९९२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९४९

लो. टिळकांचे केसरींतील लेख

भाग २ रा

लो. टिळकांचे
केसरीतील लेख

REFBK-600246 1

ग्रंथ संग्रहालय
नं. ...

लो. टिळकांचे केसरींतील लेख

भाग २ रा

[राजकीय—खंड २ रा]

प्रकाशक:—केसरी—मराठा संस्था, पुणें.

सन १९२४ किं. रु. ३

प्रकाशकः—न. चिं. केळकर, पुणें.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
" जगद्धितेच्छु छापखाना," ९०७ शनिवार, पुणें.



लो० बाळगंगाधर टिळक.

(१८९८ साली सुटका झाल्यानंतरचा फोटो.)

प्रस्तावना.

प्रस्तुतचा ग्रंथ हा लो० टिळकांनीं केसरींत लिहिलेल्या राजकीय लेखांचा दुसरा खंड किंवा हप्ता होय. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत आम्ही सुचवून ठेविल्याप्रमाणें या दुसऱ्या खंडांतील पहिला लेख " घुनश्च हरिः ॐ " हा असून त्यांत लोकमान्यांनीं केलेलें आपल्या मनोवृत्तींचें अविष्करण किती तेजस्वी आहे हें वाचकांस दिसून येईलच. घुढें आरंभिलेल्या स्वाध्यायाला त्यांनीं, आपल्या सर्व मदतगारांचे उदारपणें आभार मानून म्हणजे वैदिक पद्धतीनें लौकिक ऋण फेडून, या लेखापासून सुरवात केली. आपल्या घुढील कार्यक्रमासंबंधानें त्यांनीं असें जाहीर केलें कीं कायदा बदलला असेल तर तो लक्षांत बाळगूं तथापि ज्या कालीं कायद्यानें जितकी मोकळीक दिली असेल तिचा पूर्ण फायदा घेऊन निर्भयपणें आपण लोकमत जागृति करूं व जनतेच्या हक्कांचें समर्थन करूं. या निर्भय उक्तींत ठेवलेला 'हातचा' आज कायदेभंग हा शब्द सर्वसामान्य होऊन बसल्यावर कित्येकांच्या कानाला कसासाच लागेल. तथापि तो लेख सन १८९९ सालांतील आहे येवढीच गोष्ट लक्षांत ठेविली असतां घुरें होईल. तसेंच या खंडाच्या अग्रेरचा म्हणजे परिशिष्टाच्या पूर्वीचा लेख 'हिंदुस्थानची वाट काय' या विषयावरचा छापलेला आहे. त्यांतील शेवटचीं वाक्यंहि वाचकांनीं ध्यानांत धरण्यासारखीं आहेत. हा लेख सन १९०५ च्या आगष्ट महिन्यांतील म्हणजे बनारस कॉंग्रेसच्या आधीं लिहिलेला आहे. त्यांत लो० टिळक लिहितात " हिंदुस्थानास प्रांतिक स्वातंत्र्य दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं, अशी विलायतेतील लोकांची खात्री करून देणें महत्प्रयासाचें काम आहे खरें पण त्यास इलाज काय ? तो प्रयास जर आमचे हातून होत नसेल तर उगीच वायफळ बोलण्यांत कांहीं हंशील नाहीं." या वाक्यांतील सुधारणांविषयींची टिळकांची विधायक सूचनाहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. प्रस्तुत खंडाचे हे आद्यंत लक्षांत घेतले म्हणजे या लेखांनीं आक्रमिलेल्या पांच सहा वर्षांत टिळकांचें साध्य व साधन हीं कोणचीं होतीं हें उघड दिसून येईल.

प्रस्तुत ग्रंथांत प्लेग, दुष्काळ, स्थानिक स्वराज्य, दडपशाही, लष्करी खर्च, जमीन महसुलाचा कायदा, होळकर सरकारचा राजिनामा व कर्झनशाहीचा प्रारंभ हे टिळकांच्या लेखांचे प्रमुख विषय आहेत. वरील अनेक विषयांवरचीं लो. टिळकांचीं मतें महाराष्ट्रास सामान्यतः अवगत असलीं तरी त्यांवरील टिळकांचे स्पष्टोक्तिपूर्ण व बाणेदार लेख वाचणाऱ्यांस त्या जुन्या

काळीं आपण प्रत्यक्ष असल्याचा भास तर होतोच पण राजकारणाच्या त्या त्या विषयांत विद्यमान स्थितिपेक्षांहि भावी स्थिति कल्पनेनें आकलन करून ती लक्षांत घेऊन लिहिलेले त्यांचे लेख दूर दृष्टीचें कसे ठरतात याचाहि वाचकांस अनुभव येतो. तथापि या खंडांतील लेख राष्ट्रीय चळवळीच्या खऱ्या प्रारंभापूर्वीचे आहेत व त्यांत ध्येयवादी टिळकांपेक्षां विवेकवादी टिळकच अधिक दृग्गोचर होतात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. या राष्ट्रीय चळवळीचा खरा प्रारंभ बंगभंगापासून व बनारसच्या राष्ट्रीय चळवळीपासून होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून यापुढील खंडांत याहिपेक्षां वाचनीय असें टिळकांचे लेख जे येणार ते वाचण्याला या खंडांतील लेख वाचून होणारी पूर्व तयारी वाचकांनीं करून ठेवावी व यापुढचा खंड आम्हीं यापूर्वीच हातीं घेतला असून तो वाचकांच्या हातीं लवकरच देऊं अशी आम्हांस उमेद आहे.

पुणें.
ता. ९ जानेवारी १९२४. } न. चिं. केळकर.

लो. टिळक यांचे केसरींतील लेख

राजकीय खंड भाग २

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
प्रस्तावना	१–२
सन १८९९ पृष्ठ १ ते १०२.	
१ पुनश्च हरिःॐ ...	१
२ हिंदुस्थानांतल्या प्रजेची अस्वस्थता	१२
३ हिंदुमुसलमानांमधील दुही	१७
४ उडाणटप्पूंचा कायदा व गरिबांचा काळ ...	२२
५ प्लेग टोंचणें, प्लेगची लस व प्लेगवरील उपाय ...	२८
६ शिवाजी आणि ब्राह्मण	३४
७ सरकारच्या मनांतील खव-खव केव्हां जाणार !	४१
८ सरकार सरकारचें भांडण	४७
९ स्थानिक स्वराज्याची पिछेहाट	५१
१० मुंबई इलाख्यांतील स्थानिक स्वराज्यावर घाड ...	५६
११ परदेशांतील लोकांकरितां आमचा छळ आणखी किती दिवस होणार ! ...	६१
१२ फेरपहाणीचा जुलूम...	६६
१३ खासगी शिक्षणावरील सर-कारची करडी नजर...	७२
१४ इनॉक्युलेशन प्रकरण (डॉ. भालचंद्रविरुद्ध केसरीकार)... ...	७८
१५ प्लेग टोंचणें आणि अली-कडील शास्त्रीय शोध	९३
१६ ग्रहण सुटलें... ...	९८
सन १९०० पृष्ठ १०३ ते २१८.	
१७ लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द	१०३
१८ नं. २	१०८
१९ नं. ३	११५
२० लॉर्ड सँढर्स्टचे प्रभावळींतील मंडळी	१२८
२१ प्लेग टोंचण्यासंबंधानें सर-कारी ठराव	१३३
२२ दुष्काळांत साऱ्याची तहकुबी व सूट	१४०
२३ दुष्काळाची व्यवस्था	१४८
२४ दुष्काळांत साऱ्याची तहकुबी ...	१५२
२५ दुष्काळाचीं कारणें. ...	१५६
२६ इनॉक्युलेशन कमिशन	१६१
२७ साऱ्याची सूट व तहकुबी	१६४
२८ लॉर्ड नॉर्थकोट यांचे दुष्काळव्यवस्थेबद्दल... विचार	१६९
२९ पुण्यावर पन्नास लाखांची घाड	१७३
३० ,, ,, ,, ,,	१७७
३१ ,, ,, ,, ,,	१८३

	विषय	पृष्ठें
३२	पुण्यांतील प्लेगव्यवस्था	१८८
३३	ना. जाइल्स साहेब यांचें राजद्रोहाचें पिसें ...	१९३
३४	ना. जाइल्स यांचीं ... मुक्ताफळें	१९८
३५	तेरा मुद्यांचा पुरावा	२०६
३६	ना. जाइल्स साहेब यांची ओंवाळणी	२१०
३७	प्लेगच्या खर्चाचें ... ओझें	२१५

सन १९०१ पृष्ठ २१९ ते ३००

३८	महाराणी सरकारची... कारकीर्द	२१९
३९	लॉर्ड कर्झन यांचीं बारा महत्कृत्यें.	२२३
४०	श्रीशिवजयंत्युत्सव ...	२२९
४१	ब्रिटिश सरकार व ... लोकशिक्षण... ...	२३३
४२	खिस्तीधर्म व हिंदुस्तानांतील लोकांचें राष्ट्रीयत्व ...	२३८
४३	शेतकऱ्यांनों व सावकारांनों सावध व्हा	२४१
४४	जमिनीची मालकी ... बुडाली	२४६
४५	सावकार मेला आणि कुणबीहि मेला ...	२५२
४६	खालसा जमीन कोणाची?	२५७
४७	बिलाचें तत्त्वच आम्हांस मान्य नाहीं. ...	२६२
४८	नवीन बिल व लोकमत	२६७
४९	उठा अजून वेळ गेली नाहीं.... ...	२७०

	विषय	पृष्ठें
५०	नवीन बिलाची आरती	२७४
५१	दुराग्रही सरकार आणि निर्बल लोकमत ...	२७८
५२	आमचीं कायदे कौन्सिलें थट्टा आहे काय ! ...	२८३
५३	डोंगर पोखरून उंदीर निघाला	२८८
५४	दोन चांगलीं पुस्तकें	२९२
५५	भरभराटलेलें इंग्रजी हिंदुस्थान	२९६

सन १९०२ पृष्ठ ३०० ते ३८३.

५६	हिंदुस्थानचें दारिद्र्य..	३००
५७	अनावर राज्यविस्तार	३०४
५८	हिंदुस्थानची अंतर्व्यवस्था	३११
५९	११० कोट रुपया कसा उडतो !	३१७
६०	कामिशनांचा हंगाम...	३२२
६१	लष्करी खर्चाचें ओझें कमी होण्याची आशा आहे काय !	३२६
६२	लष्करी खर्चाचें ओझें	३३२
६३	जमिनीच्या हक्काची नोंद	३३६
६४	,, ,, ,,	३४०
६५	हिंदुस्थानच्या भरभराटीची दंतकथा	३४३
६६	आमचे उद्योग धंदे कसे ठार झाले ! ...	३४७
६७	आणखी गोरें सैन्य ... पाहिजे ! !	३५४
६८	कंपनी सरकार व इंग्रज सरकार	३६०

	विषय	पृष्ठ
६९	आमचीं मनेंच फिरलीं ... पाहिजेत !	३६६
७०	प्लेगोबास पंजाब सरकारनें दिलेले बळी ...	३७२
७१	पाच्छाहीपणा कां ... गुलामगिरी ! ...	३७७

सन १९०३ पृष्ठ ३८४ ते ४९०

७२	श्री. महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर केला !	३८४
७३	राजीनामा कां बडतर्फी!	३९०
७४	व्हाइसरॉय साहेबांच्या शिळोप्याच्या चार गप्पा	३९५
७५	पोलीस खात्याची सुधारणा	४०३
७६	,, ,, ,,	४१०
७७	दुष्काळ कोडाची फिरून एकवार दुरुस्ती ...	४१७
७८	पूर्वेकडील लोकांचें ... विचारैक्य	४२२
७९	मुंबई इलाख्यांतील जमीन धाऱ्याची पद्धत ...	४२६
८०	आशिया खंडांतील ... कारस्थानें	४३२
८१	साम्राज्याचीं बंधनें ...	४४१
८२	नं २	४४४
८३	मुंबईच्या शेतकी खात्याची सुधारणा	४५०
८४	नवें खोतीबिल ...	४५५
८५	सुशिक्षितांचीं कर्तव्यें	४६३

	विषय	पृष्ठ
८६	शेतकऱ्यांच्या व कारागिरांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या	४६८
८७	शेतकऱ्यांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या ...	४७३
८८	मलबारी आणि कॉंग्रेस	४७८
८९	ह्यूमसाहेबांचा कॉंग्रेस भक्तांस अखेरचा निरोप ...	४८४

सन १९०४ पृष्ठ ४९० ते ५६९

९०	धंदेशिक्षण आणि ... सरकार	४९०
९१	उत्तम गुराखी कोण !	४९६
९२	हिंदुस्थानसरकारचा शिक्षणावरील नवा ठराव ...	५०३
९३	आमचे बोलघेवडे ... व्हाइसरॉय	५०८
९४	धूर्त कोण आणि ... फसला कोण ! ...	५१३
९५	आंकडयांचें गौडबंगाल	५१८
९६	नं. २	५२४
९७	राजकीय ळचवळीची नवी दिशा	५२९
९८	मराठी आणि इंग्रजी 'काळ'	५३४
९९	कुलकर्ण्यांच्या हक्कांवर गदा	५४७
१००	वेडरबर्न साहेबांचा ... ताजा निरोप	५५१
१०१	जपान आणि हिंदुस्थान	५५८

विषय		पृष्ठें
१०२	वेळ तर हीच आहे !	५६३

सन १९०५ पृष्ठ ५६९ ते ५९८

१०३	खोटे कोण ? ...	५६९
१०४	रोल्ट प्रकरण आणि सरकारी अन्याय ...	५७७
१०५	परवश झालेल्या नेटिव अंमलदारांचें मानसिक दौर्बल्य	५८१
१०६	इंग्रजी राज्याची कदर	५८९
१०७	हिंदुस्थानची वाट ... काय ?	५९४

परिशिष्ट सन १८९९.

खोतीच्या हक्कावर घाला नं. १—६. ५९९–६२६

ग्रंथ संग्रहालय पुणे
दा. क्र. २४०१
ग्रंथ संग्रहालय
सं. नि. क्र. ३७२
दि. २०-४-२५

लो. टिळकांचे केसरींतील लेख

* पुनश्च हरिः ॐ !

जवळ जवळ दोन वर्षांच्या कर्मलोपानंतर पुनः स्वाध्यायास सुरवात करण्यापूर्वी ज्या जगच्चालकाच्या कृपेनें आजचा दिवस प्राप्त झाला त्याचें अंतःकरणपूर्वक स्मरण करणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे. मनुष्य कितीहि कर्मवादी असला व मृत्पिंडाप्रमाणें आपल्या आयुष्याचा क्रम वाटेल तसा बनवितां येईल अशी जरी त्याची उमेद असली तरी जगांतील पुष्कळ गोष्टी आपल्या हातच्या नसून कोणत्याहि कामांत यश अगर अपयश येणें हें बऱ्याच प्रसंगीं या आपल्या हातीं नसलेल्या गोष्टीवर अवलंबून असतें हें कोणासहि कबूल करावें लागेल. अशा स्थितींत ह्या बाह्य साधनांची सर्वांशीं किंवा त्याहून कांहीं कमी प्रमाणानें अनुकूलता असणें हें ईश्वरी कृपेचेंच फल मानलें पाहिजे. प्रस्तुतच्या लेखकावर अशा तऱ्हेचा प्रसंग पहिल्यानेंच आला होता असें नाहीं. परंतु त्यांतून पार पडून पुनः आज आपलें पूर्व कर्तव्य करण्यास त्यास जें सामर्थ्य आलें आहे तें त्याच्या दृष्टीनें तरी कांहीं अमानवी कारणामुळें आलेलें आहे; व त्याबद्दल ज्याच्या कृपेनें ह्या गोष्टी घडून येतात त्याचें पुनः एकवार स्मरण केल्याखेरीज, अथवा व्यावहारिक भाषेनें बोलणें असल्यास आभार मानल्याखेरीज त्याच्यानें राहवत नाहीं.

मनुष्य जन्मतःच तीन ऋणें पाठीवर घेऊन जन्मलेला आहे, अशी आमच्या लोकांची पूर्वापार समजूत आहे, 'जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभि ऋणवा जायते' अशी श्रुति आहे, व आधुनिक विचारपद्धतीनें विचार केला असतां ती अगदीं यथायोग्य आहे असें दिसून येईल. कोणाहि मनुष्याचा जन्म झाला म्हणजे लागलीच त्याच्या पाठीमागें वर सांगितलेल्या तीन जबाबदाऱ्या अथवा ऋणें लागतात; व तीं फेडण्याकरितां त्यानें आमरणांत आपल्या बुद्धि वगैरेंचा उपयोग केला पाहिजे असें वरील श्रुतींत सांगितलेलें आहे. हीं जन्मतः प्राप्त झालेलीं ऋणें आमच्या पाठीमागें आहेतच. पण तीं फेडण्याचा प्रयत्न करीत असतां मध्यंतरी पूर्वीच्या ऋषींनीं वरील श्रुतींत अनुक्त असें जें एक नवीन

लौकिक ऋण

उपस्थित झालेलें आहे, त्याचाहि उल्लेख आजच्या प्रसंगीं करणें अवश्य आहे. हें

---

* [केसरी ता. ४ जुलै १८९९]

ऋण म्हटलें म्हणजे, केसरीवरील गेल्या संकटाचे वेळीं महाराष्ट्रांतील अगर मुंबई इलाख्यांतीलच नव्हे, तर इतर इलाख्यांतीलहि ठिकठिकाणच्या लोकांनीं आपपरभाव अगर दुसरे भेद मनांत न आणतां अंतःकरणपूर्वक कळकळीनें द्रव्यद्वारा किंवा अन्य तऱ्हेनें जी केसरीकारास मदत केली, त्यापासून उद्भवलेलें होय. ज्या वेळीं प्रस्तुतच्या लेखकाची तुरुंगांतून सुटका झाली, तेव्हां ठिकठिकाणीं लहान मोठ्या लोकांनीं जो उत्सव केला तोहि अशाच प्रकारचा होय. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं अशा रीतीनें केलेल्या मदतीबद्दल आणि अभिनंदनाबद्दल त्यांचे ऋणांतून मुक्त होण्याचा शास्त्रीय मार्ग जर कोणी आम्हांस दाखवील तर त्याचे आम्हीं आभारी होऊं. वर सांगितलेल्या ऋणत्रयींतून सुटण्याचे मार्ग सदर श्रुतींतच सांगितलेले आहेत. पण सध्यां लौकिक ऋणाचें जें जबरदस्त ओझें आमच्यावर पडलेलें आहे त्यांतून सुटण्याची आमरणांत यथाशक्ति लोकसेवा करूनहि आशा आहे कीं नाहीं याचा आम्हांस वानवाच आहे. पुष्कळ ठिकाणांहून याबद्दल आमचेकडे जीं अभिनंदनपर पत्रें अगर लेख आलेले आहेत त्या सर्वांस व्यक्तिशः जबाब देणें कठीण आहे. तथापि आजच्या प्रसंगीं एवढें सांगणें जरूर आहे कीं, १८९७–९८ सालीं लोकांमध्यें जी चळवळ झाली तीस जरी केसरीकार एका प्रकारें निमित्तभूत झालेले होते तरी त्याचें श्रेय सर्वांशीं सरकारासच दिलें पाहिजे. प्रस्तुतच्या लेखकाच्या हातून त्यांत स्वकर्तव्यापेक्षां जास्त कांहीं घडून आलें अशी त्याची कधींहि समजूत नव्हती व अद्यापहि नाहीं. कर्तव्याचा मार्ग कित्येक प्रसंगीं कठीण असतो खरा. पण तो मार्ग कोणता याबद्दल कधींच शंका नसते; व त्या मार्गाचें आक्रमण करीत असतां प्रसंगविशेषीं चांगल्या ठिकाणींहि ठेंच लागण्याचा संभव असतो. गेल्याच्या पूर्व सालीं घडून आलेला प्रकारहि अशाच प्रकारचा होता, असा आमचा ग्रह आहे. तथापि तेवढ्यानें लोकांनीं आम्हांवर उपकाराचें ओझें करून ठेवलें आहे त्यांत कांहीं कमीपणा येत नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट त्याचें महत्त्व अधिक प्रत्ययास येतें. ज्यांस केसरीचें किंवा केसरीकाराचें नांवहि पूर्वी माहीत नव्हतें, अशा गृहस्थांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें किती खटपट केली अथवा अगदीं अनोळखी गृहस्थहि केसरीकाराकरितां पन्नास हजारांची रक्कम कोर्टांत ठेवण्यास किती उत्सुकतेनें तयार झाले, या गोष्टीचें स्मरण झाल्याबरोबर त्यांच्या उपकृतीचा डोंगर डोळ्यांपुढें उभा राहतो. ह्या सर्व गृहस्थांचे उपकार आमच्या हातून फिटणें तर कठीणच आहे. परंतु आम्ही जो आयुष्यक्रम आजपर्यंत अंगिकारिलेला आहे त्यांतच आम्हांस पूर्णपणें बद्ध करून टाकण्यास ते मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालेले आहेत एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे होईल.

दुसरी गोष्ट

केसरी पत्र

चालविण्यासंबंधाची होय. केसरीवर किंबहुना पुणें शहरावर जें एक काहूर उसळलें

होतें त्यांत केसरीकारच नव्हे तर केसरीहि लयास जातो कीं काय अशी धास्ती पुष्कळांस त्या वेळीं पडलेली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. 'राजद्रोह' हा शब्द जरी लहान असला तरी त्याचा महिमा मोठा आहे; व गणेशचतुर्थीच्या चंद्रनिरीक्षणानें जरी ह्या गुन्ह्याचा आरोप कोणावर आलेला असला तरी देखील त्याचे परिणाम पुष्कळ अनिष्टकारक होण्याचा संभव असतो. हे सर्व परिणाम जर केसरीस भोगावे लागले असते तर "हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः" अशी स्थिति ह्यापूर्वी केव्हांच येऊन ठेपली असती. ही स्थिति न येण्यास जे गृहस्थ कारणीभूत झाले त्यांत मुख्यत्वेंकरून आमचे मित्र रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व आमचे मुंबईचे बातमीदार "अनंत" हे होत. या गृहस्थांनीं आमच्या गैर हजिरींत केसरीची व तद्द्वारा महाराष्ट्राची जी सेवा केली, किंबहुना त्यास जीवितसंशयापासून बचावलें, त्याजबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. ही सेवा कोणच्या प्रकारें घडली हें वाचकांस पूर्णपणें माहीत आहेच. सांधा जितका बेमालूम जडेल, किंबहुना सांधा केला आहे कीं नाहीं याचीच परिक्षकांस भ्रांती पडेल तेव्हांच त्यांत सांधा लावणाराचें कसब दृष्टीस येतें. तशा प्रकारचा बेमालूम सांधा वरील गृहस्थांनीं जडाविला होता हें केसरीच्या वाचकांस कळून आलेलेंच असेल. रा. रा. खाडिलकर यांचें नांव जबाबदार प्रकाशकांत जरी दाखल केलेलें नव्हतें तरी केसरींतील बहुतेक एडिटोरियल लेख त्यांच्याच हातचे होते हें येथें सांगणें जरूर आहे. धैर्यानें पुढें होऊन अशा रीतीनें मदत करणारी 'अनंत' मित्रमंडळी तयार असतां, व लोकांचें वर सांगितल्या प्रकारें पूर्णपणें सहाय्य असतां केसरीस कशाचीहि भीति न वाटतां तो सदैव आपल्या कर्तव्यास जागृत राहिल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं; किंबहुना अशा रीतीनें वर्तन ठेवणें हेंच त्याचें कर्तव्य आहे असें म्हटलें तरी चालेल. आमच्या व्यवसायबंधूंपैकीं बहुतेक सर्वांनीं व विशेषतः परइलाख्यांत असूनहि अमृतबझार आणि हिंदू यांनीं अथवा मुंबईतील चँपियन वगैरे पत्रकारांनीं जो आमच्याबद्दल प्रेमभाव व कळकळ दाखविली त्याबद्दलहि फिरून येथें मनःपूर्वक त्यांचे आभार मानले पाहिजेत. कलकत्त्यांतील व मद्रासेतील चळवळीचेंचसें काय पण एकंदर त्या वेळीं झालेल्या चळवळीपैकीं बऱ्याच भागाचें श्रेय पत्रिकाकार व हिंदुकर्ते यांस दिलें पाहिजे. मुदतीपूर्वी अटकेंतून मुक्तता करण्यास प्रथमतः कोण प्रवर्तक झाले याचाहि पहिल्यानें जरा संशय होता. पण आतां ही गोष्ट मुख्यत्वेंकरून प्रो. मॅक्समुल्लरसारख्यांच्या निरपेक्ष प्रयत्नानें घडून आली हेंहि येथें नमूद करणें अवश्य आहे. थोर पुरुषांचा स्नेह निमित्तसव्यपेक्ष असत नाहीं, असें जें भवभूतीनें म्हटलें आहे तें वरील उदाहरणावरून चांगलें व्यक्त होतें.

असो. वर सांगितल्याप्रमाणें स्वाध्यायास सुरुवात करण्यापूर्वी दुसरेंहि एक

काम करणें अवश्य आहे. गेल्या दोन सालांत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्यांचा वेळोवेळीं केसरींत उल्लेख केलेलाच आहे; तथापि त्यांचा आम्ही अंगिकारिलेल्या क्रमावर कितपत परिणाम होणार आहे हें पाहण्याकरितां थोडेसें

सिंहावलोकन

करून मग पुढील मार्ग क्रमण्यास लागावें हें चांगलें. तशांत अशा रीतीनें सिंहावलोकन करण्यास सध्यांची स्थितीहि अनुकूल आहे. पुण्याचें वातावरण हल्लीं बरेंच स्वच्छ झालेलें आहे. ज्युबिलीच्या रात्रीं जें भयंकर कृत्य झालें त्या बद्दल सदर कृत्य करणारांस स्वकर्मानुरूप गति मिळून सरकारचा आमच्या शहरांतील सर्व रहिवाशांवर आलेला वहीम आमच्या मतें सर्वांशीं दूर झाला असला पाहिजे. म्युनिटिव्ह पोलीसची आमच्या डोक्यावर आलेली गदाहि सुदैवानें परत फिरली आहे. आणि प्लेगानें जरी आम्हांस अद्याप सोडलें नाहीं, तरी एकंदरींत १८९७ सालापेक्षां हल्लींचें वातावरण पुष्कळ निवळलेलें आहे असें म्हटलें पाहिजे. अशा बड्या वादळांतून आपली सुटका झाली याबद्दल परमेश्वराचे आभार मानून आपल्या गलबताची डोलकाठी, शीड, नाळ, वगैरे सामान धड आहे कीं नाहीं याची चांगल्या नावाड्यानें चौकशी करून मग आपला पुढील क्रम अंगिकारला पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे वर्तमानपत्रकाराच्या स्वातंत्र्याची गेल्या दोन वर्षांत बरीच हानी झालेली आहे असें दिसून येईल. शाळाखात्यांतील मास्तरांवर जाईल्लससाहेबांनीं पाखडलेली आग, सरकारची ग्रँट्स् इन् एड घेऊन शाळा चालविणाऱ्यांस राजकीय चळवळींत पडण्याची मनाई आणि पीनलकोड आणि क्रिमिनल प्रोसीजर यांत केलेली सुधारणा व ती अमलांत आणण्याकरितां पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांनीं स्वीकारलेली काकदृष्टी वगैरे गोष्टी मनांत आणल्या म्हणजे आमच्या गलबतावरील अथवा एकंदर वर्तमान पत्रकर्त्यांच्या गलबतावरील डोलकाठी वगैरे सामानासच कांहीं इजा झाली, इतकेंच नव्हे तर आमचे कांहीं खलाशीहि आम्हांस पुनः न मिळेसे झाले आहेत असें दृष्टीस येईल. याखेरीज पीनल कोडांतील दुरुस्तीनें आमच्या मानेभोंवतालची दोरी जास्त आवळली गेली आहे ती आहेच. अशा स्थितींत वर्तमानपत्राच्या कर्णधारकत्वाचें काम पूर्वीपेक्षां जास्त जबाबदारीचें व जोखमाचें झालें आहे हें सांगावयास नकोच. यांतून आमचें गलबत सुरक्षितपणें कसें नेतां येईल याबद्दल आम्हांसहि बरीच चिंता आहे. तथापि होतां होईल तोंपर्यंत कायदेशीर रीतीनें आपलें काम बजावण्याचा जो आमचा पूर्वींचा संकल्प आहे तो कायम असल्यामुळें याहि प्रसंगांतून पार पडण्याचें धैर्य परमेश्वराच्या कृपेनें आमच्या अंगीं येईल अशी आम्हांस उमेद आहे. केसरीकारांनीं कायद्याचें अतिक्रमण जाणूनबुजून कधींच केलेलें नाहीं व करण्याची त्यांची इच्छाहि नाहीं. केसरीकार कांहीं जहागिरदार नव्हत किंवा संस्थानिक नव्हत. करितां इंग्रजी राज्य

उलथून पाडण्यास जीं साधनें अवश्य पाहिजेत, उदाहणार्थ, हत्यारें, माणसें, वगैरे तीं त्यांस कधींहि उपलब्ध होणें शक्य नाहीं. आमच्या सरकारास ही स्थिति समजत नव्हती किंवा समजली नसेल असें नाहीं. पण बुद्धींत कोणत्याहि प्रकारच्या अभिनिवेशाचा एकदां संचार झालेला असला म्हणजे मग साध्या गोष्टीचाहि अन्यथा विपर्यास होऊन त्या अन्यरूपानेंच दिसूं लागतात. सन १८९७ च्या

पूर्वींचा राजद्रोहाचा कायदा

काय होता हें इतरांस जितकें अवगत होतें तितकेंच केसरीकारांसहि होतें; व आमची अद्याप अशी समजूत आहे कीं आम्ही त्यावेळीं जे लेख लिहिलेले आहेत ते सदर कायद्यानें घातलेल्या मर्यादेच्या आंतलेच आहेत. " जेणेकरून राज्याला धोका येईल, अथवा राज्याची उलथापालथ होऊं शकेल, अगर सरकारची कायदेशीर सत्ता न जुमानण्यास लोकांस उत्तेजन मिळेल त्यास राजद्रोह म्हणावयाचें. " असा पूर्वींच्या कायद्याप्रमाणें राजद्रोहाचा अर्थ होता असें आम्हीच नव्हे तर सर्व कायदेपंडित त्यावेळीं समजत होते. किंबहुना ज्या इंग्रजी विद्वान कायदेपंडितानें पनिल कोडांतील १२४ अ हें कलम पहिल्यानें घातलें त्यानेंहि सदर कायदा पास होते वेळीं कायदे कौन्सिलांत अशाच रीतीनें सदर कलमाचा अर्थ आहे, असें स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें. एवढी जबरदस्त हमी मिळाल्यावर मग केसरीकाराच्या मनांत या कायद्याच्या अर्थाबद्दल कधींहि संशय येण्याचें काहीं कारण नव्हतें; व त्यानें आपले लेख सदर कायद्याच्या सदर दृष्टीनें राजद्रोही होऊं नयेत अशा बेताचेच लिहिलेले होते. पण राजद्रोहाचें हें माप सरकारास पसंत नसल्यामुळें तें संकुचित करण्याचा त्यांचा बरेच दिवस संकल्प झालेला होता म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणानें म्हणा, त्यांस आमचे लेख भयंकर वाटूं लागले. इतकें झालें तरी आमची अशी समजूत होती कीं, कायद्यांत असलेलें राजद्रोहाचें माप जर बदलावयाचें असेल तर तें नवा कायदा करून बदलतील, आणि त्यानंतर आमच्या विचारांस कोणतें स्वरूप द्यावयाचें याचा आपणांस विचार करितां येईल. परंतु ही आमची आशा व्यर्थ झाली. इंग्रजी राज्यपद्धतीप्रमाणें कायदा बदलण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक कायदे कौन्सिलांत नवें बिल आणून पूर्वींचा कायदा रद्द करून नवा कायदा करावयाचा; आणि दुसरी प्रमुख न्यायाधीशाकडून प्रचलित असलेल्या कायद्याचाच निराळा अर्थ करून घ्यावयाचा. या दोन तऱ्हांपैकीं पहिल्या रीतीनें कायद्यांत फेरफार झाला असतां तो फेरफार जेव्हां होईल त्या दिवसापासून पुढें अमलांत येत असतो. परंतु दुसऱ्या रीतीनें फेरफार झाला असतां फेरफार करणाऱ्या जज्जापुढें जो खटला असतो त्यासच तो पहिल्यानें लागू होऊन निदान

एक तरी कायद्याचा बळी

अशा वेळीं न्यायदेवतेस द्यावा लागत असतो, हें तत्त्व कायद्याचा अभ्यास करणाऱ्या सर्व लोकांस माहीत आहेच. प्रकृत स्थलीं असाच प्रकार घडून आला हें विशेष तऱ्हेनें सांगण्याची फारशी जरूर नाहीं. सरकारानें कायदेकौन्सिलांत नवें बिल आणून राजद्रोहाचा कायदा जर पहिल्यानेंच बदलला असता तर केसरीकाराचा बळी घेण्याची कांहीं अवश्यकता उरली नसती. कारण ज्या वेळीं जसा कायदा असेल त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे हें केसरीकारास पूर्णपणें अवगत आहे. पण सरकारची मनोवृत्तीच तऱ्हेवाईक झालेली असल्यामुळें त्या वेळीं प्रचलित असलेल्या कायद्याचा कोर्टामार्फत निराळा अर्थ करून घेऊन नंतर मग तो अर्थ दुसरा कोणी न्यायाधीश कबूल करणार नाहीं, अशा समजुतीनें स्टॅचीं साहेबांनीं केलेल्या अर्थास पुनः नवा कायदा करून कायदेशीर स्वरूप देऊन घेतलें तात्पर्य, कायदा बदलण्याच्या या दोन पद्धती वर सांगितल्या आहेत त्या दोन्हींचाहि एका काळींच अंमल झाल्यानें केसरीकारांस व त्याबरोबरच दुसऱ्या कांहीं वर्तमानपत्रकारांस वर सांगितल्याप्रमाणें कायद्याचे बळी व्हावें लागलें. सरकार कायदे फिरविण्यास पूर्ण समर्थ आहे, व प्रजेस ज्या ज्या वेळीं जे जे कायदे असतील ते ते मानले पाहिजेत, हें तत्व आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. आम्हांस बेकायदेशीर कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं. आजपर्यंत किंवा १८९७ सालापूर्वी आम्हीं जे लेख लिहिले ते त्यावेळच्या कायद्यानें जी मोकळीक दिली होती तिचा पूर्ण फायदा घेऊन लिहिलेले होते. ती मोकळीक सरकारास जर फाजील वाटत होती तर त्यांनीं तो कायदा रीतीप्रमाणें बदलून मग आम्हीं नव्या कायद्याप्रमाणें चालतों कीं नाहीं हें बघावयाचें होतें. पण तसें न करितां आम्ही मोकळीक दिली व तिचा अर्थ जरी अमुक होतो असें स्पष्टपणें कायदेकौन्सिलांत सांगितलें तरी आमच्या मनांतलि अर्थ निराळा होता, अशा सबबीवर पूर्वीच्या कायद्याप्रमाणें चालणाऱ्या माणसास एकदम खड्यांत घालण्याचा अपूर्व मार्ग सरकारनें स्वीकारला. आमचे हातांत शस्त्रें नाहींत व तीं घेण्याचेंहि आमचे मनांत नाहीं; परंतु सरकारनें जी मोकळीक दिली असेल तिचाच पूर्ण उपयोग करून आमचें सार्वजनिक कर्तव्य बजावण्याचा आमचा इरादा आहे. सरकार आम्हांस किती मोकळीक देतें तें सरकारनें एकदां इमानेंइतबारें आम्हांस सांगावें; म्हणजे आम्ही त्याप्रमाणें वागूं. आम्हांस ज्या कांहीं गोष्टी कर्तव्य आहेत त्या राजद्रोहाच्या नाहींत. त्या शब्दानें कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याचबद्दल कायतो वाद आहे. करितां ही मर्यादा जर सरकार एकदां कायमची ठरवील तर त्यांत आमचें हितच आहे. मर्यादा कितीहि संकुचित असली तरी त्याची आम्ही काळजी करीत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे कीं, संकुचित मर्यादेंतच आपले सर्व विचार व्यक्त करणें यांतच जास्त कसब आहे. मैदानावर

कसरत करण्यापेक्षां बाटल्यांवर टेबल ठेवून त्यावर कसरत करणाराची करामत जास्त हें सर्वत्रांस माहीत आहेच. व तोच न्याय प्रकृतस्थलींहि लागू आहे. सरकारनें मात्र आपली मर्यादा कायती निश्चित ठरवावी, व तींत पुन्हां फेर-बदल करणें असल्यास कायद्यानें करावा, बळी घेऊन करूं नये एवढीच कायती आमची सरकारास विनंति आहे. कायदेशीर मोकळिकीची एकदां इयत्ता ठरली म्हणजे त्या इयत्तेंत वागण्यास आम्ही तयार आहों. त्या इयत्तेचा जितका फायदा घेतां येईल तितका घेण्यास मात्र आम्ही कधींहि कचरणार नाहीं, किंबहुना तसा फायदा घेणें हें आमचें एक प्रकारें कर्तव्यच आहे असें आम्ही समजतों.

हल्लींच्या कायद्यासंबंधानें जे दोन विचार सुचले ते येथें दाखल केले आहेत. परंतु तेवढ्यानेंच सध्याच्या वस्तुस्थितीचें व साधनसामुग्रीचें परीक्षण पूर्ण झालें नाहीं. मागें सांगितलेल्या दृष्टांताप्रमाणें नौकेच्या कर्णधारास वायूची गति ज्याप्रमाणें लक्ष्यांत धरावी लागते त्याचप्रमाणें नौकेची स्थितीहि लक्षांत धरली पाहिजे. सन १८९७ सालीं ज्युबिलीच्या दिवशीं झालेल्या खुनामुळें सरकारचें डोकें ठिकाणावर नव्हतें हें तर खरेंच. पण बुजऱ्या बैलास किंवा माजलेल्या हत्तीस छू म्हणणारा कोणी तरी एखादा गृहस्थ असल्याखेरीज त्याची मुसंडी एखाद्या विशिष्ट व्यक्तीकडे किंवा पदार्थाकडे वळत नाहीं, असा सामान्य सिद्धांत आहे. याप्रमाणें पाहिलें म्हणजे सरकारची वक्रदृष्टी १८९७ सालीं कांहीं वर्तमानपत्र-कर्त्यांकडेसच लागण्यास कोणी तरी मध्यंतरी

आगींत तेल ओतणारे गृहस्थ

कारणीभूत झाले असावेत असें वाटणें स्वाभाविक आहे, व त्याप्रमाणें स्थितीहि आहे असें आम्हांस मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. पुण्यांत ज्यावेळीं मॉडरेशनचें नवीन पोलिटिकल स्कूल निघालें त्यावेळींच यांचें पर्यवसान अशा प्रकारें होईल अशी आम्हांस वाटलेली धास्ती आम्ही प्रदर्शित केलेली होती. व त्या वेळच्या आमच्या लेखाबद्दल कित्येकांनीं आम्हांस नांवेंहि ठेविलीं असतील. परंतु होणारी गोष्ट कांहीं चुकत नाहीं, असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. एका हिंदूनें किंवा नेटिव्हानें त्याचा आणि दुसऱ्याचा कांहीं बाबतींत मतभेद असला म्हणून आपल्या प्रतिपक्षाच्या लेखाचा विपर्यास करून त्यास राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करणें व तो खड्ड्यांत पडला म्हणजे आनंद मानणें यासारखें अश्लाघ्यपणाचें दुसरें कृत्य नाहीं असें आम्हीं समजतों. असली मंडळी फारच थोडी किंबहुना हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकी थोडी आहे हें एक सुदैवच आहे. पण तशी मंडळी आहे, व ती या धंद्यास प्रवृत्त झालेली आहे, याबद्दल आम्हांस बिलकुल शंका राहिलेली नाहीं, व म्हणूनच आजच्या प्रसंगीं मुद्दाम त्यांचा उल्लेख केलेला आहे. सरकारापेक्षां याच मंडळीची आम्हांस जास्त काळजी घेतली पाहिजे. कारण

आम्हीं ज्या भाषेंत लिहितों त्या भाषेचें मर्म अथवा लिहिणाराचें हृद्गत सरकारास कधींहि पूर्णपणें अवगत होण्याचें साधन नसल्यामुळें या चहाडबुचके मंडळीस अथवा क्लबास आपले घरबुडवेपणाचे व्यापार सुरू ठेवण्यास चांगली सवलत मिळालेली आहे. या मंडळींनीं लोकांचें आजपर्यंत बरेंच नुकसान केलेलें आहे. व पुढेंहि तोच क्रम चालू ठेवण्याचा त्यांचा इरादा दिसतो. करितां वेळींच सावध राहून यांचा होईल तितका प्रतिकार करावा, अशी आमची सर्वत्रांस सूचना आहे. उघड शत्रु पुरवेल, पण अशा रीतीचे लोक त्याच्यापेक्षांहि भयंकर आहेत हें आम्हीं सांगावयास नकोच. पुण्यांत खून झाल्याबरोबर त्याचा कोणत्या तरी विशिष्ट वर्तमानपत्रांतील लेखांशीं संबंध जोडण्याची कल्पना केवळ सरकारच्याच डोक्यांतून निघालेली असेल असें आम्ही समजत नाहीं. कसेंहि असो; एवढी गोष्ट मोठी समाधानकारक आहे कीं, खटला चालते वेळीं किंवा त्यानंतर कित्येक महिनेपर्यंत केसरीकार अटकेंत असतांना होईल तितकी बारीक चौकशी करूनहि सदर खुनांचा केसरींतील लेखांशीं प्रत्यक्ष किंवा परोक्ष संबंध जोडतां आला नाहीं. या अनुभवावरून तरी आमचें सरकार शहाणें होऊन वर सांगितलेल्या आगींत तेल ओतणाऱ्या गृहस्थांची खरी योग्यता त्यास कळून येईल अशी आम्हांस आशा आहे. उगीच राजद्रोह येथें आहे, तेथें आहे, अमुक शाळेंत आहे, पुण्यांतील पोरांत आहे अथवा शिवाजी उत्सवांत आहे अशा रीतीनें वेड्यासारखें धुंडाळीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्रजी राज्य उलथण्याचें आम्हीं मनांत आणलें तरी तें उलथावयाचें नाहीं, अशी आमचीचशी काय पण ज्यास हल्लींच्या वस्तुस्थितीचें थोडें बहुत शिक्षण मिळालेलें आहे त्याची पूर्ण खात्री झालेली आहे; व या शशविषाण–प्राप्त्यर्थ कोणीहि उद्योग करण्यास प्रवृत्त व्हावयाचें नाहीं. सरकारचा जर यासंबंधानें निराळा समज झालेला असला तर तो चुकीचा आहे. प्लेगच्या अनिवार जुलमामुळें कांहीं लोक घोरकृत्यें करण्यास प्रवृत्त झाले, हा दोष हल्लींच्या शिक्षणाचा किंवा विशिष्ट शहरांतील चळवळींचा नाहीं, हें पुण्याखेरीज इतर ठिकाणीं जे प्लेगमुळें दंगेधोपे व खून झाले त्यांवरून स्पष्ट सिद्ध झालेलें आहे. एका साहेबाचा खून झाल्यानें इंग्रजी राज्याचें केंसाइतकेंहि वांकडें होत नाहीं, हें न समजण्याइतके मूर्ख लोक पुण्यांत आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. प्लेगसारख्या विशिष्ट कालीं कांहीं पुंडाई होणें हें समाजाची एकंदर स्थिति लक्षांत आणतां कांहीं विलक्षण नाहीं, ही गोष्ट प्लेगच्या पूर्वीहि सरकारच्या लक्षांत होती; परंतु प्रसंगाच्या वेळीं ती जितकी त्यांच्या ध्यानीं रहावी तितकी राहिली नाहीं हें आमचें दुर्दैव होय. असो, झालेल्या गोष्टी पुन्हां परत घेतां येत नाहींत, करितां त्याबद्दल विशेष चर्चा करण्याऐवजीं पुढच्या क्रमाकडेच आपणांस लक्ष दिलें पाहिजे.

सभ्यां पुण्याची स्थिति

काय आहे याचें थोडक्यांत वर निदर्शन केलेलेंच आहे. सरकारनें धारण केलेल्या उग्र स्वरूपामुळें आणि प्लेगच्या धामधुमीनें आमच्या शहरांतील बहुतेक चळवळी स्तिमित झालेल्या आहेत. या थंडावलेल्या संस्थांस पुन्हां उभारा आणून आपलें काम अव्याहत चालू ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य कर्म आहे; परंतु हें काम हल्लीं जी दुही आहे ती मोडल्याखेरीज कधींहि तडीस जावयाचें नाहीं. सुधारक गैर–सुधारक या सामाजिक भेदापासून मॉडरेशन ऊर्फ नेमस्तपणा आणि एक्स्ट्रीम अथवा जहाल जाणारे, हा जो भेद करण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला होता त्याची गेल्या दोन वर्षांत काय वाट झाली हें दोन्ही पक्षांनीं लक्षांत आणावें. आम्ही आपापसांत एकमेकांस मोर आणि डोमकावळ्याची उपमा देऊन एकमेकांचा कितीहि उपहास केला तरी गरूडपक्षी जरूर लागेल तेव्हां दोघांसाहि एकसारखीच थप्पड देण्यास तयार असतो हें गेल्या दोन वर्षांच्या अनुभवावरून जर अद्याप आपल्या लक्षांत आलें नाहीं, तर आमच्या बुद्धीच्या तीव्रतेची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे. खटला होणें हेंच काय तें एक जहालपणाचें लक्षण असें जर कोणी म्हणेल तर त्यास उत्तर एवढेंच आहे कीं, त्या वेळीं आपणास नेमस्त म्हणविणाऱ्या कित्येक व्यक्तींवर व पत्रांवर केसरीकर्त्याप्रमाणेंच खटले झाले असते पण ते न होण्याचें कारण मात्र वेगळें होतें. आम्हीं आपल्याला मॉडरेशनिस्टस् म्हटल्यानें सरकारच्या दृष्टीनें मॉडरेशनिस्टस् होत नसतों हें जाइल्स-साहेबांनीं काढलेल्या सरक्युलरावरून उघड होत आहे. इंग्रजी राज्यांत सरकाराकडून प्रजेस जे हक्क मिळाले पाहिजेत त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. हे हक्क कोणते हें लोकांस समजावून देण्याची व त्याप्रमाणें त्यांस सरकारास मागणी करण्यास सांगण्याचीहि अवश्यकता आहे, याबद्दलहि मतभेद नाहीं. इतकें झाल्यावर नेमस्तपणा आणि जहालपणा तो कशांत रहाणार ? बोलण्याची आणि लिहिण्याची इयत्ता जी कायद्यानें ठरली जाईल ती दोघांसहि मान्य केली पाहिजे. आतां भेद राहिला तो एवढाच कीं लोकांस कोणचे हक्क मिळाले पाहिजेत याबद्दल त्यांची व सरकारची समजूत घालण्यांत जो एकनिष्ठपणा दाखविला पाहिजे तो ठेवावयाचा, किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याची गैरमर्जी झाली किंवा होईल म्हणून भीतीनें आम्हांस जी गोष्ट खरी वाटत आहे ती कायदेशीर रीतीनें बोलल्याबद्दलहि ' क्षमस्व परमेश्वर ' म्हणून प्रार्थना करून मोकळें व्हावयाचें. सरकारनें आम्हांस बोलण्याची व लिहिण्याची जी मोकळीक दिली आहे ती त्यास जास्त वाटल्यास तें केव्हांहि कमी करण्यास समर्थ आहे. परंतु ज्याकालीं कायद्याप्रमाणें जितकी मोकळीक दिलेली असेल तिचा पूर्ण फायदा घेऊन लोकमत जागृत करण्याचें व सरकारापाशीं आम्ही मागत असलेल्या हक्कांचें समर्थन करण्याचें जें काम आम्हीं पतकरलें आहे तें काम निर्भयपणें चालवणें

आम्हांस जरूर आहे. आम्हांस दिलेली मोकळीक आधींच कमी झालेली आहे; आणि त्यांत नेमस्त आणि जहाल असे भेद करणें म्हणजे आज जी पेज पिण्यास आपणास मिळत आहे तींतहि आणखी पाणी ओतून ' वाः ही काय गुळचट झाली आहे ' असें म्हणून मिटक्या मारीत बसण्यारखें आहे. केसरीकारांचें मन जात्याच अशा मार्गाकडे प्रवृत्त झालें नसल्यामुळें त्यांस हा मार्ग पसंत नाहीं हें सांगावयास नकोच; पण विचारदृष्ट्या तरी हा ग्राह्य ठरतो कीं काय ह्याचा लोकांनीं संथपणें विचार करून आज दोन वर्षें उच्छिन्न झालेल्या संस्था हल्लींच्याच कायद्याप्रमाणें कां होईना पण होईल तितक्या नेटानें चालवाव्या अशी त्यांस आमची प्रार्थना आहे. पुण्याचें जें कांहीं गेल्या दोन वर्षांत नुकसान झालें आहे त्यास आपसांतील दुही बऱ्याच अंशीं कारण झालेली आहे. वर सांगितलेल्या आगींत तेल ओतणाऱ्या मंडळीचा उद्भवहि परंपरेनें ह्या दुहीपासूनच झालेला आहे म्हणण्यास हरकत नाहीं. ही मंडळी फार थोडी आहे; व ती कोठेंहि असली तरी त्याबद्दल सर्वांनीं एकसारखीच तिरस्कारबुद्धी दाखविली पाहिजे. अमुक लोक आमच्यापेक्षां जरा नेटानें काम करणारे आहेत म्हणून, अथवा त्याच्या मागण्या सरकारास आवडण्यासारख्या नाहींत म्हणून ते राजद्रोही आहेत, अशा प्रकारचा आपल्या मनाचा खोटाच समज करून घेऊन एकमेकांपासून अलिप्त राहण्याची जी तऱ्हा निघालेली आहे, ती मोडून टाकून निदान ज्या प्रकरणीं मतैक्य आहे त्या प्रकरणीं तरी एकत्र जमून सर्वांनीं एकत्र मिळून एक दिशेनें उद्योग करणें हें हल्लींच्या स्थितींत पुणेंकरांचें पहिलें कर्तव्य होय. अमक्यानें अमक्याचें अभिनंदन केलें नाहीं, कीं घे टाइम्सकडे धांव, अशा तऱ्हेचा मूर्खपणाचा बाजार माजवण्यांत धन्यता मानून घेण्याचें आम्ही सोडून दिलें पाहिजे. कोणीहि सुशिक्षित मनुष्य इंग्रजी राज्य उलथण्याच्या किंवा रक्तस्राव करण्याच्या बेतांत सामील असूं शकणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेऊन कोणाबद्दल जर आपला तसा समज होत असला तर तें आपल्या अज्ञानाचें फल आहे, अशी मनाची प्रवृत्ति ठेवून तो गैरसमज दूर करून घेतला पाहिजे. मतभेद पुष्कळ बाबतींत असूं शकेल व खुळचट लोकहि सर्व पक्षांत व सर्व ठिकाणीं आढळण्यांत येतील. एका हाताचींच बोटें घेतलीं तर तीं सारखीं नसतात; पण खाणेंपिणें वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार करण्याचे वेळीं त्या सर्व बोटांचें साहाय्य लागतें. हाच न्याय हल्लींच्या प्रसंगींहि सर्वांनीं लक्षांत ठेवला पाहिजे. सामाजिक सुधारणा वगैरे गोष्टी करतांना तुम्ही कांहीं लिहिलें किंवा बोललेत तर त्याबद्दल सरकारास कांहीं फारशी पर्वा नाहीं, परंतु राजकीय बाबतींत कोणी कांहीं बोललें कीं सरकारचें मन तेव्हांच संशयग्रस्त होऊन दृष्टीहि कावरीबावरी होऊ लागते. अशा वेळीं सर्वांनीं एकनिष्ठपणानें व एक दिलानें वागून आम्हीं आमच्यापैकीं कोणीहि कोणतीहि योग्य मागणी केलेली असल्यास ती बरोबर आहे असेंच सरकारास भासविण्यास

झटलें पाहिजे. त्यावेळीं इतर मतभेद मनांत आणून ती अमक्यानें केली म्हणून वाईट, अशा प्रकारें ती हाणून पाडणें कोणासहि श्रेयस्कर नाहीं. राजकीय हक्कच आम्हास नकोत अशी ज्यांची समजूत असेल अथवा सगळ्या सामाजिक सुधारणा झाल्यावर मग राजकीय हक्कांकडे वळावें असें ज्याचें मत असेल त्यास कदाचित् अशा प्रकारची कृति योग्य वाटण्याचा संभव आहे. पण हें मत जोंपर्यंत ग्राह्य ठरलेलें नाहीं, व ठरण्याचाहि विशेषसा संभव नाहीं, तोंपर्यंत सर्वांनीं मिळून कॉंग्रेससारख्या संस्थेनें आमच्या मनांत ज्या आशा उत्पन्न केलेल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योगास हरएक प्रकारें लागलें पाहिजे. केसरीकारांनीं आजपर्यंत हें मत आंगिकारलेंच आहे व तें हल्लींच्या कायद्याच्या दृष्टीनें त्यांत जितका फेरफार करणें त्यास अवश्य आहे तितका करून पुढें चालू ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे. आपलें अंतःकरण जोंपर्यंत शुद्ध आहे तोंपर्यंत कशाचीहि भीति बाळगण्याची जरूर नाहीं उंदीर घुशींचा कधीं कधीं उपद्रव होतो म्हणून घर बांधण्याचें सोडून देतां कामा नये असें जें पंतांचें म्हणणें आहे तेंच यथार्थ होय. आणि आमची अशी उमेद आहे कीं, हें काम करण्यास ज्या ऐक्याची अवश्यकता आहे तें पुनः पुणेंकरांस प्राप्त होऊन त्यांच्या नैसर्गिक बुद्धीचें व हुषारीचें योग्य फल निदान महाराष्ट्रांतील तरी लोकांस पुनः ध्यावयास सांपडेल.

असो. वाढतां वाढतां हा लेख बराच लांबला. परंतु संपण्यापूर्वी ज्या आश्रयदात्यांच्या मदतीनें केसरीस आजची स्थिति आलेली आहे, व ज्यांनीं खडतर प्रसंगींहि त्यास आश्रय देण्याचें सोडून दिलें नाहीं इतकेंच नव्हे तर उलट जास्त मदत केली त्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. केसरीचा प्रसार पूर्वीपेक्षांहि आतां बराच जास्त होत आहे, याचें कारण आमच्या आश्रयदात्यांचीच मेहेरबानी होय; व आमची अशी आशा आहे कीं, त्यांनीं दिलेला हा आश्रय उत्तरोत्तर वाढत जाण्यासारखी लोकसेवा आमच्या हातून घडून येवो. " अपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानं " अशी जी कविकुलगुरूची उक्ती आहे ती सर्वत्र सारखीच लागू पडते, आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आम्हीं केलेली सेवा लोकांनीं मानून घेतली हेंच काय तें आम्हांस मुख्य समाधान आहे व त्यांनीं दिलेल्या आश्रयाबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहों. ईश्वर करो आणि त्यांच्या आमच्यामधील संबंध असाच कायम राहो, एवढीच शेवटीं प्रार्थना करून हा बराच लांबलेला लेख पुरा करितों.



* हिंदुस्थानांतल्या प्रजेची अस्वस्थता

गेल्या एकदोन वर्षांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून हिंदुस्थानांतील राणी-सरकारच्या प्रजेचें मन एक प्रकारें अस्वस्थ झालेलें आहे असें पुष्कळ इंग्रज लोकांसहि वाटूं लागलें आहे, ही आमच्या मतें एक मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे. पहिल्यानें तर इंग्रजी वर्तमानपत्रकार व कांहीं इंग्रज लोक यांस ही अस्वस्थता फारच भयंकर स्वरूपाची असावी, म्हणजे त्यामुळें लोक असंतुष्ट झालेले असून ते इंग्रज सरकारचें राज्य नाहींसें करण्याच्या मसलतींत आहेत, असेंहि वाटूं लागलें होतें; पण तो समज आतां बऱ्याच अंशीं दूर झालेला आहे. प्रो. मॉरिसन यांनीं "हिंदुस्थानांतील राणीसरकारचें साम्राज्य" या विषयावर जो नुकताच एक लहानसा ग्रंथ लिहिला आहे त्यांत व 'धीरनफाल' नांवाच्या गृहस्थांनीं पायोनियर पत्रास जें एक पत्र पाठविलें आहे त्यांत हे दोन्ही गृहस्थ स्पष्टपणें असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत जी एक प्रकारची जागृति किंवा अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे तीस राजद्रोहाचें स्वरूप देणें योग्य नाहीं. लोकांना इंग्रजसरकारचें राज्य बुडवून टाकावें असें वाटत नाहीं, व त्याकरितां ते प्रयत्नहि करूं इच्छित नाहींत. तथापि एवढी गोष्ट खरी आहे कीं, त्यांचीं मनें क्षुब्ध अथवा अस्वस्थ झालेलीं असून त्यांस आपण असावें तितके सुखी नाहीं असें वाटूं लागलें आहे, व याचा दोष प्रत्यक्ष नाहीं तर परंपरेनें तरी इंग्रजी राज्य-व्यवस्थेकडे येतो अशी त्यांची समजूत होत चाललेली आहे. इंग्रज लोक व इंग्रजी राज्य हीं जर अव्वल इंग्रजीपेक्षां आतां लोकांस आवडतनाशीं झालीं असलीं तर तो या अस्वस्थतेचाच परिणाम होय, हें वर सांगितलेल्या पुस्तकांत प्रो. मॉरिसन यांनीं कबूल केलेलें आहे. प्रो. मॉरिसन यांचें पुस्तक बरेंच विचार-पूर्वक लिहिलेलें आहे. त्यांचीं मतें व अनुमानें सर्वच बरोबर आहेत असें नाहीं; पण त्यांच्या लेखांत समाधान मानण्यासारखी मोठी गोष्ट अशी आहे कीं, लोकांमध्यें हल्लीं असलेल्या अस्वस्थतेचा शांतपणें विचार करून ती काढून टाकण्याचा कांहीं तरी उद्योग झाला पाहिजे, या म्हणण्यास त्यांच्या लेखानें चांगली बळकटी आलेली आहे. प्रो. मॉरिसन यांनीं सुचविलेली व्यवस्था जर बरोबर नसली तर त्या ठिकाणीं दुसरी सुचवितां येईल; व 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या न्यायानें आज नाहीं तर उद्यां तरी या प्रश्नाचा नीट निकाल लागून आम्हा लोकांस सुखाचे दिवस प्राप्त होतील. करितां प्रो. मॉरिसन यांचीं मतें व अनुमानें कशींहि असलीं तरी त्यांनीं हा विषय हातीं घेतला व लोकांपुढें मांडला याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. हिंदुस्थानांतील प्रजा असंतुष्ट अगर राजद्रोही नव्हे,

---

* [केसरी ता. २५ जुलै १८९९]

तर अस्वस्थ आहे, हें राज्यकर्त्यांच्या जातीपैकीं कांहींजणांचे लक्षांत येण्यास इतके दिवस लागले याचेंच आम्हांस आधीं आश्चर्य वाटतें. राष्ट्रीय सभेंत आजपर्यंत झालेलीं भाषणें व ठराव जो कोणी लक्षपूर्वक अवलोकन करील त्यास आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. हिंदुस्थानांतील लोक अस्वस्थचित्त नसते तर राष्ट्रीय सभा निघाली नसती, व ती चवदा वर्षें चाललीहि नसती. राष्ट्रीय सभेनें जर लोकांच्या चित्तवृत्तींत कांहीं फरक झाला असला तर तो एवढाच कीं, हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंतील दोष जे पूर्वी कांहीं शिकलेल्या लोकांस मात्र अवगत होते ते आतां खालच्या वर्गांतील बऱ्याच लोकांस चांगले समजूं लागले आहेत. इंग्रजी राज्यांत सर्वत्र जिकडे तिकडे शांतता झाली ही गोष्ट सर्वांसच कबूल आहे; पण त्या शांततेबरोबरच व्यापार बुडाला, या देशांतील संपत्तीचा बराच भाग परदेशांत जाऊं लागला, हिमतीचीं व धैर्याचीं कामें सर्वच राज्यकर्त्यांनीं आपले हातांत ठेवलीं असल्यामुळें लोक नाउमेद व कमकुवत होऊं लागले, इत्यादि गोष्टी लोकांस आतां चांगल्या कळूं लागल्या आहेत. पण त्यामुळें इंग्रजसरकारच नको असा त्यांचा समज झाला आहे, हें म्हणणें मात्र गैरवाजवी आहे. इंग्रजी राज्य हिंदुस्थानाला सध्यांच्या स्थितींत तरी अत्यंत अवश्यक आहे. पण तें राज्य कायम ठेवून वर सांगितलेल्या बाबतींत सुधारणा करतां येणें शक्य आहे, व ती सुधारणा होईल तरच लोकांच्या मनाची अस्वस्थता मोडेल असें राष्ट्रीय सभेचें म्हणणें आहे. प्रो. मॉरिसन यांच्या मतेंही हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं सुधारणा झाली पाहिजे. पण त्यांनीं सुचविलेली सुधारणा व राष्ट्रीय सभेनें सुचविलेली सुधारणा यामध्यें पुष्कळ भेद आहे. हा भेद कोणता व ह्यापैकीं लोकांस कोणतें मत विशेष ग्राह्य होईल याबद्दल विचार पुढें एखादेवेळेस करण्याचा आमचा इरादा आहे. आज हे विचार सुचण्याचें कारण 'धीरनपाल' नामक गृहस्थानें पायोनियर पत्रांत प्रसिद्ध केलेला लेख होय. हिंदुस्थानांतील प्रजेचीं मनें वर सांगितल्याप्रमाणें अस्वस्थ आहेत, ही गोष्ट 'धीरनपाला'स मान्य आहे. पण ती अस्वस्थता कशानें मोडेल यास त्यानें आपल्या पत्रांत उपाय सुचविले नाहींत. ही अस्वस्थता उत्पन्न होण्याचीं कारणें काय आहेत एवढ्याच गोष्टीचा त्यानें आपल्या लेखांत विचार केलेला आहे, व तेवढ्याच संबंधानें आज आम्हीं येथें चर्चा करणार आहों. आम्हीं यासंबंधानें आमचें मत काय आहे तें वर सांगितलेंच आहे. इंग्रजी-राज्याचें स्वरूप पहिल्यानें लोकांस चांगलें कां भासत होतें व तेंच आतां विपरीत कां भासूं लागलें याचीं कारणें फारशीं खोल आहेत असें नाहीं. परंतु पृथ्वीवरील लोकांस पृथ्वीची गति लक्षांत न येतां ज्याप्रमाणें आकाश आपल्या भोंवतीं फिरतें आहे असा भास होतो, तद्वतच 'धीरनपाल'—मग ते इंग्रज असोत वा हिंदु असोत- यांच्या मनाची स्थिति झालेली आहे, असें आम्हांस वाटतें. एरवीं इंग्रजी राज्यांत दोष आहेत म्हणून इंग्रज सरकाराबद्दल लोक असंतुष्ट नाहींत, तर ते

परकी राजे आहेत एवढ्याकरितांच हिंदुस्थानांतील लोकांस वाईट वाटतें असें त्यांनीं म्हटलें नसतें. हिंदुस्थानांतील लोकांस परराज्याची संवय आज पुष्कळ दिवस झालेली आहे; व निवळ परकी म्हणून राज्यकर्त्यांबद्दल जर त्यांस वाईट वाटत असतें, तर लॉर्ड रिपन सारख्याचा त्यांनीं कधींहि जयोत्साह केला नसता; अथवा अकबर बादशहाची थोरवी गाइली नसती. सारांश, " अयं निजः परो वेति गणना लघुचेतसां "—हा आपला हा परक्याचा हा क्षुद्र भेद आमच्या वेदांती लोकांनीं कधींच टाकून दिलेला आहे. राज्य कोणाचेंहि असो; तें आपल्या फायद्याचें आहे कीं नाहीं, त्यापासून देशांतील व्यापाराची, उद्योगाची, संपत्तीची, विद्येची, कला-कौशल्याची अथवा लोकांच्या अंगांतल्या कर्तबगारीची दिवसानुदिवस अभिवृद्धि होत आहे कीं नाहीं हेंच आमच्या लोकांचें मुख्य पाहणें असतें. ज्या राज्यव्यवस्थेपासून वरील फायदे आम्हांस प्राप्त होतात तिच्याबद्दल आमची समाधानवृत्ति असते, व ज्या राज्यव्यवस्थेनें हे फायदे आम्हांस प्राप्त होत नाहींत, किंवा आमचा हुरूप आणि उत्साह हीं मोडलीं जातात त्याबद्दल आमचीं मनें अस्वस्थ होतात. आगगाडी, तारायंत्र, सडका अथवा पक्षकारांमधील तंटे तोडण्यास चांगलीं न्यायाचीं कोर्टें एवढ्या गोष्टी झाल्या म्हणजे वर लिहिलेले सर्व फायदे नेहमीं लोकांस मिळालेच पाहिजेत असें मात्र आम्हीं समजत नाहीं. राष्ट्राच्या व सुधारणेच्या प्रगतीस हीं साधनें लागतात खरीं, पण तीं साधनें प्राप्त झालीं असतां साध्य गोष्ट अवश्य मिळालीच पाहिजे, हा सिद्धांत मात्र तर्कशास्त्रदृष्ट्याहि चुकीचा आहे. राष्ट्रीय सभा व प्रो. मॉरिसन या दोघांच्याहि लक्षांत ही गोष्ट येऊन चुकलेली आहे. प्रजेच्या मनांत परकीय राज्यकर्त्यांबद्दल अभिमान उत्पन्न होण्यास अर्थातच राज्यव्यवस्थेंतील महत्त्वाच्या कामांपैकीं कांहीं भाग तरी प्रजाजनांच्या पुढाऱ्यांस प्राप्त झालेला असला पाहिजे, एरवीं त्यांस केवढ्याहि बलाढ्य राज्यव्यवस्थेबद्दल प्रीति व अभिमान उत्पन्न होणार नाहीं, हें प्रो. मॉरिसन यांनीं उघडपणें कबूल केलें आहे. पण 'धीरनपाल' याच्या बुद्धीची धांव सरड्याप्रमाणें त्याच्या कुंपणाच्या पलीकडे गेलेली नाहीं. तो म्हणतो कीं, हिंदुस्थानांत हल्लीं जी अस्वस्थता आहे तिचें कारण राजकीय चळवळ नव्हे. राज्यकर्ते वाईट आहेत म्हणून ते अप्रिय झालेले नाहींत; तर ते परकी म्हणून अप्रिय झालेले आहेत; व अशा रीतीनें त्यांच्याबद्दल अप्रियता उत्पन्न होण्यास हल्लीं स्वधर्माबद्दल अभिमान उत्पन्न करण्याची जी चोहोंकडे खटपट चालली आहे तीच मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालेली आहे! 'धीरनपाल' यांचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानास एकराष्ट्रीयत्व येण्यास हिंदुस्थानांतील लोकांचा जातिभेद नाहींसा होऊन एक धर्म झाला पाहिजे, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें बरोबर आहे. हिंदूंनीं हिंदु आणि मुसलमानांनीं मुसलमान राहावें यानें कांहीं देशाची धडगत लागावयाची नाहीं. दुफळी माजेल आणि खोटा अभिमान जागृत होऊन व परकीयांबद्दल अप्रियता उत्पन्न

होऊन एकंदर देशाचें अपरिमित नुकसान होईल. 'धीरनपाल' यांच्या डोक्यांत वरील कल्पना अगदीं ठाम झालेली असल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या अस्वस्थतेचीं कारणें शोधून काढण्यास त्यास बिलकुल प्रयास पडला नाहीं. ते म्हणतात कीं या अस्वस्थतेचें बीज सर्व कांहीं हल्लीं धर्मोन्नतीप्रीत्यर्थ चालू असलेल्या खटपटींत आहे. विवेकानंद, मिसेस ॲनिबिझांट, मॅडम ब्लव्हेट्स्की इत्यादिकांनीं जीं खुळें माजविलीं आहेत, त्यामुळें तरुण लोकांचीं डोकीं फिरून जाऊन आपल्या धर्माचा व देशाचा खोटा अभिमान व परकीयांबद्दल परकीय म्हणून अप्रियता त्यांच्या मनांत उत्पन्न झालेली आहे, व या वावटळींत हिंदुस्थान देशाचें तारूं कोणीकडे भडकेल याची त्यांच्या मनास मोठी काळजी वाटत आहे.

'धीरनपाल' यांचे इंग्रजी शाळांतील अर्ध्यामुर्ध्या पढलेल्या शिक्षकांवरहि हेच आरोप आहेत. याखेरीज त्यांच्या लेखांत दुसरा कांहीं मुद्दा नाहीं. आम्हां वर्तमानपत्रकर्त्यांस ह्यांनीं दोषमुक्त केलें आहे, ही एक आमच्यावर मेहेरबानीच समजावयाची. त्यांच्या दृष्टीनें जरा सूक्ष्म विचार केला असतां वर्तमानपत्रकर्त्यांस 'डिसचार्ज' केल्याखेरीज सोयच नव्हती, असें आढळून येईल. लोकांचीं मनें अस्वस्थ होण्यास राज्यव्यवस्थेंतील दोष कारण नव्हत (कारण त्यांत दोषच नाहींत) असें एकदां गृहित धरलें, व अस्वस्थता तर आहे असें मानलें म्हणजे ती अस्वस्थता उत्पन्न होण्यास दोषी राज्यव्यवस्थेखेरीज दुसरें कांहीं कारण शोधून काढणें अवश्य होतें, आणि तसें झालें म्हणजे अर्थातच वर्तमानपत्रकर्ते 'डिसचार्ज' करावे लागतात. वर्तमानपत्रकार किंवा चळवळ करणारे सुद्धन गेले म्हणजे दुसरीं चळवळ करणारीं माणसें कोण आहेत असें पाहूं गेलें असतां स्वामी विवेकानंद व मिसेस ॲनी बिझांट हे डोळ्यांपुढें उभे राहतात, व यांच्याच माथीं या अस्वस्थतेचें सर्व अपयश लादण्याचा 'धीरनपाल' यांनीं प्रयत्न केला आहे. परंतु हा त्यांचा प्रयत्न चुकीचा व वेडगळपणाचा आहे असें थोड्या विचारांतीं कोणासहि कळून येईल. स्वधर्माचा अभिमान चांगला किंवा वाईट, हिंदुस्थानांत ख्रिस्ती किंवा एकेश्वरी धर्म पसरून सर्व देशाचें ऐक्य होणें शक्य आहे कीं नाहीं, या मुद्यांचा येथें थोडक्यांत विचार करणें शक्य आहे. तूर्त एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, स्वधर्माचा अभिमान जागृत झाल्यानें इंग्रजी राज्यास तरी कांहीं धोका नाहीं. कारण 'धीरनपाल' यांच्या म्हणण्याप्रमाणेंच त्यानें जो तो स्वधर्माभिमानी बनून सगळ्या लोकांची ऐक्यता होऊं शकत नाहीं; आणि ऐक्यता नाहीं म्हणजे इंग्रजी राज्यास त्यापासून कांहीं भय नाहीं. आतां, या धर्माभिमानानें परकीय म्हणून इंग्रजांबद्दल लोकांचीं मनें अस्वस्थ होतात, एवढाच काय तो 'धीरनपाल' याचा आक्षेप राहिला. पण ह्याचें उत्तर आम्हीं वर दिलेंच आहे कीं, लॉर्ड रिपन यांस जर आम्हीं 'थिऑसाफिकल सोसायटी' स्थापन झाल्यानंतरहि पूज्य मानीत आलों, तर त्यांचे गुण लॉर्ड कर्झन यांच्या

अंगीं असल्यास त्यांस परकी म्हणून पूज्य मानणार नाहीं असें कदापि व्हावयाचें नाहीं. स्वदेशी राज्य होणें आतां शक्य नाहीं, झालें तर टिकणार नाहीं आणि हल्लीं चालू असलेल्या युरोपांतील प्रबल राष्ट्रांच्या चढाओढींत आम्हांस इंग्रजांच्या नाहीं तर दुसऱ्या कोणाच्या तरी तडाख्यांत जावें लागेल या गोष्टी आतां सर्व लोकांस चांगल्या कळूं लागल्या आहेत. 'शिवराई' पैसा आमचा आणि 'दांडीचा' पैसा इंग्रजांचा म्हणून शिवराई पैसा कोणी हातांत धरीत नाहीं. कोणचा पैसा अधिक उपयोगी पडतो, कोणचा पैसा दिला असतां अधिक माल मिळतो इकडे लोकांचें लक्ष असतें; व त्याप्रमाणें त्याचा ते संग्रह करतात. इंग्रजी राज्याबद्दल तें परकी म्हणून कोणास वाईट वाटण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. व 'धीरनपाल' यांचें असें मत असल्यास ती त्यांची चूक आहे. अस्वस्थतेचें मूळ कारण, ही राजव्यवस्था परकी असली तरी ती असावी तेवढी आमच्या सुखाची नाहीं हें होय; व आम्हीं खात्रीनें असें सांगूं शकतों कीं, हें राज्य नाहींसें करावें असें कोणांच्या मनांत नाहीं. परंतु त्यापासून येथील लोकांच्या आंगच्या गुणांचा उत्कर्ष होऊन त्यांस इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या वर्गांत शिरण्याइतकी योग्यता यावी असें प्रत्येकास वाटत आहे, व तें सिद्धीस जाण्यास हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत जे कांहीं फेरफार झाले पाहिजेत ते घडून येतील तर हल्लीं असलेली अस्वस्थता व खिन्नता मोडून इंग्रजी राज्याचे पोवाडे खेडेगांवांतील अशिक्षित कवींच्या तोंडांतूनहि आपोआप बाहेर पडूं लागतील. 'धीरनपाल' यांचें लक्ष इकडे कां गेलें नाहीं हें वर सांगितलेंच आहे, व या त्यांच्या गैरसमजामुळें अथवा अज्ञानामुळें त्यांनीं केलेलें अस्वस्थतेचें निदान शास्त्रदृष्ट्या फारच चुकीचें, किंबहुना उपहासास्पद झालेलें आहे असें म्हटलें तरी चालेल.

❖ ❖ ❖

* हिंदुमुसलमानांमधील दुही

हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत चोहोंकडे एक प्रकारची अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे व ती घालविण्यास हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं तरी फेरफार केले पाहिजेत, या दोन गोष्टी जगापुढें स्पष्ट रीतीनें प्रो. मॉरिसन यांनीं मांडल्या याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत असें गेल्या अंकींच आम्ही लिहिलें होतें. प्रो. मॉरिसन यांचीं मतें, अनुमानें अगर सूचना सर्वांशीं आम्हास ग्राह्य वाटत नाहींत. इतकेंच नव्हे तर त्या युरोपियन लोकांसहि ग्राह्य नाहींत, हें खरें आहे. तथापि प्रो. मॉरिसन यांनीं त्यांनीं हातांत घेतलेल्या विषयांचें विवेचन करण्याची जी पद्धत स्वीकारली आहे ती आम्हास मान्य व हितावह असल्यामुळें तेवढ्याबद्दलच यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. सामान्य इंग्रज ग्रंथकार किंवा वर्तमानपत्रकर्ते यांचें असें मत असतें कीं, इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न होण्यास कांहीं एक कारण नाहीं, आणि असलेंच तर तें ब्राह्मणांनीं अगर बाबूंनीं लोकांचा गैरसमज करून उत्पन्न केलेलें असतें, व त्याकरितां या राजद्रोही मंडळीस आधीं फाशीं दिलें पाहिजे. प्रो. मॉरिसन यांनीं आपल्या पुस्तकांत या मताचा स्वीकार केला नाहीं एवढीच मुख्यत्वेंकरून समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे. हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत अस्वस्थता आहे, आणि ती निराधार किंवा विनाकारण झालेली नाहीं एवढी गोष्ट जर आमच्या सर्व राज्यकर्त्यांनीं कबूल केली तर आमचें निमें काम झालें असें आम्ही समजूं.

असो. आतां मॉरिसन साहेबांनीं जे कांहीं दुसरे सिद्धांत आपल्या बुकांत नमूद केले आहेत त्यांचा विचार करूं. परंतु तत्पूर्वी मॉरिसन साहेबांची स्थिति थोडीशी येथें सांगितली पाहिजे. हे साहेब अलिगड येथें सर सय्यद अहमद म्हणून जे राष्ट्रीय सभेचे प्रसिद्ध प्रतिपक्षी होते त्यांनीं मुसलमान लोकांकरितां काढलेल्या कॉलेजांतील एक प्रोफेसर आहेत. हें व त्या कॉलेजचे प्रिन्सिपाल बेकसाहेब हे मिळून दोघेहि 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' या लौकिक न्यायानें ज्या कार्याकरितां अलिगड येथील मुसलमान लोकांची संस्था स्थापलेली आहे त्या कार्याच्या सिध्द्यर्थ यथाशक्ति प्रयत्न करीत आहेत. आमच्या महाराष्ट्र देशांत अथवा दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचें फारसें महत्त्व नाहीं, परंतु दिल्ली, आग्रा अगर लखनौ वगैरे प्रांतांत मुसलमानी राज्याच्या वैभवाची आणा दोन आणे तरी ओळख अद्याप कायम राहिलेली आहे; व आमच्याकडील लोकांस पेशवाईंत आम्ही एकदां राज्यकर्ते होतों या गोष्टीचा जसा

---

* [केसरी ता. १ आगस्ट १८९९]

अभिमान वाटतो, तद्वतच दिल्ली लखनौ कडील मुमलमानांची स्थिति आहे. आपण राज्यकर्ते होतों त्यावेळीं बंगाल्यांतील ज्या बाबूंवर चोपून अम्मल गाजविला त्या बंगाली 'ढेरपोट्या' बाबूंनीं इंग्रजी लिहिण्याबोलण्यास शिकून आमच्यावर अधिकारी होऊन यावें, हें तिकडील मुसलमानांस रुचत नाहीं; व त्यांच्या मनांत या पटापट इंग्रजी बोलणाऱ्या बाबूंबद्दल तिरस्कारबुद्धीहि उत्पन्न झालेली असते. हल्लींच्या इंग्रजी राज्यांतहि असे कित्येक इंग्रज लोक आहेत कीं ते बुद्धीनें नेटिव्हांपेक्षां जरी कमी असले तरी ज्या अर्थीं राज्यकर्त्यांच्याच जातीचे आपण आहों त्या अर्थीं आमच्या डोक्यांत नाहीं तरी मनगटांत तरी जोर अधिक आहे असें त्यांस वाटत असतें. दिल्ली आग्र्याकडील मुसलमानांची समजहि एकदां अशाच प्रकारची होती; व ती कांहीं थोड्याच अंशानें जर अद्याप जागृत असली तर त्याचें आपणास कांहीं आश्चर्य मानावयास नको. इंग्रजी विद्या शिकल्यामुळें बाबूंनीं सर्व अधिकाराच्या जागा पटकावल्या, बाबू साहेबांच्या कांनाशीं लागूं लागले, बाबू वजनदार झाले, व आपण पूर्वीच्या बादशहाच्या धर्माचे असतांहि आपणांस या राज्यांत कोणी विचारीतनासें झालें आहे, अशी उत्तरेकडील मुसलमानांपैकीं पुष्कळांची समजूत आहे. सारांश, इंग्रजसरकारचें राज्य झाल्यामुळें पूर्वीं पादाक्रांत केलेल्या बाबूंचा वर्चष्मा होऊन आपली वाईट स्थिति झाली असें उत्तरेकडील मुसलमानांस वाटत असतें; व अलिगड येथील कॉलेज हेंहि अशाच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष समजुतीमुळें उत्पन्न झालेलें आहे. मॉरिसनसाहेब हे याच कॉलेजांतील प्रोफेसर होत; व त्यामुळें मुसलमान आणि हिंदु या दोन जातींतील परस्पर संबंधाविषयीं त्यांचीं जीं मतें झालेलीं आहेत तीं अर्थातच वर सांगितलेल्या मुसलमान लोकांच्या विचारांचें एकप्रकारचें प्रतिबिंबच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रो. मॉरिसन यांचे ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांबद्दल अगर फक्त मुसलमानांबद्दल जे उद्गार आहेत ते समजण्यास एवढी प्रस्तावना पुरे आहे.

आतां एतद्गुणविशिष्ट प्रो. मॉरिसन हे हिंदुमुसलमानांमधील द्वैधीभावासंबंधानें काय म्हणतात तें पाहूं. हिंदुस्थान देश निरनिराळ्या जातींच्या व धर्माच्या लोकांनीं भरलेला आहे, व त्या सर्वांचें कोणत्या तरी कारणानें ऐक्य झालें पाहिजे, ही गोष्ट प्रो. मॉरिसन यांस कबूल आहे. परंतु त्यांचें असें म्हणणें आहे कीं, इंग्रजी विद्येनें हिंदुमुसलमानांमधील दुही मोडण्याचें एका बाजूसच राहून या दोन जातींमधील बेबनाव उत्तरोत्तर वाढत चालला आहे. स्थानिक स्वराज्याच्या लोकनियुक्त संस्था, देशी वर्तमानपत्रें, आणि काँग्रेससारख्या मंडळ्या मिळून तिन्हीहि कारणें हिंदुमुसलमानांमधील दुही जास्त होण्यास दिवसानुदिवस अधिकाधिक कारणीभूत होत चाललीं आहेत असें प्रो. मॉरिसन यांचें म्हणणें आहे. मुसलमान लोकांची वस्ती हिंदूंच्या मानानें बहुतेक ठिकाणीं कमी अस-

ल्यामुळें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांत त्यांचा शिरकाव होत नाहीं; व लोकानियुक्त हिंदु कामिशनर मुसलमानांवर ठिकठिकाणीं जुलूम करतात अशी प्रमुख मुसलमानांची तक्रार असल्याबद्दल प्रो. मॉरिसन यांनीं आपल्या पुस्तकांतून नमूद केलेलें आहे. कॉंग्रेससभेस पहिल्यानें मुसलमान अनुकूल नसल्यास निदान प्रतिकूल तरी नव्हते; पण जेव्हां लोकानियुक्त संस्था असाव्या असें कॉंग्रेसचें मत पडलें तेव्हां मुसलमान लोकांस ती गोष्ट नापसंत होऊन ते उघड रीतीनें राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध होऊं लागले. मुसलमानांस चीड येण्याचें तिसरें कारण वर्तमानपत्रें होय असें मॉरिसनसाहेब म्हणतात. हिंदुमुसलमानांतील तंटे नेटिव्ह संस्थानांत होतात त्यापेक्षां इंग्रजी राज्यांत अधिक होतात हें मॉरिसनसाहेबांस कबूल आहे; पण याचा दोष ते इंग्रजी शिक्षण, लोकानियुक्त स्थानिक कमेट्या वर्तमानपत्रें आणि कॉंग्रेस यांच्या माथीं ठेवतात; व त्यावरून असा सिद्धांत काढतात कीं, या चाराहि गोष्टी जशा असाव्या तशा अद्याप बनून आलेल्या नाहींत. हिंदुमुसलमानांमधील बेबनाव वाढावा अशी इंग्रज अंमलदारांची इच्छा नाहीं, पण वर लिहिलेल्या चार गोष्टींमुळें या दोन जातींमधील प्रेम कायम राखणें प्रो. मॉरिसन यांच्या मताप्रमाणें अशक्य झालेलें आहे.

प्रो० मॉरिसन यांचे हे सिद्धांत चुकीचे व एकतर्फी आहेत हें आमच्या मतें कोणासहि सहज कळून येण्यासारखें आहे, मात्र त्याची दृष्टी अलिगड कॉलेजांतील धुक्यानें मंदावलेली नसली पाहिजे. मुसलमानी राज्यांत ज्यांवर आपण अम्मल गाजविला त्या काफीर हिंदूंस आज बरोबरीच्या नात्यानें आपणास सलाम करावा लागतो याबद्दलचें वैषम्य जर मुसलमान लोकांस वाटत असेल तर आतां तें त्यांनीं सोडून दिलें पाहिजे. हिंदु आणि मुसलमान यांच्यामधील बेबनाव उत्पन्न होण्यास पूर्वीचीं पुष्कळ कारणें आहेत; पण हा बेबनाव जाऊन दोन्ही जातींच्या लोकांचें एकमत झाल्याखेरीज हिंदुस्थानचें हित व्हावयाचें नाहीं असें आतां प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास वाटूं लागलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वी ज्याप्रमाणें मुसलमानांची सत्ता अबाधित होती, त्याप्रमाणेंच दक्षिण हिंदुस्थानांत इंग्रजी राज्यापूर्वी निदान कांहीं वर्षें तरी हिंदूंनीं स्वामित्व उपभोगिलें आहे. किंबहुना कंपनीसरकारबहादूर यांची स्वारी जर हिंदुस्थानांत शें-दोनशें वर्षें उशीरानें आली असती तर उत्तर आणि दक्षिण मिळून हिंदुस्थानच्या दोनहि भागांत मराठेशाहीचाच झेंडा तिच्या दृष्टीस पडला असता. पण ह्या गतगोष्टी सांगण्यांत आतां कोणताच फायदा नाहीं. इंग्रजसरकारच्या छत्राखालीं सर्वच एकसारके टक्क्यास सवाशेराप्रमाणें मोजले जात आहों. अशा वेळीं हिंदूंनीं मुसलमानांचीं व मुसलमानांनीं हिंदूंचीं डोकीं फोडण्यांत पुरुषार्थ मानावा यापेक्षां आणखी दुर्दैव तें कोणतें ? हिंदुस्थानांतील मुसलमान लोक अरबस्थानांतून किंवा मध्यएशियामधून इकडे आलेल्या मुसलमानांचे वंशज असोत

अथवा येथल्या येथेंच हिंदूंचे मुसलमान झालेले असोत, कसेंहि असलें तरी हिंदुस्थान ही आतां सर्वांचीच सारखीच जन्मभूमि झालेली आहे; व या जन्मभूमीच्या भाग्योदयासाठीं सर्वांनीं एकसारखीच खटपट केली पाहिजे, हेंहि आतां प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास कळूं लागलें आहे. आणि असें जर आहे तर इंग्रजी शिक्षण अथवा वर्तमानपत्रें अथवा काँग्रेस यानीं हिंदुमुसलमानांमधील दुही माजविली हें म्हणणें निव्वळ मूर्खपणाचें नव्हे काय ? हिंदुमुसलमानांमधील तंटे नेटिव्ह संस्थानापेक्षां इंग्रजी मुलखांत जास्त होतात, हें मॉरिसनसाहेबांप्रमाणें आम्हांसहि कबूल आहे. फार लांब कशाला ? लॉर्ड हॅरिस यांच्या कारकीर्दीत मशिदीपुढें वाद्यें वाजाविण्यासंबंधानें येथें जे तंटे उपस्थित झाले होते त्यांचा निकाल त्यावेळीं औंध संस्थानांत जितक्या सोईनें लागला तितक्या सोईनें खालसांतील कलेक्टरांस लावतां आला नाहीं हें आम्ही त्या वेळींच स्पष्ट करून दाखविलें होतें. हिंदुमुसलमानांच्या रीतीभातींचें अज्ञान, बाबी क्षुल्लक खऱ्या पण त्याबद्दल लोकांत जो एक प्रकारचा अभिमान आहे त्याबद्दल बेपर्वाई आणि न्याय करण्यास जीं साधनें लागतात तीं गोळा करण्याच्या इच्छेचा अभाव, या सर्व कारणांमुळें खालसांतील कलेक्टरांस वाद्यांच्या प्रश्नाचा निकाल अद्यापि नीट लावतां आला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत वर्तमानपत्रें किंवा गोरक्षण–संस्था यांच्या माथीं हिंदुमुसलमानांत बेबनाव केल्याचा दोष लादणें म्हणजे, आपणास नाचतां येत नाहीं म्हणून आंगण वांकडें, म्हणण्याप्रमाणेंच स्वतःच्या असंभजसपणाचें लक्षण होय. काँग्रेस सभेंत गोरक्षणाचा विषय आजपर्यंत घेतला नाहीं याचें कारणहि सदर सभेंत मुसलमान लोक येतात व त्याचप्रमाणें त्यांनीं उत्तरोत्तर अधिकाधिक येत जावें अशी सर्वांची इच्छा हेंच होय. स्थानिक कमिट्यांतून मुसलमान लोक हिंदु लोकांकडून निवडून येत नाहींत ही गोष्ट खरी आहे; पण त्यास खरा उपाय म्हटला म्हणजे मुसलमान लोकांची जेथें बरीच वस्ती आहे तेथें त्यांच्या संख्येच्या मानानें त्यांस आपला मेंबर निवडून देण्याचा हक्क देणें हाच होय. कोणत्याहि इतर धर्माच्या लोकांशीं द्वेषभावानें वागण्यास हिंदु लोकांस त्यांचा धर्म सांगत नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या धर्माप्रमाणें चालावें हेंच हिंदुधर्माचें खरें रहस्य होय; तथापि तेवढ्याकरितां मुसलमान लोकांनीं कोणतीहि गैरशिस्त गोष्ट सांगितल्यास ती सर्वांशीं मुकाट्यानें हिंदुलोक ग्राह्य करतील असें मात्र कोणी समजूं नये. गोवध हिंदुस्थानांत मुळींच होऊं देऊं नये असें हिंदुलोकांचें मत आहे, व त्याप्रमाणें घडून आल्यास प्रत्येक हिंदूस मनापासून आनंद होईल हें खरें आहे. पण तेवढ्याकरितां मुसलमान अगर इंग्रज लोक त्यांच्या धर्माप्रमाणें गोवध करीत असल्यास त्यांच्या आड हिंदुलोक येत नाहींत; फक्त अशा तऱ्हेचीं कृत्यें हिंदुलोकांच्या नजरेस न पडतील अशा ठिकाणीं त्यांनीं तीं केलीं पाहिजेत. सारांश स्वधर्माप्रमाणें प्रत्येकानें आपलें आचरण ठेवावें, एकानें

दुसऱ्याची विनाकारण कुचाळी काढूं नये, आणि सर्वांनीं एक दिलानें चालावें अशी सर्व हिंदूंची इच्छा आहे. कोणी कोणास त्रास देऊं इच्छित नाहीं; पण त्यांपैकीं एखादा विनाकारण आपला वर्चस्मा दाखवावयास पाहील तर तोहि दुसऱ्यास खपावयाचा नाहीं. अशा बिकट प्रसंगीं दोघांचेंहि सर्व म्हणणें ऐकून घेऊन पूर्वापार वहिवाट आणि न्याय यांस धरून निकाल सांगणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें कर्तव्य होय; पण त्या अधिकाऱ्यांकडून तशा प्रकारें वर्तन होत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. प्रो. मॉरिसन म्हणतात त्याप्रमाणें हिंदुमुसलमानांमधील वैमनस्य वाढविण्याची सदर अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष इच्छा नसेल; पण जोंपर्यंत त्यांच्या कृतीचा परिणाम वर सांगितल्याप्रमाणें होतो, तोंपर्यंत त्यांच्या मनांत काय आहे याचा निर्णय त्यांच्या कृतीवरूनच लोकांनीं केल्यास त्यांत कोणासच दोष ठेवतां यावयाचा नाहीं. कॉंग्रेस, वर्तमानपत्रें, स्थानिक कमिट्या अथवा इंग्रजी शिकलेले लोक यांपैकीं हिंदुमुसलमानांची दुही वाढवावी अशी एकाचीहि इच्छा नाहीं, असें आम्हीं खात्रीनें सांगूं शकतों; उलट हिंदुमुसलमानांनीं एकत्र होऊन काम करावें असें सर्वांस वाटत आहे. पण कांहीं मुसलमान लोकांच्या अज्ञानानें, कांहीं त्यांच्या पुढाऱ्यांच्या गैरसमजानें आणि बऱ्याच अंशीं युरोपियन अधिकाऱ्यांच्या वर्तनानें—मग तें वर्तन जाणून बुजून केलेलें असो वा अज्ञानमूलक असो—या दोन जातींमधील दुही खालसा मुलखांत वाढत चाललेली आहे; व ती दूर होण्यास एक तर आमच्या मुसलमान बंधूंनीं आपली व देशाची स्थिति लक्षांत आणून आपलें कर्तव्य ओळखलें पाहिजे, अथवा इंग्रजी अंमलदारांनीं तरी आपलें वर्तन सुधारलें पाहिजे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाती एक होऊन त्यांचें राष्ट्र बनावें अशी ब्रॅडलॉसारख्या कांहीं इंग्रज सत्पुरुषांची इच्छा होती, व अद्यापहि असेल. पण ती इच्छा मनांत धरून हिंदुस्थानसरकारचे किंवा प्रांतिक सरकारचे अधिकारी आपापलीं कामें करितात असें आम्हांस वाटत नाहीं. प्रो. मॉरिसन यांच्या मतांत आणि आमच्या मतांत जे कांहीं प्रमुख भेद आहेत त्यांपैकींच हा एक भेद होय. असा भेद कां पडावा याचें कारण वर आम्ही सांगितलेंच आहे. यासंबंधानें जास्त खुलासा प्रो. मॉरिसन यांच्या दुसऱ्या मुद्याचा विचार करतेवेळीं करणेंत येईल.

❖ ❖ ❖

* उडाणटप्पूंचा कायदा व गरिबांचा काळ

ह्या विषयाकडे आज आमचें लक्ष जाण्याचें कारण गेल्या अंकीं प्रसिद्ध झालेलें नाशिक जिल्ह्यांतील एका 'न्यायप्रिय' गृहस्थाचें पत्र होय. फौजदारी कायद्यामध्यें गुन्हा करणारास ज्याप्रमाणें शिक्षा सांगितली आहे व गुन्ह्याची चौकशी करून त्यास न्यायासनापुढें आणण्याचा पोलिसास अधिकार दिलेला आहे, त्याचप्रमाणें ज्यांचे हातून गुन्हा घडण्याचा संभव आहे अशा लोकांवरहि नजर ठेवून जरूर वाटल्यास त्यांचा जामीन घेऊन त्यांस मोकळें ठेवावें, अशाबद्दलहि पोलिसास क्रिमिनल प्रोसिजर कोड ऊर्फ फौजदारी काम चालविण्याचा कायदा, यांत अधिकार दिलेला आहे. रोग झाल्यावर तो बरा करण्याच्या उद्योगास लागण्यापेक्षां तो न होऊं देणें चांगलें, असें जें वैद्यशास्त्राचें तत्त्व आहे त्याच तत्त्वांवर फौजदारी कायद्यांतील हीं कलमें रचलेलीं आहेत. गुन्हे झाल्यावर ते हुडकून काढून गुन्हेगारास कोर्टाकडून योग्य शिक्षा देवविणें हें पोलिसाचें काम तर खरेंच, पण न होऊं देण्याबद्दल आपल्या हातून होईल तेवढी तजवीज राखणें हेंहि त्यांचें तितकेंच महत्त्वाचें कर्तव्य आहे. जे लोक चोरीच्याच धंद्यावर आपला उदरनिर्वाह करितात, अथवा जे अनेक वेळां चोरीमारीच्या गुन्ह्यांत सांपडून शिक्षा वगैरे भोगून आलेले आहेत, अगर ज्यांचा आयुष्यक्रम अथवा वर्तन खरोखरच संशयास्पद आणि लोकांच्या शांततेचा त्यामुळें भंग होईल अशी भीति वाटण्यासारखें आहे त्यांजवर वर लिहिलेल्या कलमाप्रमाणें फौजदारी काम चालविण्याच्या कायद्याचे १०९ कलमाप्रमाणें खटले केल्यास पोलिस अधिकाऱ्यांस कोणीहि नांवें ठेवणार नाहीं. ज्यांच्या हातून गुन्हा घडण्याचा संभव आहे त्यांजवर नजर ठेवणें पोलिसांचें कर्तव्य आहे, व त्याप्रमाणें त्यांनीं वर्तन केल्यास त्यापासून एकंदर समाजाचें पुष्कळ हित होण्यासारखें आहे. परंतु हे नियम पोलिस अधिकारी आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल तितक्या लोकांस लावूं लागले म्हणजे मात्र लोकांवर विनाकारण जुलूम होण्याचा संभव असतो. कित्येक पोलिस अधिकाऱ्यांची अशी समजूत असते कीं, कोळी, भिल्ल, कातकरी, रामोशी, मांग वगैरे हलक्या जातींतील प्रत्येक इसम सर्वांशीं नाहीं तर कांहीं अंशीं तरी चोरी वगैरे गुन्हे करून आपला उदरनिर्वाह करीत असतो; आणि याच समजुतीवर गेल्या सालीं, म्हणजे १८९८ सालीं बरेच ठिकाणीं व विशेषतः नाशिक जिल्ह्यांत पोलिस अधिकाऱ्यांनीं तेथील शेंकडों लोकांवर क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम १०९ प्रमाणें खटले केले अथवा करण्याची धमकी दिली असें समजून येतें. क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम १०९ यांत असें लिहिलें आहे कीं, ज्या मनुष्यास उपजीविकेचें कांहीं दृश्य साधन नाहीं,

* [केसरी ता. ८ आगष्ट १८९९]

अथवा ज्यांस आपण कोण, कुठला वगैरे आपली हकीकत समाधानकारक रीतीनें सांगतां येत नाहीं (अशा लोकांसच उडाणटप्पू असें म्हणतात) त्याची मॅजिस्ट्रेटानें चौकशी करून त्याजपासून एकवर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल जामीन घ्यावा, अथवा जामीन न दिल्यास त्यास सदर मुदतीपर्यंत साध्या किंवा सक्तमजुरीच्या कैदेची शिक्षा द्यावी, (कलम १२३). त्याचप्रमाणें कलम ११० यांत असें सांगितलें आहे कीं, चोरीवर किंवा चोरीच्या मालावर उपजीविका करणारे वगैरे जे नेहमींच गुन्हा करून रहाणारे लोक आहेत त्यांच्यापासूनहि अशाच प्रकारचा जामीन घ्यावा. हे लोक वाईट रीतीनें आपला उदरनिर्वाह चालवितात याबद्दल पुरावा " पुराव्याच्या कायद्याप्रमाणें फार कडक नसला तरी चालेल; फक्त सदर लोक अशा तऱ्हेचे गुन्हे करतात असा त्यांचा लोकांमध्यें लौकिक किंवा बोभाटा असला तरी तो पुराव्यास ग्राह्य आहे " असेंहि त्याच कायद्याच्या ११७ कलमांत सांगितलें आहे. जामिनकीची मुदत पूर्वीच्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाप्रमाणें सहा महिन्यांची होती, ती गेल्या सालीं दुरुस्त झालेल्या क्रिमिनल प्रोसीजर कोडप्रमाणें आतां एक वर्ष झालेली आहे. बाकी कलमें पूर्वीच्या व नव्या क्रिमिनल प्रोसीजरांत बहुतेक एकसारखींच आहेत. हीं कलमें गोऱ्या उडाणटप्पूंस लागू नाहींत. त्यांचेकरितां निराळाच एक कायदा आहे. त्याचा विचार पुढें येईलच. उडाणटप्पूंमध्यें देखील गोरा आणि काळा हा भेद असावा ही इंग्रजी राज्यांतील न्यायाच्या समतेची एक मोठीच साक्ष आहे.

असो. वरील कलमांवरून 'उडाणटप्पू' या शब्दाचा कायद्यांत काय अर्थ समजतात व त्यांच्यावर खटले होऊन त्यांचा निकाल कसा करण्यांत येतो एवढें वाचकांच्या लक्षांत येईल. सन १८९७ सालीं मध्यप्रांतांतील सहा जिल्ह्यांत एकंदर खालीं लिहिल्याप्रमाणें उडाणटप्पूंचे खटले झाले.

जिल्हा.	एकंदर खटले.	पैकीं चौकशी होऊन जामीन मागितला.	जामीन नं दिल्यामुळें तुरुंगांत गेले.	जामीन न मागतां सोडले.	पुढील सालाकरितां शिल्लक
नगर	७३	६२	४६	११	०
खानदेश	८१	५४	२४	११	६
नाशिक	५३	२१	१३	३२	०
पुणें	१२८	९३	५८	३३	२
सातारा	४६	३५	७	११	०
सोलापूर	२१	८	८	१०	०

या आंकड्यांवरून पोलिसानें उडाणटप्पूंचे ज्या इसमांवर खटले केले होते त्यांपैकीं मॅजिस्ट्रेटांनीं सोडून दिल्याचें प्रमाण नाशिक जिल्ह्यांत फार आहे असें सहज दिसून येईल. ५३ लोकांपैकीं ३२ सांवर, म्हणजे सुमारें शेंकडा ६० लोकांवर, नाशिक जिल्ह्यांत उडाणटप्पूंचे विनाकारण खटले करण्यांत आले होते. सोलापूरखेरीज इतर कोणत्याहि ठिकाणीं विनाकारण खटले केल्याचें असें प्रमाण आढळून येत नाहीं. ही १८९७ सालची गोष्ट झाली. परंतु अलीकडे अलीकडे म्हणजे सन १८९८।९९ सालीं पोलिस अधिकाऱ्यांनीं व विशेषतः नाशिक येथील पोलिस अधिकाऱ्यांनीं या बाबतींत फारच तऱ्हेवाईक असें वर्तन चालविलें आहे. नाशिक जिल्ह्यांत नुकतेच जे दरवडे पडले त्यायोगें गुन्हा न घडूं देण्याची जबाबदारी तेथील पोलिसांवर विशेष आली आहे हें आम्हीं ओळखितों; पण त्यामुळें प्लेगनें किंवा पाऊस न पडल्यानें आधींच त्रस्त झालेल्या गरीब लोकांस विनाकारण पोलिसानें आणखी त्रास देणें कधींहि योग्य होणार नाहीं. भिल्ल, कोळी, कातवडी वगैरे लोकांपैकीं बहुतेक लोक आज कित्येक पिढ्या आपला उदर-निर्वाह शेतकीवर चालवीत आहेत. त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक गरीब आहेत खरे; पण गरिबीमुळें त्यांस 'उदरनिर्वाहाचें दृश्य साधन नाहीं' अशा सबबीवर जर त्यांजवर खटले होऊं लागले तर गरिबी हा एक इंग्रजी राज्यांत मोठा गुन्हाच झाला असें म्हणावें लागेल. शेतकी करूनहि एक वेळ पोटास धड मिळत नाहीं असे हिंदुस्थानांत पुष्कळ लोक आहेत; व याखेरीज पुष्कळ लोक भिक्षेवर किंवा केवळ रानांतील कंदमुळें खाऊन कित्येक महिने आपला उदरनिर्वाह करीत असतात. अशा लोकांवर उडाणटप्पूंचे खटले झाल्यास त्यांनीं जामीन तरी कोठून आणावा, व आपली सुटका तरी कशी करून घ्यावी ? खरें म्हटलें म्हणजे मॅजिस्ट्रेटानें या गोष्टीचा विचार करावयास पाहिजे; पण पोलिसानें तयार केलेले उडाणटप्पूंच्या खटल्यांपैकीं पुष्कळ खटले मॅजिस्ट्रेटांनीं सोडून दिल्यास लगेच पोलिसचे वरिष्ठ अधिकारी अशा मॅजिस्ट्रेटांविरुद्ध तक्रार करूं लागतात, आणि मॅजिस्ट्रेट काळा व पोलिस सुपरिंटेंडेंट गोरा पडल्यामुळें अशा तक्रारींचा अखेर निकाल मॅजिस्ट्रे-टाच्या वतीनें सरकारकडून लागण्याचा फारसा संभव नसतो. तेव्हां बहुतेक मॅजि-स्ट्रेटहि या कामीं एक प्रकारची धरसोडच करीत असतात. रा. मायदेव व जोगळेकर यांस पुण्याचे सिटी मॅजिस्ट्रेट यांनीं जी शिक्षा दिली होती ती सदर गृहस्थ पुण्याचे राहणार नसल्यामुळें बेकायदेशीर होते, असें हायकोर्टानें ठरवून त्यांस सोडून दिलें; तेव्हां पुण्याच्या पोलिस सुपरिंटेंडंटनीं सरकारकडे अशी तक्रार केली कीं, ज्या कायद्याप्रमाणें ही शिक्षा बेकायदेशीर ठरली तो कायदाच बदलून टाकावा, म्हणजे हव्या त्या ठिकाणच्या मॅजिस्ट्रेटास हव्या त्या ठिकाणच्या उडाण-टप्पूंस शिक्षा देतां येईल ! मुंबईसरकारानें त्यांचें हें म्हणणें हिंदुस्थानसरकारास कळविलें; परंतु १८९८ सालीं क्रिमिनल प्रोसीजर कोड दुरुस्त झालें तेव्हां

हिंदुस्थानसरकारानें त्याचा कांहीं विचार केल्याचें दिसत नाहीं. या उदाहरणावरून एवढें सहज दिसून येईल कीं, मायदेव व जोगळेकर यांस हायकोर्टाच्या ऐवजीं मॅजिस्ट्रेटानेंच जर साडलें असतें तर डिस्ट्रिक्ट पोलिस अधिकारी, कलेक्टर व सरकार यांच्या मर्जीं ून सदर मॅजिस्ट्रेटसाहेब खास उतरले असते. सारांश, पोलिसांनीं असे खटले तयार करून मॅजिस्ट्रेटपुढें उभे केले म्हणजे त्यांपैकीं जितके थोडे सोडतां येतील तितके थोडे जामीन न मागतां सोडून देण्याची बहुतेक मॅजिस्ट्रेटांची प्रवृत्ति असते. असें असतांहि अशा खटल्यांपैकीं शेंकडा ६० खटले सन १८९७ सालीं नाशिक जिल्ह्यांत सोडून देण्यांत यावे, हें पोलिसाच्या फाजील हुशारीचेंच फल आहे असें म्हणणें भाग पडतें.

सन १८९८ सालीं या बाबतींत पोलिसाच्या फाजील हुशारीचा कळसच झाला आहे असें समजतें. कांहीं ठिकाणीं तर गांवांतील सर्व लोकांस दररोज हजिरी देण्याबद्दल पोलिसानें सक्त हुकूम सोडलेले आहेत.गांवांतील बदमाष लोकांवर गांवकामगारांनीं किंवा पोलिसानें नजर ठेवली पाहिजे हें खरें आहे; पण गांवांतील सर्व लोकांस हजिरी देण्यास सांगून त्यांच्या शेतकीच्या धंद्यांत एक प्रकारची विनाकारण अडचण उपस्थित करणें, हें अगदीं गैरवाजवी आहे इतकेंच नव्हे, तर त्यास कोणत्या कायद्याचा आधार आहे हेंहि आम्हांस नीट समजत नाहीं. गरीब बिचारे शेतकरी लोक हजिरी न दिल्यास पोलिस आपल्यावर उडाणटप्पूचे खटले करतील या भीतीनें आपले कामधंदे सोडून रोज दोन तीन तास हजिरी देण्यांत घालवितात; पण त्यामुळें त्यांजवर हा जुल्म होत नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. कोळी, कातकरी वगैरे कोणत्याहि विशिष्ट जातींतील सर्व लोकांस अशा रीतीनें हजिरी देण्यास लावण्यापूर्वीं त्यांस क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट (१८७१ चा २७) तरी पाहिल्यानें लागू केला पाहिजे, व त्यांनीं उदरनिर्वाह कसा करावा हेंहि त्या ॲक्टाप्रमाणें ठरविलें पाहिजे. पण तसा प्रकार जोंपर्यंत झाला नाहीं तोंपर्यंत उडाणटप्पूंचे खटले करण्याची धमकी देऊन गरीब लोकांस हजिरी देण्यास लावावें व त्यांच्या चरितार्थाच्या धंद्यांत एक प्रकारची आडकाठी आणावी हें सरकारी अधिकाऱ्यांस अगदीं गैरशिस्त आहे, व याचा विचार जर सरकार करणार नाहीं तर लोक विनाकारण त्रासले जाऊन ते गुन्हे करण्यास–त्यांच्या मनांत नसलें तरी–ते प्रवृत्त होतील अशी धास्ती आहे. कसें तरी तुरुंगांत जावयाचेंच; मग उडाणटप्पू म्हणून गेलें काय आणि चोरी करून गेलें काय गरीब लोकांस सारखेंच.

उडाणटप्पूंच्या खटल्यांत जो पुरावा आणतात तोहि फार चमत्कारिक व ममतीचा असतो. ' न्यायप्रिय ' यांनीं आपल्या पत्रांत लिहिलेंच आहे कीं, " चोरट्यास भाकरी दिल्याचा बोभाटा आहे, निर्वाहास साधन चोरीशिवाय दुसरें नाहीं, असें आम्ही ऐकतों " एवढ्या एखाद्याच्या साक्षीवर आरोपी उडाण-

टप्पू ठरतो ! यापेक्षां जास्त पुरावा पाहिजे असल्यास कोणी तरी सोमाजी येऊन अशी साक्ष देतो कीं, " आरोपीनें कांहीं वर्षांपूर्वीं कोठेंसें एक फाटकें लुगडें अथवा धोतर चोरल्याचें मीं ऐकलें होतें. पण त्याजवर त्यावेळीं कोणी खटला केला नाहीं. " सारांश, असल्या लंगड्या व अप्रयोजक " बोभाट्याच्या " पुराव्यावरून आरोपीनें जामीन द्यावा असा मॅजिस्ट्रेट हुकूम देतात. ज्यांस पोटभर अन्न मिळण्याची भ्रांत त्यांस जामीन तरी कोठला मिळणार ? मग अर्थातच मॅजिस्ट्रेट आरोपीस तुरुंगांत पाठवितात. अशा रीतीनें ज्यांजपाशीं जामीन मागितला जातो, त्यांपैकीं सुमारें शेंकडा ५० लोकांस कांहीं गुन्हा केला नसतांहि तुरुंगांत जावें लागतें. बरें; मॅजिस्ट्रेटसाहेब या लोकांस साध्या कैदेची तरी शिक्षा देतात काय ? नाहीं. शांततेचा ज्यांच्या हातून भंग होण्याचा संभव आहे अशा लोकांनीं जामीन न दिल्यास त्यांस साध्या कैदेचीच शिक्षा द्यावी, असें क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या १२३ वे कलमांत सांगितलें आहे. पण उडाणटप्पू, (bad character) यांनीं जामीन न दिल्यास त्यांस मॅजिस्ट्रेटच्या मर्जीस येईल त्या प्रकारची शिक्षा द्यावी, असें त्याच कलमांत सांगितलें आहे. उडाणटप्पू दोन प्रकारचे असतात. एक पूर्वीं गुन्हा केलेले व दुसरे पूर्वीं गुन्हा न केलेले. पैकीं ज्यांनीं गुन्हा केलेला असेल त्यांस जामीन न दिल्याबद्दल सक्तमजुरीची शिक्षा सांगितली असतां चालेल; पण ज्यांनीं गुन्हा केलेला नाहीं त्यांस फक्त उपजीविकेचें मुळींच दृश्य साधन नाहीं एवढ्या सबबीवर जामीन न दिल्याबद्दल सक्तमजुरीची शिक्षा देणें कायदेशीर असलें तरी अयोग्य व जुलमाचें आहे. परंतु हा विचार मॅजिस्ट्रेटसाहेबांस नेहमीं रहात नाहीं. ज्यांचें हातून गुन्हा घडलेला नाहीं असे पुष्कळ गरीब लोक जामीन न मिळाल्यामुळें उडाणटप्पू म्हणून सक्तमजुरीची शिक्षा हल्लीं तुरुंगांत भोगीत आहेत. म्हणजे गुन्हा न केलेला आणि गुन्हा केलेला असे दोघेहि तुरुंगांत सारख्याच सक्तीनें वागविले जातात; इतकेंच नव्हे, तर हा उडाणटप्पू शिक्षा भोगून बाहेर पडला म्हणजे पोलीस त्यावर पुन्हां उडाणटप्पूचा खटला करते. वर्षापूर्वीं ज्यास उपजीविकेचें साधन नसतें त्यास एक वर्ष तुरुंगांत राहिल्यानंतर कोर्टास दाखविण्यास उपजिविकेचें साधन किंवा जामीन कोठला सांपडणार ? अर्थात् हे उडाणटप्पू पुनः तुरुंगांत जातात, पुनः बाहेर येतात व पुनः तुरुंगांत जातात ! अशा रीतीनें ' पुनरपि जननं पुनरपि मरणं ' या न्यायानें कांहीं एक गुन्हा न करितां पांच पांच सहासहादां शिक्षा झालेले गरीब लोक आमच्या आढळण्यांत आलेले आहेत. हे लोक दुसऱ्यांदा किंवा तिसऱ्यांदां तुरुंगांत गेले म्हणजे त्यांस " नेहमींचे गुन्हेगार "(habitual offender) या सदरांत घालून त्यांच्यावर इतर कैद्यांपेक्षां जास्त सक्ती करण्यांत येते; आणि इकडे पहावें तों त्यांनीं लोकांस दाखविण्यासारखें उपजीविकेचें दृश्य साधन नाहीं यापलीकडे कांहीं गुन्हा केलेला नसतो. ' आंधळें दळतें

आणि कुत्रें पीठ खातें 'अशांतलाच हा प्रकार आहे; व याची दाद जर सरकार घेणार नाहीं तर गरीब लोकांवर हल्लीं होत असलेला जुलूम नाहींसा होण्यास दुसरा कोणताच मार्ग नाहीं. उडाणटप्पूचे खटले खरोखरच ज्यांचें वर्तन गैर चालीचें आहे त्या थोड्या लोकांवरच झाले पाहिजेत; इतकेंच नव्हे तर ज्यांच्यावर कोणताहि गुन्हा केल्याची शाबिती नाहीं, त्यांस कायद्यानें मोकळीक दिली असली तरी मॅजिस्ट्रेटांनीं सक्तमजुरीची शिक्षा सांगूं नये; व असे उडाणटप्पू पुनः पुनः तुरुंगांत घातल्यास तुरुंगांत तरी त्यांस नेहमींच्या गुन्हेगारांत दाखल न करतां इतर साध्या कैद्यांप्रमाणें ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे. हल्लींच्या व्यवस्थेनें निरपराधी मनुष्य गरीबीमुळें जामीन न मिळतां पुनः पुनः तुरुंगांत जातो, आणि तेथें त्यास नेहमींचा अपराधी समजून त्यानें यत्किंचितहि तक्रार अगर हयगय केल्यास त्याबद्दल त्यास कैदेची अगर कसली तरी कडक शिक्षा होते.

आम्ही वर जो जुलमाचा प्रकार दाखवला आहे त्याची सत्यता कोणास पहावयाची असल्यास त्यानें गोव्या उडाणटप्पूंचा कायदा पहावा. उडाणटप्पू म्हणजे येथून तेथून सारखेच असावे कीं नाहीं ? पण कायद्यांत तसा प्रकार नाहीं. गोव्या उडाणटप्पूंकरितां १८७४ चा ९ वा म्हणून एक स्वतंत्र कायदा आहे. या कायद्याप्रमाणें गोव्या उडाणटप्पूंची चौकशी फर्स्टक्लास मॅजिस्टेटचा अधिकार असलेल्या जस्टिस ऑफ दी पीस यांसच करतां येते. या गोव्या उडाणटप्पूंस तुरुंगांत न पाठवितां वर्कहाऊस (work house) मध्यें पाठवितात; व तेथें त्यास हलकें काम देऊन त्याची खाण्यापिण्याची सोय करतात. वर्कहाऊस हें कांहीं अंशीं तुरुंगाप्रमाणेंच असतें, पण त्यांतील लोकांस तेथील अधिकाऱ्याच्या परवानगीनें बाहेर जातां येतें व त्यांस कैदी समजत नाहींत. खेरीज अशा उडाणटप्पूंस धंदें मिळवून देण्याचीहि मॅजिस्ट्रेटांनीं तजवीज करावी असें कायद्यांत आहे. काळ्या उडाणटप्पूंकरितां अशा रीतीची स्वतंत्र सोय करणें जर शक्य नसेल, तर निदान ज्यांनीं पूर्वी कांहीं गुन्हा केलेला नाहीं व केवळ जामीन न मिळाल्यामुळें ज्यांस पुनः पुनः तुरुंगांत जावें लागतें अशा लोकांस ज्यांनीं प्रत्यक्ष खून अथवा चोऱ्या केल्या आहेत त्यांच्याप्रमाणें सक्तीनें न वागवतां साध्या कैद्याप्रमाणें तरी वागवण्याची सोय होणें न्याय्य व जरूर आहे. परंतु तत्पूर्वी जो बंदोबस्त व्हावयास पाहिजे तो हा कीं, पोलिसांतून या बाबतींत असलेल्या कायद्याच्या कलमाचा हल्लीं जो दुरुपयोग होत आहे तो बंद झाला पाहिजे. गरीबीकरितां लोक तुरुंगांत पाठवूं लागलें तर हिंदुस्थानच्या सरहद्दीवरच तुरुंगाच्या भिंती घालाव्या लागतील. पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ आतां बहुतेक डोक्यावर आल्यासारखाच झाला आहे. अशा वेळीं ज्यांस रोज पोटभरहि अन्न मिळण्याचीहि भ्रांत अशा लोकांस " तुम्ही रोज हाजिरी दिली

पाहिजे; नाहीं तर तुमच्यावर उडाणटप्पूंचे खटले करूं, " अशी धमकी देऊन विनाकारण सतावणें चांगलें नाहीं, हें आम्ही सरकारास सांगितलें पाहिजे असें नाहीं. जे लोक खरोखरच गैरचालीचे आहेत त्यांवर पोलिसांनीं नजर ठेवणें जरूर आहे; पण एखाद्या हलक्या जातींतील कांहीं लोक गैरचालीचे असले म्हणून त्या जातींतील सर्व लोकांस सक्तीनें वागविणें हितावह नाहीं पोलिसानें या बाबतींत हल्लीं जो क्रम स्वीकारला आहे तो आमच्या मतें अगदीं अन्यायाचा, व विषेशेंकरून गरीब लोकांस अत्यंत त्रासदायक आहे; व आमची अशी आशा आहे कीं याचा सरकारांत योग्य विचार होऊन पोलिसाच्या फाजील हुशारीस लवकरच कांहीं तरी आळा बसेल. गुन्हे न होण्याबद्दल जी खबरदारी घ्यावयाची ती घेतांना त्यामुळें निरपराधी लोक विनाकारण त्रस्त होऊन, त्यांच्या मनांत नसतांहि गुन्हे करण्याकडे त्यांची प्रवृत्ति न होऊं देण्याबद्दल अधिकाऱ्यांनीं काळजी घेतली पाहिजे. तशी काळजी हल्लीं घेण्यांत येते असें आम्हांस वाटत नाहीं, व म्हणूनच या विषयासंबंधानें आज एवढें सविस्तर विवेचन केलें आहे.

❋ ❋ ❋

प्लेग टोचण, प्लेगची लस व प्लेगवरील उपाय*

डॉ. हाफकिन यांनीं शोधून काढलेली प्लेगची लस तयार करण्याकरितां मुंबईजवळ परळ येथें गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्यांत एक मोठा कारखाना सुरू करण्यांत आला आहे. हा कारखाना उघडण्याचा समारंभ गेल्या गुरुवारीं मुंबईस लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या हातानें करण्यांत आला. त्यावेळीं या कारखान्यांत जिला आपण प्लेगची लस म्हणतों ती कशी तयार करतात, हें जमलेल्या मंडळीस दाखविण्यांत आलें; इतकेंच नव्हे तर त्याची माहितीहि डॉ. ब्रॅनरमन यांनीं तेथें जमलेल्या मंडळींस सांगितली. त्या माहितीवरून व तत्पूर्वी प्रसिद्ध झालेल्या कांहीं माहितीवरून आज यासंबंधाची हकीगत खालीं दिली आहे. या हकीगतीवरून प्लेग टोचणें म्हणजे काय आहे, त्यापासून भीति अथवा अपाय किती आहे आणि फायदा किती होण्याचा संभव आहे वगैरे गोष्टींचा बराच खुलासा होईल. विषय शास्त्रीय आहे, करितां त्यांतील बारीकसारीक गोष्टी गाळून मुद्याच्या आणि महत्त्वाच्या गोष्टी जितक्या सोप्या रीतीनें सांगतां येतील तितक्या सोप्या रीतीनें सांगितल्या आहेत.

कॉलऱ्याप्रमाणें प्लेग हाहि रोग एक प्रकारचे अतिशय सूक्ष्म जंतु (त्यांस

---

* [केसरी ता० १५ आगस्ट १८९९]

सजीव विषकण म्हटलें तरीहि चालेल) शरीरांत शिरल्यानें उद्भवतो असें डॉ. यारसिन आणि जपानी डॉ. किटॅसॅटो यांनीं हाँगकाँग येथें प्लेग सुरू होता तेव्हां प्रथम शोधून काढल्यास बरींच वर्षें झालीं. हा प्लेगजंतु अथवा सजीव विषकण शरीरांत शिरला म्हणजे तो मनुष्याच्या शरीरांतील रक्तांत एक प्रकारचें निर्जीव विष उत्पन्न करतो. ज्याप्रमाणें कोळ्याच्या पोटांतून धागे निघतात, तशाच प्रकारें हे प्लेगजंतु रक्तांत शिरल्यानें तेथें त्यांच्या पोटांतून हें निर्जीव विष बाहेर पडतें. मनुष्य प्लेगनें मरतो तो कांहीं प्लेगजंतु शरीरांत शिरल्यानें मरत नाहीं. तर या प्लेगजंतूंपासून जें विष निष्पन्न होऊन शरीरांत सांचतें त्या विषाच्या योगानें मनुष्यास मृत्यु येतो. हें विष मारण्यास दुसरें प्रतिविष अद्याप सांपडलेलें नाहीं; परंतु असें आढळून आलेलें आहे कीं, जे रोगी प्लेग होऊन बचावतात त्यांच्या रक्तांत निसर्गतःच प्लेगच्या विषास मारक असें प्रतिविष तयार होतें; व अशा रीतीनें प्रतिविष तयार झाल्यामुळें ते प्लेगनें मरत नाहींत. ज्यांच्या शरीरांत अथवा रक्तांत हें प्रतिविष उत्पन्न करून प्लेगबरोबर झुंजण्याची शक्ती नसते ते प्लेग झाला असतां जगत नाहींत. शरीराचा धर्मच असा आहे कीं, त्यांत कोणतेंहि विष गेलें असतां तें शरीराबाहेर काढून टाकण्याचा शरीर प्रयत्न करीत असतें. कांहीं रोगांत हें विष घामानें बाहेर जातें, कांहींत रेच होऊन बाहेर पडतें आणि कांहींत दुसऱ्या कोणत्या तरी द्वारानें तें बाहेर काढावें लागतें. प्लेगमध्यें आलेली गांठ वाहून दिल्यानें अशाच प्रकारचा कांहीं परिणाम घडून येतो असें डाक्तरांचें म्हणणें आहे. प्लेगचें किंवा प्लेगजंतूनीं निर्माण केलेलें हें विष इतर रोगांतील विषापेक्षां फारच जालीम असल्यानें त्याचा प्रतिकार नैसर्गिक शारीरिक क्रियेनें किंवा औषधानें होऊं शकत नाहीं.

लशीची कल्पना.

लशीची कल्पना प्रथम देवीपासून निघाली. देवी हा रोग मनुष्यास आयुष्यांतून एकदां तरी येण्याचा संभव असतो, व तो एकदां आला म्हणजे बहुधा पुन्हां येत नाहीं असा अनुभव आहे. याकरितां एकदां स्वभावतःच मोठा देवीचा रोग येण्याची वाट पाहण्यापेक्षां ज्यास देवी झाल्या असतील त्यांच्या अंगांतील थोडीशी देवीची लस आपल्या अंगांत टोंचून घालून सोप्या देवी नियमित ठिकाणीं आल्या म्हणजे पुन्हा देवी येण्याचा संभव कमी होतो, ही गोष्ट 'गोस्तनसीतला' काढण्याची युक्ति निघण्यापूर्वींच हिंदुस्थानांत माहीत होती. देवी आलेल्या मनुष्याची लस घेऊन तिनें प्रकोष्ठावर तोडगे काढून देवी टोंचण्याची पद्धत आमच्याकडें पूर्वीपासून सुरू होती. पण अशी एका रोग्याची प्रत्यक्ष लस घेऊन दुसऱ्या माणसाच्या अंगांत घातल्यानें एकादे वेळेस खरोखरच नव्या माणसाच्या सर्वांगावर देवी येत. परंतु आतां असें आढळून आलें आहे कीं, पाडीच्या स्तनावर पहिल्यांदा देवी काढून मग त्याची लस माणसाच्या अंगांत टोंचून घातली असतां असा

प्रकार घडत नाहीं, व पुनः रोग न होण्याचा संभवहि अधिक दृढ होतो. डॉ. जेनर यांचा मुख्य शोध हाच होय; व त्याप्रमाणें हल्लीं देवी टोंचण्याचा प्रघात आहे.

प्लेगची लस.

वर सांगितलेंच आहे कीं, प्लेगजंतूपासून एक प्रकारचें निर्जीव विष शरीरांत तयार होऊन त्याच्यायोगानें प्लेगचा रोगी मरतो. परंतु या विषाच्या तडाख्यांतूनहि जे लोक वांचतात त्यांस एक प्रकारची अशी खात्री वाटते कीं, आपणास एकदां प्लेग झाला, आतां पुनः येणार नाहीं. देवीच्या रोगाप्रमाणें प्लेग हा आयुष्यांतून एकदांच येणारा आहे असें नाहीं; तथापि प्लेग झालेल्या मनुष्यास लागलाच पुनः प्लेग होण्याचा संभव कमी असतो. एवढ्या तत्त्वावर प्लेगच्या लशीची योजना झालेली आहे. प्लेगजंतु शरीरांत शिरून त्यांस आपल्या रक्तांत हवें तेवढें विष निर्माण करूं देण्यापेक्षां त्यास आपल्या शरीराच्या बाहेर सदर विष निर्माण करावयास लावून त्यांतलें थोडेंसें विष (जंतु नव्हे) आपल्या शरीरांत टोंचून घातल्यानें स्वल्प प्रमाणावर प्लेगच्या सर्व भावना आपणास होतील; आणि त्या तशा भावना झाल्या म्हणजे प्लेगमधून बरा झालेल्या माणसास ज्याप्रमाणें लवकरच प्लेगपासून भीति नसते, तद्वत् आपणासहि कांहीं काळपर्यंत प्लेग होण्याची भीति राहणार नाहीं. सारांश, जिवावर जो प्रसंग यावयाचा तो शेपटावर भागवस्यासारखें होईल. प्लेग टोंचण्याची जी कृती आहे ती याच तत्त्वावर अवलंबून आहे. प्लेगजंतु निवडून काढून त्यांस कोणत्या तरी एकाद्या पदार्थांत आपलें विष उत्पन्न करूं द्यावयाचें आणि मग ते जंतु मारून विष तेवढें कायम ठेवून तें विष लसीच्या रूपानें थोडथोडें प्रत्येक मनुष्याचे अंगांत घालून प्लेगची थोडीशी भावना त्याच्या अनुभवास आणून द्यावयाची, यालेंच नांव 'प्लेगची लस टोंचणें' हें होय. असें केल्यानें रोग्यास एक दोन दिवस मध्यमप्रतीचा म्हणजे सुमारें १०२।३ डिग्रीचा ताप येतो व क्वचित् गोळाहि येतो. पण त्यानें तो मरण पावत नाहीं. कित्येकांच्या अंगांत कांहीं दिवसपर्यंत अशक्तता रहाते, पण एकंदरींत प्लेग टोंचलेले लोक लवकरच कामकाज करण्यास तयार होतात असा अनुभव आहे.

प्लेगची लस तयार करण्याची कृति.

मुंबईच्या कारखान्यांत प्लेगची लस कशी तयार करतात याची डॉ. बॅनरमन यांनीं जी माहिती दिली ती येणेंप्रमाणें आहे. ते म्हणाले कीं, प्लेगजंतू मनुष्याच्या शरीरांत शिरून ज्याप्रमाणें एकाचे हजारों वाढतात व विष निर्माण करतात, तशाच प्रकारची त्यांची लागवड कृत्रिम रीतीनें मनुष्याच्या शरीराखेरीज दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थांत करावी लागते. कोणत्याहि बियाण्याची लागवड करण्यास बीं आणि जमीन हीं दोनहि चांगलीं लागतात. प्लेगच्या जंतूंची लागवड करून लस

तयार करतांना ह्या दोनहि गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. प्लेगचा जंतु किंवा सजीव विषकण हॉस्पिटलांत प्लेग झालेल्या रोग्याच्या गांठींतून आपणास सहज मिळण्यासारखा असतो. पण या जंतूंची वंशवृद्धी होऊन त्यांची ज्यांत चांगली लागवड होईल असा पदार्थ तयार करावा लागतो. तो पदार्थ बकऱ्याच्या मांसाचें पाणी किंवा सूप (मांसरस) होय. हा मांसरस शिजवून त्यांत दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचे जंतु जिवंत रहात नाहींत अशी खबरदारी घेतली पाहिजे. नाहींपेक्षां जंतु मांसरसांत घातले असतां त्यांच्याबरोबर मांसरसांत पूर्वी असलेल्या इतर जंतूंची वाढ होऊन अखेरीस जें विष निष्पन्न व्हावयाचें तें दोघांच्याहि कमाईचें होऊन जितकें निर्भेळ पाहिजे तितकें मिळणार नाहीं. प्लेगजंतु अतीशय सूक्ष्म असतात, करितां प्लेगच्या रोग्याच्या गांठीमधून आणलेल्या जंतूबरोबर दुसरे जंतु आले नाहींत फक्त प्लेगचेच जंतु आहेत हें ओळखण्याचें साधन डॉ. हाफकिन यांनीं प्रथमतः शोधून काढलें. वर सांगितल्याप्रमाणें उष्णतेनें निर्जीव केलेल्या मांसरसाच्या बाटलींत किंवा नळींत प्लेगजंतु टाकले म्हणजे दोन दिवसांनीं नळींतील मांसरसावर एक प्रकारचा तरंग येऊन त्यांत रेशमाच्या धाग्यासारखीं बारीक सुतें दृष्टीस पडतात. हीं सुतें प्लेगजंतूखेरीज दुसऱ्या जंतूपासून निष्पन्न होत नाहींत व म्हणूनच हीं सुतें दिसूं लागलीं म्हणजे बाटलींतल्या मांसरसांत प्लेगजंतूच आहेत दुसरे जंतु नाहींत असें ठरवितां येतें. डॉ. हाफकिन यांचा महत्त्वाचा शोध हाच होय. नळींतील मांसरसावर हीं सुतें दिसावयास लागलीं म्हणजे मग या नळींतील जंतु एका मोठ्या वर सांगितलेल्या निर्जीव मांसरसानें भरलेल्या बाटलींत टाकतात, आणि त्या बाटल्या अंधारांत ठेवून देतात या बाटल्या तेथें सुमारें दीड महिना निवांत ठेवल्या म्हणजे त्यांत प्लेगजंतूंची वाढ पुरी होऊन त्यांनीं निर्माण केलेलें विषहि त्यांत सांचून राहतें. परंतु आपणास फक्त विष पाहिजे असतें, जंतु नको असतात म्हणून या बाटल्यांतील मांसरस तापवून त्यांतील जंतु मारून टाकतात व विष तेवढें कायम रहातें. एवढी कृती झाली म्हणजे लस तयार झाली. ही लस म्हणजे ज्यांत मेलेले प्लेगजंतु आणि त्यांनीं निर्माण केलेले निर्जीव विष असतें असला मांसरस होय. नंतर ही लस बाटलींत भरून ठिकाठिकाणीं प्लेग टोंचण्याकरितां पाठविण्यांत येते. लस तयार करण्याची सामान्य कृती वरच्याप्रमाणें आहे. या कामीं प्रत्येक वेळीं लस शुद्ध राहून दुसऱ्या कोणत्याहि विषाची अगर जंतूची त्यांत भेसळ न होऊं देण्याबद्दल फार खबरदारी घ्यावी लागते; पण त्याबद्दल येथें विशेष सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. ही लस पिचकारीनें कोणाच्याहि शरीरांत घातली असतां त्याला ताप येऊन प्लेगच्या भावना होतात. अशा भावना ज्यास होणार नाहींत त्यानें पुनः टोंचून घेतलें पाहिजे. एरव्हीं टोंचण्यापासून जो फायदा व्हावयाचा तो त्यास व्हावयाचा नाहीं. या लसीला 'प्लेगच्या जंतूखेरीज प्लेगच्या विषाची लस' असें

म्हटलें असतां चालेल. या लसीच्या हजारों बाटल्या तयार करण्याचा कारखाना परेल येथें हल्लीं चालू आहे. ही डॉ. हाफकिन यांची लस झाली. आतां

डॉ. यारसिन यांची प्लेगची लस.

तयार करण्याची कृती मागें प्रसिद्ध झाली होती, तिच्याबद्दल येथें थोडीशी माहिती देणें जरूर आहे. वर सांगितलेंच आहे कीं, प्लेगच्या रोगांतून बचावलेल्या इसमाच्या अंगांत प्लेगच्या विषाचें मारक एक प्रकारचें प्रतिविष शरीराच्या नैसर्गिक धर्मानेंच तयार झालेलें असतें. हें प्रतिविष कोणच्याहि कृत्रिम उपायानें जर तयार करण्यांत आलें तर तें टोंचून शरीरांत घातल्यानें प्लेगचे रोगी बरे करतां येतील ही डॉ. यारसिन यांची कल्पना होय. डॉ. हाफकिन हे प्लेगजंतूचें विष मोळा करून त्याची लस करतात, व ती प्लेग होण्यापूर्वी प्रतिबंधक म्हणून तिचा उपयोग करावयास सांगतात डॉ. यारसिन यांच्या कृतीप्रमाणें प्लेगच्या विषाचें मारक प्रतिविष गोळा करून त्याची लस तयार करण्यांत येते; व प्लेग झाला असतां तो बरा करण्यास तिचा सदर डॉक्टरांच्या मतें उपयोग होतो. दोन्हीं डाक्टरांच्या लसींत जो मोठा फरक आहे तो हाच होय. शास्त्रीय परिभाषेंत एकीस "प्लेगच्या विषाची" लस म्हटलें तर दुसरीस "प्लेगच्या प्रतिविषाची" लस म्हटलें पाहिजे. डॉ. यारसिन हे फ्रेंच डॉक्टर असून त्यांनीं डॉ. हाफकिनप्रमाणेंच या सूक्ष्मजंतुशास्त्रविद्येचा अभ्यास केलेला आहे. सन १८९७ च्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत ते मुंबईस आले होते, व तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबर ही प्लेगच्या प्रतिविषाची लसहि थोडीशी आणली होती; परंतु पुढें त्यांची हिंदुस्थानांत डॉ. हाफकिनप्रमाणें फारशी संभावना झाली नाहीं, व त्यांची लस तयार करण्याचा कारखाना काढण्यास अवश्य लागणारें साहित्य व खर्चहि त्यांस देण्यास येथें कोणीहि तयार झाला नाहीं. त्यांनीं ही लस तयार करण्याचा सायाम देशाच्या पूर्वेस आनाम नांवाचा जो फ्रेंच्यांचा मुलूख आहे त्यांतील एके शहरांत एक कारखाना काढला होता, व तेथें तयार केलेली लस घेऊनच ते येथें आले होते. ही लस तयार करण्यास चांगले शें दीडशें घोडे लागतात. आनाम प्रांतांत तद्रूप स्वस्त मिळतात म्हणून तेथें हा कारखाना डॉ. यारसिन यांनीं प्रथम सुरू केला. घोड्यास प्रथम प्लेग आणावयाचा, व त्यांतून जे जिवंत राहतील त्यांच्या अंगांतून ही प्रतिविषाची लस काढावयाची. शंभर घोडे डॉ. यारसिन यांनीं पहिल्यानें घेतले होते. पैकीं पन्नास मेले व पन्नास शिल्लक राहिले. या शिल्लक राहिलेल्या पन्नासांपासून त्यांनीं आपली लस तयार केली होती. घोड्याच्या शरीरांत ही लस तयार होण्यास सुमारें पांच महिने लागतात; व ती एकदां तयार झाली म्हणजे तो घोडा मरेपर्यंत त्याच्या अंगांतून काढून घ्यावयास सांपडते. डॉ. यारसिन यांनीं तयार केलेली ही प्लेगच्या प्रतिविषाची लस त्यांनीं कांहीं ठिकाणीं अनुभवून पाहिली आहे; परंतु तिचा जितका अनुभव घ्यावयास पाहिजे तितका तिचा

अजून घेतलेला नाहीं, व आतांपर्यंत घेतलेल्या अनुभवावरून ती लस शरीरांत टोंचून घातल्यानें प्लेग हटकून बरा होईलच असें म्हणतां येत नाहीं.

एकोणिसाव्या शतकांत सूक्ष्मजंतुशास्त्रवेत्त्यांनीं प्लेगसंबंधानें शोध करून ज्या ह्या दोन लसी काढल्या त्यांची येणेंप्रमाणें हकीकत आहे. डॉ० हाफकिन यांची लस तयार करण्याचा मोठा कारखाना मुंबईस निघाला आहे खरा; परंतु ही लसहि अद्याप डॉ. यारसिन यांच्या लसीप्रमाणेंच अपूर्णावस्थेंत आहे असें म्हणावें लागतें. पहिली गोष्ट ही कीं, डॉ. हाफकिनची लस टोंचून शरीरांत घातल्यानें एक प्रकारच्या प्लेगच्या भावना टोंचून घेतलेल्या मनुष्यास होतात. या भावना होऊं नयेत अशा प्रकारची परंतु तितकीच गुणकारक लस तयार करणें अशक्य आहे असें डॉ. बॅनरमन यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. सारांश ही लस टोंचून घेऊन प्लेगच्या भावना झाल्या तरच तिचा उपयोग झाला असें समजावें नाहीं तर पुनः टोंचून घेतलें पाहिजे असें आतां बहुतेक ठरल्यासारखें झालें आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, या प्लेगच्या भावना अथवा यातना स्वल्प प्रमाणानेंच कां होईना पण त्या एकदां सोसून घेतल्या म्हणजे तेवढ्यानेंच कांहीं पुरें पडत नाहीं. देवी टोंचलेल्या माणसास ज्याप्रमाणें पुनः कधींहि देवी येण्याची भीति नसते तसा प्लेग टोंचण्याचा प्रकार नाहीं. एकदां डा. हाफकिनची लस शरीरांत घातली म्हणजे त्यापासून सुमारें फार झालें तर तीन चार महिने निर्धास्त रहातां येतें; व पुढें असाच निर्धास्तपणा कायम ठेवणें असल्यास पुनः टोंचून घेतलें पाहिजे. सारांश, प्लेगची साथ दोन तीन वर्षें राहिल्यास त्या दोन तीन वर्षांत ५।७ वेळां टोंचून घेतल्याखेरीज निर्वाह नाहीं. परंतु ५।७ वेळां या लशींचें विष शरीरांत घातल्यानें प्रकृतीवर काय परिणाम होईल हें अद्याप निश्चित झालेलें नाहीं. डॉ. हाफकिन यांच्या लशींत जिवंत जंतु नसून फक्त निर्जीव विष असतें हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें या लशीनें टोंचून घेतलें असतां टोंचून घेतलेल्या मनुष्यापासून इतरांस संसर्गानें प्लेग होण्याची कांहीं भीति नाहीं, असें डॉ. हाफकिन यांचें म्हणणें आहे. तथापि दुसरे कित्येक डाक्तर अद्याप ही गोष्ट अनुभवानें सिद्ध झाली नाहीं असें म्हणतात. डॉ. यारसिन यांची लस बहुधा प्लेग झालेल्या रोग्यासच टोंचण्यांत येत असे; परंतु ती टोंचल्यानें कांहीं शारीर यातना अथवा क्लेश होत नाहीं. ही लस तयार करण्याचा आमचेकडे कारखाना नाहींच; परंतु अलीकडे कांहीं दिवस विलायतेहून शिकून आलेले प्रसिद्ध डॉक्टर राव हे अशाच प्रकारचा कांहीं शोध करण्याच्या उद्योगांत आहेत असें समजतें.

* शिवाजी आणि ब्राह्मण

वरील सदराखालीं मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया पत्रांत थोडेच दिवसांपूर्वी कोणी 'हिस्टारिकस्' या सहीवर एक पत्र प्रसिद्ध होऊन त्यांत असें प्रतिपादन केलें होतें कीं, ज्या ब्राह्मणांनीं शिवाजीचें राज्य बुडविलें त्यांनींच त्याचा उत्सव करण्याचा आतां प्रयत्न करणें चमत्कारिक होय. या पत्रास मुंबईचे प्रसिद्ध पारशी गृहस्थ मि. कर्केरिया यांनीं जो जबाब टाइम्सपत्रामध्येंच प्रसिद्ध केला आहे त्याचें भाषांतर दुसरीकडे दिलें आहे. या जबाबावरून वस्तुस्थिति व ऐतिहासिक दृष्ट्या घडलेला खरा प्रकार हे दोन्ही कोणाच्याहि चांगले लक्षांत येण्यासारखे आहेत. तथापि या पत्रव्यवहारासंबंधानें कांहीं गोष्टींचें जितक्या खुल्या रीतीनें विवेचन; व्हावयास पाहिजे तितकें मि. कर्केरिया यांचे पत्रांत झालें नसल्यानें त्याजबद्दल आज येथें आणखी दोन शब्द लिहिणें जरूर आहे. अशा विषयासंबंधानें लिहिणें जरा नाजूक खरें; पण कसेंहि असलें तरी आमचें कर्तव्य आम्हांस केलें पाहिजे. शिवाजीउत्सव कोणत्या कारणाकरितां काढला, तो केव्हां व कसा निघाला याची माहिती आमच्या वाचकांस देण्याचें कांहीं कारण नाहीं. तो मोडण्याकरितां ज्या नव्या कोट्या आमचे प्रतिपक्षी काढीत असतात त्यांचाच विचार कर्तव्य आहे, आणि तशा दृष्टीनेंच आम्हीं वर लिहिलेल्या पत्रव्यवहाराचा आज विचार करणार आहों.

यासंबंधानें पहिली मुद्याची गोष्ट म्हटली म्हणजे टाइम्सकाराचा लुब्रेपणा होय. मराठ्यांच्या इतिहासाची माहिती पहिल्यानें आम्हांस ग्रँटडफ्सारख्या इतिहासकारानें सांगितली याबद्दल आम्ही त्याचे फार आभारी आहों; पण त्या इतिहासांतलि खरें रहस्य लोकांस समजून देण्यास इंग्रजी ग्रंथकार स्वभावतःच अयोग्य आहेत, आणि त्यांतून टाईम्ससारखीं पत्रें तर अगदीं कुचकामाचीं आहेत, हें आतां कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. कै. रावबहादूर निळकंठ जनार्दन कीर्तने यांची ग्रँटडफकृत मराठ्यांच्या इतिहासावरील टीका प्रसिद्ध झाल्यापासून आतांपर्यंत मराठी इतिहासासंबंधानें जी चर्चा झालेली आहे, व ज्या चर्चेच्या घोरणानेंच न्या. रानडे हे हल्लीं त्या इतिहासाचें खरें स्वरूप इंग्रजी वाचकांपुढें मांडण्याकरितां एक मराठ्यांच्या इतिहासावर छोटासा ग्रंथ लिहीत आहेत त्या चर्चेवरून या इतिहासाचें खरें हृद्गत महाराष्ट्रांतील लोकांस आतां इतकें चांगलें माहित झालें आहे कीं, टाइम्स किंवा टाइम्सचे साथीदार यांचें म्हणणें आतां कोणासहि पसंत पडावयाचें नाहीं. तथापि असले आक्षेप उत्तर दिल्याखेरीज राहूं देणें चांगलें नाहीं म्हणून चर्वितचर्वणाचा दोष आला तरी तो पत्करून असलीं

---

* [केसरी–ता. २२ आगस्ट १८९९]

खोटीं मतें खोडून टाकणें फार जरूर आहे. शिवाजी चोर होता, लुटारू होता, बदमाष होता, त्यानें अफजुलखानास दग्यानें मारलें वगैरे जे आक्षेप आमच्या कानीं आजपर्यंत पडत होते त्यांतलाच ब्राह्मणांनीं शिवाजीस बुडविलें हा एक होय; व पहिल्या आक्षेपास ज्याप्रमाणें आम्हीं वेळोवेळीं उत्तरें दिलीं त्याप्रमाणें हल्लींच्या आक्षेपासहि उत्तर देणें जरूर आहे. हें उत्तर देतांना टाइम्सकाराचे हेतु आणि ऐतिहासिक अज्ञान अथवा त्यासंबंधानें त्यांनीं आपला मुद्दाम करून घेतलेला गैरसमज याचेंहि आम्हांस आविष्करण केलें पाहिजे. असें करतांना कदाचित् सदर पत्रकारास अथवा त्यांच्या जातभाईंस अप्रिय वाटतील अशाहि कांहीं गोष्टींचा उल्लेख करावा लागेल; पण त्यास आमचा कांहीं इलाज नाहीं. हल्लीं दुरुस्त झालेल्या पीनलकोडाप्रमाणें पाहिलें तर ब्राह्मण आणि मराठे किंवा हिंदु आणि मुसलमान अशा जातींमधील द्वेष वाढवणारे लेख कोणत्याहि वर्तमानपत्रकारानें लिहिले तर तो गुन्हा घडतो, व त्याबद्दल मॅजिस्ट्रेटास सदर वर्तमानपत्रकारास इशारत देण्याचाहि अधिकार दिलेला आहे. कायद्यांत इंग्रजी आणि नेटिव्ह वर्तमानपत्रें असा कांहीं भेद केलेला नाहीं, आणि न्या. स्ट्रॅची-साहेब यांनीं जें तत्त्व घालून दिलेलें आहे त्यावरून ऐतिहासिक विवेचनाचाहि जर जातीजातीमधील वैमनस्यें वाढविण्यासारखा परिणाम होत असेल तर तसें ऐतिहासिक विवेचन करणाराहि दोषी ठरतो हें आतां कोर्टाघुढें सिद्ध झालेलें आहे. असें जर आहे तर सरकारनें टाइम्समध्यें प्रसिद्ध झालेल्या पत्रव्यवहाराचा वेळींच विचार करणें व त्यापासून उत्पन्न होणारे पुढील प्रसंग टाळणें हें आमच्यामतें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे. टाइम्सपत्रकारास नेटिव्हांच्या नाकांत काड्या घालूं द्यावयाच्या, आणि त्यामुळें चिडून कोणी रागानें किंवा त्वेषानें कांहीं शब्द वापरले असतां त्यावर घारीप्रमाणें झडप घालण्यास अगदीं सूक्ष्म नजर ठेवून टपून बसावयाचें हें सरकारच्या इभ्रतीस कधींहि शोभत नाहीं. टाइम्सपत्राचे एडिटर कांहीं अडाणी किंवा मूर्ख नाहींत. तेव्हां त्यांनीं मुद्दाम होऊन 'हिस्टॉरिकस्' याचें पत्र प्रसिद्ध करून हा वाद कां उपस्थित करावा हें आम्हांस समजत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाची यत्किंचितहि ज्यास ओळख आहे त्याच्या हातूनहि अशाप्रकारच्या चुका घडावयाच्या नाहींत, मग टाइम्सकारासारख्या सर्वज्ञतेची घमेंड बाळगणाऱ्या एडिटरांनीं जर हा वाद मुद्दाम उपस्थित केला तर तो कुत्सित बुद्धीनें आणि त्यांस अंतस्थ हेतूकरतां म्हणजे न आवडणाऱ्या चळवळीस हाणून पाडण्याच्या उद्देशानें लिहिला आहे असें म्हणणें भाग येतें. मराठ्यांच्या राज्याचे उत्पादक श्री. शिवाजीमहाराज यांनीं स्थापिलेलें राज्य पेशव्यांनीं शिवाजीमहाराजांच्या वंशजांशीं विश्वासघात करून संपादिलें असें जरी क्षणभर गृहीत धरलें, तरी १८९९ मध्यें जीवंत असलेल्या ब्राह्मणांनीं शिवाजीमहाराजांचा उत्सव करूं नये असें त्यापासून कसें निष्पन्न होतें हें आम्हांस कळत नाहीं. इंग्रज लोकांचे पूर्वज रानटी होते म्हणून हल्लींचे इंग्रज लोक सुधार-

णेची ध्वजा चौहोंकडे फडकविण्यास अत्यंत नालायख आहेत असें जर कोणी म्हणेल तर तें म्हणणें जिव्हकें मूर्खपणाचें होईल तितकें टाइम्सचे मुखानें बोलण्याच्या 'हेस्टॉरिकस्'चें होय. मि. करकेरिया यांनीं ही गोष्ट आपल्या पत्रांत अगदीं प्रथमच स्पष्टपणें दाखल केलेली आहे. तूं नाहीं तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील, हा इस्तापनीतींतील न्याय जितका सयुक्तिक व समंजस आहे तितकाच एका दृष्टीनें 'हिस्टॉरिकस्'नें काढलेला सध्यांचा आक्षेप होय; परंतु त्याहिपेक्षां विशेष दोषास्पद गोष्ट ही कीं, पूर्वीच्या ब्राह्मणांनीं शिवाजीचें राज्य बुडविलें असें जें 'हिस्टॉरिकस्'चें म्हणणें आहे तेंहि अगदीं निर्मूल व निराधार आहे. पाया खोटा आणि त्या खोट्या पायावर रचलेली इमारतहि खोटी असा 'हिस्टॉरिकस्'च्या प्रतिपादनाचा प्रकार आहे. शिवाजीचा उत्सव करणें टाइम्सपत्रकारास किंवा हिस्टॉरिक्स् यास आवडत नसेल. महाराष्ट्रीयांनीं किंवा हिंदुस्थानांतील कोणत्याहि भागांतील लोकांनीं कोणत्याहि निमित्याकरितां आपआपसांतील सर्व भेद विसरून एकत्र होऊं नये, अथवा आपल्या पूर्वजांचे पराक्रम आठवून त्यापासून नैसर्गिक रीतीनें उत्पन्न होणाऱ्या मनाच्या उन्नतीचा उपभोग घेऊं नये असें प्रतिपादन करणारे कोत्या बुद्धीचे कांहीं इंग्रज लोक आहेत व त्यांचें हातांत जर हिंदुस्थानचा राज्यकारभार जाईल तर पांच असामी बेकायदेशीर काम करण्याकरितां जमले म्हणजे बेकायदेशीर मंडळी होते असें जें हल्लीं पीनलकोडांत कलम आहे तें बदलून कायदेशीर कामाकरितांहि दोन असामी एके ठिकाणीं जमले म्हणजे बेकायदेशीर मंडळी झाली असा हे पहिल्या समाट्यास कायदा करून सोडतील. असो. या विघ्नसंतोषी मंडळीस आपलीं मतें प्रसिद्ध करण्याचा आमच्याप्रमाणेंच पूर्ण अधिकार आहे; परंतु आमची त्यांस एवढीच विनंति आहे कीं, तुम्हांस जर कांहीं गोष्टी आवडत नसल्या तर ज्या कारणाकरितां तुम्हांस त्या आवडत नाहींत तीं कारणें उघड लिहा. त्याकरितां जुन्या इतिहासाचा विपर्यास करून जातीजातींमध्यें विनाकारण फूट पाडण्याचें पातक करूं नका. इतिहासाचा उपयोग वैमनस्यें वाढविण्याकरितां नव्हे, तर पूर्वीं चुका झाल्या असल्यास त्या दुरुस्त करून राष्ट्रीय उन्नतीचा खरा मार्ग कोणता हें दाखविण्याकरितां आहे, असें जें मि. करकेरिया यांनीं म्हटलेलें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. या तत्त्वाविरुद्ध जे पुरुष इतिहासाचा दुरुपयोग करितात ते आमच्यामतें आमच्या देशाचे शत्रू होत. टाईम्सपत्रकारांची गणना अशा शत्रूंमध्येंच केली पाहिजे व नेटिव्ह वर्तमानपत्रांतील लेख सूक्ष्म दृष्टीनें दर आठवड्यास पाहण्याकरितां प्रेस कमिट्या नेमणारें सरकार टाइम्सकारांस अशा रीतीनें उच्छृंखल लेख प्रसिद्ध करूं देतें हें एक आमचें दुर्दैवच होय.

असो. आतां सदर लेखांतील मुख्य मुद्याकडे वळूं. ब्राह्मणांनीं अथवा पेशव्यांनीं—शिवाजीच्या वंशजांस बुडविलें असा हिस्टारिकस् याचा आक्षेप आहे. हा आक्षेप कितपत खरा आहे याचा विचार करण्यापूर्वी हिस्टारिकस् यास आमचा

एवढाच प्रश्न आहे कीं, महाराष्ट्रांतील ब्राह्मण व त्यांतूनहि विशेषतः सर्व कोंकणस्थ ब्राह्मण लुच्चे, गळेकापू, आणि विश्वासघातकी असतील. पण इंग्रज लोक तरी आगींत धुतल्याप्रमाणें अगदीं पवित्र आहेत ना ? मग या इंग्रजांनीं पेशवाई बुडवून ज्या सातारच्या राज्याची स्थापना केली होती तेंच सातारचें राज्य पुनः स्थापन केल्यापासून चाळीस वर्षांतच कां घशांत टाकलें ? इतकेंच नव्हे तर पेशवे ज्याप्रमाणें सातारच्या राजाचे प्रधान म्हणून काम करीत होते, त्याचप्रमाणें दिल्लीच्या बादशहाचे मुतालीक म्हणून ईस्ट इंडिया कंपनी कांहीं दिवस बंगालचा कारभार पहात होती; पण तीच इंग्रजी व्यापाऱ्यांची कंपनी पुढें मोंगल बादशहास पिंजऱ्यांत ठेवण्यासं कारण झाली ना ? दक्षिणेंत निजाम उल्मुल्क हा पहिल्यानें दिल्लीच्या बादशहाचा सुभा होता; पण पुढें तो लवकरच स्वतंत्र होऊन त्याची स्वतंत्रता खुद्द कंपनीसरकारनेंहि कबूल केली. फार लांब जावयास नको. नेटिव्ह संस्थानांपैकीं निजाम, गायकवाड वगैरे ज्या मोठ्या संस्थानिकांशीं कंपनी सरकारनें दोस्त म्हणून तहनामे केले होते, तेच संस्थानिक हिंदुस्थानसरकारनें आपले दास करून सोडले आहेत; आणि पूर्वीच्या तहनाम्यांतील दोस्त शब्दाचा अर्थ "बरोबरीचे दोस्त नव्हे" तर हाताखालचे दोस्त असा करावा, असेंहि लीवार्नरसारखे शहाणे मुत्सद्दी प्रतिपादन करूं लागले आहेत. हें तरी कशाचें फल होय हें हिस्टारिकस् सांगूं शकेल काय ? निजाम, कंपनीसरकार अथवा हिंदुस्थानसकार हे सर्वच जर विश्वासघातकी असले तर त्यांच्या पंक्तीस पेशव्यांना बसविल्यास त्यांत कोणासहि लाज वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्या कारणाकरितां हैद्राबादची राज्यसूत्रें निजामानें घेतलीं, ज्याकरितां कंपनीसरकारच्या राज्याचा विस्तार होऊन अखेरीस महाराणी सरकारास चक्रवर्तिनी हें पद घ्यावें लागलें, ज्याकरितां पराक्रमी क्रॉमवेलच्या पुत्रास दूर करून इंग्लंडचे पिढीजाद राजे पुनः राज्यारूढ झाले, त्याच कारणाकरितां पेशव्यांस महाराष्ट्रांतील राज्यसत्तेचा अधिकार कांहीं वर्षें आपल्या हातांत घ्यावा लागला होता, हें मि. करकेरिया यांनीं स्पष्ट रीतीनें दाखविलेंच आहे. परंतु त्यांतहि विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, पेशव्यांनीं सातारच्या राजांचा नायनाट करण्याची बुद्धि शेवटपर्यंत कधींहि बाळगली नाहीं. उलट त्यांस योग्य तो मान देऊन त्यांच्या हातूनच प्रधानकीची वस्त्रें प्रत्येक नवा पेशवा घेत असे. पण तेंच इंग्रज सरकारकडे पहा. त्यांनीं नंतर पेशवाई बुडविण्यास सोपें जावें म्हणून ज्या सातारच्या गादीची पुनः स्थापना केली त्या गादीवरील पुरुषांचे दत्तक लवकरच पुढें नामंजूर करून अखेरीस त्यांच्या वंशजांस 'फर्स्टक्लास सरदार' च्या लिस्टांत ढकलून दिलें, आणि त्यांस कोणी सन्मानानेंहि महाराज म्हणूं नये असा वट हुकूम सोडला ! पेशव्यांनीं कांहींहि पातकें केलीं असलीं तरी त्यांनीं वरच्या सारख्या शिवाजीच्या वंशाचा उच्छेद व उपमर्द कधींहि केला नाहीं हें इतिहासवाचकांनीं विसरतां कामा नये.

सातारच्या गादीची पुनः स्थापना करण्यासंबंधानें त्यावेळीं इंग्रजी अम्मलदारांमध्यें झालेला पत्रव्यवहार 'भारतवर्षांत' जो नुकताच प्रसिद्ध झालेला आहे तोहि वाचण्यासारखा आहे.

निजाम, कंपनीसरकार किंवा विलायतेंतील इंग्रजसरकार यांनीं ज्यावेळीं जसें वर्तन केलें तसेंच तसल्या प्रसंगीं पेशव्यांनीं केलें असल्यामुळें पेशव्यांसच त्याबद्दल दूषण देणें इतिहासदृष्ट्या अन्यायाचें आहे एवढें वर लिहिलेल्या विवेचनावरून कोणासहि कळून येईल. पण मराठ्यांच्या इतिहासांतील खरें मर्म समजण्यास याहिपेक्षां जरा सूक्ष्म रीतीनें या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. शिवाजीमहाराजांनीं जें राज्य संपादिलें तें कांहीं स्वतःकरितां किंवा स्वतःच्या वंशजांकरितां नव्हे. तें सर्व महाराष्ट्राकरितां किंबहुना हिंदुलोकांकरितां संपादिलें होतें. व त्यांच्यामागें तें राखण्याची जबाबदारी जितकी त्यांच्या वंशजांवर होती तितकीच महाराष्ट्रांतील सर्व लोकांवर होती. संभाजी किंवा राजाराम यांच्या कारकीर्दींत मराठी राज्य राखलें गेलें तें कांहीं संभाजीच्या किंवा राजारामाच्या करामतीनें नव्हे तर सगळ्या महाराष्ट्रांतील त्या वेळच्या प्रमुख मंडळींच्या साहाय्यानें होय. शिवाजीमहाराजांनीं स्थापिलेलें राज्य सर्व महाराष्ट्रीयांचें आहे असा पक्का अभिमान जोंपर्यंत महाराष्ट्रांतील प्रत्येक इसमास वाटत होता—मग तो इस्रम पांढरपेशे वर्गांतला असो किंवा मराठा असो—तोंपर्यंत मराठी राज्याच्या इमारतीस तिजवर भयंकर वादळ कोसळलें असतांहि काडीइतका देखील धक्का लागला नाहीं. ब्राह्मण, परभु, शेणवी, मराठे, धनगर, मावळे वगैरे महाराष्ट्रांतील सर्व जातींत स्वराज्याबद्दल सारखा अभिमान उत्पन्न करून त्यांस इष्ट हेतूच्या प्राप्त्यर्थ आपापसांतील भेद विसरावयास लावण्याचें महत्कृत्य शिवाजीमहाराजांनीं केलें होतें. व तोच धडा पुढें पहिले बाजीरावसाहेबांनीं गिरविला हें सिद्ध करणें फारसें कठीण नाहीं. पेशव्यांनीं शिवाजीमहाराजांच्या दुर्बल वंशजांस राज्याधिकार चालवूं दिला नाहीं खरा; पण त्या अधिकाराचीं चिन्हें इंग्लंडांत ज्याप्रमाणें महाराणी सरकारकडे आहेत त्याचप्रमाणें पेशव्यांनींहि सातारच्या राजांकडे ठेविलीं होतीं. सारांश, राजघराण्यांतील पुरुषांस अथवा राज्यसंपादन करणाऱ्या पुरुषाच्या वंशजांस सदर पुरुषाचे वंशज म्हणून जितका मान द्यावयास पाहिजे होता तितका सातारच्या गादीवरील पुरुषांस पेशवे नेहमीं देत असत. परंतु गादीवरील पुरुषाचे अंगीं शौर्याचा अगर बुद्धीचा अभाव असल्यानें जें राष्ट्राचें नुकसान व्हावयाचें तेवढें मात्र पेशव्यांनीं करूं दिलें नाहीं. 'हिस्टॉरिकस्' हा पेशव्यांस ह्या त्यांच्या कृत्याबद्दल दोष देत असल्यास खुशाल देवो; पण आम्ही त्यास असें विचारितों कीं, इंग्लंडच्या गादीवरील राजे जर पुढें मागें शाहूराजाप्रमाणें दुर्बल झाले तर इंग्लंडांतील प्रमुख लोक मग ते कोणच्याहि पक्षाचे असोत, सदर राजास इंग्लंडचें अफाट राज्य बुडवूं देतील काय ? क्रॉमवेलनें राज्यसत्ता अनियंत्रित होऊं लागली म्हणून

स्वतंत्रतेचा ध्वज उभारला आणि राज्यसत्ता दुर्बल झाली म्हणून पेशव्यांस तसें करावें लागलें एवढाच कायतो दोघांत भेद आहे. बाकी दोघांचींहि कृत्यें त्यांच्या त्यांच्या देशास परिणामीं हितावहच झालेलीं आहेत. पेशव्यांनीं सातारच्या गादीचा मान राखून राज्याधिकार जो आपल्या हातीं घेतला तो ब्राह्मण किंवा मराठे असा भेद मनांत आणून घेतला नाहीं, तर सर्व महाराष्ट्राचें राज्य राखण्याकरितां घेतला हें पेशव्यांच्या इतिहासांतील दुसऱ्या पुष्कळ उदाहरणांवरून सिद्ध करून देतां येईल. पहिल्या बाजीरावानें ब्राह्मण आणि मराठे हा भेद मनांत ठेवून जर राज्यकारभार चालविला असता तर शिंदे, होळकर आणि गायकवाड यांस अगदीं हलक्या पाहिरीपासून मोठ्या पदास त्यानें कधींहि चढविलें नसतें. सेनापति दाभाडे व पंतप्रतिनिधी या दोघांसहि पहिले बाजीराव स्वराज्याचे सारखेच वैरी समजत असत. आणि सेनापति दाभाड्यांस लढाईंत मारल्यानंतर गुजराथची सुभेदारी गायकवाडास न देतां कोणत्या तरी एकाद्या ब्राह्मणास त्यास सहज देतां आली असती; आणि असें झालें असतें म्हणजे बडोद्यास आज जी मराठी पगडी दिसत आहे त्याऐवजीं ब्राह्मणी पागोटें नजरेस आलें असतें. परंतु शिवाजीमहाराजांप्रमाणें पहिल्या बाजीरावानें केवळ गुणाकडे पाहूनच लोकांस हातीं धरलें; व यामुळेंच त्यास शिवाजीमहाराज यांनीं लावलेल्या वृक्षाचा एवढा मोठा विस्तार करतां आला. तात्पर्य, मराठी राज्य बुडविल्याचा पेशव्यांच्या मार्थी जे आरोप ठेवतात त्यांनीं शिंदे, होळकर व गायकवाड हीं मोठीं मराठी संस्थानें होण्यास पेशवेच कारण झाले हें विसरतां कामा नये. मराठ्यांच्या इतिहासापासून जर कांहीं बोध घ्यावयाचा असला तर तो हाच होय कीं, त्यांतील कर्ते पुरुषांनीं मराठे, परभु, ब्राह्मण, शेणवी वगैरे कोणताहि भेद मनांत न आणतां ज्यांच्या त्यांच्या गुणाकडे पाहून तीं तीं माणसें योग्यतेस चढविलीं आणि एकंदर महाराष्ट्राचें हित साधण्याचा प्रयत्न केला. थोरल्या माधवरावांच्या अंगांत हा गुण बऱ्याच अंशानें वसत होता. म्हणून त्यांच्या कारकीर्दींत मराठी राज्य पुनः भरभराटीस येण्याचा समय आलेला होता. परंतु पेशवाईअखेर हें तत्त्व अमलांत आणणारा कोणीहि पुरुष नसल्यानें पेशवाईचा व त्याबरोबरच मराठी राज्याचा शेवट होऊन इसापनीतींतील 'चार बैल आणि सिंह' या गोष्टीप्रमाणें सर्वच आम्हीं आपल्या राज्यास अंतरलों. पेशव्यांचे वंशज त्यावेळीं दुर्बल व चैनी झालेले होते. अशा स्थितींत पेशव्यांनीं ज्याप्रमाणें शिवाजीमहाराजांचें वंशजांस सन्मानपूर्वक बाजूला काढून प्रथमतः राज्यकारभार आपले हातीं घेतला, त्याचप्रमाणें सरतेशेवटच्या दुर्बल पेशव्यास एके बाजूस सारून कोणीतरी कर्त्या पुरुषानें मराठी राज्याची व्यवस्था लावावयास पाहिजे होती. त्यावेळच्या मराठी राज्याचे आधारस्तंभ जे शिंदे, गायकवाड, होळकर, भोंसले, विंचुरकर, आणि पटवर्धन यांस ही गोष्ट करतां येण्याजोगी होती. पण तिकडे त्यांनीं बिलकूल

लक्ष दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर पुण्याच्या दरबारास न जुमानतां प्रत्येकजण कंपनीसरकारशीं स्वतंत्र तह करून आपापली आघीं सोय पाहूं लागला; आणि त्यामुळें अखेरीस स्वराज्यास कोणीहि त्राता न मिळाल्यानें तें लयास गेलें. मराठी राज्याच्या ऱ्हासाचीं दुसरींहि बरींच कारणें अहेत, पण सध्यां त्यांचा आपणांस विचार कर्तव्य नाहीं. मराठी राज्य सर्वांचें होतें. व महाराष्ट्रांत ज्यावेळीं जे कर्ते पुरुष निपजले त्यांस—मग ते कोणत्याहि जातीचे असोत—त्या राज्याचें हरएक उपायें करून संरक्षण करणें जरूर होतें; किंबहुना त्यांचें तें कर्तव्य होतें म्हटलें तरी चालेल. पहिल्या पेशव्यांनीं जर कांहीं केलें असेल तर हें कर्तव्य त्यांनीं चांगल्या रीतीनें बजावलें असेंच म्हटलें पाहिजे; व मि. कर्केरिया म्हणतात त्याप्रमाणें, मराठी इतिहासाचें जरा सूक्ष्म अवलोकन केल्यानें कोणासहि असें आढळून येईल कीं, पेशव्यांनीं जर राज्य चालविण्याचा अधिकार आपल्या हातांत घेतला नसता तर निजाम वगैरे मराठे लोकांचे पिढीजात शत्रु होते त्यांनीं त्यास केव्हांच ग्रासून टाकलें असतें. हिस्टॉरिकस् यास मराठ्यांच्या इतिहासांत अशा तऱ्हेचें धोरण तो खरा मर्मज्ञ व निःपक्षपाती असता तर तेव्हांच दिसून आलें असतें; पण जेथें आधीं मार्मिकता बेताचीच आणि तीहि अनिवार्य कुत्सित बुद्धीनें ग्रासलेली तेथें या इतिहासज्ञाच्या बुद्धीचे वरच्याप्रमाणें तारे पडावे यांत कांहीं नवल नाहीं. नवल एवढेंच कीं, अशा तऱ्हेचे कुत्सित लेख वेळोवेळीं प्रसिद्ध करून नेटिव्ह लोकांत वैमनस्यें उत्पन्न करण्याची सरकारनें टाइम्सपत्रकारांस पूर्ण मुभा ठेवावी, आणि मग त्याच्यावर कोणी अप्रिय अगर कडक टीका केली असतां सदर टीकाकारांस जबाबदार धरण्यास मात्र टपत बसावें.

असो, या उदाहरणावरून मराठ्यांचा इतिहास वाचतानां त्यापासून बोध घेण्याजोग्या गोष्टी कोणत्या आहेत, व त्या हल्लींच्या काळास कशा लागू करावयाच्या याचा विचार करतांना किती काळजी घेतली पाहिजे, मनाचा समतोलपणा कोणत्या प्रकारचा असला पाहिजे वगैरे गोष्टी चांगल्या कळून येतील. इतिहास व इतिहासांतील प्रमेयें हीं पाश्चात्यविद्येच्याच अभ्यासानें आम्हांस अवगत झालेलीं आहेत; पण निदान आजमितीला तरी अशी स्थिति नाहीं कीं, अमुक एक गौरकाय गोमाजी आमच्या इतिहासाबद्दल अमुक म्हणतात एवढ्यावरून आम्हीं तें शिरसामान्य करावें. आमचा इतिहास आमच्या दृष्टीनें पाहण्याची ताकद आमच्या अंगांत आलेली आहे, व टाइम्ससारख्या कुत्सित पत्रकारांनीं आतां कितीहि जरी बाष्कळपणा केला तरी तेवढ्यानेंच महाराष्ट्रांतील लोक फसून जातील असें नाहीं. अँग्लो-इंडियन पत्रकारांस जर महाराष्ट्रसमाजाची ही स्थिति समजली नसेल तर ही त्यांची मोठीच चूक होय; व ती त्यांनीं होईल तितकी लवकर दुरुस्त केल्यास त्यांत सर्वांचेंच हित आहे. इंग्रजसरकार आपलें राज्य कायम करण्याकरितां नेटिव्हांत दुही वाढवतें किंवा वाढवणें इष्ट असें मानतें,

असा जो कित्येकांचा समज झाला आहे त्यास टाइम्ससारख्या पत्रामधील हिस्टॉरिकस्चे लेखच कारण होतात. करितां अशा लेखांचा वेळींच प्रतिकार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, आणि म्हणूनच मि. करकेरिया यांनीं हिस्टॉरिकस्चें म्हणणें नाबडतोब मुद्देशीर खोडून काढलें याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. आमची अशी आशा आहे कीं, अशा तऱ्हेनें नसता वाद उपस्थित करून कोणाचींहि मनें दुखविण्याचा आमच्यावर प्रसंग येणार नाहीं.

❖ ❖ ❖

* सरकारच्या मनांतील खवखव केव्हां जाणार ?

मुंबईसरकारच्या मनांतील खरे हेतु काय आहेत हें पाहण्याकरितां त्यांच्या राजधानींत घडलेल्या गोष्टींपेक्षां विलायतेंत घडलेल्या गोष्टींकडे पुष्कळ वेळां नजर द्यावी लागते, याचा कायदे शिकाविण्याच्या कॉलेजासंबंधानें नुकताच सर्वत्रांस अनुभव आलेला आहे. मुंबईस सरकारी लॉ स्कूल आहे त्याचप्रमाणेंच तेथें खासगी लॉ स्कूल काढण्याचा कित्येक मंडळींचा विचार होता; पण आम्ही सरकारी लॉ क्लास सुधारण्याची खटपट करीत आहों व त्यासाठीं या लॉ क्लासची जितकी फी उत्पन्न होईल तितकी आम्हांस पाहिजे आहे, त्यामुळें खासगी लॉ क्लास काढण्यास परवानगी देतां येत नाहीं असें मुंबईसरकाराकडून तेथील लोकांस उत्तर मिळालें होतें. पण याच सरकारचें विलायतेस जें एक तोंड आहे त्यांतून अशी वाणी निघाली कीं, खासगी लॉ क्लास काढूं न देण्याचें खरें कारण निराळेंच आहे. हें तोंड म्हणजे लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन हे होत. यांनीं पार्लमेंट सभेंत असें सांगितलें कीं, वरिष्ठ प्रतीचें कायद्याचें शिक्षण लोकांच्या हातांत देणें राजकीय दृष्ट्या इष्ट नाहीं, म्हणून मुंबईस खासगी लॉ क्लास काढण्याची परवानगी दिली नाहीं. तात्पर्य येथील फर्ग्युसन कॉलेजाचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत सरकारचा जो हेतु होता तोच खासगी लॉ क्लास काढूं न देण्यांत होता असें लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांच्या उत्तरावरून स्पष्ट दिसतें. परंतु मुंबईसरकारानें इकडे दिलेला जबाब निराळा असल्यामुळें ना. मेथा यांनीं गेल्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत एक असा प्रश्न विचारला होता कीं, लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनीं दिलेलें उत्तर मुंबईसरकारच्या मताप्रमाणेंच आहे कीं नाहीं ? त्यावर असा जबाब मिळाला कीं, लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनीं बोलून दाखविलेलें मत बरोबर मुंबईसरकारच्या मताप्रमाणेंच आहे. या एका उदाहरणावरून मुंबईसरकारच्या मनांतील काळेंबेरें लंडन येथील तोंडांतून जितकें लवकर बाहेर पडतें तितकें मुंबईच्या तोंडांतून पडत नाहीं, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

---

* [केसरी–ता. २९ आगष्ट १८९९]

खासगी लॉ क्लासासंबंधानें मुंबईसरकारच्या मनांतील संशय खरा आहे कीं खोटा आहे याचा आज येथें विचार करण्याचा आमचा इरादा नाहीं. मुंबईसरकारच्या मनांतील खरे हेतु समजण्यास त्यांच्या विलायतच्या तोंडाकडे बऱ्याच वेळीं पाहण्याचा प्रसंग येतो एवढेंच या उदाहरणावरून आम्हांस सांगावयाचें होतें तें सांगून आतां प्रस्तुत विषयाकडे वळूं.

हा विषय म्हटला म्हणजे आजपर्यंत लोकांपुढें असलेला उभयतां नातू बंधूसंबंधाचा होय. या प्रश्नाची चर्चा ऐकून व वाचून महाराष्ट्रांतील लोक अगदीं कंटाळले असतील हें आम्ही समजून आहों; पण जोंपर्यंत नातूबंधूंस विनाकारण अटकेंत ठेवलेलें आहे तोंपर्यंत या विषयास कंटाळून चालावयाचें नाहीं. शरीरांत रोग आहे तोंपर्यंत औषध सुरू ठेवलेंच पाहिजे, व त्याप्रमाणेंच हल्लींच्या प्रश्नाचीहि स्थिति आहे. ज्युबिलीच्या दिवशीं रँड व आयर्स्ट यांचे जे खून झाले त्यासंबंधानें सरकारचें मन संशायित होऊन नातूबंधूंस अटकेंत ठेवल्यानें या खुनांचा कोणी कट केलेला असल्यास त्याचा पत्ता लागेल अशी सरकारची समजूत होती, असें लॉर्ड जॉर्ज हॉमिल्टन यांनीं १८९७ सालींच बोलून दाखविलें होतें. तात्पर्य, या खुनाच्या बाबतींतच नातूबंधूंस पहिल्यानें अटकेंत ठवलें ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून सरकाच्या मनांतील संशय दूर व्हावयास पाहिजे होता. प्लेगव्यवस्थेनें डोकें फिरून गेलेल्या कांहीं इसमांनीं रँडसाहेबांचा खून केला ही गोष्ट आतां जगजाहीर झालेली आहे. त्याचप्रमाणें जितकी गुप्त व बारीक चौकशी करणें शक्य होती तितकी पोलीसमार्फत झाली असतांहि नातूबंधूंचा या खुनाशीं अगर कोणत्याहि प्रकारच्या दंग्याधोप्याशीं प्रत्यक्ष अगर परोक्ष संबंध दिसून आला नाहीं; इतकेंच नव्हे तर खुनासंबंधाच्या चौकशींत त्यांचीं हत्यारें पोलिसानें घेतलीं होतीं तींहि त्यांस परत देण्यांत आलीं, ही गोष्टहि सर्वांस माहीत आहे. यावरून मुंबईसरकारच्या मनांतील नातूंसंबंधाचा संशय दूर झाला असें आम्हीं समजत होतों, पण मुंबईसरकारच्या विलायतच्या तोंडांतून नुकतेच उद्गार बाहेर पडले त्यावरून व येथें घडलेल्या कांहीं प्रकारावरून अद्याप मुंबईसरकारच्या मनास संशयपिशाचिकेनें सोडलें नाहीं, किंवा अनन्यगतिक झाल्यामुळें मुंबईसरकार आपण होऊनच सदर पिशाचिकेस कवटाळून धरीत आहे असें म्हणणें भाग येतें. विलायतेंत या महिन्याच्या आरंभीं पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या बजेटावर जो वादविवाद झाला त्यावेळीं सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनीं केलेल्या आपल्या भाषणांत नातूंसंबंधानें पुनः उल्लेख केलेला होता. सर डब्ल्यू. वेडरबर्न असें बोलले कीं, ज्या खुनासंबंधानें गुप्त कट बाहेर येतलि म्हणून नातूंस अटकेंत ठेवलें होतें,ते खून करणारे इसम सांपडून त्यांची चौकशी होऊन त्यांस फांशींहि देण्यांत आलें, तरी अद्याप नातूबंधूंची सुटका होत नाहीं.

सर डब्ल्यू. वेडरबर्न यांचें याप्रमाणें भाषण चाललें असतां मुंबईसरकारच्या विलायतच्या तोंडांतून असा ध्वनी निघाला कीं, " खून करणारे सर्व सांपडले आहेत काय ? " लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांच्या या वेदवाणीवरून सरकारचें मन अद्याप कलुषित आहे, व मूर्खपणानेंच कां होईना, पण अद्यापहि महाराष्ट्रांत कोठें तरी गुप्त कटाचीं गुप्त पाळेंमुळें दृष्टीस येतील अशी सरकारास आशा वाटत आहे असें यावरून साहजिक अनुमान होतें. पण हें अनुमान काढण्यास केवळ विलायतच्या तोंडाकडेसच पाहण्याची आतां कांहीं जरूरी नाहीं. साताऱ्यास सुमारें महिना दोन महिने एका प्रकरणासंबंधानें जो गोंधळ चालू आहे त्यावरून लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांच्या वेदवाणीवरून निघणारें अनुमानच अधिक दृढ होतें. प्रतापगडाच्या देवीचा कोणी एक पुराणिक नांवाचा पुजारी साताऱ्यास पकडला असून नातू आणि टिळक यांस अटकेंतून सोडविण्याकरितां तो बंड करणार होता, व एकंदरींत टिळक, नातू किंवा दोघेहि पुराणिकानें योजलेल्या बंडाशीं सामील होते, निदान त्यांचा सदर पुराणिकाशीं कांही संबंध तरी होता अशाबद्दल सातारा येथें आज बरेच दिवस चौकशी चालली होती. पण डोंगर पोखरण्याच्या या मोठ्या उद्योगापासून जिवंत नाहींच पण मेलेला उंदीर देखील बाहेर पडला नाहीं. सदर पुराणिक हा दरिद्री असून याच्या मनांतून कोठें तरी दरवडे घालून पैसे मिळवावयाचे होतें व त्याकरितां लोकांस गोड वाटतील अशा कांहीं तरी थापा देऊन तो दहा पांच चोरटे लोक गोळा करण्याचा प्रयत्न करीत होता, एवढेंच या चौकशी अंतीं निष्पन्न झालेलें आहे ! सदर पुराणिकावर तो दरवडे घालण्याच्या खटपटींत होता अगर प्रयत्न करीत होता (बंड करण्याचा नव्हे) असा आरोप ठेऊन त्यास सेशनकमिट करण्यांत आलें आहे. या खटल्याचा सेशनांत काय निकाल होईल तो होवो. त्याबद्दल आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. पुराणिकाचे मनांत जर खरोखरीच दरवडे घालावयाचे असतील तर त्याच्यापासून शांतता राखण्याचा कायद्याप्रमाणें जामीन घेतला म्हणजे बस्स आहे. तथापि त्याच्या मनांत दरवडे घालण्याची कल्पना येऊन त्यानें दरवडे घालण्याची जर प्रत्यक्ष कांहीं तयारी केली असेल, तर हल्लीं त्यावर ठेवलेला आरोपहि अयोग्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कसेंहि असो, आपणास आज जो कांहीं विचार कर्तव्य आहे तो पुराणिकासंबंधानें नव्हे, तर नातूंसंबंधानें होय. नातूंस संशयावरून अटकेंत ठेवून आज दोन वर्षें होऊन गेलीं. इतक्या मुदतींत त्यांच्या वर्तनाबद्दल सरकारास जितक्या बारीक रीतीनें चौकशी करणें शक्य होतें तितकी सरकारानें केली असतांहि त्यांत नातूंच्या विरुद्ध कांहीं निष्पन्न झालें नाहीं. असें असतां कोणीहि एखाद्या चोरट्यानें किंवा फाटक्या गृहस्थानें नातू-टिळकांचें नांव घेतल्याबरोबर सरकारच्या मनांत संशयाचे उमाळे पुनः फुटूं लागावे हें मोठें आश्चर्य होय. एकदां

संशयानें ग्रस्त झालेल्या मनाची समजूत काढणें किती कठीण असतें हें नवरा-बायकोच्या उदाहरणावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. त्यांतूनहि आयागो-प्रमाणें कोणी संशयांत भर घालण्यास तयार असल्यास मग तर विचारावयास नको. नातू कोणत्याहि प्रकारच्या बंडांत, दंग्याधोप्यांत अथवा खून करण्याच्या वगैरे मसलतींत कधींहि सामील नव्हते; इतकेंच नव्हे तर अशा प्रकारच्या कृत्यांशीं त्यांचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष कोणत्याहि प्रकारचा कधींहि संबंध नव्हता हें ढळ-ढळीत सिद्ध झालें असतां, पुनः सरकारानें त्यांची चौकशी न करतां किंवा अद्या-पहि कोर्टापुढें त्यांच्यावर खटला न करतां त्यांस तसेंच अटकेंत ठेवावें हें इंग्रजी राज्यपद्धतीच्या तत्त्वांस अत्यंत लांछनास्पद आहे. संशय म्हटला तरी तो निघ-ण्यास अथवा खरा ठरण्यास दोन वर्षें पुरीं आहेत. इतक्या अवधींत नातूंच्या विरुद्ध जर कांहीं पुरावा मिळाला नाहीं, तर तो पुढें केव्हां तरी मिळेल आणि मग आपल्या हातून झालेली चूक सकारण घडली असें जगास दाखवा-वयास सांपडेल अशा आशेवर जर सरकार बसलें असेल, तर ही आशा अगदीं व्यर्थ होय; आणि त्यापासून सरकारच्याबद्दल लोकांच्या मनांत जो कांहीं पूज्य-भाव आहे त्यास कायमचा धक्का येण्याचा संभव आहे, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

नातूंनीं केलें आहे काय ? त्यांच्या हातून शांतताभंग होण्याचा कांहीं संभव आहे कीं काय ? असल्यास त्यांचे हातून जी गोष्ट होईल म्हणून सरकारास वाटतें, त्याचा बंदोबस्त पोलीस, लष्कर वगैरे सार्वजनिक शांतता राखण्याकरितां ज्या संस्था आहेत त्या संस्थांकडून होईल कीं नाहीं ? नातूंवर भरकोर्टांत खटला करून चौकशी करण्याचा सरकारचा इरादा आहे कीं नाहीं ? आणि सार्वजनिक शांततेचा भंग होऊं नये म्हणून नातूंस अटकेंतच ठेवणें जरूर आहे कीं काय ? वगैरेबद्दलचे प्रश्न ना. मेथा यांनीं अगदीं स्पष्ट रीतीनें सरकारास गेल्या गुरुवारच्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत विचारले होते. पण चमत्कार असा कीं, यांपैकीं एकाचाहि सरकारांतून सरळ जबाब मिळाला नाहीं. पोलिसांकडून किंवा लष्करी लोकांडून ज्याचें ताबडतोब निवारण होणार नाहीं, अशा प्रकारचा दंगाधोपा करण्याचें हिंदुस्थानांत एकाहि मनुष्याचे अंगांत सामर्थ्य नाहीं, (मग नातूंची कथा काय) असा खुद्द गव्हर्नरसाहेबांनीं ना० मेथा यांच्या एका प्रश्नास जबाब दिला. पण आ. मि. जेम्स यांनीं ना. मेथांच्या नातूंसंबंधाच्या दुसऱ्या एका प्रश्नास जबाब देतांना असें सांगितलें कीं, दंगा होऊन तो मोड-ण्यापेक्षां दंगा न होण्याकरितांच प्रथमतः सरकारानें काळजी घेणें जरूर आहे, व तशा प्रकारची काळजी सरकार घेत आहे. या उत्तरावरून नातूंबंधूंस अटकेंत ठेवणें ही अशा प्रकारचीच एक सावधगिरी आहे, असा मुंबईसरकारचा एक समज असल्याचें स्पष्ट दिसून येतें. सरदार नातूंच्या हातून कोणत्याहि प्रकारचा दंगाधोपा

होईल असें तरी सरकारास कां वाटतें हें आम्हांस समजत नाहीं. अशा तऱ्हेचा स्पष्ट प्रश्न सरकारास विचारलेला नव्हता; पण " नातूबंधूंस अटकेंत ठेवल्यानें जें कार्य व्हावयाचें तें त्यांच्यावर देखरेख ठेवून पोलिसाच्या मार्फत करून घेतां येणार नाहीं, अशी सरकारची समजूत असल्यास ती मेहेरबानीनें सरकार कळवील काय ? " असा एक मि. मेथा यांनीं सरकारास प्रश्न विचारला होता. पण त्यास फक्त "नाहीं" असा दोन अक्षरीच जबाब मिळाला. हा जबाब पाहून कोणाचेंहि चित्त क्षणभर उद्विग्न व अस्वस्थ झाल्यावांचून राहणार नाहीं. ' नाहीं ' या दोन अक्षरांपेक्षां जास्त अक्षरें उच्चारण्याची जबाब देणारास शक्ति नव्हती, किंवा जबाब लिहून काढतांना दौतींतील शाई सरली होती कीं काय न कळे. मुद्याच्या आणि महत्त्वाच्या प्रश्नाचा अशा रीतीनें संदिग्ध जबाब देऊन सरकारानें आपली अब्रू राखण्याचा प्रयत्न करावा, यापेक्षां कायदेकौन्सिलांतील प्रश्न विचारण्याच्या अधिकाराच्या निष्फलते-बद्दल आणखी जास्त पुरावा नको आहे. ' नाहीं ' म्हणजे सरकारची कळवण्याची इच्छा नाहीं, कां पोलिसाच्या हातून बंदोबस्त होणार नाहीं, कां दुसरें कांहीं नाहीं याचा वाटेल त्यानें वाटेल तो अर्थ घ्यावा. कोर्टांत साक्षीदारानें जर असा जबाब दिला असता तर न्यायाधिशानें आणि वकिलांनीं त्यास नकोसें करून सोडलें असतें, पण कायदेकौन्सिलांत प्रश्न विचारण्याची व जबाब देण्याची तऱ्हा अगदींच अपूर्व आहे. प्रश्न विचारणारानें आधींच आपले प्रश्न लिहून कळवावे लागतात; मग ते प्रश्न आणि त्यांचे जबाब हे दोन्हीहि कौन्सिलच्या बैठकीच्या दिवशीं छापून तयार होतात. कौन्सिल भरलें म्हणजे मग ज्यांचे प्रश्न असतात त्यांपैकीं पहिला सभासद माझा " पहिला प्रश्न " एवढेच शब्द उच्चारतो; आणि लागलीच कोणी तरी म्हणजे गव्हर्नर किंवा सरकारी दोघे कौन्सिलदार यांपैकीं एकजण त्या प्रश्नाचा जबाब वाचतात; आणि दोघेहि खालीं बसतात, अथवा दुसरा प्रश्न असल्यास त्याची वर लिहिल्याप्रमाणेंच क्रिया सुरू होते. उत्तर समर्पक आहे कीं नाहीं, नसल्यास त्यांत दोष काय आहेत, वगैरेबद्दल विचारपूस करणें असल्यास ती कौन्सिलच्या पुढच्या बैठकीच्या वेळीं म्हणजे आणखी सहा महिन्यांनीं करावी. कायदेकौन्सिलांतील प्रश्नोत्तरांचा हा फार्स पाहून प्रश्न विचारणारास पुष्कळदां संतापहि येत असेल; पण तो सर्व मनांतल्या मनांत गिळून टाकावा लागतो. ना० मेथांच्या नातूंसंबंधाच्या प्रश्नांची अशीच स्थिति झालेली आहे; व आपल्या प्रश्नांचीं अशीं उत्तरें ऐकण्याकरितां मुंबईहून आपला उद्योगधंदा सोडून पुण्यास आल्याबद्दल त्यांस जर वाईट वाटत नसलें तर लोकांस तरी त्याबद्दल अत्यंत वाईट वाटत आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. नातूंस सोडून देऊन आपल्या मनाचा मोठेपणा दाखवण्याची सरकारास जी संधी आलेली आहे तिचा फायदा घेण्याचें त्यांच्या मनांत जर नसेल, तर निदानपक्षीं असल्या तऱ्हेचीं घरसोडीचीं व लोकांस चीड आणण्यासारखीं उत्तरें देण्याच्या तरी भानगडींत त्यांनीं

पडूं नये, एवढीच आमची त्यांस प्रार्थना आहे. "आमच्या मनांतील संशय अद्याप दूर झाला नाहीं; आम्हीं राजे आहों करितां राजकारणासाठीं वाटेल तितके दिवस आमच्या मर्जीप्रमाणें नातूंस प्रतिबंधांत ठेवण्याचा आम्हांस अधिकार आहे; व त्याप्रमाणें आम्हीं ठेवूं ? मग त्यांच्या हातून गुन्हा घडला असो वा नसो." अशा तऱ्हेचा जबाब, अप्रिय असला तरी, निदान उघड्या अंतःकरणानें तरी दिलेला आहे असें तरी लोकांस वाटेल. प्रजाजनापैकीं केव्हांहि कोणास विना-कारणही तुरुंगांत ठेवण्याचा राजास हक्क आहे, अशी हिंदुस्थानांतील प्रजेची तरी जुनी समजूत आहे, व सरकार कांहीं कारण न दाखवील तर नातूंस अशाच प्रकारें अटकेंत ठेविलें आहे, असें म्हणून लोक आपली समजूत करून घेतील. पण कारणाखेरीज किंवा उघड चौकशी केल्याखेरीज कोणासहि अटकेंत ठेवणें इंग्रजी राजनीतीच्या प्रमुख तत्त्वांविरुद्ध आहे असा एकीकडे बाणा मिरवावयाचा, आणि दुसरीकडे कोणासहि प्रतिबंधांत ठेवण्याची कारणें सांगण्याची वेळ आली म्हणजे धरसोडीचे किंवा उडवाउडवीचे जबाब द्यावयाचे, हा प्रकार परस्पर विरुद्ध आणि अश्लाघ्य होय. अशा वर्तनानें लोकांचीं मनें शांत न होतां उलट तीं अधिक अस्वस्थ होतात, हें आमच्या शहाण्या सरकारास आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. नातूंवर खटला करून त्यांची चौकशी करा आणि त्यांत ते दोषी ठरल्यावर त्यांस शिक्षा द्या, अथवा त्यांस प्रतिबंधांतून आतांच मुक्त करा, किंवा त्यांस विनाकारण आम्हीं तुरुंगांत ठेवणार असें स्पष्ट तरी सांगा. या खेरीज आतां प्रामाणिकपणाचा सरकारास कोणचाच मार्ग खुला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. नातूंस कैदेंत ठेवून दोन वर्षें झालीं. इतक्या मुदतींत त्यांच्या संबंधानें गुप्त व बारीक चौकशी सुरू असतांहि जर त्यांच्याविरुद्ध काडीइतकाहि पुरावा मिळालेला नाहीं, तर तो पुढें केव्हां तरी मिळेल अशी आशा धरणें व्यर्थ होय व सरकार जर या आशेवरच बसलें असेल, तर सरकारचें वर्तन लोकांस कधींहि सयुक्तिक वाटणार नाहीं. यासाठीं लॉर्ड सॅन्डहर्स्ट यांस आमची अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपल्या कारकीर्दीतील ही चूक दुरुस्त करण्याचें काम आपल्या पाठीमागून येणाऱ्या गव्हर्नरावर टाकून देऊं नये. प्लेग बंद करणें किंवा न करणें लॉर्ड लॅन्डहर्स्ट याच्या हातांत नाहीं; व तो लॉर्ड सँडहर्स्ट यांस मागील गव्हर्नराकरितां ठेवून जाणें भाग पडल्यास त्याकरितां लॉर्ड सँडहर्स्ट यांस कोणीहि दोष देणार नाहीं. पण नातूप्रकरणाची तशी स्थिति नाहीं. या पण बाबतींतील चूक अथवा घाण काढून टाकणें ही लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या हातां-तली गोष्ट आहे. करितां आमची अशी आशा आहे कीं, याबद्दल नव्या गव्हर्नर साहेबांची विनवणी करण्याचा आम्हांवर प्रसंग येणार नाहीं.

◆ ◆ ◆

* सरकार सरकारचें भांडण

प्रजेच्या वतीनें बोलणाऱ्या गृहस्थांचें आणि सरकारचें भांडण नेहमींचेंच जुंपलेलें आहे, व आमच्या वाचकांस त्याचा मासला अनेक वेळां पहाण्यास मिळालेला आहे. परंतु आज ज्या विषयासंबंधानें आम्हीं लिहिणार होतों तो नेहमींच्याहून फार निराळा आहे. हिंदुस्थानावर राज्य करणारें सरकार राजकीय तत्त्वदृष्ट्या जरी एक असलें तरी त्यांतलें त्यांतच हिंदुस्थानसरकार, मुंबईसरकार, मद्राससरकार बंगालसरकार वगैरे पोटसरकारें असून एकाच्यावर दुसरें, त्याच्यावर तिसरें अशा क्रमाक्रमानें पायऱ्या आहेत. हीं सर्व सरकारें बहुधा वरिष्ठ सरकारच्या हुकमानेंच चालत असून त्यांच्या त्यांच्यांत जर कांहीं भांडण झालें तर तें बाहेरच्या लोकांच्या फारसें नजरेस येत नाहीं. परंतु क्वचित् प्रसंगीं हें सरकारासरकारामधील भांडण वेशीवर मांडण्यांत येत असतें, व त्यावेळीं एक सरकारची दुसरें सरकार किती अदबी ठेवीत असतें हें लोकांच्या चांगलें लक्षांत येतें. असे प्रसंग फारच थोडे येतात हें खरें आहे, पण हे प्रसंग जेव्हां येतात तेव्हां त्यांचें स्वरूप लोकांपुढें मांडून हिंदुस्थानच्या राज्यव्यस्थेच्या रचनेंची त्यापासून होणारी माहिती लोकांपुढें मांडावी हें आमचें कर्तव्य होय. अशा प्रसंगावरून सरकारावर टीका करण्याची पद्धत कशी असावी हेंहि लोकांनीं शिकण्यासारखें आहे, कारण हिंदुस्थानसरकारास मुंबईसरकार जर वाईट म्हणणार, तर मग मुंबईसरकारास तरी लोकांनीं योग्य स्थलीं नांवें ठेवण्यास काय हरकत आहे ? सारांश, या सरकारासरकाराच्या भांडणावरून बऱ्याच गोष्टीसंबंधें आम्हीं बोध घेण्यासारखा आहे, व यासाठींच अशा भांडणाचा आज अनायासें प्राप्त झालेला एक मासला येथें देण्याचा आमचा विचार आहे.

हें भांडण म्हणजे मुंबई इलाख्या यंदाच्या सालचें बजेट गेल्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत वाचतांना ऑ० मि० न्यूजंट यांनीं केलेलें भाषण हें होय. परंतु त्यांतील मुद्दा सांगण्यापूर्वी हिंदुस्थान व मुंबईसरकार यांच्या दरम्यान मुंबईइलाख्याचें उत्पन्न कसें विभागलें जातें याबद्दल थोडी हकीगत सांगितली पाहिजे. सन १८७०।७१ सालापासून प्रांतिक सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांच्या दरम्यान इलाखेवार उत्पन्नाच्या दर पांच पांच वर्षांनीं नव्या नव्या फारकती किंवा करार होत असतात. हल्लीं जो करार अमलांत आहे तो १८९७।९८ सालापासून तों १९०२।३ सालापर्यंत पांच वर्षांचा आहे. उत्पन्नाच्या ज्या बाबी मुंबई इलाख्यांत आहेत त्यापैकीं कांहीं बाबींचें निम्में कांहीं बाबींचें सर्व अथवा कांहीं बाबींचें मुळींच नाहीं अशा रीतीनें मुंबई सरकारास मुंबईइलाख्यांत खर्च करण्या-

---

* [केसरी–ता. ५ सप्टेंबर १८९९]

करतां म्हणून हिंदुस्थानसरकार सुमारें चार साडेचार कोटी रुपये ठेवितें. एकंदर इलाख्याचें सर्व बाबींचें उत्पन्न सुमारें चवदा कोट रुपये आहे; पण त्यापैकीं सुमारें साडेचार कोट रुपयेच काय ते खर्च करण्याचा मुंबईसरकारास अधिकार आहे. बाकी पैसे हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत मुंबईसरकारास भरावे लागतात; व ते हिंदुस्थानसरकारानें आपलें ताब्यांत लष्करासारखीं जीं खातीं ठेवलीं आहेत तिकडे खर्च होतात. सारांश मुंबईइलाख्याचें उत्पन्न जरी चवदा पंधरा कोट रुपये असलें तरी मुंबईसरकारास स्वतःच्या मुखत्यारीनें खर्च करण्याकरितां म्हणून हिंदुस्थानसरकार सुमारें चार साडेचार कोटच रुपये देतें. जमेच्या बाबी ज्याप्रमाणें तोडलेल्या आहेत त्याप्रमाणेंच खर्चाच्या बाबी अथवा खातींहि मुंबईसरकाराकडे तोडून दिलेलीं आहेत. ह्या खात्यांचा नेहमीचा खर्च चालवून त्या खात्यांत जर कांहीं जास्त सुधारण करणें असेल तो पैसाहि मुंबईसरकारास तोडून दिलेल्या जमेच्या बाबींचें उत्पन्न वाढवून मुंबईसरकारानें वसूल केला पाहिजे. याशिवाय मुंबईसरकारानें बीस लक्षांची शिल्लक नेहमीं ठेवली पाहिजे असाहि एक नियम आहे. चार पांच वर्षांत कोठें काटकसर करून जर मुंबईसरकारनें थोडीबहुत शिल्लक टाकली तर दुसऱ्या पंचवार्षिक कराराचे वेळीं हिंदुस्थान सरकार लगेंच ती आपल्या पिशवींत ओढून घेतें; आणि पुनः मुंबईसरकारास पूर्ववत् स्थिति प्राप्त होते. यांस उत्कृष्ट दृष्टांत म्हटला म्हणजे मेंढ्यावरील लोंकर कापण्याचा होय. प्रांतिक सरकार ह्या हिंदुस्थानसरकारच्या मेंढ्या होत. यांच्या अंगावरील लोंकर कापण्याकरितां हिंदुस्थानसरकारचे फडणीस दर पांच वर्षांनीं कातरी घेऊन सिमल्यावरून खालीं उतरतात. त्यावेळीं मेंढ्यांच्या अंगांत उब राहण्यापुरती त्यांच्या अंगावर बोट बोट लोंकर ठेवून बाकी सर्व लोंकर कापण्यांत येते. पुढें पांच वर्षांत एखादे ठिकाणीं जास्त लोंकर वाढल्यास त्या पांच वर्षांचा मेंढ्यांस फायदा मिळतो, पण पांचवें वर्ष आलें कीं पुनः या मेंढ्यांस पालथे पाडून हिंदुस्थान सरकार पुनः लोंकर कापूस घेऊन त्यांच्या अंगावर पूर्ववत् बोटभरच लोंकर ठेवतें. हा पंचवार्षिक लोंकर कातरण्याचा प्रकार अन्यायाचा आहे, व त्यामुळें प्रांतिक सरकारास त्यांच्याकडे सोंपवलेल्या खात्यांत योग्य सुधारणा करण्यास सांपडत नाहींत अशी सर्व प्रांतिक सरकारांची तक्रार आहे. दर पांच वर्षीं अशी कातरणी करण्यापेक्षां उत्पन्नाच्या बाबींतील कायमचा कांहीं भाग प्रांतिक सरकारास देऊन बाकी राहिलेला भाग हिंदुस्थानसरकारानें घ्यावा, म्हणजे उत्पन्नाचा स्थाइकपणा राहून इलाखेनिहाय सुधारणा करण्यास ठिक पडेल असें पुष्कळांचें म्हणणें आहे. राष्ट्रीय-सभेचेंहि मत याचप्रमाणें आहे; व या एका बाबतींत तरी हिंदुस्थानसरकाराशीं भांडण्यास सदर सभेच्या जोडीस प्रांतिक सरकारें आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. यावरून राष्ट्रीय सभेच्या आक्षेपकांनीं चांगला धडा घेण्यासारखा आहे. 'ज्याचें पोट दुखतें तो ओवा मागतो' अशी एक म्हण आहे. त्या म्हणी-

प्रमाणेंच प्रांतिकसरकारचा हिंदुस्थानसरकारशीं तंटा लागलेला आहे. सर्व प्रांतिकसरकारांचें हिंदुस्थानसरकारास असें म्हणणें आहे कीं, तुम्ही आम्हांस जितकी जमा तोडून देतां तेवढी आमच्या खर्चास पुरी होत नाहीं. त्यांतून दर पांच वर्षांनीं तुमची कातर पुनः आमच्या अंगावरून फिरते ती फिरतेच. अशा स्थितींत प्रांतवार ज्या सुधारणा होणें जरूर आहेत त्या होऊं शकत नाहींत. वायव्यप्रांत, बंगाल, मद्रास वगैरे इतर प्रांतांच्या सरकारांनीं अशी तक्रार उघड-पणें मागेंच केलेली होती. यंदां तोच प्रसंग मुंबईसरकारावर आलेला आहे, व त्यांनींहि या पंचवार्षिक करारासंबंधानें आपला अभिप्राय इतर प्रांतिकसरकारां-सारखाच दिलेला आहे.

मुंबईसरकारच्या तिजोरीची स्थिति दुष्काळ आणि प्लेग यांमुळें गेल्या तीन सालांत फारच वाईट झालेली आहे. सन १८९६।९७ सालच्या आरंभीं मुंबई-सरकाराजवळ सुमारें चाळीस लक्ष रुपये शिल्लक होती. परंतु ही शिल्लक सर्व नाहींशी होऊन सन १८९९।१९०० साल अखेर शून्य शिल्लक राहील असा अद-मास यंदांच्या बजेटांत केलेला आहे ! परंतु ही स्थितिहि हिंदुस्थानसरकारानें मुंबईसरकारास मदत केली नसती तर आली नसती. दुष्काळाप्रीत्यर्थ झालेला प्रत्यक्ष खर्च सर्व हिंदुस्थानसरकारनें सोसला; व याखेरीज १८९७।९८ सालीं सुमारें बारा लक्ष; ९८।९९ सालीं सुमारें चाळीस लक्ष; आणि पुनः यंदांच्या सालीं सुमारें साडेबारा लक्ष रुपये हिंदुस्थानसरकारानें मुंबईसरकारचें दिवाळें निघूं नये म्हणून त्यास दिलेले आहेत. हिंदुस्थानसरकाराकडून आलेली ही रक्कम आणि मुंबईसरकारची पूर्वीची चाळीस लाखांची शिल्लक मिळून सर्व पैसा दुष्काळ व प्लेग यांकरितां खर्च होऊन १८९९।१९०० अखेर मुंबईसरकारच्या तिजोरीचें बूड उघडें पडणार आहे ! ही स्थिति सुधारून पुनः लवकरच मुंबईसरकारामें आपली वसि लक्षांची शिल्लक जमवावी असें हिंदुस्थानसरकारचें म्हणणें आहे. व याखेरीज हिंदुस्थानसरकारचे फडणीस सर जेम्स वेस्टलंड यांचा मुंबईसरकारावर दुसरा असाहि आरोप आहे कीं, दुष्काळचा व प्लेगचा खर्च बाजूला ठेवला तरीहि गेल्या तीन सालीं मुंबईसरकारचा खर्च उत्पन्नापेक्षां अधिक झाला असून तो कमी करण्याची मुंबईसरकारानें कांहीं खटपट केली नाहीं. सारांश, दुष्काळचे सालांत देखील मुंबईसरकार उधळेपणानें खर्च करीत होतें असें हिंदुस्थानसरकारचें म्हणणें आहे. सर जेम्स वेस्टलंड यांच्या या आरोपास ऑ० मि० न्यूंजंट यांनीं आपल्या बजेटावरील भाषणांत चांगलें खरपूस उत्तर दिलें आहे. मि० न्यूजंटसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, वेस्टलंडसाहेबांनीं जो हिशोब केला तो चुकीचा आहे. दुष्काळ व प्लेग यांसंबंधें प्रत्यक्ष झालेला खर्च वजा केला म्हणजे तेवढ्यानेंच दुष्का ळचा किंवा प्लेगचा सर्व खर्च भागला असें नाहीं. दुष्काळखर्चाकरतां म्हणून जी रक्कम दुष्काळखातीं खर्च पडते त्याखेरीज दर एक खात्यांत दुष्कळाप्रीत्यर्थ आणखी

खर्च होत असतो. नोकरांना महागाई म्हणून जास्त पैसे द्यावे लागतात, कांहीं ठिकाणीं नवे मामलेदार नेमावे लागतात, व कारकून शिपाई वाढवावे लागतात; धान्याच्या किंमती वाढल्यामुळें जेलमधील लोकांस लागणारा अन्नखर्च वाढतो; प्लेगकरितां नवीं हॉस्पिटलें काढावीं लागतात, नोकर ठेवावे लागतात व हॉस्पिटल असिस्टंटहि ठेवावे लागतात. याखेरीज तारा, पोस्ट वगैरे किरकोळ बाबींतहि हरएक खात्यांत जास्त खर्च होतो; हा सर्व खर्च दुष्काळखातीं न पडतां ज्या त्या खात्यांस विभागला जातो. करतां दुष्काळच्या सर्व खर्चाचा आकार करून तो बाजूस ठेवतांना वर सांगितल्याप्रमाणें अप्रत्यक्ष रीतीनें दुष्काळाप्रीत्यर्थच दरएक खात्यांत जो जास्त खर्च झाला असेल त्याचाहि त्यांत समावेश केला पाहिजे; आणि असा समावेश केला म्हणजे खातेवार खर्च जमेपेक्षां दुष्काळच्या सालीं जास्त म्हणून जें सर वेस्टलंड यांचें म्हणणें आहे तें खोटें ठरतें. न्यूजंटसाहेबांची ही कोटी निरुत्तर आहे, व ती कांहीं अंशीं हिंदुस्थानसरकरानें कबूलहि केली आहे असें त्यांच्याच भाषणावरून दिसतें.

इतकें झालें तरी मुख्य महत्त्वाचा मुद्दा निराळाच रहातो. तो हा कीं दुष्काळ किंवा प्लेग अशा अस्मानीसुलतानी प्रसंगीं हिंदुस्थानसरकारानें प्रांतिकसरकाराला किती मदत द्यावी, प्रांतिकसरकारास वीस लक्ष रुपयांची शिल्लक ठेवणें जर जरूर आहे, तर असल्या अस्मानी सुलतानी प्रसंगीं ती शिल्लक सरेपर्यंत हिंदुस्थानसरकारानें प्रांतिकसरकारास मदत करूं नये, व घुढें जरूर तेवढी मदत करून पुनः वीस लाखांची शिल्लक जमविण्याची जबाबदारी प्रांतिक सरकारावरच टाकावी हें अन्याय्य होय. प्रांतिकसरकारच्या अंगावरील लोंकर दुष्काळच्या सालीं झडली तर पुढच्या सालीं ती कांहीं दाट उगवत नाहीं. करतां अशा वेळीं हिंदुस्थानसरकारानें जी मदत करावयाची ती खर्चाच्या तुटीपुरतीच करून उपयोगी नाहीं. तर पुनः शिल्लक जमविण्यासहि मदत केली पाहिजे. प्रांतिकसरकारचें हें म्हणणें अगदीं वाजवी व न्यायाचें आहे असें कोणीहि कबूल करील. पण सिमल्याच्या महादेवास ही गोष्ट कशी रुचणार ? त्याची दृष्टी कोणीकडून तरी आपल्या पिशवींत जास्त शिल्लक पडावी व त्यांतून सरहद्दीवरील लढायांसारखे खर्च चालवतां यावे इकडे असतें. यामुळें प्रांतिकसरकाराशीं त्यांचें वर्तन शुद्ध मारवाडीपणाचें असतें. प्रांतिकसरकारास हिंदुस्थानसरकारचें म्हणणें अर्थांतच गैर वाटतें आणि मग दोघांचें भांडण सुरू होतें. परंतु सरकारसरकारच्या या भांडणांत दोन्ही पक्ष एवढी खबरदारी घेतात कीं, लोकांस एक पक्षास मिळण्याची संधि किंवा उत्तेजन त्यापासून मिळूं नये. हिंदुस्थानसरकार जो हा अन्याय करीत आहे त्याबद्दल मुंबईसरकारच्या मनांत कितीहि जरी वाईट वाटलें तरी लोकमताचें साहाय्य घेऊन हिंदुस्थानसरकारशीं भांडण्यास तें कधींच तयार होत नाहीं. बजेट कायदे कौन्सिलापुढें मांडावें लागतें म्हणून या भांडणाचा एवढा

भाग तरी बाहेर येतो; नाहीं पेक्षां तोहि आला नसता. यावरून प्रत्येकानें ध्यानांत घेण्याजोगी एवढी गोष्ट आहे कीं, हिंदुस्थानसरकार हिंदुस्थानांतील लोकांकडून वसूल झालेला पैसा ज्या रीतीनें खर्च करतें किंवा त्याची प्रांतवार जी फाळणी करतें ती प्रांतिकसरकारासहि मान्य नाहीं मग राष्ट्रीयसभेसारख्या संस्थांस ती मान्य नसल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं.

* * *

2849

स्थानिक स्वराज्याची पिछेहाट*

शुक्रवार ता. १ सप्टंबर रोजीं कलकत्ता म्युनिसिपालिटींत एक विलक्षण प्रकार घडून आला. कलकत्ता म्युनिसिपल बिलाची सर्व हकीकत लॉर्ड कर्झन यांचा ठराव प्रसिद्ध झाला तेव्हांच केसरींत प्रसिद्ध झालेली आहे. कलकत्ता म्युनिसिपालिटींतील हिंदु कमिशनर बहुभाष व अप्रामाणिक आहेत अशा तऱ्हेचे त्यांजवर खोटेनाटे आरोप ठेऊन बंगालसरकारानें म्युनिसिपल कमिशनरांच्या हातांतील सत्ता कमी करून जींत युरोपियन लोकांचें वर्चस्व आहे अशा म्यॅनेजिंग कमिटीस देण्याचें योजिलें होतें, व त्याप्रमाणें नव्या बिलाचा मसुदाहि बंगाली कायदेकौन्सिलपुढें आला होता. बंगालसरकारचें हें कृत्य अन्यायाचें व स्थानिक स्वराज्यास धोका आणण्यासारखें आहे या मुद्यावर कलकत्त्यांतील लोकांनीं आज पुष्कळ दिवस चळवळ चालू ठेविली आहे. आणि त्यांची अशी आशाहि होती कीं, लॉर्ड कर्झन यांच्या हातून लोकांच्या म्हणण्याचा योग्य विचार होऊन लॉर्ड रिपन यांनीं दिलेल्या स्थानिक स्वराज्याच्या हक्कांचें चागलें संरक्षण होईल. पण 'भरंवशाच्या म्हशीस टोणगा', ह्या म्हणीप्रमाणें लॉर्ड कर्झन यांनीं जो ठराव केला त्यांत आजपर्यंत कलकत्ता म्युनिसिपालिटींत लोकांनीं निवडलेले ५० कमिशनर असत, त्याऐवजीं यापुढें ते २५ च असावेत अशी बंगालसरकारास शिफारस केली. लॉर्ड कर्झन यांचा हा ठराव वाचून अर्थातच कलकत्त्यांतील सर्व प्रमुख गृहस्थांस व लोकांस फार वाईट वाटलें. लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या ठरावांत जी भाषा वापरली आहे ती मोठी रसाळ आहे, व त्याच्या योगें त्यांनीं कलकत्ता म्युनिसिपालिटीस दिलेली कडू जहर गोळी 'साखरावगुंठित' होईल, अशी त्यांस आशा होती; पण कलकत्त्यांतील 'लबाड' बाबूंनीं गोळीच्या वरील साखरेच्या पापुद्यास न भुलतां आंतलें औषध कडूजहर आहे हें ताबडतोब ताडलें, आणि सरकार जर स्थानिक स्वराज्याचा हक्क आहे तसा राखण्यास तयार नाहीं, तर असल्या मळमळीत सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य पत्करलेलेंच बरें असा त्यांनीं निश्चय

---

* [केसरी ता. १२ सप्टेंबर १८९९]

केला. कलकत्ता म्युनिसिपालीटींतील सभासदांची एक सभा भरवून त्यांत सरकारानें कोणत्या आधारावर कमिशनर लोकांस अप्रामाणिक म्हटलें आहे याबद्दल सरकारास पत्र पाठवून जबाब मागवावा असें ठरलें व त्याप्रमाणें बंगालसरकार काय जबाब देतें याची लोक वाट पहात होते. ता. १० आगस्ट रोजीं सरकारांतून असा जबाब आला कीं, " कमिशनर लोकांवर जे आरोप केलेले आहेत ते बंगालचे माजी लेफ्टनेंट गव्हर्नर सर अलेक्झांडर मॅकेंझी यांनीं उघडपणें बंगालच्या कायदेकौन्सिलांत सन १८९८ च्या एप्रिल महिन्यांतच केलेले आहेत; व त्यासंबंधानें हल्लींचे लेफ्टनेंट गव्हर्नर कलकत्ता म्युनिसिपालिटीबरोबर कोणत्याहि प्रकारचा पत्रव्यवहार करूं इच्छित नाहींत. " बंगालसरकारचें हें उत्तर आल्यानंतर कलकत्ता म्युनिसिपालिटींत कमिशनरांनीं पुढें काय करावें असा प्रश्न सहजच उत्पन्न झाला. लोकांनीं निवडलेल्या कमिशनरांची एक खासगी सभा भरली, आणि बहुतेकांच्या मतें असें ठरलें कीं, ज्या अर्थीं सरकार कमिशनरांवर अप्रामाणिकपणाचा आरोप करण्यास तयार आहे, पण तो शाबीत करण्यास किंवा परत घेण्यास तयार नाहीं, त्याअर्थीं असले घाणेरडे आरोप सरकार आपल्यावर आणीत असतां आपण म्युनिसिपल कमिटींत डोकें देऊन राहणें चांगलें नाहीं. कलकत्ता म्युनिसिपालिटींत एकंदर ७५ कमिशनर असून त्यांपैकीं ५० लोकांनीं निवडलेले आहेत. या पन्नासांत ३६ हिंदु, ६ मुसलमान आणि ८ इंग्रज आहेत. पैकीं २७ हिंदु आणि १ मुसलमान मिळून २८जणांनीं आपल्या जाग्यांचें तारीख १ सप्टंबर रोजीं भरलेल्या म्युनिसिपल कमेटीच्या सभेंत राजीनामे दिले.या राजीनामे देणाऱ्या गृहस्थांत भूपेंद्रनाथ बोस, कालीनाथ मित्र, एन् एन्. घोस, सुरेंद्रनाथ, नरेंद्रनाथसेन, घोसाळ,अमृतलाल घोस वगैरे सर्व पक्षांतील प्रमुख प्रमुख गृहस्थांचीं नांवें आहेत. बंगालच्या ज्या लेफ्टनेंट गव्हर्नरांनीं म्हणजे सर आलेक्झांटर मॅकेन्झी यांनीं कलकत्ता म्युनिसिपालिटींत सुधारणा करण्याचें हल्लींचें बिल उपस्थित केलें त्यांनीं आपल्या भाषणांत असें म्हटलें होतें कीं, " बाबू कालिनाथ मित्रांसारखीं चांगलीं माणसें जर नवीन व्यवस्थेप्रमाणें म्युनासिपल कमेटींत काम करण्यास तयार नसलीं तर नवीन बिल पास करण्याचा आग्रह न धरतां आपण तें चुलींत टाकूं !" सर अलेक्झांडर मॅकेंझी यांच्या म्हणण्याप्रमाणेंच आजमितीस हुबेहुब स्थिति झाली आहे. ज्या लोकांनीं कलकत्ता म्युनिसिपालिपाटींत एक पैसाहि न घेतां आज पुष्कळ वर्षें लोकांच्या वतीनें इमानें इतबारें वीस वीस पंचवीस पंचवीस वर्षें काम केलें आहे ते गृहस्थ नवीन बिलास प्रतिकूल आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांनीं नाखूष होऊन आपल्या जाग्यांचे राजीनामे दिले आहेत. असल्या लोकांस नाखूष करून म्युनिसिपालिटीची व्यवस्था राखण्याचें सरकारच्या मनांत आहे, किंवा स्थानिक स्वराज्याच्या खऱ्या तत्त्वाप्रमाणें प्रत्येक ठिकाणच्या प्रमुख लोकांच्या मदतीनेंच त्या त्या ठिकाणचीं स्थानिक व्यवस्था करण्याची सरकारची

इच्छा आहे या प्रश्नाचा आतां अनायासानेंच उलगडा होईल. लोकांकरतां पदरचा वेळ मोडून काम करावयाचें आणि सरकारकडून पुनः अप्रामाणिक म्हणून घ्यावयाचें इतके निर्लज्ज कलकत्त्यांतील किंवा दुसऱ्या कोणत्याहि शहरांतील प्रमुख गृहस्थ असतील असें आम्हांस वाटत नाहीं. स्थानिक स्वराज्याकरितां चांगल्या लोकांची मदत जर सरकारास पाहिजे असेल तर सरकारनें त्या लोकांचा योग्य मान ठेवून त्यांच्या हातांत खरा अधिकार ठेवला पाहिजे. स्थानिक स्वराज्याचा जर कांहीं अर्थ असला तर हाच होय, आणि तशा प्रकारें व्यवस्था करण्यास हिंदुस्थानसरकार जर तयार नसेल, तर म्युनिसिपालिट्यांची व लोकलबोर्डांची व्यवस्था लोकांकडून काढून घेऊन पूर्ववत सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावी हें चांगलें.

कलकत्ता येथील २८ कामिशनरांनीं राजीनामे दिले व नवीन म्युनिसिपल बिलाबद्दल आपली नाखुषी दर्शविली याबद्दल कित्येक इंग्रजी पत्रांत सदर कमिशनरांच्या विरुद्ध टीका आलेली आहे. हे पत्रकार असें म्हणतात कीं, अशा तऱ्हेनें त्रागा करण्यापासून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं, उलट सरकार हट्टास पेटून आपलाच आग्रह तडीस नेईल! गोष्ट खरी आहे. सरकारचें मनगट धरून कोणतीहि गोष्ट सरकारास करावयास लावण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं; आणि युक्तिवादानें किंवा मुद्देसूद रीतीनें सरकारास योग्य विनंती केली तरीहि सरकार ऐकत नाहीं अशी मोठी बिकट [illegible] हल्लींच्या काळांत झालेली आहे, व त्यांतून कसें पार पडावें याचें आमच्या पुढारी मंडळीस मोठेंच गूढ पडलेलें आहे. आजपर्यंत लोकांची अशी समजूत होती कीं, कोणचीहि गोष्ट सप्रमाण किंवा मुद्देसूद रीतीनें सरकारापुढें मांडली असतां सरकारकडून तिचा योग्य विचार होऊन लोकांची दाद लागेल; पण हा भ्रम आतां बहुतेक दूर झाल्यासारखा आहे. उदाहरणार्थ, हल्लींचेंच प्रकरण घ्या. कलकत्ता म्युनिसिपालिटींत सुधारणा करण्याकरितां बंगाल कौन्सिलपुढें आलेलें बिल स्थानिक स्वराज्याच्या हक्कास बाधक आहे अशाबद्दल जितके पद्धतशीर व मुद्देसूद अर्ज सरकारास जावयास पाहिजे होते, अथवा हिंदुस्थान आणि विलायत येथें जितकी चळवळ व्हावयास पाहिजे होती तेवढी कलकत्त्यांतील लोकांनीं केली; व अखेरीस लॉर्ड कर्झन आल्यादिवसापासून तों आतांपर्यंत व्हॉइसरॉयसाहेबांच्या हातून लोकमतास अनुकूल असाच या प्रश्नाचा निकाल लागेल या भरंवशावर ते होते. पण इतकें करूनहि त्यांची कर्झन साहेबांनीं निराशा केली ती केलीच. सरकार योग्य कारणें दाखवून केलेल्या विनंतीस मान देत नाहीं आणि सरकारास कोणचीहि गोष्ट अन्य उपायांनीं करावयास लावणें शक्य नाहीं, तेव्हां आतां आमच्या पुढाऱ्यांनीं करावें तरी काय असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. राजीनामे देऊन घरीं बसणें हा एक वैतागण्याचा किंवा आततायीपणाचा मार्ग आहे खरा. पण वैतागूं नये तर करावें तरी काय ? सर-

कारी अधिकाऱ्यांनीं आमच्या थोबाडींत मारीत असावें आणि पुनः आम्ही गोंडा घोळीत त्याच्यापुढें जाऊन सांगावें कीं, " माबाप, आपण थोबाडींत दिली पण ती नींटशी लागली नाहीं; करितां पुनः दुसऱ्यानें दुसऱ्या गालावर चांगली चापट द्या." असें प्रतिपादन करणारे कांहीं लोक आहेत. पण आमच्यामतें हा मार्ग सभ्यपणास किंवा इभ्रतीस अगदींच अयोग्य आहे. आपल्या हातांत सत्ता नाहीं व सरकारास आपलें योग्य म्हणणें कबूल करावयास लावणेंहि आमच्या हातीं नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण सरकारनें अन्याय केला असतां त्याबद्दल वाईटहि वाटूं नये आणि त्वेषानें " तुम्हीं काय पाहिजे तें करा, आम्ही तरी निदान असल्या अन्यायांत सामील होणार नाहीं," असें म्हणण्याइतकेंहि धैर्य आमच्या अंगीं असूं नये इतक्या निकृष्टावस्थेस आम्हीं खास पोहोंचलेले नाहीं. कलकत्ता म्युनिसिपालिटींतील २८ लोकनियुक्त कमिशनरांनीं केलेलें वर्तन आम्हांस जें श्लाघ्य वाटतें तें याच कारणाकरितां होय. आमच्यांतील प्रमुख लोकांच्या मदतीखेरीज राज्यकारभार चालवण्यास सरकार समर्थ नाहीं असें नाहीं; व आमच्या वांचून त्यांचें कांहीं अडत नाहीं हेंहि खरें आहे. पण तेवढ्यासाठीं ते देतील तेवढाच भाकरीचा किंवा मानाचा तुकडा घेऊन आम्हीं त्यांच्या पायाशीं लोळत पडावें हें कोणीहि अब्रूदार मनुष्य कबूल करणार नाहीं. कलकत्ता म्युनिसिपालिटींतील कमिशनरांनीं घालून दिलेलें उदाहरण महत्त्वाचें आहे असें जें आम्हीं म्हणतों तें याच दृष्टीनें होय. त्याचा पुढें कांहीं परिणाम होवो किंवा न होवो तिकडे आम्हीं पहात नाहीं. आज त्यांनीं जें वर्तन केलें तें 'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते' या गीतेंतील तत्त्वास अनुसरूनच केलेलें आहे, व तें अगदीं योग्य आहे अशी जोंपर्यंत आमची खात्री आहे तोंपर्यंत त्याच्या परिणामाकडे न बघतां अब्रूदार मनुष्यास जें उचित तेंच त्यांनीं केलें असें म्हणण्यास आम्ही कधींहि मागेंपुढें पाहणार नाहीं. ज्या दिवशीं २८ कमिशनरांनीं राजीनामे दिले त्या दिवशीं लोकांनीं निवडलेल्या ब्रॅनफील्ड नामक एका युरोपियन कमिशनरानें अशाच प्रकारचें कलकत्ता म्युनिसिपालिटीच्या सभेंत भाषण केलें आहे. मि. ब्रॅनफील्ड म्हणाले कीं, ' हिंदु कमिशनरांनीं जें वर्तन केलें त्याखेरीज निराळ्या रीतीनें वर्तन करणें अब्रूदार मनुष्यास शक्य नव्हतें." आमच्या मनांतील खरे विचार काय आहेत हें समजणारा मि. ब्रॅनफील्डसारखा एक जरी इंग्रज निघाला तरी त्यांत भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें, ' उत्पद्यतेस्ति मम कोपि समानधर्मा ' अशा रीतीचा एक प्रकारचा आम्हांस आनंदच आहे; व तेवढ्यावर खुषी राहून दुसऱ्या कांहीं आपमतलबी लोकांच्या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष करण्यास आम्हीं तयार असलें पाहिजे.

कलकत्ता म्युनिसिपालिटीवर आलेल्या धाडींचें लॉर्ड कर्झन यांच्या हातून जेव्हां निवारण झालें नाहीं तेव्हांच हल्लींच्या व्हाइसरायांच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्याची पिछेहाट होणार असें आम्हांस वाटलें. स्थानिक स्वराज्यास पहिल्या-

पासूनच सरकारी अधिकारी विरुद्ध होते; पण लॉर्ड रिपन यांनीं जेव्हां " ही व्यवस्था अमलांत आलीच पाहिजे " असें त्यांस निक्षून सांगितलें तेव्हां अधिकारी वर्गाचा हिरमोड होऊन सन १८८४ सालीं स्थानिक स्वराज्यांचां पाया पडला. पण लॉर्ड रिपन यांची पाठ हिंदुस्थानाकडे वळली न वळली तोंच पुनः स्थानिक स्वराज्याच्या हक्कावर चोहोंकडून स्वाऱ्या होऊं लागल्या. सन १८८४ सालापर्यंत म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांची सर्व व्यवस्था जिल्ह्याचे कलेक्टरच बघत असत. स्थानिक स्वराज्य सन १८८४ पासूनच पुढें सुरू झालें. पण मौज अशी कीं, ज्या गोष्टी जिल्ह्याचे अधिकारी यांच्या हातांत कामिट्या व बोर्डें असतां त्यांस करतां आल्या नाहींत, त्याच न केल्याबद्दल लोकानियुक्त कमिशनरांच्या डोक्यावर अपयशाचें खापर फोडण्यास जिल्ह्याचे अधिकारी तयार झाले; आणि चोहोंकडून स्थानिक कामिट्यांची व्यवस्था बरोबर नाहीं अशी ओरड सुरू झाली. कलकत्ता म्युनिसिपल बिल हें अशाच ओरडीचा परिणाम होय, व लॉर्ड कर्झन त्याची काय व्यवस्था लावतात त्यावर पुढील सर्व धोरण अवलंबून होतें. आतां लॉर्ड कर्झन यांचें मत बाहेर पडलें आहे. तेव्हां अर्थातच पुढील मार्ग खुला झाला; आणि इतर प्रांतिक सरकारेंहि त्याच धोरणावर आपापल्या इलाख्यांतील म्युनिसिपालिट्यांची सुधारणा करण्यास पुढें सरसावल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. मुंबई इलाख्यांतील म्युनिसिपालिट्यांची सुधारणा करण्या-संबंधानें कायद्याचा मसुदा आज बरेच दिवस तयार होत होता असें ऐकिवांत होतें. हा मसुदा १८९९चें बिल नं. २ म्हणून आतां प्रसिद्ध झाला आहे, या नव्या कायद्यासंबंधानें आम्हांस बरेंच लिहावें लागेल, पण सध्यां स्थलसंकोचास्तव त्यांतील महत्त्वाच्या तेवढया कलमांची माहिती देण्याचा विचार आहे. या नवीन कायद्याचें धोरण असें आहे कीं, सन १८८४ सालापूर्वी " टाऊन आणि सिटी" म्हणजे उत्पन्नाच्या किंवा लोकसंख्येच्या मानानें लहान आणि मोठ्या असा जो म्युनि-सिपालिट्यांचा भेद केलेला होता, व जो भेद सन १८८४ च्या कायद्यांतून काढून टाकला होता तो पुनः सुरू करावयाचा.अशा रीतीनें लहानमोठ्या म्युनिसिपालि-ट्यांची निवड झाली म्हणजे मग मोठमोठ्या म्युनिसिपालिट्यांतून एक एक्झिक्युटिव्ह आफिसर, एक हेल्थ ऑफिसर आणि एक इंजीनियर अशा तीन मोठ्या पगारा-च्या व जबाबदारीच्या जागा करून त्या जाग्यांवर चांगले गृहस्थ नेमावयाचे, व ते सरकारच्या परवानगीखेरीज काढले जाऊं नयेत असा कायदा करावयाचा. तात्पर्य, मोठमोठ्या म्युनिसिपालिट्यांतून वर सांगितलेल्या तीन कामदारांच्या हातांत म्युनिसिपालिटीची खरी सत्ता रहावी असें या कायद्याचें धोरण आहे. म्युनिसिपालिटींत प्लेगसारख्या साथींचा बंदोबस्त करण्याचा जास्त अधिकार असावा व म्युनिसिपल कामाकरितां लागणाऱ्या पोलिसांचा व मॅजिस्ट्रेटांचा खर्च म्युनिसिपालिटीस देतां यावा अशाबद्दलहि कांहीं कलमें नवीन बिलांत आहेत.

त्याचप्रमाणें अगदीं लहान गांवांतून जरूर वाटल्यास म्युनिसिपल कामाकरितां म्युनिसिपालिटी न नेमतां एकादी पट्टी बसविण्याचा सरकारास या कायद्यानें अधिकार देण्याचा विचार आहे. सारांश प्लेगसारख्या सांथींच्या खर्चाची जबाबदारी म्युनिसिपालिट्यांवर टाकून त्यांच्याकडून असल्या कामाप्रीत्यर्थ निघतील तेवढे पैसे काढावयाचे, आणि मोठमोठ्या शहरांतून आरोग्यरक्षणाचीं, इंजिनियरचीं, किंवा इतर कामें काढण्याचीं अथवा चालविण्याचीं सूत्रें सरकारास पसंत पडलेल्या अधिकाऱ्यांच्या हातांत ठेवावयाचीं असें या नवीन प्रसिद्ध केलेल्या बिलाचें धोरण आहे. या बिलाचा ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांनीं नीट विचार करून त्याबद्दल सरकारास स्पष्टपणें आपले अभिप्राय कळाविणें जरूर आहे, व तशा प्रकारची ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांकडून योग्य वेळीं तजवीज होईल अशी आम्हांस आशा आहे. या कायद्यांतील कोणचे फेरफार विशेष नडण्यासारखे आहेत व त्यांत कोणचे फेरफार केले पाहिजेत याबद्दल सविस्तर विवेचन आज करण्यास सवड नाहीं; तथापि वर सांगितलेल्या गोष्टीवरून या बिलाचें धोरण कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. स्थानिक स्वराज्याचें खरें आणि उदात्त स्वरूप म्हटलें म्हणजे लोकांस आपापल्या शहरांतील बंदोबस्त करण्याचा पूर्ण अधिकार देणें हेंच होय. तें उदात्त स्वरूप लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत पहावयास मिळेल अशी आतां आशा नाहीं. तेव्हां मुंबईसरकारनें येथील म्युनिसिपल ॲक्टांत ज्या सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्यांच्यामुळें स्थानिक स्वराज्याचे वाजवी हक्क जेवढे होतील तेवढे कमी काढले जावेत यापेक्षां या बाबतींत जास्त कांहीं करतां येईल असें दिसत नाहीं. तथापि वेळींच लोकांनीं जागें होऊन ह्या होऊं घातलेल्या नव्या कायद्यासंबंधानें आपले विचार सरकारपुढें मांडणें अत्यंत अवश्यक आहे; व त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांकडून ते मांडण्यांत येतील अशी आमची उमेद आहे.

* * *

मुंबई इलाख्यांतील स्थानिक स्वराज्यावर घाड*

कलकत्ता म्युनिसिपल बिलासंबंधानें लॉर्ड कर्झन यांचा ठराव प्रसिद्ध झाला तेव्हांच मुंबई इलाख्यांतील स्थानिकस्वराज्याचीहि तीच वाट व्हावयाची असें आम्हीं भाकित केलें होतें; कारण स्थानिकस्वराज्याबद्दल जर कोणास अभिमान असावयास पाहिजे, व त्या कामीं पुरस्कर्तृत्व घेण्याची जर कोणास कांहीं अवश्यकता असेल तर ती हिंदुस्थानसरकारासच होय. स्थानिक अधिकारी आणि स्वतंत्र

---

* [केसरी ता. १९ सप्टेंबर १८९९.]

स्थानिक कमेट्या या बहुधा एकमेकांच्या वैरी आहेत असें म्हटलें तरी चालेल. पुणें, अहमदाबाद, सातारा, सोलापूर, धारवाड वगैरे ठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांतील लोकनियुक्त सभासदांनीं आपापलीं कामें स्वतंत्र रीतीनें बिनबोभाट चालवावीं आणि त्यांत जिल्हाधिपतीस फक्त कांहीं विशिष्ट कारणाशिवाय हात घालतां येऊं नये हें एका प्रकारें त्यास शल्यच वाटत असतें. जिल्हाधिपतीची अशी समजूत असते कीं, जिल्ह्यांतील प्रत्येक महत्त्वाची गोष्ट त्यांस विचारून व्हावी. तात्पर्य मी जेथें जाईन तेथें नवरा होईन असें कलेक्टरसाहेबांचें स्वभावतःच म्हणणें असतें. स्थानिक कमेट्यांस हा सासुरवास नको असतो. पुणें, नगर, ठाणें, सुरत वगैरे ठिकाणच्या प्रमुख गृहस्थांस आपापल्या शहराची व्यवस्था लावण्याइतकें शहाणपण नाहीं असें कोणासही म्हणतां येणें अशक्य आहे. कारण सरकारी हुद्यांचीं मोठमोठीं कामें केलेलीं माणसें, किंवा व्यापारांत अगर अन्य तऱ्हेनें उत्कर्षास चढलेले गृहस्थ या शहरांतून नेहमीं पुष्कळ आढळण्यांत येतात. या गृहस्थांस आपापल्या शहरांतील रस्ते झाडणें, दिवे लावणें, शौचकूप उपसणें, वगैरे किरकोळ कामें करतां येऊं नयेत काय ? पण सन १८८४ सालापूर्वी इंग्रजी राज्यपद्धतीचें धोरण असें होतें कीं, लोकांच्या हातांत कोणतीहि सत्ता न ठेवतां सर्व अधिकार कलेक्टररूप एकमुखी रुद्राक्षांत यावे. त्यामुळें ज्या संस्थानिकांचा, जहागिरदारांचा, इनामदारांचा, व्यापाऱ्यांचा किंवा विद्वानांचा, म्युनिसिपालिट्यांचाचसा काय पण सुभ्यांचाहि बंदोबस्त करून घेण्यांत उपयोग करून घेतां आला असता, त्यांस इंग्रजसरकारनें घरीं खुशाल झोंप घेत बसण्यास सांगून वंशपरंपरागत त्यांच्या अंगांत असलेली धमक व कर्तबगारी निरुपयोगी करून टाकली. पण पुढें पाहतात तों कलेक्टरसाहेबाचें काम अतिशय वाढून तें त्यांस उरकेनासें झालें. ही स्थिति काढुन टाकावी, किरकोळ स्थानिक कामें कलेक्टराच्या हातून काढून घेऊन लोकांकडे सोंपवावीं, आणि मुलास बाप ज्याप्रमाणें व्यवहार शिकण्याकरितां म्हणून पहिल्यानें कांहीं कारभार तोडून देतो तसा सार्वजनिक कामें करण्याचा ' ओनामा ' शिकण्यासाठीं स्थानिक कमेट्यांचीं कामें ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांकडे सोपवून त्यांस एक प्रकारचें प्राथमिक राजकीय शिक्षण देण्याची सुरवात करावी, असा लॉर्ड रिपन यांनीं पाहिल्यानें आपल्या मनांत इरादा आणला. सारांश, जें जें काम पूर्वी कलेक्टरच्या तंत्रानें चालत होतें तें तसें न चालतां इंग्रजसरकारच्या राजछत्राच्या छायेखालीं ठिकठिकाणच्या लोकांनीं आपले स्थानिक व्यवहार चालवून सुखी रहावें, आणि जिल्हाधिकाऱ्यांनीं लोक याप्रमाणें आपापलीं स्थानिक कामें करून सुखी आहेत असें पाहून आनंद मानावा हाच लॉर्ड रिपन यांचा मुख्य हेतु होता, व त्यासच **स्थानिक स्वराज्य** अशी संज्ञा आहे. **स्वराज्य** म्हणजे कांहीं **पेशवाई** नव्हे, व तिची पुनः स्थापनाहि करण्याचा कोणी विचार करीत नव्हतें; परंतु एखादा अल्पदृष्टी आणि अधाशी बाप पोरास

स्वतंत्र रीतीनें कांहीं अधिकार तोडून देऊन त्याच्या सुखांतच आपलें सुख मानून घेण्यास ज्याप्रमाणें राजी नसतो, तद्वतच जिल्ह्यांतील अधिकारी आणि स्थानिक सरकार हें लॉर्ड रिपन यांनीं सुचवलेल्या सुधारणेस प्रतिकूल होतें. त्यांस असें वाटत होते, व अद्यापहि तसेंच आहे कीं, अशा रीतीनें आपल्या हातांतून अधिकार गेल्यावर मग आपलें महत्त्व तें काय ? लॉर्ड रिपन यांनीं सुचवलेली व्यवस्था याच-मुळें त्यांस पसंत पडली नाहीं. पण हिंस्थानसरकारचा दपटशा मागें लागल्यामुळें लॉर्ड रिपन यांचें म्हणणें त्यावेळीं अमलांत आणणें भाग पडलें. मात्र स्थानिक सरकारांनीं त्यावेळीं हिंदुस्थानसरकारास असें कळवलें कीं, " महाराज, आपण म्हणतां ती गोष्ट खरी आहे, पण या वेड्याखुळ्या लोकांच्या हातांत सगळी सत्ता एकदमच देऊं नका; अर्धीमुर्धी आतां देऊन पहा आणि तिचा ते कसा उपयोग करतात तें पाहून मग काय करणें असेल तें करा. " प्रांतिकसरकारचें हें म्हणणें हिंदुस्थानसरकारानें कबूल केलें आणि म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांतील निदान निम्मे निम्मे मेंबर तरी लोकनियुक्त असावे असा सन १८८४ सालीं कायदा पास झाला. हा कायदा म्हणजे लोकल सेल्फ गव्हर्नमेंट अथवा स्थानिक स्वराज्याचें हक्कदान याचा पहिला हप्ता अशी त्यावेळीं समजूत होती; व त्यावेळीं प्रसिद्ध झालेलें स्थानिकस्वराज्यावरील ब्ल्यूबुक जर कोणी वाचून पाहील तर त्यास आम्ही म्हणतों त्याप्रमाणें प्रत्यक्ष हिंदुस्थानसरकारानें आपल्या ठरावांत म्हटलेलें आढळून येईल. असो. हा पहिला हप्ता मिळून आज चौदा वर्षें झालीं. इतक्या अवधींत म्युनिसिपालिट्या किंवा लोकलबोर्डें यांनीं त्यांचा कारभार कलेक्टरच्या ताब्यांत होता त्यावेळेपेक्षां कोणत्याहि प्रकारें वाईट काम केलें असें दाखविण्यास काडीइतकाहि पुरावा नाहीं. प्लेगसारखी भयंकर आपत्ति १८८४ सालापूर्वी आली नव्हती ती १८९७ सालीं आली, म्हणून स्थानिकस्वराज्यव्यवस्थेस जर दोष द्यावयाचा असेल तर त्या दोषाचा थोडथोडा भाग लॉर्ड सॅन्डहर्स्ट, लॉर्ड एल्जिन व लॉर्ड कर्झन यांसहि आपापल्या माथीं घ्यावा लागेल. अहमदाबाद, पुणें वगैरे या इलाख्यांत ज्या मोठमोठ्या म्युनिसिपालिट्या आहेत त्यांच्या कामा-वर दरसाल कमिशनरसाहेबांनीं जे शेरे दिलेले सरकारी रिपोर्टांत प्रसिद्ध झालेले आहेत ते पाहिले म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. गेल्या चवदा वर्षांत म्युनिसिपालिट्यांनीं आपला कारभार ज्याप्रमाणें चालविला आहे त्याप्रमाणें पाहिलें तर स्थानिकस्वराज्याचा दुसरा हप्ता मागण्याचा त्यांस अधिकार पोहोंचत आहे. पण या गोष्टीकडे कोण लक्ष देतो ? म्युनिसिपालिट्यांनीं काम चांगलें केलें किंवा वाईट केलें हा प्रश्नच आज उरला नाहीं. कैलासावरीलच सर्व कड्याळ फिरून गेलें आहे आणि त्यामुळें पूर्वी जेथें फुलांची वृष्टी होत होती तेथें गोवऱ्यांची वृष्टी होण्याचा प्रसंग आलेला आहे. हल्लींच्या म्युनिसिपल बिला-सारख्या स्थानिक स्वराज्यास विघातक व अहितकारक अशा बिलाची कल्पना दुसऱ्या

कोणत्याहि कारणानें उत्पन्न होणें संभवत नाहीं. आपापले शहरांतील रस्ते झाडावयाचा म्हणजे मोठासा अधिकार आहे असें नाहीं; पण तोहि बजावतांना कलेक्टरसाहेबांनीं दिलेला मनुष्य आमच्या पाठिमागें पाहिजे. इतके आम्ही पाजी असलों तर आम्हांस तो अधिकार देता तरी कशाला ? त्यांतून सर्व इलाखाभर प्लेगनें व भावी दुष्काळाच्या चिंतेनें लोकांस त्राहि त्राहि करून सोडलें आहे, अशा वेळीं स्थानिकस्वराज्याचे अधिकार काढून घेण्याचें बिल सरकारानें कौन्सिलपुढें आणून त्याचा वादाविवाद करीत बसणें अगदींच अप्रयोजक होय. मुंबईसरकारची तर सध्याची स्थिति अशी आहे कीं, ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांच्या मदतीखेरीज प्लेगचा योग्य बंदोबस्त ठेवणें त्यांस दुष्कर झालेलें आहे. लॉर्ड सँडहर्स्ट जेथें जेथें जातात तेथल्या पुढाऱ्यांस त्यांची पहिली विनंति ही असते कीं, " तुम्ही सर्वांनीं प्लेगच्या कामीं सरकारास मदत करावी. " एकीकडे लोकांच्या पुढाऱ्यांची अशा तऱ्हेनें मदत मागावयाची, आणि दुसरीकडे बुटाच्या लाथा मारून त्यांस खोलींतून बाहेर घालवावयाचें हा प्रकार पाहून कोणत्या अब्रूदार मनुष्यास लाज वाटणार नाहीं ? अथवा हल्लीं सरकार व्हालंटियर लोकांस जें हातांत धरतें आहे तें फक्त गरजेपुरतें आहे असेंहि लोकांस कां वाटूं नये ? लोकांवर सरकारचा जर भरंवसा असेल, लोकांच्या खऱ्या पुढाऱ्यांनीं आपापलीं स्थानिक कामें करून सरकारी कारभाराच्या चालत्या गाडयास त्यांनीं मदत करावी अशी जर त्यांची खरोखर इच्छा असेल, व अब्रूदार माणसांनीं यांत पडावें असें त्यांस मनोभावेंकरून वाटत असेल तर हल्लींच्या बिलांत म्युनिसिपालिट्यांच्या रचनेंत जे फेरफार करण्याचें योजलें आहे ते सोडून दिले पाहिजेत; आणि लॉर्ड रिपन यांनीं जो वृक्ष रोविला त्याचेंच संगोपन करून त्यास फळें येण्याची वाट पाहिली पाहिजे. तसें सरकारास जर कर्तव्य नसेल तर मग आज मॅनेजिंग कमेटींतील निम्मे मेंबर सरकारनें निवडावे किंवा दुष्काळचा किंवा प्लेगचा खर्चहि कमिट्यांनींच करावा अशा तऱ्हेचे नियम करून त्यांचे हातपाय मोडीत बसण्यापेक्षां एकदम त्यांचा शिरच्छेद करून सर्व कारभार कलेक्टरांच्या हातीं द्यावा हें फार चांगलें. सर्व राज्यच जर इंग्रज सरकारचें आहे तर मग म्युनिसिपालिट्यांचाहि कारभार कलेक्टरसाहेबांकडे दिल्यास त्यांत कोणासहि वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. पण एकदां कांहीं स्वतंत्र अधिकार द्यावययाचे आणि दहापांच वर्षांनीं ते पुनः काढून घ्यावयाचे अशा पोरखेळानें लोकांचीं मनें मात्र अस्वस्थ होऊन त्यांच्या मनांत सरकाराबद्दल एक प्रकारची अपूज्य बुद्धि उत्पन्न होते. आज अमलांत असलेल्या कायद्यानें म्युनिसिपालिट्या म्हणजे पूर्ण स्वतंत्र आहेत असें नाहीं; परंतु हा स्थानिकस्वराज्याचा पहिला हप्ता आहे. हा घडा चांगला गिरवला असतां दुसरा घडा मास्तर आम्हांस घालून देतील अशा आशेवार कांहीं चांगले गृहस्थ म्युनिसिपालिटीचे मेंबर होण्यास तयार होते. पण आतां तशा प्रकारची आशाहि कांहीं उरली नाहीं. कलेक्टर-

साहेबांचा हात लांब होऊन मॅनेजिंग कमेटींतील निम्मे मेंबर त्या हातांत सांपडणार. सरकारचे ऑडिटर म्युनिसिपालिटींत जाऊन हिशोब तपासणार आणि प्रेसिडेंट, व्हाइस प्रेसिडेंट, आणि मेंबर यांस सरकार आपल्या नोकरांस ज्या प्रकारें केव्हांहि कामावरून दूर करूं शकतें त्याप्रमाणें दूर करण्याचा अधिकार आपल्याकडे घेणार. बरें, घरें बांधण्यास परवानगी देणें, लहानसहान नोकरांच्या नेमणुका करणें वगैरे कांहीं कामें मुखत्यारीनें करावयास सांपडतील तर तींहि एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर आटपून टाकणार, मग लोकांच्या पुढाऱ्यांची म्युनिसिपालिटींत जरूर तरी कशाला ? व ते शहाणे असल्यास जातात तरी कशाला ? सारांश, म्युनिसिपालिट्या म्हणजे कलेक्टरसाहेबांच्या ताब्यांत जिल्ह्यांतील जीं इतर पुष्कळ खातीं आहेत त्यांपैकींच हें एक म्युनिसिपल खातें होणार आहे. दरएक खात्यांतील सर्व अधिकारी पगार देऊन नेमलेले असतात; परंतु येथें बिनपगारी जर कांहीं लोक मदतीस सांपडले तर सरकारास घ्यावयाचे आहेत, व एवढ्यासाठींच निवडणुकीचें तत्त्व या बिलांत कायम ठेवलेलें आहे. बाकी खऱ्या अधिकाराचा लेशहि लोकानियुक्त सभासदांच्या हातीं ठेवलेला नाहीं. अशा स्थितींत अब्रूदार, वजनदार आणि अभिमानी माणसें म्युनिसिपालिटयांत काम करण्यास सरकारास सांपडतील असें आम्हांस वाटत नाहीं. ज्यांस कलेक्टरसाहेबांची खुषमस्करी करून दिवस काढावयाचे असतील असले कांहीं रावसाहेब किंवा रावबहादुर यांच काय पण यापेक्षांहि घाणेरडचा म्युनिसिपल कायद्याप्रमाणें काम करण्यास तयार होतील; आणि हेच लोक आपणास मिळावे एवढीच जर सरकारची इच्छा असेल तर मग हल्लींच्या बिलांत ठेवले आहेत एवढे देखील हक्क लोकांस ठेवण्याची जरूरी नाहीं. परंतु ठिकठिकाणच्या समजदार, भजनदार आणि आपल्या मताबद्दल किंवा स्थितीबद्दल योग्य अभिमान वाटणाऱ्या गृहस्थांचें स्थानिक काम चालविण्याचे कामीं आपल्यास सहाय्य व्हावें असें जर सरकारास वाटत असेल तर हल्लींच्या बिलांत पुष्कळच सुधारणा केली पाहिजे. किंबहुना ज्या हेतूनें तें बिल पुढें आणलें आहे तो हेतूच सोडून देऊन लॉर्ड रिपन सारख्या उदार अंतःकरणाच्या मुत्सद्याचे शुद्ध विचार मनांत ठेवून मग म्युनिसिपालिट्यांची रचना सुधारण्याचें काम हातांत घेतलें पाहिजे. लोकांच्या खऱ्या पुढाऱ्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांबरोबर सलोख्यानें वागण्यास एकच मार्ग आहे; आणि तो हा कीं, सदर पुढाऱ्यांस कांहीं सार्वजनिक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांकडे सरकारी अधिकाऱ्यांनीं वक्रदृष्टीनें कधीं न पाहिलें पाहिजे. नाहींपेक्षां इसापनीतींतील गोष्टीप्रमाणें शेतकऱ्यास मूल मेल्याची आणि सापास शेंपूट तुटल्याची जोंपर्यंत आठवण राहील तोंपर्यंत बिळाशीं दुधाची वाटी ठेवूनहि दोघांचें कधींहि सख्य व्हावयाचें नाहीं. म्युनिसिपालिटयांचे अधिकार लोकांच्या पुढाऱ्यांनीं वापरल्यास कलेक्टरसाहेबांचा दर्जा कांहीं कमी होतो असें नाहीं. खर्चाच्या मानानें पहावें तर कायद्यामध्यें दुष्काळचा व प्लेगचा

खर्च म्युनिसिपालिटयांवर लादल्यानें म्हणजे म्युनिसिपालिटया तें सोसण्यास समर्थ होतात असेंहि थोडेंच आहे. हिंदुस्थानसरकारानें मुंबईसरकारचे अंगावरील भीस दरपांच वर्षीं जरा जास्त कापली तर न्यूजंट साहेबांस जर वाईट वाटतें, तर मग नुसती भीसच नव्हे तर म्युनिसिपालिटयांच्या आंगाचा तुकडा मुंबईसरकार कायमचा कादून घेण्यास तयार झाल्यावर म्युनिसिपालिटयांचें ' बँ ' झाल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें ? अबला लुबाडतो म्हणून बनें कला लुबाडावें हा कांहीं न्याय नव्हे. व या न्यायापेक्षां हल्लींच्या बाबतींत दुसरा कोणताहि न्याय लागू आहे असें आम्हांस वाटत नाहीं. असो. यापेक्षां घुष्कळ जास्त लिहावयाचें आहे, पण स्थलसंकोचास्तव तें घुढील खेपेवर टाकणें भाग आहे. सरतेशेवटीं ना. गरूड, छत्रे वगैरे लोकनियुक्त सभासदांस एवढीच विनंती आहे कीं, त्यांनीं ह्या बाबतींतील लोकमत सरकारापुढें मांडण्यास आळस करूं नये. ठिकठिकाणच्या लोकांनींहि त्याचप्रमाणें या बिलाविरुद्ध एव्हांपासूनच चळवळ चालू केली पाहिजे. मग सरकार आपलें ऐको वा न ऐको. उद्योग करणें आपलें काम आहे.

* * *

परदेशांतील लोकांकरितां आमचा छळ आणखी किती दिवस होणार ?*

पुण्यांतील गरीब लोकांनीं तारीख २८ आगष्ट रोजीं चार साडेचार हजार सह्यांचा जो एक मोठा मराठी अर्ज सरकाराकडे पाठविला होता त्याचा जबाब ६ आक्टोबर तारखेचा रा. रा. पांडुरंग रामजी बारी यांचे नांवचा नुकताच येथें येऊन दाखल झाला आहे. अर्जांत लोकांच्या काय मागण्या होत्या याचा उल्लेख मागें आम्हीं केलेलाच आहे. हल्लींच्या प्लेगव्यवस्थेमुळें लोकांस कोणकोणत्या प्रकारचीं दुःखें सोसावीं लागतात, त्यांचे कसकसे हाल होतात वगैरे सविस्तर कळकळीनें वर्णन करून अखेरीस तीन वर्षांच्या अनुभवावरून हे सर्व उपाय निरुपयोगी आहेत, आणि लोकांचें खरोखर कल्याण करण्याची सरकारची बुद्धि असेल तर या उपायांप्रीत्यर्थ सरकारचे जे लाखों रुपये खर्च होत आहेत त्याऐवजीं गांवाबाहेर गरीब लोकांकरितां झोंपड्या बांधून देऊन गांवांत कोठेंहि प्लेग आला असतां त्या ठिकाणच्या गरीब लोकांस गांवाबाहेर राहण्याची दयाळू सरकारनें सोय करून द्यावी अशी या अर्जांत हल्लींच्या प्लेगव्यवस्थेनें जाचलेल्या पुण्यांतील गोरगरीबांनीं सरकारास नम्रपणें विनंती केली होती. हाल्लींच्या प्लेग-

---

* [केसरी ता. १७ आक्टोबर १८९९]

व्यवस्थेनें गरीब लोकांस होणाऱ्या जाचाचें ह्यांत दिलेलें वर्णन इतकें हृदयद्रावक आहे कीं, तें वाचून कोणाच्याहि अंतःकरणास सहज चटका बसेल. या अर्जाबद्दल बऱ्याच वर्तमानपत्रांतून अनुकूल अभिप्राय आलेले होते; व लोक जर प्लेग टाळण्याकरितां गांवाबाहेर रहाण्यास खुषी आहेत, तर इनॉक्युलेशनसारख्या लोकांस अप्रिय झालेल्या उपायांची योजना करण्यापेक्षां सरकारनें अशा बाबतींत लोकांच्या तंत्रानेंच वागून आणि त्यांस गांवाबाहेर झोंपड्या बांधून देऊन त्यांचे जीव बचावावे असें बहुतेकांचें म्हणणें होतें. या अर्जासंबंधानें विशेष गोष्ट म्हटली म्हणजे ही होय कीं, तो सरकारच्या डोळ्यांत खुपणाऱ्या कोणी पांढरपेशानें लिहिलेला नसून, ज्या लोकांस प्लेगचा त्रास व जाच सोसावा लागत आहे त्यांच्यापैकींच एकानें त्यांचीं दुःखें सरकारास बरोबर रीतीनें कळण्याकरितां हा अर्ज तयार केला होता. 'अनुभवाखेरीज ब्रह्मज्ञान नाहीं' या म्हणीप्रमाणें या अर्जांत गरीब लोकांच्या दुःखांचें जें वर्णन केलें होतें तें अर्थातच अत्यंत कळकळीनें केलेलें असल्यामुळें हुबेहुब वठलेलें होतें. अर्जांत शेवटीं असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, स्थानत्याग करून आमच्या जीविताचा आम्हीं बचाव करण्यास तयार आहों; पण श्रीमंत लोकांप्रमाणें गांवाबाहेर झोंपड्या बांधून रहाण्याची आम्हांस ताकद नाहीं, करितां आम्हांस त्रास होण्याजोगे इलाज करण्यापेक्षां सरकार गांवाबाहेर जर आम्हांस झोंपड्या बांधून देईल तर सरकारचे उपकार आम्हीं कधींहि विसरणार नाहीं. असो. अशा प्रकारच्या अर्जास सरकारांतून जो जबाब आला तो खालीं दिला आहे. हा जबाब सरकारचे अंडर सेक्रेटरींच्या सहीचा आहे. ते रा. रा. बारी यांस असें लिहितात कीं:—

" आपल्या व पुण्यांतील रहिवाशांच्या सहीचा गेल्या महिन्याच्या २८ तारखेचा जो अर्ज आला तो सरकारास पोहोंचला. लोकांनीं निमूटपणें सोसलेल्या दुःखाचें हृदयाद्रवक वर्णन वाचून ना. गव्हर्नर—इन—कौन्सिल यांस फार वाईट वाटतें असें कळवण्यास मला हुकूम झालेला आहे. गव्हर्नरसाहेबांची अशी इच्छा व हेतु आहे कीं, हल्लींच्या प्लेगव्यवस्थेमुळें लोकांस जो कांहीं त्रास व दुःखें होतात, तीं होतील तेवढीं कमी करावीं. परंतु केवळ अर्जदारांच्या म्हणण्याचाच ना. गव्हर्नरसाहेब यांस विचार करावयाचा आहे असें नाहीं. तर हिंदुस्थानचे इतर प्रांत आणि हिंदुस्थानखेरीज इतर देश यांच्यासंबंधानेंहि त्यांस अवश्य विचार केला पाहिजे; आणि त्यांस हल्लीं जी सल्ला मिळाली आहे त्यावरून अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणें कोणतीहि प्लेगव्यवस्था कमी करणें किंवा त्यांत बदल करणें यांस गव्हर्नरसाहेब आपली मंजुरी देऊं शकत नाहींत. तथापि मला आपणांस एवढें कळवावयाचें आहे कीं, अर्जांत लोकांस होत असलेली जी गैरसोय व त्रास दाखविला आहे तो कमी करण्याचा होईल तेवढा प्रयत्न केला जाईल. "

सरकारचें वरील उत्तर वाचून कोणासहि आश्चर्य व खेद वाटल्यावांचून रहाणार नाहीं; व परदेशांतील किंवा परमुलखांतील लोकांकरतां आमची चांदी आणखी किती दिवस उडणार असा त्यांच्या तोंडांतून स्वभावतःच प्रश्न निघेल. सरकारानें तीन वर्षें प्लेग हटाविण्याकरितां जे उपाय योजले ते कितपत सिद्धीस गेले ही गोष्ट सरकारास न समजण्याइतकें सरकार गैरशहाणें आहे असें नाहीं. अलीकडे कांहीं ठिकाणीं हे उपाय टाकून देऊन प्लेग टोंचण्याच्या उपायाचीच सरकार सक्तीनें अंमलबजावणी करीत आहे, अथवा केलेली पहात आहे असें म्हटलें तरी चालेल. तात्पर्य, कोणीना कोणीकडून तरी लोकांच्या पाठीमागचा त्रास चुकलेला नाहीं. रोगी इस्पतळांत नेणें, घरच्या लोकांस सेग्रिगेट करणें, कपडे वाफवणें, जाळणें, धुणें, व्यवहार बंद ठेवणें. वगैरे उपाय थकले. आतां प्लेग टोंचून घेणें कपाळीं आलें आहे; परंतु तेंहि परिणामीं कितपत हितावह होईल त्याचीहि अद्याप शंकाच आहे. अशा स्थितींत प्लेग टाळण्यास नव्या व जुन्या अनुभवावरून गुणावह ठरलेला जो स्थानत्यागाचा उपाय तो करण्यास आम्हीं तयार आहों, आमची कांहीं तरी सोय लावून द्या, अशा प्रकारची लोक विनवणी करीत असतां परदेशांतील किंवा परमुलखांतील लोकांची सबब सांगून सरकारानें त्यांच्या अर्जास वाटाण्याच्या अक्षता लावाव्या ही अत्यंत चमत्कारिक व खेदाची गोष्ट होय. परमुलखांतील किंवा परदेशांतील लोकांची नागपूरसरकार किंवा बंगालसरकार यांचेपेक्षां मुंबईसरकारासच जास्त काळजी कोठून आली कोण जाणे ? कलकत्त्यास किंवा नागपुरास मुंबई-पुण्याप्रमाणें प्लेगव्यवस्थेची लोकांवर सक्ती नाहीं. मग पुण्यासच त्याबद्दल एवढा जुलूम कां असावा ? आमच्या गव्हर्नरसाहेबांचें पुणें हें विशेष आवडतें शहर आहे म्हणून तर नाहीं ना ? कसेंहि असो. परदेशांची आणि हिंदुस्थानांतील इतर मुलखांची सरकारच्या उत्तरांत जी सबब दाखविली आहे ती आमच्या मतें अगदीं अयोग्य व अपुरी आहे. आमच्याकडील गरीब लोक सरकार म्हणतें त्याप्रमाणें हीं प्लेगव्यवस्थेचीं दुःखें मुकाट्यानें सोशीत आहेत, व त्यांच्या सोशिकपणाची गव्हर्नरसाहेबांनीं वेळोंवेळीं जी तारीफ केली आहे, तीहि अगदीं अक्षरशः खरी आहे. पण युरोपांत प्लेग गेल्यावर तेथील लोक असलीं दुःखें इतक्या निमूटपणें सोसतील किंवा नाहीं या गोष्टीकडे गव्हर्नरसाहेबांनीं लक्ष दिलें आहे काय ? पोर्चुगाल देशांत ओपोर्टो शहरीं जेव्हां प्लेग गेला तेव्हां तेथें जी तारांबळ उडून गेली ती मुंबईसरकारास माहीत असेलच. शहराभोंवतीं लष्करी लोक बसवून नाकेबंदी करण्याचा आणि शहरांत सेग्रिगेशन वगैरे करण्याचा विचार आहे असें ओपोर्टो शहरचा गव्हर्नर (मुख्य अधिकारी) यास कळल्याबरोबर त्यानें आपला राजीनामा सरकाराकडे पाठवून दिला; आणि शहरच्या व्यापाऱ्यांनीं संप करण्याची भीति घातली. प्लेगखेरीज इतर रोगानें अजारी पड-

लेल्या लोकांस विनाकारण हास्पिटलांत नेतात अशा प्रकारच्या किंवा प्लेगचे रोगी हॉस्पिटलांत नेले असतां तेथें त्यांस विष घालून मारून टाकतात अशा प्रकारच्या तक्रारीहि ओपोर्टी शहरांत ऐकूं येऊं लागल्या आहेत. युरोपांतील लोकांची जर ही स्थिती तर हिंदुस्थांतील अडाणी लोकांनीं अशाच प्रकारचीं गाऱ्हाणीं केल्यास त्यांत नवल तें कोणतें ? सरकार लोकांपेक्षां अधिक शहाणें आहे, व प्लेगच्या सांथीनें लोकांचा नाश होत असतां इंग्रजसरकारासारख्या शाहाण्या सरकारानें त्याचा प्रयत्नानें होण्यासारखा असेल तेवढा बंदोबस्त न केल्यास सरकारावर हयगयीचा दोष येऊन ईश्वराच्या घरीं सरकार गुन्हेगार ठरेल ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे.अडाणी लोक कांहींहि म्हणोत, एकोणिसाव्या शतकांतील शास्त्रीय शोधांच्या सामुग्रीची मदत घेऊन सुधारलेल्या सरकारास आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, मुंबईसरकार कलकत्ता किंवा नागपूर सरकारापेक्षां कांहीं अधिक सुधारलेलें नाहीं. शिवाय गेल्या तीन वर्षांचा अनुभव पाहिला असतां ज्या शास्त्रीय शोधांस किंवा उपायांस प्लेगानें अनेक वेळां हुलकावणी देऊन फसविलें आहे, तेच उपाय निमूटपणें दुःखें सोसणाऱ्या लोकांवर सक्तीनें लादणें आमच्या मतें अगदीं गैर शहाणपणाचें काम आहे. गेल्या तीन वर्षांच्या अनुभवावरून प्लेग हटाविण्याकारितां लोकांची सोय आणि शास्त्रीय शोध यांच्या मिलाफानें जर कांहीं व्यवस्था अमलांत आणावयाची असेल तर स्थानत्याग आणि कोणी आपखुषीनें केल्यास इनॉक्युलेशन या दोनच गोष्टी सुरू ठेवल्या पाहिजेत. सेग्रिगेशनचा कांहीं उपयोग नाहीं असें नाहीं; पण त्याचा स्थानत्यागांत आपोआपच अंतर्भाव होतो. शिवाय एकदां गांवांत रोग शिरल्यावर सेग्रिगेशन सारखें सक्तीचे उपाय त्याचा प्रतिबंध होण्यास फारसे उपयोगीं पडत नाहींत ही गोष्ट आतां सिद्ध झाल्यासारखीच आहे. इतका अनुभव डोळ्यांपुढें असून पुनः परदेशाची आणि परमुलखाची सबब लावून आमचीं दुःखें कमी करण्यास जर सरकार तयार नाहीं तर आश्चर्य नव्हे काय ? सरकारची अशी स्थिति कां व्हावी ! लोकांचीं दुःखें पाहून किंवा त्यांचें वर्णन ऐकून गव्हर्नर साहेबांस अत्यंत दुःख वाटत असतांहि सदर दुःखाचा प्रतिकार करण्याची बुद्धि त्यांस उत्पन्न होऊं नये यांचें तरी कारण काय ! सरकार आपल्या जबाबांत परदेशाची आणि परमुलखाची सबब सांगत आहे; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आमच्या मतें त्यांतील खरें बीज गव्हर्नरसाहेबांच्या सल्लागार मंडळीचा सल्ला हें होय. मुंबई इलाख्यांत प्लेगचें ठाणें गेल्या तीन वर्षें असल्यामुळें पहिल्यानें प्लेग हटाविण्याकारितां मोठ्या उमेदीनें आलेल्या किंवा आणविलेल्या रथी महारथी डॉक्टरांची किंवा नर्सेसची येथें बरीच विपुलता झालेली आहे; किंबहुना हें एक स्वतंत्र खातेंच बनलेलें आहे. या खात्यांतील लोकांस त्यांनीं सुरू केलेल्या व्यवस्थेचा अभिमान असणें अगदीं साहाजिक आहे; आणि या अभिमानामुळें त्यांच्या

हातून गव्हर्नरसाहेबांस कधींहि योग्य सल्ला मिळेल कीं नाहीं याचा वानवा आहे.. जे अधिकारी प्लेग थोड्याच दिवसांत निर्मूळ करण्याचा विडा उचलून आले त्यांनीं आतां आमचे उपाय हरले असें कोणत्या तोंडानें कबूल करावें ? अर्थात् हा नाहीं तर तो उपाय करून पहा म्हणून गव्हर्नरसाहेबांस ते नेहमीं सल्ला देत बसणार; आणि तळ्यांतील बेडकांप्रमाणें " हा तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो " अशी लोकांची स्थिति होणार ! ही स्थिति किंवा संकट टाळण्यास एकच मार्ग आहे, तो हा कीं, गव्हर्नरसाहेबांनीं स्वतंत्रपणें या प्रकरणाची चौकशी करून व आपल्या प्रजेची स्थिति लक्षांत आणून कोणत्याही खात्याचा किंवा अधिकाऱ्यांचा अभिमान न धरतां त्यांच्या बुद्धीस खरा वाटेल तो निकाल देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असा प्रयत्न लार्ड सँडहर्स्ट यांचे हातून होत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. परवां बेळगांवास जी हकीगत घडून आली त्यावरून ही गोष्ट उघड होत आहे. सरकारच्या मनांतून इनॉक्युलेशनचा प्रयोग लोकांवर अनुभवून पहावयाचा आहे. सरकार सक्ती करा असें म्हणण्यास तयार नाहीं; पण खालील अधिकाऱ्यांनीं सक्ती केल्यास त्यांजवर पांघरूण घालण्यास सरकार तयार झालेलें आहे. " प्लेग टोंचून घेण्याची कोणावर सक्ती नाहीं; पण तो सर्वांनीं टोंचून घेतलाच पाहिजे " अशा अर्थाच्या शुष्क कोट्या अलीकडे निघूं लागल्या आहेत; व या सर्व सरकारच्या कानावर गेल्या असतांहि सरकार तिकडे लक्ष देत नाहीं अशी स्थिति झालेली आहे. या सर्व गोष्टींवरून एकच अनुमान निघण्यासारखें आहे; आणि तें हें कीं, लॉर्ड सँडहर्स्ट यांचे हातून या बाबतींत लोकांस दाद मिळण्याचा संभव कमी आहे; बहुतेक नाहीं म्हटलें तरी चालेल. शंकरानें भस्मासुरास निर्माण केल्यानंतर त्याच्या त्रासांतून लोकांस कसें सोडवावें हें शंकरासच जसें कळत नाहींसें झालें होतें तद्वत गव्हर्नरसाहेबांची स्थिति झालेली आहे. प्लेग अधिकाऱ्यांची सर्वत्र मातब्बरी वाढली आहे आणि ते देतील तो सल्ला लॉर्ड सँडहर्स्ट यांस नाकबूल करणें अशक्य झालें आहे. कारण त्यांच्याच हातें हें सर्व प्लेगखातें वाढलेलें आहे. अशा स्थितींत प्रजेची दाद कशी लागावी आणि त्यांचीं दुःखें कशीं दूर व्हावीं, हा एक मोठाच प्रश्न आहे. भस्मासुराच्या वेळीं तोंड काढण्याचें काम विष्णूकडे आलें होतें. तसाच हल्लींच्या प्रकरणीं लॉर्ड सँडहर्स्ट जाऊन कोणी विष्णु आल्यास न कळे. तोंपर्यंत आमच्या लोकांचा त्रास टळेल असें वाटत नाहीं. कारण प्लेग खात्याची उमेद कधींहि कमी व्हावयाची नाहीं. मग प्लेग दहा वर्षें राहो कीं पंचवीस वर्षें राहो. आज हा उपाय केला, उद्यां तो केला; आज लोकांवर असे प्रतीबंध ठेवले, उद्यां तसे ठेवले, असें म्हणत म्हणत प्लेग जेव्हां आपोआप नाहींसा होईल मग तो दहा वर्षांनीं होवो, कां पांच वर्षांनीं होवो, तेव्हां ही मंडळी प्लेगला हिंदुस्थानांतून हांकून देण्याचें

श्रेय आपणांस व आपल्या प्रयत्नांस देण्यास काडीइतकी देखील कसूर करणार नाहीं. यांची वरणी मात्र तोंपर्यंत चालली पाहिजे म्हणजे झालें. सारांश, गव्हर्नर-साहेबांस अशा वेळीं योग्य सल्ला मिळत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि परदेशाची वगैरे जी सबब सांगितली आहे तीहि आमच्या दृष्टीनें बरोबर नाहीं. तेव्हां सरतेशेवटीं गव्हर्नरसाहेबांस आमची ऐवढीच प्रार्थना आहे कीं, लोकांचे हाल झाले तेवढे बस झाले; आतां यांतून कांहीं तरी त्यांची सुटका करण्याची मेहर-बानी करा.

* * *

फेरपहाणीचा जुलूम*

शेंतकरी लोकांची इंग्रजसरकारच्या राज्यांत निकृष्टावस्था होण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकींच वारंवार वाढणारा शेतसारा हें एक होय. हिंदुस्थानांतील बहुतेक लोक पहिल्यापासूनच शेतकीवर उदरनिर्वाह करणारे आहेत; आणि इंग्रजी राज्यांत इतर उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाल्यामुळें तर शेतीवर उदरनिर्वाह करणारांची संख्या पूर्वीपेक्षां जास्त झाली आहे. लोकसंख्येचें मानहि पूर्वीपेक्षां जास्त वाढलें असून, तिकडून पाहिलें तरी ज्या गांवांत शेतकीवर उदरनिर्वाह करणारीं पूर्वीं दहा दहा माणसांचीं पन्नास कुटुंबें किंवा पांचशें माणसें होतीं, तेथें आतां जवळ जवळ त्याच्या दुप्पट माणसें झालेलीं आहेत; आणि जमीन कांहीं त्या प्रमाणानें वाढलेली किंवा सुधारलेली नाहीं. अशा स्थितींत सरकारानें दर तीस वर्षीं साऱ्याचें मान दुप्पट, तिप्पट किंबहुना पांचसहापट वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पहिल्या मोजणीच्या चुक्या दुरुस्त करणें नव्हे, तर शेत-कऱ्यांनीं आपल्या मेहनतीनें आणि खर्चानें पहिल्या मोजणीनंतर जें उत्पन्न वाढ विलें असेल तें सर्व त्यांच्यापासून हिसकून घेऊन त्यांची दुर्दशा करण्यासारखें होय. जमिनीची सुधारणा करुन त्यांत जितकें जास्त पीक येईल तितकें जमि-नीपासून काढण्याची शेतकऱ्याची स्वाभाविकच इच्छा असते. पहिल्या मोजणीच्या वेळीं ज्या जमिनी वरकस लागल्या होत्या त्यांची सुधारणा होऊन या मोजणीच्या वेळीं त्यांपैकीं पुष्कळ शेतजमिनी झालेल्या आहेत. पण ही सुधारणा ढगांतून पाऊस पडून किंवा सूर्याच्या उष्णतेनें आपोआप घडून आलेली नाहीं; अथवा सरकारानें कालवे बंधारे बांधून किंवा अन्य तऱ्हेनें मदत करूनहि घडवून आणलेली

---

* [केसरी ता. २४ आक्टोबर १८९९]

नाहीं. असें असतां सरकारानें फेरपाहणीच्या वेळीं कांहीं तरी. सबबी लावून असल्या जमिनींवरील सारा वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे गरीब लोकांनीं पोटासाठीं मेहनत करून संचित केलेल्या द्रव्याचा अपहार करण्यासारखेंच आहे. सरकारचें हें वर्तन अयोग्य आहे, शेतसाऱ्याची हल्लींची पद्धत बदलून सारे कायम ठरविले पाहिजेत, वगैरे लोकांच्या पुढाऱ्यांच्या तक्रारी नेहमीं चालू आहेत; व हिंदुस्थानच्या दारिद्र्याचीं कारणें दाखवून तीं दूर करण्याचे उपाय सुचवितांना राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांनींहि हल्लींच्या तीस वर्षांनीं वाढत्या साऱ्याच्या पद्धतीचा उल्लेख करून, ही पद्धत बदलून कायमधाऱ्याची पद्धत अमलांत आणली पाहिजे असें सुचविलें आहे. इतकेंच नव्हे तर फेरपहाणींत सारे अतोनात वाढून लोकांवर जुलूम होतो ही गोष्ट खुद्द सरकारासहि मान्य आहे. कारण मागें एकदां विलायतसरकारनें दोन ठराव करून त्यांत फेरपहाणीच्या वेळीं सारे वाढविणें ते अमुक इयत्तेच्या पलीकडे वाढवूं नयेत असा स्पष्ट हुकूम सोडलेला आहे. फेरपहाणींत सारे अतोनात वाढतात ही गोष्ट जर सरकारच्या ध्यानांत आली नसती, तर वरील ठराव करण्याचेंहि कांहीं कारण नव्हतें. हे ठराव सन १८७४ व १८८४ सालीं प्रसिद्ध झालेले आहेत, व त्यांतील इत्यर्थ असा आहे कीं:— (१) कोणत्याहि तालुक्यावर किंवा गांवांच्या गटावर सारा वाढविणें झाल्यास तो शेंकडा ३३ या प्रमाणापेक्षां (तृतीयांशांपेक्षां) जास्त वाढवूं नये; (२) कोणत्याहि गांवचा सारा शेंकडा ६६ या मानापेक्षां (दोन तृतीयांशांपेक्षां) जास्त वाढवूं नये; (३) कोणत्याहि नंबरावरील किंवा खात्यावरील सारा शेंकडा १०० हून (दुपटीहून) जास्त वाढवूं नये. तात्पर्य, सरकारनें आपण होऊनच साऱ्याच्या वाढीचें प्रमाण ठरवून दिलेलें आहे. त्याचप्रमाणें शेतकऱ्यानें जमिनीची आपल्या खर्चानें मशागत करून जमीन सुधारली असल्यास त्याचा पूर्ण फायदा शेतकऱ्यास द्यावा, त्याबद्दल सारा वाढवूं नये, अशा अर्थाचेंहि एक कलम (कलम १०६) मुंबई लॅन्ड रेव्हिन्यू कोडमध्यें घातलेलें आहे. शिवाय सन १८८६ सालीं लॅन्ड रेव्हिन्यू कोड जेव्हां दुरुस्त करण्यांत आलें, तेव्हां फेरपाहणीच्या वेळीं सारे वाढविल्यास त्याची योग्य नोटीस लोकांस देऊन लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या जातील असेंहि सरकारनें ठरविलें आहे. सारांश, कायमधाऱ्याची पद्धत सुरू करण्यास सरकार जरी अद्याप तयार नाहीं, तरी सारे भलतेच वाढूं नयेत, शेतकऱ्यांनीं पदरच्या पैशानें जमिनीची सुधारणा केली असतां त्याचा पूर्ण फायदा शेतकऱ्यांस मिळावा, आणि खालील अधिकाऱ्यांनीं भलतेच सारे वाढविले असतां त्याबद्दल योग्य तक्रार करण्याची खातेदारास सवड मिळावी अशी सरकारची पूर्ण इच्छा आहे, एवढें वरील ठरावांवरून कोणासहि स्पष्टपणें कळून येईल. धारें कायस करण्यास सरकार राजी नाहीं; पण रयतेस पिळून त्यांनीं केलेल्या श्रमाचें त्यांस फल न देतां त्यांच्याकडून निघतील तितके पैसे उकळावे अशी

सरकारची, म्हणजे विलायतसरकार किंवा हिंदुस्थानांतील वरच्या प्रतीचे अधिकारी यांची तरी खास इच्छा नाहीं.

परंतु सरकारची इच्छा आणि परमेश्वराची इच्छा या कांहीं बाबतींत तरी आम्हांस एकसारख्या झालेल्या आहेत. दयाळू परमेश्वराच्या मनांत कोणाहि प्राणिमात्रावर संकट यावें अशी कधींहि इच्छा नसते हा सिद्धांत होय; पण आमच्या कर्मानें आमच्या पाठीमागें दुष्काळ, प्लेग आणि इतर संकटें थोड्याबहुत प्रमाणानें नेहमीं लागलेलींच असतात. तद्वतच वर लिहिलेल्या सरकारी इच्छेचा हल्लीं प्रकार झालेला आहे. ठाणें जिल्ह्यांतील डहाणू तालुक्याच्या उंबरगांव पेट्यामधील सुतीदार रयत लोकांचा ठाणें जिल्ह्याचे कलेक्टर यांस जो अर्ज गेलेला आहे, तो वाचला असतां आम्हीं काय म्हणतो हें कोणाच्याहि चांगलें लक्षांत येईल. या पेट्यांत रिव्हिजन सर्व्हेचें काम संपून त्याचा निकाल म्हणून जो आतां प्रसिद्ध झालेला आहे, त्यांत वर सांगितलेले सरकारचे सर्व ठराव धाब्यावर बसवून सर्व्हे अधिकाऱ्यांनीं तालुक्याचे, गांवचे अथवा खात्यावरचे धारे मन मानेल तसे वाढविले आहेत. डहाणू–उंबरगांव पेटा म्हटला म्हणजे वाईट हवेच्या संबंधानें सर्वत्र प्रसिद्धच आहे. ही हवा सरकारानें कांहीं मेहनत करून गेल्या तीस वर्षांत बदलून लोकांस अधिक सौख्य देण्याची तजवीज केलेली नाहीं; इतकेंच नव्हे तर पाट, बंधारे, कालवे वगैरे सरकारी कामें होऊन या तालुक्याची गेल्या तीस वर्षांत कांहीं सुधारणा झालेली नाहीं. गेल्या तीस वर्षांत या तालुक्यांत सरकारी मोठें काम झालेलें म्हटलें म्हणजे रेलवे होय; पण पहिल्या पहाणीच्या वेळींच या रेलवेस सुरवात झालेली होती, आणि त्यापासून शेतकऱ्यांस होणारा फायदा लक्षांत घेऊनच पहिले सारे ठरविले होते. तेव्हां पुनः त्या रेलवेबद्दल सारा वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे " घीनो पैसा " आणि " पैशानो घी " करण्यासारखेंच आहे. ह्या पेट्यांतील जमिनीची जर कांहीं सुधारणा झाली असेल तर ती लोकांनीं आपण होऊनच केलेली आहे, हें उघड आहे; व सरकारी नियमाप्रमाणें पाहिलें तर या सुधारणेचा सर्व फायदा शेतकऱ्यांसच मिळाला पाहिजे. पण नवीन सारे ठरवितांना सर्व्हे अधिकाऱ्यांनीं या गोष्टीकडे बिलकुल लक्ष दिलेलें नाहीं. कोणत्याहि एका गांवाचा सारा दोन तृतींयांशाहून जास्ती वाढवूं नये, असा वर सांगितल्याप्रमाणें सरकाराचा ठराव असतांहि बऱ्याच गांवचे सारे दुप्पट आणि तिप्पट वाढविलेले आहेत. उदाहरणार्थ, कुनवडा गांवचा सारा जवळ जवळ तिप्पट वाढलेला आहे. आतां सबंध गांवाचा सारा तिप्पट झाला म्हणजे त्यांतील कांहीं नंबरांवर साऱ्याचे मान पांचपट, सहापट वाढले असलेंच पाहिजे; एरवीं सरासरीनें गांवच्या साऱ्याची तिप्पट होऊं शकत नाहीं. सारांश, नंबराचा सारा पांच सहा पट, गांवचा सारा तिप्पट आणि सबंध पेटयाचा शेंकडा ३६ किंवा ४० या प्रमाणानें वाढलेला

आहे ! सरकारी ठराव कोणीकडे आणि सर्व्हे अधिकाऱ्यांची ही दांडगाई कोणीकडे, याचा जरा लक्षपूर्वक विचार केला असतां वरिष्ठ सरकारचे हेतु चांगले असूनहि खालील अधिकाऱ्याच्या कर्मानें रयत लोकांवर या राज्यांत कसा जुलूम होतो हें सरकारच्या लक्षांत येईल. अशा प्रसंगीं आपली दाद लावण्याचा रयतेस मोकळा मार्ग म्हटला म्हणजे सरकारास अर्ज करणें हा होय. पण या अर्जाची घुष्कळ वेळां कशी वाट लांगते हें लक्षांत आणलें म्हणजे दाद लागण्याचें हें द्वार नेहमींच मोकळें नसतें असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. वैकुंठाचे दरवाजे चार महिने खेरीज करून नेहमीं मोकळे असतात; पण प्राण्याचें कर्म ज्याप्रमाणें त्यास वैकुंठास जाऊं देत नाहीं, तद्वतच रयत लोकांची हल्लीं स्थिति झालेली आहे. रयतेनें आपल्या तक्रारी कितीहि साधार व सप्रमाण रीतीनें सरकारापुढें मांडल्या तरीहि खालील अधिकारी कांहींना कांहीं तरी कारणें दाखवून रयतेस दाद मिळण्याचा दरवाजा बंद करीत असतात. इलाखाधिपतींनीं मुख्यत्वेंकरून ज्या गोष्टीचा बंदोबस्त केला पाहिजे ती हिच होय. खालील अधिकाऱ्यांनीं तयार केलेलें काम त्यांजवर पूर्ण भरंवसा ठेवून मंजूर करणें रयतेच्या दृष्टीनें धोक्याचें आहे, व तें काम पुनः नीट तपासून त्यांत रयतेच्या आणि अधिकाऱ्यांच्या म्हणण्यापैकीं कोणाचें म्हणणें खरें आहे याचा निःपक्षपात बुद्धीनें निकाल करणें हेंच गव्हर्नर-इन् कौन्सिलचें काम आहे; व आमची अशी खात्री आहे कीं, डहाणू-उंबरगांव पेट्यांतील सुतीदार लोकांच्या अर्जाचा जर अशा रीतीनें विचार होईल तर त्यांची दाद लागण्यास काडीइतकी देखील हरकत पडणार नाहीं. त्यांच्या अर्जांतील मुद्दे महत्त्वाचे आहेत इतकेंच नव्हे तर ते सिद्ध करण्यास जे आधार दाखविले आहेत तेही अगदीं निरुत्तर आहेत. इतक्याउप्पर जर सरकार या पेटयांतील लोकांचें म्हणणें ऐकणार नाहीं, तर सरकारी ठराव कांहींहि असले तरी ते नेहमीं पाळावेच असें सरकार बांधलेलें नाहीं, व वाटेल तेव्हां मनसोक्त आचरण करण्याचा सरकारचा प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष इरादा आहे-मग त्यांत रयतेचें कल्याण होवो अगर अकल्याण होवो-असें स्वाभाविक रीतीनें लोकांस वाटण्याचा संभव आहे. आतां एवढी गोष्ट खरी आहे कीं, रयतेचें म्हणणें ऐकलें असतां सर्व्हे अधिकाऱ्यांनीं सारा वाढवून सरकारी तिजोरींत भर टाकण्याची जी सोय केली आहे तिचा सरकारास अव्हेर करावा लागेल. पण "प्रजेचा संतोष" हेंच ज्या सरकारच्या राज्याच्या बळकटीचें लक्षण आहे, त्या सरकारनें प्रजेस असंतुष्ट ठेवून आपण केलेल्या ठरावाविरुद्ध सरकारी तिजोरींत कशीतरी भर घालण्याची इच्छा धरणें चांगलें नाहीं; व आमची अशी आशा आहे कीं, या सर्व गोष्टींचा नीट विचार होऊन उंबरगांव पेटयांतील सुतीदार लोकांच्या जमिनींवर फेरपहाणींत जे अतोनात सारे वाढले आहेत ते सरकारांतून कमी करण्यांत येतील.

सर्व्हेच्या अधिकाऱ्यांनीं वर लिहिलेल्या सरकारी ठरावाविरुद्ध अतोनात सारे वाढविण्याचीं कारणें तरी काय दिलीं आहेत असा प्रश्न सहज निघण्यासारखा आहे. कारण सर्व सरकारी अधिकारी म्हणजे न्यायाचे पुतळे अशी कित्येक लोकांची समजूत आहे; आणि सर्व्हे अधिकाऱ्यांनीं सारे वाढविले असल्यास त्यास कांहीं तरी कारण असलें पाहिजे असें हे लोक मानीत असतात. आमची अशी समजूत नाहीं. आमच्या असें नजरेस आलें आहे कीं, कांहीं सरकारी अधिकारी अमुक एक गोष्ट करण्याकरितांच नेमलेले असतात; आणि ती गोष्ट सकारण आहे हें दाखविण्याचा वकिलाप्रमाणें विडा उचलणें हेंच त्यांचें कर्तव्य होऊन बसतें. अशा अधिकाऱ्यांनीं केलेलीं कामें अर्थातच नेहमीं न्याय्य असतात असें नाहीं. हे अधिकारी आपलें कर्तव्य म्हणून ज्या गोष्टी करतात त्यांवर रयतेचें काय म्हणणें आहे हें ऐकून घेऊन अखेर सरळ न्याय देण्याचें गव्हर्नर–इन–कौन्सिल यांचें काम आहे, व तें हल्लींच्या प्रसंगीं ते करतील अशी आम्हांस उमेद आहे. सारांश, सर्व्हे अधिकारी म्हणजे रयतेच्या जमिनीवरील सारे कसे वाढवावे याबद्दल सरकारास युक्त्या सुचवणारे अधिकारी होत. ते पगार खात आहेत तो एवढ्याचकरितां; परंतु तेवढ्यानें त्यांचें म्हणणें योग्य आहे असें होत नाहीं. आजपर्यंत त्यांच्या म्हणण्याविरुद्ध लोकांनीं तक्रार केली नसल्यास ती लोकांची चूक होती व लोकांस सरकारी व्यवस्थेचें जसजसें ज्ञान...जास्त होत चाललें आहे तसतशी ही चूक हल्लीं दुरुस्त होत चालली आहे. याबद्दल सरकारास किंवा सरकारी अधिकाऱ्यांस वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. न्यायाच्या कोर्टांत दोन्ही पक्षांचे वकील असल्यानें न्यायाधिशाचा उपमर्द करण्याची कोणाची बुद्धी होती असें ज्याप्रमाणें कोणी समजत नाहीं, त्याप्रमाणेंच येथेंहि स्थिति आहे; व त्या स्थितीप्रमाणें पाहिलें म्हणजे सर्व्हे अधिकाऱ्यांनीं सारा वाढाविण्याचीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांजवर सुतीदारांच्या अर्जांत जी टीका केली आहे तीहि अगदीं बरोबर आहे. जमिनीवरील सारे वाढाविण्याच्या सर्व्हे अधिकाऱ्यांच्या इतक्या युक्त्या आहेत कीं, " चोराचीं पावलें चोरासच माहीत " या म्हणीप्रमाणें त्यांतला कोणी दर्दी असल्याखेरीज त्या युक्त्यांतील लबाडी कोणाच्याहि लक्षांत यावयाची नाहीं. गांवांचे गट बदलणें, म्हणजे कांहीं गांव कमी दराच्या सदरांत असले तर ते काढून जास्त दराच्या सदरांत घालणें; जमिनीची प्रतिबंदी बदलणें; जिराइताची बागायत, वरकसची रबी किंवा जिराईत करून दर वाढविणें; दरएक प्रतीच्या जमिनीवरील प्रत्येक एकरीं पूर्वी जो कमाल दर असेल तो वाढवून जास्त दर ठरविणें; जमिनीची आणेवारी बांधतांना त्यांत फेरबदल करून पूर्वीची आठ आण्यांची जमीन बारा आण्यांत ढकलणें; कोणा गांवास बाजार जवळ, तर कोणास रेलवे जवळ, अशा सबबीवर गांवचें सबंध उत्पन्न एकदम वाढविणें, वगैरे सारा वाढवणें झाल्यास तो सकारण आहे असें दाख-

विण्याच्या सर्व्हे अधिकाऱ्यांच्या हजारों युक्त्या आहेत. याखेरीज पूर्वीच्या मोजणीच्या चुका किंवा प्रतबंदीच्या चुका म्हणून सारे वाढविण्यांत येतात ते निराळेच. या सर्वांचें स्पष्टीकरण करूं लागल्यास पुष्कळच विस्तार होईल. अर्जदारांनीं आपल्या अर्जांत या गोष्टींचा चांगला विचार केलेला आहे. पुष्कळ वरकस जमीन रबींत ढकलून पूर्वी वरकशीचा आकार १८७९ रुपये होता तो आतां २३४७४ रुपये झालेला आहे. कोठें १८७९ कोठें २३४७४ ! गोड्या खरीप जमिनीवरीलहि सारा असाच वाढलेला आहे. खरीप जमिनीचे एकर पूर्वीपेक्षां ३०० कमी झालेले आहेत; पण पूर्वीचा सारा सुमारें ९७ हजार होता तो आतां ११५ हजार झालेला आहे ! खरीप जमिनीचे पूर्वी नऊ वर्ग केलेले असून दर एकरीं कमाल सारा ६, ५½, ५, ४½, ४, ३½, ३, २½, २ रुपये होता. म्हणजे आठआठ आण्यांच्या फरकानें जमिनीच्या मगदुराप्रमाणें दर एकरीं २ पासून ६ रुपयेपर्यंत साऱ्याचा दर होता; आणि जमिनीचे नऊ वर्ग केलेले असल्यामुळें कोणत्याहि जमिनीवर त्या जमिनीच्या योग्यतेच्या मानानें सारा बसण्यास अडचण पडत नसे. पण आतां हे नऊ वर्ग मोडून टाकून खरीप जमिनीच्या साऱ्याच्या दराचे ६, ५ आणि २½ रु. असे तीनच वर्ग केलेले आहेत. म्हणजे पूर्वीचे ५½ दराचे नंबर १½ सहांत गेले. ३½, ४ आणि ४½ पांचांत म्हणजे दुसऱ्या वर्गांत गेले; आणि पूर्वीचे २ आणि २½ एवढेच कायते तिसऱ्या म्हणजे २½ च्या वर्गांत राहिले. याचा परिणाम असा झाला कीं, खरीपाचा सारा ९७ हजार होता तो ११५ हजार झाला. पूर्वीचे नऊ वर्ग काढून तीन वर्ग कां केले याचें कारण सर्व्हे अधिकारी कांहीं तरी देतीलच; पण जरा विचार केला असतां पूर्वीच्या नवांच्या ऐवजीं हल्लींचे तीन वर्ग निव्वळ उत्पन्न वाढविण्याकरितां केलेले आहेत हें कोणासहि कळून येईल. पूर्वी ज्या जमिनी खराब होत्या त्या सुधारून त्यांच्या शेतजमिनी ज्यांनीं केल्या त्यांजवरहि साऱ्याचें नवीन ओझें या सर्व्हेंत बसलें आहे. अर्जांत दिलेल्या तक्त्यावरून असें दिसतें कीं, अशा जमिनीपासून एकंदर सारा सुमारें दोन अडीच हजार रुपये वाढलेला आहे. याखेरीज सर्व्हे अधिकाऱ्यांच्या दुसऱ्याहि युक्त्या पुष्कळ आहेत, पण त्यांचा सविस्तर विचार करणें येथें अशक्य आहे. करतां सरकारास आमची एवढीच विनंती आहे कीं, या सुतीदार लोकांच्या अर्जाचा सरकारांत नीट विचार होऊन सरकार आपलीं वचनें पाळण्यास नेहमीं तयार आहे, व सर्व्हे अधिकाऱ्यांनीं कितीहि वकिली कारणें दाखविलीं तरी सरकार रयतेची दाद घेण्यास तयार असतें, अशाप्रकारें लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्यासारखा सरकारांतून अखेर निकाल होण्याची सरकारनें तजवीज करावी. कलेक्टरसाहेबांचा अभिप्रायहि असाच पडेल, अशी आमची आशा आहे.

खासगी शिक्षणावरील सरकारची करडी नजर *

लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या कारकिर्दीत आमच्या इलाख्यावर काय काय प्रसंग आलेले आहेत याचें वर्णन करावयाची वेळ लवकरच यावयाची आहे; पण त्यांपैकीं आज एकाबद्दल विचार करणें जरूर पडत आहे. गेल्या पंधरवड्यांत सार्वजनिक शिक्षणासंबंधानें हिंदुस्थानसरकारचा एक व मद्रासरकारचा एक असे दोन महत्त्वाचे ठराव बाहेर आले आहेत. त्यांपैकीं हिंदुस्थानसरकारचे ठरावांत गेल्या पांच वर्षांत एकंदर हिंदुस्थानांत विद्येचा प्रसार कसा काय झाला हें सांगून पुढील धोरण कसें राखावें हेंहि दाखविलें आहे. कॉलेज आणि हायस्कुलें म्हणजे वरिष्ठ आणि मध्यम प्रतीचें शिक्षण एज्युकेशन कमीशननें सांगितल्याप्रमाणें सरकारच्या ताब्यांतून लोकांच्या ताब्यांत जाईल तितकें चांगलें असें हिंदुस्थानसरकारचें मत आहे; आणि त्याप्रमाणें मद्राससरकार करीत नाहीं, म्हणून हिंदुस्थानसरकारनें मद्राससरकारास दोष दिलेला आहे. एज्युकेशन कामिशन होऊन गेल्यास सतरा वर्षें झालीं. इतक्या मुदतींत कमिशननें शिफारस केल्याप्रमाणें चोहोंकडे खासगी शाळा निघून आज झाला आहे त्यापेक्षां मध्यम प्रतीच्या शिक्षणाचा जास्त प्रसार सर्व हिंदुस्थानांत झाला असता; पण कमिशनची ही शिफारस लवकरच मागें पडून खासगी शिक्षणाकडे सरकारची नजर उत्तरोत्तर जास्त जास्त कडक होत चालली. लॉर्ड सँडहर्स्टसाहेबांच्या कारकीर्दीत तर एक वेळ सरकारी नोकरी पतकरेल; पण खासगी शाळेंत नोकरी करणें म्हणजे पैशाची व स्वातंत्र्याची अशी दोहोंकडूनहि हानी करून घेण्याची स्थिती प्राप्त झाली आहे. मद्राससरकारानेंहि आतां हीच पद्धत उचलली आहे असें त्यांच्या हल्लीं नवीन प्रसिद्ध झालेल्या ग्रँट्स्-इन्-एड्-कोडावरून दिसतें. मद्रास इलाख्यांत याबद्दल हल्लीं बरीच चळवळ सुरू आहे. खासगी शाळांतील शिक्षकांस राजकीय बाबतींत पडण्याची मोकळीक असावी किंवा नाहीं हाच काय तो वादाचा मुख्य विषय आहे. मद्राससरकारनें असा ठराव केला आहे कीं, "कोणाहि सरकारी मदत मिळणाऱ्या खाजगी शाळेंतील मास्तरानें डायरेक्टरच्या परवानगीखेरीज प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें राजकीय चळवळींत सामील होऊं नये, अथवा राजकीय बाबतींत भरलेल्या सभेस हजर राहूं नये." मद्राससरकारनें हा ठराव काढलेला पाहून तिकडील लोकांस पुष्कळ आश्चर्य वाटत आहे; कारण लॉर्ड सँडहर्स्टपेक्षां लॉर्ड हॅवलॉक हे कमी उतावळे आहेत, अशी त्यांची समजूत होती. कित्येकांस तर असें वाटलें कीं, लॉर्ड हॅवलॉक यांनीं ही गोष्ट हिंदुस्थानसरकारच्या हुकुमावरून केलेली असेल; पण आमच्या मतें हे

---

* [केसरी १४ नोव्हेंबर १८९९]

दोनही समज चुकीचे आहेत. राजद्रोहाचें बीज खासगी शाळांतून पेरलें जातें ही कल्पना मुंबइसरकारच्या माथ्यांत पाहिल्यानें शिरली. यापूर्वी खासगी शिक्षणावर सरकारची थोडीशी गैरमर्जी किंवा दुर्लक्ष झालेलेंच होतें. त्यांत ही राजद्रोहाची भर पडल्यावर मग " आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला" याप्रमाणें त्यांनीं चोहोंकडून दाणादाण सुरू करून खासगी शिक्षणाचा अगदीं हिरमोड करून टाकला आहे. ही गोष्ट ज्यावेळीं घडून आली त्याच वेळीं या इलाख्यांत त्याबद्दल चळवळ व्हावयास पाहिजे होती, पण खासगी शिक्षणाचीं सूत्रें त्यावेळीं ज्यांच्या हातांत होतीं त्यांनीं जाणून बुजून सरकारी जूं आपल्या मानेवर घेतल्यामुळें मुंबई इलाख्यांत सरकारच्या या अरेरावीपणाबद्दल त्यावेळीं कांहींएक चर्चा झाली नाहीं; इतकेंच नव्हे तर खासगी शाळा काढण्याचा व चालविण्याचा जो हेतु असावा व होता तोहि नाहींसा होऊन सरकारी नोकरीपेक्षां ही खासगी शाळांतील नोकरी अधिक दीनपणाची व भिकार झालेली आहे. ही स्थिती कां व कशी आली याची हकीकत पुष्कळांस माहीत नसल्यामुळें ती येथें पाहिल्यानें देऊन नंतर त्यासंबंधाचे आमचे विचार प्रदर्शित करण्याचा आमचा इरादा आहे.

या इलाख्यांतील खासगी शाळांमध्यें प्रमुख संस्था म्हटल्या म्हणजे येथें असलेल्या न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, व डेक्कन सोसायटी या होत. या संस्था कोणत्या उद्देशानें स्थापल्या गेल्या वगैरेबद्दलची हकीगत केसरी पत्राच्या सुरवातीच्या वेळींच त्यांत आलेली आहे. कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांनीं तरुण पिढीच्या शिक्षणाचें काम आपल्यां हातीं घेतल्याखेरीज तें कधींहि नीट पार पडत नाहीं. सरकारी शिक्षणाचा ओघ एकतर्फी व आकुंचित असतो आणि तशा तालमींत तयार झालेली मंडळी देशहिताकरितां जे उद्योग करावयास पाहिजेत तसे करण्यास सरसावत नाहीं वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन, व स्वतंत्र रीतीच्या शिक्षणाचा पाया घालून होईल तितक्या रीतीनें तें शिक्षण लोकप्रिय आणि स्वस्तें केल्यास ह्या दोषांचा कालांतरानें बराच प्रतिकार होईल या बुद्धीनें येथील न्यू-स्कूलची सन १८८० सालीं स्थापना झाली होती. ही शाळा पुढें कितपत भरभराटीस आली, एज्युकेशनल कमिशनपुढें या शाळेंतील चालकांस कित्येकांनीं नावें ठेविलीं तरीहि कै. वामन शिवराम आपटे यांनीं शाळेच्या चालकांच्या तर्फे सदर कमिशनपुढें दिलेली साक्ष कमिशनास कितपत पसंत पडली व पुढें एकदां सरकार महाराष्ट्रांतील वरिष्ठ शिक्षणाचें आदिपीठ जें डेक्कन कॉलेज तें देखील सोसायटीच्या ताब्यांत देण्यास कसें तयार झालें होतें याची हकीगत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेलीच आहे. या शाळेस पहिल्या पांच वर्षेंपर्यंत सरकारी मदत मिळत नव्हती; पण पुढें शाळेची भरभराट पाहून " अशा रीतीनें केवळ खासगी प्रयत्नानें भरभराटीस आलेल्या शाळेस मदत करून तिच्या उत्कर्षाबद्दलच्या श्रेयाचा कांहीं तरी अंश सरकारानें न घेणें हें सरकारासच उलट दूषणास्पद आहे." असे जेव्हां सर

जेम्स फर्ग्युसन यांनीं उद्गार काढले, तेव्हां शाळेची स्वतंत्रता कायम राहून सरकारची मदत तीस मिळूं लागली. या संबंधीं कच्ची माहिती पहाणें असल्यास ती शाळेच्या रिपोर्टांत कोणासहि सांपडेल. स्थलसंकोचास्तव ती सर्व येथें देतां येत नाहीं. थोडक्यांत एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, या इलाख्यांत ज्या कांहीं खासगी शिक्षणाच्या संस्था आहेत त्यांत डेक्कन एज्युकेशन सोसायटीस जें अग्रेसरत्व मिळालें होतें व सर्व लोकांकडून जी मदत मिळाली होती त्याचें खरें कारण या संस्थेच्या चालकांनीं दाखवलेला स्वार्थत्याग, त्यांचें एकनिष्ठ धैर्य, आणि कांहीं एक लोककल्याणाची गोष्ट स्वतंत्रतेनें व नेटानें तडीस नेण्याचा त्यांचा संकल्प हेंच होय. असल्या संस्थेनें सन १८९७ च्या वादळांत आपलें शीड गुंडाळून आपली डोलकाठी कापून टाकावी आणि गलबत कोठें खडकावर आदळतें कीं काय या भीतीनें शत्रूच्या बंदरांत त्यास शरण जाऊन थारा घेऊन रहावें हें आमच्या मतें अत्यंत चुकीचें होय; व आज मद्रासइलाख्यांत मद्राससरकारनें खासगी शाळेंतील शिक्षकांच्या स्वातंत्र्यावर जी गदा आणलेली आहे तीहि परंपरेनें याच चुकीचें फळ आहे. सरकारानें खासगी शाळांतील शिक्षकांची स्वतंत्रता अशा रीतीनें हिसकावून घेणें गैरवाजवी तर खरेंच, पण खासगी शिक्षकानींहि जेथें शक्य असेल तेथें आपल्या स्वतंत्रतेच्या रक्षणार्थ भांडून तें कायम ठेवण्याकरितां सतत प्रयत्न सुरू ठेवले पाहिजेत. खासगी शाळांस सरकारची मदत मिळते एवढ्याचकरितां जर त्यांतील शिक्षकांनीं आपलें स्वातंत्र्य सरकारास विकावयाचें असेल, तर खासगी शाळेंत नौकरी न करतां सरकारी शाळेंत केलेलीच काय वाईट ? खासगी शिक्षणास उत्तेजन देण्याचें ढोंग करून खासगी शाळांची सर्व व्यवस्था आपल्या तंत्रानेंच चालवूं इच्छिणारें सरकार दोषार्ह तर खरेंच, पण एका हातानें टाळी वाजत नसते ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे आमच्या कडील खासगी शाळांतील पुढाऱ्यांनींहि वेळींच जितकें धैर्य दाखवावयास पाहिजे होतें तितकें दाखविलें नाहीं असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

हल्लीं मद्राससरकारनें जो ग्रँट्स्–इन्-एड् मिळणाऱ्या शाळांसंबंधानें ठराव केला आहे तोच सन १८९७।९८ सालीं जाइल्स साहेबांनीं सरकारच्या मंजुरीनें येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीस लागू करून पुढें इतरांसहि लागू केला आहे ही गोष्ट कदाचित् बऱ्यांच लोकांस माहीत नसेल; पण न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज व डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांचा सन १८९६।९७, ९७।९८ चा रिपोर्ट जो वाचील त्यास आम्ही म्हणतों ही गोष्ट कळून येईल. या संस्थांचें पूर्वीचें रूप कसें होतें हें वर थोडक्यांत सांगितलेंच आहे. पण सन १८९७।९८ च्या भोंवऱ्यांत तें स्वरूप बदलून जाऊन " विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् " या म्हणीप्रमाणें त्याचें अगदीं रूपांतर होऊन गेलें आहे. ज्या संस्था स्वतंत्ररीतीनें चालविण्याकरितां आपलें आयुष्य खर्च करावयाचें असा संकल्प करून १०–

१५ सुशिक्षित लोक एकत्र झाले, ती संस्था आज अशा दशेस यावी ही गोष्ट मोठ्या दुःखाची आहे. आतां कित्येक असें म्हणतील कीं, ही स्थिति टाळण्यास दुसरा कांहीं इलाज नव्हता. अजीबात मरून जाण्यापेक्षां थोडी धुगधुगी असली तर केव्हां तरी संजीवनी देऊन उठवतां येईल अशी आशा असते; व त्या आशेवरच या संस्थांच्या हल्लींच्या चालकांनीं 'ग्रँट्सू इन्-एड्' च्या चतकोर भाकरीकरितां सरकारचें एवढें दास्य पत्करलें असेल. कसेंहि असो. शाळेच्या चालकांनीं ही स्थिती कां पत्करली याचा आज आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. आमच्या मतें त्यांनीं ती पत्करावयास नको होती आणि पत्करली ही चूकच केली. पण आमचें मतच सर्वांस ग्राह्य असतें असे नाहीं. "पिंडे पिंडे मतिर्भिन्ना" या न्यायानें कित्येकांस त्यांनीं स्वीकारलेला हा पंथ बरा वाटेल. आम्हांस आज या विषयाचा मुख्यत्वेंकरून जो विचार करावयाचा आहे तो सरकारानें खासगी शाळांतील शिक्षकांचीं अशा तऱ्हेनें तोंडें बांधणें वाजवी आहे कीं नाहीं, एवढ्याच पुरता होय. सरकारची मर्जी असेल त्याप्रमाणें कांहीं खासगी शाळांतील शिक्षक वागण्यास तयार होतील हें आम्हीं जाणून आहों; पण कांहीं खासगी शाळांचे शिक्षक याप्रमाणें वागण्यास तयार असले तरी सरकारची कृती गैरवाजवी नाहीं असें होत नाहीं. जुलूम तो जुलूमच, मग तो लोक मुकाट्यानें सोसोत वा न सोसोत, असें आमचें मत आहे. या मताप्रमाणें पाहिलें तर मुंबईसरकारानें येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर व इतर खासगी शिक्षण संस्थांवर जे निर्बंध ठेवले आहेत ते व जे निर्बंध मद्राससरकार तिकडील खासगी शाळांवर ठेवूं पहात आहे ते दोनही आमच्या दृष्टीनें अत्यंत अहितकारक व गैरशिस्त आहेत; व आपल्या मानेवरील हें जूं जितक्या लवकर काढून टाकतां येईल तितक्या लवकर तें खासगी शाळांच्या चालकांनीं काढून टाकलें पाहिजे.

वर सांगितलेंच आहे कीं, मद्रास इलाख्यांतील खासगी शाळांतील शिक्षकांस राजकीय बाबतींत भरलेल्या सभेस जाण्याची परवानगी नाहीं असा तेथील सरकार नियम करीत आहे. मुंबईसरकारानें डेक्कन एज्युकेशन सोसायटीस जे नियम बसविले आहेत ते याहिपेक्षां कडक आहेत. सन १८९७ सालचें वादळ झालें तेव्हां सुधारक पत्राचें कर्तृत्व या संस्थेंतील दोन लाईफ मेंबरांकडे होतें; व प्रो० भानू यांनीं शिवाजी-उत्सवांत त्याच सालीं व्याख्यान दिलेलें होतें. सरकारचें पित्त आधींच खवळलेलें होतें; त्यांत या गोष्टी त्यांच्या नजरेस आल्यावर मग राजद्रोहाचें मूळ खणून टाकण्याचे इराद्यानें त्यांनीं 'खासगी शाळांची व्यवस्था' हा विषय लागलाच हातीं घेतला. ज्या शाळेस सरकारी मदत मिळते त्या शाळेंतील मास्तरांनीं खुद्द सरकारच्या नोकरांपेक्षांहि सरकारची मनधरणी अधिक केली पाहिजे, हें तत्त्व सरकारांतून ठरून त्याची डायरेक्टरसाहेबांकडून अम्मलबजावणी झाली. "तरुण पिढीचें शिक्षण आणि राजकीय चळवळी

यांचा संबंध असणें इष्ट नाहीं " असें एक मोठें तत्त्व ठोकून देऊन त्याच्या जोरावर न्यू स्कुलांतील दोन लाईफ मेंबरांस एकदोन वर्षें एकांत-वासाची सजा देण्यांत आली, व इतउत्तर या संस्थेंतील कोणत्याहि लाईफ मेंबरानें खालीं लिहिलेल्यांपैकीं कोणतीहि गोष्ट करूं नये अशी त्यांच्यापासून कबूली करून घेतली. त्या शर्ती येणें प्रमाणें:—

[१] कोणतेंहि राजकीय वर्तमानपत्र चालविण्यांत, प्रसिद्ध करण्यांत किंवा त्याची व्यवस्था ठेवण्यांत पूर्ण किंवा कमी मालकीच्या हक्कानें किंवा अन्य तऱ्हेनें लाईफ मेंबरनें पडूं नये.

[२] कोणत्याहि राजकीय संस्थेच्या कोणच्याहि कामगाराची जागा कोणत्याहि लाईफ मेंबरनें पत्करूं नये.

[३] या संस्थेची गव्हार्निंग बॉडी म्हणजे शास्तेमंडळी ज्या सार्वजनिक चळवळींत पडूं नका म्हणून सांगेल त्यांत लाईफ मेंबरांनीं पडतां कामा नये; कारण समाजांतील भिन्न भिन्न जातींत ज्या योगानें तंटे वाढतील अशा ज्या चळवळी, किंवा ज्या जात्याच दांडगेपणाच्या आहेत त्यांत शिक्षकांनीं पडणें अत्यंत अनिष्टकारक आहे.

[४] शाळेबाहेर लाईफ मेंबरची सार्वजनिक वर्तणूक कशी आहे याबद्दल ते शास्ते मंडळीस जबाबदार राहतील.

वरील चार शर्ती वाचल्या म्हणजे ज्या सबलती मद्रासससरकार आपल्या इलाख्यांतील खासगी शाळांच्या शिक्षकांस ठेवीत आहे त्याहि या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लाईफ मेंबरांपासून काढून घेतल्या आहेत असें दिसून येईल. वरील शर्तींत सांगितलेल्या शास्ते मंडळीची रचना सरकारी ठरावानें अशी ठरली आहे कीं, त्यांत शाळेच्या लाईफ मेंबरांपैकीं तीन व बाहेरील पांच, मिळून आठ लोक असावयाचे. ही अष्टमूर्ती सासूबाई (पैकीं तीनच तोंडें लाईफ मेंबरांचीं असावयाचीं) सांगेल त्याप्रमाणें शाळांतील अभ्यासाचा क्रम, पुस्तकें, फी, मास्तर काढणें, लावणें किंवा त्यांस बढती अगर रजा देणें वगैरे व्यवस्था झाली पाहिजे असा सरकारानें नियम घालून दिला आहे; व हा नियम सरकारी परवानगीखेरीज पुनः कोणासहि बदलतां यावयाचा नाहीं असा हें प्रकरण सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत जाऊन तिकडून ठराव होऊन आलेला आहे! सारांश, दहा वर्षांपूर्वी पुण्यास स्वतंत्र शिक्षणाच्या संस्था निघाल्यामुळें या शहरास किंवा महाराष्ट्रासहि इतर बाबतींत पुष्कळ फायदा होईल अशी जी आशा होती ती आतां अगदीं नाहींशी झाली आहे. सरकाराकडून दरमहाचे दरमहा वेतन घेणाऱ्या लोकांसहि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या हल्लींच्या मेंबरांपेक्षां अधिक स्वातंत्र्य असतें. त्यांस राजकीय चळवळींत पडतां येत नाहीं हें खरें; पण दुसऱ्या कोणत्याहि चळवळींत

पडण्यास त्यांस सासूबाईची परवानगी लागत नाहीं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा तसा प्रकार नाहीं. या सोसायटीचे मेंबर हे वर सांगितलेल्या अष्टमूर्ति सासूबाईचे दास आहेत आणि ही सासूबाई सरकारची मुलगी आहे. म्हणजे सोसायटीचे लाईफ मेंबर हे सरकारचे नुसते दास नव्हेत तर दासानुदास झाले. अशा रीतीनें सरकारचे दासानुदास बनून रहावें कीं नाहीं हा ज्याच्या त्याच्या समजुतीचा प्रश्न आहे. आम्हांस कोणाहि व्यक्तीबद्दल बोलावयाचें नाहीं; करतां अशा समजुतीचा आम्ही येथें विचार करीत नाहीं. आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, अशा रीतीनें थोडेशा 'ग्रँट्स्-इन् एड्' ची लालूच दाखवून सरकारानें खासगी शाळांतील मास्तरांची मुस्कुटें दाबण्याचा प्रयत्न करणें हें जितकें मूर्खपणाचें लक्षण आहे, तितकेंच सदर मास्तरांनीं आपल्या गळ्यांत हें लोढणें अडकवून घेणें हें होय. स्वतंत्र खासगी शिक्षणापासून देशास जर कांहीं उपयोग व्हावयाचा असला तर तो या रीतीनें कधींच व्हावयाचा नाहीं. इतकेंच नव्हे तर स्वतंत्रतेपरी स्वतंत्रता गमावून पुनः खासगी शाळांतील कमी वेतनावर संतुष्ट राहणारे चांगले सुशिक्षित लोक इतउत्तर असल्या संस्थास कधींहि मिळावयाचे नाहींत; आणि चांगले लोक मिळाले नाहींत म्हणजे त्या भरभराटीस येण्याचीहि कधीं आशा ठेवावयास नको. कोणचीहि एकादी स्वतःची आवडती कल्पना अथवा हेतु सिद्धीस नेण्याकरितां एकादा मनुष्य इतर व्यवसाय सोडून देऊन आजन्म भैक्ष्यवृत्तीहि पत्करील, पण भैक्ष्यवृत्ती आणि परतंत्रता हीं दोन्ही पत्करण्याइतका कोणी शहाणा निघेल असें आम्हांस वाटत नाहीं. बनारस येथील हिंदुकॉलेजच्या चालकांनीं प्रायः याच गोष्टी लक्षांत आणून स्वतंत्र रीतीनें आपलें कॉलेज चालविण्याचा पहिल्यापासूनच निश्चय केला असावा. असा निश्चय आमच्याकडेहि कां तडीस जाऊं नये हें आम्हांस समजत नाहीं. निश्चय मात्र पाहिजे; तोच होत नसल्यास नाइलाज आहे. हा उपाय खासगी शाळांतील मास्तरांनीं करावयाचा आहे. पण तेवढ्यानें सरकारचा दोष कमी होत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. तरुण मुलांस राजकीय चळवळींत गोवूं नये हें तत्त्व एकपक्षीं खरें आहे; पण त्यामुळें तरुण पिढीस राजकीय चळवळींची बिलकूल ओळख होऊं देऊं नये हें म्हणणें जितकें अविचाराचें आहे त्यापेक्षांहि खासगी शाळांतील तरुण पिढीच्या शिक्षकांनीं राजकीय चळवळींत पडूं नये हें जास्त अविचाराचें होय. सरकार खासगी शाळांस जी मदत देतें ती सदर शाळा शिक्षणप्रसारास जी मदत करतात तेवढयाचकरितां होय. यापेक्षां जास्त खासगी शाळांच्या शिक्षकांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न करणें अगदींच गैरशिस्त आहे. मिशनरी लोकांच्या शाळा हिंदुलोकांस बाटविण्याकरितांच मुख्यत्वेंकरून घातलेल्या आहेत; आणि ख्रिस्ती राष्ट्रांतील लोक या शाळा चालविण्यास जो खर्च देतात तो याच करतां आहे. हिंदुलोकांस बाटविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे एक प्रकारें त्यांच्यांत

बखेडा उत्पन्न करण्याचा प्रयत्न नव्हे काय ? आणि असें असतांहि जर त्या शाळांस सरकार भरपूर मदत देतें, तर हिंदुलोकांच्या खासगी शाळांनीं असें काय पाप केलें आहे कीं, त्यांतील मास्तरांनीं सासूबाईंच्याच परवानगीखेरीज राष्ट्रीय सभेस देखील जाऊं नये, व गेलें तरी बोलूं नये. ज्यास पिनलकोडांत राजद्रोह म्हणतात अशा गोष्टी त्यांनीं करूं नयेत असें म्हणणें सयुक्तिक आहे, पण सरकार ज्यांस सगळी भाकरी देतें त्यांजवर देखील जे निर्बंध ठेवलेले नाहींत ते ज्यांस चतकोर भाकरी देतें त्यांजवर ठेवण्याचा प्रयत्न करणें शुद्ध अरेरावीपणाचें दर्शक होय. मद्रास शहरांत याबद्दल लवकरच सभा होऊन सरकारास अर्ज जावयाचा आहे असें समजतें. कदाचित् तेथील सरकारास लोकांची विनंति मान्य होणार नाहीं. असें झाल्यास आमचे मद्रास इलाख्यांतील बंधू तरी हा प्रश्न वरपर्यंत नेऊन त्याचा अखेर निकाल लावून घेतील अशी आम्हांस आशा आहे.

* * *

इनॉक्युलेशन प्रकरण*

डॉ. भालचंद्र विरुद्ध केसरीकार.

प्लेग टोंचण्याच्या उपायासंबंधानें आम्हीं डॉ. भालचंद्र यांस जे प्रश्न विचारले होते त्यांचीं सविस्तर उत्तरें त्यांनीं लिहून आमच्याकडे पाठविलेलीं दुसरीकडे प्रसिद्ध केलेलीं आहेत. हीं उत्तरें यापेक्षां फारच थोडक्यांत लिहितां आलीं असतीं; पण, इनॉक्युलेशन तर्फेचें सर्व म्हणणें लोकांपुढें मांडण्याची आयती आलेली संधी फुकट कां दवडावी अशा हेतूनें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा डॉ. साहेबांनीं आपल्या उत्तरांस निबंधाचें स्वरूप आणलें आहे; आणि तो इतका विस्तृत झांला आहे कीं, आम्हीं विचारलेल्या प्रश्नांस त्यांत मुद्देसूद उत्तर कोठें आहे हेंहि बरेच श्रम केल्याखेरीज कोणास सांपडणार नाहीं. डॉ० साहेबांनीं माहिती बरीच गोळा केलेली आहे. पण ती सर्व या उत्तरांत देण्याची जरूर नव्हती. इतकेंच नव्हे तर बी पुष्कळ ठिकाणीं मुद्यास सोडून भलतीकडेच वाहवत गेलेली आहे. प्लेगची लस कशी तयार करतात, त्यांत द्रव्यें काय असतात, व त्यांचे मनुष्याचे शरीरावर काय परिणाम होतात या गोष्टींचा खुलासा केसरींत (१५ आगष्ट १८९९ व त्यानंतरचे अंक पहा) जितका चांगला केलेला आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि मराठी पत्रांत किंवा खुद्द डॉ. साहेबांच्या उत्तरांतहि केलेला नाहीं. डॉ. भालचंद्र हे

---

* [केसरी २१ नोव्हेंबर १८९९]

शास्त्रीय शोधास जितका मान देतात त्यापेक्षां जास्त नसल्यास तितका तरी केसरीकार सदर शोधांस मान देण्यास तयार आहेत; आणि याबद्दल डॉ. भालचंद्रांनीं आपल्या पत्राच्या अखेरीस केसरीकारांस उपदेशाचा जो डौल घातला आहे तो अगदीं निरर्थक आहे. शास्त्रीय शोध किंवा प्रयोग यांजपासून लोककल्याण होण्याचा जो संभव आहे त्याचें अनेक वेळां आम्हीं आपल्या पत्रांत निदर्शन केलेलें आहे. त्याबद्दल डॉ. साहेबांचा व आमचा मतभेद नाहीं;

वादाचा मुख्य मुद्दा

एवढाच आहे कीं,आमच्यामतें प्लेग टोंचण्याचा उपाय अद्याप अपूर्ण अवस्थेंत आहे व सध्याच्या स्थितींत तो अमलांत आणण्याकरितां लोकांवर सक्ती करणें अथवा सशक्त–अशक्त, म्हातारे–कोतारे आणि बायकापोरें वगैरे सर्वांस सरसट्टा टोंचून काढणें हें शास्त्रीयदृष्ट्या अविचाराचें आणि निर्दयपणाचें काम आहे. डॉ. भालचंद्र यांच्या मतें हा उपाय प्रयोगवस्थेच्या पलीकडे गेलेला आहे आणि त्याच्यापासून जर कांहीं अपाय घडले तर ते आगंतुक आहेत. आपल्या पत्रांत अखेरीस प्लेग टोंचण्याची सक्ती होऊं नये असें त्यांनीं म्हटलें आहे खरें; पण अलिबाग वगैरे ठिकाणीं प्लेग टोंचण्याबद्दल ' खुषीची सक्ती ' जेव्हां सुरू झाली तेव्हां डॉ. साहेबांच्या कानावर ही गोष्ट गेली असतां ती बंद करण्याकडे त्यांनीं लक्ष पोंचविलें नाहीं. इनॉक्युलेशनचे वास्तविक गुण दाखविणें हें जितकें लोकांच्या पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे तितकेंच हल्लीं जें भाडोत्री, जबरीचें आणि अडाणीपणाचें इनॉक्युलेशन चाललें आहे तें अगदीं गैरशिस्त आहे हेंहि सरकारच्या नजरेस आणून देण्याचें त्यांचें कर्तव्य होय. डॉ. भालचंद्र यांस यांपैकीं एकच कर्तव्य करावयाचें आहे आणि केसरीकारांस हीं दोन्हीं करावयाचीं आहेत एवढाच काय तो त्यांच्या व आमच्यामध्यें फरक आहे. हा फरक जर त्यांनीं लक्षांत ठेवला असता तर आमच्या प्रश्नांचीं मुद्देसूद उत्तरें त्यांस थोडक्यांत देतां आलीं असतीं. असो. या निमित्तानें तरी इनॉक्युलेशनच्या तर्फेची सर्व बाजू लोकांपुढें मांडली गेली हेंहि एका अर्थीं बरेंच झालें. व त्याबद्दल डॉ. साहेबांचे सर्वांनीं आभार मानले पाहिजेत. आतां डॉक्टरसाहेबांनीं आमच्या प्रश्नांचीं जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांचा क्रमशः विचार करूं. हीं उत्तरें देण्यापूर्वीं डॉ. साहेबांनीं बऱ्याच मोठमोठ्या लोकांच्या नांवांची यादी दिली आहे; पण आमचें त्यांस एवढेंच उत्तर आहे कीं, अशा यादीनें या वादाचा निर्णय होण्यासारखा नाहीं.

बाबावाक्यं प्रमाणं,

हें तत्त्व व्यवहारांत कित्येक वेळां जरी उपयोगी असलें तरी शास्त्रीय शोधांत आणि विवेचनांत त्यास काडीइतकें देखील महत्त्व देत नाहींत हें डॉ. भालचंद्र

यांसहि माहीत असेल सरकारानें इॅनाक्युलेशनाचा सपाटा सुरू केल्यामुळें प्लेग टोंचण्यासाठीं पुष्कळ डॉक्टर लोक सरकारनें ठेविले आहेत. या लोकांनीं हजारों लोकांस टोंचून काढलें आहे व हल्लींचा क्रम सुरू राहिल्यास आणखीहि हजारों लोकांस टोंचून काढतील. पिचकाऱ्या आणि लस हीं मात्र सरकारानें पुरविलीं म्हणजे झालें. या डॉक्टरांचा हा धंदा आहे व तो ते उत्तम प्रकारें करीत आहेत याबद्दल त्यांस जर सर्टिफिकेट पाहिजे असलें तर तें आम्हींहि मोठ्या खुषीनें देतों. पण प्रकृत वादांत मात्र त्यांच्या साक्षीची फारशी मातबरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कारण प्लेग टोंचलेल्या माणसास पुढें काय अपाय होतात याबद्दलची चवकशी व्यवस्थेशिर कोणीहि डॉक्टर ठेवीत नाहींत. कित्येक ठिकाणीं तर असा प्रकार घडतो कीं, एकदां एकाद्या माणसास डाक्तरानें टोंचून सोडून दिलें म्हणजे मग त्याची आणि डाक्तराची गांठ वरच्या लोकांत पडावयाची. अशा लोकांच्या किंवा डॉक्तरांच्या माहितीवर डॉ. भालचंद्र यांनीं आपली इमारत रचलेली आहे. डॉ. धारगळकर यांनीं जें सरक्युलर काढलें होतें त्यापासून खरी माहिती मिळण्याचा संभव फार कमी आहे हें आम्हीं त्याच वेळीं लिहिलें होतें. आणि तोच न्याय डॉ. भालचंद्र यांनीं मिळविलेल्या माहितीसहि लागू आहे; रा. रा. गु रुजी हे गरीब आहेत ही गोष्ट खरी आहे पण डॉ. भालचंद्र यांनींहि कधीं गरीबींत दिवस काढले नाहींत काय ? गरीब मनुष्य अतिशयोक्ति करणारा आाण अविश्वसनीय असतो हें तत्त्व आम्हांस बिलकुल मान्य नाहीं. आमची उलट अशी समजूत आहे कीं, गाडया घोडयांतून हिंडणाऱ्या गृहस्थांपेक्षां गरीब लोकांसच खरी लोकस्थिती अधिक चांगली समजते. सरकारी अधिकारी शास्त्रीय शोध निःपक्षपात बुद्धीनें करण्यास कित्येक प्रसंगीं अगदीं नालायक कसे असतात याचें उदाहरण फॅमिन फी रिलफिचे वेळीं एके बाजूस डॉ. कार्टर आणि दुसरे बाजूस मुंबईचे गव्हर्नर आणि त्यांचे मेडिकल ऑफिसर यांच्या दरम्यान जो वाद झाला त्यावरून डॉ. भालचंद्र यांस कळून येईल. गरीब लोकांकडूनहि माहिती घेऊन व तिचा विचार करून आपले शोध परिपक्व दशेस आणणें हें शास्त्रीय शोधकांचें काम आहे, व त्यांस मनाचा जो समतोलपणा लागतो तो सरकारी अधिकाऱ्यांचे हातांत प्लेग टोंचण्याचें काम दिल्यानें कधींहि रहात नाहीं. हल्लींचा प्रकार बहुतेक अंशीं असाच झालेला आहे. मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं आणि गृहस्थांनीं इनॉक्युलेशनची तुतारी वाजविण्यास सुरु केल्याबरोबर गरीब लोकांवर या अपरिपक्व उपचाराच्या अम्मलबजावणीकरितां भारी जुलूम होऊं लागला आहे. तो कमी व्हावा आणि या उपचारांचें खरें स्वरूप लोकांस कळावें एवढया हेतूनेंच केसरींतील लेख लिहिलेले आहेत. ज्यांचे हातांत या उपचारांची अंमलबजावणी आहे त्यांस ते मान्य होणार नाहींत हें आम्हांस माहीत आहे; पण त्यास आमचा कांहीं इलाज नाहीं. वास्तविक पाहतां आम्ही जी माहिती

गोळा करीत आहों ती सरकारी अधिकाऱ्यांनींच करावयास पाहिजे होती. निदान डॉ. भालचंद्रासारख्यांनीं तरी या प्रश्नाचा पहिल्यानेंच विचार करावयास पाहिजे होता. पण तो न करितां रा. रा. गुरुजी यांनीं जागें केल्यावर त्यांजवर विनाकारण घसरा करून " मी एकटाच वेडापीर नाहीं " हें जगास सांगत बसण्यांत कांहीं भूषण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आमचें तर असें मत आहे कीं, हा विषय लोकांपुढें आणल्याबद्दल

रा. रा. गुरुजी यांचे आभार

सर्वांनीं मानले पाहिजेत. रा. रा. गुरुजी हे डाक्तर नाहींत हें खरें आहे, पण अमक्याचा हात लुला पडला आहे कीं नाहीं हें पाहून त्याबद्दलची खात्री करून घेण्यास ईश्वरानें त्यांस इतर लोकांप्रमाणेंच कान व डोळे दिलेले आहेत; आणि त्यांनीं दाखविलेल्या उदाहरणांत अनिष्ट परिणाम कशामुळें घडून आला याबद्दल जरी मतभेद असला तरी ते म्हणतात त्याप्रमाणें अनिष्ट परिणाम मुळींच घडलेले नाहींत असें डॉ. राजम् अयंगार देखील म्हणत नाहींत. डॉ. भालचंद्र यांनींहि ही गोष्ट कबूल केलेली आहे. तेव्हां आतां रा. गुरुजी आणि डॉ. भालचंद्र यांच्या मध्यें मतभेद काय तो एवढाच कीं डॉ० भालचंद्र यांच्या मतें हे अनिष्टकारक परिणाम आगंतुक आहेत, प्लेगच्या लसीचे नव्हत; आणि तेहि हजारांत दहापांच ठिकाणीं होतात. रा. गुरुजींच्या म्हणण्याप्रमाणें खुद्द धारवाडांतच, म्हणजे जेथील लोकसंख्या सुमारें ३०००० आहे तेथें, टोंचलेल्या १७००० लोकांत अशा प्रकारचे अपाय घडून आल्याचीं उदाहरणें कमींत कमी निदान १००० तरी सांपडतीलच सांपडतील.व हे विकार बहुधा प्लेगच्या लसीच्या तीव्रतेमुळेंच झाले असावे. वादाचा मुख्य मुद्दा हाच आहे व यास अनुलक्षूनच आम्हीं आपले प्रश्न विचारले होते.त्याचीं उत्तरें कशीं काय आलीं आहेत याचा आतां क्रमवार विचार करूं. प्लेग टोंचून घेतल्यानें टोंचून घेतलेल्या इसमास कांहीं स्वल्प काळपर्यंत प्लेग होण्याची भीति थोडीशी कमी असते ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे. याबद्दल पुढें विचार येईलच. येथें ही गोष्ट सांगण्याचें कारण एवढेंच कीं, ती सिद्ध करण्याकरितां डॉ. भालचंद्र यांनीं आपल्या उत्तरांत अनेक लोकांचीं नांवें व आंकडे देऊन जी जागा अडवली आहे ती अडविण्याचें कांहीं कारण नव्हतें. प्लेग टोंचल्यानंतर थोडे दिवस प्लेग होण्याची भीति नसली तरी हा उपाय देवी टोंचण्याइतका निर्धास्त आणि गुणकारी नाहीं; किंबहुना अपायकारक आहे, व म्हणून त्याचा सक्तीनें प्रसार करणें गैरशिस्त आहे; हाच काय तो वादाचा मुख्य विषय होता. करितां तेवढ्याबद्दलच डॉ. भालचंद्र यांचें काय म्हणणें आहे याचा आम्ही थोडक्यांत विचार करणार आहों. बाकीच्या गोष्टी मुद्यास सोडून असल्यामुळें त्यांचा विचार करण्याची जरूर नाहीं.

प्लेग टोंचण्याचे अपायकारक परिणाम.

वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले, आपणास खरे वाटतात कीं नाहीं असा डॉ. साहेबांस आमचा पहिला प्रश्न होता; व दुसऱ्या प्रश्नांत त्यांस ते कबूल नसल्यास त्यांची कोणत्या प्रकारें खात्री करून दिली असतां चालेल असें विचारलें होतें. या दोन्हीं प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत डॉ. साहेबांनीं जी हातचलाखी केली आहे ती फारच वर्णन करण्यासारखी आहे. रा. रा. गुरुजी यांनीं दाखविलेलीं उदाहरणें खोटीं आहेत असें न म्हणतां त्यांचा डॉ० साहेबांनीं विनाकारण जो उपहास केला आहे तो आमच्या मतें अगदीं गैरशिस्त आहे. रा. गुरुजी डॉक्टर नाहींत ही गोष्ट कोणालाहि सांगावयास नको, पण ज्या गोष्टीकडे डाक्तरांनींच लक्ष पुरवावयास पाहिजे होतें त्या गोष्टी लोकांच्या नजरेस आणून देण्याचें गुरुजींनीं श्रेय घेतलें हें त्यांनीं लहान सहान काम केलेलें नाहीं. प्लेग टोंचून घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं पुष्कळ लोकांस अशक्तता, दमा, हातपाय लुले पडणें, डोकें दुखणें वगैरे विकार होतात हें आतां निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. रा. गुरुजींचे म्हणणें १७००० टोंचलेल्या लोकांत निदान १००० तरी असे इजा झालेले लोक आहेत. डॉ. भालचंद्र म्हणतात कीं, इतके नाहींत; आणि त्यास प्रमाण म्हणून दहा पांच ठिकाणच्या डाक्तरांचीं मतें देतात. परंतु गुरुजींनीं घरोघर जाऊन ज्याप्रमाणें चवकशी केली आहे तशी डॉ. भालचंद्र यांस पत्रें पाठविणारे लोकांनीं केलेली आहे असें दिसत नाहीं, तोंपर्यंत गुरुजींच्याच म्हणण्यावर आम्हांस जास्त विश्वास ठेवला पाहिजे. मुंबईस किंवा पुण्यास प्लेग टोंचल्यापासून अपकार झाल्याचीं उदाहरणें आढळण्यांत येत नाहींत या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सक्तीनें प्लेग टोंचण्याचें काम मुंबईस अद्याप फारसें झालें नाहीं तें होऊन प्रत्येक इसमास घर कीं टोंच असा जेव्हां क्रम तेथें सुरू होईल तेव्हां घारवाडप्रमाणेंच मुंबईसहि प्लेग टोचल्यानें इजा पावलेली शेंकडों मंडळी नजरेस पडेल. पुण्यामध्यें व्हाइसरायसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें प्रकृति पाहून मोठ्या सावधगिरीनें आणि तारतम्यानें प्लेगची लस वापरल्यास त्यापासून अपकार फारसा होणार नाहीं ही गोष्ट अम्हांसहि कबूल आहे; पण तसा प्रकार हल्लीं घडत नाहीं. रोज शेंकडों लोक एकेकटा डाक्तर वेळगांव घारवाडाकडे टोंचून काढीत होता व आहे. असें सरसट्टा इनॉक्युलेशन, केल्यानें ज्या मंडळींचे हातपाय दुखावले आहेत त्यांची डॉ. भालचंद्रासारख्या पुढाऱ्यास कांहींच कींव येऊं नये काय ? असो, मुंबईस हल्लीं ज्या प्रकारचें इनाक्युलेशन चाललें आहे त्यापासूनहि बऱ्याच लोकांस अपाय घडल्याचीं उदाहरणें डॉ. सुखिया यांनीं डॉ. धारगळकर यांजकडे पाठविलीं आहेत. फार लांब कशाला, खुद्द हाफकिन आणि मेजर बानरमन यांनीं ज्यांस प्लेग टोंचला अशापैकींहि कांहीं लोक पुढें वेडे झाले किंवा दुसऱ्या

विकारानें खितपत पडले अशीं उदाहरणें डॉ.सुखिया यांनीं दाखविलीं आहेत.तेव्हां डॉ. भालचंद्र यांच्या कल्पनेप्रमाणें या अपायकारक परिणामाचा सर्व दोष आगंतुक कारणांवर टाकणें वाजवी नाहीं. डॉ. भालचंद्र यांनीं तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरांत प्लेग टोंचल्यापासून अपाय होण्यास पांच कारणें दिलेलीं आहेत, व त्यांपैकींच टोंचलेल्या औषधांतील दोष हें एक कारण सांगितलें आहे, आणि पुढें असें लिहिलें आहे कीं, " संधिवात, क्षय आणि मूत्रपिंडाचे रोग " यांचा विकार प्रथम शरीरांत असेल तर तो टोंचण्याच्या उपचारानें अधिक होतो असें चार पांच डॉक्टरांचें म्हणणें आहे. डॉ. भालचंद्र यांस जर एवढी गोष्ट कबूल असेल तर वादाचा बहुतेक भाग मिटल्यासारखाच आहे. संधिवातादि रोगांची याद जास्त अनुभवानें कदाचित् वाढेल किंवा कमी होईल याबद्दल आमची तक्रार नाहीं; पण आजपर्यंत मिळालेल्या अनुभवावरून सरसट्टा प्लेग टोंचण्याचें काम चालू ठेवणें निर्दयपणाचें आहे असें जें आम्ही विधान केलें होतें तेंच खरें ठरतें. प्लेग टोंचण्याचा उपाय सर्वमान्य होण्यास प्लेगची लस अशा रीतीनें तयार झाली पाहिजे कीं, ती सर्व प्रकारच्या प्रकृतीच्या मनुष्यांस मानवेल. अशा प्रकारची लस जोंपर्यंत तयार झाली नाहीं तोंपर्यंत सरसट्टा प्लेग टोंचून घुष्कळ गरीब लोकांस कायमचे पंगू करणें हा आमच्या मतें गुन्हा आहे व हा बंद करण्यास डॉ. भालचंद्र हे जर आपल्या बजनाचा लोकांचे पुढारी या नात्यानें उपयोग करणार नाहींत तर या गुन्ह्यास अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन दिल्याच्या जबाबदारींतून त्यांस आम्ही तरी कसें मोकळें सोडावें हें आम्हांस समजत नाहीं. शंभर लोकांस दोन चार महिने थोडासा फायदा होतो एवढ्याच संबंधावर त्यांपैकीं पांच सात लोकांस कायमचे पंगू करणें कोणच्याहि दृष्टीनें पाहिलें तरी अन्याय्य होय. प्लेगच्या मृत्यूचें सरासरी मान पाहिलें तरी त्या शहराच्या वस्तीच्या दहाव्या भागापेक्षां जास्त लोक प्लेगानें मरत नाहींत.आतां प्लेग टोंचल्यानें मुळींच कोणास प्लेग होते नाहीं इतक्या पूर्णावस्थेस हा उपाय अद्याप आलेला नाहीं, हें डॉ.भालचंद्र यांसहि कबूल आहे. पण घटकाभर असें कबूल करूं कीं, प्लेग टोंचलेल्या लोकांत कोणीहि प्लेगानें मरत नाहीं, तरी सरासरीच्या मानानें शेंकडा दहा लोक बचावण्याकरितां शेंकडा पांचसात लोकांस आमरणांत जाया करण्याचे उपचारास शास्त्रीय उपचार म्हणावे कीं नाहीं याबद्दल कोणाहि विचारी मनुष्याचा मतभेद पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. डॉ. भालचंद्र यांचें उत्तर असें आहे कीं, प्लेग टोंचल्यापसून शेंकडा पांचसात लोकांस अपाय होतो हें म्हणणें अतिशयोक्तीचें आहे; आणि अशा अपायकारक उदाहरणांची संख्या फार झालें तर शेंकडा एक किंवा दीडपेक्षां जास्त नाहीं. डॉक्टर साहेबांचें हें म्हणणें कदाचित् खरें असेल; पण गुरुजींप्रमाणें घरोघर हिंडून इतर लोकांनीं माहिती गोळा केली आहे असें जोंपर्यंत कोणी म्हणत नाहीं तोंपर्यंत गुरुजींच्याच आंकड्यांवर आम्हांस जास्त विश्वास ठेविला पाहिजे. डॉ.

भालचंद्र यांस या प्रश्नाची खरोखरच शहानिशा करावयाची असल्यास त्यांनीं अशा उदाहरणांची चौकशी करण्यास खासगी किंवा सरकारी कमिशन काढवावें, याखेरीज दुसरी तोड नाहीं. गुरुजींनीं दाखविलेलीं उदाहरणें बरोबर आहेत याबद्दल डॉ० राजम् अयंगार यांची साक्ष आम्ही मागेंच दिली आहे. धारवाडासच ही ओरड अधिक आहे आणि दुसऱ्या ठिकाणीं नाहीं यावरून " धारवाडच्या टोंचण्याच्या कृतींत किंवा औषधांत कांहीं विशेष दोष असावा" असें डॉ. भालचंद्र यांचें दुसरें एक अनुमान आहे. पण हेंहि अनुमान बरोबर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कारण अलिबाग, बडोदें, बेळगांव, नगर, मुंबई वगैरे ठिकणांहून प्लेग टोंचल्यामुळें अपाय झाल्याचीं बरींच उदाहरणें आमच्याकडे आलेलीं आहेत; त्यांवरून आमची अशी समजूत झाली आहे की, रा. रा. गुरुजींप्रमाणें वरील प्रत्येक ठिकाणीं जर कोणी उद्योगी गृहस्थ भेटतील तर धारवाडाप्रमाणेंच इतर ठिकाणीहि प्लेग टोंचल्यामुळें अपाय झाल्याचीं शेंकडों उदाहरणें गोळा करतां येतील. खुद्द मुंबईचीच गोष्ट घ्या ना. डॉ. सुखिया यांच्या पाहण्यांत अपाय झाल्याचीं जितकीं उदाहरणें आहेत तितकीं डॉ. भालचंद्र यांच्या पहाण्यांत नाहींत. असा प्रकार कां होतो याचें कारणही उघड आहे. प्लेग टोंचणें हा एक उत्तम शास्त्रीय उपचार आहे अशी मनाची दृढ समजूत करून घेऊन डॉ. भालचंद्र हे वागत असल्यामुळें आपल्या आडवत्या मुलाचे अवगुण त्यांच्या लक्षांत येत नाहींत. डॉ. सुखिया हे हा उपचार अद्याप प्रयोगावस्थेंतच आहे असें मानून त्याच्या गुणावगुणाची काळजीपूर्वक चिकित्सा करितात, त्यामुळें डॉ. भालचंद्र यांच्या नजरेस येत नाहींत ते दोष डॉ. सुखिया यांच्या सहज नजरेस येतात. यांपैकीं शास्त्रीय पद्धती कोणाची आहे हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. रा. रा. गुरुजी यांच्या मनाला टोंचण्याच्या उपचारासंबंधें विरुद्ध पक्षाचा तीव्र संस्कार झालेला दिसतो असा त्यांजवर डॉ.भालचंद्र यांनीं आरोप केला आहे; पण प्लेग टोंचण्यासंबंधानें त्यांच्या बुद्धीसहि अशाच प्रकारचा तीव्र संस्कार झालेला आहे हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. लोकांच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं असें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. डॉ. भालचंद्र यांच्या मनावर इनॉक्युलेशन तर्फेच्या ग्रहाचा पगडा इतका दृढ बसला आहे कीं, प्लेग टोंचण्याकरितां जो सविष पदार्थ तयार करितात तो औषधी आहे विषारी नव्हे असें त्यांनीं प्रतिपादन केलेलें आहे. टोंचण्याच्या औषधांत

प्लेगचें विष

नसतें आणि औषधानें मनुष्याला टोंचणें म्हणजे त्यांच्या अंगांत प्लेगचें विष घालणें नव्हे असें त्यांनीं ६ वे प्रश्नाचे उत्तरांत लिहिलेलें आहे. डॉक्तरसाहेबांनीं जर याबद्दलचा शांतपणानें विचार केला असता तर या याबतींत त्यांचा स्वतःचाच गैर-

समज झालेला आहे असें त्यांच्या सहज लक्षांत आलें असतें. प्लेगची लस तयार करण्याचा परळ येथील कारखाना आम्हीं स्वतः पाहिलेला आहे व त्यांत लस कशी तयार करितात हेंहि आम्हांस प्रत्यक्ष पाहिल्यावरून माहीत आहे. या माहितीवरून डॉ. भालचंद्र यांचें मत चुकीचें आहे असें म्हणण्यास आम्हांस बिलकूल शंका वाटत नाहीं. प्लेगनें जो मनुष्य मरतो तो प्लेगचे जंतु पुष्कळ झाल्यानें मरत नाहीं, तर प्लेगचे जंतु रक्तांत जें विष प्रसवतात तें विष सहन करण्याची शरीरास शक्ती नसल्यामुळें मनुष्य मरण पावतें असा वैद्यशास्त्राचा हल्लींचा सिद्धान्त आहे. प्लेगचे जंतु रक्तांत जाऊन तेथें ते जें विष उत्पन्न करितात तेंच विष सदर जंतु मांसरसांत ठेवून त्या रसांत त्यांच्याकडून परळच्या रसायन शाळेंत उत्पन्न करवितात; आणि नंतर मांसरसास उष्णता देऊन मग त्यांतले किडे मेले म्हणजे हे मेलेले किडे आणि त्यांनीं मांसरसांत उत्पन्न केलेलें विष मिळून दोन्हीं पदार्थांचा प्लेग टोंचण्याकरितां लस या नात्यानें उपयोग करण्यांत येतो. या प्रवाही द्रव्यास लस किंवा विष न म्हणतां औषध म्हणावें असें डॉ. भालचंद्र यांचें म्हणणें आहे व 'प्लेग टोंचणें' 'प्लेगची लस' वगैरे शब्द वापरल्याबद्दल त्यांनीं आम्हांस दोष दिला आहे. पण खरा प्रकार पाहिला तर मनुष्यास प्लेग झाला असतां त्याच्या रक्तांत जें विष उत्पन्न होतें तेंच विष टोंचण्याच्या वेळीं शरीरांत घालतात. यास लस म्हणणें बरोबर नसल्यास विष म्हणा, पण हें बाळकडवासारखें एक औषध आहे असा गोडव्या शब्दांनीं त्याचा गौरव करणें म्हणजे आपलें त्याबद्दल अज्ञान प्रदर्शित करण्यासारखें आहे. इंग्रजींत प्लेग टोंचण्याच्या कृतीस इनॉक्युलेशन (inoculation) आणि टोंचून घालण्याच्या प्रवाही पदार्थास व्हाकसीन (vaccine) सीरम (serum) वगैरे शब्द लावितात, हें डॉक्टरसाहेबांस माहित असेलच.या शब्दाची व्युत्पत्ती लक्षांत आणली म्हणजे लस हा शब्द त्यांच्यापेक्षां अधिक चांगला आहे असें कोणाच्याहि लक्षांत येईल.असो. हा शब्दवाद वाढविण्यांत कांहीं हंशील नाहीं. मुख्य मुद्दा काय तो लसीच्या स्वरूपाबद्दलचा आहे. आणि ही लस म्हणजे प्लेगजतूंनीं मांसरसांत उत्पन्न केलेलें प्लेगचेंच विष होय, ही गोष्ट खुद्द हाफकिन व बॅनरमन यांसहि मान्य आहे. ज्याप्रमाणें रोज थोडथोडी अफू खाणाऱ्या मनुष्यास अफूचें विष सहसा बाधत नाहीं, किंवा बाधलें तरी त्यापासून फार इजा होत नाहीं, तद्वतच् प्लेग टोंचण्याचा प्रकार आहे. प्लेगचे जंतु आणि प्लेगचे (जंतूंचें) विष यांमध्यें फरक आहे आणि प्लेग टोंचण्याच्या वेळीं प्लेगचे सजीव जंतु शरीरांत न घालतां ते मारून त्याबरोबरच प्लेगचें विष शरीरांत घालतात. हें विष शरीरांत गेलें म्हणजे ताप येणें वगैरे प्लेगच्या विषाचींच चिन्हें अथवा परिणाम स्वल्प प्रमाणानें शरीरावर घडतात. पण प्लेगचे जिवंत जंतु लशींत नसल्यामुळें ते शरीरांत वाढून टोंचून घातल्यापेक्षां जास्त प्लेगचें विष शरीरांत उत्पन्न होत नाहीं. अशी याबद्दलची हाफकिनसाहे-

बांची उपपत्ती आहे; परंतु तेवढ्यानें प्लेगचें विष शरीरांत जात नाहीं असें जें डॉ. भालचंद्र यांनीं विधान केलें आहे तें खरें ठरत नाहीं. डॉ. भालचंद्र यांनीं ही चूक कशी केली याचेंच आम्हांस आश्चर्य वाटतें. "प्लेग टोंचणें" हाच शब्द या उपचारास अधिक योग्य व अन्वर्थक आहे. कारण प्लेगचें विष थोड्या प्रमाणानें शरीरांत घालणें हेंच या क्रियेचें खरें स्वरूप आहे. एकदां अशा रीतीनें प्लेगचें विष सोसण्याची शरीरास ताकद आली म्हणजे मग टोंचलेल्या मनुष्यास पुढें प्लेग होण्याची कांहीं तरी दिवस भीति कमी असते हें खरें आहे; पण हा निर्धास्तपणा देवी टोंचण्याच्या उपायाइतका कायमचा नसतो ही एक या उपचारामध्यें मोठीच उणीव आहे. याखेरीज प्लेगचें विष टोंचून शरीरांत घातल्यानें त्याचा कित्येक लोकांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होणें हेंहि अगदीं स्वाभाविकच आहे. लस म्हणजे बोलून चालून प्लेगचें विष हें जर खरें आहे तर हें विष कांहीं माणसांस न सोसल्यास तो दोष प्रकृतीचा आहे, लसीचा नव्हे हें म्हणणें अगदींच गांवढळपणाचें नव्हे काय ? डॉ. भालचंद्र यांची ही कोटी स्वीकारली तर उद्यां असेंहि म्हणतां येईल कीं, प्रत्यक्ष प्लेग होऊन जीं माणसें मरतात तींहि प्लेगनें मरत नाहींत तर त्यांची प्रकृती सदृढ नसल्यामुळें मरतात; कारण कांहीं सदृढ प्रकृतीचे लोक प्लेगमधूनहि निभावतात असा अनुभव आहे ! सामान्यतः सर्वांच्या प्रकृतीस मानेल असेंच औषध असलें पाहिजे. तशा प्रकारची प्लेग टोंचण्याची लस तयार झाली नाहीं तोंपर्यंत त्या लसीपासून अपकार झाल्यास त्याचा दोष 'प्रकृतीपेक्षां' लसीकडेच जास्त येतो हें कोणासहि सहज समजण्यासारखें आहे. शेंकडा ९० माणसें अशीं आहेत कीं त्यांचे अंगांत कांहींना कांहीं गूढ दोष असतात. कोणास आईबापांची कडकी, अशक्तपणा किंवा दमा इत्यादि विकारांचीं गूढ बीजें प्राप्त झालेलीं असतात. कित्येकांनीं तीं पुढेंहि संपादन केलेलीं असतात. या सर्व लोकांस प्लेगच्या लसीपासून जर इजा होऊं लागली तर ती लस सुधारणें हें खऱ्या वैद्याचें काम आहे, प्रकृतिवर दोष ठेवून वेळ मारून नेणें बरोबर नाहीं. असा कोणचा मनुष्य आहे कीं, त्याच्या प्रकृतिवर कोणच्याच विषाचा वाईट परिणाम व्हावयाचा नाहीं ? देवीच्या रोगांत माणसाच्या लसीनें फोड्या टोंचून घेण्याची पद्धत मागें पडून त्याऐवजीं गोस्तनशीतला टोंचण्याची पद्धत कां अमलांत आली यांचीं कारणें पाहिलीं असतां आम्ही प्लेगच्या लसीसंबंधानें वर जो आक्षेप केला आहे तो बरोबर आहे असें डॉ. भालचंद्र यांचें लक्षांत येईल. देवींतील इनॉक्युलेशनसंबंधानें लिहितानां एका ग्रंथकारानें असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, गोस्तनशीतला टोंचण्याप्रमाणें जरी या इनाक्युलेनचा उपयोग होतो तरी पुष्कळ ठिकाणीं माणसाच्या लसीनें देवी टोंचण्यापासून दुसरे अनिष्ट परिणाम जास्त होतात असें लक्षांत आल्यावरून ही पद्धत इंग्लंडात कायद्यानें बंद करण्यांत आली आहे. सारांश डॉ. भालचंद्र यांनी

प्रकृतीची जी सबब पुढें आणिली आहे ती अगदीं लंगडी व अशास्त्रीय होय. वैद्यशास्त्र सामान्य प्रकृतीच्या मनुष्याचे रोग औषधानें बरे करण्याकरितां प्रवृत्त झालेलें आहे, आणि कोणत्याहि रोगावर कोणतेंहि औषध सर्वमान्य होण्यास तें सर्व प्रकारच्या प्रकृतीच्या लोकांस घेतां येण्याजोगें झालें पाहिजे. असें जोंपर्यंत झालें नाहीं तोंपर्यंत तें औषध अपूर्णावस्थेंत आहे असेंच म्हणणें अधिक शास्त्रोक्त आहे. पथ्यासंबंधींहि डॉ. भालचंद्र यांचे विचार अशाच मासल्याचे आहेत. प्लेग टोंचून घेतल्यावर (No change in diet is necessary) पथ्य म्हणून खाण्या-पिण्यांत कांहीं फरक करण्याची जरूर नाहीं, असें डॉ. बॅनरमन यांनीं प्रसिद्ध केलेलें आहे. आणि वहिवाटहि तशीच आहे. तेव्हां टोंचल्यापासून विकार होतात असें नजरेस आल्यावर त्याचा दोष अपथ्यावर ठेवणें म्हणजे वाटाण्याचें निमित्त सांगण्यासारखेंच हास्यास्पद होय. सारांश प्लेगची लस सर्व प्रकारच्या प्रकृतीच्या मनुष्यास मानवत नाहीं आणि मानवली तरी तिच्यापासून होणारे फायदे (गोस्तन) देवी टोंचण्याइतकें चिरकालीन नसतात, या गोष्टी आतां सिद्ध झालेल्या आहेत. या दोनच गोष्टी हा उपचार अद्याप प्रयोगावस्थेपलीकडे गेला नाहीं असें म्हणण्यास बस्स आहेत. पण याहिपेक्षां

हा उपचार शास्त्रीयदृष्ट्या कच्चा आहे

असें सिद्ध करण्यास दुसराहि सबळ पुरावा आहे. डॉ. भालचंद्र यांस विचारलेल्या प्रश्नांपैकीं चवथा व पांचवा असे दोन प्रश्न या संबंधाचे होते. प्लेग टोंचण्याचा बेळगांव-धारवाडाकडे सपाटा चालू करण्यापूर्वी प्लेगच्या लसींत मृतजंतु आणि प्लेगचें विष अशीं जीं दोन द्रव्यें असतात त्यांचा शरीरावर पृथक् पृथक् काय परिणाम होतो हें शास्त्रीय प्रयोग करून ठरविलेलें असेल अशी आमची पहिल्यानें समजूत होती; पण हाफकिनसाहेबांनीं विलायतेंत जें व्याख्यान दिलें व जें जून महिन्याचे लॅन्सेट पत्रांत प्रसिद्ध झालें आहे तें वाचलें तेव्हां प्लेगची लस हाफ-किनसाहेबांनीं आपल्या कल्पनेनें तयार केलेली आहे, त्यांतील घटकावयवांचा शरीरावर पृथक् पृथक् काय परिणाम होतो याचा शास्त्रीय प्रयोग करून त्यांनीं अनुभव पाहिलेला नाहीं असें आम्हांस आढळून आलें. प्लेगच्या लसीची क्रिया दोन प्रकारची आहे; (१) टोंचेलल्या माणसास पुनः रोग न होणें आणि (२) प्लेग झाल्यास त्यांतून तो बचावणें. पैकीं पहिला गुण मृत जंतूंत आणि दुसरा गुण सविष प्रवाहि पदार्थांत असतो अशी डॉ. हाफकिन यांनीं पाहिल्यानें नुसती कल्पना बांधली होती. आणि ही कल्पना "पुढें मागें बदलावी लागेल किंवा मुळींच सोडून द्यावी लागेल" असें त्यांनीं गेल्या जून महिन्यांत लंडन येथें दिलेल्या व्याख्यानांत स्पष्टपणें कबूल केलें आहे:— म्हणजे गेल्या जूनपर्यंत या बाबतींत कोणत्याहि प्रकारचे शास्त्रीय प्रयोग करून पाहिले नव्हते. व आम्ही

डॉ. भालचंद्र यांस जो प्रश्न विचारला होता तोहि हाफकिनसाहेबांच्या या म्हणण्यास अनुलक्षूनच केला होता. पण या संबंधानें हाफकिनसाहेबांची जरी खात्री नाहीं तरी डॉ. भालचंद्र यांनीं ' मृत जंतूंचा गुण प्लेगचा विकार होऊं न देण्याचा असतो आणि प्रवाही पदार्थांचा गुण प्लेग झाला तर बरा करण्याचा असतो ' असें आपलें साफ मत दिलें आहे. आणि त्यास आधार म्हणून परळ येथील रसायनशाळेंत नुकताच येथें केलेल्यां प्रयोगावर हवाला दिला आहे. हे प्रयोग कसे केलेले आहेत आणि त्यापासून काय अनुमानें निघण्यासारखीं आहेत याबद्दलचा खुलासा डॉ० साहेबांच्या उत्तरांत नसल्यामुळें आम्हीं त्यांस पुनः पत्र पाठवून तो खुलासा विचारला, तेव्हां सदर माहिती परळच्या रसायनशाळेंत मिळेल असें त्यांनीं कळविलें. यानंतर मुद्दाम सदर रसायनशाळेंत जाऊन वर लिहिलेल्या प्रयोगांची हकीगत आम्हीं पाहिली परंतु त्यावरून यासंबंधानें निश्चयात्मक असें अनुमान करण्यास अद्याप आधार मिळाला नाहीं, असें आढळून आलें; उलट प्लेगचे मृतजंतु आणि सविष प्रवाही पदार्थ या दोहोंचाहि गुण एकच आहे असें या प्रयोगावरून दिसून येतें. तथापि अद्याप निश्चयात्मक असें कांहीं सांगतां येत नाहीं असा खुद्द डॉ. बॅनरमन यांचाच रिपोर्ट आहे. सारांश, हाफकिनसाहेब व मेजर बॅनरमन या दोघांच्याहि मतें लसींतील घटकावयवांचे पृथक् पृथक् शरीरावर काय परिणाम होतात याबद्दलचे प्रयोग करून अद्याप पुरा अनुभव घेतलेला नाहीं; तथापि डॉ. भालचंद्र यांनीं हाफकिनसाहेबांची नुसती कल्पना वेदवाक्यासारखी प्रमाण मानून आपल्या उत्तरांत लसीतिल घटकावयवाचे परिणाम अमुक अमुक होतात असें निःशंक विधान केलेलें आहे. आमच्या मतें असें विधान करण्यास शास्त्रीय पुरावा अद्याप गोळा झालेला नाहीं, व ही गोष्ट हाफकिन व बॅनरमन यांसहि मान्य आहे. हाफकिनसाहेबांचें लेक्चर विलायतेंत झालें तेव्हां त्यावर प्लेगकमिशनचे मेंबर प्रोफेसर राईट यांनीं केलेली टीका ता. १ जुलई सन १८९९ च्या लॅन्सेट पत्रांत प्रसिद्ध झालेली आहे. त्यांतहि हाफकिनसाहेबांची कल्पना शास्त्रीय दृष्टया बरोबर आहे का नाहीं याबद्दल प्रो. राईट यांनीं संशय प्रदर्शित केला आहे, व लॉर्ड लीस्टर यांनीं आपल्या भाषणांतहि प्रो. राईट यांनीं सुचविल्याप्रमाणें आणखी शोध झाला पाहिजे असें सांगितलें आहे. हे शोध अद्याप झालेले नाहींत. तेव्हां अर्थात्च प्लेगच्या लसीची कल्पना अद्याप प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलेली नाहीं ही गोष्ट उघड उघड सिद्ध होते. डॉ. भालचंद्र यांस ही गोष्ट माहीत नसावी असें नाहीं. इनॉक्युलेशनची तळी उठविण्याच्या भरांत तिकडे त्यांनीं दुर्लक्ष केलेलें आहे. एरव्हीं लॉर्ड लीस्टर यांचीं स्तुती तेवढी डॉ. भालचंद्र यांस दिसावी आणि प्रो. राईट यांची शंका त्यांचे लक्षांत राहूं नये असें व्हावयाचें नाहीं. या सर्व गोष्टींवरून प्रश्न ४ व ५ यांस डॉक्टर साहेबांनीं दिलेलीं उत्तरें पुष्कळ अंशीं मुद्यास सोडून आहेत, आणि

जेथें मुद्यास धरून आहेत तेथें तीं सप्रमाण नाहींत असें कोणासहि दिसून येईल. इनॉक्युलेशन अद्याप अपूर्णावस्थेंत आहे असें म्हणणारे केसरीकार आणि तें प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलेलें आहे असें म्हणणारे डॉ. भालचंद्र यांपैकीं कोणता पक्ष सत्यास, अनुभवास, आणि शास्त्रीय प्रयोगास धरून आहे याचा यानें सहज निकाल लागतो.

आतां शेवटच्या चार प्रश्नांचीं डॉ. साहेबांनीं कशीं काय उत्तरें दिलीं आहेत तीं पाहूं. प्लेग टोंचल्यामुळें टोंचलेल्या माणसास गांवांत किंवा आसपास प्लेग नसतांहि गोळा येतो असें पाहण्यांत येतें. या गोळ्यांत सजिव प्लेगजंतु असतात कीं नाहीं याचा अनुभव कोणी पाहिला आहे कीं काय असा आमचा प्रश्न होता. त्यास सरळ उत्तर डॉ० साहेबांनीं दिलेलें आम्हांस आढळत नाहीं.

प्लेगजंतूंचा मृत्यु

ऊष्णतेनें किंवा क्वारबॉलिक आसीडनें होत असेल. परंतु या बाबतींत किंबहुना प्लेगजंतूच्या सर्व बाबतींत आमचा अनुभव किती कोता आहे हें आम्हीं डॉक्टरसाहेबांस सांगावयास नकोच. हे जंतु कसे उत्पन्न होतात आणि कसे मरतात हें एक मोठें गूढच आहे; प्लेगनें दूषित झालेलें घर किंवा खोली औषधी पाण्यानें धुवून किंवा खोलींत आग करून शुद्ध केली तरी त्यांतील प्लेगजंतू नाहींसे होत नाहींत, असा पुष्कळ ठिकाणचा अनुभव आहे. किंबहुना कांहीं ठिकाणीं असेंहि आढळण्यांत आलें आहे कीं, यंदाचें सालीं गांवांत प्लेग असतां जर एकाद्या विशिष्ट घरांतील विशिष्ट खोलींत प्लेग केस झाली तर पुढील वर्षीं पुनः गांवांत प्लेग आला असतां त्याच ठिकाणीं तेवढी फिरून प्लेग केस होते, म्हणजे एक सालचा प्लेग गेल्यावरच पुनः प्लेग येईपर्यंत हे जंतु मृतप्राय असतात आणि पुनः अनुकूळ काळ आला म्हणजे ते जीव धरूं लागतात. या गोष्टीवरून प्लेगजंतूंच्या मरणाबद्दल व पुनरुज्जीवनाबद्दल जें विधान करावयाचें तें अनुभवानें सिद्ध होण्यारखें पाहिजे, केवळ कल्पनेचें उपयोगी नाहीं, असें दिसून येईल. प्लेग टोंचलेला मनुष्य सामान्यतः प्लेगचा प्रसार करण्यास कारणीभूत होत नसेल पण त्याच्या अंगांत घातलेलें प्लेगचें विष कधींहि त्याच्या अंगांतून दुसऱ्याच्या अंगांत जावयाचें नाहीं असें म्हणणें जरा साहसाचें आहे. एका बाईस टोंचलें असतां तिच्या अंगावर पिणारे लहान मुलास प्लेग होऊन तें मूल मेलें असें एक उदाहरण येथेंच घडलेलें आहे, यांत अशाच प्रकारच्या दुसऱ्या उदाहरणांची नीट उपपत्ती लागेपर्यंत प्लेग टोंचलेल्या मनुष्यापासून त्याच्या सहवासानें प्लेग न टोंचलेल्या मनुष्यास कधींहि व केव्हांहि प्लेग लागावयाचा नाहीं हें म्हणणें जरा साहसाचें आहे. टोंचण्याच्या लसींत सजीव जंतु न ठेवण्याची खबरदारी घेतलेली असते हें खरें आहे, पण या संबंधाच्या दुसऱ्या अनेक कारणांचा विचार करतां प्लेग टोंचलेल्या इसमापासून दुसऱ्या

कोणास कधींहि विकार व्हावयाचा नाहीं हें म्हणणें जरा साहसाचें आहे; निदान त्याबद्दल आणखी शोध होईपर्यंत तरी या विषयावरील आपलें मत कोणींहि कायम न करणें हेंच आमच्या मतें अधिक समंजस होईल.

शेवटच्या चार प्रश्नांसंबंधानें डा. भालचंद्र यांनीं जीं उत्तरें दिलीं आहे त्यांत

प्लेग टोंचण्याची सक्ती नसावी

असे जें त्यांनीं आपलें उघड मत दिलें आहे तें आमच्या मतें विशेष महत्त्वाचें आहे. प्लेग टोंचणें हें प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलें आहे, असें मानणारे डॉ. भालचंद्र यांस जर सक्तीनें प्लेग टोंचणें पसंत नाहीं तर, प्लेग टोंचण्याचा उपाय अद्याप अपूर्णावस्थेंतच आहे असें आमच्याप्रमाणें ज्यांचें मत आहे त्यांच्या दृष्टीनें या बाबतींत होणारी सक्ती अगदींच अविचाराची आहे असें उघड उघड प्रतिपादन करण्यास कांहीं हरकत नाहीं. प्लेग टोंचण्याकरितां जो प्रवाही पदार्थ वापरतात तो प्लेगचें विष आहे याबद्दल हाफकिन, बॅनरमन यांचीं मतें वर दिलींच आहेत. या रसास औषध म्हणा कीं लस म्हणा, तें प्लेगचेंच विष आहे. आणि थोडया प्रमाणानेंच कां होईना पण दहापांचदां तें शरीरांत घातल्यानें कोणासहि इजा व्हावयाची नाहीं या म्हणण्यावर विश्वास बसण्यास डॉ. भालचंद्र यांनीं दाखविला आहे त्यापेक्षां आणखी पुष्कळच पुरावा मिळाला पाहिजे. स्थानत्यागाखेरीज आजपर्यंत केलेले इतर उपाय व्यर्थ आहेत हें डाक्टर साहेबानीं नवव्या प्रश्नाचें उत्तरांत उघड कबूल केलेलें आहे. तेव्हां आतां स्थानत्याग आणि प्लेग टोंचणें हेच काय ते दोन उपाय राहिले. स्थानत्याग हा खर्चाचा उपाय आहे, आणि त्यामुळें तो गरीबांस स्वीकारतां येत नाहीं हें खरें आहे; पण सरकारनें या कामीं मदत केल्यास इतक्यापेक्षां तरी तो उपाय अधिक अमलांत आणण्यास कांहीं हरकत नाहीं. प्लेग टोंचण्याचे वाईट परिणाम खाण्यापिण्याची ज्यांची चांगली व्यवस्था नसते अशा गरीब लोकांतच जास्त होतात, असा डॉ. भालचंद्र यांनीं कित्येकांचा अभिप्राय दिला आहे. श्रीमान लोक स्थानत्याग करतील पण गरीबांस तसें होत नाहीं म्हणून त्यांनीं टोंचून घेणें जरूर आहे असेंहि दुसरें डॉक्तरसाहेबांचें म्हणणें आहे. हीं दोनही मतें एकत्र केलीं म्हणजे गरीब लोकांनीं टोंचून घेतलें पाहिजे आणि त्यामुळें त्यांचे हालहि अधिक होण्याचा संभव आहे असा सिद्धांत निघत नाहीं काय ? सारांश, गरीबांचे चोहोंकडून हाल आहेत ते आहेतच. अशा प्रसंगीं त्यांजवर प्लेग टोंचून घेण्याची सक्ती करण्यापेक्षां त्यांस गांवांबाहेर राहाण्याची सोय करून दिली तर चांगलें नव्हे काय ?

उपसंहार

असो, वाढतां वाढतां हा लेख बराच लांबला, करितां दुसऱ्या बारीकसारीक गोष्टींचा येथें विचार करतां येत नाहीं. डॉ. भालचंद्र यांचा व आमचा कोणत्या

महत्त्वाचे बाबतींत मतभेद आहे हें वर लिहिलेल्या हकीकतीवरून स्पष्ट दिसून येईल. कोणचाहि प्लेग टोंचण्याची कल्पना पहिल्यानें देवी टोंचण्याच्या युक्तीपासून निघाली, पण देवींचा रोगच असा आहे कीं, तो कोणाहि मनुष्यास एकदां आला असतां बहुधा पुनः येत नाहीं. प्लेगचा तसा प्रकार नाहीं; तेव्हां प्लेग टोंचल्यापासून टोंचलेल्या मनुष्यास पुनः कधींहि प्लेग होणार नाहीं अशी खात्रीलायक लस तयार होईल कीं नाहीं याचा अद्याप जंतुशास्त्रज्ञांस संशयच आहे. तथापि हाफकिनसारख्या गृहस्थांनीं हिंमतीनें आणि उद्योगानें नव्या नव्या कल्पना काढून त्याप्रमाणें प्रयोग करून अनुभव घेण्याचें काम चालविलें आहे. प्लेगनें टोंचलेल्या इसमास कांहीं दिवस तरी प्लेग होण्याची धास्ती नसते असा बराच अनुभव आलेला आहे. पण हा निर्धास्तपणा किती दिवस टिकतो हें अद्याप निश्चित कळलें नाहीं. त्याचप्रमाणें कांहीं प्रकृतीच्या लोकांस ही प्लेगची लस मानवत नाहीं हेंहि आमच्या मतें सिद्ध झाल्यासारखें आहे. अशा स्थितींत या उपायास अपरिपक्क म्हणावें किंवा प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलेला म्हणावें याचा वाचकांनींच विचार करावा. शास्त्रीय दृष्ट्या पाहिलें तर प्लेगच्या लसींत घन (मृत जंतु) आणि प्रवाही (प्लेगविष) असे जे दोन घटकावयव असतात त्यांचे शरीरावर पृथक् पृथक् काय परिणाम होतात हेंहि अद्याप नीट समजलें नाहीं. उद्योग चांगला आहे, स्तुत्य आहे व केव्हां ना केव्हां तरी त्यापासून जगाचें मोठें कल्याण होण्याची मोठी आशा आहे, पण या सर्व गोष्टी कबूल केल्या तरी आज त्याची स्थिती अपूर्ण नाहीं असें आम्हीं म्हणूं शकत नाहीं. अमक्या ठिकाणीं अमुक हजार माणसें टोंचलीं वगैरे जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांत आम्हांस तर कांहीं विशेष अर्थ दिसत नाहीं. प्लेग टोंचल्यापासून टोंचलेल्या गृहस्थास कांहीं दिवस प्लेग होण्याची भीति नसते, एवढीच जर गोष्ट सिद्ध करावयाची असेल तर त्यास या आंकडयांचीहि जरूर नाहीं. कारण क्षयरोग, टायफाईड ज्वर, यांसहि हेंच तत्त्व लागू केलेलें असून तेथेंहि अशाच प्रकारचे अनुभव आलेले आहेत. पण ते रोग टोंचण्याचे उपचार परिपक्क झाले असें मोठेमोठे जंतुशास्त्रज्ञ मानीत नाहींत, तर प्लेग टोंचण्याचा उपचार प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलेला आहे असें म्हणणें कदापीहि वाजवी होणार नाहीं. मि. हाफकिन यांनींहि आपल्या व्याख्यानांत ही गोष्ट कबूल केली आहे. या बाबतींत अद्याप पुष्कळ शोध व्हावयाचे आहेत. प्लेगाच्या लसींतील घटकावयवांचे गुणदोष अद्याप समजावयाचे आहेत आणि तिची तीव्रता कमी करून कोणच्या प्रकृतीच्या मनुष्यास टोंचलें असतां त्यास इजा होणार नाहीं हेंहि अद्याप ठरावयाचें आहे. आज सिद्ध काय तें एवढेंच झालें आहे कीं, प्लेगचें थोडेसें विष अंगांत घातलें असतां शरीरांत प्लेगबरोबर झुंजण्याची थोडीशी अधिक शक्ती येते, पण हे तत्त्व सिद्ध करण्यास एवढा खटाटोपहि नको होता. कारण वर लिहिल्याप्रमाणें नित्य

अफू खाणारास अफू बाधत नाहीं यांतील व देवी टोंचण्यांतील बीज तेंच आहे. मुख्य मुद्याची गोष्ट ही आहे कीं, प्लेंग टोंचण्यानें जो निर्धास्तपणा येतो तो देवी टोंचण्याइतका तरी कायमचा झाला पाहिजे. तसा जर तो पुष्कळ शास्त्रीय शोध करून न होईल तर त्या उपचाराची मातब्बरी फारशी राहणार नाहीं. कसेंहि असो; हल्लीं तो अपूर्णावस्थेंत आहे एवढें आमच्या मतें निर्विवाद आहे. पूर्णावस्थेस यावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. पण त्यामुळें त्या अर्ध्या कच्च्या तयार झालेल्या रसायनाचा सर्वांनीं अंगिकार करावा आणि ते तसें करीत नस-ल्यास ' खुषीची सक्ती ' असें वेडें वांकडें नांव देऊन सरकारानें लोकांवर जुलूम करून त्यांस टोंचून सोडावें असें मत देण्यास आमची मनोदेवता आम्हांस सांगत नाहीं. कांहीं डॉक्टर असे असतात कीं, त्यांनीं कोणतेंहि एकादें नवें औषध पाहिलें कीं, त्याचा ते रोग्यावर ताबडतोब प्रयोग करूं लागतात. आणि दुसरे कित्येक असे असतात कीं, ते सदर औषाधाचा प्रयोग करणें झाल्यास तो फार सावध-गिरीनें आणि बेताबातानें करतात. डॉ. भालचंद्र यांनीं प्लेग टोंचण्याच्या उपाया-बद्दल उत्कंठा दाखविली आहे त्यावरून त्यांची गणना पाहिल्या वर्गांत करावी लागते. त्यांची विद्वत्ता, वाचन आणि अनुभव पुष्कळ आहे, हें आम्हांसहि मान्य आहे. पण त्यांच्याच तोडीचे डॉ. घोले, डॉ. देशमुख वगैरे अनु-भविक आणि विद्वान डॉक्टर त्यांच्या इतके प्लेग टोंचण्याच्या उपचारास अनुकूल नाहींत हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. पण या संबंधानें केसरीकारांचें जें मत झालेलें तें कोणत्याहि व्यक्तीच्या मतामुळें झालेलें नाहीं. हाफकिनसाहेबांनीं आपल्या प्रयोगांचा जो इतिहास प्रसिद्ध केला आहे व वेळोवेळीं दुसरी जी माहिती प्रसिद्ध झाली आहे त्यावरून केसरीकारांनीं आपलें मत ठरविलें आहे. हें चुकलेलें असेल; पण त्यांतील चुकी आम्हांस दाखवीपर्यंत तें आम्ही बदलूं शकत नाहीं. डॉ. भालचंद्र यांचे पूर्वीचे लेख व आजचें दहा कॉलमाचें उत्तर आम्हीं लक्षपूर्वक वाचलें आहे, पण त्यावरून आमचें मत बदलण्यास कांहीं कारण उप-स्थित झालें आहे असें आम्हांस दिसत नाहीं. तथापि डॉ. भालचंद्र यांनीं मेहे-नत घेऊन मेहेरबानीनें आमच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं व लोकांपुढें आपली बाजू जितकी जोरदार रीतीनें मांडतां येईल तितकी मांडली त्याबद्दल सर्वांबरोबर आम्हींहि त्यांचे मनोभावें आभार मानतों. त्यांच्या प्रतिपादनांत कांहीं कमतरता असेल तर तो दोष त्यांचा नव्हे, विषयाचा आहे हें आम्हीं जाणून आहों व आमची अशी अशा आहे कीं, यासंबंधानें डॉक्टरसाहेबांच्या विवेचनांत जे दोष दाखवावे लागले त्याबद्दल आमच्यावर ते रागें भरणार नाहींत.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
..... नं. .....
ता. ....

प्लेग टोंचणें आणि अल्कर्डोल

शास्त्रीय शोध *

गेल्या खेपेस डॉ. भालचंद्र यांस उत्तर देतांना आणि त्यापूर्वी प्लेगसंबंधानें झालेल्या अर्वाचीन शास्त्रीय शोधांबद्दल आम्ही थोडीशी माहिती दिली होती व त्यावरून ते शोध अद्याप अपूर्णावस्थेंत आहेत असें लिहिलें होतें. याच मुद्याच्या समर्थनार्थ आज या शोधांबद्दल आणखी दोन शब्द लिहावयाचे आहेत. कोण त्याहि रोगाचें विष अंगांत टोंचून घालून त्यायोगें पुनः तो रोग आपणास न होण्याची तजवीज करण्याचें तत्त्व युरोपियन वैद्यांस व शास्त्रज्ञांस गेल्या १५।२० वर्षांतच सांपडलेलें आहे व प्लेगशिवाय इतर रोगांवर त्याचा कसा काय उपयोग होत आहे हें पाहिलें म्हणजे प्लेगची लस टोंचून घेऊन आपला बचाव करणें कितपत निर्धास्त आणि उपयोगाचें आहे याचा कोणासहि सहज निर्णय करतां येईल. हा निर्णय व्हावा म्हणूनच डॉ० भालचंद्र यांस विचारलेल्यांपैकीं तीन प्रश्न याच विषयास उद्देशून घातलेले होते; पण त्यांचें उत्तर शास्त्रीयरीत्या जसें द्यावयास पाहिजे होतें तसें डॉ० भालचंद्र यांजकडून न मिळतां उलट शास्त्रीय सिद्धांतास सोडून " प्लेगची लस हें विष नव्हे " अशा प्रकारचीं त्यांनीं विधानें केलेलीं आहेत. याबद्दल आम्हांस काय लिहावयाचें तें आम्हीं गेले अंकीं लिहिलें आहे; म्हणून त्याची द्विरुक्ती न करतां जंतूशास्त्रांतील कांहीं सिद्धांत सामान्य लोकांस समजतील अशा भाषेनें आज सांगण्याचें योजिलें आहे. मि० हाफकिन यांची टोंचून घेण्याची लस उपयोगांत आली तेव्हां आमच्याकडील डॉक्टर मंडळींनीं या लशीची शास्त्रीय रीत्या शहानिशा करून मि. हाफकिन यांनीं कोणते शास्त्रीय प्रयोग केलेले आहेत व कोणते नाहींत याची खात्री करून घेऊन मग ह्या लशीच्या उपयुक्ततेबद्दल आपलें मत द्यावयास पाहिजे होतें. पण डॉक्टर भालचंद्र यांनीं ज्या डॉक्टरांचीं नांवें दिलीं आहेत त्यांपैकीं कोणीहि अशा दृष्टीनें या विषयाचा विचार करून आपलें मत ठरविलें आहे असें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर शास्त्रीय शोध करण्याच्या बुद्धीनें प्लेग टोंचलेल्या मनुष्यावर जितकें लक्ष ठेवावयास पाहिजे तशा प्रकारचें लक्ष ठेवून त्यांची प्लेग टोंचल्यामुळें पुढें काय स्थिति झाली याबद्दलहि प्लेग टोंचणाऱ्या डॉक्टरांनीं कोठें काळजी घेतल्याचें आढळत नाहीं. सारांश, हजारों लोकांस प्लेग टोंचल्याचीं डॉ० भलचंद्र यांनीं उदाहरणें दिलीं आहेत तीं शास्त्रीय सिद्धांत ठरविण्याचे कामीं निरुपयोगी आहेत. अशा प्रकारच्या टोंचण्याची सक्ती करून तरी सरकारास काय फायदा आहे हें

---

* [केसरी ता. २८ नोव्हेंबर स. १८९९]

आम्हांस समजत नाहीं. टोंचलेल्या लोकांसंबंधानें शास्त्रीय रीत्या जी माहिती गोळा करण्याची जरूर आहे ती कोणीच करीत नाहीं, आणि त्याऐवजीं गोरगरीबांस ४।८ आण्यांचे पैसे देऊन टोंचून काढण्याचा सपाटा सुरू आहे. मग हे गरीब लोक पुढें कोठेंहि जावोत आणि कांहींहि करोत.

संसर्गानें होणारे रोगांपैकीं बरेच रोग एक प्रकारचे अतिसूक्ष्म जंतु शरीरांत जाऊन त्यापासून उत्पन्न होतात ही कल्पना गेल्या पांचपंचवीस वर्षांतच निघालेली आहे. पटकी, प्लेग, क्षयरोग, घटसर्प वगैरे रोग निरनिराळ्या प्रकारचे जंतु शरीरांत जाऊन उत्पन्न होतात हें आतां सप्रमाण सिद्ध झालेलें आहे. हे जंतु इतके सूक्ष्म असतात कीं, त्यांस जंतु म्हणण्यापेक्षां ' सजीव विषकण ' हें नांव अधिक चांगलें लागू पडतें. हे सजीव विषकण किंवा जंतु हेंच संचारी रोगाचें बीज होय अशी आतां वैद्यशास्त्रज्ञांची खास खात्री झाली आहे. या जंतूंमुळें रोग होतो हें समजून आल्यावर या जंतूंच्या आयुष्यक्रमाची किंवा राहण्याची, खाण्याची, किंवा त्यांच्या एकंदर चलनादि क्रियेची अथवा धर्मांची जितकी माहिती मिळेल तितकी मिळविण्याचे उद्योगास युरोपांतील पुष्कळ शास्त्रज्ञ लोक लागले. फ्रान्समधील प्रसिद्ध पॅस्टूरसाहेब यांनीं तुतीच्या झाडाचा रोग काढला तोहि याच तत्त्वावर होय. हे जंतु सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनहि दिसण्याची कित्येक वेळां मारामार पडते, इतके लहान असतात. तेव्हां यांच्या निरनिराळ्या जाती, शरीररचना, आणि त्यांच्या जीवनक्रियेचे शरीरावर घडणारे परिणाम यांची माहिती मिळविणें किती कठीण आहे हें सहज लक्षांत येईल. प्लेग, किंवा घटसर्प किंवा क्षयरोग, यांचे जंतु पृथक् पृथक् निवडून काढून त्यांचे व्यापार सूक्ष्म रीतीनें अवलोकन करणें हें मोठया परिश्रमाचें आणि तसेंच शास्त्रीयदृष्ट्या एकप्रकारें मनोरंजक आणि चित्तवेधक काम आहे. हिंदुस्थानांत हें काम करणारे आमच्याकडील कोणी वैद्य अगर डॉक्टर अद्याप निघालेले नाहींत. डॉ० राव हे विलायतेहून हें शास्त्र शिकून नुकतेच इकडे आलेले आहेत. पण त्यांच्याखेरीज या शास्त्राची अनुभवसिद्ध माहिती इकडील डॉक्टरांस बहुतेक नसतेच म्हटलें तरी चालेल. कारण सूक्ष्मजंतुशास्त्र ऊर्फ बॅक्टेरिऑलजी हें आतां स्वतंत्र शास्त्र बनल्यासारखें झालें आहे व त्या शास्त्रावरून जीं औषधें सिद्ध झालेलीं आहेत त्यांच्या गुणावगुणाचा विचार करण्याच्या पद्धतीहि निराळ्या आहेत. या पद्धतीनें हाफकिनच्या प्लेगच्या लशीचा विचार झाला असता, तर आज त्याबद्दल जो वाद माजला आहे तो कधींच माजला नसता. पण तसा प्रकार झाला नसल्यामुळें त्याबद्दल गरीब लोकांस विनाकारण त्रास सोसावा लागत आहे.

कोणत्याहि संचारी रोगाचे विशिष्ट जंतु कोणते ते शोधून काढणें हें पहिलें काम आहे. प्लेगचे जंतु जपानचे जंतुशास्त्रज्ञ किटासटो आणि फ्रेंच जंतुशास्त्रज्ञ येरसिन् यांनीं पहिल्यानें शोधून काढल्यानंतर ते कोणत्या प्रकारें शरीरांत रोग

उत्पन्न करितात हें पहावें लागलें. याकरितां या जंतूंस मानवेल अशा प्रकारचा त्यांस खाण्यास योग्य असा अन्नाचा किंवा मांसाचा रस तयार करून त्यांत या जंतूंची वाढ किंवा लागवड करावी लागते. हा रस खाऊन हे जंतु आपल्या शरीरांतून विष्टेच्या रूपानें एक प्रकारचें विष बाहेर टाकतात. या विषापासूनच हे जंतु शरीरांत शिरले असतां मनुष्यास मृत्यु येतो असें आतां जंतुशास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. जंतु निराळे काढून त्यांची कृत्रिम अन्न किंवा मांसरसांत आपणास वाढ करतां येऊं लागली हेंच शास्त्रीयदृष्टया मोठ्या महत्त्वाचें काम झालेलें आहे. जंतु मनुष्याच्या रक्तांत शिरले म्हणजे ते तेथें काय करितात हें यावरून चांगलें लक्षांत येतें. ते रक्त खाऊन एक प्रकारचें विष शरीरांत उत्पन्न करितात. तें विष शरीरांत सांचलें म्हणजे अनावर होऊन त्यापासून मनुष्यास मृत्यु येतो. जंतूंची शरीरेंहि स्वतः विषारी आहेत व सदर शरीरांच्या आंतहि एक प्रकारचें विष असतें असें आतां अनुभवास आलेलें आहे. हीं दोन्हीं विषें रसायनशास्त्रदृष्टया थोडीं भिन्न आहेत. पण त्यांचा शरीरावर परिणाम एकच होतो असें आतां आढळून आलेलें आहे. शरीरांत जंतू शिरले म्हणजे तेथें त्यांची अगणित वृद्धी होते व त्या सर्वांचें विष अखेरीस रोग्यास मारक होतें, असेंहि जंतुज्ञांनीं ठरविलें आहे.

कोणतेंहि शास्त्र घ्या त्यांतील शोधापासून मनुष्याच्या सुखांत भर पडली नाहीं असें नाहीं. जंतुशास्त्राचीहि स्थिति अशीच आहे. सूक्ष्मजंतूच्या निरनिराळ्या जाती ओळखून काढून व ते विष कसे प्रसवतात याचें लक्षपूर्वक अवलोकन करून सदर विषाचा प्रतिकार कसा करतां येईल हा प्रश्नहि जंतुशास्त्रज्ञांनीं हातीं घेतला आहे. जंतुशास्त्रांतील शोध होण्यापूर्वीच देवी टोंचण्याची व गोस्तनशीतला टोंचण्याची पद्धत सुरू झालेली होती. या पद्धतींतील तत्त्व जंतुशास्त्रज्ञांस फार उपयोगी पडलें. कोणताहि रोग मनुष्यास एकदां येऊन गेल्यावर त्याच्या प्रकृतींत किंवा रक्तांत असा कांहीं गुण उत्पन्न झालेला असतो कीं, त्यामुळें त्यास तो रोग निदान कांहीं दिवस तरी पुनः होण्याचा संभव नसतो. देवीसारख्या रोगांत तर पुनः आमरणांत तो रोग होत नाहीं असा अनुभव आहे. जंतुशास्त्रज्ञांस पहिल्यानें असें वाटत होतें कीं, देवीचा रोग जसा एकदां झाल्यावर पुनः होत नाहीं तशीच सर्व रोगांची स्थिति असेल. पण अनुभवांतीं हें अनुमान चुकीचें आहे असें आढळून आलेलें आहे. देवी टोंचण्याचा जो उपचार आहे त्यांतील बीज असें आहे कीं, साक्षात् देवीचा स्वाभाविकरीत्या रोग येण्याची वाट पाहात बसण्यापेक्षां कृत्रिम रीतीनें स्वल्प प्रमाणानें तो रोग शरीरांत घालून त्याचे परिणाम शरीरावर घडले म्हणजे पुनः रोग येण्याची भीति नसते. हें तत्त्व लक्षांत ठेवून जंतुशास्त्रज्ञांनीं इतर रोगांसंबंधानेंहि अशाच प्रकारचे प्रयोग ससा, माकड वगैरे जनावरांवर करून पाहाण्यास सुरवात केली. ती अशी कीं, कोणत्याहि जनावराचें अंगांत पहिल्यानें एकाद्या रोगाचे निर्बल केलेले (अगदीं मारलेले नव्हत) जंतु घालून ते सोसण्याची त्या जनाव-

रास ताकद आली म्हणजे त्यापेक्षां जरा जास्त शक्तीचे जंतु त्याच जनावराच्या शरीरांत घालावयाचे. असें पांचसहादां केलें म्हणजे अखेरीस त्या जनावराच्या अंगांत अशी कांहीं शक्ती येते कीं, त्यास पुढें त्या रोगाचें विष अगदीं बाधत नाहींसें होतें. जनावरावरील केलेल्या प्रयोगावरून दुसरी अशीहि गोष्ट अनुभवास आली आहे कीं, अशा रीतीनें रोगापासून बचावलेल्या जनावराच्या रक्तांतील पाणी काढून घेऊन तें सदर रोगानें ग्रस्त झालेल्या मनुष्याच्या किंवा जनावराच्या अंगांत घातलें असतां तो मनुष्य किंवा तें जनावर बरें होतें. तथापि ही क्रिया सर्व ठिकाणी सारखी लागू पडत नाहीं. ती अपूर्णावस्थेंत आहे व निरनिराळ्या जंतु-शास्त्रज्ञांचे त्याबद्दलचे अभिप्रायहि निरनिराळे आहेत. ते सर्व येथें देणें अशक्य आहे. यरसिन यांनीं प्लेग बरा होण्याची जी लस तयार केलेली होती ती याच तत्त्वावर केलेली होती व त्याकरितां ते घोड्याचा उपयोग करीत हें मागें सांगितलेंच आहे. यरसिन् यांची ही लस अद्याप खात्रीलायक उपचारांत गणली जात नाहीं.

कोणत्याहि रोगाचे जिवंत जंतु शरीरांत घातले असतां काय परिणाम होतो हें वर सांगितलें. परंतु सदर जंतूंनीं उत्पन्न केलेलें विषहि निरोगी मनुष्याच्या किंवा जनावराच्या शरीरांत घातल्यानें काय होतें याचाहि जंतुशास्त्रज्ञांनीं थोडाबहुत अनुभव घेतलेला आहे. जंतूनें उत्पन्न केलेलें विष किंवा जंतूंचीं मृत शरीरें कोणत्याहि निरोगी प्राण्याच्या शरीरांत घातल्यावर सदर प्राण्यास हळू हळू हें विष सोसण्याची शक्ति येते. ती शक्ति येण्याचें कारण त्याच्या अंगांत जंतूच्या विषाच्या प्रतिक्रियेनें एक प्रकारचें प्रतिविष तयार होतें असें कित्येकांचें म्हणणें आहे; आणि कित्येकांचें मत शरीरास विष सोस-ण्याची संवय होते म्हणून पुढें विष बाधत नाहीं असें आहे. कारण कांहींहि असो थोडथोडें विष शरीरांत घातल्यानें त्या जातीचें विष सोसण्याची कांहीं दिवस तरी शक्ति येते, हें सिद्ध आहे. परंतु ही शक्ति किती दिवस टिकते, ती येण्या-करितां पहिल्यानें जें विष शरीरांत घालावें लागतें त्यापासून कांहीं वाईट परिणाम होतात किंवा नाहीं वगैरे गोष्टींचे रसायनशाळेंत जनावरावर प्रयोग करून त्या-बद्दलचे कायमचे सिद्धान्त ठरल्यावर मग मनुष्यास हें विष देण्यास लागावें हाच शास्त्रोक्त मार्ग आहे. अशा तऱ्हेचे प्रयोग हाफकिनसाहेबांच्या लसीचे संबंधानें झाले आहेत कीं नाहीं व झाले असल्यास त्यापासून काय काय सिद्धान्त निष्पन्न झाले हें आधीं कळणें आमच्या मतें जरूरीचें आहे. परंतु चौकशी करतां असें आढळून येतें कीं, या लशीचा टोंचण्याच्या कामीं उपयोग होण्यापूर्वीं जनावराकर जितके प्रयोग व्हावयास पाहिजे होते तितके झालेले नाहींत. अशा स्थितींत ही लस माणसांच्या अंगांत टोंचून घालून त्यांजवर जनावरांप्रमाणें प्रयोग करून अनुभव पहाण्यास लागणें, हें आमच्या मतें अगदीं गैरशिस्त आहे. परंतु सेवड्यानेंहि

हल्लीं होत असलेली चूक पुरी होत नाहीं. मनुष्यास प्लेग टोंचून जो अनुभव घ्यावयाचा तोहि शास्त्रीय रीतीनें कोणी घेतला आहे असेंहि दिसत नाहीं. आपण काढलेला तोडगा उपयुक्त आहे असें दाखविण्याकडेच हाफकिन आणि त्यांचे अनुयायी यांचें लक्ष लागलें आहे. खेरीज जिल्हानिहाय प्लेग टोंचण्याच्या कामीं ज्या मनुष्यांची योजना झालेली आहे त्यांस जंतुशास्त्राचीं प्रमेयें माहित नसल्यामुळें आलेल्या इसमास टोंचण्यापलीकडे आणि तेंहि निष्काळजीपणानें टोंचण्यापेक्षां जास्त ते कांहींहि काम करीत नाहींत. अशा स्थितींत खरा शास्त्रीय शोध कसा होणार, किंवा शास्त्रीयदृष्ट्या उपयुक्त माहिती तरी कशी मिळणार हें आम्हांस समजत नाहीं. वास्तविक म्हटलें तर प्लेग टोंचल्यापासून ज्यांस अपाय झाला त्यांची संख्या आणि प्लेग टोंचल्यानंतर लवकर पुनः प्लेग होऊन मरण पावले त्यांची संख्या या दोहोंची नोंद त्या सरकारी अधिकाऱ्यांनींच जागोजाग ठेवावयास पाहिजे होती. ती त्यांनीं ठेवली नाहीं आणि आपणास अनुकूल तेवढ्याच गोष्टी गोळा करून इनॉक्युलेशनची तुतारी वाजविण्यास सुरवात केली हें त्यांचें काम शास्त्रीय पद्धतीस अगदीं सोडून आहे; व याचा परिणाम कधींहि चांगला व्हावयाचा नाहीं. हिंदुस्थानांतले लोक गरीब व सोशीक असले तरी त्यांच्यावर अर्ध्या कच्च्या शास्त्रीय शोधाचा अनुभव घेणें अगदीं गैरवाजवी आहे. हाफकिनसाहेबाच्या लसीनें किती दिवसपर्यंत निर्धास्तपणा येतो हें रसायनशाळेंतील प्रयोगावरून आधीं ठरवावयास पाहिजे होतें पण तसें न करतां लोकांवर एकदम हा प्रयोग करण्याची सुरवात केलेली आहे. डॉ० भालचंद्र यांच्या दृष्टीनें हें करणें कदाचित् शास्त्रीय असेल, पण आम्हांस जी जंतुशास्त्राची थोडीबहुत माहिती आहे त्यावरून प्लेग टोंचण्याचा उपचार अद्याप प्रयोगावस्थेच्या पलीकडे गेलेला आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं.

❀ ❀ ❀

* ग्रहण सुटलें !!

मंगळवार ता. २२ जानेवारी १८९७ रोजीं ज्युबिलीचे रात्रीं मि. रँड व ले. आयर्स्ट यांचे खून झाल्यापासून पुणेंप्रकरणास प्रारंभ झाला. खून झाल्यापासून चारपांच दिवसांनीं त्या वेळचे पुण्याचे कलेक्टर मि. लँब यांनीं सर्व सरदारांस व इतर सभ्य गृहस्थांस बोलावून अशी धमकी दिली कीं, पुण्यांतील राजद्रोहाचा कट जर लवकर उघडकीस आला नाहीं, तर पुण्यानें कधींहि पूर्वीं अनुभवलेलीं नसतील अशीं दुःखें पुणेकराना सोसावीं लागतील. या दुःखांचा पहिला हप्ता म्हणजे पुण्यावर लगेच लादलेलें जादा पोलीस होय. हें जादा पोलीस सरकारनें आपोआप पुढें कसें काढून घेतलें व त्याच्या खर्चाची विल्हेवाटहि परस्पर कशी लावण्यांत आली हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. जादा पोलीस लादल्यानंतर पुढें एक महिनाभर स्तब्धता होती व सरकारचा राग आतां कोणत्या स्वरूपानें बाहेर पडतो या विवंचनेंत लोक निमग्न होते. नंतर ता. २७ जुलै १८९७ मंगळवार रोजीं रात्रीं रा. टिळक यांना मुंबईस एकदम पकडण्यांत आलें व दुसरे दिवशीं सकाळीं भल्या पहांटेस सरदार बाळासाहेब नातू यांचे वाड्यास एकाएकीं पोलीसनें गराडा दिला व सरदार बाळासाहेब व श्री. तात्यासाहेब यांना पकडण्यांत आलें. त्याच दिवशीं केसरीचे मॅनेजर रा. बाळ, पुणेवैभवाचे एडिटर रा. केळकर यांनाहि पकडण्यांत येऊन, पुढें लवकरच वाईचें मोदवृत्त, व इसलामपूरचें प्रतोद या पत्रांवरहि राजद्रोहाचे आरोप ठेवून त्यांचे चालकांस व मालकांस पकडण्यांत आलें. वर्तमानपत्रकारांची चौकशी, नामदार स्ट्रॅचीसाहेबांनीं १२४ अ या कलमाचा केलेला विपरीत अर्थ, पत्रकारांस भोगावा लागलेला कारागृहवास, दामोदर चाफेकर फांसावर चढल्यानंतर सरकारचा राग शांत होऊन पत्रकारांच्या कारागृहवासासंबंधानें त्यांना मिळालेल्या सवलती, व पुढें चाफेकर व द्रविड प्रकरणांचा अखेर शेवट झाल्यावर पुणेकरांच्या राजद्रोहाच्या कटाविषयीं निष्कारण संशय उत्पन्न झाला अशी सरकारची बहुतेक अंशीं झालेली खात्री, इत्यादि गेल्या दोन तीन वर्षांतील निरनिराळ्या गोष्टींसंबंधानें आम्हास कांहीं लिहावयाचें नाहीं. पुणेप्रकरणामुळें राज्यकर्त्यांच्या मनावर किंवा प्रजाजनांच्या मनावर जे परिणाम झाले त्यांपैकीं कांहीं दोनचार वर्षांचे अवधींत नष्ट होण्याचा संभव नसल्यामुळें या दूरवरच्या परिणामांसंबंधानेंहि आज आम्हांस चर्चा करावयाची नाहीं. पुणेंप्रकरणाच्या ज्वाळा ज्या पांच दहा असामींना प्रत्यक्ष चाटून गेल्या त्या असामींपैकीं दोन खेरीजकरून बाकी सर्व पुणेंप्रकरणांतून मुक्त होऊन बरेच महिने झाले आहेत.

---

* [केसरी तारीख २६ डिसेंबर १८९९]

हे दोन गृहस्थ म्हणजे श्रीमंत सरदार नातूबंधु होत. श्रीमंत नातूबंधूंना त्यांच्या स्थावर इस्टेटीसह सरकारनें सोडून देण्याची मेहरबानी केली असल्याविषयीं काल रोजीं रात्रीं मद्रासेचे सुमारास बेळगावांहून आम्हांस तार आली आहे हें कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो.

केसरी व नातूबंधु हे एकाच काळीं व एकाच कारणाकरितां संकटांत पडले होते. या संकटसमयींच्या दुःखांचे आम्हीं सर्वजण वांटेकरी असल्यामुळें नातूबंधूंच्या सुटकेनें केसरीस तर विशेषच आनंद होत आहे. गेल्या अडीच वर्षांत श्री. नातूबंधूंवर जीं संकटें आलीं त्या संकटांतून ते मोठ्या धैर्यानें व सरदार बाळासाहेब नातू यांच्या नेहमींच्या मानी व सरदारी स्वभावास शोभेल अशा रीतीनें पार पडले याबद्दल अंतःकरणपूर्वक त्यांचें अभिनंदन केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. पुणेंप्रकरण पांचदहा व्यक्तींवर प्रत्यक्ष कोसळलें होतें तरी तेव्हांपासून पुणें शहरचे मागें सरकारचा कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचा ससेमिरा हा आलाच होताच; व तो यापुढेंहि आणखी कांहीं दिवस चालेल असा जरी रंग असला तथापि श्री. नातूबंधूंचे सुटकेबरोबर पुणेंप्रकरणाची एकप्रकारची इतिश्रीच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां या दृष्टीनें विचार केला असतां ही केवळ श्री. नातूबंधूंची सुटका नव्हे तर सर्व पुणेशहरची संशयपिशाचापासून सुटका झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तीन चाफेकर व एक रानडे हे फासावर चढले त्या वेळींच पुणेंप्रकरणाचा खरा शेवट झाला. पण आपली चूक झाली असें आपल्या कृतीनें दाखविण्याचें अधिकारीवर्गाचे नेहमीं जिवावर येत असल्यामुळें सरकारदरबारमार्फत पुणेप्रकरणाची समाप्ति होण्यास इतका वेळ लागला. आम्हांस अशी बातमी समजली आहे कीं, लॉर्ड सँडहर्स्ट हे कलकत्त्यास निघण्यापूर्वीं ता. २१ रोजींच नातूबंधूंना सोडून देण्याविषयींचा सरकारी ठराव झाला, म्हणजे ता. २२ ६ १८९७ रोजीं पुणेशहरासंबंधानें रुष्ट झालेला शाने ता. २२ १२ ९९ रोजीं म्हणजे बरोबर २॥ वर्षांनीं पालटला असें म्हणण्यास हरकत नाहीं. लॉर्ड सँडहर्स्ट हे येत्या फेब्रुवारी महिन्यांत विलायतेस परत जावयाचे आहेत. ते जाण्याचे पूर्वीं किंवा नवीन गव्हर्नरसाहेब येण्याबरोबर नातूबंधूंची सुटका होईल असा पुष्कळांचा अंदाज होता व तो खराहि ठरला आहे. नातूबंधूंना कारागृहांत तसेंच ठेवून आपण विलायतेस निघून जाऊन लॉर्ड सँडहर्स्ट यांनीं या ग्रहणाचा ग्रस्तास्त होऊं दिला नाहीं याबद्दल त्यांचेहि आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

साडेसातीनैकीं गेल्या अडीच वर्षांचे हप्त्यांत कारागृहवासांत असतांना तऱ्हेतऱ्हेच्या अडकावाचीं दुःखें नातूबंधूंना भोगावीं लागलीं. प्रारंभीं श्री. बाळासाहेब याना अमदाबादचें तुरुंगांत व श्री. तात्यासाहेब यांना ठाण्याचे तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. अमदाबादेस असतांना खाण्यापिण्यासंबंधानें श्री. बाळा-

साहेब यांचे प्रारंभीं फारच हाल झाले. राजकीय कैदी या नात्यानें त्यांच्या सरदारी दर्जास अनुसरून सरकारनें व्यवस्था ठेवावयास पाहिजे होती. पण ही व्यवस्था सरदार श्री. बाळासाहेब यांजकडून ५।६ यादी सरकारास जाईतों करण्यांत आली नाहीं. आपल्या दोन कर्त्यासवरत्या मुलांवर अशा प्रकारें एकाएकीं भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें नातूबंधूंचे मातोश्रीलाहि त्यांच्या कारागृहवासानंतर थोडकेच दिवसांत देवाज्ञा झाली. कारागृहवासाचे दुःखांत मातृवियोगाचे दुःखाची भर पडल्यामुळें तुरुंगांत असतांना श्री. बाळासाहेब यांची प्रकृति बिघडून त्यांना मधुमेहाचा विकार झाला. ता. २६ मार्च १८९८ रोजीं सरदार बाळासाहेब यांनीं असा अर्ज केला कीं, अमदाबादची उष्णता आपल्या प्रकृतीस बिलकूल मानवत नसून तुरुंगांतील तापलेल्या कोठडींत आजारीपणाचे स्थितींत बसवत देखील नाहीं. यानंतर एक महिन्यानें ता. २१ एप्रिल १८९८ रोजीं अमदाबादचे जज् मि. फ्राय यांनीं त्यांना असें कळविलें कीं, सरकार लवकरच तुम्हांस थंड हवेंत नेण्याची व्यवस्था करील. तुरुंगांतील नातूबंधूंच्या दुःखाकडे व हालअपेष्टांकडे सरकारांतून किती जलद लक्ष पुरविण्यांत येत असे हें वरील उदाहरणावरून चांगलें लक्षांत येईल. याच सुमारास सरदार बाळासाहेबांचें कुटुंब श्रीमंत सौ. लक्ष्मीबाईसाहेब यांनींहि पार्लमेंटसभेस सरदार नातूबंधूना सोडून देण्याविषयीं व सोडून न दिल्यास अमदाबादचे तुरुंगांत पतिशेजारीं कैदेंत स्वतांस टाकण्याविषयीं अर्जद्वारां विनंति केली होती. त्या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, ता. १० मे १८९८ रोजीं नातुबंधूंना बेळगांवास नेण्यांत आलें. व त्यांच्या तुरुंगाची हद्द बेळगांव शहरचे हद्दीपर्यंत वाढाविण्यांत येऊन इष्टबांधवांसह त्यांना त्या शहरांत राहण्याची परवानगी मिळाली. पुढें कन्यागताचे दिवस संपत आल्यामुळें कृष्णातटाकीं राहण्याची परवानगी मागितल्यावरून बेळगांव जिल्ह्यांत कुडची येथें नातूबंधू कांहीं दिवस होते बेळगांव शहरीं हे दिवस प्लेगचे पहिल्या हप्त्याचे असल्यामुळें चिकोडी तालुक्यांतच कांहीं दिवस त्यांनीं घालविले.याच संधीस अथणीहून तैनातीचे पैसे आणीत असतांना त्यांना चोरांचे हातचा चांगला मार खावा लागला. बेळगांव शहरचे प्लेगच्या गेल्या हप्त्याचे वेळीं ते बेळगांवासच होते. बेळगांवास प्लेग असल्यामुळें वाई तालुक्यांतील आपल्या इनामगांवीं जाऊन राहण्याची त्यांनीं परवानगी मागितली, पण सरकारनें त्यांना ही परवानगी दिली नाहीं. प्लेगसारख्या संकटसमयीं सर्वांचें संरक्षण करणारा परमेश्वर असतोच त्याप्रमाणें आपला संरक्षणकर्ता परमेश्वर तर खराच पण सरकारनेंहि आपल्या संरक्षणाची जबाबदारी स्वताचे शिरावर घेतली आहे, तेव्हां आपणास दोन संरक्षणकर्ते आहेत असें म्हणून ते स्वस्थ असत. तुमची इच्छा असल्यास तुम्ही धारवाडास जाऊन रहा असा सरकारनें ठराव केल्यावर, सरकारी हुकूम होत असल्यास आम्ही धारवाडास जातों, या कामीं आमची इच्छा काय आहे ती

ह. नं. २४८१०१

आम्हीं पूर्वी कळविलीच आहे, असें सरदार बाळासाहेब यांचेकडून उत्तर गेलें तेव्हां घारवाडास त्यांना नेण्याचा बेत रहित करण्यांत आला. अखेरीस खुद्द नातूंचे बंगल्यांत एक दोन प्लेगकेसीस झाल्याचें कलेक्टरसाहेबांच्या जेव्हां दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां बेळगांवचे किल्ल्यांतील एका बंगल्यांत राहण्याची त्यांना सोय करून देण्यांत आली. गेल्या अडीच वर्षांतील नातूबंधूंच्या जीवनवृत्तांताचा थोडक्यांत इतिहास वर लिहिल्याप्रमाणें आहे.

नातूबंधूंना कारागृहवास कां सोसावा लागला, यांत चुगलीखोरांचा दोष किती, सरकारचा दोष किती, वगैरे गोष्टींसंबंधानें केसरींत सविस्तर विवेचन पूर्वी अनेक वेळां आलेंच आहे. ज्युबिलीच्या दिवशींचे खुनांत नातूबंधू सामील असावेत असा सरकारास संशय आला हें त्यांच्या दुःखाचें मुख्य कारण होय. हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनींहि प्रथम यांना कैद करण्याचें कारण सांगतांना असें सांगितलें होतें कीं, यांच्या अटकावापासून ज्युबिलीच्या खुनांचा सुगावा लागेल. येथील अधिकारी अधिक सावधगिरीनें बोलत होते व कायदे कौन्सिलांतील प्रश्नांस उत्तरें देतांना १८२७ चे २५ व्या राजकीय कैद्यांसंबंधाच्या कायद्यांतील भाषेशिवाय इतर भाषा ते वापरीत नव्हते. रँडसाहेबांचे प्लेगचे अमदानींत एका सुईणीला सरदार बाळासाहेब यांनीं धमकी देऊन सरकारी कामापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला व एक बाई प्लेगनें मेली असतां सोल्जरांचे जुलुमानें मेली असा पंचनामा करण्याविषयीं एका पोलिस पाटलास सरदार बाळासाहेब यांनीं भर दिली असेंहि पार्लमेंट सभेंत सांगण्यांत आलें, हे दोनहि आरोप खोटे असल्याविषयीं १८९८ चे मार्च महिन्यांत नातूबंधूंनी सरकारास कळविलें व सरकारची इच्छा असल्यास हे आरोप आपणावर ठेवून न्यायाचे उघड्या कोर्टांत आपली चवकशी व्हावी अशी विनंति केली. ज्या सुईणबाईसाहेबांचा सरकारनें एवढा कैवार घेतला होता ती बया कर्नल क्रेम यांचे प्लेगचे अमदानींत प्लेगचे कामांत कशी नालायक ठरली व तिला प्लेगचे नोकरींतून कसें कमी करण्यांत आलें हें केसरीचे वाचकांस माहित आहेच. नातूबंधूंवर ठेवलेले हे दोन आरोप अत्यंत किरकोळ असून जुना कायदा उकरून काढून त्यांना राजकीय कैदी बनविण्याच्या लायकीचे नाहींत अशी सर्वांची खात्री झाली, व यापुढें पार्लमेंट सभेंत किंवा येथील कायदेकौन्सिलांत नातूबंधूंच्या बंडाळीचीं हीं दोन कृत्यें पुढें येईनाशीं झालीं. तेव्हां महाराणीसरकारच्या प्रांतांतील शांतता नातूबंधू मोकळे असल्यानें बिघडण्याचा सभव आहे एवढेंच काय तें ठरीव उत्तर कायम राहिलें. मुंबईस भरलेल्या गेल्या कायदेकौन्सिलचे वेळीं नामदार मेथा यांनीं निरानिराळे प्रश्न विचारून या ठरीव उत्तरासंबंधानेंहि मुंबईसरकारास कुंठित केलें. त्यावेळीं वैतागून जाऊन लॉर्ड सँडहर्स्ट यांनीं शेवटचें निकराचें असें उत्तर दिलें कीं, येथे

शांततेचा जरी भंग झाला नसला व इंग्रजी लष्कर व पोलिस यांच्या सहायानें जो दंगा नाहींसा करितां यावयाचा नाहीं अशा प्रकारचा दंगाधोपा हिंदुस्थानांत उत्पन्न होणें जरी शक्य नसलें व नातूबंधूंच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्याचें चातुर्य पोलिसांत किती जरी असलें तरी नातूबंधूंना अटकावांत ठेवून दंगा होऊं न देण्याची खबरदारी घेणें सरकारास अधिक श्रेयस्कर वाटतें. या उत्तरानें कायदेकौन्सिलांतील या प्रश्नासंबंधाचा वाद कायमचा मिटल्यासारखा झाला. सारांश खुनासंबंधानें नातूबंधूंवर संशय होता व तोच संशय त्यांच्या कारागृहवासास कारण ही गोष्ट निर्विवाद होय. खुनाचें वेळीं नातूबंधूंचीं हत्यारें पोलिसानें नेलीं होतीं व तीं परत आलीं त्यावेळीं खुनाचे चौकशीकरितां असा त्यांजवर शेरा होता. म्हणजे नातूबंधूंचा संशय येऊन हत्यारांवरून काहीं माग लागल्यास पहाण्याकरितां त्यांचीं हत्यारें जप्त केलीं होतीं हें उघड होय. श्रीशिवाजीमहाराजांचा उत्सव, श्रीगणपतीमहोत्सव इत्यादि धार्मिक व ऐतिहासिक चळवळींचे पुढारी लोकांच्या मनांत राजद्रोहाचें बीं पेरून भयंकर कृत्ये करण्यास त्यांस प्रवृत्त करतात अशा प्रकारच्या कुकल्पना सरकारचे मनांत कांहीं लोकांनीं भरवून दिल्यामुळें व अविवेकी अधिकारी वर्गांत ही कल्पना दृढ झाल्यामुळें एकंदरीनें नातुबंधूंवर हा प्रसंग गुदरला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सरदार बाळासाहेब नातू शिवाजी व गणपति महोत्सवांत पडत होते व श्री. तात्यासाहेब घोड्यावर बसण्यांत पटाईत असून श्रीशिवाजी रायडिंग क्लब या नांवाची त्यांनीं संस्था काढली होती हेच काय ते नातूबंधूंचे मुख्य अपराध होत. असो. १८९७ चा जून महिना आतां निघून गेला. धार्मिक व ऐतिहासिक महोत्सवांत असणें म्हणजे गुन्हा करणें असें आतां कोणी मानीत नाहीं. सरकारास आतां आपण एके काळीं निष्कारण संशयग्रस्त कसे झालों होतों हें नीट समजलें.व पुणें शहरावरील वावटळ वीस वर्षांपूर्वीच्या म्हणजे बुधवार वाडा जळला त्यावेळच्या वावटळीप्रमाणें आलें तसें निघून गेलें.

❖ ❖ ❖

* लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द

उपोद्घात

पुढच्या फेब्रुवारीच्या अठराव्या तारखेस लॉर्ड सँढरर्ट यांस आमच्या इलाख्याच्या किनाऱ्यावर पहिल्यानें पाय ठेविल्यास पांच वर्षें पुरीं होणार, व ज्या इलाख्याचा राज्यरकट त्यांनीं गेल्या पांच वर्षें हांकला होता त्याचें धुरंधरत्व सदर तारखेनंतर लॉर्ड सँढर्स्ट यांजकडून निघून लॉर्ड नार्थकोट यांचे हातीं पडणार. अशा वेळीं यांच्या पंचवार्षिक चारित्राचें सिंहावलोकनन्यायानें थोडेंसें निरीक्षण करून लॉर्ड हॅरिससाहेबांप्रमाणें लॉर्ड सँढर्स्ट यांचीहि आरती करण्याचा आमचा विचार आहे. आमचा असा विचार होण्यास मुख्यत्वेंकरून लॉर्ड साहेबांच्या स्मारकाबद्दल जी चळवळ चालू आहे तींच कारण झालेली आहे. इलाख्याच्या गव्हर्नराचें आम्हीं जें स्मारक करणार तें कांहीं त्यांच्या खाजगी गुणाकरितां अथवा सामाजिक सौजन्याकरितां नव्हे. कोणीहि मनुष्य झाला तरी त्याच्या अंगांत कांहींना कांहीं-तरी गुण असतोच. ईश्वरानें मोरास पिसारा, पोपटास वाणी, आणि सिंहास शौर्य हे गुण दिलेले आहेत; पण त्यामुळें सिंहाच्या गुणाची अपेक्षा असतां त्या ठिकाणीं पोपटाची, किंवा पोपटाच्या गुणांची अपेक्षा असतां त्या ठिकाणीं मोराची ज्याप्रमाणे कोणी योजना अथवा स्तुति करीत नाहीं, तद्वतच सध्यांचा प्रकार होय. हिरा कितीहि दैदीप्यमान असला तरी रसायनशाळेंत त्या बिचाऱ्यास कोळशाच्याच तोडीस बसावें लागतें. सारांश, कोणत्याहि मनुष्याची अगर वस्तूची पारख करणें ती त्यापासून जो जो उपयोग घडावयाचा असतो त्या त्या मानानें भिन्न भिन्न प्रकारें करावी लागते; व व्यवहारांत असा भेद वेल्याखेरीज गत्यंतरच रहात नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचें आम्हीं जें परीक्षण करणार आहों तें अशाच प्रकारचें होय. हे स्वभावानें व बोलण्याचालण्यांत सौम्य असून, एकंदरींत आपल्या ताब्यांतील लोकांचें बरें व्हावें अशी त्यांची इच्छा आहे व होती हें आम्हांसहि मान्य आहे; व एवढ्याच गुणाकरितां लॉर्ड सँढर्स्ट यांचें जर कोणी स्मारक करूं इच्छित असेल तर आम्हीहि त्यास आपली अल्प स्वल्प मदत खुषीनें पाठवून देऊं. परंतु आज आम्हांस त्यांच्या कारकीर्दीचें जें परीक्षण करावयाचें आहे, तें वरील दृष्टीनें नसून आमचे गव्हर्नर या नात्यानें त्यांनीं राज्यकारभार कसा चालविला या दृष्टीनें होय; आणि तेंहि समग्र कारकीर्दीचें करावयाचें आहे, कारकीर्दीच्या आरंभींचें किंवा शेवटचें नव्हे. संस्कृतात अशी एक म्हण आहे कीं, " उदेति सविता ताम्रस्ताम्रेवास्तमेति च," म्हणजे सूर्य उदयकालीं आणि अस्तकालीं एका महाराष्ट्र कवीनें

---

* [केसरी ता. २३ जानेवारी १९००]

म्हटल्याप्रमाणें, त्याजकडे पाहणारास सारखें 'रागदान' करीत असतो; पण त्याच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होण्यास मारवाडांतील ग्रीष्म काळची भरमध्यान्हींची स्थिति लक्षांत आणावी लागते. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचेंहि परीक्षण अशाच तऱ्हेनें करावयाचें आहे, व तें जितक्या निःपक्षपातबुद्धीनें व कृतज्ञतापूर्वक करावयास सांपडेल तितकें करण्याचा आमचा उद्देश आहे. केवळ त्यांचे दोष काढावे अशा बुद्धीनें हा लेख आम्ही लिहीत नाहीं. मग इतकेंहि करून आम्ही हातांत घेतलेल्या चाळणींत अखेरीस कांहीं नावडतेच खडे राहिल्यास त्याचा दोष आमचे वाचक आम्हाकडे न देता चाळणीकडे देतील अशी आम्हांस उमेद आहे. " विहिरींत असेल तर पोहऱ्यांत येणार " हा न्याय सर्वव्यापी आहे आणि आम्ही लॉर्ड साहेबांचे चित्र कितीहि चांगलें काढण्याचा प्रयत्न केला तरी तें अस्सलबरहुकूम काढावयाचे म्हटल्यास आम्हांस आपल्या कल्पनेची त्यांत कधींहि भर घालतां यावयाची नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांचे आमच्यावर अथवा दुसऱ्या कोणावर खासगी कितीहि उपकार असले तरी आज त्यांचें आम्हीं जें चित्र काढीत आहोंत तें मुंबई इलाख्याचे गव्हर्नर या नात्यानें होय हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे;आणि आम्हीं जो धंदा स्वीकारला आहे त्या धंद्यांतील कर्तव्य बजावणें असल्यास आम्हांस हें चित्र यथा–दर्शन–पद्धतीप्रमाणेंच काढलें पाहिजे. आमचा कोणासहि दुखावण्याचा इरादा नाहीं; फक्त आमचें कर्तव्य आम्हांस करावयाचें आहे, व तसें करीत असतां त्यामध्यें जर कोणाबद्दल कांहीं अप्रिय लिहिण्याचा प्रसंग आला तर त्यास आमचा नाइलाज आहे, असें समजून त्याबद्दल ते आम्हांस माफी करितील अशी आम्हांस आशा आहे.

आजच्या विषयास एवढी प्रस्तावना पुरी आहे. आतां लॉर्ड सँढहर्स्ट यांच्या कारकीर्दीच्या परीक्षणाकडे वळूं. सन १८९५च्या फेब्रुवारींत लॉर्ड सँढहर्स्ट यांनीं मुंबईलाख्याचीं राज्यसूत्रें जेव्हां आपले हातांत घेतलीं, त्यावेळीं त्यांच्याबद्दलचें लोकमत आणि हल्लींचें यांच्याबद्दलचें लोकमत यांमध्यें जमीन–अस्मानाचें अंतर आहे. त्यावेळीं लॉर्ड हॅरिस यांनीं आपली कारकीर्द कशी गाजविली याचा लोकांस पुरा अनुभव आलेला होता. वाद्यांचे नियम, हिंदुमुसलमानांतील ठिकठिकाणचे तंटे, " फेर लढा " याकरितां झालेली फौजदारी फिर्याद, दारूवाल्याच्या पुलावरील मारामारीप्रीत्यर्थ पुण्यावर जादा पोलीस बसविण्याकरितां चाललेली वाटाघाट, अलिबाग तालुक्यांतील वाढलेले सारे,प्रॉव्हिनशिअल सार्व्हिसच्या परीक्षेकरितां केलेले नियम, कौन्सिलच्या निवडणुकीचे हक्क देतांना मध्यभागास मिळालेल्या वाटाण्याच्या अक्षता, आणि नेटिव्ह वर्तमानपत्रें किंबहुना महाराष्ट्रांतील सर्व लोक यांस मिळालेलें व्यवहारशून्यत्वाचें सर्टिफिकीट; या सर्व गोष्टी लोकांच्या डोळ्यांपुढें ताज्या उभ्या होत्या. या सर्व गोष्टींत लॉर्ड हॅरिस यांनीं आपल्या स्वतंत्र विचाराचा खालील अधिकाऱ्यांच्या शिफारशीस आळा

घालावयाचा तो न घालतां, राज्यशकट हे अधिकारी जिकडे ओढतील तिकडे ओढूं दिल्यामुळें—व विशेषेंकरून लोकमतास मान देणारे लॉर्ड रे यांच्या मागूनच लॉर्ड हॅरिस यांची स्वारी येथें आल्यामुळें—हॅरिसशाही लोकांस फार अप्रिय झालेली होती; व त्यावेळीं हॅरिसभक्तांनीं आपल्या प्रियदेवतेचा उत्सव करण्याची जरी पुष्कळ खटपट केली होती, तरी अखेरीस लोकमतानें लॉर्ड हॅरिस यांची कारकीर्द स्तुतीस पात्र ठरली नाहीं ती नाहींच. परंतु हॅरीसशाहीच्या पांच-वर्षांच्या तडाक्यांतून निघून लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अमदानींत शीतळाई होईल अशी तेव्हां पुष्कळांची समजूत होती; आणि तशी समजूत होण्यासहि बरींच कारणें झालेलीं होतीं. प्रथमतः लॉर्ड सँडहर्स्ट यांची नेमणूक लिबरलपक्षाचे पुढारी मि. ग्लॅडस्टन यांचे हातून झालेली असल्यामुळें सदर पक्षाच्या उदात्त तत्वाचें कांहीं तरी वारें नवीन गव्हर्नरसाहेबांच्या अंगांत मुरत असेल असें पुष्कळांस वाटत होतें. त्यांतून लॉर्ड सँढर्स्ट यांनीं विलायतेहून निघते वेळीं नॉर्थ ब्रुक क्लबमध्यें जें भाषण केलें होतें त्यांत त्यांनीं असें सांगितलें होतें कीं, "आपण देशभर हिंडून लोकांचीं सुखदुःखें समजून घेण्यास आणि निःपक्षपातबुद्धीनें वागण्यास जेवढा होईल तेवढा उद्योग करूं." लॉर्ड सँढर्स्ट यांचे वडील आणि चुलते या दोघांनींहि हिंदुस्थानांत कामें केलीं होतीं व त्यांपैकीं एकानें तर केवळ आपल्या लोकप्रियतेवरच इंग्रजी राज्याचे एका बिकट प्रसंगीं एका जिल्ह्यांत चांगलें संरक्षण केलें होतें. सारांश, लॉर्ड सँढर्स्ट यांच्या मनाचा ओढा जात्याच प्रजापक्षाकडे अधिक आहे व ते आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दींत केवळ हॅरीसशाहीचें अनुकरण न करितां स्वतंत्रतेनें वागतील अशी बहुतेक सर्व लोकांस आशा होती. शिवाय त्यांच्या कारकीर्दीच्या आरंभींच ज्या एकदोन गोष्टी घडून आल्या त्यामुळें तर हा समज आणखी दृढ झाला. मुंबईच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष यांस नवीन वाढविलेल्या पोलीस खर्चाबद्दल लॉर्ड सँढर्स्ट यांनीं स्वतः लिहिलेलें पत्र, मध्यभागास दिलेला कायदेकौन्सिलचा निवडणुकीचा हक्क, पुण्यावर जादा पोलीस बसविण्याच्या वाटाघाटीस दिलेली रजा, आणि फर्ग्युसन कॉलेज उघडण्याच्या समारंभास मुद्दाम येथें येऊन केलेलें भाषण, वगैरे लक्षणांवरून लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द हारिसशाहीपेक्षां पुष्कळ सुखावह होईल असें वाटत होतें याविरुद्ध त्यावेळीं एकच काय तें भविष्य करण्यांत आलें होतें. ज्योतिर्मालेचे कर्ते यांनीं ज्योतिष्याच्या आधारावरून त्याचवेळीं असें वर्तविलें होतें कीं, लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द लोकांस आशा वाटत आहे त्याप्रमाणें सुखावह व्हावयाची नाहीं, रयतेवरील कराचें ओझें वाढेल, आणि अखेरीस मागलाच गव्हर्नर बरा असें म्हणण्याचीं पाळी येईल! कोणाचा फलज्योतिष्यावर भरवंसा असो वा नसो; परंतु रा. रा. चिटणीस

यांनीं वर्तविलेलें हें भविष्य अखेरीस अक्षरशः खरें घडून आलें हीं मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय हें कोणीहि कबूल करील.

लॉर्ड हॅरिस यांच्या कारकीर्दीत हिंदुमुसलमानांचे दंगे झाले होते, तर लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारर्दीत त्याहिपेक्षां भयंकर असे दुष्काळचे व प्लेगचे दंगे झाले, व त्यामुळें नुसत्या " फेर लढो " करतांच नव्हे तर त्याहिपेक्षां निरुपद्रवी लेखांकरितां तीन वर्तमानपत्रकर्त्यांस कैदेंत जावें लागलें. आणि सरदार नातूबंधूंचीहि त्याचप्रमाणें वाट लागली. लॉर्ड हॅरिस यांचा पुण्यावर नुसता प्युनिटिव बसविण्याचा विचार होता, पण लॉर्ड सँढर्स्ट यांनीं ती गोष्ट प्रत्यक्ष करून दाखविली. सारांश, ज्या ज्या बाबतींत म्हणून हॅरिसशाही लोकांस अप्रिय झालेली होती त्या सर्व बाबी लॉर्ड सँढहर्स्ट यांचे कारकीर्दींत अधिक जोरानें उदयास आल्या. लॉर्ड सँढहर्स्ट यांनीं कित्येक वेळां असे उद्गार काढले आहेत कीं, आपल्या कारकीर्दींत मुंबई इलाख्यावर जशीं दैविक संकटें कोसळलीं तशीं पूर्वी कधींहि कोणत्याहि गव्हर्नरच्या वांट्यास आलीं नसतील. लॉर्ड सँढहर्स्ट यांचे हे उद्गार अक्षरशः खरे आहेत; पण आम्हीं मागें लिहिल्याप्रमाणें लॉर्ड सँढहर्स्ट हे आजपर्यंत आलेल्या कोणत्याहि गव्हर्नरांपेक्षां आपल्या कामास अधिक अयोग्य नव्हते असें मात्र नाहीं. मुंबई इलाखा म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रजसरकारच्या राज्यांत विद्येनें, शहाणपणानें, आणि व्यापारानें पुढें आलेला प्रांत आहे, ही गोष्ट लॉर्ड सँढहर्स्ट यांस पूर्णपणें अवगत होती, असें त्यांच्या नार्थब्रुक क्लबमधील भाषणावरून सिद्ध होतें. अशा इलाख्यावर पांच वर्षें राज्यसत्ता चालवून —आणि तीहि ऐन आर्णाबाणीच्या वेळीं—लोकप्रियता संपादन करण्याची संधि फारच थोड्या लोकांस मिळण्यासारखी होती. खऱ्या राजकारणी पुरुषाची परीक्षा अशाच वेळीं होत असते; आणि तशी वेळ आली असतांहि जर लॉर्ड सँढर्स्ट यांच्याकडून लोकांस पसंत पडेल असें वर्तन घडलें नाहीं, तर त्याचा दोष प्रतिकूल वस्तुस्थितीकडे लावण्यापेक्षां लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कर्तृत्वशून्यतेकडेसच लावणें अधिक प्रशस्त आणि न्यायाचें होय, हें कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. " सुस्थे को वा न पंडितः " हें वाक्य नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ' प्रसंग कठीण, प्रसंग कठीण ' म्हणून ओरडत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. प्रसंग कठीण असेल तरच मनुष्याच्या अकलेची आणि हुषारीची परीक्षा होत असते. एरव्हीं बायकोच्या नथींतून तीर मारणारे अथवा उत्तराप्रमाणें प्रसंग येण्यापूर्वीच बडबड करणारे पुष्कळ गृहस्थ असतात. खऱ्या कसोटीची वेळ म्हणजे संकटें ही होय. अशीं संकटें या इलाख्यावर आलीं असतां अधिकाऱ्यांचें व लोकांचें अशीं दोन्ही प्रकारचीं म्हणणीं ऐकून घेऊन त्यांतून योग्यायोग्य निवड करण्याचें काम सुदैवानें लॉर्ड सँढर्स्ट यांजकडे आलेलें होतें. अशा वेळीं त्यांनीं आपल्या हुषारीनें आणि शहाणपणानें दोघांसहि जरबेंत ठेवून जर योग्य

मार्गाचा स्वीकार केला असता, तर त्यांच्या सौम्य स्वभावाचें चीज होऊन त्यांच्या कर्तृत्वशक्तीची लोकांनीं तारीफ केली असती. पण आमच्या दुर्दैवानें तसा प्रकार घडून आला नाहीं; इतकेंच नव्हे तर गेल्या पांचपंचवीस वर्षांत येथें जे गव्हर्नर आले त्यांपैकीं लॉर्ड सँढहर्स्टइतके आमच्या दृष्टीनें गव्हर्नरच्या कामास अयोग्य असे कोणीच गव्हर्नर आले नाहींत अशी म्हणण्याची आमच्यावर पाळी आली आहे, याचें फार दुःख वाटतें. कोणत्याहि इलाख्यांत आणि विशेषेंकरून मुंबईसारख्या इलाख्यांत एवढा मोठा पगार देऊन विलायतेहून मोठ्या कुळांतील माणसें गव्हर्नरच्या जागेवर महाराणीसरकार जीं धाडतात तीं कांहीं येथील लहान मोठ्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या सर्व गोष्टींस होस हो म्हणण्याकरितां नव्हे, असें आमचें फारा दिवसांचें मत आहे; व तें राजकीय दृष्ट्या बरोबर आहे अशीहि आमची पक्की समजूत झालेली आहे. गव्हर्नरसाहेबांनीं खालील अधिकाऱ्यांवर भरंवसा ठेवणें अगदीं जरूर आहे, पण भरंवसा ठेवणें म्हणजे ते जी गोष्ट सांगतील ती मुकाट्यानें कबूल करणें नव्हे. अधिकारीवर्ग नेहमीं प्रजेचें कल्याण करण्याकरितांच जन्मलेला आहे अथवा खटपट करीत असतो हीहि समजूत चुकीची आहे. प्रजेचें कल्याण करावें अशी अधिकाऱ्यांची इच्छा असेल, पण मी चीनचा बादशहा व्हावें अशी माझी इच्छा असल्यानें जसा मी बादशहा होऊं शकत नाहीं, तद्वतच या अधिकाऱ्यांच्या इच्छेची गोष्ट आहे. ते लोकांचे कल्याणाकरितां म्हणून ज्या गोष्टी करितात त्या नेहमीं लोकांच्या कल्याणाच्याच असतात असें नाहीं. अशा वेळीं प्रजेचें काय म्हणणें आहे हें ऐकून घेऊन गव्हर्नरसाहेबांनीं निःपक्षपातबुद्धीने निकाल देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. गव्हर्नरच्या जागेची मुख्य जबाबदारी हीच होय; आणि मुंबई-इलाख्यांतील प्रजेप्रमाणें जेथिल प्रजा विशेष चौकस आणि पुढें सरसावलेली असते तेथें तर ही जबाबदारी अधिक जोखमाची आणि महत्त्वाची असते. सँढर्स्ट यांच्या हातून ही जबाबदारी कितपत निभावली याचेंच मुख्यत्वेंकरून परीक्षण आपणास करावयाचें आहे. त्यांनीं मुंबईइलाख्यांत प्रथमतः पाऊल ठेवल्यापासून पहिल्या पांचसहा महिन्यांत ज्या कांहीं गोष्टी केल्या त्यांजवरून त्यांच्या कारकीर्दीचें धोरण हॅरिसशाहीपेक्षां निराळें होईल असें सकृद्दर्शनीं लोकांस वाटत होतें, हें वर सांगितलेंच आहे. हें धोरण पालटून लोकांचा लॉर्ड सँढर्स्ट यांजबद्दलचा अनुकूल ग्रह फिरण्यास केव्हां व कसा प्रारंभ झाला याचें विवेचन पुढें येईल. नेटिव्ह वर्तमानपत्रकर्ते किंवा नेटिव्ह मुत्सद्दी हे कोणीहि गव्हर्नर आला तरी त्यास शिव्या देण्यास नेहमींच तयार असतात, त्यांचें समाधान म्हणून कधीं होत नाहीं, असा त्यांजवर इंग्रजी पत्रकर्त्यांचा व अधिकारी वर्गाचा नेहमीं एक आक्षेप असतो. वर सांगितलेल्या हकीकतीवरून प्रकृतस्थलीं तरी हा आक्षेप लागू पडत नाहीं हें उघड दिसून येईल. लॉर्डसँढर्स्ट येथें येऊन दाखल झाल्या-

नंतर कित्येक महिनेपर्यंत त्यांच्याविरुद्ध वर्तमानपत्रांत किंवा अन्य ठिकाणीं कोणी एक अवाक्षर देखील उच्चारलेलें नव्हतें. उलट त्यांच्या हातून त्यांच्या पिढीजाद गुणामुळें व त्यांच्या सौम्य स्वभावामुळें आमचें कांहीं तरी कल्याण होईल अशी सर्वांस उमेद होती. पण लॉर्ड साहेबांच्या कृत्यानेंच पुढें ही उमेद हळू हळू नाहींशी होऊन सर्व देशास निराशेचें खग्रास ग्रहण लागलें. तें कसें, त्यांतील खरे राहू कोण होते, वगैरे हकिकत क्रमाक्रमानें पुढें येणार आहे. तूर्त एवढेंच सांगणें आहे कीं, लॉर्ड सँढर्स्ट यांजबद्दल जें लोकमत आहे तें त्यांज-विषयींचा पूर्वीपासूनच लोकांचा प्रतिकूल ग्रह असल्यामुळें नव्हे, तर लॉर्ड साहे-बांबद्दल लोकांचा पहिल्यानें अनुकूल ग्रह असून त्यांच्या कृत्यानें तो प्रतिकूल झालेला आहे. अर्थात् त्यांची जबाबदारी लोकांवर न टाकतां इलाख्याचे अधि-पति या नात्यानें लॉर्ड सँढर्स्ट यांजवर व त्यांचे साथीदार मंडळीवर टाकली पाहिजे.

❁ ❁ ❁

* लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द

नंबर २

गव्हर्नरसाहेबांवरची जबाबदारी

लॉर्ड सँढर्स्ट यांजबद्दल लोकमत पहिल्यानें अनुकूल असतां पुढें त्यांच्या कृतीनेंच तें कसें प्रतिकूल झालें, हें गेल्या अंकीं सांगितलेंच आहे. लॉर्ड सँढर्स्ट यांची कृति म्हणजे त्यांच्या कारकीर्दींत मुंबईसरकारची कृति असा आम्ही अर्थ करितों. कारण जरी मुंबईसरकारचीं सर्व कामें मुंबईचे गव्हर्नर हे स्वतः एकटे करीत नाहींत, तरी मुंबईइलाख्यांतील अधिकारीवर्गाचे नायक या नात्यानें सरकारच्या सर्व कृत्यांची बरी वाईट जबाबदारी गव्हर्नरसाहेबांच्याच शिरावर राहते, हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. शिवाय गेल्या पांच वर्षांत प्लेग आणि दुष्काळ अशा ज्या दोन महत्त्वाच्या बाबी उत्पन्न झाल्या त्यांपैकीं एकाची पूर्ण आणि दुसऱ्याची अंशतः तरी व्यवस्था लॉर्ड सँढर्स्ट यांच्या स्वतःच्या देखरेखीखालीं चालली होती, आणि त्यांच्या कारकीर्दींत लोकांस अप्रिय अशा ज्या दोन गोष्टी घडून आल्या त्या या दोन बाबतींतच होत. करितां गेल्या पांच वर्षांच्या मुंबई-सरकारच्या कृत्यांबद्दल केवळ औपचारिक रीतिनेंच नव्हे, तर प्रत्यक्ष म्हणूनहि इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांस त्याबद्दल जबाबदार धरणें गैरवाजवी होणार

---

* [केसरी ता. ३० जानेवारी १९००]

नाहीं. ' गव्हर्नरसाहेब ' आणि ' जबाबदार ' हा संबंध कित्येकांस अवघड वाटेल खरा, पण न्यायाच्या आणि कायद्याच्या दृष्टीनें तो अगदीं बरोबर आहे. गव्हर्नरसाहेब आम्हास जबाबदार आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. पण तेवढ्यानें त्यांजवरची जबाबदारी मात्र अजिबात नाहींशी होत नाहीं. हिंदुस्थानांतील राणीसरकारच्या अधिकाऱ्यांनीं येथील प्रजेवर कोणत्या प्रकारें राज्य करावें याचें घोरण खुद्द महाराणीसाहेबांनीं आपल्या जाहिरनाम्यांत आणि पार्लमेंट सभेनें अन्य प्रसंगीं ठरविलेलें आहें. या घोरणांस अनुसरून लॉर्ड सँढर्स्ट यांनीं राज्यकारभार चालविला कीं, नाहीं याचा निःपक्षपात रीतीनें विचार करणें हें प्रत्येक राजानिष्ठ मनुष्याचें कर्तव्य होय. कारण अशा विवेचनापासून राज्यकर्ते व प्रजा या दोघांसहि फायदा होण्याचा व राज्यकारभारांत सुधारणा होण्याचा संभव असतो. लॉर्ड सँढर्स्ट हे आज निघून जातील व पुढें या इलाख्यांतील लोकांशीं त्यांचा फारसा संबंधहि यावयाचा नाहीं हें खरें आहे. पण आम्हीं जें त्यांच्या कारकीर्दीचें परीक्षण करीत आहों तें त्यांच्याकरितां नव्हे, एकंदर राज्यपद्धतींत काय सुधारणा झाल्या पाहिजेत हें त्यांवरून सरकारास दाखविण्याकरितां होय. लोकमत काय आहे, राज्यकारभार कोणत्या रीतीनें चालविला असतां तो प्रजेस आवडेल, लोकांच्या इच्छा काय आहेत, आणि गव्हर्नरसाहेबांनीं काय केलें असतां त्या पूर्ण होण्याचा संभव आहे, याचा जर इलाख्यांतील मुख्य अधिकारी नेहमीं विचार करतील तर लॉर्ड हॅरिस व लॉर्ड सँढर्स्ट यांच्या हातून ज्या चुका घडल्या तशा त्यांच्या हातून न घडतां लोकांची प्रीति संपादून ते इंग्रजी राज्याचा पाया मजबूत करतील हें आम्हीं सांगावयास नको. कोणत्याहि गव्हर्नर साहेबांच्या कारकीर्दीचें परिक्षण करावयाचें तें याच हेतूनें होय; व तशाच दृष्टीनें हल्लींचें परीक्षण आम्हीं करीत आहों.

लॉर्ड सँढर्स्ट हे येथें आल्यानंतर त्यांनीं मुंबई म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष यांस जें पोलीसच्या खर्चासंबंधाचें पत्र लिहिलें त्यावरून, किंवा त्यांनीं पुण्यास व मुंबईस त्यावेळीं जीं भाषणें केली त्यावरून त्यावरून त्याजबद्दल लोकांचा ग्रह पहिल्यानें अनुकूल होता, हें वर सांगितलेंच आहे. हा अनुकूल ग्रह एक दोन गोष्टी खेरीजकरून १८९६ सालच्या दुष्काळास आरंभ होईपर्यंत कायम होता असें म्हटलें तरी चालेल. रायगडच्या उत्साहास लॉर्डसाहेबांनीं दिलेली परवानगी, मुंबईच्या कनिष्ट प्रतीच्या शिक्षणाच्या शाळांकरितां चांगल्या इमारती बांधण्याकरितां दिलेली अर्ध्या लाखाची मदत, आणि पुणें येथें झालेल्या एका भाषणांत येथील फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल यांचे मृत्यूसंबंधानें केलेला उल्लेख, हें सर्व लॉर्ड सँढर्स्ट यांच्या आस्थेवाईक व सौम्यस्वभावास अनुसरून असून त्यामुळें त्यांच्या कारकीर्दीचें घोरण चांगलें राहील अशी काहीं दिवस लोकांस आशा होती. या आशेला पहिला धक्का म्हटला म्हणजे प्रथम

महाबळेश्वरास जाऊन १८९५ चे जून महिन्यांत परत आल्यावर लॉर्ड सँढर्स्ट यांनीं येथिल सार्वजनिक सभेच्या मानपत्रास दिलेलें उत्तर हा होय नेहमींच्या वहिवाटीस अनुसरून सार्वजनिक सभेनें लोकांच्या कांहीं मागण्या अथवा दुःखें लॉर्डसाहेबांच्या कानावर जावंत म्हणून आपल्या मानपत्रांत गोवलीं होतीं. पण सदर मानपत्रास उत्तर देतांना लॉर्ड सँढर्स्ट यांनीं असें स्पष्ट सांगितलें कीं इलाख्यांतील अधिकाऱ्यांच्याविरूद्ध अशा प्रकारच्या सामान्य तक्रारी गव्हर्नर साहेबांकडे करणें अगदीं गैरवाजवी होय. अधिकाऱ्यांवर लोकांचा विश्वास पाहिजे व तो विश्वास उत्पन्न करण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. लॉर्ड सँढर्स्ट यांनीं या गोष्टिचा उल्लेख त्यावेळीं आपल्या उत्तरांत करण्याची फारशी जरूर नव्हती. असें असतांहि जेव्हां त्या भाषणांत वरील उल्लेख आला तेव्हांच लॉर्ड हॅरीस यांच्याप्रमाणें हेही गव्हर्नर हळूहळू अधिकाऱ्यांच्या ओंजळीनेंच पाणी पिण्यास लागणार अशी शंका येण्यास कारण झालें, व लॉर्ड साहेबांच्या पुढील क्रमामुळें ती शंका निराधार नव्हती असेंहि अखेरीस दिसून आलें. पुराव्याखेरीज लोकांनीं कोणतीहि गोष्ट सरकारापुढें मांडूं नये हें तत्व आह्मांस पूर्णपणें मान्य आहे. पण त्याबरोबरच सरकारनेंहि पुराव्याखेरीज केवळ कांहीं अधिकाऱ्यांच्या म्हणण्यावर नाना तऱ्हेचे कुतर्क मनांत आणून लोकांवर जुलूम करणें वाजवी नाहीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. लॉर्ड सँढर्स्ट यांची दृष्टि पाहिल्या तत्वाकडे जशी गेली तशीच जर ती दुसऱ्या तत्वाकडे वळली असती तर त्यांच्या कारकीर्दींत मुंबई सरकारच्या हातून जीं कांहीं अन्वन्वित कृत्यें घडलीं तीं खास घडून आलीं नसतीं. खालील अधिकाऱ्यांवर पूर्ण भरंवसा, लोकांचें हिताहित काय आहे हें लोकांपेक्षां त्यांसच अधिक चांगलें कळतें अशी पूर्ण समजूत आणि ते जें काय करतील त्यास संमति देणे एवढेंच गव्हर्नरसाहेबांचे कर्तव्य आहे अशा प्रकारची बुद्धि, या तिन गोष्टी लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द अप्रिय आणि अयशी होण्यास मुख्य कारणीभूत होत; आणि या तत्वांची छाया लॉर्ड सँढर्स्ट यांचे मनावर पडली असल्याचें दिग्दर्शन सार्वजनिक सभेच्या दिलेल्या मानपत्राच्या उत्तरावरून पहिल्यानें नजरेस आलें. अधिकारी वर्ग जें कांहीं करील त्यासच तुम्हीं मान द्या व त्यांतच तुमचें कल्याण आहे हेंच श्रम घेऊन लोकांस सांगत फिरण्याचा लॉर्ड सँढर्स्ट यांनीं क्रम स्वीकारला होता. हा क्रम त्यांच्या दृष्टीनें योग्य असेल, पण लोकांस तो तसा वाटला नाहीं व कधींहि वाटणें शक्य नाहीं. विशेषेंकरून मुंबईइलाख्यासारख्या चौकस प्रजेस तर नाहींच नाहीं हें आम्हीं सागावयास नको. लॉर्डसाहेबांचें वरील धोरण त्यांच्या अध्यक्षतेखालीं कायदेकौन्सिलांत सन १८९५ सालीं जो प्रकार घडून आला त्यावरूनहि दिसून आलें. कायदेकौन्सिल म्हणजे एक प्रकारची ' सर्कस ' आहे असें ऑ० मि० न्यूजंट यांनीं त्यावेळीं काढलेले उद्गार गव्हर्नरसाहेबांनीं त्यांचे विरुद्ध न बोलतां तसेंच जाऊं दिले.

असो; या बारीकसारीक गोष्टी आतां सांगत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचें धोरण काय आहे हें पुरतेपणीं समजून येण्याचा पुढें लवकर एक मोठा प्रसंग आला. हा प्रसंग म्हणजे सन १८९६ सालचा दुष्काळ होय. या दुष्कळाची व्यवस्था बरीच ऑ. मि. न्यूजंट व मि० मॉंटीथ यांचे ताब्यांत होती. तथापि लॉर्ड सँढर्स्ट यांनींही त्या कामीं बरेंच लक्ष पुरविलें होतें. परंतु या प्रश्नांची वाटाघाट करण्याची आम्हांस कांहीं जरूर नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचें जें परीक्षण करावयाचें तें सर्वच गोष्टी त्यांनीं स्वतः केल्या आहेत या नात्यानें नव्हे तर सर्व राज्यव्यवस्थेचे मुख्य अधिकारी म्हणून ते जबाबदार होते या नात्यानें होय, हें वर सांगितलेंच आहे. जो पुढारी झाला त्याजवर बरेंवाईटपणाचा दोष नेहमींच पडत असतो; व पुढारी म्हणून जर इतरांच्या उच्छृंखल वृत्तींचा अवरोध करण्याचा त्यास अधिकार असतो, तर यशापयशाचा बोजाहि विनाकारण त्याच्या माथीं पडतो असें म्हणतां यावयाचें नाहीं.

दुष्काळव्यवस्था

असो; आतां सरकारानें सन १८९६ सालीं दुष्काळची जी व्यवस्था केली त्याकडे वळूं. सन १८७६ च्या व १८९६ च्या दुष्काळांत मोठा फरक हा होता कीं, मागील अनुभवावरून दुष्काळच्या वेळीं काय काय व्यवस्था केली पाहिजे या गोष्टी सरकारानें नियम करून आतां ठरवून टाकल्या होत्या. फॅमिन कोड व फॅमिन फंड हे शब्द १८७६ सालीं लोकांस माहित नव्हते. परंतु सन १८७६ पासून १८९६ पर्यंत जो काळ गेला त्या अवधींत सरकारानें पुढचें धोरण लक्षांत आणून दुष्काळचे वेळीं काय काय व्यवस्था करावी लागते हें बहुतेक निश्चित करून टाकलें होतें; इतकेंच नव्हे तर अशा वेळीं पैशाची तूट पडूं नये म्हणून एक दुष्काळनिवारणार्थ फंड काढून दरसाल दीड कोट रुपये या कामाप्रीत्यर्थ निराळे ठेवण्याचा त्यांनीं संकल्प केला होता ! त्यामुळें सन १८९६ सालीं जेव्हां दुष्काळ आला तेव्हां अर्थात्च दुष्काळकोड आणि दुष्काळफंड यांचा अम्मल व व्यय अनुक्रमें कसा काय होतो हें पहाण्याकडे लोकांचे डोळे लागले. इंग्रज-सरकार पूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षां शहाणे व धूर्त आहेत हें लोकांस सांगण्याची कांहीं जरूर नव्हती. ते धूर्त आहेत म्हणूनच त्याचें राज्य हिंदुस्थानांत झालें, आणि दुष्काळासारख्या कठीण प्रसंगींहि काय काय व्यवस्था केली पाहिजे हें त्यानीं कायद्यांनीं आगाऊ ठरविलें हें सर्वत्रांस माहीत होतें. फॅमिन कोडाप्रमाणें सर्व व्यवस्था अमलांत येते कीं नाहीं हाच काय तो मुख्य प्रश्न होता; आणि यामुळेंच अधिकारीवर्ग आणि सार्वजनिक संस्था यांच्यामध्यें त्यावेळीं विरोध उत्पन्न होऊन वादास सुरवात झाली.

लोकाचे आणि सार्वजनिक सभेसारख्या संस्थांचें असें म्हणणें होतें कीं, फॅमिन कमिशन होऊन जर आतां दुष्काळच्या व्यवस्थेचे नियम ठरलेले आहेत

तर त्याप्रमाणें मुंबईसरकारनें सर्व व्यवस्था केली पाहिजे; किंबहूना फॅमिन फंड म्हणून जर एक सरकारनें या कामाकरितां स्वतंत्र कर घेऊन फंड केला आहे, तर त्या फंडांतून लागतील तितके पैसे खर्च करून फॅमिन कोडाप्रमाणें सर्व व्यवस्था करा असें सरकाराजवळ मागण्याचा प्रजेचा हक्क आहे. सरकारी अधिकाऱ्यांचें मत अर्थात्च याच्या उलट होतें. दुष्काळाप्रीत्यर्थ हिंदुस्थानसरकारकडून खर्चासाठीं जितके पैसे मिळतील तिततक्याच दुष्काळाचीं सर्व कामें संपविणें त्यांस जरूर होतें; मग त्याकरितां फॅमिन कोड बाजूला राहिलें तरी हरकत नाहीं. उदाहरणार्थ, एक दोन गोष्टीच घेतल्या म्हणजे पुरें आहे. चार आण्याहून कमी पीक आलें असलें म्हणजे साऱ्याची तहकुबी होईल असा सरकारचा ठराव होता; पण ज्या जिल्ह्याचें पीक सरासरीनें दोन आणेहि नव्हतें, त्यांतील बहुतेक सर्व सारा चोपून पहिल्याच हप्त्यास वसूल करण्यांत आला ! कोष्टी लोकांस धंद्याचीं कामें काढून दुष्काळांत मदत केलीच पाहिजे असा फॅमिन कोडांत पहिल्यानें नियम होता; पण हा नियम आपल्या गळ्यांत पडतो असें जेव्हां मुंबई सरकारास वाटलें तेव्हां त्यांनीं तो नियम फिरवून आणिला ! इतकेंच नव्हे तर सोलापूरचे व्यापारी पदरची झीज सोसून या कामीं सरकारास मदत करण्यास तयार असतांहि सरकारानें ती गोष्ट मान्य केली नाहीं ! ! यास आस्था किंवा दुराग्रह काय म्हणावयाचें त्याचा वाचकांनींच विचार करावा. सारांश, हिंदुस्थानसरकार देईल तेवढ्या पैशांत होईल तेवढी दुष्काळाचीं कामें करून पुनः तेवढ्यावरच दुष्काळाची उत्तम व्यवस्था केल्याचें श्रेय सरकारास मिळावयाचें होतें, आणि दुसऱ्या पक्षीं लोकांस फॅमिन कोडाप्रमाणें सर्व व्यवस्था व्हावयास पाहिजे होती. तेव्हां अर्थात्च दोन्ही पक्षांत विरोध उत्पन्न झाला, आणि सार्वजनिक सभा जेव्हां फॅमिन कोड लोकांस समजावून देण्याचा प्रयत्न करूं लागली तेव्हां तिचे प्रयत्न सरकारचे डोळ्यांत खुपूं लागले. लोकांस फॅमिन कोड समजावून देण्याचें वास्तविक पाहिलें तर सरकारचेंच काम होतें; पण त्यांनीं तें केलें नाहीं इतकेंच नव्हे, तर लोकांस दुसऱ्या कोणी तें समजावून दिलें तर तेंहि त्यांस खपलें नाहीं; कारण फॅमिन कोड समजल्यानें लोक त्याप्रमाणें आपले हक्क मागतील आणि त्यामुळें पुढें सरकारास अडचण पडेल ! फॅमिन कोड सरकारानें केलें खरें, पण तें फक्त महाराणी सरकारच्या अधिकाऱ्यांकरितां आहे, लोकांकरितां नव्हे, असाहि मध्यें एक बूट निघाला होता ! कसेंहि असो. सरकारचें या वेळचें वर्तन अगदीं दांडगेपणाचें आणि अन्यायाचें होतें. सार्वजनिक सभेनें नुसती सामान्य विधानें न करितां आपलें म्हणणें योग्य पुराव्यानें सिद्ध करावें असा ज्या लॉर्ड सँढर्स्टसाहेबांनीं सभेचें मानपत्र स्वीकारतांना तिला उपदेश केला होता, त्यांच्याच हातून सभेच्या साऱ्याच्या तहकुबीसंबंधानें केलेल्या मुद्देसूद अर्जास तुम्ही ' ही माहिती कोठून मिळविली ? ' अथवा ' तुम्हांस

ती कशी मिळाली ?' असे वेडेवांकडे प्रश्न होऊं लागले. माहिती खरी कां खोटी हें कोणीच पाहीना. होतां होतां इतक्या थरावर गोष्ट गेली कीं, फॅमिन कोड लोकांस समजावून देऊन त्यांस सरकाराजवळ कोडाप्रमाणें हक्क मागण्यास लावण्याचा जो उद्योग सभा करीत होती तो लासदायक म्हणून तो कसा तरी बंद करण्याचा सरकारानें निश्चय केला. प्रो. साठे यांजवर व डहाणू उंबरगांव येथील तीन गृहस्थांवर विनाकारण फौजदारी खटले करण्यांत आले; इतकेंच नव्हे तर अखेरीस कांहीं तरी निमित्त काढून राणीसरकारच्या प्रत्येक प्रजेस कायदेशीर रीतीनें जो जन्मतःच हक्क प्राप्त झाला आहे, तशा प्रकारचा सरकारास अर्ज करण्याचा सभेचा हक्क मुंबई सरकारानें एकदम काढून घेतल्याचा ठराव केला. हा ठराव करण्यास सभेच्या एका एजंटाकडून झालेल्या चुकीची सबब पुढें आणलेली आहे; पण खरा प्रकार व हेतु काय होता हें सभा व सरकार यांच्या दरम्यान झालेल्या पत्रव्यवहारावरून कोणासहि सहज कळून येण्यासारखें आहे. ही अरेरावी आणि दांडगाई लॉर्ड सँढर्स्ट यांच्या नांवानें आणि त्यांच्या कारकीर्दींत झाली आहे; आणि ती इतकी अन्यायाची व आडदांडपणाची आहे कीं, कोणाहि सुशिक्षित इंग्रजास त्याबद्दल लाज वाटली पाहिजे व वाटेलहि. पण लॉर्ड सँढर्स्ट हे खालील अधिकाऱ्यांच्या तंत्रानेंच चालत असल्यामुळें त्यांस सभेचा अर्ज करण्याचा हक्क काढून घेण्यासहि दिक्कत वाटली नाहीं; आणि तो कशाकरितां, तर सभा सरकारानें केलेलें फॅमिन कोड लोकांस समजावून देऊन कायद्याप्रमाणें आपला जीव बचाविण्याचा त्यांस मार्ग दाखावते म्हणून. फॅमिन कोड समजावून देण्याच्या मिषानें सारा न देण्यास रयतेस सभा उत्तेजन देतें असाहि सभेवर आरोप ठेविला होता; पण सरकार असा विचार करीना कीं, चार आणेहून कमी पीक आलें असतां सारा तहकूब करूं असें आम्ही म्हणतो काय, आणि दोन आणेहि पीक आलें नाहीं तेथें एकदम बहुतेक सर्व सारा वसूल करतों काय ! लॉर्ड सँढर्स्ट यांनीं दुष्काळांत पुष्कळ ठिकाणीं जाऊन तेथील कामें पाहण्याची मेहनत घेतली खरी; पण दुष्काळाची व्यवस्था ज्या नियमाप्रमाणें चालविण्याचें ठरलें होतें, ते नियम कितपत अमलांत येतात अथवा अमलांत न आल्यास ते कां येत नाहींत याबद्दल खालील अधिकाऱ्यांकडून त्यांनीं कधींहि जाब विचारिलेला निदान आम्हांस माहीत नाहीं. इतकेंच नव्हे तर नगरास चार्लससाहेबांसारख्या अनुभविक कलेक्टरानें ज्या सूचना केल्या होत्या त्याहि सरकारास नापसंत होऊन अखेरीस चार्लससाहेबांस कारवारास काळेपाण्यावर जावें लागलें. सारांश, सेक्रेटरीएटमध्यें दुष्काळाची जी व्यवस्था ठरेल तीच सर्वांनीं उत्तम म्हणून चालल पाहिजे, कोणीहि तिच्याविरुद्ध ब्र काढूं नये, इतकेंच नव्हे तर उलट सरकार जी कांहीं चतकोर भाकरी देईल तिच्याबद्दल सरकारचे टोपलीइतके सदैव आभार रयतेनें मानिले पाहिजेत असें लॉर्ड

सँढर्स्ट यांच्या दुष्काळव्यवस्थेचें धोरण होतें. हें धोरण ठरविण्यांत लॉर्ड सँढर्स्ट यांचा फारसा हात नसला तरी तें बंद करण्याची त्यांस कधींहि इच्छा झाली नाहीं, अथवा खालील अधिकाऱ्यांचीं कृत्यें नीट रीतीनें खोडून काढण्याइतकें त्यांच्या अंगीं धैर्य किंवा हुषारी नव्हती असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं. ऑ. मि. न्यूजंटसाहेबांसारखे कौन्सिलर आणि मि. माँटीथसारखे सेक्रेटरी यांच्या शहाणपणाचें कौतुक करण्यापलीकडे लॉर्ड सँडर्स्ट यांचीं कधीं मजल गेली नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, सरकारचे पैसे व्हावयाचे ते खर्च झालेच; पण लोकांस त्यापासून जितका फायदा व्हावयाचा तितका मात्र झाला नाहीं. हा परिणाम लॉर्ड सँढर्स्ट यांच्या दुराग्रहापेक्षां त्यांच्या कर्तृत्वशक्तीच्या उणेपणामुळें घडला, असें त्यांची ज्यास थोडीबहुत माहिती आहे त्यास तेव्हांच कळून येईल गव्हर्नर या नात्यानें त्यांच्या अंगीं जो दुर्गुण होता तो हाच होय. अनुभवाची सबब सांगून हाताखालच्या लोकांनीं वाटेल तें करावें आणि गव्हर्नरसाहेबांनीं मुकाट्यानें त्यास आपली समति द्यावी, एवढ्याकरितांच जर गव्हर्नराची नेमणूक असेल तर त्याकरितां दरमहा दहा हजार रुपये खर्चावयास नको आहेत. तें काम विलायतेहून तारायत्रानेंहि सहज करितां येईल. दुष्काळांत एक दोन ठिकाणीं दंगे होईपर्यंत स्वस्त धान्याचीं दुकानें काढिलीं नव्हतीं, आणि एका ठिकाणीं दंगा झाल्यावर तेथील कलेक्टर नेटिव्ह म्हणून त्यास विनाकारण प्रायश्चित्त भोगावें लागलें, हेंहि लॉर्ड सँढर्स्ट यांच्या केवळ अधिकाऱ्यांच्याच तंत्र्यानें वागण्याचें फल होय. सारांश दुष्काळच्या व्यवस्थेचें अथपासून इतिपर्संत जर अवलोकन केलें तर असें आढळून येईल कीं, सरकारास त्यावेळीं अधिकारी वर्गाखेरीज दुसऱ्या कोणाचेंहि म्हणणें, तें कितीहि मुद्देसूद असलें तरी ऐकावयास नको होतें. आम्हीं करूं तें करूं; आम्हांस तुम्ही कोण विचारणार; संभाळून रहा; फार गडबड केल्यास तुमच्यावर खटला करूं; तुम्हास तुरुंगांत टाकूं; अथवा तुमच्या अर्जाकडे ढुंकून न पाहण्याचा ठराव करूं. हाच काय तो दुष्काळाच्या कामीं खालील अधिकाऱ्यांनीं घालून दिलेला कित्ता लॉर्ड सँढर्स्ट यांनीं वळविला होता. हें वळण इतकें अयोग्य आणि अविचारीपणाचें होतें कीं, त्याबद्दल मि. मलबारीसारख्या गृहस्थानेंहि मुंबईसरकारास नांवें ठेविलीं आहेत, मग आम्हीं ठेविलीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. दुष्काळ संपतो न संपतो तों प्लेगनें डोकें वर काढलेंच होतें. या राक्षसाशीं झुंजण्याचे कामीं सेनाधिपत्य खुद्द लॉर्ड सँडर्स्ट यांनीं स्वीकारिलें होत. तथापि त्याची हकीगत दुष्काळापेक्षांहि अधिक अनान्वित आहे. पण आजचा लेख बराच लांबल्यामुळें तिचा विचार पुढील खेपेवर टाकणें भाग आहे.

◆ ◆ ◆

* लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द

नबर ३

दुष्काळव्यवस्था

दुष्काळच्या व्यवस्थेचें धोरण कोणत्या प्रकारचें होतें हें गेल्या खेपेस सांगितलें. ह्या दुष्काळांत उपासमर होऊन कोणीहि मनुष्य मेला नाहीं अशी एक प्रकारची सरकारची बढाई सांगण्यांत येत असते. ही बढाई कितपत खरी आहे हें दक्षिण महाराष्ट्रांतील लोकांस तरी आम्हीं सांगावयास नको. दुष्काळचे वेळीं नेहमींपेक्षा मृत्युसंख्या जी जास्त वाढली असते, ह्याचें सूक्ष्म रीतीनें कोणी अवलोकन केलें असतां, दुष्काळामुळें कोणी मेला नाहीं ही एक बोलण्याची पद्धड आहे, त्यांत तथ्यांश कांहीं नसतो, असें कोणाच्याहि लक्षांत येईल. " कोणीहि मनुष्य ताप, खोकला, पडसें, उदर, प्लेग, वगैरे रोगांनीं मरत नाहीं; मरण्याचें कारण काय तें एक 'त्रिदोष' आहे, मेल्याचा दोष प्लेग आदिकरून रोगांकडे नाहीं." असें जर कोणी वैद्यानें उद्यां म्हटलें तर तें जितकें खरें व खोटें होईल तितकी सरकारतर्फेची वरील बढाई खरी व खोटी आहे. निव्वळ उपासमार होऊन खारकेसारखा वाळून कोणीहि मरत नाहीं; त्यास योग्य अन्न कांहीं दिवस न मिळेल तर कांहींना कांहींवरी व्याधि जडतातच, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाय वर्तमानपत्रांतून तरी निदान कांहीं उपासमरीनें मेलेल्याचीं उदाहरणें प्रसिद्ध झालीं होतीं, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. जमिनीचा सारा, घरचीं भांडींकुंडीं विकून दिल्याचीं निदान कुलाबा जिल्ह्यांतील तरी उदाहरणें सरकारी अधिकाऱ्यांच्या कानांवर घालण्यांत आलीं होतीं; पण तिकडेहि सरकारनें लक्ष दिलें नाहीं. सारांश, फॅमिन कोड कांहींहि म्हणो, आम्हीं देऊं तेवढ्यांत प्रजेनें संतुष्ट असलें पाहिजे; इतकच नव्हे तर न केलेल्या गोष्टीबद्दल तक्रार न करितां अधिकारी देतील तें घेऊन त्याबद्दल सकाळ संध्याकाळ ईश्वरापाशीं त्यांच्या आयुष्याभिवृद्धयर्थ प्रार्थना केली पाहिजे; आम्ही कायदे केले असल्यास ते आमच्याकरितां आहेत, रयतेस कोणत्याहि प्रकारचा त्यामुळें हक्क प्राप्त होत नाहीं, आणि रयत इतक्या-उप्पर तक्रार करील, किंवा त्यांस ओरड करण्यास कोणी सांगेल तर, रयत किंवा त्यांचे उपदेशक बंडखोर समजून, सरकार त्यांस शिक्षा देईल, हेंच काय तें लॉर्ड सँढर्स्ट साहेबांच्या दुष्काळच्या व्यवस्थेचें मुख्य जुलमी धोरण होतें. सरकार कांहींहि म्हणो, १८९६।९७ च्या दुष्काळांत पुष्कळ माणसें जर बळीं पडलीं नसलीं,

---

* [केसरी ता. ६ फेब्रुवारी १९००]

तर त्याचें श्रेय निदान कांहीं अंशीं तरी सार्वजनिक सभेसारख्या संस्था, कीं ज्यांनीं दुष्काळ-कोंड लोकांना समजावून देऊन त्यांस आत्मसंरक्षणाचा कायदेशीर मार्ग दाखविला; त्यांस दिलें पाहिजे. सरकारास त्यापासून कांहीं अंशीं त्रास झाला असेल, नाहीं असें नाहीं; पण त्यामुळें लोकांचा बचाव अधिक चांगला झाला, निदान दुष्काळची व्यवस्था म्हणजे काय व तिचा फायदा कसा करून घ्यावा, हें त्यांच्या लक्षांत आलें हें निर्विवाद आहे. मुंबईइलाख्याचीं राज्यसूत्रें लॉर्ड रे सारख्याच्या हातीं असतीं तर त्यांनीं या संस्थांनीं केलेल्या मदतीबद्दल त्यांचें अभिनंदन केलें असतें. लॉर्ड सँढर्स्ट यांनीं त्यांस थप्पड दिली आणि सरकारी अधिकाऱ्यांची बाजू संभाळली, हाच काय तो त्यांच्या राजनीतींतला सरकारी अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें गुण व आमच्या दृष्टीनें अवगुण आहे. प्लेगच्या व्यवस्थेत हाच अवगुण जास्त ठळक रीतीनें लोकांचे नजरेस आला; व त्यापासून होणारे अनिष्ट परिणामहि त्यांस अनेक रीतीनें भोगावे लागले. प्लेगची व्यवस्था खुद्द लॉर्ड सँढर्स्ट यांच्या ताब्यांत होती, करितां त्याची सर्व जबाबदारी त्यांच्याच शिरावर आहे हेंहि येथें पहिल्यानें सांगितलें म्हणजे बरें.

प्लेग व्यवस्था

प्लेगचा रोग आमच्या देशांत निदान गेल्या शेंदीडशें वर्षांत तरी आल्याचें कोणासही माहीत नाहीं. असा अद्भुतपूर्व आणि भयंकर सांथीचा रोग कोणत्याहि देशांत उद्भवला असतां तेथील सरकारनें त्याच्या प्रतिबंधार्थ होईल तेवढे प्रयत्न करणें हें त्या सरकारचें कर्तव्यकर्म आहे, ही गोष्ट आम्हांस पूर्णपणं मान्य आहे. इतकेंच नव्हे तर कोणत्याहि देशांतील सरकार याप्रमाणें व्यवस्था न करील तर लौकिकदृष्ट्या आणि देवाच्या घरींहि तें दोषास पात्र होईल असें आम्ही समजतों. तेव्हां मुंबईसरकारानें हा रोग हटविण्याकरितां प्रयत्न करण्यास जी सुरुवात केली, त्याबद्दल आम्हींहि त्यांची तारीफच केलेली आहे; परंतु या बाबतींत जरी त्यांचें व आमचें मतैक्य आहे तरी पुढें जो प्रकार झाला तो आमच्या मतें अगदीं अविचारीपणाचा व जुलमाचा झाला; किंबहुना लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कर्तृत्वशून्यतेची आणि परावलंबनाची या कामीं कमाल होऊन त्यामुळें लोकांस अतिशय त्रास सोसावा लागला असें मोठ्या दुःखानें प्रसिद्धपणें दोन तीन वर्षांच्या अनुभवावरून येथें नमूद करणें जरूर आहे. लॉर्ड सँढर्स्ट यांची लोकांचें बरें करण्याची इच्छा जितकी उत्कट होती, तितकीच जर त्यांची खालील अधिकाऱ्यांवर दाब ठेवण्याची शैली किंवा सदर अधिकाऱ्यांनीं सुचविलेल्या उपायांपैकीं योग्यायोग्य निवड करण्याची हुषारी व कर्तबगारी चांगली असती, तर लॉर्डसाहेब हजारो नाहीं तर लाखों लोकांचा दुवा घेऊन आज स्वदेशास परत गेले असते. पण " यदभावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा " अशी जी म्हण आहे त्याप्रमाणे लॉर्ड सँढर्स्ट यांच्या वांट्यास, लोककल्याण करण्याची त्याची

बुद्धि असतांहि, जें अपयश यावयाचें तें कोठून चुकणार ? प्लेगव्यवस्था पहिल्यानें जी सुरू केली ती धडक हाँगकाँगच्या नमुन्यावर झाली; पण कोणी असा विचार केला नाहीं कीं, हाँगकाँग येथें तिच्यापासून कितीसा फायदा झाला होता. प्लेग म्हणजे काय बिशाद आहे, हं हं म्हणतां त्यास हांकलून देऊं, अशा जोरानें व उमेदीनें सरकारी अधिकारी, इंग्रजी मेडिकल ऑफिसर, आणि लष्करी गोरे शिपाई तयार झाले. नेटिव्ह लोक स्वभावतःच गरीब आणि ईश्वरावर भरंवसा ठेवून चालत असल्यामुळें त्यांस प्लेग अधिकाऱ्यांचा हा राक्षसी आवेश अर्थातच पोकळ बढाईचा व निरर्थक वाटला; व नेटिव्ह लोकांच्या पुष्कळ पुढाऱ्यांनीं आणि वर्तमानपत्रकारांनीं हा असला लष्करी आवेश रोग हटाविण्याचें कामीं निरुपयोगी होईल, इतकेंच नव्हें त्यापासून लोकांस अश्रुतपूर्व त्रास होऊन त्यांजवर अनन्वित जुलूम होईल, हेंहि सरकारास नम्रपणें कळाविलें. पण कोणत्या स्थितींत कोणते उपाय कितपत साध्य आहेत, अथवा एखादा उपाय शास्त्रीय असला तरी लौकिक दृष्ट्या तो ग्राह्य व सह्य होण्यास त्याची योजना कोणत्या प्रकारें केली पाहिजे, हें लोकांच्या पुढाऱ्यांचें मत घेऊन शांतपणें ठरविण्याची लॉर्ड सँढर्स्ट यांचें अंगांत (लोकांनीं त्यांस विनंति केली असतांहि) इच्छा, धमक अगर हुषारी नसल्यामुळें, व अधिकाऱ्यांवर योग्य दाब ठेवण्यास जी कांहीं तरतरी अथवा खुबी लागते ती त्यांच्या अंगांत नसल्यामुळें पुण्यासारख्या शहरांतील लाखों लोकांचे गृहसौख्याचें अधिकारी वर्गांकडून मातेरें झालें. युरोपांत प्लेग गेला तेव्हां ओपोर्टो येथें प्लेग हटविण्याचे लष्करी उपाय व्यर्थ आहेत अशी लोकांची लवकरच खात्री झाली. पण आमच्या देशांतील परक्या अधिकारी वर्गाची तशी खातरी होण्यास आत्महत्या, खून, व दंगे होऊन दोन वर्षेंपर्यंत बरीच धामधूम व्हावी लागली. लोकांचीं घरें स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था सरकारानें ठेवण्याचें मनांत आणिलें असतें तरी ती व्यवस्था नेटिव्ह अम्मलदारांकडून अगर म्युनिसिपालिट्यांकडून ठेवतां आली असती ! त्याकरितां दांडगे सोल्जर लोक नेटिव्हांच्या घरातून घालण्याची कांहीं जरूर नव्हती. इतकेंच नव्हे तर यापासून लोकांस अतिशय त्रास होऊन प्लेगपेक्षां या व्यवस्थेनेंच ते जास्त भंडावून जातील ही गोष्टहि सरकारच्या कानावर गेलेली होती. फार लांब कशाला, मुंबई-सरकारनें पहिल्यानेंच सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडे जो रिपोर्ट केला होता, त्यांत प्लेगची कडक व्यवस्था अमलांत आली असतां लोकांमध्यें अस्वस्थता उत्पन्न होऊन दंगे होतील असें स्पष्ट लिहिलें होतें; पण वरून हुकूम आल्यामुळें म्हणा अथवा खालील अधिकाऱ्यांचा विशेष आग्रह पडल्यामुळें म्हणा, लॉर्ड सँढर्स्ट यांचा सारासार विचार नाहींसा होऊन सोल्जरमार्फत प्लेगच्या व्यवस्थेची कडक अंमलबजावणी पहिल्यानें पुणें येथें सुरवात करण्यांत आली ! हें काम लोककल्याणाचें आहे असें सांगून लोकांच्या पुढाऱ्यांची त्या कामीं मदत घेण्याची युक्ति लॉर्ड सँढर्स्ट यांनीं

पहिल्यापासून काढली होती; परंतु लोकांच्या पुढाऱ्यांस पहिल्या सालीं ज्याप्रमाणें वागविण्यांत आलें त्यावरून या पुढाऱ्यांची योग्यता सोल्जरापेक्षां कमी आहे, त्यांस प्लेगव्यवस्थेंत कमी जास्ती करा म्हणण्याचा हक्क नाहीं, अधिकारी करतील तेंच घगेबर आहे असें लोकांस समजून देणें एवढेंच त्यांचें काम आहे, अशा प्रकारची प्लेग अधिकाऱ्यांची त्यांच्याबद्दल समजूत झालेली दिसून आली. सारांश, लॉर्ड सँढर्स्ट हे नेटिव्ह लोकाच्या पुढाऱ्यांशीं गोड गोड बोलत होते तरी सिन्नर-मुंबईचे दंगे होईपर्यंत या पुढाऱ्यांचें म्हणणें कांहीं विचार करण्यासारखें आहे असें त्यांस कधींहि वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे तर

ज्युबिलीच्या रात्रीचे खून

झाल्यानंतर त्यांत पुण्यांतील कांहीं पुढाऱ्यांचें अंग असावें असाहि अधिकारी वर्गाच्या अभिप्रायानें किंवा अन्य तऱ्हेनें त्यांच्या मनांत बळकट खोटा संशय आला, आणि त्या संशयास योग्य आधार आहे कीं नाहीं याबद्दल पुराव्याची वाट न पाहतां अथवा चौकशी न करतां, एकदम त्यांनीं पुण्यांतील लोकांस सरकारच्या सर्व अधिकाराचा व सत्तेचा उपयोग करून त्राहि त्राहि करून सोडण्याचा संकल्प केला. पुण्याचे कलेक्टर मि० ल्यांब यांनीं त्यावेळीं येथील पुढाऱ्यांस उद्देशून केलेलें भाषण अद्याप लोकांच्या लक्षांत असेलच. त्यानंतर लागलींच सन १८२७ सालापासून कपाटांत धूळ खात पडलेला कायदा हुडकून काढून विनाकारण निरपराधी नातुबंधूंस कैदेंत पाठविलें; पोलिस अॅक्टाच्या कलमाचा नसता उपयोग करून पुण्यावर जादा पोलिस बसविलें; आणि वर्तमानपत्रांच्या ज्या लेखांचा खुनाशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, जवळचा अगर दूरचा कोणताच कधींहि संबंध यावयाचा नाहीं ते लेख हुडकून काढून सदर पत्रकर्त्यांस तुरुंगांत टाकलें ! गोऱ्या अधिकाऱ्याच्या खुनाबद्दल खुनी लोकांचा चांगला समाचार घेतला पाहिजे ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे. पण एक खून झाल्याबरोबर माथें फिरून जाऊन अन्वित कृत्यें करण्यास प्रवृत्त होणारे मुत्सद्दी इलाखाधिपतीसारख्या जबाबदारीचे जाग्यास कितपत लायक आहेत याचा आम्हांस वानवाच आहे; किंबहुना हा मुत्सद्दीपणा तरी कोणता हें आम्हांस समजत नाहीं. बऱ्याच सरकारी अधिकाऱ्यांच्या अथवा सामान्य अँग्लो–इंडियन लोकांच्या डोळ्यांत खुपणाऱ्या पुण्यांतील कांहीं पुढाऱ्यांचा पाणउतारा करण्याचीहि त्यांस उत्कृष्ट संधि मिळाली होती. सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वैर वर्तनाविरुद्ध निर्भीड व स्पष्ट टीका करणें आणि खून करण्यास उत्तेजन देणें या दोन गोष्टींमध्ये फारसें अंतर नाहीं अशी या शहाण्या पण अधिकारमदानें वेडावलेल्या लोकाची समजूत झालेली असते, व या समजुतीस कित्येकदां आमच्यापैकींहि कांहीं प्रोत्साहन देणारे भेटतात. परंतु इलाख्याचीं सर्व राज्यसूत्रे ज्यांच्या हातांत आहेत त्यांनीं जो अखेर निकाल

द्यावयाचा तो वर सांगितल्याप्रमाणें वेडावलेल्या केवळ एका पक्षाच्याच मतावर भिस्त न ठेवतां सारासार विचार करून दिला पाहिजे; आणि तो सारासार विचार संकटांत भांबावून न जातां जो करील तोच खरा मुत्सद्दी होय आमचे राज्यकर्ते परकीय असल्यामळें त्यांच्ीं मनें आमच्यांतील पुढारी गृहस्थांबद्दलहि थोडीबहुत साशंक असतात ही गोष्ट अम्हीं समजून आहों पण आमची अशी समजून होती कीं, सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर निर्भींडपणें टीका करणारे कोण आणि खून करणारे कोण याचा भेद सामान्य इंग्रजास न कळला तरी इलाख्याचे गव्हर्नर आणि त्यांचे कौन्सिलर यांसारख्या मोठ्या अधिकाऱ्यांस तरी निदान त्याबद्दल शंका असणार नाहीं. पण लॉर्ड सँढर्स्ट यांनीं आमचा हा भ्रम दूर केला. पुण्यावर अशा प्रकारचा प्रसंग पहिल्यानेंच आला असें नाही. सन १८७९ सालीं बुधवारचा वाडा जळाला तेव्हां पुण्यांतील पुढारी लोकांबद्दल अशाच प्रकारचा संशय अँग्लो–इंडियन पत्रकारांस आला होता. परंतु त्यावेळचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल हे कडक खरे पण स्वतः शहाणे असल्यामुळे त्यांच्या हातून १८९७ सालासारखा अनन्वित प्रकार घडून आला नाहीं, "मळमळीत सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य बरें" असं म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. लॉर्ड सँढर्स्ट याच्या कारकीर्दीपासून आम्हांस जर कांहीं धडा मिळाला असला तर तो हाच होय.

कडक प्लेगव्यवस्था

अंमलांत आल्यामुळें लोकांस जीं दुःखे सोसावीं लागलीं त्याचें वर्णन करण्याची कांहीं जरूरी नाहीं. मुंबईचा दंगा झाल्यानंतर "लोकांच्या सहनशीलतेवर वाजवीपेक्षां फाजील ओझें टाकितां येत नाहीं," ही गोष्ट खुद्द सरकारनें कबूल केली आहे; इतकेंच नव्हे तर "वाजवीपेक्षां प्लेगव्यवस्थेचे नियम फाजील कडक झाल्यामुळें अशिक्षित आणि माथेफिरू लोक बेकायदेशीर कृत्यें करण्यास प्रवृत्त होतात" हेंहि मुंबईच्या दंग्यासंबंधानें सरकारानें काढलेल्या ठरावांत स्पष्टपणें कबूल केलें आहे. नेटिव्ह लोकांचे पुढारी व त्यांचीं प्रमुख वर्तमानपत्रें तर्ी हीच गोष्ट लॉर्ड सँढर्स्टसाहेबांचे कानावर पहिल्यापासून घालीत होतीं; व त्यांच्या म्हणण्याचा वेळींच जर त्यांजवर भरंवसा ठेवून लॉर्ड सँढर्स्ट यांनीं योग्य विचार केला असता तर मुंबई इलाख्यांतील लोकांस त्यांच्या कारकीर्दीत ज्या दुर्धर यातना भोगाव्या लागल्या त्या न लागतां त्यांच्या पदरींहि आज जो अपेशाचा वांटा आला आहे तो आला नसता. प्लेगव्यवस्थेमुळें लोकांस त्रास झाला नाहीं किंवा गोऱ्या सोल्जरांकडून पुष्कळदां लोकांचा उपमर्द किंवा आगळिक झाली नाहीं हें म्हणणें अगदीं निराधार व चुकीचें आहे. त्याबद्दल अद्यापहि सरकारी दप्तरांतून पाहिजेल तेवढा पुरावा मिळेल; पण प्रो. गोखले यांची एक चुकी सांपडल्यामुळें या सर्व प्रकारावर पांघरूण घालण्याची व डेक्कन सभेनें केलेल्या अर्जासहि फेटाळण्याची

मुंबईसरकारास संधि सांपडून तिचा त्यांनीं पूर्णपणें फायदा करून घेतला. तथापि खऱ्यात कांहीं मरण नाहीं व कालांतरानें कां होईना, पण खऱ्याची परीक्षा झाल्याखेरीज रहात नाहीं या न्यायानें प्लेगची कडक व्यवस्था निरुपयोगी होती व प्लेग समूळ नाहींसा करण्याचा लष्करी अमलदारांचा आवेश वृथा होता हें आतां सर्वांस कबूल करावें लागत आहे. अधिकाऱ्यांचें मत आणि लोकमत यांचा मेळ घालण्याइतकें कौशल्य जर लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अंगीं पहिल्यापासूनच असतें, तर असल्या घोड्याएवढ्या चुका त्यांच्या हातून घडल्या नसत्या. राजद्रोहाचा कायदा पिनलकोड व क्रिमिनल कोडमधील सुधारणा वगैरे गेल्या दोनतीन वर्षांत हिंदुस्थानसरकारकडून लोकमतास प्रतिकूल अशा ज्या गोष्टी घडून आल्या आहेत त्यांस लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अविचारीपणामुळें जरी पुष्कळ मदत झाली, तरी त्या केवळ या इलाख्याच्याच राज्यकारभारास अनुलक्षून नसल्यामुळें त्याचा आम्हीं येथें विचार करीत नाहीं. एवढेंच सांगणें पुरें आहे कीं, आमच्या इलाख्यांत जें

राजद्रोहाचें खूळ.

माजलें होतें, त्याचें कारण सरकाची निष्कारण संशयी वृत्ति आणि अविचारीपणा हींच होत. कडक प्लेगव्यवस्थेमुळें माथेफिरू लोक त्रासून जाऊन दंगे अथवा खून करण्यास प्रवृत्त होतात ही गोष्ट मान्य केली असतां त्याचा दोष सरकाराकडेच येतो, हें जाणून पुण्यांतील खुनाचा संबंध वर्तमानपत्रांशीं किंवा नातूबंधूंशीं जोडण्याची अविचारीपणास वश होऊन सरकाराने होईल तितकी खटपट केली; इतकेंच नव्हे तर आपल्या सत्तेचाहि दुरुपयोग केला असें म्हटल्यावांचून आमच्याने राहवत नाहीं. पण पुणें सिन्नर, कलकत्ता, पंजाब, म्हैसूर वगैरे साऱ्याच ठिकाणीं जेव्हां पुणें–मुंबईप्रमाणेंच प्रकार होऊं लागले तेव्हां सरकार थोडथोडें ताळ्यावर येऊं लागलें. तथापि सरकार तें सरकारच. तें ताळ्यावर आलें तरी नातूबंधूंस एकदां जें अविचारानें त्यांनीं प्रतिबंधांत ठेविलें तेथून त्यांची सुटका परवांपर्यंत त्यांच्यानें करवली नाहीं. "क्रोधाद्भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः । स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ॥" अशी जी भगवद्गीतेत नाशोत्पादक पापकर्माची परंपरा सांगितली आहे ती आणि पुण्यांतील खून झाल्यानंतर रागानें संतप्त झालेल्या मुंबईसरकारची कृति यांजमध्यें इतकें साम्य आहे कीं, या एकंदर प्रकरणाचा विचार केला असतां वरील व्यासोक्तीची कोणासहि आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. प्लेगव्यवस्था म्युनिसिपालिट्यांकडून काढून घेऊन पुन्हां खर्चाचा बराच भाग त्यांस देण्यास लावणें, सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तनच अविचारपणाचें असतां लोकमताकडे दुर्लक्ष करून त्यांचा तिरस्कार करणें, आणि त्याबरोबरच लोकांवर जुलूम करण्याकरितां लोकांच्या पुढाऱ्यांची मदत मागणें, या सर्व गोष्टी बुद्धिभ्रंशाखेरीज संभवत नाहत. ही आसुरी संपत्ति लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीत अतिशयच बोकाळली होती.

गेल्या वर्ष दीड वर्षांत तीस कांहीं थोडासा आळा पडला आहे. पण अद्यापहि तिच्या पूर्वस्वरूपाचे परिणाम प्रेसकमिट्या, फाजिल डिटेक्टिव्ह, पोलिस वगैरे बाबतींत लोकांस त्रास सोसावे लागत आहेत; इतकेच नव्हे तर सरकारी अधिकाऱ्यांचे अभिप्राय लोकांचे हिताचे पुष्कळ वेळां नसतात असा प्लेगच्या बाबतींतच प्रत्यक्ष अनुभव आला असतांहि बेळगांव-धारवाडाकडे 'खुषीची सक्ती' आणि 'सक्तीची खुषी' करून इनॉक्युलेशनसंबंधानें कॅपेलशाही लॉर्ड सँढर्स्ट यांच्या संमतीनें अद्याप चालू आहे. सारांश, अधिकाऱ्यांच्या तंत्रानें वागणें हेंच काय तें लॉर्ड सँढर्स्ट यांच्या मतें गव्हर्नरसाहेबांचें कर्तव्य असें ठरून गेलें आहे. मुंबई इलाख्यांतील प्रजा विद्येनें व व्यापारानें पुढें सरसावली आहे, ही गोष्ट त्यांस अवगत आहे; पण अशा प्रजेच्या पुढाऱ्यांचें स्वतंत्र मत जमेंत धरून आपल्या बुद्धीनें त्यांतील व अधिकाऱ्यांच्या मतांतील सारासार निवडण्याचें सामर्थ्य अथवा इच्छा त्यांच्या अंगांत नसल्यामुळें बैलावर गाडी सोंपवून बैल चकारीनें चालतील अशा समजुतीनें कित्येक गाफील किंवा अडाणी गाडीवाले जसे खड्डयांत पडतात तशी लॉर्ड सँढर्स्ट यांच्या राज्यकारभाराची स्थिति झाली आहे; व ती प्लेगच्या व्यवस्थेंत जितकी आढळून येते तितकी दुसऱ्या कोठेंहि आढळून यावयाची नाहीं. याबद्दल जास्त विस्तार करीत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. वेळोवेळीं यासंबंधानें जें काय लिहावयाचें तें आम्हीं लिहिलेंच आहे. सिन्नर—मुंबईच्या दंग्यानंतर व्हालंटिअर लोकांस हातांत धरून त्यांच्याद्वारें प्लेगनियमाचा अंमल करण्याची पद्धत सुरू झाली आहे खरी; पण व्हालंटिअरांची गव्हर्नरसाहेबांनीं कितीहि स्तुति केली, तरी त्यांच्या हातीं लोकांस सुख देण्याचा काडीइतकाहि अधिकार नसतो हें त्यांच्याहि लक्षांत नाहीं असें नाहीं. सरकारच्याच प्लेगव्यवस्थेचें घोरण मुंबईच्या दंग्यानंतर पालटलें असल्यामुळें, पहिल्या सालच्या व्हालंटिअरांप्रमाणें हल्लींच्या व्हालंटिअरांचा फारसा अपमान होण्याची पाळी येत नसेल; पण ह्यांस कामापुरतें हातांत धरण्यापलीकडे सरकारचा जास्त कांहीं हेतु नाहीं असें जें आम्हीं वर म्हटलें आहे त्यास त्यांच्या हल्लींच्या स्थितीमुळें कांहीं बाध येत नाहीं. प्लेग—रावबहादुरी मिळण्यास व्हालंटिअरानें आपलें मत सरकारी अधिकाऱ्यांच्या मताविरुद्ध कधींहि जोरानें व निर्भिडपणें प्रतिपादन करितां कामा नये, हें तत्त्व पहिल्यानें जितकें अमलांत होतें तितकेंच आतां अमलांत आहे. प्लेगव्यवस्थेंत जर कांहीं मवाळपणा आला असला तर त्याचें कारण निदान नेटिव्ह लोकांच्या पुढाऱ्यांवरील सरकारचा विश्वास नव्हे, एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. पुण्याचे खून झाल्यानंतर येथें जे अनन्वित प्रकार घडून आले त्यासंबंधानें सरतेशेवटीं आणखी एक गोष्ट सांगणें जरूर आहे. ती ही कीं, या सर्वांस जिल्ह्याच्या किंवा भागाच्या अधिकाऱ्यांची कधींहि पूर्ण संमति नव्हती. हें सर्व

कड्याळ वरच्यावर शिजून तयार झालें, आणि असें असल्यास त्याचा दोषहि वरच्यावर वरच्याच अधिकाऱ्यांकडे येतो हें सांगावयास नको.

❖ ❖ ❖

* लॉर्ड सँढर्स्ट याची कारकीर्द

नंबर ४

किरकोळ खातीं, गोष्टी व उपसंहार

लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीत दुष्काळच्या व प्लेगच्या व्यवस्थेचें धोरण कोणत्या प्रकारचें होते याचें विवेचन गेल्या दोन अंकीं केलेंच आहे. पण एकदां डोकें फिरलें असतां मनुष्य सर्व बाबतींतच ज्याप्रमाणें बरळूं लागतो, तशी पुण्याच्या खुनानंतर मुंबईसरकारच्या मनाची स्थिति झाली असल्यामुळें, त्यांच्या अविचारीपणाचे परिणाम सर्वच खात्यांत व बाबतींत पुढें दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. कावीळ झालेल्यास ज्याप्रमाणें सगळें जग पिंवळें दिसतें त्याप्रमाणें पुण्याच्या खुनानंतर राजद्रोह–पिशाचिकेनें पछाडलेल्या सरकारच्या मेंदूस चोहोंकडे राजद्रोहाच्या राशिच्या राशी नजरेस येऊं लागल्या. याचें ठळक उदाहरण विद्याखातें होय. या खात्याची वाढ लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीत खुंटली गेली, इतकेंच नव्हे तर एज्युकेशन कमिशननंतर या इलाख्यांत खाजगी शिक्षणास प्रोत्साहन मिळून त्याची जी अभिवृद्धी झाली होती तिचीहि पिछेहाट करण्याचें अपयश लॉर्ड सँढर्स्ट यांच्याच वाट्यास आलें आहे. दुष्काळामुळें काटकसरीची पहिली कात्री युनिव्हर्सिटीस सरकारांतून जी पांच हजार रुपयांची मदत होती तिजवर पडली. पुढें पुण्याचे खुनानंतर सरकारची दृष्टी बदलून जाऊन जेव्हां राजद्रोह प्लेगजंतूप्रमाणें निर्मूळ करण्याचा सरकारनें निश्चय केला, तेव्हां नगर येथील शिक्षणप्रसारक मंडळी आणि पुणें येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या स्वातंत्र्याची सरकारच्या क्रोधाग्नीस आहुती द्यावी लागली; व पुढें युनिव्हर्सिटीचा डिग्री देण्याचा अधिकार कितपत अनियंत्रित आहे ह्याचाहि हायकोर्टापर्यंत जाऊन निकाल करून घ्यावा लागला. खाजगी लॉ कॉलेज काढण्याकरितां त्यांत मोठमोठे लोकहि असून परवानगी मिळाली नाहीं, व त्या बाबतींत मुंबईच्या लोकांस एक व विलायतच्या लोकांस एक अशीं दोन तऱ्हेनें दोन कारणें दाखविण्यांत आलीं, हेंहि या प्रकरणाचा विचार करितांना लक्षांत

---

* [केसरी ता. १३ फेब्रुवारी १९००]

ठेविलें पाहिजे. यावेळीं विद्याखात्याचे अधिकारी जर चाटफील्डसाहेब असते, तर सरकारचा क्रोधाग्नि त्यांनीं आपल्या खात्याकडे अशा रीतीनें वळूं दिला नसता; पण मनुष्याची बुद्धि जशी कर्मानुसार असते तद्वतच हल्लींचे डायरेक्टरहि या बाबतींत सरकारचेंच अनुकरण करणारे मिळाल्यामुळे विद्याखात्याचें मुसकूट दाबून आपल्या संशयी मनाची आणि क्रोधाग्नीची सरकारनें या खात्यासहि चांगली ओळख करून दिली. स्थानिक स्वराज्याचीहि याचप्रमाणें लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीत विल्हेवाट लागली आहे. पुणें म्युनिसिपालिटीस दिलेले विशेष हक्क लॉर्ड सँढर्स्ट यांनीं रागाच्या भरांत काढून घेतले आहेत, इतकेंच नव्हे तर सर्व म्युनिसिपालिट्यांच्या हक्कावर नव्या कोत्या विचारांचें लाटणें फिरवून लॉर्ड रिपन यांनीं उदार मनानें दिलेल्या स्थानिक स्वराज्याच्या हक्कांची जेवढी पीछेहाट करवेल तितकी करण्याकरितां कायदेकौन्सिलपुढे नवीन बिल तयार होऊन आलें आहे. कराचीच्या म्युनिसिपालिटीस तेथील पोर्ट ट्रस्टच्या बोर्डाचे दोन मेंबर निवडण्याचा अधिकार आहे तो काढून घेण्याविषयीं कायद्याचा मसुदाहि कायदेकौन्सिलपुढें एकदां आला होता, पण त्यावेळीं सरकाराने ती गोष्ट माघारी घेतल्यामुळे कराची म्युनिसिपालिटीच्या हक्काचा एक पाय अद्याप लंगडा झाला नाहीं. मुंबई म्युनिसिपालिटीस प्लेगच्या वेळीं एक कायमचा डेप्युटी कमिशनर अधिक जोडण्यांत आला हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लोकलबोर्डाची अशा रीतीनें पीछेहाट झाली नाहीं खरी, पण दुष्काळाच्या खर्चाचें ओझें त्यांजवर विनाकारण लादण्यांत आलें आहे. सारांश, स्थानिक स्वराज्य किंवा विद्याखातें या दोघांचीहि लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीत पुरी पीछेहाटच झाली आहे असें म्हणणें भाग येतें. हीं दोन्हीहि खातीं उदयास आणण्यास लॉर्ड रिपनसारख्या महात्म्यांनीं किती नेटानें उद्योग केला हें लक्षांत आणिलें म्हणजे लॉर्ड सँढर्स्ट याच्या कारकीर्दीत या खात्यास झालेल्या अपायाचें पूर्ण स्वरूप वाचकांस कळून येईल. सरकारचें धोरण कोणत्या प्रकारचें असतें, हें ठरविण्यास त्या सरकाराकडून कोणकोणते कायदे मंजूर करण्यांत येतात हेंहि पाहिलें पाहिजे. तशा दृष्टीने विचार केला म्हणजे पोलिस ॲक्ट, नवीन होणारा खोती ॲक्ट आणि म्युनिसिपल ॲक्ट हीं लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचीं चांगलीं स्मारकें होत. देवगडच्या खोतांची तक्रार योग्य असतां व ती अगदीं त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच त्यांच्या नजरेस आणली असतां त्यांचा गेल्या पांच वर्षांतहि सरकाराकडून निकाल लागला नाहीं. असो. अधिकाऱ्यांची सत्ता वाढवावी आणि लोकांचे हक्क कमी करावे हीं दोन या कायद्यांचीं प्रमुख तत्त्वें म्हटलीं तरी चालतील. मुंबई शहर सुधारण्याचा जो कायदा पास झाला आहे त्यासंबंधानें लॉर्डसाहेबांच्या दूरदर्शीपणाची कित्येकांनीं फार तारीफ केली आहे; पण लॉर्डसाहेबांच्या या कृत्याची जर तारीफ करावयाची तर त्याजबरोबर क्रॉफर्ड-

साहेब मुंबईस कमिशनरचा अधिकार निरर्गल रीतीनें चालवित असतां त्यांनीं अनन्वित कृत्यें केलीं त्याबद्दल त्यांची कां तारीफ करूं नये हें आम्हांस समजत नाहीं. घरभाडें नव्हे तर घराचे वांसे मोजून त्याप्रमाणें कॉम्पेनसेशन देऊन लोकांचीं घरें बहुतेक मोफत घेण्याची ज्या कायद्यानें मोकळीक मिळते त्या कायद्यास सर्व घर पडल्यावर पुढें हवा स्वच्छ होईल म्हणून उत्तम प्रतीच्या कायद्यांत गणणें म्हणजे लंडन शहरावर आग लागून पुढें रस्ते रुंद करण्यास सवड झाली म्हणून अग्नि नारायणास शाबासकी देण्याइतकें शहाणपणाचें आहे. मुंबई शहर सुधारण्यास याखेरीज लोकांच्या अधिक सवलतीचा मार्ग नव्हता असें नाहीं; पण सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत येईल तीच गोष्ट तावडतोब झाली पाहिजे, मग त्यामुळें लोकांची कितीहि गैरसोय झाली तरी हरकत नाहीं, असें ज्यांच्या राज्यपद्धतीचें धोरण, त्यांस हे मार्ग कोठून सुचणार ? लॉर्ड सँढर्स्ट यांनीं इलाख्याच्या जमा खर्चांत फारसें कधींच लक्ष घातलें नव्हतें; तथापि दुष्काळ आणि प्लेग यामुळें त्यांस तसें करतां आलें नाहीं असें म्हणण्यास सवड आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या कारकीर्दींत दोन्हीहि कौन्सिलदारीच्या जागा रेव्हिन्यू खात्यांतील लोकांस दिल्या गेल्या याबद्दलहि सर्वांशीं त्यांजकडे दोष ठेवितां यावयाचा नाहीं. तथापि एकंदरींत त्यांच्या कारकीर्दीचें धोरण कसें होतें हें त्यांजवरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. नेटिव्ह संस्थानांची व्यवस्था करण्यांतहि हेंच धोरण होतें हें कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट कर्नल रे यांची कृती व त्यांच्या विषप्रयोगाचा खटला यावरून पूर्णपणें दिसून येतें. पोटासाठीं त्रागा करून मालकांशीं भांडणाऱ्या गरीब बिचाऱ्या सिग्नलरांच्या सपांत देखील ज्या सरकारास राजद्रोहाचा वास येऊन सिग्नलरांभोवतीं डिटेक्टिवांचा सुळसुळाट लागला त्या गव्हर्नराची कारकीर्द शहाणपणाची अथवा लोकांच्या फायद्याची होती असें कोणीहि विचारी अथवा समंजस मनुष्य कबूल करील, असें आम्हांस वाटत नाहीं. कोणीकडेहि पहा, लॉर्ड सँढर्स्ट याच्या सौम्यतेचीं आणि कर्तृत्वशून्यतेचीं दुष्ट फलें एकसारखींच आपल्या नजरेस येतील. हीं फलें प्रत्यक्ष डोळ्यापुढें दिसत असतां लॉर्ड सँढर्स्ट यांस मानपत्र देण्याचा विचार कोणातरी एका नेटिवाच्या डोक्यांत यावा हें परकीय राष्ट्रांतील लोकांनीं ऐकलें, तर आमच्या लुब्रेपणाबद्दल त्यांची तिरस्कारबुद्धि झाल्याखेरीज कधींहि रहावयाची नाहीं. आमच्या हातीं अधिकार नाहीं खरा; पण स्वाभिमान आणि सत्यप्रियता हे दोन गुण सोडून देण्याइतके निर्लज्ज आम्हीं बनलों आहों असें आम्हांस वाटत नाहीं. व आमचा अभ्युदय होण्याची जर आम्हांस कांहीं आशा असली तर ती वरील गुण आमच्यामध्यें अद्याप वास करीत आहेत यामुळें होय. करितां आमच्या पुढाऱ्यांस एवढीच विनंति आहे कीं, लांड्या कोल्ह्याप्रमाणें आपल्या तुटलेल्याच शेंपटाचा अभिमान धरून त्यांनीं इतरांस लांडे करण्याच्या प्रयत्नास लागूं नये.

उपसंहार

वरील सर्व हकीगतीवरून लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द सर्वतोपरी आमच्या नुकसानीची आणि त्रासाची झाली हें कोणासहि कळून येईल. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अंगीं जे गुण आहेत ते आम्हीं या टीकेंत प्रांजलपणें कबूल केले आहेत; पण आमच्या किंवा लॉर्डसाहेबांच्या दुर्दैवानें या सर्व गुणांचा गव्हर्नर या नात्यानें राज्य कारभार चालविण्यांत त्यांस फारसा कोठेंच उपयोग पडला नाहीं. नार्थब्रुक क्लब-मध्यें सांगितल्याप्रमाणें आपल्या हातून होईल तितका उद्योग करण्यांत त्यांनीं कांहीं कमी केलें नाहीं. प्लेग आणि दुष्काळ यांप्रीत्यर्थ त्यांस इलाखाभर हिंडावें लागलें आणि त्यामुळें खरी लोकस्थिति समजून घेण्याची त्यांची इच्छा व योग्यता असती तर त्यांस चांगली संधि मिळाली होती. पण या संधीचा त्यांनीं उपयोग करून घेतला असें कोठें आढळून आलें नाहीं. नुसत्या उद्योशीलतेनें गव्हर्नरच्या जागेचें काम बिनबोभाट संभाळून लौकिक संपादन करितां येईल अशी जर लॉर्ड सँढर्स्ट यांची समजूत असेल तर ती चुकीची आहे. पांच पंचवीस वर्षांपूर्वीं गव्हर्नरचें काम करणें जितकें सोपें होतें, तितकें सोपें तें आतां राहिलें नाहीं. विद्येच्या व ज्ञानाच्या प्रसारानें लोकांस आपल्या हिताहिताच्या गोष्टीं कळूं लागल्या आहेत; व यांपैकीं आपल्या अहिताच्या गोष्टी कमी होऊन हिताच्या गोष्टी वाढाव्या अशाबद्दल हिंदुस्थानांतील प्रजेमध्यें हल्लीं बरीच चळवळ सुरू आहे. ही त्यांची चळवळ येथील अधिकारी वर्गास अर्थातच मान्य नाहीं. त्यांच्या मतें हिंदुस्थानचें राज्य कायम राहण्यास एकच मार्ग आहे आणि तो असा कीं, हिंदुस्थानांतील अधिकारी वर्गाचें प्राबल्य शहाणपणानें नाहीं तर सत्तेनें तरी सरकारानें कायम राखिलें पाहिजे. ही समजूत आणि विद्याप्रसारामुळें राज्य-कारभारांत अधिकाधिक हक्क मिळविण्याची प्रजेच्या मनांत उद्भवलेली बुद्धी यांमध्यें स्वभावतःच विरोध आलेला आहे हा विरोध अलीकडे अलीकडे इतका उघड झाला आहे कीं, सरकारी अधिकाऱ्यांनीं प्रजेच्या पुढाऱ्यांस राजद्रोही म्हणावें आणि प्रजेच्या पुढाऱ्यांनीं अधिकाऱ्यांवर उद्दामपणाचा आणि अरेरावी-पणाचा आरोप करावा अशी स्थिति झालेली आहे. अशा वेळीं अधिकारी वर्ग आणि प्रजेचे पुढारी यांच्यामध्यें तडजोड घालण्याची ज्यांच्या अंगांत हुषारी अथवा करामत नाहीं ते गव्हर्नरच्या जागेचें काम करण्यास कधींहि लायक समजले जाणार नाहींत. हिंदुस्थानची आणि विशेषतः करून मुंबईइलाख्याची सध्याची स्थिति अशी आहे कीं, आमचे गव्हर्नर केवळ मोठ्या कुळांतले, सभ्य किंवा प्रतिष्ठित आहेत, एवढ्यानें काम भागण्यासारखें नाहीं. गव्हर्नरची जागा चालविणें म्हणजे हाताखालील अधिकाऱ्यांवर पूर्ण भरंवसा ठेवून नेटिव्ह लोकांशीं वरवर गोड बोलणें नव्हे, हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. आमच्या तिजोरींतून दरमहा दहा हजार रुपये देऊन खऱ्या कर्तबगारीचीं माणसें हिंदुस्थानांत

पाठवावयास जर विलायतसरकारास मिळत नसतील तर या जागा मुळींच काढून टाकव्या अथवा पाहिजे असल्यास आणखी पगार देऊन योग्य माणसें इकडे पाठवावीं अशी राणीसरकारास आमची प्रार्थना आहे. लॉर्ड सँढर्स्ट यांस जें काय शिक्षण मिळालें तें सर्व लष्करी शाळेंतलें होतें हें त्यांनीं आपल्या एका भाषणांत सांगितलेलें आहे. हिंदुस्थानांतील अधिकारी वर्गाचा आणि प्रजेच्या पुढाऱ्यांचा विरोध असेल ही कल्पनाहि त्यांच्या मनांत पूर्वी कधीं आली असेल असें वाटत नाहीं. निदान तशी कल्पना त्यांच्या मनांत आली असल्यास या दोन पक्षांची तडजोड पाहून राज्याचें गाडें सुरळित हांकण्याइतकी त्यांच्या अंगांत कर्तबगारी होती असें पूर्वी कोठेंच आढळून आलें नव्हतें. त्यांतून येथें आल्यावर त म्हणतात त्याप्रमाणें अश्रूतपूर्व संकटांतून या इलाख्याच्या राज्यकारभाराचें तारूं सुरळितपणें पार पाडण्याची जोखीम एकाएकीं त्यांचे शिरावर येऊन पडली. अशा स्थितींत कोणीहि धूर्त आणि शहाणा मुत्सद्दी नांव मिळवून गेला असता; पण लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अंगीं कर्तृत्वशक्तीचा तादृश अभाव असल्यामुळें, त्यांनीं आपल्या हाताखालील नावाडी वीस वर्षें वल्हीं मारून अनुभविलेले आहत अशा समजुतीनें त्यांजवर विश्वास टाकून सुकाण ढिलें सोडिलें आणि आपल्या लौकिकाचा पूर्ण खराबा करून घेतला. अँग्लो इंडियन पत्रकार किंवा सरकारी अधिकारी त्यांच्या या ढिलेपणाबद्दल लॉर्डसाहेबांची पाठ थोपटतील किंवहुना त्यांचें स्मारकहि करतील हे आम्ही जाणून आहों; पण हें स्मारक म्हणजे रावण दरबारांतील प्रधानमडळीनें संन्याशास सुळी देण्याबद्दल रावणाच्या राज्यकारभाराची शिफारस करण्याइतकेंच समंजस आहे. लॉर्डसाहेब असल्या स्मारकानें खूष होतील तर खुशाल होवोत. कोणत्याहि गर्व्हनराचें स्मारक कोणीहि एखादा श्रीमंत गृहस्थ करूं शकेल; पण खरी लोकप्रियता हेंच जर शहाण्या राज्यकर्त्यांच्या परीक्षेचें साधन असें मानावयाचें असेल, तर ती लोकप्रियता लॉर्ड सँढर्स्ट यांनीं संपादिली नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्या उलट त्यांनीं लोकांची अतिशय हानी केली असें म्हणावें लागेल. लॉर्ड हॅरिस पुष्कळच अप्रिय झालेले होते, पण शारीर शिक्षणाच्या कामांत तरी त्यांनीं आमचें कांहीं बरें केलें होतें. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या हातून तशा प्रकारचीही गोष्ट घडून आली नाहीं. त्यांनीं जें काय केलें तें एवढेच कीं, आपल्या हाताखालील अधिकारी वर्गास स्वैरपणानें वागूं दिलें आणि लोकांनीं जेव्हां जव्हां त्यांच्याविरुद्ध कांहीं तक्रारी केल्या तेव्हां तेव्हां लोकांस किंवा लोकांच्या पुढाऱ्यांस थप्पड मारून खालीं बसविलें. पुण्यांतील खून, सिन्नर–मुंबईतील दंगे, वर्तमानपत्रांवर राजद्रोहाच्या फिर्यादी, फॉमनकोड लोकांस समजावून देण्याबद्दल सार्वजनिक संस्थावर झालेली इतराजी, आणि निरपराधी मनुष्यांस जुने कायदे हुडकून काढून, संशयावरून कैदेंत टाकणें किंवा त्यांजविरुद्ध काडीइतका देखील पुरावा नसतां त्यांस प्रतिबंधांत ठेवणें, हींच यांचीं महत्कृत्यें

होत. अशा कृत्यांबद्दल गव्हर्नरसाहेब म्हणून कोणाचेहि आभार मानण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. आमचें हित कोणतें आणि गैरहित कोणतें हें आम्हांस कळूं लागलें आहे. आणि कोणत्याहि गव्हर्नराच्या गुणावगुणाचें आम्हीं जें परीक्षण करणार तें ह्याच कसोटीस लावून करणार. पांचपंचवीस वर्षांपूर्वी ही स्थिति आलेली नव्हती; पण आतां तसा प्रकार राहिलेला नाहीं. इंग्रजसरकारचें राज्य कोणास नको आहे असें नाहीं; सरकारी अधिकाऱ्यांनीं राजद्रोहाची जी हूल काढिली आहे ती अगदीं चुकीची व वेडेपणाची होय, व सध्यां जरी त्यामुळें आम्हांस त्रास सोसावा लागला, तरी अखेरीस केव्हांना केव्हां तरी हें ढोंग फुटल्याखेरीज राहणार नाहीं. आमचा राज्यकारभार आम्हांस हितावह अशा रीतीनें चालला जावा एवढेंच काय तें आमचें मागणें आहे; आणि तें मागणें कायदेशीर रीतीनें शेवटपर्यंत आग्रहपूर्वक मागण्याचा आमचा हेतु आहे. ह्या हेतूस स्वभावानें नाहीं तर कृतीनें विघ्न करणारे लॉर्ड सँढर्स्टसारखे कांहीं गव्हर्नर निघून अधिकारी वर्गाची कांहीं दिवस सरशी होईल, पण ही स्थिति चिरकाल राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे; व म्हणूनच आमच्या लोकांनीं लॉर्ड सँढर्स्टसारखे कर्तृत्वशून्य गव्हर्नर आले तरी तेवढ्यानें निराश होऊन आपला क्रम सोडून देऊं नये अशी त्यांस आमची विनति आहे. सरतेशेवटीं लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचें वर मीं परीक्षण केलें त्यांत नाइलाजास्तव त्यांच्यासंबंधानें जे कडू शब्द वापरावे लागले त्यांजबद्दल त्यांची माफी मागून, व असें गव्हर्नर आमच्याकडे पुनः कधींहि न येवोत अशी परमेश्वराची प्रार्थना करून हा लेख संपवितों. लॉर्डसाहेबांची स्वदेशगमनयात्रा त्यांस व त्यांच्या पत्नीस सुखावह होईल अशी आम्हांस आशा आहे. त्यांचा आमचा कोणत्याहि प्रकारें वैरभाव नाहीं. ते थोर आहेत, कुलीन आहेत, सभ्य आहेत, आदरातिथ्य करण्यांत तत्पर आहेत, पण गव्हर्नरचें आणि तेंहि हल्लींच्या स्थितींत मुंबईसारख्या इलाख्याच्या गव्हर्नरचें काम चालविण्यास स्वभावतःच अगदीं नालायक आहेत अस त्यांच्या पांच वर्षांच्या कारकीर्दीवरून आमचें मत झालें आहे. त्यास आमचा व त्यांचा कांहीं इलाज नाहीं, हें लक्षांत आणून ते आमच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल थोर मनानें आम्हांस माफी करतील अशी उमेद आहे.

* लॉर्ड सँढर्स्टचे प्रभावळींतील मंडळी

आमचे पुढारी

हल्लीं येथें चालू असलेल्या गव्हर्नरसाहेबांच्या स्मारकासंबंधानें आमचे एका मद्रासेकडील मित्रास सुचविलेले विचार त्यानें आम्हांस कळविले आहेत, त्यांतील कांहीं भागाचें भाषांतर करून खालीं दिलें आहे. त्यावरून आम्हासच नव्हे तर इतर इलाख्यांतहि आमच्या पुढाऱ्यांनीं हल्लीं जें नाटक चालविलें आहे त्याबद्दल खऱ्या कळकळीच्या लोकांस किती वाईट वाटत आहे हें चांगलें दिसून येईल. राष्ट्रांत ज्या तऱ्हेचे पुढारी निपजतात त्या मानानें त्यांची स्थिती सुधारते अगर बिघडते हें निर्विवाद आहे. आमची स्थिति सुधारणें अस-ल्यास ती हल्लींच्या पुढाऱ्यांच्या हातून सुधारण्याची आशा नाहीं. याचीं उदाहरणें दिवसेंदिवस अधिकाधिक प्रत्ययास येत चाललीं आहेत. सर भालचंद्र किंवा भावी न्यायमूर्ति चंदावरकर यांच्या पोंचटपणाबद्दल आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. यांच्यांत जर कांहीं विशेष तारीफ करण्यासारखा गुण असला तर तो पोंचट-पणाच होय. सर्वाकारांनीं रमणीय तऱ्हेनें वर्तन ठेवणें हेंच ज्यांच्या आयुष्याचें इतिकर्तव्य त्यांनीं मुंबईइलाख्यास नव्हे तर सर्व देशास संकटांत घालणाऱ्या गव्हर्नरास मानपत्र देण्यास तयार व्हावें यांत आश्चर्य तें कोणतें ? फार लांब कशाला ? उद्यां यांना अजिबात घोटाळ्यांत पाडून जर यास कोणी बहुमान देणारा इसम निपजला तरी देखील हे ईश्वराप्रमाणें त्याच्या पाया पडतील, याबद्दल आम्ही त्यांस दोष देतों असें नाहीं, हा त्यांचा स्वभाव आहे; आणि एका सस्कृत कवीनें म्हटल्याप्रमाणें " अतीत्य हि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते. " तेव्हां सर भालचंद्र अगर ना. चंदावरकर यांस त्यांच्या पोंचटपणाबद्दल नांवें ठेवणें म्हणजे परमेश्वरानें कोल्ह्यास धैर्य दिलें नाहीं म्हणून ईश्वरास दोष देण्यासारखें आहे. आम्ही यांस पुढारी समजतों हीच आमची चूक आहे. बाकी सरकारास असलीं माणसें हवींच आहेत व अशाच माणसांस त्यांच्याकडून बहादुरकी, ' सर ' की, अथवा इतर सन्मान मिळावयाचा ! जुलमी अम्मल-दाराचा अगर राजाचा स्वभावच असा असतो कीं, ते आपल्याजवळ जी माणसें बाळगतात तीं अशीं असावीं कीं त्यांस कोणी शालजोडीतील मारले तरी त्यांनीं शालजोडीच्या मऊपणाचीच तारीफ करीत राहावें ! ह्यासंबंधाचे आमचे विचार आम्हीं वेळोंवेळीं दाखल केलेलेंच आहेत. करितां आतां आमच्या मद्रासी मित्राच्या म्हणण्याकडे वळूं. या मित्राचा पहिला प्रश्न खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

---

* [केसरी ता. २३ फेब्रुवारी १९००]

ते म्हणतात कीं, "महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांबद्दल आमची आजपर्यंत बरीच पूज्य-बुद्धी होती. सर रिचर्ड टेंपल व लॉर्ड हॅरिस यांच्या स्मारकाबद्दल मुंबईस ज्या चळवळी व वाटाघाटी झाल्या त्यावरून मुंबईच्या पुढाऱ्यांत कांहीं स्वाभिमान असून त्यांस सत्याची चाड आहे व प्रसंगविशेषीं आपलें खरें मत निर्भीडपणें प्रसिद्ध करण्याचें धैर्यहि त्यांच्यांत आहे असें सर्वांस वाटत होतें. पण लॉर्ड सँढर्स्टच्या स्मारकाची ना. मेथा, ना. चंदावरकर, सर भाटवडेकर वगैरे मंडळींनीं जी उचल केली आहे, त्यावरून आमची फार निराशा झाली आहे. लोकांचे पुढारी या नात्यानें वरील मंडळीस गव्हर्नर, कौन्सिलर किंवा दुसरे बडे बडे अधिकारी यांच्यांत वागण्याचा अनेक वेळ प्रसंग येतो हें खरें आहे. पण असल्या प्रसंगीं बड्याबड्या अधिकारी वर्गाच्या समाजांत आपणांस गोडी राखून वागतां यावें म्हणून लोकांचें खरें मत योग्य प्रसंगीं प्रदर्शित करण्याचें ज्यांच्या अंगीं धैर्य नाहीं ते लोकांचे पुढारी असून व नसून सारखेच; किंबहुना असल्या नरम पुढाऱ्यांमुळें लोकांच्या फायद्यापेक्षां त्यांचें नुकसानच जास्त होतें असें म्हटलें तरी चालेल. लोकमत आणि सरकारमत यांच्यामध्यें जो एक प्रकारचा विरोध आहे त्यामुळें लोकांच्या पुढाऱ्यांस अधिकारी वर्गाची प्रीति नेहमीं संपादन करतां येईल असें नाहीं; व त्यामुळें लोकांच्या पुढाऱ्यांनीं अधिकारी वर्गाच्या समाजांत आपली वागणूक कधीं कधीं अप्रिय होण्याचा प्रसंग आल्यास त्यास तयार असलें पाहिजे. तशा तऱ्हेची तयारी ना. मेथासारख्या निस्पृह म्हणून नांवाजलेल्या गृहस्थाच्या अंगांतहि दिसून येत नाहीं, हें हल्लींच्या स्मारकाच्या चळवळीवरून हिंदुस्थानांतील सर्व लोकांस कळून चुकलें आहे. आमच्या कॉंग्रेसचे हेच लोक पुढारी आहेत व कॉंग्रेस सभेनें लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दींतील बहुतेक महत्त्वाच्या गोष्टी राष्ट्रास अपायकारक आहेत असे ठराव निरनिराळ्या प्रसंगीं केलेले आहेत. हे ठराव नामदार मेथा अगर नामदार चंदावरकर यांस माहीत नसतील असें नाहीं. तथापि ते सर्व एका बाजूस गुंडाळून ठेवून आज लॉर्ड सँढर्स्टचे पोवाडे गाण्यास यांनीं तयार व्हावें यापेक्षां आमच्या राष्ट्राच्या दुर्बलतेचें व दुर्दैवाचें दुसरें लक्षण सांपडणें कठीण आहे. असे पुढारी मिळाल्यावर आमच्या ह्या हतभागी राष्ट्राचा अभ्युदय न झाल्यास त्याचा दोष राजकर्त्यांकडे देणें अगदीं मूर्खपणा होय." आमच्या मित्राचे वरील विचार अगदीं यथार्थ आहेत हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. ना. मेथा यांस सिंहाची उपमा देण्यांत येत असते; पण सध्यांचा काळ असा आला आहे कीं, या सिंहानें सुद्धां शेंपूट घालून श्वानवृत्ति स्वीकारली आहे. ना. मेथांबद्दल अशा तऱ्हेचे उद्गार काढण्याचा आमच्यावर प्रसंग यावा हें आमचें मोठें दुर्दैव होय; पण नाइलाजास्तव आज ही गोष्ट करणें भाग पडत आहे. लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द खरोखरच लोकांस हितावह होती असें नामदार चंदावरकरांप्रमाणें सभेंत प्रति-

पादन करण्याचें मि. मेथा यांचें धैर्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मग आमचे सर्व अजमास चुकतात त्यांत हाहि चुकल्यास नकळे. निदान आम्हीं एवढें तरी म्हणूं शकतो कीं, लॉर्ड सँढर्स्ट यांच्या हातून ज्या कांहीं चुका घडल्या त्या लोकांच्या दृष्टीनें अत्यंत दोषार्ह होत्या हें नामदार मेथा यांस माहीत आहे. असें असतांहि नामदार मेथा यांनीं आज अशी वृत्ति कां धारण करावी याचें पुष्कळांस आमच्याप्रमाणेंच गूढ पडेल यांत शंका नाहीं. आम्हीं या बाबतींत जी चौकशी केली आहे त्यावरून आम्हांस असें कळून आलें आहे कीं, नामदार मेथा यांनीं हल्लींची वृत्ति केवळ "पॉलिसी" (policy) म्हणून स्वीकारली आहे. सारांश, लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कृतीबद्दल लोकांचा व या चळवळींत पुढें आलेल्या गृहस्थांचा जरी मतभेद नसला, तरी कोणी पॉलिसी म्हणून तर कोणी स्वभाव म्हणून या चळवळींत पुढाकार घेऊन अधिकारी वर्गांत नेहमीं वागण्याचा आपला रस्ता पूर्वीप्रमाणेंच सुखकर ठेवण्याची हे लोक तजवीज करीत आहेत. स्वहिताच्या दृष्टीनें अथवा सरकारच्या दृष्टीनें हें वर्तन योग्य असेल, पण लोकांचे पुढारी या नात्यानें हें कृत्य अगदीं अश्लाघ्यच नव्हे, तर आमच्या देशाच्या अत्यंत नुकसानीचें आहे असें आमचें पूर्ण विचारांतीं ठाम मत झालेलें आहे.

आमच्या राजकर्त्यांकडून जे हक्क आम्हांस प्राप्त व्हावयाचे ते तंटा करून आम्हांस मिळावयाचे नाहींत व दांडगाई करण्याचें आमचें अंगांत सामर्थ्यहि नाहीं ही गोष्ट आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. पण दांडगाई आणि तंटा न करणें म्हणजे हल्लींचा क्रम स्वीकारणें नव्हे. आमच्या थोबाडींत मारणाऱ्या गृहस्थाचे उलट थोबाडींत मारण्याची आमच्या अंगांत शक्ती नसेल व अशा वेळीं थोबाडींत मारलेली मुकाट्यानें सहन करून बसणें हेंच अधिक शहाणपणाचें होईल. पण आपल्या अंगांत अशी शक्ती नसली म्हणून थोबाडींत मारणाऱ्या गृहस्थाची आरती करण्यास आम्हीं तयार व्हावें हें आमच्या मतें आमच्या स्वभावाच्या पोंचटपणाचें लक्षण होय. किती एकांस असें वाटत असेल कीं, अशा कृत्यांनीं आम्हीं सरकारी अधिकाऱ्यांची मेहेरबानी संपादूं, परंतु आमच्या मतें ही मोठी चूक आहे. पोंचटपणा नेहमींच तिरस्कारार्ह होय. आणि आमच्या पुढाऱ्यांच्या हल्लींच्या पोंचटपणाचें टाइम्ससारख्या पत्रकारांनीं किंवा कांहीं इंग्रजी अधिकाऱ्यांनीं जरी आज क्षणभर कौतुक केले, तरी खऱ्या हाडाच्या इंग्रजांस या पोंचटपणाचा तिरस्कार आल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं. नेटिव्ह लोकांचे पुढारी म्हणजे पोंचटपणाचे पुतळे असें यांच्या वर्तनावरून कोणीहि इंग्रज जर म्हणूं लागला, तर त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. ज्या टाइम्सकारांनीं सर भाटवडेकरांस आज उचलून धरलें आहे त्याच टाइम्सकारांनीं त्यांस एकदां महामूर्ख (idiot) म्हटलें होतें हें पुष्कळांस स्मरत असेलच. टाइम्सनें वापरलेल्या शब्दाची त्यांच्याच कृतीनें सहजगत्या आठवण होण्याची पाळी आज आम्हांवर

यावी हें आमचें दुर्भाग्य होय. टाइम्सकारास सर इनॉक्युलेशनची खरी किंमत माहीत आहे येवढें यावरून स्पष्ट दिसतें. मग आजच्या प्रसंगाकरितां ते त्यांची कितीहि वाखाणणी करोत.

नामदार मेथा यांच्यासंबंधानें आम्हीं आपले मद्रासी मित्राचे व आमचे विचार वर प्रसिद्ध केलेलेच आहेत. पण नामदार मेथा यांच्या 'पॉलिसी'नें दुसरेंहि आमचें मोठें नुकसान झालेलें आहे तेंहि येथें नमूद केलें पाहिजे. कौरव-पांडवांचें सभेंत धर्मराजानें सौम्य वृत्ति स्वीकारून द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळींहि भीमार्जुनांचें शौर्य जसें निष्फळ केलें तद्वतच नामदार मेथा यांच्या हल्लींच्या वर्तनानें मिस्टर वाच्छा व सेटलवाड यांची हबेलंडी उडून गेली आहे. मनाची प्रवृत्ति एकीकडे आणि पुढाऱ्यांची इच्छा एकीकडे अशा कैचींत ही मंडळी सांपडलेली आहे. पुढाऱ्याला तेवढ्यापुरता सोडून देऊन मनदेवता सांगते त्याप्रमाणें आचरण करण्याचें यांच्या अंगांत धैर्य नाहीं आणि मनदेवतेची कांहीं-तरी समजूत घालून तिच्या साफ विरुद्ध जाण्याचीहि न्यायमूर्तीप्रमाणे छाती होत नाहीं. तेव्हां महाभारतांत सांगितल्याप्रमाणें "मणीवोष्ट्रस्य लंबेते प्रियौ वत्सतरौ मम" अशी या नामदार मेथा यांच्या भक्तद्वयाची स्थिती झाली आहे. ही स्थिती फारच अनुकंपनीय होय. तथापि त्यांतले त्यांत समाधानकारक गोष्ट एवढी कीं, या दोन्ही गृहस्थांनीं सत्यास अजिबात सोडून दिलें नाहीं. नामदार चंदावरकर आणि (मुंबईचे टाइम्सकारांनीं एका काळीं प्रेमानें ठेवलेलें नांव वापरावयाचें असल्यास) सर इडियट यांच्या अंगांत तेवढेंहि धैर्य दिसलें नाहीं. एकदां उलट खावयाची म्हणजे ती पुरी खाल्ली पाहिजे असा यांचा या बाबतींत तरी संकल्प झालेला दिसतो. चंदावरकरांस वकिली करण्याची ज्याप्रमाणें सवय आहे त्याप्रमाचें असाध्य रोग्यास औषध देण्याचाहि डॉक्टरसाहेबांस पुष्कळदां योग आला असेल. तेव्हां आजच्या प्रसंगीं दोघांनींहि आपली कर्तबगारी दाखविली यांत कांहीं विशेष नाहीं. पण न्याय-अन्याय निवडण्याचें ज्यांचें काम त्यांनींहि अशा वेळीं "नरो वा कुंजरो वा" अशी वृत्ति धारण करावी हें आश्चर्य होय ! लॉर्ड सँढर्स्ट यांस खाजगी पार्टी देण्याचें न्यायमूर्ती रानडे यांस कांहीं कारण नव्हतें. कारण त्यांच्यामध्यें व लॉर्ड सँढर्स्ट यांच्यामध्यें मोठें रहस्य गळत होतें असें आम्हांस तरी माहीत नाहीं. न्यायमूर्ती रानडे हे भावी न्यायमूर्ती चंदावरकरांप्रमाणें लॉर्ड सँढर्स्ट यांची स्तुति करीत सुटले नाहींत हें खरें आहे. पण त्यांनीं खाजगी मेजवानी देऊन "नरो वा कुंजरो वा"ची जी वृत्ति धारण केली आहे तींहि आमच्या मतें चुकीची होय. धर्मराजासारख्यासहि अशाच चुकीकरितां क्षणभर तरी पाताळ लोकांत वास करावा लागला, व त्यांचा आंगठा गळून पडला हें सर्वांस माहीत आहेच.

सारांश, आमच्या हिंदु पुढाऱ्यांचें या बाबतींतलें वर्तन लक्षांत आणितां तें

अगदींच अक्षम्य व तिरस्करणीय झालेलें आहे असें मोठ्या दुःखानें आम्हांस म्हणावें लागतें. महाराष्ट्रावर गेल्या दोन तीन वर्षांत सरकारानें जीं संकटें आणलीं त्याचा जर हा परिणाम असेल तर सरकारानें अखेर जितली असें म्हटलें पाहिजे. जोंपर्यंत आमच्यामधील पुढारी स्पष्टपणें खरें लोकमत सांगण्यास नेहमीं तयार नाहींत तोंपर्यंत आमच्या भावी उन्नतीची आम्ही आशा बाळगणें व्यर्थ होय. नामदार मेथा यांच्यासारख्यांनीं इकडे लॉर्ड सँढर्स्ट यांस मानपत्रें द्यावीं आणि तिकडे कॉंग्रेसमध्यें मोठा सूर काढून अभिनययुक्त आवेशानें लॉर्ड सँढर्स्ट यांच्यापासून सुरुवात झालेल्या कृत्यांचें दोषाविष्करण करावें हें आमच्या मतें अगदीं परस्पर विरुद्ध होय. याचा परिणाम असा होणार कीं, आमच्या कॉंग्रेसमधील चळवळ आणि भाषणें पोकळ पांडित्याचीं आहेत असें सर्व जगास कळून येणार. या स्मारकाच्या चळवळींत बरेच पार्शी गृहस्थहि सामील झालेले आहेत. लॉर्ड हॅरिसच्या स्मारकाच्यावेळीं हीच मंडळी अत्यंत विरुद्ध होती; कारण सदर साहेबाच्या कारकीर्दीत राजाबाई टावरवरून उडी टाकून आत्महत्या केलेल्या दोन पार्शी स्त्रियांच्या खटल्याची हकीगत त्यावेळीं यांच्या स्मरणांत ताजी होती. सरदार नातुबंधू हे हिंदु नसतां जर पार्शी असते तर आज इतके पार्शी लोक लॉर्ड सँढर्स्ट यांच्या स्मारकास जाते कीं नाहीं याचाहि आम्हांस वानवाच आहे. परंतु या जातीभेदाच्या गोष्टीकडे लक्ष देण्याची आज आम्हांस जरूर नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांचें अखेर स्मारक जर कोणास कर्तव्य असेल तर तें सँढर्स्टसाहेबांचा पुतळा न करितां नातुबंधूंचे पुतळे करून केलें पाहिजे. पण हल्लींच्यासारखे जोंपर्यंत आमचे पुढारी आहेत तोंपर्यंत ही गोष्ट मनांत आणावयास नको. आमच्या पुढाऱ्यांस आम्हीं नेहमीं दूषणें देतों असा आमच्यावर कित्येकांचा आक्षेप आहे. पण सुदैवानें हे पुढारी कोणच्या प्रकारचे आहेत हें समजण्याचा आज आपोआपच प्रसंग आलेला आहे. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या स्मारकापासून जर कांहीं आम्हांस धडा शिकावयाचा असला तर तो हाच होय; आणि महाराष्ट्रांतील लोक तो शिकतील अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. आपले सेनापती कोणच्या प्रकारचे आहेत हें शिपायांस नेहमीं माहीत पाहिजे. तशा प्रकारची माहिती नेहमींच मिळण्याचा प्रसंग येतो असें नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांनीं तसा प्रसंग आमच्या प्रत्ययास आणून दिला हे त्यांचे आमच्यावर मोठेच उपकार आहेत. व ईश्वरापाशीं आमची नेहमीं प्रार्थना आहे कीं, आमच्या पुढाऱ्यांचा शक्तिपात झालेला पाहण्याचा असला प्रसंग आमच्यावर पुनः न येवो.

❖ ❖ ❖

* प्लेग टोंचण्यासंबंधानें सरकारी ठराव

ता. २२ फेब्रुवारी १९०० रोजीं हिंदुस्थानसरकारनें प्लेग टोंचण्यासंबंधानें एक सरकारी ठराव प्रसिद्ध केला आहे. ह्या ठरावालगत प्लेग कमीशनचा या बाबीसंबंधाचा रीपोर्टहि दिला आहे. हा रिपोर्ट विस्तृत असून, मुंबई, दमण, खडकी, बुलसारा, कराची, बडोदें, सातारा, बेळगांव, धारवाड, हुबळी, गदग, बंगलोर, म्हैसूर इत्यादि ठिकाणच्या इनॉक्युलेशनसंबंधाच्या आंकड्यांनीं भरलेला आहे. प्लेगकमीशननें आपले रिपोर्टाचे अखेरीस जे सिद्धान्त दाखल केले आहेत, तेच सिद्धान्त सरकारी ठरावांत दिले असून त्या सिद्धान्तांवरून हिंदुस्थानसरकारनें प्लेग टोंचण्यासंबंधानें आपलें अनुकूल मत देऊन त्याचा फैलाव चोहोंकडे व्हावा म्हणून फर्माविलें आहे. प्लेग कमिशनचे सिद्धान्त थोडक्यांत येणेंप्रमाणें आहेत. (१) प्लेग टोंचून घेतला असतां प्लेग होण्याची भीति बरीच कमी होते; पण अगदींच नाहींशी होते असें नाहीं. प्लेग होण्यापूर्वी दोन वर्षांत चार वेळां ज्यांनीं प्लेग टोंचून घेतला होता त्यांना पुढें प्लेग झाल्याचींहि उदाहरणें दृष्टीस पडतात. बलसार येथें इनॉक्युलेशन केलेल्यांपैकीं शेंकडा ८ असामींस प्लेग झाला. इतर ठिकाणीं निरनिराळ्या कारणानें हें प्रमाण बरेंच कमी जास्ती आहे. म्हणून यासंबंधानें कांहींच निश्चित सांगतां येत नाहीं. (२) प्लेग टोंचल्यानें मृत्युसंख्यादि कमी होते म्हणजे प्लेग थोडक्यांना होतो असें नव्हे तर प्लेग झाल्यावरहि त्यापैकी कमी मृत्युमुखीं पडतात. (३) प्लेग टोंचल्याबरोबर लगेच प्लेग निवारण करण्याची शक्ती येत नाहीं, ह्याकरितां प्लेग टोंचून घेतल्याबरोबर दूषित ठिकाणीं रहाणें इष्ट नाहीं. (४) कांहीं आठवडेपर्यंत प्लेग टोंचण्याचा इष्ट परिणाम टिकतो. हा परिणाम कांहीं महिनेहि रहात असेल. आणखी अनुभव घेतल्याशिवाय ह्यासंबंधानें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. (५) लसीचे प्रमाणावर पुढील परिणाम अवलंबून असतात. अमुक इतकी लस एकदम अंगांत घातली असतां उत्कृष्ट परिणाम होतील असें कांहींसें प्रमाण असावेसें दिसतें. व हें प्रमाण एकदां शोधून काढलें म्हणजे प्लेग टोंचण्याचे चांगले परिणाम दृष्टीस पडतील; व तसें झालें असतां दोनदोनदां तीनतीनदां प्लेग टोंचून घेण्याचें कारण राहणार नाहीं. प्लेग कमिशननें याशिवाय असाहि आणखी एक शेरा मारला आहे कीं, प्लेग टोंचल्याबरोबर आकस्मिक मृत्यू आल्याचीं कांहीं उदाहरणें त्यांच्यापुढें आलीं खरीं पण प्लेगच्या लसीचा तो परिणाम असावा असें त्यांना वाटत नाहीं. प्लेग

---

* [केसरी ता. ६ मार्च १९००]

टोंचल्यानंतर घुढें कांहीं वाईट परिणाम झाल्याचींहि त्यांच्याघुढें उदाहरणें आलीं आहेत, पण लसीशिवाय सभोंवारच्या इतर कारणांमुळें ही स्थिति झाली असावी असें त्यांचें म्हणणें आहे. एकंदरीनें इनॉक्युलेशनपासून दुष्ट परिणाम होत नाहीं असें त्यांनीं मत दिलें आहे ही गोष्ट हिंदुस्थानसरकारानें लोकांच्या नजरेघुढें मुद्दाम आणली आहे. इनॉक्युलेशनपासून होणाऱ्या फायद्यासंबंधानें कमिशननें वरील प्रकारचा अभिप्राय दिल्यानंतर खुषीनें प्लेग टोंचून घेण्यास लोक कितपत राजी असतात यासंबंधानें आपले सिद्धान्त येणेंप्रमाणें नमूद केले आहेत. (१) ज्या ठिकाणीं प्लेग नाहीं अशा ठिकाणचे लोक प्लेग टोंचून घेण्यास राजी असलेले क्वचितच दृष्टीस पडतात, (२) सेग्रिगेशन व घराबाहेर काढणें ह्यासंबंधानें सवलती दिल्या असतां साथीच्या वेळीं प्लेग टोंचून घेण्यास पुष्कळ लोक तयार असतात. (३) लालूच न दाखवितां म्हैसूर शहरच्याच कायते बरेच लोकांनीं प्लेग टोंचून घेतला. (४) मुंबई व कराची येथील खोजे लोकांनीं ज्याप्रमाणें आपले घुढाऱ्यांचे सांगण्यावरून प्लेग टोंचून घेतला त्याप्रमाणें इतर लहान सहान समाजहि पुढाऱ्यांनीं सांगितलें असतां प्लेग टोंचून घेण्यास तयार होण्याचा संभव आहे. प्लेग कमिशनचें वरील सूचनेवरून हिंदुस्थानसरकारनें असें फर्माविलें आहे कीं, ज्या ठिकाणीं पूर्वी प्लेग येऊन गेला असेल व दुसऱ्यांदा साथ सुरू होण्याची चिन्हें दिसत असतील किंवा आसपासच्या ठिकाणीं प्लेग जारीनें सुरू असेल त्या ठिकाणचे लोकांनीं प्लेग सुरू होण्याचें पूर्वी टोंचून घ्यावें; ह्याकरितां होईल तितका इलाज करणें इष्ट आहे व लोकांना इनॉक्युलेशनचे फायदे समजून देण्याचे कामीं व प्लेग टोंचण्याचा सर्रास उपयोग करून घेण्याकडे त्यांची प्रवृत्ती करण्याचें कामीं हरएक प्रकारचे प्रयत्न करण्यास अधिकाऱ्यांनीं चुकूं नये व हयगय करूं नये. तथापि यासंबंधानें हिंदुस्थानसरकारनें पूर्वी वारंवार फर्माविलेलें मत बिलकूल सोडलें नसून त्यांचें असें ठाम मत आहे कीं, प्लेग टोंचून घेणें किंवा न घेणें ह्यासंबंधानें लोकांवर कोणत्याहि कारणानें सक्ती न करितां ती गोष्ट सर्वांशीं लोकांच्या खुषीवर सोंपविली पाहिजे. (At the same time His Excellency in Council adheres strictly to the principle, which he has continuously enjoined, that the choice whether or not, they will be inoculated must be left entirely to the people and complusion must on no account be resorted to.) प्लेग टोंचण्यासंबंधाचा कमिशनचा अभिप्राय व त्यावरील हिंदुस्थान सरकारचा ठराव हीं थोडक्यांत वर दिल्याप्रमाणें आहेत. प्लेग कमीशननें आपले जे सिद्धान्त म्हणून दिले आहेत त्याकडे केवळ जरी शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें तरी प्लेग टोंचण्याचा तोडगा अद्याप प्रयोगावस्थेंत आहे असेंच म्हणावें लागतें. हल्लीं बेळगांव–धारवाडकडे दोनदोनदां तीनतीनदां प्लेग टोंचण्याचा धडाका चालला आहे. यासंबं-

धानें कमिशनचा अनुकूल अभिप्राय दिसत नाहीं. प्लेग टोंचल्यानें किती दिवस प्लेगची भीति बाळगावयास नको हें ठरविण्यास बराच अनुभव घेतला पाहिजे असें त्यांचें मत आहे. किती तीक्ष्ण लस किती प्रमाणानें अंगांत घातली पाहिजे हें शोधून काढल्यास चांगलें होईल अशा तऱ्हेची त्यांची शिफारस आहे. प्लेग-पासून कांहीं अंशीं सुटका होण्यास या तोडग्याचा उपयोग होतो असें ते म्हणतात, पण यासंबंधाचं प्रमाण निश्चित करण्यास चांगल्या तऱ्हेचा अद्याप पुष्कळ पुरावा पाहिजे, अशाच आशयाचें त्यांचे उद्गार आहेत; म्हणजे वरील सर्व बाबींसंबंधानें कमीजास्ती प्रमाणानें अद्याप हा तोडगा प्रयोगावस्थेंत आहे असेंच त्यांचें मत असल्याविषयीं दिसतें. सर भालचंद्र व केसरी यांमध्यें जो वादविवाद झाला त्यामध्यें हा उपाय अद्याप प्रयोगावस्थेंत आहे, यासंबंधानें लोकांवर सक्ती करणें केव्हांहि इष्ट नाहीं असें जें आम्हीं प्रतिपादिलें होतें त्या मतासच कमिशनचे रिपोर्टानें अधिक बळकटी येते. कोणताहि उपाय प्रयोगावस्थेंतून निघून सुनिश्चित शास्त्रीय तत्त्वाचें त्याला स्वरूप येण्यास शेंकडों निरनिराळे प्रयोग करून पाहिले पाहिजेत व लक्षावधी लोकांवर त्यांचे प्रयोग करून अनुभव घेतले पाहिजेत. प्लेग टोंचून घेण्याच्यासंबंधानें अद्याप यावयास पाहिजे तितका अनुभव आलेला नाहीं व यासंबंधाच्या क्रियेची तत्त्वेंहि पूर्णावस्थेंत आलीं नाहींत हीच गोष्ट कमिशनचे रिपोर्टावरून चांगली दृष्टीस पडते. इनॉक्युलेशन हा एक तोडगा आहे, ह्यापासून आल्यास थोडाबहुत गुण येईल, कदाचित बरें वाईट कांहींच होणार नाहीं, एकादे वेळेला थोडकेंसें नुकसानहि होईल; पण प्लेगसारख्या भयंकर प्रळयाचे वेळीं औषधोपचारासंबंधानें चोहोंकडे पूर्ण अंधार असतो अशा स्थितींत तुम्हांला वाटल्यास हा लेचापेचा तोडगा करून घ्या, अशा प्रकारें लोकांस सांगणें निराळें व डॉ. भालचंद्र यांच्याप्रमाणें उगीच मोठ्यानें तुतारी वाजवून इनॉक्युलेशनची तळी उचलणें निराळें, हा भेद अवश्य लक्षांत ठेवला पाहिजे. प्लेग टोंचण्यापासून भावी दुष्ट परिणाम कांहीं थोडके होतात, पण ते प्लेगच्या लसीपासून नसावेत यासंबंधानें प्लेग कमिशननें दिलेल्या अभिप्रायावर आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, वरील प्रश्न जितक्या प्राधान्यंकरून कमिशनपुढें यावयास पाहिजे होता तितका आलेला नसून कमिशननें या प्रश्नाचें विवेचनहि केलेलें दिसत नाहीं. ह्या प्रश्नाकडे कमिशनचें काम चाललें असतां शास्त्रज्ञांचें किंवा लोकांचें विशेष लक्ष गेलें नव्हतें त्यामुळें कमिशनचें विवेचनांत ह्या प्रश्नास अत्यंत किरकोळ बाबतींत ढकलेलें आहे. प्लेग टोंचण्याच्या बुडाशीं शास्त्रीय तत्त्वें कोणतीं आहेत. डॉ. हाफकिन यांनीं कोणते व कसे प्रयोग करून पाहिले, इनॉक्युलेशनचे इष्ट परिणाम घडण्यासंबंधाचा ठिक-ठिकाणचा अनुभव काय आहे, ठिकठिकाणचे आंकडे कसे व किती चुकीचे आहेत, लोक कितपत राजी असतात इत्यादि गोष्टींसंबंधानें ह्या कमिशननें जसें सविस्तर, मुद्देसूद व पुराव्यासह विवेचन केलें आहे तशा प्रकारचें विवेचन

इनॉक्युलेशनच्या दुष्ट परिणामसंबंधाच्या तक्रारी ह्या मुद्यासंबंधानें केलेलें नाहीं. हा मुद्दा अलीकडे उपस्थित झालेला असल्यामुळें कमिशनचे रिपोर्टांत त्याला प्राधान्य नसावें ही गोष्ट साहजीक आहे. कमिशनचे सहजगत्या ज्या गोष्टी दृष्टीस पडल्या त्यासंबंधाचे कमिशनचे विचारांना सरकारी ठरावांत मात्र विशेष महत्त्व दिलें आहे. प्लेग टोंचल्यानें प्लेगशिवाय इतर रोगहि बरे झाले व ह्या तोडग्यामुळें इतर वाईट परिणाम उद्भवले या दोनहि मतांकडे कमिशननें एक प्रकारचें दुर्लक्ष केलें आहे. इतर मुद्यांच्या विवेचनास कमिशननें दिलेली जागा व त्याकरितां गोळा केलेला पुरावा ही पाहिली व वरील दोन मतांचा थोडक्यांत कसा उल्लेख केला आहे इकडे दृष्टी दिली, म्हणजे दुष्ट परिणामासंबंधाचा मुद्दा प्राधान्येंकरून कमिशनपुढें आला नसावा असें अनुमान काढणें भाग पडतें. ह्या मुद्यासंबंधानें खुलासेवार माहिती गोळा करण्याकरितां मुंबईसरकारनें कमिशन नेमावें म्हणून लोकांनीं वारंवार केलेली सूचना अमलांत येऊं नये हें सर्वांचें दुर्भाग्य होय.

प्लेग टोंचण्याचे तोडग्यासंबंधानें हिंदुस्थानसरकारचे ठरावापेक्षां प्लेग कमिशनचा रिपोर्ट विशेष महत्वाचा आहे. या रिपोर्टांत पुष्कळ माहिती भरलेली असून त्यापैकीं महत्त्वाच्या गोष्टींचें दिग्दर्शन येथें करणें जरूर आहे. रिपोर्टाचे आरंभीं देवी आलेल्यास पुनः देवी येत नाहींत ह्या अनुभवावरून देवी टोंचण्याची युक्ती कशी निघाली, एकाच्या शरीरांतील लस दुसऱ्याचे रक्तांत मिसळली असतां त्या लसीबरोबर सदर रोगाचें बीजासह त्या मनुष्याचें अंगांतील इतर विषहि जाण्याचा संभव असल्यामुळें गोस्तनशीतलेची युक्ती पुढें कशी काढण्यांत आली, कॉलरा टोंचणें, दूषित ताप टोंचणें इत्यादि गोष्टींकडे शास्त्रज्ञांचें लक्ष कसें लागलें व हीच कल्पना पुढें वाढून प्लेगचे सूक्ष्म जंतु निरोगी मनुष्याचें अंगांत घालण्याची डॉ. हाफकिन यांनीं युक्ती कशी काढली, इत्यादि गोष्टींचें शास्त्रीय रीतीनें थोडक्यांत विवेचन केलेलें आहे. या तोडग्याच्या शास्त्रीय उपपत्तीचें आम्ही पूर्वी विवेचन केलेंच आहे. मांसरसांत प्लेगचे जंतु ठेवले असतां ह्या जंतूपासून उत्पन्न होणाऱ्या विषाचा तवंग वर दृष्टीस पडतो. हें विष व प्लेगचे मृतजंतू ह्यांची लस बनविलेली असते व ह्या लसीमधील मृत जंतूमुळेंच प्लेगपासून बचाव होतो असें जंतुशास्त्रज्ञांचें मत आहे; प्लेगचे जंतूना मारण्याची डॉ. हाफकिन यांची क्रिया इतर जंतूच्या सूक्ष्म जंतूंना मारण्याच्या क्रियेसारखीच असून, ती निर्दोष आहे असें प्लेगकमिशनचें मत आहे. लॅन्सेट वगैरे मासिक पुस्तकांतील उतारे देऊन व इतर डॉक्टरांचे अभिप्राय दाखवून पूर्वी आम्ही असें प्रसिद्ध केलें होतें कीं, लस तयार करण्याचे क्रियेमध्यें प्लेगजंतु खरोखर मरतात किंवा नाहीं हें अद्याप शास्त्रीयरीत्या पक्कें सिद्ध झालेलें नसून मनुष्याचे रक्तांत ते मिसळले असतां कालांतरानें ते सजीव होण्याची भीति आहे. जंतुशास्त्रवेत्त्या कांहीं मंडळीनीं आपला असा अभिप्राय दिला आहे

कीं, राष्ट्रांत इनॉक्युलेशन सुरू करणें म्हणजे अदृश्य कारणामुळें पांचदहा वर्षांनीं कां होईना प्लेग अजीबात जो नाहींसा व्हावयाचा तो नाहींसा न होतां देवी, पटकी इत्यादि रोगांप्रमाणें किंचित् कमी जहर प्रमाणावर प्लेगचें देशांत कायमचें ठाणें बसविण्यासारखें होय. प्लेगचा जंतु किती ऊष्णतेनें मरतो हें युरोपांत अद्याप जंतुशास्त्रवेत्त्यांनीं मुकरर ठरविलेलें नाहीं. इतर तापाप्रमाणें प्लेगाच्या तापालाहि औषधोपचार करून ज्याप्रमाणें कांहींच निपन्न होत नाहीं असा डॉक्टरलोकांना अनुभव आला आहे त्याप्रमाणें इतर सूक्ष्मजंतूहून प्लेगाच्या सूक्ष्मजंतूची खुबी कांहीं न्यारीच आहे असें जंतुशास्त्रवेत्त्यांच्या अनुभवास येण्याचा संभव आहे. युरोपांत निदान शास्त्रज्ञांना या जंतूचें पक्कें स्वरूप अद्याप समजलेलें नाहीं व ह्या जंतूसंबंधानें दोन मतें आहेत ही गोष्ट निर्विवाद होय. अशा स्थितींत लस तयार करण्याच्या क्रियेसंबंधाचा वाद प्लेगकमिशनच्या रिपोर्टानें मिटला जाणें शक्य नाहीं.

प्लेग टोंचण्याच्या उपपत्तीसंबंधानें व लस तयार करण्याच्या क्रियेसंबंधानें बराच सविस्तर विचार केल्यानंतर ह्या उपायापासून लोकांचा कितपत बचाव झाला आहे या संबंधाचे आंकडे नीट बारकाईनें तपासण्यांत कमिशनच्या रिपोर्टाचा बराच भाग व्यापला आहे. कराची, बडोदें, धारवाड, हुबळी, बेळगांव, सातारा, बंगलोर, म्हैसूर इत्यादि ठिकाठिकाणच्या इनॉक्युलेशनसंबंधाच्या तक्त्यावर प्लेग कमीशननें बरीच खरमरीत टीका केली असून सदर तक्त्यांत दाखविलेलीं प्रमाणें चुकीचीं आहेत तेव्हां अर्थात त्यापासून काढलेलीं अनुमानेंहि विश्वसनीय नाहींत असें आपलें स्पष्ट मत दिलें आहे. प्लेगाच्या केसीस लपवून ठेवणें, प्लेगाच्या केसीस चोरणें, टोंचलेल्या मधील केस न टोंचल्यामध्यें नोंदणें, प्लेग टोंचल्यासंबंधाचीं खोटीं सर्टिफिकिटें पैदा करणें, टोंचलेले व न टोंचलेले यांची संख्या चुकीची धरणें, टोंचलेल्यांसंबंधानें पुढें विश्वसनीय माहिती न मिळविणें, टोंचलेले व न टोंचलेले यांमधील रहाणीचें अंतराकडे लक्ष न देणें, टोंचलेले व न टोंचलेले हे प्लेगसंबंधाची खानेसुमारी झाल्यावरहि गांवांत रहावयास आले असतां किंवा बाहेर गेले असतां त्यासंबंधाची नोंद बरोबर नसणें, एका ठिकाणीं लसीचें प्रमाण अमुक, तर दुसऱ्या ठिकाणीं लसीचें प्रमाण भलतेंच, इत्यादि अनेक कारणें पुढें मांडून प्लेग कमिशननें वरील ठिकाणचे तक्ते विश्वसनीय नाहींत असा शेरा मारला आहे. खुद्द डॉ. हाफकिन यांनीं ज्या लोकांना प्लेग टोंचला त्या लोकांच्याहि पुढील स्थितीवर मुंबईसारख्या शहरीं ठेवावयास पाहिजे तितकें लक्ष ठेवतां येणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं तयार केलेले तक्तेहि विशेष विश्वसनीय मानतां येत नाहींत. उमरखाडी तुरुंग, भायखळा तुरुंग, बंगलोर येथील नेटिव्ह सैन्य व बेळगांव येथील नेटिव्ह सैन्य ह्यांना इनॉक्युलेशन करण्यांत आलें. व ह्या ठिकाणीं पूर्वीची स्थिती काय होती, व पुढें काय झाली, एकंदर कितीनीं इनॉक्युलेशन केलें, कितीनीं केलें नाहीं ह्यासंबंधानें विश्वसनीय माहिती मिळणें

साहाजिक होतें व ती मिळालेली आहे. लष्करी अंमलदारांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं लष्करचे लोक दररोज असल्यामुळें व त्याचप्रमाणें जेलरचे दृष्टीखालीं तुरुंग असल्यामुळें तेथील आंकड्यांत शहरच्या इतर आंकड्यांप्रमाणें भेंसळ असण्याचा संभव नाहीं. तथापि बेळगांवच्या पलटणीसंबंधाच्या आंकड्यांवर प्लेगकामिशनचा विशेषसा विश्वास नाहीं. कारण या पलटणीसंबंधानें दोन साहेबांनीं दोन निरनिराळ्या प्रकारचे तक्ते कामिशनपुढें सादर केले आहेत. तुरुंगांतील लोकांच्या स्थितीवर इनॉक्युलेशनचा काय परिणाम होतो हें पाहण्यापेक्षां स्वच्छ हवेंत राहणारे, प्रत्येकाची राहण्याची व्यवस्था बहुतेक अंशीं सारखी, सर्वांची प्रकृति सारखी असून बहुतेक चांगले सदृढ, खाण्यापिण्यासंबंधानें, व औषधोपचारासंबंधानें सरकारची दररोजची काळजी असल्यामुळें, पथ्यपाणींच मिळालें नाहीं डोसच चुकला अशी कांहींना कांहीं कारणें ज्यांच्यासंबंधानें पुढें आणतां येत नाहींत अशा पलटणींतील शिपायांसंबंधानें इनॉक्युलेशनचा कितपत उपयोग झाला हें पहाणें जरूर आहे. बंगलोर येथील पलटणींतील लोकांपैकीं प्लेग टोंचलेले व न टोंचलेले यांमध्यें अवांतर सर्व गोष्टी विचारांत घेऊन प्लेग कमिशनने खालील तुलना केली आहे.

	संख्या	प्लेग केसेस		प्लेगपासून मृत्यु	
		किती	शेंकडा प्रमाण	किती	शेंकडा प्रमाण
टोंचलेले	४४६	८	१-७	७	१-५
न टोंचलेले	२४५४	२८	१-१	१८	-७

टोंचलेले व न टोंचलेले या दोघांची स्थिती सारखी असतां प्लेग टोंचल्यापासून कितपत फायदा होतो हें वरील आंकड्यांपासून चांगलें दिसणारें आहे. प्लेग कमीशनचें रिपोर्टांत ठिकठिकाणचे जे आंकडे दिले आहेत व त्यावर जे आक्षेप घेतलेले आहेत तशा प्रकारचे आक्षेप वरील तक्त्यासंबंधानें पुढें आलेले नाहींत. यासंबंधानें प्लेग कामिशनचें इतकेंच म्हणणें आहे कीं, टोंचलेले व न टोंचलेले यांची परस्परांशीं तुलना करण्यास हे आंकडे योग्य असले तरी स्वच्छते-

संबंधानें हरएक प्रकारच्या सोई लष्करांत असल्यामुळें प्लेगशीं झगडण्यांत प्लेग टोंचण्याचा कितपत उपयोग होतो हें यावरून चांगलेंसें समजणार नाहीं. चॅपेल शाहींतील तक्तयासंबंधानें प्लेग कमिशननें ठिकठिकाणीं केलेली टीका पाहून धारवाड, हुबळी बेळगांव येथील आंकड्यांवरून इनॉक्युलेशनची वर्तमानपत्रांतून तळी उचलून धरणारांना आपलीं पूर्वीचीं विधानें पुनः एकदां तपासण्याविषयीं सूचना केल्यावाचून आमच्यानें राहवत नाहीं. प्लेग कमिशननें एकंदरींत इनॉक्युलेशनपासून कांहीं फायदा आहे असें जरी म्हटलें आहे, तरी त्यांचें मत इनॉक्युलेशनचे भारभर पोवाडे गाणाऱ्यांहून कांहीं भिन्न असल्याचें दिसतें. इनॉक्युलेशनपासून कांहीं उपयोग होणार नाहीं, सर्वथैव तें वर्ज आहे असा कोणाचाहि केव्हांहि हट्ट नव्हता. आमचें पहिल्यापासून असें म्हणणें आहे कीं, प्रयोगावस्थेंत जोंपर्यंत हा उपाय आहे तोंपर्यंत सक्तीची खुषी किंवा खुषीची सक्ती, ह्या नाहींतर त्या नांवाखालीं लोकांना प्लेग टोंचून घेणें भाग पाडणें केव्हांहि इष्ट नाहीं. दोनदोनदां तीनतीनदां प्लेग टोंचून घेतल्यानंतरहि प्लेग होऊन लोक मरतात व असल्या मृत्यूंचे आंकडे इनॉक्युलेशनची तरफदारी करणारे जितके अल्प दाखवितात तितके अल्प नाहींत हें प्लेग कमिशनच्या रिपोर्टावरून स्पष्ट दिसून येईल. ठिकठिकाणच्या इस्पितळांतहि एक एकदां दोनदोनदां टोंचून घेतल्यानंतर प्लेगनें पछाडलेले रोगी गेलेले आहेत व ह्यासंबंधानेंहि रा. रा. गुरुजी यांनीं तक्ते प्रसिद्ध केले आहेत. धारवाड, गदग, बंगलोर, म्हैसुर इत्यादि ठिकाणचे इस्पितळांत टोंचलेले व न टोंचलेले किती मेले याचें प्रमाण दाखवून टोंचलेल्यांपेक्षां न टोंचलेले दिढी दुपटीनें अधिक मरतात असें कमिशननें सिद्ध केलें आहे. प्लेग झाल्यानंतर पूर्वी प्लेग टोंचला असला तर मरणाची भीति जितकी कमी असते तितकी प्लेग टोंचल्यावर मुळींच प्लेग न होण्याची नसते असें प्लेग कमिशनचें मत आहे. प्लेग टोंचण्यासंबंधाचा विषय बराच वादग्रस्त असल्यामुळें; प्लेग कमीशनचा रिपोर्ट विस्तृत असल्यामुळें व हा लेख फार लाबल्यामुळें, आजच्या खेपेस येथेंच मुक्काम करणें जरूर आहे. या रिपोर्टाकडे पुनः एकवार फिरण्याचा मानस आहे.



* दुष्काळांत साऱ्याची तहकुबी व सूट

ह्या विषयासंबंधानें कुलाबा जिल्ह्यांतील एका बातमीदाराकडून आलेलें पत्र दुसरीकडे छापलें आहे. त्यावरून यंदाचें दुष्काळाचें सालींहि मंबईसरकार मागील दुष्काळाप्रमाणें साऱ्याच्या तहकुबीच्या बाबतींत कंजूषपणा दाखवून आपला हट्ट पूर्ववत् चालविणार अशी भीति वाटत आहे. मंबईसरकारचें या बाबतींतील वर्तन किती अन्यायाचें व दांडगाईचें आहे याबद्दल १८९६।९७ चे दुष्काळाचे वेळीं आम्हीं पूर्ण विवेचन केलें होतें. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत या प्रश्नासंबंधानें जो वादविवाद व चर्चा झालेली आहे ती येथें दाखल करून यापुढें लोकांनीं काय करावें हें आज थोडक्यांत सांगण्याचा आमचा विचार आहे. गेल्या दोन वर्षांतील मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे सन १८९७ सालीं बसलेल्या दुष्काळ कमिशनचा रिपोर्ट ही होय. सन १८९६।९७ सालीं दुष्काळनिवारणार्थ फॅमिन कोडाप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांत जी व्यवस्था करण्यांत आली ती बरोबर आहे किंवा चुकीची आहे, चुकीची असल्यास ती सुधारण्यास कोणते उपाय करावे वगैरे गोष्टींचा विचार करण्याकरितां हें कमिशन हिंदुस्थानसरकारकडून मुद्दाम नेमण्यांत आलें होतें. या कमिशननें सर्व देशभर हिंडून निरनिराळ्या लोकांच्या साक्षी घेतल्या आणि सरकारी कागदपत्र पाहून १८९८ च्या आक्टोबर महिन्यांत आपला समग्र रिपोर्ट प्रसिद्ध केला. ह्या रिपोर्टांत सन १८९६।९७ सालीं मुंबईसरकारनें मंबई इलाख्यांत जी दुष्काळव्यवस्था ठेवली तिचें चांगलें परीक्षण करून त्यांत दोष कोणते कोणते होते याबद्दल कमिशननें आपला अभिप्राय दिलेला आहे. मुंबईसरकार आणि सार्वजनिकसभेसारख्या किंवा वर्तमानपत्रासारख्या स्वतंत्र संस्था याच्या दरम्यान १८९६।९७ च्या दुष्काळव्यवस्थेबद्दल बराच मतभेद होता हें त्या वेळची हकीगत ज्यांनीं वाचली असेल त्यांस माहीत असेलच. लॉर्ड सँढर्स्ट हे दुष्काळग्रस्त लोकांची स्थिती डोळ्यांनीं बघण्याकरितां इकडून तिकडे आणि तिकडून इकडे बरेच वेळां गेले ही गोष्ट खरी आहे. पण दुष्काळाची व्यवस्था कशी राखावी यार्चे घोरण आ. मि. न्यूजंट अथवा मि. मॉंटिथ यांच्या सारख्यांच्या हातांत असल्यानें लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या येरझारांपासून लोकांस कोणत्याहि प्रकारचा विशेष फायदा झाला नाहीं, व तो त्यांस करून देण्याइतकी लॉर्ड साहेबांच्या अंगांत धमकहि नव्हती. असो; गेल्याचा वृथा शोक करीत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या जागीं नवे गव्हर्नर आलेले आहेत

---

* [केसरी ता. १३ मार्च १९००]

आणि त्यांतल्या त्यांत विशेष समाधानाची गोष्ट ही कीं, ज्या बाबतींत सरकार आणि सार्वजनिक संस्था यांजमध्यें मतभेद होता त्या बाबींचें परीक्षण होऊन त्यांत खरा पक्ष कोणता याचा गेल्या फॅमिन कामिशननें निर्णय केलेला आहे. हाच निर्णय अंगिकारून लॉर्ड नॉर्थकोट यांनीं हल्लींच्या दुष्काळव्यवस्थेचें धोरण ठेवल्यास त्यांचे लोकावर घुष्कळ उपकार होतील. सरकारी बाजू खरी कीं लोकांची बाजू खरी याचा निर्णय करणें मोठें कठीण असतें; आणि सरकारी अधिकारी थोडे दुराग्रही आणि फाजील असले म्हणजे स्वपक्षसमर्थनार्थ लोकांच्या वतीनें भांडणाऱ्या गृहस्थांवर नसते आरोप करण्यासही ते मागें घुढें पहात नाहींत. अशा स्थितींत आपलें डोकें शांत ठेवून खऱ्याखोट्याचा निर्णय करणें हें इलाखाधिपतीचें मुख्य काम होय. लॉर्ड सँढर्स्ट यांनीं ही कामगिरी बजाविली नाहीं. इतकेंच नव्हे तर, गैर माहितीनें किंवा सौजन्यानें त्यांनीं खालील अधिकारीवर्गाच्या कृतीसच होईल तेवढें उत्तेजन दिलें. लॉर्ड नॉर्थकोट यांच्या हातून अशा प्रकारची चूक घडणार नाहीं. अशी आम्हांस बळकट आशा आहे; व या साठींच याविषयाचा घुनः उहापोह करण्याचें आज आम्हीं योजिलें आहे.

दुष्काळच्या सालीं शेतकरी लोकांस साऱ्याची सूट देण्याची वहिवाट आजकालची नाहीं. पूर्वी पेशवाईत किंवा त्याच्या मागच्या राज्यांतहि दुष्काळच्या सालीं साऱ्याची सूट मिळत असे ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. सन १८७६ सालीं जो एक मोठा दुष्काळ पडला त्या दुष्काळांत मुंबईसरकारनें या इलाख्यांतील शेतकऱ्यांस साऱ्याची बरीच सूट दिली होती. त्या वेळीं मुंबई सरकारचें वर्तन इतकें उदार होतें कीं, ज्या ठिकाणीं आठ आण्यांहून जास्त परंतु बारा आण्यांहून कमी याप्रमाणें पीक बुडालें असेल तेथें एक हप्त्याची आणि ज्या ठिकाणीं बारा आण्यांहून जास्त पिकास धक्का पोंहोचला असेल त्या ठिकाणीं दोन्ही हप्त्यांची सूट देण्याबद्दल सन १८७६ सालीं मुंबईसरकारनें ठराव केला होता. या ठरावान्वयें त्या सालीं ज्या जिल्ह्यांचा सारा १४० लाख होता त्या जिल्ह्यांत सव्वादोन लक्षांची साऱ्याची सूट आणि ५० लक्षांची तहकुबी देण्यांत आली. पण सन १८९६।९७ सालीं हें औदार्य दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. १८९६।९७ चा दुष्काळ १८७६ च्या दुष्काळापेक्षां अधिक कडक होता, ही गोष्ट खुद्द मुंबईसरकारासहि मान्य आहे. परंतु या दुष्काळांत दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा एकंदर वसूल १७३ लाख असून पैकीं सुमारें १५००० रुपयांची सूट आणि ७८३००० रुपयांची तहकुबी देण्यांत आली. खालीं दिलेल्या कोष्टकावरून ही गोष्ट वाचकांच्या चांगली लक्षांत येईल.

साऱ्याची तहकुबी व सूट.

दुष्काळ साल	दुष्काळग्रस्त जिल्ह्यांची एकंदर जमाबंदी	पैकी सूट रु.	तहकूब सारा रु.
१८७६ सा. दु.	१,४०,००,०००	२,२५,०००	५०,००,०००
१८९६ ,, ,,	१,७३,००,०००	१५,१६१	७,८३,२९६

सन १८९६ सालीं साऱ्याच्या तहकुबीच्या आणि सुटीच्या संबंधानें इतका कंजुषपणा कां दाखविण्यांत आला यार्ची कारणें येथें समग्र सांगणें अशक्य आहे. सन १८७६ सालानंतर पहिलें फॅमिन कमिशन बसलें, तेव्हां त्यांत साऱ्याच्या सुटीचा व तहकुबीचा विचार होऊन असें ठरलें कीं, साऱ्याची एकदम सूट देणें वाजवी नाहीं. कारण चांगलीं आणि वाईट सालचीं पिकें जमेस धरून त्यांच्या सरासरीवरच साऱ्याचें प्रमाण ठरविलें असतें. परंतु कमिशननें त्याजबरोबर दुसरी अशी सूचना केली कीं, ज्या ठिकाणीं चार आण्याहून जास्त पीक आलें नसेल तेथें साऱ्याची तहकुबी देण्याची सरकारनें पहिल्यापासूनच सढळ हातानें तजवीज ठेवली पाहिजे. सारांश, दुष्कांळांत सूट नाहीं तर साऱ्याची तहकुबी तरी देणें जरूर आहे असा कमिशननें आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे; व हाच अभिप्राय लक्षांत घेऊन फॅमिन कोडमध्यें असें कलम घातलें आहे कीं, दुष्काळाचे वेळीं सरकारी सारा भरण्याकरितां कर्ज काढण्याची कोणावरहि पाळी आणूं देऊं नये. सन १८९६ सालीं सार्वजनिक सभा आणि मुंबईसरकार यांच्या दरम्यान दुष्काळव्यवस्थेसंबंधानें जो मतभेद होता त्यापैकीं एक मुद्दा या प्रकरणास अनुलक्षूनच होता. सभेचें म्हणणें असें होतें कीं, दुष्काळाचे वेळीं साऱ्याची सूट व तहकुबी देणें हें सरकारचें कर्तव्य आहे; त्याप्रमाणें सन १८७६ सालीं मुंबईसरकारनें साऱ्याची सूट व तहकुबी दिली आहे आणि १८९६ सालींहि तशीच दिली पाहिजे. फॅमिन कमिशनच्या रिपोर्टानें जर कांहीं फरक झाला असला तर तो एवढाच कीं, पाहिल्या प्रथम साऱ्याची सूट न देतां तहकुबी द्यावी. सभेचें हें म्हणणें साधारण सयुक्तिक व सरळपणाचें होतें; पण मुंबईसरकार अथवा दुष्काळाची व्यवस्था ज्यांच्या हातांत होती असे सर-

कारचे त्यावेळचे अधिकारी ह्यांस हें म्हणणें त्या वेळीं पसंत पडलें नाहीं. साऱ्याची सूट होईल तितकी कमी दिली पाहिजे असा त्यांनीं आपल्या मनाशीं ठराव केला होता; आणि त्याच ठरावाची अंम्मलबजावणी जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांकडून करविण्यांत आली. ज्या जिल्ह्यांत दोन आणे देखील पीक आलें नव्हतें, तेथेंहि सर्व सारा वसूल करण्यांत आला. कांहीं कांहीं ठिकाणीं तर इतकी सक्ती करण्यांत आली कीं, अम्मलदारांनीं दोन हप्त्याऐवजीं एकच हप्त्यांत सर्व वसूल केला. या दांडगाईचा दोष जिल्ह्याचे अधिकाऱ्यांकडे नाहीं हें आम्हीं जाणून आहों. कारण हे अधिकारी म्हणजे या बाबतींत सरकारचे निव्वळ ताबेदार होत. साऱ्याची सूट किंवा तहकुबी कितपत देण्याचा सरकारचा विचार आहे हें खालील अधिकाऱ्यांस कळलें म्हणजे अर्थातच ते त्या धोरणानें रयतेशीं वागूं लागतात. चार आण्यापेक्षां जास्त पीक आलें नसल्यास ऐपतदार कुळांखेरीज इतरांना जरूर वाटेल त्याप्रमाणें साऱ्याची तहकुबी द्यावी असा जरी दिसण्यांत सरळ सरकारचा हुकूम असला तरी त्यांतल्या अंतस्थ मेखा खालील अधिकाऱ्यांच्या ताबडतोब लक्षांत येतात आणि मग " ऐपतदार कोण " अथवा " जरूर कोणास आहे " इत्यादि प्रकारचे वेडेवांकडे प्रश्न सुरू होतात. याचा अखेर परिणाम असा होतो कीं, गरीब शेतकऱ्यांस दुष्काळाच्या वेळीं कर्ज काढून सरकारचावडी भरावी लागते. सन १८९६ सालीं अशा प्रकारचा प्रसंग कित्येक लोकांवर आला होता हें रा. रा. घरत यांनीं कुलाब्याचे कलेक्टर यांस सप्रमाण कळविलें होतें; पण तिकडेहि सरकारनें ढुंकून पाहिलें नाहीं. उघडच आहे. निजलेल्यास जागें कोणी तरी करील, जाग्यास जागें कोण करणार ?

सार्वजानिक सभा या बाबतींत सरकारास अर्ज करूनच राहिली नाहीं, तर गरीब शेतकरी लोकांसहि फॅमिन कोडांतील व्यवस्था व हक्क समजून देण्याचा तिनें प्रयत्न केला. त्यामुळें साऱ्याची सूट अथवा तहकुबी मिळण्याबद्दल शेतकऱ्यांकडून सरकाराकडेहि बरेच अर्ज त्या सालीं करण्यांत आले. साऱ्याची सूट किंवा तहकुबी न देण्याचा सरकारचा आधींच निश्चय झालेला होता, तथापि अर्जदारांचें म्हणणें गैरशिस्त किंवा गैरकायदा आहे असें सरकारास म्हणतां येईना. तेव्हां त्यांनीं अशी तोड काढली कीं, " तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील " साऱ्याची सूट मागण्यास लोकांस कोणीतरीं चिथावीत आहे, लोक आपण होऊन ती मागत नाहींत अशा क्लिष्ट व कुत्सित कल्पना काढून मुंबई-सरकारानें त्यावेळीं रयतेच्या हक्कांकडे आणि सुखाकडे जाणून बुजून दुर्लक्ष केलें. वास्तविक पाहिलें असतां दुष्काळाचे वेळीं साऱ्याची सूट देणें ही सरकारच्या खुषीची गोष्ट नव्हे, तर त्यांचें कर्तव्य होय. हें कर्तव्य करण्याचें १८९६ सालीं सरकारनें जाणून बुजून सोडून दिलें आणि 'न कर्त्याचा वार शनवार' या न्यायानें

या चुकीबद्दलची जबाबदारी या बाबतींत चळवळ करणारांच्या माथ्यावर टाकून आपली कृती योग्य आहे, असें वरिष्ठ सरकारास भासविण्याची खटपट केली. सरकारचें म्हणणें रास्त नव्हतें हें वर सांगितलेंच आहे. पण निव्वळ अधिकाराच्या जोरावर गरीब रयतेच्या विनवणीकडे लक्ष देण्याचें त्यांनीं नाकारलें, इतकेंच नव्हे तर या बाबतींत सरकारचें व लोकांचें खरें कर्तव्य काय आहे हें लोकांस चांगल्या रीतीनें समजून देणाऱ्या गृहस्थांवरहि त्यांची मर्जी खप्पा होऊन गेली. सन १८९७ चें फॅमिन कमिशन बसण्यापूर्वीची या बाबतींतली हकीकत वर सांगितल्याप्रमाणें आहे.

मुंबईसरकार आणि सार्वजनिक सभा यांच्या दरम्यान साऱ्याच्या सुटी व तहकुबीबद्दल जो हा तंटा पडला होता त्याचा निकाल लावण्यास कोणीतरी एका तिऱ्हाईत पचाची जरूर होती. कारण त्या वेळचे गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांनीं न्यायाधिशाचें काम सोडून देऊन बुढ्या कौन्सिलदाराचें तरुण एकनिष्ठ शिष्य बनण्याचें व्रत अंगिकारलें होतें. सन १८९७ चें फॅमिन कमिशन यानें ही उणीव दूर झाली. या कमिशनपुढें ज्या साक्षी झाल्या त्यांत रा. रा. घरत अथवा घुणें सार्वजनिक सभेचे चेअरमन यांच्याहि साक्षी झाल्या होत्या. त्यावरून मुंबई इलाख्याच्या दुष्काळव्यवस्थेंतील दोष कमिशनच्या सहज नजरेस येण्यासारखे होते. कोष्टी लोकांस कोष्टयांच्या धंद्याची कामें देण्याची व्यवस्था मुंबईसरकारानें केली नाहीं ही सरकारची चूक झाली असा कमिशननें आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे. पण त्याबद्दल आज विचार कर्तव्य नाहीं. साऱ्याच्या सुटीच्या व तहकुबीच्या बाबतींत कमिशननें काय अभिप्राय दिला आहे हें आपणास पहावयाचें आहे. कमिशनानें सरकारची व लोकांची अशा दोन्ही बाजू ऐकून घेऊन दोन्ही पक्षांचा पुरावा घेतला होता. या सर्व घुराव्याचा विचार करून मुंबईसरकारच्या या बाबतींतल्या वर्तनावर कमिशननें जो अभिप्राय दिला आहे तो येणेंप्रमाणें आहे:—

The very small suspensions and remissions of land revenue granted in the distressed districts seem the most questionable feature of the scheme of relief adopted. It would appear that the Bombay Government has given up its old principle of treating all the revenue payers of a village alike in the matter of suspensions and remissions. ..... Though Government gave out in its orders that no one was to be pressed to pay who could not pay without borrowing, it is difficult to belive that the majority of the smaller land—holders did not have to borrow to pay the revenue in such a year.

कमिशनचा हा अभिप्राय पाहून मुंबईसरकारनें १८९६ सालीं साऱ्याची बरीच

बरीच मोठी सूट किंवा तहकुबी न देण्यांत निव्वळ दांडगाई केली असें जें आम्ही वर म्हटलें आहे तें कोणाच्याहि प्रत्ययास आल्याखेरीज राहणार नाहीं. अधिकाराच्या जोरावर सार्वजनिक सभेचें तोंड जसें सरकारनें बांधून टाकलें त्याप्रमाणें फॅमिन कमिशनचें तोंड त्यास बांधतां आलें नाहीं. पुण्यास उत्पन्न झालेल्या चळवळीमुळें सरकारास फाजील कडकपणा अंगिकारावा लागला अशी सबबहि सरकारतर्फे कमिशनपुढें दाखविण्यांत आली होती. पण कमिशननें तिला फारसें महत्त्व दिलें नाहीं. उलट त्यांनीं आपला अभिप्राय असा दिला कीं, "मुंबई सरकारच्या दुष्काळव्यवस्थेंत विशेष दोषार्ह गोष्ट म्हटली म्हणजे त्यांनीं साऱ्याची सूट व तहकुबी या बाबतींत दाखविलेला कंजुषपणा ही होय. गांवांतील कुळांमध्यें भेदाभेद न करतां फक्त पिकाच्या मानानें साऱ्याची सूट व तहकुबी देण्याची जुनी वहिवाट मुंबई सरकारानें सोडून दिली असें उघड दिसून येतें. सरकारी हुकुमांत कोणावरहि कर्ज काढून सारा देण्याचा प्रसंग आणूं नये असें स्पष्ट लिहिलें आहे; पण सारा भरण्याकरितां पुष्कळ लहान लहान शेतकरी लोकांस कर्ज काढावें लागलें नाहीं असें मानतां येणें कठीण आहे." कमिशनचा हा अभिप्राय जितका असावा तितका स्पष्ट आणि खुलासेवार दिला आहे. ऑ. मि. न्यूजंट व मि. मॉंटिथ अथवा मुंबई सरकार यांनीं सन १८९६ सालीं साऱ्याच्या सुटीबद्दल व तहकुबीबद्दल जे हुकूम दिले ते गैरशिस्त होते असें कमिशनच्या शिक्क्यामोर्तबाच्या मापानें आतां निर्विवाद ठरलें आहे. सार्वजनिक सभेच्या अर्जांत तरी हीच गोष्ट नमूद केली होती; परंतु अधिकाराच्या जोरावर लॉर्ड सॅंढर्स्ट यांच्या गोडव्या कारकीर्दींत जरी सत्याचा क्षणभर पाडाव झाला तरी अखेरीस इंडियन फॅमिन कमिशनकडून खरा पक्ष कोणता याचा योग्य तोच निर्णय करण्यांत आला. लॉर्ड सॅंढर्स्ट यांच्या कारकीर्दींतील दुष्काळव्यवस्था सर्वांशीं निर्दोष होती असें प्रतिपादन करणारांनीं वर दाखल केलेला कमिशनचा अभिप्राय अवश्य वाचावा अशी आमची त्यास शिफारस आहे. एकीकडे शेतकऱ्यांस सावकाराच्या कर्जांतून मुक्त करण्याकरितां नवे नवे कायदे करण्याची धडपड एकसारखी चालू ठेवावयाची आणि दुष्काळाच्या वेळीं सरकारी सारा भरण्याकरितां कर्ज काढण्याची पाळी शेतकऱ्यावर आणावयाची हें सरकारचें करणें किती शहाणपणाचें आहे, याचा सरकारनेंच विचार करावा. १८९७ च्या फॅमिन कमिशननें यासंबंधानें आपला अभिप्राय खालीं लिहिल्याप्रमाणें दिला आहेः—

The duty and policy of making such remissions to the land-holders in years of absolute and abnormal failure of crops from any cause is an old obligation on the State, based on its original title to take land revenue.....We take this opportunity of remarking that any want of proper liberality in granting these remissions in

times of great loss of crops and cattle would in our opinion, be inconsistent with the present policy of readiness to make great changes of laws and regulations in the hope of saving the agricultural classes from indebtedness. This seems plain, but with a strongly departmental system of Government such an inconsistency is not impossible. Each department is apt to find reasons for its own hard and fast rules, though it is apt to cry out against the rigidity of those of other departments.

वरील अभिप्राय वाचून तरी मुंबईसरकारचे या वेळेस डोळे उघडतील अशी आम्हांस उमेद आहे. " सरकारास जमीनीवर सारा घेण्याचा हक्क ज्यामुळें प्राप्त झाला आहे त्याच कारणामुळें पिकें बुडालीं असतां कुळांस साऱ्याची सूट देण्याची जवाबदारीहि सरकारच्याच माथ्यावर फार प्राचीन काळापासून आलेली आहे. शेतकऱ्यांस कर्जातून मुक्त करण्याकरितां नवे नवे कायदे करणारांनीं दुष्काळाचे वेळीं साऱ्याची सूट देण्यांत कंजुषगणा दाखवावा हें तर अत्यंत विलक्षण आणि परस्परविरुद्ध होय. ही गोष्ट कां घडावी याबद्दल प्रथम थोडें आश्चर्य वाटतें. पण सरकारची खातेवार काम करण्याची पद्धत लक्षांत आणली असतां त्याचा सहज उलगडा होतो. प्रत्येक खात्यांतील अधिकारी आपल्या खात्यांतील नियम कितीहि कडक असले तरी ते सयुक्तिक आहेत आणि दुसऱ्याच्या खात्यातील मात्र कडक आहेत, असें दाखविण्याचा स्वभावतःच प्रयत्न करीत असतात " असें वरच्या उताऱ्यांत कमिशननें स्पष्ट म्हटलें आहे. यावरून मुंबईसरकारची साऱ्याची सूट होईल तितकी कमी देण्याबद्दलची १८९६ सालची पद्धत पूर्वापार वहिवाटीसच नव्हे, तर त्यांच्या कर्तव्यासहि सोडून आहे असें उघड उघड सिद्ध होतें. आतां आमची

लॉर्ड नार्थकोट यांस विनंति

अशी आहे कीं, त्यांनीं या महत्त्वाच्या बाबतींत एकवार मन घालून सन १८९७ च्या फॅमिन कमिशनचें म्हणणें अमलांत येईल अशी तजवीज करावी. सरकारी अधिकाऱ्यांचा पक्ष खरा कीं लोकांचा पक्ष खरा याचा निर्णय करणें नव्या गव्हर्नरास कठीण पडतें हें आम्हीं जाणून आहों. कारण कोणीहि नवा गव्हर्नर आला म्हणजे या इलाख्यांत वीस वीस पंचवीस पंचवीस वर्षें काम केलेले त्यांचे वृद्धकपी कौन्सिलदार त्यास असें सांगतात कीं, " आमच्या अनुभवानें आम्हांस ही गोष्ट बरोबर वाटते, तुम्हांस वाटत नसल्यास ती फिरविण्याची जबाबदारी तुम्ही आपल्या अंगावर घ्यावी. " वृद्ध व अनुभवशीर सल्लागारांची याप्रमाणें मसलत मिळाल्यावर ती बाजूस ठेऊन स्वतःच्या धमकीवर काम चालविण्याचें साहस थोड्याच गृहस्थांच्या अंगांत असतें. तेव्हां प्रायः नवे गव्हर्नर बड्या अधिकाऱ्यांच्याच

नेत्यानें चहिल्यानें चालत असतात. लॉर्ड नॉर्थकोट यांच्या किंवा आमच्या सुदैवानें प्रस्तुतच्या बाबतींत तरी अशा प्रकारचा पेंच आज राहिला नाहीं ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. दुष्काळाचे वेळीं साऱ्याची सूट व तहकुबी बरोच मिळाली पाहिजे असें रयतेचें म्हणणें आहे. आणि सरकारी अधिकारी यांचें मत ही सूट होईल तितकी कमी द्यावी असें आहे. यापैकीं खरा पक्ष कोणता याचा फॅमिन कमिशननें अनायासेंच नुक्ताच गेल्या सालीं निकाल केला आहे. आतां हा निकाल अमलांत आणणें एवढेंच कायतें काम उरलें आहे. तें काम लॉर्ड नॉर्थकोट यांच्या हातून सिद्धीस जाईल अशी आम्हांस उमेद आहे. पुण्यांतील चळवळीची सबब सांगून सन १८९६ सालीं मुंबईसरकारानें नुसती दांडगाई केली या गोष्टीस आतां जास्त पुरावा देण्याची जरूर राहिली नाहीं. ही चूक दुरुस्त करणें हें सरकारचें कर्तव्य तर खरेंच, पण ठिकठिकाणच्या लोकांनीं वर सांगितलेले फॅमिन कमिशनचे अभिप्राय सरकारच्या नजरेस आणून सरकारास हल्लींचे दुष्काळाचे सालीं साऱ्याची सूट सढळ हातानें देण्याबद्दल विनंति करणें हें लोकांचेंहि कर्तव्य होय. सन १८९६ सालीं सरकारनें आपली विनंती मान्य केली नाहीं, म्हणून यंदाचे सालीं उगीच बसणें वाजवी नाहीं. सन १८९६ सालीं सरकारची चूक झाली हें आतां राजरोस ठरलें आहे व हीच चूक सरकार पुन्हां करील असें समजणें म्हणजे सरकारच्या पदरीं निदान सध्यां तरी विनाकारण दुराग्रहाचें व मूर्खपणाचें माप बांधण्यासारखें आहे. तसें न करितां लोकांनीं आपली बाजू पुनः नीट रीतीनें सरकारपुढें मांडावी अशी त्यांस सूचना करून आणि सरकारहि त्याचा कमिशननें म्हटल्याप्रमाणें समदृष्टीनें विचार करील अशी आशा प्रदर्शित करून हा लेख संपवितों.

❖ ❖ ❖

* दुष्काळाची व्यवस्था

पंधरा दिवसांपूर्वीं ' दुष्काळांत साऱ्याची तहकुबी व सूट ' यासंबंधानें आम्हीं जो एक लेख लिहिला होता त्याबद्दल बरेच ठिकाणांहून पत्रें आलेलीं आहेत. त्यांस उत्तर गेल्याच अंकीं द्यावयास पाहिजे होतें, पण स्थलसंकोचास्तव तसें करतां आलें नाहीं. दुष्काळाची व्यवस्था हा विषय फार महत्त्वाचा व सध्यांच्या वेळीं तर अत्यंत उपयुक्त व जरुरीचा आहे. १८९६ सालच्या दुष्काळपेक्षांहि यंदांचा दुष्काळ भयंकर आहे हें खुद्द सरकारनेंच कबूल केलेलें आहे. या महिन्याच्या १० व्या तारखेपर्यंत मुंबईइलाख्यांत दुष्काळाचे कामावर मजुरदार व त्यांच्यावर अवलंबून राहणारे मिळून बारा लाख लोक होते व खेरीज गांवोगांवीं ज्यांस फुकट शिधा देण्यांत येतो असे ९२००० लोक आहेत. म्हणजे हल्लींच्या दुष्काळांत मुंबई इलाख्यांत सरकार १३ लक्ष माणसांना पोशीत आहे असें उघड दिसून येतें. इतक्या लोकांच्या पोटापाण्याची नीट व्यवस्था ठेवणें म्हणजे कांहीं लहानसहान काम नव्हे हें आम्हीं समजत नाहीं असें नाहीं. पण ज्या अर्थीं सरकारनें केवळ दुष्काळाप्रीत्यर्थ एक कर बसवून त्याच्या उत्पन्नांतून दुष्काळांत लोकांस मदत करण्याचें काम आपण होऊन आपल्या शिरावर घेतलें आहे त्या अर्थीं तें काम होईल तितक्या चांगल्या रीतीनें पार पाडणें हें लोकांस हितावह आहे, इतकेंच नव्हे तर सरकारचेंहि मुख्य कर्तव्य आहे. फॅमिन कोड व फॅमिन कमिशन ह्यांनीं जे नियम घालून दिले आहेत ते दुष्काळाची व्यवस्था सरकारचे हातून सुयंत्रित रीतीनें चालावी एवढ्याचकरितां होत; व तेच नियम होईल तितक्या सढळ हातानें अमलांत आणावे एवढेंच कायतें आमचें मुख्य मागणें आहे. ' धन्याचें जातें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें ' असा प्रकार दुष्काळव्यवस्थेंत पुष्कळदां होत असतो. तो होऊं नये व लोकांस दुष्काळव्यवस्थेंचें खरें ज्ञान व्हावें एवढ्याचकरितां आम्हीं मागील लेख लिहिला होता व याच उद्देशानें आजहि पुनः त्याचसबंधानें कांहीं गोष्टींचा विचार करण्याचें योजिलें आहे. दुष्काळव्यवस्थेंत पहिली गोष्ट म्हटली म्हणजेः—

साऱ्याची तहकुबी व सूट

ही होय. सन १८९७ सालीं जें फॅमिन कमिशन बसलें होतें त्या कमिशननें १८९६ सालीं मुंबईसरकारानें या बाबतींत जो कंजुषपणा दाखविला त्याबद्दल त्यास दोष दिल्याचें आम्हीं मागेंच लिहिलें आहे. कोणत्याहि प्रांतांत दुष्काळ पडला म्हणजे लहान शेतकरी व हलक्या प्रतीचे मजूर यांजवर दुष्काळाची पहि-

---

* [केसरी ता. २७ मार्च १९००]

ल्यानें धाड येते. पैकीं मजूर लोक बहुतेक रिलीफ कामें सुरू झालीं असतां सदर कामावर जातात. पण बऱ्याच शेतकरी लोकांस आपापलीं शेतें सोडून गांवाबाहेर जाणें दुर्घट होतें. अशा प्रसंगीं सरकारनें मदत करण्याचा मुख्य मार्ग म्हटला म्हणजे साऱ्याची तहकुबी व सूट हाच होय. पूर्वी पेशवाईंत देखील याच मार्गाचें अवलंबन करीत असत. दुष्काळांत देखील साऱ्याचा भरपूर वसूल घ्यावयाचा ही परवां डेक्कन कॉलेजांत जाईल्ससाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें १९०० शतकाच्या अखेरीची सुधारणा होय! सन १८९६ सालीं सार्वजनिक सभेच्या एजंटांनीं लोकांस चिथाविलें असल्या पोरकट सबबीवर सरकारनें आपल्या कंजुषपणाचें समर्थन केलें होतें; पण तीहि सबब यंदां राहिली नाहीं. सारांश, या बाबतींत सरकारची खरी नीति काय आहे हें ओळखण्याचा आजचा प्रसंग आहे, व या वेळीं जर सरकार उदार बुद्धी दाखविणार नाहीं तर फॅमिन कोड व फॅमिन कमिशनचे रिपोर्ट यांतील नियम व अभिप्राय केवळ कागदावर ठेवण्याकरितां आहेत अशी लोकांची खात्री झाल्याखेरीज राहणार नाहीं. खानदेश जिल्ह्यांतील लोकांचा अर्ज सरकारापुढें आहेच. पीक चार आणे देखील नाहीं आणि ज्या लोकांस सारा भरावयाचा त्यांस कर्ज काढल्याखेरीज सोय नाहीं अशी स्थिती आहे. बरें फॅमिन कोडांत पहावें तर साऱ्याकरितां कोणावरहि कर्ज काढण्याची पाळी नये देऊं असा स्पष्ट नियम आहे; आणि हा नियम डोळ्यापुढें असतांहि सरकारी अधिकारी वसुलासाठीं भराभर नोटिसा काढीत आहेत व त्यांच्या मताप्रमाणें ऐपतदार व बिन ऐपतदार कुळांची निवड करीत आहेत! हा सर्व फार्स पाहून कोणाच्याहि अंतःकरणास चरका बसल्यावांचून राहावयाचा नाहीं. सरकारचे मनांतून जर साऱ्याची तहकुबी अथवा सूट द्यावयाची नसेल, तर तशा प्रकारचा ठराव पहिल्यानेंच प्रसिद्ध करणें फार चांगलें. फॅमिन कोडांतील नियम एक प्रकारचे आणि कृती दुसऱ्या प्रकारची हें केवळ गैरशिस्त नव्हे तर हल्लींच्या प्रसंगीं निर्दयपणाचें कृत्य होय. सावकारापासून जमिनीचा सारा घ्यावयाचा म्हणून जो नियम आहे तोहि अशाच प्रकारचा आहे. कोणाची जमीन एकदां गहाण पडली असली म्हणजे दुष्काळाचे सालींहि साऱ्याकरितां त्याच जमिनीवर त्यास आणखी कर्ज काढण्यास सांगण्यासारखाच हा प्रकार होय; व फॅमिन कोडांतील तत्त्वाप्रमाणें तो अगदीं अन्यायी आहे. सारांश, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी या बाबतींत सरकारचें वर्तन आमच्या मतें अत्यंत दांडगाईचें आणि गैरशिस्त आहे. दुष्काळाचे सालीं साऱ्याची तहकुबी आणि सूट देणें हें फॅमिन कोड झालें नसतें तरीहि सरकारचें कर्तव्य मानलें गेलें असतें असा फॅमिन कमिशननेंच आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे. कायद्याबद्दल अथवा फॅमिन कोडांतील नियमांबद्दल कोणत्याहि प्रकारची शंका नाहीं. सन १८९७ च्या फॅमिन कमिशनचाहि अभिप्राय आम्हांस अनुकूल आहे,

करितां दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील लोकांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं आपआपल्या तालुक्यांतील पिकाचें व उत्पन्नाचें मान देऊन साऱ्याच्या तहकुबीकरितां अथवा सुटीकरितां सरकारकडे अर्ज देण्यास विलंब करू नये. श्रीमंत शेतकऱ्यांस अथवा सावकारांस सूट मिळणार नाहीं, पण कायद्याप्रमाणें गरीब शेतकऱ्यांस ती मिळणें अवश्य आहे, मग सरकार दांडगाईनें त्याचा विचार न करील तर गोष्ट निराळी. या बाबतींत कायदा काय आहे येवढेंच लोकांस समजून देण्याचें आमचें कर्तव्य आहे. त्याची अंमलबजावणी कशी होते हें पहाणें व ती योग्य प्रकारें न झाल्यास पुनः सरकारास विनंती करणें हे लोकांचें कर्तव्य आहे. खानदेशांतील लोकांनीं हें कर्तव्य बजावलें आहे. व इतर ठिकाणचे लोक तोच कित्ता गिरवतील अशी आम्हांस आशा आहे. दुष्काळव्यवस्थेचा दुसरा विषय

रिलीफचीं कामें

हा होय ह्यासंबंधानें कांहीं ठिकाणच्या बऱ्याच तक्रारी ऐकूं येतात. दुष्काळाचे कामावर जे मजूर लागतात त्यांस निरखाप्रमाणें मजुरी मिळत नाहीं, दंड फार होतो, कामावर मजूर आले असतां त्यांस तेथून दूरदूरच्या कामावर जाण्यास सांगतात, व ते जाण्यास तयार असले तरी त्यांस वाटखर्चीहि मिळत नाहीं; वगैरे तक्रारी किरकोळ दिसल्या तरी हल्लींच्या प्रसंगीं त्या पुष्कळ महत्त्वाच्या व विचार करण्यासारख्या आहेत. दुष्काळाचे कामीं जो पैसा खर्च व्हावयाचा तो योग्य रीतीनें खर्च व्हावा अथवा त्याचा अपव्यय होऊं नये याबद्दल सरकारनें जरूर व्यवस्था केली पाहिजे. पण अशी व्यवस्था करतांना ज्या गरीब लोकांवर अन्नाकरितां उन्हांत खडी फोडण्याचा प्रसंग आला आहे त्यांस साध्या कैदेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याइतकेंहि दररोज अन्न मिळण्याची पंचाईत पडावी असें झाल्यास तें सरकारास अत्यंत लाजीरवाणें आहे. अन्न न मिळाल्यामुळें कोणी मरूं नये असा जो महाराणीसरकारचा स्तुत्य हेतु आहे त्यास वर सांगितलेले प्रकार अत्यंत विरुद्ध होत. दंड करणें तोहि कांहीं यत्तेच्या पलीकडे करूं नये असें जें फॅमिन कोडांत तत्त्व घातलें आहे त्याचाहि हेतु हाच आहे कीं कांहीं झालें तरी दुष्काळाच्या कामावरील मजुरांस पोटाची ददात पडूं नये. दुष्काळाच्या कामावर जे मजूर लावतात त्यांचें काम नेहमींच्या मजुराच्या कामाप्रमाणें पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत झालेंच पाहिजे हें तत्त्व कोणी कोठून काढले आहे कोण जाणें. दुष्काळाचे वेळीं गरीब लोकांस पोटास देणे हे सरकारचें कर्तव्य आहे आणि त्यांस काम सांगणें तें केवळ धर्मार्थ देणगीचा दुरुपयोग होऊं नये एवढ्याकरितां होय. करितां या बाबतींत जी सक्ती होत आहे ती पहिल्यानें कमी झाली पाहिजे. खडी फोडण्याचें काम कांहीं हलकें नाहीं आणि अशा कामीं लोकांवर सक्ती करून त्यांस कसें बसें तरी पोटभर अन्न देण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं. लोकांपासून मुळींच काम घेऊं नये असें आमचें

म्हणणें नाहीं, त्यांत सारासार विचार झाला पाहिजे; आणि वरील अधिकारी जर अमुक पैशांत अमुक खडी फुटलीच पाहिजे असा सर्वत्र आग्रह धरणार नाहींत तर दुष्काळाचे कामावरील अधिकारी या बाबतींत लोकांस विनाकारण त्रास देण्यास तयार होणार नाहींत अशी आमची खात्री झाहे. दुष्काळव्यवस्थेची तिसरी बाब म्हटली म्हणजे

कोष्ट्यांचा व्यवस्था

ही होय. यासंबंधानें १८९६ सालीं मुंबईसरकारनें केलेली व्यवस्था अथवा गैरव्यवस्था फॅमिन कामिशनास पसंत पडली नाहीं हें आम्हीं मागेंच सांगितलें आहे. कोष्टी लोकानां दुष्काळाचे वेळीं खडी फोडावयास लावणें बरोबर नाहीं, त्यांच्याकरितां सरकारनें कापड विणण्याचींच कामें काढून त्यांचा बचाव केला पाहिजे हें तत्व आतां निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. पैशाच्या अडचणीकरितां किंवा एकाद्या वड्या अंमलदाराच्या खुषीस्तव दुष्काळचे वेळीं अशा प्रकारची व्यवस्था न करणें म्हणजे स्वकर्तव्यास विसरण्यासारखें आहे. मुंबईसरकारचा पहिल्यापासून कोष्ट्यांवर रोष असल्यामुळें यंदांचे सालींहि त्यांचें बचावाकरितां कापड विणण्याचीं कामें काढण्याचा सरकारचा इरादा दिसत नाहीं. कोष्ट्यांच्या बाबतींत मुंबईसरकारचाच असा दुरभिमान कां असावा हें आम्हांस समजत नाहीं. मद्रास वायव्यप्रांत वगैरे इलाख्यांतील सरकार जर येथल्यापेक्षां अधिक औदार्य दाखवितें तर मुंबईसरकारच्या कद्रूपणाबद्दल कोणासहि आश्चर्य वाटण्यासारखें आहे. असो. हल्लीं या बाबतींत मुंबईसरकारचा असा बेत झाल्याचें समजतें कीं, कोष्ट्यांना मदत देण्याची जबाबदारी ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांवर सोंपवावी व याकरितां जरूर लागल्यास कर्ज काढण्याचीहि म्युनिसिपालिटीस मोकळीक असावी ! 'हलवायाचे घरावर ब्रम्हार्पण' करण्याचा सरकारचा हा बेत पाहून हसावें कीं रडावें हें आम्हांस समजत नाहीं. दुष्काळपीडित लोकांस—मग ते शेतकरी असोत, मजूर असोत किंवा कोष्टी असोत—मदत करणें हें सरकारचें काम आहे; व त्याकरितां फॅमिनफंडाचे पैसेच खर्च झाले पाहिजेत. किंबहुना मूळ फॅमिन फंड काढला तो एवढ्याचकरितां कीं दुष्काळाचे वेळीं फाजील खर्चाचा बोजा सरकारावर अगर लोकलबोर्ड अथवा कमिट्या यांजवर पडू नये. असें जर आहे तर फॅमिनफंड सरकारनें आपल्या ताब्यांत ठेवावयाचा आणि दुष्काळांत कोष्ट्यांना मदत करण्याची जबाबदारी व खर्च म्युनिसिपालिट्यांवर टाकावयाचा हें अगदींच अन्याय्य होय. म्युनिसिपालिट्यांपाशीं त्यांचींच कामें करण्याइतके पैसे शिल्लक नसतात. अशा वेळीं त्यांच्या अंगावर नव्या नव्या जबाबदाऱ्या घालून सरकारनें आपल्या अंगावरील ही कायदेशीर जबाबदारी काढून टाकण्याचा प्रयत्न करणें जुलुमाचें व अन्याय्य आहे. सरकारजवळ पैसे नसल्यास त्यांनीं कोष्ट्यांस

मदत करूं नये; पण आपण मदत करावयाची नाहीं आणि ज्याजवळ पैसे नाहींत त्यांच्याजवळ हें लचांड अडकवून देऊन पुनः फॅमिन कोडाप्रमाणें सर्व व्यवस्था केल्याचें श्रेय आपण घ्यावयाचें हें आमच्या मतें अगदींच अश्लाघ्य होय. नवीन म्युनिसिपल बिलांत शहरांतील दुष्काळव्यवस्थेची जबाबदारी जी म्युनिसिपालिटी-वर टाकण्यांत आली आहे त्यांतला खरा हेतु काय असावा हें यावरून चांगलें कळून येईल. इलाख्यांतील म्युनिसिपालिट्या हें नवीन ओझें आपणावर बसवून घेणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. दुष्काळांत कोष्टयांस मदत करणें हें सरकारचें काम आहे व त्याकरितां लागेल तो खर्च फॅमिनफंडांतून केला पाहिजे. या किंवा इतर दुष्काळच्या कामीं व्यवस्था ठेवण्यास किंवा इतर किरकोळ कामें करण्यास लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांनीं सरकारास मदत केली पाहिजे. पण त्याकरितां कर्जाचा बोजा अंगावर घेणें कोणत्याहि म्युनिसिपालिटीस श्रेयस्कर व हितावह व्हावयाचें नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. व एवढ्याचकरितां सरकारनें हल्लीं काढलेला विचार गैरशिस्त आहे असें आमचें म्हणणें आहे. दुष्काळसंबंधाच्या इतर कांहीं बाबतींचा विचार आजच करावयाचा होता पण स्थलसंकोचास्तव तो तहकूब ठेवणें भाग आहे.

❖ ❖ ❖

* दुष्काळांत साऱ्याची तहकुबी

या विषयावर मागें आम्हीं जो लेख लिहिला होता त्यानंतर गेल्या आठवड्याच्या दुष्काळपत्रांत प्रसिद्ध झालेला सरकारचा ठराव हाच या बाबतींतला सरकारचा अखेरचा हुकूम होय. यावरून पाहतां साऱ्याच्या तहकुबी किंवा सुटीसंबंधानें सन १८९६ सालापेक्षां यंदाच्या सालीं दक्षिणेतील जिल्ह्यांत तरी अधिक सवलती मिळतील असें दिसून येतें. निदान सरकारचा इरादा तरी तशा प्रकारचा आहे हें सदर ठराव वाचणारांस सहज कळून येईल. सरकारचा ठराव आणि खालील अधिकाऱ्यांच्या हातांतील अंमलबजावणी या दोहोंमध्यें पुष्कळ तफावत असते हें आम्हांस माहीत आहे. पण सरकारचें धोरण काय आहे हें लोकांस पूर्णपणें माहीत असल्यास खालील अधिकाऱ्यांच्या हातून दांडगाई होण्याचा संभव नसतो; एवढ्यासाठीं दुसरीकडे गेल्या आठवड्याच्या दुष्काळ-पत्रकांत आलेल्या सरकारी ठरावाचे मुद्दाम भाषांतर दिलें आहे; व त्यांतील तत्त्व लक्षांत घेऊन निरनिराळ्या ठिकाणच्या शेतकरी लोकांनीं साऱ्याच्या तह-

---

* [केसरी ता. १७ एप्रिल १९००]

कुबीबद्दल व सुटीबद्दल सरकाराकडे मागणी करावी अशी त्यांस आमची सूचना आहे. कोणाहि शेतकऱ्यावर कर्ज काढून सारा भरण्याचा प्रसंग येऊं नये असें जें पहिल्या फॅमिन कमिशननें आपल्या रिपोर्टीत म्हटलें आहे तें तत्त्व मुंबई सरकारास पूर्णपणें मान्य आहे असें त्यांच्या हल्लींच्या ठरावावरून दिसून येतें. सरकारास हें तत्त्व मान्य आहे व त्याची अंमलबजावणी करण्याकरितां सरकारनें खालील अधिकाऱ्यांस हुकूम दिले आहेत, या दोन्ही गोष्टी दुष्काळग्रस्त प्रांतांतील सर्व शेतकऱ्यांस कळणें जरूर आहे. किंबहुना खुद्द गव्हर्नर—इन-कौन्सिल यांनीं आपण होऊनच लोकांचा गैरसमज दूर करण्याकरितां वर सांगितलेल्या तत्त्वांचा हल्लींच्या ठरावांत पुनः एकवार उल्लेख केलेला आहे. गव्हर्नर-इन-कौन्सिल यांची अशा प्रकारची इच्छा असताहि जर सारा वसूल करण्यासंबंधानें गरीब शेतकऱ्यांवर सक्ती होईल, तर त्याचा दोष निदान कांहीं अंशीं तरी लोकांकडेसच येणार आहे हें त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. ऐपतदार कोणास म्हणावें आणि कोणास न म्हणावें याबद्दलहि या ठरावांत स्पष्ट खुलासा केलेला आहे. पुढील सालीं शेतकीचें काम करण्यास अवश्य लागणारें साहित्य, गुरें ढोरें वगैरेकरितां जी शिल्लक ठेवणें जरूर आहे त्यापेक्षां जास्त शिल्लक ज्यांजवळ नाहीं त्यापासून सारा वसूल करूं नये असें या ठरावांत सरकारानें स्पष्ट म्हटलें आहे. यावरून ज्यास हातावर कर्ज मिळतें तो ऐपतदार वगैरे प्रकारचे तालुका निहाय जे हुकूम गेलेले आहेत ते सर्व चुकीचे आहेत असें सिद्ध होतें. स्वतः शेती न करितां कुळांकडून जमिनी करणारे अथवा सावकारी करणारे अशा लोकांस साऱ्याची सूट किंवा तहकुबी देण्याचा सरकारचा विचार नाहीं असें या ठरावांत स्पष्ट म्हटलेलें आहे. हें म्हणणें कितपत बरोबर आहे याचा पुढें विचार करूं सध्यां सरकारचा हेतु काय आहे तो कळण्याकरितां सावकारास सूट किंवा तहकुबी सरकार देऊं इच्छित नाहीं, एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. तथापि स्वतः हातानें शेती करणाऱ्या लोकांस साऱ्याकरितां कर्ज काढणें भाग पडूं नये अशी जर सरकारची इच्छा आहे, तर तेवढ्यानेंहि गरीब लोकांचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. व तो हल्लींचा ठराव वाचून गरीब शेतकरी अवश्य करून घेतील अशी आम्हांस उमेद आहे. दक्षिणेंत गेला दुष्काळ पडल्यापासून पुरीं दोन वर्षें चांगलीं गेलीं नाहींत तोंच यंदाचा दुष्काळ पडला ही गोष्ट सरकारच्या पूर्ण लक्षांत आहे. व हीच गोष्ट ह्याचप्रमाणें खालील अधिकाऱ्यांच्याहि लक्षांत राहील तर सरकार म्हणतें त्याप्रमाणें दक्षिणेंत साऱ्याच्या तहकुबीसंबंधानें सढळ हातानें यंदाच्या सालीं व्यवस्था होण्यास हरकत पडणार नाहीं.

असो. आतां सरकारी ठरावांत ज्या मुख्य मुख्य गोष्टी नमूद केल्या आहेत त्या कितपत योग्य किंवा अयोग्य आहेत हें पाहूं. या ठरावांतील पहिलीं दोन कलमें आमच्या मतें अगदीं निरर्थक आहेत. पहिल्या फॅमिन कमिशनपुढें साक्षी-

पुरावा होऊन त्या कमिशनचा जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यांत सक्तदर्शनीं कोणासहि साऱ्याची सूट न मिळतां तहकुबी मात्र मिळावी असा कमिशननें आपला अभिप्राय स्पष्ट दिला आहे. त्याचप्रमाणें केवळ पीक बुडाल्यामुळें श्रीमंत आणि गरीब यांस सारखीच तहकुबी किंवा सूट मिळणार नाहीं असेंहि त्याच कमिशननें ठरविलें आहे. कमिशनचें हे दोन्ही अभिप्राय लोकांस माहीत नाहींत असें नाहीं; तेव्हां सरकारनें आपल्या ठरावांत या दोन्ही मुद्यांवर जो विशेष जोर दिला आहे तो अगदीं अप्रासंगिक आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. साऱ्याच्या तहकुबीबद्दल व माफीबद्दल रयतेचे जे अर्ज आहेत ते कांहीं श्रीमंत लोकांकरितां नव्हेत गरीबांकरितां होत; आणि गरीब शेतकऱ्यांची हल्लींच्या काळांत दाद लागेनाशी झाली आहे. रयतेकडून जास्त जास्त सारा वसूल करणारा मामलेदार किंवा महालकरी वरिष्ठ अधिकाऱ्यांस अधिक प्रिय असतो. अशी समजूत झाल्यामुळें तालुक्यांतून किंवा गांवानिहाय साऱ्याच्या वसुलीबद्दल पुष्कळ सक्ती करण्यांत येते. गांवकामगार या कामांत सक्ती करतात म्हणून लोकांच्या दृष्टीनें सक्तीचें सर्व अपयश त्यांच्याच माथीं लादलें जातें हें तर खरें आहे. पण आमच्या मतें याचा सर्व दोष केवळ गावकामगाराकडे न देता त्यांस हुकूम देणाऱ्या अंमलदारांकडे दिला पाहिजे. घरीं शेतकी करणाऱ्या लोकांपैकीं दुष्काळाचे वेळीं सारा देण्याचें सामर्थ्य फार थोड्यांस असतें ही गोष्ट सरकारास माहीत नाहीं असें नाहीं. पण त्याप्रमाणें खालील अंमलदारांस आणि विशेषेंकरून गांवकामगारांस हुकूम न गेल्यामुळें साऱ्याबद्दल गरीब कुणब्यांवर विनाकारण सक्ती होत असते. लोकांची जर कांहीं तक्रार असली तर हीच होय. गांवकामगार बाईट असतात आणि त्यांचे हातांत अधिकार राहूं नये अशी लोकांची तक्रार गृहीत धरून त्यांस उत्तर देण्याचा सरकारी ठरावांत प्रयत्न केला आहे; पण सरकारची ही कृति दोरीस साप समजून मग काठीनें तीस बडवीत उठण्यासारखी आहे. सावकारांस किंवा मोठमोठ्या जमिनदारांस सूट द्यावयाची नसल्यास देऊं नका. पण गरीब शेतकऱ्यांस साऱ्याची सूट, निदान तहकुबी तरी देण्याचा सरकारचा इरादा आहे असे गांवकामगारांस स्पष्ट हुकूम गेले म्हणजे मग त्यांच्याकडून कोणत्याहि प्रकारें सक्ती होण्याचा संभव नसतो परंतु सरकारी ठराव किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूमच अशा प्रकारचे असतात कीं, एकीकडे गरीब शेतकऱ्यांपासून सारा वसूल करूं नये म्हणून म्हणावयाचें आणि दुसरीकडे गांवाच्या एकंदर साऱ्यापैकीं शेंकडा अमुक एक प्रमाणानें सारा वसूल न झाल्यास गांवकामगारांस ठपका ठेवावयाचा. अशा स्थितींत गांवकामगारानें लोकांच्या गैरसोयीकडे किंवा गरिबीकडे लक्ष न दिल्यास त्याचा दोष गांवकामगारांवर टाकणें गैरवाजवी आहे. यापेक्षां शेतकीखात्यामार्फत सरकारनें दुष्काळाच्या आरंभींच पीकपहाणी करून साऱ्याच्या तहकुबीसंबंधानें किंवा सुटीसंबं-

धानें आपला काय इरादा आहे हें स्पष्टपणें गांवकामगारांस कळविल्यास पुढें कांहीं अडचण पडणार नाहीं किंवा ओरडहि होणार नाहीं. परंतु दुःखाची गोष्ट एवढीच कीं, सरकारनें अशा तऱ्हेचा मार्ग आजपर्यंत स्वीकारलेला आम्हांस माहीत नाहीं.

सरकारच्या ठरावांत सावकार लोक व जामिनदार यांस तहकुबी किंवा सूट न देण्याबद्दल जीं कारणें दाखविलीं आहेत तींहि आमच्या मतें अगदीं लंगडीं आहेत. थोडीशी शेती करणारा सावकार आणि जमिनदार किंवा खोत या दोहोमध्यें फार अंतर आहे. जमिनदार किंवा खोत यांनीं सरकारास सारा भरावयाचा म्हणजे तो कांहीं आपल्या पदरचा भरावयाचा नाहीं. कुळांकडून वसूल येईल तेव्हां त्यापैकीं बराच भाग ते सरकारास भरणार. पण हल्लीं कांहीं ठिकाणीं असा प्रकार चालू असल्याचें समजतें कीं, खोत किंवा जामिनदार यांजपासून सर्व सारा वसूल करावयाचा आणे तो कुळांपासून वसूल करण्यास मात्र त्यांस मदत द्यावयाची नाहीं! इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणीं जमिनदारांस सारा न देण्याबद्दल कुळांस अधिकाऱ्यांकडून उत्तेजनहि मिळाल्याचें ऐकिवांत आहे. हें जर खरें असेल तर या बाबतींत सरकारने लौकर बंदोबस्त केला पाहिजे. स्वतः घरची थोडी शेती असणाऱ्याची गोष्ट निराळी आणि खोतासारख्या जमिनदाराची गोष्ट निराळी. अशा जमिनदारांस सूट किंवा तहकुबी दिल्याखेरीज त्यांच्या कुळांस सूट किंवा तहकुबी मिळण्याचा संभव नाहीं हें सरकारास आम्हीं सांगावयास नकोच. गहाणदारापासून सारा वसूल करून घेणें हेंहि एक प्रकारें रयतेस फसविण्यासारखेंच आहे. कारण गहाणदार कांहीं रयतेस फुकट पैसा देत नाहीं तेव्हां गहाणदारापासून सारा वसूल करून घेतल्यानें रयतेवरील कर्जाचें ओझें न वाढविण्याकरितां साऱ्याची तहकुबी द्यावयाची असा जो फॅमिन कमिशनचा नियम आहे त्यास पर्यायानें हरताळ लागतोच. सन १८९८ च्या फॅमिन कमिशननें या गोष्टीचा विचार करून मुंबईसरकारास १८९६ सालच्या डिसेंबरांत काढलेल्या ठरावाबद्दल दोष दिला आहे. सारांश, गरीब शेतकऱ्यांनीं कर्ज काढून किंवा पोटास चिमटा घेऊन सारा देऊं नये अशी जर सरकारची इच्छा असेल, तर त्यांच्या कल्याणाकरितां गहाणदार जामिनदार, आणि खोत यांसहि साऱ्याची सूट मिळाली पाहिजे. असें न झाल्यास हल्लींप्रमाणें नुसता ठराव काढून शेतकऱ्यांचा कांहीं एक फायदा व्हावयाचा नाहीं.

हल्लींच्या ठरावांत जो मोठा दोष आहे तो हाच होय. परंतु तो सध्यां एके बाजूस ठेवला तरी बाकीच्या ठरावांची अंमलबजावणी कशी होते इकडे सरकारनें नेहमीं लक्ष ठेविलें पाहिजे. शेंकडा दहापंधरा किंवा वीस टक्यांपलीकडे साऱ्याची जास्त तहकुबी होऊं नये अशी पर्यायानें किंवा प्रत्यक्ष जर आंतून सक्ती असेल तर हल्लींच्या ठरावापासून लोकांस कांहींहि उपयोग व्हावयाचा

नाहीं. सारा वसूल करण्याकरितां जप्ती करावयाची कीं नाहीं याचा निकाल करण्याचें काम असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरकडे सोंपाविल्यानें लोकांवरील सक्ती कमी होईल अशी जर सरकारची समजूत असली तर ती चुकीची आहे. यापेक्षां गांवाची पीकपहाणी करून त्याप्रमाणें पहिल्यानेंच जितक्या होतील तितक्या नोटिसा कमी करणें हें अधिक चांगलें. एकदां नोटीस निघाली म्हणजे मग पुराव्याचा बोजा सर्व शेतकऱ्यांवर पडतो आणि अडाणी शेतकऱ्यांस आपली खरी स्थितीहि सिद्ध करण्यास पंचाईत पडते. असो; सरकारनें जो सध्यां ठराव केला आहे तो लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागण्याची लोकांनीं तजवीज ठेवल्यास कांहीं तरी फायदा होईल. ज्यांस नोटिसा निघाल्या नसतील त्यांचें ठीकच आहे. पण ज्यांस निघल्या असतील त्यांनीं या ठरावांत सांगितल्याप्रमाणें कर्ज काढल्याखेरीज आपणास सारा देण्यास ताकद नाहीं असा असिस्टंट कलेक्टर किंवा डेप्युटी कलेक्टर यांजपुढें पुरावा आणावा. सरकारचें धोरण काय आहे हें आतां समजलें आहे; तर त्याप्रमाणें वागून आपला फायदा करून घेणें हें लोकांचें काम आहे. जमिनदार लोक व खोत यांनीं माल वर सांगितल्याप्रमाणें निराळा अर्ज करून पुनः दाद मागितली पाहिजे.

◆ ◆ ◆

* दुष्काळाचीं कारणें

मद्रास येथील दहाव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मि. वेब व लखनौच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मि. दत्त यांची हिंदुस्थानांतील दुष्काळासंबंधानें दोन पत्रें विलायतेस 'बिटिश फ्रेंड' व 'टाइम्स' यांमध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडतो, यासंबंधानें कोणाचाच वाद नाहीं. वादाचा प्रश्न असा आहे कीं, दुष्काळाशीं टक्कर देण्याइतकें सामर्थ्य रयतेंत कां असूं नये ? दुष्काळाचे वेळीं निर्वाह चालवितां येण्याइतकी शिल्लक प्रजेपाशीं कां नसावी? युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांत दुष्काळ पडण्याची शक्यताच नाहीं असें प्रतिपादण्यांत येतें. याचा अर्थ असा आहे कीं, दुष्काळामुळें एखादे प्रांतांत धान्य न पिकलें तरी इतर ठिकाणचें महाग धान्य खरेदी करण्याची ऐपत रयतेंत असते व दुष्काळचे दिवस अशा रीतीनें पार पाडून नेण्याइतका प्रत्येक रयत श्रीमंत असतो. दुष्काळामुळें येथें धान्य उत्पन्न झालें नाहीं तर मद्रास, बंगाल, ब्रम्हदेश या प्रांतांतून तेथील लोकांना पुरून आम्हांस पुरेसें धान्य यंदा उत्पन्न झालेलें आहे; पण तें धान्य विकत घेण्यास आमच्या रयतेपाशीं पैसेच नाहींत. उन्हातान्हांत दिवसभर खडी फोडावी तेव्हां सहा

---

* [केसरी ता. ८ मे. १९००]

दिडक्या दृष्टीस पडावयाच्या आणि मग दाणे विकत घेण्याची बात ! अशी निकृष्ट स्थिती आमची कां व्हावी ? वर्षाचे अखेरीस सरकार सारा देऊन टाकल्यावर रयतेपाशीं कांहींच शिल्लक न राहून नवीन सालचे प्रारंभीं धुतलेल्या तांदुळाप्रमाणें आम्हांस उघडें नागडें कां व्हावें लागतें ? तेव्हां दुष्काळ कां पडतो यांचीं कारणें शोधावयाचीं नसून दुष्काळाचा धक्का सोसण्याइतकें त्राण प्रजेंत कां नाहीं या निकृष्ट स्थितीच्या कारणांचा विचार करावयाचा आहे. बऱ्या स्थितींतील शेतकरी म्हणून जे नांवाजलेले ते आज बायकामुलांसह दुष्काळ कामावर खडी फोडीत आहेत ! १८९६ सालच्या दुष्काळांत ज्या दर्जाचे लोक दुष्काळकामावर गेले नाहींत त्या दर्जाचे लोक शेकडों हजारों पाट्या वाहतांना दृष्टीस पडत आहेत ! अशी स्थिती आणखी कांहीं पिढ्या चालल्यास हिंदुस्थान देश मजुरांचा निवळ कोंडवाडा झाल्याशिवाय राहणार नाहीं. १८९६ सालच्या दुष्काळांत दुष्काळ कामावर जितके रयत गेले होते त्याहून तिप्पट रयत सांप्रतच्या दुष्काळांत दुष्काळकामावर पोट भरीत आहेत. हिंदुस्थानास अशी अपूर्व निकृष्ट स्थिती येऊन चोहोंकडे दारिद्र्याचा अंमल बसण्याचें कारण लोकसंख्येचें वाढतें प्रमाण नव्हे, असें मि. वेब यांनीं आपलें पत्रांत प्रसिद्ध केलें आहे. इंग्लंडापेक्षां हिंदुस्थानांत दरहजारी २२५ जनसंख्या कमी आहे, व युरोपापेक्षां दर हजारीं ७५ कमी आहे, म्हणजे इंग्लंडांत व युरोपांत हिंदुस्थानाहून लोकसंख्या अधिक झपाट्यानें वाढत आहे. अशी स्थिती असतां इंग्लंडांतील किंवा युरोपांतील लोकांना दुष्काळ म्हणजे काय हें अजिबात ठाऊकच नाहींसें झालें आहे. हिंदुस्थानांतच दुष्काळामुळें कोट्यावधी लोकांची उपासमार कां व्हावी ह्याचा उलगडा झाला पाहिजे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें कारण सांप्रतची राज्यव्यवस्था होय. 'राजा कालस्य कारणम्' अशी जी संस्कृतांत म्हण आहे ती अक्षरशः खरी होय. सांप्रतच्या राज्यपद्धतीचें स्वरूपच असें आहे कीं, त्यामुळें रयत निव्वळ पिळून निघत असून येथील संपत्तीचा ओघ इंग्लंडाकडे अव्याहत व जोरानें वाहत चालला आहे. तुंबडी लावून अंगांतील रक्त शोषून घेतलें असतां जसा निवळ हाडाचा पिंजरा शिल्लक राहतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व सत्त्व इंग्लंडकडे वाहत चाललें असून गुलामस्वरूपीं पाप्याचीं पितरें मात्र येथें शिल्लक राहिलीं आहेत. "हिंदुस्थानाला पिळून काढलें पाहिजे" असे उद्गार पूर्वी एकदां लॉर्ड सॅलिसबरी साहेबांनीं काढले होते; आणि आतां हिंदुस्थान पिळून निघाला आहे. दरसाल हिंदुस्थानांतून इंग्लंडांत ४०।५० कोट रुपये जातात असा अंदाज आहे. इंग्लंड हिंदुस्थानातून खंडणीच्या रूपानें हे रुपये उकळतें असा भास नाहीं; तथापि निरनिराळ्या स्वरूपानें इतके रुपये दरसाल इंग्लंडांत पोहोंचतें करण्यांत येतात यांत शंका नाहीं. सेक्रेटरीसाहेबांच्या कचेरीचे पगार, इंग्लंडांतून हिंदुस्थानांत सरकारी सामानसुमान येतें त्याची किंमत, इंग्लंडांतील

सावकारांचें व्याज व पेन्शनें मिळून १९०० सालचे बजेटांत ३२ कोट रुपयांची रकम घातली आहे. एवढी मोठी रकम हिंदुस्थानसरकार आपल्या हातानें इंग्लंडांत पोहोंचती करतें. हिंदुस्थानांतील युरोपियन नोकर लोक आपल्या कुटुंबाचे खर्चाकरितां पगाराचा मोठा भाग इंग्लडांत पाठवितात; म्हणजे एकंदरींत ४०।५० कोट रुपये सरकार व सरकारी नोकर मिळून इंग्लंडांत पाठवितात. शिवाय व्यापाराचें जाळें निराळेंच. हरएक प्रकारचा मोठा किफायतीचा धंदा व व्यापार युरोपीयनांच्या हातीं! त्यामुळें हिंदुस्थानांतून इंग्लंडांत जाणारी संपत्ती निराळीच, प्रत्येक युरोपियन हिंदुस्थानांत येतो, पैसे कमावतो, व मोठें गाठोडें गोळा करून युरोपांत निघून जातो. एकाद्या खेड्यांत चार दोन लक्षाधीश मारवाडी असल्यानें ज्याप्रमाणें मारवाड्यांची संपत्ती वाढते, पण खेड्यास निकृष्टावस्थाच येते त्याप्रमाणें युरोपियन कारखाने, युरोपियन व्यापारी हिंदुस्थानांत चोहोंकडे झाल्यानें इंग्लंडची संपत्ती अतोनात वाढत आहे; पण आमचा व्यापार बुडून, आमचे उद्योगधंदे रसातळास जाऊन आमच्या वाट्यास दारिद्र्य येत आहे. हिंदुस्थानसरकारला लागणारीं लढाऊ गलबतें, तोफा वगैरे मोठमोठ्या सामानापासून तों टांचणीपर्यंत हरएक पदार्थ इंग्लंडांत खरेदी केला जातो. हिंदुस्थानांतील प्रत्येक युरोपियन, भाजीपाला, ताजें दूध वगैरे जे जिन्नस इंग्लडांतून आणतां येत नाहींत त्याखेरीज हरएक जिन्नस इंग्लंडचा वापरतो. म्हणजे हिंदुस्थानांत राहून इंग्लंडांत राहिल्याचें श्रेय त्यांच्या देशाला मिळतें; शिवाय शिल्लक काय उरेल ती पश्चिम दिशाच पाहते. रेलवेसारख्या अवाढव्य कारखान्यांतील नोकरीचा अंश इंग्लंडला मुदलाचें व्याज इंग्लंडकडे, व नफाहि जातो इंग्लंडातच; अशीच इतर व्यापाराची व कारखान्यांची स्थिति मग हिंदुस्थानच्या मागें दारिद्र्यानें हात धुवून लागू नये तर व्हावें तरी काय? मोंगलाईत किंवा इतर मुसलमानी राज्यांत सरकारी खर्च केवढाहि मोठा असला तरी तो हिंदुस्थानच्या हिंदुस्थानांत होत असे, त्यामुळें रयतेची अशी विपन्न स्थिती झाली नव्हती. हिंदुस्थानच्या संपत्तीची जी अशा प्रकारें दररोज दिवसा ढवळ्या कायदेशीर लूट चालली आहे तिचा प्रतिकार करण्याचें लॉर्ड कर्झन यांनीं मनांत आणल्याशिवाय रयतेची स्थिती सुधारण्याची आशाच करावयास नको. लष्करी व इंग्लंडचा खर्च कमी करून तिजोरींत शिल्लक राहिली असून सारा कमी करून तो कायम करण्यांत यावा, बऱ्याच अधिक उच्च प्रतीच्या जागा नेटिवांस देण्यांत याव्या, देशी उद्योधंद्याना व व्यापाराला भरपूर उत्तेजन मिळून, परदेशी माल व परदेशी व्यापारी आमच्या बाजारांत जितके कमी करणें अर्थशास्त्रदृष्ट्या शक्य तितकें दक्षतेनें कमी करण्यांत यावे अशी स्थिती झाल्याशिवाय दुष्काळकामावर कंगाल रयतेचा तोबा उडाल्यावांचून राहणार नाहीं.

मि. वेब यांच्या पत्रांतील मुख्य मुद्याचें विवेचन वर दिलें आहे. बाबू रोमे-

शचंद्र दत्त यांनीं जबर साऱ्याविषयीं जी चळवळ चालविली आहे त्यासंबंधानेंहि मि. वेब यांनीं आपली पूर्ण संमति दाखविली आहे. जामिनींतील एकंदर उत्पन्नाच्या एकषष्ठांशाहून अधिक सारा बंगाल्यांत शेतकरी जामिनदारांना देत नसल्यामुळें दुष्काळाचे वेळीं बंगालच्या शेतकऱ्यांची मुंबई व मद्रास इलाख्यांतील शेतकऱ्यांसारखी तारांबळ उडत नाहीं. मि. दत्त यांच्या वरील विधानावर पार्लमेंट सभेंत टीका करतांना लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनीं असें सांगितलें कीं, हायकोर्टचे जज्ज, कलेक्टर, कमिशनर आदींकरून बड्याबड्या अधिकाऱ्यांना विचारतां बंगाल्यांत एकषष्ठांशाहून अधिक सारा शेतकऱ्यांना द्यावा लागत नाहीं ही बातमी कोणासच नाहीं! आमचे सेक्रेटरीसाहेब वरील धाडसाचें विधान करून राहिले इतकेंच नव्हे तर त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, बंगाल्यांत पुष्कळ ठिकाणीं एकंदर उत्पन्नाचा निम्मा भाग व कांहीं ठिकाणीं तीन चतुर्थांश भाग साऱ्यादाखल रयत देत असते. मि. इन यांनीं आतां असें प्रसिद्ध केलें आहे, कीं, वरील विधान निराधार असून बंगाल्यांतील जमीनदार शेतकऱ्यांपासून एक षष्ठांशाहून अधिक भाग घेत नाहीं. एकदोन जागीं रटेट सेक्रेटरी साहेब म्हणतात तशी स्थिती आहे, पण ती सार्वत्रिक बिलकुल नव्हे. आपलें मत खरें असून लॉर्ड जॉर्ज यांची माहिती चुकीची आहे हें सिद्ध करण्याकरितां मि. दत्त यांनीं सर विल्यम हंटरचे "स्टॅटिस्टिकल अकौंट" या पुस्तकांतुन बंगालचे जमीनदार रयतेपासून उत्पन्नाचा कितवा भाग घेतात यासंबंधाचे आंकडे प्रसिद्ध केले आहेत. ती माहिती येणेंप्रमाणें:—

जिल्हा	दर एकरीं एकंदर उत्पन्न	दर एकरीं सरासरी सारा	उत्पन्नाचें व साऱ्याचें प्रमाण
	रु. आ. पै	रु. आ. पै	
२४ परगणे	६५ — ४ — ०	९ — १२— ०	$\frac{१}{६}$ हून कमी.
मिदनापूर	५६ — ४ — ०	६ — १२— ०	$\frac{१}{८}$ हून कमी.
जेसूर	५५ — २ — ०	६ — १२— ०	$\frac{१}{८}$ हून कमी.
गया	५४ — ० — ०	६ — १२— ०	$\frac{१}{८}$ हून कमी.
नौखली	५२ — ८ — ०	६ — १२— ०	$\frac{१}{७}$ हून कमी.

मि. दत्त यांचे तक्त्यांत हिशेब पौंडात दिला व वरील तक्त्यांत एका पौंडाचें १५ रुपये ह्या प्रमाणानें तोच हिशेब रुपयांत दिला आहे. मुंबईइलाख्यांत रयत या नात्यानें जमिनीवर शेतकऱ्यांची जी मालकी असते, तींच बंगाल्यांत शेतकऱ्यांची असते; फरक इतकाच कीं, येथें रयतेपासून साक्षात् सरकार सारा घेतें व सारा वसूल करण्याचें काम नोकर ठेवून सरकारांतून करण्यांत येतें. बंगाल्यांत जमीनदारांपासून सरकार सारा एकदम घेतें व जमीनदार लोक शेतकऱ्यांपासून सारा वसूल करितात. शेतकऱ्यांनीं जमीनदाराला द्यावयाचा सारा कायम आहे व त्याचें प्रमाण वर दिलेलें आहे. जमीनदारांना कमीजास्त सारा करतां येत नाहीं कारण शेतकरी कुळें नसून रयत आहेत. मि. दत्त म्हणतात कीं, बंगाल्यांतील शेतकऱ्यांवर जबर साऱ्याचे ओझें नसल्यामुळें १८७४ सालचे दुष्काळांत बंगाल्यांत प्राणहानी झालीं नाहीं, पण १८७६।७७ सालचे दुष्काळांत मद्रासेकडे व १८९६।९७ सालचे दुष्काळांत मध्यप्रांतांत लाखों लोक प्राणास मुकले. दोहों ठिकाणीं असा भेद अरण्याचे कारण एकीकडे जबर सारा व एकीकडे हलका सारा हेंच होय. मि. दत्त इंग्रजांना उद्देशून असें लिहितात कीं दुष्काळांतील तुमच्या हालअपेष्टेबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें, आमच्या मनांत अतिशय कळकळ आहे, सहानुभूति आहे, असे कोरडे शब्द उच्चारून व प्रसंगीं घुरती वर्गणी गोळा करून काय उपयोग ? जर खरी सहानुभूति असेल, शाब्दिक कळवळ दाखवून आमची थट्टा करावयाची नसेल, तर लष्करचा खर्च कमी करा, हिंदुस्थानांतून इंग्लंडकडे वाहत चाललेल्या संपत्तीचा ओघ अंशतः तरी मागें फिरवा, आणि जमिनीचा सारा हलका करून रयतेची स्थिति सुधारा, म्हणजे दुष्काळाचे वेळीं रयतेचे हाल होऊं नयेत अशी तुमची इच्छा असल्याविषयीं लोकांची खात्री होईल. विलायतेंत मि. दत्त ह्यांनीं वरीलप्रमाणें केलेली ओरड अरण्यरुदित न होवो म्हणजे झालें.

* इनाक्युलेशन कमिशन

धारवाड येथें मागें लिहिल्याप्रमाणें इनॉक्युलेशन कमिशनच्या बैठकीस गेल्याच्या मागील गुरुवारीं सुरवात झाली. पहिल्या दिवशीं रा. सा. देसाई यांची प्लेग सुपरिंटेंडेंट या नात्यानें साक्ष झाली. त्यांत म्युनिसिपालिटीनें प्लेग हटविण्याकरितां काय व्यवस्था केली याची त्यांनीं हकीकत सांगितली आहे. यांची साक्ष चालली असतां कमिशनचा कटाक्ष विशेषेंकरून दोन गोष्टींवर होता असें धारवाडवृत्तकर्ते म्हणतात. पहिली गोष्ट खानेसुमारीची आणि दुसरी इनॉक्युलेशनची. खानेसुमारी म्हणजे प्लेगच्या वेळीं घरोघर व्हालंटियरनीं केलेली तपासणी बरोबर होत नाहीं आणि कांहीं लोकांनीं इनॉक्युलेशनची खोटीं सर्टिफिकिटें मिळविलीं असावीं अशी कमिशनास शंका आली असावी. गुरुवारची बैठक झाल्यानंतर गेल्या मंगळवारपर्यंत साक्षी घेण्याचें काम झालें नाहीं. मंगळवारीं साक्षीस पुनः सुरवात होऊन रा. रा. कट्टी पेनशनर प्रिन्सिपाल, रा. रा. व्यंकटेश अनंत मायजरकर, अकौंटंट सदर्न मराठा रेलवे, रा. रा. रामचंद्र बाळाजी करंदीकर, बी. ए. एल् एल् बी. वकील, रा. रा. किर्लोस्कर, गुरुजी, निवगी, खानोलकर, दलाल चनंप्पा शीलवंत वगैरे गृहस्थांच्या साक्षी झाल्या. या सर्व साक्षीदारांनीं प्लेग टोंचून घेतल्यामुळें आपापल्या प्रकृतीवर कायमचे वाईट परिणाम झाल्यचें कमिशनास कळविलें. कोणाला फेंपरें येउं लागलें तर कोणाचा हात वांकडा झाला आहे, कोणास ताप तेव्हांपासून जडला आहे तर कोणास भोवंड येऊं लागली आहे, अशा प्रकारच्या यांच्या साक्षी झाल्या; व ज्यांनीं हातास इजा झाली आहे म्हणून सांगितलें या सर्वांचे हात डाक्तरांनीं तपासले. तथापि या बाबतींत यावा तितका पुरावा कमिशनपुढें आला नाहीं असें समजतें. प्लेग टोंचल्यामुळें ज्यांच्या शरीरावर वाईट परिणाम झाले आहेत त्यांनीं आपलीं नांवें म्युनिसिपालटीत कळवावीं म्हणून एक दिवसाची नोटीस पहिल्यानें दिली होती. पण आतां कमिशन धारवाडास आहे तोंपर्यंत त्यांनीं केव्हाहि येऊन साक्ष द्यावी असें प्रसिद्ध झाल्याचें समजतें. ही सवड कमिशननें दिली हें ठीकच झालें, पण कमिशनच्या चौकशीचें काम याहिपेक्षां दक्षतेनें झालें पाहिजे असें आम्हास वाटतें. इनॉक्युलेशनपासून शरीरावर वाईट परिणाम झाल्याचीं धारवाडास शेंकडों उदाहरणें आहेत असें जेव्हां रा. रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं धैर्यानें नांवनिशीवार याद देऊन पहिल्यानें प्रसिद्ध केलें तेव्हां डाक्तर (आतां सर) भाल-

---

*[केसरी ता. १२ जून १९००]

चंद्र यांस गुरुजींचें म्हणणें खरें वाटलें नाहीं. सुदैवानें या बाबतींत चौकशी करण्याकरतां सरकारनें आतां कमिशन नेमलें आहे, व रा. रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी हे काशीस गेले होते तेहि तेथून मुद्दाम आपली सर्व माहिती कमिशनपुढें मांडण्याकरितां धारवाडास गेले आहेत. रा. रा. गुरुजी यांची कमिशनपुढें साक्षहि झाली आहे. पण ती साक्ष त्यांच्या स्वतः पुरतीच कमिशननें घेतली असें समजतें. रा. रा. गुरुजी यांनीं इतर गृहस्थांची सांगितलेली माहिती कमिशननें घ्यावी असें आम्हीं म्हणत नाहीं. पण गुरुजी आपल्या साक्षींत ज्या माणसांचीं नांवें देतील किंवा जीं उदाहरणें घडलीं असल्याचें कळवितील त्या गृहस्थांस बोलावून आणून कमिशननें त्यांची तपासणी करणें अवश्य आहे. प्लेग टोंचल्यापासून शरीरावर कोणत्या प्रकारचे परिणाम होतात हा शास्त्रीय प्रश्न आहे आणि ज्या गोष्टीची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमलें आहे त्यापैकीं जर ही एक गोष्ट आहे तर गुरुजींनीं सांगितलेले गृहस्थ कमिशनपुढें हजर करण्याजी जबाबदारी गुरुजींवर टाकणें अगदीं गैरशिस्त आहे. प्लेग टोंचल्यापासून शरीरावर अनिष्ट परिणाम होतात याबद्दल १०।१२ विश्वसनीय गृहस्थांच्या जर कमिशनपुढें आतांच साक्षी झाल्या आहेत तर या बाबतींत पुरी चौकशी केल्याखेरीज कमिशननें धारवाड सोडणें कदापि वाजवी होणार नाहीं. प्लेग टोंचल्यापासून शेंकडा ५ किंवा १० माणसें कायमचीं व्याधिग्रस्त, दुबळीं किंवा निरुपयोगी होतात असें जर लोकांच्या नजरेस येईल तर असल्या प्रकारचें विष शरीरांत मुद्दाम घालून आपला बचाव करण्यापेक्षां स्थानत्यागाचा उपाय लोकांनीं व सरकारानीं अमलांत आणावा हेंच इष्ट होय, असें आमचें पहिल्यापासून म्हणणें आहे. प्लेगची लस आहे त्यापेक्षां अधिक निर्दोष व गुणकारी करितां येणार नाहीं असें नाहीं, पण तसा प्रकार जोंपर्यंत झाला नाहीं तोंपर्यंत सरकारानें विनाकारण लोकांवर प्लेग टोंचण्याची सक्ती करू नये असें लोकांचें म्हणणें आहे. हें म्हणणें कितपत सयुक्तिक व साधार आहे याचा कमिशन जर पूर्णपणें शोध करणार नाहीं तर हें कमिशन नेमून आणि न नेमून सारखेंच होणार आहे. सारांश, कमिशननें या बाबतींत श्रम घेऊन जितका पुरावा मिळणें शक्य असेल तितका गोळा केला पाहिजे. सत्यान्वेषणाकरितां नेमलेलें कमिशन आणि पक्षकारांमधील तंटे तोडण्याकरितां नेमलेलीं कोर्टें यांत पुष्कळ अंतर आहे. समोर आलेल्या पुराव्यावर कोर्टास निकाल द्यावयाचा असतो. आणि कोर्टासमोर पुरावा आणणें हें पक्षकाराचें काम असतें. तथापि पक्षकारानें सांगितलेल्या साक्षीदारांस बोलावण्याचें काम कोर्टाचें असतें इतकेंच नव्हे, तर स्वतःच्या खात्रीकरितांहि कित्येक वेळां कोर्ट आपण होऊन साक्षीदार बोलावतें अथवा स्वतः जाग्यावर जाऊन चौकशी करितें. कोर्टाची जर ही स्थिती तर कमिशनची जबाबदारी यापेक्षांहि जास्त आहे हें आम्हीं सांगावयास नको. प्लेग टोंचल्यानें वाईट परिणाम घडल्याचीं उदाहरणें नांवनिशींवार जर

गुरुजी कमिशनपुढें सांगत आहेत तर त्यांतील पुरुषमंडळीवर कमिशननें समन्सें काढणें आणि बायकांची तपासणी लेडी डाक्तर पाठवून घरीं करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. प्लेग टोंचतांना जर लोकांच्या घरीं जाऊन टोंचावयाचा तर त्याच्या दुष्परिणामाची चौकशी करण्यांत कसूर कां करावी ? लोकांनीं आपण होऊन कमिशनपुढें जावें हें खरें आहे; व आमची लोकांस आग्रहपूर्वक अशी सूचना आहे कीं, त्यांनीं ह्यावेळीं कमिशनपुढें जाऊन खऱ्या खऱ्या घडलेल्या गोष्टी त्याजपुढें मांडण्यास बिलकुल हयगय करूं नये. यावेळीं हयगय केल्यास एकंदर लोकांचें नुकसान होईल इतकेंच नव्हे, तर शास्त्रीय दृष्ट्याहि त्यापासून पुष्कळ तोटा होणार आहे. पण लोकांस जशी आमची ही सूचना आहे त्याचप्रमाणें सरकारासहि आम्ही अशी विनंती करतों कीं, त्यांनीं कमिशनास या बाबतींत पूर्ण चवकशी करण्याबद्दल व जरूर लागल्यास घरोघरीं जाऊन माहिती मिळविण्याबद्दल हुकूम द्यावा. लोकांचा जीव बचावण्याबद्दल ज्या तजविजी करावयाच्या त्या निदान कोणास अपायकारक होत नाहींत एवढें पाहणें जरूर आहे. हेंच पाहण्याकरितां कमिशनची नेमणूक झाली आहे. व आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें जर तजवीज होणार नाहीं तर एवढा खर्च करून नेमलेल्या कमिशनचे सिद्धान्तहि लोकांच्या भरंवशास पात्र व्हावयाचे नाहींत. यासाठीं लोकांनीं व सरकारनें वेळींच खबरदारी घ्यावी हें चांगलें.

कमिशनपुढें ज्या साक्षी झाल्या आहेत त्यांत बऱ्यास विश्वसनीय लोकांनीं प्लेग टोंचल्यापासून आपणांस कायमची व्याधि झाल्याचें कळविलें आहे. रा. रा. करंदीकर यांची व्यथा तर इंग्रजी डाक्तरांनीं तपासणी करून प्लेग टोंचल्यापासून झाली असें ठरविलें आहे. असें जर आहे तर या साक्षीदारांच्या किंवा यांच्यासारख्या इतर गृहस्थांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून अथवा त्यांचा उपहास करून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. उलट असल्या लोकांस बोलावून त्यांची साक्ष कमिशन जर घेणार नाहीं तर हें कमिशन इनॉक्युलेशनचे डोल्हारे माजविण्याकरितांच काढलेलें आहे अशी लोकांची समजूत होईल आणि ती निराधार झाली आहे असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. धारवाड हुबळीकडे प्लेग टोंचण्याच्या बाबतींत जी सक्ती व अंदाधुंदी झालेली आहे तीहि या कमिशनपुढें मांडण्यास लोकांनीं यावेळीं हयगय करूं नये. प्लेग टोंचून घेतलेले किती लोक सहा महिन्यांच्या आंत मेले, प्लेग टोंचल्यानें कित्येकांस नव्या व्याधि जडून त्यामुळें किंवा त्यापासून उद्भवलेल्या रोगांमुळें त्यांस मृत्यु आला वगैरे सर्व गोष्टी यथास्थितपणें कमिशनसमोर लोकांनीं सांगितल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें प्लेग टोंचलेल्या लोकांपैकीं गांवाबाहेर किती राहिले होते व गांवांत किती राहिले होते हें टोंचलेल्या लोकांपैकीं मृत्युसंख्येचें मान काढतानां लक्षांत ठेवलें पाहिजे. रा. रा. गुरुजी यांनीं अशाच प्रकारच्या कांहीं गोष्टी नमूद करून कमिशनास

एक अर्ज पाठविला आहे. या अर्जातील माहिती कमिशननें गुरुजींच्या भरंवशावर खरी मानावी असें आमचें म्हणणें नाहीं. पण गुरुजी सांगतात तीं उदाहरणें खरीं आहेत किंवा खोटीं आहेत हें जर कमिशन पाहणार नाहीं तर मग कमिशन करणार तरी काय? कमिशनरांचीं मतें गुरुजींच्या मतांहून कदाचित् भिन्न असतील, नाहीं असें नाहीं. पण तेवढ्यानें गुरुजींनीं आपल्या अर्जांत अगर साक्षींत दाखविलेलीं उदाहरणें कमिशननें स्वतः होऊन तपासूं नयेत असें मात्र होत नाहीं. रा. रा. गुरुजी हे मुद्दाम काशीहून धारवाडास गेले व आपणाजवळ असलेली माहिती त्यांनीं मोकळेपणानें कमिशनास दिली इतक्यानें ते आपल्या जबाबदारींतून मोकळे झाले आहेत. आतां कमिशन जर त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करील तर तो दोष गुरुजींचा नाहीं, कमिशनचा समजला जाईल. आणि अशी एकदां लोकांची समज झाली म्हणजे मग हें कमिशन नेमल्यापासून शास्त्रीय किंवा लौकिक दृष्ट्या जो परिणाम व्हावयास पाहिजे तो व्हावयाचा नाहीं. याकरितां लोकांस आपापली हकीकत कमिशनपुढें मांडण्याबद्दल आणि कमिशनरांस होईल तितकें करून सर्व खरी माहिती जरूर लागल्यास घरोघर हिंडूनहि गोळा करण्याबद्दल पुनः विनंति करून हा लेख आटपतों. प्लेग टोंचून घेणें किंवा न घेणें हें जितकें महत्त्वाचें कित्येकांस वाटतें तितकेंच भीतीचेंहि पण लोकांस वाटत आहे. ही भीति काढून टाकून खरें तत्त्व शोधून काढण्याकरितां कमिशनची नेमणूक आहे. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें कमिशनच्या कामांत ढिलाई न होणें हें सर्वांसच इष्ट आहे हें सांगावयास नको.

* * *

* साऱ्याची सूट व तहकुबी

दुष्काळाचे वेळीं सरकारानें साऱ्याची सूट व तहकुबी द्यावी याबद्दल सन १८९७ सालच्या दुष्काळाच्या वेळीं सार्वजनिक सभेनें सरकारास अर्ज केले होते व त्यांत साऱ्याच्या सुटीबद्दल व तहकुबीबद्दल फॅमिन कमिशन व सरकार यांनीं वेळोवेळीं केलेल्या सूचना व ठराव यांची पूर्णपणें माहिती दिलेली होती. सभेचें म्हणणें सरकारास त्यावेळीं पसंत पडलें नाहीं. परंतु सभेनें दाखविलेलीं कारणें किंवा अधार खोडूनहि काढतां आले नाहींत. तेव्हां अखेरीस "शेषं कोपेन पूरयेत" या न्यायानें सभेवर सरकारचा विनाकारण घुस्सा झाला व त्यामुळें त्यावेळीं आमच्यापैकीं कित्येकांस समाधानहि वाटलें. सभेचें म्हणणें सप्रमाण

---

* [केसरी ता. ३ माहे जुलई सन १९००]

होतें असा १८९८ सालच्या फॅमिन कमिशननेंहि आपला अभिप्राय दिला आहे. व साऱ्याच्या सुटीच्या व तहकुबीच्या बाबतींत मुंबईसरकारचें वर्तन असावें तितकें उदार नाहीं ही गोष्ट कमिशननें आपल्या रिपोर्टांत दाखल केली आहे. तेव्हां त्याबद्दल आतां शंका बाळगावयास नको. हल्लींच्या दुष्काळांत सार्वजनिक सभेनें पुन्हां या बाबतींत सरकाराकडे अर्ज धाडलेले नाहींत. करितां सभेच्या अर्जानें रागाऊन जाऊन सरकार लोकांच्या जमिनी जप्त करतें असल्या प्रकारचा आक्षेप घेण्यास कोणासहि जागा राहिली नाहीं. हा आक्षेप चुकीचा आहे याबद्दल मागेंच आम्हीं लिहिलें होतें. सरकारच्या मनांतून एखादी गोष्ट करावयाची असली म्हणजे सदर गोष्टीस अनुकूल अभिप्राय देणाऱ्या आमच्या लोकांची पाठ थोपटून सरकार त्यांस महत्त्व देतें, आणि तीच गोष्ट सरकारच्या मनांतून करावयाची नसली म्हणजे आमच्यापैकीं याच गृहस्थांचें म्हणणें सरकारास कडू लागुन सरकारची त्यांजवर अवकृपा होते असा नेहमींचा प्रकार आहे. अशा स्थितींत आमच्या लोकांनीं कोणत्या रीतीनें वागावें हा एक प्रश्नच आहे. कित्येकांचें मत सरकारचा कल पाहून तेवढ्याचपुरतें आपलें मागणें मागावें असें आहे; आणि दुसऱ्या कित्येकांचें म्हणणें खऱ्या गोष्टी सरकारापुढें मांडाव्या, मग त्या सरकारास बऱ्या वाटोत वा वाईट वाटोत असें आहे. यापैकीं दुसऱ्या मार्गाचा स्वीकार सन १८९७ सालीं सार्वजनिक सभेनें केला होता. त्यापासून सभेस त्यावेळीं कांहीं फायदा झाला नाहीं; पण या विषयासंबंधानें त्यावेळीं जी चर्चा झाली तिचा हल्लींच्या दुष्काळांत कांहीं उपयोग झाल्यास ती अगदीच फुकट गेली असें म्हणतां यावयाचें नाहीं.

आज हे विचार सुचण्याचें कारण हल्लींच्या दुष्काळांत साऱ्याची सूट व तहकुबी बरीच दिली पाहिजे अशा अर्थाचे टाइम्स ऑफ इंडियासारख्या इंग्रजी पत्रांतूनहि लेख येऊं लागले आहेत हें होय. साऱ्याची तहकुबी किंवा सूट घुष्कळ दिली तर सरकारचें उत्पन्न बुडेल आणि सरकारचें उत्पन्न कमी झालें म्हणजे अर्थातच दुष्काळच्या रिलीफ कामाप्रीत्यर्थ खर्च करण्यास त्यांजवळ पैसे राहणार नाहींत, अशी मुंबईच्या कांहीं इंग्रजी पत्रांची सन १८९७ सालीं शंका होती. ही शंका यंदाच्या सालीं नाहींशी होऊन शेतकरी लोकांस सढळ हातानें साऱ्याची सूट व तहकुबी दिल्याखेरीज त्यांचा निभाव लागणार नाहीं असें टाइम्ससारख्या पत्रकर्त्यांस वाटूं लागलें आहे हें एक सुचिन्हच समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशननेंहि या बाबतींत मुंबईसरकारास एक अर्ज पाठविला आहे व त्या अर्जांतहि सरकारनें साऱ्याची सूट व तहकुबी यंदांच्या सालीं घुष्कळ उदार बुद्धीनें द्यावी अशी विनंती केली आहे. साऱ्याच्या आजपर्यंतच्या वसुलासंबंधानें जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून यंदाच्या सालीं अमदाबाद, पंचमहाल, खेडा आणि भडोच या चार

जिल्ह्यांत ६१ लाखांपैकीं १४॥ लाख आतांपर्यंत वसूल झालेले आहेत व फार झालें तर अखेरपर्यंत २५ लाख वसूल होतील असा अंदाज आहे. बाकी ३६ लाखांची सूट किंवा तहकुबी द्यावी लागेल असें टाइम्सकारांचें म्हणणें आहे. या चार जिल्ह्यांत दुष्काळचें स्वरूप अतिशय उग्र आहे हें सर्वांस माहीत आहेच. उत्तरभागचे कमिशनर यांनीं या जिल्ह्यांतून यंदा साऱ्याची बरीच सूट किंवा तहकुबी द्यावी लागेल असा सरकारास पहिल्यानेंच रिपोर्ट केला होता. पण सरकारनें १८९७ सालीं विजापूर जिल्ह्यांत साऱ्याचा जो वसूल झाला होता त्याचें उदाहरण दाखवून कमिशनर साहेबांचा अजमास बरोबर नाहीं असें प्रसिद्ध केलें होतें. विजापूरच्या अजमासाप्रमाणें म्हटलें म्हणजे या चार जिल्ह्यांत ६१ लाखांपैकीं जवळ जवळ ५० लाख रुपये यंदा उत्पन्न व्हावयास पाहिजे होते, पण त्याच्या निम्मे देखील उत्पन्न होतील कीं नाहीं याची वानवाच आहे. मध्यभागांतील जिल्ह्यांपैकीं पुणें जिल्ह्यांत १३ लक्ष वसुलापैकीं ६ लक्षांची तहकुबी द्यावी लागेल असें दिसतें. नाशिक जिल्हा सुमारें १५॥ लाख आहे, पैकीं ११ लाख वसूल झाला आहे; आणखी लाख सवालाख होईल. नगर जिल्ह्याचें उत्पन्न सुमारें १५॥। लक्षांचें आहे. पैकीं ५ लक्ष वसूल झाले आहेत व आणखी फार झालें तर ३।४ लक्ष होतील. सोलापूरच्या ११। लक्षांपैकीं ८ लक्ष वसूल झाला आहे आणि पुढें यापेक्षां फारसा जास्त होईल असें दिसत नाहीं. खानदेश जिल्हा ४१ लक्षांचा आहे, पैकीं २४॥ लक्ष वसूल झाले असून आणखी सुमारें ६ लक्ष रुपये वसूल होतील असा अजमास आहे. म्हणजे मध्यभागच्या ६ जिल्ह्यांतील ११६ लाखांपैकीं फार फार झालें तर ८१।८२ लक्ष रुपये वसूल होतील आणि बाकी ३४ लक्षांची तहकुबी द्यावी लागेल असें दिसतें. यांतील कांहीं जिल्ह्यांचे आंकडे ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. नगरापेक्षां खानदेश जिल्ह्यांत दुष्काळ कांहीं कमी नाहीं, तथापि नगरांत सुमारें १५॥। लक्षांपैकीं पांच लक्ष आणि खानदेशांत ४१ लक्षांपैकीं २४॥ लक्ष वसूल झाले आहेत, म्हणजे नगर जिल्ह्यांत $\frac{1}{3}$ ला कमी तर खानदेशाला निम्मेपेक्षां जास्त सारा आज मित्तीस वसूल झाला आहे. अर्थात् सारा वसूल करण्याची सक्ती खानदेशांत जास्त झाली असावी असें अनुमान होतें. सर्व जिल्ह्यांत सारखी व्यवस्था न राहतां कोठें अधिक आणि कोठें कमी सक्ती होते यांचें कारण खालील अधिकाऱ्यांची कमजास्त हुशारी होय; आणि खालील अधिकाऱ्यांच्या फाजील हुशारीस कोणत्याहि प्रकारचा आळा घालायचा असेल तर सरकारानें पहिल्यापासूनच या बाबतींतलें आपलें धोरण सर्व जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांस स्पष्टपणें कळाविलें पाहिजे. तसें न झालें तर कांहीं अधिकारी फाजील सक्ती करितात आणि कांहीं नेहमींप्रमाणें काम चालवितात. असो; दक्षिणभागासंबंधानें वसुलाची स्थिति दोन्ही भागांपेक्षां घुष्कळ चांगली आहे. विजापुरास १४ लाखांपैकीं ११ लाख वसूल

झाले आहेत आणि कुलाब्यास १३ पैकीं ११। लक्षांचा वसूल आहे. बेळगांव, धारवाड कानडा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांतून कुळांकडे फारशी बाकी राहील असें दिसत नाहीं व या जिल्ह्यांत इतर जिल्ह्यांप्रमाणें दुष्काळहि नाहीं. कुलाबा जिल्ह्यांत वसुलाची सक्ती झाल्याबद्दल बरीच ओरडं आहे; आणि विजापूरचीहि तीच स्थिति आहे. लोकांकडून हरप्रयत्न करूनहि सारा वसूल झाला नाहीं म्हणजे मग तहकुबीचा किंवा सुटीचा हुकूम काढण्यापेक्षां सरकारनें प्रथमच पिकाची पाहणी करून जर सुटीचे किंवा तहकुबीचे हुकूम काढले, तर लोकांस सुटीसंबंधाची जी सवलत मिळावयाची ती अधिक शिस्तवार मिळेल. पण सरकारानें तशा प्रकारची तजवीज आजपर्यंत कधींच केली नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. असो; आतां तरी साऱ्याच्या सुटीच्या व तहकुबीच्या बाबतींत सरकार अधिक औदार्याचें वर्तन स्वीकारील अशी आम्हांस आशा आहे. या सालच्या दुष्काळानें चोहोंकडे लोकांस अगदीं त्राहि त्राहि करून सोडलें आहे. शेतकऱ्यांचीं गुरेंढोरें बहुतेक नाहींशीं झाल्यामुळें यंदा पाऊस पडला तरी सर्व जमिनीची लागवड होईल कीं नाहीं याची शंका आहे. अशा स्थितींत शेतकऱ्यांच्या डोक्यावर साऱ्याचा बोजा ठेवणें कधींहि योग्य होणार नाहीं. ऐपत आणि बिन ऐपतदार कुळांची चौकशी करण्यांत कांहीं हंशील नाहीं. त्यामुळें खालील अधिकाऱ्यांस लोकांवर जुलूम करण्यास मात्र सवड होते; असें जें प्रेसिडेन्सी असोशिएशनचें म्हणणें आहे तें अगदीं बरोबर आहे. यासंबंधानें आम्हीं मागें चर्चा केलीच आहे. करितां त्याची पुनरुक्ती आज करीत नाहीं. सढळ हातानें साऱ्याची सूट दिली असतां कोट दोन कोट रुपये सरकारचें नुकसान होईल हें खरें आहे. पण दुष्काळाप्रीत्यर्थ म्हणून जर सरकार ७।८ कोट रुपये खर्च करतें तर त्यांतच आणखी २।३ कोटींची भर पडल्यास त्यामुळें सरकारचें विशेष नुकसान होईल असें नाहीं. दुष्काळनिवारणार्थ जो स्वतंत्र फंड काढलेला आहे त्या फंडांतूनच ही तूटहि भरून काढण्यास काय हरकत आहे ? किंबहुना, या फंडांतून साऱ्याच्या सुटीमुळे झालेले नुकसान भरून काढावें लागल असें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं पार्लमेंट सभेंत मागें एकदां बोलून दाखविलें आहे. हेंच बोलणें आतां अमलांत आणलें म्हणजे झालें. सन १८९७ सालापेक्षांहि यंदाच्या सालीं साऱ्याच्या सुटीची (केवळ तहकुबीची नव्हे) जास्त अवश्यकता आहे हें निर्विवाद आहे. परदेशांतील लोकांनीं लक्षावधि रुपये पाठवून आमच्या लोकांचे जीव वांचवावयाचा प्रयत्न करावा आणि इकडे आमच्या सरकारनें हर प्रयत्नानें होईल तेवढा सारा वसूल करावा हें मारवाडीपणापेक्षांहि अधिक निर्दयतेचें काम होय. करितां सरतेशेवटीं लॉर्ड नॉर्थकोट यांस आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या सर्व गोष्टींचा विचार करून यंदाच्या सालीं साऱ्याची सूट सढळ हातानें देण्याची तजवीज करावी.

पाऊस पडून पुढें कधीं सुबत्ता होईल ती होवो, पण आजची स्थिती अशी आहे कीं साऱ्याची नुसती तहकुबी देऊन म्हणजे त्यांच्या डोक्यावर साऱ्याचें ओझें आणखी चार वर्षें कायम ठेवून त्यांत शेतकऱ्याचा किंवा सरकारचा कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. उगाच शेतकऱ्यांचे मागें पाटिल कुलकर्णी यांचा तगादा मात्र चार वर्षें राहणार आहे. या तगाद्यांतून त्यांस मोकळें केल्यानें पुढें शेतकीचें काम चांगल्या रीतीनें करण्यास त्यांस उमेद येईल. नाहींपेक्षां यंदा नाहींतर पुढील सालीं तरी त्यांस सावकाराचें कर्ज काढून सारा भरावा लागेल. तात्पर्य, साऱ्याकरितां केव्हांहि सावकाराचें कर्ज काढण्याचा किंवा जमीन जुमला विकण्याचा शेतकऱ्यांवर प्रसंग येऊं नये अशी जर सरकारची खरोखरच इच्छा असेल तर पहिलें फॅमिन कमिशन बसण्यापूर्वी म्हणजे १८७६ सालीं मुंबईसरकारचें या बाबतींत जें धोरण होतें तेंच धोरण यंदाच्या सालींहि ठेवणें जरूर आहे. मुंबई हायकोर्टाचे मागील जज्ज मि० जार्डिन यांनीं नुक्ताच विलायतेस एका व्याख्यानांत आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले कीं, आपल्या अमदानींत इंदापूर तालुक्यांत दुष्काळ पडला तेव्हां आपण स्वतः तालुक्यांत फिरून शेतकऱ्यांची माहिती मिळविली आणि त्यांस एकदम सूट देण्याबद्दल सरकाराकडे शिफारस केली व त्या वेळच्या सरकारानें ती मंजूरहि केली. हेंच धोरण यंदाच्या सालींहि अमलांत आल्यास जिल्ह्याजिल्ह्यांच्या कलेक्टरांकडून साऱ्याच्या सुटीबद्दल शिफारशी येण्यास फारशी पंचाईत पडेल असें आम्हांस वाटत नाहीं, सरकारनें मात्र आपलें हल्लींचें धोरण सोडून देऊन अधिक औदार्य दाखविण्यास तयार तयार झालें पाहिजे आणि लॉर्ड नॉर्थकोट ह्यांच्या कारकीर्दींत मुंबईसरकार अशा प्रकारें तयार होईल अशी आम्हास आशा आहे.

❖ ❖ ❖

* लॉर्ड नॉर्थकोट यांचे दुष्काळव्यवस्थेबद्दलचे विचार

लॉर्ड नॉर्थकोट यांनीं डेक्कन सभेच्या मानपत्रास उत्तर देतांना मुंबईसरकार हल्लींच्या दुष्काळांत कोणत्या धोरणावर व्यवस्था ठेवीत आहे याबद्दल मुद्दाम आपण होऊन सर्व हकीकत सांगितली आहे. दुष्काळनिवारणार्थ फॅमिन कमिशन आणि फॅमिन कोडामध्यें जे निरनिराळे उपाय सांगितले आहेत ते सर्व मुंबई-सरकाराच्या हांतून आमलांत आले नाहींत व जे आले आहेत त्यांत मारवाडी-पणाचा आणि सक्तीचा भाग विशेष आहे अशी लोकांची ओरड आहे. लॉर्डनॉर्थ कोट यांनीं या आक्षेपांस सरळपणें उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल त्यांची तारीफ केली पाहिजे. आजच्या प्रसंगीं आपल्या भाषणांत या गोष्टींचा उल्लेख करण्याची गव्हर्नरसाहेबांस अगदीं जरूरच होती असें नाहीं. दुष्काळ संप-ल्यानंतर एकाद्या सरकारी ठरावांत या गोष्टी त्यास सहज घालतां आल्या असत्या. पण तसें न करतां आजच्या प्रसंगीं लॉर्ड नॉर्थकोट यांनीं जो खुलासा केला आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. यावरून नवीन कारकीर्दीचें धोरण पूर्वीच्याहून बऱ्याच अंशीं निराळें होईल असें दिसते. साऱ्याच्या बाबतींत या दुष्काळांत १८९७ सालच्या दुष्काळापेक्षां बरीच जास्त सवलत देण्याचा सरकारचा विचार दिसतो असें गेल्या अंकींच आम्हीं लिहिलें होतें. गव्हर्नरसाहेबांच्या हल्लींच्या भाषणावरून तेंच अनुमान दृढ होतें. कोष्टयासंबंधानें सभेच्या अर्जांत किंवा गव्हर्नरसाहेबांच्या उत्तरांत उल्लेख आलेला नाहीं. खोती-बिलासंबंधानें आपण अद्याप त्याचा नीट विचार केला नाहीं असे नॉर्थकोट यांनीं सांगितलें, व म्युनिसिपल बिलासंबंधानें म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास मान देतांना ज्या गोष्टी सांगितल्या त्यांचाच पुनः उल्लेख करून त्याप्रमाणें तजवीज होईल असें म्हणाले. इनॉक्युलेशन कमिशनसंबंधानें सभेच्या अर्जांत केलेल्या उल्लेखास उत्तर देतांना लॉर्ड नॉर्थकोट यांनीं इनॉक्युलेशनसंबंधानें कांहींतरी महत्त्वाची माहिती हें कमिशन गोळा करील अशी आपणांस आशा असल्याबद्दलचें बोलून दाखविलें. कमिशनची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून ही आशा कितपत सफल होईल याची आम्हांस शंकाच आहे. घार-वाडास साक्षीदार फार आले नाहींत म्हणून ओरड, तर हुबळीस जमलेल्या ६५० साक्षीदारांचा दोनचार तासांत निकाल, अशी ज्या कमिशनची काम करण्याची पद्धत, त्यांनीं गोळा केलेली माहिती किंवा बांधलेलीं अनुमानें शास्त्रीय रीत्या

---

* [केसरी ता. १० जुलै १९००]

फारशीं महत्त्वाचीं असणें शक्य नाहीं असें कोणास वाटल्यास त्यांत त्यांची चूक हाईल असें नाहीं.

असो. लॉर्ड नॉर्थकोट यांच्या भाषणांतील महत्त्वाचे जे मुद्दे आहेत ते निराळेच आहेत. दुष्काळग्रस्त लोकांना फुकट खाऊं घातल्यानें त्यांची काम करण्याची संवय मोडून ते एक प्रकारें घुढें निरुपयोगी होतात हें तत्त्व दुष्काळव्यवस्थेंत सरकारनें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे असें गव्हर्नरसाहेबांचें म्हणणें आहे. फॅमिन कमिशनच्या रिपोर्टांत हें तत्त्व दाखल केलें असून त्याच तत्त्वावर दुष्काळग्रस्तांकरितां रिलीफचीं कामें काढण्यांत येतात. दुष्काळग्रस्तांस फुकट खायला दिल्यानें ते अधिकाधिक निकृष्टावस्थेस जाऊन पुढें म्हणजे दुष्काळ गेल्यानंतर धंदा करण्याची त्यांच्या अंगांत उमेद रहात नाहीं हें इंग्रजी दुष्काळपद्धतीचें तत्त्व आहे एवढें आम्हांस मान्य आहे. पण केवळ या तत्त्वावर लक्ष देऊन दुष्काळ कामावर लागलेल्या लोकांच्या मजुरीचे दर रोजीं दोन तीन पैशावर आणून ठेवावें हें आमच्या मतें कांहीं बरोबर नाहीं. इंग्रजी अंमलापूर्वी कांहीं दुष्काळ पडत नसत असें नाहीं. परंतु पूर्वीचे राजे दुष्काळच्या प्रसंगीं रयतेस सर्व सारा माफ करून खेरीज गांवोगांव जीं सरकारी पेंवें असत त्यांतून गरीबांस खडी फोडावयास न लावतां फुकट धान्य देत असत; पण त्यामुळें देशांतली प्रजा उद्योग करण्यास नालायख होऊन निकृष्टावस्थेस पोहोंचल्याचें कोणासहि माहीत नाहीं. दानधर्म किंवा गरीब लोकांस मदत करणें झालें तरीहि ती त्यांजपासून काम घेतल्याखेरीज मदत करूं नये हें इंग्रजी तत्त्व हिंदुस्थानास सर्वांशींच लागू पडलें पाहिजे असें नाहीं. धर्मार्थ पाणपोईवर किंवा अन्नछत्रांत निरुपाय झाल्याखेरीज जाणें बरोबर नाहीं अशी ज्यांची धर्मसमजूत आहे असे लोक या देशांतल्या शेतककरी वर्गांतहि लाखों लोक सांपडतील. सरकार म्हणतें त्याप्रमाणें कांहीं चांगले लोकहि दुष्काळ कामावर जात असतील व जातात हें आम्हांस मान्य आहे. पण भिकाऱ्यांच्या लक्ष भोजनांत शें दोनशे चांगले लोक गेले म्हणून सर्व लोकांची उपासमार करणें ज्याप्रमाणें बरोबर नाहीं त्याचप्रमाणें दुष्काळ कामाचा प्रकार आहे. सारांश लोकांच्या रीतीभाती, धर्मसमजुती वगैरे गोष्टी लक्षांत घेतल्या तर दुष्काळग्रस्तांकरितां लहान लहान कामें काढणें, त्यांस आपलीं घरें दारें सोडण्याचा प्रसंग येण्यापूर्वीच मदत करणें, आणि दुष्काळ कामावर लागल्यावर त्यांनीं खडी फोडण्याचें काम नीट केलें नाहीं म्हणून त्यांजवर न रागावतां त्यांस सोईचें दुसरें काम सांगून पोटापुरतें तरी खायला देणें, अशा प्रकारची व्यवस्था सरकारातून अवश्य झाली पाहिजे. फुकट खायला घातलें म्हणजे लोक निकृष्टावस्थेस पोहोंचून कुचकामाचे होतात ही सबब आमच्या मतें योग्य नाहीं. निदान यामुळें दुष्काळकामावरील मजुरीचे दर पोटभर अन्न न मिळण्याइतके कमी करणें तरी कधींहि वाजवी होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. फॅमिन कमिशननें सांगि-

तलेलें तत्व तात्त्विकदृष्ट्या खरें असेल, पण व्यवहारांत त्याचा उपयोग करतांना दुसऱ्या पुष्कळ गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें. तशा प्रकारें मुंबईसरकारनें लक्ष ठेवल आहे कीं नाहीं हाच मुख्य मुद्दा आहे. आणि अशा दृष्टीनें विचार केला म्हणज होईल तितकें करून गांवोगांव कामें काढण्याबद्दल सरकारची हयगय आणि मजुरीचे दर, मजुरास शिक्षा म्हणून, अत्यत कमी करून त्यांच्या पोटास चिमटा बसेल अशा रीतीची सरकारची व्यवस्था हीं दोन्हींहि अश्लाघ्य होत असें म्हणणें जरूर पडत.

दुसरी गोष्ट साऱ्याच्या वसुलासंबंधाची होय. यदाच्या सालीं शेतकरी लोकांची दुर्दशा होऊन सरकारी सारा भरण्याचें त्यांस सामर्थ्य नाहीं इतकेच नव्हे, तर पाऊस पडला तरी पुढील सालीं शेतकी करण्यास त्यांजपाशीं आउतें अगर जनावरें राहिलीं नाहींत, हें लॉर्ड नॉर्थकोट यांच्या पूर्णपणें लक्षांत आहे ही समाधानकारक गोष्ट होय. अशा रीतीच्या शेतकऱ्यांस मदत करण्याबद्दस सरकारची तजवीज चालू आहे असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. ५६ लक्ष रुपये बीं व जनावरें विकत घेण्यास तगाई म्हणून काढलेले आहेत, आणि आणखीहि रक्कम या कामीं खर्च करण्यास सरकार तयार आहे. त्याचप्रमाणें धर्मार्थ दुष्काळफंडांतून गरीब शेतकऱ्यांस मदत करण्याचेंहि काम चालू आहे. तेव्हां कोणत्या ना कोणत्या तरी तऱ्हेनें मदत मिळून सर्व गरीब शेतकरी लोक या पावसाळ्यांत आपलें शेतकीचें काम पूर्ववत् चालवूं लागतील अशी गव्हर्नरसाहेबांस आशा आहे. ईश्वर करो आणि ही आशा सफल होवो म्हणजे झालें. साऱ्याच्या सुटीसंबंधानें ज्यास कर्ज काढल्याखेरीज सारा देण्याची ऐपत नाहीं त्याजवर साऱ्याबद्दल सक्ती करूं नये, अशा तऱ्हेचे जिल्ह्याजिल्ह्याच्या कलेक्टरांस स्पष्ट हुकूम गेले आहेत असें गव्हर्नरसाहेबांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें ज्यांच्यापासून सारा पुढें लौकर वसूल होण्याची बिलकूल आशा नाहीं त्यांस एकदम माफ करण्याबद्दलहि सरकारचा हूकूम झालेला आहे. हे हुकूम बरोबर आहेत; पण आमच्या मतें ते अधिक स्पष्ट असावयास पाहिजे होते. लोकांस फुकट खायला घातल्यानें लोकांची नीतिमत्ता बिघडण्याचा जसा संभव असतो, तसाच जमाबंदीचे बाबतींत असले मोघम हुकूम काढल्यानें खालील अधिकाऱ्यांस लोकांवर जुलूम करण्यास एक साधन होतें असा अनुभव आहे. त्यापेक्षां सगळा किंवा निम्मा सारा एकदम माफ करणें किंवा तहकूब करणें फार चांगलें. सारा न देण्याबद्दल श्रीमंत खातेदार कुळें कट करितात आणि तो कट मोडणें हें सरकारचें कर्तव्य आहे ही कल्पनाहि लॉर्ड नॉर्थकोट यांच्या मनांत इतक्यांतच भरलेली आहे असें त्यांच्या भाषणावरून उघड होतें. पण दुःखाची गोष्ट ही कीं त्यांनीं त्याबद्दल कांहीं पुरावा दिलेला नाहीं. आमचें तर असें मत आहे कीं, खालील अधिकारी आपल्या जुलमाच्या समर्थनार्थ ही सबब पुष्कळदां

पुढें आणीत असतात. त्यांतून कुळें आणि सरकार यांच्या दरम्यान जेथें जमीनदारांचा वर्ग असतो तेथें मुलकी अधिकाऱ्यांस अशा प्रकारची सबब सरकारपुढें मांडणें अगदीं सोपें असतें. जमिनदार लोक हे श्रीमंत असावयाचेच. पण नेहमीं प्रश्न असा असतो कीं, जमिनदार लोकांस जर साऱ्याची सूट किंवा तहकुबी मिळेल तर ती कुळांस मिळणार, नाहींपेक्षां जमिनदारानें भरलेला सारा कुळापासून केव्हांना केव्हां तरी तो वसूल करून घेणारच. अशा ठिकाणीं जमिनदारांस साऱ्याची सूट किंवा तहकुबी मिळाली पाहिजे असें फॅमिन कमिशनचेंहि मत आहे. पण होईल तितका सारा वसूल करण्याच्या धांदलींत या मताकडे लक्ष न देतां सरकारी अधिकारी या जमिनदारांस तक्रारी ठरवून त्यांच्यापासून सर्व सारा सक्तीनें वसूल करतात. सारा न देण्याबद्दल कट केल्याचीं गव्हर्नरसाहेबांपुढें जर कोणी कांहीं उदाहरणें ठेवलीं असलीं तर तीं प्रायः याच मासल्याचीं असावीं. गहाणदारापासून सारा वसूल करणें हाहि यांतलाच प्रकार होय. या बाबतींत जी सक्ती किंवा जुलूम होतो त्याचा मुंबईसरकारनें १८९७ सालींहि विचार केला नव्हता; व यंदाहि करील असें दिसत नाहीं. गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत असे कट कोठें कोठें झाले आहेत व त्यास पुरावा काय आहे याचा जर स्पष्ट उल्लेख केला असता तर त्याबद्दल सविस्तर विवेचन करतां आलें असतें. पण तसा प्रकार ज्या अर्थीं झाला नाहीं त्या अर्थीं सारा न देण्याबद्दच्या कटाची कल्पना खालील अधिकाऱ्यांनीं आपल्या जुलुमाच्या समर्थनार्थ काढली असावी असें जें आमचें मत आहे तें बदलण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. सन १८९७ सालीं सार्वजनिक सभेनें एजंट पाठविले म्हणून त्यांच्या डोक्यावर या कटाचें अपयश घालण्याचा सरकारनें प्रयत्न केला होता. यंदाच्या सालीं सभेनें एजंट पाठविले नाहींत तरीहि तीच स्थिति आहे. यावरून खरा प्रकार काय असावा याची कोणासहि सहज कल्पना होईल; व लॉर्ड नॉर्थकोट यांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या बाबतींतील खरें बीज शोधून काढून मग योग्य ती तजवीज करावी, केवळ खालील अधिकाऱ्यांच्याच मतावर भिस्त ठेवूं नये.

* पुण्यावर पन्नास लाखांची धाड

पुण्यांतील लोकांवर एका मोठ्या प्रश्नाचा निकाल लावण्याची वेळ लॉकरच येणार आहे किंवा आली आहे असें म्हटलें तरी चालेल. हा प्रश्न शहरांतील मलमूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यासबंधाचा होय. हा विषय स्थानिक आहे व सामान्यतः केवळ स्थानिक विषयाचा विशेष उहापोह केसरी पत्रांत फारसा न करण्याची आमची वहिवाट आहे. पण त्या वहीवाटीस सोडून देऊन या विषयासंबंधानें आम्ही लवकरच सर्व हकीकत प्रसिद्ध करणार आहोंत. याचें कारण असें कीं हा विषय जरी स्थानिक असला तरी लौकरच इतर म्युनिसिपालिट्यांवरहि अशीच धाड येण्याचा संभव असल्यामुळें त्याबद्दलची माहिती सर्वांस असणें जरूर आहे. कोणत्याहि शहरास पाण्याचा पुरवठा आणि मलमूत्र किंवा घाणेरडें पाणी वाहून नेण्याची सोय असणें अवश्य आहे. हें तत्त्व पेशव्यांसहि पूर्णपणें माहीत होतें. लहान खेडेगांवांतून या बाबतींत जी व्यवस्था असते ती मोठे शहरास कधींच लागू पडत नाहीं, करितां शहर म्हटलें म्हणजे तेथें पाण्याचा नळ आणि सांडपाणी वाहून नेणारा नाला या दोन गोष्टी अवश्य पाहिजेत. पुणें शहर वसविलें तेव्हां पेशव्यांनीं या दोन गोष्टींची त्या वेळच्या समजुतीप्रमाणें चांगली सोय केली होती. कात्रजचा तलाव बांधून तेथून त्यांनीं शहरांत पाणी आणलें होतें. व शहरांतील सांडपाणी मोठा नाला बांधून कुंभारवेशीच्या घरणाखालीं सोडून दिलें होतें. या दोन्ही कामांस त्यावेळीं पुष्कळ खर्च झाला असावा; पण तो सर्व पेशवेसरकारानींच केला होता. हल्लींच्या राज्यांत ही पद्धत अगदीं बदलून गेली आहे. इंग्रजसरकार आपल्या ऑफिसां करतां किंवा बड्या अधिकाऱ्यांच्या सोईकरितां पुष्कळ पैसे खर्च करितें खरें, पण खुद्द राजधानीच्या शहरांतील देखील सुधारणा करण्याचें काम त्यांनीं लोकांकडेच सोंपविलें आहे, अथवा सर्वच लोकांकडे सोंपविलें आहे असें म्हणण्यापेक्षां याबद्दलच्या खर्चाची जबाबदारी त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या डोक्यावरच लादली आहे असें म्हणणें वस्तुस्थितीस अधिक शोभण्यासारखें आहे. कारण सर्वच ठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांचें काम चालविण्याचा अधिकार लोकांस दिलेला नाहीं, व ज्या ठिकाणीं तो दिला आहे त्या ठिकाणींहि तो फार मर्यादित आहे इतकेंच नव्हे, तर आणखीहि मर्यादित करण्याचा प्रयत्न चालू आहे. असो. सध्यां आपणापुढें तो विषय नाहीं. प्रत्येक शहरांत पाण्याचा घुरवठा करणें अथवा नाला बांधून मैला किंवा सांडपाणी वाहून नेणें याबद्दलच्या खर्चाची जबाबदारी म्युनिसिपल ॲक्टानें त्या त्या शहरांतील लोकांवर

---

*[केसरी ता. ३१ जुलई १९००]

ठेवली असून त्या ठिकाणच्या म्युनिसिपालिटीच्या कर्तव्यांपैकीं हें एक कर्तव्य आहे असें ठरविलें आहे. या कर्तव्यानुरूप पुणें शहरांतील पाण्याचा पुरवठा आणि नाला सुधारण्यासंबंधीं प्रश्न पुणें म्युनिसिपालिटीपुढें येऊन बरींच वर्षें झालीं आहेत. पूर्वीं कात्रजचें पाणीं हौदांत सोडून तेवढ्या गोड्या पाण्यावर लोकांचा निर्वाह होत असे; पण कात्रजचा तलाव भरून चालल्यामुळें व शहरांतहि लोकांस घरोघर नळाचें पाणी असावें अशी इच्छा झाल्यामुळें पूर्वीचें पाणी पुरेनासें होऊन आज कित्येक वर्षें म्युनिसिपालिटी कालव्याचें पाणी येत आहे. पण पाणी गाळून घेण्याबद्दल कांहीं व्यवस्था नसून पावसाळ्यांत तर चिखलाचें पाणी येथील लोकांस प्यावें लागतें. तेव्हां या बाबतीत सुधारणा काय करावी हा एक प्रश्न आहे; परंतु याहिपेक्षां महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नाल्याचा होय. पेशवाईतील नाले व मोऱ्या दगडी असल्यामुळें त्यांतील पाणी जमिनींत मुरतें आणि बऱ्याच ठिकाणीं हे नाले अगदीं मोडकळीस आलेले आहेत. तेव्हां त्यांची दुरुस्ती करावयाची किंवा नव्या शास्त्रीय पद्धतीप्रमाणें नवीनच ड्रेनेज करावयाचा हाहि प्रश्न येथील म्युनिसिपालिटीपुढें येऊन बरेच दिवस झालेले आहेत. सरकारनें खडकवासल्याचें धरण बांधून आमच्या पायगतची नदी जेव्हां उशागती नेऊन ठेवली, तेव्हां या प्रश्नाचा निकाल करण्याची लोकांस विशेष अवश्यकता वाटूं लागली. पुणें शहर हें पर्वतीपासून नदीपर्यंत उतरत्या जागेवर वसलेलें आहे त्यामुळें पर्वतीवरून जाणाऱ्या कालव्यानें शहरांतील घरांखालील जमिनींत जास्त ओलावा येऊन ज्या जुन्या विहिरींत उन्हाळ्यांत खाऱ्या पाण्याचाहि थेंब राहत नसे त्याच विहिरी बाराहि महिने आतां गोडे पाण्यानें भरलेल्या असतात. शहरांतील जमिनीचा हा नवीन आलेला ओलसरपणा काढून टाकण्यास शहरांतील नाला चांगला करणें हाच एक उपाय होता; व सन १८८१ सालीं कर्नल डयूकेट व रा. सा. गंगाधर अनंत भट यांनीं नवीन कोणत्या प्रकारचा नाला करावा याबद्दल एक तपशिलपत्रक तयार करून म्युनिसिपालिटीकडे पाठवून दिलेलें होतें. डयूकेटसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणें मोऱ्या व नाला तयार करण्यास आठ नऊ लाख रुपये लागत होते; परंतु एवढा खर्च करण्याची त्यावेळीं येथील म्युनिसिपालिटीस शक्ती नसल्यामुळें व अन्य कारणांनीं हें प्रकरण कांहीं वर्षें तसच पडून राहिलें. पण गेल्या दोन चार वर्षांतील प्लेगामुळें पुनः त्यानें उचल खाल्ली आहे. सरकारचे सॅनिटरी इंजिनियर मि. पॉटिंजर यांचें आतां असें म्हणणें आहे कीं, पुण्यासारख्या शहराला हल्लींच्या ताज्या शास्त्रीय पद्धतीप्रमाणें मैला व सांडपाणी वाहून नेणारा नाला आणि चांगल्या पाण्याचा पुरवठा करण्यास ४०।५० लाख रुपये लागतात, व तेवढे पैसे कर्ज काढून किंवा अन्य तऱ्हेनें म्युनिसिपालिटीनें दिले पाहिजेत. मि. पॉटिंजर यांनीं तयार केलेल्या तपशिलपत्रकांत या नाल्याच्या पाण्याचा

शेतांत उपयोग करून त्यापासून बरेंच मोठें उत्पन्न होणें शक्य आहे असें दाखविलें आहे; व त्यांचें असेंहि म्हणणें आहे कीं, हे ४०।५० लाख रुपये कर्ज काढले तरी त्याचा बोजा शहरांतील लोकांवर पडणार नाहीं. पण असल्या बाबतींत खर्च व्हावयाचा तो होतो आणि अंदाजाप्रमाणे पुढें उत्पन्न मात्र हातीं येण्यास कठींण पडतें असा सर्वत्र अनुभव आहे. करितां तूर्त येथील म्युनिसिपालिटीनें व लोकांनीं ज्या प्रश्नाचा मुख्यत्वेंकरून विचार करावयाचा तो आमच्या मतें खर्चाबद्दलचाच होय. नाला बांधण्याचें काम ८ लाखांपासून १०० लाखांपर्यंत कमजास्त मानानें हवें तसें करितां येईल. शहरांत कोठेंहि यत्किंचित् देखील सांडपाणी राहूं नये आणि हें सांडपाणी व मल त्वरित व कोठेंहि दुर्गंधी न सुटतां अचानक शहराबाहेर जाऊन पडावा, अशी तजवीज करण्यास आम्ही जितके पैसे खर्च करूं तितके थोडेच आहेत. पण मोठ्या खर्चानें उत्कृष्ट कांचेच्या मोऱ्या बांधतां येत असल्या तरी आम्हांस त्याचा काय उपयोग ? आम्हांस आपले पाय अंथरूण पाहूनच पसरले पाहिजेत. सारांश, आमच्या मतें हा प्रश्न केवळ इंजिनियर लोकांचा नाहीं. मुंबईसारख्या शहरांत—कीं जेथें उत्पन्नच ६० लाख रुपयांचें आहे—मोठमोठ्या खर्चाचे नाले बांधण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ज्या म्युनिसिपालिटीस पुर तीन लाखहि उत्पन्न नाहीं तिनें नाल्याच्या पाण्यावर शेतवाडी करून त्याचें पुढें पुष्कळ उत्पन्न होईल या आशेवर ४०।५० लाख रुपये आज खर्च करणें म्हणजे मनोराज्यांतील राजवाडा बांधण्याकरितां आपल्या हल्लींच्या सुखावर लाथ मारण्याइतकेंच असमंजसपणाचें आहे. प्रत्येक मनुष्यास रहावयास घर पाहिजे असतें, पण प्रत्येकानें मला राजवाडा पाहिजे असें म्हणणें जितकें उपहासास्पद आहे तितकेंच मुंबई किंवा लंडन शहरच्या नाल्याच्या धर्तीवर पुणें शहरांतील नाला बांधण्याचा विचार करणें हें होय. नवीन नाले जर दोनतीन प्रकारें बांधतां येण्यासारखे आहेत तर त्यांत आपल्या उत्पन्नाच्या मानानें आपल्या सोईची गोष्ट कोणती याचा पहिल्यानें विचार केला पाहिजे. हत्ती स्वस्त मिळाला तरी तो घेऊन त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. मि. पॉटिंजर यांनीं योजलेल्या नाल्याचे काम अशाच प्रकारचें आहे. ४०।५० लाख रुपये ज्या कामास लागतात असें काम करून पुणें शहरांतील लोकांवर कराचा कायमचा बोजा वाढविणें अगदीं गैरवाजवी आहे. त्यांतून सरकार पेशव्यांप्रमाणें पुणें शहरास जर नाला बांधून देत असतें, तर गोष्ट निराळी. पण तसा प्रकार घडून येण्याचे आतां दिवस राहिले नाहींत. उलट सरकारच्या लष्कराची छावणी पुण्याबाहेर असल्यामुळें पूर्वी शहरांतील नाल्याचें पाणी नदींत सोडून दिल्यानें जें काम भागत असे तसें आतां न होतां पुण्यापासून दोन तीन मैलाच्या अंतरावर हे पाणी सोडून दिलें पाहिजे असें सरकारचें म्हणणें आहे. म्हणजे पेशवाईप्रमाणें आतां सरकारी

खर्चानें हें काम होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर खडकवासल्याचा कालवा शहराच्या वरच्या भागातून गेल्यानें आणि शहरच्या नदींत सांडपाणी सोडण्यास सरकारची मनाई असल्यानें, नाला बांधण्याचें काम पूर्वापेक्षांहि जास्त खर्चाचें झालें आहे. वास्तविक पाहिलें असतां हा जादा खर्च तरी सरकारनेंच सोसला पाहिजे. पण तो प्रश्न जरी सध्यां एका बाजूस ठेवला तरी सर्व शहरांतून मुंबईसारखी मोठ्या खर्चाची नाल्याची व्यवस्था करावयाची किंवा ज्या त्या शहराच्या ऐपती प्रमाणें तेथील सांडपाणी किंवा मैला वाहून नेण्याची व्यवस्था करावयाची हा आज आमच्या मतें मुख्य प्रश्न आहे. मि. पॉटिंजर साहेबांनीं योजलेली नाल्याची व्यवस्था अगदीं निर्दोष असेल. पण ही ४०।५० लाखांची धोंड आमच्या डोक्यावर दिल्यास ती आम्हांस कितपत सहन करतां येईल याचा आम्ही प्रथमतः विचार केला पाहिजे. अमुक एक प्रकारचा नाला जास्त चांगला किंवा सोईवार एवढेंच बघून उपयोगाचें नाहीं. यासंबंधानें तपशिलवार माहिती आम्ही पुढें देणार आहों, पण तत्पूर्वी ही जी ४०।५० लाखांची धाड पुण्यावर येऊं पहात आहे त्याचा येथील लोकांनीं ताबडतोब विचार केला पाहिजे असें त्यांस आमचें सांगणें आहे. नाला अमक्या तऱ्हेनें बांधावा किंवा अमक्या तऱ्हेनें बांधू नये या बाबतींत लोकांस आपलें मत देतां येणार नाहीं. या गोष्टी त्या विषयातील वाकबगार अशा इंजिनियर लोकांनींच ठरविल्या पाहिजेत. तथापि आम्हांस अमुक एक रकमेपर्यंत खर्च करण्याची ताकद आहे एवढी गोष्ट म्युनिसिपालिटीच्याद्वारें सरकारास कळविणें अत्यंत आवश्यक आहे. नाहींपेक्षां पुण्यासच नव्हे तर हळूहळू इलाख्यांत इतर ठिकाणींहि मोठमोठ्या खर्चाचे पाण्याचे नळ, नाले आणि मोऱ्या यांच्या पायीं म्युनिसिपालिट्या कर्जात बुडून जाऊन लोकांवरील कर्जाचें ओझें अतिशय वाढण्याचा संभव आहे. येथील म्युनिसिपल कमिशनरांनींहि याच दृष्टीनें या प्रश्नाचा पहिल्यानें विचार केला पाहिजे. कोणीहि मनुष्य घ्या, जो तो आपल्या ऐपतीप्रमाणें आपलें घर बांधीत असतो व हाच न्याय म्युनिसिपालिटीसाहि लागू आहे. अमदाबाद म्युनिसिपालिटीनें या बाबतींत आमच्या मतें बरीच दूरदृष्टी व हुषारी दाखविली आहे, व त्याचेंच अनुकरण पुण्यांतील लोक करतील अशी आम्हांला उमेद आहे. आपल्या ऐपतीप्रमाणें घर बांधणें आणि तें बांधतांना होईल तितकी काटकसर करणें याच काय त्या दोन मुद्याच्या गोष्टी आहेत व पुण्यांतील लोक जर आज तिकडे लक्ष देणार नाहींत तर त्याचा परिणाम त्यांसच नव्हे तर त्यांच्या मुलांबाळांसहि भोगावा लागेल. सबब वेळींच जागें होऊन त्यानीं या बाबतींत आपलें मत सरकारास कळविणें इष्ट आहे. मागें डयूकेट साहेबांनीं केलेल्या नाला बांधण्याच्या व्यवस्थेसंबंधानें लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न झाला होता तसा तो हल्लींहि होईल अशी आशा आम्हांस आहे.

केसरी ग्रंथ संग्रहालय
.....नं.....
ता. ....

* पुण्यावर पन्नास लक्षांची आफत.

गेल्या अंकीं या शहरांतील सांडपाण्याचा नाला व स्वच्छ पाण्याचा पुरवठा नव्या शास्त्रीय पद्धतीवर सुधारून करण्यास सुमारें ५० लाख रुपयांचा खर्च येथील म्युनिसिपालिटीवर लादण्याचा कित्येक सरकारी अधिकाऱ्यांचा विचार आहे असें लिहिलें होतें. यासंबंधानें शहरांतील लोकांनीं काय करावें हें सांगण्यापूर्वीं सांडपाण्याच्या व मैलाच्या मोऱ्या शास्त्रीय पद्धतीनें तयार करण्याच्या ज्या कृती हल्लीं निघाल्या आहेत त्यासंबंधानें थोडीशी माहिती देणें अवश्य आहे. तसेंच पाण्याच्याहि पुरवठ्यासंबंधानें दोन शब्द सांगितले पाहिजेत. तेवढें आज सांगून त्यासंबंधाची चर्चा पुढें घेऊं.

पुणें शहरास पाण्याचा पुरवठा पांच सात प्रकारें होत आहे. पैकीं सदाशिव पेठचा, रास्त्याचा आणि चौघऱ्याचा हे नळ लहान म्हणून सोडून दिले तर शहरास पाण्याचा पुरवठा होण्यास मुख्य कात्रज, खडकवासल्याचा कालवा, नदी आणि विहिरी, हीं चारच साधनें राहतात. पैकीं खडकवासल्याच्या धरणामुळें नदी निरुपयोगीच झाली आहे; आणि विहिरीचें खारें पाणी दूर्वीं घुष्कळ लोक वापरीत असले तरी हल्लीं त्याचा पूर्वीं इतका कोणी उपयोग करीत नाहींत. तेव्हां कात्रज आणि खडवासल्याचा कालवा हीं दोनच गोड्या पाण्याच्या पुरवठ्याचीं साधनें शिल्लक राहतात. पुणें शहरची वस्ती सुमारें एक लाख धरली तर एवढ्या वस्तीस कात्रजच्या तलावाचें पाणी हल्लींहि पुरत नाहीं. ह्या तलावांत सांचलेला गाळ काढल्यानें आणि तलावाच्या धरणाची भिंत वाढविल्यानें पाण्याचा कांहीं पुरवठा जास्त होईल खरा; पण दर माणशीं दररोज २० ग्यालन किंवा १०० शेर पाण्यापेक्षां जास्त पाणी या तलावांतून शहरांतील लोकांस मिळेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. सारांश, शहरांत स्वच्छ पाण्याचा मुबलक पुरवठा करणेंच असेल तर म्युनिसिपालिटीनें एक नवीन धरण तरी बांधलें पाहिजे, किंवा खडकवासल्याच्या कालव्याचें पाणी सरकारापासून विकत घेऊन तें सांठविण्याची व गाळून घेण्याची तजवीज केली पाहिजे. गाळलेलें स्वच्छ पाणी शहरांत आल्यास शहरांतील रोगराई कांहीं अंशानें तरी कमी झालीच पाहिजे, हें अनेक ठिकाणच्या अनुभवावरून सिद्ध आहे. पिण्याचें पाणी जितकें स्वच्छ असेल तितकी रोगराई कमी, याच तत्त्वावर "वस्त्रपूतं पिबेत्जलं" ही म्हण प्रचारांत आलेली आहे. पूर्वीची वहिवाट म्हटली म्हणजे पिण्याचें पाणी निराळें आणि खर्चाचें निराळें अशी होती. पण ती वहिवाट मोडत जाऊन

---

* [केसरी ता. ७ आगस्ट १९००]

आतां नळाचें पाणी सर्व व्यवहाराकरितां लोक वापरूं लागले आहेत. हें पाणी दर माणशीं निदान दररोज वीस ग्यालन तरी लागतें. पण पाण्यानें मल वाहून नेणारा मोठा नाला शहरांत बांधला असतां दर माणशीं निदान रोजचा ३०।३५ ग्यालन या प्रमाणानें तरी पाण्याचा पुरवठा झाला पाहिजे. एवढा पुरवठा होण्यास खडकवासल्याखेरीज दुसरें साधन नाहीं आणि त्याचा उपयोग करूं म्हटल्यास पाणी सांठविण्याचे, निवळण्याचे आणि गाळण्याचे हौद शहराकरितां स्वतंत्र तयार करून त्या पाण्याचा गावांत पुरवठा करण्यास निदान ७।८ लाख रुपये खर्च लागेल असा अदमास आहे. कित्येकांचें असें मत आहे कीं, कात्रजच्या तलावाची भिंत चढवून व गाळ काढून होईल तितका पाण्याचा पुरवठा जास्त करावा मग जरूर लागल्यास कालव्याचें आणखी जास्त पाणी घेण्याची व्यवस्था करावी. काटकसरीच्या दृष्टीनें पाहिलें तर हें म्हणणें बरेंच सयुक्तिक आहे; आणि शहरांतील लोकांस लागणाऱ्या पिण्याच्या पाण्यासंबंधानेंच जर बंदोबस्त करावयाचा असेल तर हें अवश्य जमेस धरण्यासारखें आहे; पण पाण्यानें मलमूत्र वाहून नेणारा मोठा नाला कर्तव्य असल्यास किंवा करावा लागल्यास कात्रजच्या पाण्याचा पुरवठा कधींहि पुरा पडणार नाहीं. त्यास कालव्याचेंच पाणी घेतलें पाहिजे. करितां या नाल्यासंबंधानें आधीं काय तो निकाल झाला पाहिजे.

पेशव्यांनीं पुणें शहर वसविलें तेव्हां त्या वेळच्या समजुतीप्रमाणें शहराकरितां सांडपाण्याच्या नाल्याचींहि तजवीज केली होती. व याच नाल्यांतून पावसाचेंहि पाणी वाहून जात असे. कांहीं ठिकाणीं हा नाला पुरुषापेक्षांहि जास्त उंचीचा आहे व तो चांगला बांधून काढलेला आहे. शहरांतील सर्व नाले ओंकारेश्वराजवळ मोठ्या नाल्यांत सोडून दिले असून तेथून ती मोरी नदीकांठानें पुढें सारखी बांधून नेऊन कुंभारवेशीच्या धरणाखालीं तें पाणी सोडून दिलें आहे. याखेरीज नागझरी व माणिकनाला यांतूनहि सांडपाणी वाहून जाऊन नदीस मिळतें. सारांश नदी ही सांडपाणी सोडून देण्याची पूर्वीपासून जागा असून तेथून हें पाणी पुढें वाहत जात असे. शहर पर्वतीकडून नदीकडे उतरतें असल्यामुळें नालेहि नदीकडच्या बाजूला आपोआप उतरते राहून मोठ्या मोरीचें तोंड नदीमध्यें करण्यास कांहीं हरकत नव्हती. परंतु ही पूर्वीची व्यवस्था आतां सुरळीत चालेनाशी झाली आहे. नदीला वर धरण पडल्यामुळें नदी पूर्वीप्रमाणें वाहती राहिली नाहीं. वर धरण पडलें इतकेंच नव्हे, तर बंडाजवळ खालींहि धरण पडून त्यामुळें झालेला पाण्याचा तुंबा शहराच्या एका भागास थोडा बहुत अपायकारक झाला आहे. दुसरें कारण असें कीं, सांडपाणी नदींत सोडल्यानें नदीचें घाण होऊन नदीचें पाणी पिण्यास नालायख होतें अशी सरकारी अधिकाऱ्यांची तक्रार आहे. कारण, कांहीं वर्षांपूर्वी नदीचेंच पाणी तेथील लष्कराचे लोकांस पिण्याकरितां नेत असत. हल्लीं खडकवासल्याच्या कालव्याचें पाणी लष्करांत

जातें तेव्हां कदाचित् पूर्वीप्रमाणें नदींत सांडपाणी सोडून देण्यास सरकारची हरकत पडणार नाहीं. तथापि मोऱ्यांतून मळहि वाहून नेण्याची सोय केल्यास तशा प्रकारचा नाला नदींत सोडून देण्याची परवानगी सरकार देईल कीं नाहीं याची वानवाच आहे, तिसरी गोष्ट अशी कीं, जुने नाले घुष्कळ ठिकाणीं नादुरुस्त असून त्यांतून वाहत जाणारें पाणीं कांहीं ठिकाणीं जमिनींत मुरतें व कांहीं ठिकाणीं तर ते नाले अगदीं गाळानें भरून गेले आहेत अशी स्थिती आहे. याकरितां जुना नाला अजिबात टाकून देऊन सर्व शहरभर नवीन शास्त्रीय पद्धतीनें नाले बांधावे अशी सूचना आज कित्येक वर्षें येथील म्युनिसिपालिटीपुढें विचाराकरितां येऊन पडलेली आहे; व तिचेंच अगदीं ताजें रूप म्हणजे मि. पॉटिंजर यांचा पन्नास लाखांचा नाला व पाण्याचा घुरवठा होय. ही व्यवस्था योजतानां कोणतीं धोरणें लक्षांत ठेविलीं आहेत याची थोडीशी हकीकत देणें जरूर आहे. पुणें शहरास स्वच्छ पाण्याचा घुरवठा आणि चांगला नाला या दोन्हीं गोष्टींची जरूरी आहे, पण या शहरच्या ऐपतीच्या मानानें या दोन्ही गोष्टी कशा साध्य कराव्या एवढाच काय तो प्रश्न आहे. त्याचें उत्तर देण्यापूर्वी नवीन नाला कोणत्या प्रकारचा करण्याचा विचार आहे याचें थोडेंसें विवेचन करूं.

आजपर्यंत पुणें शहरांतील पायखाने भंग्यामार्फत साफ करवून मैला ठिकठिकाणीं गाड्यांत भरून त्या गाड्या शहराबाहेर नेऊन तेथें मैला व गांवांतील राख यांच्या मिश्रणानें सोनखत तयार करून तें उसाच्या लागवडीसाठीं आसपासच्या शेतकऱ्यांस विकत देण्याची वहिवाट आहे. या वहिवाटीमुळें हा मैला नाल्यांत टाकण्याची कांहीं जरूर पडत नाहीं. व खताचें म्युनिसिपालिटीस उत्पन्नहि तीसपासून साठ हजार रुपयेपर्यंत कमजास्त मानानें होत आहे. मैला अशा रीतीनें वाहून नेऊन त्याचें खत करण्याची पद्धत चांगली नाहीं व तो नाल्यांतूनच सोडून देऊन पाण्याच्या जोरानें शहराबाहेर वाहून जाईल अशी व्यवस्था केली पाहिजे असें आतां सरकारी इंजिनियरांचें म्हणणें आहे. कर्नल डयूकेट साहेबांनीं सन १८८१ सालीं पुणें शहराकरितां नवीन नाला बांधण्याची योजना करून जीं तपशीलपत्रकें तयार केलीं होतीं तीं याच तत्त्वावर होतीं. दरएक घरांत नवीन तऱ्हेचे पायखाने व मोऱ्या बांधून त्यांतील सर्व सांडपाणी व मैला रस्त्यांतील लहान सांडपाण्याच्या नळांत आणि तेथून मोठ्या नाल्यांत आणून तो शहराबाहेर सोडावा आणि आणि मग तेथें तीनशें एकर जमीनं खरेदी करून त्या जमिनींत हें खत घालून म्युनिसिपालिटीनें स्वतः उसाची वगैरे लागवड करून त्याचें जें उत्पन्न येईल तें घ्यावें, अशा प्रकारची कर्नल डयूकेट यांची नाल्याची योजना होती. व त्यांच्या अदमासाप्रमाणें या सर्व कामास सुमारें नऊ लाख रुपयांचा खर्च आकारला होता. यांत पाण्याचा वगैरे खर्च धरलेला नव्हता. तो व

आणखी दुसरे कांहीं खर्च धरले तर डयूकेटसाहेबांच्या नाल्यास एकंदर सुमारें १२ लाखपर्यंत खर्च येईल असें त्यावेळच्या कागदापत्रांवरून दिसतें. पावसाचें पाणी नाल्यांत जाऊं न देतां तें वरच्या वर उघडीं गटारें बांधून नदींत नेऊन सांडावयाचें आणि मैला व सांडपाणी हीं दोन्हीं जमिनीखालून मोठे नळ घालून त्यांतून सुमारें दोनतीन तासांत शहराबाहेर शेतांत जाऊन पडतील अशी व्यवस्था करावयाची, व त्या खताचा जमिनीवर उपयोग करून उसाचें वगैरे उत्पन्न करावयाचें, हे डयूकेटसाहेबांनीं योजलेल्या व्यवस्थेंतील मुख्य भाग होत. डयूकेटसाहेबांच्या नाल्यासंबंधानें जी कांहीं पुढें चर्चा झाली त्यांत अशा प्रकारच्या नाल्यापासून गांवांतील रोगराई कमी न होतां उलट जास्त होते व खर्चहि फार होतो हेच काय ते दोन मुख्य मुद्दे होते. मैला सांडपाण्यांत मिसळून तो नाल्यांत सोडल्यानें सारखा वाहत न जातां मध्येंच कुजून जातो व त्यामुळें एक प्रकारचा विषारी वायु किंवा वाफ नाल्यांत सांचून नाल्यांतून मोऱ्यांच्या द्वारें ती घरांत शिरते, व त्यामुळें लोकांच्या आरोग्यास धक्का बसण्याचा संभव असतो, असें त्यावेळीं कित्येक डाक्तरांचें म्हणणें होतें. मुंबई म्युनिसिपालिटीनें त्यावेळीं बांधलेल्या नाल्यासंबंधानेंहि अशीच तक्रार होती; व त्यामुळें डयूकेटसाहेबांनीं योजिलेली मोठ्या खर्चाची व्यवस्था कितपत सिद्धीस जाईल ही शंका आणि ती सिद्धीस न गेल्यास खर्चाखालीं पुणें शहराच्या म्युनिसिपालिटीचा मात्र चुराडा होईल अशी भीति त्यावेळीं पुष्कळांस वाटत होती. सारांश, शहरच्या नाल्यांत मैला सोडून देण्यास तेव्हां लोकमत अनुकूल नव्हतें व दहा बारा लाख खर्चाचाहि बोजा विशेष आहे असें तेव्हांहि लोकांस वाटत होतें.

डयूकटसाहेबांनीं जी व्यवस्था सुचविली त्यास आज जवळ जवळ वीस वर्षें झालीं. इतक्या मुदतींत अमदाबाद, रंगून, कराची वगैरे ठिकाणीं नाल्याचीं कामें नवीन पद्धतीवर होऊन त्यामुळें व युरोपांत दुसऱ्या ठिकाणीं जीं अशीं कामें झालीं आहेत त्यामुळें पुष्कळ नवीन अनुभव मिळून नाला बांधण्याच्या कामीं नवीन सुधारणाहि करण्यांत व सुचविण्यांत आल्या आहेत. मलमूत्र आणि सांडपाणीं नाल्यांतून त्वरित वाहून जाण्यास नाले अमुक एक उताराचे असावे हें आतां बहुतेक निश्चित ठरल्यासारखें झालें आहे. तसेंच ज्या ठिकाणीं नाल्यास इतका उतार देणें शक्य नाहीं तेथें नाल्यांतील पदार्थ पाण्यानें किंवा हवेच्या दाबानें वाहून नेण्याच्या दोन पद्धती निघाल्या आहेत. रंगूनप्रमाणें जीं शहरें सपाट जाग्यावरच वसलीं आहेत तेथें मलमूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यास जास्त उतार दिला तर नाल्याचे नळ जमिनींत फार खोल खणून घालावे लागतात व त्यास खर्चहि पुष्कळ येतो. हा खर्च व त्रास कमी व्हावा म्हणून नाल्याचा मोठा नळ बहुतेक सपाटच ठेऊन त्यांतील घाणेरे पदार्थ एका बाजूनें हवेचा दाब लावून दुसऱ्या तोंडानें पिचकारीसारखे बाहेर काढून टाकतात. ही पद्धति

शोनसाहेबांनीं पहिल्यानें अमलांत आणिली म्हणून त्यास शोन–सिस्टीम असें म्हणतात. हवा दाबून नळांत घालण्याकरितां मोठमोठ्या पिचकाऱ्यांसारखींच यंत्रें असून तीं वाफेच्या यंत्रानें चालवितात व त्यास खर्चहि बराच येतो. अशा रीतीनें दाबलेली हवा पाहिजे त्या ठिकाणीं मग नळ घालून नेतां येते, आणि त्या योगें कोणत्याहि नळांतील मैला व सांडपाणी दाबून दुसऱ्या तोडानें बाहेर पडेल अशी व्यवस्था करितां येते. शहराचे निरनिराळे भाग करून त्या प्रत्येक भागांतील मैला त्या भागांत कोठें तरी एका ठिकाणीं बांधलेल्या व वरून बंद केलेल्या हौदांत सांठवितात, व त्या हौदांतून हवेच्या दाबानें तो नाल्याच्या मोठ्या नळांत सोडून देतात. रंगून येथें ही व्यवस्था चालूं आहे व ती जरी बऱ्याच खर्चाची आहे तरी सुरळीतपणानें चाललेली आहे. जीं शहरें सपाट जाग्यावर नसून उतरणीवर आहेत तेथें हा खटाटोप करण्याची जरूर नाहीं. कारण जमिनीच्या स्वाभाविक उतारामुळेंच नाल्यांतील पाणी वाहून जाण्यास आपोआप सोय असते. ही सोय टाकून देऊन हवेच्या दाबाची योजना करणें म्हणजे विनाकारण द्राविडी प्राणायाम करणें होय.

नाल्यांतून मैला वाहून नेण्यास पाण्याचा पुरवठा नेहमीं मुबलक पाहिजे. अमदाबाद आणि रंगून येथें तसा पुरवठा आहे. रंगून येथें तर सुमारें दर माणशीं चाळीस ग्यालन पाणी खर्च होतें आणि अमदाबाद येथेंहि माणशीं २५ पासून ३० ग्यालनपर्यंत पाणी देतां येण्यासारखें आहे. पुण्यास तितका पुरवठा नाहीं. करितां नाल्याबरोबर पाण्याचीहि व्यवस्था आम्हांस केली पाहिजे. नाल्यांतून वाहून जाणारा मैला व सांडपाणी हीं नाल्यांतून बाहेर पडल्याबरोबर तेथेंच शेतांत खत म्हणून उपयोगांत आणावीं असें डयूकेटसाहेबांचें म्हणणें होतें. जमिनींत हें खत घातल्यानें त्याची दुर्गंधी नाहींशी होऊन पुढें तें मातींत मिसळून जातें असा अनुभव आहे; व फारच झालें तर कांहीं वर्षें ती जमीन मध्यंतरी पडीत ठेविली म्हणजे झालें. पण गेल्या पांच सात वर्षांत यावर आणखी सुधारणा झालेली आहे. सोनखताचें जमिनींत पृथःकरण कसें होतें, याचा शोध होऊन असें ठरलें आहे कीं, कॉलरा किंवा प्लेग यांच्या जंतूप्रमाणेंच सोनखतावर उपजीविका करणारे एक प्रकारचे बारीक जंतु आहेत; पण ते विषारी किंवा रोग उत्पन्न करणारे नसून उलट दुर्गंधीनाशक असल्यामुळें मनुष्याचें हित करणारे आहेत. हे जंतु दोन प्रकारचे असतात. एक उजेडांत राहून काम करणारे व एक अंधारांत राहून काम करणारे, पैकीं अंधःकारप्रियजंतू सोनखतांतील जड द्रव्याचें पाणी करतात आणि प्रकाशोपजीवि जंतु या पाण्याचें आणखी पृथःकरण करून त्यांतील शेतकीस उपयोगीं पडणारीं रासायनिक द्रव्यें निराळीं करितात. पॉटिंजरसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं पुण्यास जो नवीन नाला बांधावयाचा त्यांतून वाहून जाणारें मलमूत्र व सांडपाणी हें या नवीन शास्त्रीय पद्धतीप्रमाणें

अंधःकारप्रिय आणि प्रकाशोपजीवि जंतूंकडून शुद्ध करून घ्यावें. या कामाकरितां नाल्याच्या अखेर तोंडाशीं मोठमोठे बंद व उघडे हौद बांधून त्यांत या सोनखत शुद्ध करणाऱ्या जंतूंची लागवड करावयाची आणि त्यांनीं नाल्यांतील घाणेरा प्रवाही पदार्थ शुद्ध केला म्हणजे मग तें शुद्ध पाणी पाहिजे तर नदींत सोडून द्यावयाचें किंवा हडपसरच्या बाजूला पांचसहा मैल लांब नेऊन तेथें जमिन खरेदी करून त्या जमिनींत खताच्या रूपानें या पाण्याचा उपयोग करून म्युनिसिपालिटीस उसाचें वगैरे सालोसाल उत्पन्न होईल अशी तजवीज करावयाची. मैला व सांडपाणी यांची या जंतूकडून शुद्धी करण्याचे हौद वगैरे बांधण्यास व तत्संबंधीं इतर सामुग्रीस सुमारें ६।७ लाख रुपये खर्च लागतील; आणि हें पाणी पुढें शहराबाहेर पांचसहा मैल नेऊन तेथें शेतवाडी करण्यास आणखी आठ लाख रुपये लागतील असा पॉटिंजरसाहेबांचा अदमास आहे. याखेरीज पाण्याचा पुरवठा करण्यास ७ लाख; म्हणजे एकंदर सुमारें ३७।३८ लाखांचा बोजा शहरावर लादण्याचा पॉटिंजरसाहेबांचा विचार आहे. त्यांत नवीन पायखाने बांधण्यास लोकांस खर्च येईल तो किंवा अंदाजाबाहेर अधिक उणा खर्च होईल तो धरला नाहीं; व पाणी गाळून घेण्याची सोय यांत नाहीं ती नाहींच. या सर्व सोयी करावयाच्या म्हणजे आणखी ८।१० लाख रुपये लागणार. सारांश, वर सांगितलेल्या एकंदर सर्व शास्त्रीय सुधारणांचा पुणेंकरांस फायदा घ्यावयाचा असल्यास त्यांनीं पन्नास लाख रुपये खर्च करण्यास तयार झालें पाहिजे. एवढा खर्च या शहरास सोसेल कीं नाहीं, सोसणें शक्य नसल्यास दुसरी काय तजवीज केली पाहिजे याचा विचार पुढें करूं.

◆ ◆ ◆

* पुण्यावर पन्नास लाखांची धाड

गेल्या दोन अंकांत मि. पॉटिंजर साहेबांचे म्हणण्याप्रमाणें पुणें शहराकरितां जे नवीन नाले बांधावयाचे त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. वर्तमानपत्रांतून या विषयासंबंधानें जास्त माहिती देणें शक्य नाहीं. पुणें शहरास चांगला पाण्याचा पुरवठा होऊन मलमूत्र वाहून नेण्याचीहि चांगली सोय झाली पाहिजे ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. पण याकरितां पुणेकरांच्या माथीं किती लाख रुपयांचा खर्च लादावयाचा याचा आधीं विचार झाला पाहिजे. शहरांतील सर्व मैला भंग्यांकडून बाहेर न नेतां सांडपाण्याच्या नाल्यांत सोडून त्या नाल्यांतूनच तो वाहून न्यावयाचा ही एक सुधारणा झाली. पण त्याचबरोबर नाल्यांतील मैला व सांडपाणी हवेच्या दाबानें वर चढवावयाचें आणि नंतर आंधेऱ्या व उजेड्या किड्यांकडून त्याचें पृथक्करण करवून नवीन नवीन शास्त्रीय शोधांचा पुणेकरांवरच अनुभव घेऊन पहावयाचा ही कल्पना आमच्या मतें बरोबर नाहीं, इतकेंच नव्हे तर पुण्यासारख्या शहराची ऐपत लक्षांत न आणतां त्या सर्व सुधारणांचा खर्च त्यावर लादणें हें आमच्या मतें अगदीं वेडेपणाचें काम आहे. शोन सिस्टिम किंवा किड्यांकडून मैला शुद्ध करण्याची पद्धत दुसऱ्या कोठें नीट चालत नसेल असें आम्हीं म्हणत नाहीं, पण हे मोठे शोध उपयुक्त असले तरी आम्हांस काय होत ? पुणें शहर म्हणजे कांहीं लंडन किंवा म्यांचेस्टर नव्हे. फार कशाला, अमदाबादपेक्षांहि हें शहर फार गरीब आहे. अशा स्थितींत या शहरांतील लोकांकरितां जो नाला बांधावयाचा तो त्यांच्या ऐपतीप्रमाणें बांधला पाहिजे. सरकारी सॅनिटरी इंजिनियर यांच्या लक्षांत या गोष्टी नीट शिरत नाहींत. युरोप किंवा अमेरिका येथें झालेले नवीन शोध त्यांच्या डोळ्यापुढें असतात; पण आमचेकडील शहरांत त्यांचा कितपत उपयोग करून घेतां येईल याचा ते विचार करीत नाहींत. १९ साव्या नाहीं तरी विसाव्या शतकांतील सर्व सुधारणा करण्यास आम्ही आज तयार होऊं. पैसा मात्र पाहिजे. तो मिळाला कीं मग लोखंडाचेचसे काय पण कांचेच्या नळ्यांतून देखील मैला व सांडपाणी काढून देऊन येथून दहापांच कोसांवर लांब सोडून देण्यास आमची कांहीं हरकत नाहीं. युरोप किंवा अमेरिका यापेक्षां व्यापारांत, उद्योगधंद्यांत किंवा सुधारणेंत जर हिंदुस्थान दोनतीन शतकें मागें आहे तर विसाव्या शतकांतील नाल्याचीच तेवढी सुधारणा आमच्या शहरावर कशाकरितां लादली पाहिजे हें आम्हांस समजत नाहीं. युरोपियन इंजिनियर अशा दृष्टीनें या गोष्टीचा विचार करीत नाहींत हें वर

---

* [केसरी ता. १४ आगष्ट १९००]

सांगितलेंच आहे. यांत त्यांचा कांहीं दोष असतो असें नाहीं, पण त्यामुळें त्यांनीं सुचविलेल्या व्यवस्थेचें ओझें कांहीं हलकें होत नाहीं. करितां मि. पॉटिंजर यांस व सरकारास आमची येवढीच विनंती आहे कीं, थोडक्या खर्चांत जरूर तेवढी व्यवस्था आज करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा पुढें मागें पुण्यास मँचेस्टरची योग्यता आल्यास तेव्हांची म्युनिसिपालिटी त्या वेळीं लागेल तेवढा खर्च करील, त्यास कोणाचीहि हरकत नाहीं.

खर्चाच्या संबंधानें पॉटिंजर साहेबांचें असें म्हणणें आहे कीं, त्यांनीं सुचविल्याप्रमाणें जर नाल्याची व्यवस्था करून येथून पांचसहा मैलांवर हें सांडपाणी नेऊन तेथें जमीन खरेदी करून उंसाची लागवड केली तर दरसाल म्युनिसिपालिटीस अडीच लाख रुपयांचें निवळ उत्पन्न होऊन त्यांतून व्याजाचा व मुद्दलाच्या हप्त्याचा खर्च भागेल. पॉटिंजर साहेबांची ही कल्पना फार नामी आहे. पण ती अमलांत येऊन तिजपासून खरोखर किती उत्पन्न म्युनिसिपालिटीस मिळेल याची शंका आहे. उंसाच्या लागवडीपासून दर एकरीं सालोंसाल खर्चवेंच वजा जाऊन निवळ तीनशे रुपयेप्रमाणें कित्येक वर्षें कोणास उत्पन्न झाल्याचें आम्हांस माहीत नाहीं. शेतीच्या उत्पन्नाचे शेतकी खात्याच्या थोड्याशा अनुभवावरून केलेले अदमास पुष्कळ वेळां चुकलेले असतात, असें नजरेस आलेलें आहे. शिवाय युरोपांतहि नाल्याच्या शेत पाण्यावर केलेली बागाईत अंदाजाप्रमाणें फायदेशीर होत नाहीं असें कित्येक ठिकाणीं दिसून आलें आहे. मग आमच्या येथील नाल्याच्या पाण्यांत बागाईत फायदेशीर करण्याचा विशेष गुण असल्यास नकळे ! सारांश नाल्याच्या पाण्यानें बागाईत करून त्यापासून पुढें लाखों रुपये उत्पन्न होतील अशा आशेवर आज पन्नास लाख रुपये खर्च करणें कधींहि शहाणपणाचें होणार नाहीं. त्यांतून ही व्यवस्था खाजगी मालकाची असती तर गोष्ट निराळी. आम्हीं म्हणतों याचा प्रत्यय घेण्यास फार दूर जावयास नको. पॉटिंजर साहेब म्हणतात त्याप्रमाणें या नाल्याच्या पाण्यानें केलेल्या बागायतीपासून जर खरोखरच दरसाल अडीच लाख रुपये उत्पन्न होणें शक्य असेल तर आमच्या म्युनिसिपालिटीनें जाहीर नोटीस देऊन हा किफायतीचा धंदा स्वतःच्या जबाबदारीवर करण्यास कोण कोण तयार आहेत याचीं टेंडरें मागवावीं. चाळीस पन्नास लाख रुपयांची रक्कम युरोपियन व्यापाऱ्यांस कांहीं भारी नाहीं. आणि त्यांची जर पॉटिंजर साहेबांच्या अंदाजपत्रकावरून हा धंदा किफायतीचा आहे अशी खात्री झाली तर तो करण्यास ते कधींहि मागेंपुढें पहावयाचे नाहींत; अथवा लांब तरी कशाला ? सरकारास जर उत्पन्नाचा अंदाज खरा वाटत असेल तर त्यांनीं आपण होऊनच आपल्या देखरेखीखालीं हे नाले बांधवावे व पंचवीसाच्या ऐवजीं चाळीस वर्षें त्यांचें उत्पन्न घेऊन मग तें म्युनिसिपालिटीकडे द्यावें. म्युनिसिपालिटी तरी पैसे कर्जाऊच काढणार. पण तेच सरकारनें

काढले तर त्यास कमी व्याजानें मिळतील आणि मग नफाहि पॉटिंजर साहेबांनीं दाखविला त्यापेक्षां अधिक होईल.

असो, सरकार किंवा युरोपियन व्यापाऱ्यांच्या कंपन्या या गोष्टीकडे पहावयाच्या नाहींत हें आम्हांस उघड दिसत आहे. शहरच्या लोकांनींच याचा काय तो निकाल लावला पाहिजे. पण तो लावतांना हल्लींच्या अंदाजपत्रकांतील उत्पन्नावर मात्र भिस्त ठेऊन उपयोगी नाहीं. येथून सहा कोसांवर एका युरोपियन अंमलदाराच्या नजरेखालीं आपल्या शहरांतील सांडपाण्यावर मोठी उंसाची लागवड होऊन पुणें शहर श्रीमंत होणार या तूर्त तरी मनोराज्यांतलिच गोष्टी मानल्या पाहिजेत. आज आपल्या पदरचे तीस चाळीस लाख रुपये जाणार एवढें मात्र खरें आहे. हा खर्च जेणेंकरून कमी होईल तशी व्यवस्था आम्हांस केली पाहिजे. पैकीं पहिली विचार करण्यासारखी गोष्ट ही कीं, १९ साव्या शतकांतील अगदीं ताज्या ताज्या ज्या सुधारणा आहेत त्या सर्व आम्हीं अमलांत आणल्या पाहिजेत कीं काय ? शहरांतील सांडपाणी जर आम्हांस कोठें जवळच सोडून देतां आलें असतें तर ७।८ लाख रुपयांत सर्व खर्च भागून आमचें काम झालें असतें. नाल्यांत मैला न घालतां फक्त सांडपाणीच पूर्वीं कुंभारवेशीच्या धरणाखालीं सोडून देत असत. तीच व्यवस्था जर आतां कायम ठेवतां आली असती तर भंग्यांची संस्था राखून सांडपाण्याकरितां नवे नळ घालण्यास फारसा खर्च आला नसता. पण ही स्थिती आतां राहिली नाहीं. आणि त्याचें कारण शहरच्या पूर्वभागीं झालेली कँटोनमेंटची वस्ती हें होय. सरकारानें केलेल्या या वस्तीमुळें नदींत सांडपाणी सोडून देण्याच्या आमच्या कित्येक वर्षें चालत आलेल्या हक्कास आम्हीं मुकलों आहों. कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें तर योग्य मोबदला दिल्याखेरीज हा हक्क कोणासहि काढून टाकतां यावयाचा नाहीं. पण हा कायद्याचा प्रश्न काढण्याची कांहीं जरूर नाहीं. कारण पुण्याच्या नदींत सांडपाण्याचा नाला वाहतो आहे तो बंद करून तेथून दुसरीकडे सोडण्याकरितां जो खर्च लागेल त्यापैकीं निम्मा खर्च सरकारच्या मिलिटरी कँटोनमेंटनें सोसावा असा सन १८६५ सालींच सरकारचा ठराव झाला आहे. आणि वास्तविक पाहतां हाच ठराव न्यायाचा आहे. नदीचें पाणी पूर्वींप्रमाणें लष्करांत पिण्यास लागत नसलें तरी कुंभारवेशीखालीं शहरांतील सांडपाण्याचा नाला सोडल्यानें लष्करचें आरोग्य बिघडण्याचा संभव आहे. पण यांत कांहीं पुणेकरांचा दोष नाहीं. ज्यांनीं ही वस्ती वसविली त्यांनींच वास्तविक म्हटलें असतां हा नाला आणखी पलीकडे नेण्याचा खर्च दिला पाहिजे. पुण्यापासून सहा मैलावर आज जें नाल्याचें तोंड न्यावें लागत आहे तें वास्तविक म्हटलें म्हणजे लष्करी कँटोनमेंटकरितां आहे. नाहींपेक्षां हा सांडपाण्याचा नाला कुंभारवेशीच्या धरणाखालीं किंवा फार झालें तर संगमाजवळ नेऊन आम्हीं

सोडून दिला असता. खडकवासल्याचा कालवा गांवावरून गेला त्यामुळें व त्याचें पाणी आसपास बरेंच मुरत असल्यामुळें नाल्याची हल्लीं विशेष अवश्यकता भासूं लागली ही गोष्टहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सारांश, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी सरकारच्या लष्करी खात्यानें किंवा सरकारानें पुणें शहरच्या नवीन नाला बांधण्याच्या खर्चापैकीं कांहीं भाग देणें जरूर आहे. त्यांतून प्लेगच्या खर्चाखालीं डबघाईस आलेल्या म्युनिसिपालिटीस अशा प्रकारची मदत मिळाल्याखेरीज तिच्या हातून ड्रेनेजसारखें खर्चाचें काम होणें शक्य नाहीं व लोकांत अधिक कर देण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं ही गोष्ट देखील सरकारास माहीत नाहीं असें नाहीं. अशा स्थितींत सरकारच्या मदतीवांचून एवढ्या मोठ्या खर्चाचें काम नुसतें म्युनिसिपालिटीकडून किंवा लोकांकडून होणें आहे. करितां या बाबतींत सरकाराकडे विनंति अर्ज पाठवून सरकार म्युनिसिपालिटीस किती मदत करण्यास तयार आहे याचा कमिशनर लोकांनीं आधीं निर्णय करून द्यावा अशी त्यांस आमची सूचना आहे.

पण सरकारची अशा रीतीनें मदत मिळाली तरी अव्यवस्थित रीतीनें उधळपट्टी करण्याइतके पैसे आमचेपाशीं नाहींत हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे. ड्रेनेज करण्यास आज तीस चाळीस लाख रुपये लागले तर त्याखेरीज दर एक घरवाल्यास आपल्या घरांतील सांडपाणी व मैला नाल्यांत सोडून देण्यास व त्याकरितां नवीन पायखाने बांधण्यास मिळून दीडशेंपासून दोनशें रुपयेपर्यंत खर्च येणार. कारण जर ही व्यवस्था झाली नाहीं तर मोठा नाला करूनहि तो फुकट आहे. करितां होईल तेवढी काटकसर करून जरूरीची व्यवस्था कोणती आणि बिनजरूरीच्या गोष्टी कोणत्या याचा कमिशनर लोकांनीं नीट विचार केला पाहिजे. किड्यांकडून सांडपाणी व मैला शुद्ध करण्याकरितां पांचसांत लाख रुपये खर्च करणें जरूर आहे कीं काय आणि त्याचप्रमाणें शोनसिस्टिमचा उपयोग करून हवेच्या दाबानें नाल्यांतील पदार्थ वर उचलून घेण्यापेक्षां पंपानें किंवा अन्य तऱ्हेनें व्यवस्था केली असतां कमी खर्चाची होईल कीं नाहीं, हे दोन्ही मुद्दे पॉटिंजर साहेबांनीं सुचविलेल्या व्यवस्थेंत विचार करण्यासारखे आहेत. रंगून येथें अमूक व्यवस्था आहे एवढ्यावर जाऊन कांहीं उपयोगी नाहीं किंवा ती व्यवस्था बरोबर चालते एवढ्याचाहि केवळ विचार करून चालावयाचें नाहीं. त्यास खर्च किती लागतो तो आपल्यास सोसेल कीं नाहीं, आणि सोसण्यारखा नसल्यास तेंच काम जरा कमी सुधारलेल्या मार्गानें कां होईना पण होण्यासारखें आहे कीं नाहीं याचा मुख्यत्वेंकरून विचार झाला पाहिजे. म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट खा. ब. दोराबजी यांनीं या विषयावर जो लेख लिहिला आहे त्यांत या मुद्याचें बरेंच विवेचन केलेलें आहे. नाल्याकरितां नळ दहा इंची आणावे किंवा आठ इंची आणावे याचा निकाल इंजिनि-

यर लोकांनींच केला पाहिजे. तें काम सामान्य लोकांचें नव्हे. पण घराचे खांब, बहालें, वगैरे कोठें व कशीं घालावयाचीं हें जरी घर बांधणाऱ्या मेस्त्र्याचें काम असलें तरी आपणास अमुक एक रकमेपर्यंत घर बांधण्याकडे खर्च करण्याची ताकद आहे ही गोष्ट जशी यजमानानें ठरविली पाहिजे, त्याप्रमाणेंच शहराचा नाला दोन तीन प्रकारें जर बांधतां येत असला तर त्यांपैकीं कोणती पद्धत शहराच्या ऐपतीप्रमाणें शहरास झेंपण्यासारखी आहे याचा निकाल कमिशनर लोकांनींच केला पाहिजे. हा निकाल करण्यास जीं साधनें पाहिजेत तीं आज सर्व उपलब्ध आहेत व त्यांचा पूर्ण उपयोग करून घेऊन मग या गोष्टीचा कमिटींत निर्णय होईल अशी आम्हांस उमेद आहे.

सरतेशेवटीं घुण्यांतील लोकांसहि आमची अशी सूचना आहे कीं त्यांनीं या वेळीं गप्प बसूं नये. नाले वाईट बांधलें गेल्यास खर्चाचें ओझें अंगावर बसून घुनः शहरचें आरोग्यहि बिघडतें असा कित्येक ठिकाणचा अनुभव आहे. शिवाय आमच्या म्युनिसिपालिटीची हल्लींची स्थिती लक्षांत आणतां या प्रश्नाचा निकाल करतांना शहराच्या ऐपतीकडे लक्ष देणारांचेंच बहुमत होईल अशी खात्री सांगतां येत नाहीं. करितां वेळींच आपलें काय म्हणणें आहे तें कमिशनरांस कळविणें जरूर आहे. नाला बांधण्याचें जें तपशीलपत्रक आतां प्रसिद्ध झालें आहे त्यांत चुका असल्यास त्या दुरुस्त करण्याचें आपलें काम नव्हे; पण अमुक एक रकमेपर्यंत हें काम व्हावें वगैरे गोष्टी लोकांनीं म्युनिसिपालिटीस कळविणें जरूर आहे. निदान लोकमत कमिशनरमार्फत अशा रीतीनें सरकारपुढें जाणें तरी अवश्य आहे व त्याकरितां कमिशनर लोकांनीं पेठोपेठीं सभा करून या विषयाच्या चर्चेस सुरुवात केली पाहिजे इतकेंच आज आमचें त्यांस सांगणें आहे. विषयाची चर्चा सुरूं झाल्यास यापेक्षां कांहीं जास्त लिहावें लागल्यास तें पुढें लिहूं.

* पुण्यांतील प्लेगव्यवस्था

पुणें शहरांत यंदाच्या सालीं कोणच्या प्रकारची प्लेगव्यवस्था ठेवावयाची याबद्दलचे नियम व हिंदुस्थानसरकारचा प्लेग कमिशनच्या रिपोर्टावरील ठराव हे आम्हीं मागें प्रसिद्ध केलेच होतें; व त्यावेळीं सरकारी ठरावांत आणि पुणें शहराकरितां जे नियम केले होतें त्यांत काय फरक आहे हेंहि थोडक्यांत दाखविलें होतें. पण हा फरक लौकरच इतक्या विकोपास जाऊन त्याचे परिणाम आम्हांस भोगावयास लागतील असें त्यावेळीं आम्हांस वाटलें नव्हतें. पावसाळ्यांत कोणतीहि आळी अगर पेठ खालीं करणें बरोबर नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यापासून फाय दाहि होत नाहीं असा प्लेग कमिशनचा स्पष्ट अभिप्राय असतां, येथील ऑफिसर यांनीं शुक्रवार पेठेंतील एक आळी खालीं करण्याबद्दल नोटिसा प्रसिद्ध करून चार दिवसांत म्हणजे आज दोन प्रहरच्या आंत त्या आळींतील घरवाले लोक आपलीं घरें सोडून स्वाराच्या गेटाजवळील हेल्थ कँपमध्यें राहावयास न गेल्यास ते गुन्हेगार होतील असा हुकूम फर्माविला होता. हा हुकूम गैरशिस्त आहे व त्याचा विचार करण्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांस विनंती करावी हाच शनवारच्या जाहीर सभेंतील मुख्य विषय होता सभेचे अध्यक्ष डॉ. भागवत होते, व ज्यांच्या घरांस नोटिसा लागल्या होत्या ते बहुतेक सर्व लोक, सर्व जातीच्या स्त्रिया व पुरुष या सभेस हजर होते. शुक्रवार पेठेंतच कांहीं घरें नायकिणींचीं व चांभारांचीं आहेत, व त्यांसहि इतरांबरोबर नोटिसा मिळाल्या असल्यामुळें ते या सभेस मुद्दाम आलेले होते. अशा प्रकारची सर्व जातींच्या घंदेवाल्या लोकांची सभा ते समदुःखी असल्याखेरीज होणें अशक्य आहे. असो, या सभेंत प्लेग नियमांची वाटाघाट होऊन अखेरीस कलेक्टर साहेबांकडे लोकांच्या वतीनें विनंती करण्याकरितां डेप्युटेशन पाठवावें असें ठरलें, व खर्चाकरितां कांहीं रक्कम तेथल्या तेथें गोळा झाली व कांहीं रक्कम दुसऱ्या दिवशीं देण्यांत आली. काल डॉ. भागवत रा. रा. आण्णासाहेब पटवर्धन, श्री. बाळासाहेब नातू, डॉ. गर्दे, रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, गणपत बाळोबा खुर्द, रा. रा. सदाशिव परशराम जोशी, सातारकर वैद्य, आणि रा. रा. थत्ते हे गृहस्थ कलेक्टरसाहेब व प्लेग कमिटीचे चेअरमन मि. बर्नेट यांजकडे गेले होते. त्या दोघांनींहि डेप्युटेशनचें म्हणणें ऐकून घेऊन घरें खालीं करण्याचा हुकूम शनिवारपर्यंत म्हणजे गणपती विसर्जन होईपर्यंत तहकूब ठेवला आणि पुढें प्लेग कमिटीची सभा भरवून त्यांत लोकांचें म्हणणें ऐकून घेऊन मग काय व्यवस्था करणें असेल ती करूं असें सांगितलें. जनरल

---

*[केसरी ता. ४ सप्टेंबर १९००]

बर्नेट व कलेक्टर यांच्या या सौजन्याबद्दल त्यांचे आपण आभार मानले पाहिजेत. सरकारच्या हातांत सत्ता व अधिकार आहेच; तो कोणी काढून घेऊं इच्छित नाहीं व शक्यही नाहीं. लोकांची विनंती एवढीच असते कीं त्यांच्या सोई व गैरसोई काय आहेत त्या ऐकून घेऊन मग सरकारी अधिकाऱ्यांनीं कोणता हुकूम करावयाचा असेल तो करावा. तशा प्रकारची सवलत वरील अधिकाऱ्यांकडून आतां मिळाली हें सुचिन्ह होय व त्याबद्दल सर्वांस आनंद होईल यांत शंका नाहीं.

आतां हल्लीं मि. म्याकनिल यांनीं घरें खालीं करण्याबद्दल जी नोटीस काढली आहे त्याच्या योग्यायोग्यतेबद्दल थोडासा विचार करूं. प्लेगच्या हल्ल्यापासून आपला बचाव करण्यास स्थानत्यागासारखा दुसरा उपाय नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्याच्या घरांत उंदीर मेले त्यानें कांहीं दिवस तें घर सोडून जावें हा उत्तम पक्ष होय. पण हा पक्ष सर्वांस नेहमींच साध्य असतो असें नाहीं. लहान लहान खेडेगांवची गोष्ट निराळी. अशा गांवांच्या बाहेर शेतकऱ्यांचे गोठे वगैरे नेहमीं असतातच व त्यांत किंवा उघड्या शेतांत लहानशी झोंपडी बांधून तेथें राहण्याची त्यांची नेहमींच सोय असते. फक्त पावसाळ्यांत मात्र अशा प्रकारें त्यांस आपलीं घरें सोडतां येत नाहींत. कारण पावसामुळें शेतांतील जमीन ओली असून बाहेरची हवाहि सर्द व थंड असते. परंतु मोठमोठ्या शहरांचा प्रकार याहून भिन्न असतो. सर्व शहर खालीं करण्यास शहराजवळ दुसरे शहरच वसवावें लागतें व एवढा खर्च करण्यास जोंपर्यंत कोणी तयार नाहीं तोपर्यंत सर्व शहर खालीं करण्याचा उपाय मोठमोठ्या शहरांत तरी अमलांत आणतां येत नाहीं. दुसरी अडचण अशी कीं, शहरांत धंदेवाले किंवा मजुरीनें निर्वाह करणारे लोक पुष्कळ असतात. त्यामुळें आपला धंदा सोडून शहराबाहेर गेल्यानें या लोकांस उपजीविकेचें साधन नाहींसें होतें. मुंबईच्या दुसऱ्या प्लेगच्या वेळीं ही गोष्ट चांगली अनुभवास आली. पहिल्या वर्षीं गिरण्यांतील हजारों मंजूर भिऊन आपापल्या देशांत गेले. पण तेथें जेव्हां खावयास मिळेना तेव्हां दुसऱ्या वर्षीं प्लेगनें मेलों तर मेलों पण पोटभर खाऊन तरी मरूं अशा बुद्धीनें प्लेगच्या दिवसांतहि त्यांनीं मुंबई सोडली नाहीं. या सर्व अडचणी आज आहींनव्या काढतों असें नाहीं. प्लेग कमिशनपुढें जो साक्षीपुरावा आला त्यावरून या सर्व गैरसोई कमिशनच्या लक्षांत येऊन त्यांनीं आपला अभिप्राय असा दिला आहे कीं,—(१) घरें खालीं करण्याचा उपाय फार झालें तर दहा हजारांपेक्षां जास्त वस्तीच्या गांवांस लागू करूं नये; (२) पावसाळ्यांत याबद्दल सक्ती करूं नये, आणि (३) मोलमजुरी करून किंवा उदीम धंदा करून पोट भरणाऱ्या लोकांस शहरांतून बाहेर काढूं नये. कमिशनचा हा अभिप्राय हिंदुस्थानसरकारास मान्य आहे अस त्यांनीं आपल्या ठरावांत स्पष्ट म्हटलें आहे.

अशा तऱ्हेचा निर्णय झाला असतांहि हल्लींच्या दिवसांत शुक्रवार पेठेंतील एक आळी खालीं करण्याबद्दल कशा नोटिसा काढल्या याचेंच आम्हांस आश्चर्य वाटतें. गोरगरीबांस बाहेर निवाऱ्याची जागा, हातरूण, पांघरूण आणि निर्वाहाची सोय जर सरकार करून देत असेल तर त्यांस सक्तीनें बाहेर काढणें त्यांच्या कल्याणाचें आहे असें म्हणतां येईल. पण तसें कांहीं एक न करितां केवळ लोकांच्या सोईकरितां त्यांस घरें खालीं करण्यास सांगणें म्हणजे त्यांच्यावर विनाकारण जुलूम करणें होय.

या मुद्याचा दुसऱ्या एका दृष्टीनेंहि विचार करण्यासारखा आहे. प्लेगनिवारणार्थ जे उपाय योजतात ते दोन प्रकारच्या हेतूनें योजतात. एक सार्वजनिक हिताकरितां आणि एक व्यक्तिमात्राच्या हिताकरितां. पैकीं प्लेग कमिटीसारख्या अधिकाऱ्यांस पहिल्या हेतूचा विचार करावयाचा असतो. अमुक एक मनुष्य प्लेग झाला असतां औषध घेत नाहीं, किंवा प्लेगनें दूषित झालेलें आपलें घर शुद्ध करीत नाहीं इकडे त्याची फारशी नजर नसते. त्याचें मुख्य पाहणें एवढें असतें कीं, असा एक मनुष्य आळींत अगर पेठेंत राहूं दिल्यानें आसपास रोग पसरण्याचा संभव असतो सबब आसपासच्या लोकांच्या कल्याणाकरितां रोगाचें बीजच पहिल्यानें नाहींसें करावें. प्लेगचे नियम व व्यवस्था यांतहि खरें तत्त्व हेंच आहे. या तत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें तरीहि पुण्यास घरें खालीं करण्याबद्दल हल्लीं जी धामधूम सुरूं आहे ती चुकीची आहे असें सहज कळून येईल. पुणें शहरांत हल्लीं जो प्लेगचा प्रादुर्भाव झाला आहे तो दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणचें बियाणे येऊन झालेला नाहीं. प्लेगजंतु पुण्यास आतां सर्वत्र पसरलेलेच आहेत. हवेची वगैरे अनुकूल स्थिती मिळाली म्हणजे पर्जन्यकाळीं उद्भवणाऱ्या बेडकांप्रमाणें ते आपलें डोकें वर काढतात आणि इतर वेळीं निजून राहातात. अशा स्थितींत दहापांच किंवा पांच पंचवीस घरें सक्तीनें खालीं करण्यापासून सार्वजनिक फायदा कांहींच होऊं शकत नाहीं. कारण या घरांतून प्लेगचें बींज सर्व शहरभर पसरतें अथवा पसरेल अशी भीतीच आतां राहिली नाहीं. जर कांहीं फायदा झाला तर त्या घरांतील लोकांस मात्र होण्याचा संभव आहे. व ही गोष्ट लोकांस इतकी अवगत आहे कीं चांगल्या स्थितींतील गृहस्थ घरांत उंदीर निघाले म्हणजे ताबडतोब तीं घरें सोडून आतांच बाहेर जाऊं लागले आहेत. पण गरीबांस तसें करतां येत नाहीं. बाहेर जावें तर खाण्यास मिळण्याची पंचाईत व घरांत रहावें तर तें प्लेगनें दूषित. तात्पर्य एकीकडे आड व एकीकडे विहीर अशी त्यांची स्थिती असते. तेव्हां भुकेनें मरण्यापेक्षां ईश्वरावर भरंवसा ठेवून आपल्या कुटुंबांतच काय होईल तें होईल अशा समजुतीनें ते घर सोडण्यास नाखूष असतात. अशा लोकांना सरकारास जर कांहीं मदत करावयाची असेल तर त्यांचीं घरें सरकारनें फुकट डिसइन्फेक्ट करून द्यावीं, किंवा त्यांस बाहेर काढणें

असल्यास त्यांच्या गोटापाण्याची व राहण्याची चांगली सोय करून द्यावी, याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. एकाद्या शहरांत प्लेगचा रोग पहिल्यानेंच आला असल्यास त्यावेळीं ज्या पेठेंत अगर आळींत त्याचा पहिल्यानें उद्भव होतो, तेथील घरें खालीं केल्यानें सार्वजनिक फायदा होण्याचा संभव असतो. पण मुंबई पुण्याप्रमाणें एकदां रोगानें ठाणें देऊन दोन दोन चार चार वर्षें झाल्यावर मग घरें खालीं करण्यापासून जो कांहीं उपयोग व्हावयाचा तो व्यक्तीपुरताच होय आणि त्याकरितां सक्ती करणें वाजवी नाहीं. प्लेगच्या तडाख्यांत सांपडून आपण विनाकारण मरावें अशी कोणाचीच इच्छा नसते. चार वर्षांच्या अनुभवावरून कोणता उपाय चांगला आणि कोणता वाईट हें आतां सर्व लोकांस पुरतेपणीं कळून चुकलें आहे. ज्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे ते दूषित घरें सोडून जात आहेत. पण ज्यांस तसें सामर्थ्य नाहीं त्यास शहरांत राहणें भाग आहे, आणि त्यांस कांहीं मदत करण्याची सरकारची इच्छा असेल तर ती वर सांगितलेल्या दोन मार्गांनींच होणें शक्य आहे. सर्व गरीब लोकांचें दुष्काळाच्या वेळीं रिलीफ कामें काढून सरकार जसें पोषण करतें तसें प्लेगच्या वेळींहि केलें पाहिजे; पण इतिकां खर्च करावयाचा नसेल तर लोकांचीं घरें शुद्ध करून त्यांस पुनः तेथें राहूं द्यावें, याखेरीज दुसरा शास्त्रीय मार्ग नाहीं. मि. म्याक्नील यांनीं या गोष्टीचा विचार केला आहे असें त्यांच्या हल्लींच्या हुकुमावरून दिसत नाहीं. असो, त्याबद्दल कमिटींत तरी विचार होऊन त्याचा योग्य बंदोबस्त होईल अशी आम्हांस आशा आहे.

पुणें शहराच्या हल्लींच्या प्लेगनियमांत आणखी एक दोन दोष आहेत. गरीब लोकांचीं घरें सक्तीनें खालीं करूं नयेत असें ठरलें तरी दुसरीं कांहीं घरें खालीं होणारच. या घरांतील मालमत्तेचें संरक्षण करण्याची योग्य जबाबदारी प्लेग अधिकाऱ्यांकडे आहे. सक्तीनें घरें खालीं केल्यास त्यांच्या संरक्षणाची योग्य काळजी घेतली जाईल असें नियमांत स्पष्ट आहे, पण ही योग्य काळजी कशी घेणार हें मात्र अद्याप कोठें प्रसिद्ध झालें नाहीं. खेरीज दुसरा प्रश्न असा आहे कीं सक्तीनेंच खालीं केलेल्या घरांचीं प्लेगकमिटीनें काळजी घ्यावी आणि खुषीनें खालीं केलेल्या घरांचीं कां घेऊं नये ? सर्व लोकांच्या घरांचें प्लेगच्या वेळीं संरक्षण करण्याचें सरकारचें काम आहे, व त्याकरितां निराळें पोलीस ठेवण्यास प्लेगकमिटी जोंपर्यंत तयार नाहीं तोंपर्यंत लोकांस आपलीं घरें खुषीनें किंवा सक्तीनें सोडून जाणें कठीण वाटणार आहे. पहिल्या सालीं गांवांतील लोक बरींच घरें बंद करून बाहेर गेले होते तेव्हां त्या घरांतूनच नव्हे, तर लोकांच्या सोईकरितां त्यांचा माल ठेवण्याची म्युनिसिपालिटीनें जी कोठी काढली होती त्यांतहि चोरी झाल्याचें दसरीं दाखले आहेत. तेव्हां लोकांनीं स्थानत्याग करावा अशी कमिटीची इच्छा असेल तर पहिल्यानें लोकांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याबद्दल

कमिटीनें किंवा प्लेगअधिकाऱ्यांनीं चांगला बंदोबस्त केला पाहिजे. मग त्याकरितां थोडा जास्त खर्च आला तरी हरकत नाहीं. पण हल्लींच्या प्लेग अधिकाऱ्यांची दिशा याहून भिन्न आहे. खालीं केलेल्या घरांच्या रक्षणासाठीं योग्य बंदोबस्त केलेला नाहीं तो नाहींच, पण कोणी आपल्या घरास कुलूप लावून बाहेरगांवीं गेला तर त्याच्या पश्चात् त्याचें घर व्हालंटियरानें किंवा सोल्जरानें फोडून डिसइन्फेक्ट करावें असा एक नियम आहे. हा नियम आमच्या मतें अगदीच चुकीचा आहे. अशा वेळीं निदान आसपासच्या चारपांच संभावित गृहस्थांस बोलावून त्यांच्या देखत घरांतील मिळकतीची व जिनसांची पहिल्यानें याद करणें जरूर आहे; मग ती मिळकत पुढें कोठेंहि ठेवा. सामान्य बाबतींतहि जर पोलीस अधिकारी असा क्रम ठेवतात तर तोच क्रम प्लेग अधिकाऱ्यांसहि ठेवणें अवश्य आहे. करतां या गोष्टीचाहि कमिटींत विचार झाला पाहिजे.

शनवारच्या सभेंत ज्या गोष्टींची वाटाघाट झाली त्या वर लिहिल्याप्रमाणें होत. यासंबंधाचें लोकांचे सर्व म्हणणें ऐकून घेण्याचें कलेक्टरसाहेब व जनरल बार्नेट यांनीं वचन देऊन तूर्त घरें खालीं करण्याची तहकुबी केली आहे हें वर सांगितलेंच आहे. पुढील निकालहि याच धोरणावर होऊन प्लेगचे नियमांपासून घुण्यांतील लोकांस विनाकारण त्रास सोसावा लागणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे. प्लेगची या शहरावर पांचवी स्वारी आहे, व कडक प्लेगव्यवस्थेचीं दुःखें या शहरांतील लोकांनीं जितकीं भोगलीं आहेत तितकीं हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरानें भोगलीं नसतील. करितां या बाबतींत प्लेग कमिशनच्या सूचनेप्रमाणें आजपर्यंतच्या अनुभवावरून निरुपयोगी ठरलेला कडकपणा कमी करून लोकांस ज्या सवलती देण्याचें ठरलें आहे त्या सर्व आम्हांस यंदाच्या सालीं तरी अनुभवावयास सांपडतील अशा प्रकारची प्लेग कमिटीनें व्यवस्था करावी अशी कमिटीस आमची सूचना आहे. केवळ कांहीं व्हालंटियरांच्या एकतर्फी म्हणण्यावरून निकाल करूं नये.

* नामदार जाइलससाहेब यांचें राजद्रोहाचें पिसें

सन १८९७ च्या वावटळींत ज्या कित्येक युरोपिन अंमलदारांचीं डोकीं फिरून गेलीं होतीं त्यापैकींच ना. जाइल्ससाहेब हे एक होत. परंतु मुळांत जरी हा वेडेपणा आतां आटत चालला आहे तरी ना. जाइल्ससाहेबासारखे दंडुके साहेब आपलें व्रत पूर्ववत् चालवीत आहेत व नाकांत राजद्रोहाचा वास भरल्यामुळें नसत्या ठिकाणींहि राजद्रोह हुडकून काढून तो साफ करण्याचा प्रयत्न करीत आहेत हें पाहून कोणासहि आमच्या हल्लींच्या विद्याखात्याच्या अधिपतींची कींव आल्याखेरीज राहणार नाहीं. जाइल्ससाहेब यांनीं नुकतेंच डेक्कन कॉलेजांत दिलेलें व्याख्यान आमच्या वाचकांस आठवत असेलच. हें व्याख्यान जाइल्ससाहेबांचें डोकें फिरून गेल्यावर त्यांच्या हातून जीं कृत्यें घडलीं त्यापैकीं पहिलेंच कृत्य होतें असें नाहीं; पण उत्तरोत्तर डायरेक्टरसाहेबांचें माथें थंड होत जाऊन त्यांस खरी वस्तुस्थिति लवकरच समजेल अशी आम्हांस आशा होती.ती आशा गेल्या सालीं प्रसिद्ध झालेल्या एतद्देशीय ग्रंथांवर साहेब मजकुरांनीं जो टीकालेख लिहिला आहे तो वाचून समूळ नाहींशी झाली, इतकेंच नव्हे, तर विद्याखात्याच्या अधिपतींचें हें वेड उघडकीस न आणल्यास यापासून एकंदरींत वाईट परिणाम होतील अशी आमच्या मनाची खात्री झाली आहे. डायरेक्टरसाहेबांचा हा लेख प्रसिद्ध होऊन आज सुमारें दोन महिने झाले. पूर्वी हें काम नेटिव प्रेसचे रिपोर्टर करीत असत. पण ते पुण्याचे ब्राह्मण असल्यामुळें म्हणा किंवा अन्य कारणामुळें म्हणा सरकारी ठरावानें हें काम गेल्या वर्षापासून जाइल्ससाहेबांकडे सोंपविण्यांत आलें आहे, व त्याची हल्लींचा रिपोर्ट ही 'भवानी' होय. पुढील रिपोर्ट जर याच नमुन्यावर निघायचे असतील तर सरकारास आमची एवढीच सूचना आहे कीं, त्यांनीं ते रिपोर्ट प्रसिद्ध करण्याची तसदी न घेतां मेहरबानीनें ते आपल्या दप्तरांतच ठेवावे. कारण, या रिपोर्टांत एकच दोष आहे असें नाहीं. ग्रंथसमूह इंग्रजी, मराठी, गुजराथी, हिंदी, कानडी, सिंधी, उर्दू इ० अनेक भाषेंत असतो. पण इतक्या भाषांतील ग्रंथसमूहावर टीका करणारे गृहस्थास या भाषा अवगत नसतात इतकेंच नव्हे तर त्या त्या भाषा बोलणारांचे रीतिरीवाजहि माहीत नसतात. त्यामुळें अज्ञान, एतद्देशीयांच्या रीतिरीवाजांची गैरमाहिती, स्वतःच्या ज्ञानाची व मताची घमेंड, बऱ्याच अँग्लोइंडियनांच्या आंगीं असलेली एक प्रकारची बेपर्वाई, राजद्रोहाच्या आणि राजानिष्ठेच्या चुकीच्या व मूर्खपणाच्या कल्पना आणि या कल्पनेमुळें चांगल्या

---

* [केसरी ता. २५ सप्टेंबर १९००]

गृहस्थांचा किंवा ग्रंथकारांचाहि उपहास किंवा उपमर्द करण्याची हौस हे सर्व दुर्गुण हल्लींच्या डायरेक्टरसाहेबांच्या टीकेंत भरलेले आहेत. व सरकारच्या एका प्रमुख खात्यावरील मुख्य अधिकाऱ्यांस जर अशा प्रकारें एका रीतीचें दुर्वर्तन करण्यास मोकळीक असेल तर सरकारी अधिकाऱ्यांबद्दल अथवा खुद्द सरकाराबद्दलहि सामान्य लोकांची किंवा चांगल्या गृहस्थांचींहि मनें दूषित झाल्यास त्याचा दोष लोकांकडे ठेवतां येणार नाहीं. जाइल्ससाहेबांच्या या अलौकिक कृतीचें परीक्षण आम्हीं या पूर्वीच करणार होतों, पण आमचे कांहीं नरमगरम बंधू याजबद्दल काय म्हणतात हें आधीं बाहेर पडलें असतां बरें अशा समजुतीवर आम्ही याबद्दलचा आपला अभिप्राय देण्याचें लांबविलें होतें. ती अट आतां पुरी झाली. कारण ज्यास आपल्या लेखाच्या सौम्यतेबद्दल खुद्द राजकर्त्यांकडूनहि सर्टिफिकेट मिळालें आहे अशा आमच्या मलबारी शेटजींसहि ज्या अर्थी जाइल्ससाहेबांची कृति गैरशिस्त व दांडगेपणाची वाटत आहे त्या अर्थी आतां ' नेमस्त ' पक्षांतहि डायरेक्टरसाहेबांचा पाठराख्या कोणी असेल असें आम्हांस वाटत नाहीं. केसरीकारांचें जाइल्ससाहेबांच्या कृतीबद्दलचें मत अर्थातच यापेक्षां अधिक कडक आहे, पण त्याच्या योग्यायोग्यतेबद्दल आतां कोणत्याहि प्रकारचा मतभेद नाहीं ही एक प्रकारें समाधानकारक गोष्ट आहे.

असो; एतद्देशीय भाषांतील ग्रंथसमूहावर टीका करण्याची संधी साधून जाइल्ससाहेबांनीं त्यांत आपल्या मताचें जागोजाग जें आविष्करण केलें आहे त्याबद्दल चर्चा करण्यापूर्वी या साहेबांच्या आंगांत राजद्रोहाचें जें पिसें शिरलें आहे त्याच्याबद्दल थोडीशी माहिती येथें देणें जरूर आहे. जाइल्ससाहेब हे नुसते विद्याखात्याचे मुख्य अधिकारी आहेत इतकेंच नव्हे, तर चांगले विद्वानहि आहेत ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. हे ज्या वेळेस विलायतेहून प्रथमतः इकडे आले तेव्हां एल्फिन्स्टन कॉलेजांत झालेलीं त्यांचीं इतिहासावरील व्याख्यानें ज्यांनीं ऐकलीं असतील ते आणखी अशीहि साक्ष देतील कीं, मि. जाइल्ससाहेब हे जेव्हां कोरे करकरीत इकडे आले तेव्हां त्यांचीं मतें व विचार उदात्त व प्रजापक्षीय होते. रोमच्या इतिहासावर व्याख्यानें देतांना प्लेबिअन लोकांस हक्क कसे मिळाले याचें चांगलें प्रतिपादन करून त्याबद्दल याच जाइल्ससाहेबांनीं कित्येक वेळां आपली पसंती दाखविलेली त्यांच्या पुष्कळ विद्यार्थ्यांस आठवत असेल. सारांश, यांचीं त्या वेळचीं व्याख्यानें त्यांच्या विद्वत्तेस शोभतील अशीं असून त्यांत राजकीय बाजूनें कमी दर्जाच्या लोकांबद्दल कित्येकदां सहानुभूति प्रगट केलेली असे. तेच जाइल्ससाहेब आज डोक्यांत राजद्रोहाचें वेड घेऊन कोणी इंग्रजी राज्यपद्धतीस जरा दोष दिला कीं त्याजकडे टवकारून पाहूं लागले आहेत. हा परिणाम कशाचा हे आम्ही निश्चयानें सांगू शकत नाहीं, पण अँग्लो–इंडियन लोकांची संगती आणि नित्य व्यवसायानें स्वभावतःच गरीब लोकांस बेपर्वाईनें वागविण्याची जड-

लेली संवय हीं जाइल्ससाहेबासारख्यांच्या विचारपद्धतींत फरक पडण्याचीं मुख्य कारणें असावींत असें आम्हांस वाटतें. त्यांतून जेव्हां खुद्द मुंबईसरकारचेंच डोकें ताळ्यावर नाहींसें झालें होतें तेव्हां जाइल्ससारख्या अंमलदारांची पोळी अर्थातच आपोआप पिकली गेली, व गंगेच्या ओघाप्रमाणें " विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः " अशी विलायतेहून त्यांनीं येथें पहिल्यानें बरोबर आणलेल्या त्यांच्या विचारसरणीची स्थिति होऊन ती अनेक रूपानें चोहोंकडे प्रगट होऊं लागली. किंबहुना ती अनावरच झाली असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. देशी वर्तमानपत्रांत किंवा ग्रंथसमूहांत कांहीं दोष नसतील असें आमचें बिलकुल म्हणणें नाहीं. बरा वाईट प्रकार सर्वत्र थोड्याबहुत प्रमाणानें भरलेलाच आहे; पण जाइल्ससाहेबांनीं त्यास भयंकर स्वरूप देण्याचा जो प्रयत्न चालविला आहे तो मात्र पोरकटपणाचा असून अगदीं गैरशिस्त आहे. सुशिक्षित नेटिव गृहस्थांस इंग्रजी राज्य नकोसें झालें आहे व तें राज्य उलथून पाडण्याच्या ते उद्योगांत आहेत असा जाइल्ससाहेबांच्या मनाचा पक्का ग्रह झालेला आहे; आणि त्यांची अशीहि समजूत आहे कीं, या राजद्रोहाचें मूळ कारण इंग्रजी शाळांतून नेटिवांस मिळत असलेलें इंग्रजी शिक्षण हें होय. अर्थात् आपल्या ताब्यांत असलेल्या शाळांतून कोणत्याहि प्रकारें अशा रीतीचें शिक्षण देण्यांत येऊं नये, देत असल्यास तें बंद व्हावें, चोरून मारून कोणी तसा प्रयत्न करीत असल्यास तो उघडकीस यावा आणि पुढील पिढीस या अरेरावी डायरेक्टरसाहेबांनीं तयार केलेल्या बोळ्यांतील दुधाखेरीज दुसरें दूधच प्यावयास मिळूं नये अशी तजवीज करण्यास हे साहेब लागले. नामदारसाहेबांचा हा उद्योग पाहून समुद्रशोषण करणाऱ्या पंचतंत्रांतील टिटवीची आम्हांस आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. इंग्रजी राज्यकर्ते कितीहि चांगलें अगर शक्तिमान् असोत त्यांचें राज्य या देशांत स्थापित झाल्यानें एतद्देशीयांवर बऱ्याच प्रकारें नवीन नवीन संकटें येऊं लागलीं आहेत हें मिल्ल, बेकन, बर्क, मेकॉले वगैरे सर्वमान्य इंग्रजी ग्रंथकारांच्या ग्रंथांचा अभ्यास करणाऱ्या लोकांस सहज कळून येणारें आहे; व हे ग्रंथ युनिव्हर्सिटीतून किंवा शाळांतून शिकविण्याचें किंवा विलायतेहून इकडे येण्याचें जोंपर्यंत बंद झालें नाहीं तोंपर्यंत मि० जाइल्ससारख्यांनीं कितीहि अट्टाहास केला तरी दिवसेंदिवस होत चाललेल्या आपल्या निकृष्ट स्थितीबद्दल सुशिक्षित नेटिव्ह लोकांचीं अंतःकरणें कधींहि अस्वस्थ झाल्याखेरीज रहावयाचीं नाहींत. आगगाड्या व तारयंत्रें इंग्रजी राज्यांत झालीं असलीं तरी परकीय व्यापाऱ्यांच्या चढाओढीनें आमच्या धंद्याचें वाटोळें होऊन आम्ही भिकेस लागत चाललों आहों, आम्हांस दिवाणी अगर लष्करी किंवा मुलकी वगैरे कोणत्याच खात्यांत वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळत नसल्यामुळें आमच्या आंगच्या गुणांचा विकास न होतां उलट आमच्या अंगांत असलेली थोडीबहुत तरतरीहि उत्तरोत्तर नाहींशी

होत चाललेली आहे; व इंग्रजी साम्राज्याकरितां आम्ही प्राण देण्यास तयार असलों तरीहि त्या साम्राज्यांतील इतर इंग्रजी प्रजेप्रमाणें आम्हांस हक्क नसून निदान आज तरी या साम्राज्याचे आम्ही गुलाम आहों असें कोणाहि विचारी व सुशिक्षित मनुष्यास वाटल्याखेरीज राहणार नाहीं. जाइल्ससाहेबांस या निकृष्ट स्थितीबद्दल जर कांहीं शंका असेल तर ती पुराव्यानें व आंकड्यानें त्यांस सप्रमाण सिद्ध करून दाखवितां येईल. इंग्रजी साम्राज्याच्या छत्राखालीं राहूनच ही स्थिति कशी सुधारतां येईल, त्यास सरकार किंवा सरकारी अधिकारी यांजकडून कांहीं योग्य मदत होण्याचा संभव आहे कीं नाहीं, आणि असल्यास तशा प्रकारची मदत मिळण्यास लोकांनीं काय केलें पाहिजे या गोष्टी स्वदेशासंबंधाने विचार करणाऱ्या प्रत्येक चांगल्या नेटिव गृहस्थाच्या मनांत घोळूं लागल्या आहेत; मग ते गृहस्थ न्या. रानडे असोत वा मि० मलबारी असोत. खरा देशाभिमान जर कशांत असला तर तो यांतच आहे कीं ज्यामुळें आपल्या देशाची व लोकांची निकृष्टावस्था झाली तीं कारणें शोधून काढून त्याच्या प्रतिकारार्थ उद्योग करावयाचा. अशा प्रकारची देशभक्ति आणि जाइल्ससाहेबांसारख्यांची राजभक्ति यांच्यांमध्यें कित्येकदां विरोध उत्पन्न होऊन अविचारानें किंवा अधिकारमदानें रणेंहि माजण्याचा संभव आहे. पण अखेरीस सत्याचा जय होऊन केव्हांना केव्हां तरी ब्रेबियन लोकांच्या हक्कांचाच झेंडा उभारला जाईल याबद्दल आम्हांस बिलकुल शंका वाटत नाहीं. प्रोफेसर जाइल्स यांची समजूतहि अशाच प्रकारची होती; पण प्रोफेसर जाइल्स आणि डायरेक्टर जाइल्स यांच्यामध्यें रामरावणाच्या सौंगाइतकें अंतर पडलें आहे हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. हिंदुस्थानांतील विद्याखातें मिल्ल, मेकॉले सारख्या उदारबुद्धीच्या विद्वानांनीं उपस्थित केलें असून आमच्या मुंबई इलाख्यांत त्याचें पुरस्कर्तृत्व हावर्ड, ग्रांट वगैरे चांगल्या गृहस्थांच्या हातांत होतें. पण उत्तरोत्तर या खात्याचा एक प्रकारें ऱ्हास होत चालला आहे असें म्हणणें भाग येतें. विद्याखात्यांत ज्या अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या पाहिजेत त्यांपैकींच धंदेशिक्षण, नानातऱ्हेचीं शास्त्रे व कला शिकण्याकरितां परदेशांत विद्यार्थी पाठविणें वगैरे होत. पण पैशाच्या टचाईमुळें किंवा अन्य कारणांनीं मि. चाटफील्ड यांस तिकडे लक्ष देतां आलें नाहीं. तथापि त्यांनीं आपलें डोकें व मेंदू शाबूत ठेवला होता. त्यांच्या मागून जाइल्ससाहेब आले आणि तेहि अशा वेळीं आले कीं, राजद्रोहानें इलाख्यांतील सर्व वातावरण त्या वेळीं अगदीं दूषित होऊन गेलें होतें. मग काय विचारतां ! 'आघींच मर्कट' इ. प्राकृत म्हणीप्रमाणें राजद्रोहरूपी प्लेगनें दूषित झालेलें हे वातावरण डिस्इन्फेक्ट करण्याचें आपलें काम आहे अशी आपल्या मनाची खोटी समजूत करून घेऊन आमचे हर्क्युलीस–सदृश डायरेक्टर ही घाण काढण्यास स्वतः हातांत खराटा घेऊन सज्ज झाले. नगरच्या शाळेंतील एक

मास्तर आणि घुष्यांतील फर्ग्युसन् कॉलेज हीं प्रथमतःच त्यांच्या खराट्यांत सांपडलीं; व कशीं बशीं तरी त्यांनीं या कचाटींतून आपली सुटका करून घेतली. पुढें साहेब बहादुरांची दृष्टी खाजगी शिक्षणाकडे वळून एकंदर खाजगी शाळांचीं मुस्कुटें दाबण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पैशाचा पाश कठीण आहे. भीष्माचार्यांस देखील त्यांतून सुटतां आलें नाहीं; मग सरकारी मदत घेणाऱ्या शाळामास्तरांची गोष्ट कशाला ? गणपति उत्सवांत जाणें डायरेक्टर साहेबांस आवडत नाहीं, अगर शिवाजी उत्सवांत सरकारची मदत घेणाऱ्या खासगी शाळेतील देखील कोणी मास्तर गेलेलाहि त्यांस खपत नाहीं. म्हणून असल्या प्रकारच्या चळवळींत खासगी शाळांतील मास्तरांनीं शिरूं नये म्हणून सर्क्युलरें निघालीं आहेत ! इतकेंच नव्हे, तर मि. जाइल्स हे शाळा तपासण्यास गेले असतां कित्येक ठिकाणी कांहीं पोरकट प्रश्नहि त्यांनीं आपल्या हाताखालील मास्तरांस विचारल्याचें आमच्या ऐकिवांत आहे. गरीब बिचारा मास्तर या रावणी डायरेक्टर साहेबांस काय उत्तर देणार हें सांगावयास नकोच. पण केवळ हाताखालील मास्तरावरच अशा प्रकारचा जुलूम करून हे डायरेक्टर स्वस्थ बसले नाहींत; युनिव्हर्सिटींत—की जेथें आजपर्यंत असल्या मूर्खपणाचा गंधहि लागला नव्हता तेथेंहि—अमक्या गृहस्थानें अमुक एक पुस्तक केलें आहे म्हणून त्यास परीक्षक नेमूं नका असा सिंडिक या नात्यानें डायरेक्टरसाहेबांचा थोडासा आग्रहहि होता असें समजतें. त्याप्रमाणेंच मराठी ग्रंथकार व ग्रंथ यांच्यावर डायरेक्टरसाहेबांची करडी नजर झालेली आहे. पंडिता रमाबाईंच्या ग्रंथांत एका टिपेंत युनायटेड स्टेटस्मधील काळे लोक आणि हिंदुस्थानांतील हिंदू लोक यांच्या स्थितीची तुलना केली असल्यामुळें तो ग्रंथ डायरेक्टरसाहेबांस राजद्रोहाचा वाटून नापसंत झाला. दुसरींहि अशाच प्रकारचीं कित्येक उदाहरणें आहेत. पण तीं येथें सांगत बसण्याची जरूर नाहीं; कारण, सन १८९९ सालांत प्रसिद्ध झालेल्या एतद्देशीय भाषांतल्या ग्रंथांवर डायरेक्टरसाहेबांनीं हल्लीं जो रिपोर्ट केला आहे तोच त्याची साक्ष देत आहे. या रिपोर्टींतील कांहीं ठळक गोष्टी अथवा डायरेक्टरसाहेबांची सुविचारमुक्ताफळें आम्ही पुढील खेपेस वाचकांस सादर करूं. आज जी हकीकत वर दिली आहे त्यावरून खुद्द मुंबईसरकारास आमचा सविनय एवढाच प्रश्न आहे कीं, इंग्रजी राज्यास वळकटी आणण्याकरितां अशा तऱ्हेची व्यर्थ उठाठेव करणाऱ्या डायरेक्टराचीच जरूरी आहे कीं काय ? कोणाचीं मतें कांहींहि असोत, त्यास दिलेलें काम त्यानें योग्य रीतीनें बजावणें हें त्याचें कर्तव्य आहे; आणि तें कर्तव्य हल्लींचे डायरेक्टरसाहेब चांगल्या रीतीनें बजावीत आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. किंबहुना डायरेक्टर जाइल्स हें प्रोफेसर जाइल्स यांनीं केलेल्या कामावरून खराटा फिरविण्याच्या उद्योगांत आहेत असेंहि म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हें संकासुराचें सोंग फार दिवस न टिकतां अखेर

प्रोफेसर जाइल्स यांचाच उपदेश कायम राहील आणि इंग्रजी शिक्षणामुळें सुशिक्षित वर्गाच्या अंगीं स्वदेशाच्या निकृष्ट स्थितीसंबंधानें जे विचार उद्भवले आहेत तेच बळावत जाऊन त्यांच्या ज्वालाग्रींत डायरेक्टरसाहेबांच्या विचारांची आहुती पडून राज्यकर्ते आणि प्रजा यांचें कायमचें कल्याण होईल अशी आमची पूर्ण खात्री आहे, व म्हणूनच आम्हीं सरकारास अशी विनंती करतों कीं त्यांनीं डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शनसारख्या आपल्या एका बड्या अंमलदाराचे असले पोरखेळ आतां होईल तितके लवकर बंद करावे.

❖ ❖ ❖

* नामदार जाइल्स यांचीं मुक्ताफळें

गेल्या खेपेस ना० जाइल्स यांच्या हल्लींच्या रिपोर्टींत ठिकठिकाणीं दिसून येत असलेल्या राजद्रोहाच्या पिशाचाबद्दल सामान्य विवेचन केलें आहे. आज या रिपोर्टांतलि कांहीं मुक्ताफळें येथें दाखल करून या मोत्यांचा खोटेपणा व्यक्त करण्याचा आमचा इरादा आहे. हत्तीच्या गंडस्थलांत मोतीं निघतें अशी एक म्हण आहे, पण त्या मोत्यांत आणि जाइल्ससाहेबांच्या गंडस्थलांतील मोत्यांत एक मोठा फरक हा आहे कीं, डायरेक्टरसाहेबांच्या हाताखालील हुषार व विद्वान् मंडळीनें तीं मुक्ताफळें त्यांच्या डोक्यांत कोंबलीं आहेत. जाइल्ससाहेब आपल्या रिपोर्टाच्या प्रारंभींच असें म्हणतात कीं, एका वर्षांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकसंग्रहापैकीं गुणावगुणामध्यें श्रेष्ठ अशीं पुस्तकेच फक्त ओरिएन्टल ट्रान्सलेटर यांनीं या रिपोर्टाकरितां निवडून दिलीं; व हीं पुस्तकें विद्याखात्यांतील कांहीं रत्नपारख्यांकडे पाठवून त्यांच्या अभिप्रायावरून डायरेक्टरसाहेबांनीं आपला रिपोर्ट तयार केला आहे. सारांश डायरेक्टरसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, आपण जो रिपोर्ट लिहिला तो देशी विद्वान् लोकांच्या अभिप्रायावरून लिहिला आणि म्हणून तो बरोबर असलाच पाहिजे. डायरेक्टरसाहेबांचा हा कोटिक्रम कोणासहि पसंत पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. उद्यां जर इंग्रजी ग्रंथकारांबद्दल एखाद्या वेदशास्त्रसंपन्न शास्त्र्यानें कर्णोपकर्णीं मिळालेल्या माहितीवरून कांहीं टीका केली, तर ती जितकी समंजस व ग्राह्य होईल तितकीच जाइल्ससाहेबांची टीका होय. यांचें देशी भाषांचें ज्ञान म्हणजे घोडेवाला किंवा बटलर यांस हुकूम देण्यापुरतेंच असावयाचें. अशा गृहस्थानें देशी ग्रंथसंग्रहांतील मर्म काढण्याचा प्रयत्न करणें म्हणजे एक प्रकारचें साहस किंवा वेडेपणाच आहे.

---

* [केसरी ता. २ आक्टोबर १९००]

आतां डायरेक्टरसाहेबांस विद्याखात्यांतील एतद्देशीय रत्नपारख्यांची मदत होती असें जर कोणी म्हणेल तर त्यास आमच्या दुसऱ्या कित्येक बंधूंनीं जें उत्तर दिलें आहे तें अगदीं समर्पक आहे. विद्याखात्यांतील हेडमास्तर, प्रोफेसर किंवा डेप्युटी इन्स्पेक्टर हेच कायते डायरेक्टरच्या हाताखालील रत्नपारखी होत. पण खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, यांपैकीं जे लोक साहेबांचा कल पाहून बोलतात तेच त्यांच्या प्रीतींतले होतात, आणि जे प्रीतींतले असतात त्यांच्याकडेसच रत्नपारख्याचें काम देण्यांत येतें. जाइल्ससाहेबांच्या डोक्यांत राजद्रोहाचें पिसें भरलेलें आहे असा बोभाट चोहोंकडे आधीं झालेलाच आहे, तेव्हां हाताखालील अम्मलदारहि परीक्षणास दिलेल्या बुकांतून काकदृष्टीनें अशीं वाक्यें शोधून काढतात कीं, ज्याचा थोडाबहुत विपर्यास करून राजद्रोहपर अर्थ लावतां येईल. हाताखालील नेटिव अम्मलदारांस अशा प्रकारचीं संवय असते हें जर जाइल्ससाहेबांच्या अद्याप लक्षांत आलें नसेल तर त्यांनीं इतकीं वर्षें हिंदुस्थानांत फुकट काढलीं असें म्हटलें पाहिजे. नेटिवांस इंग्रजी राज्यांत नेहमींच खालच्या प्रतीच्या जागांवर रखडत पडून बढतीकरितां सदैव साहेबांच्या मर्जीवर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें अशा प्रकारें तोंडापुरतें गोड बोलण्याची संवय पुष्कळ विद्वान् लोकांसहि झालेली असते; आणि ही संवय एकदां जडली म्हणजे पेन्शन घेऊन घरीं बसल्यावरहि बहुतेकांची ती सुटत नाहीं; इतकेंच नव्हे, तर मुद्दाम साहेब लोकांकडे हेलपाटे घालून त्यांच्या तोंडासारखे हे कधीं कधीं त्यांच्या पुढें बोलत असतात. एक प्रकारानें म्हटलें म्हणजे जाइल्ससाहेबांपेक्षां असल्या रीतीनें मलबारी शेट यांनीं म्हटल्याप्रमाणे हांजी हांजी करणारे किंवा चुगलखोर लोकच अधिक तिरस्कारार्ह होत. पण हाताखालील नेटिवांच्या अंगांत अशा तऱ्हेचा अवगुण असतो हें वरिष्ठ अधिकाऱ्यांस नीट कळलें पाहिजे. तसें जाइल्ससाहेबांस कळत नाहीं किंवा कळवून घेण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत, ही त्यांची चूक आहे. नेटिव अधिकारी असे कां होतात व देशी बड्या अधिकाऱ्यांत एखादा तरी रामशास्त्री कां निघत नाहीं हा स्वतंत्र प्रश्न आहे. त्याचा विचार आज कर्तव्य नाहीं. जाइल्ससाहेबांनीं जो रिपोर्ट केला तो करण्यास ते स्वतः नालायख आहेत आणि ज्यांच्या भरंवशावर ही इमारत उठविली आहे. ते हुषार असले तरी स्वभावानें, मतलबानें किंवा अनन्यगतिकत्वानें तोंडपुजे बनले असल्यामुळें जाइल्ससाहेबांचा एकंदर रिपोर्ट भिकार व मूर्खपणाचा झाला आहे एवढेंच आज सांगणें आहे. हें काम असेंच जर चालावयाचें असेल तर त्याची लोकांत कवडी इतकी देखील किंमत राहणार नाहीं.

सन १८९९।१९०० सालीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं त्यांपैकीं ६९ इंग्रजींत लिहिलेलीं असून पैकीं २० च डायरेक्टरसाहेबांकडे तपासणीकरितां पाठविण्यांत आलीं. यांतच न्या. मू. रानडे यांनीं हिंदुस्थानच्या व्यवहारिक स्थितीबद्दल प्रसिद्ध

केलेल्या बारा निबंधांचें पुस्तक होतें. न्या. मू. रानड्यांसारख्यांवर ना. जाइल्स यांनीं पेन उचलणें म्हणजे एक प्रकारचा फाजीलपणाच झाला असता व जाइल्स साहेबांसहि ही गोष्ट माहीत होती. तेव्हां न्या. मू. च्या विद्वत्तेची, वाचनाची, लेखनपटुत्वाची आणि निःपक्षपातीपणाची त्यांनीं शिफारस केली यांत कांहीं नवल नाहीं. पण मध्यें एके ठिकाणीं "क्वचित् स्थलीं राजकीय दुरभिमानानें यांची दृष्टी मंदावलेली दिसते" असा न्यायमूर्तींसहि डायरेक्टरसाहेबांनीं टोमणा दिला आहे. त्याचप्रमाणें अर्थशास्त्राच्या अनादिसिद्ध तत्वाबद्दल न्या. मू. रानडे यांची अविश्वासबुद्धि व्यक्त करतांनाहि त्या संबंधाची आवली गर्भित उपहासबुद्धि डायरेक्टरसाहेबांनीं दाखविली आहे. तात्पर्य, हाच ग्रंथ जर न्या. मूर्तीपेक्षां कमी योग्यतेच्या व प्रसिद्धीस आलेल्या गृहस्थानें लिहिलेला असता तर डाय० साहेबांच्या पोटांतील विचारास उकळी फुटून ते अधिक स्पष्ट रीतीनें बाहेर पडले असते. मि० बिरजे यांच्या बुकावर अभिप्राय देतांना 'पुष्कळ शिवाजी' किंवा 'पिढिजाद देशाभिमान्यांची परंपरा' या शब्दांवर डाय० साहेबांचा जो कटाक्ष आहे त्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. सुभेदार महंमद बेग हे १८९७ सालीं ज्युबिलीकरितां इकडून जे लष्करी अंमलदार विलायतेस पाठविले त्यांपैकीं एक होते. त्यांनीं आपल्या प्रवासवर्णनांत महाराणी सरकारच्या हातून आपणास ज्युबिली पदक मिळालें तेव्हां झालेला आनंद ज्या शब्दांनीं व्यक्त केला आहे ते शब्द डायरेक्टरसाहेबांनीं मोठ्या खुषीनें उतरून घेतले आहेत व राजनिष्ठेचा कित्ता म्हणून लोकांस गिरविण्यास सांगितलें आहे. "अशा राणीकरतां आणि अशा साम्राज्याकरितां मी एकदां नाहीं तर शक्य असल्यास आनंदानें वीसदां मरेन" असें सुभेदार साहेबांनीं लिहिलें आहे. सुभेदार साहेबांचें हें म्हणणें ना० जाइल्स-साहेबांस जर पसंत आहे तर राणीसरकारच्या सर्व प्रजाजनांस सारखेच हक्क असले पाहिजेत या म्हणण्याची डायरेक्टरसाहेबांस कां चीड असावी याचें दुरभिमानाखेरीज दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं. "खिस्तीधर्म खोटा व बनावट नाहीं काय !" या नांवाचें एक पुस्तक भोपाळचे प्रिन्स तहसीनखान यांच्या शिक्षकानें लिहिलें आहे. हें पुस्तक उपहासास्पद, दुरभिमानानें व अज्ञानानें भरलेलें आहे असें जाइल्ससाहेब म्हणतात. ठीक आहे; पण खिस्ती लोक मुसलमान धर्माची व हिंदुधर्माची जी निंदा करतात तीहि मूर्खपणाची असते हें जाइल्स साहेबांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. पण तसा प्रकार घडून आला नाहीं व म्हणूनच जाइल्ससाहेब ग्रंथपरीक्षणाच्या कामास निरुपयोगी आहेत असें आम्ही समजतों.

गुजराथी पुस्तकें एकंदर २३९ होतीं. पैकीं २८ च काय तीं डायरेक्टरसाहेबांकडे भेट म्हणून निवडून काढण्यांत आलीं. यांतच शहानाम्याचें भाषांतर आहे. यांतील कांहीं वाक्यें डायरेक्टरसाहेबांनीं उतरून घेतलीं आहेत; व तीं हिंदुस्था

नच्या राजांनीं आपल्या मुलांस शिकाविण्यासारखीं आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. तीं वाक्यें येणेंप्रमाणें:—" जो आपल्या शेतकऱ्यांवर जुलूम करतो आणि न्याय देत नाहीं तो राजा होण्यास नालायख होय; तो भयंकर व्याघ्र होय. " " राज्य तीन गोष्टींनीं नाहींसें होतें. राज्यकर्त्याची हयगय, पुष्कळ धनाचा लोभ आणि चांगल्यास सोडून वाईटास हातीं धरणें " " आपलेजवळ तोंडपुजे व हांजी हांजी करणारे ठेऊं नको. " आमच्या मतें हीं वाक्यें एतद्देशीय संस्थानिकांनींच नव्हे, तर इंग्रजी राज्यकर्त्यांनीं व खुद्द जाइल्ससाहेबांनींहि लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. पण मदानें अंध झालेल्या डायरेक्टरसाहेबांस परक्यांचीं छिद्रें दिसतात आणि स्वतःचीं आणि इंग्रजी राज्यपद्धतीचीं ढोबळ व्यंगें दिसत नाहींत एवढेंच नव्हे तर कोणी दाखविलीं असतां ते गरम होतात. गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीनें मराठींत 'हिंदुस्थानची राज्यव्यवस्था आणि लोकस्थिति' यावर कै. रा. सा. महादेव रामचंद्र सोमण यांनीं जें पुस्तक लिहिलें आहे त्याचें भाषांतर करविलें आहे. या पुस्तकाबद्दल आभेप्राय मागें 'केसरीं'त आला आहे. पुस्तकांतील माहिती उपयुक्त असून त्यांत राष्ट्रीय सभेची व सरकारची बाजू दोन्ही व्यवस्थित रीतीनें दाखविल्या आहेत. ग्रंथकार कोणताहि पक्ष न धरतां दोन्ही पक्ष लोकांपुढें मांडून वाचकांपैकीं ज्याचें त्यानें दोन्ही पक्षांचीं कारणें ऐकून मत ठरवावें असें म्हणतो. सारांश, या पुस्तकांत कोणत्याहि मताचा अभिमान दाखविलेला नाहीं. तथापि गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीनें अशा वादग्रस्त विषयावर पुस्तक प्रसिद्ध केलें हें चांगलें केलें नाहीं असें डाय० साहेबांनीं म्हटलें आहे! यावरून डायरेक्टरसाहेबांचा दुराभिमान व पक्षपातबुद्धि चांगलीच व्यक्त होते; व यांच्या कारकीर्दींचें हेंच धोरण कायम राहिल्यास गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटी किंवा डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी यांनीं इतउत्तर राजकीय विषयावर निःपक्षपातबुद्धीनें लिहिलेले ग्रंथहि प्रसिद्ध करणें डायरेक्टरसाहेबांच्या दृष्टीनें राजद्रोहाचें होईल. डाय० साहेबांचा असा कायमचा ग्रह झालेला आहे कीं, इंग्रजी राज्यपद्धतींत दोष आहेत असें सुद्धां कोणी म्हणूं नये, व कोणत्याहि बुकाचें परीक्षण करतांना ते एवढीच एक गोष्ट बघत असतात. त्यांतील भाषासरणी, किंवा इतर विचार यांची त्यांस जरूर नाहीं. फार लांब कशाला? ज्या ग्रंथाचें गुजराथींत भाषांतर केलें तो ग्रंथ मराठींत कोणी लिहिला हेंहि त्यांस माहीत नाहीं व त्याची चौकशीहि केलेली नाहीं. कवि दयाराम याच्या चरित्रावर अभिप्राय देतांनाहि डायरेक्टरसाहेब अशाच प्रकारें घसरले आहेत. यांची कविता अश्लील आहे व त्यापासून लोकांच्या मनावर चांगला परिणाम झाला नाहीं असें डाय० साहेब लिहितात. जणूं काय डाय० साहेबांनीं त्यांचे सर्व ग्रंथ वाचलेच आहेत. डाय० साहेबांस ही माहिती कोणी तरी हाताखालील रत्नपारख्यानेंच दिलेली असेल, पण ते रत्नपारखी नसून गाजरपारखी आहेत

असें गुजराथी वर्तमानपत्रकारांचें म्हणणें आहे. निदान एवढी तरी गोष्ट खरी कीं, तोंडासारखें बोलणाऱ्या रत्नपारख्यांच्या मतावर भिस्त ठेवून सरकारी रिपोर्टांत अशा प्रकारें शेरे मारणें अगदीं गैरशिस्त व अन्याय्य होय. जाइल्ससाहेबांच्या काकदृष्टीचें आणखी एक उदाहरण मि. मादन यानें लिहिलेल्या सर जमशेटजी जिजीभाईच्या चरित्रावरील टीका हें होय. अलीकडे राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्यें पूर्ववत् स्नेहभाव राहिलेला नाहीं असें या ग्रंथांत एके ठिकाणीं लिहिलेलें आहे. पण डायरेक्टर साहेबांस तें कसलें खपणार? त्यांनीं त्यावर असा शेरा मारला आहे कीं, " या वाक्यांत इंग्रज लोकांचा दोष दाखविला आहे, पण त्याचें कारण काय हें सांगण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. ही गोष्ट इंग्लिश लोकांच्या स्वभावांत फरक झाल्यामुळें नव्हे तर गेल्या पन्नास वर्षांत मुंबई इलाख्यांत जें स्थित्यंतर झालें आहे त्यामुळें घडून आली आहे हें म्हणणें अधिक प्रशस्त आहे. " डाय० साहेबांचा हा अभिप्राय पाहून कापूस चोरून दाढीस हात लावणाऱ्या गृहस्थाची आम्हांस आठवण होते. गेल्या पन्नास वर्षांत मुंबई इलाख्याचीचशी काय पण सगळ्या हिंदुस्थानची स्थिति पालटली आहे. इंग्रजी विद्येनें लोकांचीं मनें सुसंस्कृत होऊन त्यांस आपल्या बऱ्यावाईटाच्या गोष्टी कोणत्या हें समजूं लागलें आहे; आणि बऱ्या गोष्टी वाढाव्या व वाईट गोष्टी कमी व्हाव्या याबद्दल ते उद्योग करूं लागले आहेत. हा उद्योग हल्लींच्या व्यवस्थेंत ज्यांच्या पोळीवर अधिक तूप पडतें त्या जाइल्ससाहेबांसारख्या अधिकाऱ्यांस खपत नाहीं व त्यामुळें ते नेटिवांशीं सलोख्यानें वागत नाहींत असें प्रजापक्षाच्या लोकांचें म्हणणें आहे. जाइल्ससाहेबांस यांपैकीं एक गोष्ट तर कबूलच आहे. ती ही कीं अधिकारी व प्रजा यांच्या दरम्यान पूर्वी सलोखा होता तसा आतां नाहीं. परंतु त्यांचें असें म्हणणें आहे कीं, हा परिणाम इंग्रज लोकांच्या स्वभावांत फरक झाल्यामुळें झाला नाहीं, तर पन्नास वर्षांतील स्थित्यंतरामुळें झाला. आम्ही तरी हेंच म्हणतों. इंग्रज लोक किंवा अधिकारी राज्य कायम होईपर्यंत जसे वागत असत तसे आतां वागत नाहींत. त्यांचा स्वभाव मनुष्यस्वभावाहून कांहीं निराळा नाहीं. कित्येक वेळां नखें बाहेर दाखविणें फायद्याचें नसतें. परंतु एकदां कार्यसिद्धी झाली म्हणजे पांघरूण काढून टाकण्यास कांहीं हरकत रहात नाहीं. युरोपियन अधिकाऱ्यांची स्थिति अशा प्रकारची झाली आहे. त्यांचा स्वभाव बदलला असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. पूर्वी तो गुप्त होता व आतां प्रत्ययास आला एवढाच काय तो विशेष आहे, व तो विशेष जाइल्ससाहेबांसहि कबूल आहे. मि० काब्राजी यांच्या 'मिठी मिठी' या कादंबरीवर टीका करतांनाहि जाइल्ससाहेब असेच एका वाक्यावर गरम झाले आहेत. ग्रंथकार इंग्रजी लष्करी अंमलदारांच्या नितिदृष्ट्या गैरवर्तनाबद्दल थोडीशी टीका करण्यास प्रवृत्त झाले हें जाइल्ससाहेबांस खपले नाहीं. यावरून

केवळ " हम करेसो कायदा " च नव्हे तर युरोपियन वागेल तच्चि नीति लोकांनीं मानली पाहिजे असें डाय०साहेबांचें मत आहे असें दिसतें. त्याच प्रमाणें मि० पटेल यांच्या बुकांत एके ठिकाणीं इंग्रजी पोषाख व रितीभाती उचलणाऱ्या नेटिवांस जो दोष दिला आहे तोहि डाय०साहेबांस गैरशिस्त वाटला आहे. ' लाल आणि लक्ष्मी ' हें पुस्तक गचाळ आहे असें डाय०साहेबांचें म्हणणें आहे, पण त्यांत हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रकर्ते अशिक्षित असून लोकांकडून पैसे उकळतात असें जें विधान आहे तें डायरेक्टरसाहेबांस फार रुचलें आहे. यावर मि० जाइल्स यांस ' फिनिक्स ' पत्रकर्त्याप्रमाणें आमचा एवढाच प्रश्न आहे कीं, हें जें हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रकर्त्यांचें वर्णन आहे त्यांत इंग्रजी वर्तमानपत्रें चालविणाऱ्या इंग्रजी वर्तमानपत्रकारांचाहि समावेश होत नाहीं काय ? अधिकाऱ्यांच्या तब्बेतीप्रमाणें लिहिणें आणि एखाद्या संस्थानिकाकडून कोणत्या तरी निमित्तानें पैसे उकळणें हीं कामें करणारे देशी वर्तमानपत्रकारांत कोणी नसतील असें नाहीं. पण या कामीं कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रकारांची शिताफी अधिक आहे हें शोधाअंतीं कोणासहि कळून येईल; मात्र त्याचें मन व विचार जाइल्ससाहेबांसारखे गढूळ झालेले नसावेत.

पण जाइल्ससाहेबांच्या फाजील धाष्टर्याची पराकाष्ठा पाहिजे असल्यास ती मि० मलबारी यांनीं केलेल्या ' संसारिका ' पुस्तकावरील अभिप्रायांत दिसून येईल. जाइल्ससाहेबांना प्रथमतःच अशी शंका आली आहे कीं, कोणीहि पारशी इतकें शुद्ध गुजराथी कसें लिहील, आणि स्वदेश म्हणजे गुजराथ परकीयांच्या अमलाखालीं बुडाला असें त्यांस वाटून त्याचें त्यास एवढें दुःख तरी कसें होईल ? सारांश हल्लींच्या विद्याखात्याच्या अधिपतीची अशी समजूत आहे कीं इंग्रजी राज्यांत देशांतील उद्योगधंदे बुडून देश भिकेस लागला अशी जी नेटिव्ह ग्रंथकारांची व लेखकांची ओरड आहे ती पारशी ग्रंथकारांस संमत नाहीं. जरा निराळ्या तऱ्हेनें बोलावयाचें असल्यास अशा तऱ्हेची राजद्रोही ओरड करणारे लोक पारशांत नाहींत असें डायरेक्टर साहेबांचें मत असल्यामुळें त्यांनीं वरील कोटी योजून आपलेकडून मि. मलबारीशेट यांस पळून जाण्यास वाट करून दिली होती. पण शेटजी कसले खमंग ! त्यांनीं ना० जाइल्ससाहेबांचे उपकार मानावयाचे सोडून उलट आपणच तो ग्रंथ लिहिला, व त्यांतील खरें मर्म कळण्याइतकी जाइल्ससाहेबांची कोणत्याहि प्रकारें योग्यता नाहीं असें उघड प्रतिपादन केलें आहे. इतकेंच नव्हे तर स्वभावानें, विद्येनें, किंवा सहवासानें हल्लींचे डायरेक्टर हें काम करण्यास नालायख आहेत व त्यांनीं केलेलीं भाषांतरें चुकीचीं असून त्यांची जन्मभाषा इंग्रजीसुद्धां त्यांस घड लिहितां येत नाहीं असें शेटजीनीं आपल्या पत्रांत लिहिलें आहे. 'संसारिका' पुस्तकांतील दोन तीन कविता 'देशाभिमानी' म्हणून जाइल्ससाहेबांनीं मुद्दाम निवडलेल्या आहेत व देशाभि-

मानी शब्दावर कटाक्ष आहे हें दाखविण्याकरितां तो शब्द मुद्दाम 'इटॉलिक' अक्षरांत छापलेला आहे. देशांतील संपत्तीपैकीं $\frac{1}{10}$ परकीयांच्या हातांत पडते, राज्यव्यवस्था आम्हांस फायदेशीर नाहीं, उद्योगधंदे सर्व बुडाले आहेत, पगाराच्या रूपानें लाखों रुपये परकीयांच्या खिशांत उतरत आहेत आणि देश भिकेस लागत चालला आहे असें सांगून नंतर लोकांना ग्रंथकर्त्यानें असा उपदेश केला आहे कीं, आर्यपुत्रहो, जागे व्हा आणि उठा, झोंप घेण्याची आतां वेळ राहिली नाहीं, या संकटाचें निवारण तुम्हांसच केलें पाहिजे, या कामीं इंग्लंडांतील पुष्कळ उदार गृहस्थांचें तुम्हांस साहाय्य मिळेल आणि असले उदार आत्मे इंग्लंडांत पुष्कळ आहेत, करितां आपली नाउमेद होऊं देऊं नका, तर कमरा बांधा आणि उद्योगास लागा. या कविता डाय० साहेबांस आवडल्या नाहींत हें सांगावयास नकोच. पिशाच्चानें घेरलेल्या एखाद्या मनुष्याची " वाजे पाऊल आपलें म्हणे मागें कोण आलें. " अशी ज्याप्रमाणें स्थिति होते तद्वत् राजद्रोहाच्या संशयपिशाच्चिकेनें डोकें भणाणून गेलेल्या जाइल्लसाहेबांस ' उठा ' हा शब्द पहिल्याबरोबर मलबारी शेट लोकांस बंड करण्यास उठण्यास सांगतात कीं काय असा भास झाला आणि त्या भरांत त्यांनीं देशाभिमान ऊर्फ राजद्रोह असा या कवितेवर शिक्का ठोकून दिला. राजद्रोहाचें पिसें किंवा चळ डायरेक्टरसाहेबांस लागला आहे, आणि विलायतेंतील थंड हवेंत कांहीं दिवस त्यांस फलींवर पाठविल्याशिवाय हें वेड त्यांच्या डोक्यांतून निघावयाचें नाहीं एवढें यावरून निर्विवाद सिद्ध होतें. सन १८९७ सालीं काविळीनें ज्यांची दृष्टी बिघडलेली होती त्यापैकींच मुंबई ग्याझेट वर्तमानपत्रकर्ते होत. पण तेहि आतां इतके शुद्धीवर आले आहेत कीं, मलबारीशेटजींच्या वरील लेखांत राजद्रोह नाहीं, उद्योग करण्याबद्दल लोकांस उत्तेजन आहे, असा आपला अभिप्राय त्यांनीं आपल्या पत्रांत दिला आहे. पण जाइल्लसाहेबांचें डोकें अद्याप शांत झालें नसल्यामुळें त्यांच्या दृष्टीस चोहोंकडे पिशाच्चांचींच कोलितें दृष्टीस पडत आहेत. एरव्हीं मलबारीशेटजीसारख्यांवरहि त्यांनीं अशा प्रकारचे आरोप केले नसते. जाइल्लसाहेबांचा या कामीं फाजील उतावीळपणा किंवा अविचार झाला याबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे असें दुसरीकडे दिलेल्या उताऱ्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल. पण त्यापासून आम्ही काय बोध घेतला पाहिजे हें मात्र जितक्या स्पष्टपणें सांगावयास पाहिजे तितक्या स्पष्टपणें कोणी सांगितलें नाहीं. तो बोध हा होय कीं, जाइल्लसाहेबांसारखे दंडुके अंमलदार इंग्रजी राज्यांत अमुक दोष आहेत व ते सुधारले पाहिजेत असें म्हणणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित नेटिवास राजद्रोही समजत असतात, आणि नोकरींत असतां पोटाकरितां जरी कित्येक वेळां असल्या अधिकाऱ्यांचें म्हणणें त्यांच्या हाताखालील नेटिव्ह अधिकाऱ्यांस कबूल करावें लागत असलें तरी नोकरीबाहेरील

सुशिक्षित लोकांपैकीं कित्येक गृहस्थांनीं आपापसांत एकमेकांस राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करणें अत्यंत लज्जास्पद होय. बंड करण्याचा जोंपर्यंत कोणाचा इरादा नाहीं, तोंपर्यंत एखाद्याची भाषा कडक असली म्हणून त्यास राजद्रोही ठरविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्यास माना डोलविणें घरबुडवेपणाचें लक्षण होय. या लक्षणांनीं युक्त कांहीं मंडळी आमच्यांत आहेत. व आमची अशी आशा आहे कीं जाइल्ससाहेबांचा मलबारी शेटजीवरील अभिप्राय वाचून तरी त्यांचे डोळे पुरे उघडून ते खऱ्या मार्गाचा स्वीकार करतील. डायरेक्टरसाहेबांच्या हल्लींच्या रिपोर्टांचा आमच्यावर एवढा जरी परिणाम झाला तरी जाइल्स साहेबांनीं आमचें पुष्कळ कार्य केल्यासारखें होईल व त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारीहि होऊं हें सांगावयास नकोच. राजद्रोहाच्या पिशाचानें जाइल्ससाहेब वेडे झाले आहेत खरे, पण मनुष्याच्या अंतःकरणांतील विचार कधीं कधीं झोपेंत व वेडेपणांतच बाहेर पडत असतात असा अनुभव आहे. आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे जाइल्ससारख्या अधिकाऱ्यांचें खरें इंगित काय आहे हें जर हल्लींच्या रिपोर्टावरून आम्हांस कळून आलें नाहीं तर आमच्यासारखे मूर्ख कोणीच नाहींत असें म्हणावें लागेल.

असो; गुजराथी ग्रंथसंग्रहांतील शेलक्या बुकांवर अभिप्राय देतांना डायरेक्टरसाहेबांच्या पेनांतून जे विचार बाहेर पडले आहेत त्यांचें परीक्षण करण्यांतच आजची जागा संपून गेली. करितां साहेबबहादुरांची मराठी ग्रंथावरील टीका व उपसंहार यांचें परीक्षण करण्याचें काम पुढील खेपेवर टाकणें भाग आहे.

❁ ❁ ❁

* तेरा मुद्यांचा पुरावा

यंदाच्या सालीं दुष्काळांत सरकारी सारा वसूल करण्याच्या बाबतींत गुजराथ व मध्यभाग या जिल्ह्यांतून किती जुलूम झाला याचें वर्णन वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून आलेलेंच आहे. हा जुलूम खरा होता कीं खोटा होता याविषयीं कोणाहि समंजस व चौकस मनुष्यास शंका येण्याचें कांहीं कारण नाहीं. पण हल्लींची राज्यपद्धती अशी कांहीं विलक्षण आहे कीं, त्यांत लोकांचा व अधिकाऱ्यांचा मेळ पडणें मोठें दुर्घट झालें आहे. लोकांची स्थिति काय आहे, त्यांच्यावर जुलूम होत आहे कीं नाहीं आणि होत असल्यास त्याचा प्रतिकार कसा होईल या सर्व गोष्टींचा विचार वास्तविक म्हटलें म्हणजे सरकारानेंच केला पाहिजे. 'पण साऱ्याच्या वसुलीसंबंधानें आणि सुटीसंबंधानें सरकारी अधिकाऱ्यांचीं जीं मतें व समजुती आहेत त्या अशा प्रकारच्या आहेत कीं, तेणेंकरून गरीब शेतकरी लोकांस जी सवलत मिळणें अवश्य आहे ती देखील खालील अधिकाऱ्यांच्या हातून मिळत नाहीं. दक्षिणेंतील जिल्ह्यांत ह्यासंबंधानें कोणते गैरशिस्त प्रकार झाले त्याचें वर्णन केसरींत मागें आलेलेंच आहे. पैकीं कऱ्हाड व खानदेश यासंबंधानें चौकशी होऊन तेथील तक्रारी साधार आहेत अशाबद्दल सरकारची खात्री झालेली आहे इतकेंच नव्हे, तर त्याबद्दल सरकारास वाईट वाटत आहे असें सरकारी ठरावांत म्हटलें आहे. गुजराथेंत सारा वसुलीसंबंधानें झालेल्या सक्तीची सविस्तर हकीकत पहिल्यानें ' टाइम्स ऑफ् इंडिया ' पत्रांत 'गुजराथी' या सहीनें जो पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला त्यांत आली होती, व टाइम्सकारानेंहि आपल्या बातमीदारास दुजोरा दिला होता. पुढें अर्थातच हे हें प्रकरण सरकारमार्फत चौकशीकरितां ज्या जिल्ह्यांतील व तालुक्यांतील अधिकाऱ्यांनीं जुलूम केला होता त्यांच्याकडेस गेलें. सारांश, एखाद्या ठिकाणीं चोरी झाली असतां त्याबद्दलचा रिपोर्ट चोरी करणारासच जसा विचावयाचा तद्वतच या बाबतींत सरकारनें आपलें वर्तन ठेवलें. याचा परिणाम असा झाला कीं, खालील अधिकाऱ्यांच्या दुर्वर्तनावर पांघरूण घालण्याकरितां भलभलत्या सबबी रिपोर्टांत दाखल झाल्या आणि त्याच कलेक्टर व कमिशनरमार्फत सरकाराकडे येऊन सरकारांतून अखेर असा ठराव झाला कीं, " गुजराथी या सहीनें प्रसिद्ध झालेले लेख अतिशयोक्तीचे, अविश्वसनीय व निराधार आहेत." इतक्यावरच ही गोष्ट भागली नाहीं. तर कायदेकौन्सिलची ता. २४ आगस्ट रोजीं जी बैठक झाली त्यांत ना. मि. पारख यांनीं गुजराथेंत झालेल्या सारावसुलीच्या सक्तीसंबं-

---

* [केसरी ता. ९ आक्टोबर १९००]

धानें 'गुथराथी' यानें केलेले सर्व आरोप पुनः कायदेकौन्सिलापुढें मांडून ते आरोप सिद्ध करण्यास आपलेजवळ 'बराच पुरावा' आहे असें आपल्या भाषणांत स्पष्ट बोलून दाखविलें. कायदेकौन्सिलांत अशा रीतीनें एका सभासदानें स्पष्ट विधान केल्यानंतर त्यांस कांहीं तरी उत्तर देणें भाग होतें. तेव्हां ना. मि. मान्टीथ यांनीं असें सांगितलें कीं, 'गुजराथी'च्या लेखाखेरीज ना. मि. पारख यांच्या विधानांस कांहीं पुरावा आहे असें दिसत नाहीं; आणि 'गुजराथी' चीं विधानें विश्वसनीय नाहींत असें चौकशी अंतीं सरकारानें आपल्या ठरावांत स्पष्ट सांगितलेंच आहे. मान्टीथसाहेबांचें याप्रमाणें भाषण झाल्यावर गव्हर्नर-साहेबांनींहि आपल्या शेवटच्या भाषणांत अशाच तऱ्हेचे पण अधिक कळ-कळीचे आणि शिष्टपणाचे उद्गार काढले. लॉर्ड नॉर्थकोट असें म्हणाले कीं, " सरकारचे हेतु व हुकूम खालील अधिकारी कांहीं ठिकाणीं नीट रीतीनें बजा-वीत नाहींत याबद्दल आपल्याजवळ पुरावा असल्याचें ना. मि. पारख यांनीं बोलून दाखविलें आहे; तरी माझी त्यांस अशी सूचना आहे कीं, त्यांनीं तो पुरावा कौन्सिलपुढें मांडावा. एरवीं, सरकारास त्यांचे कलेक्टर, कमिशनर किंवा इतर अधिकारी यांच्या रिपोर्टावर विश्वास ठेऊनच चाललें पाहिजे. " गव्हर्नर-साहेबांनीं मि. गोकुळदास कहानदास पारख यांस अशा रीतीनें पुरावा देण्या-बद्दल जेव्हां आव्हान केलें तेव्हां मि. पारख हे कांहीं पुरावा कौन्सिलपुढें मांडतील असें कोणास वाटलें नसेल. 'गुजराथी'च्या पत्राची व त्यांतील विधानांची सरकारी अधिकाऱ्यांनीं विस्तेवाट लावून दिलीच होती. शिवाय ऐपतदार लोक कट करून सरकारी सारा बुडवितात असा सारा न देणारांवर सरकारी अधिकाऱ्यांचा पहिल्यापासूनच आक्षेप होता. तो आणि दुसऱ्या कांहीं सबबी मिळून गव्हर्नर—इन्—कौन्सिल यांजकडे गरीब रयतेची दाद न लागावी असा सरकारी अधिकाऱ्यांनीं कट केला नसल्यास तजवीज तरी खास केली होती. शिवाय 'गुजराथी' या सहीनें लेख लिहिणारा इसम कोण आहे याचें अनुमान करून तो स्वतःच्या फायद्याकरितां ही चळवळ करीत आहे आणि अधिकाऱ्यांच्या हातून त्याचें पूर्वी जें कांहीं बरें वाईट झालें आहे त्यामुळें असं-तुष्ट होऊन त्यानें ही खटपट चालविली आहे असाहि त्याच्या लेखावर एक आक्षेप काढण्यांत आला होता. सारांश, सरकारी अधिकाऱ्यांचे या बाबतींतलें वर्तन अशा प्रकारचें होतें कीं, जेणेंकरून कट केल्याचा आरोप वर्तमानपत्रांतील लेखकांपेक्षां त्यांजवरच अधिक चांगल्या रीतीनें लागू होत होता. पण त्यास पुराव्याची अपेक्षा होती असें खुद्द गव्हर्नरसाहेबांनींच बोलून दाखविलें असल्या-मुळें हा पुरावा गोळा होईपर्यंत रयतेच्या तर्फेनें जास्त कांहीं बोलतां येत नव्हतें. कारण गव्हर्नरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें खालील अधिकारी हेच सरकारचे नेत्र होत. पण हे नेत्र पुष्कळदां बिघडलेले असतात हें जरी

निर्विवाद आहे, तरी तें सिद्ध करण्याचा बोजा रयतेच्यातर्फे भांडणाऱ्या लोकांवर येऊन पडतो. गव्हर्नरसाहेबांनीं प्रकृतस्थलीं हा पुरावा मि. पारख यांचे जवळ मागितला हेंच आमच्या मतें लॉर्ड नॉर्थकोट यांच्या न्यायबुद्धीचें लक्षण होय. हाताखालील अधिकारी कांहींहि म्हणोत, त्यांच्यांविरुद्ध दुसरी बाजू असून ती घुराव्यानें सिद्ध करण्यासारखी असते इतकें लॉर्ड नॉर्थकोट यांच्या मनानें घेतलें आहे एवढें यावरून सिद्ध होतें.

असो, लॉर्ड नॉर्थकोट यांनीं आव्हान केल्यानंतर मि. गोकुळदास पारख यांनीं गुजराथेंत जाऊन ४७ लोकांच्या लेखी जबान्या घेतल्या. पैकीं दोन जबान्यांखेरीज बाकीच्या सर्व जबान्या मि. पारख यांच्या देखत झालेल्या आहेत व एक दोन खेरीज त्यांनीं त्या सर्व आपल्या हातानें लिहून घेतल्या आहेत. या जबान्यांचें इंग्रजींत भाषांतर करून आणि सोबत आपलें एक पत्र मिळून मि. गोकुळदास पारख यांनीं सर्व पुरावा आतां सरकारकडे रवाना करून तो छापून काढला आहे; आणि त्यांत अखेर सरकारास या पुराव्याचा विचार करावा म्हणून विनंति केली आहे. अंकलेश्वराचे मुनसफ-मॅजिस्ट्रेट यांच्यासमोर जो एक खटला चालला होता त्यांतहि सारावसुलीच्या कामीं गांवकामगार व भागकारकून यांनीं जो जुलूम केला तो पुराव्यानें शाबीत झालेला आहे, व त्या घुराव्याचा उल्लेखहि मि. पारख यांनीं आपल्या पत्रांत केला आहे. मि. पारख यांचें पत्र व जबान्या मिळून फुल्स्केप साइजचीं छापील ६१ पानें झालीं आहेत व त्यांचें बूक 'टाइम्स ऑफ् इंडिया' छापखान्यांतून छापून बाहेर पडलें आहे. हा पुरावा वाचल्यानंतर मुंबईसरकार पुढें काय तजवीज करतें हें पाहणें आहे. ना. मि. पारख हे कांहीं कोणी वर्तमानपत्रांतील निनांवी लेखक नव्हत. शिवाय त्यांनीं जो पुरावा गोळा केला आहे तो प्रत्यक्ष हिंडून व जबानी देणारास आपल्यासमोर बोलावून लिहून घेतलेला आहे. त्यामुळें सामान्य दृष्ट्या पाहिलें तर ज्या अधिकाऱ्यांनीं जुलूम केला त्यांच्या रिपोर्टापेक्षां हा पुरावा अधिक विश्वसनीय मानणें जरूर आहे, व त्याप्रमाणें लोकांची समजूत होईल यांत शंका नाहीं. मुंबई ग्याझेट पत्रकर्त्यांनीं नेटिव लोक स्वभावतःच हवें तें खोडसाळ सांगणारे असतात आणि हा त्यांचा खोडसाळपणा सर्वत्र प्रसिद्ध आहे, अशा प्रकारची कांही तरी गचाळ सबब लावून ना. पारख यांनीं गोळा केलेल्या पुराव्याचें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या गचाळ सबबीनें कोणाचेंहि समाधान होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मि. पारख यांनीं हायकोर्टाच्या वकिलाचें बरेच दिवस काम केलें असून पुराव्याचा खरेखोटेपणा ग्याझेटच्या एडिटरापेक्षां त्यांस जास्त चांगला कळतो असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं, व आमची अशी खात्री आहे कीं, गेरीसाहेब जर हयात असते तर सरकारच्या समर्थनार्थ त्यांनीं असली गचाळ व खोडसाळ सबब कधींहि पुढें आणली नसती.

ना. मि. गोकुळदास पारख यांनीं ज्या जबान्या गोळा केल्या आहेत त्यावरून 'गुजराथी' नामक लेखकानें केलेलीं सर्व विधानें चांगलीं सिद्ध होतात. 'गुजराथी'चे आरोप येणेंप्रमाणें होते:-(१) भडोच जिल्ह्याच्या पुष्कळ भागांत गेल्या पांच वर्षें पिकें चांगलीं नसून शेतकऱ्यांची स्थिति निकृष्ट होत चालली आहे, आणि १८९९ सालीं पुष्कळ शेतकऱ्यांस सारा देण्याची देखील मारामार पडून अंकलेश्वर तालुक्यांत आणि हनसोट पेट्यांत पुष्कळ लोकांनीं जमिनी सोडून दिल्या; (२) दुष्काळाच्या सालीं ज्यांनीं सारा दिला नाहीं त्यांस मार किंवा अशाच प्रकारची शारीरिक शिक्षा भोगावी लागली (३) सारा न देणाऱ्या कांहीं इसमांस त्यांनीं सारा द्यावा म्हणून कुटुंबांतील माणसांसुद्धां घराबाहेर काढलें आणि त्यांनीं घरांत शिरूं नये म्हणून घरांस कुलुपें अगर पट्ट्या ठोकल्या; (४) मामलेदार किंवा त्यावरील दर्जाचे अधिकारी यांच्या हुकमाखेरीज गांवकामगारांनीं सारा न देणाऱ्यांचा जंगम माल म्हणजे नांगर, आऊतें, बैल, कपडे, पांघरुणें वगैरेसुद्धां जप्त केला; (५) कुलूप लावून बाहेर गेलेल्या इसमांचीं घरें त्यांच्या पश्चात आंतील मालाची जप्ती करण्याकरितां फोडलीं; (६) कांहीं घरांच्या जमिनी आंत द्रव्य पुरलें असेल अशा हेतूनें खणून पाहिल्या; (७) सारा न देणाऱ्या गांवकऱ्यांस गांवांतील विहिरींचें पाणी भरूं दिलें नाहीं, (८) अशा तऱ्हेची सक्ती चालू असल्यामुळें शेतकऱ्यांनीं जवळ असलेली सर्व चीजवस्त धान्य किंवा गुरांस लागणारी वैरण विकूनहि सारा भरला; (९) तगाईकरितां सरकारांतून जे पैसे देण्यांत आले त्यांतून सारा वसूल केला; (१०) दुष्काळाचे वेळीं धर्मार्थ म्हणून जो पैसा देण्यांत आला त्यांतून सारा कापून घेण्यांत आला; (११) बाईमणी नांवाच्या एका औरतीचा उद्धट रीतीनें झाडा घेतला; (१२) भिमा प्राग नांवाच्या इसमास उघडें बोडकें आपल्या गांवापासून ओलफाड येथें नेऊन तेथें त्यास तीन दिवस अन्नावांचून कोंडून ठेविलें; आणि (१३) साऊलचा एक वाणी आणि भडोचचा एक रजपूत हे सारा देण्यास पात्र नसतां त्यांजकडून जुलमानें सारा वसूल केला.

हे तेराहि आरोप किती भयंकर आहेत हें आम्ही सांगावयास नकोच. ते भयंकर आहेत, असें वाटल्यावरूनच सरकारनें त्यांची चौकशी केली व हाताखालील अधिकाऱ्यांच्या रिपोर्टावर भरंवसा ठेऊन 'गुजराथी' चे लेख अतिशयोक्तीचे व बेभरंवशाचे आहेत असा ठराव प्रसिद्ध केला. परंतु आतां मि. पारख यांनीं वरील सर्व आरोपांच्या समर्थनार्थ आपण समक्ष घेतलेल्या ४६ साक्षीदारांच्या जबान्या प्रसिद्ध केल्या आहेत. कोणकोणत्या जबान्या कोणकोणता आरोप समर्थन करितात हें येथें सांगण्याची जरूर नाहीं. या जबान्या वाचून सरकार काय करतें एवढेंच पाहणें आहे. हिंदु लोक खोटें बोलतात असें म्हणून आतां निर्वाह लागेल असें आम्हांस वाटत नाहीं. बाप दाखीव नाहीं तर

श्राद्ध कर अशाच थरास ही गोष्ट आलेली आहे व ती या थरास आणण्यास ना. गव्हर्नरसाहेबांनीं केलेलें आव्हानच एक प्रकारें कारणीभूत झालेलें आहे. तेव्हां आम्हांस अशी उमेद आहे कीं गव्हर्नरसाहेब आपल्या मनाची पूर्वींचीच समता कायम ठेऊन खालच्या प्रतीचे सरकारी अधिकारी आणि मि. पारख यांचे साक्षीदार यांपैकीं कोण खरे व कोण खोटे याचा निर्णय तिऱ्हाइत पंच नेमून करतील. याखेरीज सरकारास अन्य मार्ग राहिला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मग मागील कारकीर्दींत असल्या प्रसंगीं 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायाचा जसा उपयोग करीत असत तशीच कांहीं तरी मि. पारख यांच्या लेखाची विल्हेवाट लावावयाची असल्यास नकळे. असो, सरकार पुढें काय करतें हें समजल्यावांचून त्याबद्दल जास्त चर्चा करण्यांत हांशील नाहीं. करितां शेवटीं ना. मि. पारख यांनीं या कामीं जो उद्योग केला व धैर्य दाखविलें त्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून आजचा लेख संपवितों.

◆ ◆ ◆

* नामदार जाइलससाहेब यांची ओंवाळणी

आजच्या अंकांत आणि पंधरा दिवसांपूर्वीं मराठी, इंग्रजी, गुजराथी, हिंदुस्थानी वगैरे निरनिराळ्या ठिकाणच्या वर्तमानपत्रांतील जाइल्ससाहेबांच्या रिपोर्टावरील अभिप्राय म्हणून जे उतारे दिले आहेत त्यांवरून जुन्या सँढर्स्ट-शाहींतील राजद्रोहरूपी ओंडक्याच्या तुकड्याची जाइल्ससाहेबांस जी एक आमच्या बंधूनें उपमा दिली जाहे ती योग्य व सर्वमान्य आहे असें वाचकांस आढळून येईल. राजद्रोहाच्या ओंडक्याच्या या तुकड्यास चार पांच वर्षांपूर्वीं कदाचित् चंदनाचा तुकडा म्हणून कोणी हातीं धरलें असतें; पण हल्लींच्या कारकीर्दींत त्यास जळाऊ लांकडाची देखील कोणी किंमत देणार नाहीं हें साहेबबहादुर प्रस्तुत रिपोर्ट लिहीत असतांना विसरले असावे असें दिसतें. आम्हीं या विषयावरील पहिल्या लेखांतच शिक्षणानें, सहवासानें किंवा स्वभावानें जाइल्ससाहेब पुस्तकपरीक्षणाच्या कामास नालायक आहेत असें लिहिलें होतें, व आमच्या इतर बंधूंचेंहि तेंच मत आहे असे दुसरीकडे दिलेल्या उताऱ्यांवरून कळून येईल. फार लांब कशाला ? 'पायोनियर'सारख्या अँग्लो-इंडियनांच्या कट्टया अभिमानी वर्तमानपत्रानेंहि जाइल्ससाहेबांच्या तोंडांत साखर घालण्याचा प्रयत्न केला आहे; व ते या कामास नालायक आहेत असा आपला स्पष्ट अभिप्राय

---

* [केसरी ता. १६ आक्टोबर १९००]

दिला आहे. 'पायोनियर'कडून हें सर्टिफिकेट मिळाल्यावरहि जर मुंबईसरकार जाइल्ससाहेबांकडे हें काम ठेवील तर ग्रंथकारांनीं एक तर पुस्तकें लिहिण्याचे सोडून दिलें पाहिजे किंवा तीं जाइल्ससाहेबांसारख्या शाहण्या डायरेक्टरसाहेबांच्या हातांत न पडतील अशी तरी तजवीज ठेविली पाहिजे. कारण, डायरेक्टरसाहेबांच्या डोक्यांतील राजद्रोहाचें भूत केव्हां बाहेर पडेल आणि त्यांच्या कचाट्यांत कोण कसा सांपडेल याचा आतां नियम उरला नाहीं. हिंदुस्थानचें कल्याण व्हावें, एतद्देशीय लोकांनीं उद्योगधंद्याची वृद्धि करावी, इंग्रजी साम्राज्याचें कल्याण इच्छून अधिक राजकीय हक्क संपादन करावे इ० कायदेशीर आणि योग्य गोष्टीहे साहेबबहादुरांस खपेनाशा झालेल्या आहेत; व त्याचा सर्व शाळाखात्यांतील नोकर लोकांवर वाईट परिणाम झाल्यावांचून राहणार नाही. शाळाखातें म्हटलें म्हणजे शुद्ध आणि पवित्र खातें असावयाचें. विद्यार्जन, विद्येची अभिरुचि उत्पन्न करणें, अध्ययन, अध्यापन वगैरे या खात्याचीं मुख्य कामें होत. हीं सोडून देऊन मारक्या बैलाप्रमाणें त्या खात्याचे मुख्य अधिकारीच जेव्हां चोहोंकडे राजद्रोहाच्या संशयानें लोकांस धक्के देत हिंडतात, तेव्हां कोणी तरी यांस वेसण घालून ताळ्यावर आणल्याखेरीज शाळाखात्याची स्थिति सुधारणार नाही इतकेंच नव्हे, तर असल्या अधिकाऱ्याच्या उद्दाम व उच्छृंखल वर्तनानें लोकांच्या मनांत जो एक प्रकारचा असंतोष व गैरसमज उत्पन्न होतो तो दूर व्हावयचा नाहीं. राज्यकर्ते आणि प्रजा यांच्या दरम्यान वर्तमानपत्रकारांनीं अप्रीति उत्पन्न करूं नये म्हणून सरकारानें नवीन कायदे केले आहेत. पण जाइल्ससाहेबांसारखे बडे अधिकारी जेव्हां आपण होऊनच प्रजाजनांचीं मनें दूषित करण्याचा प्रयत्न करितात, तेव्हां त्यामुळें सरकारावरहि एक प्रकारचा आक्षेप येण्याचा संभव असतो. करितां सरकारानें अशा अधिकाऱ्यांची वेळींच कानउघाडणी करणे जरूर आहे, आणि ती जितकी लवकर होईल तितकी चांगली. हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति कधींच सुधारूं नये, किंवा त्यांनीं उद्योगधंदे करून दोन पैसे कमावूं नयेत, फक्त जमिनींतील पिकापैकीं पोटापुरता भाग ठेवून बाकी सर्व परकी व्यापाऱ्यांच्या हवालीं करावा आणि एक वर्ष पाऊस पडला नाहीं की, माबाप सरकारच्या दारांत भिक्षेकरतां येऊन ठेपावें, अशी आमच्या सरकारची इच्छा असेल असें आम्हांस वाटत नाहीं आणि तशी जर त्यांची इच्छा नाहीं, तर मधेंच एखाद्या अधिकाऱ्यानें दांडगाई करून आजपर्यंत चालू असलेल्या राज्यपद्धतीस किंवा राज्यकर्त्यांस अनुचित असें वर्तन करावें आणि सरकारानें त्यास तें करूं द्यावें हें अश्लाघ्य होय; व याचकरितां सरकारास आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं जाइल्ससाहेबांच्या या कृतीचा योग्य विचार केल्याखेरीज राहूं नये.

गेल्या लेखांत जाइल्ससाहेबांचा गुजराथी भाषेंतील ग्रंथसंग्रहावर काय अभि-

प्राय आहे त्याचें परीक्षण केलें होतें. आतां मराठी ग्रंथाकडे वळूं. मराठी भाषेंत एकंदर १०४ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. पैकीं साहेबांच्या हाताखालील रत्नपारख्यांनीं २१ सच मौल्यवान् खडे साहेबांस नजर केले. यांपैकीं ऐतिहासिक पुस्तकांत रावसाहेब नागेश विनायक बापट यांचीं 'चितूरचा वेढा' व 'पानपतची मोहीम' हीं दोन पुस्तकें अभिप्रायार्थ साहेबांनीं हातीं घेतलीं आहेत. परंतु त्यांत राजद्रोह कोठें नसल्यामुळें पुस्तकें बरीं आहेत असा शेरा मारून ग्रंथकारास सोडून दिलें आहे. जाइल्ससाहेबांच्या कचाट्यांत सांपडलेले दुसरे ग्रंथकार रा. रा. विनायक कोंडदेव ओक हे होत. यांनीं लिहिलेलें ग्लॅडस्टनचें चरित्र इंग्रजी ग्रंथांवरून घेतलेलें आहे. म्हणून व विशेषेंकरून रा. ओक यांच्यासारख्यांच्या लेखणींतून तें निघालें असल्यामुळें त्यांतहि साहेबांस नांवें ठेवण्यासारखें कांहीं निघालें नाहीं. पण जातां जातां ग्लॅडस्टनच्या चरित्रापासून बोध घेण्याजोग्या ग्रंथकारानें ज्या गोष्टी वर्णिल्या आहेत त्यांत ग्लॅडस्टनची वृद्धापकाळींहि असलेली विद्याभिरुचि, त्याची जाडी विद्वत्ता, बुद्धिमत्ता, वक्तृत्व आणि स्वदेशाबद्दलची प्रीति हीं सांगितलीं आहेत असें साहेबबहादुरांनीं म्हटलें आहे. हा शेरा देण्याचें व विशेषतः त्यांत स्वदेशप्रीति गोवण्याचें काय कारण असावें हें चाणाक्ष वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. एकदां गाय लाथाळी निघाली म्हणजे ती कोठें कोणास लाथ मारील याचा कांहीं नियम नसतो. मराठी नाटकांत पहिले बाजीराव पेशव्यांचें नाटक साहेब बहादुरांस पसंत पडलें आहे! नशीब विचाऱ्या ग्रंथकाराचें! आमची त्यास एवढीच सूचना आहे कीं, साहेबांच्या सुप्रसन्नतेचा सूर्य प्रकाशित आहे तोंपर्यंतच त्यानें आपली पाठ तापवून घ्यावी. विधवाविवाहावर नाटक रचणाऱ्या एका ग्रंथकारास चांगला विषय वाईट रीतीनें समर्थन करून घालविला असा शेरा मिळाला आहे. 'लंडनमधल्या दरबारांतील गुप्त कृत्ये' याचें भाषांतर करणारास 'बदमाष लोकांकरितां' ग्रंथ लिहिला आहे असें सर्टिफिकीट मिळालें आहे. दुसऱ्या एकदोन ग्रंथांची हीच स्थिति आहे. कोणी मूर्ख, कोणी बदमाष, कोणी अश्लील आणि यांतून सुटून राहिलेले राजद्रोही, मिळून सरसट्टा सर्वांस दोष देऊन मधमाशांच्या पोळ्यांत शिरणाऱ्या आस्वलाप्रमाणें साहेबबहादुरांनीं आपली स्थिति करून घेतली आहे. शारदा नाटकासारख्या ग्रंथांतहि, जरी त्यांत साहेबांस नापसंत पडण्यासारखा मजकूर दिसला नाहीं तरी, लोकांच्या सद्यःस्थितीसंबंधानें जे कांहीं दुःखाचे उद्गार त्यांत आहेत तेवढेच बाहेर काढून साहेबांनीं आपला छिद्रान्वेषीपणा दाखविला आहे. आनंदसाम्राज्य किंवा नित्यानित्यविवेक यांसारखे वेदांतावरील ग्रंथहि पारखावयाचे साहेबांनीं सोडले नाहींत. एकावर विषय गहन पण भाषा चांगली असा शेरा आहे, व ग्रंथकारानें मध्येंच शृंगारविषय घातल्याबद्दल खेद प्रदर्शित केला आहे. वेदांत ग्रंथाचें साहेबांनीं केलेलें हें परीक्षण पाहून साहेबांची विद्वत्ता किंवा ग्रंथ-

कारांचें दुर्भाग्य यांपैकीं कशाचें वर्णन करावें हें आम्हांस समजत नाहीं. नित्यानित्यविवेक सोप्या भाषेंत लिहिला आहे असें साहेब म्हणतात; पण त्याचा अर्थ काय हें त्यांचें त्यांसच माहीत ! कारण, यांस मराठी भाषा कळत नाहीं आणि वेदांत विषयासंबंधानें पहावें तर त्यांतहि साहेबबहादुरांची गति असल्याचें कोठें प्रसिद्धीस आलेलें नाहीं. तेव्हां प्रत्येक पुस्तकावर कांहींतरी अभिप्राय दिलाच पाहिजे एवढ्या हेतूनें साहेबबहादुरांनीं हा अभिप्राय दिला असला पाहिजे, आणि हेंच काम करण्याकरितां जर यांस एवढा मोठा पगार द्यावयाचा असेल तर हा खर्च सरकारनें काढून टाकावा हें फार चांगलें. यानंतर प्रो. गोळे यांच्या 'हिंदुधर्म आणि सुधारणा' या पुस्तकावर साहेबांनीं आपला अभिप्राय दिला आहे. सरकारी दृष्टीनें पाहिलें तर या पुस्तकाचें साहेबबहादुरांनीं चांगल्या रीतीनें परीक्षण करावयास पाहिजे होतें. पण विद्याधर पंडिताच्या समजुतींत फेरफार कसे झाले एवढेंच साहेबांनीं दहापांच ओळींत सांगून दिलें आहे. रा. चितळे यांनीं केलेलें ब्लॅकीच्या सेल्फकल्चरचें भाषांतर आणि प्रो. मोडक यांचे पदार्थविज्ञानशास्त्रावरील ग्रंथ यांचें शेवटीं त्रोटक परीक्षण करून साहेबांनीं आपला मराठी ग्रंथावरील रिपोर्ट पुरा केला आहे. हे ग्रंथ परीक्षणाकरितां कां निवडले होते हें आम्हांस समजत नाहीं. गेल्या वर्षांतील मराठी पुस्तकांचें जर कोणास परीक्षण करावयाचें असेल किंवा सदर ग्रंथकारांची किंवा लोकसमूहाची प्रवृत्ती लक्षांत आणावयाची असेल, तर साहेबांस नजर केलेल्या २१ रत्नांपेक्षां दुसरे पुष्कळ ग्रंथ घेतां आले असते. पण 'यथा राजा तथा प्रजा' हा न्याय विद्याखात्यांतील मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखालील कामगार यांसहि लागू पडत असल्यामुळें साहेबबहादुरांच्या कलाप्रमाणेंच खालील रत्नपारख्यांनीं निवड केली असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कानडी भाषेंतील १६ ग्रंथांपैकीं तीनच रत्नें साहेबांपुढे मांडण्यांत आलीं. पैकीं एक बुक साहेबबहादुरांनीं सोवळें ठरविलें आहे; पण आंत अद्भुत गोष्टी नसत्या तर बरें झालें असतें असा शेरा दिला आहे. 'तत्त्वानुसंधान' हा ग्रंथ सामान्य लोकांस कळणार नाहीं असा साहेबांचा अभिप्राय आहे आणि तिसऱ्या एका बुकांत बाळ गंगाधर टिळकांवरील पदें आणि शृंगारीक कविता आहेत एवढाच साहेबबहादुरांचा शेरा आहे. या एकेरी विधानाच्या शेऱ्यांतील मर्म काय आहे हें मि. मलबारी यांनीं आपल्या टीकेंत दाखविलेंच आहे. खुद्द डायरेक्टरसाहेबांस टिळक या नांवाची जेव्हां इतकी चीड आहे तेव्हां त्यांच्या हाताखालील एका अंमलदारानें धारवाड येथें नुकत्याच भरलेल्या लोकांच्या सभेंत टिळकांचें नांव काढूं नये असा उपदेश केला असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. साहेब टिळकांचें एकेरी नांव तरी घेतात, पण हाताखालील अधिकारी त्यावरहि ताण करून आपल्या वरिष्ठापेक्षांहि आपण अधिक मूर्ख आहोंत असें जगास दाखविण्यास कसे प्रवृत्त

होतात याचें हें एक चांगलें उदाहरण आहे. सिंधी, पारशी, हिंदी, उर्दू वगैरे ग्रंथांवरील परीक्षण याच मासल्याचें झालेलें आहे. संस्कृत ग्रंथांत मात्र रा. रा. केतकर यांच्या ज्योतिर्गणितावर साहेबांच्या हातून चांगला शेरा पडला आहे. गणितांच्या आंकड्यांत कांहीं आंकडे राजद्रोही नाहींत हें केतकरांचें सुदैवच समजावयाचें !

असो; पुस्तकपरीक्षण आटपल्यानंतर साहेबांनीं 'सारांश' या सदराखालीं पांचपंचवीस ओळी लिहून त्यांत देशी भाषांत अद्याप चांगले ग्रंथकार निपजूं लागले नाहींत, ग्रंथकारास उत्तेजन अगर प्राप्ति होत नाहीं, चांगले लोक सरकारी नोकरींत जातात आणि तेथें त्यांचा सर्व वेळ मोडतो, सरकारी नोकरी ज्यांस मिळत नाहीं ते वर्तमानपत्राचा धंदा करून कसेंबसें पोट भरतात, वगैरे कांहीं बरींवाईट विधानें ठोकून दिलीं आहेत. याबद्दल विशेष चर्चा करीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. कारण सर्वच जेथें अज्ञानाचा आणि मूर्खपणाचा बाजार, तेथें कोणी झालें तरी काळेंगोरें काय निवडणार ? सर्वानुमतें साहेबांचा रिपोर्ट गचाळ आणि कवडीमोलाचा ठरलेला आहे. तेव्हां त्याचें अधिक विवेचन करून त्यापासून कोणासहि फायदा होणें शक्य नाहीं. तथापि एवढें सांगणें जरूर आहे कीं, रिपोर्टाच्या या उपसंहारांतहि हिंदु आणि पारशी ग्रंथकारांची तुलना करून एक मलबारी शेटखेरीज करून इतर कोणत्याहि पारशी ग्रंथकारांत हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीबद्दलची निराशा नजरेस येत नाहीं असें साहेबबहादुरांनीं विधान केलें आहे, आणि त्याचबरोबर असें सांगितलें आहे कीं, ही निराशा गेल्या कांहीं वर्षांतील स्थिति लक्षांत आणतां अगदींच निराधार आहे असें नाहीं. यावरून पाहतां साहेबबहादुरांनीं एतद्देशीय ग्रंथकारांची विचारधरणी समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांस ती समजण्याइतकी अद्याप त्यांच्या अंगीं अक्कल आहे असें दिसून येतें. पण ही गोष्ट घडण्यास दुराभिमान आणि वशयापिशाच्च यांनीं जें साहेबांचें डोकें भणाणून गेलें आहे तें प्रथमतः ताळ्यावर आलें पाहिजे; आणि तें आपणें आम्हीं वर सुचविल्याप्रमाणें सर्वस्वीं सरकारच्चे हातांत आहे. करतां वरच्याप्रमाणें सरकारास पुन्हां एकदां विनंति करून आणि वाइल्ससाहेबांस उद्देशून जें कांहीं आम्हांस कडू शब्द वापरावे लागले ते सार्वजनिक कर्तव्य बजावीत असतां वापरावे लागले, यामुळें साहेबबहादुर आमच्यावर जास्त खप्पा होणार नाहींत अशी आशा प्रदर्शित करून त्यांच्या रिपोर्टाचें परीक्षण पुरें करितों. ईश्वर करो आणि पुढील साली साहेबांची असल्या प्रकारची ओंवाळणी करण्याची पाळी आमच्यावर न येवो म्हणजे झालें.

◆ ◆ ◆

* प्लेगच्या खर्चाचें ओझें

प्लेग जाण्याच्या रंगांत आहे तोंच त्याची दुष्ट छाया आमच्यावर पडण्यास सुरवात झाली आहे. व या छायेंत आमच्या संपत्तीचा आणखी किती ऱ्हास होतो याची नवीन काळजी उत्पन्न झाली आहे. प्लेग हटविण्याकरितां सरकारनें मनापासून जरी हजारों प्रयत्न केले तरी अखेरीस त्यांचा कांहीं उपयोग न होतां मानवी इच्छेपेक्षां ईश्वरी इच्छा बलवत्तर आहे याचाच लोकांस अधिक प्रत्यय आला हें कोणासहि सांगण्याची आतां जरूर नाहीं. मरकी किंवा प्लेग, अथवा संस्कृतांत ज्यास 'जनमार' असें यथार्थ नांव आहे, तो रोग कधीं काळीं राष्ट्राच्या दुर्भाग्यानें एकाद्या देशांत उत्पन्न होतो अशी आमची पूर्वीपासून समजूत आहे; व दुष्काळाप्रमाणें हें राष्ट्रीय संकट निवारण्याचें काम एकाद्या व्यक्तीवर किंवा शहरावर न टाकतां खुद्द राज्यकर्त्यांनींच तें हातांत घेणें जरूर आहे असें मुंबईसरकार व हिंदुस्थानसरकार या दोघांसहि संमत आहे. अर्थात् या संबंधाचा जो खर्च व्हावयाचा तोहि एकाद्या विशिष्ट शहरावर, तालुक्यावर किंवा जिल्ह्यावर न टाकतां सरकारानें आपल्या राजकीय तिजोरींतूनच केला पाहिजे हें उघड आहे. स्थानिक संस्था किंवा स्थानिक स्वराज्य यांची स्थापना झाली ती कांहीं राष्ट्रीय संकटाच्या निवारणाकरितां नव्हे. स्थानिक संस्थांनीं आपआपल्या मगदुराप्रमाणें असलीं संकटें निवारण्याचें कार्मी सरकारास मदत करूं नये असें आम्हीं म्हणत नाहीं, पण त्यांनीं होऊन आपल्या मगदुराप्रमाणें मदत करणें निराळें, आणि सरकारांतून "अमुक वर्षांत तुम्ही अमुक पैसा द्या" म्हणून त्यांस सक्तीनें सांगणें निराळें. हल्लीं या दुसऱ्या प्रकारचा अंमल होऊं लागला आहे ही दुःखाची गोष्ट आहे. प्लेगसंबंधाचा खर्च होतां होईं तों स्थानिक संस्थांवर न टाकण्याचा मुंबईसरकारचा विचार होता. पण हिंदुस्थानसरकारानें हीं गोष्ट मान्य केली नाहीं असें सन १८९८ सालीं प्रसिद्ध झालेल्या सरकारी ठरावावरून दिसून येतें. तेव्हां मुंबईसरकारास तरी या बाबतींत विशेष दोष देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. उलट गुदस्त सालीं प्लेगसंबंधानें झालेल्या खर्चापैकीं सुमारें २६।२७ लक्ष रुपये मुंबईसरकारानें आपण सोसूं म्हणून प्रसिद्ध केलें व हिंदुस्थानसरकारची त्यास मंजूरी मिळविली याबद्दल मुंबईसरकाराचे स्थानिक संस्थांनीं आभार मानले पाहिजेत. मुंबईसरकारचा या बाबतींत जर विशेष आग्रह पडला नसता तर एवढ्या मोठ्या रकमेचें ओझें सरकारी तिजोरीवर टाकण्यास हिंदुस्थानसरकारची परवानगी मिळाली असती कीं नाहीं याची आम्हांस शंकाच

---

*[केसरी ता. ११ डिसेंबर १९००]

आहे. परंतु याबद्दल जरी आम्हीं सरकारचे आभारी असलों तरी स्थानिक कमिट्यांपुढें विचाराकरितां हल्लीं जो प्रश्न आलेला आहे त्याचा तेवढ्यानेंच सोईवार उलगडा होत नाहीं. २६।२७ लक्ष रुपयांचें ओझें सरकारानें आपल्या अंगावर घेतलें तरी अवशिष्ट राहिलेलें ओझेंहि पुष्कळ म्युनिसिपालिट्यांस असह्य वाटण्यासारखें आहे. प्लेगमध्यें म्युनिसिपालिट्यांची किंवा स्थानिक कमिट्यांची किती नुकसानी व खराबी झाली असेल यांची कल्पना करणें कठीण नाहीं. दुष्काळासारख्या संकटाचें निवारण करण्यास जो ९।१० कोटी खर्च लागतो तो शंभर कोट रुपये उत्पन्न असणाऱ्या हिंदुस्थानसरकारासहि बराच जबर वाटतो, व त्याकरितां इतर बाबतींत बरीच काटकसर करून अथवा कर्ज काढून पैसे गोळा करावे लागतात. जवळ जवळ दरसाल १०० कोट रुपये उत्पन्न असणाऱ्या सरकारची १० कोटीच्या म्हणजे उत्पन्नाच्या मानाने सुमारें $\frac{१}{१०}$ फार्जील खर्चाच्या ओझ्यानें जर इतकी तारांबळ होते, तर म्युनिलिट्यांसारख्या गरीब स्थानिक कमिट्यांनीं एक वर्षाच्या उत्पन्नाइतकें किंवा त्याहूनहि जास्त खर्चाचें ओझें कसें सहन करावें याचा सरकारनें शांतपणानें विचार करावा हें बरें. त्यांतून यंदाच्या सालीं प्लेग अगदीं निःशेष झाला असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं हा प्लेग एकदां किंवा अनेकदां आला तेथील लोकांचीहि त्यानें बरीच हलाकी करून सोडली आहे. शिवाय दुसरी अशीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं सरकारानें प्लेग हटविण्याकरितां जे उपाय योजिले व जो अनन्वित खर्च केला तोहि लोकमताचे विरुद्ध केलेला असून लोकांची सरकारच्या प्लेग व्यवस्थेमुळें 'भीक नको पण कुत्रा आटप' अशी व्यवस्था झाली होती. सारांश सरकारनें प्लेगनिवारणार्थ जे जे उपाय योजिले ते लोकांच्या गैरसोईचे, अति खर्चाचे आणि लोकमतास विरुद्ध असे होते. व अखेरीस ते बहुतेक निरुपयोगी असा अनुभवहि आला. लोकांनीं या गैरसोईच्या व्यवस्था असामान्य धिमेपणानें सोसल्या अशी खुद्द मुंबईसरकारची साक्ष आहे, तेव्हां त्याबद्दल कांहीं जास्त लिहावयास नको. अशा तऱ्हेचा धिमेपणा व शांतपणा दाखविणाऱ्या लोकांवरच पुनः त्यांची ज्या व्यवस्थेनें अतिशय गैरसोय झाली त्या व्यवस्थेचें ओझें टाकणें म्हणजे मऊ लागलें म्हणून कोपरानें खणण्यासारखें असमंजस होय, असें आम्हांस वाटतें. व प्रायः हाच हेतु मनांत आणून प्लेगचा खर्च होईल तितका कमी स्थानिक कमिट्यांवर टाकण्यांत यावा अशी मुंबईसरकारानें शिफारस केली होती. ही शिफारस हिंदुस्थानसरकारानें मान्य केली नाहीं ही मोठया दुःखाची गोष्ट होय. प्लेग हटविण्याकरितां ज्या कांहीं तजविजी कराव्या लागल्या त्यापासून कांहीं शहरांत जी सुधराई व सफाई झाली तिचा फायदा जर शहरास मिळाला आहे तर त्या शहरांतील लोकांनीं तेवढ्यापुरता तरी खर्च सरकारास दिला पाहिजे असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे. पण ही कोटी आम्हांस बरोबर दिसत नाहीं.

उदाहरणार्थ, दुष्काळाची कामें घ्या. सर्व जिल्ह्यांतील लोकांस दुष्काळांतून बचावण्याकरितां दुष्काळाचीं मोठमोठीं कामें फार झालीं तर जिल्ह्यांत एक दोन ठिकाणींच काढतात. व त्यापैकीं कांहीं कामांचा उपयोग स्थानिकच होतो. पण त्यांचा उपयोग स्थानिक झाला म्हणून दुष्काळाच्या खर्चाचें ओझें जसें स्थानिक कमिश्यांवर टाकित नाहींत तद्वतच प्लेगची स्थिती आहे. प्लेग हें राष्ट्रीय संकट आहे. व तें निवारण करण्याकरितां जी व्यवस्था करावयाची तीहि राष्ट्रीय किंवा 'इंपीरियल' असली पाहिजे असें हिंदुस्थानसरकारनें प्रथमतःच ठरवून जर स्थानिक कमिश्यांकडून ही व्यवस्था काढून घेतली होती तर आतां खर्चाचा बोजा सरकारनेंच सोसावयास नको काय? 'खानेकु हं और लढनेकू मेरा भाई' अशी एक म्हण आहे व तीच सरकारच्या हल्लींच्या वर्तनास लागूं पडते. प्लेग हें राष्ट्रीय संकट म्हणून त्याच्या निवारणार्थ जे कांहीं उपाय केले ते लोकांच्या अत्यंत गैरसोयीचे असतांहि सरकारांनीं केवळ आपल्या अधिकाराच्या व सत्तेच्या जोरावर अमलांत आणले, व आतां खर्चाची वांटणी होऊं लागली तेव्हां मात्र खर्चाचा कांहीं तरी वांटा उचला म्हणून स्थानिक कमिश्यांस सरकार सांगूं लागलें आहे. आमच्या मतें हा कांहीं न्याय नाहीं. लोकांवर झालेली सक्ती लोकांनीं धिमेपणानें आणि शांतपणानें सोसली याबद्दल सरकारास जर आनंद वाटत असेल तर तो व्यक्त करण्यास खर्चाचें ओझें स्थानिक कमिश्यांवर लादणें हा मार्ग नव्हे. प्लेगचा त्रास व सरकारची सक्ती हीं दोन्ही जर लोकांनीं सोसलीं आहेत तर आतां त्यांजवर खर्चाचेंहि ओझें लादणें बरोबर नाहीं. १०० कोट रुपये उत्पन्न असणाऱ्या हिंदुस्थानसरकारास ५।२५ लाखांचें म्हणजे कांहीं विशेष ओझें आहे असें नाहीं. पण तेंच ओझें स्थानिक कमिश्यांस असह्य होऊन त्यांची सुधारणा मात्र १०।२० वर्षेंपर्यंत मागें पडण्याचा संभव आहे हें सरकारानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

आज हे विचार सुचण्याचें कारण सातारा व पुणें येथील कमिश्यांपुढें सदर कमिश्यांवर टाकलेल्या प्लेगच्या खर्चाचा भाग भरून काढण्याकरितां कर्ज काढण्यासंबंधानें व तें कर्ज कसें फेडावें याबद्दल व्यवस्था करण्याविषयीं जो प्रश्न आला आहे तो होय. साताऱ्च्या म्युनिसिपालिटीस पाण्याच्या बाबतींतलें पूर्वीचें कर्ज असतांहि आणखी प्लेगच्या बाबतींत ४५ हजार रुपये कर्ज काढावें लागणार आहे व पुण्याच्या कमिटीस २ लक्षांच्यावर कांहीं पैसे द्यावे लागतील. हें कर्ज पांच वर्षांत फेडावें अशी सरकारची इच्छा आहे. म्हणजे गेल्या चार वर्षांच्या प्लेगच्या खर्चाकरितां (आणि तोहि सर्व सरकारच्या हातून झालेला) पुणें म्युनिसिपालिटीस पुढें ५ वर्षें दरसाल ३५।४० हजार रुपये भरावे लागणार आहेत. हे ३५।४० हजार रुपये जास्त उत्पन्न करण्यास साताऱ्याप्रमाणें प्लेग-टॅक्स बसविला नाहीं, तर दुसरे कर तरी वाढ-

वावे लागणारच, आणि कोणताहि कर वाढविला तरी त्यामुळें लोकांवर एक प्रकारची सक्ती व जुलूम होणारच. कांहीं कांहीं म्युनिसिपालिट्यांस तर हें ओझें इतकें असह्य होणार आहे कीं, त्याच्या ओझ्याखालींच त्या बहुतेक चिरडून जाण्याचा संभव आहे; निदान दहा पंधरा वर्षें तरी डोकें वर काढण्याची त्यांस आशा नको. अशा स्थितींत हिंदुस्थानसरकारनें नाहीं तरी स्थानिक सरकारनें तरी त्यास कांहीं तरी मदत करणें आमच्या मतें जरूर आहे. हिंदुस्थानसरकारनें मुंबईसरकाराची शिफारस मान्य केली हें वाजवी नव्हे हे आम्हीं वर म्हटलेंच आहे. पण हिंदुस्थानसरकारनें एकादी गोष्ट केली नाहीं म्हणून ती मुंबईसरकारास करतां येत नाहीं असें नाहीं. प्रॉव्हिन्शियल बजेटमध्यें कांहीं काटकसर करून प्लेगकरितां स्थानिक कमिट्यांस मुंबईसरकारनें कांहीं मदत केल्यास त्यास हिंदुस्थानसरकार आड येईल असें आम्हांस वाटत नाहीं. पण हीहि गोष्ट शक्य नसेल तर निदान कमिट्यांस रक्कम बिनव्याजी न मिळाल्यास ती देण्याची व फेडीच्या शर्तीं होतील तितक्या सढळ करण्याची व्यवस्था जरूर झालीच पाहिजे. या बाबतींत मुंबईसरकारचें धोरण लोकांस व कमिट्यांस पहिल्यापासून बरेंच अनुकूल आहे. व आम्हांस अशी आशा आहे कीं, लॉर्ड नॉर्थकोट यांच्या अमदानींत तें तसेंच कायम राहील इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानसरकारनें जरी मोडता घातला तरी स्थानिक कमिट्यांस कांहीं अन्य उपायांनीं मदत करण्याची युक्ती निघून त्यांचा मुंबईसरकारच्या हातून योग्य बचाव करण्यांत येईल. म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न व स्थिति काय आहे हें आम्हीं सरकारास सांगावयास नको. आमची एवढीच विनंति आहे कीं, त्यांची ही स्थिती लक्षांत आणून त्यांच्यावर प्लेगच्या खर्चाचें ओझें होतां होईल तितकें कमी होईल अशी सरकारांतून व्यवस्था झाली पाहिजे. तसेंच पुढें यासंबंधानें जो खर्च व्हावयाचा तोहि हल्लींची अडचण लक्षांत आणून त्या बेतानें ठेविला पाहिजे. हिंदुस्थानसरकार सर्व खर्च भरील असें मुंबईसरकारास पहिल्यानें जें वाटत होतें तें आतां जर चुकीचें ठरलें आहे तर पुढील व्यवस्था तरी अखेरीस खर्च कोणावर पडणार हें लक्षांत ठेऊनच केली पाहिजे.

❁ ❁ ❁

* महाराणी सरकारची कारकीर्द

ता. २२ जानेवारी रोजीं सायंकाळीं इंग्लंडच्या इतिहासांतील ज्या कारकीर्दीचा शेवट झाला ती अनेक दृष्टीनें महत्वाची होती याबद्दल कोणाचाहि मतभेद पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारकीर्दीची नुसती मुदत पाहिली तरी देखील इंग्लंडच्या राज्यकर्त्यांत राणीसाहेबांचा पहिला नंबर लागतो, पण नुसत्या मुदतीवरच त्याचें महत्व अवलंबून नाहीं. महाराणी व्हिक्टोरिया यांजबद्दल त्यांच्या प्रजेस जें आज अनिवार दुःख होत आहे त्याचीं अनेक कारणें असून पैकीं कांहींचा उल्लेख चार वर्षांपूर्वी "महाराणी सरकारचा जयजयकार" म्हणून जे आम्ही ज्युबिली लेख लिहिले आहेत त्यांत केला आहे. इंग्रजी राज्याचा विस्तार, वैभव, सत्ता किंवा मान हीं जीं आज मित्तीस वाढलेलीं आहेत, सर्व पृथ्वीस व्यापून जो त्याचा व्यापार किंवा दरारा राहिला आहे तो सर्व महाराणीसरकारच्या कारकीर्दीत संपादन झालेला आहे; व प्रत्येक इंग्रज गृहस्थाच्या मनांत या दोहोंची अशी पक्की सांगड बसून गेलेली आहे कीं, व्हिक्टोरियाचे नांव काढल्याबरोबर आपल्या वैभवाचें, आणि आपल्या वैभवाचें चिंतन केल्याबरोबर व्हिक्टोरियांचें त्यास स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं. समुद्रावरील स्वामित्व, यंत्रशास्त्रांतील प्रसिद्ध शोध, राज्यव्यवस्थेंत खालच्या-प्रतीच्या कारागीर लोकांचा प्रवेश वगैरे ज्या कांहीं गोष्टी इंग्लंडाच्या अलीकडील अभ्युदयास मूलभूत असून कारण झाल्या त्या सर्वांचा प्रारंभ महाराणी व्हिक्टोरिया गादीवर येण्यापूर्वींच झालेला होता. गुलामगिरी बंद करणें, नेपोलियन बोनापार्टचा पराभव, वगैरे गोष्टी मागील राजांच्या कारकीर्दीतच घडून गेल्या होत्या. पण तेवढ्यानें लोकांची स्थिति सुधारावी तशी सुधारली नव्हती. शेतकरी आणि कारागीर या दोन्ही वर्गांस नेहमींच्या निर्वाहास जीं साधनें लागतात तीं तेव्हां मिळण्याचीं मारामार पडलेली होती; व त्यांची अशी समजूत झालेली होती कीं राज्यव्यवस्थेंत सुधारणा झाल्याखेरीज ही स्थिति चांगली व्हावयाची नाहीं. राज्यवस्थेंत काय सुधारणा पाहिजेत हें ठरवून त्याप्रमाणें त्यांनीं आपली मागणीहि तयार केली होती व त्या मागण्या पार्लमेंटकडून कबूल करवून घ्यावयाच्या असा त्यांनीं निश्चय केला होता. पार्लमेंटच्या सभासदांच्या निवडणुकीसंबंधानें व्हिक्टोरिया राणीसरकारच्या कारकीर्दीत वेळोवेळीं जे निरनिराळे कायदे झाले त्यांत या मागण्यांपैकीं बऱ्याच मागण्या अखेरीस कबूल केलेल्या आहेत. पण इंग्लंडचा गेल्या ६० वर्षांत जो अतिशय उत्कर्ष झाला व इंग्रजी व्यापारास जगड्व्याळ स्वरूप येऊन

---

* [केसरी ता. २९ जानेवारी १९०१]

इंग्रजी राष्ट्र जें वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहोंचलें तें कांहीं एवढ्याच कारणामुळें नव्हे. राज्याचीं सूत्रें महाराणी व्हिक्टोरियासारख्या नीतीनें वागणाऱ्या व दयाळू स्त्रीच्या हातीं असल्यामुळें सन १८४८।४९ सालीं युरोपांत जी आग पसरली तीपासून इंग्लंडांस अलिप्त राहतां आलें; आणि घरीं अशा प्रकारच्या उलाढालीं करण्याची अवश्यकता न राहिल्यामुळें आपल्या राज्याचा व व्यापाराचा जेणेंकरून विस्तार होईल त्या उद्योगास इंग्रज लोक लागले. आफ्रिका, हिंदुस्थान, चीन, इराण, इजित वगैरे ठिकाणीं ज्या लहान मोठ्या लढाया महाराणी व्हिक्टोरियांच्या कारकीर्दीत झाल्या त्या याच उद्देशानें झाल्या असें म्हटलें तरी चालेल. आणि या भाग्यशाली राणीची सद्दी अशी कांहीं विलक्षण होती, कीं आफगाणिस्थानांतील माघार व ५७ चें बंड याखेरीज इतर सर्व ठिकाणीं इंग्रजी सत्ता, व्यापार किंवा मुत्सद्दीपणा याचे केव्हांहि घटकाभर देखील मागें पाऊल आलें नाहीं. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीत जी गोष्ट घ्यावी ती सिद्धीस जाई असें म्हटलें तरी चालेल. व्यापार वाढून त्याबरोबर संपत्तिहि वाढली, राज्यविस्तार अधिक झाला, यंत्रशास्त्र आणि इतर कला यांतील नव्या शोधांनीं राष्ट्राची काम करण्याची शक्तिहि शेकडों पट अधिक होऊन थोड्याशा लोकांस जगाबरोबर व्यापार करितां येईल इतका माल तयार करतां आला, आणि अप्रतिबंध व्यापारानें धान्य स्वस्त होऊन इंग्लंड देशांतील लोकांची व विशेषतः गरीब लोकांची मुख्य अडचण दूर झाली. पोस्ट, तारायंत्रें, आगगाड्या वगैरे अनेक किरकोळ सुधारणा नमूद करणें येथें अशक्य आहे. त्यांची ज्यांस समग्र माहिती करून घेणें असेल त्यानें इतिहासच वाचला पाहिजे. एवढी गोष्ट खरी आहे कीं, महाराणी व्हिक्टोरिया यांची ६४ वर्षांची कारकीर्द म्हणजे इंग्लंडचा एकसारखा भरभराटीचा काल होय. अमेरिकेंतील संस्थानांतील लढाई, फ्रँको–प्रशियन वॉर किंवा टर्की आणि रशियामधील लढाई वगैरे इतर राष्ट्रांतून बऱ्याच चळवळी होऊन त्यांत त्यांचें लक्ष वेधून गेलें. पण या सर्व चळवळींपासून होईल तितकें अलिप्त राहण्यास दुसरीकडे सांगितल्याप्रमाणें महाराणीसरकार कारण झाल्या इतकेंच नव्हे तर खुद्द इंग्लंडांतील राज्यव्यस्था कायद्यानें घालून दिलेल्या शिस्तीप्रमाणें सुरळीत चालविण्याचा त्यांचा संकल्प असल्यामुळें इंग्लंड देशास चोहोंकडून आपल्या उत्कर्षाकडे लक्ष देण्यास सांपडलें आणि त्याची एकसारखी भरभराट होत गेली. क्रिमियन वॉर किंवा इजिप्तमधील लढाई अशा दोनच प्रसंगीं युरोपांतील राष्ट्रांबरोबर इंग्लंडास युद्ध करावें लागलें पण दोन्ही वेळीं इंग्लंडासच यश येऊन अखेर इंग्रजी मुत्सद्दीपणाचा विजय झाला.

महाराणीसरकारच्या सामान्य लोकप्रियतेचें कारण त्यांच्या कारकीर्दीत झालेली इंग्लंड देशाची भरभराट हें तर खरेंच, पण त्याखेरीज त्यांचें खाजगी वर्तन, गृहस्थिति, शुद्ध आचरण, दयाळु स्वभाव यांचीहि त्यांस पुष्कळ मदत

झाली हें निःसंशय आहे. असल्या कालांत इंग्लंडच्या गादीवर राज्य करणारी स्त्री यावी हा तरी एक सुदैवाचाच योग म्हणावयाचा. स्त्रियांस व विशेषतः राज्यकर्त्या स्त्रियांस इंग्लंडांतील लोकांकडून चांगला मान मिळत असल्यामुळें व त्यांतल्या त्यांतहि व्हिक्टोरियासारखी प्रेमळ व निर्मळ आचरणाची राणी असल्यामुळें लोकांची प्रीति तिच्या ठायीं जडली यांत कांहीं नवल नाहीं. अबलात्व हा कांहीं प्रसंगीं दोष आहे खरा, पण महाराणीसरकारच्या कारकीर्दीस त्यामुळेंच विशेष लोकप्रियता आलेली आहे हें निःसंशय आहे. स्त्रिया स्वभावतःच पुरुषापेक्षां अधिक कोमल अंतःकरणाच्या असतात; आणि दुसऱ्या गुणांबरोबरच जेव्हां हा गुण गादीवर आरूढ झालेल्या लोकांत नजरेस येतो तेव्हां त्याची किंमत शतपट अधिक वाटते. प्रजेचें दुःख पाहून राणीसरकारचें अंतःकरण किती द्रवत असे हें त्यांनीं कांहीं प्रसंगीं आपल्या प्रजेस जीं पत्रें धाडलीं आहेत त्यांवरून उघड होत आहे. राजा किंवा बादशहा म्हणजे कायद्याच्या बंधनापासून स्वतः मुक्त असावयाचा; पण राणीसरकार याच्या अगदीं उलट म्हणजे स्वतःच कायद्यानें चालणाऱ्या होत्या. एवढाच गुण कोणताहि राजा लोकप्रिय होण्यास पुरें आहे. पण त्यांत आणखी जेव्हां स्त्री जातीस नैसर्गिक असलेल्या दयार्द्र अंतःकरणाची, सौजन्याची आणि कळकळीची भर पडली तेव्हां या योग दुधांत साखर पडल्याप्रमाणें अधिक प्रिय झाला हें सांगावयास नकोच. महाराणी व्हिक्टोरिया सरकार यांच्या लोकप्रियतेचें खरें रहस्य हेंच होय; व इंग्रज लोकांस त्यांजबद्दल जो एवढा अभिमान वाटत आहे, व त्यांच्या मरणानें जें सर्वांस अतिशय दुःख होत आहे तेंहि याच कारणाकरितां होय. व्हिक्टोरिया ही एकप्रकारें राष्ट्राची देवीच बनून राहिली होती; सन १८८७ सालीं व सन १८९७ सालीं सर्व इंग्रजी साम्राज्यांत ठिकठिकाणीं तिचा जो जयोत्सव झाला त्यास तिची कारकीर्द व वर्तन पाहतां ती सर्वांशीं योग्य होती असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं. महाराणी म्हणजे केवळ राजकीय बाबतींतच राष्ट्राची नियमनकर्त्री किंवा पुढाकार घेणारी असते असें नाहीं तर सामाजिक बाबतींतहि तिच्या वर्तनाचा व उदाहरणाचा राष्ट्रावर परिणाम घडून येत असतो. तशा प्रकारचा परिणाम महाराणी सरकारच्या उदार चरित्रानें इंग्रजी राष्ट्रावर झालेला आहे ही गोष्ट सर्वांस मान्य आहे.

इंग्लंडची राणी या नात्यानें हा विचार झाला. पण महाराणी व्हिक्टोरिया यांनीं याखेरीज हिंदुस्थानची बादशाहीण हा किताब प्रथमतः धारण केलेला होता व त्यांच्या मागें आतां तो त्यांचे वडील पुत्र सातवे एडवर्ड यांसहि प्राप्त झालेला आहे. हिंदुस्थानची बादशाहीण किंवा बादशहा या नात्यानें विचार करूं गेलें तरीहि राणीसरकारच्या दयाळु स्वभावाची व अलौकिक सामर्थ्याचीच प्रतीति आल्यावांचून राहावयाची नाहीं. हिंदुस्थानाशीं राणीसरकारच्या प्रत्यक्ष

संबंधास सन १८५७ सालापासून सुरुवात झाली व पुढें १९ वर्षांनीं त्यांनीं बादशाहीण हा किताब घेतला. तेव्हांपासून त्यांच्या मृत्यूपर्यंत गेलेल्या चाळीस बेचाळीस वर्षांत हिंदुस्थान देश सुखशांततेचा एकसारखा अनुभव घेत आहे हें आम्ही सांगावयास नकोच. परंतु राणीसरकारचें आमच्यावरील असलेलें खरो खरीचें प्रेम दुसरीकडे छापलेल्या १८५८ सालच्या त्यांच्या जाहिरनाम्यावरून चांगलें सिद्ध होतें. या जाहिरनाम्याच्या पहिल्या मसुद्यांत "हिंदुस्थानांतील प्रजेच्या रीतीभातींत किंवा धर्मांत फरक करण्याचा राणीसरकारास अधिकार आहे" अशा अर्थाचे शब्द होते. पण हा कागद जेव्हां राणीसाहेबांकडे गेला तेव्हां या शब्दांबद्दल आपली नापसंती प्रदर्शित करून त्यांनीं आपले मुख्य प्रधान लॉर्ड डर्बी यांस असें लिहिलें कीं, "हा जाहिरनामा लॉर्ड डर्बी यांनीं आपल्या उत्तम भाषेंत पुनः लिहावा; आणि तो लिहितांना असें लक्षांत ठेवावें कीं, पूर्वेकडील कोट्यवधि लोकांत त्यांच्यावरील राज्य करणारी स्त्री भयंकर बंडाचा मोड करून राज्यकारभार हातीं घेतांना आपल्या राज्यकारभाराचें धोरण काय हें सांगत आहे, आणि पुढें कांहीं वर्षांनीं तिचे अधिकारी ज्या गोष्टी करणार आहेत त्यांबद्दल त्यांस अभिवचनें द्यावयाचीं आहेत. असा जाहिरनामा म्हटला म्हणजे तो धर्मौदार्यानें, प्रेमळपणानें, आणि परोपकारबुद्धीनें भरलेला असला पाहिजे व राणीच्या राज्यापासून घुढें लोकांस काय फायदे होतील तेंहि त्यांत नमूद असलें पाहिजे." राणीसाहेबांचे हे विचार समजल्यानंतर लॉर्ड डर्बी यांनीं हा जाहिरनामा त्यांच्या सांगण्याप्रमाणें नव्यानें लिहून काढला. तरी देखील तो राणीसाहेबांपुढें आला तेव्हां त्यांनीं त्यांत 'रयतेच्या कल्याणाविषयीं सर्व शक्तिमान परमेश्वर सामर्थ्य देवो' हें वाक्य अापण आपल्या हातांनीं लिहून तो पुरा केला. हा जाहिरनामा म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्काची मुख्य व महत्वाची सनद होय; व तिचा अंमल होण्यास जरी विलंब लागला तरी आज नाहीं उद्यां तरी अखेरीस हे हक्क आम्हां हिंदुस्थानवासी जनांस राणी सरकारच्या इच्छेप्रमाणें मिळालेच पाहिजेत. ज्या थोर राजकर्त्याकडून अशा प्रकारची सनद आम्हांस प्राप्त झाली त्यांचे आम्ही किती उपकारी असलें पाहिजे हें सांगावयास नको. कोणी कांहींहि म्हणो ही सनद जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत आमच्या राजकीय हक्कांसंबंधाच्या मागण्या केवळ कायदेशीरच नव्हे तर त्या ईश्वरी व बादशाही संकेताच्या आहेत, अर्थात् सर्व प्रकारें योग्य व न्यायाच्या आहेत यास दुसऱ्या प्रमाणाचीं जरूर नाहीं.

राणीसरकारच्या कारकीर्दीत हिंदुस्थानांतहि आगगाड्या, तारायंत्रें, पोस्ट ऑफिसें, शिक्षण वगैरे बाबतींत पुष्कळ सुधारणा झालेली आह. अलीकडील दुष्काळामुळें लोकांच्या दारिद्र्याकडे सरकारचें अधिक लक्ष वेधलें आहे, व आयर्लंडच्या दुष्काळामुळें आयर्लंडच्या संबंधाच्या प्रश्नास जसें महत्त्व आलें तसेंच

हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीचे प्रश्नाकडेहि राज्यकर्ते आतां अधिक लक्ष देतील अशी उमेद आहे. पण हा पुढील कारकीर्दीचा भाग झाला. आज राणी सरकारच्या पुरता विचार केला तरीहि त्यांच्या कारकीर्दीत या देशावर त्यांनी पुष्कळ उपकार केलेले आहेत असें म्हणावें लागतें. वृद्धापकाळींहि हिंदुस्थानची माणसें जवळ ठेऊन हिंदुस्थानी भाषा शिकण्यास उद्युक्त होणें, नेटिव शिपायास विलायतेस बोलावून नेऊन त्यांचा सन्मान करणें दुष्काळांत अन्नावांचून कोणीहि मरूं देऊं नका म्हणून हुकूम काढणें वगैरे गोष्टींवरून राणीसाहेबांची हिंदुस्थाना-बद्दल खरी कळकळ दिसून येते. अशा तऱ्हेची दयाळू व परोपकारी राणी आणखी कांहीं दिवस जास्त जगती तर ५८ च्या जाहिरनाम्यांतील मुख्य मुख्य अभिवचनें तरी प्रत्यक्ष अमलांत आली असतीं. हा योग घडून आला नाहीं हें आमचें दुर्दैव होय. असो; राणीसाहेबांचे जेष्ठ चिरंजीव जे आतां सातवे एडवर्ड या नांवानें बादशहा झाले आहेत, त्यांच्या हातून तरी या गोष्टी पार पडोत अशी ईश्वराची प्रार्थना करून व त्यांस दीर्घायुष्य चिंतून हा दुःखकारक लेख येथें संपवितों.

❖ ❖ ❖

* लॉर्ड कर्झन यांचीं बारा महत्कृत्यें

लॉर्ड कर्झन हे ज्यावेळीं इकडे गव्हर्नर जनरल होऊन आले तेव्हां आपल्या कारकीर्दीत बारा कृत्यें करण्याचा त्यांनीं संकल्प केला होता असें पहिल्या बजेट-च्या त्यांच्या भाषणांत प्रसिद्ध झालें होतें. हीं बारा कृत्यें कोणतीं याबद्दल तेव्हां बरीच भवति न भवति झालेली होती. रोमन लोकांच्या पुराणांतून हर-किलीज नामक त्यांच्या देवानें बारा महत्कृत्यें केल्याचें वर्णन आहे. व आमच्या-कडेहि द्वादश आदित्याच्या रूपानें सूर्यनारायण बारा महत्कृत्यें करतो असें वर्णन आहे. तेव्हां लॉर्ड कर्झन यांचीं बारा महत्कृत्यें कोणतीं हें समजून घेण्याची पुष्कळांस इच्छा होती व ती इच्छा जास्त बलवत्तर होण्याचें कारण असें कीं, त्यावेळीं लॉर्ड कर्झन यांनीं संकल्पित बारा कृत्यांचा आपल्या भाषणांत सवि-स्तर उल्लेख केलेला नव्हता. लॉर्ड कर्झन यांची विद्वत्ता, कर्तबगारी व हुषारी सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें त्यांनीं संकल्पित केलेल्या बारा कृत्यांपैकीं बरींच कॉंग्रेसच्या मागण्यांपैकीं असतील असें कॉंग्रेसभक्तांस त्यावेळीं वाटलें व अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं हीं कृत्यें निराळ्याच तऱ्हेचीं असावीं असा अदमास केला.

---

* [केसरी ता. २ एप्रिल १९०१]

लॉर्ड कर्झन यांनीं आतां तीं बारा कृत्यें कोणतीं याचा यंदाच्या बजेटवर त्यांनीं नुकतेंच जें भाषण केलें त्यांत सविस्तर उल्लेख केलेला असून त्यासंबंधानें किती बाबतींत आपण काय काय केलें हेंहि सांगितलें आहे. तेव्हां त्यासंबंधानें व लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांतील एकदोन मुद्यांसंबंधानें आम्हांस जें कांहीं सामान्यतः सांगणें आहे तेवढें येथें देण्याचा विचार आहे.

हिंदुस्थानांत कोणीहि गव्हर्नर–जनरल आला असतां त्याच्यापुढें विचाराकरितां जे अनेक प्रश्न येतात ते सामान्यतः दोन प्रकारचे असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी साम्राज्यांत हिंदुस्थान देश हा एक हिरा आहे व साम्राज्याच्या वैभवास, इभ्रतीस आणि थोरपणास अनेक प्रकारें तो कारणीभूत झालेला आहे ही गोष्ट लक्षांत आणून तो हिरा या साम्राज्याच्या कोंदणांत अधिक अधिक दृढ कसा बसवावा हा आमच्या राज्यकर्त्यांच्या नजरेपुढें नेहमींचाच एक प्रश्न असतो. आशिया खंडांत ज्या अनेक चळवळी चालू आहेत त्यांत आपलें वजन राखून त्या सर्वांचें पर्यवसान हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यास कसें हितावह करून घेतां येईल याचा सतत विचार करून त्याप्रमाणें राज्यकारभाराचीं सूत्रें चालविण्याचें काम बरेंच जोखमीचें आणि श्रमाचें आहे. विलायतेहून गव्हर्नर–जनरल होऊन जे कोणी बडे मुत्सद्दी इकडे येतात–मग ते लिबरल असोत किंवा कॉन्सरव्हेटिव असोत—त्यांच्या डोक्यांत हा प्रश्न नेहमीं घोळत असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांतील रयतेस ज्याप्रमाणें आपणास पोटभर भाकरी कशी मिळेल याची नेहमीं काळजी वाटत असून तोच प्रश्न नेहमीं महत्त्वाचा वाटतो त्याप्रमाणें राज्यकर्त्यांसहि आपलें राज्य अधिकाधिक चिरस्थायी कसें होईल व तें होण्यास कोणकोणते नवीन उपाय योजले पाहिजेत हे प्रश्न आधीं सुचतात. आम्ही हिंदुस्थानांतील गरीब प्रजेनें कितीहि राजनिष्ठपणा दाखविला तरी राज्यरक्षण करण्यास यापेक्षां अन्य उपायांची योजना केली पाहिजे असें आम्हांस निःशस्त्र केलेल्या राज्यकर्त्यांस वाटणें स्वाभाविकच आहे. 'प्रजेचा संतोष तेंच आमचें सामर्थ्य' असें जे अष्टावनच्या जाहिरनाम्यांत शब्द आहेत ते समरांगणांत इंग्रजसरकार विजयी झाल्याबरचे आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तशांत इंग्रजी राज्याच्या वैभवांतच दंग होऊन जाणारे लॉर्ड कर्झनसारखे गव्हर्नर–जनरल असल्यावर मग तर सहजगत्याच या प्रश्नास महत्त्व येऊन रयतेच्या प्रत्यक्ष कल्याणाचे प्रश्न बाजूला राहतात. लॉर्ड कर्झन यांनीं संकल्प केलेलीं बारा महत्कृत्यें जीं आज प्रसिद्ध झालेलीं आहेत तीं लक्षपूर्वक वाचलीं असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील लढायांचें धोरण कसें ठेवावें आणि तेथील लोकांस खूष ठेवून त्यांच्याकरितां निराळीच प्रांतिक व्यवस्था कशी करून देतां येईल हा लॉर्ड कर्झन यांच्या बारा प्रश्नांपैकीं पहिला प्रश्न होता. जिल्ह्यांतील ऑफिसर लोकांची वारंवार बदली न करितां त्यांस

एकेच ठिकाणीं ठेवून व त्यांच्याकडे असलेले रिपोर्टाचें काम कमी करून त्यांचा व लोकांचा पूर्वीप्रमाणें जास्त सलोखा होईल अशी तजवीज करणें हा दुसरा प्रश्न होता. या सर्व बाबी लॉर्ड कर्झन यांनीं दोन वर्षांत उरकून टाकल्या आहेत व त्यासंबंधाचे ठरावहि नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. बलुचिस्थान, स्वात व चित्रळ हे प्रांत स्वतंत्र काढून त्यांच्या स्वतंत्र पोलिटिकल एजन्सी बनविल्या आहेत व ह्या दोन्ही ठिकाणीं हिंदुस्थानचे लष्कर विशेष न ठेवितां तेथील लोकांसच लष्करांत ठेवून त्यांच्याच सहाय्यानें त्या प्रांतांचा बंदोबस्त करण्याचा विचार आहे. सोन्याचें नाणें करणे, रेल्वे वाढविणें, विलायतेस तार पाठविण्याचे दर कमी करणें हे लॉर्ड कर्झनच्या बारा प्रश्नांपैकीं आणखी प्रश्न होते व त्यांचाहि थोडाबहुत निकाल लागलेला आहे असें लॉर्ड कर्झन यांनीं सांगितलें. हे सर्व प्रश्न आम्हीं वर सांगितलेल्या राज्यरक्षणाच्या बाह्य प्रश्नांत येतात. रेल्वेपासून रयतेचा प्रत्यक्ष फायदा आहे असें दाखविण्याचा लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या भाषणांत प्रयत्न केला आहे, पण त्यांनीं दिलेल्या आंकड्यांवरून त्यांचें म्हणणें सिद्ध होतें असें आम्हांस वाटत नाहीं. कोणत्याहि देशांत त्या त्या देशाच्या रेल्वे असणें निराळें आणि एका देशांतील व्यापाऱ्यांनीं दुसऱ्या देशांत जाऊन रेल्वे काढणें निराळें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या प्रश्नाच्या भरीस जुन्या इमारतींचें संरक्षण करण्याच्या प्रश्नाचीही भर घातली पाहिजे. कारण, हाहि एका अर्शी शोभेचा आणि दिमाखाचा प्रश्न आहे म्हटलें तरी चालेल. यासंबंधानें लवकरच एक कायदाहि पास व्हावयाचा आहे.

आतां लॉर्ड कर्झन यांच्या बारा प्रश्नांत रयतेच्या कल्याणाचे किती प्रश्न आहेत व त्यांची व्यवस्था काय झाली हें पाहूं. पहिला प्रश्न पाटबंधारे व तलाव यांच्यासंबंधाचा होय. हिंदुस्थानांत दुष्काळाच्या वर्षांहि थोडाबहुत तरी पाऊस पडतोच. पावसाचें हें पाणी योग्य ठिकाणीं सांचवून तेथून किंवा मोठमोठ्या नद्यांतून पाट काढून त्या पाण्याचा होईल तितका शेतकीकडे उपयोग केल्यास शेतकऱ्यांचे हाल घुष्कळ वांचतील हे खरें आहे व तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे पाऊण कोट रुपयांचे ऐवजीं एक कोट रुपये खर्च करण्याचा सरकारचा विचार आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पण या बाबतींत अद्याप घुष्कळ होण्यासारखें आहे व तें होईपर्यंत तें केल्याचें श्रेय लॉर्ड कर्झन यांस घेतां यावयाचें नाहीं. शेतकऱ्यांस कर्जातून मोकळें करण्याबद्दल लॉर्ड कर्झन यांनीं काढलेली तोड म्हटली म्हणजे पंजाब प्रांतांतील शेतकऱ्यांनीं आपली जमीन विकूं नये म्हणून जो नुकताच कायदा पास झाला ती होय. यासंबंधानें सरकारी अधिकाऱ्यांच्या मतांत व लोकमतांत बराच फेर असून त्यानें शेतकऱ्यांचें कल्याण होईल कीं नाहीं याचा वानवाच आहे. तेव्हां याहि बाबतींत लॉर्ड कर्झन यांचें कृत्य दूरदर्शीपणाचें किंवा हिताचें आहे असें अद्याप म्हणतां येत नाहीं. लोकांच्या प्रत्यक्ष हिताचा तिसरा प्रश्न सोजीर लोकांचा खेडेगांवांतील लोकांस होत अस-

लेला त्रास होय. यासंबंधानें लॉर्ड कर्झन यांची बरीच कडक नजर असून तिचा थोडाबहुत परिणामहि झालेला आहे. पण कर्झनसाहेबांची पाठ हिंदुस्थानाकडे वळल्यावर त्यांनीं घालून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी कशी काय होते हें अद्याप पाहणें आहे. तथापि, त्यांच्या कारकीर्दीत या बाबतींत योग्य न्यायबुद्धि दाखविली याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. लोकोपयोगाचीं शेवटचीं दोन कामें म्हणजे शाळाखात्याचीं आणि पोलिसची सुधारणा हीं होत. या दोन्ही प्रश्नाबद्दलची व्यवस्था अद्यापि व्हावयाची आहे. तथापि, शाळाखात्यांत आणि विशेषेंकरून खासगी शाळांचा व सरकारचा जो संबंध आहे त्यांत काय सुधारणा होणार हें बहुतेक समजल्यासारखेंच आहे. शाळाखात्याच्या सुधारणांत खासगी शाळांच्या स्वातंत्र्याची पायमल्ली आणि पोलिसच्या सुधारणेंत वाढल्यानें लागलेल्या गोऱ्या अंमलदारांची अभिवृद्धि न होवो म्हणजे झालें. यासंबंधानें सरकारचे ठराव चारसहा महिन्यांत बाहेर पडणार आहेत असें लॉर्ड कर्झन यांनीं सांगितलें आहे. तेव्हां ते बाहेर पडल्यावर त्याचा विचार करूं.

झालीं; लॉर्ड कर्झन यानीं संकल्प केलेलीं बारा महत्कृयें कोणतीं व त्यापैकीं किती तडीस गेलीं व किती जावयाचीं आहेत हें वरील हकीकतीवरून सर्वांच्या नजरेस येईल. लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचा सूर्य मध्यान्हीं आलेला असून पुढल्या वर्षीं या वेळेस तो उतरत्या बाजूस थोडासा तरी गेलेला दृष्टीस पडणार. अशा वेळीं व्हइसरॉयसाहेब यांनीं योजिलेल्या बारा महत्कृत्यांपैकीं लोकांच्या प्रत्यक्ष फायद्याचीं कोणतीं याचा थोडासा अधिक खुलासेवार विचार करणें जरूर आहे. दुष्काळ व प्लेग यांच्या तडाख्यांत लॉर्ड कर्झन यांस दुसऱ्या कांहीं गोष्टी करावयाच्या असल्यास त्या करितां आल्या नाहींत हें खरें आहे; पण दुष्काळामुळें लोकांची दरिद्रावस्था पूर्णपणें नजरेस येऊन लॉर्ड कर्झनसारख्या हुषार व्हाइसरॉयसाहेबांचें लक्ष जर आमचें दारिद्र्य घालविण्याच्या उपायांकडे गेलें नाहीं तर हें एक आमचें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. हिंदुस्थानच्या लोकांची स्थिति काय आहे, त्यांच्या गरजा काय व त्याचें हित होण्याकरितां राज्यकारभारांत काय काय सुधारणा झाल्या पाहिजेत या सर्व गोष्टींचा आज राष्ट्रीयसभेंत पंधरा वर्षें खल होत असून त्या लॉर्ड कर्झनसारख्या हुषार व्हाइसरॉयांच्या कानावर अद्याप गेल्या नसतील असें नाहीं. पण त्यांपैकीं एखाद दुसरी तरी त्यांच्या महत्कृत्यांत आली आहे काय? रयतेची स्थिति सुधारून देशांतील उद्योगधंद्यास उत्तेजन देणें या गोष्टीकडे तरी व्हाइसरॉयसाहेबांचें लक्ष लागेल असें वाटत होतें. पण औद्योगिक शिक्षण देशांत सुरू करण्याची उत्तम संधी आली असतां तिचाहि त्यांनीं उपयोग करून घेतला नाहीं. गुदस्तां दुष्काळव्यवस्थेसंबंधानें यांनीं जें भाषण केलें होतें त्यांत हिंदुस्थानांत शेतीचें उत्पन्न एकंदर सुमारें ४०० कोटी रुपये असेल असें यांनीं सांगितलें होतें. या त्यांच्या

म्हणण्यावर अमृतबझार पत्राचे विलायतचे बातमीदार मि. डिग्बी यांनीं बरीच टीका करून १८८२ सालीं हिंदुस्थानांतील प्रजेचें उत्पन्न दरमाणशीं दरसाल जें २७ रुपये होतें तें कर्झनसाहेबांनीं दिलेल्या वरील अदमासाप्रमाणें आतां दरसाल दरमाणशीं १८ रुपये झालें आहे असें लिहून अद्याप लॉर्ड कर्झन कसे स्वस्थ बसतात असा त्यांस दोष दिला होता. लॉर्ड कर्झन यांनीं हल्लींच्या भाषणांत आपल्यावरील हा दोष उडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सन १८८२ सालीं जे आंकडे प्रसिद्ध झाले होते ते १८८० सालच्या दुष्काळाच्या कमिशनचे वेळीं गोळा केलेले होते व त्यांत हिंदुस्थानचें शेतीचें उत्पन्न एकंदर ३५० कोटी रुपये धरलेलें होतें. हाच अजमास घेऊन व उत्पन्न थोडेंसें वाढून ४०० कोटी झालें असेल असा आपल्या दुष्काळव्यवस्थेच्या भाषणांत आपण उल्लेख केला होता खरा; पण सन १८९८ सालच्या दुष्काळकमिशनचे आंकडे पाहतां ४०० कोटी ऐवजीं सर्व हिंदुस्थानचें शेतकीचें उत्पन्न ४५० कोटी रुपये आहे असें दिसून येतें व त्या मानानें पाहिलें तर सन १८८० सालीं दरसाल दरमाणशीं शेतकीचें उत्पन्न जर १८ रुपयांचें होतें तर नुकत्याच झालेल्या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून सन १९०१ सालीं (लोकसंख्या सुमारें २२$\frac{1}{2}$ कोट) तें दरमाणशीं २० रुपये म्हणजे २ रुपये जास्त आहे असें लॉर्ड कर्झन यांनीं सांगितलें. व या मानानें पाहिलें असतां एकंदर उत्पन्न दरसाल दर माणशीं सन १८८० सालीं २७ रुपये होतें तें आतां ३० झालें पाहिजे असें ते म्हणाले. त्याचप्रमाणें सन १८८० सालीं १९ कोटी ४० लक्ष एकर जमीन लागवडीस होती त्या ऐवजीं आतां २१ कोटी ७० लक्ष एकर जमीन लागवडीस असून दर एकरीं पीकहि पूर्वी ७३० पौंड होतें तें आतां ८४० पौंड झालें आहे असें लॉर्ड कर्झन यांनीं प्रतिपादन केलें. सारांश, देशाची समृद्धि होत आहे असें सांगण्याचा त्यांचा हेतु होता. पण मग दहा वर्षांच्या खानेसुमारींत लोकसंख्या कमी कां झाली वगैरे गोष्टींचा नीट खुलासा होत नाहीं हें त्यांनींहि कांहीं अंशानें कबूल केलें. कसेंहि असो; सन १८८२ सालचे व सन १८९८ सालचे हिंदुस्थानच्या शेतकीच्या व बिनशेतकीच्या उत्पन्नाचे आंकडे व हिशेब सरकारनें जे आजपर्यंत प्रसिद्ध केले नाहींत ते जर लॉर्ड कर्झन प्रसिद्ध करतील तर या गोष्टीचा बराच उलगडा लागणार आहे. लोकांचा अनुभव तर असा आहे कीं, प्रजा उत्तरोत्तर दरिद्री होत चालली आहे. सरकारास जर ही गोष्ट खोटी वाटत असेल तर त्यांनीं आपले आंकडे व हिशेब सर्व प्रसिद्ध करावा म्हणजे त्यांत चुका काय आहेत त्या दाखविण्यास ठीक पडेल. सन १८८० व १८८२ चे आंकडे व हिशेब प्रसिद्ध करावे म्हणून मि. दादाभाई व डिग्बी यांनीं आज कित्येक दिवस तरी ओरड चालविली आहे; पण ते किंवा १८९८ चे असे कोणतेच आंकडे प्रसिद्ध न

करितां त्या वेळीं गोळा केलेली माहिती व आंकडे यापैकीं आपल्या कामास येईल तेवढीच माहिती किंवा आंकडे प्रसिद्ध करणें बरोबर नाहीं. करितां लॉर्ड कर्झन यांस आमची अशी विनंति आहे कीं, दहा वर्षांनीं जशी एकवार खाने-सुमारी होऊन पुष्कळ महत्त्वाच्या बाबींचा एकदम निकाल लागतो तद्वतच हिंदुस्थानचे लोक दरिद्री होत आहेत किंवा जास्त सधन होत आहेत याचा वीस वर्षांतून एकदां तरी नवी माहिती गोळा करून निर्णय करण्याची पद्धत त्यांनीं घालून द्यावी. हिंदुस्थानच्या लष्करावर जास्त पैसा खर्च करणें, त्यांना नव्या बंदुका देणें, नव्या तोफा आणणें, सरहद्दीची नवीन व्यवस्था लावून त्याचे नवे प्रांत करणें वगैरे कामें साम्राज्याच्या दृष्टीनें महत्त्वाचीं असतील, नाहीं असें नाहीं; पण हिंदुस्थानांतील रयतेची स्थिति जर सुधारली नाहीं, नवीन उद्योगधंदे निघून केवळ शेतकीवर उपजीविका करणारांची संख्या जर कमी झाली नाहीं, किंवा कॉंग्रेसनें सुचविलेल्या अनेक व्यवस्थांपैकीं बऱ्याच व्यवस्था जर अमलांत आल्या नाहींत, तर इंग्रजी साम्राज्याच्या भरभराटींतहि हिंदुस्थानच्या रयतेस उपाशीं मरण्याची पाळी येणार आहे किंवा आलेली आहे म्हटली तरी चालेल. लॉर्ड कर्झनसारख्या हुषार गव्हर्नर-जनरलास ही गोष्ट कळूं नये अशी नाहीं; पण दुःखाची गोष्ट ही कीं, त्यांच्या बारा महत्कृत्यांत यांस स्थळ न मिळतां उलट हिंदुस्थानची स्थिति सुधारत चालली आहे असें दाखविण्याकडेच त्यांच्या मनाची प्रवृत्ति झालेली आहे. ही प्रवृत्ति जर अशीच कायम राहील तर यांच्या कारकीर्दींत रयतेचें प्रत्यक्ष हित होण्यासारखी राज्य-व्यवस्थेंत कांहीं सुधारणा होण्याची आशा बाळगावयास नको.

* श्री शिवजयंत्युत्सव

गेल्या वर्षीं श्री शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीसंबंधानें जो लेख आला होता, त्यानंतर या वर्षांत आम्हांकडे जी माहिती आली त्यापैकीं कांहीं दुसरीकडे दिली आहे; व बाकीची पुढील खेपेस येईल. महाराजांची जन्मतिथि प्रतीपदा किंवा द्वितीया याचा निकाल आज जरी झाला नाहीं तरी लवकरच होईल; व तो होईपर्यंत द्वितीयाच धरून उत्सव करणें योग्य आहे, व यंदाच्या सालचे उत्सव तेव्हांच म्हणजे वैशाख शुद्ध द्वितीयेसच होतील असा आम्हांस भरंवसा आहे. आतां शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीसंबंधानें गेल्या वर्षांत महत्त्वाचे प्रसिद्ध झालेले लेख म्हणजे कै. न्यायमूर्ति रानडे यांचा मराठ्यांचा इतिहास होय. हा इतिहास लिहिण्याची कल्पना पहिल्यानें कै. रा. ब. निळकंठराव यांची असून त्यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें इतिहासाच्या बऱ्याच भागाचीं टिपणेंहि तयार केलेलीं होतीं. कै. निळकंठरावजी कीर्तने यांनीं मराठी इतिहासावर बरेच परिश्रम केलेले होते. ग्रांट डफच्या इतिहासावर पहिली मार्मिक टीका यांच्या हातची असून पुढें चिटणीसकृत शिवछत्रपतीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र वगैरे ग्रंथहि त्यांनीं प्रसिद्ध केले होते. त्यांचें असें मत होतें कीं, शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत मराठी राज्याची जी स्थापना झाली ती त्यांच्या आंगच्या गुणांचें फल तर खरेंच; पण ऐतिहासिक दृष्ट्या या महत्कार्याची मूळपिठीका बरीच मागें न्यावी लागत असून त्यास आधारभूत असे ऐतिहासिक दाखलेहि मिळतात. निळकंठरावजींनीं आपल्या टिपणांवरून या मताप्रमाणें पुण्यास एक व्याख्यानहि दिलें होतें. ग्रॅंट डफच्याच इतिहास वाचणाऱ्या गृहस्थांस शिवाजीची कारकीर्द किंवा एकंदर मराठ्यांचा अभ्युदय हा केवळ औत्पादिक वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः तो तसा नाहीं. त्याचें बीजारोपण पूर्वीं बरींच वर्षें झालेलें असून वृक्ष वाढीस लागल्यावरहि त्याच्या निरनिराळ्या शाखांचें एकाच स्कंधापासून पोषण होत होतें; व शेवटीं जरी हा वृक्ष नाश पावला, तरी जितक्या वेळपर्यंत तो जिवंत होता तितक्या वेळपर्यंत तरी त्याच्यामध्यें एक प्रकारचें तेज असून त्याचे निरनिराळ्या अवयवांची वाढहि कांहीं सामान्य तत्त्वांसच अनुसरून होत होती. निलकंठरावजींनीं हें मत पुष्कळ विचार करून ठरविलें होतें. व त्यांचींच टिपणें घेऊन कै. काशिनाथपंत तेलंग हे इंग्रजींत एका विलायतच्या पुस्तक प्रसिद्ध करणाऱ्या कंपनीकरितां एक ग्रंथ लिहिणार होते. हाच ग्रंथ पुढें कै. न्या. रानडे यांनीं हातीं घेतला. पण तोहि अपूर्ण राहिला आहे असें समजतें. कै. निळकंठरावजींच्या वेळेपेक्षां मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

---

* [केसरी ता. ९ एप्रिल १९०१]

आजमितीस जास्त उपलब्ध झालेलीं आहेत; व न्या. रानडे हयात असते तर त्या सर्व साधनांचा उपयोग करून घेऊन त्यांची भर निळकंठरावजींच्या मतांत घालून त्यांनीं आपला ग्रंथ तयार केला असता यांत संशय नाहीं. परंतु आतां तें काम करणारा त्यांच्या योग्यतेचा पुरुष मिळेल कीं नाहीं याची शंका आहे. तथापि, विद्यमान विद्वानांपैकीं कोणी तरी या अपुरत्या ग्रंथास हातीं घेऊन त्याची पूर्तता करणें हें महाराष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे व त्याप्रमाणें लवकरच योग घडून येवो अशी आमची इच्छा आहे. कै. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं कांहीं अंशीं अशाच प्रकारचा उद्योग आरंभिला होता पण तेहि गेल्या सालांतच निवर्तले.

मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें हा भाग झाला. परंतु आजचा मुख्य विषय जो श्री शिवजयंत्युत्सव त्या संबंधानें आज दोन शब्द लिहिणें जरूर आहे. पहिली गोष्ट अशी कीं, रायगड येथील समाधीच्या जीर्णोद्धाराकरितां जो फंड गोळा झालेला आहे, त्याची काय व्यवस्था आहे व त्या फंडाचा इष्ट कार्याकडे केव्हां विनियोग होईल, याविषयीं बऱ्याच लोकांस नीट माहिती नाहीं, करितां ती थोडक्यांत द्यावी. शिवाजीमहाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धारार्थ व छत्री बांधण्यास वगैरे फंड गोळा करण्यास सन १८९५ सालीं सुरुवात झाली, व दोन वर्षांतच सुमारें चवदापंधरा हजार रुपये गोळा झाले. ही रक्कम व व्याज मिळून आज सुमारें वीस हजार रुपये गोळा झालेले आहेत व ते फंडाचे खजिनदार श्री. बाळासाहेब नातू यांच्या नांवें येथील डेक्कन बँकेमध्यें ६ टक्क्यांच्या व्याजानें ठेविलेले आहेत. यापैकीं कांहीं रक्कम कित्येकांनीं गहाणावर वगैरे कांहीं कामाकरितां मागितलेली होती; पण ती दुसऱ्या कोणत्याहि कार्यास खर्च करण्याचा किंवा कोणासहि कर्ज देण्याचा सेक्रेटरी किंवा खजिनदार यांस अधिकार नसल्यामुळें इतर ट्रस्ट मिळकतीप्रमाणेंच सदर रक्कम तिचा अखेर विनियोग होईपर्यंत तशीच ठेवण्याचा त्यांचा निश्चय आहे. आतां या रकमेचा अद्याप इष्ट कार्याकडे विनियोग कां झाला नाहीं असा कित्येकांचा प्रश्न आहे. त्यास उत्तर एवढेंच आहे कीं, जरी रायगड येथील समाधी, देवालयें, राजवाडा वगैरे ठिकाणें फारेस्ट ॲक्टाप्रमाणें जंगलांत न घालतां ती सार्वजनिक समजून लोकांचा तेथें जाण्यायेण्याचा हक्क अबाधित ठेवला आहे, तरी एवढयानें कोणाहि मनुष्यास त्या स्थलांची दुरुस्ती किंवा जीर्णोद्धार करणें असल्यास तो त्यास स्वतंत्र रीतीनें करतां येईल कीं नाहीं याची शंका आहे रायगड येथील उत्सव करण्यास जरी कोणाच्याहि परवानगीची जरूर नसली तरी समाधीचा जीर्णोद्धार वगैरे करणें असल्यास ती गोष्ट केवळ एखाद्या मनुष्यास आपल्या इच्छेप्रमाणेंच स्वतंत्र करितां येईल असें नाहीं सबब ही गोष्ट कालानुकूल्य पाहून करावयास पाहिजे व ती करण्यांत येईल. तेथपर्यंत रकमेचें जें व्याज येईल तें चारपांच वर्षांनीं रायगड येथें एक मोठा

उत्सव व इतर सालीं लहान उत्सव करण्याचें कामीं खर्चावी असें ठरविलें आहे. मोठा उत्सव ज्या सालीं होणार नाहीं त्या सालीं व्याजापैकीं बरीच रक्कम शिल्लक राहील व ती मुदलांत मिळविली जाईल. अशा रीतीनें काम सुरू करण्यापूर्वी हल्लींच्या रकमेंत आणखी दोन तीन हजारांची तरी भर पडेल असा अदमास आहे. फंड व त्याचा विनियोग यासंबंधानें कोणाचा कांहीं गैरसमज असल्यास तो वरील हकीकतीनें दूर होईल.

श्रीशिवजयंत्युत्सवासंबंधानें पहिल्या पहिल्यानें कित्येकांचे कांहीं विलक्षण आक्षेप होते, व त्यांस १८९८ च्या वावटळींत कांहीं तऱ्हेवाईक स्वरूप देण्याचा प्रयत्नहि झालेला होता. पण कालिदास कवीनें "हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा" असें जें म्हटलें आहे त्याप्रमाणेंच शिवजयंत्युत्सवहि १८९८ सालच्या भट्टींतून तावून सुलाखून निघाल्यामुळें त्याची योग्यता व कायदेशीरपणा हीं अधिकच व्यक्त झालीं. आपल्या देशांतील थोर पुरुषांचे उत्सव करण्यापासून काय फायदे आहेत यासंबंधानें मागें आम्हीं अनेक लेख लिहिले आहेत. त्या सर्वांची आज येथें पुनरावृत्ति करण्याची कांहीं जरूर नाहीं. तथापि, सूर्यावर आलेलीं अभ्रें जशीं वायूस वारंवार दूर करावीं लागतात तद्वतच कांहीं अंशीं प्रत्येक सार्वजनिक विषयाची स्थिति असल्यामुळें कांहीं गढूळ मतीच्या लोकांकडून मध्यंतरीं जे आक्षेप निघतात त्यांतील चुका दाखविणें हें उत्सवाच्या पुरस्कर्त्यांचें काम आहे. श्रीशिवजयंत्युत्सवापासून आम्हांस काय फायदा आहे, हा प्रश्न पितरांचें श्राद्ध करण्यापासून काय फायदा आहे या प्रश्नाइतकाच अप्रयोजक व व हास्यास्पद आहे. थोर पुरुषांचे उत्सव सर्व राष्ट्रांतून जे करितात ते कांहीं उत्सव करणाऱ्यांपैकीं कोणासहि उद्यां एकादी बढतीची जागा मिळेल किंवा व्यापारांत फायदा होईल म्हणून कोणी करीत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या ज्या संस्था उपस्थित झाल्या आहेत त्यांच्यापासूनहि कित्येकांस उपयोग नाहीं असें वाटत आहे, व कित्येक ठिकाणीं कांहीं लोक अशा चळवळी करणारांस "गप्प बसाल तर काय घ्याल" म्हणून खासगी रीतीने तरी विचारूं लागले आहेत! हा आक्षेप अगदीं पोरकट असून तो काढणाऱ्या लोकांच्या अंगांत दूरदर्शीपणा किंवा पोंच याचा बहुतेक अभावच असतो म्हटलें तरी चालेल. असो; पण राष्ट्रीय सभेसंबंधानें आज आपणास विचार कर्तव्य नाहीं. आजचा विषय शिवजयंत्युत्सवाचा होय, व तो राष्ट्रीय सभेहून अगदीं भिन्न व निराळ्या तऱ्हेचा आहे. राष्ट्रीय सभेची चळवळ राज्यकर्त्यांपासून लोकांस कांहीं विवक्षित हक्क प्राप्त करून देण्याकरितां आहे. श्रीशिवजयंत्युत्सवाचा तसा कोणताहि हेतु नाहीं व या उत्सवाच्या पुरस्कर्त्यांस उत्सवाच्या द्वारें राज्यकर्त्यांपाशीं कांहीं मागणेंहि नाहीं. राष्ट्राचें राष्ट्रीयत्व किंवा जिवीत्व कायम राहण्यास जीं अनेक साधनें आहेत त्यांतच राष्ट्रीय उत्सवांचा समावेश होतो, व या राष्ट्रीय

उत्सवांतच थोर पुरुषांचे जयंत्युत्सव गणले जातात. सारांश, आपल्या थोर पूर्वजांस विसरून जाऊन कोणतेंहि राष्ट्र उदयास आलें नाहीं व येणेंहि शक्य नाहीं असा जो सर्वमान्य ऐतिहासिक सिद्धान्त आहे याचेंच शिवजयंत्युत्सवासारखें उत्सव हें दृश्य स्वरूप होय. स्वभाषेची अभिवृद्धि, स्वराष्ट्राच्या इतिहासाचा स्वकीय दृष्टीनें अभ्यास व मनन, स्वधर्मश्रद्धा इत्यादि गोष्टी जशा राष्ट्राच्या उत्कर्षाला कारणीभूत होतात त्यांतलाच श्रीशिवजयंत्युत्सवासारख्या उत्सवाचा प्रकार होय. हे उत्सव कांहीं विवक्षित हक्क मिळविण्याकरितां किंवा विशिष्ट सद्यःफलप्राप्ती मिळविण्याकरितां करीत नसतात. वैद्यशास्त्रांतील दृष्टांत घ्यावयाचा असल्यास असल्या उत्सवाची गणना ताप, खोकला, दमा वगैरे रोगांवरील औषधांत न करितां सामान्य आयुर्वर्धक किंवा शक्तिवर्धक उपायांत करावी लागेल. राष्ट्रांत अशा प्रकारचे जितके उत्सव असतील तितके चांगले हें तत्त्व सुधारलेल्या देशांतही सर्वमान्य झालेलें आहे. पण आमच्या दुर्दैवानें आमच्याकडे मात्र असले उत्सव कमी होत चालले आहेत किंवा नाहींसे होत चालले आहेत म्हटलें तरी चालेल. मुंबईखेरीज इतर इलाख्यांतील बऱ्याच सार्वजनिक पुढारी गृहस्थांचें मतहि अशा प्रकारच्या उत्सवांस अनुकूल आहे; इतकेंच नव्हे, तर कांहीं ठिकाणीं अशा प्रकारचे उत्सव त्या त्या प्रांतांतील लोकस्थितीस व पूर्वेतिहासाला धरून सुरू करण्याचा प्रयत्न चालू असल्याचें आम्हांस माहीत आहे. शेतांत उत्पन्न झालेली किंवा नोकरींत मिळालेली भाकरी केवळ घरीं बसून स्वस्थ खात पडावें हें राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत हानिकारक आहे. अशा स्थितींत लोकांची उमेद, ईर्षा किंवा हुरूप हीं बहुतेक लयास जात असतात. या स्थितींतून त्यास काढण्यास, किंवा पूर्वी चांगलें असल्यास अशा स्थितींत जाऊं न देण्यास जीं कांहीं साधनें आहेत त्यापैकीं राष्ट्रीय उत्सव हें एक होय. व निरनिराळ्या प्रांतांत किंवा इलाख्यांत ते जरी निरनिराळ्या प्रकारचे झाले तरी त्यानें एकंदर हिंदुस्थानच्या एकीकरणास कोणत्याहि प्रकारें बाध यावयाचा नाहीं. हिंदुस्थान देश हा अनेक राष्ट्रें मिळून झालेला आहे हें म्हणणें एका अर्थीं खरें आहे व या सर्व राष्ट्रांची एकी होणें जरी इष्ट आहे व त्याकरितां आपले प्रयत्नहि जरी चालू आहेत तरी त्यासाठीं प्रांतिक उत्सवास फांटा दिला पाहिजे हें म्हणणें अगदीं अविचाराचें आहे. महाराष्ट्रीयांचें मराठीपण, राजपुतान्यांतील लोकांचा रजपुती बाणा किंवा शीख लोकांचा विशिष्टपणाही राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांनीं एकी करण्याचा जो उद्योग चालविला आहे तो सिद्धीस गेल्यावरहि बऱ्याच प्रमाणानें कायम राहणार आहे. किंबहुना सर्वांची एकी होण्यास हा विशिष्टपणा एक प्रकारें राहणेंच जरूर आहे, व तो सामान्य एकीस विरुद्ध नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा स्थितींत श्रीशिवजयंत्युत्सवावर आक्षेप घेणें म्हणजे म्हणजे आपल्या बुद्धीचा कोतेपणा किंवा अनौदार्य प्रगट करण्यासारखें आहे. सबब असल्या आक्षेपांस भीक न

घालतां महाराष्ट्रांतील लोक सालाबादप्रमाणें हा उत्सव यंदाहि साजरा करतील असा आम्हांस भरंवसा आहे. आम्ही कोणत्याहि स्थितींत असलों तरी अशा प्रकारचे उत्सव करणें हाच आमच्या अभ्युदयाचा मार्ग असून परिणामीं तोच श्रेयस्कर आहे असें आम्ही समजतों.

* * *

* ब्रिटिशसरकार व लोकशिक्षण

गेल्या आठवड्यांत म्हणजे ता. २३ एप्रिल रोजीं ना. लॉर्ड कर्झन हे सिमल्यास जाण्याच्या वाटेंत अल्हीगड येथें उतरले होते, व तेथें मुक्काम असतां प्रख्यात सर सय्यद अहमद यांनीं स्थापन केलेलें मुसलमान लोकांचें कॉलेज पाहण्यास ते गेले होते. सदर प्रसंगीं त्यांस जें मानपत्र देण्यांत आलें त्यास उत्तर देतांना कर्झनसाहेबांनीं लोकशिक्षण या विषयावर बरेंच महत्त्वाचें भाषण केलें. अल्हीगड कॉलेजचा वृत्तांत लोकांस बहुधा माहीत आहेच. सदर्हू कॉलेजांत चालू असणारा शिक्षणक्रम किंवा त्यांतून तयार झालेले उपपदधारी लोक यांपैकीं कोणीहि अद्याप आपल्या गुणांनीं विशेष लोकमान्य झालेले आमच्या ऐकिवांत नाहीं. तथापि एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, सदर्हू कॉलेजाचें मूळ उत्पादक सर सय्यद अहमद हे कट्टे कॉंग्रेसद्वेष्टे असून राजकीय चळवळींत शिखंडित्व धारण करण्याचें त्यांचें जें व्रत होतें तेंच व्रत त्यांच्या कॉलेजांतील इंग्रजी अध्यापकांनीं व विद्यार्थ्यांनीं बरेच अंशीं चालविलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बरेच अंशीं म्हणण्याचें कारण असें कीं, यद्यपि सर सय्यद अहमद यांची स्मृति त्यांचे मनांत जागृत आहे, व प्रसंगविशेषीं राजकीय बाबतींच्या उहापोहांत त्यांचे तोंडून एखादा शब्द चुकून जाण्याचा संभव दिसूं लागतांच हॅम्लेट नाटकांत राजपुत्र आपल्याशीं बोलत असतां ज्याप्रमाणें समंध झालेला त्याचा बाप उग्रपणानें ' शपथ वाहा , शपथ वाहा ' अशी ताकीद देत असतो त्याचप्रमाणें सर सय्यद महमद यांचे पिशाच्चाचें दर्शन होऊनच कीं काय त्यांचे चिरंजीव माजी जस्टिस महमद व मुसलमानांच्या फंडांतून पगार खाणारे अल्हीगड कॉलेजचे इंग्लिश प्रोफेसर हे राजकीय बाबतींत चार दोन शब्द बोलून जातांच जीभ सैल सुटेल कीं काय या भीतीनें ती वेळींच आंखडून धरतात. तथापि, इतक्या जबर शक्ती मागें ओढीत असतांहि सर सय्यद अहमद यांच्या सांप्रदायांतील लोकांची मनःप्रवृत्ति केव्हां केव्हां उचंबळून अनावर होते. मृच्छकटिक नाटकांत आपल्या साथीदार द्यूतकारांस फसविण्या

---

* [केसरी ता. ३० एप्रिल १९०१]

करितां देवाच्या मूर्तीचें सोंग घेऊन, व आंगीं उसनें ताटस्थ्य आणून मौनव्रत धारण करून उभा राहणारा संवाहक, समोर चाललेल्या फाशांचा डाव ऐन भरांत आलेला पाहतांच भान जाऊन मध्येंच ओरडला व आपल्या कर्जदाराच्या हातीं सांपडला; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाती, प्रेमपूर्वक व आदरपूर्वक कां होईना, सरकारशीं राजकीय बाबतींत भांडत असतां न बोलण्याचा निश्चय केलेले वायव्य प्रांताच्या एका कोंपऱ्यांतील हे बुद्धिवान परंतु लब्धप्रतिष्ठित मुसलमानलोक कांहींतरी मध्येंच कसें बोलून जातात याचें उदहारण थोडे दिवसांपूर्वी मि० आलफ्रेड नंदी यांची व कांहीं मुसलमान लेखकांची 'पायोनियर' वर्नमानपत्रांत झटापट झाली तेव्हां दिसून आलें आहे. तथापि एकंदरीनें राजकीय बाबतींत घरलेलें मौनव्रत त्यांनीं बरेंच चालविलें आहे यांत शंका नाहीं; व तें व्रत त्यांनीं तसेंच चालवावें अशाविषयीं उत्तेजन देण्याकरितांच कीं काय एका अर्थी लॉर्ड कर्झन यांनीं अल्लीगड कॉलेजास भेट दिली असें म्हटलें असतां फारसें वावगें होणार नाहीं. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या वाणीमध्यें बरेंच मोहन आहे हें सदर्हू प्रसंगीं केलेल्या त्यांच्या भाषणावरून व्यक्त होते. या भाषणांत मुख्य दोन मुद्दे होते. व दोन्ही स्तुतिविषयक होते. पैकीं एक मुद्दा ब्रिटिशसरकारचे स्तुतीसंबंधाचा होता, व दुसरा अल्लीगडवाल्यांच्या स्तुतीसंबंधाचा होता. लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें असें कीं, हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशांत लोकशिक्षण हा राज्यकर्त्यांचें कर्तव्यांपैकीं एक महत्त्वाचा भाग होय, व तें कर्तव्य आतांपर्यंत त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें बजाविलें आहे कीं, समजा उद्यां जर हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य समूळ नाहींसें होण्याचा प्रसंग आला व त्या राज्याचीं इतर सर्व दृश्य चिन्हें नाहींशीं झालीं तरी लोकशिक्षणाचे बाबतींत ब्रिटिशसरकारनें हिंदुस्थानांत जी वृत्ती अंगिकारली होती व तिच्या योगानें हृत्पटलावर जो मृत्युलेख कोरला जाईल तेवढाच ब्रिटिश राज्याचा धन्यवाद कायमचा चालविण्यास पुरे आहे. लॉर्ड कर्झन यांचें भाषणांत अलंकारहि कांहीं कमी नसतात. ते म्हणाले कीं, ज्ञानमंदिराचीं कवाडें खुलीं करून हिंदुस्थानांतील लोकांचा त्यांत समावेश करण्यास आम्ही इमानें इतबारें प्रयत्न केला आहे. आमच्या राज्यांत शिक्षण ही थोड्या व भाग्यशाली लोकांची मौल्यवान् मिळकत असें तिचें स्वरूप न राहतां ती स्वस्त व गरीब-श्रीमंतास सारखीच सुलभ अशी वस्तु झालेली आहे. ब्रिटिश राज्याची व हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या इतर राज्यांची तुलना करून आपली श्रेष्ठता दाखविण्याचें लॉर्ड कर्झन यांचें आवडतें पालुपदहि या भाषणांत थोडेसें आलेंच होतें. ते म्हणाले कीं, आजपर्यंत हिंदुस्थानांत परधर्मी, परजातीय व परकी भाषा बोलणारे राजे होऊन गेले. त्यांनीं लोकशिक्षणासंबंधानें अशी वृत्ती अंगिकारली होती काय ? एवढेंच नव्हे तर ज्यांच्या हातून हल्लींच्या लोकशिक्षणाचा विस्तार यत्किंचितहि कमी

होईल अगर विद्यामंदिरांतून एखाद्यास धुडकावून दिलें जाईल असा एकहि-गव्हर्नर–जनरल किंवा प्रांतिक गव्हर्नर हिंदुस्थानांत येणार नाहीं अशी त्यांनीं खातरजमा केली. विद्येची प्रशंसाहि त्यांनीं थोडीबहुत गाइली. विसाव्या शतकांत विद्येवांचून कोणाचें चालवायचें नाहीं. रणांगणांत ज्याप्रमाणें निःशस्त्र माणूस त्याप्रमाणें जीवनकलहांत गुतलेल्या या जगांत विद्येवांचून जिणें व्यर्थ होय. परंतु ब्रिटिशसरकारनें शिक्षणासंबंधानें इतकी तजवीज करून दिली असतांहि आजपर्यंत मुसलमान लोक त्या तजाविजीचा घ्यावा तितका उपयोग करून घेत नव्हते ते आतां घेऊं लागले आहेत; व शेख, सुनी वगैरे सर्व पंथांचे लोक विद्यासंपन्न होण्याचे कामीं अहमहमिका बाळगूं लागले आहेत याबद्दल लॉर्ड कर्झन यांनीं मुसलमान समाजाची स्तुती केली. मुसलमानी धर्म चांगला आहे, त्यांत उदार तत्त्वें व सत्य बरेंच असून त्याचे अनुरोधानें शिक्षण चालू ठेविलें असतां समाजास फार फायदा होईल. धर्म बाजूस ठेवून लोकाशिक्षण देणें म्हणजे बिनपायावर अवजड इमारत रचण्यासारखें होय. तथापि, आपला धर्म न सोडतां खरें ज्ञानार्जन करावयाचें असल्यास हिंदुस्थानांतील लोकांस पश्चिमेकडे तोंड करायवास पाहिजे. कारण ज्ञानरूपी फळ हें एक वेळीं आशियाच्या बागेंत पिकत होतें हें खरें आहे; तथापि तें आतां युरोपच्या बागेंत पिकूं लागलेलें आहे. अशा रीतीनें लॉर्ड कर्झन यांनीं ' अहो रूपं अहो ध्वनिः ' या न्यायानें वेळ मारून नेली.

अलीगड कॉलेजच्या भेटीचा समारंभ क्षणाचा होऊन गेला, परंतु लॉर्ड कर्झन यांनीं उच्चारलेले शब्द मात्र अक्षय्य असून त्यांच्या शब्दांवरून ब्रिटिश राज्याच्या दानतीचा न्याय लोक करतील हें त्यांचे लक्षांत यावयास पाहिजे होतें. आत्मश्लाघा ही कोणासहि शोभत नाहीं. व विशेषतः ती जेव्हां सर्वांशीं सत्य नसते तेव्हां तर ती मुळींच शोभत नाहीं. व्हाइसरॉयसाहेबांनीं केलेली विद्येची प्रशंसा आम्हांसहि अभिमत आहे. परंतु हल्लीं आम्हांस दिली जात आहे ती विद्या कोणत्या कसास लागणारी आहे याचा विचार मनांत आल्यावांचून राहत नाहीं. त्याचप्रमाणें आम्हांस विद्यादान करण्यासंबंधानें सरकार खरोखर आपल्या पदरास किती खार लावून घेतें हेंहि पाहणें जरूर आहे. युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रें ज्या मानानें लोकाशिक्षणावर खर्च करितात त्याच मानानें हिंदुस्थानांत लोकाशिक्षणावर खर्च होत आहे कीं काय हें लॉर्ड कर्झन आपल्या मनाशीं विचारून पाहतील काय ? युरोपियन राष्ट्रांमध्यें नवीन प्रकारच्या विद्येची परंपरा आज फार लांबून चालत आलेली आहे, व त्या देशांतील विद्यापीठें बरींच जुनीं आहेत असें कदाचित् म्हणतां येईल. परंतु हिंदुस्थानांत इंग्रजी विद्येचीं शाळा व कॉलेजें स्थापन झालीं, त्यांचे मागूनच जपानांत लोकाशिक्षणास खरा प्रारंभ झाला कीं नाहीं ? व असें असतांहि जपानांतील लोक युरोपियन लोकांच्या बरोबरीनें आज

निष्णात झाले असून कोणत्याहि एखाद्या उपयुक्त विषयाचें शिक्षण स्वस्त मिळविणें झाल्यास हिंदुस्थानांतील लोकांस जपानाकडे धांव घ्यावी लागत आहे किंवा नाहीं ? हें तर एक राहोच; परंतु आज हिंदुस्थानांत सुशिक्षित लोकांचें प्रमाण शेंकडा दहावीसांवरहि गेलेलें नाहीं, व जोंपर्यंत एवढा मोठा समाज अशिक्षित राहिलेला आहे तोंपर्यंत यापुढें कोणीहि गव्हर्नर हल्लींच्या शिक्षणाचा विस्तार कमी करणार नाहीं असें केवळ नकारात्मक आश्वासन देऊन, झालें एवढें लोकशिक्षण बस्स झालें, हिंदुस्थानांतील प्रजेचा वेल मांडवास चढला व आपली इतिकर्तव्यता समाप्त झाली व आतां गुडघ्यावर हात देऊन स्वस्थ बसण्यास हरकत नाहीं अशा अर्थाचे लॉर्ड कर्झन यांचे उद्गार, खरोखरच ब्रिटिश राज्याच्या कर्तव्याची लॉर्ड कर्झन यांची कल्पना इतकी कोती आहे काय अशी शंका उत्पन्न होऊन कोणाचीहि निराशा झाल्यावांचून राहणार नाहीं ! हिंदुस्थानांतील लोकशिक्षणाची प्रस्तुतची स्थिति पाहिली तर अद्यापि सबंध जिल्ह्यास देखील एक याप्रमाणें सरकारी हायस्कुलांची संख्या नाहीं. खासगी शाळांस उत्तेजन म्हणावें तर तेंहि यथातथाच. औद्योगिक व व्यापारी शिक्षणाचें तर अद्याप नांवच नाहीं. मग शास्त्रीय शोध लावणें, परदेशीं हुषार विद्यार्थी पाठवून विद्या व कला स्वदेशीं आणविणें याची गोष्ट तर बोलावयासच नको. तात्पर्य, यद्यपि ब्रिटिशसरकारानें प्रजेस उदार शिक्षण देण्याचा आव घातला आहे, तरी प्रत्यक्ष शिक्षणाची मजल फारशी गेलेली नाहीं व जें व्हावयाचें उरलें आहे तें झालेल्याच्या मानानें किती तरी अधिक आहे हें लक्षांत घेतलें असतां इतक्यांतच आपलें कर्तव्य संपलें अशी तुतारी व्हाइसरॉयसाहेबांसारख्यांनीं वाजविणें म्हणजे आम्हां हिंदुस्थानवासी लोकांची व विद्यादेवीची, हें तर राहोच, परंतु खुद्द ब्रिटिशराज्याच्या दानतेची निव्वळ थट्टा करण्यासारखें आहे. पण अवघ्या पांच वर्षांत सर्व हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची या टोंकापासून त्या टोंकांपर्यंत सुधारणा करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या मुत्सद्यानें अशा प्रकारें बोलावें यांत कांहीं नवल नाहीं. एखादा गारुडी बोलतां बोलतां हातचलाखीनें जें झाड उगवून दाखविणार तें चार दोन बोटेंच उंच असावयाचें. ज्यांस विद्या द्यावयाची त्या हिंदुस्थानवासी लोकांच्या भावी उत्कर्षाविषयींची लॉर्ड कर्झन यांची जी कल्पना असल्याचें यापूर्वी आपणांस वेळोवेळीं दिसून आलें आहे त्या कल्पनेस साजेल अशीच क्षुद्र व कोंती कल्पना त्यांच्या विद्येच्या परिसमाप्तीविषयीं त्यांची असावी हें साहजिक आहे. हिंदुस्थानांतील लोकांस विद्या देऊन तरी त्यांनीं उत्तम करकून बनावें व ब्रिटिश सरकारचें राज्य चालविण्यास मदत करावी एवढाच त्यांना विद्या शिकविण्याचा हेतु आहे कीं नाहीं! झालें तर मग. तेवढ्या कामास पुरून उरण्याइतकी विद्या आजपर्यंत सरकारनें ५०कळ शिकविली आहे. त्याच विद्येनें सुशिक्षित लोकांचें पोट भरण्यासहि कांहीं

पंचाईत पडणार नाहीं. आधींच या देशांतील लोकांस आपला चरितार्थ चालविण्यास फारसा पैसा लागत नाहीं, हा सिद्धांत सरकारानें अनेक वेळां ठरवून सोडलेलाच आहे; व तेवढ्या गरीबीच्या चरितार्थास जें कांहीं लागेल तें हल्लींच्या विद्येनें सहज मिळण्यासारखें आहे. एका कवीनें असें म्हटलें आहे कीं,

स्याद्विद्या यदि का चिंता वराकोदरपूरणे ? ॥
शुकोप्यशनमाप्नोति हरे राम इति ब्रुवन् ॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें सरकारास प्रिय तितकें बोलून व नुसती पोपटपंची करून स्वस्थ हरिहरि म्हणत आम्हीं बसलों असतां पोटाचा खळगा भरून निघण्यास पुरें इतकें द्रव्य आमच्या प्रस्तुतच्या विद्येनें आम्हांस मिळणारें आहे. तेव्हां लॉर्ड कर्झन यांचें बोलणें योग्यच आहे असें म्हटलें पाहिजे. ब्रिटिश साम्राज्यांत आम्ही जर कांहीं विशेष कामगिरी बजावावी, किंवा आमची धनसंपत्ति वाढून व आमच्या अंगीं पराक्रम व कर्तृत्व येऊन आमचे शक्तीचे सहाय्यानें ब्रिटिश साम्राज्य अंशतः तरी प्रबल व्हावें अशी जर लॉर्ड कर्झन यांची कल्पना असती तर लॉर्ड कर्झन यांनीं केलें याहून निराळ्या तऱ्हेचें भाषण केलें असतें ही गोष्ट निर्विवाद आहे. वास्तविक लॉर्ड कर्झन यांची स्वतःची बुद्धी कूपांतील मंडुकाच्या बुद्धीसारखी कोती आहे असा प्रकार नाहीं. परंतु आम्ही हिंदुस्थानवासी लोक हे मात्र कूपांतील मंडुकाच्या योग्यतेचे आहों. या दृष्टीनें पाहिलें असतां त्यांनीं केलेलें भाषण सर्वथैव योग्य होतें.

❖ ❖ ❖

* ख्रिस्तीधर्म व हिंदुस्थानांतील लोकांचें राष्ट्रीयत्व

सुमारें एक महिन्यापूर्वी 'राष्ट्रीयत्वाची कल्पना' या मथळ्याखालीं राष्ट्रीयत्वाची आमची कल्पना काय आहे आणि तिचा प्रसार होण्यास व शेवटीं खुद्द राष्ट्रीयत्वाची सिद्धी होण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत होतात याचें स्थूल विवेचन केलें होतें; व अशा गोष्टींमध्यें स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान व पूर्वेतिहासस्मरण वगैरे गोष्टींचा समावेश केला होता. तथापि समानहितत्व हें राष्ट्रीयत्वाची कल्पना सिद्ध होण्याचें प्रत्यक्ष कारण होय व स्वधर्मप्रीति वगैरे दुय्यम प्रकारचीं होत असेंहि आम्ही सांगितलें होतें. म्हणजे हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींतील लोकांमध्यें जर यापुढें केव्हां राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न होऊन ती प्रबल होण्याचा संभव असेल तर महाराष्ट्रीयांनीं व त्याचप्रमाणें इतर लोकांनीं स्वधर्म, स्वभाषा व आपला पूर्वेतिहास वगैरे विषयींची प्रीति बाळगून सर्वांस समान असे जे राजकीय हक्क ते मिळविण्यास उद्युक्त झालें पाहिजे असें आम्हीं सुचविलें होतें. अर्थात् त्यावेळीं, हिंदुस्थानांतील लोकांस अंगीं राष्ट्रीयत्व येण्यास पाहिजे असेल तर त्यांनीं स्वधर्मप्रीति बाळगावयाची सोडून वरती धर्मांतरहि केलें पाहिजे असें सांगणारे कोणी विद्वान् गृहस्थ कधीं निपजतील असें आमच्या स्वप्नींहि आलें नव्हतें. परंतु मुंबईचे लॉर्ड बिशप म्हणजे मुंबई इलाख्यांतील ख्रिस्ती धर्माध्यक्ष यांनीं लंडन येथें ता. २४ एप्रिल रोजीं जें व्याख्यान दिलें तें पाहून कोणत्या वाटेल त्या गोष्टीनें कोणती वाटेल ती गोष्ट सिद्ध करून देतां येईल याविषयीं आमची शंका नाहींशी झाली. कारण, रेव्हरंड डॉक्टर म्याक् आर्थर, मुंबईचे धर्माध्यक्ष, यांनीं तर असें प्रतिपादन केल्याचें दिसून येतें कीं, हिंदुस्थानांतील लोकांचें राष्ट्र बनण्यास आज फक्त एकाच गोष्टीची काय ती उणीव आहे व ही गोष्ट म्हटली म्हणजे त्यांनीं आपापले धर्म सोडून एकदम ख्रिस्ती धर्माची दीक्षा घ्यावी ही होय. डॉ० म्याक् आर्थर यांचें एकंदर भाषण वाचलें असतां त्यांत खऱ्या व खोट्या गोष्टींची विलक्षण सरमिसळ झालेली दृष्टीस पडते. हिंदुस्थानांतील लोकांचे मनाची स्थिति राजकीय बाबतींत हल्लीं कशी आहे याचें वर्णन बिशप साहेबांनीं इतक्या मार्मिकपणानें केलेलें आहे कीं, तें एखाद्या नेटिवासहि करतां येणार नाहीं. परंतु त्यांच्या भावी राष्ट्रीयत्वाच्या सिद्धीला उपाय म्हणून जो त्यांनीं सांगितला आहे तो मात्र सर्वस्वी चुकीचा सांगितला आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या राजकीय स्थितीबद्दल लोकांच्या मताचें निरीक्षण करून त्यांनीं जे सिद्धांत केले आहेत ते सर्वांशीं बरोबर आहेत. लॉर्ड बिशप यांच्या म्हणण्याप्रमाणें हिंदुस्थानवासी

---

* [केसरी ता. २१ मे १९०१]

लोकांपैकीं शिकलेल्या लोकांचा जो वर्ग आहे त्याचे मनांत एक तऱ्हेची खळबळ उत्पन्न होऊन राजकीय स्वातंत्र्य मिळवावें, आपलें गेलेलें राष्ट्रीयत्व यत्न करून फिरून परत आणावें व ब्रिटिश राज्यछत्राखालींच कां होईना परंतु स्वराज्य करावें अशी प्रबळ इच्छा त्यांचे ठिकाणीं उत्पन्न होऊं लागली आहे. त्या इच्छेस कोणी अराजनिष्ठत्वाची लाट असें म्हणतात, परंतु असें म्हणणें चुकीचें आहे असें लॉर्ड बिशपसाहेबांनीं आपल्या श्रोत्यांस निर्भीडपणें सांगितलें आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ज्या राष्ट्रामध्यें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय झाला आहे त्या राष्ट्रामध्यें एक प्रकारचा असंतोष, कांहींसा चिरडखोरपणा, सरकारचे कृत्यावर टीका करण्याची हौस, संशयखोरपणा व किंचित् एक प्रकारचें अमित्वाहि दिसून येणारच. परंतु लगामानें आंखडून घरलेला एखादा पाणीदार घोडा ज्याप्रमाणें थोडाबहुत दंगा करतो त्याच प्रकारचा दंगा हल्लींच्या सुशिक्षित हिंदुस्थानवासी लोकांचा होय, त्याहून त्यास अधिक वाईट स्वरूप नाहीं. आपण इतर स्वतंत्र लोकांहून काय कमी आहोंत म्हणून आपल्यावर प्रतिबंधाचा एवढा हा जुलूम ? इतर लोकांप्रमाणें आपल्यासहि स्वतंत्र हक्क कां असूं नयेत ? असे प्रश्न त्यांच्या मनापुढें नेहमीं उभे राहत आहेत. तथापि, ब्रिटिश राज्याचे योगानें आपले कोणकोणते फायदे झाले आहेत हें त्यांस पूर्णपणें माहीत असल्यामुळें परकीयांचें वर्चस्व त्यांस अगदींच असहन होत नाहीं, व जरी इंग्लिश लोक त्यांस आवडत नाहींत, तरी त्यांच्याबद्दलची गुणग्राहकता व विश्वास हीं त्यांचे मनांत अद्यापपर्यंत वसत आहेत. तात्पर्य, राष्ट्रीयत्वाची कल्पना त्यांचे डोक्यांत शिरली असूनहि ते अराजनिष्ठ बनलेले नाहींत असें सर्टिफिकीट लॉर्ड बिशपसाहेबांनीं हिंदुस्थानांतील लोकांस दिलें आहे. बिशपसाहेबांचीं वरील विधानें अगदीं बरोबर आहेत हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या प्रस्तुतच्या राजकीयविषयक विचारांचें खरें स्वरूप विलायतेंतील लोकांच्या नजरेपुढें मांडलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारीहि आहों. तथापि, बिशपसाहेबांची ही वस्तुनिरिक्षणदृष्टी त्यांची त्यांस सर्वत्र सारखीच उपयोगी पडत नाहीं, व हिंदुस्थानांतील लोकांच्या धार्मिक स्थितीचें निरिक्षण करतांना त्यांचे दृष्टीवर एक प्रकारचें तमोपटल येऊन त्यांस सर्व हिंदुस्थान ख्रिस्तमय दिसूं लागतें ही गोष्ट मात्र आमच्यानें येथें नमूद केल्यावांचून राहवत नाहीं. कारण, हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रवेश कितपत होण्याचा संभव आहे याविषयीं बोलतांना त्यांनीं आपल्या श्रोतृमंडळास ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या त्या ऐकून कोणासहि हसूं आल्यावांचून रहावयाचें नाहीं. बिशपसाहेबांचें या बाबतींत म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांस ख्रिस्ती धर्माचीं तत्वें आतां मार्मिकपणानें कळूं लागल्यामुळें त्या धर्माविषयीं त्यांची आवड दिवसेंदिवस जास्तच होत चालली आहे. सुशिक्षित लोक ख्रिस्ती बुकांच्या अनुरोधानें ईश्वर-

ज्ञान मिळवूं लागलेले आहेत. ते बायबलचा अभ्यास करतात व तें भक्तिपुरस्सर वाचतात. कित्येक हिंदु गृहस्थ तर केव्हां केव्हां आपल्या मुलांस घेऊन बायबलांतील कांहीं भाग पोथीवजा वाचतात; व हिंदु तत्त्वज्ञानाशीं खिस्ताच्या स्वरूपाचा मेळ पडत नाहीं, तरी खिस्ताबद्दल त्यांस अत्यंत पूज्यबुद्धि वाटत असते. कित्येक हिंदु गृहस्थ बायबल हें उत्तम इंग्रजी भाषा व उत्तम नीति यांचा केवळ निधीच असें जाणून तें शाळांतून सुरूं करावें असेंहि म्हणतात. फार काय पण आज मित्तीचे हिंदु व मुसलमान मनानें बहुधा खिस्तीच बनले आहेत असें लॉर्ड बिशप यांचें म्हणणें आहे. परंतु हें असें जर आहे तर दरवर्षीं बाप्तिस्मा घेणाऱ्या लोकांची संख्या वाढावी कीं नाहीं, व खिस्ती धर्माचें पीक येण्यास हिंदुस्थानांतील शेतकीचें पीक बुडालेंच पाहिजे अशी स्थिति कां असावी असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होणार. म्हणून त्याचेंहि उत्तर लॉर्ड बिशपसाहेबांनीं देऊन ठेविलें आहे. तें असें कीं, हिंदुस्थानांतील लोक मनानें खिस्ती आहेत, परंतु प्रत्यक्ष बाप्तिस्मा घेणार नाहींत, व तो घेऊं नये असा त्यांनीं जाणून बुजून निश्चयच केला आहे. आतां या चमत्कारिक स्थितीचें कारण हिंदुस्थानवासी लोकांवर वाईट तऱ्हेच्या हेतूचा आरोप करून बिशपसाहेबांस आपल्या श्रोत्यांस सांगतां आलें असतें. परंतु त्यांनीं तसें न करितां एक प्रकारच्या उदार हेतूचा आरोप त्यांजवर केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, हिंदुस्थानांतील लोक जातिद्रोह करण्यास भितात असें नाहीं. कारण तसें करण्यांत हल्लीं मुळींच धोका उरलेला नाहीं. तसेंच कुटुंबाचे पाश तोडण्यासहि ते मागें घेतील असें नाहीं. परंतु आज बाप्तिस्मा घेण्यास ते तयार नसण्याचें एकच मुख्य कारण लॉर्ड बिशप यांस सुचलें तें असें कीं, धर्म व राष्ट्रीयत्व यांचा निकट संबंध असल्यामुळें बाप्तिस्मा घेऊन आपल्या राष्ट्रीयत्वास धोका आणण्याची त्यांची इच्छा नाहीं. वरील विधानामध्यें कितपत सत्यांश आहे हें वाचकांस तेव्हांच कळून येण्यासारखें आहे. सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं, लॉर्ड बिशप यांच्यासारख्या तीव्र दृष्टीच्या मनुष्यासहि केवळ आपल्या पगाराचें चीज करण्याकरितां व जो धंदा आपण पतकरला आहे त्यांतील भूमिकेची योग्य बतावणी करण्याकरितां किती सत्यापलाप करण्याची गरज पडलेली आहे ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. हिंदु समाजांत बायबलाचे इतके देव्हारे माजले आहेत असा बिशपसाहेबांचा मह हिंदु म्हणवून घेणाऱ्या आमच्या एका न्यायमूर्तींनीं नुकतेंच जें एल्फिन्स्टन कॉलेजासंबंधीं एका सभेंत नुकतेच तारे तोडले तशा प्रकारच्या भाषणांवरून झाला असेल; परंतु तेवढ्यावरून आज हिंदुस्थानांतील सर्व हिंदुमुसलमान अंतरंगीं खिस्तमय होऊन गेले आहेत असें विधान करण्यास खरोखर खिस्ती लोकांचे अंगीं असलेलें धाष्टर्यच पाहिजे त्याशिवाय तें होणार नाहीं. हिंदु आणि मुसलमान लोकांस आपल्या राष्ट्रीयत्वाचा पाया आपापल्या धर्मावरच रचला गेला पाहिजे असें वाटतें

हें खरें आहे. तथापि तेवढें शिवाय करून हिंदुस्थानांतील सर्व लोक आज बातिस्मा घेण्यास एका पायावर तयार आहेत अशा प्रकारचें विधान धर्मप्रसार हा पोटाचा धंदा करणाऱ्यानें व धर्मप्रसार हा राजकीय साम्राज्य वाढविण्याचा श्रीगणेशा आहे अशा दृष्टीनें पैसे खर्च करणाऱ्या लोकांपुढेंच केलेलें शोभतें.

* ❊ ❊ ❊

* शेतकऱ्यांनों व सावकारांनों, सावध व्हा

इंग्रजी राज्याची एक एक तऱ्हा पाहावी तों विलक्षणच आहे; व त्यांतून जमिनीसंबंधानें जे कायदे झाले आहेत व होत आहेत त्यांचें धोरण तर फारच विलक्षण आहे. मुसलमानी राज्यांत किंवा पेशवाईत सरकारची कितीहि सक्ती असली.तरी मिरासदाराची जमीन त्याच्या स्वतःच्या मालकीची राहत असे. एखादे वेळीं सरकारसारा थकला तरीहि मिरासदाराचा हक्क नाहींसा न होतां उत्पन्नांतून सरकारसारा वसूल झाल्यानंतर मिरासदारास आपली जमीन परत मिळत असे. सारांश, मिरासदार म्हणजे जमिनीचा मालक होता, व तृण, काष्ट, तरु, पाषाण वगैरे जें कांहीं त्यांच्या जमिनीच्या खालीं किंवा पृष्ठभागावर उत्पन्न होई तें सर्व मालकी हक्कानें त्यास मिळत असे. जे मिरासदार नाहींत त्यांस उपरी म्हणत. उपरी म्हणजे जमिनीच्या लागवडीकरितां मिरासदार लोक किंवा इनामदार लोक आपल्या जमिनी कांहीं वर्षांच्या कबुलायतीनें ज्या कुळांस देत तीं कुळें. यांस फक्त जमीन लागवड करण्याचाच हक्क असे. मिरासदार व उपरी हा भेद फार प्राचीन आहे; व एकदां सर्वच जमीन मिरासी हक्काची असून उपरी कुळें मिरासदार किंवा इनामदार यांनीं पुढें अस्तित्वांत आणलीं असें कित्येकांचें मत आहे. कसेंहि असो; शेतकरी म्हणजे जमिनीचा मालक ही आमचेकडील प्रांतांत तरी प्राचीन समजूत असून वहिवाटहि तशीच होती. अर्थात् त्यावेळीं मिरासी हक्क संपादण्यांत लोकांस भूषण व अभिमान वाटे व जमिनीची लागवडहि लोक आस्थेनें करीत. शेतकऱ्याचा हा हक्क काढून घेण्याचा आमच्या जुन्या राजांनीं कधींहि प्रयत्न केलेला नाहीं. उलट कित्येक ग्रंथांतून अशीं वचनें आहेत कीं, जमीन शेतकऱ्यांची, दुसरे कोणाची नाहीं, व राजाचा हक्क फक्त महसूल घेण्यापुरता आहे; इतकेंच नव्हे, तर राजानें कोणास एखादा गांव इनाम दिला तर जमिनीचा कर घेण्याचा हक्क इनामदारासच येतो. परंतु जमीन मिरासदारांची असल्यास ती

---

* [केसरी ता. ४ जून १९०१]

स्यांच्याच मालकीची राहते. दक्षिणेंत व महाराष्ट्रांत हीच पद्धत जारी होती अशा-बद्दल बळकट पुरावे आहेत. पण पेशवाई बुडून इंग्रजी राज्य झाल्यानंतर सर्व्हे-सेटलमेंट होऊन सदर खात्यानें मिरासदाराच्या हक्काची बहुतेक राखरांगोळी केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. या थोरपणाचा अखेर असा परिणाम झाला कीं, सन १८७९ च्या काळीच्या जमीन महसुलाच्या कायद्यांत शेतकरी हा जमिनीचा मालक नव्हे, तर जमिनीच्या पृष्ठभागावर लागवड करण्याच्या हक्काचा मालक आहे, अशी शेतकऱ्याची चमत्कारिक व्याख्या होऊन गेली. ही गोष्ट शेतकऱ्यांस चांगल्या रीतीनें तेव्हां किंवा अद्यापि कळली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. माझें शेत, माझें शेत, म्हणून जो शेतकरी ओरडत असतो त्यास जर असें सांगितलें कीं, शेत तुझें नव्हे व तुझ्या बापाचेंहि नव्हे, तें सरकारचें आहे व तूं सरकारास मुद्दतशीर सारा भरीत आहेस तोंपर्यंत जमिनीचा पृष्ठभाग नांगरून त्यांत उत्पन्न होणारें धान्य वगैरे घेण्याचा मात्र वंशपरंपरेचा हक्क तुला दिला आहे; तर त्यास या कायद्याच्या गूढाचा कांहीं अर्थ न समजतां तो बिचारा निवळ गांगरून जाईल. हे कायदे ज्यावेळीं कायदेकौन्सिलांतून पास झाले त्यावेळीं कै० रा. सा. मंडलीकांसारख्या कांहीं सभासदांनीं ही सरकारची युक्ती ओळखून सरकारचें धोरण एकंदरींत बरें नाहीं, असें स्पष्टपणें सरकारास जाहीर केलें होतें. पण त्याचा कांहीं एक उपयोग न होतां अखेरीस शेतकरी म्हणजे जमिनीचा पृष्ठभाग नांगर-ण्याचा व त्यापासून होणारें उत्पन्न सरकारास सारा भरीत आहे तोंपर्यंत घेण्याचा ज्यास वंशपरंपरा हक्क आहे तो इसम असा अर्थ सन १८७९ सालापूर्वीच होऊन गेला. सारांश मागील पद्धति मोडून जाऊन जमिनीचे मालक सरकार झालें आणि जमिनीच्याऐवजीं जमिनीचा पृष्ठभाग सारा भरीत आहों तोंपर्यंत वंशपरंपरेनें आमच्या मालकीचा राहिला ! खालीं दगडाची किंवा सोन्याची खाण लागली किंवा वर पांखरूं आलें तर तें सरकारचें परंतु सरकारानें मेहरबान होऊन आम्हांस एवढी सवलत ठेविली होती कीं, हा जो पृष्ठभाग लागवड करण्याचा हक्क तो आम्ही पाहिजे त्यास विकावा किंवा गहाण द्यावा; सरकारास सारा जोंपर्यंत मिळत आहे तोंपर्यंत तें त्यांस कधींहि प्रतिबंध करणार नाहीं. इंग्रजी राज्यांत जमिनोची मालकी म्हणजे हीच होती, व तीहि आतां काढून घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

मिरासीचा हक्क गेला आणि जमिनीचा पृष्ठभाग वंशपरंपरेनें तीस वर्षांनीं वाढणारे सारे भरीपर्यंत लागवड करण्याचा हक्कहि गेला, व आतां अशी स्थिति येणार आहे कीं, जमीन सरकार देईल तितकीं वर्षें लागवड करावी, सारा भरावा आणि नकोशी झाल्यास सरकारास परत करावी; पण सरकारच्या मंजुरीखेरीज कोणास विकूं नये किंवा गहाण ठेवूं नये. सारांश, जी जमीन माझ्या मालकीची, जी जमीन माझी दौलत, जो जमीन माझें भांडवल व माझ्या मुलांबाळांस मी जी

जमीन इस्टेट म्हणून ठेवणार, ती माझी नसून सरकारची, व सरकार देईल तर ती नांगरून त्या त्या सालापुरतें आपलें पोट भरावें अशी अत्यंत शोचनीय स्थिति आमच्या शेतकऱ्यांची या राज्यांत लवकरच व्हावयाची आहे; आणि ती कशाकरितां म्हणाल, तर शेतकऱ्यांचें कल्याण व्हावें म्हणून ! गेल्या आठवड्यांत महाबळेश्वरास जो एक कायद्याचा नवीन मसुदा आला आहे व जो लवकरच पास होण्याचा रंग दिसत आहे त्यांतील इत्यर्थ वरच्याप्रमाणें असून, या पुढील कृत्याचा आज या नव्या कायद्यानें पाया घालण्याचा सरकारचा विचार आहे. हल्लींच्या लँड रेव्हिन्यू कोडप्रमाणें एकदां शेतकऱ्यांस जमीन मिळाली म्हणजे तो तिच्या पृष्ठभागाचाच कां होईना पण वंशपरंपरेचा मालक बनतो. तीस वर्षांनीं पाहिजे तर सरकारानें सारा वाढवावा, पण जमिनीच्या पृष्ठभागावरील मालकी हक्क शेतकऱ्याचा व तो हक्क त्यानें पाहिजे त्यास विकावा किंवा गहाण द्यावा. तात्पर्य कसें झालें तरी जमीन म्हणून त्याची कांहीं तरी इस्टेट असे; पण आतां तशी इस्टेट त्याच्या हातांत राहिल्यानें तो ती विकून किंवा सावकाराकडे गहाण ठेवून आपण पुनः दरिद्रीच्या दरिद्री राहतों, असें दयाळू सरकारच्या नजरेस आल्यावरून त्यांनीं अशी युक्ति काढली आहे कीं, या बेट्या शेतकऱ्यांकडे जमिनीची मालकीच जाऊं देऊं नये. त्याला सदैव उपरी कुळासारखा वागवून जमिनीची मालकी सरकारनें आपल्या हातांत ठेवावी ! ही युक्ति म्हणजे बहुतेक 'तुला तुझ्या पैशाचा उपयोग करतां येत नाहीं म्हणून मी तो घेऊन तुला नोकर ठेवतों' असें म्हणण्याइतकीच शहाणपणाची आहे. ही युक्ति शेतकऱ्याच्या फायद्याची आहे असें जर खरोखर सरकारचें मत असेल तर इनाम गांवांतील किंवा खोती गांवांतील उपरी कुळें कायमचीं करण्याबद्दल सरकार एवढी जी धडपड करीत आहे ती कशाला ? उपरी कूळ या नात्यानें राहण्यांतच जर शेतकऱ्यांचें हित आहे तर मग इनामदारांचीं सर्व कुळें उपरी करून टाकण्यास काय हरकत आहे ? इनामदार स्वार्थसाधू आणि कर्जबाजारी असतात असाच जर आक्षेप घ्यावयाचा असेल तर तो आक्षेप सरकारास बिलकुल लागूं पडत नाहीं असें नाहीं. कारण; हिंदुस्थानसरकारासहि पुष्कळ कर्ज आहे; आणि त्यांची स्वार्थपरायणता इतकी जबर आहे कीं, दुष्काळांत मोकळ्या हातानें शेतकऱ्यांस सूट देणें त्यांच्या जिवावर आलें आहे. सारांश, सरकार म्हणजे एक मोठें इनामदारच आहे. आणि सामान्य इनामदारास जो न्याय लागू करावयाचा तो सरकारास कां करूं नये हें आम्हांस समजत नाहीं. असो, शेतकऱ्याच्या हितांकरतां शेतकऱ्यास उपरी कूळ बनवावयाची युक्ति तर निघाली, पण ती अमलात कशी आणावी याबद्दल आज बरेच दिवस वाटाघाट चालू होती. ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्टानें शेतकऱ्याची जमीन सावकारास लवकर विकतां येऊं नये, निदान हातावरील कर्जाकरितां तरी विकतां येऊं नये, असा बंदोबस्त झाला.

पण तरीहि सावकाराच्या हातांत जमिनी जातात असें दिसून आलें. तेव्हां शेतकऱ्यास आपली जमीन विकण्याचा मुळींच हक्क नसावा अशी चार शाहण्यांनीं तोड काढली; व त्याप्रमाणें पंजाबाकरितां असा कायदा पास करण्यांत आला कीं, शेतकऱ्यानें शेतकऱ्याखेरीज आपली जमीन दुसऱ्या कोणासहि विकूं नये. पण आमच्या मुंबईकरांचें दुर्दैव याहीपेक्षां जास्त ओढवलें आहेसें दिसतें. देशांतील लोकांचे इतर उद्योगधंदे सर्व बुडाले, शेतकीवरच सर्वांस निर्वाह करावा लागतो व त्यामुळें शेतकरी भिकारी होत चालले इकडे कोणाचेंहि लक्ष जात नाहीं, व गेलें तरी ती दिशा कोणीच घेत नाहीं. जामिनीवरील प्रेम किंवा जामिनीवरील मालकीचा अभिमान हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या अंगीं इतर देशांतील शेतकऱ्यांपेक्षां कांहीं कमी आहे असें नाहीं व जमीन विकावयाची म्हणजे त्यांस केव्हांहि मोठें संकट वाटतें. पण करतात काय ? जामिनीचें उत्पन्न कुटुंबास पुरेसें नसतें आणि दुसरा उद्योगधंदा पाहावा तर तोहि इंग्रजी राज्यांत नाहींसा झालेला. तेव्हां सावकाराचें घर पाहणें त्यास जरूर येतें व अखेरीस आपणांस प्रिय असलेली जमीनहि विकावी लागते. या संकटांतून त्यास सोडवावें अशी खरोखर ज्यांची इच्छा असेल त्यांनीं देशांतील उद्योगधंद्यांची वृद्धी करून गरीब लोकांस जिकडून मजुरी जास्त मिळेल अशी तजवीज केली पाहिजे. पण तें कांहीं एक न करतां शेतकऱ्याचा मालकी हक्क काढून घेण्याकडे सरकारची नजर गेलेली आहे. आज महाराष्ट्रांत जे हजारों शेतकरी आहेत त्यांचे हक्क अशा तऱ्हेनें काढून घेतले असतां लोकांत अत्यंत असंतोष उत्पन्न होऊन कदाचित् शेतकऱ्यांचे दंगेहि होतील ही गोष्ट सरकारच्या लक्षांत आहे, व एवढ्या करतांच हें उंटाचें पिल्लूं आमच्या घरांत हळू हळू सोडण्याचा त्यांचा विचार आहे. गुजराथचे कमिशनर मि. लिली यांनीं अशी युक्ति सुचविली आहे कीं, दुष्काळांत सारा न दिल्यामुळें आंतां शेकडों जमिनी खालसा कराव्या लागतील, व त्या खालसा केल्या म्हणजे घुन्हां त्यांच्या मालकी हक्काचा आजपर्यंतच्या वहिवाटीप्रमाणें लिलांव न करितां त्या जमिनी कांहीं वर्षें मुदतीच्या कबुलायतीनें लोकांस द्याव्या; व सदर कबुलायतींत कुळानें ती जमीन गहाण टाकूं नये अगर विकूं नये, अशी शर्त घालावी. परंतु हल्लींच्या कायद्यांत खालसा केलेल्या जमिनी अशा रीतीनें कुळास देण्यास कलेक्टर यांस अधिकार नाहीं. तो अधिकार लँ. रे. कोडांत दुरुस्ती करून त्यांस द्यावा या हेतूनें हल्लीं कौन्सिलपुढें लँड रेव्हिन्यु कोड दुरुस्त करण्याचें बिल आणलें आहे. दुष्काळांत खालसा केलेल्या जमिनीस हें तत्त्व पहिल्यानें लागू केलें म्हणजे हक्क बुडविल्याबद्दल कोणाची तक्रार नको आणि एकदां लोकांस उपरी कुळें बनविण्याची ही पद्धत बरी वाटल्यास चोहोंकडे सुरू करावयाची. 'बरी वाटल्यास' अशी जरी आज शर्त घातली आहे तरी तींत कांहीं अर्थ नाहीं. कारण सरकारानें अंगिकारलेली अशी कोणती

गोष्ट आहे कीं, जी सरकारच्या खालील अधिकाऱ्यांनीं अखेरीस बरी ठरविली नाहीं ? तेव्हां हा नवीन कायदा पसार होऊन जर कलेक्टरास वर लिहिल्याप्रमाणें अधिकार मिळाला तर आज दुष्काळांत खालसा झालेल्या जमिनींस जी पद्धत लागू करावयाची तीच पद्धत पुढें इतर जमिनीसहि लागू व्हावयाची आहे. करितां वेळींच सर्व लोकांनीं सावध होऊन या उंटाचे पिल्लास घरांत न येऊं येण्याची एव्हांपासूनच तजवीज केली पाहिजे. शेतकऱ्यास जमीन आपली अशी वाटूं नये सदैव उपरी कूळ असें वाटावें, ही स्थिती आमच्या मतें फार भयंकर व शोचनीय आहे; व कांहीं दिवसांनीं अशी स्थिती यावयाची आहे कीं, कलेक्टर हा जिल्ह्याचा बडा इनामदार व बाकी सर्व त्याचीं उपरी कुळें ! सारांश, या देशांतील जमीन आमची ही देखील समजूत या राज्यांत आतां शिल्लक राहील कीं नाहीं याची भीति पडलेली आहे. सर्व हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस अशा रीतीनें उपरी कुळें बनविणें हें शहाणपणाच्या किंवा अर्थशास्त्राच्या दृष्टीनेंहि मोठ्या चुकीचें होय. जमीन आपली आहे अशी जर शेतकऱ्यांची समजूत असेल तर तो कष्टानें जमीन वाहील. नाहींपेक्षां उपरी कूळ झाल्यानें त्यास कोणी कर्ज देणार नाहीं आणि जमिनीचीहि तो तितक्या काळजीनें मेहनत घेणार नाहीं. अशा प्रकारचा शेतकरी वर्ग जेथें गुलामगिरीचा व्यापार चालू आहे त्याखेरीज इतरत्र कोठेंहि चालू नसेल. पण त्या विषयाची आमच्या सरकारास परीक्षा पहावयाची आहे व तेवढ्याकरितांच हल्लींचें बिल कौन्सिलपुढें आणलेलें आहे. करितां महाराष्ट्रांतील सर्व लोकांस आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या वेळीं स्वस्थ न बसतां हें उंटाचें पिल्लूं घरांत न शिरेल असा एव्हांपासूनच बंदोबस्त करण्यास लागावें. हें बिल मोठें घातुक आहे आणि तें पास झाल्यास आज नाहीं तर कांहीं कालानें तरी आमचा शेतकरी वर्ग गुलामाइतकाच नीच अवस्थेस पोहोंचणार आहे. त्यास कोणी साऱ्याकरितां पैसे द्यावयाचा नाहीं कीं कर्ज द्यावयाचा नाहीं; व दुष्काळाच्या वेळीं सरकारचा सारा वसूल होण्याचीहि मारामार पडेल. या सर्व अडचणी सरकारच्याच अनुभवास पुढें येतील, नाहीं असें नाहीं; पण सध्यां दुष्काळांत खालसा झालेल्या जमिनीचा फायदा घेऊन शेतकऱ्याच्या मालकी हक्कावर अखेर गदा आणण्याचा उपक्रम करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. करितां शेतकरी व सावकार लोक यांनीं वेळींच सावध होऊन आपली इस्टेट म्हणजे जमिनीचा मालकी हक्क याचें सरकारकडे अर्ज करून रक्षण करण्याची खबरदारी घ्यावी, अशी त्यांस पुनः एकदां सूचना करून आजचा हा लेख संपवितों.

❖ ❖ ❖

*जमिनीची मालकी बुडाली !

या विषयाच्या संबंधानें मागें एक लेख प्रसिद्ध झालाच आहे. आज दुसरीकडे हल्लीं जें बिल कौन्सिलपुढें आलें आहे त्याच्या दहा कलमांचा गोषवारा देऊन त्यापासून होणाऱ्या अनिष्ट परिणामाचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. हिंदुस्थानांत आजपर्यंत पुष्कळ राजे झाले; पण या देशांतील शेतकऱ्यांना निवळ उपरी कुळांची स्थिति आणण्याचा कोणी प्रयत्न केलेला नव्हता. शेतकऱ्याची उपजीविका जमिनीवर तर खरीच; पण " माझी जमीन " म्हणून एक प्रकारचें आपल्या जमिनीबद्दल जें प्रेम त्याच्या ठायीं वसत असतें, तें तो आपणास जमिनीचा मालक समजतो म्हणून होय. मीं जमिनींत सुधारणा केल्या असतां त्यांच्या योगें माझा कायमचा फायदा होईल; अर्थात् तो मलाच नव्हे तर माझ्या पोराबाळांसहि उपभोगावयास सांपडेल; जमीन दोनचार वर्षांकरितांच माझ्या ताब्यांत लागवडीकरितां दिली आहे असें नाहीं, तर ती माझी व माझ्या मागें माझ्या मुलाबाळांची आहे ही समजूत आमच्याकडे शेतकऱ्याची आज हजारों वर्षें चालत आलेली आहे. राजाचें देणें किंवा षष्ठांश राजास देण्यास आमच्या शेतकऱ्यांनीं कधींहि कुरकुर केलेली नाहीं. पण तो नियमित असावा आणि त्याच्या मोबदला परचक्रापासून आपलें संरक्षण व्हावें, इतकेंच नव्हे तर आपल्या देशांतील कलाकौशल्य, उद्योगधंदे यांसहि राजाकडून उत्तेजन मिळत गेलें पाहिजे अशी आमची समजूत आहे. परंतु इंग्रजी राज्यांत या समजूतीवर बराच घाला आलेला आहे. परचक्रापासून आमचें संरक्षण उत्तम रीतीनें होत आहे हें खरें, पण मुसलमानांच्या टोळ्या किंवा त्यांच्या तरवारी यांच्याऐवजीं परकी व्यापारी व त्यांचा व्यापार या देशांत येऊन त्यांनीं जी नासाडी केली आहे ती त्याहिपेक्षां फार भयंकर आहे. हळूहळू देशांतील सर्व धंदे बुडून आतां शेतकीवर निर्वाह करण्याची पाळी आली आहे; व सर्वांचाच भार शेतकीवर पडल्यामुळें त्या धंद्यांतील किफायतहि उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. अशा स्थितींत शेतकऱ्याचा खरा बचाव ज्यास करणें असेल त्यानें त्यांच्याकरितां शेतकीखेरीज दुसरे धंदे देशांत निर्माण होतील अशी तजवीज केली पाहिजे; किंवा शेतींतच अशा प्रकारची सुधारणा करावयास पाहिजे कीं, जेणेंकरून जमिनींचें उत्पन्न वाढून त्यानें इतर उद्योगधंदे बुडाल्यामुळें उदरनिर्वाहार्थ जमिनीवर ज्या लोकांचा जास्त भार आला त्यांची सोय होईल. पण अशी तजवीज न करतां आमचें सरकार भलभलत्याच तजविजीस पहिल्यानें लागलें आहे.

---

* [केसरी ता. १८ जून १९०१]

शेतकरी बुडण्याचें मुख्य कारण सावकार, अशी खोटीच समजूत मनांत घेऊन सावकारांच्या कर्जातून शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याकरितां वीसबावीस वर्षांपूर्वी आमच्याकडे एक कायदा करण्यांत आला. पण त्यापासून शेतकऱ्यांची स्थिति गेल्या वीस वर्षांत सुधारल्याचें कोठेंहि आढळून आलें नाहीं. उलट गेल्या दोन दुष्काळांत असें दिसून आलें कीं, शेतकऱ्यांचा ॲक्ट ज्या जिल्ह्यांत लागू केला आहे तेथेंहि एक वर्ष पाऊस न पडल्याबरोबर हजारों लोकांच्या झुंडी दुष्काळाच्या कामावर येऊन थडकल्या. सारांश, शेतकरी आणि सावकार यांच्या दरम्यान जो व्यवहार चालतो त्यास कितीहि आळा घातला तरी शेतकऱ्याची स्थिति सुधारली नाहीं हें गेल्या दुष्काळावरून स्पष्ट आहे. तेव्हां शेतकऱ्याची स्थिति सुधारावी कशी हा प्रश्न पुन्हां सरकारापुढें येऊन पडला आहे. पण प्रश्न पुन्हां उपस्थित झाला तरी सरकारी अधिकाऱ्यांचीं डोकीं पूर्वीच्याच खोट्या कल्पनांनीं भरलीं असल्यामुळें त्यांना शेतकऱ्यांस बुडविणारा सावकाराखेरीज दुसरा कोणी दिसत नाहीं. शेतकऱ्यांचा कायदा करून कांहीं फायदा झाला नाहीं तर आतां शेतकऱ्यास जमीनच विकूं देऊं नये, वाटेल तितक्या दिवस ती त्यानें वाहावी, व नकोशी झाली म्हणजे सरकारास परत द्यावी, असा कायदा करण्याचें ठरून त्याप्रमाणें हल्लींचें बिल कायदेकौन्सिलापुढें आलेलें आहे. यापासून काडीचा देखील फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. उलट शेतकऱ्यांस कोणी कर्ज देणार नाहीं, जमिनीचा सारा दरसाल सरकारच्या पदरीं पडणार नाहीं आणि शेतकऱ्यास मालकी हक्क नसल्यागुळें जमिनीची कधीं सुधारणाहि व्हावयाची नाहीं. विपन्न झालेल्या आयर्लंडांतील शेतकऱ्यांस जमिनीचें मालक बनविण्याच्या कायद्याचा उपक्रम सुरू आहे आणि आमचेकडे शेतकऱ्याकडे असलेली जमिनीची मालकी काढून घेऊन त्यास सरकारचीं उपरी कुळें किंवा बंदे गुलाम बनविण्याचा आजपर्यंत कधीं न झालेला प्रयत्न चालू आहे हें पाहून आमच्या सरकारच्या हल्लींच्या कृत्याबद्दल आश्चर्य व खेद वाटल्यावांचून रहाणार नाहीं ! इंग्रज सरकारच्या कारकीर्दीत मोजणी होऊन तीस वर्षांची सारा-आकारणीची पद्धत अमलांत आल्यानें चोहोंकडे नव्या जमिनी लागवडीस येऊं लागल्या वगैरे आजपर्यंत जे सर्व्हे कामगारांनीं व रेव्हिन्यू कामगारांनीं रिपोर्ट केले आहेत ते सर्व खोटे आणि चुकीचे आहेत काय ? मॉंटिथ साहेबांनीं आपल्या भाषणांत या गोष्टीचा उल्लेख केलेला होता पण त्यांचें समर्पक उत्तर दिल्याचें कोठेंहि आढळून आलेलें नाहीं. त्यांचें एवढेंच म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यास जमीन विकण्याची परवानगी नसल्यानें त्याची स्थिति कशी सुधारते याचा अनुभव घेण्याकरितां हें बिल आणलेलें आहे. ठीक आहे. अनुभवच घ्यावयाचा असेल तर एक दोन जिल्ह्यांत घ्या, सर्व जिल्ह्यांतील पडित जमिनीस हा कायदा कशा-

करितां लागू करतां ? शेतकऱ्याचा कायदा चारच जिल्ह्यांस लागू केलेला आहे; तसा हल्लींचा कायदा एक दोन जिल्ह्यासच लागू करून त्याचा परिणाम काय होतो तो पहा आणि मग तरी हें उंटाचें पिल्लूं लोकांच्या घरांत सोडा. पण हल्लींच्या बिलांत तशा प्रकारचा हेतु बिलकूल आढळून येत नाहीं. आमची समजूत काढण्याकरितां म्हणून मॅंटिथ साहेबांनीं आमच्या तोंडास एक दोन पानें पुसलीं आहेत. पण त्यांच्या सर्व भाषणावरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते; ती ही कीं, मिरासी हक्क बुडविण्याची ही जी सरकारनें नवीन युक्ति काढली आहे ती पाहिल्यानें जरी पडीत जमिनीस लाविली असली तरी उत्तरोत्तर आमच्या इलाख्यांतील सर्व शेतकऱ्यांस मालकाच्या ऐवजीं मजूरदार बनविण्याचा सरकारचा इरादा आहे. आणि मौज अशी आहे कीं, हें सर्व कृत्य शेतकऱ्यांच्या कल्याणाकरितां आहे अशा झोंकावर व डौलावर त्याची मांडणी करण्यांत आली आहे. सरकारचा हेतु स्तुत्य असेल; पण त्यांनीं आणलेल्या बिलावरून जर त्यांच्या हेतूची कल्पना करावयाची असेल तर हें बिल म्हणजे आमच्या मिरासी हक्कावर घाला घालण्याचा ओनामा आहे असें स्पष्ट म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. मुंबई इलाख्यांतील सिव्हिल सर्व्हिसमध्यें कोणीहि या घातुक कल्पनेचा प्रतिकार करण्यास तयार होऊं नये हें एक आमचें दुर्दैव होय. शेतकऱ्याची आपल्या शेतावर पूर्ण मालकी असल्यानें एखादे वेळेस एखादा शेतकरी आपलें शेत अविचारानें विकील, नाहीं असें नाहीं. पण जगामध्यें असें कोणतें तत्व आहे कीं त्याचा कधींहि दुरुपयोग होत नाहीं. हिंदुस्थानांत घडून येणाऱ्या आत्महत्येच्या संख्येवरून किंवा सर्पदंशानें मरण पावलेल्या लोकांच्या संख्येवरून उद्यां जर कोणी असें प्रतिपादन करूं लागला कीं, हिंदुस्थानच्या लोकांस सदैव अटकेंत ठेऊन बाहेर फिरूं न देणें यांतच त्यांचें हित आहे, तर त्याचा सिद्धांत जितका मूर्खपणाचा दिसेल तितकाच हल्लींच्या बिलांतील सिद्धांत असमंजस होय. उद्योगधंद्याचा नाश, साऱ्याची सक्ती वगैरे कारणांनीं जमिनीवर निर्वाह होणें अशक्य होऊन शेतकरी लोकांस पोटाकरितां किंवा साऱ्याकरितां सावकाराकडे जावें लागतें हें खरें आहे; पण तेवढ्याकरितां जमीन दुसऱ्याच्या नांवावर करून देण्याचा शेतकऱ्याचा हक्कच काढून घेणें या शहाणपणास काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. कसेंहि झालें तरी सावकार आणि शेतकरी एकाच गांवांत असल्यामुळें सावकारास शेतकऱ्याचा बचाव कांहीं झालें तरी करावा लागतोच; कारण त्यास माहीत असतें कीं, शेतकरी आहे तर आपणास उत्पन्न मिळणार आहे. नाहींपेक्षां आपणास स्वतः हाबांत नांगर धरून कांहीं जमीन नांगरतां यावयाची नाहीं. शेतकरी आणि सावकार यांजवर जो सामाजिक निर्बंध आहे तो शेतकरी व सरकार यांच्या दरम्यान राहणें अशक्य आहे; व म्हणूनच आमचें असें मत आहे कीं, शेतकऱ्यांस

उपरी कुळें बनविल्यानें त्यांचें सर्वस्वी नुकसान मात्र होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, आपण असें समजूं कीं, एका गांवांतील एक पडीत किंवा दुष्काळांत जप्त झालेला नंबर नवीन बिलाप्रमाणें एखाद्या शेतकऱ्यास कलेक्टरसाहेबांनीं उद्यां दहा वर्षांच्या मुदतीनें देऊन त्यानें तो कोणास विकूं नये किंवा गहाण ठेऊं नये अशी शर्त घातली. आतां या नंबराचें उत्पन्न या शेतकऱ्याच्या कुटुंबास पुरून थोडीशी शिल्लक राहण्यापुरतें असेल तर ठीकच आहे. पण अशा रीतीनें प्रत्येक नवीन उपरी कुळास दहा पांच बिघे जमीन देतां येईल किंवा नाहीं याची शंकाच आहे. अर्थात् त्याचा परिणाम असा होणार कीं, जमिनीचें उत्पन्न वर्षाच्या वेगमीस पुरेसें नसलें म्हणजे साऱ्याची रक्कम भरण्यास शेतकऱ्यास तूट पडणार आणि सावकाराकडे जावें तर जमीन गहाण ठेवण्याचा किंवा विकण्याचा हक्क नसल्यामुळें तेंहि द्वार बंद झालेलें. दुष्काळच्या प्रसंगीं तर त्याची स्थिति विचारावयासच नको. आवर्षणास सुरवात झाल्यापासून पुन्हां वृष्टी होईपर्यंत दुष्काळच्या कामावर त्यानें आपलें पोट भरलें पाहिजे. देशाची स्थिति हल्लींच विपन्न झालेली आहे; तशांत अशा प्रकारचे शेतकरी निर्माण करून भर घालण्याची कल्पना ज्यास सुचली त्याची बुद्धि खरोखरच अचाट असली पाहिजे यांत शंका नाहीं. सारांश कोणत्याहि दृष्टीनें पहा, शेतकरी किंवा सरकार या दोघांसहि लोकांचे मिरासी हक्क बुडविल्यापासून कांहीं फायदा नाहीं. दुष्काळच्या प्रसंगीं जमिनी खालसा झाल्यामुळें कोणाचे कायदेशीर हक्क न बुडवितां ही नवी पद्धत अमलांत आणण्यास चांगली संधी मिळाली आहे या सबबीवर हल्लींचें बिल पास करण्याची घाई चालली आहे व दुष्काळांत ज्याच्याकडे सारे थकले त्यांच्या जमिनी एकदम जप्त करून या जप्त केलेल्या जमिनीचा लिलांव करण्याचें काम सध्यां तहकूब ठेवलें आहे. हें सर्व करण्यांत सरकारचा हेतु बरा असेल. पण आमच्या दृष्टीनें, अनुभवानें व बुद्धीनें मिरासहक्क बुडविण्याची ही नवी पद्धत कोणासहि श्रेयस्कर व्हावयाची नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे व सरकारास आमचें एवढेंच सुचविणें आहे कीं, दुष्काळांत दारिद्र्यामुळें सारा भरण्या चेंहि ज्यांस सामर्थ्य राहिलें नाहीं त्यांच्या जमिनी कायद्यानें जप्त झाल्या असल्या तरी तेवढ्याच सबबीवर त्यांचे मिरासी हक्क काढून घेऊन त्यांना उपरी कुळें बनविणें अन्याय्य आहे. दुष्काळाचें संकट आमच्यावर आलें तें आलेंच; पण या ईश्वरी क्षोभाबरोबर राजक्षोभ होऊन आजपर्यंत कोणत्याहि राजानें काढून न घेतलेले मिरासी हक्कहि सरकारानें काढून घ्यावे हें आमचें दुर्दैव होय ! "ज्यांस सारा देण्याची शक्ति नसेल त्यास दुष्काळांत सूट मिळेल" अशीं जीं सरकारानें वेळोवेळीं अभिवचनें दिलीं आहेत त्यांस या बिलानें हरताळ लागत आहे हें सरकारानें लक्षांत आणावें. ऑ. मॉन्टिथ किंवा लेली यांची जी कोटी आहे कीं, दुष्काळांत सारा न दिल्यामुळें जप्त झालेल्या जमिनी पुन्हां वाटेल त्या शर्तींवर

दुसऱ्या कोणास देण्याचा सरकारास हक्क असल्यामुळें हल्लींच्या बिलानें कोणाचेहि हक्क बुचाडले जात नाहींत, ती अगदीं बॅरिस्टरी काढ्याची किंवा फसवणुकीची आहे. दुष्काळांत ऐपतदार माणसानें जर सारा दिला नसेल तर त्याच्या जमिनीचें वाटेल तें करा, पण दक्षिण व गुजराथ प्रांतांत आज ज्या बऱ्याच जमिनी जप्त झाल्या आहेत त्या गरीब लोकांच्या असून त्यांस सारा देण्याची ऐपत नसल्यामुळें त्या जप्तींत आल्या आहेत. अशा लोकांस साऱ्याची एक सालची सूट देऊन त्यांचे मिरासी किंवा मालकी हक्क कायम ठेवणें हेंच शाहण्या राज्यकर्त्यांचें कर्तव्य होय; किंबहुना अशा स्थितींत गरीब शेतकऱ्यांस एक वर्षाच्या साऱ्याची सूट मागण्याचा हक्क आहे असें म्हटलें तरीहि चालेल ! पण हा त्यांचा हक्क किंवा ज्यांस सारा देण्याची ऐपत नसेल त्यांस सूट मिळेल अशीं वारंवार दिलेलीं अभिवचनें एकीकडे ठेवून मॉंटीथ किंवा लेली त्यांच्यासारख्या कामगारांनीं भर कौन्सिलांत मिरासी किंवा मालकी हक्क बुडविण्याची ही उत्तम संधी आलेली आहे, अशा रीतीनें प्रतिपादन करण्याचें धाडस करावें आणि तें आमच्या कांहीं मेंबरांनीं मुकाट्यानें ऐकून घ्यावें हें आमचें मोठेंच दुर्दैव होय ! परमेश्वराची अवकृपा झाली ती झाली. पण त्यांतच सरकार भर घालून आमच्या दुःस्थितीचा घडा पुरा भरून काढीत आहे, दुसरें कांहीं नाहीं.

असो, हें जें संकट आलें आहे त्याच्या प्रतिकारार्थ ठिकठिकाणच्या लोकांनीं सरकाराकडे अर्ज करणें हा एकच मार्ग आहे. दुष्काळांत जमिनी जरी खालसा झाल्या असल्या तरी चौकशी करून केवळ ऐपत नसल्यामुळें ज्यांच्या जमिनी खालसा झाल्या आहेत त्यांस या साऱ्याची सूट देऊन किंवा दोन चार वर्षांत भरण्याची सवलत देऊन पुन्हां त्या जमिनी त्यांजकडेसच चालविण्याबद्दल सरकारास सर्वांनीं विनंति केली पाहिजे. दुष्काळांत जीं सर्क्युलरें निघालीं आहेत त्यांत अशा ठिकाणीं सारा माफ करूं असें सरकारचें स्पष्ट अभिवचन आहे; व तेंच त्यांनीं चालवावें, शायलॉकच्या न्यायानें आमचे सर्व मालकी हक्क हरण करूं नयेत व करणें बरोबर नाहीं असें आम्ही सरकारास कळविलें पाहिजे. नवीन कायदा केल्यानें या नवीन पद्धतीचा बेकायदेशीरपणा नाहींसा होईल. पण त्यांतील अन्याय नाहींसा होत नाहीं. इतकें करून सरकारास अनुभव पाहणेंच असेल तर दोन चार तालुक्यांत पहावा, सर्व ठिकाणीं पाहण्याची जरूर नाहीं. असेंहि या अर्जांत असलें पाहिजे. खातेदार कुळांनीं जे अर्ज करावयाचे त्यांत सर्व शेतकरी सरकारचीं उपरी कुळें बनल्यानें त्यांचें कसें व किती नुकसान होईल हेंहि दाखविलें पाहिजे. सारांश, या नवीन बिलानें पडीत जमीन किंवा पहिल्यानें ज्या गांवांत सर्व्हे पाहणी व्हावयाची असेल तेथें जी पद्धत सुरू करण्याचें योजिलें आहे ती, शेतकरी व सरकार या दोघांसहि घातुक आहे अशा प्रकारचे शेकडों अर्ज ठिकठिकाणीं सभा होऊन मुंबई कायदेकौन्सिलचे सेक्रेटरी यांच्या-

कडे रवाना होऊन ते कायदेकौन्सिलापुढें मांडण्याकरितां त्यांस विनंति केली पाहिजे. नाहींपेक्षां हें उंटाचें पिल्लूं घरांत शिरून आपला सर्वस्वी नाश करणार आहे. आज हिंदुस्थानच्या जामिनीच्या पृष्ठभागापैकीं वीतभर पृष्ठभाग तरी कसण्याचा आपला मालकी हक्क आहे, पण तोहि आतां निघून जाणार. आज पडीत जामिनीसंबंधानें निघून गेला उद्यां दुसऱ्या जमिनीसंबंधानें निघून जाणार हें सर्व लोकांनीं पूर्णपणें लक्षांत आणलें पाहिजे. मुंबई कायदेकौन्सिलाच्या सेक्रेटरीकडे जावयाचें अर्ज मराठींत असले तरी चालतात, किंबहुना प्रत्येक बिलाचें मराठींत जें भाषांतर प्रसिद्ध होतें तें निवळ मराठी जाणणाऱ्या लोकांनीं बिलावरील आक्षेप सरकारास कळविण्याकरितांच होय; या कामीं इंग्रजीची जरूर नाहीं; पण महाराष्ट्रांतील लोकांस मिरासी किंवा मालकी हक्क बुडविण्याची कल्पना अत्यंत दुःखकारक आहे ही गोष्ट हजारों अर्ज कायदेकौन्सिलच्या टेबलावर पडून सरकारास कळली पाहिजे. दुष्काळांत पडीत झालेल्या जमिनी एक साल साऱ्याची सूट देऊन पुनः पूर्वींप्रमाणेंच लोकांस द्याव्या, नव्या बिलानें आमचा मालकी हक्क बुडवूं नये एवढीच मुद्याची गोष्ट सरकारास कळवावयाची आहे आणि ती वर सांगितल्याप्रमाणें लहानशा अर्जानें कळविली तरी चालेल. पण अर्ज मात्र शेकडों ठिकाणाहून हजारों लोकांचे गेले पाहिजेत; नाहींपेक्षां हें उंटाचें पिल्लूं आमच्या घरांत शिरून त्याचा सत्यनाश केल्याखेरीज सोडणार नाहीं. कायदेकौन्सिलांतील लोकांनीं निवडलेले मेंबर यांनींहि आमच्या मतें हाच क्रम स्वीकारला पाहिजे. अनुभव पहाण्याची सरकारची इच्छा असेल तर निदान तो दोन चार तालुक्यांत पहावा, एकदम घाई करणें चांगलें नाहीं एवढें तरी जोरानें व कळकळीनें आम्ही सरकारापुढें मांडलें पाहिजे. शेतकऱ्यांची विपन्न स्थिति हा कांहीं आजकालचा विषय नव्हे. त्यांच्या निकृष्टावस्थेचीं कारणें शोधून काढण्याकरितां पाहिजे तर कमिशन नेमा; पण घाईनें किंवा उच्छृंखळपणें केवळ कांहीं अधिकाऱ्यांच्या तब्येतीखातर दुष्काळानें गांजलेल्या लोकांस सर्वस्वी बुचाडून त्यांस नंगे फकीर बनवूं नका असें सरकारास आम्ही स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. बिलाच्या पहिल्या वाचनाच्या वेळींच झाली त्यापेक्षां जास्त चर्चा व्हावयास पाहिजे होती, पण अद्यापहि वेळ गेली आहे असें नाहीं. तरी आम्हांस अशी आशा आहे कीं, लोकांची बाजू पूर्णपणें कौन्सिलांत मांडली जाऊन तिचा कांहीं तरी सरकारवर परिणाम होईल. हें बिल म्हणजे आमच्या भावी स्थितीचें दुस्वप्न होय व हें जर असेंच पास होऊं दिलें तर आमच्या ऐदीपणाची कमाल झाली असें म्हणावें लागेल.

❖ ❖ ❖

* सावकार मेला आणि कुणबीहि मेला !

मुंबई इलाख्यांतील जमीनमहसुलाचा कायदा सुधारण्याचें बिल पास करण्याच्या कामीं मुंबईसरकार जी घाई करीत आहे ती अक्षम्य होय. मुंबईइलाख्यांतील सर्व गरीब शेतकऱ्यांस सरकारचे बंदे गुलाम करून टाकण्यांत सरकारास काय पुरुषार्थ वाटत असेल तो वाटो; पण निदान असल्या प्रकारची अश्रुतपूर्व गोष्ट करण्यापूर्वी लोकमत कसें काय आहे तें तरी सरकारास कळविण्याची लोकांस संधी द्यावयास पाहिजे होती. पण सरकारचे मनांत तसें कर्तव्य नसून घाईघाईनें दुष्काळाची संधी साधून मुंबईइलाख्यांतील गरीब शेतकऱ्यांस दास्यत्वांत आणि गुलामगिरींत ढकलावयाचें आहे; इतकेंच नव्हे; तर त्यांच्याबरोबर सावकारांसहि बळी देऊन आज हजारों वर्षेंपर्यंत चालत आलेली जमीनवहिवाटीची पद्धत एकदम बुडवून त्याऐवजीं शेतकऱ्यांस सरकारचीं उपरीं कुळें अथवा गुलाम बनवावयाचें आहे. आज हा कायदा फक्त पडीत किंवा जप्त झालेल्या जमिनीसंबंधानेंच लागू करावयाचा आहे, पण कालांतरानें दुसऱ्या लोकांचे सारे जप्तजसे थकतील तसतशा त्यांच्याहि जमिनी जप्त होऊन त्या सर्व या नव्या कायद्याच्या अमलाखालीं येणार. आणि कांहीं वर्षांनीं मुंबई इलाख्यांतील शेती म्हणजे, सरकार हें एक मोठें सावकार व जमीनदार आणि सर्व शेतकरी त्यांचीं उपरीं कुळें, मजुरदार किंवा गुलाम अशी स्थिति व्हावयाची आहे. तात्पर्य सिलोन, मॉरिशस किंवा आसाम वगैरे प्रांतांतून युरोपियन शेतकरी चहा, कॉफी यांची लागवड करण्याकरितां ज्याप्रमाणें हजारों नेटिव मजूर लावतात, तद्वत् आमच्या इलाख्याची स्थिति होणार आहे. शेतकरी आणि मजुरदार यांच्यामध्यें भेद राहणार नाहीं, जमिनीची मशागत बंद होईल, इतकेंच नव्हे तर मालकीच्या अभिमानामुळें शेतकऱ्यांच्या अंगीं जो एक प्रकारचा स्वावलंबनाचा गुण राहतो तो न राहून सर्व लोक दीन व हताश होऊन त्याचे परिणाम राजा व प्रजा या दोहोंसहि अपायकारक होतील, अशा प्रकारचें भयंकर बिल किंवा कायद्याचा मसुदा घाईघाईनें सरकारानें पास करावयाचा विचार करावा हें आमच्या मतें अगदीं अनुचित व अन्याय्य होय. हिंदुस्थानचें राज्य इंग्रजसरकारच्या ताब्यांत आलें त्याबरोबर जमिनीचा सारा घेण्याचाहि हक्क सरकाराकडे आला ही गोष्ट खरी आहे. त्यामुळें दुष्काळाची संधी साधून दुष्काळांत तेरावा महिना या न्यायानें आधींच गांजलेल्या शेतकऱ्यांपासून एक वर्षाचा सारा त्यांनीं न दिल्यामुळें त्यांचे जमिनीवरील मालकी हक्क सर्वस्वी काढून घेण्याचा सरकारास

---

* [केसरी ता. २ माहे जुलै १९०१]

कसा हक्क पोहोंचतो हें आम्हांस समजत नाहीं. सरकार करील तो कायदा या न्यायानें सरकारचे हातून बेकायदेशीर गोष्ट कधींच होणें शक्य नाहीं हे आम्ही जाणून आहों. पण आज जो आम्ही विचार करीत आहों तो अशा दृष्टीनें नव्हे. कायदे-कौन्सिलांत चार पांच काळे हात एका बाजूस व दहा बारा गोरे हात दुसरे बाजूस होऊन जरी सरकारास हवा तो कायदा करतां येतो, तरी अशा रीतीनें पास झालेला कायदा मामूल वहिवाट किंवा लोकमत यांच्याविरुद्ध आहे कीं नाहीं, आणि त्यापासून लोकांचें हित होईल कीं नाहीं हा प्रश्न निराळा राहतो तो राहतोच. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे हल्लींचें सरकारचें करणें अगदीं गैरशिस्त व जुलमाचें आहे असें म्हणणें भाग येतें. सरकारतर्फेच्या कांहीं सभासदांनीं या नवीन बिलाची किती जरी प्रशंसा केली तरी इलाख्यांतील लोक यामुळें अत्यंत घाबरून गेले आहेत, त्यांच्यामध्यें एक प्रकारचा विलक्षण असंतोष उत्पन्न झालेला आहे व सरकार शेतकऱ्यांचे मालकी हक्क विनाकारण बुडवून त्यांस गुलामाच्या पदवीस आणण्याचा प्रयत्न करीत आहे अशी सर्वांची समजूत झाली आहे. सरकारास ही गोष्ट माहीत असून जर तें हा कायदा पास करीत असेल तर मग आमचें कांहीं म्हणणें नाहीं. कारण इंग्रजसरकारासारखें बलिष्ठ सरकार जाणून बुजून अन्याय करूं लागल्यास त्याचा हात तरी कोण धरणार ! पण सरकारास ही गोष्ट जर अवगत नसेल, तर ती त्यांच्यापुढें मांडणें हें आमचें कर्तव्य आहे व तें कर्तव्य स्मरूनच आम्हीं आजपर्यंत या विषयावरचे लेख लिहिले आहेत. या बिलाइतकें राजा व प्रजा या दोहोंसही अपायकारक, लोकांच्या हक्कांचा त्यांच्या दुःस्थितीचा फायदा घेऊन चुराडा करणारें, एकंदर शेतकरी वर्गास दास्यत्वांत ढकलणारें, जुलुमाचें आणि अन्यायाचें दुसरें कोणतेंहि बिल आजपर्यंत कौन्सिलपुढें आलें नव्हतें म्हटलें तरी चालेल. अशा प्रकारचा अभूतपूर्व आणि अश्रुतपूर्व कायदा, लोकांस त्याबद्दल विचार करण्याची सवडहि न देतां लॉर्ड नॉर्थकोट यांच्या कारकीर्दीत घाईघाईनें पास व्हावा हें आमच्या मतें त्यांच्या आजपर्यंत दृष्टीस पडलेल्या सौजन्यास अत्यंत दूषणास्पद होणार आहे. करितां गव्हर्नरसाहेबांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं यक्षिणीच्या कांडीप्रमाणें शेतकऱ्यांस गुलाम करण्याकरितां काढलेलें हें बिल कांहीं महिने तरी तहकूब ठेऊन लोकांचें काय म्हणणें आहे हें शांतपणें ऐकून घ्यावें. हें बिल कायदेकौन्सिलापुढें आणण्यापूर्वी सरकारी अधिकाऱ्यांतहि त्याबद्दल बरेच दिवस वाटाघाट चालू असेल व वास्तविक म्हटलें म्हणजे लोकांस या बिलासंबंधीं विचार करण्यास त्याहूनहि जास्त मुदत द्यावयास पाहिजे होती. त्याचप्रमाणें ज्या कारणाकरितां सरकारास हें बिल आणणें इष्ट वाटलें तीं कारणें व निरनिराळ्या सरकारी अधिकाऱ्यांची या बिलावरील मतेंहि प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतीं. पण तसा प्रकार न होतां ता० ३० मे रोजीं सिलेक्ट कमिटीकडे पाठविलेलें बिल सदर कमिटीकडून

ता. ३० जून पूर्वीच पसार होऊन आलें हें आश्चर्य होय. आतां बहुतेक आणखी एक महिन्यांत हा कायदा सरकार पास करून टाकणार हें बहुतेक निश्चित आहे. तथापि हा जो जुलमाचा व अन्यायाचा प्रकार होत आहे त्याबद्दल लोकांनीं आपलें म्हणणें सरकारापुढें मांडण्यास मागें घेऊं नये. कायदेकौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांनीं या बिलाच्या पहिल्या वाचनासच आपलीं मतें अनुकूल द्यावयास नको होतीं, पण नजरचुकीनें जरी तशी गोष्ट घडली तरी सिलेक्ट कमिटींत ना. छत्रे व गोखले असे आमचे जे दोघे मेंबर आहेत त्यांजकडून आणि दुसऱ्या वाचनाचे वेळीं सर्व लोकनियुक्त सभासदांकडून कौन्सिलांत लोकमत चांगल्या रीतीनें प्रतिपादिलें जाईल अशी आम्हांस अद्याप आशा आहे. लोकांतहि या बिलासंबंधानें व्हावयास पाहिजे इतकी चळवळ अद्याप झालेली दिसत नाहीं. सातारा, विजापूर, सोलापूर, ठाणें या जिल्ह्यांतून सरकाराकडे अर्ज गेले आहेत व कांहीं सार्वजनिक संस्थानींहि हे अर्ज पाठविले आहेत. पण बिलापासून होणारे भावी भयंकर परिणाम लक्षांत आणतां त्यासंबंधानें लोकांत जितकी चळवळ व्हावयास पाहिजे आहे तितकी झालेली नजरेस येत नाहीं. ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. शेतकरी लोकांस त्यांच्या जमिनीची मालकी त्यांच्या हातांतून चालली ही गोष्ट नीट समजून देण्याचा अवकाश सरकारानें दिला नाहीं हें खरें आहे, पण जो अवकाश मिळाला आहे तेवढ्याचा तरी आम्हीं पूर्ण फायदा घेतला पाहिजे. शेतकरी आधींच दरिद्री झालेले आहेत व त्यांच्यापैकीं बहुतेक अशिक्षित व अडाणी असल्यामुळें त्यांस या गोष्टी समजून देणें कठीण आहे; किंबहुना सरकारतर्फे असाहि प्रयत्न करण्यांत येईल कीं, या बिलापासून सावकार बुडून शेतकऱ्यांचे कल्याण होणार आहे. पण ही गोष्ट खोटी आहे. या बिलाचा खरा परिणाम असा आहे कीं, सावकार मरणार आणि शेतकरीहि मरणार ! करितां दोघांनींहि एकविचारें या वेळीं त्यांच्यावर आलेल्या संकटाचा प्रतिकार करण्यास झटलें पाहिजे.

सावकार व शेतकरी यांची स्थिति हें बिल पास झाल्यानंतर कोणत्या तऱ्हेची होणार याचें थोडक्यांत दिग्दर्शन करून आजचा लेख आम्हीं संपविणार आहों. हा कायदा फक्त पडीत आणि जप्त झालेल्या जमिनीसच लागू करण्याचा विचार आहे. म्हणजे दुष्काळांत सारा न दिल्यामुळें ज्या जमिनी जप्त झाल्या त्यावरील सावकारांचे वगैरे सर्व हक्क बुडून त्या पुन्हां पूर्वीप्रमाणें लिलांव न करितां आणि त्या कुळास गहाणटहाण ठेवण्याचा अधिकार न देतां थोड्या मुदतीनें कौलानें देण्याचा सरकारचा विचार आहे. या जामिनीवर इतउत्तर कोणीहि कर्ज देणार नाहीं हें उघड आहे. कारण, या जामिनीवर जीं उपरीं कुळें राहावयाचीं त्यांजवळ सालोसालच्या उभ्या पिकाखेरीज दुसरी कोणतीहि मिळकत सावकारानें

होणार याचें थोडक्यांत दिग्दर्शन करून आजचा लेख आम्हीं संपविणार आहों. हा कायदा फक्त पडीत आणि जप्त झालेल्या जामिनीसच लागू करण्याचा विचार आहे. म्हणजे दुष्काळांत सारा न दिल्यामुळें ज्या जामिनी जप्त झाल्या त्यावरील सावकारांचे वगैरे सर्व हक्क बुडून त्या पुन्हां पूर्वीप्रमाणें लिलांव न करितां आणि त्या कुळास गहाणटहाण ठेवण्याचा अधिकार न देतां थोड्या मुदतीनें कौलानें देण्याचा सरकारचा विचार आहे. या जामिनीवर इतउत्तर कोणीहि कर्ज देणार नाहीं हें उघड आहे. कारण, या जामिनीवर जीं उपरीं कुळें राहावयाचीं त्यांजवळ सालोसालच्या उभ्या पिकाखेरीज दुसरी कोणतीहि मिळकत सावकारानें

जप्त करण्यासारखी राहावयाची नाहीं. या कंगाल कुळांस बैल घेण्याकरितां, घरखर्चाकरितां, विहीर खोदण्याकरितां, बियाण्याकरिता किंवा पोटाकरितां जर कांहीं पैसे लागले तर ते सरकारकडून तगाई रूपानेंच घेतले पाहिजेत आणि ही तगाई वेळेवर मिळेल कीं नाहीं याचाहि वानवाच आहे. शिवाय सरकारानें तगाई दिली आणि ती बुडवून शेतकरी चालता झाला तर सरकार त्याचें काय घेणार? तेव्हां सरकारी अधिकारीहि विचारानेंच तगाई देणार आणि तगाई वेळेवर न मिळाली म्हणजे उपरीं कुळांनीं संसार डोक्यावर घेऊन मध्य हिंदुस्थानांतील कांहीं संस्थानांच्या रयतेप्रमाणें मजुरदारासारखें काम मंदा लागेल तिकडे भीक मागत हिंडावें अशी स्थिति येणार आहे. हल्लींच्या दुष्काळांत ज्या जमिनी जप्त झाल्या आहेत त्या जमिनी एकंदर जमिनीचा चवथा हिस्सा तरी असतील. म्हणजे मुंबईइलाख्यांतील $\frac{1}{4}$ शेतकरी या नवीन बिलानें आजच गुलाम होणार आहेत. पण एवढ्यानेंच त्यांच्या दुर्दैवाची कहाणी संपेल असें नाहीं. या $\frac{1}{4}$ जमिनी लोकांचा मालकी हक्क जाऊन सरकाराकडे गेल्यावर दरसाल कांहीं नंबर साऱ्याकरितां खालसा होणारच व त्यांसहि हा नवीन होणारा कायदा लागू होईल. परंतु आणखी दहापांच वर्षांत जर एखादा दुष्काळ आला तर मग कांहीं विचारावयासच नको. पुन्हां $\frac{1}{4}$ जमिनी सरकारांत खालसा होणार आणि पुन्हां तितकेच शेतकरी भिकेस लागणार. हा भिकेस लागण्याचा क्रम अशा रीतीनें चालू राहिल्यावर पांच पंचवीस वर्षांत मालकी हक्काचे अभिमानी शेतकरी बुडून त्यांच्याऐवजीं कंगाल शेतकरी चोहोंकडे दृष्टीस पडणार आहेत ? ही शेतकऱ्यांची स्थिति झाली. आतां सावकारांची स्थिति पहा. उपरी कुळांस कोणीहि पैसे देणार नाहीं हें तर सिद्धच आहे. परंतु हल्लीं ज्या कुळांस सावकारांनीं पैसे दिले आहेत तीं कुळेंहि सावकारास बुडविण्याचा या कायद्यामुळें प्रयत्न करण्यास चुकणार नाहींत. कारण सावकाराचें कर्ज वाढलें म्हणजे कुळानें एक वर्षाचा सारा देऊं नये म्हणजे झालें. या योगानें कूळ तर बुडेलच, पण सावकाराचे पैसे एकदम बुडणार. सारांश, हा कायदा पास झाल्यावर सावकारानें कुळास पैसे देणें असल्यास जमिनीचें खातें आपल्या नांवानें करून घेतल्याखेरीज व कुळानें सारा न दिल्यास आपण जमिनीची लागवड करण्यास तयार असल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं. आजपर्यंतची सावकारी म्हटली म्हणजे कुळास पैसे देऊन त्याची जमीन गहाण ठेवावयाची आणि सोयीसोयीनें त्याच्याकडून पैसे वसूल करावयाचे. सावकारास स्वतः आपल्या बतीनें लागवड करण्याची कधींहि जरूर पडत नसे. पण आतां तशी सावकारी चालावयाची नाहीं; कारण कुळानें एक वर्षाचा सारा न दिला तर सावकाराचे सर्व पैसे बुडून जमीन खालसा होणार. अशा स्थितींत सावकारी करणें असल्यास सावकारानें खातें आपल्या नांवाचें करून घेऊन साऱ्याचे व कर्जाचे पैसे

कुळाकडून वसूल करण्याची तजवीज ठेविली पाहिजे. म्हणजे सरकार ज्याप्रमाणें सर्व जामिनीचे मालक होऊन शेतकऱ्यांस जशीं उपरी कुळें बनविणार तसें सावकारानें कर्जदारांस उपरीं कुळें बनवून आपण जमिनीचे मालक झालें पाहिजे. परंतु पुष्कळ सावकारांस ही गोष्ट करतां येणें अशक्य आहे; कारण त्यांचे पुष्कळ धंदे असतात. अर्थात् सावकारांचा धंदा उत्तरोत्तर कमी होऊन सावकार मरणार आणि वर सांगितल्याप्रमाणें कुणबीहि मरणार अशी स्थिति सर्व देशभर येणार आहे. ज्या जमिनी हल्लीं खालसा झालेल्या आहेत त्यावर दिलेलें सावकाराचें कर्ज आजच बुडालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, कित्येक कलेक्टरांनीं जप्त केलेल्या जमिनीचा सारा घेण्याचें आजच बंद केलें आहे. व कांहीं कलेक्टरांनीं जरी अद्याप सारा देण्यास सवड दिली आहे, तरी हल्लीं होणारा कायदा लक्षांत आणून सावकार या जमिनीवरील सारा देण्यास फारसे धजतील असें वाटत नाहीं. मॉन्टीथसाहेबांनीं आपल्या भाषणांत असा डौल मारला आहे कीं, ज्या जमिनी खालसा झाल्या आहेत त्यास नवीन कायदा लागू केला असतां सरकारचें ७५ लाखांचे यंदाच्या सालच्या साऱ्याचें नुकसान होईल. पण हा डौल अगदीं फुकट आहे. वास्तविक पाहतां हें नुकसान या नव्या कायद्यानें होणारें नव्हे, तें दुष्काळामुळें झालेलें आहे. आणि दुष्कळव्यवस्थेचीं तत्त्वें लक्षांत आणलीं असतां सरकारनें इतक्या रकमेची सूट शेतकऱ्यांस देऊन शिवाय त्यांचे मालकी हक्क त्यांच्याकडे ठेविले पाहिजेत. शिवाय जामिनीची किंमत लक्षांत आणली असतां ७५ लक्षांत सरकारास इतक्या जामिनी मिळाल्या हा एक मोठाच फायदा आहे. किंबहुना या जामिनी सरकारास फुकट मिळाल्या असेंहि म्हणतां येईल. परंतु याहिपेक्षां विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी अशी गोष्ट आहे कीं, या जामिनी खालसा केल्यानें सरकारचें ७५ लाखांचें नुकसान झालें असलें तर सावकारांचें यापेक्षां दुप्पट चौपट नुकसान झालेलें आहे, आणि या नुकसानीबद्दल सावकारास कवडीचाहि मोबदला नाहीं. सरकारास मात्र ७५ लक्षांत इतक्या जामिनीचे मालकी हक्क मिळणार. सारांश, हें बिल पास झालें असतां सावकार बुडणार, शेतकरी बुडणार आणि सरकारची मात्र धन होणार ! विलायतेंत जर अशा प्रकारचें बिल कोणत्याहि कायदेकौन्सिलापुढें आलें असतें तर सर्व देशभर गडबड उडून लोकांनीं सरकारास त्राहि त्राहि करून सोडलें असतें. पण आमच्या हिंदुस्थान देशाचें दुर्दैव असें आहे कीं शहाण्या सरकारानें गरीब रयतेवर तिच्या कल्याणाकरितां म्हणून वाटेल तसा जुलूम करावा. आयर्लंडांत शेतकऱ्यांची स्थिति वाईट आहे, पण ती सुधारण्यास शेतकऱ्यास मालकी हक्क देण्याची खटपट चालू आहे आणि आमच्या इकडे शेतकऱ्याचा मालकी हक्क काढून घेऊन त्याचें कल्याण करूं इच्छित आहेत. हा उलटा न्याय सरकार व प्रजा या दोघांसहि अपायकारक होईल हें सरकारी अधिकाऱ्याखेरीज कोणाच्याहि

सहज लक्षांत येण्यासारखे आहे. लॉर्ड नॉर्थब्रोट साहेबांस आमची शेवटची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं हे बिल होतां होईल तों मंजूर करूं नये; परंतु अधिकाऱ्यांचा आग्रहच असेल तर निदान एक दोन जिल्ह्यांतच याचा कांहीं वर्षे अनुभव घ्यावा व त्या अनुभवाने जें सिद्ध होईल त्याप्रमाणें पुढें सरकारनें व्यवस्था करावी. पेनाच्या एका झपाट्यानें लाखों शेतकऱ्यांचे मालकी हक्क बुडवून त्यांस मजूरदार करणें राजकीय दृष्टया किंवा सामाजिक दृष्टया सारखेंच अपायकारक आहे.

◆ ◆ ◆

* खालसा जमीन कोणाची ?

जमीन महसुलाच्या कायद्यांत सुधारणा करण्याकरितां जें बिल हल्लीं कायदे-कौन्सिलापुढें आलें आहे, त्याच्याविरुद्ध अर्ज करण्याकरितां परवां सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत येथील लोकांची जी सभा भरली होती तिची हकीकत दुसरीकडे आलीच आहे. या सभेंत ज्या एका महत्त्वाच्या मुद्यासंबंधानें वाटाघाट झाली तो खालसा जमिनीवरील मालकी हक्कासंबंधाचा होय. सारा न भरल्यामुळे जमीन महसुलाच्या कायद्यांतील ५६ व्या कलमाप्रमाणें खातेदाराची जमीन जप्त करून खालसा करण्याचा आणि विकण्याचा हक्क सन १८७९ च्या कायद्यानें सरकारनें घेतलेला आहे ही गोष्ट खरी आहे, पण खातेदाराची जमीन सरकारनें अशा रीतीनें खालसा केली असतां ती सर्वस्वी सरकारचीच होते किंवा खातेदाराचा तिच्यावर कांहीं हक्क असतो हा एक मोठा प्रश्न आहे. ना. मि. मॉन्टीथ यांचें असें म्हणणें आहे कीं, साऱ्याकरितां खातेदाराची जमीन खालसा केली म्हणजे ती सर्वस्वी सरकारची झाली; आणि गेल्या दुष्काळांत अशा प्रकारें ज्या जमिनी खालसा झालेल्या आहेत त्या वाटेल त्या रीतीनें वाटेल त्यास देण्यास सरकार पूर्ण मुखत्यार आहे. मॉन्टीथसाहेबांनीं काढलेले हें तत्त्व ना० पारख यांनीं आपल्या भाषणांत एकदम कबूल केलें आहे, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. कारण खुद्द मॉन्टीथसाहेब हेच आपल्या भाषणांत असें म्हणतात कीं, या बाबतींत सरकारच्या सल्लागार कायदेपंडितांमध्यें मतभेद आहे. साऱ्याकरितां खालसा केलेली जमीन वाटेल त्यास देण्यास सरकारास जर अधिकार आहे तर हें नवें बिल करण्याचा तरी खटाटोप कशास पाहिजे ! सरकाचा अधिकार जर पूर्ण आहे तर खालसा जमिनी कलेक्टर वाटेल त्यास वाटेल

---

* [केसरी ता. ९ जुलै १९०१]

त्या शर्तींवर देऊं शकेल, त्याकरतां कायद्याची कांहीं जरूर नाहीं. अर्थात् या बाबतींत कांहीं शंका आहे, म्हणून हें नवें बिल कायदेकौन्सिलापुढें आणलें आहे व ही गोष्ट मि. मॉन्टीथ यांनीं पूर्णपणें कबूल केली आहे. सरकारास आपल्या हक्काची शंका आणि ना. पारख त्याबद्दल निःशंक हें नवल नव्हे काय ? बिलाच्या पहिल्या वाचनाचे वेळीं दुसऱ्या लोकनियुक्त सभासदांनीं केलेलीं भाषणेंहि अशाच प्रकारचीं अर्धवट आहेत. कोणी असें म्हटलें आहे कीं, " माझा कांहीं आग्रह नाहीं, मी दोहोंकडचें ऐकायास तयार आहे; " आणि कोणी खालसा जमिनीवरील सरकारचा हक्क कबूल केला आहे. ना. मेथासारखे गृहस्थ तर मुळीं कौन्सिलला गेलेच नाहींत. शेतकरी लोकांच्या अंगावालील जमीनी चालल्या असें प्रत्यक्ष दिसत असतां लोकांच्या पुढाऱ्यांनीं जाणून बुजून नसली तरी अनास्था दाखवावी हें कांहीं ठीक नाहीं. सन १८६५ सालीं मिरासी हक्क सर्व्हे ॲक्टानें जेव्हां पहिल्यानें कमी करण्यांत आले व त्याऐवजीं वंशपरंपरेचा खातेदारीचा हक्क सर्वांस दिला, तेव्हां हल्लीं इतके लोक शिकले नसूनहि हल्लींपेक्षां जास्त चळवळ झाली होती. सरकारच्या मनांत हें बिल पास करण्याचें बहुतेक पूर्वीच ठरल्यासारखें दिसत आहे; एरव्हीं सिलेक्ट कमिटींतून इतक्या जलदीनें तें मंजूर होऊन बाहेर पडलें नसतें. परंतु असें जरी सरकारचें ठरलेलें असलें तरी लोकांची बाजू सरकारपुढें मांडणें व सरकार जी गोष्ट करूं इच्छित आहे ती अन्यायाची व लोकांच्या अत्यंत नुकसानीची आहे हें सरकारास दाखविणें हें लोकांच्या पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे, व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आतांपर्यंत या बिलाविरुद्ध जी चळवळ झाली ती या बिलाचें महत्त्व व त्यापासून होणारे दुष्परिणाम लक्षांत आणतां अगदीं अपुरी व थोडी झाली असें म्हणणें भाग पडतें. येथील एका आमच्या बंधूस आमच्या वरील विधानांत मात्सर्य दिसत आहे. पण त्यानें एवढें लक्षांत ठेवावें कीं, आम्ही हें विधान तिन्ही भागांच्या लोकनियुक्त सभासदासंबंधानें करीत आहों. या तिघांच्याहि हातून बिलाच्या पहिल्या वाचनाचे वेळीं जशी प्रतिकूल टीका व्हावयास पाहिजे होती तशी झालेली नाहीं असें आमचें मत आहे. मग तो प्रकार गैरमाहितीमुळें घडलेला असो किंवा अवकाश कमी राहिल्यामुळें घडलेला असो. तथापि ही उणीव सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टांत किंवा बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळीं भरून काढण्यांत येईल अशी आम्हांस उमेद आहे.

असो; लँड रेव्हिन्यू कोडमधील ५६ व्या कलमाप्रमाणें सारा न दिल्यामुळें खालसा केलेली जमीन सर्वांशीं सरकारची होत नाहीं, सारा न देणाऱ्या इसमाचा सदर जमिनीवर थोडाबहुत तरी हक्क राहतोच ही गोष्ट लँड रेव्हिन्यू कोडमध्येंच निर्विवाद कबूल केलेली आहे. सदर ॲक्टाचें कलम १८३ यांत असें स्पष्ट लिहिलेलें आहे कीं, जेव्हां साऱ्याकरितां खालसा केलेली जमीन

सरकार दुसऱ्यास विकील तेव्हां विक्रीच्या पैशांतून खर्चवेंच प साऱ्याची रक्कम वजा करून बाकी शिल्लक राहील ती खातेदारास परत द्यावी. हें कलम जोंपर्यंत लॅन्ड रे. कोडामध्यें आहे तोपर्यंत खालसा जमिनीवरील मालकी सर्वस्वी सरकारची आहे असें जें मॉन्टीथ साहेबांनीं विधान केलें आहे तें बरोबर आहे असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. यास दुसरें प्रमाण असें आहे कीं, सारा न दिल्यामुळें सरकारी गांवांतून खालसा झालेली जमीन जर सरकारची तर इनाम गांवांतून याच कारणाकरितां खालसा झालेली जमीन इनामदाराची व्हावयास नको काय? परंतु सरकारचे व हायकोर्टाचे असे ठराव झाले आहेत कीं, इनामी गांवांत एखाद्या कुळाचा सारा थकल्यामुळें त्याची जमीन जर खालसा झाली व विकली तर विक्रीच्या पैशांतून विक्रीचा खर्च व सारा वजा करून बाकी राहील ती इनामदारानें कुळास दिली पाहिजे. इनामदारावर जर अशा प्रकारची अमलबजावणी करावयाची तर सरकारी गांवांत दुष्काळाच्या प्रसंगीं साऱ्याकरितां खालसा झालेल्या जमिनी सर्वस्वी सरकारच्या आहेत व सरकार वाटेल त्यास वाटेल त्या शर्तीवर त्या देईल असें निःशंकपणें कौन्सिलांत मि. मॉन्टिथ यांच्या सारख्यांनीं म्हणणें म्हणजे कायदा करण्याचा अधिकार आपल्या हातांत आहे म्हणून आम्ही वाटेल तशी दांडगाई करू असें उघडपणें म्हणण्यासारखेंच आहे. ना. पारख यांच्या सारख्याच्या लक्षांत ही गोष्ट यापूर्वीच यावयास पाहिजे होती. असो; ५६ वें कलम १८७९ च्या कायद्यांत प्रथमतःच घातलेलें आहे. त्यापूर्वी जमिनीच्या साऱ्याची वसुली १८२७ च्या १७ व्या कायद्याप्रमाणें होत असे, व त्या कायद्यांतहि शेतकऱ्याची स्थावरजंगम जिनगी साऱ्याकरितां विकण्याचा कलेक्टरास अधिकार दिलेला आहे. परंतु हा अधिकार किंवा खालसा करण्याचा अधिकार कलेक्टरास दिल्यानें खातेदाराची मालकी कांहीं कमी होते असें नाहीं. पूर्वीच्या धर्मशास्त्राप्रमाणें खातेदार किंवा मिरासदार हाच जमिनीचा मालक होय. परंतु सन १८६५ सालीं त्यावर इंग्रजी राज्यांत झालेली सुधारणा जरी कबूल केली तरी पृष्ठभागापासून नांगराचा फाळ जितका जमिनींत खोल जाईल तितपर्यंतच्या जमिनीच्या वरच्या थराची मालकी किंवा खातेदारीचा वंशपरंपरेचा हक्क हा नव्या कायद्याप्रमाणें खातेदाराकडेच राहतो; आणि ज्याप्रमाणें घनकांनें डिक्री मिळवून कर्जाकरितां जप्त करून विकलेल्या मिळकतीची किंमत कर्जापेक्षां जास्त असल्यास घनकोस मिळत नाहीं, त्याचप्रमाणें साऱ्याकरितां खालसा केलेल्या जमिनीची स्थिति आहे, हें काळीच्या कायद्यांतील १८३ कलमावरून उघड होतें. अर्थात् मॉन्टीथसाहेबांनीं या नव्या बिलाची सर्व उभारणी ज्या पायावर केली आहे तो पायाच आजिबात ढांसळून जातो. हजारों शेतकऱ्यांचे मालकी हक्क काढून घेऊन त्यांस उपरीं कुळें केल्यानें शेतकऱ्यांचा फायदाच होईल असें मॉन्टीथसाहेब खात्रीनें म्हणूं शकत नाहींत. त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, कोणाचे

हक्क न बुडवितां जर एक प्रकारचा नवा अनुभव घेण्याची सरकारास संधी सांपडत आहे तर ती त्यांनीं फुकट कां दवडावी ? हें म्हणणें दिसण्यांत मोठें बोंडस दिसतें; पण त्याचें मनोरम स्वरूप परिणामीं कौंडाळाच्या बाह्य स्वरूपासारखेंच आहे असें दिसून येईल. साऱ्याकरितां खालसा केलेल्या जमिनी सर्वांशीं सरकारच्या होत नाहींत असें जर लँड रेव्हिन्यू कोडमध्येंच कबूल केलेलें आहे, तर मग " कोणाचे हक्क न बुडवितां अनुभव घेण्याची आलेली संधी सरकार फुकट दवडूं इच्छित नाहीं " असें जें मॉन्टीथसाहेब म्हणतात तें चुकीचें आणि वरपांगीपणाचें नव्हे काय ? खालसा जमिनीवर हल्लींच्या कायद्याप्रमाणें सरकारचा सर्वांशीं हक्क नाहीं खरा, पण तो हक्क सरकारास देण्याकरितांच हल्लींचें बिल कौन्सिलापुढें आणलें आहे असें जर मॉन्टीथसाहेब म्हणतील तर मग ७५ लक्षांचा आंवळा देऊन त्याच्या पांचपट किंवा सहापट म्हणजे चार पांच कोटींचा कोहळा सरकारचें घरांत घालून शेतकऱ्यांस भिकारी मजुरदार करण्याकरितां हें बिल कायदेकौन्सिलापुढें आणलेलें आहे असें म्हणण्यास कोणती हरकत आहे हें आम्हांस समजत नाहीं. सारांश, खालसा जमिनिवर सरकारचा सर्वस्वी हक्क असेल तर हल्लींच्या बिलाची मुळींच जरूर नाहीं; आणि सरकारचा जर तसा हक्क नसेल तर हजारों लोकांचे सदर जमिनीवरील कोट्यावधि रुपयाचे हक्क बुडविण्याकरितां व घुढें मानमानेल तशी व्यवस्था ठेवण्याकरितां सरकारनें हें बिल पास करण्याचें ठरविलें आहे असें उघड होतें. या दोहोंखेरीज दुसरा पक्ष संभवत नाहीं. पहिल्या पक्षीं सरकारच्या पदरीं मूर्खपणा येतो आणि दुसऱ्या पक्षीं रयतेच्या मिळकतीचा स्वार्थबुद्धीनें अभिलाष करण्याचा दोष त्यांच्या माथीं मारावा लागतो. कोणीकडून पाहिलें तरी सरकारचें वर्तन अश्लाघ्य व चुकीचेंच ठरतें; तेव्हां असल्या पेंचांत विनाकारण सरकारनें आपणास घालून घेऊं नये अशी त्यास आमची विनंति आहे. दुष्काळांत सारा ज्यांस देण्याची शक्ती नाहीं त्यांस माऱ्याची सूट देऊं अशीं जीं दुष्काळकोडांत सरकारचीं अभिवचनें आहेत त्याचाहि या स्थळीं विचार केला पाहिजे. सुबत्तेच्या वेळीं साऱ्याकरितां खालसा केलेली जमीन जर पूर्णपणें सरकारच्या मालकीची होत नाहीं आणि ती विकली असतां खर्चवेंच वजा जाऊन बाकी खातेदारास द्यावी लागते, तर दुष्काळाचें वेळीं नाइलाजास्तव सारा न भरल्यामुळें खालसा झालेल्या जमिनीवरील खातेदाराचा सर्व हक्क बुडवून घेण्याचा मार्ग किती अन्यायाचा; निर्दयतेचा आणि राजनीतीच्या दृष्टीनें रयतेच्या नुकसानीचा अतएव दांडगाईचा आहे याचा सरकारनेंच विचार करावा एखाद्या इसमास दुसऱ्याच्या घरीं चोरी करण्याची संधी मिळाली म्हणून त्यानें चोरी करावी असें जसें होत नाहीं, त्याप्रमाणेंच दुष्काळांत संधी आली म्हणून खालसा झालेल्या जमिनीवरील खातेदाराचे सर्व हक्क बुडवून त्या जमिनी वाटेल त्यास देण्याचा अधिकार सरकारानें आपल्या हातांत घेणें योग्य नाहीं. रेव्हिन्यू ज्युरि-

सडिक्शन ॲक्टाप्रमाणें खालसा जमिनीवरील मालकीचा दावा हायकोर्टांपुढें नेतां येत नाहीं. पण हाहि प्रतिबंध सरकारानें आपल्या फायद्याकरितांच केला आहे; तेव्हां त्याची नीतिदृष्ट्या फारशी मातबरी नाहीं. खालसा जमिनीसंबंधानें सरकार व कूळ यांच्यामधील तंटा जरी हायकोर्टकडे गेला नाहीं तरी इनामदार व कूळ यांच्यामधील तंटा हायकोर्टाकडे गेला आहे; आणि त्यांत जो न्याय झाला तोच सरकारासहि कबूल केला पाहिजे. असें झालें म्हणजे मि. मॉन्टीथ यांनी हल्लींच्या बिलाच्या तर्फे जें मनोरम वाक्पांडित्य केलें आहे त्याचा 'मूले कुठारः' या न्यायानें सर्वांशीं विच्छेद होऊन प्रस्तुतचें बिल कायदेकौन्सिलापुढें आणण्यांत लोकांचे हक्क विनाकारण बुडविण्याचा सरकारचा हेतु आहे व रयतेच्या अशा तऱ्हेनें बुडविण्याकरतां कलेक्टरास कायदेशीर हक्क देण्यासाठीं या बिलाची योजना आहे असें साफ म्हणावें लागतें. दुष्काळांत साऱ्याची सूट देण्याऐवजीं साऱ्याबद्दल एकदम मालकी हक्क बुडविले जातात हें आश्चर्य नव्हे काय ? शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याकरितां दयाळू सरकारची ही योजना असेल, नाहीं असें नाहीं; पण ऋणमुक्त असून गांवोंगांव भटकत हिंडणाऱ्या उपरीं कुळांपेक्षां गांवांतच मालकी हक्कानें जमीन वाहणारे पण थोडेंसे कर्जी असलेले शेतकरी बरे नव्हेत काय ! ऋणमुक्त असण्यांतच कांहीं सुख नाहीं; कारण तसें असतें तर बैल, घोडे, गाढवें, हींहि दक्षिणेंतील शेतकऱ्यापेक्षां अधिक सुखीं असतात असें म्हणावें लागेल. किंबहुना " यद्वक्त्रं मुहुरीक्षसे न घनिनां " म्हणजे सावकाराचें तोंड सुद्धां पाहण्याचा तुला प्रसंग येत नाहीं अशी वनांतील हरणाची स्तुती करून भर्तृहरीनें अखेरीस "तन्मे ब्रूहि कुरंग ! कुत्र भवता किं नाम तप्तं तपः " असा जो प्रश्न केला आहे त्याचीच सत्यता लॉर्ड नॉर्थकोट यांच्या कारकीर्दीत आज पर्यायानें येत आहे असें आम्हांस वाटतें. हल्लींचा कायदा पास झाला असतां कर्जबाजारी शेतकरी नाहींसे होऊन त्या ऐवजीं सुखानें या गांवाहून त्या गांवांत भिक्षा मागणारे शेतकरी निर्माण होतील; आणि एका मोठ्या घनाढ्य जमीनदाराच्या मेहरबानीच्या कटाक्षाप्रमाणें त्यांस कर्जाचा कधींहि ताप लागणार नाहीं ! दक्षिणेंतील मिरासदार शेतकऱ्यांच्या वंशजांना यापेक्षां आणखी सुख तें कोणतें मिळावयाचें ?

* बिलाचें तत्त्वच आम्हांस मान्य नाहीं

गेल्या आठवड्यांत जमीनमहसुलाच्या कायद्यांत दुरुस्ती करण्याच्या बिलासंबंधानें तीन महत्वाचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. (१) सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट व त्यांनीं दुरुस्त केलेले बिल, (२) ना० गोखले व छत्रे यांचा सिलेक्ट कमिटीच्या विरुद्ध अभिप्राय असल्याबद्दलचें मिनिट, आणि (३) डेक्कन सभेच्या अर्जास सरकारचें उत्तर. या तिन्ही कागदांसंबंधानें आजच्या लेखांत थोडासा विचार करण्याचा आमचा इरादा आहे. बिलाचें एकंदर स्वरूप काय आहे, त्यापासून नफा कोणता, नुकसान कोणतें याचें गेल्या चार आठवड्यांत आमच्या दृष्टीनें विवेचन केलेलें आहे; व ठिकठिकाणच्या लोकांकडून आम्हांस जीं पत्रें आलीं आहेत त्यांवरून लोकमतहि तशाच प्रकारचें आहे असें दिसून येतें. परंतु कायदेकौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांनीं बिलाच्या पहिल्या वाचनाचेच वेळीं जितक्या निकराचीं व जोराचीं भाषणें करावयास पाहिजे होतीं तितकीं न केल्यामुळें एक प्रकारें लोकमतास थोडा लंगडेपणा येतो कीं काय अशी धास्ती वाटत होती; पण ना० गोखले व छत्रे यांच्या सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टाबरोबर प्रसिद्ध झालेल्या मिनिटावरून ती भीति घुष्कळ अंशीं दूर झाली. ज्या गृहस्थांचें मत बिलास अनुकूल नसलें तरी एक प्रकारचें डळमळीत होतें, व कदाचित् सरकारची बाजू बरोबर असण्याचा संभव ज्यांस शक्य वाटत होता त्यांनीं सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टांत आतां आपलें मत बिलाच्या विरुद्ध निक्षून दिलें आहे ही मोठ्या आनदाचीं आणि समाधानाची गोष्ट आहे; मग तो उत्तरोत्तर अधिकाधिक जागृत होत असलेल्या लोकमताचा परिणाम असो किंवा अधिकाधिक वाचनाचा, वादविवादाचा किंवा या प्रश्नाच्या परीक्षणाचा परिणाम असो. कसेंहि असलें तरी हल्लीं ना. गोखले व छत्रे यांनीं आपल्या मिनिटांत जो बिलाविरुद्ध मजकूर लिहिला आहे तो पूर्वीप्रमाणें अर्धवट नसून पक्का निश्चयाचा आहे आणि लोकांची बाजू अशा रीतीनें योग्य मार्गानें सरकारापुढें नेल्याबद्दल त्यांचे लोकांनीं आभार मानले पाहिजेत. या लेखांत केसरींत वेळोवेळीं आलेल्या मुद्यापेक्षां मोठासा नवीन मुद्दा नसल्यामुळें त्यांतील सारांश देण्याचें कांहीं कारण नाहीं. आमची एवढीच उमेद आहे कीं, ना० पारखहि याचप्रमाणें बिलाच्या विरुद्ध आपलें मत निश्चित करतील व सर्व लोकनियुक्त सभासदांकडून बिलाच्या दुसऱ्या व तिसऱ्या वाचनाचे वेळीं त्यांतील तत्वांचा जोरानें निषेध केला जाईल. सरकारानें हें बिल पास करण्याचें मनावर घेतलें आहे असें डेक्कन सभेस आलेल्या

---

* [केसरी ता. १६ जुलै सन १९०१]

उत्तरावरूनच उघड होत आहे. परंतु हें उत्तर वाचून कोणाचेंही पूर्वी प्रतिकूल असलेलें मत बिलास अनुकूल होईल असें आम्हांस वाटत नाहीं. सरकार म्हणतें कीं, बिलाच्या तत्त्वांविरुद्ध कांहीं सप्रमाण हरकत घेतां यावयाची नाहीं व कोणी घेतलीहि नाहीं ! नेटिव वर्तमानपत्रांतून या बिलाविरुद्ध वेळोवेळीं जे लेख आलेले आहेत त्यांजवरून पाहतां वरील प्रकारचें विधान सरकारानें करणें म्हणजे एक तर कानांत मुद्दाम बोटें घालून बसण्यासारखें आहे किंवा सरकारचे अधिकारी नेटिव वर्तमानपत्रांतील लेखांचें लोटक किंवा चुकीचें भाषांतर सरकाराकडे पाठवितात असें म्हणावें लागतें. सरकारची ही गैरसमज कशामुळेहि झालेली असो, ती मानभावीपणाची असो वा खरी असो, ती घालविण्याकरितां आम्हांस स्पष्टपणें असें नमूद करणें जरूर आहे कीं, लोकांचे जमिनीवरचे मालकी हक्क काढून घेऊन त्यांस उपरीं कुळें बनवावयाची बिलांतील जी मुख्य कल्पना आहे तीच लोकांच्या दृष्टीनें चुकीची व घातुक आहे व त्याचकरितां या बिलाविरुद्ध सर्व लोकाची ओरड आहे. तात्पर्य सरकार जो अनुभव घेऊं इच्छित आहे तशा प्रकारचा अनुभव पाहणें योग्य नाहीं, लोकाचें त्यापासून हित नाहीं, प्रजा भिकारी होऊन लोकांचे वंशपरंपरेचे हक्क बुडले जाणार हेच कायते लोकाचे प्रमुख आक्षेप आहेत. अर्थात् बिलाचें तत्त्वच लोकांस मान्य नाहीं हें उघड आहे. एखादे ठिकाणीं म्हणजे भिल्ल, कोळी, वारली वगैरे लोक जी जमीन करतात त्यासंबंधानें खातेदारीचे हक्क सदर लोकांस देणें योग्य नसेल एवढें कोणी कबूल केल्यानें बिलाचें तत्त्व त्यास कबूल झालें असें जें सरकारचें अनुमान आहे तें फार चुकीचें आहे. लोकांस बिलच नको आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, आजपर्यंत जितके हिंदुस्थानांत राजे झाले त्यांनीं जी गोष्ट केली नाहीं ती त्यामुळें लोकांचें कल्याण होईल अशा खोट्या समजुतीनें इंग्रजसरकार करण्यास प्रवृत्त झालें आहे. अशा स्थितींत लोक किंवा वर्तमानपत्रें बिलाच्या तत्वाविरुद्ध नाहींत अशा प्रकारचें विधान करण्याचें घाडस सरकारी ठरावांत केलें जावें हें अत्यंत आश्चर्यकारक होय. कोळी, भिल्ल वगैरे लोकांकरिता किंवा सिंध प्रांतातील जमिनीकरिता बिलाची जरूरी असली तर बिलाची व्याप्ती त्याच्या पुरतीच ठेवा; पण दक्षिणेंतील आणि गुजराथेतील ज्या शेतकऱ्यांस दुष्काळामुळें जमिनी सोडाव्या लागल्या त्यांच्यावर या बिलाचा अंमल चालविणें म्हणजे अत्यंत निर्दयपणाचें गैरफायद्याचें, आणि गैरमुत्सद्दीपणाचें होय. रयतेस लवकर भिकेस लावण्याची दुसरी सोपी युक्ति यापेक्षां खचित सांपडणार नाहीं. शेतकऱ्याचे आपल्या जमिनींवरील मालकीचे हक्क काढून घेतल्यानें तो भिकेस लागेल कीं नाहीं याचा अनुभवच जर पहावयाचा असेल, तर तो मध्यहिंदुस्थानांतील नेटिव संस्थानांत मिळणार नाहीं काय ? अनुभव पहाण्याची संधि आलेली आहे ही सबब कांहीं बरोबर नाहीं जी गोष्ट करावयाची ती योग्य आहे कीं नाहीं हा वादाचा मुद्दा आहे. संधीची सबब अगदीं लंगडी आहे.

मनुष्यास चोरी करण्याची संधि पुष्कळ वेळां येते म्हणून तो चोरी करतो काय ! नाहीं. तद्वतच हल्लींचीहि स्थिति आहे. पुष्कळ जमिनी दुष्काळामुळें जप्त झाल्या, दरसाल इतक्या जप्त होत नाहींत; म्हणून शेतकऱ्यांचे मालकी हक्क काढून घेण्याचीं हीच वेळ सरकारनें साधावी हें अगदीं अश्लाघ्य होय. मालकी हक्क काढल्यानें रयत सुखी होईल असें जरी सरकारच्या उत्तरांत म्हटलेलें आहे तरी प्रमाणें देऊन तें सिद्ध करण्याचा प्रयत्न मॉन्टीथसाहेबांनीं केला नाहीं व हल्लींच्या उत्तरांतहि केलेला दिसत नाहीं. तेव्हां नुसत्या कांहीं अधिकाऱ्यांच्या मताखातर आज शेंकडों वर्षें चालत आलेले शेतकऱ्याचे मालकी हक्क सरकारनें बुडवावे हें अगदींच गैरशिस्त होय व लॉर्ड नॉर्थकोट यांनीं त्यास आपली कशी पसंती दिली आहे हें आम्हांस समजत नाहीं. अनुभव पाहूं या, चांगला अनुभव न आल्यास दुरुस्ती करूं, या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लोक चांगल्या गोष्टीचा अनुभव घेत असतात; सोमल देऊन त्याचा कसा काय अनुभव येतो असें जर कोणी पाहूं लागला तर त्यास वेडा किंवा खुनी या दोन वर्गांपैकीं कोणत्या तरी एका वर्गांत घालावें लागेल. करितां सरकारास आमची अशी विनंति आहे कीं, मालकी हक्क काढल्यानें रयतेचा नफा होतो हें अगोदर सिद्ध करा, आणि मग अनुभव घेण्यास सुरवात करा. अनुभवाखेरीज सिद्ध करतां येत नाहीं असें जर म्हणणें असेल तर ज्या ठिकाणीं ही पद्धत सुरू आहे तेथला अनुभव मिळवा, किंवा मुंबईइलाख्यांतच अनुभव पहावयाचा असल्यास तो शेतकऱ्याच्या कायद्याप्रमाणें एक दोन जिल्ह्यांतच पहा. तसें न करितां एकदम सर्व इलाख्यास दुष्काळाची संधी साधून हें बिल लागूं करणें हें हेकटपणाचें काम आहे; निदान ज्या अधिकाऱ्यांनीं या बिलास अनुकूल मतें दिलीं आहेत तीं तरी अगोदर सरकारानें प्रसिद्ध करावयाचीं होतीं. म्हणजे मग तीं बरोबर आहेत कीं नाहींत याची वाटाघाट होऊन कांहीं तरी निर्णय करतां आला असता. आज वर्ष दोन वर्षें हें प्रकरण गुप्त रीतीनें सरकारांत चालू आहे व बिलांतील तत्वासंबंधानें कित्येक अधिकाऱ्यांचीं मतें सरकारानें घेतलीं आहेत अशीहि बातमी आहे. त्याजबरोबर असेंहि समजतें कीं, सरकारानें हे बिल पास करण्याचें सहा महिन्यापूर्वीच ठरवून टाकलें आहे. हें जर खरें असेल, तर कायदेकौन्सिलापुढे हें बिल आणून त्याचें त्रिवार लिलाव करण्याचे श्रम तरी सरकारानें कां घ्यावे हें आम्हांस समजत नाहीं. सर्व शहाणपण सरकारी अधिकाऱ्यांच्याच पदरांत आहे अशी जर सरकारची समजूत असेल,तर कायदेकौन्सिलें तरी कशाला ? आणि त्यांत लोकनियुक्त सभासदांचीं भाषणें ऐकण्याचा फार्स तरी कशाला ? 'हम् करेसो कायदा' या न्यायानें एक दिवस कायदेकौन्सिलाची सभा बोलावून आम्ही अमुक कायदा केला आहे, तुम्हीं आतां काय पाहिजे तें बोला असें सांगावें म्हणजे झालें. चोहोंकडून कानीं येणारा लोकमताचा ध्वनि एकसारखा प्रतिकूल असतां

सरकारानें संधी चांगली आहे या निमित्तावर जमिनीवरील लोकांचे मालकी हक्क काढून घ्यावे व आपल्या कांहीं अधिकाऱ्यांची हेकेखोर मतें अमलांत आणावीं हें गैरवाजवी होय. लोकांना आपलें हित कळत नाहींसें नाहीं; व सर्व लोकांचें एकमत ज्या बाबतींत आहे त्या बाबतींत तरी सरकारी अधिकाऱ्यांच्या मतापेक्षां लोकमतास अधिक मान देणें जरूर आहे. पंजाबांतील जमिनी-संबंधानें जो कायदा झाला त्याबद्दल विलायतेंत 'ईस्ट इंडिया असोसिएशन' नामक सभेंत नुक्ताच एक वाद झाला. सभेस सुरुवात पंजाबांतील माजी कमिशनर मि. यॉर्बर्न यांच्या निबंधानें झाली, नंतर सर जेम्स लॉयल, स्टीव्हन्स वगैरे गृहस्थांचीं भाषणें होऊन अखेरीस अध्यक्ष मि. कोर्टने यांनीं वादाचा उपसंहार केला. भाषण करणाऱ्या बहुतेक लोकांनीं असें मत दिलें कीं, पंजाबच्या कायद्याचा अनुभव पाहिल्याखेरीज तो दुसरीकडे लागू करणें योग्य होणार नाहीं. विलायतेंतील प्रसिद्ध मुत्सद्यांचें जर याप्रमाणें तीन आठवड्यांच्या पूर्वी मत प्रसिद्ध झालें आहे, तर मुंबईसरकारानें पंजाबच्या कायद्याची सबब सांगून व दुष्काळची संधी दाखवून लोकांचे जमिनीवरील मालकी हक्क भरामर काढून घेणें अन्यायाचें, जुलमाचें व अविचारीपणाचें नाही असें कोण म्हणेल !

असो; सरतेशेवटीं सिलेक्ट कमिटीनें बिलांत काय दुरुस्ती केली आहे हें सांगून आजचा लेख पुरा करितों. बिलाचे तत्त्व सिलेक्ट कमिटीस म्हणजे ना० गोखले व छत्रेखेरीज बाकीच्यांस, मान्य आहे. यामुळें बिलाच्या तत्त्वासंबंधानें कोणताहि फेरफार सिलेक्ट कमिटीनें केलेला नाहीं. हल्लींच्या नव्या बिलांत १५ कलमें आहेत; व नवीन घातलेल्या कलमांपैकीं महत्त्वाचीं कलमें म्हटलीं म्हणजे ६, ९ व १५ हीं होत. लँड रेव्हिन्यू कोडमधील कलम ५६ प्रमाणें जी जमीन साऱ्याकरितां खालसा करण्यांत येते ती सरकारनें पुन्हां विकली तर जमिनीवरील मागील कर्ज खरेदीदारास द्यावें लागत नाहीं, कारण जमीन खालसा झाली तेव्हांच ते सर्व हक्क बुडाले असा हल्लींचा कायदा आहे. सिलेक्ट कमिटीचें असें म्हणणें आहे कीं, हल्लींच्या बिलाप्रमाण खालसा झालेली जमीन कलेक्टर कोणास खरेदी देवो अगर खंडानें देवो ती पुन्हा ज्याच्या ताब्यांत येईल त्यास जमीन खालसा होण्यापूर्वीचें जमिनीवरील कर्ज द्यावें लागणार नाहीं असा ५६ व्या कलमांत फेरफार करावा. म्हणजे याचा परिणाम असा आहे कीं, केव्हांहि खालसा केलेल्या जमिनीवरील सावकाराचें सर्व कर्ज बुडून जाणार, मग ती जमीन कलेक्टर पुढें कोणासहि खंडानें देवो किंवा विको. हल्लींचा कायदा विक्रीपुरताच आहे अशी एखाद्याची समजूत होण्याचा संभव आहे; सबब ही फोड करणें जरूर आहे असें सिलेक्ट कमिटीनें सुचविलें आहे. हें कलम पास झाल्यास ५६ व्या कलमाची शेतकऱ्याच्या गळ्याभोंवतालची दोरी अधिक घट्ट होईल. ५६ व्या कलमाची

याप्रमाणें दुरुस्ती सुचविल्यावर ७० व्या कलमाची दुरुस्ती करण्याबद्दल सिलेक्ट कमिटीनें सूचना केली आहे. हें बिल पास झाल्यानंतर जमीन विकण्याचा किंवा गहाण ठेवण्याचा अधिकार शेतकऱ्यास नसल्यामुळें कोर्टाचा हुकूमनामाहि त्याच्या जमिनविर बजावतां येणार नाहीं हें उघड आहे. पण सिलेक्ट कमिटीनें असें सुचविलें आहे कीं, " उघड आहे " एवढ्यावर ही गोष्ट ठेवून उपयोगी नाहीं. त्याकरितां लँड रे. कोडाच्या ७० व्या कलमास एक पुरवणी जोडावी. ती अशी कीं, कोर्टानें ही जमीन विकूं नये आणि विकल्यास कलेक्टरसाहेबांचा दाखला आल्याबगेबर कोर्टानें आपला पहिला हुकूम फिरवून खरेदी किंवा जप्ती रद्द करावी. सिलेक्ट कमिटीनें मंजूर केलेल्या बिलाचें १५ कलम थोडेंसें महत्त्वाचें आहे. सारा न दिला, तर एकदम जमीन खालसा करण्याचा लँड रे. कोडमधील १५३ कलमाप्रमाणें कलेक्टरास अधिकार आहे. पण यापुढ ज्या जमिनी खालसा होणार त्यावरील मालकी हक्कहि सर्वस्वी जावयाचे असल्यामुळे सिलेक्ट कमिटीनें अशी सूचना केली आहे कीं, १५३ कलमाप्रमाणे जमीन खालसा करण्यापूर्वी कलेक्टरानें लेखी जाहिरनामा काढावा आणि निदान जाहिरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवस तरी जमीन खालसा करूं नये. सारांश, इतउत्तर जमीन खालसा करणें तीं निदान १५ दिवसांची नोटीस मिळाल्याशिवाय होऊं असें सिलेक्ट कमिटीचें म्हणणें आहे. पंधरा दिवसांपेक्षां माहिन्याची मुदत असती तर बरें होतें; कारण या नोटिशी रयतेच्या नजरेस येण्यास बराच अवकाश लागतो. कोर्टाच्या संबंधानें सिलेक्ट कमिटीनें जी सूचना केली आहे, त्यांत कोर्टाचा हुकूम अमुक एक मुदतीपर्यंत रद्द करण्यांत येईल, पुढें करण्यांत येणार नाहीं, अशी जी एक मुदत पाहिजे होती तीहि घातलेली दिसत नाहीं. ५६ व्या कलमाचा गळफांस तर अधिकच घट्ट झाला आहे हें तर सांगावयास नकोच. बाकीच्या सुधारणा निवळ शब्दरचनेसंबंधाच्या किंवा क्षुल्लक बाबतींतल्या आहेत. त्याचा येथे विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. बिलाचें तत्व सिलेक्ट कमिटीनें कायम राखिलें आहे. सिलेक्ट कमिटीपुढें कागद काय आले होते हें रिपोर्टांत कोठें दाखल नाहीं. आमच्या मतें ज्या सरकारी अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणें हें बिल करण्यांत आलें त्यांच्या मताचे कागद सिलेक्ट कमिटींतील सभासदांनीं मागितले असते तर बरें झालें असतें. सिलेक्ट कमिटीनें हें नवें बिल मराठी, गुजराथी व कानडी भाषेंत भाषांतर करून छापावे असे सुचविलें आहे, त्यावरून सरकाराकडे अर्ज करण्यास अद्याप लोकांस बराच अवकाश मिळेल असें दिसतें. तर त्यांनीं तो फुकट न दवडतां जेथून जेथून अद्याप अर्ज गेले नाहींत तेथून तेथून ते पाठविण्याची संधी फुकट दवडूं नये अशी त्यांस आमची सूचना आहे.

❖ ❖ ❖

* नवीन बिल व लोकमत

आजपर्यंत आम्हीं जमीनमहसुलाच्या बिलासंबंधानें जे लेख लिहिले व त्यांत ज्या गोष्टी प्रतिपादन केल्या त्या सर्वांस ग्राह्य होऊन ठिकठिकाणच्या लोकांकडूनच नव्हे तर अखेरीस मुंबई येथें ना० मेथा यांचे अध्यक्षतेखालीं एक मोठी जंगी सभा भरून लोकमत स्पष्टपणें सरकारास कळविण्यांत आलें, याबद्दल आम्हांस फार आनंद वाटतो. केसरींतील लेख पहिल्यानें कित्येकांस कडक वाटले असतील; पण खरोखर लोकहिताचा मार्ग आम्हीं सांगितला तोच होता व अखेरीस ना. मेथा, सर भालचंद्र, वगैरे मंडळींसहि शेवटीं त्याच मार्गाचें अवलंबन करावें लागलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ज्या वेळेस लोकांच्या हक्कावर एकादा घाला येतो तेव्हां भीडभाड न धरतां ठिकठिकाणच्या सर्व लोकांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं एकदिलानें व आपापसातील भेद विसरून सरकारापुढें नम्रपणें पण निग्रहानें आपलें मत कळविणें जरूर आहे, व तसा प्रकार हल्लींच्या बिलासंबंधानें झाला, ही गोष्ट आमच्या मतें आज कांहीं वर्षें थंडावत आलेल्या लोकमताच्या भावी चांगल्या स्थितीचें चिन्ह होय. बिलाचे दुसरे वाचनाची मुदत आणखी महिनाभर वाढली आहे; तेव्हां अद्यापहि ठिकठिकाणचे लोक गुजराथींत, कानडींत, मराठींत किंवा इंग्रजींत साधेल त्याप्रमाणें सरकाराकडे या बिलाविरुद्ध अर्ज करण्यास सोडणार नाहींत अशी आम्हांस उमेद आहे. दर एक खेड्यांतून एकेक नव्हे तर दहा दहा अर्ज सरकारांत गेले तरी ते पाहिजे आहेत. व असे अर्ज जातील तेव्हांच काम होईल हें सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. हल्लींचें बिल लहान दिसतें खरें; पण हें आक्काबाईचें पोर सर्व इलाखा भिकारी करील इतकें त्यांचें दुष्ट सामर्थ्य आहे व त्याची ओळख लोकांस बरीच पटत चालली आहे, हें परवांच्या सभेवरून स्पष्ट होतें. ही सभा पुष्कळ सभ्य गृहस्थांच्या सूचनेवरून मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशननें बोलाविली होती व तिला निरनिराळ्या ठिकाणांहून सुमारें ७०० प्रतिनिधि गेले होते असें समजतें. यापेक्षां प्रांतिक सभाच यावेळीं भरविली असती तर फार चांगलें झालें असतें. पण आमच्या कांहीं पुढाऱ्यांच्या गैरसोयीमुळें तशी गोष्ट करता आली नाहीं असें वाटतें. कसेंहि असो, आतां स्थानिक व प्रांतिक यांपैकीं कोणत्याहि प्रकारानें बिलाविरुद्ध लोकमत जाहीर करण्याचें राहिलें असें म्हणण्यास जागा उरली नाहीं. गेल्या दोनतीन आठवड्यांत इलाख्यांतील निरनिराळ्या गांवीं प्रत्यहीं पांचचार सभा झाल्याचें ऐकण्यांत आलें नाहीं असा आमचा एकहि दिवस गेला नाहीं. आज मितीस बऱ्याच तालुक्यांचे ठिकाणीं, बहुतेक जिल्ह्याचे

* [केसरी ता. ३० जुलै १९०१]

शहरीं, व इलाख्याच्या दोनहि राजधानीच्या नगरांत जाहिरसभा भरून बिला-विषयीं असलेलें आपलें प्रतिकूल मत जितक्या स्पष्ट शब्दांनीं राजनिष्ठ प्रजेनें आपल्या मानघन प्रभूस कळविणें शक्य आहे तितक्या स्पष्ट शब्दांनीं तें कळविलें आहे. औपचारिक मायने लिहिण्यांत वाकबगार असलेले मुत्सद्दी, शब्द तोलून कायदेशीर व नेमस्त भाषा वापरणारे वकील, व मनांत येईल तोच अर्थ ओठांनीं बाहेर काढणारी निरक्षर शेतकरी रयत, इत्यादिकांनीं आपल्या अर्जांत जो मजकूर सरकारास आतांपर्यंत कळविला आहे त्यांत मतभेद नसून सर्वांनीं एकच गोष्ट नमून पण निक्षून सांगितलेली आहे, व ती हीच कीं, हल्लीं पुढें आणलेल्या बिलापासून कोणाचाच फायदा नसून आज अनादि कालापासून उपभोगिलेला जमिनीवरील मालकी हक्क नष्ट होण्याची वेळ आल्यानें व शेतकऱ्यांची पत ठार बुडण्याचा प्रसंग येऊन ठेपल्यानें सर्व प्रजा अस्वस्थ व बेदिल होऊन गेलेली आहे. यास्तव सरकारांनीं कृपाळू होऊन हें बिल परत घ्यावें. हल्लीं प्लेग व दुष्काळ अशा उपाधींच्या जोडीनें प्रजा गांजून गेलेली आहे, व अशा वेळीं मालकी हक्कावर घाला घालणारा व दुष्काळव्यवस्थेच्या उदार तत्त्वांवर हरताळ फांसणारा असा हा कायदा पास करणें म्हणजे दुःखावर डाग दिल्याप्रमाणें होणार आहे. गारोड्याच्या टोपलींतून एकदम आंब्याचें झाड उगवावें त्याप्रमाणें आगापिछा कांहीं नसतां एक दोन मुलकी अधिकाऱ्यांच्या डोक्यांत उत्पन्न झालेल्या कल्पनेवर हें बिल दकदम पुढें आलेलें आहे. त्यास मुत्सद्दीगिरीचा आधार नाहीं. प्रजेच्या संतोषानें अगर संपन्नतेनें याची फलद्रूपताहि होणें नाहीं. असें हें बिल पुढें येणें हेंच मुळीं गैरशिस्त; व आलें तरी तें अद्यापि मागें घेण्यास अवधि आहे. कायदेकौन्सिलपुढें आणलेलें बिल म्हणजे तो कांहीं 'रामाचा बाण' नव्हे किंवा 'वासवी शक्ति' नव्हे कीं जी एकदा हातांतून सुटली म्हणजे मग परत यावयाचीच नाहीं. हीं बिलें म्हणजे मांजराच्या नखांसारखीं वाटेल तेव्हां पुढें काढतां येतात व वाटेल तेव्हां मागें घेतां येतात. सरकारांनीं हें बिल पुढें आणण्यापूर्वी लोकमत विचारावयास पाहिजे होतें. तसें झालें नाहीं, तर आतां लोकमत स्पष्ट रीतीनें प्रगट झालें आहे. तेव्हां आतां तरी तें मागे घ्यावें व सावकाशपणें सर्व गोष्टींचा पुरता सारासार विचार करून मग काय तें करावें, इत्यादि मजकूर सरकारचे कानावर गेलेला आहे व प्रत्यहीं जात आहे. असें असतां सरकारास त्याचें कांहींच वाटत नाहीं. एखाद्या पैलवानाचे दंडावर दगडाचे प्रहार केल्यानें ते दंड भंग न पावतां उलट अधिकच घट्ट होतात, त्याचप्रमाणें जसजसे लोकमताचे आघात होऊं लागले तसतसा सरकारचा निश्चय न डळमळतां तो उलट अधिकच दृढ होत चालला आहेसा दिसतो. कारण इकडे जिल्हानिहाय सभा भरताहेत, तर इकडे कलेक्टरसाहेब उद्यांचें बिल आजच पास झालें समजून त्याचा सारा--वसुलीचे कामीं अंमल करूं

लागले आहेत ! इकडे गरीब रयत लोक हें नवीन संकट काय आहे म्हणून पुरता उमज न पडल्यामुळें मामलेदार लोकांकडे घांव घेण्यास तयार होतात तोंच मामलेदार लोक गांवकामगारांमार्फत सरकारी जमिनीची बाकी दिली नाहीं तर नवीन बिल पास होतांच जमिनी सरकारदाखल होतील, खरेदी व गहाण देण्याचा हक्क नाहींसा होईल, व गहाणदार वगैरे लोकांचे पूर्वीचे हक्कहि नष्ट होतील अशा भयंकर अर्थाची जाहिरखबर गांवकामगारामार्फत पसरण्यांत गुंतलेले आहेत असें दिसतें. सरकारचे हे हुकूम व लोकांचे हे अर्ज यांचा केवळ कार्यकारणसंबंध जरी नसला तरी हा वेळपावेतों प्रगट झालेल्या लोकमतानें,—निदान लोकांत झालेल्या चळवळीनें व असतोषानें—सरकारचे मनावर यत्किंचित्हि परिणाम झाल्याचें आम्हांस तरी दिसत नाहीं. या स्थितीचे हटकून अमुकच परिणाम होतील हें सांगण्यास आम्ही कांहीं भविष्यवादी नाहीं. परंतु लोकमताचा सरकार अशा रीतीनें उपमर्द किंवहुना धिःकार करीत आहेत हें सुचिन्ह नव्हे खास. एवढेंच नव्हे तर 'कुणबी' हें टोपण नांव धारण करून गरीब कुणब्यांशीं मायावी सहानुभूति दाखवून सुशिक्षित वर्गास शिव्या देणाऱ्या युरोपियन गृहस्थांनीं—मग हे गृहस्थ कदाचित् उच्च दर्जाचे अधिकारीहि असतील !—लोकमत म्हणजे बी. ए. एल्एल्. बी.ची टुग्टुर असे टाइम्स ऑफ इंडियांत स्पष्ट उद्गार काढिले आहेत. लोकमताच्या पवित्र तत्वाचा अशा रीतीनें उपहास करणाऱ्या या गृहस्थांच्या डोळ्यावर अधिकाराची धुंदी खास आली आहे असें म्हणावें लागतें. एरवी सुधारलेल्या राज्यांत लोकमत व्यक्त करण्याचा अधिकार स्वाभाविकपणें सुशिक्षित पुढाऱ्यांवर येतो ही सूर्यप्रकाशाइतकी उघड गोष्ट न पाहिल्याचा आविर्भाव करून त्यानें सुशीक्षित वर्गाची टर करण्याचा प्रयत्न केला नसता. परंतु हा प्रयत्न व्यर्थ होय. रयतेच्या खऱ्या हिताचिंतकास शिव्या देऊन तिचे कायते हितकर्ते आपणच असें भासविण्याचा कपटनाटकी प्रयोग आज इतके दिवस या हिंदुस्थानांतील रंगभूमीवर होत आहे कीं त्याचा चटकदारपणा सर्व निघून जाऊन त्यांतील मर्म खुद्द रयतेच्याहि लक्षांत आतां पुरें येऊन चुकले आहे. जोंपर्यंत सावकाराचें गळ्यावर सरकारानें फांस टाकिला होता तोंपर्यंत कदाचित् रयत फसली जाण्याचा संभव होता. परंतु गेल्या २० वर्षांचे अनुभवानें सावकाराला मारल्यापासून आपल्यास खरोखर फायदा किती झाला हें रयतेस कळूं लागलें आहे, व शिवाय आतां तर त्यांच्या स्वतःच्या मालकी हक्कावरच घाला येऊन पडलेला आहे! यामुळें सरकारच्या कळकळीचें खरें स्वरूप त्यांजपासून यापुढें लपून राहणें शक्य नाहीं व १८७९ च्या शेतकऱ्यांचे कायद्याचे वेळीं रयतेकडून जितका प्रतिबंध झाला होता त्यापेक्षां शतपटीनें हल्लींच्या बिलास त्यांजकडून होत आहे. यावरून वरील विधानाची सत्यता कळून येणार आहे. आजपर्यंत नवीन बिलाविरुद्ध शेतकऱ्यांच्या अर्जांचीं भेंडोळींच्या भेंडोळीं सरकारच्या टेबलावर जाऊन पडलीं आहेत. त्यांव-

रून तरी लोकमत म्हणजे निवळ बी. ए. एल्एल् बी. लोकांची टुरटुर नव्हे, एवढें कबूल करणें भाग येईल. परंतु लोकमत आशिक्षित रयतेचें असो किंवा सुशिक्षितांचें असो दोघांचीहि किंमत सरकाराजवळ बहुधा सारखीच आहे. या लोकमतास सरकार कोठें विचारतें आहें ? व त्यांनीं विचारावें तरी काय म्हणून ? कारण त्यांच्या सल्लगारांनीं बहुधा त्यांस अशी सल्ला दिलेली दिसते कीं, हिंदुस्थानची प्रजा सात्विक आहे. तिचें काय वाटेल तें केलें तरी तिला कधींहि राग येणार नाहीं. व तसें खरें असेल तर मग " अमर्श-शून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः " हा भारवी कवीनें वर्णिलेला न्याय लोकप्रसिद्ध आहेच. तथापि सरकारास आमची अशी विनति आहे कीं केवळ लोक सात्विक आहेत येवढ्यामुळेंच त्यांनीं लोकमतास तुच्छ मानूं नये.

❖ ❖ ❖

* उठा, अजून वेळ गेली नाहीं

जमीनमहसुलाच्या कायद्याच्या बिलाचें दुसरें वचन ता. २२ आगष्ट रोजीं व्हावयाचें म्हणून प्रसिद्ध झालें आहे. मुंबई कायदेकौन्सिलाच्या याच बैठकींत यंदाच्या सालच्या प्रांतिक बजेटावर वादविवादहि व्हावयाचा असल्यामुळें बिलाच्या दुसऱ्या वाचनास किती अवकाश मिळेल याची शंकाच आहे. तथापि सरकारच्या मनांत दुसरें वाचन करावयाचेंच असल्यास वेळेची सबब सरकार पुढें आणणार नाहीं, आणि ती सबब सरकारानें पुढें आणली नाहीं म्हणजे नॉन-ऑफिशियल सभासदांनीं कितीहि तक्रार केली तरी बिलाचें दुसरें वाचन चुटकी-सरसें होऊन जाणार आहे; आणि दुसरें वाचन झाल्यावर मग तिसरें वाचन करण्यांत गव्हर्नरसाहेबांची मंजुरी मिळाल्यावर एक क्षणाचा देखील अवकाश लागत नाहीं ! तेव्हां अशा स्थितींत आमच्या लोकनियुक्त सभासदांनीं काय करावयास पाहिजे हें आम्ही सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं. बिलाच्या पहिल्या वाचनाचे वेळीं कित्येक लोकनियुक्त सभासदांनीं मतें घेतांना 'नो नो' म्हटल्याची हकीकत येथील एका पत्रकारानें गुलदस्त म्हणून प्रसिद्ध केली होती. परतु गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या सरकारी ग्याझेटांत कायदेकौन्सिलच्या सेक्रेटरीच्या सहीनें बिलाच्या पहिल्या वाचनाचे वेळचें कायदेकौन्सिलचें जें प्रोसिडिंग प्रसिद्ध झालें आहे त्यांत ही 'नो नो' ची गोष्ट कोठें नमूद केलेली आम्हांस सांपडली नाहीं. उलट मतें घेण्याच्या संबंधानें त्यांत जो उल्लेख आलेला आहे तो एवढाच

---

* [केसरी ता. १३ आगष्ट १९०१]

आहे कीं, " गव्हर्नर व अध्यक्ष यांनीं पहिल्या वाचनाची सूचना कौन्सिलपुढें आणली होती व ती मंजूर झाल्यावर पहिलें वाचन समाप्त झालें. " पहिल्या वाचनाचे वेळीं कोणी मेंबर विरुद्ध होते कीं नाहीं व असल्यास कोणते, सूचना पास झाली ती बहुमताने झाली किंवा सर्वानुमतें झाली, या गोष्टींचा सरकारी ग्याझेटांत कोठें उल्लेख नाहीं; आणि सरकारी ग्याझेटांत नाहीं म्हणजे इतर ठिकाणचा असून नसून फुकट आहे. बिलाच्या दुसऱ्या वाचनाचे वेळीं असा प्रकार होणार नाहीं हें आजपर्यंतच्या झालेल्या चर्चेवरून उघड आहे; तथापि त्यासंबंधाने एक सूचना करणें अवश्य आहे, ती ही कीं, बिलाच्या पहिल्या वाचनाचे वेळीं काहीं लोकनियुक्त सभासदांनीं ज्या थोड्याबहुत गोष्टी विनाकारण कबूल केल्या आहेत, तसा प्रकार आतां होऊ देऊं नये. किंबहुना पूर्ण विचारांतीं त्या बरोबर नाहींत अशी आपली खात्री झाल्याचेंहि प्रतिपादन केलें पाहिजे; आणि तसे होईल अशी आम्हांस बळकट आशा आहे. सरकारचा अधिकार मोठा किंवा कौन्सिलांत सरकारनें नेमलेले सभासद अधिक असतात म्हणून आम्ही आपलें म्हणणें मुळमुळीत ठेऊन किंवा नाटकांतील पात्रांप्रमाणें जनांतिक ' नो नो ' म्हणून कांहीं उपयोगी नाहीं. तशांत हल्लींचें बिल म्हटलें म्हणजे मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांच्या भावी दुर्दैवी स्थितीचें मूळ बीजच आहे असें म्हटलें तरी चालेल. अशा या दुष्टपरिणामी बिलाचा प्रतिकार लोकांच्या वतीनें सर्व लोकनियुक्त सभासदांनीं निग्रहानें व जोरानें केला पाहिजे, व बिलाच्या प्रत्येक कलमावर, किंबहुना प्रत्येक महत्त्वाच्या शब्दावरहि प्रतिकूल टीका व्हावयास पाहिजे. मग केवळ मनगटाच्या किंवा सरकारी सभासदांच्या जोरावर सरकारास काय करावयाचें असेल तें करो. सरकारचे हेतु चांगले आहेत म्हणून सरकारतर्फे एक सबब नेहेमीं सांगण्यांत येत असते. पण या सबबींत कांहीं अर्थ नाहीं. आमच्या शेतकऱ्यांचीं तोंडें चित्रांतील चेहऱ्याप्रमाणें सुबक नाहींत म्हणून तीं नीट करण्याकरितां चांगल्या हेतूनें जर त्यांच्या थोबाडींत कोणी भराभर देऊं लागला, तर त्याच्या सद्धेतूची आम्ही जितकी तारीफ करूं तितकीच सरकारच्या सद्धेतूची हल्लींच्या प्रकरणांत केली पाहिजे. आमचा सरकाराशीं जो वाद आहे तो हेतूबद्दल नाहीं, परिणामाबद्दल आहे. आणि जोपर्यंत बिलाचें परिणाम वाईट होतील अशी प्रत्येकाची खात्री आहे तोंपर्यंत सरकारचा हेतु कितीहि चांगला असला तरी तो फुकट आहे.

बिलाच्या विरुद्ध सुमारें ५४९ देशी भाषेंत आणि ३१ इंग्रजी अर्ज गेल्याचें कौन्सिलच्या कार्यक्रमपत्रिकेंत प्रसिद्ध झालें आहे. आज दोन महिनेपर्यंत एकसारखा ओरड चालली असतां मुंबईइलाख्यांतून या बिलाविरुद्ध सहाशेपेक्षां अधिक अर्ज जाऊं नयेत हें मोठेंच आश्चर्य होय. लाखों लोकांच्या आंगाखालील जमिनी एका पेनाच्या झपाट्याबरोबर काढून घेतल्या जात आहेत, ही गोष्ट

जितक्या पुरतेपणीं लोकांस कळली पाहिजे तितकी अद्याप कळली नाहीं असें दिसतें. मुंबईची सभा ग्रॅज्युएटांची म्हणून टाइम्सग्याझेटांनीं ओरड केली आहे. पण कायदेकौन्सिलच्या टेबलावर ज सुमारें साडेपांचशें अर्ज पडले आहेत ते कांहीं ग्रॅज्युएटांचे नव्हत. आम्हास जी माहिती मिळाली आहे त्यावरून हे अर्ज किंवा यांपैकीं पुष्कळ अर्ज निवळ शेतकऱ्यांचे आहेत असें दिसून येतें. शेतकऱ्यांनीं जी ही चळवळ केली तो आजपर्यंतच्या अनुभवावरून पाहतां बरीच झाली असें म्हटलें पाहिज, पण अद्याप आमच्या मतें तरी ती पुरी झालेली नाहीं. हल्लीं मुंबई कायदे कौन्सिलपुढें जें बिल आलें आहे तें अशा प्रकारचें आहे कीं, सर्व खेड्यापाड्यांतील चावडींत त्याची चर्चा होऊन दर खेड्यांतून निदान एक अर्ज तरी सरकाराकडे यावयास पाहिजे होता. आमचा शेतकरी वर्ग विद्येनें मागास-लेला असल्यामुळें घुष्कळांस लिहितां वाचतां येत नाहीं व वर्तमानपत्रांवरून समजूत करून घेतां येत नाहीं, हें खरें आहे. तथापि ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं हल्लीपेक्षां थोडी जास्ती मेहेनत केली असती तर सहाशेंपेक्षां जास्त अर्ज सरकाराकडे खचित पाठावितां आले असते, व अद्यापहि पाठवितां येतील. शिरोलेखांत लिहिल्याप्रमाणें अद्याप आठ दहा दिवसांचा अवकाश आहे व ज्या ज्या ठिकाणाहून अद्याप अर्ज गेले नाहींत त्या त्या ठिकाणांहून मुंबई कायदेकौन्सिलच्या सेक्रेटरींच्या नांवें तार किंवा अर्ज अजूनहि पाठविण्यास वेळ आहे. अर्जांत कारणें वगैरे देण्याच्या भरीस न पडतां लोकांनीं आपणांस हें बिल नको एवढें कळविलें तरी बस आहे; आणि तेवढें घुष्कळांनीं कळविलें आहे हें जरी खरें आहे, तरी अजून अशा प्रकारचे अर्ज किंवा तारा जितक्या सरकाराकडे जातील तितक्या चांगल्या. विलायतेसारख्या स्वतंत्र देशांत जर असें बिल आलें असतें तर त्याच्या वाचनाचे वेळीं हजारों लोकांचा कायदे-कौन्सिलाभोंवतीं गराडा पडला असता. तसा प्रकार येथें होणें शक्य नाहीं, पण त्याऐवजीं निदान कायदेकौन्सिलाचें टेबल अर्जांच्या ओझ्याखालीं वांकून जावयास पाहिजे. बिलासंबंधानें मुंबईइलाख्यांतील कोणताहि समजस शेतकरी अनुकूल मत देणार नाहीं अशी आमची खात्री आहे परंतु स्वतंत्र देशांत लोकमत प्रसिद्ध करण्याच्या ज्या रीती आहेत त्यांचें अनुकरण करण्यास आमचा शेतकरी वर्ग अद्याप न शिकल्यामुळें त्यांचें मत त्यांस सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकमताप्रमाणें व्यक्त करतां येत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आज जे सहाशें अर्ज सरकारांत आले आहेत; हे सहा हजार अर्जाच्या ठिकाणीं आहेत व सरकार त्यांचा योग्य विचार करील अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. मुंबईसरकारच्या या बिलानें इलाख्यांत हल्लीं जी चळवळ उडाली आहे तितकी चळवळ अलीकडे सदर सरकारच्या दुसऱ्या कोणत्याहि बिलानें झाल्याचें आम्हांस माहीत नाहीं. म्युनिसिपालिटीचें बिल वाईट होतें खरें, पण त्या बिलाच्या वाईटपणांत आणि हल्लींच्या बिलाच्या वाईटपणांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. म्युनिसिपालिटीचा

अंमल फार झालें तर मोठमोठ्या गांवांतील लोकांवरच व्हावयाचा, पण हल्लींच्या बिलाचा अंमल सर्व मुंबई इलाख्याभर व्हावयाचा असून तोही अशा तऱ्हेचा आहे कीं, त्यामुळें बहुतेक सर्व शेतकरीवर्ग भिकेस लागणार. पंजाबांतील शेतकऱ्यांकरतां नुकताच जो कायदा हिंदुस्थानसरकारनें मंजूर केला; त्यांतहि जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडून काढून घेतलेली नाहीं. परंतु मुंबईसरकारनें हिंदुस्थानसरकारावरहि ताण केली आहे. इतकेंच नव्हे तर, सन १८५८ सालच्या राणीसाहेबांच्या जाहीरनाम्यासहि हरताळ लावण्याचा प्रसंग आला आहे. सन १८५७ चें बंड, इनाम-कमिशनसारख्या इनामें खालसा करणाऱ्या संस्था काढल्यामुळें झालें, निदान तें होण्यास जीं अनेक कारणें झाला त्यांपैकीं हें एक होतें असें कित्येकांचें म्हणणें आहे. हें खरें असो वा खोटें असो, बंडानंतर सन १८५८ सालीं राणीसाहेबांनीं जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत लोकांस असें स्पष्ट अभिवचन दिलें आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांची पूर्वापार चालत आलेल्या जमिनीवर प्रेम व आसक्ती आहे ती सरकारास माहीत आहे; व साऱ्याच्या रूपानें सरकारचें जें योग्य घेणें असेल तें घेऊन मामूल वहिवाटीप्रमाणें लोकांचे जे योग्य हक्क आहेत त्यांचें संरक्षण करूं. जाहिरनाम्यांतील हें अभिवचन लक्षांत आणलें असतां हल्लींचें बिल सर्वांशीं या अभिवचनाच्या विरुद्ध आहे असें कोणाच्याहि लक्षांत येईल. महाराष्ट्रांतील शेतकरी लोक केवळ उपरीं कुळें या नात्यानें जमीन करण्यास कधींहि खुषी असावयाचे नाहींत; मिराशी हक्काकरितां प्राण देतील; असें पुष्कळ इंग्रजी अंमलदारांनीं पूर्वीं लिहून ठेविलें आहे. व १८५८ च्यां जाहिरनाम्यांतहि अशाच प्रकारच्या लोकांच्या जमिनीवरील आसक्तीचा उल्लेख केला आहे. हा उल्लेख व हें धोरण लक्षांत आणून मुंबईसरकारनें या वेळीं न्यायानें व सरळपणानें हल्लींचें बिल काढून घ्यावें हें फार चांगलें असें आम्हांस वाटतें व त्याप्रमाणें तें करील अशी आम्हांस उमेद आहे. लोकांनीं मात्र या कामीं सरकारचा पिच्छा पुरविण्याचें कमी करूं नये.

❁ ❁ ❁

* नवीन बिलाची आरती

गेल्या आठवड्यांत जमीनमहसुलच्या बिलासंबंधानें कमींत कमी तीन साडे-तीन हजार लोकांनीं व्यक्तिशः म्हणजे लेखी सह्यानिशीं व कित्येक संस्थांनीं जन-समूहाचे तर्फे आपली नापसंती सरकारास कळविली आहे, व हें बिल येत्या गरु-वारीं कौन्सिलपुढें न येतां आणखी कांहीं दिवस लांबणीवर पडेल तर दिवसें-दिवस आधिकाधिक अर्ज सरकारचे टेबलावर जाऊन पडतील याविषयीं आम्हांस शंका नाहीं. पूर्वकालीन ग्रीसच्या इतिहासांत एका नगरच्या शूर व स्वाभिमानी स्त्रियांनीं आपल्या हातांतिल कंकणें व दागिने फेंकून आपल्या एका शत्रूस ठार केल्याची गोष्ट सांगण्यांत येतें. हल्लींच्या काळच्या आम्हां हिंदुस्थानवासी लोकांच्या अर्जांस स्त्रियांच्या हातांतिल कांकणाइतकीच योग्यता आलेली आहे हें आम्ही जाणून आहों; तथापि प्रस्तुतचें बिल लोकांस इतकें अप्रिय आहे कीं, थोडीशी कालावधि मिळाली असतां आमच्या भिन्न्या प्रजावर्गाकडूनहि सदरहू बिलावर अर्जांचा इतका वर्षाव होणें शक्य आहे कीं, त्याखालीं चिरडून गेलेलें बिल सजीव करण्यास आमचे सरकारास एखादी नवीन अमृतसंजीवनी विद्याच शोधून काढावी लागेल! असो; गेल्या आठवड्यांत जे अर्ज सरकारदप्तरीं जाऊन रुजू झाले आहेत त्यांपैकीं मुख्य म्हटले म्हणजे पुणें, खानदेश, गुजराथ, विजा-पूर, साष्टी येथील अर्ज होत. पैकीं साष्टी येथील अर्जावर २३०० व खानदे-शच्या अर्जावर १००० सह्या असल्याचें समजतें. गुजराथचा अर्ज, सर्व गुजराथ-तर्फे बिलाविरुद्ध तक्रार करण्यास नेमलेल्या कमिटीनें पाठविलेला आहे. याशिवाय मि. लल्लूभाई सामळदास, भावनगर संस्थानचे माजी रेव्हिन्यू कमिशनर, यांनांहि स्वतंत्रपणें बिलास कांहीं गोष्टींत अनुकूल परंतु कांहीं गोष्टींत प्रतिकूल अशीं टिपणें करून सरकारास पाठविलीं आहेत. या इतक्या अर्जांपैकीं पुण्याचे जाहीर सभेमार्फत गेलेला अर्ज बराच विस्तृत आहे, व त्यामध्यें रयतेच्या जमिनीवरील मालकी हक्काच्या पूर्वापार इतिहासाचें थोडक्यांत समग्र पर्यालोचन केलेलें असून असें स्पष्ट दाखविण्यांत आलें आहे कीं, मालकी हक्काच्या प्रश्नाचा पूर्वापार इति-हास व खुद्द लँड रे. बिलांतील निरनिराळीं कलमें यांची एकवाक्यता इतक्या गोष्टींचा विचार केला असतां आज जर लँड रे. कोडाची दुरुस्ती होणें अवश्य असेल तर ती, १८७९ सालीं पास झालेल्या जमीनहसुलाच्या कायद्यांतील कलम ५६ यामध्यें Forfeiture (खालसा करणें) हा जो अनर्थास्पद शब्द सरकारानें घुसडून दिलेला आहे, व जो आज बावीस वर्षें राहूं दिल्यानें सरकार वहिवा-

---

* [केसरी ता. २० आगष्ट १९०१]

टीचा हक्क सांगूं लागलें असून आजपर्यंत केव्हांहि न बजावलेल्या अधिकाराचें बीज या शब्दांत आहे असें प्रतिपादन करूं लागलें आहे, तो शब्द काढून टाकून लोकांच्या मालकी हक्कांस अविरुद्ध असा शब्द घालण्याकरितांच कायती दुरुस्ती हवी आहे. त्याचप्रमाणें, मुंबई इलाख्यांतील रयतेची आपल्या जमिनीवर किती दृढ प्रीति असते, व जमीन राखण्याकरितां ते काय काय करण्यास अगर सोसण्यास तयार होतील हें सर विल्यम लि–वॉर्नरसारख्या प्रजाविद्वेषी साहेब लोकांच्या लेखांतूनहि कसें सिद्ध करतां येतें हें दाखवून, व विशेषतः जमिनीचे बाबतींत लोकांचे हक्कावर दरोडा पडून त्यांचीं मनें बेदिल न व्हावींत या घोरणानें खुद्द महाराणी सरकारांनीं १८५८ च्या जाहिरनाम्यांतहि ' जमिनीवरील प्रजेच्या सर्व हक्कांचे आम्ही यथायोग्य परिपालन करूं व या बाबतींत नवीन कायदे करतांना आणि जुन्यांची अंमलबजावणी करितांना लोकांचे हक्क व त्यांच्या चालीरीति यांकडे पूर्ण लक्ष देऊं' असें स्पष्ट आश्वासन दिलें असल्यानें हल्लींसारखें बिल पुढें आणण्यांत मुंबईसरकारची राजनीतिदृष्टया घोड्याएवढी चूक कशी होत आहे हेंहि पुण्याच्या अर्जांत स्पष्टपणें दाखविलें आहे. मि. लल्लूभाई सामळदास यांनीं आपल्या टिपणांत बिलांतील मुख्य तत्त्वास, म्हणजे रयतेस आपली जमीन गहाण अगर खरेदी देण्याच्या हक्कास, आळा घालण्याच्या तत्वास संमती दिलेली आहे, व असें केल्यानें शेतकऱ्याचे लायकीस धक्का पोहोंचणार नाहीं असेंहि त्यांनीं मत दिलें आहे. तथापि हें त्यांचें मत गुजराथेच्या एका भागापुरत्या व कांहीं विवक्षित प्रकारच्या अनुभवानें बनलेलें असून शिवाय त्यांचें म्हणणें मध्यहिंदुस्थानांतील कित्येक संस्थानांच्या प्रजेच्या स्थितीच्या पुराव्यानें खोडून काढतां येण्यासारखें आहे. परंतु या दोन गोष्टी वगळल्या असतां बाकी, थोड्या वर्षांच्या करारानें जमिनी लागवडीस देणें, त्याही वाटतील त्यास व वाटतील त्या शर्तीनें देणें, व विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रस्तुतच्या स्थितींत हल्लींसारखें बिल पुढें आणणें या बाबतींत मि. लल्लूभाईसारखे सरकारचे अकारणबंधूहि त्यांजविरुद्ध आहेत. अशा रीतीनें रयतेच्या तर्फे व बिलाविरुद्ध तक्रारींचा बराच गोंगाट झालेला पाहून व आपली बाजू उचलून धरण्यास कोणी पुढें येत नाहीं असें जाणून निदान आपण तरी आपली स्तुति करावी व लोकमताच्या या देखाव्यानें आपण यत्किंचितहि डगमगलों नाहीं असें दाखवावें याकरितांच कीं काय मुंबईसरकारनेंहि मुद्दाम ठराव प्रसिद्ध करून आपल्या सर्व्हे व जमिनमहसुलाच्या पद्धतीच्या स्तुतीचे पोवाडे गाण्याचा प्रयत्न केला आहे. या ठरावांत सर्व्हे पद्धतीनें रयतेचा व सरकारचा आजपर्यंत कसकसा फायदा झालेला आहे वगैरे गोष्टी पाल्हाळानें सांगितल्या आहेत, हा ठराव म्हणजे येत्या गुरुवारीं कौन्सिल हालांत सरफारतर्फे होणाऱ्या युक्तिवादाच्या नाटकाची तालीमच असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु एखाद्यास संशयानें " तूं कोण आहेस " असें दरडावून विचारलें

असतां त्यानें आपलें नांव सांगण्याच्या ऐवजीं "मी पुरुष आहे" असें सांगणें, जितकें संशयास्पद होईल तितकेंच, हल्लींच्या बिलांतील नवीन तत्वाविरुद्ध लोकांनीं गवगवा केला असतां त्यांचें सरळ रीतीनें समर्थन करण्याचें सोडून, मोघमपणें आपल्या सर्व्हे व जमीनहसुलाच्या पद्धतीची मोठमोठ्यानें स्तुति करीत सुटणें हेंहि संशयास्पद व हास्यास्पद आहे. असो; अशा रीतीनें येत्या गुरवारीं कायदेकौंसिलांत होणाऱ्या वाग्युद्धांतिल वीर व तत्पक्षाभिमानी यांची जय्यत तयारी चालली आहे. परंतु वादाचें मूळ सरकारच्या लोभीपणांत व अन्यायबुद्धींत आहे असें सिद्ध झालें असतांहि सरकार आपलें बिल पुढें ढकलण्याचा हेका सोडील असें दिसत नाहीं. गेल्याचे मागील गुरुवारीं शेतसारा वसुलीसंबंधानें व जमिनी खालसा करण्यासंबंधानें मुंबईसरकारचा जो एक स्वतंत ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यावरून सदरहू बिल पुढें आणण्यांत सरकारचे हेतु लोभमूलक नाहींत असें भासविण्याचा प्रयत्न 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रानें केलेला आहे. मुंबईसरकारच्या या ठरावांतील आश्वासनाप्रमाणें, गेल्या दोन सालांत थकलेल्या शेतकऱ्याचा वसूल सक्तीनें करण्याचा सरकारचा बेत नसून घुर्दाल दोन सालांत सोईसोईनें तो वसूल करण्याची सरकारची इच्छा जर खरी आहे व जमिनी भराभर खालसा करण्याचा जर सरकारचा खरोखर बेत नाहीं, तर अर्थातच पुढील दोन सालापर्यंत हल्लींचें बिल अमलांत आणण्यांत कांहीं अर्थहि नाहीं. मग आजच बिल पास करण्याची एवढी घाई तरी कशाला ? परंतु वस्तुस्थिति निराळीच आहे. आजपर्यंतचा अनुभव असतांनाहि सरकारचे दाखविण्याचे व खाण्याचे दांत एकच आहेत असें आम्हीं मानूं तर आमच्यासारखें पढतमूर्ख आम्हींच ठरूं. सदर्हू ठरावाची भाषा अशीच कांहीं मोघम आहे कीं, वेळ पडली असतां, या ठरावाचा अंमल करणें व नवीन बिलाचा कायदा करून त्याचाहि अंमल करणें या दोन्ही गोष्टी सर्वथा सुसंगतच आहेत असा युक्तिवाद सरकारी पंडित करूं शकतील अशी आमची पूर्ण खात्री आहे. पण प्रथमतः असा विचार केला पाहिजे कीं, या ठरावाच्या मायावी स्वरूपास भुलून जाऊन आपण टाइम्सकाराचें म्हणणें क्षणभर खरें मानिलें तर मग सदरहू बिलाचे पहिल्या वाचनाचें वेळीं, बिलांतील तत्व अमलांत येण्यास हल्लींचीच स्थिति अत्यंत अनुकूल आहे, शेंकडों जामिनी शेतकऱ्यांच्या बाकीकरतां सरकारच्या हातीं परत येथील व थोड्या मुदतीचे व इतर शर्तींचे करार करून त्या लागवडीस परत दिल्या असतां रयत कर्जमुक्त करण्याचा प्रयोग चांगला सिद्धीस जाईल, असें जें ना. मॉन्टीथसाहेब यांनीं बोलून दाखविलें त्याचा अर्थ काय करावयाचा ? तात्पर्य, टाइम्सकारास हल्लींचें बिल किंवा हल्लींचा ठराव यांपैकीं कोणाचाच खरा अर्थ कळला नाहीं असें म्हणावें लागतें. हल्लींच्या ठरावानें कित्येक खातेदारांस कदाचित् धीर येण्याचा संभव आहे, नाही असें नाहीं. परंतु जोंपर्यंत अमुक एका खातेदारास

आपणास ठरावांतील सवलतीचा फायदा हटकून मिळेल असें छातीवर हात ठेवून सांगतां येण्याइतकी ठरावाची भाषा स्पष्ट नाहीं तोंपर्यंत, लोभी वैद्य लोक दुखण्याचा ज्याप्रमाणें चढउतार करितात त्याप्रमाणेंच, प्रस्तुतचा ठराव हा लोकांच्या चढून गेलेल्या मस्तकास केवळ उताऱ्याचा एक वळसा म्हणून दिलेला आहे असें म्हणावें लागतें. किंबहुना वैद्यकशास्त्रांतलिच उपमा घेण्याची असल्यास शस्त्रक्रिया करण्याचे वेळीं त्वचेचे ठिकाणीं बधिरता उत्पन्न करण्याकरितां जें एक प्रकारचें तेल लाविंतात त्याच्याच योग्यतेचा हल्लींचा हा ठराव होय. याचे योगानें भोळसर व श्रद्धाळू खातेदार लोक कदाचित् समाधान मानतील, परंतु शहाणे फसणार नाहींत. शिवाय, सदर ठरावांतील अश्वासनांचा अगदीं उदार बुद्धीनें अंमल केला तरी त्याचा परिणाम मरणास आड येणाऱ्या रात्रीपेक्षां अधिक फायद्याचा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. हल्लींच्या बिलाचा कायदा होऊन पुढें दोन वर्षांनीं कां होईना परंतु शेतकऱ्यांचे मालकी हक्क काबीज करण्याकरितां शेतसारा थकण्याची संधी केव्हां येते याची वाट पाहण्यास जर सरकार टपून बसणार असेल, तर वरील ठरावानें शेतकऱ्यांस खरें समाधान कितपत होईल हें दिसतच आहे. तात्पर्य शेतकऱ्याचें बेदिल झालेलें मन पुनः तळ्यावर आणण्याची सरकारची इच्छा असेल तर तें काम असल्या मायावी ठरावांनीं होणार नाहीं. फार काय, पण आजचें बिल उद्यांवर टाकूनहि होणार नाहीं, तर बिलांतील मुख्य तत्व आपण बदलतों व हल्लींच्या घाऱ्याच्या पद्धतींत जे कांहीं फेरबदल करावयाचे असतील त्यांची बजावणी मेकॉनकीसारख्या निरर्गल कलेक्टरावर न सोंपवितां त्याजविषयीं कायद्याची स्पष्ट व दृढ बंधनें करितों असें वचन सरकारनें दिलें पाहिजे. हल्लीं तर प्रजेची बालंबाल खात्री होऊन गेली आहे कीं, प्रस्तुतच्या बिलानें मालकी हक्कांचा स्वाहाकार करणें हाच कायतो सरकारचा मुख्य हेतु आहे. व शाकुंतल नाटकांत 'त्वयि तु परिसमाप्तं बंधुकृत्यं प्रजानाम्' या ज्या उदात्त वचनानें राजाच्या निस्सीम प्रजावात्सल्याचें वर्णन केलें आहे त्याच वाक्याचा आधार घेऊन, मुंबईसरकारनें प्रजेचें बंधुकृत्य म्हणजे प्रेमपूर्वक परिपालन करण्याचें बाजूस ठेऊन दुसऱ्या एका प्रकारचें "बंधुकृत्य" म्हणणें निवळ भाऊबंदकी केली व सावकारास बाजूस सारून सर्व जमिनीचे मालकी हक्क आपल्याच घशांत उतरविंले, असा आरोप करण्यास रयत तयार झालेली आहे; व तसें करण्यास तिला सबळ कारण नाहीं असें कोण म्हणेल ? तेव्हां अशा स्थितींत प्रजापीडन–संतापापासून उत्पन्न होणारा अग्नि अधिक धुमसूं न देतां, राजाची लोभबुद्धि हाच प्रजेचा मुख्य शत्रु आहे, व इतर सर्व शत्रूंपासून रक्षण करण्यापेक्षां या शत्रूपासून तिचें रक्षण करण्यांतच राजास विशेष श्रेय आहे हें ध्यानांत आणून हट्टास न पेटतां हल्लींचें बिल माघारें घेऊन मुंबईसरकार आपला शहाणपणा व मुत्सद्दीगिरी व्यक्त करील अशी आम्हांस आशा आहे!

* दुराग्रही सरकार आणि निर्बल लोकमत

गेल्या शनिवारीं येथें भरलेल्या मुंबईसरकारच्या कायदेकौन्सिलाच्या बैठकींत जो अपूर्व प्रकार घडून आला त्यामुळें या इलाख्यांतील सर्व लोकांस अत्यंत वाईट वाटून घडलेल्या प्रकाराबद्दल त्यांच्या मनांत एक प्रकारचा असंतोष उत्पन्न होईल यांत शंका नाहीं. जमीनमहसुलाच्या नवीन बिलाविरुद्ध मुंबई इलाख्याच्या निरनिराळ्या ठिकाणांहून ४२ इंग्रजी व ६३० मराठी वगैरे देशी भाषेंतील अर्ज कौन्सिलच्या टेबलावर जाऊन पडले होते. व या ६३० अर्जांवर कमींतकमी ५२००० लोकांच्या सह्या होत्या. याखेरीज निरनिराळ्या ठिकाणीं जाहिरसभा भरून जे अर्ज पाठविण्यांत आले व मुंबई येथें जी मोठी जाहिरसभा झाली त्यांतील सभासदांची संख्या मोजदादींत धरली तर जवळ जवळ लाख दीड लाख लोकांनीं नवीन बिलाविरुद्ध आपलें मत सरकारास स्पष्टपणें कळविलें होतें. इतकेंच नव्हे तर, सर्व लोकानियुक्त सभासदांनीं जितक्या आस्थेनें, कळकळीनें आणि निग्रहपूर्वक आवेशानें या बिलाचा निषेध करतां येईल तितका केला; आणि पहिल्या वाचनाचे वेळींच हा प्रकार झाला असता तर बरें झालें असतें असें जें आम्हीं मागें म्हटलें होतें त्याचा वचपा या दुसऱ्या वाचनाचे वेळीं पूर्णपणें काढून घेतला. आजपर्यंत मुंबईसरकारच्या कायदेकौन्सिलांतून लोकनियुक्त सभासद अशा रीतीनें निघून आल्याचें एकहि उदाहरण घडून आलें नव्हतें. परंतु बिलावर कलेक्टर वगैरे लोकांचीं मतें घेण्याकरितां निदान पांचसहा महिने तरी दुसरें वाचन तहकूब ठेवा, अशा अर्थाची कळकळीनें केलेली विनंति देखील ऐकण्यास जेव्हां सरकार तयार नाहीं तेव्हां ज्या मनुष्यास यत्किंचित स्वाभिमान आहे व जो निवळ दरबारी मानासच भुकेलेला नाहीं त्यास कौन्सिल सोडून घरीं येण्याखेरीज दुसरा मार्गच राहिला नव्हता. सरकार समर्थ आहे, पाहिजे ती गोष्ट वाटेल तेव्हां सरकारास करतां येईल, या गोष्टी खऱ्या आहेत. पण कायद्यानें, शिस्तीनें आणि न्यायीपणानें वागण्याचा डौल घालणाऱ्या हल्लींच्या सरकाराकडून अशा प्रकारचें दांडगाईचें, बेपर्वाईचें, दुराग्रहाचें, हट्टाचें किंवहुना उद्धटपणाचें वर्तन होईल—आणि तेंहि लॉर्ड नॉर्थकोट यांच्या कारकीर्दींत होईल— असें कोणासहि वाटलें नव्हतें. सरकारी अधिकाराचा मद डोळ्यांवर चढल्यामुळें स्वतःच्या शहाणपणाची सरकारी अधिकाऱ्यांस किती घमेंड असते, इतर लोक किंवा त्यांचीं मतें यांस ते किती तुच्छ समजतात आणि प्रसंग पडल्यास बेइमानीपणाचा, मूर्खपणाचा, अज्ञानाचा किंवा अप-

---

* [केसरी ता. २७ आगष्ट १९०१]

मतलबीपणाचा आरोप दुसऱ्याच्या माथीं मारण्यास ही ऑफिसर मंडळी बिनदिक्कत निलाजरेपणानें कशी तयार होते, याचें उदाहरण कोणास पाहावयाचें असेल तर त्यांनीं गेल्या कौन्सिलांत सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेलीं भाषणें समग्र वाचावीं. अशा तऱ्हेचा लोकमताचा उपमर्द आणि स्वतःच्या शहाणपणाच्या घमेंडीचें प्रदर्शन गेल्या कौन्सिलांत ज्याप्रमाणें झालें तसें दुसऱ्या ठिकाणीं झालेलें क्वचितच आढळेल. ना. मेथा यांनीं म्हटल्याप्रमाणें कायदेकौन्सिलांत लोकमताची अर्थात् लोकनियुक्त सभासदांची संख्येच्या मानानें सरशी होणें कदापिहि शक्य नाहीं. पण युक्तिवाद, विनंति, लोकांच्या खऱ्या स्थितीचें निदर्शन इत्यादि प्रकारांनीं सरकाराचें मन वळेल तेवढें वळविणें हें लोकनियुक्त सभासदांचें काम आहे; परंतु या सर्वांस घाव्यावर बसवून केवळ हट्टानें आणि दुराग्रहानें सरकार जेव्हां आपला हेका तडीस नेण्यास सिद्ध झालें, तेव्हां लोकनियुक्त सभासदांनीं रागानें नव्हे तर अशा वेळीं केवळ आपलें कर्तव्य स्मरून असल्या प्रकारच्या सभेंतून उठून येणें हेंच वाजवी होय. कोर्टांत न्यायाधीशानें फैसला लिहून ठेविल्यानंतर मग त्याच्यापुढें बॅरिस्टरानें बड बड करणें जितपत व्यर्थ आहे तितपतच परवांच्या कायदेकौन्सिलाच्या सभेंतील लोकनियुक्त सभासदांचीं भाषणें निष्फळ झालीं. बिलाविरुद्ध निरनिराळ्या अर्जांतून किंवा लोकनियुक्त सभासदांच्या भाषणांतून जे दोषारोप करण्यांत आले होते त्यांस सरकारी अधिकाऱ्यांपैकीं एकानें तरी समर्पक उत्तर दिलें असेल तर शपथ. बिलाविरुद्ध केलेली ओरड सावकार वर्गाची अतएव आपमतलबी आहे, शेतकऱ्यांचें कल्याण कोणी पहात नाहीं, आणि लोकनियुक्त सभासदांना खेडेगांवांतील शेतकऱ्यांच्या स्थितीचा अनुभव नसल्यामुळें त्यांचें म्हणणें विचारांत घेण्यासारखें नाहीं, त्यांस तर्कशास्त्र कळत नाहीं, तीं शाळेंतील पोरें आहेत, अशा तऱ्हेचे उद्धटपणाचे आणि उपमर्दकारक आक्षेप लोकपक्षाच्या सभासदांविरुद्ध करून, गव्हर्नरसाहेबांसकट सगळ्यांनीं सरकारचा हट्ट पुरविण्याचें आपलें व्रत तडीस नेलें. ही दांडगाई किंवा धाष्टर्य पांच पन्नास वर्षांपूर्वी करण्यास सरकार कदाचित् धजलें नसतें, पण उत्तरोत्तर लोकमताविषयीं बेपर्वाई आणि स्वतःच्या शहाणपणाविषयीं घमेंड सरकारी अधिकाऱ्यांत इतकी वाढत चालली आहे कीं, ना. मेथा, सर भालचंद्र, पारख, गोखले, खरे, यांच्यासारख्या गृहस्थांनीं लोकांच्या वतीनें सहा महिन्यांची मुदत मागितली तर तीहि देण्यास हे अधिकारी तयार नाहींत अशी स्थिति येऊन ठेपली आहे ! ना. मेथासारख्या गृहस्थांनीं सभेंतून उठून जावें आणि इकडे सरकारानें 'बरें झालें, पीडा गेली' म्हणून आपले काम उरकून घ्यावें, यापेक्षां गैरमुत्सद्दीपणाचें आणि अविचाराचें कृत्य कोणतें हें आम्हांस समजत नाहीं. लोकमताचा कांहीं एक विचार न करतां सरकारास जर कायदे पास करावयाचे असतील तर कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त

सभासद घेण्याचा फार्स तरी कशास पाहिजे कोण जाणे ? लोकांचे प्रतिनिधि लोकांस निवडण्यास सांगून मग त्यांच्या भाषणांचा व मतांचा अशा रीतीनें अव्हेर करणें, किंवहुना कुत्सितपणानें त्यांस नाना तऱ्हेचीं दूषणें देऊन विश्वासास अपात्र ठरविणें, हें मोंगलाईचें लक्षण आहे असें आम्हीं समजत होतों; पण दुर्दैवानें लॉर्ड कर्झन व लॉर्ड नॉर्थकोट यांच्या कारकीर्दीत इंग्रजी राज्यांत तसा प्रकार आमच्या डोळ्यादेखत घडून आला आहे. रयतेचें खरें कल्याण कशांत आहे, हें लोकनियुक्त सभासदांस कळत नाहीं असें खुद्द गव्हर्नरसाहेब आणि ना० मॉन्टीथ यांनीं सांगितलें आणि त्याचें कारण असें दिलें कीं, लोकनियुक्त सभासद सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणें लोकांत मिसळत नाहींत. परंतु सरकारास आमचा असा प्रश्न आहे कीं, हल्लीचे गव्हर्नर सोडून द्या, पण त्यांचे कौन्सिलर ना. मॉन्टीथ किंवा सर चार्लस ऑलिव्हंट यांनीं शेतकरी वर्गाच्या सहवासांत आपल्या अमदानींत कितीसे दिवस काढिले आहेत ? मुंबई इलाख्यांतील सर्व कलेक्टर लोकांस जर हें बिल पसंत आहे तर त्यांचीं मतें घेतलीं असल्यास सरकार तीं कां प्रसिद्ध करीत नाहीं ? अथवा नसल्यास ना. मेथा म्हणतात त्याप्रमाणें हें बिल त्यांच्याकडे अभिप्रायार्थ कां पाठवीत नाहीं ? मुलकी दृष्टीनें हा विचार झाला. आतां कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें तर तिकडूनहि सरकारची बाजू लंगडीच आहे, हें खुद्द सरकारचें ॲडव्होकेट–जनरल ना० स्कॉट यांच्या भाषणावरूनच दिसून येतें. ना. मॉन्टीथ यांच्याखेरीज बिलाच्या तर्फे ना. लेली, ॲस्टन, कामिन, स्कॉट, आणि नेटिव मेंबरांपैकीं रा. ब देसाई, चुणीलाल व विंचूरकर यांचींच कायतीं भाषणें झालीं. पण या सर्वांत कोणीहि बिलाविरुद्ध आक्षेप मुद्देसूद रीतीनें खोडण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. लेली साहेबांच्या भाषणांत शेतकरी लग्नकार्यांत कसे पैसे उधळतात याचेंच वर्णन केलेलें होतें. पण ना. पारख व खरे यांनीं सांगितल्याप्रमाणें या मुद्याचा दक्षिणेंत तरी दोन कामिशनांनीं पूर्वीच निकाल लावून टाकला आहे, हें लेली साहेबांस माहीत नव्हतें असें दिसतें. ना. खरे यांनीं कायद्याच्या दृष्टीनें बिलांतील तत्वें कशीं चुकीचीं आहेत हें सप्रमाण दाखविलें होतें; व त्यास वास्तविक पाहतां ॲडव्होकेट–जनरल यांनीं उत्तर द्यावयास पाहिजे होतें, पण तेंहि उत्तर मिळालें नाहीं. सारांश, युक्तिवाद, विनवणी, खरेपणा, आणि निर्भय रीतीनें लोकांच्या हक्काचें प्रतिपादन इतक्या सर्व शस्त्रांचा लोकनियुक्त सभासदांनीं यावेळीं उपयोग केला. परंतु त्यांच्या युक्तिवादास वगैरे न जुमानतां हट्टानें, दुराग्रहानें किंवा दुराभिमानानें केवळ मनगटाच्या व संख्येच्या जोरावर अखेरीस सरकारानें आपला हेका पुरवून घेऊन, मुंबई इलाख्यांतील शेतकरी वर्गास भिकेस लावण्याचा ओनामा घालून दिला; असल्या शिरजोरपणाच्या कृत्यास आळा घालणें शक्य नसेल तर शहाण्या मनुष्यानें अशा प्रकारची दांडगाई जेथें चालते तेथून चालतें व्हावें हेंच चांगलें; आणि त्याप्रमाणें ना. मेथा, पारख, गोखले, खरे,

व सर भालचंद्र हे कौन्सिलांतून उठून आले, याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत व आम्ही त्यांचें त्यासाठीं मनःपूर्वक अभिनंदन करितों. आग्रही व हट्टी सरकारास ताळ्यावर आणण्याचे होते तेवढे कायदेशीर इलाज त्यांनीं करून पाहिले; पण अखेरीस सरकार ऐकत नाहीं असें समजल्याबरोबर पुढें होणाऱ्या जुलमी कायद्याशीं आपला कोणत्याहि प्रकारें संबंध नसावा असें वाटून ते उठून आले यांत कांहीं नवल नाहीं. आमच्या मतें ना. इचलकरंजीकर यांनींहि हाच कित्ता गिरवावयास पाहिजे होता. परंतु संस्थानिक या नात्यानें त्यांनीं तसें केलें नसेल किंवा तसें करणें त्यांस इष्ट वाटलें नसेल; तथापि त्यांनीं मेथा यांच्या उपसूचनेस आपलें मत दिलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ना० विंचुरकर आणि चुणीलाल हे दोघेहि कांहीं सरकारी अधिकारी नाहींत व खरें म्हटलें म्हणजे ना० मेथा यांच्या उपसूचनेस अनुकूल मत देण्यास त्यांस कोणतीहि हरकत नव्हती व तसें झालें असतें म्हणजे उपसूचनेस अनुकूल ११ आणि प्रतिकूल ११ मतें होऊन एक तर ती पास झाली असती किंवा गव्हर्नरसाहेबांस आपलें प्रतिकूल मत देऊन ती नामंजूर करावी लागली असती. पण तसा योग यावा कसा ? ना. देसाई यांनीं तर बोलून चालून आपला देह व मतें पोटाकरितां सरकारास विकलेलीं आहेत. ना. चुणीलाल पेन्शन खात आहेत आणि ना. विंचूरकर हे नुकतेच सरंजामावर चढलेले तरुण गृहस्थ आहेत. तेव्हां या सर्वांनीं आपलीं मतें सरकारास देऊन त्याऐवजीं हुषारीचें व अनुभवाचें सर्टिफिकेट मॉन्टीथसाहेबांकडून मिळविलें. देशाचें कल्याण किंवा अकल्याण न पाहतां अशा रीतीनें कौन्सिलांत मत देणारी मंडळी जोंपर्यंत आमच्यांत निपजत आहेत व त्यांत तरुण सरदार मंडळींची भर पडत आहे तोंपर्यंत लोकमताचा कौन्सिलांत केव्हांहि जय होणें अशक्य होय. जी भीति सर भालचंद्रांसारख्या गृहस्थास वाटली नाहीं ती विंचूरकरासारख्या तरुण सरदारास वाटावी हें आमचें दुर्भाग्य नाहीं असें कोण म्हणेल ? सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, या बिलाचा अंमल एकदम सर्वत्र न करितां काल व प्रसंग पाहून करण्यांत येईल. पण या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. वर्ष दोन वर्षें सरकार कदाचित् आपला हात आंखडून धरील, पण दहा पंधरा वर्षांनीं व विशेषेंकरून तितक्या मुदतींत एक दोन दुष्काळ पडले तर मुंबई इलाख्यांतील सर्व जिल्ह्यांत मिळून निम्मी जमीन तरी सरकारच्या हक्काची व खरेदीस अपात्र होऊन त्यावर उपजीविका करणारा शेतकरी वर्ग दरिद्री आणि मजुरदाराप्रमाणें अन्नास मोताद होऊन राहणार आहे, हें निश्चित होय. मिरासी हक्क बुडवून सर्व्हे टेन्युअरचे जे हक्क लोकांस दिले, त्यांचें घोरण काय होतें हें या बिलानें आतां लोकांच्या पूर्ण प्रत्ययास आलें आहे, आणि याचे पुढील वीस पंचवीस वर्षांत काय परिणाम होतील हेंहि सर्वांस कळून चुकलें आहे. सरकारच्या हट्टामुळें लोकमताचें किंवा लोकांच्या पुढाऱ्यांचें कांहीं

एक चालत नाहीं. अमुक एक गोमाजी सरकारचे आवडते आणि अमुक एक न आवडते, अमुक एक नेमस्त किंवा अमुक एक बिननेमस्त इत्यादि आपापसांतील घमेंडी व्यर्थ होत, जें कांहीं सरकारास कळविणें असेल तें निग्रहानें, निश्चयानें आणि निर्भिडपणानें कळविलें पाहिजे, मग तें सरकार ऐको किंवा न ऐको, हेंहि या विषयावर झालेल्या वादविवादावरून व्यक्त होत आहे. आम्ही ही गोष्ट अनेक वेळां लोकांपुढें मांडलेली आहे. पण परवांच्या प्रसंगावरून तिची सत्यता सर्व लोकांच्या चांगली ध्यानांत येईल. सरकार उत्तरोत्तर इतकें बेपर्वा व बेफाम होत चाललें आहे कीं आमच्या पुढाऱ्यांनीं प्रत्येक बाबतींत लोकमत स्पष्ट व निर्भिडपणें सरकारापुढें मांडल्याखेरीज आतां कांहीं गत्यंतर नाहीं; व देशांतील सर्व पुढारी जेव्हां अशा रीतीनें वर्तन करतील तेव्हांच कांहीं अंशीं तरी लोकमताची सरशी होणें शक्य आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे जे पांच लोकनियुक्त सभासद परवांच्या सभेंतून उठून आले, त्यांचें सर्व लोकांनीं अवश्य अभिनंदन केलें पाहिजे. आमच्या पुढाऱ्याला सरकारानें किंमत दिली नाहीं, तरी तो जेव्हां आमची कामगिरी करील तेव्हां तिची किंमत आम्ही पूर्ण ओळखतों, हें सरकारास उघडपणें दाखविणें हें आमचें कर्तव्य होय. सरकारच्या मनासारखें बोलून कांहीं हक्क आपणांस मिळतील अशी अद्याप जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची होय. लोकमत दुर्बल आहे, सरकारावर त्याचा पगडा बसविण्याइतकें लोकांच्या अंगांत सामर्थ्य नाहीं, ही गोष्ट खरी आहे, पण त्याकरितां स्वस्थ बसून उपयोगी नाहीं. आपली बाजू निर्भिडपणें आणि मुद्देसूद रीतीनें सरकारापुढें मांडणें जरूर आहे आणि तशा रीतीनें ती परवांच्या कायदेकौन्सिलांत मांडली गेली, याबद्दल सर्वांच्या वतीनें लोकनियुक्त सभासदांचे आम्ही मोठ्या आनंदानें आभार मानितों.

बिल तर मुंबईसरकारनें पास करून टाकलेंच; पण तेवढ्यानें आपला कार्यभाग संपला असें मात्र लोकांनीं समजूं नये. जे पांच लोकनियुक्त सभासद उठून गेले त्यांनीं व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल यांस लोकमत विरुद्ध असल्याबद्दल अर्जद्वारां कळवावें व त्याप्रमाणें ते कळवितील अशी आम्हांस आशा आहे. कारण मुंबईच्या कायदेकौन्सिलांत हें बिल जरी पास झालें तरी गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांची त्यास संमति मिळेपर्यंत त्याचा अंमल होऊं शकत नाहीं. ही संमतीहि देण्याचें कदाचित् पूर्वी ठरलें असेल, नाहीं असें नाहीं, पण तें कसेंहि असलें तरी ज्या लोकांनीं सभा करून मुंबईसरकाराकडे अर्ज पाठविले त्यांनीं तशाच पुन्हां सभा करून लॉर्ड कर्झन यांजकडे या बिलास संमति न देण्याबद्दल पुन्हां पुढील अर्ज आठ पंधरा दिवसांतच पाठविले पाहिजेत. लोकांच्या वतीनें कौन्सिलांत फुकट भांडून उलट सरकारी अधिकाऱ्यांच्या शिव्याच खाऊन जे गृहस्थ सरकारचा असह्य दुराभिमान पाहून कौन्सिलांतून परत आले आहेत त्यांचा बोज

ठेवण्याकरितां तरी वर लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थानसरकारास आम्ही या बाबतींत अर्ज करणें जरूर आहे. मग त्याचा उपयोग काय होईल तो होवो. सरकार आमच्या हिताकरतां म्हणून जे उपाय करीत आहे ते आम्हांस भिकेस लावण्यास मात्र कारण होतील, अशी जर आमची पक्की समजूत आहे तर ती स्पष्टपणें सरकारास कळविणें आमचें काम होय; मग सरकार काय वाटेल तें करो तिकडे आम्हांस पाहणें नाहीं. हल्लींच्या स्थितींत आमचें काम आम्हीं केलें म्हणजे झालें आणि तेवढें करून या प्रकरणाचा शेवट लावण्यास आमचे लोक आतां मागेंपुढें पाहणार नाहींत, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

* * *

* आमचीं कायदेकौन्सिलें थट्टा आहे काय?

परवांच्या कायदेकौन्सिलाच्या सभेंतून जे पांच लोकनियुक्त सभासद उठून गेले त्यांच्यासंबंधानें आमचे व्यवसायबंधु अँग्लभौम पत्रकार आणि विशेषकरून मुंबईचे टाइम्सकार यांनीं शिमग्यांतील पोरांप्रमाणें बराच चावटपणा करण्यास आरंभ केलेला आहे व लोकनियुक्त सभासद जे कौन्सिलांतून उठून आले त्यांचें वर्तन नाटकी किंवा विदुषकी थाटाचें अथवा उपहासास्पद असून त्यामुळें त्यांनीं आपणास फाजितीस पात्र करून गव्हर्नरसाहेबांचा अपमान केला असे उद्गार काढिले आहेत. हे उद्गार वाचले म्हणजे कौरवांच्या द्यूतसभेंतून पांच पांडव उठून गेल्यानंतर त्यांचा उपहास करणाऱ्या दुःशासनाची आम्हांस आठवण होते. जिल्ह्यांतील डिस्ट्रिक्ट ऑफिसर लोकांच्या कल्याणाकरितां किती तत्पर असतात खेडेगांवांतून ते फिरायाला गेले असतां त्यांचा मुक्काम गांवाबाहेर, नदीकाठीं किंवा अंबराईंत होऊन किती पानकोंबडीं त्यांच्या बंदुकीच्या गोळ्यांखालीं प्राणास मुकतात आणि रयतेशीं त्यांचा कोणत्या प्रकारचा निकट संबंध असतो हें आतां खेडेगांवांतील कुणब्यास देखील कळून चुकलें आहे. अव्वल इंग्रजींत म्हणजे ज्या वेळेस पेशवाई नुकतीच जाऊन तिचें स्मरण लोकांमध्यें अगदीं नष्ट झालें नव्हतें तेव्हां लोकांशीं मिळून मिसळून वागणारे व त्यांच्या म्हणण्यास मान देणारे एल्फिन्स्टनसाहेबांसारखे बरेच अंमलदार इकडे येत असत व खरी लोकस्थितीहि त्यांस समजत असे. असें करण्यांत त्यांचा काय हेतु होता हें येथें सांगत बसण्याची जरूरी नाहीं. तो राजनीतीचा प्रश्न असून त्याचें उत्तर आज देण्याची अवश्यकता नाहीं. इतकी मात्र गोष्ट खरी कीं, अव्वल इंग्रजींत रयतेंत

---

* [केसरी ता. ३ सप्टेंबर सन १९०१]

मिळून मिसळून वागून तिचें खरें हित कशांत आहे, हें इंग्रजी अधिकारी पाहूत असत. पण इंग्रजी राज्याची व्यवस्था उत्तरोत्तर जशी जशी दृढावत चालली, जमीन–पाहणी झाली, रेल्वे, टेलिग्राफ, पोलिस वगैरे खात्यांचा जारी अंमल सुरू होऊन सर्व लोक जागच्या जागीं अशा रीतीनें बांधले गेले कीं, बिनकुंपण घातलेली जंगलाची हद्द गुरांनीं देखील उल्लंघिली असतां त्यांच्या मालकास दंड होऊं लागला तेव्हां इंग्रजी अधिकाऱ्यांचें खरें स्वरूप उत्तरोत्तर लोकांच्या अधिकाधिक नजरेस येऊं लागून साहेब कागदपत्रांच्या पलीकडे कितीसे जातात हें सर्वांच्या अनुभवास येऊन चुकलें. अशा प्रकारचे अधिकारी दौऱ्यावर गेल्यानें त्यांस रयतेची अधिक माहिती होते व लोकनियुक्त सभासदांपेक्षां रयतेची खरी कळकळ ते अधिक बाळगतात असें प्रतिपादन करणें म्हणजे खेडेगांवांतून सदैव संचार करणाऱ्या वायूशीं शेतकऱ्यांची खरी स्थिति खुद्द शेतकऱ्यापेक्षांहि अधिक चांगल्या रीतीनें समजतें असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे. टाइम्सच्या इंग्रजी ग्राहकांस सदर पत्रकाराच्या कोटींचें मोठें कौतुक वाटत असेल, पण ही कोटी इतकी जुनी, अप्रयोजक आणि निरर्थक आहे कीं, ती खेडेगांवचा अडाणी कुणबी देखील कबूल करणार नाहीं. लोकांत हजारों निमित्तांनीं नेहमीं वापरणारे व वागणारे ना. मेथासारख्या पुढाऱ्यापेक्षां सहा हजार कोसांवरून आलेला सिव्हिलियन दहा वर्षें एखाद्या जिल्ह्यांत पडून राहिल्यानें त्यास शेतकऱ्यांच्या स्थितीचा जास्त अनुभव येतो हें म्हणणें अगदींच असंबद्ध व वेडेपणाचें होय. ईश्वरानें आमच्या कल्याणाकरतांच इंग्रजसरकारास इकडे पाठविलें आहे आणि सदर सरकार जें जें करील तें तें आमच्या कल्याणाचें असलें पाहिजे, ही वरील सिद्धांताचीच 'कुर्लरी' आहे किंवा वरची कुर्लरी धरल्यास हा खालचा अँग्लो-इंडियनचा सिद्धांत समजला पाहिजे. असले सिद्धांत म्हणजे कौरवांनीं पांडवांबद्दल वर उल्लेख केलेल्या सभांतील सिद्धांताच्याच योग्यतेचे आहेत हें आम्ही सांगावयास नको. कुणब्यास त्याचें कल्याण कळत नाहीं तें नाहींच; पण तें ना. फेरोजशहा मेथा, सर भालचंद्र, पारख, गोखले, खरे किंवा या देशांतील शेंकडों ठिकाणचे समंजस गृहस्थ यांसहि नकळतां ना. लेली व म्यूरमॅकेन्झी यांस कळतें अशा तऱ्हेचें प्रतिपादन, आमचें राज्य चालू आहे, आम्हीं काय पाहिजे ते करूं आणि काय पाहिजे तें सांगूं आणि आमच्या तोंडांतून जे बोल निघतील तेच कल्याणप्रद म्हणून लोकांनीं स्वीकारले पाहिजेत, अशा प्रकारच्या दुरभिमानानें आणि दुराग्रहानें ग्रस्त झालेल्या राज्यकर्त्यांच्या जातभाईंकडून व्हावयाचें व त्याचप्रमाणें तें टाइम्सकारानें केलेंहि आहे. इतकेंच नव्हे तर, सदर पत्रांत दुसरा जो एक लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत लोकनियुक्त कायदेकौन्सिलांतील सभासद आपल्या जागा सोडून जाऊं लागल्यास पुढें मागें त्यांनीं आपल्या जागा न सोडण्याबद्दल सरकारास कायदाहि करावा लागेल असें थट्टेनें सुचविलें आहे. हा लेख पाहून कोणासहि

टाइम्सकाराबद्दल कींव आल्याखेरीज राहणार नाहीं. जे मेंबर कायदेकौन्सिलांतून उठून आले त्यांस टाइम्सच्या एडिटरापेक्षां बरीच पट अधिक अक्कल आहे हें कोणासहि सांगावयास नको. कायदेकौन्सिलांत लोकमताचें किंवा लोकांच्या प्रतिनिधींचें वर्चस्व पडत नाहीं तर तो दोष प्रतिनिधींचा नव्हे, तर इंग्रज सरकारानें आम्हांस दिलेल्या कायदेकौन्सिलाच्या रचनेचा आहे हें टाइम्सकारास किंवा त्यांतील लेखकास समजत नाहीं असें नाहीं. पण असें असतांहि कौन्सिलांतून उठून जाणाऱ्या मेंबर लोकांस पळपुटे म्हणून विशेषण देऊन त्यांचा टाइम्सकारानें जो उपहास केला आहे तो उद्वेगजनकच नव्हे, तर कांहीं अंशीं दुःखावर डाग देऊन चीड आणण्यासारखा आहे. कायदेकौन्सिलाची रचनाच अशी ठेवावयाची कीं, त्यांत लोकनियुक्त सभासदांचें कधींहि बहुमत होऊं नये. ग्लॅडस्टन किंवा ब्राडलॉसारख्या एखाद्या मुत्सद्यानें पार्लमेंटसभेंत जी आमच्याकरतां झक मारली त्याचें फल म्हणून लोकनियुक्त सभासदांचीं भाषणें तरी कायदेकौन्सिलांतून झोप घेतच कां होईना पण निमूटपणें ऐकून घ्यावीं लागतात अशी ज्यांची समजूत त्यांचे हातून लोकमताचा उपमर्द झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. म्हण आहे कीं 'धन्यापेक्षां नोकराचीच बेपर्वाई अधिक असते' व तशांतलाच प्रकार हल्लींच्या प्रसंगीं झालेला आहे. खुद्द गव्हर्नरसाहेब किंवा त्यांचे कौन्सिलर यांस जो प्रकार थोडासा तरी खेदास्पद वाटला असावा तोच टाइम्ससारख्या खुशाल-चेंडू अँग्लोइंडिन पत्रकारास उपहासास्पद वाटत आहे. टाइम्सकाराची ही थट्टा वाचली म्हणजे परवां लॉर्ड किचनेर यांनीं बोअर लोकांस शांततेच्या व तहाच्या ज्या शर्तीं कळाविल्या होत्या त्यास जनरल बोथा यांनीं जें उत्तर दिलें आहे त्याची आम्हांस आठवण होते. बोअर लोकांनीं लढाई बंद केली म्हणजे ट्रान्सवाल देशांत इंग्रजांच्या राज्यछत्राखालीं खऱ्या स्वातंत्र्यास आरंभ होऊन तेथें कायदेकौन्सिलें नवीन करून त्यांत लोकांचे सभासद नेमले जातील अशा अर्थाचें बोलणें किचनेर साहेबांनीं चालविलें होतें, पण जनरल बोथा यांनीं आपल्या बोअर लोकांस जें एक यासबंधानें पत्र पाठविलें त्यांत त्यांनीं असें कळाविलें आहे कीं "पहा, ते आम्हांस कायदेकौन्सिलें देतील आणि त्यांत आपले अधिकारी आणि त्यांनींच नेमलेले दुसरे लोक नेमतील. अशा रीतीनें लोकांच्या मतास कोठेंहि मान मिळावयाचा नाहीं." जनरल बोथा यांनीं ट्रान्सवालमधील भावी कायदेकौन्सिलाबद्दल केलेलें हें भाकीत आज अक्षरशः आमच्या प्रत्ययास येत आहे हें टाइम्सकारास आम्ही सांगितलें पाहिजे असें नाहीं. सरकारनें नेमलेले अधिकारी नरम पाहूनच नेमले जातात ही गोष्ट टाइम्सकारास पुरी माहीत असावी. कारण, या नेमणुकांतील ऑफिशियल इंगित टाइम्सकारास कळण्याचा जितका संभव आहे तितका आम्हांस नाहीं. आमच्यापैकीं कांहीं लोक तर अद्याप इतके मूर्ख आहेत कीं जामिनमहसुलाच्या कायद्यास अनुकूल मत देऊन घरीं आलेल्या तरुण सरदारास पानसुपारी देण्यास व

तीहि लोकांच्या वतीनें दिली म्हणून म्हणण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत. आणि असले कांहीं बहादूर या आर्यभूमीवर अजून आहेत म्हणूनच आज इंग्रजी राज्यावर कधींहि न मावळण्याचें व्रत सूर्यनारायणानें पत्करिलें आहे. दुरभिमानाचा आणि दुराग्रहाचा जेथें बाजार माजला, नीति आणि शहाणपणा जेथून सुटला आणि केवळ मनगटाच्या जोरावर मुत्सद्दीपणाचीं कार्यें उरकून घेण्यास ज्या ठिकाणीं मंडळी सज्ज झाली आणि असल्या मंडळीचेंच जेथें विशेष प्राबल्य, तेथून आपला पक्ष खरा असला तरी शहाण्या माणसानें उठून जाण्याखेरीज दुसरी कांहीं सोय आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अशा प्रकारचीं कायदेकौन्सिलें म्हणजे एक प्रकारची थट्टाच होय हें आम्ही जाणून आहों. पण ही थट्टा कोणाची ? ना. मेथा आणि गोखले यांची नव्हे; तर सत्याची, खऱ्या लोकमताची, राजनीतीची आणि मुत्सद्दीपणाची थट्टा होय. व या गोष्टीची जर थट्टा होऊं लागली तर आज नाहीं तर पुढें मागें केव्हां तरी त्याचा परिणाम राज्यकर्त्यांस व प्रजेस नडल्याखेरीज राहणार नाहीं. लोकांचे प्रतिनिधि कायदेकौन्सिलांत घेण्याचा खरा उद्देश म्हटला म्हणजे लोकांची बाजू ऐकून घेऊन त्याप्रमाणें कांहीं तरी राज्यव्यवस्थेचें व नीतीचें सुकाणूं धरावें हा होय. पण तें सर्व विसरून जाऊन हट्टानें लोकांस न विचारितां पूर्वीच अधिकाऱ्यांनीं आपापसांत ठरवून टाकलेल्या कायद्याचा मसुदा केवळ अधिकारी वर्गाच्या बहुमतानें कायदेकौन्सिलांत मंजूर करून टाकणें म्हणजे ज्या उदार तत्वाचा राणीसाहेबांच्या जाहिरनाम्यांत उल्लेख केलेला आहे त्यास हरताळ लावून खुद्द राणीसरकारचा आणि त्यांच्या मागें त्यांच्या गादीवर आलेल्या चिरंजीवाचा उपमर्द करणें नव्हे काय ? कायदेकौन्सिलांतून ना. मेथा वगैरे मंडळी आली म्हणून गव्हर्नरसाहेबांचा उपमर्द झाला असें टाइम्सकार म्हणतात; पण या शहाण्या एडिटरास एवढें समजत नाहीं कीं, थोडेंच कां होईना, पण ज्या पार्लमेंटाच्या ॲक्टानें लोकांचे प्रतिनिधि कायदेकौन्सिलांत गेले आहेत त्यांच्या विनवणीस व लोकांच्या अर्जास भीक न घालतां सरकारानें कोणतीहि गोष्ट अरेरावीनें करणें आणि तीहि जे लोक प्रतिकूल आहेत त्यांच्याच हिताकरितां म्हणून म्हणणें म्हणजें खुद्द पार्लमेंटचा अपमान करण्यासारखें नव्हे काय ? लोकांचे प्रतिनिधि कायदेकौन्सिलांत घेऊन अशाच तऱ्हेनें जर त्यांचा बोज ठेवावयाचा असेल तर यापेक्षां पांच सहा संगमरवरी दगडांचे पुतळे करून त्यांचीच कायदेकौन्सिलांत निरनिराळ्या ठिकाणीं स्थापना करावी आणि निरनिराळ्या भागांच्या निवडणुकी झाल्या म्हणजे एका पुतळ्यास ना. मेथाची टोपी तर दुसऱ्यास प्रो. गोखल्यांचें पागोटें घालून चटावरील श्राद्धाप्रमाणें कायदेकौन्सिलांतील फार्स उरकून घेण्याचा १९२६ सालापूर्वीच एखादा नवा कायदा पास करून घ्यावा हें फार चांगलें. टाइम्सकारास वाटतें त्याप्रमाणें हा थट्टेचा विषय नव्हे आहे, कायदेकौन्सिलाची रचना

असावी तशी नाहीं, लोकांच्या कल्याणाच्या ज्या बाबी आहेत त्यांतहि लोकमतास कोणी विचारीत नाहीं इत्यादि गोष्टी लोकांस आतां चांगल्या कळूं लागल्या आहेत. आणि परवा कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांनीं जें वर्तन केलें त्यामुळें या उणिवा लोकांच्या जास्त नजरेस भरून पुढें मागें कायदेकौन्सिलांत जी सुधारणा होणें जरूर व इष्ट आहे त्यास आमच्या सभासदांचें हें वर्तन कांहीं अंशीं तरी कारणीभूत होईल असें आम्हांस वाटतें व म्हणूनच आम्ही त्यांचें अभिनंदन केलें आहे. टाइम्ससारखे स्वराज्याच्या धुंदीनें मदावलेले पत्रकार हांसोत वा रडोत ! त्यांची आम्हांस कांहीं पर्वा नाहीं, किंबहुना यांच्या-सारखे दुर्जन हांसले म्हणजेच आमची बाजू खरी आहे असें सुरेंद्रनाथ बानर्जी म्हणतात त्याचप्रमाणें आम्ही समजतों आणि आम्हांस अशी पूर्ण उमेद आहे कीं, असल्या अँग्लो-इंडियन पत्रांच्या हांसण्यानें, दटावण्यानें, व्याजस्तुतीनें किंवा भुलथापीनें सत्याचा, सरळपणाचा आणि न्यायाचा जो मार्ग खुला आहे व ज्या मार्गानें आम्ही जाऊं इच्छितों तो कदापिहि अडला जाणार नाहीं. लॉर्ड कर्झन यांच्या हातून झालेल्या अन्यायाची कांहीं दाद लागल्यास पाहावी एवढेंच काय तें सध्यां या प्रकरणासंबंधानें आमचें कायदेशीर कर्तव्य आहे व त्याप्रमाणें "मुंबईसरकारनें नुकतेंच पास केलेलें जमिनमहसुलाचे बिलास आपण मेहेरबानीनें संमति देऊं नये." अशा अर्थाची तारेनें किंवा अर्जानें ठिकठिकाणीं सभा भरून व्हाइ-सरॉयसाहेबांस विनंति करण्यांत येत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. अशाच सभा आणखी जितक्या ठिकाणीं होतील तितक्या झाल्या पाहिजेत व त्यांच्या तारा व्हाइसरॉयसाहेबांकडे गेल्या पाहिजेत; मग आमचें काम होवो किंवा न होवो, आमचा प्रयत्न खरा आणि इमानाचा आहे व हल्लींच्या कायदेकौन्सिलां-तून जर त्यास कोणी भीक घातली नाहीं तर हीं कायदेकौन्सिलें सुधारण्यासंबंधीं जी आमची ओरड आहे तीस अधिक बळ येऊन अखेर या सर्व चळवळीचा परिणाम आमच्या हिताचाच होईल अशी आम्हांस पक्की खात्री आहे. सबब आजपर्यंत ज्याप्रमाणें लोकांनीं खटपट केली तशीच आणखी खटपट करण्यास चुकूं नये. व्हाइसरॉय लार्ड कर्झन यांस जाणारे अर्ज मराठींतून गेले तरी हरकत नाहीं. पण ते कुणबी शेतकरी यांजकडून इकडे मुंबईसरकाराकडे जसे आले तसच त्यांजकडेहि गेले पाहिजेत. त्यांच्या मनांत गोष्ट भरली असतां ती घडवून आणण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं आहे आणि मोहरा बिलासारख्या मागील कांहीं उदाहरणांवरून आम्ही हिंदुस्थानसरकारास केलेली विनंति अगदींच फुकट जाईल असें आज तरी मानण्यास कांहीं आधार नाहीं.

❖ ❖ ❖

* डोंगर पोखरून उंदीर निघाला

इसापनीतींत डोंगराच्या प्रसववेदना पाहणाऱ्या लोकांस अखेरीस डोंगरांतून उंदीर बाहेर पडल्यामुळें जितकें आश्चर्य वाटलें त्याहूनहि अधिक आश्चर्य. गुजराथेंत गेल्या सालीं साऱ्याची वसुली सक्तीनें झाली कीं नाहीं याची चौकशी करण्याकरितां जें कमिशन नेमलें होतें त्याचा रिपोर्ट आणि त्यावरील नुकताच प्रसिद्ध झालेला ठराव पाहून आमच्या लोकांस वाटेल यांत शंका नाहीं. भडोच जिल्ह्यांत अंकलेश्वर तालुक्यांत आणि हनसोट महालांत आणि सुरत जिल्ह्यांत ओलपाड तालुक्यांत दुष्काळाचे सालीं साऱ्याची वसुली सक्तीनें करण्यांत आली; कित्येक शेतकऱ्यांस व खातेदारांस सारा वसूल करण्याकरितां घरांत कुलुपें लावून कोंडून ठेविलें; कित्येकांस तगाई दिली होती त्यांतूनच सारा वसूल केला, आणि कित्येकांस जमिनी विकावयास किंवा गहाण टाकण्यास भाग पाडिलें. इत्यादि अनेक प्रकारच्या तक्रारी मुद्देसूद रीतीनें उदाहरणांसह ऑ. मि. पारख यांनीं सरकारापुढें गेल्या सालीं सप्तंबर महिन्यांत मांडिल्या, आणि त्यांची चौकशी करण्याकरितां मुंबईसरकारनें कमिशन काढून तें काम लागलीच मि. मेकॉनकी यांजकडे सोंपविलें हें वाचकांस माहीत असेलच. त्यावेळीं सरकारची बाजू राखणाऱ्या टाइम्ससारख्या पत्रकर्त्यांनींहि लोकांच्या तर्फे ओरड सुरू ठेवण्यास मदत केली होती आणि 'गुजराथी' या सहीनें जे लेख प्रसिद्ध झाले होते ते याच पत्रांत झाले होते. नंतर कमिशनच्या चौकशीच्या वेळीं खुद्द ऑ. मि. पारख हे हजर असून त्यांनीं आपल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें कमिशनपुढें पुरावाहि हजर केला होता; आणि त्या पुराव्यावरून मि. मेकॉनकी यांचा रिपोर्ट बऱ्याच अंशीं रयतेच्या बाजूचा होईल, निदान झाला पाहिजे असें आम्हांस वाटत होतें; परंतु हल्लीं जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पाहतां या कामीं आमची व लोकांची पूर्ण निराशाच झाली असें म्हटलें पाहिजे. मेकॉनकीसाहेबांचा रिपोर्ट गेल्या मार्च महिन्यांत झाला; आणि त्यावर मि. पानसे आणि कमिशनर मि. लेली यांचे अभिप्राय जुलै व आगष्ट महिन्यांत तयार होऊन सरकारकडे गेले परंतु आतांपर्यंत म्हणजे लेली साहेबांचा रिपोर्ट सरकारांत जाऊन चार महिने होईपर्यंत सरकारी ठराव प्रसिद्ध झाला नव्हता. हा उशीर ऑफिशियल कामाच्या साहजिक पद्धतीमुळें झाला असेल व त्याकरितां सरकारास दोष देण्याची जरूर नाहीं; परंतु चार महिने विचार करून सरकारानें या एकंदर प्रकरणावर आपलें जें मत दिलें आहे तें पाहून

---

* [केसरी ता. ३ डिसेंबर सन १९०१]

मात्र वाईट वाटतें. सरकारी ठरावांत असें लिहिलें आहे कीं, " एकंदर प्रकरणांत इत्यर्थ पाहतां ऑ० मि. पारख आणि 'गुजराथी' यांनीं सरकारी अधिकऱ्यांवर जे आरोप आणिले आहेत ते अतिशयोक्तीचे आहेत आणि त्यांनीं दाखविलेल्या उदाहरणांपैकीं बहुतेक पुराव्यानें शाबीत होत नाहींत असें दिसून येतें " सरकारी ठरावाच्या ह्या शेवटील वाक्यानें बहुतेक सर्व प्रकरणाचा एकदम च निकाल लागला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सारावसुलीच्या बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांवर रयतेच्या तर्फे आणलेले आरोप सरकारी कमिशनपुढें चाललेल्या चौकशींत किती टिकतात व त्याचा सरकार कोणत्या तऱ्हेनें अखेर निकाल करितें हें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागले होते. पण अखेरीस गुळाचाच गणपती व गुळाचाच नैवेद्य असतां जसा निकाल व्हावयाचा तसाच हल्लींच्या कामांत झाला आहे. रिपोर्टांत ठिकठिकाणीं " हा पुरावा बरोबर नाहीं, " " आरोप शाबीत होण्यास इतका पुरावा बस्स नाहीं, " " हा पुरावा संशयात्मक आहे, " " कोर्टांत गेलें असतां ह्या पुराव्यावर शिक्षा व्हावयाची नाहीं, " "हा प्रघात सार्वत्रिक आहे" इत्यादि उडवाउडवीचे शेरे दिलेले आहेत व हे सर्व भट्टींत घालूनच त्यांचा अर्क म्हणून वर सांगितलेला सिद्धांत सरकारच्या ठरावाच्या अखेरीस दाखल झाला आहे ! नाहीं म्हणावयास सरकारनें एवढी गोष्ट कबूल केली आहे कीं मेकॉनकीसाहेब आणि लेलीसाहेब यांनीं लिहिल्याप्रमाणें ओलपाड तालुक्यांतील मुलकी अधिकाऱ्यांवर जुलूम केल्याचा आरोप जरी सिद्ध होत नाहीं तरी एकंदर त्या तालुक्यांत सारा वसूल करण्याचें वातावरण बरेंच दुःसह झालें होतें. या 'दुःसह वातावरणांत' आणि सारा वसूल करण्याचें कामीं होणाऱ्या सक्तींत किती डिग्रीचें अंतर आहे हें सरकारी ठरावाच्या थरमॉमेटरवरून दिसत नाहीं. व आमच्यासारख्या तिऱ्हाईतांनीं त्याची मीमांसा करण्यांतहि कांहीं हंशील नाहीं. क्राफर्ड कमिशनच्या वेळीं सदर कमिशननें क्राफर्डसाहेबांबद्दल असा अभिप्राय दिला होता कीं, त्यांच्या भोंवतालचें वातावरण जरी दूषित झालें होतें तरी हे साहेब समुद्रांत राहून कोरडेच होते ! मेकॉनकीसाहेबांच्या रिपोर्टांत दुस्सह वातावरण आणि सक्ति यांमधील केलेला भेद अशाच प्रकारचा आहे. दुष्काळचे वेळीं सारा वसूल करण्याचें वातावरण नेहमींपेक्षां अधिक सुखावह करण्याचें सोडून तें दुःसह कां व्हावें हाच प्रश्न विचार करण्यासारखा आहे व हल्लींच्या कमिशननें एवढी गोष्ट जरी पूर्णपणें सरकारच्या नजरेस आली तरी त्यापासून रयतेस पुष्कळ फायदा होईल. या दुःसह वातावरणासंबंधानें सरकारनें आपल्या ठरावांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, इतउत्तर सारा वसूल करण्याच्या बाबतींत दुष्काळच्या वेळीं ज्या सवलती देण्याबद्दल सरकारनें वेळोवेळीं ठराव केले आहेत त्या सवलती लोकांस मिळतील अशा प्रकारची सौम्य पद्धत तालुक्यांतील अधिकारी स्वीकारतील अशी उत्तरभागचे कमिशनर

आणि त्यांचे हाताखालील अधिकारी यांनीं काळजी घ्यावी. सरकारची ही सूचना योग्य आहे, पण ती अमलांत आणण्यास सारावसुलीचे नियम, दुष्काळचे साली त्यासंबंधानें लोकांस मिळणाऱ्या सवलती वगैरे एकत्र करून त्या सर्व लोकांस कळतील अशा रीतीनें सरकारानें जाहीर केल्या पाहिजेत. हल्लींच्या ठरावांत सारावसुलीच्या संबंधानें सक्ती करूं नये अशा प्रकारचे सन १८९६ पासून सन १९०० जुलैपर्यंत झालेले सहा ठराव दाखल केलेले आहेत, पण त्यांचा अंमल कसा काय झाला हें मात्र सांगितलें नाहीं, किंवा ते लोकांस कळविण्याची काय तजवीज केली होती याचाहि कोठें उल्लेख नाहीं. पहिला ठराव तारीख २ डिसेंबर सन १८९६ चा नंबर ९७०४ चा आहे व त्यांत सन १८८० सालच्या फॅमिन कमिशननें म्हटल्याप्रमाणें कोणावरही साऱ्याकरितां कर्ज काढण्याची पाळी येऊं नये आणि जमीनदारांस सूट दिली असतां त्यानें आपल्या कुळास सूट द्यावी, असें आहे. दुसरा ठराव तारीख ९ जानेवारी १८९७ चा दुष्काळ नं ९८ चा असून त्यांत चार आण्यांहून ज्यास्त ज्यांचें पीक आहे अथवा जे ऐपतदार आहेत त्या सर्वांकडून सारा वसूल करावा, इतरांकडून करूं नये असा हुकूम आहे. तिसरा ठराव १२ जानेवारी १९०० नं. १८३ चा असून त्यांत साऱ्याकरितां जप्तीचे हुकूम असि. किंवा डेप्युटी कलेक्टर याहून खालच्या अधिकाऱ्यांनीं करूं नयेत आणि साऱ्याकरितां कोणाला जमीन व गुरेंढोरें गहाण टाकण्याचा प्रसंग आणूं नये, असें लिहिलें आहे. चौथा ठराव ७ एप्रिल १९०० नं. १९६५ चा आहे. आणि त्यांत सरकारनें असें लिहिलें आहे कीं, पुढील सालची शेतकी करण्यास जी सामुग्री अवश्य लागते त्यांत कमतरता येईल अशा प्रकारें सारा वसूल करण्याच्या कामीं शेतकऱ्यांवर सक्ती होऊं नये हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. पांचवा ठराव ३० जून १९०० नं. २०७१ चा असून त्यांत असें लिहिलें आहे कीं, जे ऐपतदार आहेत त्यांसच नोटीसा कराव्या, आणि इतरांपासून रोख्हिन्यु सालांत सारा मागूं नये; आणि ऐपतीबद्दल कांहीं संशय असल्यास त्या संशयाचा फायदा शेतकऱ्यांस द्यावा. सरकारचा शेवटचा ठराव २३ जुलै १९०० नं. २८९५ चा आहे; व त्यांत खालील अधिकाऱ्यांस असें कळविलें आहे कीं, अंदाजापेक्षां सारा कमी आला तर मुलकी अधिकाऱ्यांस सरकार नांवें ठेवणार नाहीं; पण जुलमानें जर सारा वसूल केला तर मात्र सरकार त्यांस दोष देईल. हे साही ठराव हल्लींच्या ठरावांत मुद्दाम प्रसिद्ध केले आहेत पण ते प्रसिद्ध झाले त्या तारखेस सर्व लोकांना कळविण्याची कांहीं तजवीज झाली होती कीं काय याचा कोठें उल्लेख नाहीं. पुष्कळ सारा वसूल करतो तो मुलकी अंमलदार चांगला असें सरकारचें मत नाहीं, असें हल्लींच्या ठरावांत स्पष्ट म्हटलें आहे. पण हें मत मुलकी अंमलदार किती लक्षांत ठेवतात तें तालुक्यांतील रयतेशीं खासगी रीतीनें ज्यांचा संबंध आहे त्यांखेरीज इतरांस कळणें कठीण आहे.

मेकॉनकीसाहेबांनी केलेलीच चौकशी आपण उदाहरणार्थ घेऊं. या चौकशींत जो पुरावा हजर झाला आहे त्यावरून कांहीं लोकांनीं तगाईतून किंवा धर्मार्थ पोटाकरितां मिळालेल्या रकमेंतून सारा दिला आणि कांहींना साऱ्याकरितां आपल्या जमिनी गहाण ठेवाव्या लागल्या ही गोष्ट सिद्ध झाली असून सरकारनें त्याबद्दल आपली दिलागिरीहि दाखविली आहे. पण तेवढ्यावरून ' शितावरून भाताची परीक्षा ' या न्यायानें सारावसूलीच्या बाबतींत सरकारी अधिकारी सक्ती करितात असें मात्र म्हणण्यास सरकार तयार नाहीं. असो ऑ० मि. पारख व गुजराथी, यांनीं सरकारी अधिकाऱ्यांवर आणलेले आरोप जरी या चौकशींत सरकाच्या दृष्टीनें सिद्ध झाले नाहींत तरी एकंदरींत सारा वसूल करण्याचें वातावरण बरेंच गढूळ झालेलें असतें आणि सारा वसूल करण्याच्या बाबतींत सरकारी ठरावाचें पाणी सेक्रेटरीयेटमधून निघतांना जरी शुद्ध असलें तरी शेतकऱ्यांस पोहोंचेपर्यंत तें गढूळ होऊन त्यांत कित्येक वेळां किडेहि पडतात, येवढें या चौकशींत आलेल्या पुराव्यावरून सिद्ध झालें आहे, इतकेंच नव्हे तर खुद्द सरकारच्याहि लक्षांत ही गोष्ट आली आहे. अशा प्रकारची व्यवस्था पुढें न होऊं देण्याची जर खबरदारी घेण्यांत येईल तर ही चौकशी निष्फळ झाली असें म्हणतां यावयाचें नाहीं. आणि आम्हांस अशी आशा आहे कीं यापुढें अशी व्यवस्था सरकाराकडून ठेवण्यांत येईल. ऑ. मि. पारख यांनीं केलेले आरोप जरी सिद्ध झाले नाहींत तरी सारा वसूल करण्याचें वातावरण दुस्सह असतें एवढें त्यांच्या प्रयत्नानें सिद्ध झालें याबद्दल त्यांचेसंबंधानें थोडा अनुकूल उल्लेख ठरावांत यावयास पाहिजे होता. पण इतकी उदार बुद्धि मुंबईसरकारच्या मनांत वास करीत आहे असें हल्लींच्या ठरावावरून तरी दिसत नाहीं. कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यांस शिक्षा व्हावी असा ऑ. मि. पारख किंवा गुजराथी यांचा हेतु होता असें आम्हांस वाटत नाहीं. सरकारचे हुकूम कितीहि चांगले असले तरी खालील अधिकाऱ्यांचे हातांत त्यांची दुर्दशा होऊन लोकांस किती त्रास होतो ऐवढेंच त्यांस सरकारच्या नजरेस स्पष्ट आणावयाचें होतें. आणि ते "सक्तीच्या" रूपानें नाहीं तर 'दुःसह वातावरणाच्या' रूपानें सरकारच्या नजरेस आलें ही समाधानकारक गोष्ट आहे. बाकीचें काम सरकारानें आपण होऊनच केलें पाहिजे. सरकारचे हेतु चांगले असतां खालील वातावरण दुःसह कां व्हावें हें आम्हांस समजत नाहीं. हल्लींच्याच प्रकरणीं कांहीं मुलकी अंमलदारांस मि. मेकॉनकी यांनीं दोष दिला आहे; पण कमिशनर आणि सरकार यांच्या चाळणींतून जेव्हां मि. मेकॉनकी यांचा रिपोर्ट बाहेर पडला तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांवरील दोषारोप नाहींसे होऊन त्यांनीं पुढें चांगलें रहावें येवढीच कायती त्यांस इशारत मिळाली आहे. न्यायाच्या दृष्टीनें ही पुरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कमिशनपुढें आलेला पुरावाच जर कोर्टापुढें गेला असता तर

सरकारी अधिकारी अशा रीतीनें सुटते कीं नाहीं ह्याचा वानवाच आहे. अंकलेश्वर येथील मुनसफांनीं दिलेला निकाल मागेंच प्रसिद्ध झालेला आहे. आणि अशाच प्रकारचे जास्त आणखी दुसरे खटले न्यायाच्या कोर्टांघुढें जर आले असते तर मुलकी अधिकारी हल्लींप्रमाणें निर्दोष ठरले असते असें आम्हांस वाटत नाहीं. असो; कांहींच नाहीं त्यापेक्षां प्रस्तुतच्या चौकशीनें निदान सारा वसूल करण्याच्या बाबतींत तरी 'दुःसह वातावरण' सरकारच्या नजरेस आलें, आणि साऱ्यासंबंधानें सरकाचे ठराव व सरकारची इच्छा लोकांस समजली हा एक फायदाच होय; व त्याचा लोक चांगल्या रीतीनें उपयोग करून घेतील अशी आम्हांस आशा आहे.

◆ ◆ ◆

* दोन चागलीं पुस्तकें

गेल्या पंचवीस तीस वर्षांत हिंदुस्थानांत राजकीय बाबतींत जी चळवळ चालू आहे तिचा परिणाम काय आहे हें जर कोणास पाहावयाचें असेल तर मि. दादाभाई नौरोजी आणि मि. विल्यम डिग्बी यांनीं प्रसिद्ध केलेलीं दोन पुस्तकें त्यानें अवश्य वाचावींत अशी त्यास आमची सूचना आहे. दादाभाई नौरोजी यांनीं आपला देह हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां अर्पिलेला असून इंग्रजांसारख्या बलाढ्य व सुशिक्षित सार्वभौम राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं हिंदुस्थानदेश इतका दरिद्री कां झाला यार्ची अर्थशास्त्रदृष्ट्या सोपपत्तिक खरीं कारणें विलायतेंतील इंग्रज लोकांस समजून देऊन त्यांच्या हातून हिंदुस्थानचें कांहीं कल्याण झाल्यास पहावें या सेद्धेतूनें ते आपल्या आयुष्याचीं शेवटचीं पंधरा वीस वर्षें स्वदेशाचा व स्वकीयांचा त्याग जरून परदेशांत एकनिष्ठपणें काढीत आहेत हें सर्वांस श्रुत आहेच. किंबहुना राजकीय बाबतींत खटपट करणाऱ्या हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाचे पुढारीच नव्हे, तर त्यातील महर्षी ही संज्ञा जर कोणास साजण्यासारखी असेल तर ती दादाभाई नौरोजी यांसच लागू पडते. कोणताहि देश विपन्न स्थितींत आला असतां त्याच्या रोगाची खरीं कारणें आपल्या बुद्धिबळानें शोधून काढून तीं दूर करण्याचा कायावाचामनेंकरून यथाशक्ति, अव्याहत, आमरणांत प्रयत्न करणें हें देशांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य होय. असे पुढारी ज्या देशांत जन्मत नाहींत त्याची इतिहासज्ञ पुरुष मेलेल्या राष्ट्रांत गणना करीत असतात. शरीरास ज्याप्रमाणें प्राण त्याप्रमाणें असले पुढारी हे राष्ट्राचे जीव होत. राष्ट्र म्हणजे समुद्र आणि

---

* [केसरी ता. १० डिसेंबर. १९०१]

नव्या यांनीं मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणीं व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या कांहीं मैल चौरस तुकड्यास राष्ट्र म्हणावयाचें तर सहारा वाळवंटास हि राष्ट्र म्हटलें पाहिजे किंवा उत्तर ध्रुवाजवळील बर्फाच्छादित प्रदेशासहि राष्ट्र म्हणतां येईल. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ नाहीं व त्याचप्रमाणें नुसता लोकसमुदाय म्हणजेहि राष्ट्र नव्हे हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्या लोकसमुदायांत एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाहीं, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनीं एकत्र बांधलेले नाहींत, अथवा ज्यांच्या अंगांत इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचें वैशिष्ट्यवास करीत नाहीं ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधींहि राष्ट्र या संज्ञेस पात्र होत नाहीं. तसेंच ज्या समुदायांत किंवा लोकसमूहांत वर सांगितलेल्या प्रकारचीं बंधनें किंवा वैशिष्ट्य नेहमीं जागृत ठेवण्याच्या उद्योगास लागलेले पुढारी नाहींत तो समाजहि केव्हांना केव्हां तरी लयास जाणार हें निश्चित होय. राष्ट्रांत हजारों लोक असले तरी ते सर्व राष्ट्रीयत्वास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा नेहमीं विचार करीत नाहींत. हें काम देशांतील पुढाऱ्यांनींच केलें पाहिजे व अशा प्रकारचे पुढारी इंग्रजी राज्य पद्धतींत व इंग्रजी अंमलाखालीं उत्तरोत्तर दुर्मीळ होत चाललेले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मुसलमान, मराठे, शीख वगैरे पूर्वीच्या राजांच्या सत्ता नाहींशा होऊन इंग्रजसरकारचें राज्य जेव्हां या देशांत स्थापित झालें तेव्हां अव्वल इंग्रजींत तयार झालेल्या मंडळींस इंग्रजी राज्याचे गोडवे किती व कोठवर गाऊं असें होऊन गेलें होतें. युरोपांतील राजनीति इतर देश आपल्या सत्तेखालीं आणून ते वागविण्याची पद्धति, एका देशानें दुसऱ्या देशावर आपला अंमल चिरकाल कायम ठेवावयाचा असल्यास लोकांचीं मनें न मोडतां त्यासाठीं कोणकोणते उपाय केव्हां केव्हां कसे कसे अमलांत आणले पाहिजेत यासंबंधीं इतिहासावरून निघालेले सिद्धान्त इ. गोष्टी आम्हांस अनवगत असल्यामुळें इंग्रजी राज्याचें घोरण पहिल्यानें बहुतेक कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. शाळाखातें, तारायंत्र, आगगाड्या, आगबोटी, सडका, धर्मशाळा, दवाखाने, तुरुंग वगैरे राज्यव्यवस्थेच्या नवीन शिस्तीनें सर्वांचे डोळे दिपून गेले व कांहीं दिवस तरी सर्वांस असा भ्रम झाला कीं, या दयाळू इंग्रजसरकारच्या राज्यांत भरतभूमीस इंद्रपद खचित प्राप्त होणार; पण हा भ्रम लवकरच नाहींसा झाला. परराष्ट्रीय व्यापाऱ्यांनीं व धंदेवाल्यांनीं आपला माल हिंदुस्थानच्या बाजारांत आणून अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वावर आमच्या कारागिरांस, धंदेवाल्यांस व व्यापाऱ्यांस भिकेस लावलें. आगगाड्या, आगबोटी वगैरे जीं देशांतरीं जाण्यायेण्याचीं शीघ्र साधनें आस्तित्वांत आलीं त्यांनीं या देशांतील धान्य व माल परदेशांत शीघ्र पाठविण्यास चांगली मदत केली, आणि ज्या ठिकाणीं पूर्वीं दहापांच युरोपियन लोक होते तेथें आतां शेंकडों होऊन त्यांचे पगार, पेन्शनें आणि व्यापाराच्या व व्याजाच्या रूपानें जात असलेला पैसा यानें

सर्व हिंदुस्थान देश निर्धन करून सोडला. एकीकडे अशा प्रकारची देशास कीड लागली असतां व दरवर्षीं त्याचीं गात्रें उत्तरोत्तर निर्जीव व शिथील होत चालली असतां ज्या लोकांच्या हातांत ईश्वरकृपेनें या देशाचीं सूत्रें गेलीं आहेत त्यांनीं एकसारखी अशी ओरड चालू ठेवली होती कीं, "इंग्रजी राज्यछत्राखालीं शांतता आणि सुरक्षितपणा यांच्या योगानें देशामध्यें सुबत्ता होऊन देश इंग्रजी अंमलाखालीं भरभराटीस येत चालला आहे" ही ओरड म्हणजे एक प्रकारें एखादी स्त्री सती चालली असतां मंगल वाद्यांचा ज्याप्रमाणें गजर चालू असतो त्याप्रमाणें होती असें म्हटलें तरी चालेल. विष्णूनें ज्याप्रमाणें तीन पावलानें सर्व जगाचें आक्रमण केलें अशी वेदांत व पुराणांत गोष्ट आहे त्याचप्रमाणें महाविष्णूचा हल्लींचा अवतार जे इंग्रजसरकार त्यानें मि. डिग्बी यांनीं म्हटल्याप्रमाणें व्यापार, राजसत्ता आणि अफूची गोळी या तीन साधनांनीं हिंदुस्थानदेशाचें आक्रमण करून त्यास पृथ्वींतील धनाढ्य देशाच्या उत्कृष्ट पायरीवरून दारिद्र्याच्या पाताळांत आणून सोडलें आहे. आमच्या डोळ्यापुढें गेल्या पन्नास पाऊणशें वर्षे हें जें गौड-बंगाल चाललें आहे त्याचें खरें इंगित काय, व त्याचा परिणाम पुढें काय होणार हें पन्नास वर्षांपूर्वी ज्यांनीं ताडिलें त्यापैकीं मि. दादाभाई नौरोजी यांस अग्रेसरत्व दिलें पाहिजे. इंग्रजी राज्याची वरील चकाकी व भपका यांस भूलून न जातां शांत व सूक्ष्म रीतीनें अर्थशास्त्राच्या सिद्धान्ताप्रमाणें नवीन राज्यपद्धतीचा विचार करून 'हें कांहीं ठीक नव्हें हे भिकेचे डोहाळे आहेत,' असे ज्यांच्या तोंडून पाहिल्यानें उद्गार पडले व ज्या उद्गारांचा खरेपणा आज पावलोपावलीं आमच्या प्रत्ययास येत आहे त्या पुरुषास देशाच्या पुढाऱ्यांमध्यें आम्ही अग्रस्थान दिल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. वातावरण चोहोंकडे शांत असतां व आकाश निरभ्र असतां भावी वावटळाची अटकळ ज्यास बांधतां येते तोच देशाची नाव योग्य रीतीनें चालविण्यास लायख नावाडी होय. बाकी सटर फटर खलाशी पुष्कळ सांपडतात पण समुद्रकिनाऱ्यावरील शिंपांपेक्षां त्यांची योग्यता अधिक नसते. असो; सार्वभौम इंग्रजी राज्यसत्तेखालीं हिंदुस्थानदेश भिकेस लागत चालला आहे व एक वर्ष पावसानें डोळे वटारल्यावरोबर लक्षावधि लोक रिलीफ कामावर उदर निर्वाह करण्यास येतात अशी स्थिति येऊन ठेपली आहे, ही गोष्ट आतां पुष्कळ लोकांस मान्य झाल्यासारखी आहे. पण या विषयाचें सोपपत्तिक विवेचन थोडक्यांत एके ठिकाणीं ज्या पुस्तकांत केलेलें आहे अशा प्रकारचीं पुस्तकें आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं नव्हतीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांत प्रांतिकसभा, राष्ट्रीयसभा व इतर सार्वजनिक संस्था व वर्तमानपत्रें वगैरेमधून राज्यकर्त्यांच्या पक्षाचें व प्रजेच्या पक्षाचें वाग्युद्ध चालून दोन्ही पक्षांच्या कोट्या, प्रमाणें व आंकडे हे सर्व हळुहळु प्रसिद्धीस आलेले आहेत. त्यांतून राष्ट्रियसभेच्या सोळा बैठकींमध्यें प्रजापक्षाचे बहुतेक प्रश्न ज्या

ज्या युक्तीनें सिद्ध करतां येतात त्या त्या युक्त्या व प्रमाणें आतां सर्व लोकांस विदित झालीं आहेत; व त्यांतलेत्यांतच गेल्या सालच्या दुष्काळानें आमचेंचसें काय पण आमच्या राज्यकर्त्यांचेहि डोळे उघडून ह्या दारिद्र्याचा प्रतिकार कसा करावा हा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला आहे. अशा वेळीं इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थान देशास दारिद्र्य व दुर्बलता हीं कशीं प्राप्त झालीं, देशाचें राष्ट्रीयत्व नाहींसें होऊन त्यांत मुत्सद्दी, योद्धे, विद्वान् आणि साहसी पुरुष निपजण्याची अजिबात कशी बंदी झाली, सुशिक्षित राज्यकर्त्यांची सुधारलेली राज्यपद्धति उत्कर्षास कारण न होतां तिच्यामुळें राष्ट्राच्या मानसिक व अधिभौतिक संपत्तीचा कसा ऱ्हास होत गेला आणि चोहोंबाजूनें आम्हीं हिंदुस्थानवासी लोक हतवीर्य आणि उत्साहहीन होऊन अक्काबाईच्या फेऱ्यांत कसे पडलों हें विलायतेंतील लोकांस व आमच्या राज्यकर्त्यांस स्पष्टपणें कळविणें जरूर होतें; आणि तें काम मि. दादाभाई नौरोजी आणि मि. डिग्बी यांनीं दोन चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध करून केलें आहे म्हणून त्यांचें मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. दादाभाई नौरोजी यांच्या पुस्तकाचें नांव Poverty and Unbritish Rule in India म्हणजे हिंदुस्थानांतील दारिद्र्य आणि इंग्रज लोकांचे शीलास न शोभणारी राज्यपद्धति असें आहे आणि मि. डिग्बी यांनीं आपल्या पुस्तकास Prosperous India म्हणजे " भरभराटलेलें हिंदुस्थान " असें व्याजोक्तीनें नांव दिलें आहे. दोन्हीं पुस्तकें हिंदुस्थानांतील लोकांच्या तर्फे त्यांच्या पुढाऱ्यांचें काय म्हणणें आहे हें ज्यास समजून घ्यावयाचें आहे त्यांनीं अवश्य वाचण्यासारखीं आहेत. मि. डिग्बी यांनीं तर आपल्या पुस्तकाच्या आरंभींच लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांस लिहिलेलें पत्र छापलें आहे. व त्यांत हिंदुस्थानचे महानबाब लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांस अशी विनंति केली आहे कीं, " माझ्या पुस्तकांतील गोष्टी सर्व सरकारी रिपोर्टांतून घेतल्या आहेत, त्या खोट्या तरी ठरवा, किंवा हिंदुस्थानास भिकेस लावणारी राज्यपद्धति तरी बदला. " पुस्तकांत ठिकठिकाणीं निरनिराळ्या आकृति काढून हिंदुस्थानचें दारिद्र्य व दुर्दशा अगदीं वरवर पुस्तक वाचणारासहि उघड दिसून येईल अशी व्यवस्था केली आहे. पुस्तकाच्या अगदीं पुठ्ठ्यावरच हिंदुस्थानांतील प्रजेचें उत्पन्न दर माणशीं दररोज १८५० सालीं २ पेन्स, १८८० सालीं १॥ पेन्स आणि १९०० सालीं $\frac{3}{4}$ पेन्स होतें. असें सोनेरी अक्षरांनीं छापलें आहे. हिंदुस्थानांतील संपत्ती कोठें जाते आणि ज्या ठिकाणीं तिचा उगम होतो तो देश कोरडा राहून साता समुद्रापलीकडे एका बेटांत तो ओघ कसा सांठवला जातो याचेंहि या पुस्तकांत सप्रमाण विवेचन आहे. हीं दोन्हीं पुस्तकें मराठींत समग्र नाहीं तरी सारांश रूपानें व चटकदार भाषेंत जर कोणी तयार करील तर त्याचा आमच्या लोकांस पुष्कळ उपयोग होईल असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थान देश

भिकारी होत चालला आहे. व पन्नास वर्षांनीं पुढें काय भयंकर स्थिति होणार आहे याची पुष्कळांस कल्पना देखील करतां येत नाहीं, असें झालें आहे. पण देश भिकेस लागला आहे अशी नुसती कल्पना होऊन किंवा खात्री पटून उपयोगी नाहीं. ज्यांच्या हातांत अशा स्थितीचा प्रतिकार करण्याचा अधिकार व सामर्थ्य आहे त्यांची आपण तशाप्रकारें खात्री करून दिली पाहिजे, व ही खात्री करून देण्याकरितांच मि. दादाभाई नौरोजी व मि. डिग्बी यांनीं हीं दोन पुस्तकें लिहिलीं आहेत. या दोन्हीं पुस्तकांचें सामान्य स्वरूप वर सांगितलें; त्यांतील कांहीं विशिष्ट मुद्यांचा विचार किंवा सारांश पुढें सवडीप्रमाणें देण्याचा विचार आहे.

◆ ◆ ◆

* भरभराटलेलें इंग्रजी हिंदुस्थान

वरील नांवाचा ग्रंथ मि. डिग्बी यांनीं प्रसिद्ध केल्याचें नुकतेंच गेल्या अंकांत आम्हीं सांगितलें आहे. या पुस्तकाची डेमी अष्टपत्री सांच्याचीं सुमारें ७०० पृष्ठें असून त्याची किंमत ७॥ रुपये आहे. हिंदुस्थानास दारिद्र्य येण्यास कोणकोणतीं कारणें झालीं याबद्दल गेल्या पांचपंचवीस वर्षांत मि. दादाभाई नौरोजी, मि. ह्यूम वगैरे सद्गृहस्थांनीं जीं निरनिराळीं कारणें सिद्ध करून दाखविलीं त्या सर्वांचा थोडक्यांत गोषवारा ज्यास पाहावयाचा असेल त्यानें हें पुस्तक अवश्य वाचावें अशी आमची शिफारस आहे; किंबहुना एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थान अतिशय सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं असतांहि त्यास अशी भिकारदशा कां प्राप्त झाली, याची विसाव्या शतकाच्या आरंभीं संक्षिप्त हकीकत सांगून पुढें ती स्थिति सुधारण्यास काय केलें पाहिजे याचें या ग्रंथांत विवेचन आहे; आणि यांत सांगिलेल्या गोष्टींचा किंवा रोगाचा प्रतिकार न झाल्यास विसाव्या शतकाचें अखेरीस हिंदुस्थान अतिशय भिकारी होऊन भरतभूमी म्हणजे एक भिकारी लोकांचा मोठा तुरुंग बनणार आहे. मि. डिग्बी हे आपल्या ग्रंथांत असें लिहितात कीं, आजपर्यंत हिंदुस्थानच्या द्रव्याची जी पावडेओढ चालली आहे तीमुळें "विसाव्या शतकाच्या आरंभीं हिंदुस्थान संपत्तीच्या मानानें आणि नैतिक गुणसंबंधानें इतका खालावला आहे आणि त्यांतील लोक निःसत्व होऊन इतके गुलाम बनले आहेत कीं, ही स्थिती अशीच राहिल्यास लवकरच तेवीस कोटींपैकीं २० कोट प्रजा अन्नास मोताद होईल!" ही भयंकर स्थिति टाळण्यास एकच

---

*[केसरी ता. १७ डिसेंबर १९०१]

उपाय आहे आणि तो हा कीं, देशांतील संपत्ती देशांत राहून तिचा उपयोग देशांतील धंद्यांची अभिवृद्धि करण्याकडे झाला पाहिजे. हिंदुस्थानची हल्लींची स्थिति मि. डिग्बी यांनीं जी वर्णन केली आहे ती अशी आहे कीं, ती ऐकल्यानें कोणांसहि द्रव आल्याखेरीज राहणार नाहीं. ज्या देशांत (१) गांवोगांव असलेलीं धान्याचीं पेवें नाहींशी होत चाललीं, (२) सोन्यारुप्याचे दागिने किंवा त्या रूपानें आलेली शिल्पक बहुतेक नष्ट झाली, (३) लोकांचे निरनिराळ्या प्रकारचे समुद्रावरील किंवा जमिनीवरील उद्योगधंदे नाहींसे होऊन सर्वजण शेतकीवर येऊन पडले, (४) ज्या गलबताच्या योगानें देशांतील धान्य किंवा उत्पन्न परदेशांत जातें तीं गलबतें देखील परकीयांनीं बांधलेलीं व परकीयांनीं चालविलेलीं आहेत, व त्यांचा फायदा परकीयांकडे जात आहे. (५) नीळ, चहा, कॉफी वगैरे ज्या नव्या उत्पन्नाच्या बाबी आहेत त्या सर्व परकीय भांडवलानें परकीय लोकांच्या फायद्याकरितां चाललेल्या आहेत. (६) व्यापार किंवा मोठमोठे उद्योगधंदे हे सर्व किंबहुना किफायतीचा सर्व रोजगार जेथें परकीयांच्या हातांत आहे, आणि (७) राज्यकारभारांतील मोठमोठ्या पगाराच्या व हुद्याच्या नोकऱ्या सर्व परदेशांतील लोकांच्या ताब्यांत आहेत, त्या देशास भीक लागून एक वर्ष पाऊस न पडतांच लोक अन्नान्नदशेस लागल्यास नवल काय, असा मि० डिग्बी यांनीं प्रश्न केला आहे. विसावें शतक लागलें तेव्हां विलायतेच्या पत्रांतून एकोणीसाव्या शतकांत इंग्लंडाची कशी काय भरभराट झाली याविषयीं अनेक लेख आले होते. या लेखांवरून पाहतां एकोणीसाव्या शतकांतच इंग्लंडदेशाची अतिशय भरभराट झाली असें दिसून येतें. पण त्याच शतकांत हिंदुस्थानदेश इंग्लंडच्या ताब्यांत असतां तो मात्र भिकेस लागला. मि. डिग्बी यांनीं आपल्या ग्रंथांत ब्रुक्स ॲडाम्स यांच्या ग्रंथांतील एक उतारा देऊन असें सिद्ध केलें आहे कीं, १७५७ सालीं प्लासीची लढाई झाल्यानंतर तीन वर्षांनींच सुताच्या गिरणींची कल्पना इंग्लंडांत निघाली, व १७६८ सालीं वॉटसाहेबांनीं वाफेच्या इंजिनाची कल्पना काढली, पण नुसत्या कल्पनांनीं होणार काय ? आज म्यांचेस्टर व लँकेशायर येथें ज्या शेंकडों वाफेच्या गिरण्या चालू आहेत त्यांस द्रव्यबल नसतें तर त्या कधींहि चालू झाल्या नसत्या हें उघड आहे. हें द्रव्यबल इंग्लंडास कोठून प्राप्त झालें याचा ब्रुक्स ॲडाम्स यांनीं जो निर्णय केला आहे तो असा आहे कीं, यापैकीं बहुतेक पैसा प्लासीच्या लढाईनंतर हिंदुस्थानांतून आला. सारांश कंपनीच्या अंमलांत किंवा अव्वल इंग्रजींत, लूट, पगार किंवा व्यापार यांच्या मिषानें जो द्रव्याचा ओघ हिंदुस्थानांतून इंग्लंडास गेला त्यामुळेंच यांत्रिक कल्पना अमलांत व प्रचारांत येण्यास ज्या साधनांची जरूरी आहे तीं म्हणजे द्रव्याचीं साधनें, इंग्लंड देशास उपलब्ध होऊन तो भरभराटीच्या शिखरावर चढला, व आम्हीं दारिद्र्याच्या खड्यांत किंवा चिखलांत उत्तरोत्तर अधिकाधिक गढत चाललों, इतकेंच नव्हे,

तर इंग्लंड देश जसजसा हिंदुस्थानांतून गेलेल्या संपत्तीनें अधिकाधिक भरभराटीस येत चालला तसतशी त्याची भरभराटच आमच्या ऱ्हासास अधिक कारणीभूत होत चालली. गाडीच्या चाकाप्रमाणें ही एका देशाची उन्नति व एका देशाची अवनति कशी झाली हें मि. डिग्बी यांनीं आपल्या पुस्तकांत सुरेख दाखविलें आहे. कापसाचीं किंवा रेशमी वस्त्रें तयार करण्यांत हिंदुस्थान देशाचा पूर्वीच्या काळीं पहिला नंबर असे व एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थानांत जर स्वराज्य असतें तर जपान देशानें हल्लीं ज्याप्रमाणें युरोपियन कलाकौशल्यें उचलली आहेत तद्वतच वाफेनें माग चालविण्याची कल्पनाहि आम्ही घेऊन सदर कल्पनेपासून द्रव्यद्वारां होणारा सर्व फायदा या देशांतील लोकांच्याच पदरांत पडला असता. पण दैवगति अशी कांहीं विचित्र आहे कीं, शास्त्रीय किंवा यांत्रीक नवीन नवीन शोध निघण्यास आणि हिंदुस्थानांत परकीय राज्य होऊन या देशांतील संपत्ती विलायतेस जाण्यास एकच गांठ पडली ! आणि एकदां याप्रमाणें संपत्तीचा ओघ पूर्वेकडून पश्चिमेकडे वळल्यानंतर राजसत्ता परकीयाच्यांच हातांत असल्यामुळें या ओघास बंधारा घालण्याचें काम झालें नाहीं तें नाहींच. पण तो उलट अधिक जोरानें परदेशाकडे जेणेंकरून वाहत जाईल अशा सर्व तजविजी करण्यांत आल्या. मि. डिग्बी यांनीं थॅकरे यांच्या रिपोर्टांतील एक उतारा पहिल्यानेंच घेतला आहे. मद्रास इलाख्यांत जमीनधाऱ्याची कोणती पद्धत सुरू ठेवावी याबद्दल १८१२ सालीं जो वाद झाला त्यांत मि. थॅकरे यांनीं जो अभिप्राय दिला आहे त्यापैकीं हा उतारा आहे. जमीन धाऱ्याच्या दोन पद्धती आहेत. एक देशमूख, देशपांडे वगैरे मधले अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत सारा वसूल करणें, आणि दुसरी रयतवारी किंवा शेतकऱ्यांपासून प्रत्यक्ष सरकारानें सारा घेणें. पैकीं पहिल्या पद्धतीप्रमाणें देशमूख व देशपांडे वगैरे लोकांस जमिनीच्या साऱ्यापैकीं शेंकडा कांहीं तरी भाग वेतनादाखल मिळून राज्यामध्यें सुखवस्तु व समृद्ध लोकांचा एक वर्ग वाढतो; आणि ज्यावेळीं स्वराज्य होतें त्यावेळीं अशा प्रकारच्या लोकांचा वर्ग राज्यांत असल्यानें राज्यास एक प्रकारची बळकटी होती. परंतु परकीय राज्यांत अशा प्रकारचे मधल्या वर्गांतील संपन्न लोक असणें राज्यकर्त्यांस हितावह नाहीं, असा थॅकरेसाहेबांनीं आपला अभिप्राय दिला आहे. व याकरितां जमीन धाऱ्याची जी पद्धत सुरू करावयाची ती देशमुख, देशपांडे इनामदार वगैरे नाहींसे व्हावे अशा प्रकारची करावी असें त्याचें म्हणणें नमूद आहे. ते म्हणतात कीं, इंग्लन्डांत साऱ्यापैकीं बराच भाग ज्यांच्या पदरांत पडतो अशा प्रकारचे जमिनदार लोक असल्यानें त्या वर्गांतून चांगले मुत्सद्दी व कारस्थानी लोक निपजून राज्यास बळकटी येते. पण हिंदुस्थानांत अशा प्रकारचे जमिनदार लोक ठेऊन उपयोग काय ? संपत्ती पुष्कळ असल्यानें त्यांचे विचार सह-

जगत्या राजकीय विषयाकडे वळून ते आपली महत्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या उद्योगास लागणार. ज्याठिकाणीं स्वराज्य आहे तेथें असले लोक पाहिजेत. पण हिंदुस्थानांत इंग्रज सरकारास त्यांची जरूर नाहीं. हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या संपत्तीनें उत्पन्न होणारे विचार, महत्वाकांक्षा, स्वातंत्र्यप्रियता, आणि ताठरपणा हीं जितकीं बुडवितां येतील तितकी चांगलीं. "आम्हांस हिंदु लोकांमनधू मोठे मुत्सद्दी, योद्धे किंवा राज्यकारस्थानी पुरुष निपजण्यास नको आहेत. शेतकी करून गरीबीनें उद्योग करणारे लोक असले म्हणजे बस्स आहे!" आतां ही गोष्ट खरी आहे कीं पूर्वीच्या राज्यांतील इनामदार व वतनदार एकदम कमी करतां येत नाहींत पण वर सांगितल्याप्रमाणें राजकीय दृष्ट्या विचार केला तर अशा प्रकारचे संपन्न व स्वतंत्र विचाराचे नवीन लोक न निपजतील अशा प्रकारची तजवीज करणें जरूर आहे. अशा प्रकारचे नवीन लोक निपजणें बंद झालें म्हणजे जुन्यांचाच काय तो बींमोड करण्याचा प्रश्न राहिला, व तोहि कालांतरानें समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत येईल. थॅकरेसाहेबांनीं हे विचार १८१२ सालीं प्रसिद्ध केलेले आहेत, व गेल्या ९० वर्षांत त्यांचा कसा काय अंमल झाला हें सर्वांस माहीत आहेच. इंग्रजसरकारच्या राज्यांत शांतता स्थापित होऊन लोकांस आगगाड्या तारायंत्रें इत्यादिकांचें सौख्य प्राप्त झालें, असें प्रतिपादन करणारांनीं थॅकरेसाहेबांचे वरील विचार अवश्य वाचावे अशी त्यांस आमची सूचना आहे. पेशवाई संपल्यानंतर एल्फिन्स्टनसाहेबांनीं दक्षिणेंतील सरंजामदार व जहागीरदार मंडळीची जी व्यवस्था लाविली व त्यापुढें दक्षिणेंत साऱ्याची जी रयतवारी पद्धत अमलांत आली तिचें रहस्य काय आहे हें यावरून ध्यानांत येईल. जुनी सरदार घराणीं बुडवावयाचीं आणि सरकारशीं डोकें वर काढून कोणी भांडेल अशा प्रकारचा मनुष्य राज्यामध्यें ठेवावयाचा नाहीं हें इंग्रजी राज्याचें धोरण पहिल्यापासूनच ठरलेलें आहे. मोठ-मोठ्या पगाराचे साहेब लोक आणि अंमलदार यांखेरीज राज्यांत कोणीही डोईजड मनुष्य असूं नये आणि सर्व प्रजेनें गुलामाप्रमाणें खपून व पोटास अर्धी भाकर खाऊन अर्धी भाकर राज्यकर्त्यांस द्यावी, हें इंग्रजी राज्याचें मूळ धोरण किंवा अखेर परिणाम आहे. पाहिल्यानें ही गोष्ट आमच्यांतील लोकांच्या चांगलीशी लक्षांत आली नव्हती व त्यामुळें कोणीं सामाजिक तर कोणी धार्मिक सुधारणेच्या नादीं लागले होते. पण गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासावरून व लोकस्थितीवरून एक गोष्ट आतां उघड सिद्ध झाली आहे व ती ही कीं, हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगचें तेज, वैभव, सामर्थ्य, हुषारी किंवा बुद्धी यांचा विकास न होण्यास परकीय लोकांचें राज्य हेंच जबरदस्त कारण आहे, आणि या राज्यामध्यें कितीहि शांतता असली तरी ज्या गोष्टीवर स्वतंत्र देशाचा जीव का प्राण आवलंबून असतो त्या सर्व गोष्टींस आम्हीं पारखे झालों आहों. मि. डिग्बी

यांच्या ग्रंथांत ही गोष्ट मूद्देसूद रीतीनें सिद्ध केलेली आहे व केसरीपत्रांतांहि अनेक वेळां अशाच प्रकारचे लेख मागें आलेले आहेत. इंग्रजी राज्यपद्धतीचें खरें स्वरूप ज्यास पहावयाचें असेल त्यानें या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे.

❁ ❁ ❁

* हिंदुस्थानचें दारिद्र्य

गेल्या पंचवीस वर्षांच्या वादविवादांत जर हिंदुस्थानच्या लोकांच्या तर्फे कोणतीहि गोष्ट सिद्ध करण्यांत आली असेल तर ती त्यांच्या दारिद्र्यासंबंधाची होय. दोनशें वर्षांपूर्वी ज्या वेळेस इंग्लिश, डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे पश्चिमेकडील लोकांनीं सुवर्णभूमीची आरव्या ऐकून आमच्याकडे धांव घेतली तेव्हां हिंदुस्थानच्या संपत्तीबद्दल पश्चिमेकडील लोकांची जी समजूत झाली होती तींत व हल्लींच्या वस्तुस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. आमच्या देशास सुवर्णभूमि हें नांव राहिलेलें आहे, पण 'नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा' अशी आतां स्थिति येऊन ठेपली आहे. डिग्बीसाहेबांनीं आपल्या बुकाच्या पाठीवर बुकाचें सोनेरी अक्षरानें जेथें नांव घातलें आहे त्या खालींच सोनेरी अक्षरांनीं हिंदुस्थानचें १८५० सालीं दर माणशीं रोजचें उत्पन्न २ पेन्स किंवा हल्लींच्या हुंडीच्या भावाप्रमाणें दोन आणे; १८८० सालीं १॥ पेन्स किंवा १॥ आणा; आणि १९०० सालीं $\frac{3}{4}$ पेन्स किंवा ०॥।- आणा होतें असें लिहिलें आहे. व त्याच्या पुष्टीकरणार्थ सरकारी रिपोर्टांतील उतारे घेऊन केवळ सरकारी कागदपत्रांवरूनच हें म्हणणें सिद्ध करून दाखविलें आहे. इंग्रजी राजकर्त्यांस हिंदुस्थानची खरी स्थिति न समजल्यामुळें त्यांनीं केलेली व्यवस्था नीट होत नाहीं असें सभांतून व वर्तमानपत्रांतून म्हणण्याचा प्रघात आहे; व राज्यकीय चळवळींत पडलेल्या नरम म्हणवून घेणाऱ्या कित्येक गृहस्थांस सरकारच्या सदुद्देशाचीच आम्ही वारंवार स्तुति करावी हें इष्ट वाटत असतें. पण हा सर्व भ्रम आहे आणि हिंदुस्थानची खरी स्थिति सरकारच्या कागदपत्रांत नमूद आहे व खुद्द सरकारी अधिकाऱ्यांस माहीत आहे हें मि. डिग्बी यांचें पुस्तक वाचल्यानें कोणासहि कळून येईल. सन १८८२ सालीं लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत तेव्हांचे फडणीस सर बेअरिंग यांनीं हिंदुस्थानच्या लोकांच्या प्राप्तीचें मान चौकशी करून दरसाल दर माणशीं सरासरीनें २७ रुपये ठरविलें होतें. त्यानंतर १८८८

---

* [केसरी ता. १४ जानेवारी सन १९०२]

सालीं लॉर्ड डफरिन गव्हर्नरजनरल असतां हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतिक सरकारांमार्फत गुप्त रीतीनें चौकशी होऊन हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांची व मजुरांची खरी स्थिती सरकारानें समजून घेतली. हे रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाले आहेत, पण ते गुप्त असल्यामुळें ते कोणासहि देण्यांत किंवा दाखविण्यांत येत नाहींत. सन १८९१ सालीं पार्लमेंट सभेच्या टेबलावर हे रिपोर्ट ठेवावे म्हणून ब्राडलासाहेबांनीं सूचना केली होती. पण पाहिल्यानें ती नाकबूल झाली. अखेरीस हे रिपोर्ट अपुरेच कां होईनात पार्लमेंटच्या टेबलावर ठेविले, आणि ब्राडलासाहेबांच्या उपयोगाकरितां एक प्रत देण्यांत आली. तीच प्रत हल्लीं डिग्बीसाहेबांजवळ आहे व त्याचाच आधार घेऊन प्रस्तुतच्या पुस्तकाचा बराच भाग त्यांनीं लिहिलेला आहे. बंगाल, मद्रास, मुंबई, वायव्यप्रांत, पंजाब, मध्यप्रांत, ब्रह्मदेश आणि आसाम इतक्या प्रांतांची या रिपोर्टावरून व दुसऱ्या साधनांवरून हकीकत घेऊन मि. डिग्बी यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदुस्थानांत श्रीमंत लोक जो फाजील पैसा खर्च करतात त्या मानानें गरीबांची प्राप्ती कमी धरली म्हणजे कोट्यावधि गरीब लोकांस दर माणशीं सालीना १३ शिलिंग म्हणजे हल्लींच्या भावानें सुमारें ९।।। किंवा फार झालें तर १० रुपये पडतात. लॉर्ड कर्झन यांनीं दर माणशीं दरसाल प्राप्तीचें मान ४० शिलिंग धरलें आहे. पण तें बरोबर नसून खरें प्राप्तीचें मान सुमारें २२।२३ शिलिंग आहे असें मि. डिग्बी यांनीं दाखविलें आहे. या बावीस तेवीस शिलिंगांतून श्रीमंत लोकांची प्राप्ती कमी केली म्हणजे गरीबांस वर्षास अवघे १३ शि. राहतात. कलकत्ता, मुंबईसारख्या राजधानीच्या शहरांतून व्यापाऱ्यांजवळ किंवा देशी संस्थानांतील राजांजवळ जी कांहीं हल्लीं थोडीबहुत संपत्ती दृष्टीस पडते तेवढ्यावर हिंदुस्थानच्या संपत्तीचें जर कोणी अनुमान बांधूं लागला तर तें चुकीचें होईल. हिंदुस्थानासारख्या अफाट देशांत कांहीं थोड्या लोकांजवळ जर संपत्ती दिसली तर त्यावर सर्व देशाच्या संपत्तीचें अनुमान करणें चुकीचें आहे. ज्यास देशांतील लोकांची खरी स्थिति पहावयाची असेल त्यानें खेडेगांवांतील शेतकऱ्यांची किंवा मजुरांची स्थिति पाहिली पाहिजे. कोणत्याहि देशांतील लोक समृद्ध आहेत कीं नाहींत हें पाहणें असल्यास त्या देशांतील अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांस कोणतें अन्न, वस्त्र व राहण्याची जागा असते हें पाहिलें पाहिजे. दक्षिणेंतील गरीब कुणब्यास पोटास दरसाल निदान १८ शिलिंग म्हणजे निदान १४ रुपये लागतात असा स्पेन्ससाहेबांचा अदमास आहे; व प्राप्तीचें मान पाहिलें तर त्याहिपेक्षां कमी. तुरुंगांत कैद्यास पोटास दरसाल दरमाणशीं २० रुपये तरी लागतात. या मानानें पाहिलें तर हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस तुरुंगांतील कैद्याइतकेंहि अन्न मिळत नाहीं, असें उघड सिद्ध होतें. अशा स्थितींत लोकांनीं खावें काय, उमेद कोणती बाळगावी आणि वस्त्रप्रावरण तरी कोणतें घ्यावें ?

या लोकांची खरोखर स्थिति म्हटली म्हणजे एका कवीनें वर्णन केल्याप्रमाणें "रात्रौ जानुर्दिवा भानुः कृशानुः संध्ययोरपि ॥ इत्थंशीतं मयानीतं जानुभानु-कृशानुभिः ॥" अशा प्रकारची आहे. शेत चांगलें पिकलें असतांहि ज्यास फार फार झालें तर सालीना २० शिलिंगहि मिळत नाहींत, त्यानें पोटास काय खावें, कपडा कोठला घ्यावा, लग्नकार्यास काय खर्च करावा आणि सावकारास काय द्यावें हें एक परमेश्वरासच माहीत पडेल! सर्व देशांतील लोक अशा प्रकारें कंगाल झाले असल्यावर एक साल पर्जन्य न पडला असतां लाखों लोक दुष्काळाचे कामावर येऊं लागल्यास त्यांत नवल तें काय? त्यांतून हिंदुस्थानसरकारास ही स्थिति माहीत नसती तर गोष्ट निराळी. पण हिंदुस्थानसरकारच्या हुकुमावरून निरनिराळ्या प्रांतांतील सरकारच्या अम्मलदारांनीं स्वतंत्र चौकशी करून प्रमाणासिद्ध रीतीनें ही माहिती सरकारकारपुढें मांडली असतां व ती छापूनहि प्रसिद्ध झाली असतां आज बारा वर्षें सरकार तिकडे डोळेझांक करीत आहे यास म्हणावें तरी काय? याचें कोणी उत्तर देईल काय? इंग्रजसरकारच्या राज्यव्यवस्थेखालीं हिंदुस्थान उत्तरोत्तर कंगाल होत चाललें आहे यावद्दलचा भक्कम पुरावा सरकारी रिपोर्टांत भरलेला असतां व त्या रिपोर्टाच्या शेंकडों प्रती सरकारी दप्तरांत कसर खात पडलेल्या असतां पुनः निलाजरेपणानें लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टनसारख्या बड्या अधिकाऱ्यांनीं पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानच्या भरभराटीचे पोवाडे गावे यापेक्षां अधिकारी वर्गाच्या आपमतलबी धाष्टर्याचें दुसरें उत्कृष्ट उदाहरण तें कोणतें? हिंदुस्थानदेश भिकारी होत चालला आहे ही गोष्ट इंग्रजी अधिकारी वर्गास पूर्णपणें माहीत आहे. इतकेंच नव्हे तर, ती विलायतेंतील लोकांस कळूं देऊं नये अशाबद्दल त्यांचे सक्त प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न निष्फळ होऊन हिंदुस्थानची खरी स्थिति विलायतेच्या लोकांस कळवावी एवढाच मि. दादाभाई आणि मि. डिग्बी यांच्या पुस्तकांचा हेतु आहे व तो आमच्या मतें हल्लीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकानें चांगला सिद्धीस जाण्याजोगा आहे. हिंदुस्थान निःसत्व झालें, निर्बल झालें किंवा निर्धन आणि नाउमेद होऊन त्यांतील राष्ट्रीयत्वाचें बीज नाहींसें होत चाललें, अशी आमच्या राज्यकर्त्यांजवळ येथें ओरड करून कांहीं एक उपयोग नाहीं. आज तीस कोट प्रजेवर आसेतुहिमालयापर्यंत जे अबाधित राज्य चालवीत आहेत त्यांस ही गोष्ट पूर्णपणें माहीत आहे. पण माहीत असून उपयोग काय? हिंदुस्थानांतील लोकांस त्यांस अशाच स्थितींत ठेवावयाचें आहे व याकरितां ते आपल्या देशबांधवांसाहि हव्या त्या थापा देण्यास तयार आहेत. आतां आपणांस तरणोपाय काय तो एवढाच आहे कीं, विलायतेंतील सर्व लोकांस ही स्थिति कळवून त्यांच्याकडून हिंदुस्थानांत आलेल्या त्यांच्या देशबांधवांच्या करणीस आळा घालतां आल्यास पहावा. मि. दादाभाई नौरोजी आणि मि. डिग्बी यांचीं पुस्तकें याच हेतूनें

लिहिलेलीं आहेत. हिंदुस्थानांतील लोकांच्या खऱ्या स्थितीबद्दल रिपोर्ट आपल्या दप्तरांत दाबून ठेवून विलायतेंतील लोकांस स्टेट सेक्रेटरीसारखे अधिकारी कसें फसवितात हें आतां चांगलें उघडकीस आलें आहे. याबद्दल आतां कांहीं शंका राहिली नाहीं. कारण मि. डिग्बी यांनीं आपलें पुस्तक प्रसिद्धपणें लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टन यांजकडे पाठविलें आहे. आतां विलायतेंतील लोक याचा प्रतिकार करण्याच्या कामीं आम्हांस कांहीं मदत करतील कीं काय एवढाच प्रश्न आहे. विलायतेंतील लोकांनीं या कामीं आम्हांस मदत करणें म्हणजे स्वजातीयांस कमी हावरेपणा करण्यास सांगण्यासारखें आहे. सामान्य मनुष्यस्वभावाप्रमाणें असा उपदेश आपल्या आप्तांस कोणीहि करावयाचा नाहीं. पण हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य बरेच दिवस राहिलें पाहिजे व तें राहण्यास नीति आणि सदयता हीं दोनच खरी साधनें आहेत अशी खात्री झाल्यावर इंग्लंडांतील लोक आम्हांस कांहीं मदत करूं शकतील. परंतु इंग्लंडसारख्या पैसे मिळविण्यांत चूर झालेल्या राष्ट्राची अशा प्रकारें खात्री करून देणें हें मोठ्या श्रमाचें, धीराचें आणि खर्चाचें काम आहे. मि. दादाभाई यांनीं आपलें आयुष्यच या कामीं खर्च केलें आहे असें म्हटलें तरी चालेल. पण त्यापासून व्हावा तितका उपयोग झाला नाहीं. यापुढें हा उद्योग किती व कसा चालवावा हा स्वतंत्र प्रश्न आहे, ज्या पुस्तकासंबंधानें आम्हीं प्रकृत लेख लिहिला आहे त्यावरून एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, आमच्या दारिद्र्याची सरकारास पूर्ण कल्पना असूनहि सरकार हल्लींच्या क्रमांत कांहीं फेरफार करीत नाहीं. त्यांस हीच स्थिति पाहिजे आहे किंवा नको असल्यास तिचा प्रतिकार करण्याची त्यांची इच्छा नाहीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या चळवळीनें जर कांहीं सिद्ध झालें असेल तर हेंच होय व यापुढें काय करावयाचें तें राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं ठरविलें पाहिजे.

* अनावर राज्यविस्तार

हिंदुस्थानाच्या लोकांनीं किंवा प्रजेनें इंग्रज राज्यकर्त्यांपासून आपणांस जास्त हक्क मिळविण्याकरितां गेल्या २० वर्षांत काय उद्योग केले व त्यांत कितपत यश आलें, हें गेल्या अंकीं सांगितलें आहे; परंतु ही हकीकत केवळ प्रजेच्या दृष्टीनें झाली. राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर गेल्या २० वर्षांचा इतिहास निराळ्याच प्रकारें लिहावा लागेल. इंग्रज लोक हिंदुस्थानाचें राज्य करीत आहेत तें दरबारी भाषेंत जरी हिंदुस्थानच्या हिताकरितां असलें, तरी वास्तविकरीत्या पाहिलें तर इंग्लंडखेरीज इतर युरोपियन राष्ट्रांची एशिया किंवा आफ्रिकाखंडांत जी राज्यतृष्णा व चळवळ दिसून येते त्याहून इंग्लिश लोकांची हिंदुस्थानांतील किंवा अन्य ठिकाणची चळवळ फारशी भिन्न नाहीं, असें आढळून येईल. युरोपियन राष्ट्रांच्या चढाओढीनें जगाचा नकाशा गेल्या २० वर्षांत पुष्कळ पालटला आहे. आज ज्या बोअर लोकांच्या लढाईचा शेवट कसा काय होतो याची आम्हीं वाट पहात बसलों आहों, त्या बोअर लोकांनीं माजुबा हिल येथें लढाई करून प्रथमतः इंग्लंडपासून स्वराज्याचे हक्क सन १८८१ सालीं प्राप्त करून घेतले होते. अर्थात् बोअर लोकांच्या संस्थानाची संस्थापना व मोड आणि त्याजबरोबरच दक्षिण आफ्रिकेंतील चळवळ या दोन गोष्टी गेल्या २० वर्षांतच येतात. तसेंच इजिप्त देशांतील आरबी पादशहाचें बंड, गार्डन साहेबांचा मृत्यु, महादीचा पराभव, युरोपांतील तुर्कस्थान आणि रशिया यांच्या दरम्यानच्या झटापटी, सर्व्हिया आणि बलगेरिया यांमधील युद्ध प्रसंग, युरोपांतील तुर्की राज्याच्या मर्यादेचा संकोच वगैरे गोष्टीहि गेल्या २० वर्षांतच घडलेल्या आहेत. आयरिश लोकांच्या पुढाऱ्यांनीं स्वराज्याचे हक्क मिळविण्यासाठीं केलेले प्रयत्न, त्यांजवर चालविलेली सक्ती, पारनेलचा खटला, ग्लॅडस्टनसाहेबांचें होमरूल बिल, आणि परवां लॉर्ड रोजबरी यांनीं या प्रकरणास दिलेली अखेरची मूठमाती या गोष्टीहि गेल्या २० वर्षांच्या इतिसकारांस आपल्या इतिहासांत नमूद केल्या पाहिजेत. अमेरिका आणि स्पेन यांच्या दरम्यानचें युद्ध, अमेरिकन लोकांस अमेरिकेबाहेर जाऊन मुलुख संपादन करण्याची उत्पन्न झालेली इच्छा आणि त्यापासून होणारे भावी परिणाम यांचाहि याच कालांत समावेश केला पाहिजे. या सर्व गोष्टी सविस्तरपणें तेथें सांगू गेल्यास एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. परंतु केसरीच्या आर्टिकलांत तसें करणें शक्य नाहीं, आणि जरूरहि नाहीं. गेल्या २०

---

*[केसरी ता. २५ फेब्रुवारी १९०२]

REGISTERED B 60

केसरी

स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि सदाचिष्णमनसं धनध्यानैनाथ स्पृहयजडिताशां जनयति। अतो कृधिधात्या सन्मनसनविधास्यिनमदा—कुलाचारग्राम. स्वपिनि गिरिजें दयितः॥

वर्ष २२ वें. पुणें—मंगळवार, तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९०२ अंक ६ वा.

केसरी.

बहादरिकेवेदा सिंहेदरस्फोटा-मराठी वर्दीवर फाडिला जातो. अन्यायी पुरुषांचा हा केसरी कर्दनकाळ आहे. ह्याचे गुरकावणे ऐकून कोणीही अन्याय करूं नये.

कलकत्ता, मिति माघ वद्य १ शके १८२३.

केसरी

केसरीचें स्वरूप

केसरी ह्या नांवाचें पत्र सुरू करण्याचें मनांत आलें तेव्हांच केसरीचें स्वरूप कसें असावें ह्याविषयीं आम्हांमध्यें पुष्कळ चर्चा झाली होती. केसरी हें नांव ठेवण्यांत आमचा हेतु असा होता कीं, केसरी पत्राचें स्वरूप सिंहाप्रमाणें असावें. सिंह जसा निर्भय असतो, त्याप्रमाणें केसरीनें निर्भय असावें. सिंह जसा आपल्या पंजांत सांपडलेल्या प्राण्याचा फडशा पाडतो, त्याप्रमाणें केसरीनें अन्यायी लोकांचा फडशा पाडावा. सिंह जसा आपल्या गुहेचें रक्षण करतो, त्याप्रमाणें केसरीनें आपल्या देशाचें व धर्माचें रक्षण करावें. सिंह जसा आपल्या पिलांवर प्रेम करतो, त्याप्रमाणें केसरीनें आपल्या देशबांधवांवर प्रेम करावें. सिंह जसा आपल्या शत्रूवर हल्ला करतो, त्याप्रमाणें केसरीनें आपल्या देशाच्या शत्रूवर हल्ला करावा

वर्षांत हिंदुस्थानांत काय घडलें हें आपणांस पहावयाचें आहे. पण हिंदुस्थानची ह्या अवधींतील स्थिति नीट लक्षांत येण्याकरितां हिंदुस्थानच्या-बाहेर गेल्या २० वर्षांत काय चाललें याचा नुसता नामानिर्देश करणें तरी जरूर आहे. आणि तशा दृष्टीनें पाहिलें तर अमेरिका किंवा युरोपांतील बलाढ्य राष्ट्रें यांनीं गेल्या २० वर्षांत सर्व जगांत हुतूतू घालण्यास सुरुवात केली आहे, असें वरील गोष्टीवरून वाचकांच्या लक्षांत येईल. ही चळवळ केवळ आफ्रिका-खंडांतच चालू आहे असें नाहीं. एशियाखंडाच्या उत्तरेस रशियन लोकांनीं सैबिरियामधून रेल्वे बांधून व दक्षिणेस अफगाणिस्थानच्या जवळ जवळ आपली सरहद्द आणून ठेवून एक मोठें साम्राज्य स्थापन केलें आहे. जपानाची जागृति, जपानास चिनावर मिळालेला जय आणि चीनची सध्यां झालेली स्थिती याहि गोष्टींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम हिंदुस्थानाच्या इतिहासावर झाल्याखेरीज रहात नाहीं. अफगाणिस्थानांत अबदुल रहिमानची स्थापना सन १८८० सालाच्या जुलै महिन्यांतच झाली. म्हणजे गेल्या २० वर्षांचा ज्या कोणास इतिहास लिहावयाचा असेल त्यास अबदुल रहिमानच्या सबंध कारकीर्दीची हकीकत दिली पाहिजे. फ्रान्स देशाची इजिप्तमध्यें आणि सयाम-मध्यें झालेली चळवळ, जर्मन, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे राष्ट्रांनीं आफ्रिकेंत स्थापलेलीं संस्थानें, आणि तीं चालविण्याकरितां झालेल्या खटपटी व त्याचप्रमाणें रशियांत व इराणांत चाललेलीं कारस्थानें यांचाहि आपणांस थोडाबहुत तरी विचार करावयास पाहिजे. सारांश गेलीं २० वर्षें म्हणजे जगाच्या इतिहासांतील एक मोठा चळवळीचा काल होय. इंग्रज सरकाच्या राज्यछत्राखालीं शांततेनें काळ घालविणाऱ्या हिंदुस्थानवासी प्रजेस या जगावरील उलाढालींची फारशी फिकीर करावी लागत नाहीं; किंबहुना या गोष्टींची ते चौकशीहि करीत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. परंतु आमच्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें या सर्व गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. हिंदुस्थानचें राज्य चालविण्याकरितां दर पांच वर्षांनीं जे बडे लाट इकडे येतात त्यांचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रजांचें साम्राज्य कोणत्या उपायांनीं चिरस्थायी होईल याचें नेहमीं मनन करून त्याप्रमाणें व्यवस्था करणें हें होय. इंग्लंड देशास युरोपांतील राष्ट्रांमध्यें पहिल्या दर्जाचा जो आज मान मिळत आहे त्याचें कारण हिंदुस्थानांतील अफाट राज्य हेंच होय. हिंदुस्थानचें राज्य ज्या दिवशीं जाईल त्या दिवशीं इंग्लंडचा दर्जा कमी होऊन दुसऱ्या प्रतीच्या राष्ट्रांत त्याची गणना होईल, ही गोष्ट इंग्रजी ग्रंथकारांसहि कबूल आहे. हिंदुस्थान म्हणजे एक दुभती गाय आहे. जगांत कोठेंहि कांहीं चळवळ झाली तर हिंदुस्थानचें सैन्य हिंदुस्थानच्या खर्चानें तिकडे पाठवून त्याचा विलायत सरकारास ताबडतोब बंदोबस्त करितां येतो, इतकेंच नव्हे तर विलायतेंतील व्यापारी व मध्यम प्रतीचे लोक यांस किफायतीचा व्यापार, धंदा किंवा नोकरी मिळण्यासहि आज हिंदु-

स्थानासारखें दुसरें साधन नाहीं. हिंदुस्थान ताब्यांत आहे म्हणूनच इजिप्त, अबिसीनिया, माल्टा, चीन किंवा आफ्रिका या ठिकाणीं हवें तेवढें विनखर्ची सैन्य इंग्लंडास गेल्या २० वर्षांत पाठवितां आलें. येवढें मोठें राज्य कायम कसें राखावें, रशिया, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांच्या ज्या चोहोंकडे खटपटी आणि उलाढाली चालू आहेत त्यांशीं प्रसंग पडल्यास टक्कर देण्यास तयार कसें रहावें, हे किंवा अशाच प्रकारचे विचार नेहमीं व्हाइसरॉयसाहेबांच्या डोक्यांत घोळत असतात. आमच्या प्रजेची आबादानी हेंच आमचें सामर्थ्य असें जरी महाराणी सरकारच्या जाहिरनाम्यांत नमूद असलें तरी आमचे राज्यकर्ते प्रथम राज्याच्या संरक्षणाचे जे उपाय असतील तिकडेच लक्ष देत असतात. इराण, सयाम वगैरे देशांप्रमाणें हिंदुस्थानची स्थिति नाहीं. पश्चिमेकडे सिंधुनद, उत्तरेकडे हिमालय आणि पूर्वेकडे ब्रम्हपुत्रानद यांच्या दरम्यान राहून व त्यांतील प्रजेस संतुष्ट ठेवून स्वस्थपणें राज्य करण्याची आमच्या राज्यकर्त्यांची इच्छा नाहीं. त्यांची हांव यापेक्षांहि जास्त आहे, आणि त्या हांवेमुळें इतर युरोपियन राष्ट्रांच्या चळवळींचें आगाऊ निराकरण कसें करावें या खटपटींत ते नेहमीं चूर झालेले असतात. गेल्या २० वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास पाहिला तर ही गोष्ट पूर्णपणें नजरेस येईल; आणि आज जो आम्ही लेख लिहीत आहों त्यांत याच दृष्टीनें या प्रश्नांचा विचार करणार आहों.

गेल्या वर्षांत इंग्रज सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांत असणाऱ्या भागांतील लोकसंख्या २० कोटींची २३ कोटी झाली; आणि हिंदुस्थानचें उत्पन्नहि सन १८८१ सालीं सुमारें ७३॥ कोटी होतें तें आतां १०८ कोटी झालें आहे. ही वाढ कशी झाली याचें सविस्तर विवेचन येथें करणें शक्य नाहीं; तथापि त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी सांगून या प्रश्नाची दिशा कोणत्या प्रकारची आहे येवढें या लेखांत आम्ही दाखविणार आहों. सन १८८० सालच्या जून महिन्यांत लॉर्ड रिपन यांनीं जेव्हां हिंदुस्थानच्या कारभाराचीं राज्यसूत्रें हातांत घेतलीं तेव्हां हिंदुस्थानच्या उत्तर–पश्चिमेच्या सरहद्दीवर अफगाणिस्थानांत बरीच गडबड उडून गेली होती. इंग्रजसरकारचे वकील अमीर आपल्या दरबारीं घेईना म्हणून लॉर्ड लिटनसाहेबांनीं त्याच्याशीं तंटा उपस्थित करून युद्धास आरंभ केला होता, व त्या युद्धांत सर लुई केव्हेनरी यांची कत्तल झाल्यामुळें अफगाण लोकांचें त्याकरितां पारिपत्य करणें जरूर पडून हल्लींचे लॉर्ड रॉबर्टस् यांस तिकडे पाठविण्यांत आलें, व त्यांनीं आफगाण लोकांचा पुरा मोड केला होता. लॉर्ड लिटनसाहेब यांस येवढी भानगड उपस्थित करण्याची कांहीं जरूर होती असें नाहीं; परंतु अफगाणिस्थानचा अमीर स्वतंत्र नाहीं, रशिया आणि इंग्लंड या दोन बलाढ्य राष्ट्रांमध्यें टक्कर होऊं नये एवढ्याचकरितां अफगाणिस्थानचें संस्थान राखलें आहे, आणि अमिरानें नेहमीं इंग्रजांच्या तंत्रानेंच चाललें पाहिजे, अशी

लॉर्ड लिटन यांची समजूत होती, आणि त्या समजुतीचा पुरा अंमल करण्याकरितां ही लढाई त्यांनीं उपस्थित केली होती. परंतु लॉर्ड रिपन हिंदुस्थानांत आल्यावर त्या वेळीं लिबरल पक्षाची सरशी असल्यामुळें अबदुल रहिमानखान यास गादीचा मालक करून अयूबखानाचा मोड केला आणि सन १८८१ च्या एप्रिल महिन्यांत कंदाहार खालीं करून हिंदुस्थानचें सैन्य अफगाणिस्थानांत होतें तें परत बोलवलें. लॉर्ड रिपन साहेबांनीं अफगाणिस्थानासंबंधानें केलेली ही व्यवस्था अबदुल रहिमान वारला तरी अद्याप कायम आहे; व पुढेंहि अफगाणिस्थानच्या अमिरांशीं इंग्रजसरकार जर अशाच तऱ्हेचें विश्वासाचें वर्तन ठेवील तर ती कायम राहण्यास कांहीं हरकत नाहीं. हिंदुस्थानच्या अंतर्व्यवस्थेंत लक्ष घालण्यास लॉर्ड रिपन यांस जी फुरसत मिळाली तिचें खरें कारण अफगाणिस्थानासंबंधानें वर सांगितलेली व्यवस्था हें होय. परंतु लॉर्ड रिपन यांचे हे विचार त्यांच्याबरोबर लयास गेले. हिंदुस्थानांतील इंग्रजी लष्करी अमलदारांपैकीं पुष्कळ लोकांचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानच्या ज्या स्वाभाविक सरहद्दी आहेत त्यांत स्वस्थ बसून रशियाची किंवा फ्रान्साची एशियाखंडांतील चाल अगर उत्कर्ष स्वस्थपणें पहात बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. आज रशियाचा हिंदुस्थानावर जरी डोळा नसला तरी पुढें मागें अफगाणिस्थानांत किंवा इराणांत जर कांहीं गडबड झाली तर रशियाशीं, आणि पूर्वेच्या सरहद्दीवर म्हणजे ब्रह्मदेशांत कांहीं गडबड झाली तर फ्रान्साशीं इंग्लंडास सामना द्यावा लागेल. गेल्या कांहीं वर्षांच्या इतिहासावरून पाहतां तर चीन व इराण या देशांचाहि वरील वाक्यांत समावेश करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. हिंदुस्थानचें राज्य हिंदुस्थानवासी लोकांच्याच ताब्यांत असतें तर त्यांनीं काय केलें असतें, हें सांगण्याची कांहीं जरूर नाहीं. आजमित्तीस हिंदुस्थानचें राज्य इंग्रजसरकाराकडे आहे; आणि युरोपियन राष्ट्रांच्या चढाओढींत हिंदुस्थानांतील आपलें राज्य कायम राहावें इतकेंच नव्हे तर त्याची अभिवृद्धि होऊन रशियाच्या साम्राज्याप्रमाणें आपल्या साम्राज्याचाहि अधिकाधिक विस्तार व्हावा अशी इंग्रज लोकांची इच्छा असणें सगदीं स्वाभाविक आहे; मग ती इच्छा हिंदुस्थानांतील प्रजेच्या प्रत्यक्ष फायद्याची असो वा नसो तिकडे कोणी पहात नाहीं. इंग्रजी राज्याचें विलायत हें आदिपीठ तर खरेंच, पण हिंदुस्थान हा त्या साम्राज्याचा एशियाखंडांतील मेरू असून युरोपियन राष्ट्रांचीं एशियाखंडांतील सर्व कारस्थानें या मेरूभोंवतीं फिरावयास लावावीं ही महत्त्वाकांक्षा इंग्रजी मुत्सद्यांत पूर्णपणें वास करीत आहे, व गेल्या कांहीं वर्षांत म्हणजे लिबरल पक्ष पडल्यापासून अशा प्रकारच्या महत्त्वाकांक्षेस विशेष जोर येत चालला आहे. अशा स्थितींत लॉर्ड रिपन यांनीं घालून दिलेली पद्धत फार दिवस टिकली नाहीं, याचें कांहींच आश्चर्य नाहीं. रिपनसाहेबांच्या कारकीर्दीत अबदुल रहिमान यांस दिलेलें वचन

पुढें मोडतां आलें नाहीं, हें खरें पण सन १८८५ सालीं रशियन सेनापति कॅमराफ् यानें जेव्हां अफगाणिस्थानच्या सरहद्दीवरील पेंजडे गांव घेतलें तेव्हां रशियाचें व इंग्लंडाचें युद्ध होण्याची वेळ आली होती. पण अमिरानें पेंजडेवरील आपला हक्क सोडून दिल्यामुळें तें प्रकरण सलोख्यानें मिटून जाऊन तेव्हांच शांतता झाली. तथापि अफगाणिस्थान व इराण आणि अफगाणिस्थान व रशिया यांच्या दरम्यानची सरहद्द ठरवून देण्याच्या कामीं हिंदुस्थानसरकारनें पुढें बराच खर्च केला. रशियाचे भीतीचें एवढ्यानेंच निराकरण झालें असें नाहीं; तर सरहद्दीवरील किल्ले बळकट करणें आणि तेथें रेल्वे बांधणें या कामीं कोट्यावधि रुपयांचा चूर झालेला आहे. बलुचिस्थानास क्वेटा प्रांत जो सन १८८७ सालीं जोडला गेला आणि सन १८९५ सालीं चित्रळचें जें प्रकरण उपस्थित झालें त्यांतील बीजहि हेंच होय. चित्रळ प्रांताच्या अंतर्व्यवस्थेंत आपण होऊन पडण्याचें इंग्रजसरकारास कांहीं कारण नव्हतें; आणि लढाई आटपल्यावर अफगाणिस्थानांतून रिपनच्या कारकीर्दीत ज्याप्रमाणें सैन्य माघारें घेतलें त्याप्रमाणें चित्रळचीहि व्यवस्था करण्याबद्दल सन १८९५ सालीं सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं हुकूम दिला होता. पण या हुकुमाचा अंमल होण्यापूर्वीच विलायतेंत कान्सरव्हेटिव्ह पक्षाची सरशी झाल्यामुळें लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनीं पुन्हा तो हुकूम बदलून चित्रळामध्यें हिंदुस्थानचें सैन्य ठेवावें आणि तेथें कायमचा पोलिटिकल एजंट ठेवून व्यवस्था करावी, असा हुकूम दिला. हिंदुकुश पर्वतामधून हिंदुस्थानांत येण्यास जो मार्ग आहे तो या व्यवस्थेनें सुरक्षित ठेवतां येईल अशी आमच्या राज्यकर्त्यांची, निदान कान्सरव्हेटिव्ह पक्षाची तरी, समजूत आहे; व कदाचित् ती खरीहि असेल. पण या गोष्टीसाठीं कोट्यावधि रुपये खर्च करण्याइतकी तिची योग्यता आहे कीं नाहीं याबद्दल बराच वानवा आहे. लॉर्ड कर्झन यांनीं सरहद्दीवरील चित्रळ आणि बलुचिस्थान यांतील लहान लहान संस्थानांची व्यवस्था करण्याकरितां एक स्वतंत्र इलाखा करण्याची जी नुक्तीच योजना केली आहे ती याच तत्वावर होय. यावरून उत्तर–पश्चिमेकडील सरहद्दीवर बंदोबस्ताचें धोरण पुढें कसें काय राहील याचा आपणास सहज अजमास करितां येतो. परंतु आमच्या सरकारास केवळ रशियाचाच बंदोबस्त करावयाचा आहे असें नाहीं. लॉर्ड रिपन यांच्यामागून येणारे लॉर्ड डफरिन यांनीं आपल्या कारकीर्दीत एक मोठा प्रांत हिंदुस्थानास जोडून इंग्रजी साम्राज्याची मर्यादा इरावती नदीच्याहि पलीकडे नेऊन टाकली. दक्षिण ब्रह्मदेश हिंदुस्थानच्या ताब्यांत यापूर्वीच आलेला होता आणि वास्तविक पाहिलें तर थिबाराजास अबदुल रहिमानप्रमाणें पूर्वेच्या सरहद्दीवर म्हणजे उत्तर ब्रह्मदेशांत राज्य करूं देण्यास कांहीं हरकत नव्हती, पण क्षेत्रफळानें मुंबईइलाख्याहून जास्त विस्ताराचा मुलुख कदाचित् फ्रेंचांच्या ताब्यांत जाण्यापूर्वीच आपल्या ताब्यांत

घेणें चांगलें, या तत्वावर थिबाराजास हिंदुस्थानसरकारच्या शर्ती कबूल असतांहि मंडालेंतून काढून रत्नागिरीस नेलें आणि हिंदुस्थानसरकारच्या हुकुमानें उत्तर ब्रह्मदेश म्हणजे जवळ जवळ मुंबईइलाख्याइतका नवा मुलूख हिंदुस्थानच्या राज्यास जोडण्यांत आला ! लॉर्ड डफरिन हे यवढींच शिकार साधून राहिले नाहींत. पूर्वेकडील सरहद्दीवर फ्रेंचांची आणि पश्चिमेकडील सरहद्दीवर रशियाची भीति, ते ते मुलूख हिंदुस्थानांत सामील करण्यास निमित्तमात्र तरी झालेली होती; पण उत्तरेकडील सरहद्दीवर नेपाळ आणि भूतान यांच्या दरम्यान असलेलें सिकीमचें संस्थान नाहींसें करण्यास तशा प्रकारचेंहि कांहीं कारण नव्हतें. तिबेट-तील लामा किंवा चीनचे बादशहा यांचा जर कांहीं सिकीमवर अंमल असला तर तो निवळ नावांचा होता. पण तोहि हिंदुस्थानसरकारास न खपून सिकीम प्रांतावर लढाई करून हिंदुस्थानसरकारनें त्यावर आपलें पूर्ण स्वामित्व स्थापित केलें. लॉर्ड लॅंडस्डाउन यांच्या कारकीर्दींत झालेली चीन–लुशईवरची मोहीम किंवा लॉर्ड एलगिन यांच्या कारकीर्दींतली टिराची मोहीम हीं अशाच प्रका-रच्या राजनीतींचीं फळें होत. २० वर्षांपूर्वीं जो हिंदुस्थानदेश होता तो आतां राहिला नाहीं. त्याची सरहद्द पूर्वेकडे चीन आणि फ्रान्स यांस जाऊन मिळाली आहे; आणि पश्चिमेकडे बलुचिस्थानांतून आणि चित्रळमधून अफगाणिस्थानास पोटांत घेऊन ती हिरात येथें मिळते कीं काय अशी शंका येऊं लागली आहे. उत्तरेच्या बाजूस हिमालय ही स्वाभाविकच शत्रूस अगम्य अशी सरहद्द आहे; पण या सरहद्दीपलीकडील राष्ट्रांनीं या सर-हद्दीच्या दक्षिणेस कोणताहि हक्क सांगणें आपल्यास हितकारक नाहीं, या सम-जुतीवर सिकीम हिंदुस्थानसरकारानें आपल्या ताब्यांत घेतलें आहे, आणि काश्मीर जरी ताब्यांत घेतलें नाहीं तरी त्याची स्वतंत्रता कमी केली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही राज्यतृष्णा पुढें कोठपर्यंत जावयाची. नेपाळसारखें एखादें राज्य स्वतंत्र राहिलें असल्यास तें तीस बळी पडावयाचें कीं काय, हिंदुस्थानचें राज्य इतकें अवाढव्य रीतीनें वाढवण्यास लागणारा खर्च कसा व कोठून निघणार आणि यापासून हिंदुस्थानच्या प्रजेचें कांहीं हित होण्याचा संभव आहे कीं काय हे प्रश्न प्रजेच्या दृष्टीनें तरी फार महत्त्वाचे आहेत. पण हिंदुस्थानसरकारानें त्यांचा फारसा विचार केल्याचें आढळून येत नाहीं. हिंदु-स्थानच्या राज्याची मर्यादा अशा तऱ्हेनें वाढविण्यास किती खर्च लागतो याची कल्पनाहि फारच थोड्या लोकांस असेल. १८८५ सालीं जेव्हां उत्तर ब्रह्मदेश हिंदुस्थानास जोडण्यांत आला. तेव्हां हिंदुस्थानचें सैन्य १०००० गोरे व २०००० काळे शिपाई ठेवून वाढविण्यांत आलें; इन्कम् टॅक्स पुनः बसविला; आणि तेव्हांपासून आतांपर्यंत दरसाल सरहद्दीवरील लष्करी कामाकरितां लक्षावधि रुपये खर्च होत आहेत. ब्रह्मदेश, माणिपूर, वगैरे लढायांसाठीं तर ८।१०

कोट रुपये खर्च झालेले आहेत, आणि दरसालच्या लष्करी खर्चाचें मान पाहिलें तर सन १८८१।८२ सालीं लष्कराप्रीत्यर्थ सुमारें १७ कोटींचा जो खर्च होता तो आतां २५।२६ कोट रुपयांपर्यंत वाढत गेलेला आहे. यांखेरीज लढाईच्या किंवा इतर प्रसंगीं जें कर्ज काढलें त्याचें व्याज आणि हुंडणावळीचा भाव उतरल्यानें हुंडणावळीप्रीत्यर्थ होणारा खर्चहि अनावर वाढलेला असून दरसाल हें ओझें अधिकाधिकच होत आहे. वरें एवढ्या मुदतींत हिंदुस्थानचें वार्षिक उत्पन्न वाढलें नाहीं असें नाहीं. हिंदुस्थानसरकाराचा सालीना वासूल २० वर्षांपूर्वीं सुमारें ७३॥ कोट होता तो आतां १०८ कोटी झाला आहे. म्हणजे दरसाल ३५ कोट रुपये आजामित्तीस जास्त उत्पन्न होत आहेत; पण आमच्यावर राज्य करणाऱ्या मुत्सद्यांची किंवा लष्करी अधिकाऱ्यांची राजतृष्णा इतकी कांहीं अनावर आहे कीं, जमाबंदीची वर दाखविलेली वाढ त्यांच्या खर्चास पुरेनाशी झाली आहे, व ते आतां जर अधिक चळवळ करीत नसले तर तिचें कारण केवळ पैशाची अडचण होय. अगदीं रानटी लोकांबरोबर जरी लढाई करावयाची असली तरी ती पैशाच्या मदतीखेरीज होत नाहीं, हें चित्रळच्या मोहिमेवरून आतां स्पष्टपणें अनुभवास आलें आहे. त्यांतून प्रतिपक्षांजवळ जर नवीन शास्त्रीय युद्धसामुग्री असली तर लढाई संपण्यासहि वराच अवकाश लागतो, हें बोअर लोकांशीं चाललेल्या लढाईनें सिद्ध होत आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानसरकार राज्यतृष्णेनें भांबावून जाऊन हिंदुस्थानचें दिवाळें निघेपर्यंत राज्य अधिकाधिक वाढविण्याची आपली हौस पुरी करून घेणार, किंवा प्रतिवर्षी वाढत जाणारा जमाबंदीचा वसूल हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति सुधारण्याकडे लावणार हा एक मोठाच प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचा निकाल आमच्या मतावर अवलंबून नाहीं, हें आम्हांस माहीत आहे. कारण आपलें राज्य सुरक्षित ठेवून कायम राखणें किंवा वाढविणें याबद्दल जिंकलेल्यांचें मत घेणारे राज्यकर्ते क्वचितच सांपडतात. तथापि २० वर्षांच्या इतिहासाचें जेव्हां परीक्षण करावयाचें तेव्हां वरील प्रश्नासंबंधानें राज्यकर्त्यांच्या विचारांची व कृतीची दिशा कशी आहे हें दाखविणें जरूर आहे, व तशाच दृष्टीनें आजचा लेख लिहिला आहे. तात्पर्य गेल्या २० वर्षांच्या इतिहासावरून या बाबतींत जर शिकण्यासारखी कांहीं गोष्ट असली तर ती हीच कीं रशिया असो किंवा इंग्लंड असो कोणीहि आपल्या सरहद्दीवरील लहानसान संस्थानाची किंवा निर्बल स्वतंत्र देशाची आपल्या राज्यतृष्णेस यथाशक्ति आहुति दिल्याखेरीज राहत नाहीं. हिंदुस्थानचें राज्य अटक आणि ब्रह्मपुत्रा या मर्यादा सोडून पलीकडे गेलेंच आहे, आणि हल्लीं इराण व चीन यांसंबंधें जी गडबड ऐकूं येते त्यामुळें " पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदंडः ॥ " या कालिदासाच्या वचनाप्रमाणें तें थोडक्याच वर्षांत पूर्वपश्चिम समुद्रगामी होतें, किंवा युरोपियन राष्ट्रांची जी

अश्रांत चळवळ व परस्परांमधील चढाओढ चालू आहे त्या चढाओढींत त्यास २० व्या शतकांत दुसरें कांहीं स्वरूप येतें, येवढेंच पाहणें आहे.

* * *

* हिंदुस्थानची अंतर्व्यवस्था

हिंदुस्थानचें साम्राज्य कायम राखण्यास हिंदुस्थानच्या सरहद्दीवर कोणच्या प्रकारची कडेकोट तयारी गेल्या वीस वर्षांत चालविली आहे, इंग्रजी व नेटिव्ह सैन्य किती वाढविलें आहे, आणि त्याजबरोबरच रशियाच्या किंवा फ्रान्सच्या भीतीनें सरहद्दीवरील मुलूख आमचे राज्यकर्ते कोणत्या रीतीनें तांबड्या रेघेच्या मर्यादेंत ओढीत आहेत, याचें गेल्या अंकांत थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे. कोणीहि व्हाइसरॉय हिंदुस्थानांत येवो त्याचें पहिलें कर्तव्य हिंदुस्थानची सरहद्द सुरक्षित ठेवणें हें होय; व तो सुरक्षितपणा प्रजेच्या दृष्टीनें नव्हे तर राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें योग्य व नीट बंदोबस्ताचा असला पाहिजे. असा बंदोबस्त करण्यांतच आमचे कोट्यावधि रुपये खर्च होत आहेत, आणि या खर्चाखालीं व इंग्रजी व्यापाऱ्यांच्या स्वारीखालीं आम्ही हिंदुस्थानांतील प्रजा अगदीं दीन होत चाललों आहों. हिंदुस्थानचें राज्य म्हणजे एकीकडे चीन आणि एकीकडे इराण अशा प्रकारची मर्यादा होऊन तें आतां इतकें अवाढव्य वाढलें आहे कीं, त्यास हिंदुस्थान म्हणण्यापेक्षां 'एशियांतील इंग्रज लोकांचें साम्राज्य' हें नांव अधिक चांगलें शोभेल; आणि या साम्राज्याच्या गाड्यावरोवर हिंदुस्थानचा नळा चालविला असल्यामुळें आम्हांस आमच्या फायद्याची अशी कांहीं स्वतंत्र गोष्ट करतां येणें अशक्य झालें आहे. आमच्या सरहद्दीपलीकडील शत्रूपासून आमचें संरक्षण होणें जरूर आहे, पण त्यासाठीं आमचे राजे पूर्वपश्चिम समुद्रापर्यंत जी सारखी धांव घेत आहेत ती स्वतःच्या इभ्रतीकरितां, डौलाकरितां व फायद्याकरितां आहे, आमच्या हिताकरितां तव्हे हें गेल्या २० वर्षांच्या इतिहासावरून उघड होतें.

हिंदुस्थानचें परचक्रापासून संरक्षण करणें हें जितकें महत्त्वाचें काम आहे तितकेंच हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत धंगेधोपे न होतां नेहमीं शांतता ठेवणें हें होय; आणि त्याकरितां नेहमीं प्रयत्न करणें किंवा डोळ्यांत तेल घालून पाहणें हें शहाण्या राज्यकर्त्यांचें काम आहे. हिंदुस्थानांत आजपर्यंत जे सार्वभौम राजे झाले त्या सर्वापेक्षां इंग्रजसरकार असल्या कामीं विशेष धूर्त आहे, हें आम्ही सांगावयास

---

* [केसरी ता. ४ मार्च १९०२]

नको. कोणताहि देश एकदां आपल्या हस्तगत झाला असतां तो कायमचा आपल्या कबजांत कसा राहील आणि त्यासाठीं काय काय तजविजी योजल्या पाहिजेत हें परकीय राजाच्या राजनीतीपैकीं प्रधान अंग होय. दरबारी भाषेंत बोलावयाचें असल्यास हिंदुस्थानचें राज्य हिंदू लोकांच्या हिताकरितां चालविलें आहे, व हल्लींपेक्षां दुसरें चांगलें राज्य हिंदुस्थानास कधींहि मिळणार नाहीं, असें नेहमीं सांगण्यांत येतें; व आमच्यांतील कांहीं मंडळीस ही गोष्ट खरी वाटते. पण वास्तविक स्थिति अगदीं निराळी आहे. परचक्राची भीति बाजूला ठेवली आणि देशांतील लोकांपासून राज्यकर्त्यांस कोणत्या प्रकारची भीति आहे याचा विचार केला, तर असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील नेटिव्ह सैन्य, नेटिव्ह संस्थानें आणि इतर सामान्य प्रजा या तीन वर्गांचा आपणास विचार केला पाहिजे. हे तिन्ही वर्ग जर इंग्रजसरकारच्या राज्यास राजी असले तर तें चिरस्थायी होण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. आणि जे जे व्हाइसरॉय हिंदुस्थानांत येतात त्या सर्वांस या तिन्ही गोष्टींचा विचार करून व्यवस्था लावावी लागते. सन १८५७ सालीं नेटिव्ह पलटणी उलटल्यामुळें जो भयंकर प्रसंग गुदरला तसा पुन्हां गुदरूं नये याकरितां ज्या कांहीं तजविजी करावयाच्या त्या सर्व आतां बहुतेक पुऱ्या झाल्या आहेत. नेटिव्ह सैन्याची संख्या इंग्रजी सैन्याच्या दुपटीपेक्षां अधिक असूं नये, असा नियम हल्लीं अमलांत असून जातीजातीच्या स्वतंत्र पलटणी केल्यानें निरनिराळ्या पलटणींची एकी होण्याचा संभव बराच कमी झाला आहे. नेटिव शिपायांजवळ कोणत्या प्रकारचीं हत्यारें असावीं, नेटिव लष्करी अंमलदार कोणत्या जातीचे व दर्जाचे असावे, आणि त्यांस शिक्षण कोणत्या प्रकारचें असावें वगैरे गोष्टींचा निकालहि वर सांगितलेल्या तत्त्वांवरच केलेला आहे. हीं तत्वें इतर गोष्टींप्रमाणें स्पष्ट रीतीनें कोणी सांगत नाहीं पण बारीक विचार करणारांस तीं सहज कळून येण्यासारखीं आहेत. एका देशानें दुसऱ्या देशावर कसें राज्य करावें हा राजनीतीच्या शास्त्रांतील एक स्वतंत्र भाग आहे; आणि रोमन, ग्रीक आणि मोंगल यांच्या इतिहासावरून या बाबतींत जो काहीं घेण्यासारखा धडा आहे तो सर्व आमच्या राज्यकर्त्यांनीं घेतला आहे. हा विचार केवळ नेटिव्ह सैन्यासंबंधानेंच नव्हे तर एतद्देशीय प्रजेसंबंधानेंहि तो सारखाच लागूं पडतो. हिंदु लोकांनीं आपापसांत भांडून मारामाऱ्या करूं नयेत म्हणून त्यांस आम्हीं हत्यारें देत नाहीं हें म्हणणें शुद्ध दरबारी थाटाचें आहे; किंवा ही एक प्रकारची व्याजोक्तीच आहे, असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानची प्रजा निःशस्त्र झाल्यानें त्यानीं केव्हांहि कांहीं गडबड केल्यास पांचपन्नास रायफल्नीं त्यांचा बंदोबस्त करितां येईल अशी स्थिति आज आहे खरी; पण राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें जरी ही स्थिति योग्य असली तरी लोक निःशस्त्र झाल्यानें चोर किंवा दरवडेखोर अगर हिंस्र पशू यांपासूनहि त्यांस आपलें संरक्षण करणें दुर्घट झालें आहे. आणि एकंदरींत लोकांमधील लष्करी बाणा व

उमेद कमी होत चालली असून ते हतवीर्य होत चालले आहेत, हें लक्ष ठेवलें पाहिजे. सर्व प्रजा अशा रीतीनें हतवीर्य असणें हें राज्यकर्त्यांस सकृद्दर्शनीं जरी हितावह वाटलें तरी परिणामीं त्यांच्या गळ्यांत ही एक धोंडच आहे किंवा होईल हें सांगावयास नको. शस्त्रें असणाऱ्या लोकांचें संरक्षण करण्यास जितकें पोलीस लागतें त्यापेक्षां निःशस्त्र लोकांचें संरक्षण करण्यास अधिक पोलीस पाहिजे. पण आमच्या राज्यकर्त्यांजवळ जास्त पोलीस ठेवण्यास पैसे नाहींत आणि वरील कारणाकरितां लोकांसहि ते शस्त्रें देण्यास तयार नाहींत, अशी स्थिति हळुहळु येऊन ठेपली आहे. हिंदुस्थानांतील लोकांस अशा रीतीनें निर्बल व परकीयांवर सर्वदा अवलंबून असणारे करून सरकार थांबलें आहे असें नाहीं, तर सरकारचीच व्यवस्था लोकांस गोड वाटावी व त्याबद्दल लोकांनीं सरकारचे नेहमीं आभार मानून स्वस्थ बसावें या हेतूनें प्रजेपैकीं कांहीं ठळक गृहस्थांस अमिष दाखवून सरकारचे तरफदार बनविण्यांत येतें आणि सरकारच्या राजनीतीचीं तत्वें लोकांस समजून सांगणारे लोक राजद्रोहाच्या भयंकर आरोपास पात्र होतात. एरवीं निःशस्त्र झालेल्या प्रजेच्या हातून राज्याचें कांहीं एक वांकडें व्हावयाचें नाहीं हें शहाण्यासुर्त्या राज्यकर्त्यांस कळूं नये असें नाहीं व कळत नाहीं असेंहि नाहीं. पण जी राजनीति आपण अंगिकारिली आहे ती शेवटपर्यंत एका धोरणानें तडीस नेण्याचा इरादा असल्यामुळें हे प्रकार घडून येतात. आम्हांस किंवा आमच्या लोकांस मात्र ते नीट कळत नाहींत किंवा कळले तरी त्याचा नीट उमज पडत नाहीं हें आमचें दुर्दैव होय. हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या आंतील शांतता कायम राखण्याच्या निमित्तानें ज्या ज्या गोष्टी गेल्या २० वर्षांत घडल्या त्यांपैकीं बहुतेकांचें धोरण वर लिहिल्याप्रमाणेंच आहे; मग सरकारापुढील प्रश्न हत्यारांच्या कायद्याचा असो किंवा राजद्रोहाच्या कायद्याचा असो. "बहुतेक" म्हणण्याचें कारण एवढेंच कीं लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत हें धोरण जरा निराळें होतें. हिंदूलोकांस पाश्चिमात्य शिक्षण जर देणें असेल तर त्यांजबरोबरच त्यांस स्थानिक स्वराज्याचेहि हक्क दिले पाहिजेत, व लॉर्ड लिटन यांच्या कारकीर्दींत झालेले प्रेसॲक्टासारखे कायदे रद्द केले पाहिजेत, अशा समजुतीनें तेव्हां राज्यकारभार चालला होता. आणि गेल्या अंकीं सांगितल्याप्रमाणें अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानचें सैन्य परत बोलावून सरहद्दीबाहेरील प्रांतांसंबंधें हिंदुस्थानसरकारचें धोरणहि बदललें होतें पण लॉर्ड रिपन गेल्यानंतर हळूहळू ती स्थिति पालटत जाऊन प्रेसआक्टाच्या ऐवजीं राजद्रोहाचा कायदा आमच्यावर लादला गेला आहे आणि स्थानिक स्वराज्याचे किंवा ज्यूरीचें वगैरे जे थोडेसे हक्क लोकांस दिलेले होते तेहि कमी होत चालले आहेत. लॉर्ड डफरिन् हे प्रथमतः राष्ट्रीयसभेस अनुकूल होते; पण अखेरीस अखेरीस त्यांचें मत बदलून जाऊन त्यांनीं या सभेविरुद्ध एके

ठिकाणीं भाषणहि केलें होतें. शिक्षणासंबंधानेंहि तोच प्रकार नजरेस येतो. इंग्रजी शाळांतून आम्हांस मिळणाऱ्या शिक्षणामुळें आमची महत्त्वाकांक्षा वाढते ही गोष्ट सरकारच्या नजरेस आली आहे, आणि या शिक्षणापासून होणारे अशा तऱ्हेचे परिमाण कशा रीतीनें काढून टाकतां येतील याबद्दलहि चर्चा सुरू आहे. सारांश २० वर्षांपूर्वीं लॉर्ड रिपन यांनीं सुरू केलेली या बाबतींतील राज्यनीति आतां अगदीं पालटून जाऊन प्रजा केवळ निःशस्त्रच नव्हे तर सर्व प्रकारें राज्यकर्त्यांवर अवलंबून राहील अशा प्रकारचें राज्यव्यवस्थेचें धोरण होत चाललें आहे.

सरहद्दीच्या आंतील शांतता कायम राखण्याकरितां ज्या गोष्टींचा विचार केला पाहिजे त्यांपैकींच एतद्देशीय संस्थानें ही होय. सन १८५७ सालीं शिपायांनीं मोठी धामधूम केली तरी झांशीच्या राणीखेरीज कोणीहि नांव घेण्यासारखे संस्थानिक त्यांस मिळाले नव्हते; आणि वास्तविक पाहतां या उदाहरणावरून एतद्देशीय संस्थानिकांस अधिक विश्वासानें बागविण्यास कांहीं हरकत नव्हती. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य चालविण्याचें जें शास्त्रीय धोरण आहे त्याप्रमाणें पाहतां प्रजेप्रमाणें संस्थानिकांस किंवा बड्या आणि धनवान गृहस्थांस दुर्बल करणें हेंहि या राजनीतीचें एक तत्व आहे; आणि या तत्वास अनुसरून संस्थानिकांशीं वरिष्ठ सरकारची गेल्या वीस वर्षांत वागणूक झालेली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिलें तर एतद्देशीय संस्थानिक हे इंग्रजांच्या पूर्वी हिंदुस्थानांत जीं राज्यें होतीं त्यांचें निरनिराळ्या कारणांमुळें शेष राहिलेले भाग होत; व पहिल्यानें झालेल्या तहनाम्याप्रमाणें हे संस्थानिक बहुतेक स्वतंत्र असावे. पण तशी स्थिति आतां उरली नाहीं. लॉर्ड रिपन येण्यापूर्वीच मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत करण्यांत आलें होतें व तेव्हां त्याबद्दल बराच गवगवाहि झाला होता. पण गेल्या वीस वर्षांत भरतपूर, मणिपूर, झालावर, काश्मीर, पन्ना वगैरे संस्थानांची जी स्थिति झालेली आपण पाहतों त्यावरून एतद्देशीय संस्थानिकांचें स्वातंत्र्य उत्तरोत्तर किती नष्ट होत चाललें आहे याची सहज कल्पना येईल. नेटिव्ह राजांचीं सैन्यें म्हणजे बाजारबुणग्यांपेक्षांहि कमी योग्यतेचीं होत. कोणाहि राजास हत्यारें पाडण्याचा किंवा दारूगोळा करण्याचा हक्क राहिलेला नाहीं; व जुन्यासान्या तोफा कोणाजवळ असल्या तर त्याहि प्रसंग येईल तेव्हां फोडून टाकण्यांत येतात. अशा रीतीनें एतद्देशीय संस्थानिकांची स्थिति अशी कांहीं होऊन गेली आहे कीं, त्यांच्या हातून इंग्रजी राज्यांतील शांततेचा भंग होणें कधींहि संभवनीय नाहीं. म्हैसूर संस्थान ग्लॅडस्टनसाहेबांनीं सोडलें खरें, पण त्यावर सार्वभौम सरकारच्या कारभाराचें वरेंच ओझें लादलेलें असल्यामुळें व इतर निर्बंधहि त्यास सारखेच लागू असल्यामुळें या कृत्यापासून संस्थानास फारसा फायदा झालेला नाहीं. परंतु हा फायदा मानला तरी म्हैसूर सुटलें त्याच्या भरीस वऱ्हाड गेलें अशी स्थिति आहे. सन १८५७ सालीं ज्या संस्था-

निकांनीं इंग्रज सरकारास मदत केली, व ज्या मदतीमुळें ग्वाल्हेरसारखा किल्लाहि परत देणें भाग पडलें, ते वजनदार संस्थानिक गेल्या २० वर्षांत नाहींसे होऊन त्यांच्या जागा लहानपणी इंग्रजी शिक्षकांच्या हाताखालीं तयार झालेल्या तरुण संस्थानिकांनीं भरत चालल्या आहेत. सारांश, हिंदुस्थानांतील प्रजेप्रमाणेंच हिंदुस्थानांतील संस्थानिकहि जितके परावलंबी होतील तितके करण्याचा हिंदुस्थासरकारचा मानस असून त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील राज्याच्या अंतर्व्यवस्थेचें गेल्या २० वर्षांचें धोरण ठेवण्यांत आलें आहे. मि. टप्पर व सर वि. लीवार्नर यांनीं नेटिव संस्थानसंबंधें जीं दोन पुस्तकें लिहिलीं आहेत तीं वाचलीं असतां हिंदुस्थानसरकारचें एतद्देशीय संस्थानांसंबंधाचें धोरण वाचकांचे लक्षांत येईल. २० वर्षांपूर्वीं या गोष्टी राज्यकर्त्यांच्या मनांत असल्या तरी लोकांस पूर्णपणें समजलेल्या नव्हत्या. गेल्या २० वर्षांत ही स्थिति पालटली आहे आणि आमचे संस्थानीकच नव्हेत तर मोठमोठे जमीनदार किंवा सरंजामदार यांसहि अधिकाधिक इंग्रजसरकारावर अवलंबून रहाणारे करण्याचा प्रयत्न एकसारखा चालू आहे. सन १८६२ सालीं मिळालेल्या दत्तकाच्या सनदांचा अर्थ फिरवून संस्थानिकांच्या पश्चात त्याच्या वायकोस दत्तक घेण्याचा अधिकार न देणें, साम्राज्याच्या फायद्याकरितां इंपिरियल सर्व्हिस म्हणून युरोपियन अंमलदारांच्या अधिकाराखालीं नेटिव्ह संस्थानिकांच्या नांवानें सैन्य तयार करणें, राजपुत्रांना पहिल्यापासूनच इंग्रजी शिक्षकाच्या ताब्यांत देणें, एखाद्या संस्थानांत एखाददुसरें समुद्रकांठचें बंदर असल्यास तें घेऊन समुद्राशीं त्याचा संबंध तोडून टाकणें, संस्थानिकांस पदच्युत करण्याचा अधिकार घेणें व बजाविणें, इत्यादि गोष्टी वर सांगितलेल्या तत्वावरूनच निघालेल्या आहेत. संस्थानिकांचा या कामीं दोष नसेल असें आम्ही म्हणत नाहीं. आजचा लेख संस्थानिकांचे दोष दाखविण्याकरितां लिहिलेला नाहीं, तर सरहद्दीच्या बाहेर व आंत शांतता कायम राखण्याकरितां इंग्रजी राज्यकर्त्यांनीं जी तजवीज चालविली आहे व जें धोरण ठरविलें आहे त्याचें आपणांस परीक्षण करावयाचें आहे आणि तशा रीतीनें परीक्षण केलें असतां राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें काळ्या लोकांचें सैन्य, हिंदुस्थानांतील प्रजा आणि हिंदुस्थानांतील संस्थानिक किंवा जमीनदार ह्यांस गेल्या २० वर्षांत बहुतेक पूर्णपणें निरुपद्रवी बनविण्यांत आलें आहे असें आढळून येईल. सरकारच्या दृष्टीनें हा परिणाम चांगला असेल, पण राष्ट्राच्या दृष्टीनें आणि दूरदर्शीपणानें पाहिलें तर ही स्थिति इष्ट नाहीं. सर्व सुरळित व्यवहार चालला आहे तोंपर्यंत ठीक आहे, पण युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांमध्यें जी चढाओढ चाललेली आहे ती ज्यावेळीं निकरास येईल तेव्हां अशा रीतीनें मृतप्राय केलेल्या हिंदुस्थानचें इंग्लडच्या गळ्यांतील ओझें इंग्लंडास असह्य नाहीं, तरी अडचणीचें झाल्याखेरीज राहणार नाहीं. इंग्रजी साम्राज्यांत इंग्रजी व वसाहतीचा

जसा समावेश झाला आहे व त्यांस जे हक्क मिळालेले आहेत त्याच रीतीनें हिंदुस्थानचाहि राज्यकारभार चालविणें शक्य आहे इतकेंच नव्हे तर तो तसाच चालवावा अशी हिंदुस्थानच्या सुशिक्षित प्रजेची इच्छा आहे. आम्ही ज्या २० वर्षांच्या इतिहासाचें सिंहावलोकन करण्याचें योजलें आहे त्या काळाच्या आरंभीं म्हणजे लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचें धोरण कांहीं अंशीं अशा प्रकारचें होतें. पण तें पालटून जाऊन हिंदुस्थानचें परचक्रापासून रक्षण करण्यास सरहद्दीवरील लहानमोठीं संस्थानें कबजांत घेऊन वाटेल तेवढा खर्च झाला तरी सरहद्द वाढवणें, आणि सरहद्दीच्या आंतील शांतता कायम राखण्यास हिंदुस्थानांतील प्रजा किंवा हिंदुस्थानांतील संस्थानिक यांस निर्बल करणें, हेच उपाय आजमित्तीस अमलांत आहेत. अशा विचाराच्या मुत्सद्यांची इंग्लंडांत सध्यां सरशी झालेली आहे व ती सरशी जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत राज्यव्यवस्थेचें हें धोरण पालटण्याचा संभव नाहीं. त्यांतलें त्यांत आशा म्हणून एवढीच कीं चक्रनेमिन्यायानें ही स्थिति केव्हांना केव्हां तरी पालटली पाहिजे, आणि गेल्या २० वर्षांत ज्याप्रमाणें रद्द झालेल्या प्रेस ॲक्टाच्या ऐवजीं नवीन राजद्रोहाचा कायदा आला त्याचप्रमाणें हा नवीन कायदाहि जाऊन पुढील २० वर्षांत हिंदुस्थानचा राज्यकारभार अधिकाधिक दूरदर्शीपणाच्या व औदार्याच्या तत्वावर चालण्याचा संभव आहे. २० वर्षें हीं राष्ट्राच्या इतिहासांत कांहींच नाहींत हें आम्ही मागेंच सांगितलें आहे. करितां गेल्या २० वर्षांत आमची पीछेहाट झाली, असें म्हणून उदासीन होण्यांत कांहीं अर्थ नाहीं. राष्ट्रीयदृष्ट्या आमची स्थिति आज इतकी निकृष्ट आहे कीं, ती यापेक्षां जास्त निकृष्ट होणें अशक्य आहे; आणि कालचक्राच्या फेऱ्यांत केव्हांना केव्हां तरी ती आतां वर आलीच पाहिजे अशी आमची खात्री आहे.

❋ ❋ ❋

* ११० कोट रुपया कसा उडतो !

गेल्या खेपेस हिंदुस्थानच्या १९०२–०३ सालच्या जमाखर्चाच्या अंदाजपत्रकांतील जमेच्या बाजूचें थोडेंसें परीक्षण करून एकंदर अंदाजी जमा १११ कोट ५५ लक्ष व खर्च ११० कोट ३० लक्ष रुपये होईल असें लिहिलें होतें. म्हणजे पुढील सालीं शिल्लक सुमारें १ कोट २५ लक्ष रुपये राहतील असा सरकारचे फडणीस सर एडवर्ड लॉ यांनीं अंदाज केलेला आहे. परंतु सर एडवर्ड लॉ यांचें आणखी असें म्हणणें आहे कीं, ही जी १। कोटी रुपये शिल्लक दाखविली यापेक्षां पुष्कळ जास्त शिल्लक राहिली असती; परंतु २ कोट रुपये साऱ्याच्या तहकुबीची सूट दिली त्यामुळें, पांढरीचा कर कमी केला त्यासाठीं ७० हजार, प्रांतिक सरकारास शाळाखातें वगैरेकरितां दिलेले ९० लक्ष, खेडेगांवांतील विहिरी वगैरे सुधारण्याकरितां दिलेले २५ लक्ष, आणि पटवारी सेस कमती केला त्याकरितां २३ हजार, मिळून एकंदर सुमारें ३ कोटी १४ लक्षांची रक्कम खर्चीं पडल्यामुळें शिल्लक कमी झाली. ही रक्कम खर्चीं पडली नसती तर एकंदर शिल्लक निदान ४॥ कोट रुपये झाली असती. हिंदुस्थान दुष्काळाच्या कचाटांत सांपडून उत्तरोत्तर भिकार होत चाललें असतां हिंदुस्थान सरकारच्या जमाखर्चांत चार चार पांच पांच कोटींची शिल्लक राहावी आणि या शिलकेच्या आधारावर हिंदुस्थानच्या जमाबंदीची स्थिति आबादानीची आहे अशी सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस ओरड करण्याची संधी मिळावी यांतील खरें इंगित काय आहे, असा विचारी मनुष्यास सहजी प्रश्न उत्पन्न होतो. परंतु या प्रश्नाचें उत्तर देणें फारसें कठिण नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं जेव्हां रुप्याचा भाव उतरून रुपयाची किंमत कमी झाली तेव्हां विलायतेस जे ४५ कोट रुपये पाठवावे लागतात त्यावरील वाढती हुंडणावळ आणि इकडील युरोपियन अधिकाऱ्यांस देऊं केलेली हुंडणावळाई मिळून दहा पांच कोट रुपये हिंदुस्थान सरकारास जास्त उत्पन्न करावे लागले, व ते निरनिराळ्या रीतीनें कर वाढवून हिंदुस्थानसरकारनें वसूल केले; परंतु हुंडणावळीचा भाव आतां उतरून गेला आहे व गेलीं एक दोन सालें दुष्काळाचीं गेलीं नसतीं तर चारपांच कोटीची शिल्लक यापूर्वीं कांहीं वर्षांपासूनच राहत आली असती. प्रो. गोखले यांनीं हा मुद्दा स्पष्टपणें कौन्सिलपुढें मांडला आहे, व गेल्या ४।५ सालचे आंकडे घेऊन असें सिद्ध केलें आहे कीं, हुंडणावळाई म्हणून युरोपियन लोकांस जी कोट्यावधि रुपयांची खिरापत वाटली तिच्यासाठीं एकदां जें करावें ओझें हिंदुस्थानसरकारानें वाढाविलें आहे तें अद्याप

---

*[केसरी ता. १ एप्रिल १९०२]

तसेंच कायम ठेवलें असल्यामुळें या चारचार पांचपांच कोटींच्या शिलका राहत आहेत. आणि सरकारास खरोखरच जर न्याय कर्तव्य असेल तर कराचें ओझें कमी करून, देश भिकार होत चालला असतां असल्या शिलका अंदाजपत्रकांत दाखविण्याचें सरकारानें बंद केलें पाहिजे. देशांमधील लक्षावधि लोक दुष्काळाच्या कासावर पोट भरीत असतां हिंदुस्थानसरकारानें वाढती शिल्लक दाखवावी हें निर्दयपणाचें काम होय अशा अर्थाचें प्रो. गोखले यांनीं प्रतिपादन केलें आहे. शिल्लक वाढत चालली आहे याबद्दल कोणाचाच वाद नाहीं; व ती हुंडणावळीचा भाव कमी झाल्यामुळें वाढली आहे हेंहि निर्विवाद आहे. परंतु ही वाढती शिल्लक अद्यापि कायमची समजतां येत नसल्यामुळें एखादा कर एकदम कमी करणें शाहाणपणाचें होणार नाहीं असें लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें आहे. हें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे; पण ७० हजार रुपयांचा पांढरीचा कर कमी करण्यापेक्षां इनकमटॅक्सची मर्यादा ५०० आहे ती १००० ची केली असती तर फार चांगलें झालें असतें असें अलाहाबादेचे राय ब. श्रीराम यांनीं सांगितलें. पांढरी कर देणारे एकंदर लोक अदमासें २२ हजार आहेत व ते ७० हजार रुपये कर भरीत असून ते सर्व मध्यप्रांतांतले आहेत परंतु इनकमटॅक्सचे आंकडे पाहिले तर एकंदर उत्पन्न १९० लक्षांपासून १९५ लक्षांपर्यंत असून त्यांपैकीं ३० पासून ३५ लक्ष रुपये दरसाल ५०० च्या वर आणि १००० च्या खालीं उत्पन्न आहे अशा सुमारें ३ लक्ष लोकांकडून वसूल होतात हे ३०–३५ लक्ष रुपये सरकारानें जर सोडले असते तर २२ हजारांच्या ऐवजीं ३ लक्ष लोकांचें कल्याण सरकारास करतां आलें असतें. सारांश, शिल्लक जर वाढत होती तर पांढरीचा कर कमी करण्यापेक्षां इनकमटॅक्सची यत्ता ५०० ची आहे ती १००० ची करणें लोकांस अधिक सुखावह झालें असतें असें राय ब. श्रीराम यांनीं सांगितलें. ऑ. श्रीराम यांची ही सूचना खरोखरच विचाराह होती, पण नॉन ऑफिशिअल सभासदांचीं जीं कौन्सिलमध्यें भाषणें होतात त्यापूर्वीच बहुतेक गोष्टी सरकारानें ठरवून टाकल्या असल्यामुळें या भाषणाचा अरण्यरुदनापेक्षां जास्त कांहीं उपयोग होत नाहीं. असो; सरकारनें आज जरी प्रांतीवरील किंवा मिळावरील कर कमी करण्याचें मनांत आणलें नाहीं तरी शिल्लक अशीच वाढत चालल्यास सरकारास लवकरच या गोष्टी कराव्या लागतील यांत संशय नाहीं.

सरकाराजवळ शिल्लक कां राहिली व तिचा कसा विनियोग करावयास पाहिजे होता हें वरील हकीकतविरून वाचकांचें लक्षांत येईल. आतां खर्चाच्या बाजूकडे वळूं. ११० कोट ३० लक्ष रुपये १९०२–०३ सालीं खर्च व्हावयाचे आहेत हें वर सांगितलेंच आहे. या रकमेपैकीं सुमारें २१।२२ कोट रुपये निरनिराळ्या प्रांतिक सरकारांमार्फत खर्च होतात. बाकी सुमारें ८८ किंवा ९० कोट

रुपये हिंदुस्थानसरकार आपण होऊन खर्च करतें. निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं किती व कसा खर्च करावा याबद्दल हिंदुस्थानसरकार व प्रांतिकसरकार यांच्या दरम्यान दर पांच वर्षांनीं नवा करार होत असतो; व तसे नवे करार यंदाच्या सालीं व्हावयाचे होते; पण दुष्काळ आणि प्लेग यांमुळें चोहोंकडे प्रांतिक सरकारांची ओढ झाली असल्यामुळें नवे पंचवार्षिक करार यंदाच्या सालीं न करतां पुढील सालापर्यंत हिंदुस्थानसरकारानें तहकूब ठेवले आहेत. मुंबई, मद्रास, बंगाल, मध्यप्रांत, वायव्यप्रांत, आसाम, पंजाब आणि ब्रह्मदेश मिळून आठ प्रांतांच्या प्रांतिक सरकारांबरोबर हिंदुस्थानसरकार पंचवार्षिक करार करीत असतें. कांहीं खर्चाच्या बाबी व कांहीं उत्पन्नाच्या बाबी प्रांतिक सरकाराकडे तोडून देऊन त्या बाबींचें उत्पन्न व खर्च दोन्ही प्रांतिक सरकारानें संभाळावे, हिंदुस्थानसरकारास त्याबद्दल तोशीस लागू देऊं नये असा करार असतो. एकंदर ११० कोटीपैकीं सुमारें २१-२२ कोटींची रक्कम अशा रीतीनें तोडून दिलेली असते; व त्यापैकीं मुंबई सरकारकडे सुमारें ४–४। कोट रुपये दिले आहेत. अशा प्रकारच्या जमाखर्चाच्या कांहीं बाबी तोडून दिल्यापासून असा फायदा होतो कीं, ज्या त्या प्रांतांतील सरकार प्रांतिक बाबींवरील खर्च कमी करून उत्पन्न वाढवितें. पण पुढें मौज अशी होते कीं, कोणत्याहि प्रांतिक सरकारानें अशा रीतीनें शिल्लक टाकली कीं, लागलीच हिंदुस्थानसरकारची त्याजवर झडप पडून घार जशी लोण्याचा गोळा उचलून नेते त्याप्रमाणें प्रांतिक सरकारच्या काटकसरीचा सर्व फायदा हिंदुस्थानसरकार हिरावून घेतें ! हिंदुस्थानसरकारनें प्रांतिक सरकारास बुचाडण्याचा हा विधि दर पांच वर्षांतून एकदां होत असतो. हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलांत बंगालच्या ले. गव्हर्नरांनीं सन १८९६ सालीं असें सांगितलें होतें कीं, प्रांतिकसरकार म्हणजे एक मेंढी आहे; तिची लोंकर थोडीशी वाढते न वाढते तोंच दर पांच वर्षांनीं हिंदुस्थानसरकारची कातरी तिच्या पाठींत बसून तिची सर्व लोंकर कलकत्त्याचे धनगर घेऊन जातात, आणि पुन्हां या मेंढीस थंडींत काकडत पडावें लागतें ! इतकेंच नव्हे तर पुन्हां जरा लोंकर वाढली कीं, पुन्हा वरच्याप्रमाणेंच वपन-विधि सुरू होऊन फिरून " येरे माझ्या मागल्या " याप्रमाणें स्थिति होते ! ही स्थिति होणें इष्ट नाहीं; प्रांतिकसरकाराकडे ज्या उत्पन्नाच्या बाबी दिल्या असतील त्यांत वाढ झाली असल्यास तिचा फायदा प्रांतिक सरकारासच द्यावा याबद्दल निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं व राष्ट्रीयसभेसारख्या सार्वजनिक संस्थांनींहि अनेक वेळां हिंदुस्थानसरकारास विनंती केली. पण हिंदुस्थानसरकारानें तिकडे कांहीं लक्ष दिलेलें नाहीं. यंदाचे सालीं ब्रह्मदेशचा प्रांतिक करार नवा करण्यांत आला त्यांत हिंदुस्थानसरकारानें ४० लाख रुपये ब्रह्मदेशच्या प्रांतिकसरकाराचे तोडलेले आहेत व मुंबईवरहि कदाचित्

पुढें मागें हीच पाळी येणार आहे. असा प्रकार होऊं नये व प्रांतिकसरकारास प्रांतिक सुधारणा जेणेंकरून जास्त जास्त करतां येतील अशा बेताची शिल्लक त्याजपाशीं हिंदुस्थानसरकारानें नेहमीं ठेवावी हें वाजवी होय. पण प्रांतिकसरकार हें हिंदुस्थानसरकारच्या पूर्ण ताब्यांत असल्यामुळें हिंदुस्थानसरकारास जेव्हां जेव्हां पैशाची जरूर लागेल तेव्हां प्रांतिकसरकारावर झडप घालूनच हे पैसे वसूल करण्यांत येतात. प्रांतिकसरकारची ही उपासमार कशी बंद करावी व प्रांतिक सुधारणा झपाट्यानें चालण्यास जितकें द्रव्यबल पाहिजे तितकें द्रव्यबल प्रांतिक सरकारापाशीं कसें ठेवावें हा एक मोठाच प्रश्न आहे. पण त्याचा सध्यां कांहीं विचार होईल असा रंग दिसत नाहीं. नाहीं म्हणावयास यंदांच्या शिलकेंतून एकंदर आठ प्रांतिक सरकारांना ९० लाखांची विद्याखातें, पब्लिक वर्क्स खातें, वैद्यक खातें वगैरेकरितां रक्कम दिली आहे पण ही एक सालींच असल्यामुळें प्रांतिक सरकारास सदर खात्यांत कोणतीहि कायमची सुधारणा करतां येणें अशक्य आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, प्रांतिक खर्च वजा केला तर हिंदुस्थानसरकारजवळ खर्च करण्यास सुमारें ८८ कोट रुपये राहातात. लोकलफंड वगैरे दुसरे स्थानिक कर यांतून वजा केले तर सुमारें ८५ कोट रुपये हिंदुस्थानसरकार खर्च करतें असें दिसून येतें. एवढ्या रकमेचें हिंदुस्थानसरकार करतें काय? असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. परंतु खर्चाच्या तपशिलाकडे पाहिलें असतां या शकेचें लवकरच निराकरण होतें. हिंदुस्थानसरकारची मोठी खर्चाची बाब म्हटली म्हणजे लष्करी खर्च होय. सन १९००–०१ सालीं लष्करावर जवळ जवळ २१ कोट ४० लक्ष रुपये खर्च झाले, गेल्या म्हणजे १९०१–०२ सालीं २२ कोट ८३ लक्ष रु. खर्च झाले, आणि १९०२–०३ सालीं २५ कोट १६ लक्ष रुपये खर्च होतील असा अदमास आहे. ८५ कोटींपैकीं २५ कोट रुपये लष्करावर खर्च झाल्यावर मग इतर बाबतींत हिंदुस्थानसरकारच्या खर्चाची ओढ झाल्यास त्यांत नवल तें काय ! हिंदुस्थानदेशांत होणारे दंगेधोपे मोडण्यास एवढ्या खर्चाचें लष्कर नको ही गोष्ट आफ्रिकेंत व चिनांत हिंदुस्थानसरकारानें जें सैन्य पाठविलें त्यावरून उघड होत आहे. बोअर लोकांप्रमाणें हिंदुलोकांस हत्यारें बाळगण्याची परवागी नाहीं, आणि यद्यपि असली तरी जुनीं म्हणजे कमी पल्ल्याचीं हत्यारें आमच्या लोकांच्या हातांत येतात. अशा स्थितींत दरसाल २५ कोट रुपये खर्च करून हिंदुस्थानाच्या अंतर्व्यवस्थेकरितां मोठें सैन्य ठेवण्याची वास्तविक म्हटलें म्हणजे कांहींएक जरूरी नाहीं. आतां परचक्रापासून रक्षण करावयाचें तर तें हिंदीलोकांच्या मदतीनेंच करावें, तेवढ्याकरतां सैन्य वाढविण्याची व तत्प्रीत्यर्थ अतोनात पैसे खर्च करण्याची जरूर नाहीं असें लोकांचें म्हणणें आहे. पण हिंदुस्थान-

सरकारास ही गोष्ट कशी रुचणार ? लोक अनुकूल असोत वा प्रातिकूल असोत, आपल्या सैन्याच्या जोरावर देशांतील बंडेंच नव्हे तर परचक्रहि मोडून टाकण्याइतकें आपल्या सैन्याचे आंगीं सामर्थ्य पाहिजे अशी हिंदुस्थानसरकारची समजूत झालेली आहे व व्हाइसरॉयांच्या जागीं कोणीहि गृहस्थ आले तरी त्यांचें लष्करी खर्चासंबंधाचें धोरण एकसारखेंच असतें. त्यामुळें सरहद्दीवर किल्ले बांधणें, लष्करांतील लोकांस नवीं हत्यारें देणें, नव्या तोफा किंवा लढाईचें सामान आणणें यांत दरसाल कोट्यावधि रुपयांचा चुराडा होत असतो. आणि " गंडस्योपरि पीटिका " या न्यायानें सरहद्दीवर कोठें लढाई उपस्थित झाली म्हणजे तर ही खर्चाची खांच अतिशयच खोल होऊन त्यांत आणखी कोट्यावधि रुपये गडप होतात ! काडतुसाचे वगैरे कारखाने पूर्वी हिंदुस्थानांत होते, पण बिनधुराच्या दारूचे वगैरे कारखाने इकडे सुरू करण्याचा सरकाराचा इरादा असल्यामुळें लष्करी खर्च १९०२–३ सालीं बराच वाढला आहे. शिवाय इंग्रजी सोल्जरांचे पगार वाढाविल्यामुळें सुमारें ३४ लक्षांचा हिंदुस्थानावर दरसालचा जास्त बोजा बसलेला आहे. या जास्त बोजाबद्दल आपण जबाबदार नाहीं असें लॉर्ड कर्झन यांनीं सांगितलें आहे. परंतु या उत्तरानें कोणाचेंहि फारसें समाधान होणें शक्य नाहीं. कारण खर्चाचा बोजा अखेरीस हिंदुस्थानास सोसावा लागतो तो लागतोच. पोलिटिकल खात्याचाहि खर्च त्याचप्रमाणें वाढलेला आहे. सरहद्दीवर नवा प्रांत केला त्याकरितां पोलिस, न्यायाचीं कोर्टें, मुलकी अधिकारी वगैरे सर्व नवीं करावीं लागल्यामुळें तो एक खर्च वाढलाच आहे; पण त्याखेरीज दिल्ली दरबारप्रीत्यर्थ ३५ लाख रुपये खर्च होणार असून त्यांपैकीं ८॥ लक्ष रु. खर्च लष्करी खात्याकडून होणार आहे. याखेरीज प्रदर्शनाकरितां सुमारें ४ लाख रुपये लागतील असा अंदाज केलेला आहे. सारांश, शिलकेची जी कांहीं वाढ झाली ती सर्व सरहद्दीवर नवा इलाखा करण्यांत आणि लष्करी खर्चांत नाहींशी झाली. व हिंदुस्थानच्या जमाखर्चाची केव्हांहि कांहीं सुधारणा होणें असेल तर ती हे खर्च तोडल्याशिवाय कधींहि व्हावयाची नाहीं. लष्करी खर्चाची बाब अशी कांहीं भयंकर आहे कीं, ११० कोटच काय पण २०० कोट उत्पन्न झालें तरी या बाबीची खळगी कधीं भरावयाची नाहीं ! ना. आनंदाचार्लू यांनीं हा मुद्दा चांगल्या रीतीनें सरकारापुढें मांडिला होता पण त्यांच्या मुद्यास कोणीहि उत्तर देण्याचा प्रयत्न केला नाहीं. लॉर्ड कर्झनसारख्या हुषार गव्हरनर–जनरलांनीं या विषयाबद्दल अशा रीतीचें मौन धारण करावें हें आश्चर्य होय. अथवा आश्चर्य तरी कसलें ? कारण, हिंदुस्थानाचें राज्य कोणत्या धोरणावर चालवावयाचें हें आधींच ठरलेलें असल्यामुळें लोकमताचा सरकारवर बिलकुल दाब बसत नाहीं. ज्या देशांत लोकमताखेरीज पैहि जास्त खर्च करतां येत नाहीं तेथील

सभासदांची गोष्ट निराळी आणि पदरचें खाऊन कौन्सिलांत केवळ कर्तव्य म्हणूनच भांडणाऱ्या आमच्या सभासदांची स्थिति निराळी ! शाळाखातें वगैरे गोष्टींकडे अद्याप पुष्कळ खर्च करावयास पाहिजे आहे; पण लष्करी खर्चाची हांव कमी होईल तेव्हां इतर गोष्टी आमच्या सरकारास सुचल्या तर सुचणार.

❋ ❋ ❋

कमिशनांचा हंगाम.

लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दीची आंता दीड दोन वर्षेंच शिल्लक आहेत, व गेल्या तीन वर्षांतील लाट साहेबांच्या कर्तबगारीकडे लक्ष दिलें असतां ह्या अवधींत तरी प्रजाजनांचा म्हणण्यासारखा फायदा लाट साहेबांच्या हातून होतो किंवा नाहीं ह्याविषयीं शंकाच उत्पन्न होऊं लागल्या आहेत. लॉर्ड रिपन नंतर आलेल्या गव्हर्नर–जनरलामध्यें लॉर्ड कर्झन प्रमाणें, भाषणांत प्रजाजनांच्या हिताविषयीं अत्यंत कळकळ दाखविणारे लाट साहेब कोणीच झाले नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें कोणतेंहि भाषण घ्या हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत विशेष फेरफार करून प्रजाजनांच्या हृदयांत आपलें नांव चिरस्थायी करण्याच्या मोठ्या खटपटींत लाटसाहेब चूर झाले आहेतसा भास होतो. शब्दसृष्टींत विलक्षण अवडंबर माजवून वस्तुस्थितीविषयीं भ्रम उत्पन्न करण्याची हातोटी लाट साहेबांना चांगली साधली असल्यामुळें पूर्वीचा विपरीत अनुभव विसरून जाऊन त्यांच्या प्रत्येक भाषणाचे वेळीं आतां मात्र लाट साहेब आमचें खरोखर हित करणार असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

पण ह्या शाब्दिक मायेवर सतत पांच वर्षें लोकांची तहानभूक भागणें शक्य नाहीं, ही गोष्ट लॉर्ड कर्झन साहेबांचेहि ध्यानांत आली असावी असें त्यांच्या बजेटवरील भाषणावरून दिसून येतें. इंग्रजी साम्राज्याच्या संरक्षणाकरितां व अभ्युदयाकरितां गेल्या तीन वर्षांत लॉर्ड कर्झन साहेबांनीं काय केलें व त्याचीं फळें कोणतीं दृष्टीस पडत आहेत, हें जसें त्यांना आपल्या भाषणांत नमूद करतां आलें त्याप्रमाणें अंतस्थ राज्यव्यवस्थेच्या सुधारणेकरितां कोणते फेरफार करण्यांत आले हें त्यांना सागतां आलें नाहीं. कांहीं तरी फेरफार करावयास पाहिजे आहेत, साम्राज्याच्या बंदोबस्ताकडे लक्ष पुरवीत असतां घरांतील सुखसमाधानाकडे दुर्लक्ष करतां कामा नये, हें तत्व लाट साहेबांना पूर्णपणें मान्य आहे. पण त्याची अंमलबजावणी झालेली मात्र दृष्टीस पडत नाहीं. अंतस्थ व्यवस्थेच्या

---

* [केसरी ता. ८ एप्रिल. १९०२]

सुधारणेचा प्रश्न पुढें आला कीं, त्याविषयीं कोरडी कळवळ दाखवून कोणत्याना कोणत्या तरा कारणान तो विल्हेस टाकण्याचाच प्रयत्न दृष्टीस पडतो. अशा रीतीनें महत्त्वाचे प्रश्न विल्हेस टाकणेची सर्वांत उत्कृष्ट युक्ती म्हटली म्हणजे त्यांची सांगोपांग चर्चा करण्याकरितां कमिशन नेमणें ही होय. लाट साहेबांच्या बहुतेक सर्व क्रिया इंग्रजी साम्राज्याची भरभराट कशानें होईल या प्रश्नासंबंधाच्या असल्यामुळें शाद्विक भाग तेवढा अंतस्थ सुधारणेच्या वांटणीस आलेला आहे व व या शब्दसृष्टीचें पर्यवसान कमिशनांत व्हावें, हेंहि सहाजिक आहे. लॉर्ड कर्झन साहेबांच्या पूर्वीच्या कारकीर्दीतूनहि कमिशनें नेमण्यांत आलीं व पांढऱ्याचें काळें करण्याएवजीकडे त्यांचा विशेषसा उपयोग झाला नाहीं. पण लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दीत जितकीं कमिशनें व चौकशा सुरू झाल्या आहेत तितकीं पूर्वी कधींहि झालीं नव्हती, किंबहुना कमिशनांचा हंगामच सांप्रत आला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणताहि महत्त्वाचा प्रश्न लाट साहेबांच्यापुढें जावो, त्याच्यावर कमिशन बसून तो हिंदुस्थानभर गरगर फिरावयास लागला म्हणून समजावें. आज हिंदुस्थानाचा असा कोणताहि भाग रिकामा नाहीं कीं त्यांत कोणत्याना कोणत्या तरी प्रश्नासंबंधानें कमिशन बसलेलें नाहीं. दुष्काळ, प्लेग कमिशनाचीं कामें पूर्णत्वास आलेलीं आहेत. युनिव्हर्सिटी कमिशन फिरत आहे, औद्योगिक शिक्षणासंबंधानें चौकशी चालू आहे, राजकुमारांच्या कॉलेजांतून शिक्षणपद्धति कोणती असावी याची चौकशी करण्याकरितां कमिटी बसली आहे, औद्योगिक शाळांच्या संबंधाच्या प्रश्नाची विचारपूस करण्याकरितां एक मंडळ स्थापिलें आहे, शेतकऱ्यांकरतां पेढ्या, लष्करी अधिकाराची वांटणी, कमिसरेट खात्यांतील लुच्चेगिऱ्या या सर्वांचा तलास लावण्याकरितां अधिकारी नेमले असून रीपोर्ट मागविले आहेत, पोलिसखात्याची चौकशी करण्याकरितांहि महत्त्वाचें कमिशन नेमल्याबद्दल लाटसाहेबांनीं आपल्या भाषणांत प्रसिद्ध केलें आहे. वरील सर्व कमिशनांचीं चक्रें फिरूं लागलीं आहेत व पुढील दीड दोन वर्षांत आणखी बरींच कमिशनें उद्भवणार यांत संशय नाहीं.

हीं इतकीं कमिशनें नेमण्यांत महत्त्वाचीं प्रकरणें कशीं तरी विल्हेस टाकण्याचा हेतु नाहींना ? या शंकेचा उल्लेख लाटसाहेबांनींच आपल्या भाषणांत केला आहे. कमिशन म्हणजे लोकांस चकाविण्याचें एक सोंग आहे. अशी पुष्कळांची खात्री होत चालली आहे. कोणत्याही प्रश्नासंबंधानें लोकांची ओरड विशेष होत चालली म्हणजे ती कांहीं कालपर्यंत बंद पाडण्याकरितां कमिशनें नेमण्यांत येतात हें अनुभवास आलें आहे. चौकशी करण्यांतच कमिशनांचीं पुष्कळ वर्षें जातात व कमिशनचा रिपोर्ट तयार होईतों तो प्रश्नच शिळा होतो. पुढें त्या कमिशनच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली म्हणजे सरका-

रच्या दृष्टीनें पूर्वीची स्थिति इतकी कांहीं बदललेली असते कीं, कमिशनच्या सूचना सरकारास टाकाऊ वाटतात, व बदललेल्या स्थितींत नवीन कमिशन नेमणें योग्य होईल किंवा कसें याची वाटाघाट करण्यांतच आणखी बरींच वर्षें जातात व शेवटीं लोकांना मुळींच कमिशन बसलें नसतें तर बरें, असें म्हणण्याची पाळी येते. पब्लिक सार्व्हिस कमिशनचा इतिहास पाहिला म्हणजे आमच्या वरील म्हणण्याची सत्यता वाचकांच्या ध्यानांत येईल. १८७० सालीं हें कमिशन नेमण्यांत आलें व त्यावेळीं लोकांना असें खास वाटलें कीं, आतां लवकरच मोठ-मोठ्या हुद्याच्या जागा नेटिवांना मिळूं लागणार. पुरीं दहा वर्षेपर्यंत चौकशी व सरकारचा विचार चालला होता. १८८० सालीं लॉर्ड लिटनसाहेबांनीं नेटिवांना जागा देण्याचें नियम प्रसिद्ध केले. या नियमांसंबंधानें लिटनसाहेबांनीं आपल्या खाजगी अभिप्रायांत हे नियम नेटिवांना फसाविण्याकरतां (cheating) आहेत, असा स्पष्ट उल्लेख केला आहे. सदर उद्देश नीटपणें ध्यानांत ठेऊनच घुढें सात आठ वर्षें वरील नियमांची अंमलबजावणी करण्यांत आली व आतां अखेरीस नेटिव लोक वरिष्ठ जाग्यास नालायकच आहेत असें स्पष्टपणें लोकांस सांगण्यांत येत आहे ! पूर्वीच्या एज्युकेशन कमिशनची अशाच तऱ्हेची हकीकत आहे. ओपिअम (अफू) कमिशनचा बोजवारा असाच झाला. एकंदरींत कमिशनें म्हणजे एक प्रकारची फसवणूक आहे, असें मानण्यास पूर्वीच्या इतिहासांत चांगला आधार आहे.

लॉर्ड कर्झन मात्र मोठ्या कळकळींनें लोकांना असें आश्वासन देत आहेत कीं, हीं कमिशनें म्हणजे फसवणूक आहे असें समजूं नका. कमिशनें कशा करतां नेमण्यांत येतात या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत देतां येईल असें ते म्हणतात. लाटसाहेबांचें उत्तर येणेंप्रमाणें आहेः—या सर्व कमिशनांचा हेतु एकच आहे व तो सत्यान्वेषण हा होय. समुद्राचे वाळवंटावर चकाकणारा शिंपला ज्याप्रमाणें सर्वांच्या नजरेस सहज रीतीनें पडतो त्याप्रमाणें जें सत्य आहे तें उघड उघड दिसलें पाहिजे. पण वाळू, चुना व शेवाळ यांखालीं दडपून गेलेल्या शिंपल्या प्रमाणेंच सत्य हेंहि सभोंवारच्या वेष्टनामुळें चटकन लक्षांत येण्यासारखें नसतें. अशी स्थिति असल्यामुळें लॉर्ड कर्झनसाहेब म्हणतात कीं, आपण कोठें आहों, आपली परिस्थिति काय आहे व आपणास कोठें जावयाचें आहे, हें ठाम व स्पष्टपणें समजल्याशिवाय मजपुढें ठेवलेला अंतस्थ सुधारणेचा बोजा डोक्यावर घ्यावयास मी तयार नाहीं शिवाय हिंदुस्थानची गोष्ट इतर सर्व राष्ट्रांहून निराळीच आहे. एखाद्या शहरापुरती किंवा जिल्ह्यापुरतीं हीं कमिशनें नाहींत, हें सर्वांनीं ध्यांनात ठेवलें पाहिजे. युरोपांतील सर्व राष्ट्रांना लागू पडणारे नियम तयार करतांना जेवढी जोखीम शिरावर घ्यावयास पाहिजे तेवढी जोखिम हिंदुस्थानचा विचार करतांना शिरावर पडते हें विसरतां कामा नये. बोलणें बाय-

कांचें काम आहे व करून दाखविणें पुरुषांचें आहे, हें मी पूर्णपणें ओळखून आहे, व कमिशनच्या रिपोर्टापेक्षां त्या रिपोर्टाच्या अंमलबजावणींत अधिक महत्त्व आहे, हेंहि मी जाणून आहे. तथापि मी असें म्हणतों कीं, एखादें कमिशन नेमून तें शेवटास लावणें या गोष्टीलाहि कमी जोम लागतो असें नाहीं; व ज्या गव्हर्नरजनरलसाहेबांना सुखासमाधानांत वेळ घालावयाचा असेल त्यांनीं हें कटकटीचें व त्रासाचें काम कधींहि उपस्थित करूं नये !

कमिशनांवर कमिशनें नेमण्याच्या पद्धतीचा लॉर्ड कर्झनसाहेबांनीं वरील कारणास्तव अंगीकार केलेला आहे. कमिशन नेमणें म्हणजे लहानसान काम नव्हे अशी जर लाटसाहेबांची खरोखर समजूत असेल तर तें आमचें दुर्दैव होय. लॉर्ड कर्झनसाहेबांसारख्या कर्त्या लाटसाहेबांचे कारकीर्दींत प्रजाजनांच्या हिताच्या प्रश्नाचे वेळीं केवळ शब्दजालांचा एवढा पसारा पडावा हें भावी सुस्थितीचें चिन्ह नव्हे लोकांचें हित करावयाचें असलें म्हणजे हिंदुस्थानदेश युरोपखंडाएवढा मोठा आहे, तेव्हां सत्यान्वेषण बारकाईनें व धिमेपणानें झालें पाहिजे, वगैरे सर्व तत्वें लाटसाहेबांना आठवतात व शब्दांपलीकडे कांहीं करण्याची घाई करणें म्हणजे पाप आहे असें त्यांना वाटतें. पण तीच इंग्रजी साम्राज्याच्या हिताची गोष्ट असूं द्या, विलायत सरकारच्या हुकमाशिवायहि मस्कतच्या बंदरावर लढाऊ जहाजें पाठविण्यास लाटसाहेब एका पयावर तयार ! हिंदुस्थानचा सर्व किनारा स्वतः डोळ्यांनीं पाहून किनाऱ्यावरील शहरांचा व बंदरांचा लढाईच्या वेळीं कसा बंदोबस्त करवयास पाहिजे, हें ठरविण्याचें काम द्या, शिंदे, होळकर, निजाम इत्यादि बड्या संस्थानिकांवर इंग्रजी अंमलाचा स्क्रू पिळून बसविण्याचें काम द्या, सरहद्दीवरील बंदोबस्त पक्का करण्याचा उद्योग पहा, किंवा लष्करास नवीन बंदुका व तोफा देऊन लष्करी खर्च वाढविण्याचें काम असूं द्या लाटसाहेबांचें सत्यान्वेषण अशा प्रसंगीं लांबत नसून वाळवंटावर चकाकणाऱ्या हिऱ्याप्रमाणें सत्य त्यांच्या चटकन् डोळ्यांत भरतें. प्रजाजनांच्या हितानहिताचा प्रश्न आला म्हणजे मात्र या सत्यावर चुना, माती व वाळू यांचे ढीगच्या ढीग येऊन पडतात, व ते उकरून काढण्याकरतां पाट्या, खोरीं देऊन कमिशनांना पाठविणें लॉर्ड कर्झन साहेबांना भाग पडतें. साम्राज्याकरितां मात्र लॉर्ड कर्झन साहेबांना कृती करून दाखवितां येते व आमच्याकरतां भाषणापलीकडे विशेषशीं मजल जात नाहीं. गेल्या वीस वर्षांतील वादविवादानें हिंदुस्थानांतील अंतस्थ व्यवस्थेसंबंधानें बऱ्याच गोष्टी आतां मुक्रर ठरल्या आहेत. पण लाट साहेबांची सत्यान्वेषणाची हौस कांहीं पुरी होत नाही.

सर्व गोष्टी लॉर्ड कर्झन साहेबांच्या ध्यानांत आहेत; पण एक गोष्ट ते अजिबात विसल्यासारखें दिसतात, ती गोष्ट नम्रपणें सुचविण्याची आम्ही परवानगी घेतों. ती गोष्ट हीच कीं, हिंदुस्थानांतील त्यांच्या कारकीर्दीचें आयुष्य आतां

जवळजवळ दीड वर्षांहून अधिक नाहीं लाटसाहेबांचे हेतु स्तुत्य आहेत; प्रजाजनांचें हित करावें अशी त्यांना कळकळ आहे व आपल्यामागें लोकांनीं आपलें नांव काढावें अशी त्याची इच्छाहि आहे. पण पांच वर्षांपैकीं साडेतीन वर्षें जर प्रस्तावनेंतच गेलीं तर दीड वर्षांत असा कोणता फायदा लोकांना होणार आहे हें दिसतच आहे. त्यांच्या कारकीर्दीचा प्रारंभ निघून गेला व मध्यहि संपला. आतां शेवटचा भाग सुरू आहे. हीं कमिशनें चौकशी करणार केव्हां, त्यांचा रिपोर्ट होणार केव्हां व लाटसाहेब प्रजाजनांचें हित साधणार केव्हां, या सर्व गोष्टींना वेळ कसा मिळावा हेंच आम्हांस समजत नाहीं. लॉर्ड कर्झनसाहेब विलायतेस गेले तरी कमिशनांचा रिपोर्ट मागें हिंदुस्थानांत रहील ही गोष्ट खरी आहे; पण त्या रिपोर्टांचा उपयोग मि. डिग्बी यांनीं लिहिलेल्या नव्वीन पुस्तकासारखें पुस्तक लिहितांना आंकडे गोळा करण्याचें कामीं होण्यापलीकडे विशेषसा होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

* * *

* लष्करी खर्चाचें ओझें कमी होण्याची आशा आहे काय ?

हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंतील अंतस्थ सुधारणेसंबंधाची कोणतीहि महत्त्वाची बाब घ्या, प्रजाजनांच्या हिताकडे दुर्लक्ष होण्याचें कारण हिंदुस्थानचा वाढता लष्करी खर्च आहे असें दिसून येईल. या खर्चाविरुद्ध लोकांची आज एकसारखी वीस वर्षें ओरड चालली आहे. व हा खर्च हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा नायनाट केल्यावांचून राहाणार नाहीं, असें नामांकित मुत्सद्यांनींहि कबूल केलें आहे, प्रजाजनांचें व सर्व विचारी लोकांचें किंबहुना जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांचेंहि यासंबंधानें एकमत असतां लष्करी खर्चाचें ओझें दिवसानुदिवस वाढतच जात आहे हें पाहून याच्या वाढीला कोणती तरी सीमा आहे कीं नाहीं व ही वाढ अशी कां व्हावी असा प्रश्न साहाजिकपणें उत्पन्न होतो व त्या प्रश्नाचें आज थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

१८५७ सालच्या बंडानंतर पुढील पंधरा वीस वर्षांत हिंदुस्थानच्या लष्करी खर्चाची जी वाढ झाली ती वाढ हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत बंडावा होऊन इंग्रजांचे सत्तेस धोका येऊं नये या उद्देशानें करण्यांत आली. लोकांस निःशस्त्र

---

* [केसरी ता. १५ एप्रिल १९०२]

केल्यामुळें व लोक निस्तेज करण्याचें प्रयत्न इतर सर्व बाजूंनीं पद्धतशीर रीतीनें होत चालल्यामुळें, प्रजाजनांना कह्यांत ठेवण्याकरतां लष्करी सामर्थ्य मुक्रर किती पाहिजे, हें ठरविण्यास अडचण पडली नाहीं; व पेन्जडे प्रकरणापूर्वी हिंदुस्थानसरकारचा जो लष्करी खर्च होता तो हिंदुस्थानचे लोकांपासून व सरहद्दीवरील रानटी लोकांपासून इंग्रजी राज्याचें संरक्षण करण्यास पूर्णपणें पुरेसा होता. पण ही स्थिति गेल्या वीस वर्षांत अगदीं बदलून जाऊन लष्करी खर्च असा कांहीं झपाट्यानें वाढत चालला आहे कीं, आतां त्या वाढीचें पैलतीर दृष्टीस पडणें मुष्किलीचें झालें आहे. गेल्या २५।३० वर्षांत फ्रान्स, रशिया, जर्मनी इत्यादि युरोपियन राष्ट्रांच्या कारस्थानांशीं इंग्लंडचा दिवसानुदिवस विशेष येत चाललेला संबंध व युरोपखंड आपआपसांतील लढायांत गुंतलें असतां इंग्लंडनें स्वस्थपणें आशियाखंडांत व इतर ठिकाणीं मिळविलेल्या अलोट वैभवामुळें युरोपखंडभर इंग्लंडचा होत असलेला मत्सर व द्वेष, हीं या विलक्षण वाढीचीं कारणें होत.

रशिया व फ्रान्स या दोन राष्ट्रांशीं मिळून लढण्याचा प्रसंग आपणांवर केव्हांना केव्हां तरी येणार अशी इंग्लंडला फार वर्षांची धास्ती आहे, व हा लढाईचा प्रसंग उपस्थित होण्याची स्पष्ट कारणें जरी अद्याप दिसूं लागलीं नाहींत व प्रत्येक राष्ट्र इतरांशीं स्नेहानें व प्रेमानें वागण्यास आणि लढाईचा प्रसंग टाळण्यास जरी मनापासून खटपट करीत आहे तरी इंग्रजी मुत्सद्यांची वरील धास्ती प्रतिवर्षीं अधिकच वाढत आहे, ही गोष्ट निर्विवाद होय. बोअर लोकांचें युद्धांत इंग्लंडाविषयीं युरोपखंडाचें किती प्रतिकूल मत आहे, व इंग्लंडचा द्वेष युरोपखंडांत किती माजला आहे हें स्पष्टपणें दिसून आलें आहे. इंग्लंडच्या सोल्जरांची व सेनानायकांची सकारण किंवा निष्कारण नाचक्की करण्याची संधी युरोपखंडानें बिलकुल वांया जाऊं दिली नाहीं व बोअर लोकांच्या शिपाईगिरीची तारीफ करण्यांत, प्रसंग असो वा नसो, युरोपखंडानें किमपीहि कसूर केली नाहीं. लॉर्ड रोजबरी यांनीं तर एका प्रसंगीं असें बोलून दाखविलें कीं, युरोपखंडांत अशी इंचभरहि जागा नाहीं कीं, जेथें इंग्रजांचा मनापासून द्वेष करण्यांत येत नाहीं. इंग्लंडची संपत्ति, इंग्लंडची सत्ता व इंग्लंडचें वैभव युरोपियन राष्ट्रांच्या डोळ्यांत खुपत असून त्याकरतां इंग्लंडचा एवढा द्वेष करण्यांत येत आहे.

जगांतील अधिकार, वैभव व सुखसंपत्ति ह्यांची सर्वांत अधिक वांटणी कोणी घ्यावी, ह्याबद्दल युरोपियन राष्ट्रांत शर्यत लागली आहे व प्रत्येक राष्ट्र आपआपलें घोडे सर्वांत पुढें पिटाळण्याची खटपट करीत आहे. फ्रान्स व जर्मनी यांमधील तीस वर्षांपूर्वींच्या लढाईंत फ्रान्सचा पराभव होऊन प्रिन्स बिस्मार्क यांच्या लष्करी मताचा युरोपांत पगडा बसल्यापासून ह्या शर्यतीस

विशेष तेजी आली आहे. हत्यारबंद शिपायांच्या छावणीचें स्वरूप सर्व युरोपखंडास आलेलें असून युरोपखंडांत आज मित्तीस प्रत्यक्ष लढाई नसण्याचें कारण शेजारी केव्हां काय करील या भीतीनें प्रत्येक राष्ट्र नेहमीं लढाईची जय्यत तयारी ठेऊन जागत बसलें आहे, हें होय. प्रत्येकाची झुंजण्याची हरघटकेस तयारी असल्यामुळें एक भीति दोहोंकडे होऊन कोणीच अधिक प्रसंगाला येत नाहीं. युरोपच्या ह्या शांततेस (Armed Peace) 'शस्त्रास्त्रांनीं राखलेली शांतता' असें म्हणतात. प्रिन्स बिस्मार्क यांनीं प्रचारांत आणलेल्या ह्या लष्करी धोरणापासून लांब राहण्याचा प्रयत्न इंग्लंडनें प्रथम प्रथम केला; परंतु युरोपखंडांत नसला तरी आफ्रिका व आशियाखंडांत इंग्लंडचा व इतर युरोपियन राष्ट्रांचा निकट संबंध येत चालल्यामुळें लष्करी मस्तीच्या भोंवऱ्यांत सांपडून युरोपियन राष्ट्रांच्या कारस्थानांच्या अनुसंधानानें गरगर फिरणें इंग्लंडला भाग पडलें आहे. शेजाऱ्यानें तयारी चालविली आहे म्हणून आपणाहि त्याच्यावर ताण होईल असा खर्च केला पाहिजे, एवढ्याच ईर्षेनें युरोपियन राष्ट्रांनीं आपल्या लष्कराचा व आरमाराचा खर्च कसा वाढविला आहे, हें खालील कोष्टकावरून कळून येईल. १८७४, १८८४, १८९१ व १८९६ ह्या सालीं प्रमुख राष्ट्रांनीं लष्करी खात्याकडे किती खर्च केला हें ह्या कोष्टकांत दिलें आहे.

राष्ट्राचें नांव	१८७४ साल. पौंड.	१८८४ साल. पौंड.	१८९१ साल. पौंड.	१८९६ साल. पौंड.
इंग्लंड	२३५९५०००	२९३८५०००	२९५५००००	३३७७००००
जर्मनी	१७७६००००	२२१८५०००	४०६१००००	३१८९००००
इटली	९६०००००	१२६६५०००	१४४४५०००	१२१९५०००
आस्ट्रिया	१११९००००	१२५१००००	१४१९००००	१३५१५०००
फ्रान्स	२४२७००००	३०९७५०००	३३१९५०००	३४६३५०००
रशिया	२९६२५०००	२८३९५०००	४२८५५०००	५१९७५०००

गेल्या पांच वर्षांत युरोपियन राष्ट्रांचे खर्च झपाट्यानें वाढत आहेत. वरील

कोष्टकांत हिंदुस्थानांतील लष्करी खर्च धरलेला नाहीं. रशिया व फ्रान्स यांचा खर्च जसजसा वाढतो, त्या प्रमाणानें समुद्रावरील आपलें वर्चस्व कायम ठेवण्याकरितां इंग्लंडला आरमाराचा खर्च अतोनात वाढवावा लागत आहे, व आशिया आणि आफ्रिका खंडांतील वर्चस्व संभाळण्याकरितां हिंदुस्थानावर लष्करी खर्चाचें ओझें वाढवावें लागत आहे.

युरोपियन राष्ट्रांचे कारस्थानास न जुमानतां बोअर लोकांच्या लढाईचा शेवट इंग्लंडला सर्वस्वीं आपल्यासारखा करावयाचा आहे, फ्रान्सचे डांवपेंचांस न जुमानतां घशांत घातलेले प्रदेश इजिप्त व सौडन त्यांना नीट पचवावयाचे आहेत, सैप्रस बेट ताब्यांत ठेऊन तुर्कस्थानास रशियाचें कह्यांत न जाऊं देण्याची हमी इंग्लंडनें घेतली आहे, इराणी आखातांतील किरकोळ सुलतानांना आपल्या आश्रयाखालीं नांदवायला लावण्याची इंग्लंडची इच्छा आहे, इराणचे किनाऱ्यावर कोणत्याहि युरोपियन राष्ट्रास बंदर न मिळूं देतां दक्षिण इराणांत, व इराण बलुचिस्थान यांच्या दरम्यानच्या सरहद्दीवर रशियाचा प्रवेश न होईल असा बंदोबस्त करण्यांत इंग्लंड गुंतलें आहे, अफगाणिस्थानचे अमिरास रशियाचा दरारा न वाटावा व अफगाणिस्थानास रशियापासून धोका न मिळावा म्हणून इंग्लंडची जय्यत तयारी चालली आहे. पामिरच्या चित्रळचे वाटेनें काश्मीरकडे रशिया भोंक पाडील म्हणून त्या बाजूलाहि इंग्लंडची लिंपालींप सुरू आहे, सयामावर फ्रान्सचा कटाक्ष न चालावा व ब्रह्मदेशचे सरहद्दीवर फ्रान्सच्या सत्तेची विशेष वाढ न व्हावी म्हणून खबरदारी घेण्याचें इंग्लंडनें अंगिकारलें आहे, मांच्युरियांतून रशियास काढून टाकून चीन व कोरिया या देशांत रशिया, फ्रान्स व जर्मनी यांना प्रदेश किंवा विशेष सवलती मिळूं नयेत म्हणून जपानचे खांद्यास खांदा लावून समरांगणावर दंड ठोकून आपला उभे आहों म्हणून इंग्लंडनें जाहीर केलें आहे—ह्या इतक्या जागीं रशिया व फ्रान्स या दोस्त राष्ट्रांचें इंग्लंडशीं तोंडास तोंड भिडलें आहे, लढाईचा प्रसंग आला असतां काय होईल काय नाहीं, या भीतीनेंच दोन्ही पक्ष एकमेकांचे लचके घ्यावयास सरसावत नाहींत. सर्व राष्ट्रें लष्करांचा खर्च वाढवून नेहमीं लढाईस तयार असल्यामुळें जवळ जवळ आलेलीं भांडीं एकमेकावर आपटूं नयेत म्हणून खबरदारी घेण्यांत येत आहे. आशिया व आफ्रिका खंडांतील सत्तेच्या व सुखोपभोगाच्या सर्वांत अधिक वांटणीकरितां ही झोंबाझोंब चालली असून एक पक्ष निर्बल होईतों किंवा हार खाईतों कोणत्याहि राष्ट्रास आतां आपला लष्करचा खर्च कमी करतां येत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील लढाईपासून तर या लष्करी खर्चाच्या वाढीच्या चढाओढींत जरा मागें राहिल्याचा परिणाम काय होतो हें इंग्लंडच्या चांगलें निदर्शनास आल्यामुळें आपले लष्करचे व आरमाराचे कायमचे खर्च वाढविण्याकडे व प्रिन्स बिस्मार्क यांच्या लष्करी पद्धतीस सामील होण्याकडे इंग्लंडचा

विशेष ओढा लागला आहे व या स्थितींत लष्करी खर्चाचा बोजा कमी होण्याची बिलकूल आशा करावयास नको.

साम्राज्याच्या नादीं लागल्यामुळें इंग्लडला इतर राष्ट्रांशीं शर्यत करावी लागत आहे व हिंदुस्थान इंग्लंडचा जिंकलेला देश असल्यामुळें या शर्यतीकरितां लागणाऱ्या सामानाचा व फाजिल खर्चाचा बोजा हिंदुस्थानावर पडणार हें उघड आहे. हिंदुस्थान ही इंग्लंडची कोठी आहे व इजिप्तपासून चीनपर्यंतच्या अफाट प्रदेशांत कोठेंहि गडबड झाली असतां या कोठींतून ठिकठिकाणीं हरएक प्रकारच्या सामानाची रवानगी करण्यांत येते. गेल्या बजेटाचे वेळीं लॉर्ड कर्झन यांनीं इंग्लंडच्या साम्राज्यास ऐन भांडणतंट्याचे वेळीं हिंदुस्थानांतून मदत मिळते याचें चांगलें वर्णन केलें आहे. तें वाचलें असतां आपल्या महत्त्वाकांक्षेची हौस पुरविण्याकरितां इंग्लंडनें स्वतःच्या डोक्यावर घेऊं केलेलें ओझें हिंदुस्थानच्या बोकांडीं कसें मारण्यांत येत आहे, हें चांगलें ध्यानांत येईल. दाक्षिण आफ्रिकेच्या लढाईकरतां हिंदुस्थानांतून १३ हजार गोरें सैन्य पाठविण्यांत आलें व ९ हजार नेटिव बुणगे पाठाविण्यात आलें. चीन प्रकरणीं १३०० युरोपियन सैन्य २० हजार नेटिव सैन्य व १७५०० बुणगे पाठविण्यांत आले. शिवाय दाक्षिण आफ्रिकेंत २ कोट १० लक्ष काडतुसें, १ लक्ष १४ हजार तोफांचे गोळे, ११ हजार तंबू ११ हजार खोगीर, ३ लक्ष १५ हजार शिरस्त्राणें, १ लक्ष ६९ हजार ब्लँकिटें, २ लक्ष ९० हजार बूट, ९ लक्ष ४० हजार वस्त्रपात्रें व ४२ हजार टन घांसदाणा पाठविण्यांत आला. नवीन तऱ्हेचीं शस्त्रास्त्रें करण्याचे कारखानेही हिंदुस्थानच्या खर्चानें सुरू व्हावयाचे असून यापुढील लढायांतून लागणाऱ्या बंदुकांचा व तोफांचा पुरवठा हिंदुस्थानाकडून इंग्लडास होईल अशी व्यवस्था करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें खेचरें व घोडीं यांचाहि इंग्लंडास या कोठींतून पुरवठा व्हावा म्हणून हें सामान तयार करण्याचे कारखाने हिंदुस्थानच्या खर्चानें चोहोंकडे स्थापण्यांत येत आहत.

इंग्लंडची साम्राज्याची हांव कमी होणें आतां शक्य नाहीं व या हांवेच्या पायीं हिंदुस्थानाला इंग्लंडची कोठी म्हणून हरएक प्रकारचें सामान जय्यत तयार ठेवावें लागत आहे. सोल्जरानां पोसून, शिकवून तयार करून इंग्लंडच्या हवालीं करणें हिंदुस्थानचें कर्तव्य आहे, आयते वेळीं येथील काळे गोरें सैन्य पाहिजे त्या ठिकाणीं लढाईस पाठविणें हिंदुस्थानांस जरूर आहे, काडतुसें बंदुका, तोफेचे गोळे, अन्नसामुग्री, वस्त्रपात्र, बुट, घोडा, जीन, बर्ची, हुक्कापाणी चहाकॉफी सर्व कांहीं इंग्लंडच्या लढायांना वक्तशीर पोंचविण्याची हिंदुस्थानाकडे कामगिरी आहे. इंग्लंडच्या साम्राज्याच्या पसाऱ्याबरोबर त्या कामगिरीचा बोजा वाढत जाणार यांत शका नाहा.

युरोपियन राष्ट्राच्या या वाढत्या लष्करी खर्चाचा परिणाम तरी काय होणार?

अधिकार लालसेनें उत्पन्न झालेला हा द्वेषाग्नि पेट न घेतां असाच किती दिवस धुमसत राहणार ? हे भांडण तंटे विकोपास जांऊं नयेत म्हणून व एकमेकास एकमेकांची भीति वाटावी म्हणून वाढाविण्यांत येत असलेला हा लष्करी खर्च सोसण्याची हिंदुस्थानाला निदान ताकद राहिली आहे काय ? युरोपियन राष्ट्रें झालीं तरी हा खर्च असाच अव्याहत वाढत राहिल्यास तो किती दिवस सहन करतील ? असे एका मागून एक प्रश्न उद्भवणें साहाजिक आहे. बाणासुराला ज्याप्रमाणें आपल्या एकवीस बाहूंचें वजन असह्य झालें व बरोबरीच्या वीराशीं लढून बाहूंची फाजिल शक्ति नाहींशी करण्याची संधी यावी म्हणून ज्याप्रमाणें त्यास परमेश्वराची आराधना करावी लागली तशा सारखीच कांहीं तरी तोड या लष्करी चढाओढींतून मुक्त होण्याकारितां या युरोपियन राष्ट्रांस योजणें भाग आहे. क्षत्रियांचा भार भूमीला असह्य झाला म्हणजे मारतीय युद्धासारखें युद्ध परमेश्वराला घडवून आणवावें लागतें, असें जें पुराणांत वारंवार उल्लेख आढळतात त्यांचा मतलब झाला तरी वरील तऱ्हेचाच होय. राशियन ग्रंथकार मि. ब्लॉच यांचे यासंबंधानें असें मत आहे कीं, लष्करी तयारीच्या चढाओढीनें खर्चाखालीं बेजार होऊन किंवा भयंकर लढाईच्या वादळांत सांपडून सांप्रतच्या समाजस्थितीची उलथापालथ झाल्याशिवाय प्रिन्स बिस्मार्कनें उत्पन्न केलेलें हें लष्करी भूत गाडलें जाणें शक्य नाहीं. युरोपखंडाची स्थिति कशीहि होवो, पण प्रिन्स बिस्मार्क यांच्या या भुताची बाधा स्वतःस फारशी होऊं नये म्हणून इंग्लंडनें त्यास हिंदुस्थानचे मानगुटीवर बसविलें आहे यांत संशय नाहीं ! व या अन्यायापासून हिंदुस्थानची मुक्तता केल्याशिवाय लॉर्ड कर्झनसाहेबांचे अंतस्थ सुधारणेचे बेत निष्फळ होण्याचा संभव जाहे, हें सांगावयास नकोच.

* लष्करी खर्चाचें ओझें

हिंदुस्थानच्या यंदाच्या सालच्या जमाखर्चाच्या खर्ड्याची माहिती देतांना लष्करी खर्च वाढत चालल्याबद्दल व विशेषेंकरून सोजिर लोकांचे पगार वाढविल्यामुळें यंदांच्या सालीं सुमारें ३४ लक्ष रुपये जास्त खर्च होणार आहेत त्याबद्दल आम्ही लिहिलें होतें; आणि लष्कराचा वाढत जाणारा खर्च ही एक आमच्या दुर्दैवानें गरीब रयतेपासून घेतलेल्या कराचे पैसे नाहींसे होण्याची मोठी खिंडच झाली आहे असें आम्हीं म्हटलें होतें. बजेटच्या वेळीं सर एडवर्ड लॉ यानीं जें भाषण केलें त्यांत आणि खुद्द बजेटांत ३४ लक्षांची रक्कम फक्त यंदांच्या सालाकरतांच खर्च घातली आहे व पुढें सालीना या बाबीमुळें किती ओझें वाढेल याचा फडणिसांनीं नक्की आंकडा दिलेला नाहीं. हा नक्की आंकडा अलीकडे प्रसिद्ध झाला आहे व त्यासंबंधानें विलायतेंतहि बरीच चळवळ झालेली आहे. हिंदुस्थानच्या रक्षणाकरितां व हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्य सुरक्षित ठेवण्याकरतां सुमारें ६० हजार गोरें सैन्य या देशांत ठेवतात. इतकें सैन्य ठेवल्याखेरीज हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्य सुरक्षित राहाणार नाहीं असा लष्करी अंमलदारांचा समज आहे; व राष्ट्रीय सभेसारख्या सभांचें असें म्हणणें आहे कीं, या सैन्यापैकीं दक्षिण आफ्रिकेंत व इतर ठिकाणीं २०।२५ हजार लोक गेले असतांहि जर हिंदुस्थानच्या सुरक्षितपणास धक्का आलेला दिसत नाहीं तर इतकें गोरें सैन्य हिंदुस्थानच्या खर्चानें ठेवणें म्हणजे या गरीब देशास विनाकारण नागावणें होय. परंतु हा प्रश्न सध्यां बाजूला ठेऊन आज जो प्रश्न उपस्थित झाला आहे तो याहीपेक्षां निराळ्या तऱ्हेचा आहे व त्यामुळें हिंदुस्थानावरील खर्चाचें ओझें एकदम कोट सव्वाकोट रुपये वाढणार आहे किंवा बहुतेक वाढलें आहे म्हटलें तरी चालेल. बोअर लढाईमुळें विलायतेंतील गोऱ्या सैन्याच्या संख्येंत व तयारींत ज्या उणीवा आढळून आल्या त्या सुधारण्याकडे विलायतसरकारचें लक्ष हल्लीं लागलें आहे. इंग्लंडचा राज्यविस्तार अफाट झाला आहे व कोणीकडे केव्हां कशी वेळ येईल याचा नियम नाहीं. करितां विलायतेंत गोरे शिपाई जितके ठेवतां येतील तितके नेहमीं तयार ठेविले पाहिजेत, असें विलायतेंतील लष्करी खात्यानें ठरविलें आहे. परंतु कारखान्यांतून मजुरांस जी मजुरी मिळते त्यापेक्षां लष्करी खात्याचा पगार कमी असल्यामुळें विलायतेंतील गरीब लोक लष्करांत नोकरी करण्यास उत्सुक नसतात. ही अडचण भरून काढ-

---

* [केसरी ता. २९ एप्रिल १९०२]

ण्यास दोनच उपाय आहेत. जर्मन देशाप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें लष्करांत कांहीं दिवस नोकरी केलीच पाहिजे असा सक्तीचा कायदा करणें हा एक उपाय आणि शिपायांचे पगार वाढवून लष्करी खात्यांत शिरण्यास लोकांस अधिक उत्तेजन यावें, अशी व्यवस्था करणें हा दुसरा उपाय होय. पैकीं पहिला उपाय इंग्रज लोकांस पसंत नाहीं. तेव्हां शिपायांचे पगार वाढवून कारखान्यांत न शिरतां लष्करी खात्यांत जास्त लोक येतील, अशी तजवीज करणें भाग पडलें आणि याप्रमाणें विलायतेंतील लष्करी खात्यानें व्यवस्थाहि केली. परंतु विलायतेंतील गोऱ्या शिपायांचा पगार वाढविला तर हिंदुस्थांनांतील गोऱ्या शिपायांचा तरी कां वाढवूं नये, असा त्यांतल्या त्यांत प्रश्न उपस्थित झाला आणि ज्याअर्थीं विलायतेंतील गोरा शिपाई आणि हिंदुस्थानांतील गोरा शिपाई असा पंक्तिभेद सरकारास करतां येत नाहीं त्याअर्थीं हिंदुस्थानच्या गोऱ्या शिपायाचाहि पगार वाढवावा आणि त्याचा खर्च हिंदुस्थानसरकारनें हिंदुस्थानच्या तिजोरींतून द्यावा असा इंग्लंडांतील लष्करी खात्यानें ठराव करून त्याची अंमलबजावणी होण्याकरितां तो स्टेट सेक्रेटरी लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टन यांचे मार्फत हिंदुस्थान सरकारकडे आला. या कामांत हिंदुस्थानसरकारची पूर्वी सल्ला घेतली होती असें दिसत नाहीं, व कदाचित् विलायतेंतील लष्करी खात्यास त्याची जरूरीहि वाटली नसेल. कारण गोऱ्या शिपायांचा पगार वाढाविणें किंवा न वाढाविणें हें ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारचा नाहीं. इंग्लंडच्या साम्राज्याची एकंदर स्थिति लक्षांत आणून ही गोष्ट विलायतच्या मुख्य लष्करी खात्यानें ठरवावयाची आहे व त्यांचा जो ठराव होईल तो इतरांनीं मान्य केला पाहिजे. येथपर्यंत सर्व ठीक आहे; परंतु या प्रश्नास दुसरीहि एक बाजू आहे व ती लंडन टाइम्स पत्रांत वेल्बी कमिशनचे एक साहेब मि. बुचानन यांनीं चांगली मांडली आहे. गोऱ्या शिपायांचा पगार वाढविल्यामुळें हिंदुस्थानावर ७,८६,००० पौंड म्हणजे १ कोटी १८ लक्ष रुपयांचें अधिक ओझें पडेल आणि इंग्लंडास १०,४८,००० पौंड म्हणजे सुमारें १ कोट ५७ लक्ष रुपये जास्त खर्च करावे लागतील, असा अंदाज आहे. या पैकीं सध्यांच्या वर्षीं हिंदुस्थानावर फक्त ३४ लक्षांचाच बोजा घातलेला आहे पण पुढें तो १ कोट १८ लक्षांपर्यंत वाढेल, हें निश्चित आहे. गोऱ्या शिपायांच्या पगाराकरितां एवढा मोठा खर्च हिंदुस्थानानें कां सोसावा, हा एक मोठाच प्रश्न आहे, हिंदुस्थानांत जे गोरे शिपाई आहेत ते वेळ पडली म्हणजे हिंदुस्थानांतच नव्हे तर इंग्रजी साम्राज्याकरितां आफ्रिकेंत व चिनांत उपयोगी पडतात, असा ताजा अनुभव आहे; किंबहुना आशिया व आफ्रिका खंडांतील इंग्रजांचें वर्चस्व व साम्राज्य राहाण्यास हिंदुस्थानच्या गोऱ्या व काळ्या सैन्याची इंग्लंडास जेवढी मदत होते तितकी दुसऱ्या कोणत्याहि वसाहतीच्या सैन्याची होत नाहीं, हें आतां सर्व इंग्रजी मुत्सद्यांस मान्य आहे. परंतु दुःखाची गोष्ट

अशी कीं, " खानेकू हं और लढनेकू मेरा भाई " या न्यायानें इंग्रजी साम्राज्याच्या रक्षणार्थ आधीं हिंदुस्थानच्या सैन्याचा जरी उपयोग होत असला तरी अधिक खर्चाची बाब आली कीं, ती सर्व किंवा तिचा बराच मोठा भाग एकट्या हिंदुस्थानच्या डोक्यावर आलाच म्हणून समजावें. इंग्लडच्या वसाहतींतील लोकांस जें स्वातंत्र्य व जे हक्क आहेत ते आम्हांस नाहींत ते नाहींतच, परंतु कुंभाराच्या भारवाहकाप्रमाणें बिकट प्रसंग आला की आम्हांस मदतीला ओढून न्यावें आणि आमच्या देशांतील गरीब प्रजेपासून करानें घेतलेले पैसे गोऱ्या शिपायांचा पगार वाढविण्यात खर्च करावे, अशी आमची स्थिति झाली आहे ! आतां कदाचित् कोणी असें विचारील कीं, गोऱ्या शिपायांचा पगार वाढविणें जर जरूर आहे तर हिंदुस्थानानें त्याचा खर्च द्यावयास नको काय ? गोष्ट खरी आहे, पण मग ६० हजारांच्या ऐवजीं हिंदुस्थानांत ४० हजार सैन्य ठेऊन चालणार नाहीं काय ? हेंहि हात नसेल तर मि. बुचाननसाहेब म्हणतात त्याप्रमाणें दुसरे कांहीं हल्लीं विनाकारण हिंदुस्थानावर लादण्यांत आलेले लष्करी खर्च तरी कमी केले पाहिजेत. वेल्बी कमिशननें सुमारें २,९६००० पौंड लष्करी खर्चाची रक्कम हिंदुस्थानावर त्यावेळीं लादण्यांत येत होती ती विलायतसरकारानें सोसावी अशी सूचना केली होती; व त्यापैकीं अखेरीस वादविवाद होऊन २,५७,००० पौंड म्हणजे सुमारें ३८॥ लक्ष रुपयांचें दरसालचें हिंदुस्थानावरील ओझें कमी करण्यांत आलें. पण आमचें दैवच असें कांहीं विचित्र आहे कीं, हें ओझें हलकें होतें न होतें तोंच याच्या तिप्पट दरसालचें नवीन ओझें गरीब हिंदुस्थानच्या डोक्यावर लादण्यांत येत आहे. बुचाननसाहेबांनीं आपल्या पत्रांत असें दाखविलें आहे कीं, हिंदुस्थानच्या दरएक गोऱ्या शिपायामागें दरसाल ७॥ पौंड म्हणजे सुमारें ११२ रुपये हिंदुस्थानसरकारकडून विलायतसरकार घेत असतें व त्याचा तपशील असा सांगण्यांत येत असतो कीं, गोरे सैन्याची संख्या कायम ठेवण्याकरितां दरसाल जी भरती करावी लागते ती करण्याकरितां विलायतच्या लष्करी खात्यास हा खर्च होतो ! ही सबब किंवा तपशील बरोबर नाहीं अशी खुद्द हिंदुस्थानसरकारचीहि फारा दिवसांची ओरड आहे व ती योग्य आहे असें बुचानन साहेबांचेंहि म्हणणें आहे. गोऱ्या सोजिरांच्या भरतीकरितां म्हणून दरसाल विलायतेस वर लिहिलेल्या दराप्रमाणें दरसाल सुमारें ५,००,००० पौंड म्हणजे सुमारें ७५ लक्ष रुपये हिंदुस्थानसरकारास द्यावे लागतात. ही एकच खर्चाची रक्कम कमी केली तरीहि हिंदुस्थानावर नवीन लादलेलें ओझें दोन हिश्शांनीं कमी होईल. परंतु एवढा विचार करावा कोणी ? लॉर्ड कर्झनसारखे मोठे हुषार व्हाइसरॉय जरी आले तरी असल्या बाबतींत आमच्याकरितां ते नेटानें भांडत नाहींत व भांडले तरी त्यांचें फारसें चालत नाहीं. त्यामुळें हिंदुस्थान म्हणजे इंग्रजी साम्राज्याचा एक मोठा भारवाहक

बैलच झाला आहे व लष्करी अंमलदारहि हवें तेवढें ओझें त्याच्यावर लादण्यास मागें पुढें पहात नाहींत. हा अन्याय किती दिवस टिकणार ? हिंदुस्थान हें ओझें किती दिवस सोसणार किंवा इंग्रजी साम्राज्याकरितां पोट बांधून आम्हीं किती दिवस लढणार ? हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत, व यांचा जर चांगल्या रीतीनें निकाल लागला नाहीं तर त्यांत अखेरीस इंग्रजी साम्राज्याचेंच नुकसान होण्याचा संभव आहे हें सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुस्थानदेशाचें किंवा इंग्रजी साम्राज्याचें संरक्षण करण्याकरितां जास्त फौज किंवा नव्या प्रकारच्या दारूगोळ्याची जरूर असल्यास तो जितक्या काटकसरीनें होईल तितक्या काटकसरीनें तयार केला पाहिजे. हिंदुस्थानदेश जिंकलेला असून इंग्लंडदेश जिंकणारा आहे ही गोष्ट खरी आहे, पण तेवढ्यामुळें खर्चाच्या सर्व बाबी हिंदुस्थानावर लादणें सक्तीनें शक्य असलें तरी न्यायानें वाजवी व परिणामीं हितकारक होणार नाहीं. हिंदुस्थानच्या प्रजेचेंच असें म्हणणें आहे असें नाहीं; तर खुद्द हिंदुस्थानसरकारनेंहि ही गोष्ट वारंवार विलायतसरकारच्या कानावर घातलेली आहे पण तिकडे आजपर्यंत कोणी लक्ष दिलेलें नाहीं. उत्तरोत्तर हिंदुस्थानची स्थिति अगदीं खालावत चालली आहे. दुष्काळ व प्लेग यानें रयतेपासून कर वसूल होण्यास उत्तरोउत्तर अधिकाधिक सक्ती करावी लागत आहे व अशा सक्तीनें वसूल केलेला पैसा उधळेपणानें लष्करी खात्याकडे खर्च करणें अगदीं निर्दयपणाचें होय. पण नुसता निर्दयपणा पदरीं आल्यानेंच विलायत सरकरावरील दोषारोप संपतो असें नाही. चीन व दक्षिण आफ्रिका या दोन देशांत नुकतीच जी हिंदुस्थानानें इंग्रजी साम्राज्यास मदत केली त्याचा मोबदला म्हणून खरें म्हटलें म्हणजे इंग्लंडानें हिंदुस्थानास द्रव्यद्वारां कांहीं मदत केली पाहिजे. पण तें सर्व एकीकडेच राहून गोऱ्या शिपायांचा पगार वाढवा म्हणून कोट सवा कोट आणि गेल्या सालांत भरतीकरतां नवीन शिपाई मिळेनात म्हणून नोकरीची मुदत संपलेल्या जुन्या गोऱ्या शिपायांसच येथें अधिक भत्ता देऊन ठेवलें त्याचा निम्मा भागहि हिंदुस्थानानें द्यावा, असें विलायत सरकारनें ठरविलें आहे. आम्ही साम्राराज्याची केलेली सेवा लक्षांत आणली म्हणजे आमच्यावर लादलेलें हें ओझें निर्दयपणाचेंच नव्हे तर कृतघ्नपणाचें आहे असें म्हणणें भाग येतें, विलायतेंतील कांहीं थोर गृहस्थांनीं हा प्रश्न उपास्थित केला आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. तरी आमच्याकडील लोकांनीं आतां स्वस्थ न बसतां वा बाबतींत विलायत सरकारकडे दाद मागण्याचा प्रयत्न करावा, अशी त्यांस आमची आग्रहपूर्वक सूचना आहे.

❁ ❁ ❁

*जमिनीच्या हक्काची नोंद

ऊर्फ जमिनीची खानेसुमारी.

आपल्या राज्यांतील मनुष्यांची दहा दहा वर्षांनीं खानेसुमारी करून त्यांची जात, धर्म, धंदा, स्थिति वगैरेबद्दल दर दहा वर्षांनीं ज्याप्रमाणें सरकार माहिती गोळा करितें त्याप्रमाणेंच राज्यांतील जमिनीची मोजणी व सदर जमिनीवरील हक्कदारांची नोंद ठेवून जमिनीची एक प्रकारची खानेसुमारी करणें राजाच्या दृष्टीनें आणि प्रजेच्या दृष्टीनें अवश्यक आहे; किंबहुना जमिनीच्या हक्काची बरोबर नोंद असल्यानें व्यवहारांत, राज्यकारभारांत किंवा एकंदर समाजस्थितींत प्रत्यहीं उत्पन्न होणाऱ्या पुष्कळ गोष्टींचा चांगल्या रीतीनें उलगडा होण्यास पुष्कळ सहाय्य होण्यासारखें असून जरूरीहि आहे. आणि अशा दृष्टीनें पाहिलें असतां मुंबईसरकारानें हल्लीं जो विचार मनांत आणिला आहे तो कांहीं गैरवाजवीहि नाहीं. पण सुखाबरोबर ज्याप्रमाणें दुःख लागलेलेंच असतें तद्वत् ज्या गोष्टींचा चांगला उपयोग करतां येतो त्याच गोष्टी वाईट रीतीनेंहि उपयोगांत आणतां येतात हें सुप्रसिद्ध आहे. तेव्हां आज जमिनीच्या हक्काची नोंद करून पुढें मागें तिच्या सहाय्यानें थोडे दिवसांपूर्वी मंजूर झालेल्या जमीनमहसुलाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचें अथवा जमीनदारांचे हक्क काढून कुळांस देण्याचें जर सरकारच्या मनांत असेल तर जमिनीच्या हक्काच्या नोंदीचा कायदा म्हणजे पुढील नाटकाची प्रस्तावनाच आहे असें म्हणावें लागेल; आणि जमिनीवरील लोकांच्या परंपरागत आलेल्या हक्कांवर सरकारची जी हल्लीं करडी नजर आहे ती मनांत आणली म्हणजे अशा प्रकारची शंका मनांत येणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु 'कां न सदन बांधावें कीं त्यांत बिळें पुढें करिल घूस' या मोरोपंतांच्या वचनास अनुसरून जी गोष्ट चांगली आहे तिचा पुढें कोणी तरी दुरुपयोग करील म्हणून आज आम्ही वाईट म्हणूं इच्छित नाहीं. जमिनीच्या हक्काची गांवोगांव नोंद असणें सर्वांस सोईचें आहे असें आम्हीं वर सांगितलेंच आहे; सबब सामान्य तत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें असतां या कायद्यास कांहीं हरकत येईल असें आम्हांस वाटत नाहीं.

परंतु हल्लींच्या बिलाचा मसुदा पाहिला असतां तो फारच अपुरा, घाईनें केलेला आणि रयतेस जाचणारा आहे असें कोणाच्याहि सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. सन १८८७ च्या पंजाब प्रांतांतील जमीनमहसुलाच्या कायद्याच्या धर्तीवर हल्लींचा मसुदा तयार केला आहे असें मुंबईसरकारचें म्हणणें आहे. पण

---

*[केसरी ता. २ सप्टेंबर १९०२]

हल्लींचें बिल आणि पंजाबचा कायदा यांची तुलना करून पाहतां हल्लींचें बिल त्या कायद्यापेक्षां बऱ्याच बाबतींत अनिश्चित आणि अव्यवस्थित आहे असें आढळून येईल. जमिनविरील हक्काची आणि हक्कदारांची नवीन नोंद करावयाची म्हटलें म्हणजे त्याचे स्वभावतःच दोन भाग होतात; (१) आजमित्तीस दर एक गांवांतील जमिनी कोणकोणाकडे कोणत्या हक्कानें वहिवाटीस आहेत याचें तपशीलवार रजिष्टर तयार करणें, आणि (२) असें रजिष्टर तयार झाल्यावर वारसाच्या हक्कानें, विक्रीनें, गहाणानें किंवा अन्य तऱ्हेनें कोणास कोणत्याहि जमिनिवर हक्क प्राप्त झाल्यास त्याप्रमाणें रजिष्टरांत फेरबदल करणें. पहिल्या भागास आपण 'अव्वल रजिष्टर तयार करण्याचें काम' अशी आणि दुसऱ्यास 'फेरबदलाच्या रजिष्टराचें' काम अशी संज्ञा देऊं. काळीच्या किंवा सन १८७९ च्या मुंबई जमीनमहसुलाच्या कायद्याप्रमाणें मुलकी कचेऱ्यांतून किंवा गांवगन्ना खातेदारांची जी नोंद आहे ती फारच अपुरी आहे, किंबहुना चुकीची असते असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां पहिला प्रश्न असा आहे कीं, हरएक गांवीं हक्काच्या नोंदीचें अव्वल रजिष्टर तयार करावयाचें तें कोण व कसें करणार? ज्या ठिकाणीं किंवा ज्या जमिनीच्या हक्काबद्दल तंटा नाहीं तेथें अव्वल रजिष्टर तयार करण्यास कोणतीच अडचण नाहीं. पण जेथें जमिनीच्या हक्काबद्दल वाद आहे, तेथें त्याचा निकाल करण्याचें काम गांवकुळकर्ण्याकडे किंवा घोड्यावरून एक दिवसांत चार गांवें तपासीत जाणाऱ्या मुलकी अंमलदाराकडे सोंपविणें म्हणजे न्यायाची थट्टा आणि लोकांच्या हक्कांची पायमल्ली करण्यासारखें आहे. विशेषें करून कोंकणासारख्या प्रांतांतील जिल्ह्यांस म्हणजे जेथें जमिनदार किंवा खोत आणि कुळें यांच्यामध्यें जमिनीच्या हक्कासंबंधानें एकवाक्यता नसते तेथें तर हल्लींच्या कायद्यानें केवळ अन्याय होण्याचा संभव आहे. कूळ व जमिनदार प्रत्येकजण जमीन आपलीच आहे असें म्हणणार आणि असें झालें म्हणजे मुलकी अंमलदारास थोडक्या वेळांत त्याचा समाधानकारक रीतीनें निकाल करतां येणें अगदीं अशक्य आहे. बिलांतील कलम ३ यावर बिल करण्याचा हेतु व कारणें यांत जो सरकारनें खुलासा केला आहे तो असा आहे कीं, "संशय किंवा वाद असलेल्या बाबतींत (जमिनीच्या हक्काची) नोंद करणें ती कबजाच्या आधारावर करावी आणि चौकशी अगदीं साध्या प्रकारची असावी, असा (सरकारचा) इरादा आहे." यावरून असें उघड होतें कीं, नोंदीचें अव्वल रजिष्टर तयार करतांना जमीनदार व कूळ यांच्या दरम्यान कोणत्याहि प्रकारचा लढा पडल्यास त्याचा निकाल थोडीशी चुटपुटती चौकशी करून गांवकुळकर्णी किंवा मुलकी अंमलदार करतील; आणि ज्याच्या ताब्यांत जमीन आहे तो जमिनीचा मालक समजून त्याच्या नांवें रजिष्टर जमीन नोंदली जाईल. सारांश, 'ज्याच्या हातांत ससा तो पारधी' या न्यायानें जमिनिवरील हक्काचीं रजिष्टरें गांवोगांव तयार व्हावयाचीं आणि

अशा रजिष्टराच्या भिस्तीवर पुढें शेतकऱ्यांस तगाई, सूट किंवा कर्ज देण्यांत येणार आहे. ज्या कोणास हक्काच्या रजिष्टरांतील नोंद कबूल नसेल त्यानें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून आपल्या तर्फेचा हुकूमनामा मिळवावा आणि मग कलेक्टरामार्फत गांवरजिष्टर दुरुस्त करून घ्यावें. अशा अर्थाचीं बिलांत एकदोन कलमें आहेत. पण त्यापासून लोकांस विशेष फायदा होईल असें दिसत नाहीं. मुलकी अंमलदारांनीं अर्धीमुर्धी चौकशी करून कबाजाच्या अधारावर रजिष्टर तयार करावें आणि त्यामुळें ज्या कोणाचें नुकसान होईल त्यास दिवाणी कोर्टांत जाण्याचा प्रसंग यावा, हा न्याय कोठला ? या पेक्षां सरकारनेंच पहिल्यानें थोडासा जास्त खर्च सोसून व न्याय खात्यांतले चांगले लोक या कामाकडे नेमून पहिल्यानेंच गांवोगांवचीं रजिष्टर बुकें काळजीपूर्वक कां तयार करूं नयेत, हें आम्हांस समजत नाहीं. जमीनदार व शेतकरी यांच्या हक्कांची नोंद असणें सर्वांच्या जर सोयीचें आहे तर खानेसुमारीच्या कामास सरकार जसा पदरचा खर्च करितें तसा याहि कामास सरकारानें आपल्या पदरचा खर्च करून अव्वल राजिस्टर तयार करणें तेंच चोख व बिनचूक कां करूं नये ? हल्लींचें बिल मंजूर होऊन तो कायदा होईल तेव्हां होवो; पण त्यापूर्वीच रत्नागिरी जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं खोताचे खात्यांतील नांव काढून त्या ठिकाणीं कुळाचें नांव चढवूं लागले आहेत, अशी वातमी आहे. आणि हल्लींचें बिल पसार झाल्यावर जर याचप्रमाणें गांवराजिस्टरें तयार व्हावयाचीं असतील तर वेळींच लोकांनीं सावध होऊन या बिलाविरुद्ध जें कांहीं सरकारास कळविणें असेल तें कळाविलें पाहिजे. जमिनींच्या हक्काची नोंद ठेवण्याचें तत्व आम्हांस कबूल आहे, हें आम्ही वर सांगितलेंच आहे. पण जमिनीच्या हक्कांचीं अव्वल राजिस्टरें तयार करतांना कायद्यानें किंवा पूर्वापार चालत आलेल्या गांवच्या वहिवाटीप्रमाणें ज्या जमिनीवर ज्याचा जितका हक्क असेल तितकाच तो राजिस्टरांत नोंदला जाईल; आणि ' ज्याच्या हातीं ससा तो पारधी ' असा न्याय होणार नाहीं, अशाबद्दल योग्य खबरदारी घेतली पाहिजे. कित्येक मुलकी अंमलदार असे आहेत कीं, त्यांना जमिनीवरील जितके हक्क सरकाराकडे येतील तितके पाहिजे असतात. आणि कित्येकांच्या डोक्यांत जमिनदारांस बुडवून कुळाचें हित करण्याचें वेड शिरलेलें असतें. असल्या अंमलदारांच्या हातीं हल्लींच्या बिलांत दिलेल्या अधिकाराचें कोलीत पडल्यास मग कोठें काय भूतचेष्टा होतील कोण जाणे ! असा प्रकार होऊं नये, जमिनदार व कुळें यांचे योग्य हक्क प्रथमतःच रजिष्टरांत नोंदले जावे आणि जेथें वाद असेल तेथें हक्क संशयग्रस्त आहे अशी नोंद करून अखेर दिवाणी कोर्टाच्या निकालाप्रमाणें नोंद व्हावी, अशा धोरणाचीं कांहीं कलमें हल्लींच्या बिलांत अवश्य असलीं पाहिजेत व आम्हांस अशी आशा आहे कीं, हें बिल कायदे-

कौन्सिलापुढें जेव्हां वादाविवादाकरितां येईल तेव्हां लोकनियुक्त सभासदांकडून या गोष्टीचा चांगला विचार करण्यांत येईल. अव्वल राजिष्टर कसें तयार करावें, त्याची दुरुस्ती व तपासणी कोणी करावी, त्याच्यावर अपील कोणाकडे करावें इत्यादि सर्व गोष्टी हल्लींच्या बिलांतील कलम ३ प्रमाणें सरकारच्या मर्जीवर ठेविल्या असून सरकार या बाबतींत पुढें वेळोवेळीं जे नियम करील त्याप्रमाणें व्यवस्था व्हावयाची आहे. सारांश, जमिनीच्या हक्काचें राजिष्टर तयार करण्याचा हक्क या कायद्यानें सरकारास मिळून पुढील सर्व व्यवस्था सरकारास वाटेल तसे नियम करून करावयाची आहे. परंतु आमच्या मतें सरकारी अंमलदाराच्या हातांत अशा रीतीनें फाजिल अधिकार ठेवणें गैरशिस्त व रयतेस अहितकारक आहे. हक्काचें अव्वल राजिष्टर तयार करतांना चौकशी होईल ती अमक्या प्रकारची होईल, अमक्या अमक्यास नोटिसा काढल्या जातील विशेष भानगडीचा भाग असल्यास केवळ कबजावर निकाल केला जाणार नाहीं. वगैरे ठळक ठळक गोष्टी तरी हल्लींच्या बिलांतच सामील करून कायद्यानें ठरविल्या पाहिजेत पंजाबच्या कायद्याच्या धर्तीवर हा कायदा केला आहे, असें सरकारचें म्हणणें आहे; परंतु पंजाबच्या जमिनमहसुलाच्या कायद्यांतील कलमें हल्लींच्या बिलांतील कलमांपेक्षां अधिक खुलासेवार आहेत. विशेषेंकरून जमिनीवरील हक्क जेथें वादग्रस्त आहे तेथें कोणत्या प्रकारचा निकाल करावा, याबद्दल त्या कायद्यांतील कलम ३५ मध्यें जसा खुलासा आहे तसा या बिलांत खुलासा नाहीं. तसेंच जमिनीसंबंधाची कोणतीहि दिवाणी फिर्याद करतांना वादीनें फिर्यादीबरोबर जमिनीच्या हक्काच्या रजिस्टरांतील उतारा दिला पाहिजे, नाहीं तर फिर्याद नामंजूर होईल, असें जें हल्लींच्या बिलांत कलम (८ वें) आहे तेंहि पंजाबच्या कायद्यांत नाहीं. गांवरजिस्टरांतील नोंद सकृद्दर्शनीं खरी मानली जाईल म्हणजे ज्याच्या तर्फेची नोंद असेल त्याच्या विरुद्ध पक्षावर पुराव्याचा बोजा पडेल असें जें पंजाबच्या ॲक्टामध्यें कलम आहे तसें हल्लींच्या बिलांत नाहीं, हें खरें आहे; पण दिवाणी फिर्यादींत गांवरजिस्टरांतील उतारा देण्यासंबंधानें बिलांतील कलमें निराळीं असून अव्वल रजिस्टर तयार करतांना कोणत्या प्रकारची चौकशी करावी, याबद्दल नियम करण्याचा अधिकार सरकारच्या हातांत असल्यामुळें हल्लींचें बिल पंजाबच्या कायद्यापेक्षां अधिक गैरसोयीचें झालेलें आहे; किंबहुना हल्लींचें बिल आहे तसेंच पास झाल्यास कांहीं कांहीं जिल्ह्यांत तरी जमीनदार व कुळें यांच्यामध्यें विनाकारण तंटे उपस्थित होऊन त्यांपैकीं गरीब पक्षकार विनाकारण दिवाणी कोर्टाच्या खर्चांत बुडण्याचा संभव आहे. बिलांत योग्य सुधारणा केली असतां हे दुष्परिणाम नाहींसे होतील, नाहीं असें नाहीं. परंतु सुधारणा करणें त्या मात्र नीट विचारानें करणें आणि रयतेची खरी कळकळ बाळगून केल्या पाहिजेत. अनेक रजिस्टरें ठेवण्याच्या कामीं चूर झालेल्या गांवकुळकर्ण्याकडून

थोड्या वेळांत जमिनीच्या हक्काचें रजिस्टर कसें तयार होईल, एवढ्यावरच नजर देऊन उपयोगी नाहीं. जमिनीच्या हक्काचें रजिस्टर ठेवणें जितक्या महत्त्वाचें आहे, तितक्याच काळजीनें तें तयार झालें पाहिजे. उगाच एखाद्या गोमाजीनें उठून कुळकर्ण्यास वर्दी दिली कीं, त्याच्या नांवावर जमीन चढूं नये, अशा प्रकारची कायद्यांतच व्यवस्था पाहिजे. ती कोणती आणि वर सांगितलेलें फेरबदलाचें रजिस्टर ठेवण्याचा काय बंदोबस्त केला पाहिजे, याबद्दलचें विवेचन पुढील खेपेस करूं.

* * *

जमिनीच्या हक्काची नोंद ऊर्फ जमिनीची खानेसुमारी

कोणत्याहि प्रांतांत किंवा जिल्ह्यांत जमिनीवरील हक्काची प्रथमतः नोंद करण्याचे वेळीं ज्या अडचणी येण्याचा संभव आहे, त्यांबद्दल हल्लींच्या बिलांत कोणत्याहि प्रकारची तजवीज केलेली नाहीं, हें गेल्या अंकीं दाखविलेंच आहे. विशेषेंकरून ज्या जिल्ह्यांतून खोतीसारख्या जमिनदारीची पद्धत आहे तेथें कुळाचे हक्क कोणत्या प्रकारें नोंदले जातील किंवा जावेत, याबद्दल बिलांत कांहींतरी खुलासा करावयास पाहिजे होता. जमिनदार आणि कुळें यांच्यामधील संबंध कोणत्या प्रकारचे आहेत याचा निर्णय करण्याचें काम गांवच्या कुळकर्ण्याकडे किंवा तालुक्यांतील मुलकी अंमलदाराकडे सोंपविलें असतां त्यापासून पुष्कळ अनर्थ होईल इतकेंच नव्हे, तर कांहीं कांहीं ठिकाणीं असल्या व्यवस्थेमुळें शेंकडों तंटे उपस्थित होण्याचा संभव आहे. जमिनीवरील हक्कासंबंधानें लोकांची आसक्ति किती आहे, हें सरकारास आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. लहानशा जमिनीच्या तुकड्याकरितां तीन कोर्टेंपर्यंत भांडणें किंवा कज्जे चालू ठेवणारी मंडळी किती आहे याचा अंदाज कोर्टाच्या दप्तरावरून सहज करतां येण्यासारखा आहे. जमिनीवरील हक्क म्हणजे एक प्रकारची जादू आहे म्हटलें तरी चालेल; आणि मिरासी किंवा वतनी हक्काकरितां अथवा जुनें आणि नवें कूळ यांच्या हक्काकरितां शेतकरी लोकांत एकप्रकारचा नेहमींच अभिमान दृष्टीस पडत असतो. जमिनीच्या हक्काची हल्लीं जी नोंद होणार आहे त्यांत आपला हक्क जास्ती दर्जाचा लागल्यास पहावा, अशी इच्छा कोणास झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं; आणि

---

* [केसरी ता. ९ सप्टेंबर १९०२]

अशी इच्छा सर्वत्र असल्यामुळें जामिनीच्या हक्काची जी पहिली नोंद व्हावयाची ती चांगल्या समजूतदार आणि कायदाकानू समजणाऱ्या गृहस्थाकडून होणें अवश्य आहे, परंतु हल्लींच्या बिलांत हे सर्व अधिकार कुळकर्ण्याकडेच दिलेले आहेत. याचा परिणाम असा होईल कीं, कोणीही मनुष्यानें उठून गांवकुळकर्ण्यास वश करून घेतलें असतां जामिनीच्या हक्काची नोंद त्याच्या तर्फेची होऊन विरुद्ध पक्षास दिवाणी कोर्टांत जाण्याचा प्रसंग येणार. असें होऊं नये याबद्दल कदाचित् पुढें होणाऱ्या नियमांत कांहीं तजवीज करावयाची सरकारच्या मनांत असेल पण नियमापेक्षां कायद्यांतच या गोष्टीचा अधिक खुलासा होणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. नियम करणें किंवा बदलणें, ही गोष्ट अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून राहते; आणि त्यामुळें पुष्कळदां रयतेस आपली बाजू जितकी सरकारच्या नजरेस आणणें जरूर आहे तितकी आणतां येत नाहीं. सारांश जामिनीच्या हक्काची नोंद पहिल्यानें कशी करावयाची याबद्दलचे मुख्य मुख्य नियम तरी बिलांत घातल्याखेरीज लोकांच्या मनांतील अस्वस्थता मोडणार नाहीं पंजाबचे कायद्यांत अशा प्रकारचे कांहीं नियम आहेत, पण तितकेहि हल्लींच्या बिलांत घेतलेले नाहींत. ही चूक कशी व कां झाली, हें आम्हांस समजत नाहीं; पण ती चूक आहे एवढी गोष्ट निर्विवाद आहे.

जामिनीच्या हक्काचें पाहिलें रजिष्टर करण्याचें वेळीं ज्या अडचणी येणार म्हणून वर सांगितलें आहे त्याच हक्कांतील फेरबदलाचें जें रजिष्टर ठेवावयाचें तें तयार करण्याचे कामीं येणार आहेत. वारसाच्या हक्कानें खरेदीदार म्हणून किंवा गहाणदार किंवा कूळ या नात्यानें जेव्हां जेव्हां हक्कदारांत फेरफार होईल तेव्हां तेव्हां तो फेरफार गांवकामगारास कळवून त्याच्याकडून जामिनीवरील हक्काच्या रजिस्टराची दुरुस्ती करवून घ्यावी, असें बिलांत एक कलम आहे; आणि याकरितां दस्तऐवज वगैरे मागविण्याचा व पाहण्याचा गांवकामगार व मुलकी अंमलदार यांस अधिकार दिला आहे. परंतु या कलमाप्रमाणें जी चौकशी व्हावयाची ती अगदीं स्वल्प व तूर्तातूर्तची होणार हें अगदीं उघड आहे. ज्याचा हक्क गेला त्यास नोटीस काढावयांची किंवा त्याचें म्हणणें ऐकून घ्यावयाचें अशाबद्दलहि बिलांत कांहीं कलम नाहीं. इतकेंच नव्हे तर गांवकुळकर्ण्यास परभारें माहिती मिळाली असतांहि नोंदीचें रजिष्टर दुरुस्त करण्याचा त्यास अधिकार दिलेला आहे ! याचा परिणाम असा होईल कीं, गांवकुळकर्णी कोणास सामील झाला असतां पहिल्या हक्कदाराच्या पाठीमागें किंवा त्यास न समजतांहि रजिस्टरांत असलेली त्याच्या हक्काची नोंद बदलली जाईल ! असा परिणाम होणें इष्ट नाहीं व सरकारचाहि असा उद्देश नसावा, हें उघड आहे. गांवकामगार व मुलकी अंमलदार यांस दिवाणी कोर्टाप्रमाणें सविस्तर चौकशी करण्यास सवड नसते, ही गोष्ट खरी आहे; पण मामलेदार ॲक्टांत ज्याप्रमाणें जामिनीच्या

ताब्याच्या फिर्यादीसंबंधाचे ठळक ठळक नियम आहेत तशा प्रकारचे नियम हल्लींच्या बिलांत घालण्यास आमच्या मतें कोणतीहि हरकत नाहीं. दिवाणी व फौजदारी कोर्टांतहि कांहीं कांहीं कामें समरीं किंवा लवकर आटपावयाचीं असतात, पण अशा प्रकारच्या फिर्यादींत काम चालविण्याची शिस्त काय असावी, याचा कायद्यानेंच निर्बंध केलेला असतो व तशा प्रकारचे नियम हल्लींच्या बिलांत घालणें शक्य आहे. कालच्या कायदेकौन्सिलपुढें या बिलाची जी वाटाघाट झाली त्यांत लोकांच्या तर्फेंचे सभासद ना. दीक्षीत, खरे, पारख वगैरे यांनीं या बिलावर जी टीका केली ती याच प्रकारची आहे; आणि बिलाचा विचार करण्याकरितां जी सिलेक्ट कमिटी नेमिली आहे त्यांत ना. दिक्षित व खरे यांचीं नांवें असल्यामुळें सिलेक्ट कमिटीपुढें लोकांची बाजू चांगल्या तऱ्हेनें मांडली जाईल, अशी आम्हांस आशा आहे. जमिनीच्या हक्काची नोंद बिनचूक असावी याबद्दल कोणाचाहि मतभेद असण्याचा संभव नाहीं; पण कायद्याप्रमाणें जी नोंद व्हावयाची ती वस्तुस्थितीस अनुसरून होईल, आणि गांवकामगार किंवा तालुक्यांतील अंमलदार यांचें प्रस्थ विनाकारण माजणार नाहीं, अशा प्रकारचा बंदोबस्त कायद्यानें होणें जरूर आहे. आज नाहीं तर पुढें मागें केव्हांना केव्हां तरी जमिनीच्या हक्काचें रजिस्टर म्हणजे त्या हक्काबद्दलचा महत्वाचा पुरावा सभजला जाणार आहे. तेव्हां अशा प्रकारच्या महत्वाचें रजिस्टर आपल्या मर्जीप्रमाणें तयार करण्याची सवड गांवकामगारास कायद्यानें देणें प्रजेच्या दृष्टीनें अत्यंत अहितकारक आणि चुकीचें आहे. अशा प्रकारची सवड या अंमलदारास मिळावी, अशी सरकारची इच्छा असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण, सरकारास जर कोणाच्या हक्कांत फेरफार करावयाचे असले तर ते उघड रीतीनें करण्यास त्यांस कोणतीच आडकाठी नाहीं. सबब जमिनीच्या हक्काच्या नोंदीचा कायदा फक्त नोंद ठेवण्याच्याच उपयोगी असावा, त्यामुळें कुळकर्ण्यास वगैरे दुसऱ्या सवलती मिळूं नयेत, अशी जर सरकारास यावेळीं आम्ही विनंती केली तर ती पुष्कळ अंशीं मान्य होण्याचा संभव आहे. दिवाणी कोर्टांतील प्रत्येक जमिनीच्या दाव्यांत वादीनें जमिनीवरील आपल्या हक्काचा दाखला हजर केला पाहिजे, अशा प्रकारचें जें एक कलम बिलांत घातलें आहे तेंहि आमच्या मतें सध्यां तरी गैरसोयीचें आणि त्रासदायक होणार आहे. पंजाबच्या कायद्यांत असें कलम नाहीं, असें मागेंच आम्हीं सांगितलें आहे. जमिनीच्या हक्काच्या नोंदीचीं रजिस्टरें एकदां कायमचीं तयार झालीं म्हणजे मग पाहिजे तर अशा प्रकारच्या शर्तीं काद्यांत घालण्यास कांहीं हरकत नाहीं. पण आज हक्काच्या नोंदीचा दाखला नसेल तर दिवाणी फिर्यादी काढून टाकण्याचा किंवा इनामदारांस मदत न देण्याचा दिवाणी कोर्टास किंवा कलेक्टरास अधिकार ठेवणें बरोबर नाहीं. बिलांतील बाकीचीं कलमें महत्त्वाचीं नसून त्यांबद्दल

विशेष लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. बिलांतील मुख्य दोष काय आहे, हें वर केलेल्या विवेचनावरून लोकांच्या लक्षांत येईल. सिलेक्ट कमिटींतून या बिलाचा जो नवीन मसुदा बाहेर पडेल, त्यांत आम्हीं वर दाखविलेले दोष नजरेस येणार नाहींत, अशी आम्हांस आशा आहे.

❋ ❋ ❋

* हिंदुस्थानच्या भरभराटीची दंतकथा

हिंदुस्थानांत इंग्रजी अंमलास सुरुवात झाल्यापासून येथील लोकांची सांपत्तिक स्थिति सारखी सुधारत चालली आहे, कीं ते वर येण्याच्या ऐवजीं दिवसेंदिवस खोल-खोलच जात चालले आहेत, हा प्रश्न निघाल्याबरोबर त्यास दोन प्रकारचीं परस्पर विरुद्ध उत्तरें देण्यांत येतात. बहुतेक सरकारी अधिकारी, आपणासारख्या विभूतींच्या केवळ परमार्थपर वर्तनक्रमामुळें हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति उत्तरोत्तर सुधारत आहे, असें प्रतिपादन करण्यास उत्सुक झालेले असतात; व खऱ्या वस्तुस्थितीची पुरी माहिती व थोडाबहुत अनुभव असणारे इकडील सुशिक्षित व कांहीं विचारी इंग्रज गृहस्थ, इंग्रजी मुत्सद्यांच्या मायावी कृपाप्रसादामुळें आमची अन्नान्नदशा होऊन आमचा सारखा ऱ्हास होत आहे असें सारखें म्हणत आहेत. लोक आपल्या दुःस्थितीचें गाऱ्हाणें अधिकाऱ्यांपुढें मांडितात, परंतु ते आपल्या अंगाशीं चिकटलें कीं काय या भीतीनें ते तिकडे प्रायः दुर्लक्ष करितात; व तसा प्रसंगच आल्यास हें उपद्व्यापी लोकांचें निव्वळ थोतांड आहे, असें खऱ्या खोट्या कोट्या लढवून त्यांचे अन्नदाते जे इंग्लंडचे लोक त्यांच्या मनांत भरवून देण्याचा प्रयत्न करितात, ही गोष्ट प्रत्ययसिद्ध आहे. असो; हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीविषयीं या वर्षीं जितका कडाक्याचा वाद झाला, तितका पूर्वीं केव्हांहि झाला नव्हता, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. गेल्या वीस वर्षांत आमच्या दारिद्र्यासंबंधानें बरीच चर्चा चालू आहे, परंतु हल्लींची दुष्काळपरंपरा सुरू होण्यापूर्वीं, या प्रश्नाकडे सर्वांचें एकसारखें लक्ष लागलें नव्हतें. हल्लीं लागोपाठ पडणाऱ्या दुष्काळांमुळें लोकांचे पुढारी व सरकारी अधिकारी या दोन्हीहि पक्षांचें लक्ष सांपत्तिक स्थितीच्या प्रश्नानें वेधिलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यांतहि ना. दादाभाईंचें 'हिंदुस्थानचें दारिद्र्य व इंग्रजी शीलास न शोभणारी राज्यपद्धति,' डिग्बीसाहेबांचें 'भरभराटलेलें ब्रिटिश हिंदुस्थान' व मि. दत्त यांचें ' हिंदुस्थानांतील लोकांच्या सांपत्तिक स्थितीचा इतिहास ' इत्यादि

---

* [केसरी ता. २३ सप्टेंबर सन १९०२]

महत्त्वाचीं व सरकारी कागदपत्रांवरूनच माहिती घेऊन लिहिलेलीं पुस्तकें व इतर महत्त्वाचे लेख अलीकडे प्रसिद्ध झाल्यामुळें, या लेखकांचें म्हणणें खोडून काढण्यासाठीं कांहीं तरी बोलणें प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांस भाग होतें; व या सर्व कारणांमुळें यंदां येथील वरिष्ठ कायदेकौन्सिलांत, व खुद्द पार्लमेंटांतहि, या प्रश्नाची चर्चा विशेष व्हावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. या वादविवादांत आरंभींच निर्दिष्ट केल्याप्रमाणें लॉर्ड जार्ज यांनीं हिंदुस्थान आबादि आबाद आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला व हिंदुस्थानचे कैवारी मि. केन यांनीं आमच्या पुढाऱ्यांची बाजू सभासदांपुढें मांडिली. हिंदुस्थानांतील सांप्रतची राज्यपद्धति निर्दोष आहे, असें दाखविण्याचा लाट साहेबांनीं यत्न केला व सुशिक्षित समाजासंबंधानें कुत्सित उद्गार काढले. या सर्व प्रकारासंबंधानें आमचें जें मत होतें तें यापूर्वीच दिलेलें आहे. तथापि कित्येक विचारी अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांचें या तिन्ही मुद्यांविषयीं काय मत आहे, व यासंबंधानें विचार करूं लागलें असतां, अँग्लो-इंडियनांचें देखील आमच्या पुढाऱ्यांच्या मताहून फारसें भिन्न मत होणें कसें शक्य नाहीं, एवढेंच आज दाखविण्याचा आमचा विचार आहे.

'ईस्ट अँड वेस्ट'च्या सप्तंबरच्या अंकांत मि. थॉर्बर्न यांनीं हिंदुस्थानच्या भरभराटीच्या दंतकथेवर एक लेख लिहिला आहे. मि. व्हिश यांनीं 'हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत सुधारणा' या विषयावर लेख लिहिला आहे व सर एच्. कॉटन यांनीं 'हिंदुस्थानासंबंधीं कांहीं प्रश्न' या विषयावर लंडनच्या 'फॉझिटिव्हिस्ट सोसायटी' पुढें वाचलेला निबंध प्रसिद्ध केला आहे. मि० थॉर्बर्न यांनीं विलायतेंतील आमच्या सेक्रेटरीसाहेबांचें इकडील सांपत्तिक सुस्थितीविषयींचें प्रतिपादन खोडून काढिलें आहे. मि. व्हिश यांनीं सध्यांची राज्यपद्धती पुष्कळ सदोष आहे, असें सिद्ध केलें आहे व सरसाहेबांनीं सुशिक्षित लोकांच्या निर्मळ मनाची स्वानुभवावरून साक्ष दिली आहे. हे तिन्ही लेखक सरकारी अधिकाऱ्यांपैकींच आहेत व त्यामुळें त्यांनीं जर लोकांचे बाजूनें कांहीं लिहिलें असलें तर आपल्या इतर बंधूंचें म्हणणें पुरतें लक्षांत घेऊन नंतरच त्यांनीं तो न्यायमार्ग स्वीकारिला असला पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे. मि० थॉर्बर्न यांनीं लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन साहेबांच्या भाषणावर शस्त्र उपसलें आहे. त्यांनीं सलामीच्या वेळींच लाटसाहेबांसंबंधानें असे उद्गार काढिले आहेत कीं, यांनीं सुएझच्या पूर्व बाजूला कधीं पाय देखील ठेविला नाहीं. किंवा या जागेचें काम योग्य रीतीनें होण्यास अन्य तऱ्हेनें तयारी करावी लागते तशीहि त्यांची स्थिति नाहीं. त्यांनीं वरवर जी थोडीबहुत माहिती मिळविली आहे व त्यावरून त्यांची जी हिंदुस्थानच्या स्थितीसंबंधानें मतें झालीं आहेत त्याच्या अनुरोधानें ते आपणास इष्ट वाटतील ते सल्लागार निवडून घेतात; व त्यांच्या सल्ल्यानें आणि खालील अधिकाऱ्यांकडून आलेल्या रिपोर्टाच्या अनुसंधानें ते रिकाम्या बाकांपुढें पांडित्य चाल-

वितात व हिंदुस्थानासंबंधानें निष्काळजी असणारा इंग्रजी बहुजनसमाज सकाळच्या पत्रांत आलेलें यांचें बभुकवर्णन वाचून स्वस्थ घोरत पडेल एवढी मात्र ते काळजी घेतात असें यांच्या कर्तबगारीसंबंधानें मि. थॉर्बर्न यांचें मत आहे ! मि. केन यांनीं पार्लमेंटांतील वादविदाच्या वेळीं जबर सारा, तो वसूल करण्याची सक्ति व हल्लींसारखा चालू असलेला द्रव्यशोष इत्यादि कारणामुळें हिंदुस्थानची प्रजा अधिकाअधिक निःसत्व होत चालली आहे, असें जें प्रतिपादन केलें होतें, तें मि. थॉर्बन यांस मान्य आहे. त्यांनीं जो उपाय सुचविला होता तो मात्र त्यांस पसंत नाहीं. हिंदुस्थानची स्थिति वाईट आहे, ही गोष्ट मि. थॉर्बर्न यांस कबूल आहे; परंतु ती सुधारण्यास कोणते उपाय योजावे याविषयी ते स्वतः कांहींच सांगत नसून खेड्यापाड्यांनीं देखील सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें सरकारनें चौकशी केली पाहिजे व हल्लींच्या दुःस्थितीच्या मुळाशीं कोणतीं कारणें आहेत हें प्रथम निश्चित करून नंतर त्याच्या अनुरोधानें उपाय अमलांत आणिले पाहिजेत एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. अशा चौकशीची अवश्यकता सिद्ध करण्याकरितां त्यांनीं लॉर्ड जॉर्जनीं पुढें आणिलेल्या मुद्यांचा पोकळपणा दाखविला आहे. (१) १८९६—१९०१ या अवधींतील दुष्काळांत १८७६–७८ च्या दुष्कळापेक्षां कमी मनुष्यें मेलीं. (२) शेतकरी व दुष्काळी कामावर गेलेले लोक यांचें शहात्तराच्या दुष्कळाच्या मानानें प्रमाण कमी आहे; (३) पूर्वींच्या दुष्काळाच्या मानानें सध्यांच्या दुष्काळांत लोकांनीं कमी जमिनी सोडून दिल्या, (४) युरोपियन देशांमध्यें, धान्याच्या उत्पन्नाची वाढ, आयात व निर्यात मालाची वाढ, इत्यादिच्या प्रमाणांवरून देशाच्या सुस्थितीची कल्पना करितात त्यावरून पाहतां हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति उत्तरोत्तर सारखी सुधारत आहे अशी चार विधानें आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन साहेबानीं केली होतीं परंतु हीं सर्व चुकीचीं आहेत, असें मि. थॉर्बर्न यांचें म्हणणें आहे. (१) पहिल्या मुद्यासंबंधानें त्यांचें असें म्हणणें आहे, कीं मागील दुष्काळापेक्षां हल्लींच्या दुष्काळांत कमी माणसें मरत असलीं तर तीं दुष्काळी व्यवस्था हल्लीं पुर्वीपेक्षां चांगली आहे, याचें निदर्शक आहे. परंतु १९०१ सालच्या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून पाहतां त्याच्या मागच्या दहा वर्षांत जवळ जवळ दोन कोट लोक दुष्काळामुळें मृत्युमुखीं पडले, असें दिसतें; मग हानी कमी ती कशी ? (२) जर लाटसाहेबांच्या दुसऱ्या मुद्यांत केलेलें विधान बरोबर असेल, तर तसें होण्याचें एवढेंच कारण आहे कीं, पूर्वींच्या दुष्काळांत कामावर घेण्यासंबंधानें, अथवा रोजच्या कामासंबंधानें हल्लींप्रमाणें कडक नियम नव्हते. (३) तिसऱ्या मुद्यासंबंधानें मि० थॉर्बर्न यांचें म्हणणें असें आहे कीं, त्या विधानानें मागच्या दुष्काळांत गुरें अधिक मेलीं एवढेंच सिद्ध होईल. लोकांच्या अंगांत दुष्काळांतून निभावण्याची कुवत अधिक

येत चालली आहे, असें यावरून सिद्ध होत नाहीं! (४) चौथ्या मुद्यासंबंधानें मि. थॉर्बर्न यांचें असें मत आहे कीं, भौतिक उन्नतींत पुढें गेलेल्या राष्ट्रांतील सुखसमृद्धीचें प्रमाण हिंदुस्थानासारख्या देशास लावणें हें अगदीं चुकीचें आहे. हिंदुस्थान एकच परमाणु आहे, असें न मानितां ३० कोटी परमाणूचा संघ आहे, असेंच लक्षांत बाळगिलें पाहिजे. या सर्वांमध्यें देशांतील संपत्तीची वाटणी झाली पाहिजे. एकानें श्रीमंत व्हावें व हजारों लोकांना अन्नाची भ्रांति पडण्याची वेळ यावी, हें सांपत्तिक सुस्थितीचें खात्रीनें द्योतक नाहीं. लॉर्ड जॉर्जनीं आपल्या विवेचनांत फक्त एका वर्गाची स्थिति सुधारली नाहीं, असें म्हटलें आहे. हा वर्ग म्हणजे, ज्यांच्या स्थितीसंबंधानें चौकशी करण्यांत आली होती, असा पंजाब व मुंबई इलाख्यांतील शेतकरी यांचा वर्ग होय. ज्यांची चौकशी झाली होती त्यांची सुस्थिति नाहीं, असें कबूल करणेंच भाग होतें, परंतु बहुधा सर्वत्र शेतकऱ्यांची फारच हीनावस्था आहे, असा १८८० व १९०० च्या दुष्काळ कमिशनांनीं आपल्या पुढच्या पुराव्यावरून अभिप्राय दिला असतां इतर प्रांतांस सुस्थितीच्या सदरांत ढकलणें गैरवाजवी होणार आहे. एवढ्यासाठींच सर्व इलाख्यांमध्यें लोकांच्या खऱ्या स्थितीसंबंधानें चौकशी झाली पाहिजे असें मि० थॉर्बर्न यांचें म्हणणें आहे.

वरेच दिवस कमिशनरचें काम केलेल्या थॉर्बर्नसाहेबांचे हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीविषयीं काय विचार आहेत, व त्यांनीं आमच्या स्टेटसेक्रेटरीसाहेबांच्या सुलतानी तर्कशास्त्राची कशी धुळधाण उडविली आहे, हें वरील विवेचनावरून प्रत्येकाच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. आतां मि. व्हिश यांचें सांप्रतच्या राज्यपद्धतीसंबंधानें काय मत आहे, तें पाहूं. जनरल थॉर्नटन् व कर्नल डोडन यांनीं या बाबतींत ज्या सुधारणा सुचविल्या होत्या, त्यासच यांनीं आपला संमति दिली आहे. (१) हिंदुस्थानच्या सैन्याच्या खर्चासाठीं इंग्लंडच्या खजिन्यांतून कांहींहि न देणें, (२) राज्यकारभार अतिशय खर्चाचा होणें, (३) लोकांच्या हिताहिताच्या बाबींत त्यांच्या इच्छा अथवा मनोवृत्ती इकडे बिलकूल लक्ष न देणें, (४) कायद्याच्या रूपानें, लोकांस कफल्लक बनविणें व त्यांच्यावर सक्ती करणें, (५) व पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या लोकांचा प्रतिनिधी नसणें, या पांच कारणांमुळें लोकांत 'असंतोष' आहे व हें दोष नाहींसे झाल्यास आपली राज्यपद्धति निर्दोष व लोकप्रिय होईल, असें जनरल थॉर्नटन यांचें मत आहे व व्हिशसाहेबांस तें मान्य आहे. परंतु मि. व्हिश यांची मजल याच्याहिपुढें आहे. 'सरकत्या सरहद्दीचें' धोरण बदलल्याशिवाय व पूर्वापार चालत आलेल्या ग्रामसंस्थांचें पुनरुज्जीवन झाल्याशिवाय, लोकांस सुस्थिति येणेंच शक्य नाहीं असें मि० व्हिश यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. याप्रमाणें आपल्या राज्यपद्धतींत मोठासा दोष नसल्याबद्दल फुशारकी मारणाऱ्या

लाटसाहेबांचें म्हणणें त्यांच्याच अधिकाऱ्यानें खोडून टाकिलें आहे. तसेंच लाट-साहेबांच्या कृतीवर खरमरीत टीका केल्यामुळें अप्रिय झालेल्या व तेवढ्यामुळेंच राजद्रोही ठरलेल्या सुशिक्षित लोकसमाजासंबंधानें मि. कॉटन म्हणतात कीं, सुशिक्षित लोकांस इंग्रजी राज्यापासून कोणतें फायदे झाले आहेत ते समजतात, व त्याबद्दल त्यांची सरकाराविषयीं कृतज्ञताबुद्धि आहे. जर कायदेशीर व योग्य उपयांनीं राजकर्त्यांपासून हक्क मिळाविण्याचा प्रयत्न करणें हें अराजानिष्ठतेचें लक्षण असेल, तर मात्र ते राजनिष्ठ नाहींत. वसाहती व हिंदुस्थान हीं दोन्हीं जेव्हां सारख्याच दर्जाचीं होतील, तेव्हां हिंदुस्थानांत सर्वत्र संतोष राहूं लागेल, असें सरसाहेबांच मत आहे.

या वर दिलेल्या तिन्ही लेखकांच्या विचारसरणीचा जर विचार केला, तर अस दिसून येईल कीं, मी म्हणतों तें सर्व खरें, असें म्हणून दुराग्रहानें आपल्या मूर्खपणाच्या मतास चिकटून बसण्याचा काळ आतां संपत आला आहे. वाद-विवादाला सुरवात झाली आहे. व प्रत्येक प्रश्नाचा पुरा खल झाल्याशिवाय हल्लींची सुशिक्षित लोकांच्या मनाची अस्वस्थता नाहींशी होणें शक्य नाहीं. नुसत्या अरेरावीच्या उत्तरानें समाधान होण्याचा मनु आतां राहिला नाहीं. आमच्यांतील पुढाऱ्यांनीं प्रत्येक प्रश्नाचा सार्वजनिकदृष्ट्या विचार केला अस-ल्यामुळें, व हातीं सत्ता नसल्याकारणानें, वादविवादांत खात्रीनें जय मिळावा अशा रीतीनेंच योग्यायोग्य गोष्टींची निवड करून आपली बाजू ते बळकट करीत आहेत. जों जों सरकारी अधिकारी अधिकाधिक विचार करूं लागतील, तों तों आमच्या पुढाऱ्यांच्या म्हणण्याची सत्यता त्यांस अधिकाधिक दिसूं लागेल. व स्वार्थबुद्धीच्या अभावामुळें, त्यांचेसंबंधानें कालांतरानें कां होईना, परंतु पूज्यबुद्धी सर्वत्र उत्पन्न झाल्यावांचून राहाणार नाहीं अशी आम्हांस खात्री आहे. हिंदुस्थानच्या भरभराटीच्या निव्वळ दंतकथांचा काळ फार वेळ टिकणार नाहीं, मात्र खरें कर्तव्य करण्यास परमेश्वरानें आम्हांस बुद्धि दिली पाहिजे, एवढेंच सांगून आम्हीं हा लांबलेला लेख पुरा करितों.

* * *

* आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ?

कोणत्याहि देशाची सांपत्तिक स्थिति निव्वळ शेतीवरच अवलंबून असल्यास ती सदासर्वकाळ चांगली राहणें संभवनीय नसतें. मानवी राजांच्याहि शिरावर असणाऱ्या मेघराजाच्या लहरी स्वभावावरच ज्यांचें भाग्य अवलंबून असतें, ते लोक नेहमीं सुखीच नांदतील असा नियम नाहीं. तथापि या त्यांच्या लहरी स्वभावाचे दुष्परिणाम टाळण्यास फक्त दोनच उपाय आहेत व हे दोन्ही सर्वां-

---

* [केसरी ता. ११ नोव्हेंबर १९०२]

शर्चि केवळ नसले तरी पुष्कळ अंशीं त्या त्या देशांतील राजांचेच हातीं आहेत. यांपैकीं पहिला, लोकांस आपल्या प्रयत्नानेंच ज्यांत सिद्धी मिळवितां येईल अशा तऱ्हेच्या कलांची व उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करणें हा; आणि दुसरा, या मानानें कमी दर्जाचा, परंतु महत्त्वाचा उपाय म्हणजे राजानें आपला भाग कायमचा ठरवून टाकणें, व तो देऊन टाकल्यानंतर शेतकऱ्याच्या कुटुंबाचें वर्षभर पोषण होऊन अवर्षणाच्या वर्षासाठीं त्यास संग्रह करून ठेवण्यास सवड सांपडेल, इतका तो भाग स्वल्प राखणें हा होय. पौराणिक कालापासून तों कंपनीसरकारच्या राज्याची स्थापना होईपावेतों या देशांत जरी बऱ्याच राज्य-क्रांत्या व उलाढाली झाल्या तथापि वर दिलेल्या दोन तत्त्वांस कोणत्याहि देशी अथवा विदेशी राज्यकर्त्यानें झुगारून दिलें नाहीं, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे मनूच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या राजांचा, उत्पन्नाचा $\frac{१}{१२}$ पासून $\frac{१}{६}$ पावेतों जमिनीच्या मगदुराप्रमाणें असलेला कर जरी मुसलमान राजांनीं $\frac{१}{४}$ पावेतों वाढविला, तथापि हा कर वसूल करण्याचें बाबतींत विशेष सक्ती नसल्यामुळें व त्यापेक्षांहि अधिक महत्त्वाचें म्हणजे त्यांनीं उद्योग धंदे ठार करण्याचा यत्किंचित्हि प्रयत्न न करितां, उलट ते वाढविण्याचाच सतत प्रयत्न केल्यामुळें, हिंदु-स्थानचा 'राष्ट्र' या नात्यानें या परकी अमलापासून सांपत्तिक दृष्टीनें मुळींच तोटा झाला नाहीं. मुसलमानी अंमल सुरू होण्यापूर्वी कित्येक शतकें आमचा व्यापार व आमच्यामधील कलाकौशल्य यांनीं परकीयांस मोहून टाकिलें होतें. फार प्राचीनकाळापासूनच या उद्योगधंद्यांचें महत्त्व इकडच्या लोकांच्या हृदयांत इतकें पक्कें बिंबलें होतें कीं, वाल्मीकिऋषींनीं सीतेस क्षौम वस्त्रें लेववून, तिच्या स्वयंवराचा प्रसंग घेऊन त्यांच्या वेळच्या निरनिराळ्या धंद्यांची संक्षेपानें यादी दिली आहे. परंतु व्यासांना येथेंच थांबणें बरें न वाटून व्यापारधंद्यांच्या महत्त्वा-संबंधानें भीष्माकरवीं धर्मराजास त्यांनीं उपदेश करविला आहे. अशा काळां-तील कौशल्याचीं स्मारकें म्हणून लेणीं व स्तंभ अद्यापि कायम आहेत, व आम्हीं कलाकौशल्याचें कामीं इतर देशांच्या मानानें किती पुढें होतों यांचें स्मरण देऊन ते आज उद्वेग उत्पन्न करीत आहेत.

सहाव्या शतकाच्या पूर्वीपासूनच आमचा चीन व इराण देशांशीं व्यापार चांगल्या रीतीनें सुरू होता व दहाव्या शतकापासून भूमध्य समुद्रांतून रोमन राष्ट्राशीं व्यापारास सुरुवात झाली, व रूमशामच्या पातशाहीचा दुसरा भाग जो कुस्तुंतुनीया येथें होता त्याच्याशींहि व्यापार जोरानें चालू लागला. मध्यंतरीं जरी अकरावे शतकांत आरब लोकांच्या उत्कर्षामुळें, व तेराव्या शतकांत वेबंदशाही माजून राहिल्यामुळें, व्यापाराची थोडीबहुत उदासीन स्थिति होती, तथापि सत-राव्या शतकापावेतों, व्यापार कायमचा बसल्याची अथवा व्यापार बुडाल्यामुळें कलाकौशल्य नष्ट होत चालल्याचीं चिन्हें केव्हांहि नव्हतीं. याच शतकाच्या

सुमारास पश्चिमेकडून डीलाव्हेल रे, टार्मर, डॉ. फ्रायर इत्यादि प्रवासी इकडे आले होते व त्यांनीं देखील या देशांतील उद्योगधंद्यांच्या भरभराटीसंबंधानें अत्यंत अनुकूल अभिप्राय दिला होता. एवढेंच नव्हे, तर कंपनीचें राज्य कायमचें स्थापिलें जाण्यापूर्वी अथवा तें झाल्यानंतरहि कांहीं वर्षेंपावेतों, जे कंपनीसरकारचे अनेक अधिकारी इकडे आले त्यांना देखील हिंदुस्थानचे लोक कलाकौशल्याच्या कामीं इतर राष्ट्रांच्या मानानें फारच पुढारलेले होते ही गोष्ट कबूल करावी लागली होती. परंतु लवकरच ही स्थिति पालटली. देशी उद्योगधंदे बुडत चालले कलाकौशल्याचाहि ऱ्हास होऊं सागला. कंपनीसरकारच्या अमदानींत साऱ्याची वाढ कोणत्या तत्त्वावर व कसकशी होत गेली याचा इतिहास आम्हीं गेल्या दोन तीन लेखांत दिलेलाच आहे. आरंभींच वर नमूद केलेल्या दोन उपायांपैकीं एकाची तर विल्हेवाट लागलीच आहे. आतां बाकी जो एक उपाय उरला त्या दिशेनें कंपनीसरकारनें कोणतें धोरण स्वीकारलें व त्याचे दुष्परिणाम आम्हांस कसकसे भोगावे लागले, याचा आज संक्षेपानें इतिहास देण्याचें योजिलें आहे.

कंपनी सरकारानें तराजू एका हातांत ठेवून दुसऱ्या हातांत राजदंड धारण केला, त्यावेळीं हिंदुस्थानचा माल परदेशीं पुष्कळच खपत असे. हिंदुस्थान तलम सुताच्या कापडाबद्दल, तसेंच रेशमी व लोंकरीच्या कापडाबद्दल फार प्रख्यात होतें. काश्मिरी शालीची प्रख्याति फार असे, व 'कालिको' शब्दाची उत्पत्ति 'कालिकत' या गांवापासून झाली एवढें सांगितलें म्हणजे सुती कापड इकडे किती उंच दर्जाचें निघत असे व यासंबंधाने परकी लोकांचें मत काय होतें हें निराळें सांगण्याची अवश्यकताच नाहीं. प्रसिद्ध सर थॉमस मनरो यानें 'हाऊस ऑफ कामन्स कमिटी' पुढें दिलेल्या साक्षींत एका प्रश्नास उत्तर देतांना असें स्पष्ट सांगितलें कीं, 'मी काश्मिरी शालजोडी वापरतों व एकाद्यानें उत्तम विलायती शाल मला जरी नजर म्हणून दिली तरी मी ती वापरणार नाहीं' अशा रीतीनें उत्तम प्रकारचा माल या देशीं निघत असल्याबद्दल कंपनीसरकारच्या अधिकाऱ्याची खात्री होती. तथापि हें कंपनीसरकारच्या विलायती डायरेक्टरांस पसंत पडलें नाहीं, आणि त्यांनी १७६९ सालीं कच्चया मालास उत्तेजन द्यावें व पक्का माल होतां होईल तों होऊं देऊं नये अशा अर्थाचा हुकूम फर्माविला! याच वेळीं त्यांनीं असेंहि कळविलें कीं, कोष्टयांस कंपनीच्याच कारखान्यांत काम करण्यास भाग पाडावें. व ते काम करण्यास तयार नसल्यास त्यांना अधिकाऱ्यांनीं शिक्षा द्याव्या ! कंपनी सरकारचे ठिकाठिकाणीं व्यापारी 'रेसिडेंट' असत व कंपनीनें मागितलेला माल पुरायिण्याचे कामीं हेच जबाबदार असत. यांचे व कोष्टयांचे करार होत. प्रथम काय काय माल पाहिजे या संबंधानें इंग्लंडांतील डायरेक्टर इकडे यादी पाठवीत; त्या या निरनिराळ्या ठिकाणीं राहणाऱ्या रेसि-

डेंटाकडे वांटणीनें येत, व ते जितका माल पाहिजे असेल तितका तयार करवून देत; अशा रीतीनें कंपनीसरकारचा व्यापार चालू होता. या व्यापारांत इतरांनीं आड येऊं नये अशी त्यांची इच्छा होती. व एवढ्यासाठीं वर नमूद केल्याप्रमाणें कंपनीसरकारच्या विलायती डायरेक्टरांनीं जे कोणी कंपनीचें काम करणार नाहींत, त्यांस शिक्षा देण्यास फर्माविलें, आणि या रेसिडेंटांचें स्तोम वाढविण्यासाठीं व इकडील लोकांचे हातपाय बांधून टाकण्यासाठीं १७९३ सालीं तर या बाबतींत त्यांनीं एक ठराव केला. या ठरावान्वयें ज्या ज्या कोष्टयांना कंपनीचे पैसे अगाऊ मिळाले असतील त्यांना करार केलेल्या मालाची भरपाई होईतों दुसरीकडे कोठेंहि कामावर जाण्याची, अथवा आपण तयार केलेला माल दुसऱ्यास विकण्याची मनाई होती ! करारांत ठरलेल्या वेळेस जर माल आणून दिला नाहीं, तर कोष्टयाच्या दाराशीं धरणें बसविण्याचा 'व्यापारी रेसिडेंटास' अधिकार होता. तसेंच कोष्टयानें जर कंपनीची भरती होण्यापूर्वीं आपला माल दुसऱ्यास विकला, तर त्याच्यावर दिवाणी अदालतींत खटला करण्याचाहि सदर रेसिडेंटास अधिकार होता ! हे रेसिडेंट अथवा त्यांच्या हाताखालचे इतर अधिकारी यांना कोष्टयांशीं व्यवहार ठेवण्याच्या कामीं जमीनदार अथवा कुळें यांनीं कोणत्याहि रीतीनें अडथळा करितां कामा नये, व या रेसिडेंटाशीं उद्धटपणानें कोणीहि वागतां उपयोगाचें नाहीं, असेंहि या ठरावांत स्पष्ट नमूद केलें होतें ! कोष्टयानें माल देण्यास उशीर केला असतां त्याच्या पैशांतून ३५ टक्के कापून घेण्याचाहि कायदेशीर अधिकार या रेसिडेंटास देण्यांत आला होता ! कंपनी सरकारचे हे रेसिडेंट कोष्टयांशीं कोणत्या तऱ्हेचें वर्तन ठेवीत व त्यांना जमविण्यासाठीं कशा प्रकारच्या युक्त्या योजीत असत, याचें वर्णन यापूर्वीं आलेलेंच आहे. त्याची आज पुनरुक्ति करण्याची जरूर नाहीं. त्यांनीं केलेले हे प्रकार कशाहि प्रकारचे असोत, त्यांच्या वर्णनापेक्षां त्यांच्या परिणामाकडेच आपणास नजर दिली पाहिजे. आणि अशा रीतीनें या सर्व गोष्टींचा विचार करू लागलें असतां, अशा प्रकारच्या जुलुमानें दिवसेंदिवस कला नष्ट होत जाणें किती स्वाभाविक आहे, हें कोणाच्याहि लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. कलाकौशल्याची अभिवृद्धि होण्यास व्यापार चांगला चालला पाहिजे, माल वाटेल त्या ठिकाणीं खपविण्याची माल तयार करणाऱ्यास परवानगी पाहिजे, म्हणजे तो उत्तम भाव येईल तेथें तो विकील, व त्याच्या कुशलतेच्या मानानें त्यास कमीजास्ती किंमत मिळत जाईल, आणि अधिक चांगला माल तयार करण्यास त्यास हुरूप व उत्तेजन येईल. आतां कंपनीसरकारच्या अमदानींत याच्या अगदीं उलट प्रकार होता. कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं स्वतःच्या फायद्याकारतां, अथवा कंपनीच्या हितासाठीं म्हणून बहुतेक सर्व प्रकारचा व्यापार आपल्या

मुठींत आणून ठेविला होता. हेच अधिकारी कोष्टयांच्याहि मागें लागले, तेव्हां शिक्षेच्या भीतीनें मात्र ते लोक काम करूं लागले. अर्थातच कौशल्य नाहींसें होत चाललें. परंतु अशा रीतीनें जबरीनें काम घेणें एवढाच काय तो त्या वेळच्या राज्यपद्धतींत दोष होता असें नाहीं. यापेक्षांहि शतपट अधिक वाईट अशी कृति कंपनीसरकारानें त्यावेळीं केली व तिचा दुष्परिणाम आमच्या सांपत्तिक स्थितीवर फारच घातक झाला. हिंदुस्थानच्या मालास उत्तेजन दिल्यानें इंग्लंड भिकार बनेल, अशी कंपनीसरकारच्या डायरेक्टरांस भीति पडल्यामुळें इकडून कच्चा माल मात्र अधिकाधिक येत जावा व त्यापासून इंग्लंडच्या कारखान्यांत तयार झालेला माल या देशीं यावा, अशी स्थिति आणण्यासाठीं ते सारखे प्रयत्न करूं लागले; व १७६९ मधील त्यांनीं हिंदुस्थानांतील आपल्या अधिकाऱ्यांस सोडलेला हुकूम हा प्रयत्नांचा पहिला हप्ता होय. कोष्टयांस आपणास वाटेल त्या कामास वाटेल तेव्हां लावण्याचा कंपनी सरकारचे अधिकाऱ्यांस अधिकार असल्यामुळें, देशी लोकांचे कारखाने बुडत चाललेच होते. त्यांत आणखी या एका अन्यायाची भर पडल्यामुळें कारखाने साफ बुडाले. रेशमी माल विलायतेस पाठविण्याची बंदी झाली व सुती मालावरहि भयंकर जकात बसविण्यांत आली. कोणकोणत्या प्रकारच्या मालावर किती किती जकात बसविली होती, हें पुढें दिलेल्या दोन कोष्टकांवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

कोष्टक १

	१८१२	१८२४	१८३२
	किंमतीवर शेंकडा जकात	किं. वर शे. ज.	किं. वर शे. ज.
नकशीचें वेताचें काम	७१	५०	३०
मझलिन	२७$\frac{1}{3}$	३७$\frac{1}{2}$	१०
कॅलिको	७१$\frac{2}{3}$	६७$\frac{1}{2}$	१०
इतर सुती वस्त्रें ...	२७$\frac{1}{3}$	५०	२०
बकऱ्याच्या लोंकरीच्या शाली	७१	६७$\frac{1}{2}$	३०
लाखेचे पदार्थ ...	७१	६२$\frac{1}{2}$	३०
चटया	६८$\frac{1}{3}$	५०	२०

कोष्टक २

	१८१२	१८२४	१८३२
कच्चें रेशीम.	किंमतीवर शें. २पौं. १३ शि.४पे. खेरीज प्रत्येक वजनी पौंडास ४ शि.	प्रत्येक पौंडास ४ शिलिंग.	प्रत्येक पौंडास १ पेन्स
रेशीम पदार्थ. तापते किंवा इतर नकशी केलेले पदार्थ. रेशमी वस्त्रें	इंग्लंडांत पाठविण्याची बंदी होती.	बंदी होती.	किंमतीवर शें. २० किंमतीवर ३० किंमतीवर २०
साखर(मूळाकिंमत) एका हंड्रेडवेटास १ पौंड.	जकात प्रत्येक हंड्रेडवेटास १ पौंड १३ शिलिंग.	प्रत्येकहंड्रेडवेटास ३ पौं. ३ शिं.	प्रत्येक हंड्रेडवेटास १ पौं. १२ शि.
दारू (गुळापासून केलेली.)	प्रत्येक ग्यालनास १ शि. ८ पे. खेरीज १९ शि. 1^{1} पे. जकात.	प्रत्येक ग्यालनास २ शिं. १ पे. खेरीज १७ शि. $1\frac{3}{4}$ पे. जकात.	दर ग्यालनास १५ शि.
निमसुती कापड.	दर १०० (वजनी) पौंडास १७ शि. ११ पे.	शेंकडा ६	शेंकडा २०

इकडे तयार झालेल्या मालावर अशा तऱ्हेनें भयंकर जकात बसविण्यांत आली, परंतु इंग्लंडमध्यें तयार झालेला माल मात्र फक्त २ $\frac{1}{2}$ टक्के जकातीवर इकडे येत असे. विलायती मालाचीं प्रदर्शनें करण्यांत येऊं लागलीं, व लॉर्ड वेल्सलीसारखे बडे लोक, रोहिलखंड, हरिद्वार वगैरेमध्यें निरनिराळ्या जत्रांत विलायती माल लोकांस मुलविण्यासाठीं मांडून ठेवूं लागले. राज्यकर्त्यांच्या कोणत्याहि इच्छा प्रायः पूर्ण होतात व डायरेक्टरांच्या इच्छेप्रमाणें हिंदुस्थानांत चांगला माल निघण्याचें बंद होऊन विलायती माल दरवर्षीं अधिकाधिक प्रमाणानें इकडे येऊं लागला. परदेशीं आमचा माल आम्हांस पाठावितां येऊं नये, इतकेंच करून हे अधिकारी थांबले नाहींत; त्यानीं देशांतल्या देशांत पाठाविल्या जाणाऱ्या देशी मालावर देखील जबर जकात बसविली. कच्चा मालावर

५ टक्के जकात बसविण्यांत आली व पुढें त्याच्या वस्तू बनविल्यास, त्यांच्यावर १५ पासून १७ टक्केपावेतों जकात घेण्यांत येत असे ! फक्त एकच उदाहरण घेतलें तरी याची वाचकांस चांगली समजूत पडणार आहे. देशांतल्या देशांतच गुरांढोरांचीं कांतडीं पाठवावयाचीं असल्यास त्यांवर जकात ५ टक्के, कमावलेलें कांतडें पाठविण्याचें असल्यास आणखी ५ टक्के, म्हणजे एकंदरीनें १० टक्के, व त्याच कांतड्याचे जोडे वगैरे तयार करून पाठविले असल्यास त्यावर जकात १५ टक्के ! ! ही जकात वसूल करण्यासाठीं ठिकठिकाणीं रस्त्यावर व गांवाबाहेर अशीं नाकीं बसविलेलीं होतीं व नाकेदार फार प्रामाणिक असल्यामुळें, त्यांना बक्षीसी देण्यांतच व्यापाऱ्यांचा जीव दमून जाई. अशी देशांतील अंतःस्थिति असल्यामुळें व्यापार बुडत चालला, व त्याबरोबरच कलाकौशल्याचा ऱ्हास जारीनें होत चालला ! याचा अर्थात् परिणाम म्हणजे विलायती माल चोहोंकडे फडकूं लागला. तशांत इकडूनच जहाजें भरभरून नेलेले पैसे भांडवल म्हणून उपयोगी पडूं लागल्यामुळें व वाफेची अदृश्य शक्ति एकाएकीं गोचर झाल्यामुळें, विलायतेंत एक मोठें यांत्रिक स्थित्यंतर घडून आलें होतें. तसेंच भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष सारखा होत चालला होता, व प्रत्येक धंद्यांत शास्त्रीय पद्धति अमलांत येऊं लागली होती. या देशांतून परदेशीं पैसे नेण्यास कंपनीसरकारचे डायरेक्टर जितके उत्सुक होते, त्या मानानें तिकडील नवीन कला इकडे प्रचलीत करण्यांत जर एक सहस्त्रांश उत्सुकता दाखविली असती, तर हिंदुस्थान आज मेल्यासारखा निश्चेष्ट खचित पडला नसता. परंतु त्यांनीं इकडच्या कारखान्यांस उत्तेजन तर दिलेंच नाहीं, परंतु माल पाठविण्याची मनाई करून व इतिहासांत अश्रुतपूर्व असणाऱ्या राक्षसी जकाती बसवून ते कारखाने ठार करण्याची मात्र सारखी खटपट केली. त्यांची इच्छा पूर्णपणें सफल झाली. आमचा तयार झालेला माल परदेशीं जाईनासा झाला, व विलायती माल मात्र अधिकाधिक इकडे येऊं लागला. नीळ मात्र या देशांतून परदेशीं पुष्कळ जात असे. परंतु निळीचा व्यापार विलायती व्यापाऱ्यांच्याच हातीं होता व हल्लीं चहाची लागवड करणाऱ्या लोकांप्रमाणेंच त्यांस हक्क देण्यांत आले होते. याप्रमाणें व्यापाराची स्थिति होती. कोष्टयाचा धंदा कसा बसला हें वर दिलेंच आहे. आतां याशिवाय इतर किरकोळ कांहीं धंदे राहिले होते. गाडीवानांचा धंदा, नावाड्यांचा धंदा अशा प्रकारचेच लहानसहान धंदे राहिले होते; कारण कलाकौशल्याच्या कामाची काय व्यवस्था लागली, हें आतां वाचकांस माहीत झालेंच आहे. हे किरकोळ धंदे देखील बुडत चालले. आगगाड्या इकडील लोकांच्या फायद्यासाठीं, सोईसाठींच—परकी व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीं अथवा लष्कराचे मदतीसाठीं नव्हे हो—जेव्हां इकडे अवतीर्ण झाल्या, त्या वेळेपासून या लोकांचेहि धंदे गेले. एकट्या गंगेच्या प्रवा-

हांतून मालाची नेआण करणारे १७८० मध्यें ३०,००० नावाडी होते, एवढ्या एकाच गोष्टीचा जरी विचार केला तरी आगगाडीनें किती नावाड्यांच्या व किती गाडीवानांच्या तोंडचें अन्न काढून घेतलें असेल व आपल्या श्रीमंत मालकांस चारिलें असेल, याची चांगली कल्पना करतां येण्यासारखी आहे. शेतकरी लोकच गाडीवानांचा धंदा बहुशः करीत असतात. तेव्हां त्यांस जबर साऱ्याबरोबर दुसरी कोणती गोष्ट निर्धन करीत आहे, याची सहज कल्पना करितां येण्यासारखी आहे. परंतु वर्तमानकाळाशीं आपला अद्यापि संबंध आला नसून फक्त भूतकाळाशींच आहे. म्हणून तेवढ्यापुरताच इतिहास जर पाहूं गेलों तरी उद्योगधंदे कसे बुडाले, याविषयीं किती उद्वेगजनक व विलक्षण अशी माहिती या बाबतींत सांपडते, याची कल्पना वरील विवरणावरून वाचकांस येणार आहे. हिंदुस्थानचा व्यापार ठार झाला अथवा येथील लोकांचे उद्योगधंदे बुडाले, यांत नवल नाहीं. जर अशा तऱ्हेचे कायदे इंग्लंड देशास लागू केले असते, अथवा इतकी परतंत्र स्थिति, जर दहाबीस वर्षेंच इंग्लंड देशांत राहिली असती, तर तें राष्ट्र केव्हांच रसातळास गेलें असतें, असें मानणें तर्कशास्त्रास सोडून होणार नाहीं, एवढेंच सांगून आजचा हा लांबलेला लेख पुरा करितों.

◆ ◆ ◆

* आणखी गोरें सैन्य पाहिजे ! !

हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा प्रतिवर्षीं आमच्या स्टेट सेक्रेटरीस पार्लमेंटापुढें मांडावा लागतो व हा सभेपुढें ठेवितांना एक लांबलचक भाषण करणेंहि त्यास जरूर असतें, या नियमास अनुसरून लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनीं चालू सालचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक ता. १० रोजीं पार्लमेंटच्या सभासदांस सादर केलें. आमच्या नबाबसाहेबांचें समग्र भाषण अद्यापि इकडे आलेलें नाहीं; तथापि रूटरनें, त्यांनीं केलेल्या पांडित्याचा गोषवारा दिला आहे, तेवढ्यावरून देखील त्यांच्या भाषणाची सामान्य कल्पना करितां येणार आहे. इंग्लंडच्या लोकांचें हिंदुस्थानच्या कारभाराकडे कितपत लक्ष आहे, व लढाईच्या, बडाच्या अथवा अशाच प्रकारच्या इतर धामधुमींच्या बातम्या शिवायकरुन ते या देशासंबंधाच्या अन्य बाबींकडे कितपत लक्ष पुरवितात, याचा आजपावेतों अनेक प्रसंगीं अनुभव आलेला आहे. अशा स्थितींत निवळ आंकडे मोडीनें रुक्ष झालेलें भाषण ऐकावयाला किती सभासद येण्याचा संभव आहे व हजर असलेल्या सभासदांपैकीं कितीजण हें आंकड्यांचें प्रदर्शन पाहाण्यासाठीं जागे रहात अस-

---

* [केसरी ता. १८ नोव्हेंबर १९०२]

तील, याची मागल्या अनुभवावरून बिनचूक अटकळ बांधितां येण्यासारखी आहे. तेव्हां अशा रीतीनें निर्विकल्प समाधींत डुलत राहणाऱ्या मुठभर योग्यांपुढें आमच्या योगक्षमाची काळजी वाहणाऱ्या योगिराजांनीं जें पांडित्य केलें, त्यांतील एका महत्त्वाच्या भागाचा विचार करावयाचें आज योजिलें आहे.

आमच्या इंग्लंडांतील बड्या लाटसाहेबांनीं परवां जें भाषण केलें त्यांत थोड्या वेळांत त्यांनीं पुष्कळच विषयांवर पांडित्य केलें. हिंदुस्थानची सारखी सुधारत चाललेली सांपत्तिक स्थिति, परकी राष्ट्रांशीं हिंदुस्थानसरकारचें सख्य, आपणच राज्यारोहणाचे उत्सवांत सामील होण्यासाठीं बोलाविलेल्या पाहुण्यांचा खर्च इंग्लंडच्या तिजोरीनें सोसण्यांत इंग्लंडच्या प्रधानमंडळानें दाखविलेलें औदार्य, इंडिया ऑफिसच्या टोलेजंग मेजवानीचें व दिल्लीदरबारचें हिंदुस्थानांतील लोकांची राजानिष्ठा जगाच्या नजरेस आणून देण्याच्या कामीं असलेलें महत्त्व; तसेंच इंग्लंडच्या महायात्रेस जमलेल्या हिंदुस्थानांतील यात्रेकरूंच्या वर्तनावरून या देशाच्या राजनिष्ठ स्वभावाची आपणास पटलेली ओळख, व दिल्लीदरबारच्या वेळेस राजसूययज्ञांतील 'लॉर्ड अर्जुनाची' जागा घेणारे लॉर्ड कर्झन यांची अप्रतिम कर्तबगारी, इत्यादि मोठमोठ्या महत्त्वाच्या विषयांवर हॅमिल्टनसाहेबांनीं आपल्या शैलीस अनुसरून पुष्कळच बडबड केली आहे. यांपैकीं प्रत्येक विषय घेऊन त्यासंबंधानें यथास्थित चर्चा करीत बसण्यास आमच्या जवळ तितकी जागा नाहीं, व यांपैकीं बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें वेळोवेळीं आमचा अभिप्राय प्रकट केला असल्यामुळें, पुनः त्याच बाबतींत विस्तारानें चर्चा न करतां त्याचें थोडेसें दिग्दर्शन दुसरीकडे केलें आहे. हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारत चालली आहे, असें लॉर्ड जॉर्ज आजच म्हणताहेत असें नाहीं, या देशाच्या भरभराटीची दंतकथा ते व त्यांच्या हाताखालचे अधिकारी, वर्षानुवर्ष सांगत आले आहेत; आणि त्यांच्या या म्हणण्याचा पोकळपणाहि वारंवार दाखविण्यांत आलेला आहे. शिवाय हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें जी लेखमाला आम्ही प्रसिद्ध करीत आहों व जिचें शेवटचें पुष्प आज गुंफण्याचा आमचा विचार होता त्यांत याच प्रश्नाचा विचार व्हावयाचा आहे. या कारणानें या प्रश्नाकडे न वळतां, लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टनसाहेबांच्या भाषणांतील दुसऱ्याच एका महत्त्वाच्या मुद्याकडे वळण्याची आमची इच्छा आहे.

हॅमिल्टनसाहेबांनीं परवां जें अपूर्व भाषण केलें, त्यांत त्यांनीं मोठ्या शिताफीनें हळूच पण एक मोठ्या खर्चाची बाब पुढें ढकलली आहे. "दुसऱ्यावर आपण होऊन स्वारी करावयाची नाहीं; परंतु कोणीहि आपल्यावर चालून आल्यास आपण त्याचा प्रतिकार करण्यास तयार असावयाचें, हें जें आजपावेतों हिंदुस्थान सरकारचें लष्करी धोरण आहे, तेंच अद्यापि कायम आहे; तथापि इतर राष्ट्रांची जितकी शास्त्रीय

पद्धतीची लष्करी सिद्धता आहे, तितकी या सरकारासहि करणें भाग आहे व यामुळें नवीन लष्करी सामान आणण्याची व अधिक गोरें सैन्य ठेवण्याची अवश्यकता वाटून लष्करी खात्यांतील खर्च वाढण्याचा संभव आहे.'' असें या देशाची स्थिति सुधारत चालल्याबद्दल स्तोत्रपाठ करितां करितां मध्येंच आमच्या नबाबसाहेबांनीं बोलून दाखविलें. हें वरील वाक्य वाचून पाहिलें असतां, हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत बरीचशी शिल्लक राहिली असतांहि लॉर्ड कर्झन व लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन या दोन्ही बड्या लाटांनीं आमच्या लोकांवरचे कोणतेहि कर कमी करावयाचें कां नाकारिलें याचें इंगित चटकन् ध्यानांत येण्यासारखें आहे. या देशाचा वसूल हल्लीं इतकाच राहील, अशी पक्की खात्री होईपर्यंत कोणतेहि कर कमी करण्याचें सरकारच्या मनांत कां येत नाहीं, याचा लाटसाहेबांच्या भाषणावरून सहज उलगडा होण्यासारखा आहे. परंतु कर कमी न करण्यांत या लाटद्वयाचा कोणताहि हेतु असो, त्या हेतूसंबंधानें चर्चा करण्यापेक्षां हल्लीं जी सूचना इंग्लंडच्या आमच्या बड्या लाटांनीं पार्लमेंटपुढें हळूच मांडिली आहे तिच्याच बरेवाईटपणाचा विचार करणें अधिक श्रेयस्कर होणार आहे; व यासाठीं हॅमिल्टनसाहेबांनीं खर्च वाढवावा लागेल, असें गुळमुळीत रीतीनें सांगतांना हिंदुस्थानसरकारचें आजपर्यंतचें लष्करी धोरण ज्या प्रकारचें आहे म्हणून नमूद केलें आहे, तसेंच तें आहे कीं काय, हें आपण पाहूं.

हिंदुस्थान जिंकण्यास कंपनीसरकारनें सुरवात केली तेव्हांपासून लष्करी खर्च सारखा वाढत आहे व या खर्चानेंच पुष्कळ अंशीं हिंदुस्थान अगदीं जेरीस आलें आहे, ही गोष्ट दुराग्रही अथवा मतलबी लोक शिवाय करून इतरांच्या नजरेस सहज येण्यासारखी आहे. कंपनीसरकारचें लष्करी धोरण स्वतःचा बचाव करण्याचें होतें, कीं दुसऱ्यावर आपण होऊन स्वारी करण्याचें होतें, हें आम्ही सांगण्यापेक्षां एका अर्ध्या शतकांत कंपनीसरकारच्या ताब्यांत आलेला अवाढव्य मुलुखच अधिक स्पष्ट रीतीनें सांगेल. या कंपनीसरकारच्या हातांतिल सर्व राज्यसूत्रें हिसकावून घेतलीं जाण्यापूर्वी जे अनेक गव्हर्नर जनरल येऊन गेले, त्यांपैकीं प्रायः कोणीहि राज्य-विस्ताराच्या हांवेपासून सर्वांशीं मोकळा नव्हता, ही गोष्ट इतिहासाच्या वाचकांस सांगावयास नको. ज्या वावटळीनें कंपनीसरकारास सातासमुद्रापलीकडे फेंकून देऊन त्यास समाधि दिली, ती वावटळ सुटण्यापूर्वीं आलेले लॉर्ड डलहौसीसाहेब यांना लोकांचीं राज्यें घेण्याची किती हौस होती हें त्यांच्या कारकीर्दीच्या अखेर जें बंड झालें त्यावरून चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे. डलहौसी साहेबांच्या कारकीर्दीच्या एकंदर धोरणावरून कंपनीसरकारचें धोरण राज्यविस्ताराचें होतें, व या कामीं जे कोणीं अडथळा करतील त्यांच्यावर शस्त्र उपसणें हें त्यांचें क्रमानुसार त्यांच्यावर येऊन पडलेलें कर्तव्यच होतें. अशा प्रकारच्या धोरणास स्वतःच्या संरक्षणाचें धोरण असें म्हणणें अगदीं गैरवाजवी

आहे. १८५८ सालीं जरी हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें कंपनीसरकारच्या हातून खुद्द इंग्रजसरकारच्या हातीं गेलीं, तथापि लॉर्ड डलहौसीसाहेबांचें धोरण सर्वस्वीं बुडालें, व त्यांच्यामागून कोणीहि गव्हर्नजनरलनें तें अंशतः सुद्धां स्वीकारिलें नाहीं, असें खुद्द आमच्या बड्या लाटसाहेबांस देखील म्हणतां यावयाचें नाहीं. जर या पांचपंचवीस वर्षांतल्या स्थितीची त्याच्यापूर्वीच्या स्थितीशीं तुलना केली तर, परका शब्दाचा अर्थ फक्त युरोपियन राष्ट्रें एवढाच हल्लीं झाला आहे, व त्यांच्या अंगावर आपण होऊन चालून जावयाचें नाहीं एवढा मात्र हिंदुस्थानसरकारचा कृतसंकल्प आहे. बाकी आपल्या मांडलिकांपैकीं कोणावर आपण होऊन सैन्य पाठवावयाचें नाहीं, अथवा इतर रानटी लोकांची सुधारणा व्हावी एवढ्याचसाठीं, त्यांना आपल्या अंकित करून ठेवण्यासाठीं त्यांच्यावर शस्त्र उपसावयाचें नाहीं, असा मात्र या 'बचावाच्या धोरणाचा' मुळींच अर्थ नाहीं ! रशियाशीं भिडावें लागेल या भीतीमुळेंच, अफगाणिस्थान जिंकण्यासाठीं अफगाण लोकांवर स्वारी करावी लागली, व त्याच कारणानें सरहद्दीवरच्या लढाया कराव्या लागल्या. या परकी राष्ट्रांच्या भीतीमुळेंच ब्रह्मदेशचें राज्य बळकावण्यांत आलें. अशा दृष्टीनें पाहिलें असतां, हिंदुस्थानसरकारचें लष्करी धोरण जरी रशियासंबंधानें बचावाचें असलें, तथापि एकंदरीनें 'चालून जाण्याचेंच' आहे, ही गोष्ट प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करावी लागेल. १८८५ सालीं पेंजदे प्रकरण उद्भवल्यामुळें लष्करी खर्चांत एकदम दीड लक्ष पौंडांची कायमची भर पडली, परंतु त्यानंतर ब्रह्मदेशच्या लढाया सरहद्दीवरच्या किरकोळ लढाया, व टिऱ्हा प्रांतावर स्वारी इत्यादि लढायांसच अकरा वर्षांत एक कोटी चाळीस लक्ष पौंड अथवा हल्लींच्या भावानें एकवीस कोट रुपये खर्च झाले. ज्या लष्करी धोरणामुळें इतका भयंकर खर्च करावा लागतो, त्यास ' गुपचुप बसण्याचें धोरण ' असें म्हणावयाचें असल्यास जगांतील प्रत्येक राष्ट्राचें हेंच धोरण आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

हिंदुस्थानच्या लष्करी खात्याचा खर्च सारखा वाढत आहे व यापैकीं बराचसा भाग कमी करतां येण्यासारखा आहे, अशी इकडील पुढारी आज २० वर्षें तरी जोरानें तक्रार करीत आहेत. १८५७ सालीं कंपनीच्या अमदानींत ४०००० शिपायांचें गोरें लष्कर व २१५००० लोकांचें काळें सैन्य होतें, परंतु इंग्रज सरकारच्या हातीं प्रत्यक्ष रीतीनें राजसत्ता आल्याबरोबर त्यांनीं देशी लोकांचें सैन्य कमी केलें व गोरें वाढविलें. अशा रीतीनें १८५८ सालीं लष्करी खर्च एकदम वाढला व पूर्वापेक्षां पुष्कळच अधिक पैसे परदेशीं जाऊं लागले. १८८० च्या सुमारास काळ्या लष्करांत जवळ जवळ सवा लक्ष लोक होते व बासष्ट हजार सोजिरांस आमच्या तिजोरींतून पगार मिळत असे. पुढें वर नमूद केल्याप्रमाणें १८८५ त पेंजदे प्रकरण उपस्थित झाल्यामुळें १०६५७ गोऱ्या

लोकांची पूर्वीच्या सैन्यांत भर पडली. या भरीनें दर वर्षाचा खर्च दीड लाख पौंडांनीं वाढला, व याशिवाय सैन्य तयार ठेवण्यांत दोन कोट रुपयांचा चुराडा उडाला ! यानंतर गोरें सैन्य वाढविण्याचा आज पावेतों जरी कोणी प्रयत्न केला नाहीं, तथापि लष्करी खर्च मात्र कांहींना कांहीं तरी कारणांनीं सारखा वाढत आहे. मधून मधून केलेल्या लढायांचा खर्च शिवाय करून फक्त सैन्याचाच प्रति-वर्षींचा खर्च वेल्बीकमिशननें स्वतः ठरविल्याप्रमाणें १,६१,४७,००० पौंडांपासून २,३३,०२,००० पौंडांपावेतों १८८५ पासून १८९६ पर्यंत म्हणजे जवळजवळ अकरा वर्षांत वाढला आहे ! वेल्बी कमिशनच्या सूचनेस अनुसरून इंग्लंडच्या पार्लमेटनें या ओझ्यापैकीं फक्त २, ५७,००० पौंड म्हणजे अजमासें ३८॥ लक्ष रुपयांचा भार आपल्या तिजोरीवर टाकला. याप्रमाणें पूर्वापार चालत आलेल्या अन्यायाची जराशी दाद लागून हिंदुस्थानच्या तिजोरीवरचें थोडेसें ओझें शंभराव्या हिश्शानें तरी कमी होतें न होतें, तोंच नोकरीची मुदत भर-लेल्या शिपायांस भूयसी (बौंटी) वाटण्यासाठीं, १ कोट ५७ लक्ष रुपयांचा नवीन बोजा या हतवीर्य रयतेच्या पाठीवर लादण्यांत आला आणि त्या प्रश्नाचा पुरता निकाल होतो न होतो तोंच आणखी ओझें लादण्याचा आमच्या कन-वाळु स्टेट सेक्रेटरींचा विचार आहे ! रशिया आणि इंग्लंड हीं दोन्हीं राष्ट्रें प्रबळ आहेत व श्रीमंत आहेत परंतु या दोघांच्या या देशासंबंधाच्या भांडणांत मधल्या मध्येंच आमचा चुराडा होत चालला आहे !

इंग्लंडचें साम्राज्य परशत्रूपासून कायम राखण्यासंबंधाचा सर्व खर्च इंग्लंडनेंच सोसला पाहिजे, हें उघड दिसून येणार आहे. हल्लीं जेवढें गोरें सैन्य आहे, तेवढ्याची देखील या देशांत शांतता ठेवण्यास जरूर नाहीं. दोन दोन वर्षें या गोऱ्या सैन्यापैकीं दहा बारा हजार लोक जरी हिंदुस्थान सोडून गेले, तरी येथील शांततेचा भंग होत नाहीं, ही गोष्ट सरकारच्या अनुभवास आलेली आहे. शिवाय तसाच प्रसंग पडल्यास इंग्लंडांतून या देशीं सैन्य येण्यासहि एक पंधरवड्यापेक्षां अधिक दिवस लागणार नाहींत आणि रशियाशीं झुंजण्याची वेळच आल्यास, बरेंचसें सैन्य इंग्लंडहून पाठविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत हल्लीं असलेल्या गोऱ्या सैन्याची संख्या कमी न करणें, हेंच मुळीं अन्यायाचें आहे. या इंग्रजी पलटणींत आमच्या लोकांचा प्रवेशच नसल्यामुळें हा सर्व पैसा थेट विला-यतेस जातो, व या कारणानें आमच्या सांपत्तिक अवनतींत आणखी भर पडते. तशांत दुष्काळ व प्लेग हेहि या देशाच्या पाठीस हात धुवून लागले आहेत. या अनेक कारणांमुळें हिंदुस्थानांत असलेलें गोरें सैन्य कमी करणें हेंच हिंदु-स्थानसरकारचें खरें कर्तव्य आहे, अशी वस्तुस्थिति असतां, असलेलें सैन्य कमी करण्याऐवजीं, तें वाढविण्याची सूचना आमच्या स्टेट सेक्रेटरीसाहेबांनीं पुढें आणावी, हें आमचें दुर्भाग्य होय. हिंदुस्थानचें डोकें तूर्त वर निघूं नये अशीच

परमेश्वराची इच्छा असल्याशिवाय, अशी दुर्बुद्धि आमच्या दिवाणसाहेबांस झालीच नसती. काबूलच्या अमीराशीं आपलें सख्य कायम आहे, परक्या शत्रूची भीति नाहीं, असें जे गृहस्थ बोलून दाखवितात व हिंदुस्थानच्या लोकांच्या राजनिष्ठेबद्दल स्वतःची साक्ष देतात, त्यांसच आणखी गोरें सैन्य न ठेविल्यास हिंदुस्थान आपल्या हातांतून जाईल अशी भीति वाटावी, हे वारांगनेप्रमाणें क्षणोक्षणीं भिन्नभाव दाखविणाऱ्या राजनीतीचे म्हणण्यापेक्षां आमच्या दैवगतीचे खेळ आहेत असेंच म्हटलें पाहिजे. ज्या दिवशीं हें बजेट सभेपुढें ठेवण्याचा फार्स झाला, त्याच दिवशीं गिल्डहॉल येथील मेजवानीच्या प्रसंगीं मि. बाल्फोर यांनीं सर्व युरोपियन राष्ट्रांचा शांतता कायम राखण्याचा निश्चय आहे, असें बोलून दाखविलें. तेव्हां शांतता राखण्याची इच्छा व सैन्य वाढविण्याची आवश्यकता या दोन गोष्टींचा कसा मेळ घालावयाचा, हें इंग्लंडाच्या प्रधानमंडळासच माहीत ! कांहीं असो, परंतु अशा रीतीनें जो अन्याय करण्याचा हिंदुस्थानसरकारचा विचार आहे, त्यासंबंधानें वेळींच सावध होऊन आपण आपलें म्हणणें सरकारास कळविलें पाहिजे. या तक्रारींचा किती उपयोग होईल हें जरी आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसत असलें, तथापि आपण आपलें कर्तव्य करण्यास चुकतां कामा नये. हा जादा खर्च हिंदुस्थानच्या लोकांस मान्य होता, असें आपल्या अधिकाऱ्यांस म्हणण्यास तोंडच राहूं नये, असें करणें आपलें कर्तव्य असून त्यास लोकांचे पुढारी व अहमदाबादेस भरणारी राष्ट्रीय सभा जागेल, अशी आशा प्रदर्शित करून हा लांबलेला लेख पुरा करितों.

❖ ❖ ❖

*कंपनीसरकार व इंग्रजसरकार

कंपनीसरकारच्या अमदानीस सुरवात झाल्यापासून आमची सांपत्तिक स्थिति कसकशी बदलत गेली, याचा संक्षिप्त इतिहास आम्ही मागच्या चारपांच लेखांत दिलेला आहे. १७५७ सालीं प्लासीच्या लढाईमुळें कंपनीचें वर्चस्व कसें वाढलें व १७६५ सालापासून म्हणजे मोंगल बादशहापासून बंगालच्या दिवाणीचा हक्क मोठ्या शिताफीनें मिळविल्या वेळेपासून, ईस्ट इंडिया कंपनीचें कंपनी-सरकार कसें बनलें, व या नवीन बनलेल्या सरकारच्या अधिकाऱ्यांनीं कसा धुमाकूळ घातला, तसेंच त्यांनीं आपली तुमडी भरून घेण्यासाठीं किती अन-न्वित कृत्यें केलीं, इत्यादि अनेक गोष्टींचा उहापोह मागेंच करण्यांत आला आहे. तेव्हां या लेखमालेस गेल्या शतकाच्या इतिहासाची पुरवणी जोडून ती संपविण्याचा आज विचार आहे.

कोणत्याहि राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करावयाचा असतां त्या राष्ट्रांतील लोकांचा चरितार्थ कशावर अवलंबून आहे व प्रत्येक मनुष्य स्वतः करतां म्हणून जितकें द्रव्य उत्पन्न करण्यासाठीं अथवा मिळविण्यासाठीं खटपट करितो, त्यांपैकीं त्यास किती मोठ्या भागाचा उपभोग घ्यावयास सांपडतो, हें पाहणें जरूर आहे. तसेंच सरकारच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करावयाचा असतां राष्ट्रांतील संपत्ती वाढविण्यासाठीं सरकारानें कोणकोणते उपाय अम-लांत आणले आहेत व आपल्या अमलाखालीं असलेल्या लोकांस अधिक द्रव्यार्जन करतां येण्याच्या कामीं कसकसें सहाय केलें आहे हें पाहणें आवश्यक आहे. तथापि वर दिलेल्या गोष्टी बहुतांशीं परस्परांवर अवलंबून आहेत आणि सरकार म्हणजे प्रजेच्या कल्याणासाठीं अस्तित्वांत आलेली संस्था अशा दृष्टीनें पाहूं गेल्यास प्रजेच्या सांपत्तिक स्थितीच्या मुळाशीं सर्वतोपरी सरकारचें धोरणच असतें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अशा दृष्टीनें इंग्रज लोकांच्या कंपनीनें डाव्या हातांत तागडी व उजव्या हातांत राजदंड, अशीं दोन्हीं आयुधें धारण करण्यास सुरवात केल्या वेळेपासून या देशांतील लोकांच्या हितासाठीं तिच्या अधिकाऱ्यांनीं कोणकोणतीं महत्कृत्यें केलीं, याची आमच्या वाचकांस चांगली ओळख झाली आहे. १८०० सालापावेतों कंपनीसरकारच्या अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं जें जें वर्तन केलें त्यावरून पाहिलें असतां इकडील लोकांच्या हितासाठीं झटण्याची थोडीबहुत तरी जबाबदारी आपणावर आहे, असें त्यांपैकीं प्रायः कोणासहि वाटत असल्याचें दिसून येत नाहीं. उलट पक्षीं जसा दरवडेखोरास आपल्या घरापासून पुष्कळ अंतरावर

---

*[केसरी ता. २५ नोव्हेंबर १९०२]

अकल्पित रीतीनें एखादा मोठा द्रव्याचा सांठा सांपडला असतां, त्यापैकीं किती द्रव्य घरीं नेतां येईल एवढयाच विचारांत तो निमग्न असतो, तशाच प्रकारची पुष्कळ अंशीं कंपनीसरकारच्या अधिकाऱ्यांची स्थिति झाली होती, ही गोष्ट त्यांच्या अनेक कृत्यांवरून निर्विवाद सिद्ध झाली आहे. कंपनीसरकारच्या कारभारासंबंधानें ज्या इंग्रजी इतिहासकारांना मागील शतकार्धाच्या पुढील भागांत उल्लेख करण्याचा प्रसंग आला त्यांनी कंपनी सरकारास उचलून धरण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी अखेरीस आपली चिमकुली मंडळी जगाच्या इतिहासांत एक अपूर्व चमत्कार करून दाखवीत आहेत व एका मोठ्या राज्यरूपी भव्य मंदिराचा पाया घालीत आहेत, असें त्यावेळीं कंपनीसरकारच्या कोणाहि नोकराच्या ध्यानीं मनींहि नसल्यामुळें त्यांनीं अत्याचार केले असल्यास ते क्षम्य आहेत, असें रडतखडत कां होईना परंतु कबूल केलें आहे. गेल्या शतकाच्या आरंभापावेतों तरी लूट, व्यापार व पगार अशा प्रकारच्या जळवांनीं द्रव्यशोषणाचा क्रम सुरू होता. वरील शतकाच्या अखेरीअखेरीस कंपनी सरकारच्या राज्यपद्धतीस थोडाबहुत व्यवस्थितपणा येऊं लागला होता ही गोष्ट खरी आहे; तथापि द्रव्यशोषणाच्या दृष्टीनें पाहतां कंपनीसरकारच्या एक शतकभरच चालेल्या कारकीर्दीचा उत्तरार्ध पूर्वार्धापेक्षां विशेषसा चांगला होता, असें म्हणतां येत नाहीं. अठराव्या शतकाच्या अखेरीअखेरीस न्यायाची कोर्टें स्थापन झाली व राज्यकारभारहि व्यवस्थितपणानें चालू लागला. कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांचा खासगी व्यापार बंद झाला व सर्वांत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे बंगाल प्रांतास कायम जामिनधाऱ्याची पद्धत लागू करण्यांत आली. अशा रीतीनें एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस समाधान मानून घेण्याजोग्या कांहीं गोष्टी घडून आल्या होत्या; तथापि या पुढचा काळ अशा प्रकारच्या हितपरिणामी कृतींनीं विशेषसा संस्मरणीय झाला नसून आमच्या सांपत्तिक अवनतीचें अथवा अधःपाताचें स्मारकच बनून राहिला आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीअखेरीस हिंदुस्थानचा व्यापार बुडविण्यासाठीं कायदे अमलांत येऊं लागले. व या कायद्याचा अंमल जरी तीस चाळीस वर्षेंच एकंदरीनें सुरू होता, तथापि त्यांनीं, हिंदुस्थानास किती तरी शतकें पावेतों पुन्हां डोकें वर काढतां येणार नाहीं, अशी स्थिति करून सोडली! देशांतून बाहेर जाणाऱ्या मालावर शेंकडा ६२२ पावेतों जकात ठेवून देण्यांत आली आणि अशा रीतीनें व्यापाऱ्यांच्या व देशी कारागिरांच्या नरडीस नख देण्यांत आलें ! परंतु या देशचा माल परदेशी जाऊं नये व इकडच्या लोकांस दुसऱ्या देशांतील पैसा स्वदेशीं मुळींच आणता येऊं नये, असें घडवून आणण्यापुरतीच कंपनीसरकारच्या नामदार डायरेक्टरांची व अधिकाऱ्यांची हांव नसून या देशातील सर्व लोकांनीं विलायती माल सारखा विकत घेत रहावें, अशा तऱ्हेची त्यांस स्थिति यावी अशी

त्यांची पराकाष्ठेची इच्छा होती. ही त्यांची इच्छा कितपत सिद्धीस गेली, हें कोणासहि आम्हीं सांगण्याचें कारण नाहीं. ज्यांस त्यांस प्रत्यक्ष अनुभवावरूनच हें कळून येण्यासारखें आहे. याप्रमाणें आमचे सर्व धंदे बसले. जवळ होता नव्हता तितका बहुतेक पैसा अठराव्या शतकाच्या अखेरीच्या पूर्वींच धुवून गेलेला होता; शेतसारा जुलुमासाठीं नांवाजलेल्या मोंगली बादशहांनीं सुद्धां वाढाविलेला नाहीं इतका कंपनीसरकारच्या अधिकाऱ्यांनीं वाढविल्यामुळें व प्रतिवर्षीं तो अधिक वाढविण्याची कायदेशीर तरतूद केली असल्यामुळें शेतकऱ्यांस स्वतःच्या व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहास पुरेसें धान्याहि उरेना व असल्या बिनफायद्याच्या धंद्यांत कोणीहि आपलें भांडवल गुंतवीना. या कारणामुळें देशांतील सर्व लोकांच्या चरितार्थाचें मुख्य साधन जी शेती, तीहि उत्तरोत्तर खालावत चालली. पूर्वीं सणासारखा कधींमधी येणारा दुष्काळरूपी पाहुणा तर आमच्या घरचा यजमान बनला !

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं आमची काय स्थिति होती, याचा वर संक्षेपानें उल्लेख केलाच आहे. आतां, त्यानंतर सबंध एक शतक लोटल्यानंतर तरी आमची सांपत्तिक स्थिति कितपत सुधारली आहे, निदान इतक्या अवकाशांत ती सुधारण्यासाठीं सरकारनें कोणकोणते प्रयत्न केले, हें आपणांस पाहावयाचें आहे; व यासाठीं व्यापार, कलाकौशल्य, शेती इत्यादिकांची स्थिति आज कशी काय आहे, हें स्थूल दृष्टीनें पाहणें आवश्यक आहे. तसेंच राष्ट्राची संपत्ति वाढत चाललेली आहे कीं काय व पूर्वींच्या मानानें हल्लीं द्रव्यशोष कमी झालेला आहे कीं नाहीं याचाहि विचार करणें भाग आहे. आतां या भागांपैकीं अगदीं पहिला म्हणजे शेतीचा मुद्दा घेऊन त्याविषयीं जरी विचार करूं लागलों तरी असें दिसून येईल कीं, या धंद्यांत मागील शतकांत म्हणण्यासारखा सुधारणा मुळींच झालेली नाहीं. जितक्या प्रकारचें धान्य पूर्वीं पिकत असे त्यापेक्षां हल्लीं पुष्कळशीं निरनिराळ्या प्रकारचीं धान्यें पिकत आहेत, असें सरकारची तरफदारी करणाऱ्या लोकांसहि म्हणतां येणार नाहीं. नीळ, चहा, कॉफी वगैरे परदेशीं पुष्कळसे खपणारे पदार्थ इकडे मागील शतकांतच मुबलक रीतीनें उत्पन्न होऊं लागले, हें खरें आहे; परंतु ही बहुतेक सर्व लागवड परकी लोकांची आहे. ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां आमची शेती सुधारली असें कोणासहि न्यायानें म्हणतां येणार नाहीं. लांब धाग्याचा कापूस, रेशीम वगैरे पदार्थ आम्हांस परदेशांतूनच मागवावे लागतात, ही एकच गोष्ट लक्षांत घेतली असतां आमची शेती किती मागसलेली आहे, हें सहज दिसून येण्यासारखें आहे. तसेंच शास्त्रीय पद्धतीनें प्रत्येक एकरीं जितकें धान्य इतर देशीं पिकविण्यांत येतें त्या मानानें या देशीं पिकत नाहीं, हीहि गोष्ट प्रत्ययसिद्ध आहे, ही शेतकीची गोष्ट झाली. आतां कलाकौशल्याच्या संबं-

धानें पाहूं गेल्यास त्या भागाची स्थिति अतिशय हृदयद्रावक आहे. पूर्वी ज्या अनेक कला या देशांत नांदत होत्या त्यांपैकीं हल्लीं कितीशा जिवंत आहेत व किती चांगल्या स्थितींत आहेत, असा प्रश्न केल्यास प्रत्येक देशाभिमानी मनुष्यास निवळ आकाशाकडे डोळे लावावे लागतील. पूर्वीचे लोखंडाचे कारखाने व रेशमी वस्त्रांचे कारखाने हल्लीं कोठें आहेत ? इंग्रज लोकांच्या निवळ द्रव्यलोभामुळें व मत्सरामुळें ज्यांवर जबर जकात बसविण्यांत आली होती तशा प्रकारच्या तलम सुताचे कारखाने हल्लीं कोणत्या स्थितींत आहेत ? या सर्वांस एकच हृदयभेदक उत्तर आहे व तें हें कीं, हे सर्व इकडच्याच संपत्तीच्या जोरावर तिकडे स्थापन झालेल्या वाफेच्या योगानें चालणाऱ्या कारखान्यांच्या दडपणानें रसातळीं गेले आहेत ! याप्रमाणें पूर्वीचें कलाकौशल्य सर्वतोपरी नष्ट झालें आहे व जर अजूनहि प्रदर्शनांत नमुन्यासाठीं म्हणून काहीं कुशल कारागिरांनीं केलेले जिन्नस पाहण्यांत आले तर ते वरील सिद्धांताचे फक्त अपवाद होत.

जी कलाकौशल्याची स्थिति तीच व्यापाराचीहि आहे. तथापि यासंबंधाचा इतिहास जरासा विस्तारानें देणें जरूर आहे. कंपनीसरकारनें आपल्या हातांत निव्वळ राजदंडच धारण करावयाचा व तराजू फेंकून द्यावयाची, असा निरुपायानें १८३३ सालीं निश्चय केला. व यानंतर तीन वर्षांनींच देशांतल्या देशांत इकडून तिकडे पाठविल्या जाणाऱ्या मालावर जी जकात बसविण्यांत आली होती तीहि बंद झाली ! वाफेची अदृश्य शक्ती इंग्रजी व्यापाऱ्यांस फळल्याकारणानें त्यांना हातानें निघणाऱ्या मालाची मुळींच भीति वाटेना, व आपणास आतां कोणाशींहि स्पर्धा करण्यास हरकत नाहीं, व तेवढ्यासाठीं म्हणून कायद्याचें पाठबळ मिळण्याची गरज नाहीं, अशी या व्यापाऱ्यांची खात्री झाल्यावरोवर खुल्या व्यापाराचें तत्त्वच चोहोंकडे फडकूं लागलें. तसेंच आगगाड्या व आगबोटी इत्यादि अनेक सोयी झाल्यामुळें हिंदुस्थानाशीं व्यापार करण्यासहि इंग्रजी व्यापाऱ्यांस अधिक फावूं लागलें. व या सर्वांचा परिणाम म्हणजे १८३० च्या सुमारास जवळजवळ ५०००० पौंडांचा विलायती माल इकडे येत असे, तोच आतां १९०० सालीं ६,११,१३,५८४ पौंडांचा म्हणजे जवळजवळ ९२ कोटी रुपयांचा परदेशी माल हिंदुस्थानांत आला ! तयार केलेला माल इकडून जाण्याचा बंदच झाला होता. व निवळ कच्चा मालच इकडून परदेशीं जावा अशी कंपनीसरकारच्या नामदार डायरेक्टरांनीं १८ व्या शतकाच्या अखेरीच्या पूर्वीच व्यवस्था करून ठेविली होती. त्यांच्या इच्छेस अनुसरून जरी आतां ते नामशेष झालेले आहेत तथापि त्यांनीं केलेल्या उपकाराच्या फेडीसाठीं येथें एवढें सांगणें भाग आहे कीं, ७,७९,५०,८१९ पौंडांचा माल व यापैकीं बहुतेक कच्चा माल या देशांतून परदेशीं गेला. १८५८ सालीं कंपनीसरकारच्या

हातांतील राज्यसूत्रें खुद्द इंग्रज सरकारनें हिसकावून घेतलीं. तेव्हांपासून तर खुल्या व्यापाराचें तत्व फारच बोकाळलें. १९ व्या शतकाच्या अखेरीस आमचा व्यापार असें म्हणण्यास फारशी जागा उरलेली नाहीं; परकी लोकच विलायतेशीं व्यापार करीत आहेत व त्या व्यापारावर श्रीमंत बनत आहेत. याप्रमाणें एकंदरींत व्यापाराची ही शोचनीयच स्थिति आहे.

आतां, १८५८ सालापासून जरी हिंदुस्थानांतील शेती, कलाकौशल्य व व्यापार यांची भरभराट होण्यासाठीं इंग्रजसरकारनें काय काय केलें, हे पाहूं लागलों तरी आपली या बाबतींत बहुतेक निराशाच होणार आहे. कंपनी सरकारनें जें साऱ्याचें प्रमाण बसविलें होतें अथवा जी धारापद्धति अमलांत आणली ती अद्यापि बहुतेक तशीच चालू आहे,ही गोष्ट निर्विवाद आहे. कंपनी सरकारच्या डायरेक्टरांनीं निवळ लोभाविष्टपणानें कायम धाऱ्याची पद्धति झुगारून दिली, हें उघड उघड दिसून येण्यासारखें असतां न्यायी म्हणवून घेणाऱ्या इंग्रज सरकारच्या अमदानींतहि ती स्वीकारली जाऊं नये, हें नवल होय ! तीस तीस वर्षांनीं हल्लीं सारा वाढविण्यांत येतो व कंपनीसरकारशीं आमच्या मुंबई इलाख्याच्या सरकारची विशेष सहानुभूति असल्यामुळेंच कीं काय परंतु त्यांनीं ही तीस वर्षांचीहि मुदत काढून प्रतिवर्षीं भाडेपट्टे घेण्याचें नव्या कायद्यानें ठरविलें आहे ! ही साऱ्याच्या बाबतींत स्थिति झाली. आतां शास्त्रीय पद्धति किती अमलांत आली आहे, तें पाहूं या. शेतकऱ्यांस आपली शेती सुधारतां यावी म्हणून सरकार दर महिन्यास शेतकीवरचीं लठ्ठ लठ्ठ इंग्रजी पुस्तकें प्रसिद्ध करतें व स्वस्थ बसतें. सरकारी 'फार्म' हा एक अद्यापि मनोरंजक फार्सच आहे. त्यापासून कोणताहि लाभ लोकांस झाल्याचें आम्हांस माहीत नाहीं. शास्त्रीय शिक्षण देण्यासाठीं शेतकऱ्यांच्या शाळा नाहींत अथवा त्यांना उपयुक्त माहिती सहज मिळवितां येईल, अशा प्रकारची व्यवस्थाहि करून ठेवलेली नाहीं. कलाकौशल्याचें पुनरुज्जीवन करण्यासाठींहि इंग्रजसरकारनें मुळींच प्रयत्न केलेला नाहीं. धंदेशिक्षणाच्या शाळांबद्दल सारखी ओरड सुरूच आहे व किती लोकांस हें धंदेशिक्षण देतां येईल, हाच विचार अद्यापि मोठमोठ्या मुत्सद्यांचें डोकें भणाणून सोडीत आहे. तसेंच केवळ अन्याय करून इकडील व्यापार खालीं बसविल्यानंतर जें खुल्या व्यापाराचें तत्व अंगिकारण्यांत आलें होतें, तें सोडून देऊन त्या अन्यायाचें परिमार्जनहि इंग्रजसरकारानें केलेलें नाहीं; व कंपनीसरकाराप्रमाणें जरी निवळ दांडगाईचे व जुलमाचे कायदे इंग्रजसरकार करीत नाहीं, तथापि मँचेस्टरच्या गिरणीवाल्यांसाठीं आमच्या मालावर जकात बसविण्यांत अन्याय आहे, असें अद्यापहि त्यांस वाटत नाहीं. एवंच, कंपनीसरकारच्या अमदानींतील लुटीचा प्रकार जरी अजिबात बंद झाला व न्याय देण्याच्या कामांतहि पुष्कळ सुधारणा झाली, तथापि हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधा-

रण्यासाठीं म्हणून जे प्रत्यक्ष उपाय इंग्रज सरकारासारख्या सुधारलेल्या सरकारानें योजावयास पाहिजे होते, ते आजपावेतों तरी योजण्यांत आले नाहींत, ही गोष्ट प्रत्येक निःपक्षपाती मनुष्यास कबूल करावी लागेल.

इंग्रज सरकारच्या अमदानींत हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारली कीं नाहीं, हें आणखी इतर गोष्टींवरूनहि पाहतां येण्यासारखें आहे. कंपनीसरकारच्या कारकीर्दींत त्या सरकारास अनेक प्रसंगीं मोठमोठ्या लढाया कराव्या लागल्यामुळें बरेंच कर्ज झालें होतें तथापि शांततेकरितां झटणाऱ्या व बचावाचें धोरण कायम असल्याबद्दलची फुशारकी मारणाऱ्या इंग्रजसरकारच्या कारकीर्दींत १८६७ सालीं असणाऱ्या ५ कोटी २ लक्ष पौंडांच्या कर्जाचें २३,४९,७०,३१४ पौंड कर्ज १९०० अखेर झालें आहे ! फुगत जाणारें कर्ज हेंच जर सांपत्तिक सुस्थितीचें चिन्ह असेल तर मात्र हिंदुस्थानची स्थिति सुधारत चालली आहे, असें म्हणतां येईल ! या कर्जाबरोबरच विचार करण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे प्रतिवर्षीं सारखा चाललेला भयंकर द्रव्यशोष होय. १८३० सालच्या सुमारास मॉंटगॉमरी मार्टिन नांवाच्या इंग्रजी गृहस्थानें कंपनीसरकारच्या शोषाचा हिशेब अदमासानें केला होता. त्यानें ३० लक्ष रुपये प्रतिवर्षीं परदेशीं जात आहेत व या मुद्दलावर १२ टक्के व्याज आकारल्यास ही रक्कम किती फुगत आहे, याचा अंदाज काढला आहे. तो असें म्हणतो कीं, तीस वर्षांत वरील दराप्रमाणें एकंदरींत ७२ कोटी ३९ लक्ष पौंड कंपनीसरकारानें हिंदुस्थानांतून शोषून घेतले. हल्लीं हा द्रव्यशोष ३० लाख पौंडांपासून ३ कोट पौंड अथवा ३ कोट रुपयांपासून ४५ कोट रुपयांपर्यंत वाढलेला आहे ! याप्रमाणें जरी मागील शतकांतील अखेरच्या ३० वर्षांपुरताच हिशेब केला तर व्याज सोडून दिलें तरी ९० कोटी पौंड या हिंदुस्थानांतून परदेशीं गेले, एवढी गोष्ट सिद्ध होणार आहे. येथील युरोपियन अधिकाऱ्यांचे पगार, सर्व गोऱ्या सैन्याचा पगार व याशिवाय पेन्शनें वगैरे खर्चासाठीं विलायतेस पाठवावे लागणारे पैसे, हिंदुस्थानच्या कल्याणासाठींच म्हणून ठेवलेला 'इंडिया कौंसिलचा खर्च' इत्यादि अनेक प्रकारांनीं या देशांतून पैसा परदेशीं जात आहे. इतक्या द्रव्यशोषानंतर जर आज हा देश अगदीं निःसत्त्व झाला असेल तर त्यांत कांहीं नवल नाहीं. तो अद्यापि जीव धरून राहिला आहे हीच मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास प्रचलित राज्यपद्धतींत मोठमोठे फेरफार केले पाहिजेत, ठिगळ दिल्यानें खरें काम होणार नाहीं असें आमचें ठाम मत आहे; व कोणकोणत्या दिशेनें सरकारानें सुधारणा केली पाहिजे, हें त्यांस दाखविण्यासाठींच आमच्या अवनतीच्या मुख्य मुख्य कारणांसंबंधानें आम्हीं ऊहापोह केला आहे. या लेखमालेंत जे कित्येक ठळक ठळक मुद्दे घेऊन त्यांचा आम्ही विचार केला आहे त्यासंबंधानें लोकांहि मननपूर्वक विचार करूं लागतील,

अशी आम्हांस आशा आहे. राज्यपद्धतींतील दोष समजणें, हे सरकार व प्रजा या दोघांसहि हितकारक आहे, एवढें सांगून आम्हीं ही षट्पुष्पमालिका वाचकांस प्रेमानें सादर करून त्यांची रजा घेतों.

❁ ❁ ❁

* आमचीं मनेंच फिरलीं पाहिजेत !

पेशवाई बुडल्यानंतर कांहीं काळपावेतों इष्टुरफाकड्यांच्या कारकीर्दींत लोकमताला जें वजन असे, तें पुढें हळूहळू नाहींसें होत गेलें व रिपनसाहेबांसारख्या हिंदुस्थानच्या लोकांविषयीं बरीच कळकळ असलेल्या व्हाइसरॉयांनीं स्थानिक स्वराज्याचे हक्क लोकांस देऊन जरी आपल्या मनाची उदारता प्रकट केली, तथापि वर दिलेल्या अल्पिष्टनसाहेबांच्या कारकीर्दींत लोकमतास किती मानीत असत, हें लक्षांत घेऊन जर या साहेबांच्या कारकीर्दीची रिपनसाहेबांच्या कारकीर्दीशीं तुलना केली, तर लॉर्ड रिपन यांची देखील तराजू वरच राहील, ही गोष्ट गेल्या शतकाच्या इतिहासावरून प्रत्येक विचारी मनुष्याच्या ध्यानांत येण्यासारखी आहे. लॉर्ड रिपनसाहेबानंतर जी डफरिन, लॅन्सडौन व एल्जिन लाटसाहेबांची त्रयी इकडे झाली, त्यांच्या अंमलांत लोकमताचा कितपत मान राहत असें, हें आज कोणालाहि नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. आतां एल्फिन्स्टनसाहेबांच्या वेळीं लोकमताच्या विरुद्ध जाण्यास साहेब लोक प्रवृत्त होत नसत एवढेंच नव्हे, परंतु प्रसंगोपात स्वतःच्या न्यायीपणाचा प्रत्यय लोकांस यावा एवढ्यासाठीं आपल्या जातभाईंस देहांत शासनाची देखील शिक्षा देण्यास कसे मागेंपुढें पाहत नसत, तसेंच लोकांमध्यें प्रचलित असलेल्या व स्वतःस चांगल्या न वाटणाऱ्या चालीरीती संभाळण्यास कांहीं थोड्या वर्षांपावेतों कसे जपत असत हें ध्यानांत आणिलें, व त्या स्थितीशीं आजच्या स्थितीची तुलना केली, तर जमीन अस्मानाची तफावत दिसून येणार आहे. एल्फिन्स्टनसाहेबांच्या कारकीर्दीच्या आरंभीं आरंभीं आम्हांस उत्तम तऱ्हेनें वागविण्यांत त्यांचा स्वार्थ होता कीं नाहीं, व प्रत्येक परकीय राष्ट्रानें नवीन देश काबीज केला, म्हणजे स्वतःविषयीं जेणेंकरून पूज्यबुद्धि उत्पन्न होईल अशाच प्रकारच्या उपायांची तें योजना करितें किंवा नाहीं, इत्यादि हेतूसंबंधीं प्रश्न निवळ सध्याच्या व मागच्या स्थितीच्या तुलनेंत अप्रस्तुत आहेत. अशा रीतीनें लोकमताच्या इतिहासाचें निरीक्षण करूं गेलें असतां. सध्याच्या काळांत त्याची किंमत बहुतेक

---

* [केसरी ता. २ डिसेंबर १९०२]

गेलेली आहे, व त्याविरुद्ध वागणें हेंच आपलें कर्तव्य आहे असेंहि हळूहळू कित्येक अधिकाऱ्यांस वाटत आहे, असें दिसून येणार आहे. अशा रीतीनें लोकमतास भीक न घालण्याचा जरी हल्लींच्या बहुतेक अधिकाऱ्यांचा संकल्प दिसतो, तथापि पूर्वीपेक्षां दिवसेंदिवस लोकमत अधिकाधिक प्रबळ होत चाललें आहे, ही गोष्ट अधिकाऱ्यांस पक्की समजून चुकली असल्यामुळें आपणांस अनुकूल असेल अशाच प्रकारचीं मतें लोकांमध्यें प्रचलित करण्यासाठीं ते खटपट करूं लागले आहेत. ज्या लॉर्ड कर्झनसाहेबांनीं आपण एकदां हातीं धरलेला नांगर त्याचें काम पुरतें झाल्याशिवाय खालीं ठेवावयाचा नाहीं अशी प्रतिज्ञा केली, त्याच बड्या लाटांनीं लोकांच्या मनास निराळ्या प्रकारचें वळण देण्याचें काम सुरू केलें आहे, हें कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाच्या वेळीं जें भाषण केलें त्यावरून मुख्यतः स्पष्ट कळून येण्यासारखें आहे. लॉर्ड कर्झनसाहेबांनीं होतकरू व तरुण ग्रॅज्युएटांस नवीन तऱ्हेच्या स्वदेशाभिमानाची दीक्षा देण्याचा प्रयत्न केला, आणि, 'राजा बोले दळ हाले' या म्हणीस अनुसरून तशाच प्रकारची दीक्षा देण्यासाठीं कोणी एक के. सी. एस्. आय्. नवंबर महिन्याच्या 'ईस्ट ॲन्ड वेस्ट' मध्यें अवतीर्ण झाले आहेत ! हिंदुस्थानांतील लोकांस आपल्या राजकीय स्थितीसंबंधानें कोणत्या दृष्टीनें विचार करावा हेंच कळत नाहीं, असें पुष्कळ बड्या बड्या लोकांचें मत आहे आणि एवढ्यासाठीं 'मनाची प्रवृत्ति कोणत्या प्रकारची असावी' या विषयावर या क. स. ई. च्या वरची पदवी धारण करणाऱ्या बड्या गृहस्थानें लेख लिहिला आहे. या लेखकानें निःपक्षपातीपणाचा डौल चालून पुष्कळशीं चुकीचीं व खोटीं विधानें केलीं असल्यामुळें, या बृहस्पतींच्या म्हणण्याचा विचार करण्याचें आज योजिलें आहे. आतां हिंदुस्थानच्या लोकांनीं विचार करितांना कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे, याविषयीं ऊहापोह करितांना सदरहू के. सी. एस्. आय्. नीं जीं अनेक विधानें केलीं आहेत, त्यांपैकीं थोड्याशा तरी विधानांची वाचकांस प्रथम माहिती असल्याशिवाय त्यांना त्या विधानांवरील टीका सार्थ आहे कीं नाहीं, हें जाणण्यास कठिण पडेल; एवढ्यासाठीं के. सी. एस्. आय्. नीं काय काय तारे तोडले आहेत याचें प्रथम दिग्दर्शन करून, नंतर त्यांच्या विधानांच्या सत्यासत्यतेबद्दल आपण समतोल मनानें विचार करूं.

हिंदुस्थान देश जर इंग्रजसरकारच्या ताब्यांत गेला नसता; तर कोणत्याना कोणत्या तरी मातीसाठीं भुकेलेल्या पाश्चिमात्य राष्ट्राच्या भक्ष्यस्थानीं तो पडला असता. व यामुळें जरी कंपनीसरकारच्या अमदानीच्या आरंभीं अनान्वित कृत्यें करण्यांत आलीं तरी एकंदरीनें इंग्रज सरकारासारख्या प्रबल राष्ट्राशीं आमचा संबंध जुळला ही आनंदाची गोष्ट आहे, अशाप्रकारें नमस्क्रियापूर्वक नांदी करून

हे लेखक पुढें आपल्या विषयाच्या प्रतिपादनार्थ लागले आहेत. इंग्रजसरकार हें परकीय सरकार नसून ज्या राष्ट्रावर तें अंमल गाजवीत आहे त्या राष्ट्रांतील जुन्या चालीरीती, धर्मकायदे, वाङ्मय इ० सर्व कायम राखण्याची तें खटपट करीत आहे आणि अशा रीतीनें जुनी स्थितीच पुढें सारखी चालू ठेवणाऱ्या राष्ट्रास परकी म्हणणें वाजवी नव्हे असें या के. सी. एस्. आय्चें म्हणणें आहे. ते असेंहि म्हणतात कीं, अशा तऱ्हेचें परस्थांचें राज्य म्हणजे परकी नसून आमचें जुनेंच राज्य पुढें सारखें सुरू आहे व जुन्या राज्यपद्धतींत कांहीं विशेष फरक झाला असल्यास हल्लींच्या अमदानींत लोकांस अधिक स्वातंत्र्य आहे व राज्यकर्ते अत्यंत सहनशील आणि धिमे आहेत एवढाच कायतो होय. परकी राष्ट्रांशीं दळणवळण, लढाई, अंतर्व्यवस्था व वसूल इत्यादि गोष्टी हल्लींच्या राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेवणें जरूर आहे. तथापि लोकांना आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तो धंदा पत्करण्यास नवीन उद्योग काढण्यास, हल्लीं पूर्ण मोकळीक आहे; तसेंच सामाजिक चालीरिती व धार्मिक आचारविचार या गोष्टींतहि त्यांस सरकारनें पुष्कळसें स्वातंत्र्य दिलें आहे. एवंच, ज्या ज्या गोष्टींमुळें राष्ट्राची दानत एका विशेष प्रकारची बनते आणि लोकांमध्यें जोम येऊन ते स्वतंत्रतेचा उपभोग घेतात अशा सर्व गोष्टी हल्लींच्या राज्यांत हिंदुस्थानच्या लोकांस अनुकूल आहेत. तेव्हां अशा सरकारास परकी सरकार म्हणणें ही विलक्षण चूक आहे. लोकांनीं निरनिराळ्या देशाचे इतिहास वाचावे व हिंदुस्थानच्या लोकांची जितकी वाईट अवस्था आहे त्याहून अधिक शोचनीय स्थितींत पचत असणारे कोणतेहि लोक या पृथ्वीच्या पाठीवर कोठें तरी आहेत असें आढळून आल्यास त्या लोकांच्या स्थितीपेक्षां आपली स्थिति बरी आहे एवढ्यांतच समाधान मानून त्यांनीं आनंदांत असावें; आणि ज्या सरकारनें कोणत्याहि प्रकारें, स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या लोकांस आपलें दास्य स्वीकाकरण्यास लाविलें नाहीं अथवा ज्यांनीं पूर्वापार चालत आलेल्या कोणत्याहि संस्था बुडविल्या नाहींत अशास कोणीहि परकी मानूं नये, असें के. सी. एस्. आय्. चें म्हणणें आहे. परंतु अशा रीतीनें इतर देशांच्या तुलनेनें कोणी स्वतःच्या स्थितीसंबंधानें विचार करीत नसल्यामुळें, तसेंच इंग्रजसरकारनें पूर्वींची परंपरा कायम राखली आहे ही गोष्ट लक्षांत न घेतल्यामुळें बहुतेक सुशिक्षित लोकांस सरकाराविरुद्ध टीका करणें एवढेंच आपलें कर्तव्य आहे असें वाटतें व ही स्थिति पालटावयाची असल्यास मनाला निराळ्या प्रकारचें वळण मिळालें पाहिजे, असें या बड्या पदवीवाल्याचें मत आहे. के. सी. एस्. आय्. नें वर दिलेल्या प्रकारची इतरहि बरींच विधानें केलेलीं आहेत व आपण सरकारची बाजू उचलून धरीत नाहीं असें भासविण्यासाठीं प्रत्येक विचाररूपी कणावर भुसाचा ढिगारा घालून ठेविला आहे. तेव्हां या भुसांतून असे मधून मधून

क्वचित् असणारे कण शोधून काढण्याचा अट्टाहास करण्याचें विशेषसें प्रयोजन नाहीं. व वर दिलेल्या कित्येक विधानांवरूनच के. सी. एस्. आय्. ची विचारसरणीहि वाचकांच्या पूर्णपणें लक्षांत येण्यासारखी आहे.

के. सी. एस्. आय्. च्या लेखामधील मुख्य मुद्दा काय आहे, हें मुंबईच्या टाइम्सकारांनींहि बरोबर ताडलें आहे. जरी या धूर्त पत्रकारानें के. सी. एस्. आय्. यास वर उचलून धरिलें आहे तथापि, त्यांना सुद्धां या लेखाच्या भुसभुसीत जमिनींतून जाण्याला पुष्कळच त्रास पडला हें त्यांच्या लेखावरून कोणासहि स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे. हिंदुस्थानच्या लोकांची देशाभिमानाची व्याख्या कोणत्या प्रकारची असावी हें दाखविण्यासाठींच के. सी. एस. आय्.नें हा एवढा मोठा खटाटोप केला आहे, असें टाइम्सकार म्हणत आहेत. देशाभिमानाच्या निराळ्या व्याख्येच्या आवश्यकतेचा प्रश्न लॉर्ड कर्झनसाहेबांनीं कळकत्त्याच्या कानव्होकेशनच्या वेळीं प्रथम पुढें आणला. व त्यांच्या के. सी. एस्. आय्. नें तोच प्रश्न पुनः जराशा निराळ्या स्वरूपांत पुढें आणण्याचा प्रयत्न केला आहे. के. सी. एस्. आय्.च्या लेखांतहि मुख्य प्रमेय म्हणजे इंग्रजसरकारास परकी सरकार मानणें वाजवी नव्हे हें होय. इंग्रजसरकाराच्या सहवासापासून हिंदुस्थानास किती जरी फायदा झाला असला तरी इंग्रजसरकार परकी नव्हे असें कोणासहि म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु तशांतहि न्याय व स्वातंत्र्य या दोहोंची आवड असणारे व सुधारणेच्या शिखरास पोहोंचल्याबद्दल अभिमान वाळगणारें राष्ट्र आज हिंदुस्थानावर राज्य करीत असतां केवळ त्याच्या परकेपणामुळें आमच्या खालावत चाललेल्या सांपत्तिक स्थितीस आळा पडणें कठीण झालें आहे, ही गोष्ट लोकांच्या नजरेपुढें ढळढळीत उभी असतां इंग्रजसरकार परकी नव्हे असें सांगण्याचा प्रयत्न करणें म्हणजे निव्वळ थोतांड आहे. इंग्रजसरकारच्या परकेपणामुळें आमचें कसकसें नुकसान होत गेलें व तें जर परकी नसतें तर हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें किती तरी चांगलें झालें असतें, तसेंच या परकेपणाच्या परिणामाची व्याप्ती कोठवर जाते याचा ऊहापोह आम्हीं ' कंपनीसरकारच्या अमलामुळें झालेलें हिंदुस्थानचें सांपत्तिक स्थित्यंतर ' या मथळ्याखालीं जो नुकताच लेख लिहिला आहे त्यांत केलेला आहे. कंपनीसरकारच्या परकेपणाविषयीं जें आम्हीं मागें लिहिलें आहे तेंच बऱ्याच अंशीं हल्लींच्या सरकारासहि लागू आहे. हल्लींची राज्यपद्धती कंपनीसरकारच्या राज्यपद्धतीपासून जरी कितीहि भिन्न असली, तथापि, परकेपणाच्या दृष्टीनें मात्र या दोन सरकारांत यत्किंचित्हि फरक नाहीं, ही गोष्ट जाणूनबुजून ज्यानें वेड पांघरलें नाहीं अशाच्या ध्यानांत केव्हांहि आल्यावांचून राहणार नाहीं. के. सी. एस्. आय. च्या मुद्यांपैकीं फक्त एकाच मुद्याचा विचार आज करावयाचा आहे. त्याच्या बहुतेक विधानांस यापूर्वीच यथोचित उत्तर

मिळालें आहे, तेव्हां तेवढ्याच मुद्यासंबंधानें विचार करून आजचा लेख आटोपूं.

के. सी. एस्. आय्. ची सर्व भिस्त म्हणजे पूर्वापार चालत आलेल्या सर्व संस्था इंग्रजसरकारच्या अमदानींत कायम राहिल्या आहेत, व ज्या सरकारानें ही परंपरा कायम ठेविली त्यास परकी म्हणणें गैरवाजवी आहे एवढ्याच मुद्यावर आहे. आणि ह्या मुद्याच्या मागें लागण्यांतच, इंग्रज लोक परक्या देशांतील रहिवाशी आहेत, ते आमच्या खंडांतील देखील नाहींत, ते हिंदुस्थानांत राहण्याकरितां आलेले नसून त्यांचीं घरेंदारें, बायकामुलें सर्व दुसऱ्याच देशांत आहेत, आणि या सर्वांच्या पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठीं त्यांना आपण मिळविलेलें सर्व द्रव्य परदेशीं न्यावें लागतें; तसेंच सातासमुद्रापलीकडे राहून तेथूनच राज्यशकट निर्विघ्नपणें हांकतां यावा म्हणून त्यांना निरनिराळ्या प्रकारचे इकडच्या लोकांस हानिकारक असे उपाय योजावे लागतात, इत्यादि अनेक महत्त्वाच्या बाबींकडे त्याचें दुर्लक्ष झालें आहे. तेव्हां के. सी. एस्. आय्. नें ज्या एका मजबूत किल्ल्याचा आश्रय केला आहे. तो तरी कितपत टिकण्यासारखा आहे हें पाहिलें म्हणजे त्याचा पुरा पाडाव होणार आहे. पूर्वापार चालत आलेल्या संस्था इंग्रजसरकारानें कायम ठेवल्या व पूर्वीच्या लोकांचें त्यांस कोणत्याहि प्रकारचें असलेलें स्वातंत्र्य इंग्रजसरकारानें हिरावून घेतलें नाहीं, एवढ्या दोनच गोष्टींवर के. सी. एस्. आय्. ची सर्व मदार आहे. आतां इंग्रजसरकारानें पूर्वीचें स्वातंत्र कायम राखलें असें म्हणणें किती चुकीचें आहे; व पूर्वपार चालत आलेल्या संस्था राखण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असें विधान करणेंहि किती धाडसाचें आहे, या दोन्ही गोष्टी ग्रामसंस्थांच्या इतिहासावरूनच व्यक्त होणाऱ्या आहेत. ग्रामसंस्था या मागच्या चारपांचशें वर्षांतच उद्भवलेल्या नसून फार प्राचीन काळापासून चालत आल्या आहेत. गांवें ज्या वेळेस पुरतीं वसलेलीं नव्हतीं, नव्या नव्या गांवांमध्यें आर्य लोक वस्तीसाठीं जात होते, त्या त्या ठिकाणीं त्यांनीं ही संस्था स्थापिली. वैदिक काळापासून ग्रामसंस्था अस्तित्वांत आहेत आणि या ग्रामसंस्थांमुळेंच आज हजारों वर्षें पावेतों हिंदू लोक हिंदुस्थानांत टिकाव धरून राहिले. हिंदुस्थानासारख्या सोन्याच्या तुकड्यासाठीं नेहमीं परचक्रेंहि त्यांवर यावयाचींच व इंग्रजसरकार येण्यापूर्वीं कित्येक शतकें अगोदरच परकी राजांनीं या देशावर झडप घालण्यास सुरवात केली होती. तथापि या परकीय राजांचा मुख्य अंमल मोठमोठ्या शहरांवरच असे. त्यांचा प्रत्यक्ष संबंधहि खेड्यांपाड्यांशीं फारसा येत नसे व यामुळें बहुतेक गांवांत ग्रामसंस्थेच्या स्वरूपानें स्वराज्यच चाले, ही गोष्ट सर्व निःपक्षपाती इतिहासकारांनीं कबूल केली आहे. शहरा शहरांनीं सुद्धां जरी राजे लोकांचा प्रत्यक्ष जुलूम क्वचित् प्रसंगीं कित्येकांस सोसावा लागे व त्याबरोबरच राजाची मर्जी सुप्रसन्न करण्याबद्दल कित्येकांना मोठमोठीं बक्षिसेंहि मिळत, तथापि

या दोन्ही गोष्टी जराशा बाजूस ठेविल्या असतां ग्रामसंस्थांचें प्राबल्य या शहरांत देखील दिसून येत असे. अशा रीतीनें इंग्रजसरकार येण्यापूर्वी लोकांस जे स्वराज्याचे अधिकार होते ते आज आहेत काय ? असा आम्हीं के. सी. एस्. आय्. यांस प्रश्न विचारतो. ग्रामसंस्था सरकारनें मुद्दाम बुडविल्या नाहींत, असे जरी सरकारचे बाजूचे कित्येक लोक म्हणत आहेत, तथापि सरकारच्या कृतीचा अप्रत्यक्ष रीतीनें तरी या संस्थांवर परिणाम होऊन त्या बुडाल्या, ही गोष्ट मोडमोठ्या ॲंग्लोइंडियन पत्रकारांनाहि कबूल करावी लागत आहे. ग्रामसंस्थांच्या इतिहासाकडे जरासें लक्ष पुरविलें असतां इंग्रज-सरकारास केवळ स्वतः परकी असल्यामुळें व या कारणानें सर्व प्रकारची सत्ता आपलेच हातीं ठेवण्याचा प्रयत्न करणें त्यास आवश्यक झाल्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांची केवढी हानी झाली आहे, हें उघड दिसून येणार आहे. अशा रीतीनें कित्येक हजार वर्षांच्या पूर्वीपासून चालत आलेल्या संस्थांचा नाश इंग्रजसरकारच्या कारकीर्दीत झाला असतां व प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणें अशा तऱ्हेची कृति करण्यास परकेपणाच कारणीभूत झाला असतां इंग्रजसरकार परकें नव्हे, असें कोणीहि समंजस व विचारी मनुष्य म्हणूं शकणार नाहीं. इंग्रजसर-कारनें ज्या कांहीं थोड्याबहुत गोष्टी हिंदुस्थानच्या लोकांच्या कल्याणासाठीं केल्या आहेत, त्या सोडून देऊन ज्या त्याच्या कृतीमुळें लोकांवर अनिष्ट परि-णाम घडलेला आहे त्याचें मंडन करणें, हें अत्यंत हास्यास्पद आहे. इंग्रजसरकार हिंदुस्थानच्या लोकांस परकी नसावें, इंग्रज लोकांपुरतेच निरनिराळे कायदे होऊं नयेत, त्यांच्याच सारखे सर्व हक्क हिंदुस्थानच्या सर्व लोकांस मिळावे व हिंदु-स्थानांत ज्या अठरापगड जाती आहेत त्यांतीलच ही एक एकोणिसावी टोपी-वाली जात होऊन बसावी अशी हिंदुस्थानच्या लोकांची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. ज्या दिवशीं इंग्लंडच्या बाहुल्याखालीं या देशास सर्वतोपरी पूर्ण स्वातंत्र्य मिळेल व इंग्लंड आणि हिंदुस्थान हे मित्रत्वाच्या नात्यानें राहूं लागतील, तसेंच हिंदुस्थानच्या तिजोरींतील सर्व पैसे हिंदुस्थानांतच खर्च केले जातील, तो दिवस धन्य होय. असा दिवस देवाच्या दयेनें जेव्हां प्राप्त होईल तेव्हांपासून इंग्रज सरकारचा परकेपणा अगदीं लुप्त होणार आहे. या देशांतील पैसे पांच हजार कोसांपलीकडे जाऊन पडत असतां व पाश्चिमात्य आणि पौर्वात्य असा हत्या-रांचा कायदा, ज्यूरीचा कायदा, इ० अनेक बाबींत फरक केला जात असतां, इंग्रज सरकार परकी नव्हे असें म्हणणें निवळ लपंडावाचें आहे. हिंदुस्थानच्या लोकांच्या मनास दुसऱ्या प्रकारचें वळण लावण्यासाठीं खटपट करण्यापूर्वी त्यांच्या म्हणण्यांत खरेपणाचा भाग किती आहे, हें पाहण्यासच आम्हांला नवी दीक्षा देऊं इच्छिणाऱ्या लोकांनीं प्रथम शिकावें म्हणजे मग ध्वनिप्रतिध्वनीच्या

नियमाप्रमाणें दोहोंपक्षीहि हल्लींहून बरीचशी निराळ्या प्रकारची प्रवृत्ति दिसून यावयास लागेल, एवढें सांगून आम्ही हा लांबलेला लेख पुरा करितों.

❀ ❀ ❀

* प्लेगोबास पंजाबसरकारनें दिलेले बळी

महामारीच्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि भयंकर साथींत रोगाचा प्रतिकार करण्याचा उपाय न सुचल्यामुळें भांबावून जाऊन रानटी किंवा अडाणी लोक सांथीच्या देवतेस भाताचा, जनावराचा किंवा अत्यंत रानटी अवस्थेंत लोक असल्यास, मनुष्याचाहि बळी देतात हें सर्वांस माहीत आहेच, व इंग्रजी शिक्षणानें सुशिक्षित झालेले बहुतेक लोक अशा जुन्या चालीची थट्टा किंवा उपहास नेहमीं करीत असतात हेंहि सांगावयास नकोच. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्या गोष्टी रानटी लोक करतात म्हणून आम्ही त्यांस नांवें ठेवतों त्याच गोष्टी रूपांतरानें विसाव्या शतकाच्या आरंभीं सुधारलेलें सरकार करीत असतां त्यास आमची शहाणीसुर्ती मंडळीहि सहाय्य होऊन सरकारच्या कृत्याचें अभिनंदन करण्यास किंवा त्यांनीं उपस्थित केलेल्या खंडोबाची तळी उचलण्यास तयार होते. मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच आहे, व रानटी मनुष्य अडाणीपणानें जर भांबावून जात असला तर सुधारलेलें सरकार भांबावून जाण्यास नवीन शास्त्रीय शोधांच्या नांवावर मोडेल, अशी कांहीं तरी कल्पना असली म्हणजे बस्स आहे. आकाशांतील बापानें प्लेग पाठविला आहे, करितां त्यास बळी दिल्याखेरीज त्याचें शमन होणार नाहीं ही कल्पना रानटी मनुष्यास ज्या कारणानें ग्राह्य वाटते, त्याच कारणानें प्लेग हटविण्यास राज्यांतील सर्व लोकांस सरसट्टा टोंचल्याखेरीज उपाय नाहीं ही कल्पना आमच्या सरकारच्या डोक्यांत शिरली आहे. दोन्ही कल्पना सारख्याच वेडेपणाच्या आहेत; किंबहुना दुसरी अधिक वेडेपणाची म्हटली तरी चालेल. कारण रानटी मनुष्य ईश्वरावर विश्वास ठेऊन एखादी गोष्ट ज्याप्रमाणें श्रद्धेनें करीत असतो तसा शास्त्रीय शोधासंबंधाचा प्रकार नाहीं. कोणत्याहि शास्त्रांतील सिद्धांताची—मग ते सिद्धांत जंतुशास्त्रांतील असोत, ज्योतिषशास्त्रांतील असोत किंवा पदार्थविज्ञानशास्त्रांतील असोत—त्यांची सिद्धता, अनुभव आणि अनुमान या दोन प्रमाणांनीं करून द्यावी लागते. श्रद्धेचा या कामीं बिलकुल उपयोग होत नाहीं, व प्रयोजनहि नसतें. अमुक एक औषध अमुक रोगावर चालतें ही गोष्ट अनुभवाची आहे,

---

* [केसरी ता. ९ डिसेंबर १९०२]

श्रद्धेची नव्हे. करितां प्लेगचें निवारण होण्यास जे सार्वजनिक उपाय अमलांत आणावयाचे ते तज्ज्ञ लोकांनीं अनुभवून पक्के तपासलेले आणि सर्वांच्या प्रकृतीस उपयोगी पडणारे व सर्वांस ग्राह्य आणि हितावह असतील असेच असले पाहिजेत. प्लेग, प्लेगची लस, प्लेग टोंचणें इत्यादि विषयांवर तीन वर्षांपूर्वी आम्हीं जे लेख लिहिले होते ते याच तत्वास अनुसरून लिहिले होते; व त्यांत असें सिद्ध करून दाखविलें होतें कीं. प्लेग न पसरण्यासाठीं प्लेग टोंचणें हा जो नवीनच उपाय अस्तित्वांत आला आहे तो अद्यापि अपूर्ण अवस्थेंत असून अपरिपक्व असल्यामुळें त्यापासून टोंचलेल्या मनुष्याच्या शरीरावर अपायकारक परिणाम होण्याचा पूर्ण संभव आहे. " विषस्याविषमौषधं " हें तत्त्व जरी खरें मानलें तरी रोग होण्यापूर्वीच शरीरांत विष घालून घेऊन आगामी रोगाचा प्रतिकार करण्याची युक्ति शास्त्रदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्याहि असमंजसपणाची होय. आमचेकडे रसायन घेण्यास पुष्कळ लोक नाकबूल असतात याचें तरी कारण हेंच होय. अंगावर पारा फुटलेला आहे; तेव्हां तो पक्का मारलेला नव्हता असें सांगणारे बरेच लोक आढळून येतील, आणि जो न्याय पाऱ्यास लागू आहे तोच शंभरपट अधिक प्रमाणानें प्लेगच्या लशीसहि लागू केला पाहिजे. कारण प्लेगची लस दूषित झाल्यास नुसती अंगावर फुटूनच रहात नाहीं, तर एकदम यमसदनाचा रस्ता दाखविते. प्लेगची लस म्हणजे प्लेगच्या जंतूनें मांसरसांत प्रसविलेलें विष आणि तोच रस तापवून उष्णतेनें मेलेले आंतील प्लेगजंतु यांचें मिश्रण होय. मेलेले प्लेगजंतु आणि त्यांनीं उत्पन्न केलेलें विष शरीरांत गेलें असतां त्यापासून शरीरास इजा होणार नाहीं हें म्हणणें अगदीं मूर्खपणाचें आहे. शरीरांतील रक्तावर या विषाचा जर कांहीं परिणाम होत नाहीं तर प्लेगचें तरी निवारण त्यामुळें कसें होणार? बरें परिणाम होतों असें मानिले तर तो प्लेगपुरताच होतो, इतर बाबतींत होत नाहीं असें तरी कसें म्हणतां येईल ? कारण कोणत्याहि विषाची शरीरावर जी क्रिया घडते, ती केव्हांच एकपक्षीय असत नाहीं. त्या त्या विषापासून जे परिणाम व्हावयाचे ते सर्व शरीरावर घडून येत असतात; पण या परिणामांपैकीं एक परिणाम आपणास इष्ट असल्यामुळें इतर अनिष्ट परिणाम आपण क्षणभर सोसून घेतों. प्लेगच्या लसीची गोष्ट अशांतली आहे काय ? अशांतली नाहीं हें आम्ही मागेंच सिद्ध करून दाखविलें आहे. प्लगचे जंतु एका बाटलींत एका दिवसांत किती विष प्रसवितात, अनेक बाटल्यांत ठेवलेले प्लेगजंतु आपापल्या बाटल्यांतून जें विष प्रसवितात तें सारखेच तीव्रतेचें किंवा वीर्याचें असतें किंवा नाहीं इत्यादि अनेक प्रश्नांचा अद्याप समाधानकारक निकाल व्हावयाचा आहे. अशा स्थितींत हाफकिनसारख्या एकाद्या गृहस्थानें उचल खावी; डॉक्टर—नाहीं सर—भालचंद्रसारख्यांनीं त्याची री ओढावी; लॉर्ड कर्झनसारख्यांनीं आपण टोंचून घेतलें, उपाय

चांगला आहे म्हणून सर्टिफिकीट देऊन सरकारी अधिकाराचा या मंडळीस आश्रय द्यावा; आणि पंजाबसरकारासारख्या स्थानिक सरकारनें आफ्रिकेंत रिकाम्या झालेल्या डॉक्टरांची गलबतें इकडे आणून पंजाब प्रांतांतील सर्व लोकांस सरसट्टा टोंचून काढण्याचा क्रम सुरू करावा; आणि दिवाळीच्या मुहूर्तावर पंचवीस कुटुंबांच्या पुरस्कर्त्यांस यमसदनाच्या पंथास लावावें हा सर्व सुधारलेला रानटीपणा होय ! आणि याबद्दल जर कोणास जबाबदार धरावयाचें असेल तर अपरिपक्व शास्त्रीय शोध रामबाण औषध म्हणून पुढें आणणाऱ्या लोकांपेक्षां त्यांच्या प्रशंसेस किंवा थापेस भुलून शास्त्रीय शोधाच्या नांवावर हिंदुस्थानासारख्या गरीब देशांतील राजानिष्ठ प्रजेवर प्रयोगावस्थेस बळी पडण्याचा प्रसंग आणणाऱ्या लोकांसच जबाबदार धरलें पाहिजे. विलायतेंतील थार्न्टनसारख्या कांहीं डॉक्टरांस हिंदुस्थानांतील लोकांस सरसट्टा टोंचून काढण्याची कल्पना अमानुष व भयंकर वाटते हें गेल्या अंकीं आम्हीं प्रसिद्ध केलेंच आहे. हर्बर्ट स्पेन्सरच्या यंदाच्या सालीं प्रसिद्ध झालेल्या शेवटच्या ग्रंथांतहि देवी टोंचण्यावर एक निबंध प्रसिद्ध झाला आहे तो इनाक्युलेशनची तळी उचलणारांनीं अवश्य वाचावा अशी त्यांस आमची शिफारस आहे. कोणतेंहि विष अंगांत टोंचून घातल्यानें त्यापासून एकच विवक्षित परिणाम घडतो, अन्य तऱ्हेनें त्याची शरीरावर क्रिया घडत नाहीं, हें म्हणणें निवळ मूर्खपणाचें आहे, असा स्पेन्सरसाहेबांनीं आपला साफ अभिप्राय दिला आहे. प्लेग टोंचण्यानें बेळगांव–धारवाडाकडे पुष्कळ लोकांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम घडले; कित्येकांच्या अंगावर चट्टे उठले, कित्येकांचे हात लुले पडले आणि कित्येक निःशक्त आणि निर्वीर्य झाले; अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें मागें केसरींत दाखविलीं होतींच; व त्यांपैकींच प्लेगकामिशनपुढेंहि बरेच लोक साक्षीस आले. पण सरकारी अधिकाऱ्यांचीं आपलीं कृत्यें आपल्या रिपोर्टांच्या द्वारें समर्थन करण्याची जी अजब युक्ति आहे त्या युक्तीनें आणि आमच्या पुढाऱ्यांची सरकारच्या इच्छेविरुद्ध खरी गोष्टहि सांगण्याची छाती नसल्यामुळें या कमिशनचा रिपोर्ट जितका चांगला व्हावयास पाहिजे होता तितका झाला नाहीं. तथापि प्लेगची लस सर्व प्रकृतीच्या लोकांस सारखी मानवत नाहीं ही गोष्ट त्यावरून सहज लक्षांत येण्यासारखी होती. पण या पुराव्याकडे दुर्लक्ष करून पंजाबसरकारानें एका कुमुहूर्तावर आपल्या प्रांतांतील सर्व लोकांच्या अंगांत प्लेगचें विष जबरीनें नव्हे, तर सक्तीच्या खुषीनें किंवा खुषीच्या सक्तीनें घालण्याचा निश्चय केला. रोज ७० हजार माणसांस टोंचण्यास पुरेल इतकी लस मुंबईच्या प्रयोगशाळेंत दररोज तयार होऊन पंजाबांत जावयाची होती. पण नशीब पंजाबच्या लोकांचे कीं, पांच सहा हजार लोकांस पुरेल याहून जास्त लस मुंबईच्या प्रयोगशाळेंत तयार करतां आली नाहीं. लसीचा पुरवठा कमी पडल्यानें पंजाबसरकारचा उद्योग-आणि राजद्रोहाचा आमच्यावर आरोप येऊं नये म्हणून स्तुत्य उद्योग

असेंहि त्यास आम्हीं म्हटलें पाहिजे—प्रथमारंभींच थोडासा थंडा पडला; व विलायतेहून आलेल्या कांहीं डॉक्टरांस काम नाहीं म्हणून चडफडत पगार खात बसावें लागलें. इतक्यांत प्लेग टोंचल्याबरोबर अमक्या ठिकाणीं अमुक मेला, दुसऱ्या एका ठिकाणीं तसाच प्रकार घडला आणि तिसऱ्या एका ठिकाणीं प्लेग टोंचल्यापासून २४ तासांतच प्राण कासावीस होऊन अमक्यानें यमलोकाची वाट धरली अशा बातम्या पंजाबसरकारकडे येऊं लागल्या. आणि प्लेगची लस हें एक जहाल विष आहे, सर भालचंद्रांनीं म्हटल्याप्रमाणें नुसतें गुणकारी औषध किंवा आईच्या स्तनांतिल दुधाप्रमाणें पौष्टिक प्रवाही पदार्थ नव्हे अशी शंका सरकारच्या मनांत येऊं लागली. ही शंका प्रबल होऊन सरकार प्लेग टोंचण्याचें काम बंद ठेवण्याचा हुकूम सोडणार, इतक्यांत मालकोवाल गांवीं प्लेगच्या टोंचण्यास भिऊन पहिल्या प्रथम पळून गेलेलीं पण दिवाळीकरितां पुनः घरीं आलेलीं २५ माणसें दिवाळीच्या सुमुर्हूतावर टोंचण्यांत आलीं, आणि २४ तासाच्या आंतच तीं आपल्या इष्टमित्रांस सोडून, या प्रकाराची दाद मागण्याकरितांच कीं काय परलोकीं गेल्याची भयंकर बातमी लाहोरच्या बाजारांत पसरली ! अर्थात् पंजाबसरकारास या खेदकारक आणि भयंकर प्रकाराची चौकशी करणें भाग आलें आणि त्यांनीं आपल्या पदरचे कांहीं डॉक्टर आणि अधिकारी मुंबईस पाठविले. या गृहस्थांनीं परेळच्या प्रयोगशाळेंत येऊन जी चौकशी केली त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, या प्रयोगशाळेंतून ज्या लसीच्या बाटल्या गेल्या त्यांपैकीं कांहीं बाटल्यांतील लस दूषित झाली होती आणि या दूषित झालेल्या लसीनें मालकोवाल गांवांतील स्त्रियांवर वैधव्याचा प्रसंग आणिला. या चुकीबद्दल पंजाबसरकार दुःखांत पडलेल्या मालकोवाल गांवांतील कुटुंबास चांगली मदत करणार असें सदर सरकारानें प्रसिद्ध केलें आहे. पण एवढ्यावर हें प्रकरण भागविणें कोणाहि जाणत्या मनुष्यास पसंत पडणार नाहीं. प्लेगची लस तयार करण्याची जी क्रिया आहे ती क्रियाच अद्याप अपूर्ण अवस्थेंत आहे. किंवा ती पूर्णावस्थेंत असून लस तयार झाल्यावर पुढें ती दूषित होत असल्यास त्यांचीं कारणें काय हे मुद्याचे प्रश्न आहेत. लस तयार करण्याच्या कृतींत फरक केलेला आहे अशी एक सबब पुढें आलेली आहे. पण त्या सबबींत आम्हांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. कारण पहिल्या कृतीनें तयार केलेली लस ही सर्व मनुष्यांस सारखी मानवत नाहीं, याचीं आमच्याकडील उदाहरणें आम्हांस माहीत आहेत. अर्थात् प्लेगची लस दूषित होण्यास दुसरींच कांहीं कारणें असलीं पाहिजेत किंवा जात्याच ही लस अधिकउणी तीव्र असून त्याची तीव्रता समजण्याचें साधन अद्याप आपणास समजलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. कसेंहि असो, या प्रश्नाचा जोंपर्यंत शास्त्रीयदृष्ट्या पुरा निकाल झालेला नाहीं तोंपर्यंत प्लेग टोंचण्याबद्दल कोणत्याहि

भागांत कोणत्याहि सरकारनें सक्ती करणें म्हणजे हापकिनसारख्या ऋत्विजास यज्ञ करण्याची संधी मिळावी म्हणून प्लेगोबास आमच्या लोकांचे विनाकारण बळी देण्यासारखें होय. प्लेगची लस शरीरांत घातल्यानें कांहीं लोकांची प्रकृति बिघडत असल्यास कांहीं लोकांची सुधारते असा वितंडवाद करणाऱ्या डॉक्टरांनींहि आतां आपल्या माना खाली घातल्या पाहिजेत. हर्बर्टस्पेन्सरच्या वर लिहिलेल्या ग्रंथात असल्या प्रकारचा युक्तिवाद चांगला खोडून काढला आहे. नवज्वर होऊन बरे झालेल्या लोकांत एखादा मनुष्य असा आढळून येतो कीं, नवज्वराबरोबर त्याच्या अंगांतील पूर्वीचा एखादा लहानसहान रोग आपोआप बरा होतो. पण स्पेन्सरसाहेब म्हणतात कीं, असल्या गोष्टी अपवादक असून त्यावरून सामान्य सिद्धांत बांधणें असमंजसपणाचें आहे. कारण, एखाद्या रोगानें एखाद्याची प्रकृति सुधारली एवढ्यावरून रोगानें प्रकृति सुधारेल, असा सामान्य सिद्धांत केल्यास सदृढ मनुष्यास जितके जास्त रोग होतील तितकी त्याची प्रकृति सुधारेल असें मानावें लागेल. स्पेन्सरसाहेबांचा हा सिद्धांत सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. प्लेगची लस हें विष आहे; तें एखाद्यास मानवलें तर तेवढ्यावरून सर्वांसच तें मानवेल किंवा न मानवल्यास तो त्याच्या प्रकृतीचा दोष आहे, लसीचा दोष नव्हे, असें म्हणणें गांवढळपणाचें होय. नवीन शास्त्रीय शोध म्हणून लोकांत एखाद्या गोष्टीचा फैलाव करणारे आणि शास्त्राच्या नांवावर भुलून जाऊन त्यास मदत करणारे कांहीं वेडेपीर रानटी लोकांप्रमाणें या विसाव्या शतकांतहि प्लेग टोंचण्याच्या देवतेस मनुष्याचे बळी देण्यास तयार होतील, पण शास्त्रीय शोध म्हणजे काय याचा संथपणें विचार करणारी मंडळी असल्या कृत्यास कधींहि अनुमोदन द्यावयाची नाहीं. हा शहाणपणाचा मार्ग आमच्या सरकारास आधींच कळण्यास पाहिजे होता, पण आमच्या दुर्दैवानें सरकारच्या लक्षांत तो लवकर न आल्यामुळें मालकोवाल येथील भयंकर प्रकार ऐकण्याचा आज आम्हांवर प्रसंग आला आहे. ईश्वर करो आणि या गैरसमजुतीस बळी पडलेल्या २५ इसमांच्या इशाऱ्यानें तरी आमचें सरकार अजून सावध होवो अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे. लॉर्ड कर्झनसाहेबांनीं टोंचून घेतलें व त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं, म्हणून सर्वांनीं टोंचून घ्यावें. हें म्हणणें आणि दुष्काळांत बादशहास दूधभात मिळतो म्हणून लोकांसहि तो कां मिळूं नये हीं दोन्हीं म्हणणीं सारखींच हास्यास्पद आहेत. या असल्या वेड्या समजुतीनें काय भयंकर परिणाम होतात हें आतां प्रत्यक्ष दिसून आलें आहे. प्लेगची लस हें एक तीव्र विष आहे, तें सगळ्यांस सारखेंच मानवतें असें नाहीं ही गोष्ट आतां निर्विवाद आहे; व पंजाबसरकारनें ती आपल्या ठरावांत बहुतेक कबूल केल्यासारखीच आहे. अशा स्थितींत हात आंखडून धरणें हाच शहाणपणाचा मार्ग होय, व आम्हांस अशी उमेद आहे कीं, मालकोवाल

येथील भयंकर हकीकतीकरून जो बोध घेण्यासारखा आहे तो घेऊन सरकार आणि लोक हे यापुढें अधिक सावधगिरीनें, हुषारीनें आणि समंजसपणानें आपलें वर्तन ठेवतील. आज मालकोवाल गांवावर जो प्रसंग ओढवला तोच आमच्या इलाख्यांतील एखाद्या गांवावर यावयाचा होता. पण ईश्वरानें त्या वेळीं खैर केल्यामुळें आपण त्यांतून बचावलों, याहीबद्दल आम्हीं परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत, आणि पुन्हां असा प्रसंग कोणावर न येवो, अशी त्याची प्रार्थना केली पाहिजे.

* * *

* पाच्छाहीपणा का गुलामगिरी ?

हल्लीं पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें 'इंपीरियालिझमची' अथवा पाच्छाहीपणाची जी एक भयंकर लाट उसळली आहे व जिनें मोठमोठ्या मुत्सद्दी, धीर, व विचारी लोकांसहि घेरून टाकिलें आहे तिचें थोडक्यांत स्वरूप सांगावयाचें म्हणजे 'आमच्या आंगांत तुमच्यापेक्षां अधिक बळ आहे म्हणून तुम्ही आमचें वर्चस्व सर्वस्वी कबूल करून आमचे गुलाम बनून राहिलें पाहिजे' अशा प्रकारची स्वतःच्या बलिष्ठपणाविषयींची आसुरी कल्पना होय. या कल्पनेची वाढ आज सतत १८७७ सालापासून आहेच असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८७७ सालीं परलोकवासी महाराणीसाहेबांनीं केसर-इ-हिंद म्हणजे हिंदुस्थानच्या महाराणी असा किताब जेव्हां धारण केला तेव्हांच हल्लींच्या साम्राज्याभिमानाचा पाया घातला गेला, हें उघड आहे. १८७७ पासून पुढें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचीं पांच सहा वर्षें सोडून बाकीच्या अवधींत जरी हें पाच्छाहीपणाचें भूत विशेषसें खेळ करीत नव्हतें, तथापि तें आपल्या खोडास सोडून न जातां आंत तसेंच दडून राहिलें होतें, व बोअर लढाईसारखीं अमावास्येची पर्वणी मिळाल्याबरोबर यानें आपले सर्व चाळे सुरू केले. बोअर युद्धाच्यापूर्वी इंग्लिश लोकांच्या स्वातंत्र्याविषयींच्या ज्या कल्पना असत त्या या युद्धानें पुष्कळशा बदलून टाकल्या आहेत. पंचवीस वर्षांच्या मागील स्थितीशीं इंग्लंडची आजची स्थिति ताडून पाहतां इंग्लंडच्या राष्ट्रास इंपीरियालिझमच्या भुतानें झपाटल्यामुळें त्यांत किती विलक्षण फेरफार घडून आले आहेत याची सहज कल्पना येण्यासारखी आहे. इतर देशांतील लोकांस सुशिक्षण द्यावें, त्यांना प्रत्येक

---

* [केसरी ता. १६ डिसेंबर १९०२]

तऱ्हेच्या गुलामगिरींतून सोडवून पाश्चात्य लोक ज्या स्वतंत्रतेचा अनुभव घेत आहेत तिचा थोडाबहुत तरी आस्वाद त्या लोकांस मिळावा, किंबहुना एका देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस जिंकण्याचें जर कांहीं नैतिक कारण असेल तर तें जिंकलेल्या लोकांस पुढें मागें स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत करणें हेंच होय, अशी पादशाहीपणाची स्तुत्य कल्पना पूर्वीचे इंग्रज लोक नेहमीं आपल्या भाषणांत व कांहीं अंशीं आचरणांतहि स्वतःपुढें व लोकांपुढें मांडीत असत. निदान मागच्या काळासंबंधानें एवढें तरी स्पष्ट दिसून येतें कीं, त्या वेळचे मुत्सद्दी स्वतःच्या राष्ट्राच्या खऱ्या कल्याणासाठीं झटत आणि केवळ आपणास बडे म्हणावें एवढ्यासाठीं लक्षावधि प्राण्यांचीं हाडें एखाद्या दूरच्या मैदानावर पसरण्यास धजत नसत. परंतु हा काळ पालटून जाऊन सांप्रत निराळ्या प्रकारची व परिणामीं अपायकारक अशी परिस्थिति इंग्रजी राष्ट्रांत दिसून येत आहे. इंग्रज लोक हे जगाचे स्वामी, त्यांच्या सुखाकरितां उपभोग्य वस्तूंचा संग्रह म्हणून इतर देश परमेश्वरानें निर्माण केले आहेत, व यामुळें परमेश्वराच्या या लाडक्या लेकरांच्या बरोबरीचे हक्क इतर देशांतील लोकांस देणें हें आमच्या आकाशांतील बापाच्या इच्छेविरुद्ध आहे, अशा प्रकारच्या कल्पना हल्लीं हळू हळू इंग्रजी समाजांत पसरत चालल्या आहेत. किंबहुना भगवद्गीतेंतील " इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथं। इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ असौ मया हतः शत्रुः हनिष्ये चापरानपि ॥ ईश्वरोऽहमहंभोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी ॥ आढ्योऽभिजवनस्मि कोन्योऽस्ति सदृशो मया ॥ " या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें इंग्रज लोकांची सध्यां स्थिति झाली आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या स्थितीकडे जराशी नजर पोंचविली असतां आम्हीं जें म्हणतों त्याचा सहज प्रत्यय येण्यासारखा आहे. तसेंच, ज्या हिंदुस्थानांतील लोकांस या पाच्छाहीपणाच्या काळाच्या पूर्वी महाराणीसाहेबांनीं आपल्या इंग्रज प्रजेच्या बरोबरीचे हक्क देण्याचें वचन दिलें होतें त्याच देशाविषयीं आज बोलूं लागलें असतां राणीसाहेबांचें वचन कपटाचें आहे व इंग्रज लोकांच्या बरोबरीचे हक्क मिळण्याची अथवा देण्याची कल्पनाच मुळीं असंभाव्य आहे, असें इंग्लंडांतील लॉर्ड सालसबरीसारखे प्रमुख मुत्सद्दी स्पष्ट म्हणत आहेत. इतकेंच नव्हे, तर ज्या आयरिश लोकांनीं आज कित्येक शतकें पावेतों इंग्रजी राष्ट्राची इभ्रत व मोठेपणा वाढविण्यासाठीं आपल्या अनेक बुद्धिमान् व शूर लोकांचे बळी अर्पण केले त्यांसहि स्वातंत्र्य देणें योग्य नाहीं असें स्पष्ट सांगण्यांत येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां पाच्छाहीपणाच्या भुतानें इंग्रजी राष्ट्र किती झपाटलें गेलें आहे व त्याच्या पूर्वीच्या व हल्लींच्या कल्पनांत किती विलक्षण फरक पडला आहे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी आहे. अशा प्रकारें इंग्रजी राष्ट्रांत हें गर्वाचें वारें भरलें आहे त्यामुळें

इतर जिंकलेल्या राष्ट्रांचें किती नुकसान होणार आहे व त्यांना अधिकाधिक गुलामगिरीची स्थिति कशी येणार आहे, हें आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. परंतु यावर कोणी आम्हांस असा प्रश्न करतील कीं, इंग्रजी राष्ट्रांत संचार करीत असलेल्या या पाच्छाहीपणामुळें इतर देशांची हानी होऊन ते देश गुलामगिरीच्या चिखलांत जरी अधिकाधिक रुतत गेले तरी त्यामुळें इंग्रजी राष्ट्राची तर उन्नति होईलना ? व होत असेल तर इंग्रजी मुत्सद्यांस दुसऱ्या राष्ट्रांच्या हिताहिताकडे पाहण्याची जरूर नाहीं. खरें आहे; पण सर्वांनीं नेहमीं एवढेंच लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अधिकार व गुलामगिरी या कांहीं नित्य परस्परविरोधी गोष्टी नाहींत, व जें राष्ट्र अधिकाधिक अधिकार मिळवीत चाललें आहे, त्यास तें त्याचप्रमाणानें गुलाम बनत चाललें आहे, असें म्हणणें म्हणजे सूर्याचा प्रकाश व काळोख यांचें साहचर्य प्रस्थापित करण्यासारखें असंभवनीय नाहीं. सारांश पाच्छाहीपणा व गुलामगिरी यांत अशा प्रकारचा विरोध जरी प्रथम दर्शनीं भासत असला तथापि तो खरा नसून विरोधाचा केवळ आभास आहे, ही गोष्ट थोडासा विचार केला असतां, पुर्तेपणीं ध्यानांत येण्यासारखी आहे. प्रथम आपण ही एक गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, इंग्रजी राष्ट्र अथवा समाज असें आपण ज्यांस म्हणतों तो एक व्यक्ति नसून पुष्कळ व्यक्तींचा समुदाय आहे व यांतील प्रत्येक व्यक्तीस ज्या मानानें अधिकाधिक स्वातंत्र्य भोगतां येईल त्या मानानें तो समाज गुलामगिरीपासून अलिप्त राहील. परंतु कोणत्याहि कारणानें कां असेना जर व्यक्तींचें स्वातंत्र्य कमीकमी होत चाललें असेल तर या व्यक्तींनीं बनलेला समाज गुलामगिरींत अधिकाधिक लपेटला जात आहे, असें म्हणणें भाग आहे. आणि या दृष्टीनें जर हल्लींच्या पाच्छाहीपणाच्या कल्पनेनें इंग्रजी समाजांतील व्यक्तीस्वातंत्र्य कमी होत चाललें आहे, असें दाखवितां येईल तर ही कल्पना जसजशी अधिकाधिक बळावत जाईल, तसतसें हें स्वातंत्र्य कमी कमी होत जाणार, हें उघड आहे; आणि पाच्छाहीपणा म्हणजे गुलामगिरीच होय, हें त्यावरून सहज सिद्ध होण्यासारखें आहे.

मालक आणि चाकर हे शब्द जरी अन्योन्य प्रतियोगी असले तरी या दोघांमध्यें कोण कोणाचा मालक किंवा कोण कोणाचा गुलाम अथवा दोघेहि एकमेकांचे पर्यायानें गुलाम व मालक, या प्रश्नांचा जरासा बारकाईनें विचार करूं लागलें असतां आपणांस असें आढळून येईल कीं, या दोघांपैकीं चाकर तेवढाच मात्र गुलाम असें नसून मालक आणि चाकर हे दोघेहि गुलाम आहेत. जो मनुष्य दुसऱ्याला आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करितो तो स्वतःच त्याच्या ताब्यांत असणाऱ्या मनुष्याइतका आपण बांधला गेलेला असतो. उदाहरणार्थ, जर एखादा मनुष्य दुसऱ्यास कैद करून त्याचे दंडास दोरी बांधून

त्याच्या बरोबर जात असेल तर तो कैद केलेला मनुष्य पळून जाऊं नये म्हणून कैद करणाऱ्या मनुष्यासहि आपली स्वैर फिरण्याची इच्छा आंवरून धरून, कैद केलेल्या माणसाच्या मागें गुलामाप्रमाणें हिंडलें पाहिजे. तहान लागली असतां ती भागविण्यासाठीं जर एखाद्या झऱ्यावर या कैद करणाऱ्या मनुष्यास जावयाचें असेल तर बद्ध केलेल्या माणसाची विशेष खबरदारीनें व्यवस्था केल्याशिवाय त्यास जातां येत नाहीं. म्हणजे कैद केलेल्या मनुष्याबरोबरच कैद करणाऱ्या मनुष्याचेंहि स्वातंत्र्य नष्ट होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. आपलेकडे पोलिसलोक कैद्याबरोबर आगगाडींतून जेव्हां जेव्हां रात्रीचा प्रवास करितात तेव्हां तेव्हां कैद्यानें आपली सुटका करून घेऊं नये एवढ्यासाठीं त्यांना रात्रीच्या रात्री जागून काढाव्या लागतात व झोंप घ्यावयाची असल्यास त्या कैद्याच्या हातांतील एक हातबेडी आपल्या हातांत घालून घ्यावी लागते, असा अनुभव या पोलिसांपैकीं एकजणानें आम्हांस सांगितला आहे. या उदाहरणावरून कैद्यानेंच आपली स्वतंत्रता गमावली कीं त्याच्याबरोबर त्याच्या रक्षकाचीहि नाहींशी झाली, हें सहज कळून येणार आहे; आणि व्यक्तीस जो न्याय लागू आहे तोच बहुतेक अंशीं जिंकलेल्या व जिंकणाऱ्या या दोन्हीं राष्ट्रांसहि लागू पडतो. जो देश आपण जिंकला आहे तो आपल्या ताब्यांतून जाऊं नये अशीच जिंकणाऱ्या राष्ट्राची इच्छा असते व एवढ्यामुळें पोलीस शिपायासारखीच त्याला आपण कैद केलेल्या राष्ट्रासंबंधानें खबरदारी घ्यावी लागते. स्वातंत्र्य सर्वांसच आवडतें, व प्रत्येक राष्ट्र आपलें स्वातंत्र्य गमावण्यास फार नाखुष असतें हें खरें आहे. पण या सर्व सामान्य सिद्धांतास वरील तत्व लागू केलें असतां परराष्ट्र जिंकणाऱ्या राष्ट्राच्या मानसिक अवस्थेची कल्पना होणार आहे. ज्या ज्या राष्ट्रांनीं परकी देश काबीज करून तेथें आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न केला त्यांनीं त्यांनीं आपापल्या राज्यतृष्णेच्या मानानें स्वतःचें स्वातंत्र्य संकुचित करीत आणिलें, ही गोष्ट ऐतिहासिक उदाहरणांवरून सिद्ध झालेली आहे. व अशा दृष्टीनें पाहिलें असतां इंग्रजी लोकांच्या वाढत्या राज्यलोभामुळें इंग्रजी राष्ट्रांचें स्वातंत्र्य अधिकाधिक नष्ट होत असावें, असें सहज अनुमान निघतें; व प्रत्यक्ष स्थितीचा विचार केला असतां तेंच अनुमान दृढ होतें. इंग्रज लोकांची राज्यतृष्णा ज्यावेळीं आजच्या इतकी वाढलेली नव्हती त्यावेळीं इंग्रजी समाजाची जी स्थिति होती ती आजच्या स्थितीशीं ताडून पाहिली असतां या दोहींमध्यें पुष्कळच तफावत दृष्टीस पडणार आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वी पार्लमेंटांत सभासद निवडून देण्यासंबंधानें जो वादविवाद होई, त्यांत प्रत्येक मनुष्याच्या मतास मान दिला जाई. परंतु हल्लीं ही स्थिति पालटून जाऊन स्पेन्सरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें 'इलेक्टोरल ऑलिगार्कीज" अथवा सभासदांची निवडणूक करण्यासाठीं शेलक्या मंडळींच्या सभा स्थापन झाल्या आहेत. हिंदु-

स्थान इत्यादि जिंकलेल्या देशांतील पैशानें आपली तिजोरी भरून जे श्रीमंत बनलेले आहेत असे लोकच बहुधा सभासद निवडण्याच्या कामीं प्रमुख असतात व त्यांनीं सुचविण्याच्या मिषानें कोणातरी त्यांच्या एखाद्या बगलबच्यास निवडावें आणि इतरांनीं निमूटपणें आपली संमति प्रदर्शित करावी, असा प्रकार चालू आहे. इंग्रज लोकांची राज्यतृष्णा अनिवार झाली असल्याकारणानें पैसेवाल्या लोकांचें प्राबल्य तर वाढत चाललेंच आहे; परंतु या सधन लोकांपेक्षांहि लष्करी लोकांचें महत्त्व अधिकाधिक होत चाललें आहे, ही फार दुःखाची गोष्ट होय. आणि अशा प्रकारें लोकांच्या मर्जीविरुद्ध त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याची इच्छा जेथपर्यंत प्रबळ आहे तेथपर्यंत ही स्थिति कायम राहणार. लष्करी लोकांचें प्रस्थ इंग्लंडमध्यें किती माजलें आहे, व त्यामुळें गोरगरीबांस आपल्या मिळकतीचा किती भाग कराच्या रूपानें सरकारास भरावा लागतो, याचा एक दोन गोष्टींवरून खुलासा होण्यासारखा आहे. इंग्रज लोकांतील पोराटोरांस सुद्धां आपण शिपाई बनावें अशी इच्छा होऊं लागली आहे व शाळा आणि कॉलेजें यांतून लष्करी शिक्षण देण्यांत यावें, अशा प्रकारच्या सूचना मोठमोठे लोक करूं लागले आहेत. तसेंच पूर्वी बुद्धीस जितका मान मिळत असे त्याच्या दशांशानेंहि हल्लीं देण्यांत येत नसून मानसिक शक्तीपेक्षां शारीरिक शक्तीचाच विशेष गौरव करण्यांत येत आहे. क्रिकेट, फुटबॉल वगैरे खेळांमध्यें जो आपलें प्राविण्य दाखवितो त्याचा जितका जयजयकार होतो तितका मोठमोठ्या पंडितांचा किंवा युनिव्हर्सिटींतून निघालेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांचाहि होत नाहीं, ही गोष्ट इंग्रजी वर्तमानपत्रें व सचित्र मासिक पुस्तकें यांवरून चांगली लक्षांत येण्यासारखी आहे. इंग्रजी समाजांतील धर्मशिक्षण देणारे पाद्रीभट देखील आपल्या धर्मविषयक व्याख्यानांत युद्धविषयक गोष्टींचा उपदेश करूं लागले आहेत व केवळ खिस्तीधर्म पसरण्यासाठीं अस्तित्वांत आलेल्या एका पंथांतील लोकांना आपणास मुक्ती फौज असें लष्करी नांव धारण करण्यांत भूषण वाटत आहे. या पंथाचे आचार्य आपणास सेनापति, कर्नल, कप्तान अशा पदव्या लावून घेऊन आपला लष्करी मानाबद्दलचा अभिलाष धर्माच्या कामांतहि पुरा करून घेत आहेत. अशा रीतीनें जें हें स्थित्यंतर घडून आलें आहे त्याचा विचार केला असतां इंग्रज लोकांस लष्करी कल्पनांनीं किती भुरळ पाडली आहे याचा सहज अजमास करतां येण्यासारखा आहे. याप्रमाणें परिस्थिति असल्यामुळें स्पेन्सरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें पार्लमेंट हें लष्करी खात्यास सर्व सामुग्रीचा पुरवठा करणारें एक कमिसरिएटच बनत चाललें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. युद्धाच्या संबंधानेंच विचार करावयाचा प्रसंग पुष्कळ वेळां येत असल्यामुळें पार्लमेंटच्या सभासदाचे व्यक्तिशः हक्क कमी कमी होत जाणें व कांहीं निवडक मंडळीच्या हातीं सर्व सत्ता राहणें हें वरील परिस्थितीस अनुसरूनच होय; आणि त्याचप्रमाणें इंग्लंडाची राज्यव्यवस्था बद-

लत चालली आहे. जेथें पूर्वीं पार्लमेंटच्या हातांत सर्व सत्ता होती तेथें एका सालिसबरीच्या कुटुंबांतील मुत्सद्दी हल्लीं सर्व सूत्रें हालवीत आहेत. अशा रीतीनें थोड्या लोकांच्या हातीं सत्ता देऊन त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागण्याचा प्रसंग आज इंग्रजी समाजास आला असला, व तो आला आहे हें वर दाखविलेंच आहे, तर इंग्रजी राष्ट्र अधिकाधिक गुलाम बनत चाललें आहे, ही गोष्ट सिद्ध होत नाहीं काय ? तसेंच बुद्धीस जो मान मिळत असे तो मिळण्याचें नष्ट होऊन आज शारीरिक बळासच जर इंग्रजी समाज अधिक मान देत आहे तर इंग्रज लोक सुधारणेच्या मार्गावरून पुनः रानटीपणाच्या मार्गास लागत चालले आहेत, ही गोष्टहि कबूल करणें भाग नाहीं काय ? इंग्रजी राष्ट्राच्या वाढत्या गुलामगिरीचें आणखी एक दुसरें प्रमाण आहे. प्राचीन काळीं जेव्हां गुलामगिरीची संस्था उघडपणें अस्तित्वांत होती त्यावेळीं गुलामास मालकाच्या शेतांत खपावें लागत असे व या गुलामांच्या दर्जांत कमी अधिकपणाच्या मानानें नंबरवारी होती. कित्येक गुलामांस मालकासाठीं आठवड्याचा आठवडा खपावें लागे व कित्येकांस या आठवड्यांतून कांहीं दिवसपावेतों सुट्टी असून कांहीं दिवस पावेतोंच मालकासाठीं कष्ट करावे लागत. पुढें या स्थितींत जरासा फेरफार होऊन श्रमाच्या मोबदला पैसे देण्यांत येऊं लागले. या प्राचीन स्थितीचा जरासा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, दुसऱ्याच्या फायद्यासाठीं म्हणून जितके दिवस पावेतों कोणाहि मनुष्यास कष्ट करावे लागतात तितके दिवसपर्यंत तो त्याचा गुलाम होय. अशा दृष्टीनें प्रत्येक सरकारास प्रजाजन जे कर देतात त्या कराचे पैसे मिळविण्यासाठीं त्यांस जितके दिवस खपावें लागतें तितके दिवसपर्यंत ते सरकारचे गुलाम होतात, असें मानलें पाहिजे. स्वतःच्या जीविताचें व वित्ताचें संरक्षण होण्यासाठीं सरकार म्हणून एक संस्था प्रत्येक समाजांत असणें जरूर आहे व ही संस्था चांगल्या रीतीनें चालण्यासाठीं कराच्या रूपानें लोकांनीं तीस पैसे देणें हें त्यांच्याच हिताचें व फायद्याचें आहे. परंतु ह्यांत ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, स्वतःच्या संरक्षणासाठीं पैसे भरणें व इतर कोणत्याहि कामासाठीं पैसे देणें यांत मोठा फरक आहे. इंग्रजी समाजास जर स्वतःच्या संरक्षणासाठीं कर भरावे लागत असले तर तो गुलाम नसून पूर्णपणें स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहे, असेंच म्हणणें योग्य आहे; परंतु कांहीं प्रमुख व्यक्तींच्या अनावर राज्यतृष्णेमुळें इंग्रज लोकांस जर अधिकाधिक कर द्यावे लागत असतील तर त्या मानानें ते उत्तरोत्तर व अधिकाधिक गुलाम बनत चालले आहेत, असेंच म्हणणें भाग आहे, स्पेन्सरसाहेबांनीं आपल्या अखेरच्या ग्रंथांत या विषयाचा ऊहापोह करतांना असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, दक्षिण आफ्रिकेंतील ट्रान्सवाल वगैरे संस्थानासारखे स्वातंत्र्यप्रिय देश केवळ आपलें पोकळ महत्त्व वाढविण्यासाठीं जिंकण्यास

इंग्लंडचे कांहीं मुत्सद्दी हपापले असल्यामुळें पूर्वीच्या मानानें इंग्रज लोकांस अधिक कर भरावे लागत आहेत व यामुळें इंग्लंडचे लोक अधिकाधिक गुलाम बनत चालले आहेत. एवंच, पाच्छाईपणा हें दुःखाचें मूळ आहे. गर्वानें व अतिलोभानें कधींच कोणाचें कल्याण झालेलें नाहीं, व 'लोभमूलानि पापानि' हा सिद्धांत हजारों वर्षांपूर्वीच शहाण्या लोकांस कळलेला आहे. तेव्हां साम्राज्याभिमानाचे इंग्रजी समाजावर अनेक दुष्परिणाम घडत आहेत, हें अधिक स्पष्ट करण्याची जरूर नाहीं. लोकांस निरुद्योगीपणाची आवड जडत चालली आहे, पोषाखीपणा व मिजास सारखी वाढत आहे व शेतकी खालावत चालली आहे. तसेंच इंग्रज लोकांमध्यें पूर्वी जी स्वातंत्र्यप्रीति आढळत असे ती नष्ट होत चालली असून जिंकलेल्या राष्ट्रांतील लोकांचें तर राहोच परंतु स्वतःच्या जातभाईंचें देखील व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्त्वास अनुसरून केलेलें वर्तन इंग्रज लोकांस खपेनासें झालें आहे. बोअर लोकांविषयीं कळकळ वाटून कांहीं लोकांनीं एक सभा भरविण्याचा प्रयत्न केला होता. या सभेंत दांडगे लोकांच्या दांडगाईपासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं पोलिसांची मदत मागितली असतांहि मिळाली नाहीं, एवढेंच नव्हे परंतु ही मदत न देणेंच वाजवी होतें, असें कित्येक प्रमुख पत्रकारांनीं प्रतिपादन केलें होतें. ही सर्व स्थिति स्वातंत्र्याच्या वाढीची साक्ष देत नसून स्पेन्सरसाहेबांच्या मताप्रमाणें इंग्रजी समाजाच्या अवनतीचें व वाढत्या गुलामगिरीचें निदर्शक होय. या राज्यलोभामुळें व पाच्छाहीपणामुळें इतर देशांचेंच नव्हे, तर स्वतः इंग्लंडचें नुकसान होत आहे व त्यापासून दूर राहणें, हें इंग्रजी राष्ट्राचें कर्तव्य आहे. करितां सरतेशेवटीं आम्हांस एवढेंच सांगणें आहे कीं, स्वतःचा व दुसऱ्याचा असे दोघांचेहि गळे दोरीनें एकत्र बांधले जात असतां ती दोरी आंवळण्याचा प्रयत्न करणें, हें उभयतांसहि श्रेयस्कर नाहीं व एवढ्यासाठींच इंग्लंडनें इतर देशांस गुलाम बनवून " कोऽन्योऽस्ति सदृशो मया " असा डौल मारण्यापेक्षां योग्य तितकें वर्चस्व आपणाकडे ठेऊन जिंकलेल्या देशांना स्वातंत्र्याची जोड मिळवून देण्यास झटावें, हेंच त्याच्या हिताचें असून नीतिदृष्ट्या भूषणास्पद व फायद्याचें आहे.

❁ ❁ ❁

*श्री. महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर केला !

आमच्या संस्थानिकांची व राजेरजवाड्यांची स्थिति कोणत्या प्रकारची झाली आहे किंवा होत आहे याचें गेल्या अंकींच आम्हीं थोडें विवेचन केलें होतें व त्याच अंकीं श्री. महाराज बाळासाहेब होळकर याच्यासंबंधानें जी हकीकत प्रसिद्ध केली होती त्यावरूनहि संस्थानिकांच्या भावी स्थितीसंबंधानें चांगली कल्पना करतां येण्याजोगी होती. श्री. बाळासाहेब होळकर यांच्यासंबंधानें आम्हीं दिलेला हिंदुस्थानसरकारचा ठराव अद्याप मंजूर झाला नाहीं अशा अर्थाची बातमी मुंबईच्या एका बड्या दैनिक इंग्रजी वर्तमानपत्रानें आमच्या लेखानंतर प्रसिद्ध केलेली होती. पण आपला कोंबडा झांकून ठेवल्यानें ज्याप्रमाणें उजाडावयाचें रहात नाहीं, त्याप्रमाणें अखेरीस आम्हीं लिहिल्याप्रमाणें गेल्या शनिवारीं इंदुरास दरबार भरवून तेथील गव्हर्नर–जनरलसाहेबांचे एजंट यांनीं भरदरबारांत महाराज होळकर यांचा राजीनामा हिंदुस्थानसरकारनें मंजूर केला असून त्यांच जागीं त्यांच्या चिरंजीवांस गादीवर बसविल्याचें जाहीर केलें. हे चिरंजीव अल्पवयी असल्यामुळें संस्थानचा कारभार तूर्त रेसिडेंट आणि कौंसिल यांच्यामार्फत चालवावा आणि पूर्वीचे महाराज होळकर यांनीं दरसाल ४ लाख रुपये पेन्शन घेऊन बढवाईस "हरि हरि" म्हणत बसावें असें ठरलें आहे. महाराजांनीं आपल्या राज्यकारभाराचा राजीनामा गेल्या आगस्टांत रेसिडेंटजवळ दिला व तत्पूर्वीहि त्यांनीं त्यांजवळ अशाच प्रकारची आपली इच्छा प्रदर्शित केली होती असें सरकारी ठरावांत म्हटलेलें आहे. महाराजांनीं आपण होऊनच राजीनामा दिल्यावर मग त्यांचा हात कोण धरणार ! त्यास हिंदुस्थानसरकार व विलायतसरकार यांची तावडतोब मंजुरी मिळून लवकरच युवराजास गादीवर बसविण्याची तजवीज चाललेली होती. पण मध्यंतरीं श्री. बाळासाहेब होळकर यांच्या विनंतीवरून दिल्लीदरबार होईपर्यंत ही व्यवस्था करण्याचें तहकूब राहिलें होतें, असें आतां प्रसिद्ध झालें आहे. महाराजांनीं आपल्या जागेचा जो राजीनामा दिला तो आपली प्रकृति अलीकडे नादुरुस्त असल्यामुळें दिला असें हिंदुस्थानसरकारच्या ठरावांत लिहिलेलें आहे. पण महाराजांच्या प्रकृतीचें मान ज्यांस माहीत आहे त्यांस हें कारण केवळ औपचारिक असून यांत कांहीं तरी राजकीय धोरण आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. आजपर्यंत विषप्रयोगाकरितां, खुनाकरितां किंवा

---

* [केसरी ता. ३ फेब्रुवारी १९०३]

दुसऱ्या कांहीं कारणाकरितां वरिष्ठ प्रतीच्याहि संस्थानिकांस गादीवरून काढून त्यांच्या जागीं अल्पवयस्क किंवा औरस वारसाची स्थापना करण्याचा अधिकार आणि श्रेय बरेच वेळां हिंदुस्थानसरकारानें घेतलेलें आहे. पण संस्थानिकांकडून प्रकृतीच्या सबबीवर राजीनामा घेऊन तो मंजूर करण्याची युक्ति अमलांत आणण्याचें श्रेय लॉर्ड कर्झन यांनींच प्रथमतः संपादन केलें. श्री. बाळासाहेब होळकर हे वयानें तरुण असून शरीरानें सुदृढ आहेत. अशा स्थितींत त्यांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांस आपल्या राज्य चालविण्याच्या अधिकाराचा राजीनामा द्यावा लागला हें म्हणणें कोणासहि चमत्कारिक, किंबहुना असंभवनीय वाटल्यावांचून राहणार नाहीं. महाराजांच्या हातचा जो लेख असेल त्यांत वरील प्रकारचे हे शब्द असतील, नाहीं असें नाहीं, पण महाराजांच्या राजीनाम्यांत हे शब्द असले म्हणजे वस्तुस्थिति तशी खरीच आहे असें म्हणतां येत नाहीं, आणि खरीच वस्तुस्थिति काय आहे हें समजण्याचें हिंदुस्थानसरकारास साधन नव्हतें असेंही आम्हांस वाटत नाहीं. आज बरींच वर्षें श्री. बाळासाहेब होळकर यांच्याविरुद्ध त्यांच्याच प्रजेमधील कांहीं लोकांनीं बराच गवगवा केलेला होता व त्याच गवगव्याचा हल्लींचा राजीनामा हा परिणाम झाला असावा असें मानण्यास बळकट जागा आहे. महाराजांचा अधिकार त्यांजकडून युक्तीनें कौन्सिलकडे कांहीं दिवसांपूर्वी देण्यांत आलेला होता. पण संस्थानच्या करभाराची पुढें व्यवस्था काय होते, म्हणजे श्री. बाळासाहेब यांस गादीवर ठेवतात किंवा नाहीं याबद्दल हिंदुस्थानसरकारचें धोरण कांहींच कळलेलें नव्हतें. कांहीं प्रकरणांत महाराजांचे हातून चुका किंवा जुलूम झाला, एवढ्या सबबीवर त्यांस गादीवरून दूर करणें राजकीयदृष्ट्या अन्यायाचें व जुलमाचें झालें असतें; आणि निदान हिंदुस्थानसरकारच्या दृष्टीनें तरी महाराजांस त्यांच्या प्रजेवर जुलूम करण्याचा पूर्ण अधिकार ठेवणें इष्ट नव्हतें ! अशा स्थितींत काय तोड काढावी याची अर्थात् बरीच भवति न भवति झाली असेल, आणि शेवटीं त्याचें पर्यवसान महाराजांच्या राजीनाम्यावर झालें असावें, हें हल्लींच्या सरकारी ठरावावरून उघड दिसतें. श्री. बाळासाहेब होळकर यांनीं आपण होऊन खुषीनें राजीनामा दिला आणि ज्योतिषांनीं सांगितलेल्या सुमुहूर्तावर आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून "न हि सति कुलधुर्ये सूर्यवंश्याः गृहाय" या न्यायानें आपण बढवाईस नर्मदा नदीच्या कांठीं वैराग्यवृत्ति धारण करून देह त्यागण्याकरितां गेले असें कोणीही विचारी मनुष्य मान्य करील असें आम्हांस वाटत नाहीं. कारण आपल्या पुत्रास राज्यसुख देण्याच्या इच्छेनें त्यांनीं केलें म्हणावें तर राजपुत्र कुलधूर्य नसून अजून अल्पवयी आहेत; त्यांस राज्यसुख तें कसलें मिळणार ! आपल्या हातानें आपल्या पुत्रास गादीवर बसविण्याइतका मनाचा थोरपणा विलायतेंतील किंवा युरोपांतील राजांमध्यें आढळून येत नसला, तर तो हिंदुस्थानांतील राजांमध्यें

आढळन येत आहे ही गोष्ट खरी आहे; पण श्री महाराज बाळासाहेब यांच्या मनाची खरोखरच जर अशा प्रकारची स्थिति असती, तर आज कांहीं दिवस जो कौन्सिलकडे अधिकार देण्यांत आला आहे तसें न घडतां व आगष्टपासून जानेवारी अखेरपर्यंत सहा महिने ही बातमी गुप्त न राहतां खुद्द महाराजांनीं इंदुरास युवराजाच्या अभिषेकाची तयारी करून मोठ्या आनंदानें व थाटानें हा समारंभ पार पाडला असता. गेल्या शनिवारच्या दरबारांत हा प्रकार घडून आल्याचें दिसत नाहीं. उलट महाराज दुःखी होऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं स्पेशल ट्रेननें बढवाईस चालते झाले असें इंदूरचे एक गृहस्थ कळवितात. यावरून उघड उघड असें म्हणावें लागतें कीं, ज्याप्रमाणें आमच्या नोकरींतिल एकादा इसम आम्हांस अप्रिय झाल्यास त्यास कामावरून न काढतां त्याचा आम्ही राजीनामा घेऊन तो मंजूर करतों आणि खुषीनें नोकरी सोडल्याचें सदर कृत्यास स्वरूप देतों, तद्वतच हिंदुस्थान सरकारानें श्री. महाराज होळकर यांच्याशीं वर्तन केलें आहे ! महाराज होळकर यांनीं आपण होऊनच राजीनामा दिला त्यास आम्ही काय करावें ही एक प्रतिकूल टीकाकारास जबाब देण्याची चांगली युक्ति आहे, व त्याबद्दल लॉर्ड कर्झन यांच्या किंवा हिंदुस्थान सरकारच्या धूर्ततेची तारीफ करावी तेवढी थोडीच ! पण जरा खोल विचार केला असतां आमचे राजेरजवाडे व संस्थानिक यांच्या हक्कांचा या युक्तीनें समूळ नाश होत आहे, असें साध्या धनगराच्याही लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं; मग धनगर राजाची गोष्ट कशाला ? आतां कदाचित् कोणी असें म्हणतील कीं, होळकर हे पेशव्यांचे आश्रित असून पेशव्यांनींच ज्या अर्थीं त्यांस सुभेदार केलें होते त्या अर्थीं एक सुभेदार मयत झाला असतां त्याची सुभेदारी पुढें कोणाकडे चालवावी याचा निकाल करण्याचा अधिकारही पेशव्यांकडेच राहिलेला होता; आणि पेशवाई बुडल्यावर पेशव्यांच्या जोड्यांत पाय घालणाऱ्या सार्वभौम इंग्रज सरकाराकडेही तोच अधिकार आलेला आहे. ही कोटी प्रथम दर्शनीं खरी दिसली तरी वस्तुस्थिति याहून फार निराळी आहे. होळकर यांचा व इंग्रजांचा संबंध पेशवे सरकारामार्फत जडलेला नाहीं, हें हिंदुस्थानच्या इतिहासावरून व होळकर आणि इंग्रज यांच्या दरम्यान झालेल्या तहनाम्यांवरून उघड आहे. शिंदे व होळकर हे दोघेही मराठी साम्राज्याचे अखेरचे आधारस्तंभ होते; पण या दोघांनींही कंपनी सरकाराशीं जे तहनामे केलेले आहे ते पुण्याच्या दरबारास न विचारतां किंबहुना दरबारच्या इच्छेविरुद्ध आपण स्वतंत्र राजे आहोंत अशा आणि बरोबरीच्या नात्यानें केलेले आहेत. कंपनी सरकारचा पहिला तहनामा यशवंतराव होळकरांशीं १८०५ सालीं झालेला आहे, व यशवंतराव होळकर यांनीं पुण्यावर स्वारी केली होती हें प्रसिद्ध आहे. या तहनाम्यांत इंग्रज सरकार यशवंतराव होळकरास आपला दोस्त समजतें असें स्पष्ट म्हटलेलें असून होळकरांच्या

राज्यकाभारांत हात घालण्याचा अधिकार इंग्रज सरकारकडे असल्याचें त्यांत एक अवाक्षरहि नाहीं. यशवंतराव होळकर १८११ सालीं मरणपावले व त्यांचे चिरंजीव मल्हारराव हे गादीवर आले. यांचे वेळीं राज्यांत बरीच अंदाधुंदी झालेली असल्यामुळें इंग्रजसरकारचा हात संस्थानच्या कारभारांत अधिक शिरला; व संस्थानच्या बंदोबस्ताकरितां इंग्रजसरकारनें कांहीं सैन्य ठेवावें असा करार झाला. होळकरावर पेशवे कोणत्याही प्रकारचा सार्वभौमत्वाचा हक्क सांगणार नाहींत, अशा प्रकारची हमीहि या तहनाम्यांत इंग्रजसरकारांनीं घेतलेली आहे; तथापि इंग्रजसरकार होळकरसरकारचें दोस्त आहे, वरिष्ठ सरकार नव्हे, अशा आशयाचाच मजकूर आहे. हा तहनामा १८१८ मध्यें झाला; व पुढें १५ वर्षांनीं मल्हारराव होळकर मयत झाले. तेव्हां त्यांचे पश्चात् त्यांच्या कुटुंबानें व आईनें मार्तंडराव यांस दत्तक घेतलें. त्यास इंग्रजसरकारनें कांहीं हरकत घेतली नाहीं, इतकेंच नव्हे तर हरिराव होळकर यांनीं मार्तंडरावास काढून बळजबरीनें जेव्हां आपणाकडे अधिकार घेतला, तेव्हांहि इंग्रजसरकारनें संस्थानच्या कारभारांत कांहीं हात घातला नाहीं ! उलट १८३५ सालीं हरिराव यांनीं इंग्रजसरकाराकडे जेव्हां मदत मागितली तेव्हां संस्थानचें रक्षण करण्याची जरी आम्ही हमी घेतली आहे तरी ती हमी संस्थानच्या अंतर्व्यवस्थेंत जे घोंटाळे होतील त्यास लागू नाहीं असा इंग्रजसरकारकडून हरिराव यास जबाब मिळाला. हरिराव १८४३ सालीं वारले, आणि नंतर त्यांचे पश्चात् त्यांचे दत्तक चिरंजीव खंडेराव यांस गादी मिळाली. यावेळीं खंडेराव हे गादीचे योग्य वारस आहेत असें जाहीर करण्याची इंग्रजसरकारानें संधी घेतली. खंडेराव पुढें तीन चार महिन्यांतच निर्वतले व त्यांचे मागें गादीचा सरळ वारस कोणी राहिला नाहीं. होळकरशाहींत वारसाचा निर्णय करण्याच्या कामीं हात घालण्यास इंग्रजसरकारास ही चांगली संधी होती, आणि तुकोजीराव यास दत्तक देऊन त्यांची इंदूरच्या गादीचे मालक म्हणून नेमणूक करावी असा गव्हर्नर जनरल यांनीं १८४४ सालीं इंदूरचे रेसिडेंट यास हुकूम दिला. श्री. तुकोजीराव यांस १८५२ सालीं मुखत्यारी मिळाली व त्यांच्या हयातीपर्यंत त्यांनीं संस्थानचा कारभार मोठ्या दक्षतेनें, इभ्रतीनें आणि मुत्सद्दीपणानें चालविला हें सर्व प्रसिद्ध आहे. यांचे मागून हल्लीं आपल्या जागेचा राजीनामा दिलेले त्यांचे चिरंजीव श्री. बाळासाहेब हे १८८४ सालीं गादीवर आले; व आतां म्हणजे १९०३ सालीं यांचा राजीनामा घेऊन तो मंजूर करण्याचा व त्यांचे जागीं त्यांच्या मुलास नेमण्याचा सर्व अधिकार इंग्रजसकाराकडे आलेला आपण पहात आहों ! होळकरांच्या वंशांत ज्यांनीं नांव गाजविलें किंवा मूळ वंशाची स्थापना केली ते मल्हारराव १७६९ सालीं निर्वतले आणि प्रसिद्ध अहिल्याबाई या परलोकवासी होऊनहि अद्याप कायतीं १०७ च वर्षें झालेलीं आहेत. एवढ्या मुदतींत

होळकर संस्थानच्या हक्कांची उतरत्या श्रेढीनें काय अवस्था झाली आहे हें वरील त्रोटक हकीकतीवरून वाचकांचें लक्षांत येईल सातारच्या महाराजांस न जुमानतां पेशवे स्वतंत्र झाले तरी अखेरपर्यंत पेशवाईचीं वस्त्रें साताऱ्याहून येत असत. पण यशवंतराव होळकर यांनीं पूर्वीची शिस्त सोडून पेशव्यांस न जुमानतां स्वतंत्र रीतीनें इंग्रजांशीं तह केला व त्यांचे दोस्त बनले; आणि तहनाम्याप्रमाणें पाहिलें असतां त्यांचे वंशजही इंग्रजसरकारचे दोस्त असावयास पाहिजे होते. पण 'बळी तो कान पिळी' या न्यायानें दोन दोस्तांपैकीं एक यजमान आणि दुसरा नोकर झालेला आहे; आणि नोकरास काढून टाकण्याच्याऐवजीं त्याचा राजीनामा घेऊन तो मंजूर करण्याची मेहरबानी करण्याचा अधिकार या यजमानाकडे आतां आलेला आहे ! सर लीवॉर्नर व मि. टप्पर यांनीं हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांचीं संस्थानें या विषयावर जीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांत कोणत्याहि संस्थानिकास दुःसह्य गैरवर्तनाबद्दल किंवा इंग्रजसरकारशीं बेईमानपणाचें किंवा द्रोहाचें वर्तन केल्याबद्दल गादीवरून काढून टाकण्याचा इंग्रजसरकारास अधिकार आहे असें उघड प्रतिपादन केलेलें आहे; व त्यास असें कारण दाखविलें आहे कीं, ज्या अर्थीं संस्थानिकांच्या प्रजेस संस्थानिकांविरुद्ध बंड करून त्यांस शासन करण्याचा अधिकार इंग्रज सरकारनें ठेवलेला नाहीं, त्या अर्थीं अशा तऱ्हेच्या गैरवर्तनाबद्दल संस्थानिकास शासन करून संस्थानांतील प्रजेस न्याय देणें हें इंग्रजसरकारचें कर्तव्य आहे. हें कारण सयुक्तिक असो वा अयुक्तिक असो लांडगा कोंकरू न्यायानें तें आम्हांस मान्य केलें पाहिजे. परंतु हल्लींचा प्रकार असा' कांहीं चमत्कारिक आहे कीं, या न्यायानेंही त्याचें समर्थन होत नाहीं. श्री. महाराज बाळासाहेब होळकर यांचें जें कांहीं गैरवर्तन झालेलें असेल हें दुरुस्त करण्यास दुसरे पुष्कळ मार्ग होते. संस्थानच्या संस्थानांत लोकांच्या संमतीनें कौन्सिल नेमून किंवा इंग्रजींत ज्यास "कॉन्स्टिटयूशन" म्हणतात तशी कांहीं व्यवस्था लावून कारभार चालवितां आला असता अथवा मध्यंतरीं ज्याप्रमाणें कौन्सिलकडे अधिकार दिला होता तसाच कांहीं दिवस ठेऊन पुढें महाराजांस पूर्ण अधिकार देण्यास कांहीं हरकत नव्हती. पण अशी व्यवस्था न करतां एखाद्या नोकराचा आपण ज्याप्रमाणें राजीनामा घेतों त्याप्रमाणें श्री. बाळासाहेब होळकर यांचा राजीनामा घेऊन अल्पवयी मुलाच्या नांवानें रेसिडेंट आणि दिवाणाधीष्ठित कौन्सिल यांच्या तंत्रानें राज्यकारभार चालविण्याचा हिंदुस्थानसरकारनें ठराव केला आहे. संस्थानिकांच्या हक्काच्या दृष्टीनें पाहिलें असतां हा ठराव त्यांस अतिशयच कमीपणा आणणारा आहे; व हिंदुस्थानसरकारनें या बाबतींत आपणाकडे जो अधिकार घेतलेला आहे तो सदर सरकारनेंच संस्थानिकास जें दुर्बलत्व आणिलें आहे त्याचा फायदा घेऊन घेतलेला आहे असें म्हणणें भाग येतें. श्री. बाळासाहेब होळकर यांस गादीनशीन असतांच दिल्ली दरबारास जाण्याची हौस

होती म्हणून त्यांचा राजीनामा मंजूर करण्याचा विधी दिल्लीदरबारच्या पूर्वी करण्यांत आला नाहीं असें सरकारी ठरावांत लिहिलें आहे. परंतु याचा अर्थ आम्हांस कांहीं कळत नाहीं. ज्या बाळासाहेबांस आपला राजीनामा मंजूर झाल्याचें माहीत होतें व राजीनामा मंजूर झाला तरी हिंदुस्थानसरकारच्या मेहरबानीनें आपल्या सलामीच्या तोफा व मानमरातब कायम राहील असें कळलें होतें ते दिल्लीस राजीनामा पास झाल्यावर गेले असते काय आणि तत्पूर्वी गेले असते काय सारखेंच ! लॉर्ड कर्झन यांनीं स्वतः इंदुरास येण्याची इच्छा प्रदर्शित केली तेव्हां " राज्य आपलेंच आहे मला कशाला विचारतां ?" असें श्री. बाळासाहेब होळकर यांनीं जबाब दिल्याचें कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेलें होतें. हल्लींच्या हकीकतीवरून हा जबाब राजीनामा लिहून दिल्यावर झालेला होता, अर्थात् तो वैतागून दिलेला होता असें उघड होतें. मग या वैतागून दिलेल्या जबाबावरून राजीनामा मंजूर करून मुलानें गादीवर बसविण्याचा समारंभ घुढें ढकलला कीं काय कोण जाणें ! कसेंहि असो; कै० तुकोजीराव होळकर यांचा सुत्सद्दीपणा आणि श्री. बाळासाहेब होळकर यांचा वरील जबाब व राजीनामा लक्षांत आणतां मराठी राज्याचे संस्थापक शिवाजी महाराज व त्यांचे चिरंजीव संभाजी महाराज यांच्या चरित्राची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. मात्र मराठ्यांचें राज्य लयास नेण्यास पाहणाऱ्या अवरंगजेबापेक्षां हल्लींच्या व्हॉइसरायाची धूर्तता विशेष आहे असें कोणासही कबूल केलें पाहिजे. इंदूर संस्थानची ही स्थिति पाहून इतर संस्थानिक जागृत झाल्यास आणि त्यांच्या हक्काची व अधिकाराची चांगली मीमांसा होऊन कांहीं तरी नियम ठरण्याचा प्रसंग आल्यास बरें, नाहींपेक्षां संस्थानिक म्हणजे इंग्रज सरकारचें सरंजामदार नोकर आणि त्यांच्या बारीकसारीक गैरवर्तनाबद्दलहि गोड वाटेल त्याप्रमाणें राजीनामा घेऊन किंवा जबरीनें त्यांस गादीवरून काढून टाकण्याचा इंग्रज सरकारास अधिकार आहे असें हल्लींच्या प्रकरणावरून सिद्ध होत आहे. इंग्रज सरकारास संस्थानें खालसा करावयाचीं नाहींत हें जरी खरें असलें तरी लेखी हुकूम पाठवून संस्थानिकास आपल्या कामावरून मुकाट्यानें दूर करण्याचा अधिकार आपणाकडे ठेवण्याचा इंग्रज सरकारचा पूर्ण संकल्प आहे; व त्यांतहि विशेष गोष्ट ही कीं, ज्या करणाकरितां हा अधिकार इंग्रजसरकार बजावील तीं कारणें सदर अधिकार बजावण्यास योग्य आहेत कीं नाहींत याचा निर्णयही लोकमताची पर्वा न ठेवितां सरकार आपण होऊनच करणार. ही स्थिति किती शोचनीय आहे हें आम्ही सांगण्यांचें कांहीं कारण नाहीं. आमची एवढीच आशा आहे कीं, याचा प्रतिकार करण्याचा जर कांहीं इलाज असेल तर तो करण्यास श्री. बाळासाहेब होळकर तयार नसल्यास इतर संस्थानिक तरी तो केल्याखेरीज राहणार नाहींत. श्री. बाळासाहेब होळकर यांनीं राजीनामा कां दिला, यापूर्वी त्यांचें व रेसिडेंट

याचें भाषण काय झालें, कांहीं दिवसांपूर्वी त्यांचा अधिकार कौन्सिलकडे दिला होता याबद्दल त्यांची तक्रार होती कीं काय आणि ती तक्रार ऐकली नाहीं म्हणून वैतागून राजीनामा दिला किंवा प्रकृती नादुरुस्त असल्यामुळें दिला, वगैरे गोष्टींचा पूर्ण खुलासा होणें जरूर आहे. आणि हा खुलासा हिंदुस्थानसरकाराकडून येथें होत नसल्यास विलायतसरकाराकडे होईल व तेथें तरी या प्रकरणाची पुरी शहानिशा होईल अशी आम्हांस उमेद आहे.

* * *

* राजीनामा कां बडतर्फी ?

श्री. महाराज शिवाजीराव व उर्फ बाळासाहेब होळकर यांनीं आपल्या जागेचा राजीनामा देऊन हिंदुस्थान सरकारच्या मंजुरीनें आपले चिरंजीव श्री. तुकोजीराव बाळासाहेब यांस सुमुहूर्तानें गादीवर बसाविलें आणि आपण स्वस्थपणें 'हरि हरि' म्हणत कालक्षेप करण्याकरितां नर्मदेच्या काठीं वढवाईस निघून गेले हें वर्तमान आम्हीं पूर्वीच प्रसिद्ध केलें आहे; व ता० ३१ रोजीं भरलेल्या दरबारची हकीकतही दुसरीकडे प्रसिद्ध केली आहे. ही व्यवस्था इतक्या गुप्त रीतीनें आणि एकदम कां करण्यांत आली असा प्रश्न सकृद्दर्शनीं कोणाच्याही डोळ्यापुढें उभा राहिल्याखेरीज राहणार नाहीं. श्री. बाळासाहेब होळकर यांचे वय अवघें ४५ वर्षांचें किंवा त्याहूनही जरासें कमीच असेल. एवढ्या वयांत राज्यकारभार चालविण्याचा त्यांस तिटकारा येऊन नर्मदेच्या कांठीं वैराग्यवृत्ति धारण करून राहणें त्यांस राज्य चालविण्यापेक्षां श्रेयस्कर वाटावें हेंच आधीं अलौकिक आश्चर्य होय. त्यांतून बाळासाहेब होळकर याची वृत्ति पहिल्यापासूनच वैराग्यशील असती तर गोष्ट निराळी, मग भर्तृहरी किंवा बुद्ध यांप्रमाणें ते राज्यास कंटाळून मुलास गादीवर बसवून कसे तरी मोकळे झाले, असें आम्हीं म्हटलें असतें. पण खरा प्रकार तसा नसून बाळासाहेब हे जात्या तापट, पाणीदार व थोडेसे विक्षिप्त आहेत. तेव्हां वैराग्यापेक्षां विक्षिप्तपणामुळेंच त्यांच्या तोंडून 'मला राज्य नको, पाहिजे तर मुलास गादीवर बसवा' असें केव्हां तरी उद्गार निघाले असावे आणि तीच पडत्या फळाची आज्ञा समजून हल्लींची व्यवस्था हिंदुस्थानसरकारनें किंवा त्यांच्या परवानगीनें सदर सरकारच्या अधिकाऱ्यांनीं केलेली असावी असें मानणें अधिक संभवनीय आणि प्रशस्त दिसतें. एरव्हीं, श्री. बाळासाहेब यांस आपण होऊन खुषीनें जर राज्यकारभार सोडा-

---

* [केसरी ता. १० फेब्रुवारी १९०३]

वयाचा होता, तर ही बातमी आज पांच सहा महिने गुप्त ठेवण्याचें कांहीं कारण नव्हतें. शिवाय ता० ३१ जानेवारी रोजीं जो दरबार भरला तोही केवळ ४० लोकांचाच, निमंत्रणपत्रिकेंत कामकाज सांगितल्याखेरीज, न भरवितां प्रसिद्धपणें सर्व इंदूरवासी जनांचा भरविला असता, त्याचप्रमाणें आपले चिरंजीव श्री. तुकोजीराव यांच्या शिक्षणाची व्यवस्था आणि ते वयांत येईपर्यंत राज्याचा कारभार इंग्रजसरकाराकडे न सोंपवितां श्री. बाळा-साहेब यांनीं दुसरी कांहीं तरी आपल्या स्वभावास अनुरूप अशी व्यवस्था केली असती. श्री. बाळासाहेबांस राज्यकाभार सोडावयाचाच होता, तर मग मुलाचा राज्याभिषेकोत्सव दिल्लीदरबार होईपर्यंत तहकूब ठेवण्यांत काय मतलब होता हें आम्हांस समजत नाहीं. मुलगा आपल्या गादीवर बसून त्याचे सद्‌गुण लोकांच्या नजरेस यावे व तो नांवालौकिकास चढावा अशी जर श्री. बाळासाहेब होळकर यांची इच्छा होती तर आपल्या गादीवर मुलास बसवून मग त्यास दिल्ली दरबाराचे वेळीं "प्ररोचनार्थं प्रकटीकृतश्च" करण्यास काय हरकत होती ? किंबहुना भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें असें करणेंच अधिक श्रेयस्कर व योग्य झालें असतें. आतां कदाचित् कोणी असें म्हणतील कीं, अशा प्रकारचें प्रकटीकरण करण्यास मुलगा वयानें लहान होता. पण मुलगा जर लहान होता तर त्यास गादीवर बसवून आपण राज्य सोडून देणें हीच आधीं चूक होय; आणि ही चूक करण्यास श्री. बाळासाहेब होळकर तयार झाले म्हणावें तर "मूले कुठार:" या न्यायानें त्यांचें सर्वच वर्तन वेडेपणाचें होतें असें म्हणावें लागतें. मग राजी-नामा तरी शहाणपणांत दिला कशावरून ? सारांश, कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी श्री. बाळासाहेब यांनीं दिलेला राजीनामा प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें दिलेला नसून त्यांत कांहीं तरी राजकीय धोरण असावें, असें जें आम्हीं पहि-ल्यानें म्हटलें आहे तेंच खरें आहे असें अनुमान करावें लागतें. श्री. बाळासाहेब होळकर यांची कारकीर्द बरी किंवा वाईट होती याचा विचार तूर्त आम्ही करीत नाहीं, व तो करण्याचीही जरूर नाहीं. आमच्यापुढें पहिला प्रश्न एवढाच आहे कीं, होळकर सरकारानें दिलेला राजीनामा खुषीनें आणि उल्हासानें दिलेला होता किंवा वैतागानें त्यांच्या तोंडून कांहीं तरी शब्द निघून तेच शब्द अखेर त्यांस खरे करणें भाग पडलें. पैकीं वर लिहिलेल्या गोष्टी लक्षांत आणतां खुषीची व उल्हासाची उपपत्ती नीट बसत नाहीं हें कोणाही चाणाक्ष वाचकाच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. अर्थात् गेल्या दोन वर्षें हिंदुस्थानसरकारनें इंदूर संस्थानची जी व्यवस्था केली आहे ती आपणास पसंत नाहीं, कौन्सिल-कडे सर्व अधिकार ठेऊन नुसते नामधारी राजे राहण्यापेक्षां आपण राज्य सोडून नर्मदेच्या कांठीं स्वस्थ 'हरि हरि' म्हणत राहण्यास तयार आहों, असें महाराज केव्हां तरी बोलले असावे, आणि तेंच बोलणें अखेरीस विकोपास

जाऊन भरदरबारांत त्यांच्या हातानें त्यांच्या अल्पवयी मुलास गादीवर बसविण्याचा समारंभ करविण्यांत आला असेंच म्हणणें भाग येतें !

आतां ही व्यवस्था कित्येकांच्या मतें संस्थानास श्रेयस्कर झालेली असेल, व कित्येकांनीं तर यांत कांहीं विशेष झालें नाहीं, बाळासाहेबांनीं गादी सोडल्यावर त्यांचे एकुलते एक चिरंजीव गादीवर आले व ते अल्पवयी असल्यामुळें सहजगत्याच कौन्सिलकडे कारभार देण्यांत आला असें म्हटलें आहे. सारांश इंदूरच्या गादीची जी नुकतीच व्यवस्था झाली त्यांत विशेष आश्चर्य अगर खेद मानण्यासारखें कांहीं नाहीं अशी या लेखकांची समजूत आहे, व आपल्या समजुतीप्रमाणें होळकरशाहीचे हल्लींच्या व्यवस्थेनें हक्क बुडाले असें प्रतिपादन करणें चुकीचें आहे असें हे म्हणत आहेत. पैकीं पहिली गोष्ट म्हणजे हल्लींच्या व्यवस्थेनें राज्यकारभारांत सुधारणा होऊन प्रजेस सुख होईल कीं नाहीं याचा आज विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. आम्हांस आज ज्या प्रश्नाचें विवेचन करावयाचें आहे तो व्यवस्थेचा नसून संस्थानच्या हक्काचा आहे. होळकरशाहीप्रमाणेंच शिंदे, गायकवाड, कोल्हापूर, निजाम, म्हैसूर वगैरे दुसरीं संस्थानें आहेत; व या संस्थानांतून हल्लीं जी व्यवस्था आहे त्यापेक्षां चांगली व्यवस्था ठेवण्याच्या मिषानें किंवा सबबीनें जर सदर संस्थानिकांचे हक्क बुडविण्यास कोणी तयार झाला, तर तें सदर संस्थानिकांस किंवा दुसऱ्या कोणास पसंत पडेल काय ? नाहीं. होळकरशाहींतील सध्यांची व्यवस्थाही अशाच प्रकारची आहे. श्री. बाळासाहेब होळकर यांची कारकीर्द चांगली नसली तरी त्यांस गादीवरून काढण्याइतकी ती वाईट नव्हती ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा स्थितींत त्यांचा राजीनामा घेऊन त्यांच्या हातून त्यांच्या मुलास गादीवर बसविल्यानें इंदूरच्याच नव्हे तर, इतर संस्थानांतील राजेरजवाड्यांच्या हक्कास व अधिकारांस कांहीं कमीपणा येंतो कीं काय, हा आमच्यामतें या बाबतींत महत्त्वाचा प्रश्न आहे वरवर पहाणारांस कदाचित् ही गोष्ट महत्वाची वाटणार नाहीं. पण गायकवाड, शिंदे, निजाम, म्हैसूर वगैरे संस्थानच्या अधिपतींच्या मनाची वृत्ती खरोखरच अशा प्रकारची असेल असें आम्हांस वाटत नाहीं. एतद्देशीय संस्थानिक हे पहिल्याप्रथम इंग्रज सरकारचे दोस्त म्हणजे बरोबरीच्या नात्यानें व अधिकारानें वागणारे राजे होते, हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. हा यांचा दोस्तपणा किंवा समानाधिकार नाहींसा होऊन तहनाम्यानें नव्हे तर इंग्रजसरकार उत्तरोत्तर बलाढ्य होत गेल्यामुळें, हे राजे सदर सरकारचे मांडलीक झाले; आणि त्यांच्या संस्थानांतील दुःसह्य गैरव्यवस्थेमुळें अगर त्यांच्या बेइमानीपणामुळें अथवा गैरवर्तनामुळें त्यांस गादीवरून काढून टाकण्याचा अधिकार इंग्रजसरकारनें आपणाकडे घेतला. राजकीयदृष्टया संस्थानिकांच्या हक्कांची ही मोठीच हानी झाली यांत संशय नाहीं. पण झाली ती

गोष्ट झाली, ती भरून येणें हल्लींच्या स्थितींत शक्य नाहीं, असें समजून आमच्या राजेरजवाड्यांनीं ती कबूल केलेली होती. पण होळकरशाहीची हल्लीं जी व्यवस्था करण्यांत आली आहे त्यामुळें संस्थानिकांच्या हक्कांची मर्यादा आटत आटत एक पायरी खालीं गेली आहे, असें थोड्या विचारांतीं कोणासही कळून येईल; व हीच गोष्ट विशेषेंकरून आजच्या लेखानें वाचकांच्या नजरेस आणण्याचा आमचा उद्देश आहे. श्री० बाळासाहेब होळकर यांनीं आपल्या खुषीनें व संतोषानें राज्यकारभार सोडून मुलास गादीवर बसविलें असतें आणि त्याच्या अज्ञानदशेंत राज्यकारभार चालविण्याची व्यवस्था आपण होऊनच ठेवली असती किंवा सज्ञान होईपर्यंत आपण त्याचे कारभारी म्हणून काम पाहिलें असतें, तर गोष्ट निराळी होती. कारण ही सर्व व्यवस्था त्यांच्याच खुषीनें होऊन मोकळ्या अंतःकरणानें त्यांनीं केली असती. पण तसा प्रकार न घडतां वैतागानें तोंडांतून जे शब्द निघाले तेच खरे करण्याचा त्यांजवर प्रसंग आला. यांत त्यांच्याच नव्हे, तर इतर संस्थानिकांच्या हक्कांची पुष्कळ हानी झालेली आहे. आजपर्यंतच्या दाखल्यावरून सार्वभौम सरकारचा अधिकार कोणाही मांडलिक राजास गैरवर्तनाकरितां राज्यावरून काढण्यापर्यंत येऊन ठेपला होता. पण हा अधिकार बजावण्यास संस्थानिकांचें गैरवर्तनही बरेंच महत्त्वाचें आणि राजास व प्रजेस सर्वस्वी अपायकारक असावें लागे. परंतु होळकरशाहींतील हल्लींच्या व्यवस्थेवरून संस्थानिकांच्या गैरवर्तनाची मजल इतक्यावरही येऊन ठेपण्याची जरूर नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. कोणत्याही एतद्देशीय संस्थानाची राज्यव्यवस्था घ्या—फार लांब कशाला खुद्द इंग्रजसरकारचीच घ्याना— ती म्हणजे सर्वांशीं निर्दोष आहे असें कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. संस्थानिकांच्या विरुद्ध अर्ज होतात आणि इंग्रजसरकारच्या विरुद्ध होत नाहींत हें खरें आहे; पण हा बेत कोठपर्यंत ? जोपर्यंत संस्थानिकांच्या विरुद्ध ज्याप्रमाणें इंग्रजसरकार अर्ज घेतें त्याप्रमाणें इंग्रजसरकारच्या विरुद्ध अर्ज घेणारा कोणी दुसरा राजा उभा राहिला नाहीं तोंपर्यंत. असा राजा उद्यां उभा राहूं द्या, म्हणजे गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, हायकोर्ट किंवा प्रिव्ही कौन्सिल यांच्या हातून अन्याय झाल्याबद्दल शेंकडों अर्ज त्यांजकडे जाऊन पडतील. असो; सारांश काय कीं, संस्थानिकांच्या विरुद्ध हिंदुस्थानसरकाराकडे बरेच अर्ज गेले एवढ्याचकरितां एखाद्या संस्थानिकानें वैतागून दिलेला राजीनामा मंजूर करून त्याच्या जागीं मुलास गादीवर बसविणें हिंदुस्थानसरकारास योग्य नाहीं व तहनाम्याप्रमाणें त्याजकडे तसा अधिकारही येत नाहीं. सार्वभौम सरकार या नात्यानें एखाद्या मांडलिक संस्थानिकास सल्ला मसलत देणें किंवा बरोबरीच्या नात्यानें उपदेश करणें हें काम हिंदुस्थानसरकारचें आहे; पण एखाद्या संस्थानिकाचें दुर्वर्तन लोकांस सर्वस्वी असह्य झालें आहे असें सिद्ध होण्यापूर्वीच " तुम्ही राजीनामा देतां

तर खुशाल द्या आम्हीं पुढची व्यवस्था करतों " असें त्यास सांगून त्याच्या राज्याची व्यवस्था लावणें, म्हणजे नोकराची आणि संस्थानिकाची बरोबरी करण्यासारखेंच आहे. सदर संस्थानिकाच्या मुलास त्याच्या गादीवर बसविल्यानें या राजनीतीचें स्वरूप बदलतें अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. मुलास गादीवर बसविणें किंवा मुलगा नसल्यास दत्तकास गादी देणें यावद्दलचे तहनामे व करार स्वतंत्र आहेत; व एका संस्थानिकाची कारकीर्द योग्य रीतीनें संपली असतां दुसऱ्या कोणास गादी द्यावी असा जेव्हां प्रश्न निघेल तेव्हां त्याचा विचार कर्तव्य आहे. हल्लींचा प्रश्न याहून निराळा आहे. श्री. बाळासाहेब होळकर यांची कारकीर्द संपली; ती कां व कशा प्रकारें संपली हें आम्हांस पहावयाचें आहे. म्हणजे त्यांनीं दिलेला राजीनामा खरोखरच त्यांच्या खुषीचा आहे आहे किंवा त्यांस राज्याच्या नोकरीवरून बडतर्फ करण्याचा प्रसंग आला असून त्यास राजीनाम्याचें स्वरूप देऊन युक्तीनें वेळ मारून नेली आहे, हें आम्हांस पाहणें आहे; आणि वर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांवरून श्री. बाळासाहेब यांचा लेख दिसण्यांत राजीनामा असला तरी वस्तुतः तो बडतर्फीचा आहे असें मानण्यास पुष्कळ आधार आहे. अशा प्रकारचा बडतर्फीचा राजीनामा कोणत्याही संस्थानिकाकडून घेतलेला नव्हता; व हल्लींचें उदाहरण दाखल्यासारखें धरून पुढें प्रसंगानुरोधानें याचप्रमाणें जर व्यवस्था व्हावयाची असेल तर, शिंदे, गायकवाड, कोल्हापूरचे महाराज, निजाम वगैरे संस्थानिकांनीं वेळींच सावध होऊन आपल्या हक्काची शहानिशा करून घ्यावी असें आम्ही त्यांस नम्रपणें सुचवितों. दिल्ली दरबार भरविण्याच्या पूर्वी जर ही गोष्ट घडून आली असती तर दिल्लीस शेंकडों राजेरजवाडे इतक्या उत्सुकतेनें गेले असते किंवा नाहीं याची आम्हांस शंकाच आहे. आणि कदाचित् इंदूरच्या युवराजाचा राज्याभिषेक दिल्लीदरबारानंतर करण्यांत दिल्लीस जमणाऱ्या राजेरजवाड्यांस वाईट न वाटावें असाही सरकारचा हेतु असेल; अथवा दिल्लीदरबारसारख्या महोत्सवाच्या वेळीं आपण वैतागून दिलेला राजीनामा आपणास परत देतील असेंही श्री. बाळासाहेब होळकर यांना वाटलें असेल. कसेंही असो, दिल्लीदरबारानंतर एक माहिन्याच्या आंत हिंदुस्थानांतील एका मोठ्या संस्थानिकास आपली गादी राजीनामा देऊन सोडावी लागली हें आमच्या संस्थानिकांचें मोठेंच दुर्भाग्य होय. श्री. तुकोजीराव होळकर हे वयांत येईपर्यंत कौन्सिल किंवा ते वयांत आल्यावर स्वतः इंदूर संस्थानचा कारभार श्री. बाळासाहेब होळकर यांच्यापेक्षां कदाचित् चांगल्या रीतीनें चालवितील, नाहीं असें नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें आमच्या पुढें असलेला प्रश्न राज्यव्यवस्थेचा नसून कोणत्याही संस्थानिकास आपल्या कामावरून कमी करण्याची जी पद्धत आहे तशा संबं-

घाचा आहे. अशा दृष्टीनें पाहिलें असतां लार्ड कर्झन यांनीं केलेली व्यवस्था सार्वभौम सरकारच्या दृष्टीनें धूर्ततेची असली तरी संस्थानिकांच्या दृष्टीनें अत्यंत घोक्याची आहे असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. संस्थानिकांचे हक्क आधींच बरेच संपुष्टांत आलेले आहेत. स्वतंत्र राजाप्रमाणें नाणें पाडणें, दारूगोळा तयार करणें, परराष्ट्रांशीं तर राहूंद्याच; पण हिंदुस्थानांतील इतर संस्थानिकांशीं संबंध ठेवणें वगैरे बहुतेक अधिकार त्यांचेकडून निघालेले आहेत. परंतु निदान आपल्या हयातींत तरी मोठेंसें दुर्वर्तन किंवा राजद्रोह यांखेरीज इतर कारणाकरितां आपणास गादीवरून काढून टाकतील अशी आजपर्यंत त्यांस भीति नव्हती. परंतु श्री. बाळासाहेब होळकर यांच्या उदाहरणावरून तोही निर्भयपणा आतां कायम राहिला नाहीं. श्री. बाळासाहेब होळकर यांच्या विक्षिप्तपणाचे वर्तनामुळें हल्लीं हिंदुस्थानसरकारानें केलेल्या व्यवस्थेचें खरें स्वरूप जितकें नजरेस यावें तितकें येत नाहीं हें दुर्दैव होय, व त्याचाच फायदा हिंदुस्थानसरकारानेंही घेतलेला आहे. पण ही गोष्ट बाजूला ठेऊन बाळासाहेब होळकरांच्या राजीनाम्याचें खरें स्वरूप काय याचा विचार केला पाहिजे, आणि तसा विचार केला म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें बडतर्फीचाच हा एक प्रकार आहे असें म्हणणें भाग येतें.

❁ ❁ ❁

* व्हाइसरॉयसाहेबांच्या शिळोप्याच्या चार गप्पा

पुण्यास संध्याकाळीं गंध्याच्या दुकानांत बसून पानसुपारी खात चैनीनें इकडच्यातिकडच्या चार शिळोप्याच्या गप्पा मारण्याचा जसा प्रघात आहे तद्वतच युरोपियन लोकांमधील व विशेषतः इंग्रज लोकांमधील शिळोप्याच्या गप्पा मारण्याची एक वेळ आहे. ती कोणती म्हणाल तर भोजनोत्तरच्या मदिरापानाची होय. एखाद्या बड्या गृहस्थाच्या किंवा संस्थेच्या घरीं जिव्हा आणि कोठा यांस सुग्रास अन्नानें तृप्त केल्यावर जठराग्नीस अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या ज्वाला विझविण्याकरितांच कीं काय, पाहुणेमंडळ मंदिरापानास जेव्हां सुरुवात करतें तेव्हां त्याच्या शरीराची व मनाची स्थिति एक प्रकारें चमत्कारिक झालेली असते. 'ओदनं वा परमेष्ठी एषः' हें ब्राह्मणाचें सूक्त अशा प्रसंगीं चांगलें लागू पडून वक्त्याची व श्रोत्याची वृत्ति तदाकार होऊन दोघांमध्यें एक प्रकारची सायुज्यता उत्पन्न झालेली असते. या स्थितींत कोणीही विराटनगरांतील उत्तराप्रमाणें वक्तृत्व

---

* [केसरी ता. २४ फेब्रुवारी १९०३]

केल्यास त्यांस मान डोलवणारे त्या समाजांत निघाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. ही वेळच शिळोप्याची असते, व या वेळीं जें कांहीं भाषण व्हावयाचें तेंही तत्कालीन मनोवृत्तीस रिझाविणारें असेंच असलें पाहिजे. चोंहोकडे नुक-त्याच ताव मारलेल्या सुग्रास अन्नाचा घमघमाट भरलेला असून त्यानें सौख्येतर मनोवृत्तींस मनुष्याच्या मनांत फारच थोडी जागा राहिलेली असते; आणि 'अन्नदाता सुखी भव' हेच उद्गार अखेरीस त्याच्या तोंडांतून येत असतात. लॉर्ड कर्झन यांस नुकतीच जी कलकत्त्यास बंगाल चेंबर आफ कामर्सनें आपल्या ५० व्या वाढदिवसानिमित्त मेजवानी दिली व तेथें व्हाइसरॉयसाहेबानीं जें एक मोठें लांबलचक भाषण केलें तें याच मासल्याचें आहे. या भाषणाचा अस्सल रसास्वाद ज्यांस घेण्यास मिळाला, ते मोठे नशीबवान समजले पाहिजेत. कारण, त्या दिवशीं त्यांच्या पोटोबाची चेंबरनें तर विठोबाची व्हाइसरॉयांनीं तजवीज लावलेली होती! जिकडे तिकडे सर्व कांहीं आबादीआबाद होतें. आणि व्हाइसरॉयसाहेबांपासून तों तेथें जमलेल्या क्षुल्लक पाहुण्यापर्यंत 'इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानचें किती तरी कल्याण झालें आहे व होत आहे, आणि असें कल्याण करणारे आपण किती तरी धन्य आहों,' हेच ज्याचे त्याचे तोंडून उद्गार निघत होते. प्रथमतः या देशाचें कल्याण करण्याकरितां कंपनीसरकार इकडे आलें; आणि केवळ हिंदुस्थानच्या हतभाग्य लोकांचे कल्याणाकरतांच तिनें तागडी टाकून तरवार हातीं घेतली. पण तिला ही तरवार नीट झेपेना म्हणून हिंदुस्थानच्या कल्याणाकरतांच तिनें ती राणीसरकारचे ताब्यांत दिली; आणि ही तागडी–तराजू रिकामी पडली होती ती या चेंबर ऑफ कामर्सनीं उचलली! सारांश हिंदुस्थानचे एक कल्याणकर्ते होते ते दोन झाले. एक राणीसरकारचे मुत्सद्दी व कामगार, आणि दुसरे इंग्रज व्यापारी. आमच्या कल्याणकरतां अशी दुहेरी खटपट सुरू झाल्यावर फिरून आमच्या कल्याणाकरतांच पन्नास वर्षांच्या आंत प्लेग व दुष्काळ यांनीं आमच्यामध्यें कायमचें ठाणें देण्याचा विचार केला असल्यास त्यांत आश्चर्य तें काय? असो. आज पन्नास वर्षें हिंदुस्थानच्या हिता-करितां इंग्रजी व्यापारी व इंग्रजी मुत्सद्दी यांची जी खटपट सुरू आहे तिचा आढावा घेऊन 'अहो रूपं अहो ध्वनिः' या न्यायानें भोजनोत्तर एकमेकांची प्रशंसा करण्याकरतां बंगालच्या चेंबर ऑफ कॉमर्सनें हा पंचाशद्वर्षीय मेजवानीचा प्रसंग घडवून आणला होता. आणि रीतीप्रमाणें भोजनोत्तर पहिल्यानें बादश-हांच्या नांवानें गोड पेला घेतल्यावर चेंबर ऑफ कॉमर्सच्या नांवानें पुनः एक-वार मदिराप्राशनाची सूचना व्हाइसरॉयसाहेबांनीं केली, व त्यांस जें लांबलचक भाषण करावयाचें होतें तें प्रस्तावनेदाखल आपणाबरोबर सहभोजन केलेल्या लोकांपुढें मांडून, त्यांची जिव्हा ज्याप्रमाणें तृप्त झाली होती त्याप्रमाणें कर्णही तृप्त केले! या भाषणांतील कांहीं मुद्दे महत्त्वाचे असल्यामुळें त्यांचा आज

आम्ही थोडासा विचार करीत आहों. पण आम्ही जो विचार करणार तो व्याख्यानापूर्वी झालेल्या भोजनाचा किंवा त्याचेनंतर झालेल्या 'टोस्टा' चा आस्वाद न मिळतां करणार; अर्थात् आमचें विवेचन अन्नदृष्टया न होतां अर्थ-शास्त्रदृष्टया होणार हें उघड आहे !

लॉर्ड कर्झन यांस मेजवानीचा हा थाट पाहून सहजच पहिल्यानें कलकत्त्याच्या वैभवाची आठवण झाली. कलकत्ता शहरास आज जें कांहीं सौंदर्य प्राप्त झालें आहे तें तेथिल ११ लक्ष लोकांपैकीं केवळ ३० हजार युरोपियन व युरोजियन लोकांच्या मेहनतीचें, उद्योगाचें आणि साहसाचें फळ आहे, आणि हिंदुस्थाना-चीच नव्हे, तर आशियाखंडातील इंग्रजी साम्राज्याची राजधानी होण्यास ज्या ज्या कांहीं म्हणून आणखी सुधारणा या शहरांत व्हावयास पाहिजेत त्याही इंग्रज लोकांच्याच हातून व्हाव्या असा ईश्वरी संकेत आहे असें त्यांनीं सांगितलें. नंतर कलकत्ता शहर शोभिवंत कसकसें होत गेलें, आपल्या कारकीर्दीत सदर नग-रीच्या आंगावर कोणते दागिने चढविण्यांत आले अथवा चढविण्याचा ठराव होऊन कामास सुरवात झाली इत्यादि गोष्टींचें कथन करून व आपलें या शहरावर किती प्रेम आहे हें सांगून अखेरीस या प्रेमाच्या भरांत आपणास कधीं कधीं असेंही वाटतें, कीं 'व्हाइसरॉयचा अधिकार संपल्यावर आपण या शहराच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष व्हावें, आणि आपल्या हातीं अपार पैसा, आणि अनिवार व निरर्गल अधि-कार राहून आपण या शहराच्या गल्लीकुचींत सांठलेली घाण साफ काढून टाकावी, आणि त्या ठिकाणीं टोलेजंग इमारती उठवून ब्रिटीश साम्राज्यांतील लंडनच्या खालोखाल हें दुय्यम प्रतीचें शहर बनवावें,' असे त्यांनीं उद्गार काढले ! लॉर्ड कर्झन यांची ही कलकत्त्यावरील प्रीति खरोखरच आश्चर्यकारक आहे. कारण, ज्या गृहस्थाचा अधिकार इंग्लंडचे प्रमुख प्रधान होण्याचा आहे ते एरवीं कल-कत्ता म्युनिसिपालिटीचे बादशाही अध्यक्ष होण्यास तयार झाले नसते. हतभाग्य कलकत्तानगरीचें, कीं तिच्यावर इतकें प्रेम करणारा गृहस्थही तिला या वर्षाच्या अखेरीसच सोडून जाणार ! पण या नगरदेवतेस आम्हीं इतकेंच सांगतों कीं, " बाई, तुला या अपरिहार्य गोष्टीचा शोक करण्याचें कांहीं विशेष कारण नाहीं. आपली राजधानी म्हणून गर्व वाहणाऱ्या ज्या व्हाइसरॉयचा चार वर्षें तुला सहवास घडला, त्यापैकीं किती महिने तुझा हा प्रियकर अधिपति तुजजवळ रहात होता; याचा विचार कर; आणि हिमालयपर्वतावर सिमला म्हणून जी तुझी सवत निर्माण झाली आहे तिच्यावर व्हाइसरॉयाचें अधिक प्रेम आहे कीं तुजवर आहे हें लक्षांत आण. कादंबऱ्यांतील किंवा नाटकांतील नायक क्षणभर नव्या देखलेल्या नायिकेस ज्याप्रमाणें गोड बोलून रिझवितात, तद्वतच लॉर्ड कर्झन यांच्या हल्लींच्या भाषणाचा प्रकार आहे. संस्कृतांत 'सुस्थे को वा न पंडितः' अशी म्हण आहे, तद्वतच 'भरल्या पोटीं पांडित्या'ची स्थिति आहे हें

ध्यानांत ठेव; आणि व्हाइसरॉयांच्या हल्लींच्या भाषणास भुलूं नको. तुझ्या आश्रयास कांहीं नाहीं तरी ११ लाख मुलें आहेत. यांचें जें कल्याण तेंच तुझें कल्याण आहे; केवळ शोभिवंत इमारती वाढल्यानें तुझा फायदा नाहीं. त्या इमारती तुझ्या मुलांनीं आपापल्या संपत्तीनें स्वतः उभारल्या पाहिजेत; एरवीं परकीयांनीं तुला कितीही मोठा व किंमतवान शालू नेसवला तरी तो फुकट आहे." लॉर्ड कर्झन यांसही आमचें हेंच सांगणें आहे. मुबलक पैसा आणि अमर्यादित अधिकार हातीं असल्यावर कलकत्ता नगरीचेंच काय पण सहारा वाळवंटाचेंही नंदनवन बनविणारे आमचे शहरांतील प्रसिद्ध कै. श्रीधर विठ्ठल-प्रमाणें आमच्याकडेही हरीचे लाल पुष्कळ आहेत. त्यासाठीं लॉर्ड कर्झनसारख्या मोठ्या मुत्सद्याची जरूर आहे असें नाहीं. पण कोणत्याही शहराची सुधारणा शहरवासी लोकांच्या पैशानें व त्यांच्या सोयीनेंच जोंपर्यंत करावयाची आहे, तोंपर्यंत लॉर्ड कर्झन यांच्या या शिळोप्याच्या गप्पा फुकट आहेत. कलकत्ता शहर इंग्रजांनीं वसविलें व इंग्रजी राज्याची राजधानी म्हणूनच तें भरभराटीस आलें हें खरें आहे. पण त्याबद्दल एवढा डौल मिरविण्याचें कांहीं कारण नाहीं. या हिंदुस्थानच्या भूमीवर रामाची अयोध्या, पांडवांचें इंद्रप्रस्थ, विक्रमाची उज्जनी, पृथ्वीराजाचें कनोज, मोंगलांची दिल्ली, आणि दक्षिणेंतील विजयानगर हीं शहरेंही एकदां संपत्तीनें, वैभवानें व शोभेनें इतरांस मान खालीं घालावयास लावीत असत. पण त्यांची आतां काय स्थिति झाली आहे हें लक्षांत आणलें म्हणजे, कलकत्ता आणि मुंबई यांबद्दल आम्हां हिंदुस्थानवासी लोकांच्या मनांत व्हाइसरॉय म्हणतात त्याच्या अगदीं विरुद्ध विचार उत्पन्न होतात. हे विचार सुग्रास अन्नाचा स्वाद, व नंतर प्यालेल्या मदिरेचा मद अंगांत आहे तोंवर सुचणारे नाहींत, हें खरें आहे; आणि लॉर्ड कर्झन यांनीं काढलेले उद्गार जर सकारण म्हणावयाचे असले, तर त्यांत वरच्याखेरीज कांहीं दुसरें कारण दाखवितां येईल असें आम्हांस वाटत नाहीं.

कलकत्ता नगरीच्या हल्लींच्या व भावी स्थितीचें याप्रमाणें सप्रेम वर्णन झाल्यावर आमचे कवी—व्हाइसरॉय हिंदुस्थानच्या आधुनिक व भावी सांपत्तिक स्थितीकडे वळले; आणि प्रथमतःच त्यांनीं 'आरामखुर्चीवर बसून आर्टिकलें झोडणाऱ्या' वर्तमानपत्रकारांस टोला दिला! ते म्हणाले कीं, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत प्रवास करतांना हजारों लोकांस भेटणें, निरनिराळ्या संस्था पाहणें, अनेक मानपत्रें घेणें व त्यास उत्तरें देणें, चोहोंकडे खरी स्थिति काय आहे हें डोळ्यांनीं स्वतः पाहून तिचा खात्रीपूर्वक निर्णय करणें, शाळा, दवाखाने किंवा कारखाने पाहणें, इ. इ. ज्या हजारों गोष्टी सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्हाइसरॉयांस कराव्या लागतात, त्या प्रत्यक्ष जर कोणी येऊन पाहील तर नको ही दगदग यापेक्षां खोलींत स्वस्थ पडून आर्टिकलें खरडणें बरें, असें त्यास वाटेल!

व्हाइसरॉयसाहेबांनीं आपल्या कामाचें जें हें वर्णन केलें आहे, यांत खरेपणा अधिक कीं कवित्व अधिक, याचा निर्णय करीत बसण्याची जरूर नाहीं. त्यांनींही ज्याप्रमाणें आपल्या कामाचें स्वरूप श्रोत्यांपुढें मांडलें, तसेंच आम्ही आपल्या कामाचें वाचकांपुढें मांडतों, म्हणजे झालें. आपल्या देशाची विपन्न स्थिति पाहून व अर्थशास्त्रदृष्ट्या तिच्या कारणांचा योग्य विचार करून अधिकारानें मत्त झालेल्या अधिकाऱ्यांस पुनः पुनः तें समजावून देण्याचे व्यर्थ श्रम करण्यांत आयुष्याचीं आयुष्यें घातलेल्या दादाभाईंसारख्या महात्म्याचे तोंडांतून 'एकदां, आमचे हातांत अधिकार तरी देऊन पहा', असें उद्गार निघत नसतील असें नाहीं. सत्याचा गड्डा लॉर्ड कर्झन यांनीं खणलें असतां त्यांस मात्र सांपडतो, इतरांस सांपडत नाहीं, असा कांहीं नियम नाहीं. ते ज्या तऱ्हेची दगदग करीत आहेत तीच दगदग वर्षानुवर्ष करून आपलें म्हणणें बरोबर असूनही कोणी ऐकत नाहीं, असें पाहून निराश झालेले, पण उद्योगापासून पराङ्मुख होण्यांत हांशिल नाहीं म्हणून पुनः उद्योगास लागलेले, लॉर्ड कर्झन यांनीं निंदिलेल्या लोकांत पुष्कळ इसम आहेत. उगाच बोलण्यांत काय अर्थ आहे ? लॉर्ड कर्झन यांस शक्य असेल तर त्यांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार कांहीं दिवस तरी अशा लोकांकडे देऊन पहावा, आणि तो नीट न झाल्यास मग तरी काय बोलावयाचें तें बोलावें, उगीच लोकांस नांवें ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हिंदुस्थानची स्थिति कशी आहे, हें उपाशी पोटीं आम्हांस जितकें समजतें तितकें भरपोट व्हाइसरॉयांस समजणें कठीण आहे. आणि यदाकदाचित् जर कांहीं त्यास कळलें असेल तर परवां कलकत्त्यास गरीबांचें जेवण झालें तेव्हां 'सरकार मै भूखा हूं' याचा अर्थ व्हाइसरॉयसाहेबांस 'हा आपली स्तुति करीत आहे' असा ज्याप्रमाणें सांगण्यांत आला, तद्वतच विपरीत कळण्याचा अधिक संभव असून मोंगल बादशहाप्रमाणें 'दुष्काळांत प्रजा दूधभात कां जेवीत नाहीं' असे उद्गार त्यांचे तोंडांतून निघण्याचा संभव आहे ! जो हिंदुस्थानदेश कांहीं शतकांपूर्वीं संपत्तीचें माहेरघर म्हणून प्रसिद्धीस आलेला होता, व लॉर्ड कर्झन यांचे पूर्वज कांतडीं पांघरीत असतां ज्या देशांतील लोक मलमली तयार करीत होते तो दैवगतीनें आसेतु हिमालयापर्यंत हल्लींच्या शहाण्या व कर्त्या राष्ट्रांत प्रमुख अशा इंग्रजसरकारच्या ताब्यांत आलेला आहे. लॉर्ड कर्झन यांस जर याबद्दल अभिमान वाटत असेल तर तो गैरवाजवी आहे असें कोणीही म्हणणार नाहीं. प्रश्न येवढाच आहे कीं राज्यकर्ते या नात्यानें पूर्वीं सुस्थितींत असलेला येवढा मोठा सुपीक प्रदेश, व त्यांतील गरीबीनें वागणारी प्रजा यांस नवीन तऱ्हेचे उद्योगधंदे शिकविण्याची तजवीज न करतां त्यांच्यावर स्वैर रीतीनें चरण्यास इंग्रजी व्यापारी व इंग्रजी भांडवल यास सरकारनें त्यांचें जेवण खाऊन परवानगी द्यावी कीं काय ? दिल्लीदरबार भरवून राजसत्तेच्या परिपूर्णावस्थेचें जसें

व्हाइसरॉयसाहेबांनीं प्रदर्शन केलें तद्वतच आणखी ५० वर्षांनीं आमच्या या हातभाग्य देशावर इंग्रजी व्यापारी व इंग्रजी भांडवल यांच्या परिमाणाचें प्रदर्शन करण्याचा प्रसंग येईल अशी इच्छा लाटसाहेबांनीं आपल्या भाषणांत प्रदर्शित केली आहे. तसेंच या देशांत कित्येकांच्या मतें सुमारें ८२५ कोट रुपये जमिनींत गाडलेले असून ते बाहेर काढण्याचें ज्यांस धैर्य होत नाहीं त्यांनीं इंग्रजी भांडवल इकडे आणणाऱ्या इंग्रजी व्यापारांस नांवें ठेवणें गैरवाजवी आहे, असेंही. ते म्हणतात ! व्हाइसरॉयसाहेबांचे हे उद्गार वाचले म्हणजे आमच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक झाल्यावांचून राहत नाहीं. लॉर्ड कर्झन हे हुषार आहेत. कर्ते आहेत, जमिनीखालीं खणून मूळ पाहण्याची त्यांस संवय आहे;पण आमच्या दुर्दैवानें हे सगळे गुण हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य कायमचें होऊन त्यावर इंग्रज लोकांस कायमचें कसें चरतां येईल, हेंच साध्य करण्याकडे लागले असल्यामुळें आम्हांस सदर गुणांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. सर रिचर्ड टेंपल हे येथें दुष्काळच्या कामावर असतां कोणाही मजुराच्या किंवा मजूरदारणीच्या आंगावर थोडेंसें सोनेंरुपें दिसल्याबरोबर तें त्यांस रिलीफ कामावरून काढति अशी कथा आहे ! हिंदुस्थानांत दरवर्षीं कोणत्याना कोणत्या तरी निमित्तानें कोट्यावधी रुपये विलायतेस जातात, ही गोष्ट लॉर्ड कर्झन यांस माहित नाहीं असें नाहीं; इतकेंच नव्हे, तर ती नाकबूल करण्याची त्यांची छातीही नाहीं. पण चोरांस ज्याप्रमाणें कितीही गरीब मनुष्य असला तरी तो श्रीमंतच भासतो, किंवा नाकांत सुंकलें घालून रिलीफ कामावर आलेली मोलकरणि सर रिचर्ड टेंपल यांस जशी श्रीमंत वाटली तद्वत लॉर्ड कर्झन यांस आमच्या लोकांनीं भूमींत पुरलेलें द्रव्य तेवढें आधीं दिसतें त्यास इलाज नाहीं. हें जमिनींत पुरलेलें द्रव्य ८२५ कोट रुपयेच आहे हें समजण्यास व्हाइसरायसाहेबांस कोणता पायाळू इंग्रज सांपडला होता कोण जाणे ? बरें, हा शोध खरा घेऊन चालेल तरी या द्रव्याची ३० कोट प्रजेंत वांटणी झाल्यावर हें भूमींगत द्रव्य दर माणशीं ३० रुपयापेक्षांही कमी आहे असें सिद्ध होतें. आतां २५।३० रु. म्हणजे दर माणशीं दररोज आणा सव्वा आण्याप्रमाणें एक वर्षास पोटास पुरेल एवढीच रक्कम आहे; व ही जमिनींत टाकल्याबद्दल व्हाइसरॉयसाहेबांच्या तिरस्कृतीस आम्ही पात्र झालों आहोंत. मोठाच गुन्हा खरा ! आमच्या देशांत युरोपांतील देशाप्रमाणें हुंड्यांची पद्धत प्रचारांत असती तरीही इतकें द्रव्य ब्यांकेच्या बाहेर राहिलें असतें असें इतर देशांच्या उदाहरणावरून सहज सिद्ध करितां येईल. मग त्याबद्दल आमच्या लोकांसच एवढा दोष देण्याचें कारण काय ! आमच्या घरांतील सोन्यारुप्यांची भांडीं उचलून नेत असतां अरे; तूं खेद कां करतोस ? तुझ्या घरांत तांब्यापितळेचीं भांडीं मीं ठेविलीं आहेत तीं वापर, अथवा तीं कमीं पडल्यास मातीचीं भांडीं करण्यास तुझ्या आवारांत पुष्कळ माती मीं अजून शिल्लक ठेविली

आहे, ती घे, ' असें जर कोणी आम्हांस सांगू लागला तर तें जितकें समंजसपणाचें होईल, तितकाच हल्लींचा लॉर्ड कर्झन यांचा उपदेश आहे ! देशांतील संपत्ति शिल्लक पडण्यास देशाच्या वार्षिक पिकांतून किंवा उत्पन्नांतून त्या देशांतील लोकांच्या परंपरागत ज्या गरजा आहेत त्या भागून बराच भाग शिल्लक राहिला पाहिजे. एरवीं संपत्ति वाढत नाहीं, हा अर्थशास्त्राच्या मूल सिद्धांतापैकीं एक सिद्धांत आहे; व लार्ड कर्झन यांसही तो माहित असला पाहिजे. या सिद्धांताअन्वयें हिंदुस्थानच्या वार्षिक उत्पन्नाची व्यवस्था होते कीं काय, होत नसल्यास कोणत्या प्रकारानें तशी व्यवस्था करतां येईल, हें विचार करून ठरविणें हिंदुस्थानचें खरें हित इच्छिणाऱ्या व्हाइसरॉयांचें कर्तव्य होय. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या कर्तव्याच्या दिशेचा गंधही हल्लींच्या लाटसाहेबांच्या भाषणांत आढळून येत नाहीं. त्यांस अर्थशास्त्र नको आहे, व तें युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांतून काढण्याचाही त्यांचा बेत दिसत आहे. हिंदुस्थान देशांतील जमीन व संपत्ति अधिक फलद्रूप व्हावी अशी त्यांची इच्छा आहे खरी,पण तें फळ युरोपिअन व्यापारी आणि इंग्रजी मुत्सद्दी यांसच मिळून हिंदुस्थानच्या लोकांनीं कधीं कांद्यावर तर कधीं भाकरीवरच संतुष्ट राहून या व्यापाऱ्यांस दुवा द्यावा, आणि कोणी कोठें एकादें सुंकलें केलें असल्यास तें टांकसाळेंत पाठवून त्याचे जे रुपये येतील ते या व्यापाऱ्यांचे हवालीं करावे असें लॉर्ड कर्झन यांचें सर्वलांस सांगणें आहे ! ठीक आहे. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' या न्यायानें व्यापारी सभेचें जें अन्न व्हाइसरॉयांचें पोटांत उतरलें त्याचा हा परिणाम आहे; त्याबद्दल आमच्या शास्त्राप्रमाणें तरी कर्झनसाहेबांस दोष देण्याचें कारण नाहीं. हलक्या जातीनें तयार केलेलें अन्न ब्राह्मणाचें पोटांत गेलें असतां त्याचे विचार फिरतात असें आमच्या शास्त्रकर्त्यांनीं लिहिलें आहे. तेव्हां चेंबर ऑफ कॉमर्सच्या अन्नानें आलेल्या मदभरांत व्हाइसरॉयसाहेबांनीं ज्या चार गप्पा-सांगितल्या, त्या ' शांतिरस्तु पुष्टिरस्तु ' या न्यायानें त्या व्यापाऱ्यांच्या हिताच्याच निघाल्या यांत कांहीं नवल नाहीं; व म्हणूनच आजच्या लेखास ' शिळोप्याच्या चार गप्पा ' असा माथळा मुद्दाम आम्हीं दिला आहे. कोणीही या भाषणाचा अर्थ शास्त्रदृष्ट्या विचार करूं लागेल, तर ती अशा रीतीनें विचार करणाराची चूक होय; व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आम्हीं ही चूकच करीत आहों. पण कोणत्याही वस्तूचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें हें आमचें कर्तव्य असल्यामुळें आम्हांस जाणून बुजून ही चूक करावी लागत आहे त्यास इलाज नाहीं.

व्हाइसरायसाहेबांच्या भाषणांपैकीं आणखी एक दोन मुद्दे राहिले आहेत, त्याचा विचार करून हा लेख संपवितों. रुपयांत असलेल्या चांदीपेक्षां रुपयाचा भाव कृत्रिम रीतीनें वाढवून व्यापारास हिंदुस्थानसरकारानें स्थैर्य आणलें व त्यामुळें एकंदर देशाचा फार फायदा झाला, अशी याच भाषणांत व्हाइसरॉय-

साहेबांनीं फुशारकी मारली आहे. परंतु वरील विधानाप्रमाणें हेंही विधान अर्थशास्त्रदृष्टया चुकीचें आहे. रुपयाची किंमत वाढून विलायतेस पाठवावयाच्या हुंडीचा भाव स्थिर झाला हें खरें; पण जो हिंदुस्थानांतील शेतकरी पूर्वी ५ रुपये सारा देत होता त्यास संख्येनें ५ पण किंमतीनें पांच सवे ६। रुपये आज या कायद्यानें द्यावे लागत नाहींत काय ? आणि किंमतींत वाढलेलें हे रुपये त्याजपासून घेऊन आपली तिजोरी उतास आली म्हणून इकडे हिंदुस्थानसरकार देशाच्या भरभराटीबद्दल अनुमान काढीत नाहीं काय ? रुपयाची किंमत उतरल्याबरोबर इंग्रजी बडे अधिकाऱ्यांनीं ज्याप्रमाणें एक्श्चेंजकांपेन्सेशन म्हणून वाढवा मागितला, व सरकारनें त्यांस दिला, त्याचप्रमाणें रुपयाची किंमत वाढल्यावर शेतकऱ्यांच्या साऱ्याच्या रुपयाची संख्या त्या प्रमाणानें कमी करून त्यास कमताव्याचा फायदा द्यावयास नको होता काय ? पण भोजनोत्तर असल्या बिकट प्रश्नांत व्हाइसरॉय शिरतात कशाला ? हिंदुस्थानसरकारनें जी जी गोष्ट केली ती ती लोकांच्या कल्याणाकरतांच केली आहे; व त्या प्रसंगीं आपले अन्नदाते बनलेले इंग्रजी व्यापारी हिंदुस्थानच्या कल्याणाकरतांच येथें अवतीर्ण झाले आहेत, एवढें त्यांस सांगावयाचें होतें; तें सांगून ते मोकळे झाले. आणि शेवटीं असें म्हणाले कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार अतिशय वाढत चालला असल्यामुळें निरनिराळ्या खात्यासंबंधाचे जे अनेक प्रश्न सरकारापुढें येतात, त्याजवर योग्य सल्ला देण्याकरितां आणखी अधिकारी सरकारजवळ असणें जरूर आहे. सारांश देश कितीही विपन्नावस्थेस आलेला असो, आणखी गोरे अधिकारी हिंदुस्थानांत आणणें हेंच या देशास विपन्नावस्थेंतून सोडविण्याचें खरें साधन होय; हा त्यांच्या भाषणाचा एकंदर मथितार्थ आहे; आणि तो जितक्या अलंकारिक भाषेनें सांगतां येईल तितका लॉर्डसाहेबांनीं सांगितला आहे. अर्थात् भाषासौंदर्य, अलंकार, इत्यादि कवित्व गुणांच्या दृष्टीनें हें भाषण वाचण्यासारखें झालें आहे खरें; पण अर्थशास्त्राच्या कसोटीच्या दगडावर त्याची परीक्षा करूं लागलें असतां तिची वरील झिलई ताबडतोब नाहींशी होऊन आंतील 'कोपरब्रास' परीक्षकाचे लवकरच नजरेस येतो. अशा भाषणांनीं सहभोजन करणारी मंडळी किंवा त्यांचे आप्त यांखेरीज इतर कोणी फसून जाईल अशी जर लॉर्ड कर्झन याची समजूत असेल तर, आम्ही त्यांस नम्रपणें असें सांगतों कीं, ती चुकीची आहे. हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा अर्थशास्त्रदृष्टया जो विचार करावयाचा तो अर्थशास्त्राचे नियम लावून शांतपणानें व अर्थशास्त्रज्ञांचे मदतीनेंच केला पाहिजे. आणि त्याच्या खरेपणाचा प्रत्यय, कालिदास कवीनें म्हणल्याप्रमाणें ते विचार उत्तम अर्थशास्त्रज्ञांच्या आदरास पात्र होतील तेव्हांच येणारा आहे. भाषेचें गौरव किंवा भोजनभाऊंची प्रशंसा या कामीं उपयोगी नाहीं. तसेंच ज्या लोकांनीं केवळ

सत्यान्वेषणबुद्धीनें या विषयाचा आज पुष्कळ वर्षें शास्त्रीयदृष्ट्या विचार केला आहे, त्यांचा उपहासही व्हाइसरॉयसाहेबांसारख्यांनीं करणें अनुचित होय. हे प्रश्न शास्त्रीय आहेत, हें लक्षांत ठेवून कोणाची चुकी असल्यास ती सप्रमाण त्याचे पदरांत घाला. ते त्याचें उत्तर देतील किंवा ती कबूल करतील, ती गोष्ट निराळी. परंतु दुसऱ्याच्या कोटिक्रमाकडे दुर्लक्ष करून: असल्या बाबतींत भोजनोत्तर त्यांची टवाळकी करणें अप्रशस्तच नव्हे, तर आमच्या मतें अगदीं अक्षम्य होय. आज हिंदुस्थानावर ज्याप्रमाणें इंग्रजी व्यापारी व मुत्सद्दी चरत आहेत तसेच इंग्लंडवर जर जर्मन किंवा फ्रेंच व्यापारी उद्यां चरूं लागले, तर त्यांच्या इंग्लंडांतील चेंबर ऑफ कॉमर्सपुढें इंग्लंडचे मुख्य प्रधान या नात्यानें लॉर्ड कर्झन साहेब हेंच भाषण करतील काय ? आणि इंग्लंडांतील लोकांकडून त्याबद्दल त्यांची येथील अँग्लो-इंडियनांनीं जशी स्तुति चालविली आहे तशी स्तुति होईल काय ? आमचा हा प्रश्न जरा धृष्टतेचा आहे. पण व्हाइसरॉय-साहेबांपुढें आमची खरी स्थिति थोडक्यांत मांडण्यास या प्रश्नासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं, म्हणून तो प्रश्न येथें निरुपायानें केला आहे. यांत जर कांहीं साहस झालें असेल तर त्याबद्दल आम्ही माफी मागतों; आणि आपल्या विचारांचा ओघ कोणत्या मार्गानें वळवावयाचा याचा यावरून त्यांनीं बोध घ्यावा, अशी त्यांस विनंति करतों.

* *



* पोलीस खात्याची सुधारणा.

लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या कारकीर्दीत जीं दहा पांच कमिशनें काढलीं आहेत त्यांपैकींच पोलिस कमिशन हें एक होय; व युनिव्हर्सिटी कमिशनप्रमाणें याची वाट न झाल्यास त्यापासून लोकांस बराच उपयोग होण्यासारखा आहे. परंतु सरकारास एखादी गोष्ट लवकर करावयाची नसली म्हणजे इष्ट हेतु सिद्धीस नेण्यास कमिशनचा पुष्कळ वेळां उपयोग करण्यांत येतो; हें लक्षांत आणलें म्हणजे पोलीस कमिशनपासून कांहीं फायदा होईल कीं नाहीं याबद्दल मन पुनः साशंक होतें. त्यांतून हल्लीं जेवढ्या खर्चांत पोलीसचें काम चाललें आहे, तेवढ्याच खर्चांत जास्त सुधारणा काय कराव्या येवढेंच कमिशननें सुचवावें असा त्यास हुकूम असेल, तर मग विचारावयास नको ! केवळ या बोटाची थुंकी त्या बोटावर केल्यानें खरी सुधारणा कधींही व्हावयाची नाहीं, हें युनिव्हर्सिटी

---

* [केसरी ता. १० मार्च १९०३]

कमिशनच्या लेखांत आम्हीं पूर्वीच दाखविलें आहे. व तोच न्याय पोलीस कमिशनासही लागूं आहे. मुंबईच्या पोलीस खात्यांत आजपर्यंत दोन तीनदां सुधारणा झाल्या आहेत; पण त्यामुळें पोलीसाची कर्तबगारी, लौकिक किंवा उपयुक्तता वाढल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. उलट पोलीसखातें म्हणजे 'म्हारकी खातें' अशी लोकांची समजूत असून पोलिस कामगाराची हुशारी, सभ्यपणा किंवा प्रामाणिकपणा याबद्दल समाजाचें मत कोठेंही चांगलें झालेलें दृष्टीस पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. वास्तविक पाहिलें असतां पोलिस-खातें हें न्यायखात्याचें मदतनीस आहे; तेव्हां न्यायखात्याइतका नाहीं तरी त्याहून जरा कमी पोलिसखात्यावर लोकांचा विश्वास असला पाहिजे. पण व्यवहारांत याच्या उलट प्रकार नजरेस येतो. तो कां ? याचें कारण शोधून काढून त्याबद्दल योग्य उपाय सुचविणें हें कमिशनचें खरें कर्तव्य होय; व सर फ्रेजरसारख्या हुशार व लोकांत मिळूनमिसळून वागणाऱ्या कामगाराच्या अध्यक्षतेखालीं जें कमिशन भरलें आहे त्याच्या हातून हें कर्तव्य योग्य रीतीनें पार पडेल अशी आम्हांस उमेद आहे.

पोलिसखात्यासंबंधानें विचार करण्यासारखे अनेक प्रश्न आहेत. परंतु त्यांतील मुख्य भाग म्हटला म्हणजे पोलिसखात्याची रचना व सदर खात्यांत असणाऱ्या कामगारांची किंवा शिपायांची संख्या हें होय. इलाख्यांत कोठेंही लहानमोठे गुन्हे घडूं नयेत किंवा घडले तर ते ताबडतोब उघडकीस येऊन खऱ्या गुन्हेगारांस शिक्षा व्हाव्या, हीं दोन पोलिसांचीं मुख्य कामें होत. तिजोऱ्या किंवा कैदी इकडून तिकडे पोहोंचविणें, शहरच्या रस्त्यांतून जाणा-येणाऱ्या गाड्यांचा बंदोबस्त ठेवणें, अथवा मोठ्या यात्रेंत किंवा उत्सवांत गर्दी मोडून सर्वांस आपापलें काम सोईवार करतां येईल असा बंदोबस्त करणें, इत्यादि कांहीं लहानसहान कामेंही पोलिसांकडे देण्यांत येतात; पण त्यांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें दोन प्रकारचेंच होय. पहिलें गुन्हा न होण्याचा बंदोबस्त ठेवणें, आणि दुसरें गुन्हा झाल्यास खरा गुन्हेगार हुडकून काढून त्यास योग्य शिक्षा करविणें. हीं दोन्हीही कामें आमच्या इलाख्यांतील पोलिसांकडून योग्य रीतीनें होतात काय ? असा जर कोणी प्रश्न केला तर त्यास 'नाहीं' म्हणून उत्तर द्यावें लागेल. या इलाख्यांत आज कांहीं नाहीं तरी जवळ जवळ २०,००० पगारी पोलीस आहे; व त्याज-प्रीत्यर्थ सालीना चाळीसपासून पंचेचाळीस लक्ष रुपये खर्च होत आहेत. तथापि अद्याप गांवोगांवीं घडून येणाऱ्या गुन्ह्यांचा योग्य बंदोबस्त होत नाहीं हें कोणासही सांगावयास पाहिजे असें नाहीं. पूर्वीं पोलीसखातें कलेक्टर किंवा कमिशनर या मुलकी अधिकाऱ्यांच्याच अंमलाखालीं असे. पण इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस हे सर्व इलाख्याचे मुख्य अंमलदार होऊन त्यांच्या हाताखालीं

प्रत्येक जिल्ह्यांत युरोपियन सुपरिंटेंडंट व असिस्टंट सुपरिंटेंडंट आणि तालुक्यास चीफ कॉनस्टबेल किंवा फौजदार, अशी स्वतंत्र व्यवस्था आतां झालेली आहे. या स्वतंत्र व्यवस्थेनें युरोपियन कामगारांची संख्या वाढून त्या मानानें पोलिसांचा खर्चही वाढलेला आहे. कारण सुपरिंटेंडंट युरोपियन असावा असा नियम झाल्यावर मग सुपरिंटेंडंटची जागा चालविण्याकरितां जे गुण लागतात ते अंगीं येण्यास शिकणाऊ म्हणून कांहीं प्रोबेशनरी युरोपियन कामगारही ठेवावे लागतात. अर्थात् एक गोरा सुपरिंटेंडंट म्हणजे त्याच्यामागें एक तरी गोरा प्रोबेशनरी आलाच ! सारांश, या व्यवस्थेनें युरोपियन कामगारांच्या पगाराची रक्कम मात्र फुगली; पण खात्याच्या कामांत त्यामुळें विशेष फरक झालेला नाहीं, इतकेंच नव्हे तर खात्याचें खरें काम करणारे जे खालचे कामगार त्यांची मात्र या व्यवस्थेनें नाउमेद होऊन रेव्हिन्यू किंवा जुडीशियल खात्याप्रमाणें सुशिक्षित लोकांस या खात्यांत शिरण्यास पुष्कळ किंवा सर्वांशीं प्रतिबंध झाला, असें म्हटलें असतां चालेल. एकाद्या कलेक्टरच्या किंवा जजाच्या हाताखालीं मामलेदार किंवा मुनसफ या नात्यानें काम करणें जितकें सोयीचें व अब्रूचें वाटतें तितकें पोलिस सुपरिंटेंडंटच्या किंवा असिस्टंट सुपरिंटेंडंटच्या हाताखालीं काम करणें सध्यांच्या स्थितींत कोणाही शिकलेल्या मनुष्यास वाटत नसल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. यांत कांहीं सोनाराचा व कांहीं सोन्याचा दोष आहे, हें आम्ही जाणून आहों. पण पोलिसखात्यांत जर कांहीं सुधारणा करावयाची असेल तर केवळ फौजदारच नव्हे तर असिस्टंट सुपरिंटेंडंट व सुपरिंटेंडंट हेही हल्लींपेक्षां अधिक योग्यतेचे, वजनाचे आणि समाजाचे लोक असले पाहिजेत, असें आम्हांस वाटतें. सुपरिंटेंडंट व असिस्टंट सुपरिंटेंडंटच्या जागा नेटीवांस द्या अगर देऊं नका. पूर्वी ज्याप्रमाणें सिव्हिलीयन कामगार किंवा कलेक्टर लोकांत मिळून मिसळून वागत आणि आपल्या जिल्ह्याची व त्यांतील लोकांची त्यांस पुरी ओळख असे तसा प्रकार आतां राहिला नाहीं; तें काम आतां पोलिसावर येऊन पडलें आहे, परंतु जिल्ह्यांचे पोलिस अधिकारी किंवा सुपरिंटेंडंट हेही बहुतेक कलेक्टरप्रमाणेंच लोकांत बेताबाताचेच मिसळणारे असल्यामुळें पोलिसच्या हातूनही हें काम होत नाहीं असा अनुभव आहे. ही उणीव भरून काढण्यास एक तर निराळ्या प्रकारचे गोरे सुपरिंटेंडंट नेमले पाहिजेत, किंवा या जागा चांगल्या हुशार व कुलीन नेटीवांस दिल्या पाहिजेत; परंतु या दोन्ही सूचना सरकारास मान्य होतील किंवा नाहीं याबद्दल वानवाच आहे. कारण पोलीसखातें म्हटलें म्हणजे बड्या गोऱ्या कामगारांच्या गैरहुशार पोरांकरितां राखून ठेवलेलें ' गायरान ' होय, अशी कित्येकांची समजूत आहे; आणि नेटीव म्हटला म्हणजे तो फौजदार किंवा इन्स्पेक्टरचे वरच्या जागेस चढण्यास कधींही योग्य होणें, किंवा झाला असें समजणें अशक्य आहे. अर्थात्

पोलिस खात्याच्या वरिष्ठ कामगारांची स्थिति सुधारण्याचे जे दोन मार्ग आहेत, ते दोन्हीही सरकारास पसंत होणें कठीण आहे. तथापि " हितं मनोहारि च दुर्लभंवचः " या न्यायानें ज्यास जें खरें दिसेल तें कशाचीही भीति न बाळगतां स्पष्टपणें खोलून दाखवणें हें त्याचें कर्तव्य आहे, व तें कर्तव्य कमिशन बजावील अशी आम्हांस उमेद आहे. थोडक्यांत सांगावयाचें असल्यास फौजदारापासून तों सुपरिंटेंडंटपर्यंत वरच्या दर्जाच्या ज्या जागा आहेत त्या हल्लींपेक्षां अधिक सुशिक्षित, सभ्य व हुशार गृहस्थांच्या हातांत पडल्याखेरीज पोलिसखात्यावर लोकांचा हल्लींपेक्षां जास्त विश्वास बसणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. हें स्थित्यंतर कसें घडवून आणावें, या जागाकरितां कोणच्या प्रतीच्या शिक्षणाची जरूर आहे, तें शिक्षण कोठें मिळत नसल्यास त्याकरितां निराळी शाळा काढावी काय, युरोपियन कामगार किती प्रमाणानें ठेवावे, वगैरे प्रश्नांचा यांतच अंतर्भाव होतो. पण इतक्या बारीक विचारांत शिरण्याचें सध्यां कारण दिसत नाहीं. नवऱ्यामुलासच जर ठिकाण नाहीं तर मुहुर्ताकरितां जोशीबोवांची पंचाईत कशास पाहिजे ? अशांतला हा प्रकार आहे ! आम्हीं सांगितलेलें सामान्य तत्त्व जर कबूल असेल किंवा होईल तर पुढचा विचार करणें फारसें कठीण नाहीं, आणि तें कबूल नसेल, तर पुढील विचारच करावयास नको.

वरिष्ठ प्रतीच्या कामगारांची वर जी व्यवस्था सांगितली ती जिल्हा आणि त्यांतील तालुके यांपुरती झाली. परंतु कोणताही गुन्हा एकदम सर्व जिल्ह्याभर किंवा तालुक्याभर होत असतो असें थोडेंच आहे. गुन्हा घडावयाचा तो एका विवक्षित स्थलींच घडत असतो. मग तें विवक्षित स्थल एखाद्या शहरांत असो, खेडयांत असो, वा रानांत असो. अशा विवक्षित स्थलीं गुन्हा घडला म्हणजे तो घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं तालुक्यांतील फौजदार किंवा जिल्ह्यांतील सुपरिंटेंडेंट तेथें जाऊन गुन्हा कसा घडला, चोर कोणीकडून पळाला, खून दगडानें केला का कोयत्यानें केला, याची चौकशी सुरू होतें; आणि कित्येक प्रसंगीं सदर गुन्ह्यानें ज्याचें नुकसान झालें असतें त्यानें किंवा त्याच्या आप्तानेंच लबाडीनें तो गुन्हा केला, असा त्याच्यावर संशय घेऊन आमचे हुशार, पोलिस अंमलदार त्याच्याच पाठीस लागतात, आणि ' भीक नको कुत्रा आटप ' अशी त्याची स्थिति होते. हा पोलिसचा त्रास चुकावा म्हणून कित्येकदां आपल्या घरीं झालेली चोरीहि पोलिसांस लोक कळवीत नाहींत, अशीं उदाहरणें आमच्या पहाण्यांत आहेत. गुन्ह्याची वर्दी ताबडतोब पोलिसांस मिळत नसली किंवा गुन्ह्याचा तपास करण्याच्या कामीं लोक पोलिसांस झटून मदत करीत नसले, तर त्यांतील बीज हेंच होय. शिवाय घरीं घडलेल्या गुन्ह्याची वर्दी पोलिसांस दिली असतां पोलीस अंमलदार सांगतील तेथें दिवसांतून सतरा

खेपा घालण्यांत कालाचा किती अपव्यय होतो व त्यामुळें किती त्रास होतो हें प्रत्यक्ष माहीत असल्याशिवाय समजणें कठीण आहे. किंबहुना सभ्यतेनें किंवा संभावितपणानें चौकशी करण्याची रीत आमच्या पोलिसास ठाऊकच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. पोलिस म्हटलें म्हणजे लोकांचें रक्षण करणारें आहे, आणि जो कोणी आपलें रक्षण करतो, त्यास रक्षण होतें त्याकडून योग्य मदत मिळाली पाहिजे इतकेंच नव्हे, तर मानही मिळाला पाहिजे. पण पोलिसाच्या अजाणतेपणामुळें म्हणा किंवा दांडगाईनें म्हणा पोलिस आपले रक्षणकर्ते आहेत असें लोकांस वाटतच नाहीं. कित्येकांच्या मतें हा दोष लोकांचा आहे, पोलिसांचा नव्हे. पण ही समजूत चुकीची आहे.

आमचें म्हणणें सध्यां येवढेंच आहे कीं, तालुक्यांत पोलिसांचीं ठाणीं बसवून किंवा जिल्ह्यांत हेडक्वॉर्टर ठेवून गुन्हे ताबडतोब पकडण्याचें काम योग्य रीतीनें होणें अशक्य आहे. हल्लीं पोलिसांची जी व्यवस्था आहे त्या व्यवस्थेनें मध्यभागांत किंवा महाराष्ट्रांत ९ चौरस मैलांस किंवा १४४७ लोकांस एक पोलिस शिपाई असें प्रमाण पडतें! उत्तर भागांत म्हणजे गुजराथेंत यापेक्षां जरा जास्त बंदोबस्त आहे, म्हणजे ४ चौरस मैलांस किंवा १०७२ लोकांस एक पोलिस शिपाई पडतो. दक्षिण भागांत म्हणजे बेळगांव व धारवाडाकडे $९\frac{१}{२}$ चौरस मैल व १९१९ लोक यांचा गुन्ह्यापासून बचाव करण्यास पोलिस शिपायांचें एक दांडकें पुरें होतें! दोन हजार मेंढरांस देखील एक ठिकाणीं ठेवण्यास एकापेक्षां अधिक धनगर लागतात; पण आमच्या राजकर्त्यांची अशी समजूत झालेली आहे कीं आपण मुठभर परकी लोक जर तीस कोटी प्रजेवर राज्य करतों, तर एका काळ्या डगल्याच्या बागुलबोवास दोन हजार लोक कांहीं भारी नाहींत. शिवाय सर्व प्रजेचीं शस्त्रें कायद्यानें काढून घेतलीं असल्यामुळें ज्याच्या हातीं दांडकें त्यांस दोन हजार लोक सहज वळवतां यावे. परंतु वस्तुस्थिति पाहतां ही समजूत चुकीची आहे असें उडाणटप्पूंच्या कायद्याचें मागें आम्हीं विवेचन केलें तेव्हां म्हटलें होतें. प्रजा निःशस्त्र केल्यानें त्यांतील तंटे भांडणें कमी होतात आणि त्यांजवळ शस्त्रें ठेवल्यानें तीं वाढतात हें तत्त्वच आधीं खोटें आहे. कारण ज्या राष्ट्रांतील प्रजेजवळ शस्त्रें आहेत (उदाहरणार्थ नेटीव संस्थानें घ्या.) तेथें गुन्ह्याचें प्रमाण जास्त आहे असें आढळून येत नाहीं. ज्यास खून किंवा मारामारी करावयाची आहे तो जेथें शस्त्रें असतील तेथें शस्त्रानें करील आणि नसतील तेथें कोयता, विळी, काठी, सुरी, कुऱ्हाड, किंवा दुसरें कांहीं नसल्यास दगडांनींही करूं शकेल. प्रजा निःशस्त्र करणें हें कांहीं राजकीय कारणांकरितां कांहीं राज्यकर्त्यांस जरूर वाटेल, पण सध्यां त्याचा विचार आपणास कर्तव्य नाहीं. गुन्ह्याच्या दृष्टीनें पाहिलें तर प्रजा निःशस्त्र केल्यापासून कांहीं एक फायदा नाहीं. उलट अशा निःशस्त्र झालेल्या

दोन हजार लोकांचें एक पोलीस शिपायानें रक्षण करणें अशक्य होतें. याचीं अनेक उदाहरणें आहेत. दोन चार गांव मिळून एकादा पोलीस शिपाई असतो ही गोष्ट सर्व चोरट्यांस आतां माहीत झालेली आहे. आणि गांव आहे तेथें म्हारवडा आहे. या न्यायानें कोणत्याही समाजांत चोर किंवा बदमाष लोक हे असावयाचेच. अशा स्थितींत कोठेंही दहा पांच बदमाषांनीं जमून दहा पांच जुनींपानीं मोडकीं हत्यारें जमा केलीं कीं, कांहीं दिवस तरी ते शेजारच्या खेड्यापाड्याचें किंवा मुलखांचें राजे बनून जातात ! मग जेव्हां तालुक्यांतून किंवा जिल्ह्याच्या सदर ठाण्यांतून पोलिसचे घोडेस्वार किंवा बंदुकवाले यांची पार्टी या चोरट्यांच्या मुलखांत जाईल तेव्हां बरेच दिवसांनीं त्यांचा बंदोबस्त व्हावयाचा. सारांश प्रजा निःशस्त्र आणि गांव पोलीस निर्बळ करून त्या ऐवजीं पंधराशें किंवा दोन हजार माणसांस एक पोलिस अशी तालुका पोलिसची व्यवस्था ठेवल्यानें चोरट्यांस फार फावलें आहे; आणि त्यांतलें त्यांत मूर्तिमंत दुष्काळ या गुन्हेगारांस उत्तेजन देत असल्यामुळें तर बदमाष लोकांस चोरी करणें फार सोईचें झालें आहे. अशा स्थितींत चोरीस गेलेल्या मिळकतीपैकीं शेंकडा चाळीस म्हणजे निम्मेपेक्षां कमी मिळकत मालकास परत मिळत असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

ही स्थिति सुधारण्यास एकच उपाय आहे; तो हा कीं, गांवपोलिसाचें काम ज्याप्रमाणें पूर्वी बलुतेदाराकडे होतें तसेंच तें त्याजकडे ठेवून त्याच्या वेतनाची योग्य व्यवस्था सरकारनें लावावी. व त्यांस योग्य अधिकार देऊन त्यांच्याकडून पूर्वीप्रमाणें काम घ्यावें. हें काम खर्चाचें आहे खरें, पण पोलिसखात्याच्या सुधारणेस तें अत्यंत आवश्यक आहे. ही आवश्यकता आम्हीच आज नव्यानें दाखवतों असें नाहीं. मुंबई पोलिसखात्याचें गेल्या वीस वर्षांचे रिपोर्ट जर कोणी चाळून पाहील तर त्यांत ही सूचना बऱ्याच अधिकाऱ्यांनीं केलेली त्यास आढळून येईल. एकोणीसशें एक व दोन सालचा तांबड्या शाईच्या मथळ्याचा मुंबई इलाख्याचा जो रिपोर्ट निघाला आहे त्यांतही " गांवपोलिसाची पद्धतशीर रचना अद्याप व्हावयाची आहे " असा शेरा मारलेला आहे. पोलिसखात्यांत गेल्या वीस वर्षांत कांहीं नाहीं तरी तीनदां सुधारणा झाल्या आहेत. पण या सर्व सुधारणा वरच्यावर झालेल्या असून खालीं म्हणजे गांवपोलिसाकडे अद्याप कोणाचेंच लक्ष गेलेलें दिसत नाहीं. निदान दाक्षिणेंत तरी प्रत्येक गांवास रामोशी किंवा महार किंवा दुसरें कोणी बलुत्याचें पोलिस पूर्वी असे; व गांवांतले गांवांत कोणचाही गुन्हा घडल्यास गुन्हेगार हुडकून काढण्याची जबाबदारीही त्यांच्याच शिरावर असे. इतकेंच नव्हे तर दरवडेखोर किंवा पेंढार यांपासून रक्षण करण्याकरितां गांवांतील संभावित लोकांजवळ हत्यारेंही ठेवलेलीं असत; व रात्रीं गांवांतल्या चावडीवरही बलूतदार मंडळी निजून गांवाचें रक्षण करीत

असे. हा सर्व प्रकार आतां अगदीं बदलून गेला आहे. गढया पडल्या, गांवकुसें मोडलीं, बलुतें बुडालीं आणि हत्यारें ठेवण्याचीही लोकांस परवानगी नाहींशी झाली. बरें याऐवजीं कांहीं नवीन व्यवस्था अमलांत आली असें म्हणावें तर तेंही नाहीं. नाहीं म्हणावयास तालुकापोलीस म्हणजे पंधराशें किंवा दोन हजार लोकांस एक पोलिस हेंच काय तें लोकांच्या संरक्षणाचें सरकारानें नवें साधन निर्माण केलें आहे. पण या साधनापासून लोकांचें संरक्षण होणें शक्य नाहीं हें थोड्या विचारांतीं कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें आहे. गांवांतल्या गांवांत असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांस गांवांतली जशी माहिती असते त्याप्रमाणें तालुका पोलिसास असणें अशक्य आहे. बरें यदाकदाचित् असली तरी गुन्हा घडण्याच्या वेळीं हे राजेश्री गुन्ह्याच्या जागेपासून दहा मैलांवर असल्यामुळें गुन्हाचें खरें स्वरूप गांवकऱ्यांच्या मदती खेरीज त्यास कळण्यास मार्ग नसतो; आणि गांवकऱ्यांवर कांहीं जबाबदारी नसल्यामुळें पोलीसास माहिती देऊन त्याजबरोबर हेलपाटे घालण्याचा त्रास घेण्यास ते तयार नसतात, अर्थात् गांवपोलिसांची योग्य व्यवस्था लागल्याखेरीज ही स्थिति सुधारणें शक्य नाहीं, म्हणजे हल्लीं ज्याप्रमाणें पोलिस व्यवस्थेचा तालुक्यांतील ठाणीं हा पाया आहे, त्याप्रमाणें इतउत्तर गांवपोलिस हा त्याचा पाया केला पाहिजे. दरएक गांवास त्यांतील लोकसंख्येप्रमाणें बलूतदार रक्षक नेमून खेरीज गांवांतील संभावित गृहस्थांस त्यांवर देखरेख करण्याचा अधिकार देऊन त्यांजवळ कांहीं तरी शस्त्रें ठेवण्याचीं त्यांस परवानगी दिली पाहिजे; कारण गांवांतील लोक कितीही दक्ष किंवा हुशार असले तरी चावडीवर नुसत्या वाटोळ्या गुळगुळीत दगडांच्या राशी किंवा गोफणीच्या रांगा ठेवल्यानें त्यांच्या हातून बाहेरच्या चोरट्यांचा निरोध व्हावयाचा नाहीं. लोकांपाशीं शस्त्रें ठेवल्यानें सरकारास साशंक होण्याचें कांहीं कारण नाहीं. गांवोगांवीं जीं शस्त्रें ठेवावयाचीं तीं ब्रीचलोडर्स किंवा मशीनगन्स नव्हत, साध्या तोड्याच्या किंवा केपाच्या बंदुका बस्स आहेत; आणि जोंपर्यंत लष्करी लोकांजवळ रायफल्स किंवा मशीनगन्स आहेत तोंपर्यंत गांवोगांवच्या या फुकण्यांनीं सरकारचें कांहींही वांकडें व्हावयाचें नाहीं, पण चोरट्यांचा मात्र बंदोबस्त होईल. सारांश, पोलिसखात्याच्या सुधारणेचा पाया गांवपोलिस होय. ही सुधारणा जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंत दर जिल्ह्यास एकाचे दोन पोलिस सुपरिंटेंडंट झाले तरीही त्यापासून फायदा व्हावयाचा नाहीं. पोलिसखात्याचा पाया अशा रीतीनें शुद्ध झाल्यावर पुढें काय करावयाचें हा दुसरा प्रश्न आहे, पण स्थलसंकोचास्तव त्याचा विचार आज करतां येत नाहीं.

◆ ◆ ◆

* पोलीसखात्याची सुधारणा.

गेल्या अंकीं गांवपोलिसांत सुधारणा करणें किती अवश्यक आहे, हें दाखविलें आहे. गांवपोलिस म्हणजे सर्व पोलिसखात्याचा पाया होय; आणि तोच पाया जर नीट नाहीं तर त्यावर चांगली इमारत तरी कशी उठणार अथवा सदर इमारतीस इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलिसचा एक भला मोठा कळस लाविल्यानें ती अधिक उपयुक्त किंवा बळकट तरी कशी होणार ? इंग्रजी राज्यांत मालमत्तेचा सुरक्षितपणा अधिक वाढला, अशी पुष्कळ लोकांची समजूत झालेली आहे व ती कांहीं अंशी खरीही आहे. पण त्यांतील बीज काय इकडे अद्याप कोणाचें लक्ष गेलें नाहीं. पेशवाईत पुणें शहरांत घाशिराम कोतवालाच्या कारकीर्दीतही शहरांतल्या शहरांत चोऱ्या अगर इतर गुन्हे क्वचित् घडत असत, असें खुद्द एलफिन्स्टनसाहेबांनीं लिहिलें आहे; आणि जी शहरची तीच लहानमोठ्या खेंडेगांवांची तेव्हां व्यवस्था होती. म्हणजे शहरांतून व खेडेगांवांतून बंदोबस्ताकरितां जे कोतवालीचे लोक असत त्यांचे हातून आपापल्या हद्दीपुरता गुन्ह्यासंबंधानें चांगला बंदोबस्त होत होता. शिवाय प्रत्येक ठिकाणचे ऐपतदार व श्रीमंत लोक ह्यांस आपापल्या रक्षणाकरितां हत्यारें व हत्यारबंद लोक ठेवण्याची परवानगी असल्यामुळें शहरांतल्या शहरांत किंवा गांवांतल्या गांवांत चोरट्यांचा किंवा इतरांचा फारसा त्रास होत नसे. त्या वेळचे मोठे गुन्हे किंवा दंगे म्हटले म्हणजे नारायणराव पेशवे किंवा गंगाधरशास्त्री पटवर्धन यांच्यासारखे राजकीय खून आणि मुख्य सरकारची सत्ता एकसारखी सदोदित जरबेची नसल्यामुळें दरोडखोर किंवा पेंढार यांनीं ठिकठिकाणीं माजविलेली पुंडाई व यशवंतराव होळकरासारख्यानें राजधानीवर केलेली स्वारी हे होत. अशा प्रकारचीं संकटें आतां लोकांवर येत नाहींत, यामुळें इंग्रजी राज्यांत मालमत्तेचा सुरक्षितपणा वाढला असें लोकांस वाटूं लागलें आहे. पण ही गोष्ट सोडली तर गांवच्या किंवा शहरच्या हद्दींत होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या आतां कमी झाली, अथवा गुन्हगार सांपडण्याचा मार्ग इंग्रजी राज्यांत अधिक सोपा झाला, असें म्हणतां यावयाचें नाहीं. उलट गांवपोलिसाची व्यवस्था मोडून टाकून किंवा तिकडे दुर्लक्ष करून गांवांतला बंदोबस्त पूर्वापेक्षां या राज्यांत कमीच झाला आहे; व लोक निःशस्त्र झाल्यामुळें तर कोठेंही दहा पांच चोरट्यांनीं जमून आसपासच्या खेडेगांवांत कांहीं

---

* [केसरी ता. १७ मार्च सन १९०३]

दिवस तरी राज्य करण्याची त्यांस सवड मिळत चालली आहे ! ही स्थिती सुधारण्यास गांवपोलीस पहिल्याप्रमाणें व्यवस्थेशीर करून गांवांतील गुन्हे हुडकून काढण्याची जबाबदारी गांवांतील प्रतिष्ठित लोकांच्या साह्यानें त्यांचे अंगावर टाकली पाहिजे. पोलीसखात्यांत जर कांहीं खरी सुधारणा पाहिजे असेल तर हीच आहे; आणि आजपर्यंत पोलिसखात्यांत जर एका गोष्टीची हयगय झाली असली तर ती याचीच होय.

गांवपोलिसाची याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर गांवाबाहेर पडून किंवा रानांत राहून दुसरे गांवीं चोऱ्या करणाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां व गांवपोलिसावर नजर ठेवण्याकरितां प्रत्येक तालुक्यांत एक चांगला कामगार पाहिजे व तालुक्याचे स्थितीप्रमाणें त्याजवळ दांडक्याचे व बंदुकीचे पोलिस शिपाई पाहिंजेत. या पोलिसांस तालुक्यांतिल रस्ते, जत्रा, बाजार, तालुका डोंगराळ असल्यास ह्यांतील रामोशी कोळी वगैरे लोकांवरील देखरेख इ० कामें करावीं लागतील. हीं कामें हल्लीं तालुक्यांतील हेड चीफ् कान्स्टेबल किंवा फौजदार यांजकडे असतात, पण हे कामगार या कामास जितके लायक पाहिजेत तितके नसतात, असा अनुभव आहे. तालुक्याचें मुलकी काम मामलेदाराकडे, न्यायाचें काम मुनसफाकडे आणि पोलिसाचें काम फौजदाराकडे, ही त्रयी लक्षांत आणली म्हणजे, एक तर पोलिसखातें कमी महत्त्वाचें किंवा त्यांत अद्याप व्हावी सुधारणा झाली नाहीं, असें सहज दिसून येतें. आणि एक पक्षीं फौजदार व दुसऱ्या पक्षीं मामलेदार-मुनसफ यांचेमध्यें हुशारींत, संभावितपणांत आणि वजनदारींत जें अंतर असतें तितकेंच अंतर जिल्ह्याजिल्ह्याचे कलेक्टर व पोलीस सुपरिंटेंडन्ट यांचेमध्यें आढळून येतें. हें अंतर जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत पोलिसखातें कधींही लोकांच्या विश्वासास अधिक पात्र व्हावयाचें नाहीं, व त्याची कर्तबगारी किंवा हुशारीही हल्लींपेक्षां सरकारच्या किंवा लोकांच्या जास्त नजरेस यावयाचा संभव नाहीं. दरमहा हजार रुपयांस हल्लींच्यापेक्षां चांगले गोरे कामगार कसे मिळणार, कलेक्टरास दोन अडीच हजार दरमहा द्यावे लागतात तेव्हां: चांगले लोक मिळतात, असें कित्येकांचें म्हणणें आहे; पण तें चुकीचें आहे. कॉलेजांतून इतिहास गणित वगैरे शिकविण्यास दरमहा हजार रुपये देऊन इंग्रजी युनिव्हर्सिटींत शिकलेले लोक जर मिळतात, अथवा इंजिनियरिंग खात्यांत जर तेवढ्या पगारावर शिकलेले गोरे इंजिनियर इकडे येतात, तर पोलिसखात्यांत चांगले गोरे सुपरिंटेंडन्ट मिळण्यास कां पंचाईत पडावी, हें आम्हांस समजत नाहीं. बरें पंचाईत असली तर यांपैकीं बऱ्याच जागा नेटिवांस दिल्यानें ती दूर होणार आहे. सदर-अमीन किंवा फर्स्टक्लास डेप्युटी कलेक्टर यांस हल्लीं दरमहा आठशें रुपये पगार मिळतो. याच खात्यांतून जर कांहीं हुशार माणसें पोलिस सुपरिंटेंडेंटचे जाग्यावर नेमलीं तर तीं हजाराचे

ऐवजीं आठशांवर सुद्धां हल्लींच्या बऱ्याच सुपरिंटेंडेंटापेक्षां अधिक चांगलें काम करतील. शंका काय ती एवढींच कीं, पोलिसांत सरकारचीं कांहीं गुप्त कामें चौकशीकरितां येत असतात तीं नेटिव्ह सुपरिंटेंडेंटचें हातून चांगली होतील कीं नाहीं ? पण ही शंका आजपर्यंत नेटिवांनीं सरकारचीं जीं कामें केली आहेत त्यावरून सरकारचें मनांत अद्याप राहूं नये, असें आम्हांस वाटतें. कारण एक तर इंग्रजसरकारचें राज्य भक्कम पायावर रचलें गेलें आहे अशी सुशिक्षित लोकांची समजूत आहे; आणि दुसरी गोष्ट ही कीं, एकदां एखाद्याची नोकरी करावयाची म्हटली म्हणजे ती इमानेंइतबारें करावयाची व त्यांतच होईल तितका मोठेपणा मिळवावयाचा, हा नोकरींत कांहीं वर्षें गेल्यानंतर मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे अंगांत उपजत गुणाप्रमाणेंच एक नवा गुण बनून जातो; तो इतका कीं, कित्येक वेळीं सरकारची मर्जी खप्पा होईल म्हणून सरकारचा कल पाहूनच त्याप्रमाणें ते आपल्या बोलण्याचा, लिहिण्याचा व वर्तनाचा क्रम ठेवीत असतात. असे लोक विश्वासास पात्र नाहींत, असें मानणें म्हणजे त्यांची विनाकारण बेअब्रू करण्यासारखें आहे. सबॉर्डिनेट सर्व्हिसमध्यें फार दिवस काम केल्यानें मनुष्याचे आंगचा करारीपणा थोडाबहुत कमी होतो हें खरें आहे, पण त्यास औषध म्हटलें म्हणजे अशा लोकांस स्वतंत्र हुद्याच्या जागा देणें हेंच होय व हें औषध नीट रीतीनें दिलें तर त्यापासून चांगला गुण आल्यावांचून रहावयाचा नाहीं. तशांत जिल्ह्याचे जे पोलिस अधिकारी असावयाचे ते केवळ अधिकारी या नात्यानेंच नव्हे, तर आप्तसंबंधी किंवा इष्ट स्नेही या नात्यानेंही लोकांत मिळून मिसळून वागणारे असल्यास त्यांचें हातून सरकारचें व लोकांचें जास्त हित होणार आहे. हल्लींचे पोलिस सुपरिंटेंडंट तशा प्रकारचे नसतात, त्यांस देशी भाषा चांगल्याशीं येत नाहींत; आणि आल्याच तर ते लोकांत कधीं मिसळत नाहींत. कलेक्टरसाहेबाप्रमाणेंच गांवाबाहेर राहून ऑफिसचें काम उरकतात व बाकीचा काल युरोपियनांचे सहवासांत काढतात. अशा स्थितींत शहरांत,तालुक्यांत किंवा खेड्यांत लोकांमध्यें काय चर्चा चालली आहे, त्यांचीं मनें स्वस्थ आहेत, किंवा अस्वस्थ आहेत अस्वस्थ असल्यास त्याचें कारण काय, चोर कोण, बंडखोर कोण आणि कायदेशीर रीतीनें लोकांच्या हक्काकरितां भांडणारे कोण, कोणकोणच्या सभेचे काय उद्देश आहेत, अमुक ठिकाणीं लोक जमत असल्यास ते कशाकरितां जमत असतात, कोणी ब्राह्मणाच्या पोरानें काच्या घातला कीं तो दरोडेखोर होतो कीं काय, वगैरे जिल्ह्यांतील लोकांच्या स्थितीची माहिती हल्लींच्या पोलिस सुपरिंटेंडंटास सात रुपयांचे पोलीस शिपायाकडून किंवा असल्या कामीं पोलिसास बिगर-मुषाहिरा मदत करण्याचा ज्यांनीं विडा उचललेला आहे त्यांजकडून मिळावयाची. व ती किती अविश्वसनीय असते हें अनेक वेळां सरकारच्या व लोकांच्या नजरेस

आलें आहे. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, अशी माहिती मिळविण्याचें काम जिल्ह्याचे मुख्य अधिकारी कलेक्टर यांचें असूनही तें हल्लीं पोलिसाचें वांट्यास आलें आहे. हें काम जर पोलिसाकडेसच ठेवावयाचें असेल तर निदान तालुक्यांतील व जिल्ह्यांतील पोलिस अधिकारी तरी संभावित, सुशिक्षित, हुशार, लोकांची भाषा व व्यवहार पूर्णपणें जाणणारे व लोकांत मिळून मिसळून वागणारे, आणि होईल तितकें करून येथील प्रजेपैकींच असले पाहिजेत. पुण्यास सन १८९७ सालीं मि० ऱ्यांड साहेबांचा खून झाल्यावर गुन्हेगार पकडण्यासंबंधानें येथील पोलिसानें जी धामधूम केली तिचें आणि अखेर गुन्हेगार ज्या रीतीनें पकडले गेले तिचें वर्णन जर मि० ब्रुईनसाहेबांनीं पोलिस कमिशनपुढें दिलें असतें, तर आम्ही वर दाखविलेल्या दोषांपैकीं बऱ्याच दोषांचा खरेपणा कमिशनच्या प्रत्यक्ष नजरेस आला असता. इंग्रजींत ज्यास ' डिटेक्टिव्ह स्किल ' किंवा गुन्हा शोधून काढण्याचें चातुर्य म्हणतात तशा प्रकारचें चातुर्य आमचे पोलिसाचे आंगांत बिलकूल दिसून येत नाहीं. किंबहुना अशा चातुर्याची त्यांस ओळखही नसते, असें म्हटलें तरी चालेल. याचा परिणाम किती वाईट होतो हें स्पष्ट करून सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. गुन्हेगार शोधून काढण्यास जें चातुर्य लागतें तें, आणि गुन्हेगार सांपडल्यानंतर त्याचे गुन्ह्याचा योग्य पुरावा कोर्टापुढें मांडण्यास जें ज्ञान लागतें तें, हीं दोन्हीही आमच्या पोलिसांत प्रायः अभावरूपानेंच दिसून येतात. या दोन्हीं बाबतींत त्यांस शिक्षण देण्याची एखादी शाळा असावी असें पोलिस कमिशनपुढें कित्येक साक्षीदारांनीं सुचविलें आहे, व ही सूचना विचार करण्यासारखी आहे. निदान मुंबईसारख्या मोठ्या शहरांत जेथें वर सांगितलेल्या दोन गुणांची जास्त अवश्यकता लागते तेथें कांहीं दिवस उमेदवार म्हणून काम केल्यानंतर मग जिल्ह्यांतील कामगाराचे जागीं नेमणूक करण्याचा प्रघात पडल्यास त्याचा फार फायदा होईल. वर सांगितलेंच आहे कीं, गांवपोलीसावर नजर ठेवण्याकरितां व निरनिराळ्या गांवाच्या हद्दीचे बाहेर राहणारांकडून जे गुन्हे होतात त्यांचे बंदोबस्ताकरितां तालुकापोलिसांची योजना आहे. गांव व तालुका यांस जें तत्त्व लागू आहे तेंच जिल्हा व इलाखा यांस लागू केलें पाहिजे. म्हणजे एका जिल्ह्यांतून दुसरे जिल्ह्यांत ज्या गुन्ह्यांची व्याप्ती असते असे गुन्हे शोधून काढण्याचें काम पोलिसखात्याचे एका स्वतंत्र भागाकडे असलें पाहिजे. एरव्हीं अशा प्रकारच्या गुन्हेगारांस फाजील सवड मिळून त्यांस आपला धंदा चालविण्यास एक प्रकारचें उत्तेजनच मिळतें. सगळ्या इलाख्याकरितां निराळें डिटेक्टिव्ह डिपार्टमेंट असण्याचें कांहीं कारण नाहीं. पण जी गुन्हेगार मंडळी आज पुणें जिल्ह्यांत तर उद्यां सातारा जिल्ह्यांत हिंडत असते त्यांच्या बंदोबस्ताचें काम एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडेच सोपविणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें.

पोलिसखात्यांतील अधिकारी व सर्व खात्याचा पाया जें गांवपोलीस यासंबंधानें हा विचार झाला. गुन्हेगार हुडकून काढणें आणि त्यांचे गुन्ह्यासंबंधानें योग्य पुरावा गोळा करून न्यायाधिशाकडून त्यांस शिक्षा करविणें हें पोलिसाचें मुख्य काम आहे. करितां पोलिसखात्याचा विचार करितांना पोलिस व म्याजिस्ट्रेट यांच्या संबंधाचाही विचार केला पाहिजे. सामान्यतः लोकांची अशी समजूत आहे कीं, पोलिसानें आणलेला पुरावा म्हणजे बहुतेक बनावट असावयाचा आणि त्यांतून एखादा मोठा गुन्हा असला किंवा सरकारकडून एखादा गुन्हा शोधून काढण्याविषयीं सक्ती असली अगर तो गुन्हा एखाद्या सरकारी खात्यासंबंधाचा असला म्हणजे तर विचारावयासच नको. ही लोकांची समजूत अगदीं निराधार आहे असें नाहीं. प्रत्येक पोलिस कामगारास असें वाटत असतें कीं खून म्हणजे तो सांपडलाच पाहिजे, आणि जर खरा गुन्हेगार मिळाला नाहीं तर कोणी तरी इसम पकडून त्याचे माथीं तो गुन्हा लादून आपण मोकळें झालें पाहिजे. अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें कधीं कधीं सेशन कोर्टापर्यंत येतात; व एक जरी असलें उदाहरण कोर्टापुढें आलें तरी पोलिस खात्यास बट्टा लागतो. पोलिस कमिशनपुढील एका साक्षीदारानें असें म्हटलें आहे कीं, खोटे गुन्हेगार कोर्टापुढें आणून सुटल्याचीं उदाहरणें ज्याप्रमाणें लोकांच्या नजरेस येतात त्याप्रमाणें खऱ्या गुन्हेगारास शिक्षा न झाल्याची उदाहरणेंही लोकांपुढें आलीं पाहिजेत, म्हणजे पोलिसास किंवा म्याजिस्ट्रेटास लोक नांवें ठेवणार नाहींत. पण हें म्हणणें अगदीं वेडेपणाचें आहे; कारण ज्यास कोर्टांत शिक्षा झाली नाहीं तो खरा गुन्हेगार म्हणून तरी कसा समजावयाचा ? आणि यदाकदाचित् असला; तरी "शंभर खरे खरे गुन्हेगार सुटले तरी हरकत नाहीं, पण एकाही इसमास विनाकारण शिक्षा होऊं नये" हें इंग्रजी पुराव्याचें आदितत्त्व आहे. हें पोलिसानें व विशेषतः म्याजिस्ट्रेटांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सारांश, पोलिसानें जो पुरावा गोळा करावयाचा तो हुशारीनें व आपल्या कर्तव्यास स्मरून केला पाहिजे, ही पहिली गोष्ट आहे. पण हल्लीं म्याजिस्ट्रेट व पोलिस यांचा जो संबंध आहे त्या स्थितींत या कामीं पोलिसावर जी देखरेख असावयास पाहिजे ती म्याजिस्ट्रेटाकडून ठेविली जात नाहीं. पोलिस सुपरिंटेंडन्ट व डि. म्याजिस्ट्रेट हे बहुतकरून एकमतानेंच वागणारे असल्यामुळें व तालुक्यांतिल म्याजिस्ट्रेट डि. म्याजिस्ट्रेटचे हाताखालीं वागणारे असल्यामुळें बऱ्याच कामीं तालुक्यांतिल म्याजिस्ट्रेटास स्वतंत्र व कायदेशीर रीतीनें पोलिसाचे दोष बाहेर काढण्याचें धैर्य होत नाहीं; व त्यामुळें कांहीं प्रकरणीं पोलिस अधिकाऱ्यांस एक प्रकारची फूस मिळत असते. अशा प्रकारचे खटले म्हटले म्हणजे ज्यांचे बंदोबस्ताकरितां डि. म्याजिस्ट्रेट जबाबदार आहेत ते होत; सार्वजनिक मिरवणुकी, त्यांत होणारे दंगे, जातीजातीमधील

किंवा समाजाचे दोन शाखांमधील तंटे इ. सर्व या वर्गांत येतात आणि अशा कामीं न्यायाची बाजू म्याजिस्ट्रेटाकडून जितकी चोख रहावयास पाहिजे तितकी चोख रहात नाहीं. फॉरेस्ट, अबकारी वगैरे खात्यांसंबंधानें जे गुन्हे होतात तेही याच वर्गांतील होत. हे गुन्हे क्षुल्लक किंवा नाशाबीत म्हणून सोडून दिले म्हणजे त्या त्या खात्याचे अधिकारी डि० म्याजिस्ट्रेटकडे जांऊंन "तुमचे म्याजिस्ट्रेटांनीं असें केलें तर आमचें खातें कसें चालेल?" अशी ओरड करितात; आणि त्यामुळें खालील म्याजिस्ट्रेटास या खात्याचा विनाकारण अभिमान धरून कित्येक वेळां पुरावा व कायदा (स्वतःस बढती पाहिजे असल्यास) बाजूस ठेवावा लागतो. याचा दोष सर्वांशीं पोलिसाकडे ठेवणें प्रशस्त नाहीं, पण लोकांस यापासून त्रास होतो हें लक्षांत आणिलें म्हणजे मॅजिस्ट्रेट आणि मुलकी कामगार हे निरनिराळे स्वतंत्र अधिकारी असून मॅजिस्ट्रेट हे केवळ हायकोर्टाचेच ताब्यांत रहावे, असें जें कांग्रेसचें म्हणणें आहे तें अवश्य अमलांत आल्या-खेरीज या गोष्टीचा बंदोबस्त लागणार नाहीं, हें कोणाच्याही ध्यानांत येईल. पोलिसानें केलेल्या पुराव्याचा बनावटपणा सेशनकोर्टांत जितका नजरेस पडतो तितका तालुक्थाचे म्याजिस्ट्रेटाचे कोर्टांत नजरेस येत नाहीं, याचेंही कारण हेंच आहे. पोलिस आपलें काम कसें करितें, याची झडती म्याजिस्ट्रेटपुढेंच व्हावयाची आणि तो म्याजिस्ट्रेट परंपरेनें जर वरिष्ठ प्रतिच्या सरकारी मुलकी अमलदाराच्या किंवा अबकारी, फॉरेस्ट किंवा पाालस अंमलदाराच्या कह्यांत असला तर गरीब प्रजेस कांहीं कामीं योग्य न्याय मिळण्यास पंचाईत पडल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. हा दोष काढून टाकण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, दिवाणी न्यायाधीश म्हणजे मुन-सफ ज्याप्रमाणें स्वतंत्र असतात त्याप्रमाणें फौजदारी न्यायाधीशही स्वतंत्र असले पाहिजेत, ते जोंपर्यंत स्वतंत्र नाहींत तोंपर्यंत पोलिसाचे दोष काढण्याचें काम त्यांचे हातून निर्भिडपणें व्हावयाचें नाहीं. आणि पोलिस कामगारावर त्याची जरबही राहणार नाहीं.

सरतेशेवटीं पोलिसाचे दुसरे एका कर्तव्याबद्दल दोन शब्द सांगणें आहेत ते सांगून हा लेख आटपतों. गुन्हा झाल्यानंतर तो शोधून काढून गुन्हेगारांस शिक्षा देण्याचें ज्याप्रमाणें पोलिसाचें काम आहे त्याप्रमाणें गुन्हा न होऊं देण्या-चाच प्रथमतः बंदोबस्त करणें हेंही त्याचें काम होय. हें काम हल्लीं दोन तीन प्रकारांनीं करण्यांत येत असतें. ठक लोकांप्रमाणें जेव्हां एखादी विवक्षित जातचे जातच गुन्ह्यावर आपला उदरनिर्वाह करीत असते तेव्हां त्यांचा बंदो-बस्त स्वतंत्र कायद्यानेंच करावा लागतो. परंतु याशिवाय या कामाकरितां पोलिसास जो अधिकार दिलेला आहे, तो दोन प्रकारचा आहे. एक उडाण-टप्पू धरून आणून त्यांचे जामीन घ्यावयाचे किंवा त्यांस तुरुंगांत पाठवावयाचें,

आणि ज्या गांवांत गुन्हा घडला असेल त्या गांवावर प्युनिटिव पोलिस लादून एकाकरितां सर्व गांवचे लोकांस प्रायश्चित्त भोगावयास लावावयाचें. क्वचित् स्थलीं हे उपाय योजणें कदाचित् हितकारक होईल, नाहीं असें नाहीं. पण हल्लीं या दोन्ही उपायांचा इतका दुरुपयोग होत आहे कीं, पोलिस कमिशननें या दोन्ही गोष्टींचा विचार करून यासंबंधें हल्लीं असलेल्या पोलिसचे अधिकारास कांहीं तरी आळा घालणें जरूर आहे. मुंबई इलाख्यांत अशीं ठिकाणें बराच आहेत कीं, दहा वर्षांपूर्वी तेथें एखादा गुन्हा घडला होता म्हणून त्याचा भूर्दंड तेथील लोकांस अद्याप भरावा लागत आहे ! प्युनिटिव पोलिस कोठें-कोठें, केव्हां, कोणत्या कारणाकरितां व किती दिवस बसविलें होतें याचा तक्ता जर पोलिस कमिशन मागवील तर आमच्या म्हणण्याची सत्यता त्यांस कळून येईल. उडाणटप्पूची गोष्ट त्याच वर्गांतील आहे, व यासंबंधानें असलेल्या अधिकाराचा दुरुपयोग किती होत आहे. हें पाहणें असल्यास पोलिस कमिशननें एखाद्या जेलमध्यें जाऊन तेथें किती लोक उडाणटप्पू म्हणून आले आहेत याची चौकशी करावी. या बाबतींत मागें आम्हीं एक लेख लिहिलेलाच आहे; करितां त्याची पुनरावृत्ति आज करीत नाहीं. एवढेंच सांगतों, कीं या-संबंधानें पोलिसास असलेल्या अधिकाराचा बराच दुरुपयोग होत आहे, आणि तो जितके लवकर बंद होईल तितका चांगला. पोलिसची कवाईत कोणचे तऱ्हेची असावी, त्यांत कोणते प्रकारचे लोक असावे, घोडेस्वार किती ठेवावे, बंदुकी कितीकांजवळ असाव्या वगैरे किरकोळ बरेच प्रश्न आहेत; पण त्याचा विचार दरएक इलाख्यांतील कामगारांनीं स्वतंत्र रीतीनें केला पाहिजे. सर्व हिंदुस्थानाकरितां जें कमिशन नेमलें आहे, त्याचेपुढें महत्त्वाचेच तेवढे प्रश्न यावयाचे. करितां तेवढ्यासंबंधानेंच मुख्यत्वेंकरून आमचें काय म्हणणें आहे तें या दोन लेखांत आम्हीं दाखल केलें आहे. पोलीसखात्याची सुधारणा करणें हें खर्चाचें काम आहे, हें आम्हीं आरंभींच सांगितलें आहे; तुरीची काठी तुरीवर झाडून भागविण्याचें हें काम नव्हे. करितां हिंदुस्थानसरकारचे मनांत जर अधिक पैसे खर्च करण्याचा विचार नसेल तर कमिशन नेमूनही फुकट होणार आहे, हें सांगावयास नको.

* दुष्काळकोडाची फिरून एकवार दुरुस्ती

दुष्काळ पडेल त्या साठीं क्षुत्पीडानिवारणार्थ उपाय योजणें व एरवींच्या सालीं फिरून दुष्काळ पडला असतां योजावयाच्या उपायांची आगाऊ तरतूद करून ठेवणें, अशा या दोन गोष्टींनीं मिळून हिंदुस्थानसरकारास गेल्या पांच चार वर्षांत कामाची म्हणून फारशी वाण पडूं दिली नाहीं. यंदांचें साल सुबत्तेचें खरें, परंतु या सुबत्तेच्या आनंदांत गर्क न होतां, शहाणा कुणबी ज्याप्रमाणें पाऊसकाळाच्या आधीं आपलीं आउतें वगैरे नीट करून वीं बियाण्याची तजवीज करितो, त्याप्रमाणें हिंदुस्थान-सरकारचें विचारही भावी दुष्काळाचा प्रतिकार करण्याकडे वळले, ही गोष्ट सर-कारचे दूरदर्शित्वास साजे अशीच आहे. मात्र एकाच गोष्टीचें जरासें वाईट वाटतें, व ती ही कीं, या विचारांचें फळ प्रत्यक्ष दुष्काळ आला असतां रयतेस विशेष सुखावह होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. अनुभवानें शहाणपण येतें हें खरें आहे, व गेल्या पांच चार सालांत पडलेल्या दुष्काळांचे योगानें सरकारासही नवीन नवीन गोष्टी कळल्या असतील. परंतु या ज्ञानाचें पर्यवसान रयतेच्या हिताचे बाजूकडून एक एक पाऊल मागें हटण्यांत होत आहे, हें पाहून मात्र वाईट वाटतें. वरील विधानाची सत्यता, जे कोणी दोन आठवड्यांपूर्वीं प्रसिद्ध झालेला हिंदुस्थानसरकारचा दुष्काळी ठराव वाचतील त्यांस कळून येणारी आहे. या ठरावांचा गोषवारा मागील अंकांतील स्फुट लेखांत आम्हीं दिलाच होता. परंतु त्यांतील एक दोन वादग्रस्त मुद्यांबद्दल आज विचार करणें आहे. तिसऱ्या म्हणजे सर ॲन्टनी मॅकडोनेल यांच्या कमिशनावरील सरकारचा पहिला ठराव १९०१ सालच्या आगष्ट माहिन्यांत प्रसिद्ध झाला. त्यावेळीं त्याजवर टीका करितांना आम्हीं पुढें होणाऱ्या दुसऱ्या व अखेरच्या ठरावासंबंधानें जें भाकीत केलें होतें तें अक्षरशः खरें ठरलें, असें म्हणण्यास आतां हरकत नाहीं. दुष्काळी कामावरील मजुरांना गेल्या दुष्काळापर्यंत एक कनिष्ट प्रतीचा म्हणून दर देण्यांत येत असे. तो दर यापुढें बंद करण्याचा सरकारचा विचार दिसतो व तसें झालें असतां " लोकांचे जीव संरक्षण करणें हें दुष्काळनिवारणाचें पहिलें तत्त्व आहे, त्यांच्याकडून चोपून काम करून घेणें हें नव्हे, असें जें पहिल्या कमिशनानें ठरविलें होतें त्यास हरताळ लागेल, " असें आम्हीं ता० १० सप्टेंबर १९०१ चे केसरींत लिहिलें होतें व त्याचप्रमाणें गोष्ट घडून आली आहे. नवीन दुष्काळी ठरावांत कनिष्ट प्रतीचा रोजमुरा यापुढें बंद करण्यांत

---

* [केसरी ता. १४ एप्रिल १९०३.)

आला आहे, व रोजमुरा देणेंचा तो मजुराकडून होणाऱ्या कामाचें प्रमाणानें देण्यांत येईल. दुसरा वादग्रस्त मुद्दा असा आहे कीं, या ठरावानें ठरविलेलें मजुराच्या पोटगीचें प्रमाण पूर्वीपेक्षां कमी केलेलें आहे, व या दोन गोष्टी अमलांत आणण्याकरितां दुष्काळ कोडाची मुख्यतः दुरुस्ती व्हावयाची आहे, व या दोनही दुरुस्त्या दुष्काळाचे पीडेंत सांपडून सरकारच्या मदतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांस अनहिताच्या आहेत.

सन १८७७।७८ सालच्या दुष्काळांत फॅमिन कमिशनर सर रिचर्ड टेंपल यांनीं माणशीं एक पौंड किंवा अच्छेर शिधा देण्याचें ठरविलें व त्यामुळें जो प्रळय झाला त्याची आठवण घुढें सुमारें वीस वर्षेंपर्यंत पुरली. म्हणजे त्या अवधींत जीं दुष्काळ–कोडें झालीं व जे दुष्काळ–कमिशनर कामगिरीवर प्रांतोप्रांती नेमले गेले त्यांनीं थोडासा सढळ हात ठेवला; व १८८० व १८९८ सालच्या दुष्काळ कमिशनांच्या रिपोर्टांत अशा रीतीनें सढळ हात ठेवण्याबद्दलच शिफारश केलेली होती. परंतु सर रिचर्ड टेंपल यांच्या दानशूरतेची आठवण अलीकडे मावळत चालली असावी असें दिसतें. कारण सर अँटनी मॅकडोनेल यांच्या कमिशनानें व त्यांच्या शिफारसीचा आधार घेऊन हिंदुस्थानसरकारानें दुष्काळीं कामावरील लोकांच्या मजुरीसंबंधानें ' वेताळ फिरून पूर्व स्थळावर ' आल्याप्रमाणें वर्तन केलें आहे; व या वर्तनाचा परिणाम लोकांस भोगावयास लागून फिरून एकवार हाहाःकार झाल्याशिवाय सरकारचे डोळे उघडणार नाहींत, असें दिसतें. दुष्काळ कोडांत सढळपणा असूनही " कोठावळ्याचे पोदुखीमुळें " दुष्काळपीडित लोकांचे हातीं ठरावीक शिधा पडत नाहीं, हा प्रकार वेगळा आहेच. परंतु दुष्काळ कोडाच्या शब्दांतील सढळपणाही गेला म्हणजे दुष्काळपीडित लोकाचे गळ्यांवरील तात अधिकच आवळली गेली असें होईल. सबब याबद्दल जोपर्यंत संकट पुढेंच आहे, तोंपर्यंत आगाऊ चर्चा करणें जरूर आहे. दुष्काळ आला असतां लोकांस सरकाराकडून मुख्यतः तीन प्रकारांनीं मदत मिळते. विशेष प्रतिष्ठित परंतु दरिद्रि, अथवा घरबसल्या फक्त एकच प्रकारचा धंदा करणारे लोक, हा एक वर्ग. वृद्ध, अंध, पंगु वगैरे दुबळे लोक, गरोदर बायका किंवा लहान मुलें व दुबळे लोक यांच्या संरक्षणांत गुंतल्यामुळें ज्यांस घर सोडून पोट भरण्यास बाहेर पडण्यास जातां येत नाहीं, असे लोक, हा दुसरा वर्ग. तिसरा वर्ग म्हटला म्हणजे प्रत्यक्ष दुष्काळी कामावर कामकाज करून पोट भरणार यांचा. पैकीं पहिल्या वर्गास घरबसल्या धर्मादाय देणगींतून रोख पैसे किंवा त्यांच्या धंद्याचें काम मिळतें. प्रतिष्ठित लोकांस जी देणगी मिळते तिला कांहीं प्रमाण नाहीं. सरकारच्या हातीं स्वदेशी व परदेशी लोकांच्या धर्मबुद्धीमुळें जमा झालेली रक्कम जशी असेल व त्यापैकीं विवक्षित जिल्ह्यास व तालुक्यास जी वांटणीस आली असेल व खैरात वांटणाऱ्या गृहस्थाची जशी

नजर पोंचेल, त्याप्रमाणें ही देणगी मिळते. धंदेवाल्यांस घरबसल्या काम मिळेल त्यांतही त्यांस रोजीं अमुकच एक पोटगी पडेल असा कांहीं निर्बंध नसतो. अर्थात् या वर्गास कमीजास्त पोटगी मिळण्याचा संभव असतो, व ती प्रसंगोपात कमी पडल्यास कोणास फारसा दोषही देतां येत नाहीं. दुसरा वर्ग घरबसल्या किंवा दुष्काळी तळावर जाणाऱ्या दुबळ्या लोकांचा. यांत नियमित शिधा मिळतो व या वर्गांतील दोनही प्रकारच्या लोकांस सारखाच मिळतो. हा शिधा अर्थातच कनिष्ठ प्रतीचा म्हणजे कमींतकमी पण साधारण जीव जगवितां येईल हतका असतो. तिसरा वर्ग काम करणाऱ्या लोकांचा यांत आजपर्यंत तीन निरनिराळ्या प्रमाणांचा शिधा मिळत असे. पहिला कनिष्ठ प्रतीचा, दुसरा वरीष्ठ प्रतीचा म्हणचे जास्तींत जास्ती कितीही काम केलें तरी ज्यापेक्षां अधिक मिळणार नाहीं असा; व या दोहोंच्या दरम्यान ठराविक दरानें कामाच्या प्रमाणानें कमजास्त. हल्लीं जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यामध्यें पूर्वीच्या व्यवस्थेंत जे दोन फरक केले आहेत ते असे कीं, कनिष्ठ प्रतीचा दर अजीबात काढून टाकलेला असून वरिष्ठ प्रतीचा जो दर पूर्वी होता तो कमी केला आहे. म्हणजे कामकरी लोकांस रोजमुरा मिळावयाचा तो किती कमी असावा याला सीमाच राहिली नाहीं; मात्र जी काय सीमा ठरविली आहे ती जास्तींत जास्ती मिळणाऱ्या मजुराला; व ती सीमाही पूर्वीपेक्षां अलीकडे ओढली आहे. पहिल्या दुष्काळ कमिशनानें या बाबतींत मोघम शिफारसी केल्या होत्या; म्हणजे दाम किंवा शिध्याचें प्रमाण न ठरवितां फक्त अशी शिफारस केली होती कीं, कामकरी लोकांची भूक भागण्यास पुरे असा दर ठेवावा व तो इतका सढळ असावा कीं, चुकीबिकीचा फायदा त्यांस मिळावा व एखादे वेळीं चूक झाली असतांही त्यांचे पोटास अगदींच चिमटा बसण्याची पाळी न यावी. दंड वगैरे करणें ते सुद्धां जीव जगण्यास अगदीं अवश्य इतकें तरी धान्य त्याला उरेल अशा बेतानें करावे. ठराविक अदमासापैकीं शेंकडा पाउणशें इतक्या प्रमाणानें काम केलें म्हणजे दुष्काळी मजुरानें भर काम केलें असें समजावें. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून मिळविलेल्या माहितीवरून या कमिशनानें असेंही ठरविलें होतें कीं, कामकरी मनुष्यास दररोज सुमारें पाऊण शेर किंवा बारा छटाक धान्य पोट भरण्यास पुरें होतें. परंतु मीठ, तिखट व जळण हींही त्यास लागतात. याकरितां पाऊण शेर धान्य विकत घेण्यास त्या त्या आठवड्यास बाजारभावाप्रमाणें जितके पैसे लागतील त्यापेक्षां थोडेसे अधिक पैसे द्यावे. असो, यानंतर १८८३ सालीं हिंदुस्थानसरकारनें कमिशनच्या शिफारशीप्रमाणें एक दुष्काळकोड तयार केलें. परंतु त्यांत असें ठरविलें कीं, कामकरी पुरुषास १५$\frac{1}{4}$ छटाक, कामकरी स्त्रीस १३ छटाक, हा जास्तींत जास्ती व कमींत कमी म्हटला म्हणजे पुरुषास सुमारें ९$\frac{1}{8}$ छटाक व स्त्रीस ९$\frac{1}{4}$ छटाक

याप्रमाणें शिधा मिळावा; परंतु या शिध्यांपैकीं धान्याचा जो भाग असेल, त्याच्या पाऊणपटीइतकें धान्य अधिक दिलें असतां, म्हणजे धान्याच्यां हिश्शाचे १$\frac{3}{4}$ पटीइतका शिधा दिला असतां धान्य, मिठ, मिरची व डाळ, तेल वगैरे जरूर ते पदार्थ मजुरास मिळूं शकतील. यास्तव १८८३ च्या कोडांत सांगितलेल्या शिध्याचे १$\frac{3}{4}$ पट शिधा वस्तुतः मजुरास दिला जाणार होता. यानंतर मद्रास, बहार वगैरे प्रांतांत जे दुष्काळ पडले, त्यांमध्यें वरील शिध्याचें प्रमाण अपुरें आहे असें अनुभवास आलें. तेव्हां १८९३ सालीं फिरून एकवार दुरुस्ती करण्यांत आली. या दुरुस्तीनें दुष्काळपीडित व सहाय्य देण्यास पात्र अशा लोकांची वर्गात पूर्वीहून वेगळ्या प्रकारानें केली. परंतु एकंदरीनें शिध्याचें प्रमाण वाढलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण पहिल्या वर्गाच्या म्हणजे श्रमाचें भरकाम करणाऱ्या पुरुषास २१ छटाक व स्त्रीस १९ छटाक व सर्वांत कनिष्ठ प्रतीचा शिधा, काम न करणारासही, पुरुषास १४ छटाक व स्त्रीस १३ छटाक, याप्रमाणें ठरविण्यांत आला. अशा रीतीनें ठरविलेल्या या शिध्याचें प्रमाणासंबंधानें एवढेंच सांगणें जरूर आहे कीं, हें प्रमाण दुष्काळपीडित लोकांचे प्राण वांचण्यास आवश्यक म्हणून वैद्यशास्त्रांतील उत्तम वाकबगार लोकांचे सल्ल्यानें ठरविण्यांत आलें होतें. परंतु १८९६–९७ सालच्या दुष्काळांत या ठराविक प्रमाणांत बराच फेरबदल निरानिराळ्या प्रांतीं केलेला आढळून आला. फॅमिन कोडांत एक प्रकारचा दर असतां दुसऱ्या प्रकारचा दर प्रत्यक्ष दिल्याचीं बरींच उदाहरणें दुसऱ्या दुष्काळकमिशनानें नमूद केलेलीं आहेत. उदाहरणार्थ, वायव्यप्रांतांत बायकांना फक्त २६ औंस किंवा १३ छटाकच शिधा देण्यांत आला, परंतु या शिध्याकरितां म्हणून जे पैसे मजुरदार बायकांच्या हातांत टाकण्यांत आले ते इतके थोडे होते कीं, ते बाजारांत दिले असतां ११ किंवा १२ छटाक शिधाही त्यांच्या पदरांत पडत नसे. इकडे मद्रासेकडे पहावें तों फॅमिन कोडांत सांगितल्यापेक्षां छटाकभर जास्तच शिधा दिला जात असे व मौज ही कीं, यांतून यत्किंचित्ही कमी शिधा केला तर मजुरदार बायकांच्या जिवास अपाय होण्याचा संभव होता, असें मद्रासच्या सॅनिटरी कमिशनरानें आपलें स्पष्ट मत दुष्काळ कमिशनापुढें सांगितलें. मुंबई इलाख्यांत व पंजाबांत फॅमिन कोडानें ठरविल्यापेक्षां थोडा-बहुत कमी दर देण्याकडेच प्रवृत्ति होती. ("In Bombay and the Punjab where the code provisions were more closely adhered to the tendency in practice has been towards a less rather than a more liberal scale than contemplated in the codes. Para 446 F, Com, Rep. 1898). बरें अशा प्रकारचे फरक सर्वथा सकारण आहेत कीं काय असा विचार करूं

लागलों असतां असें दिसून येईल कीं, निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या शरीरप्रकृतींत किंवा कोठ्याच्या रचनेंत इतका फरक बिलकूल नाहीं व सर्व प्रांतातून एकच ठराविक दर देतां येणें शक्य आहे कीं नाहीं, याचा विचार करितांना १८९८ चे दुष्काळ कमिशनचें रिपोर्टांतही असेंच मत दिलें आहे. (We are of opinion that the dietary requirements of famine relief in the various provinces are not great enough to make different standards of ration and wage necessary.) व सर्व हिंदुस्थानचा एकच दर ठरवितांना सदर कमिशनानें, १८९३ सालीं सरकारानें जो दर ठरविला होता तोच स्थूलमानानें पसंत करून, फरक केला तो इतकाच कीं, कनिष्ठ प्रतीच्या दरांत धान्याखेरीज मीठ मिरची वगैरेचें जें प्रमाण १८९३ त सरकारानें ठरविलें होतें त्यापेक्षां थोडेंसें जास्त घरलें गेलें. अशा रीतीनें १८९८ चें कमिशनानें ठरविलेले दर व हल्लींच्या ठरावांतील दर यांची तुलना केली असतां केवळ सरकारच्या मितव्यय--लालसेनेंच त्यांतील अंतर पडलेलें आहे, वस्तुस्थितीचें कारणानें पडलेलें नाहीं असें दिसून येईल. हल्लीं सरकारानें खांदाई काम करणार व वाहातुकीचें काम करणार म्हणजे वर्ग १ व २ यांतील मजुरांचे दरांत अनुक्रमें चार औंस व दोन औंस याप्रमाणें फरक केला आहे; परंतु १८९८ पासून गेल्या तीन चार वर्षांत हिंदुस्थानांतील लोकांची भूक मेली किंवा थोडें अन्न खाऊन पूर्वीइतकें काम करण्याची शक्ति त्यांस कोणा यक्षिणीचे कृपेनें मिळाली असें सरकारचें म्हणणें असल्यास नकळे. अशा रीतीनें इकडे कनिष्ठ प्रतीचा दर काढून टाकला व इकडे सर्वांत वारष्ठ दर कमी केला, म्हणजे अर्थातच केवळ कामाचे मानानें रोजमुरा मिळणार; व हा रोजमुरा फारच कमी पडेल व भर रोजमुरा मिळविण्याचे फारच थोड्यांच्या नशिबीं येईल हें सरकारास माहीत असून त्यांची तशी अपेक्षाहि असल्याचें दिसत आहे. निदान खालील शब्दांचा अर्थ तरी तशा प्रकारचा उघड आहे. "The reductions now proposed, however, are considerable, and it has to be borne in mind that at the same time the minimun wage is to be abolished, so that the reduced rates will be liable to a still further reduction if the task is not performed in full." परंतु येवढ्यावरच ही गोष्ट संपत नाहीं. कारण मुंबई सरकारनें मूळ सुचंविलेली व हिंदुस्थान सरकारनें पसंत करून उचललेली तिसरी ही एक युक्ति आहे. ती अशी कीं, प्रांतिक सरकारास वरील दरांतूनही पंचवीस टक्याइतका शिधा जरूर वाटल्यास कापण्याची मुभा ठेवण्यांत आलेली आहे ! ठराविक दरांत बदल करणें ही गोष्ट महत्त्वाची आहे व तीस

समतोलता आणण्यासाठीं अर्थातच ठराविक दर पंचवीस टक्के वाढविण्याचीही मुभा त्याजबरोबर ठेवलेली आहे. परंतु प्रजेचें नशीब खडतर असल्यानें वाईट तेवढें पदरांत येतें हा अनुभव कांहीं नवीन नाहीं. गेल्या दुष्काळांत या समतोल मुभेचा परिणाम फक्त मजुरीचा दर पंचवीस टक्के कमी होऊनच आपल्या अनुभवास आलेला आहे. ईश्वर मनुष्यास बुद्धिस्वातंत्र्य देतो. परंतु मनुष्य मात्र चांगलें काम करण्यापेक्षां वाईट काम करण्याकडेच त्या स्वातंत्र्याचा उपयोग करितो, हा सिद्धांत अनुभवसिद्ध आहे व तोच मासला पंचवीस टक्के अरते परते करण्यास हिंदुस्थानसरकारनें प्रांतिक सरकारास दिलेल्या स्वातंत्र्याचा होणार अशी निदान आम्हांस तरी भीति वाटते. मग वेळीं प्रांतिक दुष्काळ-कमिशनरास देव काय बुद्धि देईल ती देवो. तात्पर्य, हिंदुस्थानसरकारच्या या नवीन ठरावानें दुष्काळ कोडाची जी दुरुस्ती होणार ती लोकांस हितावह न होतां नुकसानीचीच होईल असें आम्हांस वाटतें. परंतु या गोष्टीचा दुःखद अनुभव आणून देणारा जो दुष्काळ तो पुन्हां न यावा, अशी आशा करणें मात्र आमच्या हातीं आहे, ती करून हा लेख पुरा करितों.

पूर्वेकडील लोकांचें विचारैक्य

या विषयावर जपानांतील ललितकलांचे प्रोफेसर मि. ओकाकुरा या जपानी गृहस्थांनीं इंग्रजींत लिहिलेले पुस्तकाची एक प्रत आमचेकडे नुकतीच आलेली आहे. या पुस्तकाचें नांव वाचून आंतील मजकुराबद्दल चांगलीशी कल्पना येणारी नसल्यामुळें त्याबद्दल प्रथम थोडा खुलासा करून, नंतर पुस्तकांतील विषयाचा थोडासा गोषवारा आमचे वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे. आशियाखंडांतील लोकांचें विचारैक्य म्हणजे काय, याचेंच आधीं पुष्कळांस गूढ पडेल. परंतु जगाच्या नकाशाकडे दृष्टि दिली असतां आशियाखंडांतील देशांस युरोपखंडांतील राष्ट्रें कशीं ग्रासीत चाललीं आहेत, हें लक्षांत येईल, व तें लक्षांत आलें म्हणजे या ग्रासास पात्र झालेल्या देशांस असें कांहीं सामर्थ्य आहे कीं नाहीं, कीं जेणेंकरून ही आपत्ति त्यांस टाळतां येईल, असा कोणासही सहज विचार सुचणार आहे. फार प्राचीन काळापासून युफ्रेटिस, सिंधु, गंगा, ब्रम्हपुत्रा आणि हो-हांग-हो या नद्यांचे काठीं आशियांतील राष्ट्रांच्या सुधारणेचा ध्वज फडकलेला आहे. मध्य

---

* [केसरी, ता. २८ एप्रिल १९०३]

एशियांत कांहीं दिवस या लोकांची वस्ती होती, पण दक्षिणेकडील सुपीक प्रदेश सांपडल्यानंतर मध्य एशियांतील वस्ती मोडली आणि हूण, तार्तर, वगैरे रानटी लोक कांहीं चीनांत, कांहीं हिंदुस्थानांत व कांहीं इराणांत जाऊन राहिले. बटिबलोन, निनवे, वगैरे आशियाखंडांतील अगदीं पश्चिमेकडील राष्ट्रांची सुधारणा आतां बहुतेक नामशेष होऊन राहिलेली आहे, व इराणच्या लोकांस मुसलमानी धर्म स्वीकारावा लागल्यामुळें चीन, हिंदुस्थान, व तिबेट या देशांतून इराणास एका प्रकारचा वेगळेपणा प्राप्त झालेला आहे. हा वेगळेपणा सकृद्दर्शनीं जितका भासतो, तितका वस्तुतः नाहीं हें खरें; तथापि अशोकराजाचें वेळीं हिंदुस्थानांत व हिंदुधर्माच्या छायेखालीं जमलेल्या व वाढलेल्या बौद्ध भिक्षूंनीं व उपदेशकांनीं ज्याप्रमाणें एकीकडे सिरियापालेस्ताईन, दुसरीकडे चीन, जपानपर्यंत 'पूर्वापरौतोयनिधी वगाह्यास्थितः पृथिव्या इव मानदंडः' याप्रमाणें आपल्या धर्माचा दंड पसरून दिला तसा प्रकार आतां होईल कीं नाहीं, याबद्दल शंका आहे. तथापि तिबेट, चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश, हिंदुस्थान व सिलोन आदिकरून इराणच्या पूर्वेस जे देश आहेत त्यांचा विचार केला, तर त्यांस जोडण्यास कोणच्याही प्रकारचें साधन नाहीं, असें कोणीही म्हणणार नाहीं. व आशिया खंडांतील राष्ट्रांमध्यें प्रमुख राष्ट्रें हींच आहेत. आतां एवढें खरें कीं, एक जपान खेरीज करून इतर राष्ट्रें लंगडीं झालेलीं आहेत. सेंटपीटर्सबर्गमधून थेट मांचुरियापर्यंत रशियन रेल्वे होऊन हिमालयाच्या उत्तरेकडील भाग बहुतेक ग्रासून चीनांत रशियानें प्रवेश केलेला आहे. आणि दक्षिण महासागरांतून इंग्रज लोकांनीं इकडे येऊन हिंदुस्थान व ब्रह्मदेशावर आपला पूर्ण अंमल बसविला आहे, व समुद्राच्या बाजूनें इराण व चीन यांस शह दिलेला आहे. एक जपान काय तें मोकळें सुटलेलें आहे; व जपानी लोकांनीं पाश्चिमात्यांचें जें अनुकरण केलें आहे व त्यांजपासून ज्या विद्या संपादिल्या आहेत, त्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य पुढेंही असेंच कायम राहील अशी आशा आहे. अशा स्थितींत एका जपानी प्रोफेसरास एशिया खंडांतील लोकांच्या ऐक्याचे विचार सुचावें हें अगदीं स्वाभाविक आहे. जपानानें चीनवर स्वारी करून त्या देशाचें व्यंग पाश्चिमात्य राष्ट्रांचें नजरेस आणण्यास मदत केली हें उघड आहे. पण केव्हांना केव्हां तरी आपण म्हणजे चीन, ब्रह्मदेश, हिंदुस्थान आणि जपान ह्या राष्ट्रांतील लोक एक आहों ही कल्पना कोणाही स्वतंत्र विचाराच्या पुरुषाचे डोक्यांत आल्यावांचून राहिली नसती; व तीच कल्पना मि. ओकाकुरा यांनीं आपल्या पुस्तकांत ग्रथित केली आहे. हिमालयपर्वत चीन व तिबेट या राष्ट्रांस हिंदुस्थानापासून वेगळें करतो हें खरें आहे, पण पूर्वीचा इतिहास मनांत आणला असतां जगांतील ह्या अत्युच्च पर्वतासही या दोन राष्ट्रांतील विचारैक्य मोडवलें नाहीं,

असें पुस्तकाच्या आरंभींच प्रो. ओकाकुरा यांनीं म्हटलें आहे. तिबेटांतून प्रवास करणें आतां कित्येकांस कष्टास्पद किंबहुना अशक्य वाटत असेल, पण बौद्ध-धर्माचा ध्वज जेव्हां सारखा फडकत होता तेव्हां जपानांतील शेंकडों प्रवासी हिंदुस्थानांत येत व हिंदुस्थानचे धर्मोपदेशक त्याच वाटेनें चिनांतून जपानांत जात असत. किंबहुना तिबेट हा या लोकांचा रहदारीचा रस्ताच होता असें म्हटलें तरी चालेल. चीनच्या सरहद्दीवर प्राचीन काळीं एकदां एक हिंदु, एक चीनी व जपानी प्रवाशी यांची गांठ पडली होती त्यावेळीं आपण तिघे एकच आहों, हें दाखविण्यास त्यांपैकीं एकानें असें रूपक रचलें कीं, आपण तिघेही एकाच पंरुयाचे अवयव आहों. हिंदु हा या पंरुयाच्या कड्या आहे; त्यावरून पसरलेला कागद चिनी हा आहे आणि जपानी हा त्या पंरुयाच्या काड्या सांधणारा खिळा आहे. चीन, जपान व हिंदुस्थान यांचें ऐक्य या प्रवाशांनीं केलेल्या रूपकापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें व्यक्त करणें अशक्य आहे; व प्रो. ओकाकुरा यांनीं हेंच रूपक आपल्या ग्रंथांत घेतलेलें आहे. बौद्धधर्माचा हिंदु-धर्माशीं पुष्कळ विरोध आहे; पण स्वामी विवेकानंद म्हणत असत त्याप्रमाणें बौद्धधर्म म्हणजे हिंदुधर्माचा बच्चा–पण बंडखोर बच्चा–आहे किंवा होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्रांची घांव ज्याप्रमाणें सुखोपभोगांकडे आहे, तशी पूर्वेकडील लोकांची नाहीं, व आयुष्य सुखांत घालविण्याच्या साधनांपेक्षां आयुष्याचें परिणामीं साफल्य कसें होईल हाच विचार त्यांच्या डोळ्यापुढें नेहमीं उभा असतो. आज जगांत प्रचलित असलेले सर्व धर्म पूर्वेकडील म्हणजे आशियाखंडातील राष्ट्रांतच प्रथमतः कां निपजलें याचें बीजही वरील भेदांत आहे असें प्रो. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. सारांश, पूर्वेकडील राष्ट्रांतील लोकांमध्यें पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकांपेक्षां विलक्षण असें जर एकादें विचारैक्य असेल, तर तें वर निर्दिष्ट केलेलेंच होय व त्यामुळें हिंदुस्थान, चीन, व जपान ह्या राष्ट्रांतून देवांच्या मूर्ति, धर्मोपदेशांकरितां केलेलीं लेणीं किंवा देवालयें यांच्या रचनेंत व कारागिरींतही एक प्रकारचें मर्मज्ञ प्रेक्षकांस साम्य दिसून येतें असें मि. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. अजिंठा येथील लेणीं ओकाकुरा हे पहावयास गेले तेव्हां तेथील कोरींव चित्रें अपूर्ण आहेत हें त्यांच्या ताबडतोब लक्षांत आलें, म्हणजे दगडाच्या कोरींव मूर्ति आहेत त्यांवर सनल्याचा किंवा दुसऱ्या कसल्या तरी लुकणाचा थर देऊन त्यावर पुढें मनु-ष्याचें हावभाव व मनोविकार रंगानीं दाखवावयाचें होते, परंतु तें काम झालें नाहीं, किंवा होऊन त्यांचा नाश झाला, असें मि. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. कसेंही असो, स्वतंत्र राष्ट्रांतील एका मर्मज्ञ विद्वानास पूर्वेकडील राष्ट्रांमध्यें असलेल्या ऐक्याची अशा रीतीनें एकदां प्रचीति आल्यावर लवकरच त्यास 'सर्वं ब्रह्ममयं जगत्' असें वाटूं लागल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. जपानांत

हल्लीं दोन तऱ्हेचे पक्ष झालेले आहेत. एक जपानी लोकांनीं सर्वस्वीं पाश्चिमात्यांचें अनुकरण करून त्यांची रीतभात व सुधारणा उचलावी असें म्हणणारा, व दुसरा योग्य ती पाश्चिमात्य सुधारणा घेऊन जपानच्या लोकांनीं आपला स्वाभिमान व आपलेपणा कायम ठेवावा असें प्रतिपादन करणारा. मि. ओकाकुरा हे या दुसऱ्या पक्षाचे आहेत; व जपानांतील चित्रकला किंवा मूर्तिकला याच धोरणावर सुधाराव्या असें त्यांचें मत आहे. चित्रें, जुन्या मूर्ति, किंवा जुन्या कला यांचा त्यांनीं पुष्कळ वर्षें अभ्यास केलेला असून या विषयांत त्यांचें प्राविण्य जपानांतील सर्व लोकांस मान्य व संमत आहे; इतकेंच नव्हे, तर हे विषय जेथें शिकवितात त्या संस्थेमध्यें हे प्रधान गुरु होते. पण पुढें या संस्थेचें काम इताली देशांतील कारागीर आणून या पाश्चिमात्य धर्तीवर चालवावें असें ठरल्यामुळें त्यांस संस्था सोडून द्यावी लागली. तथापि त्यांच्या लौकिकामुळें त्यांचे भोंवतीं नवीन शिष्यमंडळ तयार झालें; व त्यांच्या मतांचा अधिकाधिक प्रसार होऊं लागला. त्यांनीं हिंदुस्थान, चीन वगैरे पूर्व देशच पाहिले असें नाहीं; तर त्यांनीं युरोपांतही प्रवास केलेला आहे, व त्यांचा असा दृढ समज झालेला आहे कीं आशियाखंडांतील लोकांचें विचारैक्य केवळ चित्रें किंवा देवादिकांच्या मूर्ति यांमध्येंच नव्हे, तर धर्माच्या इतर बाबतींतही अद्यापही चांगलें प्रत्ययास येतें. व हें विचारैक्य युरोपियन राष्ट्रांतील लोकांच्या विचारापेक्षां भिन्न असल्यामुळें पूर्वेकडील विचारांचा व पश्चिमेकडील विचारांचा असे हे दोन भिन्न ओघच आहेत असें म्हणावें लागतें. या ओघांची भिन्नता कोणत्याही कारणानें एकदां लक्षांत आल्यानंतर हे दोन ओघ असेच भिन्न राहावयाचे किंवा एका ओघाच्या झपाट्याखालीं दुसरा ओघ गुरफुटून जावयाचा किंवा नाहींसा व्हावयाचा कीं काय, असा सहजच प्रश्न निघतो; व त्यास जपानी मनुष्याकडून जें उत्तर मिळावयाचें तेंच ओकाकुरा यांनीं दिलेलें आहे. आशिया खंडांतील राष्ट्रांची उन्नति होणें जरूर आहे इतकेंच नव्हे, तर ती होण्यास पूर्वीच्या विचारैक्याचे जे मार्ग पडलेले आहेत तेच पुनः सुधारून आपण नीट केले पाहिजेत, असें ओकाकुरा यांचें म्हणणें आहे व तें पुष्कळ अंशीं खरें आहे यांत शंका नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं पूर्वेकडील राष्ट्रांतील हें विचारैक्य मोडून टाकून नेहमीं त्यांस पादाक्रांत करून ठेवलेल्या स्थितींतच ठेवणें जरूर व शक्य आहे, असें प्रतिपादन करणारे कांहीं पाश्चिमात्य ग्रंथकार आहेत; किंबहुना युरोपांतील राष्ट्रांनीं आशिया खंडांतील राष्ट्रांस नेहमीं कह्यांत ठेवून त्यांचेपासून आपला होईल तेवढा फायदा करून घ्यावा असाच ईश्वरी संकेत आहे, असें म्हणण्यापर्यंतहि कित्येकांची मजल येऊन ठेपलेली आहे. याची उलट बाजू म्हटली म्हणजे ओकाकुरा यांनीं दाखविली आहे तीच होय. आशियाखंडांतील

लोकांमध्यें एक प्रकारचें विलक्षण प्राचीन काळापासून चालत आलेलें विचारैक्य आहे, व हिमालयपर्वत आड आल्यानेंही जर तें नाहींसें झालेलें नाहीं, तर अन्य कारणानेंही तें नाहींसें होणें शक्य नाहीं, बुडविलेल्या भोपळ्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी पाण्याच्या सपाटविर तरंगून दृक्प्रत्ययास येईल हें निश्चित आहे अशी यांच्या मनाची खात्री झालेली आहे व तीच खात्री हल्लींच्या पुस्तकांत त्यांनीं लोकांपुढें मांडलेली आहे. अशा प्रकारचें पुस्तक एशियाखंडांतील विद्वान् पुरुषानें लिहिलेलें हें पहिलेंच होय. व भगवद्गीतेंत सांगिल्याप्रमाणें भेदांतही साम्य पाहणारी अशा प्रकारची दृष्टि फारच थोड्या लोकांत आढळून येते. तथापि एकदां ही कल्पना प्रचलित केली म्हणजे तिचा प्रसार होण्यास फारशी पंचाईत पडत नाहीं असा ऐतिहासिक अनुभव आहे. हा अनुभव हल्लींच्या कल्पनेस लागू पडेल कीं नाहीं, पडला तर कोणत्या मानानें पडेल, आणि त्याचा शेवट कसा काय होईल इ. बरेच महत्त्वाचे प्रश्न मि. ओकाकुरा यांच्या पुस्तकाचे वाचनानें मनांत उद्भवतात, व त्यासंबंधानें आजच आणखी दोन शब्द लिहिणार होतों, परंतु स्थलसंकोचास्तव तो बेत सध्यां रहित करणें भाग आहे.

❖ ❖ ❖

* मुंबई इलाख्यांतील जमीनधाऱ्याची पद्धत

ना० दाजी आबाजी खरे यांनीं धारवाडच्या प्रांतिक सभेचे अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें त्यांतील पहिला भाग फार महत्त्वाचा असल्यामुळें त्याचा गोषवारा जरी गेल्या खेपेस दिला आहे, तरी त्या संबंधानें स्वतंत्र रीतीनें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. मुंबई इलाख्यांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत शेतकीखेरीज उपजीविकेचें आतां दुसरें साधन राहिलें नाहीं. कोष्टयाचे किंवा इतर धंदे परकीय देशांतील माल येथें येऊं लागल्यामुळें बहुतेक बुडाल्यासारखे झाले आहेत. आणि येथील लोकांस उत्पन्नाची बाब म्हटली म्हणजे देशांतील जमीनच काय ती शिल्लक राहिली आहे. सुदैव आमचें कीं, ही जमीन येथून परदेशांत वाहून नेतां येत नाहीं ! किंवा थंड देशांतील लोकांस या उष्ण देशांत येऊन आमच्या जमिनीची लागवड करण्याकरितां वसाहती करतां येत नाहींत ! नाहींपेक्षां इतर धंद्यांस ज्याप्रमाणें आम्ही आंचवलों त्याचप्रमाणें शेतकीचीही व्यवस्था झाली असती. असो; त्या तऱ्हेनें नाहीं तर दुसऱ्या

---

* [केसरी ता. ५ मे १९०३]

रीतीनें शेतकीचा धंदा बुडण्यासारखी व्यवस्था आमचे सरकारचे हातून होत आहे. वर सांगितलेंच कीं, शेतकीखेरीज उत्पन्नाचें दुसरें मोठें साधन आम्हांस राहिलें नाहीं. .सरकारी नोकरी, वकिली, बॅरिस्टरी वगैरे धंदे उंसाच्या चरकाप्रमाणें धनोत्पादक नव्हत, तर वाळूच्या चरकाप्रमाणें केवळ इकडची वाळू तिकडे नेणारे किंवा उत्पन्न झालेल्या धनाची फक्त वांटणी करणारे आहेत हें अर्थशास्त्रांत प्रसिद्ध आहे. अर्थात् शेतकीचा धंदा चांगला चालेल व त्यापासून पुष्कळ उत्पन्न होईल तेव्हांच ही पोशाखी धंद्यांची मंडळी संपन्न व्हावयाची. यासाठीं देशांतील धनोत्पादक धंद्यांचा जेव्हां विचार करावयाचा तेव्हां या पोषाखी लोकांस सोडून देऊन मुख्यत्वें शेतकीचा विचार केला पाहिजे हें उघड आहे. शेतीच्या उत्पन्नापैकीं शेतकऱ्यानें कांहीं नियमित भाग सरकारास द्यावा, सरकार त्या नियमित भागाचेंच मालक आहे, शेताचें नव्हे, असा नियम व निर्बंध फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत चालत आला आहे. इंग्रज सरकारानें हा नियम मोडून टाकून शेताचे मालक सरकार व शेतकरी हा सरकारचें कूळ, असें नवें तत्त्व हल्लींच्या कायद्यांत घातलें आहे. हें तत्व बरोबर नाहीं, पण आज विस्तृतपणें त्याचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. जमिनीच्या ऐन उत्पन्नाचा किती भाग सरकारास जातो व किती भाग शेतकरी आणि जमीनदार, इनामदार वगैरे मध्यम प्रतीच्या लोकांच्या वांटणीस येतो हें आपणास मुख्यत्वेंकरून पाहणें आहे. ज्या इलाख्यांत शेतकरी व सरकार यांच्या दरम्यान जमीनदार, इनामदार, तालुकदार वगैरे मंडळी असते तेथें जमिनीच्या ऐन उत्पन्नापैकीं $\frac{1}{6}$ पेक्षां अधिक वसूल जमिनदारानें घेऊन जमिनदारास मिळेल त्याच्या निम्मे सरकारानें घ्यावें असा सामान्यतः नियम आहे. बंगाल्यांतील कायमधाऱ्याची पद्धत अशाच प्रकारची आहे. म्हणजे जमिनीच्या उत्पन्नापैकीं $\frac{1}{6\frac{1}{2}}$ तरी जमिनदारापाशीं राहून त्या प्रांतांत जमिनदाराचा एक मध्यम स्थितींतील व संपन्न लोकांचा वर्ग बनतो. मुंबई इलाख्याची तशी स्थिति नाहीं. मराठी राज्यांत ऐन साऱ्याच्या वसुलावर कोणाला २ टक्के तर कोणाला ५ टक्के या तऱ्हेनें देशमूख, देसाई, देशपांडे वगैरे हक्कदार लोकांस साऱ्याचा भाग मिळत असे, व त्यामुळें जिल्ह्यांतून किंवा तालुक्यांतून या मंडळींचें चांगलें वजन होतें. परंतु मराठी राज्यानंतर अव्वल इंग्रजींतच ही पद्धत मोडली जाऊन जमिनीचे सारे शेतकऱ्यांकडून एकदम सरकाराकडे भरण्याची सुरवात झाली व देसाई, देशमूख वगैरे मध्यम प्रतीचे लोक व त्यांचें वजन कमी होऊं लागलें. अशा रीतीनें मध्यम प्रतीचा वर्ग मोडल्यानंतर सर्व्हे किंवा पाहणी पुनः पुनः होऊन शेतकऱ्यांचा सारा होईल तितका वाढविण्याची सुरवात झाली. ती इतकी कीं, या पद्धतीचा एक सारखा आज ६० वर्षें अम्मल असल्यामुळें एक वर्ष पाऊस न पडला कीं, शेतकरी

अन्नान्न दशेस येतो हें दुष्काळांच्या उदाहरणावरून आतां निर्विवाद सिद्ध झालें आहे. सरकार तर्फेचें असें म्हणणें आहे कीं, जामिनीची पहिली पाहणी चुकीची होती म्हणून दुसरी करण्यांत आली व साऱ्याचें उत्पन्न वाढलें आहे तें विशेषतः करून जास्त जमीन लागवडीस आल्यामुळें वाढलें आहे, आणि जमिनीवर जें साऱ्याचें ओझें आहे तें पेशवाईंत होतें त्यापेक्षां फार झालें तर शेंकडा १०।१५ या प्रमाणापेक्षां जास्त नाहीं. तात्पर्य शेतकऱ्याकडून जो आपण सारा घेतों तो माफक आहे व जमिनीच्या उत्पन्नापैकीं कांहीं शिल्लक रहात नसल्यास त्याचा दोष शेतकऱ्याकडे आहे सरकाराकडे नाहीं, असें मुंबईसरकारचें म्हणणें आहे. हें म्हणणें चुकीचें आहे असें मि० दत्त यांनीं खुल्या पत्रांच्या द्वारें लॉर्ड कर्झन यांस कळविलें होतें. मि० दत्त यांचें असें म्हणणें होतें कीं, दर पाहणीला ३० टक्के याप्रमाणें तीनदां मुंबई इलाख्यांत जमिनीचे सारे वाढलेले आहेत व जमिनीच्या ऐन उत्पन्नापैकीं शेंकडा २० पासून ३३ या प्रमाणानें सरकारसारा हल्लीं वसूल होत असतो. मि० दत्त यांनीं इतर इलाख्यासंबंधानें अशींच पत्रें लॉर्ड कर्झन यांजकडे पाठविलीं होतीं. तीं सर्व निरनिराळ्या प्रांतिक सरकारांकडे पाठवून त्यांकडून आलेले जवाब व त्यांजवरील आपला ठराव हिंदुस्थानसरकारानें वर्ष सव्वा वर्षापूर्वीं प्रसिद्ध केला होता. हा ठराव शेवटचा आणि या प्रश्नाचा अखेरचा निकाल लावणारा आहे असें हिंदुस्थानसरकारचें मत झालेलें आहे व त्याप्रमाणें हें पुस्तक देशी भाषांत भाषांतर करवून अखेरचा निकाल म्हणून प्रसिद्ध करावें, अशी सूचना झाली असल्याचेंही समजतें. अशा स्थितींत हा निकाल चुकीचा आहे आणि प्रांतिक सरकारानें हिंदुस्थान सरकाराकडे पाठविलेला खलिताही त्याच मासल्याचा आहे, असें कोणी तरी सिद्ध करून दाखविणें जरूर होतें. तें काम ना० खरे यांनीं आपल्या भाषणांत केलें आहे; व मुंबईइलाख्यापुरताच विचार करून मुंबईसरकारचे सेक्रेटरी मि० मूर मॅकेंझी यांच्या सहीनें हिंदुस्थानसरकाराकडे गेलेली माहितीही एकतर्फी व चुकीची आहे असें सरकारी रिपोर्टांतील आंकड्यांवरूनच स्पष्ट दाखविलें आहे. अथा मुंबईसरकार म्हणतें त्याप्रमाणें या प्रश्नाचा अखेर निकाल झाला असें निदान आज तरी मानणें शक्य नाहीं.

ना० खरे यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दा कायतो हाच होय. पेशवाईच्या वेळीं जमीमहसुलाची ऐन जमा किती होती हे आंकडे मिळत नाहींत. पण थोरल्या माधवरावांचे वेळीं एकंदर करांचें उत्पन्न २८० लक्ष रुपये होतें व शेवटल्या बाजीरावाच्या वेळीं जमिनीच्या साऱ्याचा वसूल सुमारें ८० लाख होता असें आढळून येतें. यावर सरकारचें असें उत्तर जाहे कीं, जमिनीचा कमाल आकार पेशवाईंत जबर म्हणजे जमिनीच्या ऐन उत्पन्नाच्या सुमारें निम्में असे; व त्यापेक्षां अव्वल इंग्रजींतच सरकारानें धारे कमी केले होते. हें सरकारचें

म्हणणें कांहीं अंशीं बरोबर व कांहीं अंशीं चुकीचेंही आहे. कमाल आकार जबर होता, पण तो निवळ कागदांतील आंकडा असून दरसाल त्यापैकीं सुमारें ½ पासून २ पर्यंतच कायतो वसूल होई,व बाकी तोटाखातें खर्च लिहून हिशेबाची दरसाल तोंडामिळवणी करीत, असें अव्वल इंग्रजींतील एल्फिन्स्टन, चापलिन वगैरे कामगारांनींच लिहिलें आहे. हें जर खरें धरलें तर इंग्रजसरकारानें सारे कमी केले असें न म्हणतां केवळ जमाखर्चाचीच पद्धत बदलली असें म्हणावें लागतें. म्हणजे सरासरीनें शेतकऱ्यांकडून जो सारा येत होता तेवढाच जमा करावा, कमाल आकार जमा करून तोटाखातें दुसऱ्या रकमा खर्ची टाकण्याची भानगड करूं नये असें त्यांनीं ठरविलें. अर्थात् पेशवाईंत जे धारे प्रत्यक्ष वसूल होत होते तेच अव्वल इंग्रजांत कायम ठेवले होते, असें यावरून सिद्ध होतें. पहिल्या जमीन पाहणीस सन १८३९–४० त सुरवात झाली. त्यापूर्वी मुंबई इलाख्यांतील सिंधखेरीज करून १८ जिल्ह्यांचें उत्पन्न १४० लक्ष रुपयांचें होतें असें सरकारी रिपोर्टांतील आंकड्यांवरूनच ना० खरे यांनीं दाखविलें आहे. तें आतां ३१० लक्षांपर्यंत आलें आहे, म्हणजे सरासरीनें २। पट वाढलें आहे. मंग कोठें याहीपेक्षां जास्ती म्हणजे तिप्पट चौपट व कोठें याहीपेक्षां कमी असेल. साऱ्याची ही वाढ लागवडीच्या वाढीपेक्षां पुष्कळच अधिक आहे असेंही ना० खरे यांनीं दाखविलें आहे; व असा सिद्धांत केला आहे कीं. **लागवडीची व लोकसंख्येची वाढ शेंकडा १०, तर साऱ्याची वाढ शेंकडा १२० याप्रमाणानें झाली आहे** ! हा सिद्धांत खरा धरला तर शेतकरी कशानें बुडाला याचें कारण उघड होतें. पेशवाईंत जो सारा होता त्याच्या दुप्पट सारा आणि तोही सुधारलेल्या सक्तीनें जर सरकार घेऊं लागलें तर रयतेजवळ (मध्यम प्रतीचा वर्ग बुडालाच.) शिल्लक ती काय राहणार ? आणि देशांतील संपत्तीची व उद्योगधंद्यांची वृद्धि तरी कशी होणार ? वर सांगितलेंच आहे कीं, शेतकी हिच काय ती आमची मुख्य उत्पन्नाची बाब. देशांतील लोकांस खावयास मिळून जर दोन पैसे शिल्लक रहावयाचें असले तर ते या बाबींतूनच राहणार. पण ना. खरे यांनीं दाखविलेल्या आंकड्यांवरून त्याच्या उलट प्रकार होत आहे असें आढळून येतें. मि. म्युर मॅकेंझी यांस हे आंकडे मिळाले नसते असें नाहीं. पण त्यांनीं आपल्या एकतर्फी लेखांत या आंकड्यांचा कोठेंच प्रवेश होऊं दिला नाहीं, व असला त्यांचा लेख प्रमाण मानून हिंदुस्थानसरकारनें या प्रश्नाचा अखेर निकाल करावा ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. फार लांब कशाला ? ना. खरे यांचें भाषण प्रसिद्ध करतांना कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं त्यांतील मुद्याचा म्हणजे जमीनसाऱ्यासंबंधींचा भाग गाळून टाकून त्याऐवजीं सदर भागांत, ना० खरे यांनीं सरकारी ठरावावर कडक प्रतिकूल टीका केली आहे, एवढेंच प्रसिद्ध केलें आहे. खरा पक्षाभिमान म्हण-

तात तो यासच, आणि तो आमच्या अँग्लो-इंडियन बंधूंमध्यें पूर्णपणें वास करीत आहे याबद्दल दुसरा पुरावा देण्याचें कांहीं कारण नाहीं.

आतां कोणी असें म्हणतील कीं, १४० लाखांचे जरी ३१० लाख रु. झाले, तरी गेल्या ६० वर्षांत जर धान्याची किंमत वाढली आहे तर दुप्पट सारा देणें शेतकऱ्यांस जड पडूं नये. ना. खरे यांच्या लक्षांत ही कोटी आली नाहीं असें नाहीं. पण सरकार स्पष्टपणें असें म्हणूं लागेपर्यंत त्यास जबाब देण्याचें कारण दिसत नाहीं असें आपल्या भाषणांत त्यांनीं म्हटलें आहे. आणि आमच्या दृष्टीनें :तेंच बरोबर आहे. कारण प्रातिपक्षानें आपली बाजू मांडल्यानंतर ती खोडणें नेहमींच अधिक सोईवार असतें. तथापि सामान्यतः विचार केला असतां ही कोटी चुकीची आहे. असें सांगण्यास आम्हांस कांहीं हरकत दिसत नाहीं. पहिल्या व दुसऱ्या रिव्हिजन सर्व्हेच्या वेळीं जे सारे वाढविण्यांत आले तेव्हांच धान्याची किंमत चढलेली होती, व तेव्हां जर शेंकडा ३० या प्रमाणानेंच सारा वाढविण्यांत आला तर पुनः तो आणखी वाढविण्याचें कारण काय ? धान्याची किंमत वाढली तर त्याबरोबरच संसारास लागणाऱ्या इतर वस्तूंची किंमत वाढत असते, आणि शेतकी करण्यास जीं साधनें व खर्च लागतो तोही वाढतो ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. लंकेंत एका हजामतीबद्दल न्हाव्यास सोन्याच्या चार विटा मिळाल्या, तर बाजारांतून अच्छेर कणकि आणण्यास त्यास तीन विटा द्याव्या लागल्या, ही गोष्ट सर्वांत माहीत आहेच ! सारांश, धान्याची किंमत वाढली ही गोष्ट जर लक्षांत घ्यावयाची असेल तर त्याजबरोबर इतर कामाचा वाढता खर्चही ध्यानांत आणला पाहिजे. किंबहुना शेतकऱ्याच्या कुटुंबास लागणारा खर्चही वाढतो हेंही जमेस धरलें पाहिजे. अशा रीतीनें हिशेब केला म्हणजे धान्याच्या वाढलेल्या किंमतीपैकीं वाढीचा कांहीं भाग मात्र—सर्व भाग नव्हे—सरकारानें घेणें योग्य ठरेल यापेक्षां या कोटीची मजल जास्त येऊं शकत नाहीं. वाढीचा कितवा भाग सरकारानें घ्यावा हें अद्याप कोठेंच निश्चित ठरलेलें नाहीं, पण जामिनीच्या उत्पन्नाशीं साऱ्याचें जें प्रमाण आहे तेंच वाढीस लावल्यास फार झालें तर वाढीचा ६ वा हिस्सा सरकारानें घ्यावा असें ठरतें. म्हणजे शेंकडा १२० याप्रमाणें सारे वाढण्यास शेंकडा ७२० या प्रमाणानें धान्याचे दर वाढलेले असले पाहिजेत, तसे ते वाढले गेले आहेत काय ? व असल्यास त्यास पुरावा काय ? हें सरकारी अधिकाऱ्यांनीं दाखविलें पाहिजे. एरवीं १४० लाखांचे ३१० लाख कसे झाले याचें समर्थन करितां यावयाचें नाहीं. पहिली पहाणी ज्या वेळीं झाली त्यावेळीं म्हणजे सन १८४० सालीं मुंबई इलाख्याच्या १८ जिल्ह्यांत इंग्रजी राज्य होऊन २० वर्षें झालीं होतीं. पेशवाईच्या अखेरच्या धामधुमीमुळें प्रथमतः कांहीं जमीन पडीत होती असें जरी मानलें तरी सन

१८४० पर्यंत ती जमीन पडीत राहणें अशक्य आहे. पेशव्यांच्या लष्करांतील शिपाई लष्कर मोडल्यामुळें शेतकीच्या धंद्याकडेच वळलेले होते; त्यामुळें इतर लढाया बंद झाल्यामुळें पुष्कळ नवीन जमीन लागवडीस आली असें त्या-वेळच्या इंग्रजी अंमलदारांनीं लिहिलें आहे. रत्नागिरीसारख्या जिल्ह्यांत तर लागवड करण्यासारखी परंतु लागवडीस न आणलेली अशी तिळभर देखील जमीन शिल्लक नव्हती असें सन १८५१ सालीं विंगेटसाहेबांनींच म्हटलें आहे. आतां नाशिक व विजापूर हे जिल्हे पुढें नवीन काढल्यानें आंकडे जुळविण्यास थोडी पंचाईत पडेल; पण एकंदरींत सन १८४० पेक्षां पुढें फार झालें तर शेंकडा १०।१२ पेक्षां जास्त नवीन जमीन लागवडीस आलेली नाहीं, असें मानावें लागतें. पहिली पाहणी चुकीची होती. म्हणजे वरकस जमीन तेव्हां मोजलेली नव्हती आणि फेर-पाहणीच्या वेळीं ती मोजल्यामुळें गांवांतील एक-रांची किंवा बिघ्यांची संख्या वाढली असें कित्येक सर्व्हे रिपोर्टांत लिहिलें आहे, पण ही वाढ खरी नव्हे, कागदोपत्रीची आहे, आणि ती जर मि. मूर मॅकेंझी यांनीं जमेस धरली असेल तर ही त्यांची मोठीच चूक होय हें निर्विवाद आहे. सन १८७१ पेक्षां म्हणजे पहिल्यानें खानेसुमारी झाली त्यापेक्षां सन १९०१ सालीं लोकसंख्या विशेषशी वाढलेली नव्हती असें खानेसुमारीच्या आंकड्यां-वरून दिसून येतें. ही लोकसंख्या न वाढण्याचें कारण प्लेग व दुष्काळ होय. परंतु कारण कोणतेंही असलें तरी शेंकडा १० पेक्षां लोकसंख्येची वाढ जास्त नाहीं हें आंकड्यांवरूनच सिद्ध होतें.

अशा स्थितींत जमिनीचे सारे हळू हळू वाढवीत वाढवीत ज्या जमिनी-पासून पेशवे सरकार ८० किंवा फार झालें तर १०० लाख रुपये उत्पन्न करीत असत व ज्या जमिनीवरील सारा पहिल्या पाहणीपूर्वी १४० लाखांहून थोडासा कमीच होता, त्या जमिनीपासून २० व्या शतकाच्या आरंभीं इंग्रजसरकार ३१० लक्ष रुपये दरसाल उत्पन्न करूं लागलें आहे; म्हणजे दरसाल १५० लाख रुपये आम्हांस मिळणाऱ्या जमिनीच्या उत्पन्नांतून काढून घेत आहे, अथवा त्या मानानें देशाच्या संपत्तीचा किंवा शेतकऱ्यांच्या स्थितीचा ऱ्हास करीत आहे असें होत नाहीं काय? जमिनीच्या उत्पन्नांतून पूर्वीपेक्षां जवळ जवळ १।।। कोट रु. जास्त आज आम्हीं पेशवाईपेक्षां इंग्रजसरकारास भरीत आहों. आगगाड्या, रस्ते व शांतता यांचें भरपूर सुख आम्हांस आहे खरें, पण याच गोष्टी परदेशांतील माल इकडे येण्यास व इकडचा माल बाहेर जाण्यास कारणीभूत झाल्या असल्यामुळें आमचे इतर उद्योगधंदे सर्व बुडून गेले आहेत, आणि संसारास दरवर्षीं लागणाऱ्या खर्चाची रक्कम दरसाल वाढत चालली आहे. शेती हेंच कायतें सर्वांस उदरनिर्वाहाचें एक साधन राहिलें आहे; आणि त्याच्या उत्पन्नांतून पूर्वीपेक्षां दरसाल १।।। कोट रु. मुंबईसरकार

आतां आम्हांपासून जास्त घेऊं लागलें आहे; १।।। कोट रु. कांहीं थोडे थोडके नाहींत, आणि शेतकीच्या उत्पन्नावर एवढी रक्कम बाहेर गेल्यावर शेतकरी भिकेस लागला असल्यास व देशांत काय ती मातीच शिल्लक राहिली असल्यास कांहीं नवल नाहीं. ना० खरे यांनीं अशा रीतीनें खुलासा केल्याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहों; व आमची सरकारास अशी विनंति आहे कीं, ना. खरे यांच्या अनुमानांत कांहीं चूक असल्यास ती त्यांनीं अवश्य प्रसिद्ध करावी, आम्ही केलेला ठराव शेवटचा आहे, असें म्हणत बसूं नये. यासंबंधाचे सर्व आंकडे मिळणें कोणास शक्य असेल तर ते सरकारासच मिळतील; आणि मि. मूर मॅकेंझी यांचेप्रमाणें केवळ एकतर्फी विचार न करितां खऱ्या उद्देशानें व प्रामाणिकपणानें जर या विषयाचा सरकाराकडून विचार होईल, तर त्यांत सरकार व रयत या उभयतांचेंही कल्याण आहे. वकील या नात्यानें या प्रश्नाचा विचार करणें सरकारास योग्य नाहीं. व मि. मूर मॅकेंझी यांनीं केलेली चूक पुन्हां न होऊं देतां सरकाराकडून सर्व आंकडे प्रसिद्ध होतील अशी आम्हांस आशा आहे. लोक भिकेस लागले तरी अद्याप सरकारची वकीली संपत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय !

❁ ❁ ❁

* आशियाखंडांतील कारस्थानें

हिंदुस्थानदेश इंग्रजी अमलाखालीं गेल्यापासून देशसंरक्षणाचा सर्व मक्ता राज्यकर्त्यांनींच आपलेकडे घेतला. राणीसरकारचे राज्यांत इंग्रजी बंदुकांच्या आवाजानें जिकडे तिकडे शांतता खेळूं लागली. सरकारचा कर, सावकारांचें देणें व भुरट्या चोरांची लुटालूट यांतून जेवढें वांचेल त्याचा सुखेनैव उपभोग घेण्याला लोकांना पूर्णपणें सवड मिळाली. जें मिळेल तें खावें, संतानवृद्धि आणि संतानपोषण यांतच सर्व आयुष्य खर्चावें, व राहील तो वेळ आणि बुद्धि आपापसांत कलह माजविण्याकडे लावावी, या पलीकडे हिंदुस्थानांतील इंग्रजी शांततेनें सुखावलेल्या प्रजेस दुसरें कर्तव्यच नाहींसें झालें. शरीराला बाह्यसुख व स्वास्थ्य मिळूं लागलें कीं अंतर्गत रोग उत्पन्न होतात, असा वैद्यशास्त्राचा अनुभव आहे. त्याचप्रमाणें कोणत्याही राष्ट्राला बाह्य शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याची काळजी नाहींशी झाली म्हणजे त्यांतही अंतर्गत कलह, घरभेदेपणा आणि सार्वत्रिक शैथिल्य इत्यादि रोग उत्पन्न होऊन तें राष्ट्र उत्तरो-

---

* [केसरी ता. २६ मे १९०३]

त्तर खालावत जातें, असें इतिहासावरून आपणांस दिसून येतें. प्रत्येक देशांत धर्मभेद, ज्ञातिभेद व मतभेद कमी अधिक प्रमाणानें असतात; परंतु जोंपर्यंत एका सामान्य परकीय शत्रूशीं टक्कर देण्याचीं जरूर त्या देशांतील लोकांना भासत असते तोंपर्यंत ते आपले सर्व अंतर्गत भेद विसरून सामान्य राष्ट्रीय कार्याकरितां एकवट होऊं शकतात; व त्यामुळें एकंदर राष्ट्रांत एक प्रकारचें बंधुप्रेम व राष्ट्रीय अभिमान जागृत राहतो. इंग्लंडांत आठवे शतकांत तीन चार भिन्न जातींचे लोक असून एकमेकांशीं भांडत होते, परंतु तेच परकीय डेन्स लोकांची स्वारी झाल्याबरोबर एकवटून अँग्लो-सॅक्सन राष्ट्र बनलें. पुढें सॅक्सन व नॉर्मन लोकांचें वैमनस्य कांहीं दिवस चालून दोन्ही जाती देश-कार्याकरितां एकवट झाल्या व आजचें इंग्रजी राष्ट्र बनलें. फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे देशांतही तोच प्रकार आढळून येतो. अगदीं अलीकडे जपान देशांतही दोन प्रबळ पक्ष कित्येक शतकें एकमेकांशीं झुंजत असतां परकीय अमेरिकन व इंग्रजी लढाऊ जहाजें किनाऱ्यावर येऊन थडकतांच ते एकवटून जाऊन जपानी राष्ट्राचा उदय झाला. परंतु हिंदुस्थानासारख्या परकी अमला-खालीं गेलेल्या देशांत मात्र ही गोष्ट अशक्य होते. परचक्रापासून देशाचें रक्षण करण्याचा सर्व मक्ता जिंकणाऱ्या राष्ट्रांनीं घेतल्यामुळें लोकांना मुख्य व महत्त्वाचें असें राष्ट्रीय कर्तव्यच नाहींसें झाल्यासारखें होतें. आपसांतील क्षुद्र भेद विसरून जाण्याला मुख्य कारण जें परशत्रूची भीति त्याचा येथें अभाव असल्यामुळें ह्या अंतर्गत भेदांना फाजील महत्त्व येतें व देशांतील चांगल्या लोकांची बुद्धीही त्यांतच सुख मानूं लागते. ज्या बुद्धीचा व कर्तृत्वशक्तीचा रोंख जगांत आपल्या राष्ट्राची महती वाढविण्याकडे असावयाचा, त्यांचाच विनियोग ज्ञातिद्वेष, परस्परवैमनस्य आणि आत्ममहत्त्व वाढविण्याकडेच होऊं लागतो; आणि तेणेंकरून राष्ट्रामध्यें उत्तरोत्तर अधिक फाटाफूट व विस्खलित-पणा उत्पन्न होऊन तें राष्ट्र लवकर विलयास जातें. हिंदुस्थानचा गेल्या ४०।५० वर्षांतील इतिहास पाहिला तर या गोष्टीचें प्रत्यंतर आल्यावांचून राहणार नाहीं. शिवाजीचे वेळींही ब्राह्मण, मराठे, परभू, शेणवी इत्यादि जाती होत्या, नाहीं असें नाहीं; किंबहुना हल्लींपेक्षांही अधिक कडक जातिनिर्बंध त्या वेळीं पाळले जात होते. तथापि हल्लींच वेदोक्तासारखीं प्रकरणें माजावीं व शिवाजीचे वेळचे लोकांस त्याचा विचारही सुचूं नये यांतील बीज हेंच होय. ज्या वेळेस विधर्मी लोकांचे जुलमापासून स्वधर्माचें रक्षण करण्याची अवश्यकता प्रत्येक मराठ्याचे, ब्राह्मणाचे व शेणव्याचे अंतःकरणांत पूर्णपणें जागृत होती त्या वेळीं अमुक मनुष्य संध्या वेदोक्तानें करतो कीं पुराणोक्तानें करतो, हा विचा-रच मनांत येण्याचा संभव नाहीं. वेदही आपलेच व पुराणेंहीं आप-लींच, व दोन्ही नाहींशी होण्याची वेळ आली असतां कोणतें बरें हा वादच

लोकांचे मनांत येत नाहीं. परमेश्वर एकच आहे व कोत्याही मार्गानें त्याची उपासना केली असतां त्यांस पोंचते, ही बुद्धि जेव्हां लोकांचे मनांत दृढपणें बिंबलेली असते त्या वेळेस असले वादच उत्पन्न होत नाहींत. परंतु जेव्हां खरी धर्मवासना नसते व स्वधर्मसंरक्षण किंवा राष्ट्रसंरक्षण करण्याकरितां परस्पर-भेद विसरून एकवट होण्याची अवश्यकता उत्कटतेनें भासत नाहीं, त्यावेळीं अर्थातच असले बुद्धिभेद उत्पन्न करणारे वाद उपस्थित होऊन आपसांत दुही माजते. पेशव्यांचे कारकीर्दींत जातिभेदाचे प्रश्न अनेक वेळां उपस्थित झाले व नाना आणि महादजी यांचे मधील प्रतिस्पर्धा तर सर्वविश्रुत आहे. तथापि ज्या ज्या वेळीं परकीयांशीं तोंड देण्याचा प्रसंग आला त्यावेळीं हे सर्व भेद विसरून 'मराठा तितुका एक' हा सर्वसामान्य विचारच मराठ्यांचे सैन्यास जयश्री मिळण्यास कारण झाला हें पेशव्यांचे इतिहासांत ठिकठिकाणीं नमूद आहे. तात्पर्य ज्ञातिभेद व अंतस्थ कलह नाहींसे करण्याला साधारण संकट व तन्नि-वारणार्थ संहत प्रयत्न करण्याची अवश्यकता हाच खरा उपाय आहे. प्रीति-भोजनें, मिश्रविवाह किंवा सामाजिक परिषदें असल्या शुष्क उपायांनीं हे समा-जरोग बरे होत नाहींत. राष्ट्रीय अभिमान प्रदीप्त करण्याला एक परकी शत्रू जशी मदत करतो तशी शेंकडों व्याख्यानें व हजारों पुस्तकें यांनीं होत नाहीं. असें प्रत्येक जिवंत राष्ट्राचे इतिहासावरून आपणास आढळतें. दुर्दैवानें किंवा सुदैवानें म्हणा, आपणा हिंदुस्थानवासी लोकांस हा मार्ग आतां बहुतेक खुंटला आहे. आपलें परचक्रापासून रक्षण करण्याचा सर्व जिम्मा इंग्रज लोकांनीं घेत-ल्यामुळें आपणास आतां पाळीव जनावराप्रमाणें टाकलेली भाकरी खाऊनच पुष्ट झालें पाहिजे. तथापि हल्लींच्या स्थितींतही अगदीं निराश होण्याचें कारण नाहीं; इतकेंच नाहीं, तर एक प्रकारें थोडाबहुत फायदाही आहे. परराष्ट्रीय कारभाराचीं सर्व सूत्रें राज्यकर्त्यांच्या हातीं असल्यामुळें आपली कर्तृत्वशक्ति जरी तेवढ्या अंशानें संकुचित झाली आहे, तरी इंग्रजी अमलांत मिळालेलें पूर्ण विचारस्वातंत्र्य व इंग्रजी शिक्षणानें प्राप्त झालेली प्रगल्भ विचारशक्ति यांचा उपयोग करून हल्लीं चालू असलेल्या राष्ट्रांच्या हालचालींत आपल्या देशाचा हितसंबंध किती व कसा काय आहे, हें त्रयस्थ या नात्यानें पाहण्यास चांगली सवड आहे. त्रयस्थ म्हणण्याचें कारण या अनेकराष्ट्रीय नाटकांत हिंदुस्थानच्या लोकांस प्रत्यक्ष भूमिका मुळींच नाहीं व त्यामुळें त्यांत उत्पन्न होणाऱ्या रागद्वे-षादि मनोविकारांपासून अलिप्त राहून केवळ प्रेक्षक या नात्यानें या राष्ट्रीय घडामोडीपासून आपल्या लोकांचें कितपत नफानुकसान होणार आहे हें आपल्या राजकर्त्यांपेक्षांही कांहीं अंशानें अधिक चांगलें आपणास कळण्यासारखें आहे. शिवाय असल्या विषयांचा विचार करण्याची आपणास जों जों अधिक संवय लागेल तों तों हिंदुस्थानांतील सर्व लोक एका राष्ट्राचे घटकावयव आहोंत,

आपलें सर्वांचें कांहीं तरी एक सामान्य हित आहे, व त्या हितप्राप्तीकरता आपण सर्वांनीं अवांतर सर्व भेद विसरून जाऊन एक मनानें विचार व प्रयत्न करण्यास शिकलें पाहिजे; ही भावना हिंदुस्थानांतिल सर्व जातीचे, वर्णाचे व धर्माचे लोकांमध्यें अधिक बळावत जाईल व तेणेंकरून परस्परांतील प्रेमबंधन व एकराष्ट्रीयत्वाची कल्पना कालांतरानें दृढतर होईल यांत शंका नाहीं. व या दृष्टीनेंच आम्ही आज आशियाखंडांत हल्लीं चालू असलेल्या कित्येक घडामोडींचें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे. आशियाखंडांतील निरनिराळ्या भागांत युरोपियन राष्ट्रांच्या ज्या अनेक हालचाली सध्यां चालू आहेत त्यांचा हिंदुस्थानचे हिताशीं निकट संबंध आहे, इतकेंच नाहीं तर आमची भवितव्यता पुष्कळ अंशानें त्यांजवर अवलंबून आहे असें म्हटलें तरी चालेल. या चळवळींचा आपले इंग्रज राज्यकर्ते स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीनें विचार करीत आहेतच; व वेळोवेळीं त्या धोरणानें त्यांची क्रियाहि घडत आहे. पण राज्यकर्त्यांचें हित तेंच सर्वांशीं हिंदुस्थानवासी लोकांचेंहि हित असेंच केवळ नाहीं; व मानवी स्वभावाला अनुसरून आपल्या राज्यकर्त्यांची दृष्टि अर्थातच स्वहिताकडे विशेष असावयाची; व त्यामुळें क्वचित् हिंदुस्थानांतील लोकांचे हिताकडे त्यांचें दुर्लक्ष होण्याचा पुष्कळ संभव आहे. सबब आपण स्वतंत्रपणें या राष्ट्रीय घडामोडींचा आपल्या दृष्टीनें विचार करून आपले विचार वेळोवेळीं राज्यकर्त्यांस कळविणें अत्यंत आवश्यक आहे.

हल्लींचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन प्रथम हिंदुस्थानांत आले त्यावेळीं यांनीं आपले एका भाषणांत, सर्व इंग्रजी साम्राज्याचा मध्याबिंदु कलकत्ता येथें आहे, असें म्हटलें होतें. त्याचें आज चार वर्षांनीं बरेंच प्रत्यंतर येऊं लागलें आहे. गेल्या बजेटचे वेळचे भाषणांतहि कर्झनसाहेबांनीं तोच मुद्दा पुनः निराळ्या शब्दांनीं सांगितला आहे. " हा देश पूर्वीं अगदीं एकलकोंडा व दूर असा होता तो आतां जगांतील राष्ट्रांच्या कारस्थानांचे भोंवऱ्यांत येऊं पहात आहे व त्यामुळें त्याचे भावी स्थितीवर पुष्कळ परिणाम होईल " हें व्हाइसरॉयसाहेबांचें वाक्य हिंदुस्थानांतील प्रत्येक सुशिक्षित माणसानें विचार करण्यासारखें आहे. जगांतील सर्व सुधारलेल्या व प्रधानभूत मानलेल्या राष्ट्रांचें लक्ष आजमित्तीस आशिया खंडांत वेधलेलें दिसतें; व या खंडांत भिन्न भिन्न स्थळीं ज्या हालचाली चालू आहेत त्या सर्वांचा रोंख कामजास्त मानानें हिंदुस्थानावर आहे हें थोड्या विचारानें समजण्यासारखें आहे. इंग्लंड, रशिया, फ्रान्स, जर्मनी, स्पेन इटली, अमेरिका, तुर्कस्थान, जपान, चीन, इराण या अनेक राष्ट्रांचे आज परस्परांत जे डाव चालले आहेत त्या सर्वांची किल्ली या आशिया खंडाचे मध्यभागीं असलेल्या त्रिकोणाकृति प्रदेशांत आहे म्हटलें तरी चालेल. एकीकडे हा त्रिकोण आपल्या दाढेंत गच्च धरून बसण्याचा इंग्रज सिंहाचा निश्चय व त्याचे

विरुद्ध राशियन आस्वलाच्या हुलकावण्या, हें नाटक आज कमींत कमी ७०।८० वर्षें चालू आहे. इतके दिवस सिंह व आस्वल हीं बरींच दूर अंतरावर होतीं; पण आतां तीं अगदीं जवळ जवळ येऊन भिडलीं आहेत व एकमेकांच्या डुरकावण्या आतां एकमेकांस स्पष्टपणें ऐकूं येऊं लागल्या आहेत. त्यांतच इतर कोल्हे, लांडगे वगैरे श्वापदें आजपर्यंत दुरून टपत राहून मजा पाहत होतीं तींही हातघाईची वेळ आलेली पाहून एकेक पाऊल जवळ येऊं लागलीं आहेत व शेवटीं या हालचालींचें पर्यवसान श्वापदांचें तुंबळ युद्धांत होईल असा पुष्कळ संभव दिसत आहे. हा आपलेकरितां होणारा रणसंग्राम जवळ येत आहेसें पाहून सिंहाचे तोंडांत असलेल्या सावजास काय वाटत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. रणसंग्राम टाळणें सावजाचे हातीं मुळींच नाहीं; तथापि त्यांत आपली ओढाताण होऊन प्राणहानि न होवो एवढ्याबद्दल ईश्वराचा धांवा करण्यास तरी तें चुकणार नाहीं. आशिया खंडांत युरोपियन राष्ट्रांच्या ज्या अनेक हालचाली चालू आहेत त्यांचें बाह्यस्वरूप वेळोवेळीं बदलतें व त्यामुळें वरचेवर कांहीं तरी नवीन प्रश्न उपस्थित झाल्याचा प्रथमदर्शनीं भास होतो. परंतु वस्तुतः या सर्व हालचालींचें मूळ हिंदुस्थानांत आहे ही एक गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे कांहींच गूढ राहणार नाहीं.

आशियाखंडामध्यें आज ज्या अनेक ठिकाणीं हालचाली चालू आहेत त्या सर्वांचे मुळाशीं मुख्य प्रश्न एक आहे. आशियाखंडाचें स्वामित्व आशियांतील प्राचीन लोकांचे हातीं रहावयाचें कीं, अमेरिका व आफ्रिका खंडांप्रमाणें युरोपांतील खिस्ती राष्ट्रांचे हातीं जावयाचें, हा तो प्रश्न होय. हिंदुस्थानांतील प्रजेप्रमाणें आशियाखंडांतील सर्व लोकांची स्थिति होणार कीं काय, हा मोठा प्रश्न जगाचे इतिहासांत पहिल्या प्रथम अगदीं ठळकपणें उपस्थित झाला आहे व त्याचा हिंदुस्थानांतच काय, पण आशियाखंडांतील प्रत्येक देशांत विचारी लोक निदिध्यास करूं लागले आहेत. उत्तर अमेरिकेंतील तांबडे इंडियन लोक आज बहुतेक निःशेष झाले आहेत व दक्षिण अमेरिकेंतील प्राचीन रानटी लोकांचीही तीच दशा आहे. दक्षिण आफ्रिकेंतील नीग्रो, काफीर, झुलू वगैरे लोकही त्याच पंथाला हळू हळू लागले आहेत; आणि उत्तर आफ्रिकेंत सौदनी, मूर, हबशी वगैरे प्राचीन रहिवासी स्वजीवितरक्षणासाठीं बलाढ्य खिस्ती शत्रूंशीं मोठ्या निकारानें लढत आहेत. अशा वेळीं आपणही त्याच गतीस जाणार कीं काय, असा प्रश्न आशियाखंडांतील लोकांचे मनांत उद्भवणें अगदीं सहाजिक आहे. हिंदुस्थान, इराण, चीन, सयाम, जपान, तिबेट, आरबस्थान वगैरे देशांतील लोकांमध्यें कितीही परस्पर वैधर्म्य व विरोध असला, तरी हा वरील प्रश्न सर्वांपुढें सारखाच दत्त म्हणून उभा असल्यामुळें ते कांहीं अंशीं एकाच पारड्यांत आहेत असें म्हटलें पाहिजे. हिंदुस्थान आज परतंत्र झालें असलें, तरी चीन

किंवा जपान यांचीही तशीच स्थिति व्हावी अशी येथें कोणासही इच्छा होणार नाहीं. इराण देश रशियानें गिळला किंवा समयाला फ्रान्सानें गडप केलें अथवा आशियामायनर प्रांत जर्मन लोकांनीं बळकाविला तर आमचे इंग्रज राज्यकर्त्यांस जितकें वाईट वाटेल तितकेंच, किंबहुना त्याहीपेक्षां अधिक हिंदुस्थानांतील लोकांसही वाईट वाटेल, यांत शंका नाहीं. चीन देशाची चीरफाड चालली असतां हिंदुस्थानांतील लोकांस आपल्या पूर्वेतिहासाची आठवण होऊन थोडा तरी दुःखाचा उमाळा येईल; व जपानसारख्या चिमुकल्या पण शूर राष्ट्राचा रशियन आस्वलाशीं झटापटींत पाडाव होऊन प्रतापसूर्य मावळला, तर हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्य थोडाबहुत तरी हळहळेल. तेव्हां या प्रत्येक देशाशीं चाललेल्या युरोपियन राष्ट्रांच्या डावपेंचांचें आपण वरचेवर सूक्ष्मरीतीनें अवलोकन करणें आपलें कर्तव्य आहे.

सध्यां युरोपियन राष्ट्रांच्या या खंडांत ज्या चळवळी चालू आहेत त्या मुख्यत्वेंकरून पांच ठिकाणीं आहेत. आशियामायनरमध्यें जर्मनी, फ्रान्स, रशिया, इंग्लंड, इराण व टर्की या सहा राष्ट्रांमध्यें भानगड आहे; व त्याचें अगदीं ताजें स्वरूप बगदाद रेल्वेसंबंधाचा वाद होय. दुसरें स्थळ आफगाणिस्थान. तेथें मुख्यत्वेंकरून इंग्लंड व रशिया आणि त्यांचें कचाट्यांत सांपडलेले अफगाणलोक यांची झटापट आहे. तिसरें ठिकाण सयाम. येथें इंग्लंड, फ्रान्स व जपान यांचा मुख्यत्वेंकरून सामना आहे. चवथें ठिकाण चीन देश. तेथें रशिया, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, जपान व इटली इतक्या राष्ट्रांची लुडबुड चाललेली आहे व पांचवें आणि अतिशय हातघाईचें ठिकाण मांचुरिया प्रांत. तेथें रशिया, चीन व जपान यांचा मुख्य सामना असून इंग्लंड आणि अमेरिका यांचाही अंशतः हात आहे. आशिया खंडाचे नकाशाकडे पाहिलें असतां हीं सर्व ठिकाणें हिंदुस्थानचे सभोंवतीं आहेत हें सहज लक्षांत येईल; व त्यामुळेंच इंग्लंडलाहि प्रत्येक ठिकाणीं तोंड खुपसणें जरूर झालें आहे. याशिवाय तिबेट, अरबस्थान व इराण येथें बारिकसारिक कारस्थानें क्वचित् उपस्थित होतात, परंतु अजून त्यांस फारसें महत्त्व आलेलें नाहीं. तसेंच सयाम येथील कारस्थानहि अजून आंतलेंआंत धुमसत आहे. सयामचे राजास इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांनीं आजपर्यंत अंकित करून टाकलें होतें. इतके दिवस इंग्रजी कामदार लोकांचें सयामचे दरबारांत प्राबल्य होतें. पण फ्रेंच लोकांचे ताब्यांत शेजारचा आनाम ऊर्फ इंडो-चायना प्रांत असल्यामुळें त्यांचा सयामांतही शिरकाव सहज झाला. अलीकडे जपानी लोकांनीं आपलें बोट सयामचे राज्यकारभारांत हळूच शिरकविलें आहे; व सयामी आणि जपानी लोक एका म्हणजे बौद्ध धर्माचे असल्यामुळें सयामचे दरबारांत जपानचें वर्चस्व लवकरच होऊन आपणा दोघांसाहि गवाळें आटपावें लागेल अशी फ्रान्स व

इंग्लंड या दोन्हीं युरोपियन राष्ट्रांस अलीकडे भीति उत्पन्न झालीं आहे. तसेंच चीन देशाचे अंतरभागांतील खटपटहि आज स्थिरावल्यासारखी झाली आहे. १९०१ सालीं चीनचे उत्तर भागांतील बाक्सर लोकांच्या बंडाळीमुळें युरोपियन राष्ट्रांस जो एक प्रकारचा वचक बसला त्यामुळें म्हणा, किंवा परस्परांच्या मत्सरामुळें म्हणा, युरोपियन राष्ट्रें चीनचे अंतर्भागांत अलीकडे गडबड करीत नाहींशीं झालीं आहेत. कांहीं दिवसांपूर्वी होनान प्रांतांत व कँटनचे आसपास बंडें उद्भवलीं होतीं. तीं मोडण्यास आपण सैन्याची कुमक देतों, असें फ्रान्सानें हळूच घोडें ढकललें होतें. परंतु चिनी लोकांचे आतां हळूहळू डोळे उघडत आहेत व त्यांनीं आमची बंडें आम्ही मोडूं, परकीयांची आम्हांस जरूर नाहीं, असा खडखडीत जबाब दिला असें म्हणतात. खरें असलें तर चिनी लोकांनीं हिंदुस्थानचे इतिहासाचा चांगलाच अभ्यास चालविला आहे, असें म्हटलें पाहिजे.

हल्लीं अतिशय निकाराचा वाद म्हणजे आशियामायनर व मांचुरिया येथें चालू आहे. अफगाणिस्थानांतहि कर्नल येटला पकडल्यामुळें हातघाई होते कीं काय अशी भीति पडली होती. परंतु अमीराच्या सौजन्यानें व कर्झनसाहेबांच्या दूरदृष्टीनें तो प्रसंग टळला ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. कर्नल येट आफगणच्या हद्दींत कां गेले होते हें अजून गूढच आहे. कोणी म्हणतात ते शिकारीस गेले होते; ते कांहीं कारस्थानांत गुंतले होते अशीहि अफवा आहे. ओघानें सत्य बाहेर येईलच. सध्यां हिंदुस्थानसरकारानें अमीराची खंडणी व तोफा अडकविल्या होत्या त्या सोडून दिल्यामुळें हें प्रकरण विझलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आशियामायनरमधील बगदाद रेल्वे व मांचुरिया प्रांतांतील रशियाची कारवाई यांसंबंधाचा वाद मात्र लौकर मिटेलसें वाटत नाहीं. व हे दोन्ही प्रश्न हिंदुस्थानांतील लोकांस अत्यंत महत्त्वाचे आहेत. बगदाद रेल्वे कान्स्टान्टिनोपलपासून सुरू होऊन इराणचें आखाताचे शिरोभागीं कोणते तरी एका बंदरापर्यंत बांधण्याचा विचार ठरला आहे. या रेल्वेला लागणारें सर्व भांडवल फ्रान्स व जर्मनी या देशांत गोळा झालें आहे; व बांधण्याचें काम एका जर्मन कंपनीनें पतकरिलें आहे. मात्र त्या कंपनीला रेल्वेपासून नक्की फायदा होईपर्यंत टर्कीचे जकातीचे उत्पन्नाची कांहीं नियामित हमी पाहिजे आहे. या रेल्वेमुळें टर्कीचे ताब्यांतील आशियामायनर प्रांत भरभराटीस येईल व त्यामुळें टर्कीचा फार फायदा होईल म्हणून ही हमी द्यावी, असें सदरहू कंपनीचें म्हणणें आहे. जर्मन लोक व बादशहा यांचे मनांत ही रेल्वे फार भरली आहे. व कसेंही करून ती सिद्धीस नेण्याचा त्यांचा संकल्प दिसतो. फ्रेंच आणि रशियन लोकांचीही या कामीं अनुकूलता आहे. फक्त या रेल्वेच्या योगानें इराणचें आखातांतील आपलें वर्चस्व नाहींसें होईल व

जर्मनी आणि रशिया हीं दोन्ही प्रतिस्पर्धी राष्ट्रें हिंदुस्थानचे जवळ येऊन भिडतील या भीतीनें इंग्रज लोक मात्र या रेल्वेच्या अगदीं विरुद्ध आहेत. शिवाय ही रेल्वे झाली असतां युरोपांत जाण्याचा जवळचा खुष्कीचा मार्ग होऊन आपली गिऱ्हाइकी बुडेल अशी पी. ओ. कंपनी वगैरे इंग्रजी आगबोट-वाल्यांसाहि भीति पडली आहे. या रेल्वेचें दक्षिण टोंक इराणच्या आखाताचे शिरोभागीं असलेल्या कोविट, खोर अबदला आणि खोर मुसा या तिहींपैकीं एका बंदरांत आणून भिडविलें पाहिजे. परंतु हीं ठाणीं इंग्रज लोकांचे हातीं असल्यामुळें त्यांचे सहानुभूतीशिवाय रेल्वे पुरी होणें दुरापास्त आहे; व म्हणूनच इंग्रज लोक अनुकूल होईपर्यंत हा रेल्वेचा प्रश्न भिजत पडेल असें वाटतें. सदर्हु बगदाद रेल्वे पुरी झाल्यास अकरा बारा दिवसांत हिंदुस्थानांतून विलायतेस जावयास सांपडेल व तेंही बोटीचा फारसा प्रवास न करितां बहुतेक खुष्कीचे मार्गानें जातां येईल, हा हिंदुस्थानांतील लोकांस मुख्य फायदा आहे. हिंदुस्थानांतील पुष्कळ लोक जातीचे व धर्माचे प्रतिबंधामुळें अनेक दिवसांचा जलप्रवास करण्यास कचरतात. त्यांना ही रेल्वे झाली तर विलायतेस जाणें सहज होईल. मुंबई किंवा कराची येथून बुशायरपर्यंत चार दिवस लागतात. तेवढा जलप्रवास कसा तरी रेटला म्हणजे तेथून थेट लंडनपर्यंत बहुतेक रेल्वे मार्गानेंच जातां येईल; व तेणेंकरून आज हिंदुस्थानांतील लोकांस युरोपियन देश व युरोपियन राष्ट्रें जीं अगदीं परक्यासारखीं व केवळ ऐकीव वाटतात तीं प्रत्यक्ष व निकट ओळखीचीं होतील, अधिक दळणवळण वाढेल व युरोपियन राष्ट्रांतील विद्याकलादिकांचें हिंदुस्थानांतील लोक फार लौकर ग्रहण करतील. व तेणेंकरून आज सर्व देशभर एकंदर जगाविषयीं जें निबिड अज्ञान भरलें आहे तें नाहींसें होऊन येथील लोकांस आपली स्थिति सुधारण्यास पुष्कळ उमेद येईल यांत शंका नाहीं. नुकतेंच या रेल्वेसंबंधानें विलायतेंत मि. जिप्सन बाउल्स व इतर कांहीं गृहस्थांनीं फार विरुद्ध व कडक भाषणें केलीं. तथापि कितीही अडथळा केला, तरी ही रेल्वे होणारच; व गंजीवरील कुऱ्याप्रमाणें अडथळा करून इंग्लंडनें विनाकारण आपलें हांसें करून घेऊं नये, असें म्हणणारे सर चार्लस डिल्कसारखे मुत्सद्दीही आज इंग्लंडांत आहेत. एकंदरींत कांहीं तरी तडजोड निघून या रेल्वेचें काम लवकरच सुरू होईल अशी अशा आहे; व ती रेल्वे पुरी झाल्यावर युरोपियन राष्ट्रें हिंदुस्थानचे पश्चिम भागावर अगदीं जवळ येऊन भिडलीच असें समजावें. रशियानें आपली एक रेल्वे मध्यएशियांतून थेट पूर्वसमुद्रापर्यंत नेऊन भिडविली आहे व दुसरी शाखा हिरातजवळ आणून सोडली आहे. तीच पुढें थोडीशी वाढवून पर्शियाचे किंवा बलुचिस्थानचे दक्षिण किनाऱ्यापर्यंत आणण्यास मुळींच अडचण पडणार

नाहीं; व हे दोन शह हिंदुस्थानाला पश्चिमेकडून लागले तर आपलें कसें होईल याची आजच इंग्रज लोकांस काळजी पडली आहे.

मांचुरिया येथील झटापटींताहि हिंदुस्थानचा परंपरेचा पण फार महत्त्वाचा संबंध आहे. मांचुरिया प्रांत बहुतेक रशियानें गिळल्यासारखाच आहे, व हळूहळू त्याचे शेजारील मंगोलिया आणि तार्तरी इकडेही रशियाचे डोळे आहेत. तेथून तिबेट आणि काश्मीर फार लांब राहत नाहींत. रशियाचे रेल्वेचा एक फांटा काशगारपर्यंत आला आहे व तोच घुढें तिबेटच्या उत्तर बाजूनें थेट पेकिनपर्यंत नेऊन भिडविण्याचा रशियाचा संकल्प आहे. पलीकडे मांचुरियाचें दक्षिण बाजूस कोरिया प्रांत फार सुपीक, मोठा व पूर्वीपासून चिनी व जपानी लोकांचे ताब्यांत आहे. रशियाची रेल्वे पोर्ट आर्थरपर्यंत गेल्यामुळें हा कोरिया प्रांतही आस्वलाचे मगरमिठींत जातो कीं काय अशी जपानला साहजिक भीति फार दिवसांपासून आहे व तसें झालें असतां रशिया खुद्द जपानचे किनाऱ्याजवळ येऊन भिडेल व जपानचे स्वातंत्र्यास ही कायमची दहशत उत्पन्न होईल. यामुळें कोरिया प्रांताकरितां रशिया व जपान यांचे दरम्यान निकराचें युद्ध कधीं तरी होईल असें वाटतें; आणि इंग्लंड व जपान यांचा तहनामा झाल्यामुळें इंग्लंडालाहि त्यांत सामील व्हावें लागेल. आशिया खंडांत कोठें घोर रणसंग्राम होणार असल्यास तो बहुधा येथेंच होईल असा आज मित्तीस संभव दिसतो व त्यांत अमुकच पक्षाचा विजय होईल असें निश्चयानें सांगवत नाहीं. या संग्रामावर बहुतेक अंशीं चीन देशाची भावी स्थिति अवलंबून आहे म्हटलें तरी चालेल. कारण ज्याचा विजय होईल त्याचेंच बहुधा चीन देशांत प्राबल्य होईल. आशिया खंडांतील लोक व इंग्लंडची प्रजा या दोन्ही नात्यानें आमची जपानी लोकांची सरशी व्हावी अशी उत्कट इच्छा असावी हें स्वाभाविक आहे; व तसें झालें असतां जपान, चीन व सयाम या तिन्ही बौद्ध राष्ट्रांचें ऐक्य होणें फार सुलभ होईल; व तेणेंकरून आशिया खंडाचे पूर्व भागांत तरी निदान स्वतंत्रता देवीचें वास्तव्य कायमचें होईल.

असो; हे विचारतरंग भविष्यत् कालाचे आहेत. आशिया खंडांतील निरनिराळ्या भागांत चाललेल्या धामधुमींचें यथादर्शनचित्र काढावें हा या लेखाचा मुख्य हेतु आहे. या सर्व हालचालींत आपला किती निकट हितसंबंध आहे हें चाणाक्ष वाचकांचे लक्षांत तेव्हांच येईल. पूर्वेकडे तीन बौद्ध राष्ट्रांचें ऐक्य होण्याचा संभव जसा आज दिसूं लागला आहे, तसेंच पश्चिमेकडील आफगाणिस्थान, इराण, अरबस्थान, इजिप्त व टर्की या महंमदानुयायी राष्ट्रांचें ऐक्य कधीं काळीं होणें असंभवनीय नाहीं. येणेंप्रमाणें एकीकडे बौद्ध व एकीकडे महंमद अशीं दोन बाजूस दोन समसमान पारडीं तयार झाल्यावर मध्यें तराजूच्या काट्याप्रमाणें निश्चल व निर्भय राहण्यास हिंदुस्थान देशास

मुळींच अडचण पडणार नाहीं. सर्व इंग्रजी साम्राज्याचा मध्यबिंदु कलकत्त्यास आहे असें जें लॉर्ड कर्झनसाहेब म्हणतात त्यांतील बीज हेंच होय. हल्लींचे व्हाइसराय यांचे भाषणांत किती गर्भितार्थ असतो हें वरील लेखावरून सूज्ञ वाचकांचे लक्षांत येईल.

❋ ❋ ❋

* साम्राज्याचीं बंधनें

इंग्लंडच्या हल्लींच्या प्रधानमंडळाचे मुख्य चालक मि. चेंबर्लेन यांचें डोकें इंग्रजी साम्राज्याच्या कल्पनेनें व विचारानें नेहमींच भणभणून गेलेलें असतें, ही गोष्ट सर्वांस माहीत आहेच. इंग्रजी साम्राज्यास हल्लीं अशा प्रकारची अवस्था प्राप्त झाली आहे कीं, साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्यास, निदान करण्याच्या हेतूनें तरी जो कोणी मनुष्य एखादी कल्पना सुचवील तो पुरुष इंग्रज लोकांस धन्य व प्रिय वाटेसा झाला आहे. इतिहासांत प्राचीन काळीं झालेल्या साम्राज्याची जी हकीकत आहे त्यावरून साम्राज्य कशाही प्रकारचें झालें तरी त्यास केव्हांना केव्हां अशा प्रकारची स्थिति प्राप्त होतेच असें आढळून येतें. प्राचीन काळचें मोठें साम्राज्य म्हटलें म्हणजे रोमचें होय. रोमची राज्यव्यवस्था प्रथम प्रजासत्ताकच होती; पण पुढें अशी स्थिति आली कीं, या अवाढव्य राज्याचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य ज्याचे अंगांत होतें त्याच्याच हातांत सेनेटनें आपल्या खुषीनें सर्व राज्यकारभार दिला. इंग्रजी साम्राज्याच्या इतिहासांत अशाच प्रकारची कांहीं घडामोड होण्याचीं वेळ आलेली आहे. युरोपांत फ्रान्स, जर्मनी आणि विशेषेंकरून रशिया हीं राष्ट्रें आशिया व आफ्रिकाखंडांतील व पासिफिक महासागरांतील प्रदेश किंवा बेटें आपल्या ताब्यांत यावीं म्हणून जी खटपट करीत आहेत त्यांमुळें, आणि अमेरिकन लोकांचे जे प्रयत्न चालू आहेत त्यांमुळें, इंग्रजी साम्राज्याचीं बंधनें हल्लीं आहेत त्याहून अधिक दृढ असावीं असें कांहीं इंग्रज लोकांस वाटूं लागलें आहे. इंग्रजी साम्राज्य मोठें खरें, पण तें जगभर पसरलें असल्यामुळें कांहींसें विस्खलित आहे; आणि सगळें साम्राज्य सुयंत्रित चालण्यास हल्लीं जगांतील महासागरावर आपली सत्ता इंग्लंड देशास हल्लींप्रमाणेंच अबाधित चालू ठेवली पाहिजे. इंग्रज लोकांचें राज्य आसेतुहिमाचलापर्यंतच आहे असें नाहीं, तर त्याचा विस्तार आटलांटिक व पासिफिक या दोन्ही महासागरांत असून शिवाय आशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडांतहि

---

* [केसरी ता. ९ जून १९०३]

जमिनीचा पुष्कळ भाग त्यांत समाविष्ट झालेला आहे. तेव्हां भूगोलदृष्ट्या विचार केला असतां इंग्रजी साम्राज्याचे भाग परस्परविलग्न आहेत एवढें म्हणणें भाग येतें. पण वरुणाच्या राज्यावर इंग्रजसरकारचें अबाधित स्वामित्व असल्यामुळें ही विलग्नता सध्यां तरी साम्राज्यास अहितकारक होण्याचा संभव नाहीं. परंतु याखेरीज दुसऱ्या एका प्रकारची विलग्नता या साम्राज्यांत अलीकडे उत्पन्न होऊं लागली आहे, आणि ती दूर करण्यास जे उपाय सुचविण्यांत येतात त्यांपैकींच मि. चेंबर्लेन यांची कल्पना हा एक होय. इंग्रजी साम्राज्याचे घटकावयव पाहूं गेलें तर असें आढळून येईल कीं, इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि आयर्लंड या चार देशांखेरीज बाकी सर्व साम्राज्य इंग्रजी वसाहतींनें आणि इंग्रजांनीं काबीज केलेल्या हिंदुस्थानासारख्या परदेशांनीं झालेलें आहे. इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्स या तीन राष्ट्रांचें संमेलन इंग्लंड आणि आयर्लंड यांपेक्षां अधिक परिपूर्ण झालेलें आहे; व मि. चेंबर्लेन यांच्या दृष्टीनें पाहिलें तर आयर्लंड आणि इंग्लंड यांचा जो हल्लींचा संबंध आहे तो मनगटाच्या जोरावर कायम ठेवणें त्यांस अधिक श्रेयस्कर वाटत आहे. ही समजूत बरोबर आहे किंवा चुकीची आहे याचा आज विचार करण्याचें कारण नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे बस्स आहे कीं, ग्लॅडस्टनसाहेबांनीं कांहीं हक्क आयर्लंडास देण्याचें योजिलें होतें म्हणून त्यांच्या पक्षांतून फुटून निघालेल्या मंडळींपैकीं मि. चेंबर्लेन हे असल्यामुळें निदान स्वमुखानें तरी आयर्लंडास अधिक हक्क देणें वाजवी आहे, असें त्यांस प्रतिपादन करतां येत नाहीं, अर्थात् साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्याची त्यांनीं हल्लीं जी कल्पना काढली आहे त्यांत आयर्लंडाचा समावेश नाहीं, आणि बिचाऱ्या हिंदुस्थानाचा तर नाहींच नाहीं ! हे दोन्ही देश मनगटांच्या जोरावर आपल्या ताब्यांत ठेवण्याचा चेंबर्लेनसाहेबांचा विचार आहे. बाकी शिल्लक राहिल्या वसाहती; आणि त्या मात्र इंग्लंड देशानें पोटच्या पोराप्रमाणें वाढवाव्या असें मि. चेंबर्लेन हे प्रतिपादन करीत आहेत. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, इंग्लंड हा वसाहतींचा माय देश आहे; आणि ज्याप्रमाणें वसाहती व इंग्लंड यांचा हा शरीरसंबंध जडलेला आहे, तसाच वसाहती व इंग्लंड यांचा व्यापारासंबंधीं हिताहितसंबंधहि कायमचा जडवून ठेवावा, म्हणजे इंग्लंड हें केवळ बेटच न रहातां सर्व जगभर पसरलेल्या वसाहतींचें त्यास साहाय्य मिळून त्याचा दरारा व वर्चस्व इतर राष्ट्रांपेक्षां अधिक स्थिर व प्रबल होईल. वसाहतींचा व मायदेशाचा अशा प्रकारचा हिताहितसंबंध जोडण्याचा प्रयत्न करणें हें काम खुद्द इंग्लंड देशांतील सुधारणेचीं कामें करण्यापेक्षां अधिक महत्त्वाचें, आवश्यक व राज्यास हितकारक आहे असें मि. चेंबर्लेन यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें असून केवळ इंग्लंड देशासंबंधीं सुधारणेचीं कामें हातीं घेणारांस कूपमंडूकन्यायानें ' लिटल इंग्लंडर्स ' म्हणजे दृष्टि दूर न पोंचवितां इंग्लं-

डांतल्या इंग्लंडांत ढवळाढवळ करणारे अशी त्यांनीं संज्ञा दिली आहे. हा उपहास नवीन इलेक्शन होईल तेव्हां आपल्या पक्षास अधिक मतें मिळविण्याकरितां केलेला आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे; व मि. चेंबर्लेन यांची आजपर्यंतची कारकीर्द पाहतां तो तसा असण्याचाहि संभव आहे. परंतु त्या गोष्टीचा आज आपणास विचार कर्तव्य नाहीं. वसाहती आणि मायदेश यांच्यामध्यें व्यापारी ऐक्य करून साम्राज्याची घडी किंवा बंधनें दृढ करण्याची जी मि. चेंबर्लेन यांची कल्पना आहे ती किती सयुक्तिक, विचारार्ह व साम्राज्यास हितकारक आहे एवढेंच आपणास पाहणें आहे; व तशा दृष्टीनें विचार केला असतां मि. चेंबर्लेन यांचें अंगांत विचारापेक्षां जात्याभिमानाचेंच वारें अधिक भरलेलें आहे असें आढळून येईल. हिंदुस्थान देश हा इंग्रजी साम्राज्याचा अद्याप घटकावयव झाला नसला तरी एक मोठा पोषक भाग आहे असें कोणीही कबूल करील; आणि हा जर भाग दैववशात् साम्राज्यांतून तुटून निघाला अथवा दारिद्र्यानें किंवा आपत्तीनें ग्रस्त होऊन इंग्लंडास त्यापासून हल्लीं जें पोषण मिळत आहे तें मिळेनासें झालें, तर इंग्रजी साम्राज्याची स्थिति काय होईल याचा मि. चेंबर्लेन यांनीं कधीं विचार केलेला दिसत नाहीं. त्यांची सर्व भिस्त काय ती इंग्लंड आणि वसाहतींवर आहे, आणि या मायलेंकरांची गट्टी ते म्हणतात त्याप्रमाणें दृढ झाली म्हणजे जर्मनी,फ्रान्स, अमेरिका किंवा रशिया या राष्ट्रांस न जुमानतां सर्व जगभर या मायलेंकरास धिंगाणा घालतां येईल असें त्यांस वाटत आहे. गेल्या पांचपन्नास वर्षांत ग्लॅडस्टनसारखे इंग्लंडांत जे मुत्सद्दी झाले त्यांच्या धोरणापेक्षां हें धोरण निराळें आहे हें वरवर विचार करणारास देखील सहज कळून येणार आहे. तथापि लिबरल पक्षांत फाटाफूट होऊन त्यास हल्लीं इतकी दुर्बलता आलेली आहे कीं, मि. चेंबर्लेन यांनीं धृष्टतेनें पुढें आणलेलें हें तत्व प्रथमतः मनोरम दिसलें तरी अखेरीस इंग्रजी साम्राज्यास अहितकारक आहे असें वक्तृत्वाच्या जोरावर नेटानें आणि युक्तीनें इंग्रज लोकांपुढें मांडणारा लिबरल पक्षांत एकही पुढारी राहिला नाहीं. अशा स्थितींत रोमच्या साम्राज्यांत सीझरनें ज्याप्रमाणें अनियंत्रित सत्ता आपल्या हातांत घेतली तसाच प्रकार मि. चेंबर्लेन यांचा झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. सत्ता, वैभव आणि सामर्थ्य यांचा अखेर परिणाम अशाच प्रकारचा व्हावयाचा याची इतिहास साक्ष देत आहे. मायदेश आणि वसाहती या जरी आज मायलेंकराप्रमाणें एकत्र करून त्यांचें एक कुटुंब बनविलें तरी त्यांचे हिताहितसंबंध पुढें केव्हां तरी भिन्न भिन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत हें अमेरिकेच्या उदाहरणावरून सहज कळून येण्यासारखें आहे. अथवा इतक्या लांब तरी कशाला ? मुलें लहान असतां कुटुंबांत जी एकी व सौमनस्य असतें तेंच मुलें मोठीं झाल्यावरही राहील असें जर कोणी प्रतिपादन करूं लागला तर

हल्लींच्या कालांत त्याच्या बोलण्यास कितपत मान मिळेल हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं;आणि तोच न्याय वहासतींसही लागू आहे.वसाहतींची स्थिति बहुतेक कुटुंबांतील लहान मुलांप्रमाणेंच आहे. देशांतील सर्व जमीन वसाहतवाल्यांनीं अद्याप लागवड केलेली नाहीं; आणि शेतकीखेरीज इतर धंद्याकडे अद्याप त्यांचें लक्षाहि गेलेलें नाहीं. या स्थितींत मायदेशाच्या साहाय्याची त्यांस अपेक्षा आहे खरी,पण तें साहाय्य मिळण्याकरितां ज्या शर्ती आज कबूल करतील त्या शर्ती त्यांच्या पुढच्या पिढीस कबूल होतील कीं नाहीं याबद्दल वानवाच आहे; आणि त्याचमुळें मि. चेंबर्लेन यांची कल्पना इंग्रजी साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्याच्या ऐवजीं समूळ नाहींशी करील असें इंग्लंडांतील कित्येक विचारी पुरुषांस वाटत असून त्याबद्दल तिकडे बरीच चळवळ होऊन राहिली आहे. साम्राज्य कोणास नको असें नाहीं; पण मि. चेंबर्लेन याचें म्हणणें पसंत झाल्यास साम्राज्य बुडून जाईल असें सर कॅंबेल बॅनरमन यांचें म्हणणें आहे. हें म्हणणें खरें कीं मि. चेंबर्लेन यांची कल्पना खरी याचा आम्ही आज विचार करणार होतों, पण स्थलसंकोचास्तव त्याबद्दलचे विचार पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

❁ ❁ ❁

*साम्राज्याचीं बंधनें

नंबर २

मागील अंकीं मि. चेंबर्लेन यांनीं इंग्रजी साम्राज्याचीं बंधनें दृढ होण्याकरितां जीं अजब युक्ती काढली आहे तिचें थोडक्यांत निदर्शन केलें; परंतु स्थलसंकोचास्तव तेव्हां जास्त लिहितां आलें नाहीं. करितां आज तोच विषय पुनः हातीं घेऊन त्याजबद्दल अधिक तपशिलवार माहिती देण्याचा आमचा विचार आहे.

आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं, इंग्रजी साम्राज्य म्हणजे इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड आणि आयर्लंड या चार संयुक्त देशांखेरीज इंग्रज लोकांच्या जगभर झालेल्या वसाहती आणि इंग्रजांनीं काबीज केलेले हिंदुस्थानसारखे देश, ज्यांस 'डिपेन्डन्सीज' असें म्हणतात, हीं होत; व हीं सर्व एके ठिकाणीं केलीं असतां इंग्रजी साम्राज्याचा विस्तार अतिशय मोठा व सर्व जगभर पसरलेला आहे असें आढळून येईल. साम्राज्याच्या या सर्व भागांचा हिताहितसंबंध पाहिला तर तो भिन्न आहे, इतकेंच नव्हे, तर कित्येक वेळां परस्परविरोधीहि आहे असें नजरेस येतें. अशा स्थितींत साम्राज्याचे हे सर्व भाग एकत्र राहण्यास जर कांहीं युक्ती असेल तर त्यांच्यामधील हिताहिताचा विरोध काढून

---

* [केसरी ता. १६ जून १९०३]

टाकणें हीच होय; व कोणत्याही खऱ्या व दूरदर्शी मुत्सद्यास हीच युक्ति ग्राह्य वाटली असती. परंतु मि. चेंबर्लेन हे ज्या वातावरणांत वाढलेले आहेत तें वातावरणच अशा प्रकारचें दूषित झालेलें आहे कीं, स्वजातीपलीकडे त्यांस दुसरें कांहीं दिसतच नाहीं. युरोपांत इंग्लंडदेश समुद्रानें वेष्टित असल्यामुळें त्या खंडांतील इतर देशांपेक्षां व्यापार आणि कलाकौशल्य या दोहोंतही त्यास अग्रेसरत्व लवकर प्राप्त झालें. नेपोलियनाच्या घोडदौडीनें जरी सर्व युरोपखंडभर धुमाकूळ चालविला तरी इंग्लंडदेशास त्यापासून फारसा त्रास पोंचला नाहीं, आणि इतर राष्ट्रें धामधुमींत असतां इंग्लंडास स्वस्थपणानें आपले उदीमधंदे व व्यापार वाढविण्यास संधी मिळाली. त्यांतून यांत्रिक सुधारणेस अवश्य लागणारीं जीं साधनें, अर्थात् लोखंड आणि कोळसा, तीं इंग्लंडांत विपुल असल्यामुळें यांचींही या कामीं इंग्रज लोकांस पुष्कळ मदत झाली. सारांश, नेपोलियन धी ग्रेट याच्या वावटळींतून सुटून युरोपखंडांतील राष्ट्रें आपापल्या घरची व्यवस्था नीट लावून पुढील उद्योगास प्रवृत्त होण्यापूर्वीच इंग्लंड देशाचें व्यापारदृष्ट्या वर्चस्व पूर्णपणें स्थापित झालेलें होतें; आणि जे कांहीं उदीमधंदे त्या देशांत होण्यासारखे होते ते सर्व यावेळीं चांगल्या दशेस आलेले होते. अशा स्थितींत, कोणत्याही देशाचा जास्त उत्कर्ष होण्यास खरा उपाय म्हटला म्हणजे आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या मालाची पृथ्वीवरील इतर देशांत विक्री होण्याची पूर्ण मुभा असणें हाच होय; आणि इंग्लंड देशांत या कालीं व पुढें जे अर्थशास्त्रवेत्ते झाले त्यांनीं हेंच तत्त्व शास्त्रीयदृष्ट्या खरें आणि श्रेयस्कर आहे असें प्रतिपादन केलेलें आहे. ज्याप्रमाणें एखाद्या मनुष्याची शरीर–सामर्थ्यवृद्धि परिपूर्ण झाली असतां पुढें सदर सामर्थ्याचा उपयोग करून दाखविण्यास आपणांस केव्हां संधी मिळेल याची तो वाट पहात असतो तद्वतच इंग्लंड देशाची या वेळीं स्थिति होती. उद्योगधंद्याचें बीजारोपण इंग्लंडांत या वेळीं चांगल्या रीतीनें झालेलें असून आपल्या कारखान्याचा माल चोहींकडे कसा खपेल याचीच हे लोक वाट पाहत होते; आणि हिंदुस्थान देश याच समयास इंग्रजी राजसत्तेखालीं गेल्यामुळें इंग्लिश लोकांचा हा हेतु तडीस जाण्यास पुष्कळ साहाय्य झालें. इंग्रजांचा इतिहास वाचणारानें इंग्रज लोक क्षत्रियांपेक्षां जात्याच अधिक वैश्य आहेत हें विसरतां कामा नये. मराठ्यांच्या इतिहासांत मराठे लोक एखादा मुलूख आपल्या पूर्णपणें ताब्यांत येत नाहीं असें दिसून आल्यास त्या प्रांतावर चौथाईचा व सरदेशमुखीचा हक्क सांगत व तो संपादन करीत, असें आपल्या नजरेस येतें. इंग्रज लोकांची तऱ्हा अशीच, पण जरा निराळ्या प्रकारची आहे. आशिया, आफ्रिका किंवा अमेरिका खंडांतील मुलूख पहिल्यानें होईल तितका आपल्या ताब्यांत घेण्याचा ते प्रयत्न करतात; पण इतकेंही करून तो ताब्यांत न येईल तर त्या देशांतील लोकांशीं व्यापार कर-

ण्याची तरी फक्त आपणासच पूर्ण मोकळीक असावी अशा तऱ्हेचा हक्क ते मागून घेतात. हा हक्क चौथाई व सरदेशमुखीच्या हक्कापेक्षां अधिक महत्त्वाचा व किफायतीचा आहे असें अनुभवावरून आतां सिद्ध झालेलें आहे. आणि मराठे चौथाई मागण्यास जीं कारणें सांगत त्यांपेक्षां हा व्यापारी हक्क आपणांस कां मिळावा याबद्दल इंग्रज लोकांनीं अधिक सयुक्तिक कारणें सांगितलीं असें दिसून येत नाहीं. असो; सारांश काय कीं, आपला व्यापार इतर सर्व देशाशीं अबाधित चालण्याबद्दल इंग्रजलोक नेहमीं खटपट करीत आलेले आहेत; आणि आज जें व्यापारी वर्चस्व इंग्लिशलोक उपभोगीत आहेत तें याच तत्वाचें फल होय. इंग्लंड देश एवढा लहान आहे कीं, त्यांत उत्पन्न होणारें धान्य त्या देशांतील हल्लींच्या लोकसंख्येस चार महिने पुरेल कीं नाहीं याचा वानवाच आहे; आणि देशांत जे निरनिराळे कारखाने आहेत त्यांस जो कच्चा माल लागतो तो स्वस्त पडण्यासाठीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व इतर देशांसच नव्हे, तर आपणा स्वतःसही इंग्लंड देशास लागू करून द्यावें लागलें आणि अनुभवानें तेंच फायदेशीर आहे असेंही आढळून आलें. म्हणजे पृथ्वीवरील इतर राष्ट्रांत तयार झालेलें धान्य व कच्चा माल त्या त्या राष्ट्रांतील लोकांस बिनहरकत विलायतेस पाठवितां येतो; आणि विलायतेंत तयार झालेला माल त्यावर कराचा बोजा न पडतां पृथ्वीवरील इतर सर्व राष्ट्रांत इंग्रजांस नेतां येतो, अशी त्यांच्या व्यापाराची हल्लीं स्थिति झालेली आहे. आणि इंग्लंडांतील सर्व अर्थशास्त्रवेत्ते हीच व्यापाराची स्थिति उत्तम, असें एकसारखें कंठरवानें प्रतिपादन करीत आलेले आहेत व करितात. माझे कारखान्यांत तयार झालेलें कापड, यंत्रें वगैरे माल तुम्ही घ्या, आणि तुमच्या देशांत तयार झालेला कापूस, गहूं वगैरे कच्चा माल माझेकडे पाठवा, व अशा रीतीनें आपण सर्वच अप्रतिबंध व्यापार चालवूं असें इंग्लंड देशाचें सर्वांस सांगणें आहे; व हिंदुस्थानासारख्या त्यांनीं अंकित केलेल्या देशास तर हें तत्व जबरीनें लागू करण्यांत येत आहे. जी गोष्ट खुद्द इंग्लंड देशांस श्रेयस्कर झाली ती इतरांसही तशीच झाली पाहिजे असें इंग्रजी अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे; आणि या तत्वावरच कोणत्याही राष्ट्रानें परदेशांतून आपल्या देशांत येणाऱ्या मालावर विनाकारण जकात बसवूं नये, असें त्यांनीं प्रतिपादन केलेलें आहे. हें प्रतिपादन ज्या कारणाकरितां केलें आहे अथवा तें सिद्ध करण्यास ज्या युक्त्या लढविल्या आहेत त्या सर्वांचा येथें सविस्तर विचार करणें अशक्य आहे. एवढें सांगितलें म्हणजे बस्स आहे कीं इंग्लंड देशानें अंगिकारलेलें अप्रतिबंध व्यापाराचें हें तत्व केवळ आप्पलपोटेपणाचें आहे, अशी जर्मनी, फ्रान्स, रशिया, व अमेरिका यांची लौकरच खात्री झाली; आणि आपापल्या हद्दींत येणाऱ्या परकीय मालावर जबर कर बसवून, स्वदेशांत तो माल उत्पन्न करण्यास उत्तेजन देण्याची कल्पना त्यांनीं स्वीकारली. प्रथमतः

इंग्लंड देशास असें वाटत होतें कीं, अर्थशास्त्रदृष्टया गैरफायद्याची ही पद्धत इतर राष्ट्रें लवकरच सोडून देतील. पण गेल्या ५०।७५ वर्षांतील अनुभव याच्या अगदीं उलट आहे. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व जरी सयुक्तिक असलें तरी तें ज्या दोन देशांतील व्यापारधंदे सारख्याच उत्कर्ष–दशेस आले आहेत त्यांसच लागू पडतें, इतरांस पडत नाहीं असें आतां अर्थशास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. किंबहुना जेव्हां एखादा देश शेतकऱ्यांनींच भरलेला असतो तेव्हां शेतकीच्या स्थितींतून त्यास काढून त्यांत उदीमधंद्याचें बीजारोपण करण्यास खुल्या व्यापाराचें तत्व सोडून देऊन सप्रतिबंध व्यापाऱ्याचें तत्वच अंगिकारलें पाहिजे असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आतां झालें आहे; आणि हेंच तत्व खरें आहे अशी सूक्ष्म विचारांतीं कोणाचीहि खात्री होईल. उघडच आहे कीं, दोन समवयस्क आणि सारखे तयार झालेल्या पहिलवानांच्या कुस्तीस जे नियम लागू पडतात तेच नियम एके बाजूस चांगला पहिलवान व दुसरे बाजूस किरकोळ मनुष्य असतां कधींही लागू पडावयाचे नाहींत. पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांनीं आपापसांत कराचा वगैरे प्रतिबंध न ठेवतां व्यापाराची सर्वांस सारखी मोकळीक ठेवावी हें समशीलतेचें तत्व बरोबर नाहीं असें कोण म्हणेल ? मात्र ज्या राष्ट्रामध्यें हें खुल्या व्यापाराचें तत्व अमलांत यावयाचें तीं इतर बाबतींतही सारखींच सुधारलेलीं असलीं पाहिजेत. दोन्ही राष्ट्रें सारखींच समंजस, सारखींच उद्योगी आणि व्यापारधंद्यांत सारखींच पुढें सरसावलेलीं असल्यावर त्यांच्या दरम्यानचा व्यापार खुला राहण्यास कोणतीहि हरकत नाहीं; इतकेंच नव्हे तर खुला राहणेंच श्रेयस्कर होय. परंतु इतर बाबतींत अशा प्रकारची समता नसतां केवळ सक्तीनें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर अप्रतिबंध व्यापाराचें तत्व लादणें, म्हणजे या दुसऱ्या राष्ट्राचें सर्वस्वी नुकसान करणें होय. ही गोष्ट अमेरिका, जर्मनी, फ्रान्स आणि रशिया या स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांच्या नजरेस येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. आणि गेल्या ५०।६० वर्षांत त्यांनीं आपल्या हद्दींत येणाऱ्या परदेशी मालावर जबर जकात बसवून, आणि स्वदेशांत उद्योगधंद्यांच्या शाळा काढून, अथवा उद्योगधंद्याच्या उत्तेजनार्थ देणग्या देऊन आपापल्या देशांतील व्यापाराची किंवा उद्योगधंद्यांची अभिवृद्धि केलेली आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पूर्वीं ज्या वस्तु इंग्लंड देशांतच तयार होत व तेथूनच परदेशांत जात, त्या आतां जर्मनी किंवा अमेरिका देशांत तयार होतात. इतकेंच नव्हे तर विलायती वस्तूंपेक्षां त्या अधिक स्वस्त दरानें मिळूं लागल्या आहेत. जर्मनी, अमेरिका किंवा फ्रान्स यांचा अशाच रीतीनें व्यापार वाढल्यास त्यापासून पुढें केव्हांना केव्हां तरी इंग्रजी व्यापारास धक्का येण्याचा संभव आहे ही गोष्ट इंग्रजी मुत्सद्यांच्या लक्षांत येऊन चुकली आहे; व त्याबरोबरच अमेरिका अगर जर्मनी यांनीं परदेशी मालावर जो जबर

कर ठेविला आहे त्यामुळेंच अशी स्थिति प्राप्त झाली आहे हेंही त्यांस अवगत आहे. परंतु अमेरिका आणि जर्मनी हीं स्वतंत्र राष्ट्रें असल्यामुळें त्यांनीं कोणत्या मालावर कर बसवावा व कोणत्या मालावर बसवूं नये हें त्यांस सांगण्याचा इंग्लंडचा अधिकार नाहीं, व यदाकदाचित् सांगितलें तरी तीं ऐकणार नाहींत अशी इंग्रजलोकांची खात्री आहे. अशा स्थितींत अमेरिका किंवा जर्मनी-सारख्या देशांत उत्पन्न होणाऱ्या स्वस्त मालानें आपल्या व्यापाराची हानि होऊं नये म्हणून काय तजवीज करावी याबद्दल इंग्लंडांत नेहमीं चर्चा सुरू असते, आणि मि० चेंबर्लेन यांनीं साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्याची जी युक्ति काढली आहे तिच्या मुळाशीं ही वर सांगितलेली व्यापारी कल्पनाच आहे, असें कोणाच्याही सहज लक्षांत येईल.

वरील विवेचनावरून मि० चेंबर्लेन यांची युक्ति लोकांस किती कबूल होईल याची अटकळ सहज बांधतां येईल. मि० चेंबर्लेन यांचें असें म्हणणें आहे कीं, इंग्लंड देशानें अप्रतिबंध व्यापाराचें तत्व अंगिकारलें असतांही ज्या अर्थीं इतर प्रमुख देशांनीं आपापल्या देशांत येणाऱ्या परकीय मालावर जबर जकात ठेविली आहे, त्या अर्थीं केवळ इंग्लंड देशानेंच आतां औदार्य दाखवून उपयोगी नाहीं. जीं राष्ट्रें इंग्लंड देशाच्या मालावर जकात किंवा कर बसवितात त्या राष्ट्रांतील माल इंग्लंडच्या साम्राज्यांत जेथें जेथें जाईल तेथें तेथें इंग्लंडानेंही त्याजवर कर बसविला पाहिजे. तात्पर्य; या कामीं इंग्लंडानें एकट्यानें औदार्य न दाखवितां " जशास तसें " या म्हणीप्रमाणें इतर देशांशीं आपला संबंध ठेविला पाहिजे. म्हणजे इतर राष्ट्रें जर आपल्या मालावर कर बसवितात तर त्यांच्या मालावरही आपण कर बसविला पाहिजे. हा इतर राष्ट्रांसंबंधानें विचार झाला. पण साम्राज्यांतील ज्या वसाहती आहेत त्यांच्या दरम्यानचा व्यापार पाहिल्याप्रमाणेंच खुला ठेवला पाहिजे असें मि. चेंबर्लेन यांचें मत आहे. थोडक्यांत सांगावयाचें असल्यास इंग्लंड देशांत जे कारखाने आहेत त्यांतील माल इंग्रजी साम्राज्यांतील वसाहती आणि हिंदुस्थानसारखे अंकित झालेले देश यांत खपविण्याची इंग्रज लोकांस पूर्ण मुभा असावी, व इतर राष्ट्रांनीं आपला माल तेथें पाठवूं नये, अथवा पाठविल्यास त्यावर जबर कर बसवून इंग्रजी व्यापाऱ्यांस तितकी सवलत मिळावी, अशी मि. चेंबर्लेन यांच्या युक्तीची एक बाजू आहे. दुसऱ्या बाजूनें वसाहतींत उत्पन्न होणाऱ्या कच्चया मालावर कर न बसवितां इंग्लंडांत तो माल विकूं देऊन इतर देशांशीं वसाहतींचा व्यापार होऊं देऊं नये असेंही मि० चेंबर्लेन यांचें म्हणणें आहे. या युक्तीनें वसाहती आणि मायदेश यांच्यामधील संबंध कायमचा व दृढ होऊन जगभर जेथें जेथें इंग्रज लोक आहेत त्या सर्वांचें ऐक्य होऊन इंग्रज किंवा अँग्लो-सॅक्सन जातीस साम्राज्याचें वैभव अप्रतिहत भोगावयास सांपडेल अशी मि० चेंबर्लेन यांची खात्री आहे.

खात्री आहे. इतर राष्ट्रांशीं " जशास तसें " आणि वसाहतींशीं प्रेमानें वागल्यानें इंग्लंडच्या मालास गिऱ्हाइक मिळेल, इतकेंच नव्हे तर इंग्लंडशीं स्पर्धा करणाऱ्या जीं इतर राष्ट्रें आहेत त्यांच्या व्यापारासही धोका येईल असें मि० चेंबर्लेन यांच्या पक्षांतील लोकांचेंही म्हणणें आहे. पण हें म्हणणें प्रधानमंडळांतील सर्व लोकांस अद्याप मान्य झालें नाहीं. वसाहतींतील लोकांचा मुख्य धंदा आजमित्तीस शेतकी आहे, आणि त्यांच्या संसारास उपयोगी अशा ज्या वस्तु ते घेतात त्या बहुतेक विलायती असतात हें खरें आहे. पण त्यांची लोकसंख्या वाढत जाऊन उदीमधंद्याची त्यांस जेव्हां आवश्यकता वाटेल, तेव्हां अमेरिकेप्रमाणें विलायती मालावर वसाहतींतील लोकही जबर कर बसविण्यास प्रवृत्त होणार नाहींत कशावरून ? आणखी दुसरें कारण असेंही आहे कीं, आज विलायती वस्तु जर्मन किंवा अमेरिकन वस्तूंपेक्षां महाग नाहींत, पण जर्मनींत किंवा अमेरिकेंत तयार झालेला माल जेव्हां याहूनही स्वस्त विकला जाईल तेव्हां वसाहतींतील लोकांस तोच स्वस्त म्हणून अधिक पसंत पडणार नाहीं कशावरून ? या दोन्ही प्रश्नांचा विचार केला तर मि. चेंबर्लेन यांची कल्पना सर्व वसाहती कायमची कबूल करतील कीं नाहीं याबद्दल बळकट शंका आहे. शिवाय खुद्द इंग्लंडांतील लोकही आपली गिऱ्हाइकी जगभर आहे ती फक्त वसाहतीपुरतीच संकुचित करण्यास कबूल होतील कीं नाहीं याचाही वानवाच आहे. कारण आज इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती यांच्या दरम्यान जी व्यवस्था होईल तीच जर्मनी आणि जर्मनीच्या वसाहती अथवा फ्रान्स आणि फ्रान्सच्या वसाहती यांच्या दरम्यान पुढें न होण्यास कांहीं कारण दिसत नाहीं; आणि असें झालें म्हणजे अर्थातच इंग्रजी मालाचा खप त्या मानानें कमी होणार. इतर राष्ट्रांनीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व सोडून दिलें हें खरें आहे; पण त्यामुळें इंग्लंड देश जर हें तत्त्व सोडून देईल तर त्यांत इंग्लंडचेंच नुकसान आहे. उदीमधंद्यांत व व्यापारांत इंग्लंड देश आज श्रेष्ठ पदास पोहोंचलेला आहे आणि इतर देश तोच श्रेष्ठपणा मिळविण्याकरितां खटपट करीत आहेत हें खरें आहे; आणि एकपक्षीं इंग्लंड देशास आपलें वर्चस्व कायम राखावयाचें असेल तर इतर राष्ट्रांनीं व्यापारांत पुढें सरसावूं नये असें त्यास वाटणेंही स्वाभाविक आहे. पण हा हेतु मि. चेंबर्लेन यांच्या युक्तीनें तडीस जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदुस्थानासारख्या अंकित देशास इंग्लंड ठेवील त्या स्थितींतच राहिलें पाहिजे. पण जर्मनी, फ्रान्स, अमेरिका वगैरे जीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत तीं व्यापारांत इंग्लंड देशाची बरोबरी करण्याचा प्रयत्न करणार आणि तो कालांतरानें सफलही होणार हें निर्विवाद आहे. तेव्हां जगांतील सर्व इंग्रज एक होऊन त्यांचा पाडाव करूं अशी व्यर्थ घमेंड मारण्यांत कांहीं हांशील नाहीं. अमेरिका ही इंग्लंड देशाचीच एक वसाहत होती. परंतु

व्यापारी हिताहिताचा विरोध आल्याबरोबर अमेरिका इंग्लंडचें ऐकेनाशी झाली, हें गेल्या शतकाच्या इतिहासावरून उघड होत आहे. आणि पुढें मागें इतर वसाहतींसही हाच धडा उचलण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं ! अर्थात् व्यापारी हिताहिताच्या संबंधावर साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्याचा प्रयत्न करणें अगदींच कमी समजाचें काम होय. यापेक्षां हिंदुस्थान देशाचा जर मि. चेंबर्लेन पुरस्कार घेतील तर इंग्रजी साम्राज्यास अधिक फायदा होईल अशी आमची समजूत आहे. परंतु ही कल्पना त्यांच्या डोक्यांत कशी शिरणार ? ' पाण्यापेक्षां रक्ताचा संबंध अधिक घट्ट असतो ' अशी एक इंग्रजींत म्हण आहे; आणि मि. चेंबर्लेन यांच्या मनाची प्रवृत्तीही अशाच प्रकारची आहे. अर्थात् त्यांनीं सुचविलेली कल्पनाही जात्यभिमान आणि रक्ताभिमान यांजवरच सर्वांशीं अवलंबून आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; व असली कल्पना साम्राज्याचीं बंधनें दृढ करण्यापेक्षां तीं भग्न करण्यासच अधिक कारणीभूत होईल असा आमचा समज आहे.वर सांगितलेंच आहे कीं,प्रधानमंडळांतील बऱ्याच लोकांस ही कल्पना अद्याप ग्राह्य वाटत नाहीं, आणि त्याचप्रमाणें लिबरल पक्षांतील लोकांचेंही मत आहे. तेव्हां इंग्लंडांतील लोकांना अखेर ही कल्पना पसंत पडेल असें वाटत नाहीं. तथापि ओघाबरोबरच जाणारे लोक अधिक असतात हें लक्षांत आणलें म्हणजे मि. चेंबर्लेन यांच्या युक्तीची इंग्लंडांत कशी काय संभावना होते याबद्दल आज निश्चित मत देणें आम्हांस शक्य वाटत नाहीं. पुढें काय हकीकत होते ती पाहून मग त्यासंबंधानें अधिक लिहावयाचें असल्यास लिहूं.

❁ ❁ ❁

* मुंबईच्या शेतकीखात्याची सुधारणा.

यासंबंधानें नुकताच सरकाराकडे जो एक कांहीं पुढारी लोकांकडून अर्ज गेला आहे व या बाबतींत ऑ. मि. मॉंटीथ यांनीं येथील ' फ्लावर शो' च्या वेळीं आपल्या भाषणांत उल्लेख केला त्याबद्दल विशेष खुलासेवार लिहिणें जरूर वाटल्यावरून आज हा विषय आम्हीं हातीं घेतला आहे. मुंबईइलाख्यांतच काय पण एकंदर हिंदुस्थानांत शेतकी हें लोकांच्या निर्वाहाचें मुख्य साधन आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; व शेतीची सुधारणा म्हणजे लोकांच्या सांपत्तिक स्थितीची सुधारणा हेंही कोणास नाकबूल होणार नाहीं. तथापि, शेतीची सुधारणा म्हणजे

---

* [केसरी ता. २२ आक्टोबर १९०३]

काय, ती कोणत्या प्रकारानें घडवून आणली पाहिजे आणि त्याकरितां काय काय तजविजी केल्या पाहिजेत या बाबतींत मतभेद होणें शक्य आहे. आजपर्यंत टी, कॉफी, कोको, नीळ वगैरे कांहीं नवे पदार्थ हिंदुस्थानांत उत्पन्न करण्याच्या कामीं बरेच प्रयत्न झालेले आहेत. परंतु यापासून जो फायदा व्हावयाचा तो सर्व युरोपियन शेतकऱ्यांच्या पदरांत पडलेला आहे. शेतकीची पुढील सुधारणा जर याच धर्तीवर व्हावयाची असेल तर ती झाली काय, आणि न झाली काय, हिंदुस्थानच्या गरीब शेतकऱ्यांस त्यापासून कांहींच फायदा व्हावयाचा नाहीं. शेतीखात्याची सुधारणा करणाऱ्या गृहस्थांनीं किंवा सरकारानें प्रथम लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे हीच होय. मोठमोठ्या पगाराचे दहा पांच युरोपियन अंमलदार यांच्या हाताखालीं पांच पन्नास पांढरपेशे एतद्देशीय सबॉर्डिनेट ऑफिसर आणि शें दोनशें कारकुनाच्या दर्जाचे इन्स्पेक्टर नेमल्यानें किंवा एखादी मोठी बोट्यानिकल गार्डन किंवा एक्सपेरिमेंटल फार्म काढल्यानें या देशांतील खऱ्या शेतकीची सुधारणा होणें शक्य नाहीं. एक शेर धान्याऐवजीं दोन शेर,भाताच्या एक काडीऐवजीं दोन काड्या हल्लींच्याच खर्चानें किंवा निदान दुपटीपेक्षां कमी खर्चानें उत्पन्न करण्याची युक्ति जर कोणी आमच्या शेतकऱ्यांस सांगेल तर ती त्यांस नको आहे असें नाहीं. शेतकीची हल्लींची स्थिति अशी आहे कीं, शेतांत खपणाऱ्या लोकांच्या हातीं शेताच्या वार्षिक उत्पन्नाचा जो भाग पडतो तो त्यांच्या कुटुंबाच्या निर्वाहास पांच सहा किंवा सात आठ महिने पुरतो कीं नाहीं याचा वानवाच आहे.अशा स्थितींत गरीब कुणब्यास जर कोणी अशी एखादी युक्ति सांगेल कीं, त्यामुळें सात आठ महिन्यांच्या ऐवजीं बारा महिनेपर्यंत त्याच्या शेताचें उत्पन्न त्याच्या उदरनिर्वाहास पुरेसें होईल, तर तो या युक्ति सांगणाराचा उपकार आमरण कधींहि विसरणार नाहीं. पण अशी युक्ति शक्य आहे काय ? आणि शक्य असण्यास ती शेतांत खपणाऱ्या शेतकऱ्यास कशी साध्य करून देतां येईल ? हे दोन मोठेच प्रश्न आहेत. चहा, काफी, यांच्या लागवडीचीं उदाहरणें या कामास उपयोगी नाहींत; त्यापासून शेतकऱ्यांची स्थिति न सुधारतां युरोपियन प्लँटरचे ते गुलाम बनून जातात आणि मग गुलामांची वाण पडूं लागली म्हणजे त्यांचे एकामागून एक एकसारखे ताफे पाठविण्यास हिंदुस्थासारकारच्या कायदेकौन्सिलाच्या टांकसाळीची मदत घ्यावी लागते हें आतां सर्वांस माहित झालेलें आहे. शेतकीच्या सुधारणेची ही दिशा सोडून दिली म्हणजे देशांतील हल्लींच्या शेतकरीवर्गास दुसऱ्या कोणत्या रीतींनें सहाय्य करतां येईल हा प्रश्न सहजच डोळ्यांपुढें उभा राहतो. युरोपांतून किंवा इंग्लंडांतून येथें जे कांहीं थोडें शेतकीच्या कामांत प्रवीण शास्त्रज्ञ पंडित या देशांत येऊन इकडील शेतीची पद्धत पाहून गेलेले आहेत त्याचें असें मत झालेलें

आहे कीं, शेतकीची जी क्रिया व पद्धत या देशांत प्रचारांत आहे तींत एकदम विशेषशी सुधारणा होणें शक्य नाहीं. हजारों वर्षांच्या अनुभवानें कोणत्या जमिनींस कोणतीं पिकें करावीं, पिकांचा फेरपालट कोणाच्या तऱ्हेचा असावा, जमीन पडीत केव्हां टाकावी, कोणत्या प्रांतांत कोणत्या वेळीं धान्य पेरावें, वगैरेबद्दलचे नियम आमच्या इकडच्या शेतकरी लोकांस परंपरेनें चांगले माहीत झालेले आहेत. आणि हा त्यांचा अनुभव आधुनिक शास्त्रपद्धतीच्या सहाय्यानें फारसा सुधारतां येणार नाहीं असें कांहीं पाश्चात्य शेतीशास्त्रज्ञांचें मत आहे. हें खरें असो वा खोटें असो, एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, शेतकऱ्यांची हल्लींची दरिद्रावस्था लक्षांत आणिली असतां केवळ पावसावर अवलंबून असणाऱ्या जिराईत जमिनीची खत घालून किंवा अन्य तऱ्हेनें सुधारणा करण्याचें काम त्यांच्या हातून होईल कीं नाहीं याचा वानवाच आहे. ज्याजवळ थोडासा पैसा असून बागाईत जमीन आहे त्याची स्थिति निराळी, पण ती सुधारण्यासही सरकार जें शेतीखातें काढणार त्याचा या लोकांशीं निकट संबंध असून सदर खात्यांतील अंमलदारही चांगल्या अनुभवाचे, शेतकऱ्यांच्या खऱ्या कळकळीचे असले पाहिजेत. एरव्हीं सरकारानें कितीही पैसे शेती खात्यावर खर्च केले तरी त्याचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. शेतीसंबंधाचें शिक्षण लोकांस मिळालें पाहिजे, शिक्षणावांचून त्यांची सुधारणा व्हावयाची नाहीं हें सामान्य तत्त्व आम्हांस इतरांप्रमाणेंच मान्य आहे. पण या सामान्य तत्त्वाचा अनेकवार उच्चार केल्यानें कांहीं कार्यसिद्धि होत नाहीं. खरें शेतीशिक्षण म्हटलें म्हणजे प्रत्येक तालुक्यांतील किंबहुना प्रत्येक खेड्यांतील शेतकऱ्यास अमुक एक पीक तूं हल्लीं करतोस त्यांपेक्षां अमक्या एका रीतीनें केल्यास तुला अधिक फायदा होईल असें अनुभवानें सांगणारे व जरूर पडल्यास कृतीनें सिद्ध करून दाखविणारे लोक शेतीखात्यांत असले पाहिजेत. हें काम अर्थातच बड्या पगारांच्या दहा पांच जागा काढल्यानें व्हावयाचें नाहीं. शेतकीच्या नव्या कृति, लावणी, पेरणी किंवा कापणी यासंबंधाचे नवे शोध, नवीन बियाणें, नवीन जिन्नस व ते तयार करण्याच्या रीति, आपल्याकडे हल्लीं शेतकीचे जे जिन्नस तयार होतात त्यांचें पीक वाढविण्याचे मार्ग वगैरे सर्व कांहीं ज्या शाळांतून सप्रयोग आणि सशास्त्र शिकविलें जाईल अशी इलाख्यांत एक मोठी, आणि सर्व इलाखाभर लहान लहान शाळा निघाल्या पाहिजेत. हल्लीं शाळाखात्याकडून खेडोंखेडीं शेतकऱ्यांच्या मुलांस औनामा शिकविण्याच्या शाळा निघालेल्या आहेत; आणि हल्लींच्या डायरेक्टर साहेबांच्या कारकीर्दीत किंडरगार्टन पद्धतीप्रमाणें त्यांत गोट्यांची, रंगांची, ड्राइंगची किंवा इतर बालोद्यान पद्धतीच्या शिक्षणवस्तूंची भर पडत आहे. परंतु या असल्या शिक्षणानें गेल्या पन्नास वर्षांत शेतकऱ्यांच्या मुलांस कांहीं फायदा

झाला आहे कीं नाहीं, याचा अद्याप कोणी विचार केलेला दिसत नाहीं. सही करण्यापुरतें लिहितां येणारे शेतकरी अगर शेतकऱ्यांचीं मुलें पूर्वीपेक्षां आतां अधिक झालीं असतील; आणि यांपैकीं कांहीं इंग्रजी शाळांत शिरून ब्राह्मणाबरोबर कारकुनीच्या जागाकरितांही अर्ज करण्यास तयार झालीं असतील. पण आमच्या दृष्टीनें पाहतां हा देशास मोठा फायदा झाला असें आम्ही समजत नाहीं. व्यापारी लोकांत ज्याप्रमाणें पैशाचे दोन पैसे कसे करावयाचे ही विद्या मुख्य समजतात, त्याप्रमाणें शेतकरी लोकांत खंडीचें दोन खंडी पीक कसें येईल ही विद्या प्रधान समजली जाते; आणि खेडेगांवांतील हल्लींच्या सर्व सरकारी शाळा घेतल्या तर शेतकऱ्यांस आवश्यक अशा या विद्येचें बीज या शाळांतून त्यांस मिळत नाहीं असें स्पष्ट म्हणावें लागतें. जमिनीची मोजणी इंग्रजी राज्य झाल्यापासून तीनदां झाली;आणि तीस तीस वर्षांनीं वाढणारे सारे कांहीं ठिकाणीं तिसऱ्यांदा वाढले आहेत व कांहीं ठिकाणीं वाढविण्याचा क्रम चालू आहे. पण शेतकऱ्यांच्या खऱ्या कल्याणाचा मार्ग सरकारानें अद्याप स्वीकारला नाहीं असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. उदाहरणार्थ, आम्ही एकच म्हणजे कापसाच्या लागवडीची गोष्ट घेतों. या देशांत लांब धाग्याचा कापूस हल्ली होत नाहीं हें खरें आहे. पण तो कधींच व्हावयाचा नाहीं असें कोणीही शास्त्रज्ञ कबूल करणार नाहीं. इजिप्त देशांतील कापूसही आमच्याप्रमाणेंच अगदीं हलक्या प्रतीचा असे. पण तो आतां सुधारून पुष्कळ चांगला निघत आहे हें प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांत तशा प्रकारची सुधारणा कां झाली नाहीं व कां होऊं नये हें आम्हांस समजत नाहीं. कापसाच्या बाबतींत जर एक सुधारणा होईल तर कोट्यावधि रुपयांचें जें आम्ही बारीक सुताचें कापड विलायतेहून खरेदी करून आणतों तें आम्हांस येथेंच तयार करतां येणार नाहीं काय ? तात्पर्य,एक कापसाच्या लागवडीची सुधारणा करणें म्हणजे कोट्यावधि रुपयांचें देशाचें कल्याण करण्यासारखें आहे. परंतु या कामास अवश्य लागणारे शोध करण्यास सरकारांतून आजपर्यंत सतत एकसारखे प्रयत्न झालेले मुळींच नजरेस येत नाहींत. मग ते विलायती व्यापारास धक्का येईल म्हणून होत नाहींत किंवा त्यांस दुसरें कांहीं कारण आहे हें आम्ही सांगूं शकत नाहीं. परंतु एवढी गोष्ट खरी आहे कीं, शेतीची सुधारणा म्हणजे नुसत्या पिकाची सुधारणा नव्हे तर त्या पिकापासून पुढें जो माल तयार होतो तो माल तयार करण्याचेही कारखाने या देशांत निघाले पाहिजेत. उदाहरणार्थ, उंसाच्या पिकाची सुधारणा झाल्यास त्याबरोबर साखर तयार होणाऱ्या कारखान्यांचीही अभिवृद्धि झाली पाहिजे. किंवा रबराचा चीक येथें तयार झाल्यास रबराच्या वस्तूंचे कारखानेही येथें निघाले पाहिजेत. ज्या जावा बेटाचा दृष्टांत सरकाराकडे गेलेल्या अर्जांत नमूद केलेला आहे त्या बेटांत आम्हीं म्हणतों त्याप्रमाणेंच स्थिति आहे. डच, किंवा

पोर्तुगीज हे लोक इंग्रज लोकांप्रमाणें केवळ व्यापारी नसून शेतकरीही आहेत. करितां त्यांच्या राज्यांत शेतकीची सुधारणा हा विषय महत्त्वाचा मानला जाऊन शेतीसुधारणेची मोठमोठी खातींही कायमची काढलेलीं आहेत. चार पांच एकर जमिन प्रत्येक माणसास मिळाली असतां त्यानें शेती करून त्यावर सरकारी सारा जाऊन त्यानें आपल्या कुटुंबाचा निर्वाह कसा करावा, हें प्रत्येक शेतक-यास समजणें अवश्य आहे; व अर्जीत नमूद केल्याप्रमाणें शेतकऱ्यांस या गोष्टी समजावून सांगण्याची जबाबदारी अमेरिका, फ्रान्स, हांलंड, इटाली वगैरे देशांतून सरकारनें आपल्या आंगावर घेतलेली आहे. हिंदुस्थानसरकार जर याचप्रमाणें ही जबाबदारी आपल्या आंगावर घेईल व शेतीच्या सुधारणेपासून जें जास्त उत्पन्न होईल तें साऱ्याच्या रूपानें पुन्हां तिजोरींत परत घेऊं इच्छिणार नाहीं, तर आपल्या कर्तव्यांपैकीं मुख्य कर्तव्य आमच्या सरकारनें बजाव-ल्यासारखें होईल; आणि दुष्काळ आणि त्याचा पाहुणा प्लेग यांची या देशांत फार दिवस वस्ती टिकणार नाहीं. पण ही गोष्ट व्हावी कशी, एवढाच कायतो प्रश्न आहे. सर्व हिंदुस्थानभर पूर्वी एकछत्री राज्य कधींही नव्हतें, तथापि विजयानगरसारख्या पूर्वीच्या मोठ्या राज्यांतील शिस्त पाहिली तर दरबारचा खर्च भागून बाकी राहिलेला कराचा पैसा पाटबंधारे किंवा तळीं वगैरे बांधून शेतीच्या सुधारणेच्याच कामीं खर्च होत असे असें आढळून येतें. परंतु आमच्या हल्लींच्या सरकारानें एखादा कालवा काढला कीं, त्यास खर्च झालेल्या रकमेवर व्याज किती सुटतें इकडे सरकाराचें आधीं लक्ष असतें ! सर मॉंटीथसाहेब म्हणतात त्याप्रमाणें एक्सपेरिमेंटल फार्मवर व्याज किती सुटतें हें सरकार पहात नसेल, पण कालव्यांच्या उदाहरणावरून सरकारची दृष्टि कशी काय आहे हें चांगलें दिसून येतें. कराचा वसूल झालेला सर्व पैसा राज्यव्यवस्थेच्या कामीं खर्च करून तुरीची काठी तुरीवर झाडावी या न्यायानें सरकार शेतीची सुधारणा करण्यास प्रवृत्त झाल्यास त्यापासून लोकांस खरा फायदा व्हावयाचा नाहीं, असें जें अर्जदारांचें म्हणणें आहे तें आम्हांस मान्य आहे; आणि तें सरकारनें लक्षांत ठेवावें अशीही त्यांस आमची विनंति आहे. पण त्याजबरोबर दुसरी अशीहि सूचना आहे कीं इतर खात्याप्रमाणेंच शेतीखातें वाढविल्यानें किंवा नुसत्या मोठमोठाल्या बोटानिकल गार्डनस् काढल्यानें त्यांपासून कांहीं एक फायदा व्हावयाचा नाहीं. निरनिराळ्या खेडेगांवांतून दहा पांच एकर जमिनीचा तुकडा घेऊन त्यांत शेती करून सुखवस्तु राहणारे शेतकरी जेव्हां लोकांच्या नजरेस पडतील तेव्हांच शेतीची खरी सुधारणा झाली असें आम्ही समजूं. तोंपर्यंत वरील अवडंबराचा खऱ्या शेतकऱ्यांस कांहीं एक फायदा नाहीं. सर्वेखातें मोडून त्याचा पैसा शेती खात्याकडे देण्यास सुरवात होऊन दहा बारा वर्षें झालीं आहेत. पण या मुदतींत आम्हीं म्हणतों तशी शेतीची सुधारणा अद्याप झाली नाहीं किंवा ती घड-

वून आणण्याचा उपक्रमहि सुरू झालेला नाहीं. शेतीचे सरकारी फार्म हे केवळ सरकारच्याच उपयोगाकरितां आहेत अशी लोकांची समजूत आहे व ती समजूत कांहीं निराधार नाहीं. ही समजूत पालटण्यास व या फार्मपासून खरा उपयोग होण्यास शेतकरी वर्गास खऱ्याखुऱ्या फायद्याचें शिक्षण मिळण्याची तजवीज होऊन त्याप्रमाणें या देशांतील शेतकरीवर्ग या कामांत सरकारनें तयार केला पाहिजे. जपान वगैरे राष्ट्रांत जेथें स्वराज्य आहे तेथें अधिकारीवर्ग आणि शेतकरीवर्ग यांच्यामध्यें एक प्रकारची सहानुभूति असून शेतकऱ्यांचें खरें कल्याण कशानें होईल इकडे अधिकाऱ्यांचें लक्ष असतें. तसा प्रकार आमच्याकडे होणें आवश्यक आहे; आणि तो होण्यास शेतकीखात्याची रचना रेव्हिन्यू, ज्युडीशियल किंवा पोलिस-खात्याहून निराळी पाहिजे. आमच्या सरकारानें आगगाड्या, तारायंत्रें वगैरे बाह्य सुधारणांच्या बाबतींत आजपर्यंत बराच खर्च केलेला आहे, पण आम्ही म्हणतों त्याप्रमाणें शेतकीची सुधारणा करण्याचे कामीं आमच्या सरकारानें वाचनिक उद्योगापेक्षां दुसऱ्या कोणत्याही प्रकारची विशेष व्यवस्था केल्याचें आढळून येत नाहीं. ही स्थिति सुधारण्याचें सरकारच्या मनांत आहे असें सरकाराकडे जो अर्ज गेला आहे त्यासंबंधानें बोलतांना ऑ. सर मॉंटीथ यांनीं बोलून दाखविलें आहे. पण हें बोलणें पुढें कितपत अमलांत येतें हें पाहिल्याशिवाय किंवा शेतकीखात्याची भावी रचना कशी काय होते हें दृष्टीस पडल्याशिवाय आज यासंबंधानें विशेष टीका करतां येत नाहीं. ईश्वर करो आणि जी सुबुद्धि सरकारास झाल्यासारखी दिसत आहे तिचा परिपाक निवळ खात्याच्या अभिवृद्धिरूप न होतां शेतकऱ्यास खरा कल्याणप्रद होवो अशी आमची प्रार्थना आहे.

* *



* नवें खोतीबिल.

सन १८८० सालीं खोतांच्या व सरकारच्या विचारानें मंजूर झालेला खोती ॲक्ट दुरुस्त करण्याकरितां सन १८९८ सालीं मुंबईसरकारनें एक बिल काय-देकौन्सिलापुढें आणलें होतें, व त्यावर सिलेक्ट कमिटीचा रिपोर्टहि झाला होता. पण तें बिल पुढें स्टेट सेक्रेटरी यांस पसंत न पडल्यामुळें मुंबईसरकारानें त्या वेळीं परत घेतलें, आणि त्याऐवजीं आतां नवें बिल येत्या कायदेकौन्सिलापुढें आणण्याचा सरकाराचा विचार असून हल्लीं तें सरकारी ग्याझेटमध्यें प्रसिद्ध

---

* [केसरी ता. २९ सप्टेंबर १९०३]

झालें आहे. या बिलासंबंधीं वाटाघाट येत्या कायदे कौन्सिलच्या बैठकींत होईलच, पण तत्पूर्वी त्याचें धोरण काय आहे हें समजण्याकरितां आज त्याबद्दल येथें थोडीशी चर्चा करण्याचें आम्हीं योजिलें आहे. खोतीचे हक्क कोणते याबद्दल मागें केसरींत चर्चा आलेलीच आहे. परंतु ती सर्वांच्या लक्षांत नसेल, म्हणून योडक्यांत खोतीचे हक्क काय आहेत हें सांगून नंतर हल्लींच्या बिलाकडे वळूं.

खोत व खोती यांचा इतिहास असा आहे कीं, जेव्हां कोंकणांत वस्ती कमी होती तेव्हां बहुतेक नवीन गांवांची वसाहत बाहेरून मजुरदार किंवा कुळें आणून खोत लोकांनीं केली; आणि याकरितां संबंध गांवचा अमुक एक नियमित सारा त्यांनीं सरकारास दिला म्हणजे गांवांतील जमिनी वाटेल त्या शर्तीवर कुळास देण्यास किंवा कुळापासून नक्त अथवा उत्पन्नाचा कांहीं भाग साऱ्याच्या रूपानें घेण्यास ते मुखत्यार असत. सारांश, खोत हा गांवच्या सर्व जमिनीचा मालक, आणि त्यापासून नियमित सारा घेण्यापलीकडे सरकारचा त्यावर किंवा खोती गांवांवर कोणत्याही प्रकारचा दुसरा हक्क नव्हता, अशी इंग्रजी राज्याच्या पूर्वीपासून पुष्कळ वर्षें वहिवाट चालत आलेली होती. इंग्रजी राज्य झाल्यानंतर मोजणीखातें सुरू होऊन जेव्हां कोंकणांत पाहणीचे कामास प्रारंभ झाला, तेव्हां खोती गांवचा एकंदर सारा वाढवावा किंवा नाहीं आणि कुळांकडे असलेल्या जमिनीबद्दल कुळांकडून खोतास शेतांतील उत्पन्नाचा जो भाग (भातशेतीस निम्मे किंवा अर्धेल आणि वरकसीस तृतियांश किंवा तिर्धेल) मिळत असे तो तसाच ठेवावा किंवा त्याची किंमत करून वटाईची पद्धत अगदीं मोडून टाकावी, इत्यादि प्रश्न सहज उत्पन्न झाले. खोताचा गांवावर कांहीं हक्क नाहीं, फार झालें तर देशावरील पाटिलकुळकर्ण्याप्रमाणें गांवच्या साऱ्यापैकीं शेंकडा अमुक एक रुपये गांवचें काम करण्याबद्दल त्यास द्यावे, यापेक्षां जास्त कांहीं देऊं नये असें सर्व्हे ऑफिसरांचें मत पडलें. हें म्हणणें खोतास अर्थातच कबूल झालें नाहीं. गांवचा सारा नियमित असावा किंवा यदाकदाचित् वाढविला तर जो सारा वाढेल तितका सरकारास दिला म्हणजे खोत आणि त्यांचीं कुळें यांच्या दरम्यानच्या व्यवहारांत सरकारास हात घालण्याचा हक्क नाहीं अशी खोत लोकांनीं हरकत घेतली. इतकेंच नव्हे तर, सरकारचें मोजणीखातें आपले हक्क बेकायदा बुडवीत आहे म्हणून सरकारावर खोतांनीं फिर्यादी लाविल्या. तेव्हां कमीशन नेमून सरकार व खोत यांच्या आपापसांतल्या समजुतीप्रमाणें सन १८८० सालचा खोती आक्ट पास झाला. व तो पास झाल्यावर खोतांनीं आपल्या सरकारावरील फिर्यादी काढून घेतल्या. या आक्टांत कुळांकडून भातशेतीच्या उत्पन्नांपैकीं निम्मे आणि वरकस जमिनीच्या उत्पन्नांपैकीं तृतियांश किंवा तिर्धेल घेण्याची जेथें खोतांची वहिवाट होती तेथें ती तशीच ठेवावी आणि जेथें नक्त

किंवा धान्याचे मक्ते घेण्याची वहिवाट असेल तेथें ते मक्ते तसेच राहूं द्यावें असें ठरविलें आहे. तसेंच ही अर्धेल-तिर्धेलीची वहिवाट किंवा मक्ते कोणाकडून कसे घ्यावयाचे याचें सर्व्हेच्या वेळीं रजिस्टर करून तेंच पुढें कायम ठेवावें, त्यांत फेरबदल करूं नये असेंही या आक्टांत कलम आहे. गांवावर बसविलेला सर्व सारा खोतानें भरला म्हणजे अर्धेल, तिर्धेल किंवा मक्ते देण्याची जी पूर्वापार वहिवाठ असेल त्याप्रमाणें कुळांकडून वसूल करण्यास तो मुखत्यार असे.

येणेंप्रमाणें सन १८८० सालीं खोत व सरकार यांच्यामधील तंट्याचा दोघांच्या समजुतीनें अखेरचा निकाल लागला; व त्या वेळचे सरकारचे रिपोर्ट पाहिले तर असें आढळून येतें कीं, तेव्हां हा निकाल सरकारासही पूर्णपणें मान्य होता, इतकेंच नव्हे तर तो खोती गांवांतील कुळांसही हितकारक आहे असें त्यावेळीं सरकारास वाटत होतें. साऱ्याबद्दल जो वसूल यावयाचा तो सरकारी तिजोरींत जरी नक्त आला पाहिजे तरी कुळानें खोतास वटाईप्रमाणें धान्य दिलें तर एकप्रकारें त्यांत कुळाची सोयच आहे असें त्या वेळच्या सरकारी ठरावांत स्पष्ट म्हटलें आहे. परंतु खोत व सरकार यांच्या दरम्यानच्या तंट्याचा निकाल लागून दहा वीस वर्षें स्थिरस्थावर झाल्यावर सरकारी अम्मलदारांची पुनः बुद्धि फिरली; व १८८० सालीं दोघांच्या समजुतीनें झालेला आक्ट पुनः फिरविला पाहिजे असें त्यास वाटूं लागलें ! याचें मुख्य कारण असें कीं, कुळानें खोतास उत्पन्नाची अर्धेल किंवा तिर्धेल देण्याची जेथें वहिवाट आहे तेथें शेतांत पिकें उभीं असतां पिकाच्या उत्पन्नाचा अदमास आधीं पंचामार्फत करून नंतर त्या अदमासाप्रमाणें अर्धेल किंवा तिर्धेल घेण्याची रीत आहे. या अदमासास आभावणी म्हणतात. ही आभावणी खोतानें कोणत्या रीतीनें करावी याबद्दल सरकारानें नियम प्रसिद्ध केले आहेत. तथापि या आभावणीबद्दल कुळें आणि खोत यांच्या दरम्यान पुष्कळदां मतभेद होऊन ते तंटे मुलकी अंमलदारांस तोडावे लागतात. सर्व इलाखाभर शेतसाऱ्याकरितां रोख रुपये शेतकऱ्यांपासून घेण्याची कलेक्टरापासून कुळकर्ण्यापर्यंत सर्व कामगारांस इंग्रजी राज्यांत संवय लागलेली आहे; आणि या संवयीमुळें रत्नागिरी जिल्ह्यांत जे मुलकी कामगार जातात त्यांस खोत आणि त्यांचीं कुळें यांच्या दरम्यानचे आभावणीचे तंटे निवडण्याची मोठी कटकट किंवा दगदग वाटते. अर्थातच ही दगदग काढून टाकून कुळांनीं खोतास उत्पन्नाचा भाग न देतां त्याऐवजीं रोख पैसे किती द्यावे हें एकदां सरकारानें कायमचें ठरवावें असें बड्या बड्या मुलकी अधिकाऱ्यांचें म्हणणें पडलें; आणि साहजिकच सरकारासही तें म्हणणें सयुक्तिक वाटावयास लागलें. कुळांनीं या बाबतींत सरकाराकडे कधीं तक्रार केलेली नव्हती; किंबहुना रत्नागिरीसारख्या भिकार जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस शेतसाऱ्याबद्दल रोख रुपये भरण्यास लावण्यापेक्षां जें पीक येईल त्याची अर्धेल

किंवा तिर्धेल खोतास देणें हेंच त्यांस हितावह आहे, असें पंचवीस वर्षांपूर्वी सरकाचें मत होतें. पण हल्लींच्या मुलकी अधिकाऱ्यांच्या रिपोर्टावरून ते सरकारचें मत फिरलें आहे; आणि कुळांकडून खोतास उत्पन्नाचा जो भाग किंवा मक्ता मिळतो त्याऐवजीं कांहीं नक्त रुपये खोतास मिळावे अशा प्रकारची खोती अक्टांत दुरुस्ती करून खोतांचे प्राचीन हक्क बुडवावे असें सरकारच्या मनांत आलें आहे !

खोती अक्टांत सुधारणा करण्याचें दुसरें एक कारण असें झालें कीं, कुळांकडून खोतास उत्पन्नाचा जो भाग किंवा मक्ता मिळत असे तो १८८० च्या खोती कायद्यानें कायमचा करून टाकला. म्हणजे कूळ आपल्या शेताबद्दल अमुक पायली किंवा मण धान्य खोतास देत असतें अशी पुष्कळ वर्षांची वहिवाट जेथें आढळून आली तेथें तीच वहिवाट कायम करण्यांत आली. अर्थात् पुढें त्यापेक्षां खोतानें कधींही जास्त मक्ता घेऊं नये असें ठरलें. यानंतर रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्याची पाहणी होऊन या पाहणींत एकंदर गांवांवरील सारा इतका चढला कीं, गांवांतील कुळांकडून मक्त्यानें किंवा वटाईनें खोतास जें धान्य येई त्याच्या किमतीपेक्षांहि सबंध गांवच्या साऱ्याची रक्कम जास्त वाढली ! तेव्हां कुळाकडून १०० रुपयांचें धान्य खोतास मिळावयाचें आणि खोतानें त्यांत आपल्या पदरचे २५ रुपये घालून सरकारास गांवच्या साऱ्याबद्दल १२५ रुपये भरावयाचे अशी पाळी आली ! सरकारी सारा शेतकऱ्यांस किती डोईजड झालेला आहे याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. असो; हे सारे वाढले तेव्हां खोतांनीं सरकारास असा अर्ज केला कीं, एक तर कुळाकडून आम्हांस जे मक्ते येतात ते वाढविण्याची आम्हांस परवानगी द्या म्हणजे वाढलेला सारा आम्ही भरतों, किंवा वाढलेले सारे तरी कमी करा. खोतांचें हें म्हणणें अगदीं सरळ व न्यायाचें होतें, व सरकारानेंही तें वाजवी आहे असें एक दोन ठिकाणीं कबूल केलें आहे. पण चमत्कार असा कीं, खोतांच्या विनंतीप्रमाणें सन १८९८ सालापर्यंत कुळांचे मक्ते वाढविण्याचीही सरकारानें कांहीं तजवीज केली नाहीं ! आणि पाहणींत वाढलेले सारेही कमी केले नाहींत ! तेव्हां खोतांनीं सारा भरण्याचें नाकारिलें आणि ते सारा देईनात म्हणून गांवचे गांव सरकारांनीं जप्तींत टाकले. याबद्दल लोकांकडून व प्रांतिक सभेकडून पुष्कळ ओरड झाली, पण सन १८९८ पर्यंत न्यायी सरकाराकडून त्याचा कांहीं विचार झाला नाहीं; मात्र गांवाची जप्ती केल्यावर कुळांकडून भर साऱ्याइतका मक्ता सरकार वसूल करीत आहे. म्हणजे जी गोष्ट खोतास करूं देण्याचें सरकारनें नाकारिलें तीच आपण जप्तीदारांकडून सरकार करवीत आहे. यांचें नांव न्याय !

वरील दोन करणांकरितां खोतीं आक्टाची दुरुस्ती करणें भाग पडलें. पैकीं पाहिलें कारण अधिकाऱ्यांची सोय होय. दुसरें कारण मात्र वाजवी आणि न्यायाचें आहे. खोतापासून १० रुपये आपण घेऊन त्यास कुळाकडून १० रुपये घेऊं न देणें म्हणजे केव्हांही अन्याय आणि दांडगाईच होय. आतां या दोन्ही कारणांकरितां खोती आक्टांत काय दुरुस्ती करण्याचें सरकारानें योजिलें आहे तें पाहूं. सन १८९८ सालीं जें बिल सरकारानें कायदेकौन्सिलापुढें आणलें होतें त्यांत कुळाकडून खोतास मिळणाऱ्या उत्पन्नाच्या भागाऐवजीं सर्वत्र रोख रुपये खोतास देण्याचें ठरवावें असें कलम होतें. परंतु भात-जमिनीच्या उत्पन्नाची अर्धेल किंवा वर्कसच्या उत्पन्नाची तिर्धेल यांची किंमत कशी करावी याबद्दल बरीच अडचण पडली होती. अखेरीस कमिटीनें असें ठरविलें कीं, शेतावर जो सारा मोजर्णीत बसला असेल त्याच्या सहापट एकंदर उत्पन्न धरण्यास हरकत नाहीं. म्हणजे सरासरीनें उत्पन्नाच्या एकषष्ठांश-किंवा सहावा हिस्सा सारा आहे असें ठरविलें. साऱ्याच्या सहापट उत्पन्न धरल्यावर अर्धेल म्हणजे साऱ्याची तिप्पट आणि तिर्धेल म्हणजे साऱ्याची दुप्पट झाली; आणि याप्रमाणें खोती गांवांतील सर्व कुळांच्या मक्त्याची किंमत करावी असें कमिटीनें ठरविलें. या ठरावावर त्यावेळीं अशी तक्रार झाली कीं, कांहीं ठिकाणीं साऱ्याच्या सहापटीपेक्षां उत्पन्न जास्त असेल किंवा कमी असेल, करितां हें किंमतींचें मान बरोबर नाहीं; आणि यदाकदाचित् बरोबर धरलें तरी कूळ व खोत यांच्या दरम्यानचा व्यवहार अशा रीतीनें बदलण्यास सरकारास अधिकार नाहीं. बटाईचा किंवा उत्पन्नाचा भाग खोतानें घेण्याची हल्लींची वहिवाट प्राचीन असून कुळास हितावह आहे; व केवळ अधिकाऱ्यांस दगदग पडते म्हणून त्यांच्या सुखाकरितां ती मोडून टाकणें इष्ट नाहीं. खोती कायद्यांत १८८० सालीं जो नियम झालेला आहे तो परस्परांच्या संमतीनें झाला असल्यामुळें त्यांत सरकारानें आपण होऊन आतां एकट्यानेंच फरक करणें म्हणजे वचनभंग करणें होय. ही तक्रार झाल्यानंतर १८९८ मध्यें आलेलें बिल सरकारानें मागें घेतलें व हल्लींच्या बिलांत त्याबद्दल असें कलम घातलें आहे कीं, कुळाकडून येणारा मक्ता कुळाचा अर्ज असेल तर नक्त रुपयांत ठरवून द्यावा, आणि हा ठराव करतेवेळीं अर्धेल म्हणजे साऱ्याची तिप्पट आणि तिर्धेल म्हणजे साऱ्याची दुप्पट असें प्रमाण दुसरा विरुद्ध पुरावा नसेल तर धरावें. परंतु कुळास तरी हा हक्क कोठून आला हा प्रश्न शिल्लक राहतोच. शिवाय साऱ्याच्या सहापट उत्पन्न हें प्रमाण नेहमींच धरलें पाहिजे असा नियम जरी हल्लींच्या बिलांत नाहीं तरी समान्यतः मुलकी अधिकाऱ्यांची प्रवृत्ति यापेक्षांही उत्पन्न कमी धरण्याकडे जाणार हें लक्षांत आणलें म्हणजे एकपक्षीं या बाबतींत कांहीं तरी कायमचा नियम असणें बरें असें वाटतें. रत्नागिरी जिल्ह्यांतील

खोतांनीं बिलांतल्या या शर्तींचा विचार करून त्यांच्या प्रांताचे कौन्सिलांत असलेले मेंबर ना. खरे यांच्या मार्फत आपलें मत कौन्सिलापुढें ठेवण्यास हयगय करूं नये. दुसरी गोष्ट अशी कीं, कुळानें अर्धेल, तिर्धेल किंवा मक्ता न दिल्यास त्याजकडून तो वसूल करण्याकरितां लँड रे० कोड कलम ८६ प्रमाणें कलेक्टरकडे मदत मागण्याचा खोतास हल्लींच्या कायद्याप्रमाणें अधिकार आहे; व खोती आक्टाचें कलम १३ प्रमाणें सदर अर्धेल, तिर्धेल किंवा मक्ता यांची बाजारभावाप्रमाणें किंमत करून ती किंमत कुळाकडून वसूल करण्यास कलेक्टरास मदत देतां येते. हल्लींच्या बिलानें खोती आक्टाचें हें कलम रद्द करावयाचें आहे; व त्याचा असा उद्देश आहे कीं, हें कलम रद्द झालें म्हणजे अर्धेल, तिर्धेल किंवा यांच्या किंमतीच्या इतके पैसे वसूल करण्यास मदत न मिळतां फक्त साऱ्याइतके पैसे मात्र कुळाकडून वसूल करण्यास लँ. रे. को. कलम ८७ प्रमाणें खोतास मदत मिळेल, आणि असें झालें म्हणजे मक्ते, अर्धेल किंवा यांच्या ऐवजीं कुळाकडून रोख पैसे घेण्याची पद्धतच खोतास हळूहळू हितावह वाटेल. सारांश, एकपक्षीं मक्त्याच्या ऐवजीं रोख सारा करण्याचें जरी एकदम ठरविलें नाहीं, कुळाच्या इच्छेवर ठेवलें आहे, तरी पर्यायानें मदतीच्या बाबतींत खोतास अडवून अखेरीस खोताचीही त्यास संमति मिळावी अशी या बिलाची योजना केलेली आहे. अर्थात् खुषीच्या सक्तीचा हा एक प्रकार आहे असें म्हणणें भाग येतें. ही सुधारणा करण्यांत सरकारानें कुळाची सोय पाहिली कीं आपल्या अधिकाऱ्यांची सोय पाहिली हा एक मोठाच प्रश्न आहे. तथापि, कोणाचीही सोय असो, यामुळें खोतीचे हक्क बुडून जाऊन हळूहळू खोत लोक घाटावरील कुळकर्ण्यांच्या पायरीस येऊन पोंचणार हें उघड आहे. एखाद्या ठिकाणच्या साऱ्याची पद्धत इतर ठिकाणच्या साऱ्याच्या पद्धतीहून निराळी असली म्हणून तेवढ्याच सबबीवर ती बुडविण्यास तयार होणें न्यायी व सुधारलेल्या सरकारास योग्य नाहीं.

आतां दुसऱ्या कारणाचा विचार केला तर त्याबद्दल कांहीं तरी तोड काढणें सरकारास जरूर होतें. कुळाकडून खोतास १०० रु. यावे व खोतानें सरकारांत १२५ भरावे हा अन्याय इतका ढळढळीत आहे कीं, त्याची उपेक्षा आजपर्यंत सरकारानें कशी केली यार्चेंच आम्हांस नवल वाटतें. साऱ्याच्या सहापट शेतार्चें उत्पन्न असतें ही गोष्ट सरकारास मान्य आहे , तर जेव्हां सारा वाढतो तेव्हां अर्धेलीचो वहिवाट असेल तेथें त्याच्या दुपटीनें व तिर्धेलीची वहिवाट असेल तेथें साऱ्याइतकेंच खोतार्चें उत्पन्न वाढवावयास नको काय ? फेरपाहणीच्या वेळीं जेव्हां शेतसारा वाढतो तेव्हां त्यार्चें कारण सरकारांतून असें देण्यांत येतें कीं, गवत, धान्य किंवा इतर शेतीचें उत्पन्न यांची किंमत सडका, रस्ते, आगगाड्या इत्यादि कारणानें वाढल्यानें त्यांच्या फायद्याचा कांहीं अंश घेण्याकरितां

सरकार सारा वाढवितें. सध्यां हेंच कारण संयुक्तिक आहे, असें आपण घेऊन चालूं. शेतांत कूळ जें धान्य उत्पन्न करतें त्याची किंमत वाढल्यास त्या वाढींतील सरकारास जसा भाग मिळतो तसाच पूर्वापार वहिवाटीप्रमाणें व हक्काप्रमाणें खोतासही मिळाला पाहिजे. खोत व सरकार यांचा शेताच्या उत्पन्नांत किती भाग असतो हें खोती कायद्यानें ठरलेलें आहे. म्हणजे प्रथमतः साऱ्याच्या सहापट उत्पन्न धरावयाचें. उदाहरणार्थ, भातशेताचा एक रुपया सारा असला तर उत्पन्नाची किंमत सहा रुपये झाली. या सहा रुपयांपैकीं ३ रु. कुळास, २ रु. खोतास व १ रुपया सरकारास मिळावयाचा. आतां आपण असें समजूं कीं, १ रुपया साऱ्याच्या ऐवजीं सरकारानें सारा २ रु. केला; अर्थात् साऱ्याची ही वाढ सरकारच्या नियमाप्रमाणें उत्पन्न वाढल्याखेरीज कांहीं झालेली नाहीं. म्हणजे दोन रु. सारा वाढला तेव्हां शेताचें उत्पन्न ६ च्या ऐवजीं १२ रु. झालें असलें पाहिजे. या १२ रुपयांपैकीं वरील हिशेबानें सरकारास २ रुं. खोतास ४ रु. व कुळास ६ रु. राहिले पाहिजेत. अर्धेलीच्या ऐवजीं तिर्धेलीची किंवा दुसऱ्या कांहीं मक्त्यांची जर वहिवाट असेल तर त्याप्रमाणें वरील हिश्शेरसींत थोडा फरक होईल. पण हिश्शेरसीचें तत्त्व काहीं बदलत नाहीं व हेंच तत्व खरें म्हटलें असतां देवगड तालुक्यासही लागू केलें पाहिजे. देवगड तालुक्यांत सरे वाढण्यापूर्वी खोत लोक कुळाकडून जो मक्ता घेत असत त्या मक्त्याचा कांहीं भाग सरकारांत भरून बाकी उत्पन्न खोतीचा फायदा म्हणून ते आपण घेत. परंतु आतां सारा इतका वाढला आहे कीं कुळाकडून येणाऱ्या उत्पन्नाच्या भागाच्या किंमतीपेक्षां साऱ्याची रक्कम जास्त झालेली आहे. अशा स्थितींत खरा न्याय म्हटला म्हणजे पूर्वीच्या साऱ्याच्या जितक्या अंशानें अथवा पटीनें खोत फायदा खोतास राहत असे तितकाच हल्लींच्या साऱ्याच्या अंशानें किंवा पटीनें तो आज राहिला पाहिजे. पण हल्लींच्या बिलांत हें तत्व अजिबात सोडून दिलें आहे; आणि असें ठरविलें आहे कीं, कुळाकडून येणारा मक्ता किंवा उत्पन्नाचा भाग याच्या किंमतीपेक्षां सरकारी सारा जेव्हां जास्त होईल तेव्हां सदर मक्ता साऱ्याच्या रकमेच्या सव्वापटीपर्यंत कलेक्टरानें वाढवून द्यावा, यापेक्षां जास्त वाढवूं नये. म्हणजे सरकाराला १ रु. सारा तर त्यामागें दोन रुपयांच्या ऐवजीं ४ आणे खोतास मिळावे. आमच्या मतें हें कलम फारच भयंकर आहे; व पुढें मागें खोतीचे हक्क बुडतील तर ते यानेंच बुडतील. तीस तीस वर्षांनीं सरकारचे सारे थोडेबहुत तरी वाढत जाणारच; आणि आज नाहीं तर पन्नास वर्षांनीं तरी देवगड तालुक्यासारखी सर्व रत्नागिरी जिल्ह्याची स्थिति होऊन साऱ्याच्या रकमेवर रुपयास ४ आण्यांपेक्षां जास्त खोतास कांहीं मिळावयाचें नाहीं. साऱ्याच्या सहापट उत्पन्न आणि अर्धेलीतिर्धेलीचें व लक्षांत आणलें असतां सरकारी साऱ्याच्या दुप्पट किंवा तिर्धेलीच्या मानानें

सरकारी साऱ्याइतका फायदा खोतास राहिला पाहिजे. पण देवगड तालुक्याची जी व्यवस्था हल्लींच्या बिलांत केलेली आहे त्या व्यवस्थेनें कांहीं वर्षांनीं साऱ्याच्या रकमेवर १५ पासून २५ टक्केपेक्षां जास्त फायदा खोतास मिळणें शक्य नाहीं. ही व्यवस्था कितपत न्यायाची आहे हें आम्हीं सांगाक्यास पाहिजे असें नाहीं. खोत इनामदारापेक्षां कमी योग्यतेचे आहेत म्हणजे इनामदारास सारा अजिबात माफ असतो व खोतास तो द्यावा लागतो. परंतु गांवचें सर्व उत्पन्न इनामदाराप्रमाणें खोतास न मिळालें तरी कुळाकडून निम्मे किंवा तृतीयांश उत्पन्न त्यास मिळतें आणि या उत्पन्नांतून सरकारसारा भागून बाकी जी शिल्लक राहते ती खोतीच्या हक्काबद्दल त्यास मिळते. ही स्थिति सरकारास सहन होत नाहींसें दिसतें; आणि कुळाचा फायदा करण्याच्या मिषानें खोताला मिळणाऱ्या रकमेपैकीं बहुतेक म्हणजे पाऊण हिस्सा भाग सारे वाढवून त्या रूपानें सरकार आपण घेऊं इच्छित आहे. इतकेंच नव्हे तर, त्याकरितां नवे नवे कायदे करून आपण पूर्वी दिलेल्या वचनाचा भंग करण्यासही तें तयार झालेलें आहे. देवगडाच्या बाबतींत सारे वाढवून आजपर्यंत ढळढळीत कसा अन्याय झाला हें वर सांगितलेंच आहे. हा अन्याय दूर करण्याकरितां म्हणून सरकारानें हल्लीच्या बिलांत सदर तालुक्यांतील खोतांस मिळणारे मक्ते साऱ्याच्या सवापटीपर्यंत वाढवावे असें कलम घातलें आहे.पण या कलमांत नमूद केलेल्या तत्वाचा दूरवर विचार करितां हेंच उंटाचें पिल्लूं हळू हळू वाढून पुढें खोतीच्या घराचें छप्पर उचलून घर उध्वस्त करणार हें निर्विवाद आहे, करितां त्याचा योग्य वेळींच प्रतिकार करण्यास झटलें पाहिजे. दिसण्यांत देवगडचा अन्याय दूर करतों असें दाखविलें आहे, पण त्याकरितां योजलेलें तत्व पुढें सर्व खोतांच्या बोकांडीस बसेल व त्यांचे हक्क नामशेष होतील असें उघड उघड दिसत आहे. अशा स्थितींत बिलांतील यासंबंधाची व्यवस्था न्याय्य म्हणावी कीं अन्याय्य म्हणावी याचा खोत लोकांनींच नीट विचार करावा. आम्हांस तर हें तत्व भयंकर दिसत आहे, व याकरितां खोत लोकांनीं याबद्दल वेळींच सावध राहून याबद्दल कायतजवीज करणें असेल ती करावी अशी आम्ही त्यांस सूचना केली आहे. खोतीच्या हक्कांत खोताच्या संमतीखेरीज सरकारास हात घालतां येतो कीं नाहीं हाही एक प्रश्न आहेच. पण त्याचें विवेचन आजच करण्याची जरूर नाहीं. बिलांतील मुख्य मुद्दे आज दिले आहेत. त्याबद्दल आणखी लिहावयाचें तें सध्यांच्या बिलाचें पहिलें वाचन व सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट होईल तेव्हां लिहूं.

❖ ❖ ❖

* सुशिक्षितांचीं कर्तव्यें

गेल्या सालीं, शेतकऱ्यांनीं आपापसांत परस्परसाहाय्यकारी बँका किंवा पेढ्या कढाव्या व अशा पेढ्या काढण्याच्या कामीं देशांतील बी. ए. आणि एम्. ए. जितकी खटपट करावी तितकी करीत नाहींत वगैरे जे ऑ. मि. लेली यांनीं कायदेकौन्सिलांत भाषण केलें होतें, आणि त्या बाबतींत सुशिक्षित वर्गावर जे आरोप केले होते त्यास मि. मेथा यांनीं यंदाच्या सालीं आपल्या बजेटवरील भाषणांत उत्तर दिलें ही गोष्ट वाचकांस माहीत आहेच. कोणीहि इंग्रजी शिकलेला मनुष्य सरकारावर थोडीशी टीका करण्यास प्रवृत्त झाला कीं, लागलीच तो अप्रामाणिक ठरतो आणि तीच टीका जरा तीव्र झाली कीं, त्यास राजद्रोही ठरविण्यांत येतें असें सांगून मि. मेथा यांनीं या वर्गाची स्थिति किती दुर्धर आहे, हें गव्हर्नर साहेबांच्या चांगलें नजरेस आणलें; आणि लेली साहेब कितीही उदार अंतःकरणाचे असले तरी सुशिक्षित वर्गावर त्यांनीं आणलेले आरोप कोते आणि निराधार आहेत इतकेंच नव्हे तर, या वर्गासंबंधानें साहेबांचें मन विनाकारण कलुषित झालेलें आहे असें आपल्या भाषणांत सांगितलें. यावर लेलीसाहेबांनीं काश्मिराहून 'टाइम्स ऑफ इंडिया'स एक पत्र धाडलें असून त्यांत आपलें मत अधिक विस्तारानें सांगून असें प्रतिपादन केलें आहे कीं, सरकारावर टीका करणारा मनुष्य ज्याप्रमाणें राजद्रोही होत नाहीं, त्याप्रमाणें सुशिक्षित वर्गावर टीका करणारा मनुष्यही त्यांचा द्वेष्टा समजला जाऊं नये. गंगानदी, हिमालय पर्वत इत्यादि गोष्टी ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत कायमच्या आहेत त्याप्रमाणें इंग्रजी राज्यहि हिंदुस्थानांत कायम झालें आहे असें समजून सुशिक्षित वर्गानें हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत जेणेंकरून आपली सल्ला किंवा मदत सरकारास नेहमीं अवश्य लागेल अशा प्रकारचें मोठ्या मुत्सद्दीपणाचें वर्तन ठेवून उद्योगास लागावें असा लेलीसाहेबांनीं या वर्गास मोठ्या उदारपणें उपदेश केलेला आहे. या लेलीसाहेबांच्या उपदेशास उत्तर म्हणून मद्रासच्या 'हिंदु' पत्रांत एक लेख प्रसिद्ध झाला आहे; पण त्याशिवाय लेलीसाहेबांच्या उपदेशाची निरर्थकता कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखी आहे. इंग्रजसरकारनें जें शिक्षण आम्हांस दिलें आहे व देत आहे, इंग्रजी भाषेच्या द्वारें युरोपियन राष्ट्रांचा जो इतिहास प्रत्यहीं आमच्या अवलोकनांत येत आहे, त्यामुळें हिंदुस्थानदेश निकृष्टदशेस कां आला, त्यांत राष्ट्रीयत्वाची व पुढाऱ्यांची उणीव कां पडली, एकीचा नाश

---

* [केसरी ता. ६ आक्टोबर १९०३]

होऊन परकीयांच्या सत्तेंत त्यांच्या बलानें नव्हे तर त्यांच्या युक्तीनें आम्ही एकामागून एक कसे सांपडले गेलों इत्यादि गोष्टी आतां आम्हांस चांगल्या कळूं लागल्या आहेत. इतकेंच नव्हे तर ही स्थिति सुधारण्यास काय उपाय करावे, निरनिराळ्या जातींत राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न करून राष्ट्रीय बाबतींत तरी सर्वांचें ऐक्य कसें संपादावें, ज्ञानाची आणि करारी स्वभावाची जोड आमच्या बुढाऱ्यांत कोणत्या साधनानें घडून येईल; स्वार्थत्याग, दृढनिश्चय, धैर्य इत्यादि अवश्य गुण राष्ट्रांतील लोकांत कसे येतील, इकडे पुष्कळांचें लक्ष लागलें आहे. सरकार अशा प्रकारच्या विचारांस राजद्रोही म्हणत असल्यास खुशाल म्हणो; पण मुंबईचे माजी लॉर्ड बिशप यांनीं सांगितल्याप्रमाणें हीं राजद्रोहाचीं फलें नव्हत तर पाश्चिमात्य शिक्षणानें उत्पन्न झालेल्या जागृतीचीं फलें होत. लेलीसाहेबांनीं, इंग्रजी राज्य या देशांत गंगानदीप्रमाणें आचंद्रार्कस्थायी झालेले आहे ही गोष्ट सुशिक्षित लोकांनीं गृहीत धरून चालावें असा त्यांस उपदेश केलेला आहे. उपदेश ठीक आहे; पण लेलीसाहेबांस प्रश्न एवढाच आहे कीं, इंग्रजी राज्य म्हणजे काय ? राज्य या शब्दाचा अर्थ जर हल्लीं चालू असलेली पद्धत असा असेल, किंवा हजारों इंग्रज लोक आज ज्याप्रमाणें हिंदुस्थान देशावर चरत आहेत व एतद्देशीय लोकांच्या बुद्धीची, करामतीची, शौर्याची, व्यापाराची किंवा इतर प्रकारच्या प्रगतीची वाट बंद करीत आहेत तशीच ती पुढें बंद ठेवणें, हेंच जर इंग्रजी राज्याचें लक्षण असेल तर इंग्रजी राज्य या देशांत आचंद्रार्क राहणें अशक्य आहे, असें लेली साहेबांस निक्षून सांगण्यास आम्हांस कोणत्याही प्रकारची भीति वाटत नाहीं. लॉर्ड बिशप म्याकर्थर यांनीं म्हटल्याप्रमाणें एतद्देशीयांच्या मनांत इंग्रजी विद्येनें एक प्रकारची स्फूर्ति उत्पन्न झालेली आहे. आपल्या बुद्धिमत्तेस किंवा कर्तबगारीस इंग्रजी राज्यांत जो आळा पडलेला आहे तो अन्यायाचा आहे, व सरकारनें आपणांस योग्य सवलत दिल्यास आपण इंग्रज लोकांप्रमाणेंच स्वदेशहिताच्या कामीं अत्यंत उपयोगीं पडूं, अशा प्रकारची बुद्धि सुशिक्षित वर्गांत उत्पन्न झाली असून ती प्रत्यहीं वाढत आहे. ही गोष्ट दहा पांच वर्षांनीं साध्य होण्यासारखी नाहीं, हें सुशिक्षित लोकांस कळत नाहीं असें नाहीं, तथापि, केव्हांना केव्हां ही स्थिति आपणास प्राप्त झाली पाहिजे, तशी स्थिति प्राप्त होणें हा आपला हक्क आहे व आपण त्या स्थितीस योग्य आहों, अशी त्यांची खात्री असून हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत अशा उत्कर्षास प्रतिबंधक जे नियम आहेत, ते नाहींसे होण्याबद्दल वर्तमानपत्रांतून, सभांतून किंवा अन्यतऱ्हेनें त्यांची जारीनें खटपट सुरू आहे. या खटपटीचा प्रवाह अद्याप बाल्यावस्थेंत असल्यानें तो जितका लवकर नजरेंत भरावा तितका भरत नाहीं. तथापि कालांतरानें गंगानदीप्रमाणेंच हा प्रवाह वृद्धिंगत होऊन

इष्ट हेतूंच्या सागरास मिळाल्याखेरीज राहावयाचा नाहीं. इंग्रजी राज्यांतील मुत्सद्यांचें जर कांहीं खरें कर्तव्य असेल तर तें एतद्देशियांचा हा हेतु सिद्धीस नेण्यास मदत करणें हें होय; आणि हा अर्थ मनांत धरून इंग्रजी राज्य या देशांत चिरस्थायी राहील असें जर कोणी म्हणेल तर तें नाकबूल करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांतील लोक शहाणे, स्वकर्तव्यास जागणारे आणि एकीनें वागणारे होऊन जेव्हां ते स्थानिक स्वराज्याच्या हक्कास पूर्णपणें पात्र होतील तेव्हांच हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यव्यवस्था खरी फलद्रूप होईल, असें जें बिशप म्याकर्थर यांनीं म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं गुलाम होऊन त्यावर इंग्लंडांतील पोरांनीं रगडून हवा तसा अम्मल चालवावा हें कांहीं इंग्रजी राज्याचें खरें लक्षण किंवा स्वरूप नव्हे. ही स्थिति न्यायाची नसून मानवी स्वभावाच्याहि विरुद्ध आहे. अर्थात् ती चिरस्थायी नाहीं, व ती चिरस्थायी आहे असें धरून जर लेलीसाहेब आम्हांस उपदेश करीत असतील तर तो त्यांचा उपदेशहि चुकीचा आहे, इतकेंच नव्हे तर, उपरोधिक आणि चीड आणणारा आहे. आमच्या लोकांत निदान आमच्या पुढाऱ्यांत जितका ताठरपणा किंवा करारी स्वभाव पाहिजे तितका अद्याप तो नजरेस येत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. फार लांब कशाला ? म्युनिसिपालिटींत फुकट काम करणाऱ्या एखाद्या रावसाहेबास जर एखाद्या गोऱ्या प्रेसिडेंटानें शेलक्या शिव्या दिल्या तर आमचे रा. सा. कदाचित् राजीनामा देतील,पण तो खाजगी कारणाकरितां (शिव्यांमुळें नव्हे) दिला, असें त्यांत लिहितील ! असला प्रकार शोचनीय तर खराच, पण त्याजबरोबरच दुसरी अशी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, करारी व बाणेदार स्वभाव बनण्यास जसें शिक्षण पाहिजे तसें हल्लींच्या शाळांतून मिळत नाहीं इंग्रजी शिक्षणानें मन जितकें संस्कृत होतें त्याप्रमाणें मनुष्याचा स्वभाव करारी किंवा निश्चयी बनण्यास मदत होत नाहीं. आमच्या सर्व शाळा व कॉलेजें हीं बहुतेक अंशीं सरकारी नोकरांचे हमालखाने झाले आहेत. कारकून, खालच्या प्रतीचे रेव्हिन्यू, ज्यूडीशियल, इंजिनियरिंग आणि मेडिकल अंमलदार तयार करण्याकरितां जें शिक्षण अवश्य लागतें तें या शाळांतून दिलें जातें; व त्याबरोबरच अशी काळजी घेतली जाते कीं, शाळेंतून बाहेर पडणारे विद्यार्थी स्वतंत्र विचाराचे किंवा निश्चयी आणि करारी स्वभावाचे होऊं नयेत. अशा स्थितींत सुशिक्षित वर्गांतून निश्चयाचे आणि पूर्ण स्वार्थत्याग करणारे बरेचसे पुढारी बाहेर पडतील कीं नाहीं याचा संशय आहे. "तुम्ही चांगले बुद्धिवान् आहांत; पण निश्चय, धैर्य, वगैरे जे गुण स्वभावतःच इंग्रज लोकांत आढळून येतात ते तुमच्यांत आढळून येत नाहींत " अशा प्रकारें बहुतेक इंग्लिश लोक आम्हांस दूषण देत असतात. पण यांपैकीं कोणीही असा विचार करीत नाहीं कीं, इंग्लंडांतील शाळांतून विद्यार्थ्यांचा स्वभाव निश्चयी

बनण्यास जीं साधनें आहेत, अथवा त्याबद्दल तेथें जी काळजी घेतात अगर उत्तेजन देतात तशीं साधनें, काळजी अगर उत्तेजन हिंदुस्थानांतील शाळांतून मिळतें काय ? कदाचित् खाजगी शाळांतून असें उत्तेजन मिळालें असतें, पण त्याही सरकारी वरवंट्याचे खालीं ओढून सरकारी व खासगी मिळून दोन्ही शाळांचीहि एकसारखी बारीक चटणी वांटण्याचा सरकारानें जो नवा क्रम सुरू केला आहे त्यामुळें हल्लींच्या शाळेंतील शिक्षणानें स्वावलंबी, निश्चयी आणि स्वार्थत्यागी पुरुष पुढें देशांत निपजणें बहुतेक दुरापास्त झाल्यासारखें दिसत आहे. ही स्थिति म्हणजे कायमची राहील असें आम्हीं समजत नाहीं. 'जेथें इच्छा आहे तेथें मार्ग आहे' अशी एक इंग्रजींत म्हण आहे. या म्हणीप्रमाणें हिंदुस्थानास चांगली दशा प्राप्त व्हावी अशी जी हल्लीं इच्छा दिसत आहे ती आळें फोडून कोठें ना कोठें तरी बाहेर पडल्याखेरीज राहावयाची नाहीं. याकरितां लेली साहेबांनीं केलेला उपदेश आमच्या मतें अगदींच असमंजसपणाचा आहे. गंगानदीप्रमाणें इंग्रजी राज्य आचंद्रार्क समजून मग काय तो आपला मुत्सद्दीपणा दाखवा, असा उपदेश करणें म्हणजे दहा पांच लोकांनीं दुसऱ्याच्या घरांत शिरून तेथें त्याच्या घरांतील साहित्य घेऊन मिष्टान्न तयार करावें आणि भोजनास बसल्यावर " अरे तुझ्या घरीं असेंच आम्ही नित्य भोजनास बसणार, असें लक्षांत ठेवून मग काय जो तुला उद्योग करावयाचा कसेल तो कर, पाहिजे तर उष्टीं काढ किंवा शेष राहिलेलें अन्न आपल्या आप्तवर्गास बरोबर घेऊन मजेनें भक्षण कर, त्यास आमची कांहीं हरकत नाहीं" असें म्हणण्याइतकेंच शहाणपणाचें आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचा सारा थकला कीं त्या जप्त करून सरकारानें आपल्या ताब्यांत घ्याव्या, तीस तीस वर्षांनीं सारे वाढवावे, आणि शेतकीचे उद्योगधंदे हळूहळू सर्व बुडवून टाकावे, पण त्यास आम्हीं नांवें ठेवूं नये इतकेंच नव्हे तर, गंगानदीप्रमाणें विलायतेच्या स्वर्गाहून हा राजनीतीचा ओघ आमचें आचंद्रार्क कल्याण करण्याकरितांच या देशांत येऊन धडकला आहे, असें आम्हीं मानावें, आणि नंतर पुन्हां शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास शेतकऱ्यांच्या पेढ्या हाच उपाय आहे, असें कोणी सरकारी अधिकाऱ्यानें सुचविल्याबरोबर शेपटी हालवीत 'वा काय नामी उपाय !' असें म्हणत त्यास मदत करण्याविषयीं चढाओढीनें झटावें, असा लेली साहेबांच्या म्हणण्याचा खरा अर्थ आहे. आमच्यापैकीं कांहीं पुढारी याच मार्गाचें सध्यां अवलंबन करीत आहेत; आणि प्लेगासारख्या बाबतींत आम्ही अमुक प्रकारें सक्ती करणार, असें सरकारानें जाहीर केल्याबरोबर त्याच कामाकरितां व्हालंटीअर होऊन धन्यतेनें सोन्याचीं किंवा रुप्याचीं पदकें मिळवित आहेत हें आम्ही जाणून आहों, व कदाचित् याच धोरणावर लेली साहेबांनीं उपदेश केला असेल; पण हें धोरण किंवा मुत्सद्दीपणा सुशिक्षित वर्गास उत्तरोत्तर अधि-

काधिक अप्रिय होत जाईल, अशी आमची खात्री आहे. हल्लींच्या शिक्षणानें स्वावलंबनाची, स्वार्थत्यागाची किंवा स्वपराक्रमाची बुद्धि जितकी जागृत व्हावी तितकी होत नाहीं, हें खरें आहे; पण ही स्थिति कायमची नाहीं. 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' हा जो कविकुलगुरूचा सिद्धांत आहे, त्याच्या सत्यतेवर आमचा भरंवसा आहे; व आमची अशी खात्री आहे कीं, आम्हांस हल्लीं जें इंग्रजी शिक्षण मिळत आहे, त्यामुळें थोड्याच कालांत आमच्यामध्यें अशीं माणसें उत्पन्न होतील कीं, वर सांगितलेल्या दृष्टांताप्रमाणें आमच्या घरांत घुसून आमचीं सर्व मिष्टान्नें खाणाऱ्या मंडळीचें उच्छिष्ट खाणें किंवा त्यांचीं उष्टीं काढणें हें आपलें काम नव्हे, तर त्यांच्याबरोबरच, किंबहुना त्यांनीं घेतलेल्या ताटापैकींच आपण एक ताट ओढून घेऊन यथेच्छ भोजन करण्याचा आपला हक्क आहे असें त्यांस वाटेल, व तो हक्क संपादन करून घेण्यास लागणारा निश्चय किंवा स्वार्थत्याग त्याच्या अंगीं पूर्णपणें आढळून येईल. सुशिक्षितांचें जर कांहीं खरें कर्तव्य असेल तर हेंच होय व आम्हांस जें इंग्रजी शिक्षण मिळत आहे तेंही याचकरितां दिलें जात आहे असें आम्हीं समजतों. सूर्याच्या आड ज्याप्रमाणें कधीं कधीं ढग येऊन त्यास आच्छादित करतात त्याप्रमाणें सुशिक्षितांच्या खऱ्या कर्तव्याचीहि दिशा किंवा इंग्रजी शिक्षणापासून होणारा हा परिणाम क्षणभर खुंटविण्याचे किंवा थांबविण्याचे प्रयत्न कांहीं कोत्या दृष्टीच्या सरकारी अधिकाऱ्यांकडून होतील; नाहीं असें नाहीं. पण ज्ञानसूर्याचा एकदां उदय झाल्यावर तो असल्या अभ्रांनीं सदैव आच्छादित राहणें अशक्य आहे; आणि ही गोष्ट लक्षांत ठेवून जर इंग्रजी राज्यांतील अधिकारी सुशिक्षित वर्गाशीं वागतील तर त्यांतच दोघांचें हित आहे. किंबहुना इंग्रजी राज्य या देशांत चिरस्थायी व्हावयाचें असेल तर तें याच उपायानें होईल, इतर उपायांनीं होणार नाहीं.

❁ ❁ ❁

* शेतकऱ्यांच्या व कारागिरांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या.

हिंदुस्थान देशांतील शेतकऱ्यांची स्थिति उत्तरोत्तर खालावत चालली आहे व वारंवार कर्ज काढावयास लागत असल्यामुळें सावकार कधीं त्यांस सुटत नाहीं अथवा सावकारास व्याज भरण्यांतच त्यांचें सर्व उत्पन्न नाहींसें होतें, ही गोष्ट हिंदुस्थानसरकारच्या आज बरींच वर्षें नजरेस आलेली आहे; व ती सुधारण्यास काय काय उपाय योजावे, याबद्दल सरकारांत विचारहि चालू आहे. परंतु राज्यकारभाराच्या इतर बाबतींत ज्याप्रमाणें सरकारचें मत व लोकमत भिन्न झालेलें आहे त्याप्रमाणेंच या विषयाचीहि स्थिति आहे. शेतकरी लोक दारिद्री झाले आणि एक वर्ष पाऊस न पडला तर त्यास दुष्काळचीं कामें पहावीं लागतात ही वस्तुस्थिति दोन्ही पक्षांसहि मान्य आहे. लोकांचें असें म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यास अशी स्थिति प्राप्त होण्याचें मुख्य कारण देशांतील उद्योगधंदे बुडून वाढत्या प्रजेस केवळ शेतकीवरच निर्वाह करावा लागतो आणि देशांतील संपत्तीचा ओघ विलायतेकडे वळला असल्यामुळें चांगले व परोपकारी सावकारहि राहिले नाहींत, हें होय. ही स्थिति सुधारावयाची असेल तर पूर्वीच्या अमदानींत खेडेगांवांतील लोकांस जे धंदे करतां येत असत ते अगर तशा प्रकारचे धंदे त्यांस मिळावे अशा प्रकारें तजवीज करून हलक्या व्याजानें शेतकऱ्यांस पैसे मिळतील अशी व्यवस्था करा, असें लोकपक्षाचें म्हणणें आहे आणि त्याप्रमाणें कांहीं उदारबुद्धीच्या सावकारांनीं एकत्र जमून आपणांस सरकार कांहीं सवलती देत असेल तर आपण शेतकीच्या पेढ्या काढून शेतकऱ्यांस हलक्या व्याजानें पैसे देण्यास तयार अहों, असें सरकारास कळाविलें होतें. पण ही व्यवस्था सरकारास रुचली नाहीं व सर डब्ल्यू. वेडरबर्नसारखे गृहस्थ मध्यस्थ असतांहि अशा तऱ्हेच्या सावकारी पेढ्यांस सरकार मदत करण्यास तयार नाहीं, असा या कामीं उद्योग करणारास जबाब मिळालेला आहे. ही गोष्ट येथें नमूद करण्याचें कारण एवढेंच कीं, सरकारचें या कामीं धोरण कोणत्या प्रकारचें आहे हें वाचकांच्या नीट लक्षांत यावें. शेतकरी किंवा कारागीर आणि सरकार यांच्या दरम्यान नेहमीं जमिनदार किंवा सावकार यांच्यासारखा धनिक वर्ग प्रत्येक देशांत असतो. हिंदुस्थानांतच सावकाराचें कारागिरावर किंवा शेतकऱ्यावर प्राबल्य

---

* [केसरी ता. १० नोव्हेंबर १९०३.]

चालतें असें नाहीं, तर इंग्लंडसारख्या देशांतहि ही स्थिति शतपट अधिक प्रमाणानें दृष्टीस पडते. ज्या गृहस्थांनीं कोट्यावधि रुपये खर्च करून इंग्लंडांत सूत काढण्याचे, कापड विणण्याचे, लोकरीचे, लोखंडाचे, वगैरे मोठ-मोठे कारखाने काढले आहेत त्या कारखान्यांतील बहुतेक मजूर आपल्या जीवनार्थ या कारखानदारांच्या मर्जीवरच अवलंबून असतात. हे मजूर किंवा कारागीर आपापल्या मंडळ्या काढून त्या मंडळीच्या जोरावर संपानें मोठमोठ्या कारखानदारांस अडवतात व हक्कानें अमुक एक मजुरी मागून घेतात असें कधीं कधीं आढळण्यांत येतें. पण एकंदरींत मजुरांचा वर्ग आपल्या धनिक कारखानदारांवर आणि शेतकऱ्यांचा वर्ग धनिक जमिनदारांवर अवलंबून असतो. ही गोष्ट सर्व देशांतून—सर्व पाश्चिमात्य देशांतूनहि—चांगली नजरेस येते. परंतु हिंदुस्थानसरकारास तशी स्थिति नको आहे. येथील सरकारचें असें मत आहे कीं, शेतकऱ्यांस जर कोणीं बुडविलें असेल तर तें सावकारांनींच बुडविलें आहे; आणि शेतकऱ्यांस साहाय्य करण्याकरितां सावकारांच्या जर पेढ्या निघाल्या तर शेतकरी उत्तरोउत्तर आधिकाअधिक सावकारांच्या कबज्यांत जातील व त्यामुळें सावकारांचें महत्त्व पूर्वीपेक्षांही अधिक वाढेल. सर डब्ल्यू वेडरबर्न यांचे मार्फत वीस पंचवीस वर्षांपूर्वी शेतकऱ्यांस मदत करण्याकरितां शेतकीच्या पेढ्या स्थापन करणारांस सवलती देण्याचें सरकारानें जें नाकारलें तें एवढ्याचकरितां होय. सरकारास सावकार नको आहेत. आणि देशांतील उद्योगधंदे सुधारून तद्द्वारा शेतकऱ्यांस मदत करण्याचेंहि फारसें सरकारच्या मनांत नाहीं. सारांश, लोकपक्षाकडून शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे जे कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत ते सर्व सरकारानें बाजूस ठेवले आहेत; व त्याऐवजीं आपल्या दृष्टीनें योग्य दिसतील असे दुसरे उपाय अमलांत आणण्याची सरकार तजवीज करीत आहे. पैकीं पहिला शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याचा कायदा, (Deccan Agriculturist's Relief Act) दुसरा पंजाब एलिएनेशन ॲक्ट व परवां पास झालेला लँड रेव्हिन्यू ॲक्ट हा होय. शेतकऱ्यांच्या व कारागिरांच्या पेढ्या स्थापन करण्यासंबंधानें जो कायद्याचा मसुदा हिंदुस्थानसरकारच्या कायदे-कौन्सिलापुढें नुकताच आला आहे तो याच धोरणावर रचलेला आहे; व तो समजण्यास वर जी प्रस्तावना केली ती अवश्य आहे. या कायद्यापासून शेतकऱ्यांचें किती हित होईल याचें विवेचन करण्यापूर्वी त्यांतील महत्वाच्या गोष्टी कोणच्या, या कायद्याचा हेतु काय, व त्यांतील कलमें कोणत्या प्रकारचीं आहेत याचें दिग्दर्शन करणें प्रथमतः जरूर आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, हल्लीं सरकारापुढें जो कायद्याचा मसुदा आहे तो कायदा सावकारांनीं पेढ्या काढण्याकरितां नव्हे, तर शेतकऱ्यांनीं किंवा कारा-

गिरांनीं आपण होऊन आपापसांत एकमेकांस मदत करण्याकरितां सावकारांची गरज न ठेवतां परस्पर सहायकारी मंडळ्या काढण्याकरितां होय. या मंडळ्या कशा काढावयाच्या याबद्दल बिलांत बरींच कलमें आहेत. मंडळ्या दोन प्रकारच्या असावयाच्या; एक कारागिरांची किंवा शहरी अगर शहरांतील (Urban) मंडळी; आणि दुसरी शेतकऱ्यांची किंवा खेडेगांवांतील (Rurae) मंडळी, एका खेड्यांतील किंवा जवळजवळच्या दोन चार खेड्यांतील मिळून दहा किंवा अधिक शेतकरी एकत्र मिळाले असतां त्यांस परस्पर सहाहकारी खेडेगांवांतील मंडळी काढतां येईल, व ती हें बिल पास झालें असतां कायद्याप्रमाणें रजिस्टर करतां येईल. अशा रीतीनें खेडेगांवांतील परस्पर सहायकारी मंडळी स्थापन झाल्यावर त्या मंडळीचे दुसरे सभासद पहिल्या सभासदांनीं बहुमतानें पसंत करून घ्यावयाचे, (नुसते पैसे भरल्यानें सभासद व्हावयाचा नाहीं) असा या बिलांत निर्बंध आहे. या मंडळीच्या प्रत्येक सभासदानें मंडळीच्या भांडवलाकरितां कांहीं रक्कम दिली पाहिजे. प्रत्येक सभासदानें किंवा मेंबरानें अशा तऱ्हेनें दिलेली रक्कम मंडळीचें भांडवल समजलें जाईल; व या भांडवलाखेरीज कोणीही मेंबर ठेव म्हणून मंडळीजवळ कांहीं पैसे ठेवण्यास कबूल असल्यास तीं मंडळीस घेण्याचा अधिकार आहे. ही ठेव व भांडवल यांतून मंडळीच्या सभासदास किंवा मेंबरास प्रसंगविशेषीं कर्ज देणें एवढ्याचकरितां या मंडळ्या स्थापावयाच्या आहेत. मंडळीच्या मेंबराखेरीज इतरांस कर्ज देण्याचा त्यांस अधिकार नाहीं; इतकेंच नव्हे, तर गहाणापाणाचाही व्यापार या मंडळीनें करूं नये, असा नियम केला आहे. कर्जाकारितां फक्त दरसालचें (पीक आणि तेंही सभासदाचेंच) गहाणाप्रमाणें कबजांत ठेवण्याचा या कायद्यांत मंडळीस अधिकार आहे, जमीन कबजांत ठेवण्याचा अधिकार नाहीं. मंडळींत सावकार घुसूं नये किंवा एखाद्या मेंबरानें मंडळीच्या भांडवलाचे शेअर पुष्कळ खरेदी करून आपणच मंडळीचा मालक होऊं नये, म्हणून हल्लींच्या कायद्याच्या मसुद्यांत असा नियम केलेला आहे कीं, कोणत्याही मेंबरानें एकंदर भांडवलाच्या $\frac{१}{१०}$ पेक्षां जास्त शेअर घेऊं नयेत; $\frac{१}{१०}$ पेक्षां किती कमी शेअर त्यास घेतां येतील हें कायद्याप्रमाणें जे नियम होतील त्या नियमांमध्यें ठरविण्यांत येईल. ही एक यत्ता झाली. दुसरी यत्ता अशी आहे कीं, खेडेगांवांतील किंवा शेतकऱ्यांच्या मंडळ्यांतील मेंबरानें २५० रुपयांपेक्षां जास्त किंमतीचे शेअर घेऊं नयेत. सारांश, लहान-लहान भांडवलांच्या पुष्कळ शेतकऱ्यांनीं मिळून ही मंडळी काढावी व चालवावी, असा कायद्याचा उद्देश आहे. शेतकऱ्यांस काटकसर करून शिल्लक ठेवण्याची व कष्ट करून मिळविलेल्या पैशांतून ठेवलेल्या शिलकेनें वेळोंवेळीं आपणास लागणाऱ्या गरजा भागविण्याची संवय लागून शेतकरी मितव्ययी, आत्मसंयमी व स्वातंत्र्यप्रिय व्हावे, एवढ्याकरितां या अशा प्रकारच्या अटी या कायद्यांत घात-

लेल्या आहेत असें सरकारचें म्हणणें आहे. अशा मंडळ्यांनीं आपल्या कामाकरितां लोकांचें कर्ज काढणें झाल्यास तें सरकारच्या परवानगीनें काढलें पाहिजे. अर्थात् अशी परवानगी जर नसेल तर या मंडळीचें जें भांडवल असेल त्यांतूनच मंडळीच्या सभासदांस सवड असेल त्याप्रमाणें कर्ज मिळेल, जास्त मिळणार नाहीं. हें कर्ज मेंबराकडून वसूल करावयाचें असल्यास रीतीप्रमाणें मेंबरावर मंडळीनें कोर्टांत फिर्याद केली पाहिजे. परंतु कोर्टाचा हुकुमनामा झाला म्हणजे गुरेंढोरें, आउतें किंवा ज्या पिकांचें बियाणें विकत घेण्यास पैसे दिले असतील तें पीक, यावर मंडळीचा हक्क इतर कर्जदारांपेक्षां अधिक योग्यतेचा समजला जाईल; म्हणजे ही मालमत्ता विकून जे पैसे येतील त्यांतून मंडळीचें कर्ज आधीं वारलें जाईल. याखेरीज कोणत्याही मेंबरानें मंडळीचे जे शेअर खरेदी केले असतील ते किंवा मंडळीकडे जी ठेव ठेवली असेल ती किंवा मंडळीकडून त्यांस फायदा मिळावयाचा असेल तो, हे सर्व मंडळीच्या कर्जाच्या फेडीस आधीं लावले जातील इतकेंच नव्हे तर कोणत्याही मेंबरानें घेतलेले शेअर मंडळीखेरीज इतर सावकारांस आपल्या कर्जाकरितां जप्त करितां यावयाचे नाहींत, असेंही एक कलम या कायद्यांत आहे. यास एकच अपवाद आहे तो सरकारच्या येण्यासंबंधानें होय. मंडळीकडे किंवा मंडळीच्या मेंबराकडे जें कांहीं सरकारचें येणें असेल तें मात्र जमिनीच्या साऱ्याप्रमाणें वसूल केलें जाईल. कोणत्याहि मेंबरानें घेतलेले शेअर एक वर्षपर्यंत त्यास दुसऱ्यास विकतां येणार नाहींत; आणि एक वर्षानंतरहि विकणें झाल्यास ते मंडळीच्या दुसऱ्या मेंबरास विकले पाहिजेत. परंतु विकत घेणाऱ्या मेंबरानें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ठरलेल्या यत्तेपेक्षां जास्त शेअर कधींहि विकत घेऊं नयेत. मंडळीचा व्यापार म्हटला म्हणजे, मेंबरांच्या गरजेकरतां त्यांस भांडवलांतून कर्ज देऊन साहाय्य करणें हा होय, केवळ नफा मिळविणें हा नव्हे. याकरितां मेंबरांस कर्ज द्यावयाचें त्यास व्याज किती असावें हें ठरविणें मंडळीकडे आहे; आणि अशा रीतीनें व्याज घेऊन जो नफा होईल तो भांडवलांतच सामील करावा, मेंबरांस किंवा भागीदारांस वांटून देऊं नये, अशीहि सरकारची इच्छा आहे. कारण या मंडळ्या एकमेकांस मदत करण्याकरितां आहेत; फायद्याकरितां नाहींत. मंडळीचें काम चालविण्याकरितां डायरेक्टर, सेक्रेटरी, वगैरे नेमण्याचा मंडळीस अधिकार आहे. हे अधिकारी किंवा मंडळी आपलें काम बरोबर चालविते किंवा नाहीं याची दरसाल सरकारांतून तपासणी होईल; आणि ही तपासणी करण्याकरितां असल्या मंडळ्यांचा रजिस्ट्रार म्हणून एक स्वतंत्र अंमलदार नेमला जाईल किंवा कलेक्टरास तशा प्रकारचा अधिकार दिला जाईल. या रजिरट्रारच्या ऑफिसांत या मंडळ्या फुकट रजिस्टर केल्या जातील. परंतु त्यांची गैरव्यवस्था आढळून आल्यास या मंडळ्या मोडण्याचा रजिस्ट्रार यास अधिकार दिला

आहे. सरकारांतून या मंडळ्यांस मदत म्हणून त्यांच्या प्रासविरील कर, मेंबरा-कडून जे कर्जरोखे घेतील त्यांस लागणारा स्टँप आणि रेजिस्ट्रेशन फी माफ करण्याचा हिंदुस्थानसरकारास अधिकार आहे व जरूर लागेल तेव्हां सरकारी ग्याझेटांत नोटीसा प्रसिद्ध करून या सवलती दिल्या जातील. कायद्याच्या मसुद्यांत यापेक्षां जास्त पैशाचें सहाय्य सरकारांतून मिळेल, अशा प्रकारचें दुसरें कलम नाहीं. परंतु या बिलावर भाषण करतांना कायदेकौन्सिलचे मेंबर ऑ. सर डेंझिल इबेटसन यांनीं असें सांगितलें आहे कीं; जरूर लागल्यास या मंडळ्यांस फार झालें तर त्यांच्या भांडवलाइतकी (परंतु दोन हजार रुपयांपेक्षां जास्त नाहीं) पैशाची मदत सरकारांतून करण्याचा सरकारचा हेतु आहे. व त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या कलेक्टरांस अधिकार दिले जातील. कोणत्या कामाकरितां मंडळीनें मेंबरास कर्ज द्यावें हें या कायद्यांत ठरविलेलें नाहीं, तें मंडळीकडे सोंपविलें आहे. तसेंच एखादा मेंबर मयत झाल्यास मंडळीस त्याचा जो योग्य वारस दिसेल त्यास सदर मेंबराच्या भागाचे पैसे देण्याचा मंडळीस अधिकार दिला आहे, वारसाच्या सार्टिफिकिटाची वाट पाहण्याची जरूर नाहीं. त्याचप्रमाणें हल्लीं कंपनीचा जो ॲक्ट आहे त्या ॲक्टाप्रमाणेंही या मंडळ्या रजिस्टार करण्याची जरूर नाहीं. हल्लींच्या कायद्याप्रमाणें रजिस्टर झाल्या म्हणजे झालें असेंही एक कलम आहे. मंडळीचें काम कसें चालवावयाचें, त्यांत हिशेब कसे ठेवावे, बुकें कोणतीं ठेवावीं, वगैरे बारिक सारिक गोष्टीबद्दल या कायद्यांत कलमें घातलेलीं नाहींत. परंतु यासंबंधानें नियम करण्याचा अधिकार स्थानिक सरकारास ठेवला असून ते नियम पुढें प्रसिद्ध करण्यांत येतील. ठिकठिकाणच्या कलेक्टरांनीं अशा प्रकारच्या मंडळ्या आपल्या जिल्ह्यांतून स्थापल्या जाण्याकरितां खटपट करावी अशी सरकारची इच्छा आहे; आणि सरकारची अशी इच्छा असल्यावर या कामीं खटपट करणार नाहीं असा कोण कलेक्टर निघणार ? सारांश, सावकारांचीं अपेक्षा न ठेवतां आपण संचित केलेल्या पैशावर शेतकऱ्यांनीं आपापसांत एकमेकांस मदत करून सुखी व सधन व्हावें, अशी सरकारची बळकट इच्छा आहे व त्याकरितांच हा कायदा मुद्दाम काढलेला आहे सावकारांनीं शेतकीकरितां काढलेल्या पेढ्या सरकारास नको आहेत, त्याऐवजीं खेडोखेडीं शेतकऱ्यांच्याच वर सांगितल्याप्रमाणें लहान लहान परस्पर साहायकारी मंडळ्या या बिलाप्रमाणें काढण्याचा किंवा उपस्थित करण्याचा सरकारचा विचार आहे; व त्यांस थोडीबहुत मदत करण्यासही सरकार तयार आहे; असें वर दिलेल्या बिलाच्या गोषवाऱ्यावरून उघड होतें. शेतऱ्यांप्रमाणें कारागिरांच्याही लहान लहान मंडळ्या याच बिलाप्रमाणें शहरांतून किंवा खेडेगांवांतून स्थापित करतां याव्या, असा सरकारचा हेतु आहे; आणि वर जे शेतऱ्यांच्या मंडळ्यांचे नियम सांगितले तेच कारागिरांच्या मंडळ्यांसहि लागू आहेत. भेद इतकाच कीं, कारा-

गीर एकाच शहरांतले किंवा एकाच खेडेगांवांतले पाहिजेत; नजिकच्या दहा-पांच खेड्यांतले उपयोगी नाहींत. तसेंच कारागिरांच्या मंडळ्यांचे सभासदांस २५० रुपयांच्या ऐवजीं १००० रुपयांपर्यंत शेअर घेण्याचा अधिकार आहे; आणि कारागिरांच्या मंडळ्यांनीं शेतकऱ्यांच्या मंडळ्यांस वाटेल तर कर्ज द्यावें असा त्यांस अधिकार दिला आहे. शेतकऱ्यांच्या मंडळ्यांनीं मात्र आपल्या मेंबरांखेरीज कोणास कर्ज देऊं नये असा प्रतिबंध आहे.

हल्लीं जें सरकारच्या कायदेकौन्सिलापुढें बिल आलेलें आहे त्यांतील मुख्य कलमांचा हा सारांश आज दिला आहे. यापासून शेतकऱ्यांस किती फायदा होण्याचा संभव आहे, यावें विवेचन पुढील खेपेस करूं.

◆ ◆ ◆

* शेतकऱ्यांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या.

गेल्या अंकीं दिलेल्या माहितीवरून हिंदुस्थानसरकारच्या मनांतून कोणत्या प्रकारच्या शेतकऱ्यांच्या पेढ्या काढावयाच्या आहेत हें वाचकांस कळून आलेंच असेल. आज कित्येक वर्षें ह्या विषयाचा वर्तमानपत्रांतून व खुद्द सरकारांतहि खल चालू असतां अखेरीस हल्लींच्याप्रमाणें " परस्परं समर्पयामि " अशा-प्रकारचें बिल बाहेर पडावें म्हणजे इसापनीतींतील आरोळ्या मारणारा डोंगर प्रसूत होऊन त्यांतून एक प्रचंड लहान उंदीर बाहेर पडावा ह्याप्रमाणेंच आश्चर्यकारक होय ! शेतकरी लोक दरिद्री असतात, उधळे असतात, लग्नकार्याकडे पुष्कळ पैसे खर्च करतात, उद्यां काय होईल या गोष्टीची त्यांस फिकीर नसते इत्यादि अनेक प्रकारें त्यांस दूषणें देऊन त्यांची स्थिति सुधारण्यास मुख्यत्वेंकरून त्यांस हलक्या व्याजानें पैसे मिळणें जरूर आहे व हल्लींचे सावकारलोक त्यांस विनाकारण नाडीत आहेत असा सरकारचा समज झाल्याचें दिसत होतें; आणि त्याचबरोबर असेंही वाटत होतें कीं, सरकार दयाळू होऊन आमच्या शेतकऱ्यांस कांहीं तरी द्रव्यद्वारां मदत करील, निदान हलक्या व्याजानें तरी त्यांस पैसे मिळावे अशा प्रकारची कांहीं तरी व्यवस्था सरकारमार्फत अमलांत येईल. पण त्याची निराशा होऊन अखेरीस तेल ना तूप तर धुपटणें मात्र शेतकऱ्यांच्या हातांत देण्यास सरकार तयार झालें आहे. शेतकरी लोकांच्या अंगांत आपल्या हिमतीवर स्वतंत्रपणें

---

* [केसरी ता. १७ नोव्हेंबर १९०३]

शेतकी करण्याची किती उमेद राहिली आहे, व पुढील धोरण लक्षांत आणून त्याप्रमाणें व्यवस्थितपणानें पहिल्यापासूनच काटकसर करण्याचा गुण त्यांच्या अंगांत कितपत वास करीत आहे याचा आमच्या सरकारास अंदाज नाहींसा नाहीं. प्राचीन काळीं प्रत्येक खेडेंगांव म्हणजे एक लहानशी स्थानिक स्वराज्याची संस्थाच होती, ही गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासांत नमूद आहे. शेतकीस लागणारे सुतार लोहारांचे धंदे किंवा खेडेगांवांतील लोकांच्या संसारास अवश्य असे तेली, वाणी, कुंभार वगैरे बलुतदार प्रत्येक गांवांत असून त्यांचा निर्वाह गांवच्या शेतकीच्या उत्पन्नावर होत असे. किंबहुना प्रत्येक खेडेगांव म्हणजे मोठ्या शहराची एक लहानशी प्रतिमाच असून खेड्यांतील लोकांचा सर्व निर्वाह तेवढ्यावर भागत असे; आणि खेड्यांतील वर सांगितलेले कारागीर किंवा उदमी आणि शेतकरी हे एकमेकांचें साहाय्यकारित्व जाणून परस्पर मिलाफानें आणि सलोख्यानें वागत असत. ही ग्रामव्यवस्था इंग्रजी राज्याच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेनें अजिबात मोडून टाकली; आणि त्याबरोबरच शेतकरी लोकांच्या अंगांत जो एक प्रकारचा परस्परसाहाय्यकारित्वाचा किंवा स्वावलंबनाचा गुण परंपरेनें आलेला होता तोहि नाहींसा होऊन नवीन राज्यव्यवस्थेच्या नांगराखालीं पूर्वींच्या ग्रामसंस्थेचीं सर्व बीजें चिरडून नष्ट झालीं. वर आम्ही सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थानसरकारास ही गोष्ट माहीत नाहीं असें नाहीं. परवां मलबारी शेटजींनीं खेडेगांवांतिल पडित जमिनी किंवा गायरान यांची व्यवस्था गांवांतल्या गांवांत कांहीं लोकांची कमिटी नेमून त्यांच्या हतांत द्यावी व गांवांतल्या लोकलफंडाचा कांहीं भाग गांवांत खर्च करण्याकरितां निराळा काढून तो खर्च या कमिटीकडून करवावा, आणि अशा तऱ्हेनें नष्ट झालेल्या ग्रामसंस्थेचें पुनरुज्जीवन करावें, म्हणून हिंदुस्थानसरकारास अर्जद्वारें लेखी सूचना केली होती. या अर्जास हिंदुस्थानसकारांतून जो जवाब मिळाला आहे तो वाचण्यासारख्या आहे. लॉर्ड कर्झन यांचें प्रायव्हेट सेक्रेटरी लॉरेन्स साहेब या जबाबांत असें म्हणतात कीं, " आपण सुचविलेली व्यवस्था अमलांत येण्यासारखी नाहीं. पंचायत किंवा इतर ग्रामसंस्था नाहींशा होऊन पुष्कळ दिवस झाले आहेत; व त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा इंग्रजसरकारनें जेथें जेथें प्रयत्न केला तेथें तेथें त्यांस यश आलेलें आहीं. मुंबईइलाख्यांत तर या संस्था इंग्रजी राज्य होण्यापूर्वींच मोडकळीस आलेल्या होत्या; व पाश्चिमात्य सुधारलेली राज्यव्यवस्था आणि इतर संस्था यांच्यांपुढें पूर्वींच्या संस्थांचा टिकाव लागणें अशक्य आहे असें उघड दृष्टीस आलें. " सारांश, ग्रामसंस्थेच्या अंगीं कांहीं जोम नाहीं, त्या मृतप्राय झालेल्या आहेत आणि त्या पुन्हा जिवंत करणें दुःसाध्य होय अशी हिंदुस्थानकारची पुरी समजूत झालेली आहे असें यावरून उघड होतें; परंतु अशी जर सरकारची समजूत आहे आणि या समजुतीमुळेंच मलबारी शेट म्हणतात त्याप्रमाणें गांवां-

तील गायरानाची व्यवस्था किंवा गांवांत जमा झालेला लोकलफंड खर्च करण्याचें काम त्यांच्याकडे देण्याइतके जर गांवांतील लोक हिंदुस्थानसरकाच्या दृष्टीनें लायक नाहींत तर शेतकऱ्यांच्या परस्परसाहाय्यकारी मंडळ्या तरी त्यांच्याकडून कशा चालविल्या जाणार ? मलबारी शेटजींना वरील उत्तर देतांना ही शंका लॉरेन्ससाहेबांच्या मनांत आली, आणि त्यांनीं पुढें असें लिहिलें आहे कीं, "हल्लीं शेतकऱ्यांच्या परस्पर–साहाय्यकारी मंडळ्या काढण्याचा सरकारचा जो उद्योग आहे तो खेडेंगांवांतील शेतकरी लोकांच्या अंगांत स्वावलंबनाचा गुण किंवा एक प्रकारचा जोम उत्पन्न करण्याकरितांच योजलेला आहे. आहे. हा हेतु कितपत सिद्धीस जातो हें पाहणें आहे." या उत्तरावरून सरकारच्या मनाची स्थिति काय आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. गांवांतील गायरानाची व्यवस्था करण्यास जे लोक योग्य नाहींत ते परस्पर एकमेकांस कर्ज देऊन गांवांतील शेतकऱ्यांस सावकाराच्या कर्जातून कितपत मोकळे करणार हें आम्ही सांगावयास पाहिजे असें नाहीं. ग्रामसंस्था मृत झाल्यामुळें मलबारी शेटजींनीं सुचविलेली व्यवस्था अमलांस आणतां येत नाहीं असें जर सरकाचें मत झालें आहे, तर परस्पर–सहाय्यकारी मंडळ्यांसच तो आक्षेप तितक्याच मानानें किंबहुना अधिक लागू पडतो हें सरकारच्या नजरेस येऊं नये काय ? आणि नजरेस आलें असेल तर हल्लींच्या बिलाप्रमाणें तुरीची काठी तुरींवर झाडण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं आमच्या सरकारास दुसरी कोणतीच युक्ति सुचूं नये काय ? लोकांच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें, पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं अशी जी म्हण आहे ती कांहीं खोटी नाहीं. शेतकऱ्यांचें कल्याण व्हावें अशी सरकारची इच्छा आहे खरी, पण इच्छेप्रमाणें पैसा खर्च करण्यास त्यांचा हात वाहत नसल्यामुळें लोकांनीं कितीहि उपाय सुचविले तरी त्यापैकीं परभारें किंवा परस्पर भागण्यासारखा जो उपाय तेवढाच सरकारास पसंत पडतो किंवा पडला आहे असें म्हणणें भाग येतें.

मलबारी शेटजींस सरकारानें दिलेल्या उत्तरांत " हिंदुस्थानांतील प्राचीन संस्था आणि पाश्चिमात्य देशांतिल संस्था यांची टक्कर झाली असतां प्राचीन पौर्वात्य संस्था हार पावतात " अशा अर्थाचें जें वाक्य आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. प्राचीन बलुतेदारांच्या ग्रामसंस्थेची रचना मामूल वहिवाटीवर केलेली असे; व त्या मामूल वहिवाटीचीं तत्वें पुष्कळ पिढ्यांच्या अनुभवानें शेतकऱ्यांच्या अंगीं खिळलेलीं होतीं. परंतु ती ग्रामव्यवस्था मोडून मामूल वहिवाटीच्या ऐवजीं जेव्हां नवीन कायदे आणि करार यांचीं तत्वें अमलांत येऊं लागलीं तेव्हां शेतकरी गोंधळून जाऊन सहाजिकरीत्याच तो दैन्यावस्थेच्या उतरत्या पायरीस लागला. जुन्या ग्रामसंस्था कशा चालवाव्या याचें शिक्षण त्यास जन्मतःच मिळत असे; आणि तालुक्यांतून किंवा जिल्ह्यांतून ग्रामसं-

स्थेच्या व्यवस्थेस धक्का पोंहोंण्यासारखें वर्तन कधींहि होत नसल्यामुळें त्या संस्था स्वतंत्रपणें आपापला जीव संरक्षण करून राहत. परंतु या संस्थांचे बहुतेक महत्त्वाचे अधिकार इंग्रजी राज्यांत पोलिसखातें, जंगलखातें, रेव्हिन्युखातें, न्यायखातें वगैरे निरनिराळ्या खात्यांत वांटून दिल्यामुळें आणि बाकीचे नव्या कायद्यांनीं नष्ट झाल्यामुळें या संस्था निवळ नामशेष झालेल्या आहेत. अशा स्थितींत खेडेगांवांतील लोकांच्या अंगीं स्वावलंबनाचा जोम उत्पन्न करणें बहुतेक दुर्घट होय. तशांतून देशांतील उद्योगधंदे जिवंत असते तर गोष्ट निराळी. पण परकीय व्यापाराच्या पायीं तेही बुडाले असल्यामुळें शेतकरी वर्गांत सरकारच्या इच्छेप्रमाणें परस्परसाहाय्यकारित्वाचा गुण उत्पन्न होणें बहुतेक अशक्य झालें आहे असें म्हटलें तरी चालेल. नवीन बिलाप्रमाणें या कामाकरितां नेमलेले रजिस्ट्रार व जिल्ह्याजिल्ह्याचे कलेक्टर हे शेतकऱ्यांच्या परस्परसाहाय्यकारी मंडळ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वजनानें कांहीं ठिकाणीं स्थापण्याचा प्रयत्न करतील, व त्याच वजनानें सदर मंडळ्या कांहीं दिवस कशाबशा चालून त्या बऱ्या चालल्या आहेत म्हणून सरकाराकडे रिपोर्टहि होतील. परंतु त्यापासून लोकांस थोडाबहुत तरी खरा फायदा होईल किंवा नाहीं याचा आम्हांस वानवाच आहे. खेडेगांवांतील शेतकऱ्यांपैकीं जे शेतकरी लोक जवळ दोन पैसे बाळगून आहेत त्यांस या परभारी पेढ्यांचें साहाय्य नको आहे, व ते या कामांत पडण्यास खुषीहि व्हावयाचे नाहींत. बाकी राहिलेले शेतकरी बहुतेक आतांच सावकाराच्या कर्जांत बुडालेले आहेत; आणि तें कर्ज जोंपर्यंत फिटलें नाहीं तोंपर्यंत हल्लींच्यासारख्या परस्परसहाय्यकारी मंडळ्यांचे मेंबर होऊन त्यांचा निभाव कदापिही लागणार नाहीं. सर डेनिझिल इबेटसन यांनीं आपल्या भाषणांत जर्मनींत अशा प्रकारच्या पेढ्या स्थापण्याचा दोन गृहस्थानीं उद्योग केला व त्यांस यश आलें असें उदाहरण दिलें आहे. पण हें जर्मनींतील उदाहरण म्हणजे पुराणांतील वांगीं पुराणांत अशा प्रकारचें होय. जर्मनी देश स्वतंत्र आहे, शेतकीचे उद्योगधंदे तेथें जारीनें सुरू आहेत, आणि सकंदर देशांतील उत्पन्न देशांत खर्च होत असून खेरीज प्रोटेक्शन किंवा सप्रतिबंध व्यापाराची पद्धतहि तेथें अमलांत आहे. हिंदुस्थानांतील स्थिति तशी नाहीं; आणि आमच्या हल्लींच्या थितींत जर्मनीचें उदाहरणहि आमच्या उपयोगीं पडण्यासारखें नाहीं. आम्ही म्हणतों याचा प्रत्यय येण्यास फार अवकाश लागणार नाहीं. कलेक्टर किंवा रजिस्ट्रार हे जेव्हां परस्पर-साहाय्यकारी मंडळ्या काढण्याकरितां खेडेगांवांत जातील तेव्हां या मंडळ्यांस भांडवल देऊन त्यांचे भागीदार होण्यास योग्य असे शेतकरीवर्गांत फारच थोडे लोक आहेत, असें त्यांस आढळून येईल. 'सर्वारंभास्तंडूलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें परस्परसाहाय्यकारी मंडळ्यांचें काम भांडवलाखेरीज चालणें अशक्य आहे; आणि या मंडळ्यांत जर सावकार लोकांस मेंबर घ्यावयाचें नाहीं

तर हें भांडवल यावयाचें कोठून हा एक मोठाच प्रश्न आहे ! कंपनीचें भांडवल जमा होईल त्या मानानें (परंतु भांडवलापेक्षां जास्त नव्हे इतकी) मदत सरकारांतून देण्याची इबेटसनसाहेब म्हणतात त्याप्रमाणें कदाचित् तजवीज होईल. पण ही तजवीज होण्यास मूळ भांडवल कांहीं तरी जमा झालें पाहिजे; आणि तेंच व्हावें कसें हा मोठा प्रश्न आहे. दहा पांच खेडीं मिळून एक मंडळी किंवा कंपनी निघाली तर या दहा पांच खेड्यांत निदान वीस पंचवीस शेतकऱ्यांस दर शेतकऱ्यास निदान शंभर रुपये तरी कर्ज देण्याइतकें म्हणजे सुमारें दोन तीन हजार रुपये तरी या कंपनीजवळ भांडवल पाहिजे. हें भांडवल जमणार कोठून ? सावकार लोकांकडून म्हणजे गांवांतील चार पैसे बाळगणाऱ्या लोकांकडून बिलांत नमूद केलेल्या यत्तेइतकें भांडवल घेऊन त्यांस भागीदार केलें तर अखेरीस या मंडळ्यांची व्यवस्था एक नाहीं तर दहा पांच सावकारांच्या तरी हातीं जाणारच आणि या सावकार लोकांस सोडून दिलें तर पुरेसें भांडवलहि मिळणें दुर्घट.अशा स्थितींत रजिस्ट्रार किंवा कलेक्टर झाले तरी काय करणार ? सरकारची इच्छाच आहे म्हणून कसें बसें तरी भांडवल उभे करून तें सर्व शेतकऱ्यांचेंच आहे म्हणून रिपोर्ट करण्यापेक्षां दुसरी कांहीं तोड आहे असें आम्हांस दिसत नाहीं. बरें, कांहीं शेतकरी या मंडळीचे मेंबर झाले तर इतर सावकरांकडून त्यांस पुनः कर्ज मिळण्याची मारामाराच पडणार. कारण या मंडळीच्या पैशानें त्यांनीं जें कांहीं खरेदी केलें असेल तें, किंवा या मंडळींत त्यांचे जे शेअर असतील ते इतर सावकारांच्या कर्जाकरितां जप्त होऊं नयेत असें बिलांत एक कलम आहे; व याच कलमामुळें इतर सावकारांस जंगम मालाचें बहुतेक तारण न राहिल्यामुळें स्थावर गहाण ठेविल्याखेरीज कधींही कर्ज देतां यावयाचें नाहीं. आणि स्थावर गहाण ठेवावें तर शेतकऱ्याच्या कायद्याची टोंचणी सावकाराच्या मागें लागलेलीच आहे. सारांश, परस्परसाहाय्यकारी मंडळ्याचे भागदिार होऊन आपली स्थिति सुधारण्याइतके ऐपतदार किंवा जोमाचे शेतकरी देशांत नसल्यामुळें हल्लींचा कायदा आमच्या ग्रामसंस्थेप्रमाणेंच कायदेबुकांत मृतप्राय पडून राहण्याचा संभव आहे. कलेक्टर व रजिस्ट्रार यांच्या धामधुमीनें,वजनानें व अधिकारानें कांहीं दिवसपर्यंत परस्पर-साहाय्यकारी मंडळ्या सजीव आहेत असा भास होईल; पण अखेरीस हिंदुस्थानसरकारच्या या परस्पर-युक्तीपासून शेतकऱ्यांचें कल्याण होईल, असें वाटत नाहीं. यापेक्षां हलक्या व्याजावर शेतकऱ्यांस पैसे मिळतील अशा प्रकारच्या सावकारांच्या पेढ्या काढण्यास जर सरकारनें मदत व उत्तेजन दिलें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण स्वतःस झीज न सोसतां परभारें लोकांचें कल्याण करण्याची इच्छा अधिक उत्कट असल्यामुळें हलक्या व्याजानें पैसे देणाऱ्या सावकारांच्या पेढ्याऐवजीं शेतकऱ्यांच्या परभाऱ्या पेढ्या निघण्याची वेळ आली आहे. हा

प्रयोग परिणामीं हितकारक होईल किंवा नाहीं याबद्दल सरकारासहि थोडी शंका आहे असें इबेटसन साहेबांच्या बोलण्यावरून व वर सांगितलेल्या मलबारी शेटजीस दिलेल्या लॉरेन्स साहेबांच्या उत्तरावरून दिसून येतें. तथापि, सरकारचा ओढा परभारें काम भागविण्याकडे असल्यामुळें हें बिल बाहेर पडलें आहे व आमचें मत कितीहि प्रतिकूल असलें तरी तें पास होईल यांत कांहीं शंका नाहीं. तथापि आमच्या शेतकऱ्यांचे शिक्षण त्यांची सध्यांची सामाजिक स्थिति वगैरे लक्षांत आणतां अनुभवांतीं परस्पर-साहाय्यकारी मंडळ्यांची युक्ति आम्ही वर सांगितल्याप्रमाणें निरुपयोगीच ठरेल, आणि अखेरीस लोकांच्या म्हणण्याप्रमाणें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास त्यांस हलक्या व्याजानें पैसे मिळण्याची योजना होऊन खेड्यांतील लोकांस करतां येतील अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांचीच देशांत अभिवृद्धि करावी लागेल अशी आम्हांस खात्री आहे. हिंदुस्थानांतील शेतकरी कायद्याच्या पांच पंचवीस कलमांच्या साहायानें परस्पर म्हणजे सावकारापासून किंवा सरकारापासून साहाय्याची अपेक्षा न धरतां आपली स्थिति सुधारण्याइतके जर समर्थ असते तर मग कांयं न होतें ? ते समर्थ असून केवळ या बिलाकरितांच त्यांचें घोडें अडून पडलें आहे अशी जर सरकारची समजूत असेल तर ती अत्यंत चुकीची आहे, व म्हणूनच हल्लींच्या बिलाची दिशा भ्रांतिमूलक असून परिणामीं त्यापासून कधींही इष्टासिद्धि व्हावयाची नाहीं, असें आम्ही खात्रीपूर्वक सांगूं शकतों. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची फार ओरड झाल्यामुळें त्यांच्याकरितां कांहीं तरी केलें पाहिजे एवढ्याच समजुतीनें सरकार जर हें बिल पुढें आणीत असेल तर मग आमचें कांहीं म्हणणें नाहीं.

❁ ❁ ❁

* मलबारी आणि कॉंग्रेस

मि. मलबारी यांनीं काढलेल्या ' ईस्ट आणि वेस्ट ' या नांवाच्या मासिक पुस्तकाच्या या महिन्याच्या अंकांत ' रानडे आणि त्यांच्या वेळची स्थिति ' या विषयावर त्यांनीं स्वतःच एक निबंध लिहिला आहे; आणि त्यांत कै. रानडे आणि तेलंग यांच्यासंबंधाच्या कांहीं गोष्टी प्रथम सांगून नंतर 'आपणांस लोक कॉंग्रेसचे शत्रु समजतात ' ही चूक आहे असें ओघाओघानें पण सविस्तर दाखविण्याचा शेटजींनीं प्रयत्न केला आहे. किंबहुना रानडे यांचें नांव निबं-

---

* [केसरी ता. २४ नोव्हेंबर १९०३]

घाच्या शिरोलेखांत पुढें करून त्या मिषानें आपलें काँग्रेससंबंधाचें वर्तन सयुक्तिक व समंजस आहे असें सिद्ध करण्याकरितांच हा लेख लिहिला आहे असें म्हटलें तरी चालेल. रानडे यांच्या विद्वत्तेबद्दल व बहुश्रुतपणाबद्दल बरीच स्तुती केलेली आहे. परंतु त्यांनीं दुसरा विवाह करतेवेळीं पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचें तत्व पत्करलें नाहीं आणि चहा प्रकरणांत प्रायश्चित्त घेऊन सर्वांशीं सलोख्यानें राहण्याचा प्रयत्न केला या दोन गोष्टींबद्दल शेटजीस रानड्यांची कींव आली आहे; आणि तेलंगसाहेबांनींहि वेळ आली तेव्हां अशाच प्रकारचा मानसिक धैर्याचा अभाव दाखविला म्हणून त्यांसहि रानड्यांच्या पंक्तींत बसवून दोघांनींहि एकच प्रकारच्या दोषास आपणास अखेरीस पात्र करून घेतलें असें म्हटलें आहे. रानडे किंवा तेलंग यांचीं हीं गृहच्छिद्रें बाहेर काढून त्यांची कोणत्याहि प्रकारें चर्चा करण्याचा आज प्रसंग नाहीं व मलबारी शेटजीसहि होता असें आम्हांस वाटत नाहीं. सदर पुरुषांच्या आंगीं जे कांहीं गुण होते त्यांचेंच पुढल्या पिढीनें अनुकरण केलें पाहिजे. अवगुणांकडे दृष्टी देतां उपयोगी नाहीं; कारण अवगुण कोणासहि सुटला आहे असे नाहीं. मलबारी शेटजींसहि हें तत्व मान्य असावें अशी आमची समजूत आहे. मग त्यांच्या हातून हा दोषदर्शनाचा प्रकार कसा झाला कोण जाणें ! असो; याप्रमाणें उपक्रम करून आपणामध्यें आणि रानडे यांच्यामध्यें पुढें पुढें पहिलें प्रेम राहिलें नव्हतें व त्याचें कारण राष्ट्रीय सभेसंबंधानें आपलें प्रतिकूल असलेलें मत असावें असें मलबारी शेटजींनीं लिहून नंतर जरी रानडे आतां हयात नाहींत तरी काँग्रेस संबंधानें आपलें खरें मत काय आहे वगैरे हकीकत लोकांस कळविण्यास हरकत नाहीं असें म्हणून मलबारी शेट वर सांगितलेल्या लेखांतील मुख्य मुद्याकडे वळलेले आहेत. मलबारी शेटजीचें यासंबंधानें म्हणणें काय आहे याचा पुंढें विचार केलाच आहे. परंतु काँग्रेससंबंधानें आपले विचार सांगण्यास रानडे यांचे दोष दाखविणारी प्रस्तावना जरूर होती काय या प्रश्नाचा विचार केला असतां मलबारी शेटजीसारख्या वाकबगार लेखकाची ही चूक झाली असें म्हणणें भाग येतें. मलबारी शेटजींनीं संमतीवयाच्या वेळीं जें काहूर उठविलें होतें त्यावेळीं व इतर बाबतींत रानडे यांनीं त्यांस पुष्कळ साहाय्य केलें हीं गोष्ट शेटजीस मान्य आहे. असें असतां दुसऱ्या एखाद्या विषयावरील लेखांत प्रस्तावना म्हणून रानड्यांचे दोष लोकांपुढें मांडणें साधारण लेखकांसहि योग्य वाटणार नाहीं, मग मलबारीसारख्या रानड्याच्या मदतीनें काम करणाऱ्या गृहस्थास तर तें बिलकूल शोभत नाहीं हें सांगावयास नको.

असो; सदर लेखांतील मुख्य मुद्दा राष्ट्रीय सभेसंबंधाचा आहे, करितां त्याचाच विशेषेंकरून विचार करूं. काँग्रेस ही संस्था आपल्याच घरांतून पहिल्यानें बाहेर पडली, आपल्याच घरांत काँग्रेसचें पहिलें प्रसिद्धीपत्रक व ठराव

एका मोठ्या इंग्रजी मुत्सद्यानें लिहिले असें मलबारी शेटजींनीं मोठ्या गौरवानें प्रसिद्ध केलें आहे. परंतु दैवयोग असा विचित्र आहे कीं, शकुंतला कण्वाश्रमांतून बाहेर पडल्यानंतर जशी ती पुन्हां कण्वाश्रमास परत गेली नाहीं, तशी मलबारी शेटजीच्या कन्येची स्थिति होऊन शेटजी कॉंग्रेसलाहि कधीं गेले नाहींत व कॉंग्रेस सभेनेंहि शेटजींच्या पुनः घरीं जाऊन त्यांचा सल्ला घ्यावा तो घेतला नाहीं ! सर्व कांहीं बिनसलें आहे तें येथेंच. नाहींपेक्षां मि. मलबारी हे कॉंग्रेसचे पुरे हितेच्छु आणि कॉंग्रेस सभा ही त्यांच्याच घरांत पहिल्यानें जन्मलेली कन्या होय. कॉंग्रेसचीं जीं कांहीं तत्वें आहेत तींच आपल्या हाडामांसांत खिळलेलीं आहेत, तेव्हां कॉंग्रेसचे वैरी आपण कसे होऊं असा शेटजींनीं मोठ्या कळकळीनें प्रश्न केला आहे. परंतु कॉंग्रेसचें ज्यांच्या मनांत हित करावयाचें आहे त्यांनीं तिच्याशीं नुसतें वैर न केल्यानें भागत नाहीं, तिची उपेक्षाहि त्यांनीं करतां कामां नये अथवा तिच्यासंबंधानें उदासीनपणाहि दाखवितां कामां नये हें तत्व शेटजींच्या लक्षांत आलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कॉंग्रेस सभेच्या रचनेंत; कार्यक्रमांत किंवा व्यवस्थेंत दोष नाहींत असें आम्ही म्हणत नाहीं. मलबारी शेटजींनीं जे दोष दाखविले आहेत त्यांपैकीं कांहीं विचार करण्यासारखे आहेत; किंबहुना कॉंग्रेसच्या हितकर्त्यांनीं ते यापूर्वीच दाखविलेहि आहेत. परंतु ही गोष्ट आज कॉंग्रेसला सांगण्याचा अधिकार मलबारी शेटजींनीं संपादन केला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सतरा वर्षांनंतर कॉंग्रेसचें स्वरूप कसें होणार याचें स्वप्न कांहीं मलबारी शेटजींस पहिल्यानेंच पडलें नव्हतें. मग हे राष्ट्रीय सभेच्या पहिल्या तरी बैठकीस मुखत्यार होऊन हजर कां राहिले नव्हते याचें उत्तर शेटजींनीं आपल्या लेखांत कोठेंहि दिलें नाहीं. आमच्यामध्यें मुलगा किंवा मुलगी झाल्यावर त्याचें जातक वर्तवून पुढें तो अगर ती कशी निघणार हें जोशाकडून लोक समजून घेत असतात. मलबारी शेटजींनीं स्वतःच्या घरांत जन्मलेल्या कॉंग्रेसच्या भावी स्वरूपाचें ज्ञान होण्याबद्दल असा कांहीं तरी तोडगा आधींच केला असल्यास आम्हांस माहीत नाहीं. परंतु सामान्य दृष्टीनें पाहतां त्यांनीं आजपर्यंत कधींच कॉंग्रेसच्या कामांत पुढाकार घेतला नाहीं ही गोष्ट लौकिकांत तरी ते कॉंग्रेसला प्रतिकूल आहेत याची साक्षीभूत झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. आपणांस कॉंग्रेसचे शत्रु कां समजतात याचा जर शेटजींस खुलासा पाहिजे असेल तर तो या एकाच गोष्टीवरून मिळण्यासारखा आहे. आतां कदाचित शत्रु न समजतां कॉंग्रेससंबंधानें शेटजींस उदासीन समजणें सामान्य जनापेक्षां अधिक विचाराच्या माणसास, विशेषेंकरून शेटजींच्या परिचित वर्गास अधिक प्रशस्त वाटलें असतें. परंतु मित्र, उदासीन आणि शत्रु असा तीन प्रकारचा भेद नेहमींच लोक करतात असें नाहीं, व हा तीन प्रकारचा भेद सोडून मित्र व शत्रु असे दोन प्रकारचेच

वर्गीकरण केलें तर शेटजींसारख्या उदासीन लोकांस साहजिकरीत्या दुसऱ्या वर्गांतच घालणें जरूर पडेल. रानड्यांसारख्या सरकारी नोकरींत असलेल्या माणसासही लोकांनीं काँग्रेसचा मित्र मानावें आणि सरकारी शृंखलेनें बद्ध न झालेल्या शेटजींस सदर सभेचे शत्रु समजण्यापर्यंत मजल येऊन ठेपावी यांत लोकांपेक्षां शेटजींचाच दोष अधिक आहे असें सूक्ष्म विचारांतीं—खुद्द शेटजींसही कळून येईल. अमुक एक संस्था बरी आहे किंवा वाईट आहे याची नुसती चर्चा करून किंवा त्यांतील दोष दाखवून कोणीही मनुष्य सदर संस्थेचा मित्र होऊं शकत नाहीं. मित्र होण्यास एक प्रकारची सहानुभूति प्रदर्शित करावी लागते, पण तशी सहानुभूति, आस्था अगर कळकळ शेटजींनीं राष्ट्रीय सभेबद्दल दाखविलेली फारशी अढळण्यांत नाहीं; आणि म्हणूनच शेटजींविषयीं लोकांनीं जर कांहीं प्रतिकूल अनुमान केलें असलें तर त्यांत त्यांची कांहीं चूक नाहीं.

राष्ट्रीय सभा निघाल्या दिवसापासून हिंदुस्थान देशांतील निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांमधील दळवळण वाढून राष्ट्रीय गोष्टीसंबंधानें त्यांचें विचारैक्य होण्यास एक मोठें साधन झालें; आणि ही सभा निघाल्यापासून सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद किंवा प्रांतिक सभा अशा प्रकारच्या चळवळींस ठिकठिकाणीं सुरवात झाली, किंबहुना कायस्थ, जैन वगैरे हिंदूमधील कांहीं विशिष्ट जातींच्या सामाजिक सभा आणि मुसलमान लोकांतील शिक्षणपरिषद हींहि हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेचीं भावंडें किंवा अपत्येंच आहेत, आणि अशा रीतीनें निरनिराळ्या दिशेनें आणि निरनिराळ्या प्रांतांत सामाजिक, औद्योगिक, आणि राजकीय विचारांची ज्या सभेमुळें जागृति झाली त्या सभेकरितां अठरा वर्षांत कितीही खर्च झाला असला तरी तो वावगा नाहीं ही गोष्ट मलबारी शेटजींस पूर्णपणें मान्य आहे. एवढ्या गोष्टी मान्य झाल्यावर वादाचा बराच भाग मिटला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणत्याही देशांत ज्या मोठमोठ्या चळवळी होतात त्या दमादमानेंच होत असतात, घाईनें होत नाहींत हें तत्वही शेटजींस कबूल आहे आणि हें कबूल झालें म्हणजे अर्थातच अठरा वर्षांत राष्ट्रीय सभेनें कांहीं केलें नाहीं असें म्हणण्यास मार्ग राहत नाहीं. राष्ट्रीय सभेवरील शेटजींचा मुख्य आक्षेप पुढील कामासंबंधाचा आणि विशेषेंकरून राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यासंबंधाचा आहे. पहिला आक्षेप असा आहे कीं, राष्ट्रीयसभा निघाल्यापासून स्थानिक सभांस एक प्रकारची मंदी आलेली आहे; अथवा ज्याप्रमाणें मांजरी आपलीच पिलें खाऊन टाकते त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेच्या अपत्यस्थानीय ज्या ठिकठिकाच्या सभा त्या राष्ट्रीय सभेनें खाऊन टाकल्या आहेत. शेटजींचा दुसरा आक्षेप असा कीं, राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं जितक्या नेटानें, कळकळीनें व

स्वहितत्यागानें कामास लागावयास पाहिजे तितक्या जोरानें अद्याप कामास सुरुवात झालेली नाहीं. याचा दोष पुढाऱ्यांपेक्षां लोकांकडेच अधिक आहे असें शेटजींचें म्हणणें आहे व याच्या दाखल्याकरितां दर आठवड्यास निघणाऱ्या आपल्या पत्राचें व मासिक पुस्तकाचें उदाहरण त्यांनीं दिलें आहे. ते म्हणतात कीं, 'ईस्ट अँड वेस्ट' सारखें चांगलें मासिक पुस्तक काढूनही त्यास पुष्कळ लोक वर्गणीदार होत नाहींत, आणि कांहीं झालें तर वर्गणीचें बिल गेल्याबरोबर त्यांचा उत्साह थंडावून "मालक घेत नाहीं, किंवा मयत, अथवा अंक परत केला" असा शेरा पडून अंक पोस्टांतून परत येतात! मलबारी शेटजींनीं वर्तमानपत्रकार या नात्यानें सांगितलेला आपला अनुभव खोटा आहे असें नाहीं; तथापि याचा दोष सर्वांशीं लोकांस देणें म्हणजे पुढाऱ्यानें एक प्रकारें आपलें नामर्दपण कबूल करण्यासारखें आहे असें आम्ही समजतों. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, अडाणी कारागीर नेहमीं आपल्या हत्यारांस नांवें ठेवीत असतो, किंवा अमुक एक काम बिघडलें असतां तें हत्यार चांगलें नाहीं म्हणून बिघडलें अशी सबब पुढें आणीत असतो. 'नाचतां येईना म्हणून आंगण वांकडें' अशी आपल्यांत जी एक म्हण आहे तीहि याच अर्थाची आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतील प्रजेप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेनें प्रेरित होऊन आपापल्या हक्कासाठीं जर एकीनें भांडणारे असते तर इंग्रज सरकारचें राज्यही या देशावर झालें नसतें आणि काँग्रेसचीहि पण जरूर पडती ना! निरनिराळ्या प्रांतांत किंवा जातींत व्यक्तिशः विद्वान्, कर्ते आणि समंजस पुरुष आमच्यांत उत्पन्न झाले नाहींत किंवा होत नाहींत असें नाहीं, परंतु कांहीं कारणांमुळें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सर्वांच्या मनांत जितक्या जोरानें जागृत असावी तितकी अद्याप असूं लागली नाहीं, आणि या दोषापासून काँग्रेसचे पुढारीही सामान्यतः अगदीं अलिप्त आहेत असें नाहीं. आपल्या देशाकरितां अमुक एक गोष्ट घडवून आणणें जरूर आहे अशी मनाची खात्री झाल्याबरोबर ती गोष्ट साध्य होण्याकरितां इतर व्यवसायांवर लाथ मारून कायावाचामनेंकरून ती साध्य होण्याविषयीं एकनिष्ठेनें मि० दादाभाई किंवा ह्यूम यांच्यासारखे प्रयत्न करणें हा गुण पूर्णपणें आंगीं येण्यास काँग्रेस सभेमध्यें सुंदर भाषण करण्यापेक्षां कांहीं जास्त साधनाची अवश्यकता आहे, आणि सध्यांच्या काँग्रेसच्या कार्यक्रमांत जो कांहीं दोष आहे तो वर सांगितलेली वृत्ति काँग्रेस सभेचें काम करणाऱ्या लोकांच्या अंगीं अद्याप पूर्णपणें बाणलेली नाहीं हा होय. कांग्रेसच्या कोणत्याहि पुढाऱ्यास व्यक्तिशः नावें ठेवण्याचा आमचा इरादा नाहीं. जो तो आपल्या परीनें काँग्रेसच्या उत्कर्षाचा उद्योग करीत आहे, मग त्यांचें फल थोडें होवो वा पुष्कळ होवो. पण एवढ्यानें आमचें काम भागत नाहीं, अथवा भागावयाचें नाहीं असें जें शेटजींचें

म्हणणें आहे तें आम्हांस मान्य आहे व 'बालादपि सुभाषितं ग्राह्यं' या न्यायानें काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं त्याचा अवश्य विचार करावा अशी त्यांस आमची सूचना आहे. विलायतेंतील लोकांचें कोणत्या तरी उपायानें मन वळवून हिंदुस्थानची राज्यव्यवस्था हल्लीं केवळ अँग्लो-इंडियन लोकांच्या सुधारलेल्या हितैकदृष्टीनें जी चालली आहे, ती तशी न चालतां राणीसकारच्या जाहिरनाम्यांत म्हटल्याप्रमाणें एतद्देशीय लोकांच्या हितैकदृष्टीनें चालू होण्याचा योग घडवून आणावा हा काँग्रेसचा मुख्य हेतु आहे. आणि ज्या इंग्रजी मुत्सद्यानें या राष्ट्रीय चळवळीस प्रारंभ केला त्याच्या मनांत ही संस्था केवळ दरवर्षीं कांहीं भाषणें होऊन ठराव पास करणारी व्हावी असें नव्हतें हेंहि उघड आहे. राष्ट्रीय सभेस यापुढें जर कांहीं करावयाचें असलें तर तें हेंच होय; आणि राष्ट्रीय सभेचे हल्लींचे पुढारी स्वतः ह्यूम, दादाभाईप्रमाणें सर्व धंदे सोडून जर या उद्योगास लागतील तर त्यांस कांहीं तरी यश येईल, इतकेंच नव्हे तर पुढील पिढीस चांगला किल्ला मिळून राष्ट्रीयसभेच्या भावी उत्कर्षाचा विमा उतरून ठेवल्याचें श्रेय त्यांस प्राप्त होईल. कोणतीही चळवळ घ्या, ती सिद्धीस नेण्यास अमुक एक तऱ्हेचा उद्योग पाहिजे असें ठरल्यावर सदर चळवळीच्या पुढाऱ्यांनीं रात्रंदिवस त्या उद्योगास लागलें पाहिजे, लोक वर्गणी देत नाहींत म्हणून रडत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. वर्गणी मिळणें किंवा न मिळणें हें स्वतःच्या उद्योगावर व हिमतीवर अवलंबून आहे. त्याकरितां परिश्रम केले पाहिजेत, हिंडलें पाहिजे; एक ठिकाणीं नाहीं तर दहा ठिकाणीं शब्द टाकला पाहिजे, आणि नाउमेद हा शब्द आपल्या कोशांतून अजीबात काढून टाकला पाहिजे. सर्व देशांतलिं लोक कळकळीचे असल्यावर पुढाऱ्यांचें कांहीं महत्त्व नाहीं; आणि पुढारी चांगला असल्यास तो आपल्या वर्तनानें व उद्योगानें लोकांच्या अंगांत कळकळ नसली तरी ती उत्पन्न करतो, व कांहीं अंशीं तरी लोकांवर आपली छाप ठेवून त्यांची प्रगति करतो, हें तत्व प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासावरून सहज समजण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे पुढाऱ्यांनीं लोकांसंबंधानें तक्रार करणें अगदीं उपयोगी नाहीं; लोक दोषास पात्र नसतात असें म्हणण्याचा आमचा इरादा नाहीं; परंतु लोक कसेही असले तरी त्यांचे दोष आपल्या नाउमेदीचें कारण होतें अशी सबब लोकांपुढें मांडणें म्हणजे स्वतःचा कमीपणा कबूल करण्यासारखेंच आहे. वानरांच्या हातून श्रीरामचंद्रांनीं काम करून घेतलें ही पौराणिक कथा सोडली, तरी मावळ्यांकडून शिवाजीनें करून घेतलें ही ऐतिहासिक गोष्ट आपल्या पुढाऱ्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं (ह्यूम, दादाभाई सोडून) अशा प्रकारच्या उद्योगास प्रारंभ केल्याचें दिसत नाहीं; व मलबारी शेटजी जर तशा

प्रकारच्या उद्योगास प्रारंभ करीत असतील तर त्यांनीं राष्ट्रीय सभेचा पुढाकार घेऊन हें काम उत्साहानें तडीस न्यावें, त्यास कोणाचीही हरकत येणार नाहीं. पण तशा प्रकारचा हेतु नसतां किंवा दिसत नसतां अमुक एक गोष्ट राष्ट्रीय सभेच्या अंगीं दृष्टीस पडत नाहीं, म्हणून मी सदर सभे-संबंधानें तटस्थ आहे, हें म्हणणें कांहीं बरोबर नाहीं. आमच्या देशांत जर कशाची उणीव असली तर ती पुढाऱ्यांचीच होय. आणि मलबारी शेटजीं-सारखा पौर्वात्य व पाश्चिमात्य यांचा मेळ घालणारा गृहस्थ जर या कामीं पुढाकार घेण्यास तयार असेल, तर त्यानें राष्ट्रीय सभेंत येऊन–सभेपासून निराळे राहून नव्हे–हें काम पतकरावें अशी त्यांस आमची विनंति आहे. राष्ट्रीय सभेच्या हातून किंवा मार्फत पुष्कळ गोष्टी आम्हांस करून घ्यावयाच्या आहेत; व ज्या कोणास स्वदेशहिताची खरी कळकळ असेल त्यानें सदर सभेंत जाऊन ती गोष्ट साध्य करावी हें चांगलें. ' मला राष्ट्रीय सभेचा शत्रु समजतात हें बरोबर नाहीं. ' अशी वृथा ओरड करीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं.

❁ ❁ ❁

*ह्यूमसाहेबांचा काँग्रेसभक्तांस अखेरचा निरोप

गोमायुरेकोअजमायुरेकः पृश्निरेको हरित एक एषां ।

....

देवहितिं जुगुपुर्द्रादिशस्य ऋतुं नरो न प्र मिनंत्येते ॥*

ऋग्वेद, मंडूकसूक्त, ७, १०३, ६ व ९

मद्रासच्या राष्ट्रीय सभेची बैठक कालरोजीं होऊन लाल मोहन घोस यांच्या भाषणानें पुष्कळ लोकांचे कान तृप्त झाले असतील, व कित्येकांच्या मनांत वर्षभर घोळत असलेली काँग्रेसच्या उपयुक्ततेबद्दलची शंका तेवढ्या वेळेपुरती

---

* **अर्थ**—एकजण बैलासारखा तर एकजण बोकडासारखा आरडतो ! ह्यांपैकीं एक पिंळवट तर एक ठिपकेदार !.....हे बेटे (बेडूक) देवानें नेमिलेली बाराव्या महिन्याची वेळ जपून पाळतात, कधींच चुकवीत नाहींत ! [पावसाळ्यांत वर्षारंभ धरून ' बारावा ' हें पद आहे. काँग्रेसही इंग्रजी वर्षाच्या अखेर बाराव्या महिन्यांतच भरते !]

* [केसरी ता. २२ डिसेंबर १९०३]

तरी दूर झाली असेल. पण आज अठरा वर्षें दरसाल लाखों रुपयांचा व्यय करून काँग्रेस सभेनें काय संपादन केलें, हल्लींप्रमाणेंच पुढला क्रम चालू ठेवल्यास आपणांस पुढें काय प्राप्त होण्याचा संभव आहे, आणि नसेल तर हल्लींच्या काँग्रेसच्या चळवळींत कोणता फरक केला पाहिजे, इत्यादि जे महत्त्वाचे प्रश्न आहेत ते या चार दिवसांच्या उत्सवानें जरी क्षणभर मनांतून नाहींसे झाले तरी नाताळ गेल्याबरोबर विचारी मनुष्याच्या मनांत ते पुनः जागृत झाल्यावांचून राहणार नाहींत. वर्षांतून एकदां कां होईना, पण नियमानें आम्हीं अठरा वर्षें एकसारखी ओरड चालविली आहे. काँग्रेसच्या सभामंडपांत झालेलीं आमचीं जोरदार भाषणें व ठराव वाचले असतां कोणासही आमच्या मागण्या न्यायाच्या आहेत असें वाटावें, इतका आवेश तेवढ्या वेळेपुरता तरी आमच्या अंगांत भरलेला असतो, आणि हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून स्वतःचे पैसे खर्च करून वर्षांतून एक वेळ तरी काँग्रेस भरेल त्या ठिकाणीं आम्ही जात असतों. पहिल्या पहिल्यानें आम्हांला मोठी उमेद होती कीं, ही जी कामधेनूसारखी काँग्रेसची संस्था निघालेली आहे, तिच्यापासून आमचें व आमच्या मुलाबाळांचें कोटकल्याण होईल; आणि खरें पाहिलें तर सरकारासहि या कामधेनूच्या सामर्थ्याबद्दल कांहीं वर्षें बरीच शंका होती. पण आम्ही व सरकार या दोघांचाहि तो भ्रम नाहींसा होऊन काँग्रेसचें महत्त्व कमी होऊं नये म्हणून तिला औद्योगिक प्रदर्शनाची पुरवणी जोडण्यांत येऊं लागली आहे. हे विचार नवे आहेत असें नाहीं; काँग्रेसला जाणाऱ्या मुखत्यारांत जे कांहीं विचारी आहेत त्यांच्या मनांत अशा प्रकारच्या .. का बरेच दिवस येऊं लागल्या आहेत, परंतु त्या उघड रीतीनें व्यक्त मात्र कोणी करीत नाहींत. हें असें कां व्हावें ? अठरा वर्षेंपर्यंत आम्ही चळवळ चालू ठेवली असतां सरकार आमचें कां ऐकत नाहीं ? बरें, ऐकत नाहीं इतकेंच नव्हे तर उत्तरोत्तर राजकीय पारतंत्र्याची आमच्या मानेभोंवतालची दोरी घट्ट करण्यास सरकार कसें धजावतें ? इत्यादि प्रश्न महत्त्वाचे आहेत; आणि काँग्रेसच्या खऱ्या हितचिंतकांनीं केव्हांना केव्हां तरी—पण लौकरच—त्यांचा विचार करणें अत्यंत अवश्यक आहे. कारण, कायदेशीर राजकीय चळवळ, किंवा इंग्रजींत ज्याला " कॉन्स्टिटयुशनल ॲजिटेशन " म्हणतात, हाच जर आमच्या उन्नतीचा खरा मार्ग असेल तर ती आम्हांस फलद्रूप झाली पाहिजे; आलि नसेल तर हा पंथ सोडून देऊन दुसरा कोणता तरी श्रेयस्कर मार्ग आपणांस पतकरला पाहिजे. तेव्हां अर्थातच असा प्रश्न निघतो कीं, अठरा वर्षें आम्हीं जी राजकीय चळवळ चालविली आहे ती जितक्या जोरानें, नेटानें आणि कळकळीनें चालावयास पाहिजे आहे तितकी चालवून निराशेचें खापर आमच्या पदरांत आलें, किंवा आमच्या हातून कांहीं चूक झाल्यामुळेंहि कामधेनु आम्हांस प्रसन्न झाली

नाहीं ! सारांश, इष्टदेवतेची उपासना करण्यांतच आमची कसूर झाली आहे, किंवा देवताच तितकी सामर्थ्यवान् नाहीं, हा प्रश्न आज आमच्यापुढें आहे. आणि त्याचें उत्तर आमच्या शब्दांनीं सांगण्यापेक्षां या देवतेचें आराधन करण्याचा गुरु-मंत्र ज्यांनीं आम्हांस दिला त्यांच्याच शब्दांनीं तें लोकांपुढें मांडण्याचा आज आमचा इरादा आहे.

ह्यूमसाहेब हे राष्ट्रीयसभेचे उत्पादक असून त्यांनीं आपलें शरीर, मन व धन हीं संस्था स्थापन करण्यांत व वाढविण्यांत खर्च केलीं हें सर्वप्रसिद्ध आहे. वार्धक्यामुळें–आणि कांहीं अंशीं नाउमेदीनें म्हटलें तरीही चालेल–आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस आपल्या देशांत एकांतांत घालविण्याचा त्यांनीं संकल्प केलेला आहे; व त्याप्रमाणें आज काहीं वर्षेपर्यंत ते वागतही होते. परंतु यंदाच्या सालीं त्याचे साथीदार सर डब्ल्यू वेडरबर्न, दादाभाई नौरोजी व डब्ल्यू. सी. बानर्जी यांनीं आग्रह केल्यावरून त्यांनीं कांग्रेसच्या सर्व अभि-मान्यांस उद्देशून निरोपादाखल म्हणून एक लेख लिहिला आहे; आणि तो प्रथम अलाहाबाद येथील 'हिंदुस्थान रिव्ह्यू' मध्यें व नंतर सर्व पत्रांत प्रसिद्ध झालेला आहे. सर डब्ल्यू वेडरबर्न, दादाभाई नौरोजी आणि बानर्जी यांचेही लेख या लेखाबरोबर जोडलेले आहेत. परंतु या सर्वांत खऱ्या कळकळीचा आणि स्पष्टवक्तेपणाचा लेख म्हटला म्हणजे ह्यूमसाहेबांचाच होय. शिवाय हे साहेब कांग्रेसचे जनक असल्यामुळें बापाचा उपदेश कितीही कडू असला तरी मुलांस तो जसा हितावह असावयाचा तसा ह्यूमसाहेबांचा हा निरोप सर्व कांग्रेसभक्तांस अप्रिय वाटला असला तरी परिणामीं तो श्रेयस्कर व्हावा अशा बुद्धीनेंच लिहिला आहे, याबद्दल कोणासही शंका यावयाची नाहीं. ह्यूम साहेब आपल्या लेखांत आणखी असेंही लिहितात कीं, "बाबानों ! तुम्हांस माझा हा शेवटचाच निरोप आहे. त्याप्रमाणें चालून निदान तुमची चळवळ योग्य दिशेनें आणि कळकळीनें चालली आहे, एवढें माझ्या नजरेस पडलें तर मी सुखानें मरेन ! कॉंग्रेसला फल आलेलें पाहीन असें अठरा वर्षांपूर्वी मला वाटत होतें; पण तसा योग आला नाहीं. तेव्हां आतां निदान ही चळ-वळ यशास येण्याच्या मार्गास लागली आहे एवढें तरी मला पाहूं द्या म्हणजे झालें !" ह्यूमसाहेबांचे हे शब्द कोणाही खऱ्या देशाभिमानी पुरुषाच्या अंतः-करणास झोंबल्याखेरीज रहावयाचे नाहींत. ज्या पुरुषानें आमच्याकरितां कॉंग्रेससभा उभारण्यांत आपलें आयुष्य खर्च केलें त्याला अठरा वर्षांनंतर अशा प्रकारचे उद्गार काढण्याचा प्रसंग यावा ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ! "तुम्ही सर्व कुचकामाचे आहां, मी आपल्याकडून तुम्हांस खरें तत्त्व सांग-ण्याची पराकाष्ठा केली, पण अजून तुमचे डोळे उघडत नाहींत; तुमचा भावी उत्कर्ष तुमच्याच हातांत आहे; जसें कराल तसें भराल, असें नित्य मी

तुमच्या कानींकपाळीं ओरडत आहे. पण अजून तुम्ही जशा रीतीनें उद्योगास लागावे तसे लागत नाहीं; नशीब तुमचें ! " असे ह्यूमसाहेबांचे उद्गार आहेत; व काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं याचा जर विचार केला नाहीं तर या पुढाऱ्यांवर लोकांची जी श्रद्धा आहे ती लवकरच नाहींशी होईल यांत बिलकुल शंका नाहीं. केव्हांना केव्हां तरी ह्यूमसाहेब म्हणतात त्या प्रश्नाचा विचार आम्हांस केलाच पाहिजे; आणि तो जितका लवकर होईल तितका चांगला.

बरें, ह्यूमसाहेब म्हणतात तरी काय ? कायदेशीर राजकीय चळवळींवर त्यांचा विश्वास नाहीं व ती सोडून द्यावी असें त्यांचें मत झालें आहे काय ! नाहीं. कायदेशीर राजकीय चळवळीवर अजून त्यांचा विश्वास आहे, परंतु त्यांचें असें म्हणणें आहे कीं, आम्हीं किंवा आमचे पुढारी यांनीं जितक्या नेटानें, कळकळीनें, स्वार्थत्यागानें, उल्हासानें किंवा हिमतीनें एकसारखा उद्योग करावयास पाहिजे तितका आम्ही करीत नाहीं. ते म्हणतात कीं, राजकीय हक्क मिळविणें किंवा राजकीय उन्नति करणें म्हणजे कांहीं थट्टा नव्हे. सरकारला शिव्या देऊन उपयोग काय ? मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच, आणि इंग्रजसरकार जरी शहाणें झालें तरी मनुष्यस्वभावाला अनुसरून आपल्या हातांत सर्व सत्ता रहावी, आणि लोकांचें कल्याण होणें असल्यास तें आपल्या हातांत सत्ता असल्यानेंच होईल असें त्यांस वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. सरकार म्हटलें कीं येथून तेथून सारखेंच, मग तें इंग्रज सरकार असो, पेशवे सरकार असो, किंवा मोंगल सरकार असो. अशा सरकारच्या जुलमाखालीं तुम्ही जर मरत असलां तर तो दोष तुमचा होय, सरकारचा नव्हे. कोणत्याही देशांतील लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणेंच त्यांच्यावर सत्ता चालविणारें सरकार मिळत असतें; हें तत्त्व अठरा वर्षांपूर्वीच मीं तुम्हांस सांगितलें होतें, असें ह्यूमसाहेब म्हणतात. तुम्हांस हल्लींची राज्यपद्धति जर असह्य झाली असेल तर ती असह्य झाली आहे असें तुमच्या वर्तनानें तुम्हीं दाखविलें पाहिजे. वर्षांतून एकदां तोंडाची वाफ दवडल्यानें कांहीं कार्य होत नाहीं. तुमचीं भाषणें मोठीं गोड आणि अलंकारिक असतात खरीं; आणि न्यायाच्या दृष्टीनें पाहिलें तर तुमचें म्हणणें सयुक्तिकहि आहे. पण सरकारापासून न्याय मागून घ्यावा, व तो सरकारा पासून लवकर मिळावा, अशी जर तुमची इच्छा असेल तर ती असल्या गुलहौसी भाषणानें किंवा वर्षांतून नाताळांत एकदां एकत्र जमून कंठशोष केल्यानें सिद्धीस जावयाची नाहीं. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत सबंध वर्षभर एकसारखी चळवळ सुरू ठेऊन इंग्रजलोकांस सळो कीं पळो केल्याखेरीज भीक नको पण कुत्रा आटप या न्यायानें यांस कांहीं तरी द्या आणि ही न्याद या देशांतून एकदां जाऊं द्या, अशा पेंचांत त्यांस घातल्यांखेरीज तुम्हांस यशप्राप्ति व्हावयाची नाहीं.

काँग्रेससभा काढली तेव्हां तिचा उद्देश हाच होता; पण दुर्दैवानें आतां तिला वार्षिक श्राद्धाचें स्वरूप प्राप्त झालें आहे ! अशानें काय होणार ? देशाभिमानाचें वारें सतत कित्येक वर्षेंपर्यंत अंगांत एकसारखें खेळून देशाकरितां आपलें तन, मन, आणि धन अर्पण करण्यास किंबहुना देशाकरितां सकटहि सोसण्यास जेव्हां तुम्ही तयार व्हाल, आणि या कामांत अशा निर्धारानें पडणारे जे लोक आहेत ते जेव्हां एकमेकांवर विश्वास ठेवून परस्परांच्या साहाय्यानें व सल्लामसलतीनें उद्योगास लागतील, तेव्हां कार्यसिद्धीची कांहीं आशा आहे. इंग्लंडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला काय किंवा कान्सरवेटिव पक्ष अधिकारारूढ झाला काय, तुम्हांस सारखेंच. एखाददुसरी गोष्ट लिबरल पक्षानें बरी केली म्हणून तेवढ्यावरून ते राजकीय हक्कांचें दान अनाहूत तुमच्या पदरांत टाकतील असें समजून हूरळून जाऊं नका. ह्यूमसाहेब म्हणतात कीं, मी तुम्हांस पुनः सांगतों कीं, तुमचें भाग्य तुमच्याच हातांत आहे. वर्षांतून एकदां पावसाळ्याचे वेळीं बेडूक जसा ओरडतो त्याप्रमाणें डिसेंबर महिन्यांत एक वेळ देशाभिमानाचें वारें अंगांत संचारूं दिल्यानें आणि काँग्रस सभेंत एखादें जोरदार भाषण केल्यानें कांहीं एक व्हावयाचें नाहीं. खरा लग्नसमारंभ जसा उत्सवांत नसतो, त्याप्रमाणें हें राजकीय चळवळीचें बीज या वार्षिक तमाशांत नाहीं. तें कोठें आहे हें मीं आपल्याकडून तुम्हांस अनेक वेळां सांगितलें आहे. पण अजून जर तुम्हीं जागे होत नाहीं तर त्यास मी काय करणार ? घोड्यास पाणी पिण्यास नदीवर न्यावयाचें काम माझ्या हातचें आहे; पण तेथें त्यास पाणी पिण्यास मी कसा लावणार ? तें त्यानेंच न्यावयास पाहिजे. माझी अशी खात्री आहे कीं, तुमच्यापैकीं पुढारी लोक जर दृढ निश्चयानें, करारीपणानें, आणि संकटांस न जुमानतां इंग्लंडांत येऊन आपल्या देशावर होत असलेल्या अन्यायाबद्दल तेथें एकसारखें धरणें धरून आकाशपाताळ एक करून सोडतील; व कांहीं झालें तरी आम्हांस अमुक एक हक्क मिळाल्याखेरीज आम्ही स्वस्थ बसणार नाहीं, आम्ही ते हक्क मिळवूंच मिळवूं, अशी आपल्या चिकाटीच्या वर्तनानें इंग्रजी लोकांची खात्री करून देतील तेव्हांच तुम्हांस कांहीं थोडाबहुत लाभ होईल. हें एक राजकीय मिशन आहे, आणि याकरतां मिशनरीसारख्या दृढ निश्चयानें सर्व संकटें सोसून सतत उद्योग सुरूं ठेवला पाहिजे. आर्यलंड आज सतत शंभर वर्षें अशा प्रकारचा उद्योग करीत आहे तेव्हां आज कोठें त्यास फल मिळण्याचा प्रसंग आला आहे, याकरितां ह्यूमसाहेब राष्ट्रीय सभेच्या भक्तांस आणखी असें सांगतात कीं, राजकीय चळवळ ही पुष्पशय्या आहे, अशी तुम्ही आपली खोटी समजूत करून घेऊं नका, वर्षांतून एकदां भूतसंचाराप्रमाणें देशाभिमानाचें वारें आणून काँग्रेस संपली कीं पुनः सर्वत्र सामसूम, जो

तो आपल्या पोटापाण्याच्या उद्योगांत, असें होऊन उपयोगी नाहीं. हाच उद्योग वर्षभर केला पाहिजे आणि आपल्या आक्रोशानें इंग्लंड किंवा हिंदुस्थानच्च काय पण आकाशपाताळ एक करून चिकाटी न सोडतां, आणि प्रतिपक्ष्याकडून तुम्हांस दटावण्याचा किंवा भेवडावण्याचा जो प्रयत्न होईल त्यास न जुमानतां तुम्हीं आपला सात्त्विक उद्योग दृढ निश्चयानें कांहीं वर्षेंपर्यंत सतत सुरू ठेवला पाहिजे, एक रतीभरही अळंटळं करून उपयोगी नाहीं; रात्रंदिवस तोच घोष व तोच प्रयत्न चालूं ठेवला पाहिजे; आणि असा तुमचा पूर्ण निश्चय दृष्टोत्पत्तीस आला म्हणजे तुमचे न्यायाचे राजकीय हक्क तुम्हांस मिळण्यास उशीर तो कोणता ? सर्व मदार काय ती तुमच्या उद्योगावर आहे. ' नर करणी करे तो नरका नारायण होय ' हें तत्व लक्षांत आणा; न्याय तुमच्या बाजूला आहे हें मनांत बाळगून एकमतानें, धैर्यानें आणि एकमेकांवर विश्वास ठेवून, एकसारखें कोणासही न भितां किंवा कोणत्याही सुखाची अपेक्षां न धरतां उद्योगास लागा, म्हणजे तुम्हांस आढळून येईल कीं, तुमच्या मागण्या तुम्हांस मिळूं नयेत असें म्हणण्याइतकें किंबहुना तुमच्याकडे वक्रदृष्टीनें पाहण्याइतकें समर्थ सर्व भूमंडळावर कोणतेंही सरकार नाहीं ! तुमचा सर्व वेळ, तुमचा पैसा, आणि जरूर पडल्यास तुमचें आयुष्य, या कामांत खर्च करण्यास तुम्ही तयार झालें पाहिजे; आणि असे तुम्ही तयार झाला म्हणजे सूर्यापुढें ज्याप्रमाणें अंधःकार टिकत नाहीं त्याप्रमाणेंच तुमच्या सात्विक निश्चयाच्या बळानें तुमच्या मार्गांतील अडचणी नाहींशा होऊन तुमच्या सौभाग्याचा भानु लवकरच्च मध्यान्हीं येईल. वृक्षाचें फल आयतेंच तुपच्या तोंडांत पडेल किंवा वर्षांतून एकदां तोंडची वाफ बाहेर काढल्यानें तें तुम्हांस प्राप्त होईल असें तुम्हांस वाटत असल्यास ती आशा फुकट आहे, त्यापासून कांहींएक व्हावयाचें नाहीं !

ह्यूमसाहेबांचा हा कळकळीचा उपदेश आमच्या पुढाऱ्यांनीं अवश्य विचार करण्यासारखा आहे. राष्ट्राच्या राजकीय उन्नतीचीं उत्क्रांतिरूप तत्वें गोड इंग्रजी शब्दांनीं वर्षांतून एकदां पोपटाप्रमाणें राष्ट्रीयसभेंत उच्चारल्यानें काम भागत नाहीं व भागणार नाहीं, हेंच काय तें मुख्य तत्त्व आहे; व ती गोष्ट मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंदाचार्लू वगैरे जे कांग्रेसचे पुढारी आहेत त्यांनीं लक्षांत आणून त्याप्रमाणें कांग्रेसचा मोर्चा फिरवून तिला कालानुरूप व मिळालेल्या अनुभवाप्रमाणें नवीन वळण दिलें पाहिजे. एकसारखा उद्योग आणि चिटाकी हेच गुण कार्यसिद्धि होण्यास अवश्यक आहेत; आणि ते जर कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं दाखविलें तर राजकीय हक्काबद्दल जी ही कायदेशीर लढाईची चळवळ सुरू होणार त्यांत या पुढाऱ्यांचें अनुकरण करण्यास नवीन पिढींतीलही पुष्कळ माणसें मिळतील, नाहीं असें नाहीं. पण जर मांजराच्या

गळ्यांत घांट कोणी बांधावी एवढाच काय तो प्रश्न आहे. त्याचें उत्तर कांग्रेसच्या हल्लींच्या पुढाऱ्यांनीं योग्य रीतीनें दिलें पाहिजे, व तसें ते न देतील तर त्यांच्यापासून तें आग्रहानें मागण्याचा लोकांचा अधिकार आहे. किंबहुना अशी स्थिति आज येऊन ठेपली आहे कीं याचें उत्तर न मिळेल तर राष्ट्रीय सभेच्या भजनीं लागलेला लोकसमुदाय ह्यूमसाहेबांप्रमाणेंच निराश होईल असें आम्हांस वाटतें. आणि एवढ्याचकरितां राष्ट्रीय सभेच्या हल्लींच्या पुढाऱ्यांनीं या प्रश्नाचा विचार केला पाहिजे असें पुनः पुनः कळकळीनें आणि नम्रपणें आम्ही त्यास सुचवितों. मि. लालमोहन घोस ह्यांस विलायतेंतील चळवळीची पूर्ण माहिती असल्यामुळें त्यांचें अध्यक्षतेखालीं भरलेल्या हल्लींच्या बैठकींत या प्रश्नाचा निकाल होईल तर फार चांगलें.

❁ ❁ ❁

*धंदेशिक्षण आणि सरकार

लॉर्ड कर्झन याच्या कारकीर्दीत हिंदुस्थान देशांतील लोकांच्या हिताचे आणि हिंदुस्थानसरकारची आशियाखंडांत इभ्रत वाढविण्याचे अथवा इंग्रजींत ज्यास 'होम आणि फॉरिन पॉलिसी' म्हणतात त्या दोन्ही तऱ्हेच्या प्रश्नांची वाटाघाट होऊन कसा निकाल लागत आहे याची कल्पना, अलीकडे जे कांहीं हिंदुस्थान सरकारचे ठराव प्रसिद्ध झाले आहेत अथवा जीं कृत्यें सरकार करीत आहे, त्यांवरून कोणासही उघड कळून येण्यासारखी आहे. हिंदुस्थानसरकार एकीकडे इराण, तिबेट यांच्या मोहिमेंत गुंतलें आहे व त्याकरितां लक्षावधि रुपये खर्च झाले तरी त्याजबद्दल सरकार कधींहि कुरकुर करीत नाहीं अगर पैशाच्या अडचणीची सबब सांगत नाहीं, इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानचा पैसा हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेरील लष्करी मोहिमेवर खर्च करूं नये अशा अर्थाचा जो पार्लमेंटसभेनें केलेल्या कायद्याचा निर्बंध आहे तो टाळण्याकरितां तिबेटच्या स्वारीला 'व्यापारी मोहिम' 'सिकिम मिशन' असें नांव सरकारानें दिलें आहे. सारांश, इंग्रजी साम्राज्याचा झेंडा इराणी आखातांत किंवा हिमालयाच्या उत्तरेस रोंवण्याकरितां लक्षावधि नव्हे तर कोट्यावधि रुपये खर्च झाले तरी तो सर्व खर्च करण्यास व वाटेल त्या अडचणी सोसून हा कार्यभाग तडीस नेण्यास लॉर्ड कर्झन तयार आहेत. परंतु दुसऱ्या पक्षीं घरचे (होम पॉलिसीचे) म्हणजे खुद्द हिंदुस्थान देशांत जी इंग्रजी प्रजा आहे तिच्या कल्याणाचे जे मार्ग

---

* [केसरी ता. २६ जानेवारी १९०४]

आहेत ते सुधारण्याचा जेव्हां सरकारापुढें प्रश्न येतो, तेव्हां मात्र आमच्या सरकारास पैशाची तूट पडून दुधाची तहान कधीं ताकावर तर कधीं चुन्याच्या निवळीवरच भागविण्याचा प्रसंग येतो. देशांतल्या प्रजेच्या कल्याणाचे जे प्रश्न लॉर्ड कर्झन यांनीं हातीं घेतले होते त्यांपैकीं महत्त्वाचे प्रश्न म्हटले म्हणजे पाटबंधाऱ्यांचीं कामें, शेतीची सुधारणा, शेतकऱ्यांच्या पेढ्या, युनिव्हर्सिट्यांची सुधारणा आणि धंदेशिक्षण देऊन उद्योगधंद्याची सुधारणा हे होत; आणि या सर्व प्रश्नांचा यथायोग्य निकाल लावण्यास आणि त्यांत सुधारणा करण्याकरितां ज्या कांहीं गोष्टी करावयाच्या त्या करण्यास हिंदुस्थानसरकारास द्रव्याचें अथवा मनुष्याचें वाटेल तितकें सहाय व बलही होतें. परंतु या प्रत्येक बाबतींत लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीचें धोरण पाहिलें तर कांहीं विलक्षणच आहे असें आढळून येईल. या सर्व सुधारणा करण्यास पुष्कळ पैसा खर्च करावा लागेल हें उघड आहे व तितका पैसा हिंदुस्थानच्या तिजोरींत नाहीं असेंहि नाहीं. तथापि या प्रत्येक बाबतींत कांहींना कांहीं तरी सबब काढून त्याची भलत्याच तऱ्हेनें वाट लावण्यांत आली आहे. शेतकऱ्यांच्या पेढ्या परस्पर काढल्या जाव्या याकरितां एक कायद्याचा मसुदा निघाला आहे; आणि युनिव्हर्सिट्यांतून अनेक शास्त्रांचा शोधपूर्वक अभ्यास चालू करण्याकरितां देशोदेशीचे विद्वान् इकडे आणण्याचें सोडून आमच्या युनिव्हर्सिट्या सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत अधिकाधिक कशा जातील याबद्दल प्रयत्न चालला आहे; देशांतील शेतकऱ्यांचा वर्ग व विद्वानांचा वर्ग यांच्या सुधारणेच्या मार्गांची याप्रमाणें वाट लावल्यावर बाकी कारागिरांचा वर्ग राहिला. या वर्गाचीहि धंदेशिक्षणावर नुकताच हिंदुस्थानसरकारानें जो ठराव प्रसिद्ध केला आहे त्यांत लॉर्ड कर्झनसाहेबांनीं वाट लावून दिली आहे. हिंदुस्थान देशांत उद्योगधंद्याच्या शिक्षणाकरितां ज्या शाळा आहेत त्या असाव्या तशा नाहींत असें वाटल्यावरून सरकारानें धंदेशिक्षणाची चौकशी करण्याकरितां कर्नल क्लिबर्न यांस अध्यक्ष नेमून एक कमिटी नेमिली होती. या कमिटीच्या रिपोर्टावर हल्लींचा ठराव प्रसिद्ध झाला आहे. कर्नल क्लिबर्नसाहेबांच्या कमिटीस ज्या प्रश्नांची चौकशी करावयास सांगितली होती तो प्रश्न असा होता कीं, हल्लीं धंदेशिक्षणाच्या ज्या कांहीं सरकारी शाळा चालू आहेत त्यांत जें शिक्षण मिळतें तें सामान्य तऱ्हेचें असून त्यापासून एखादा विशिष्ट धंदा चालविण्यास जें ज्ञान लागतें तें या शाळांतून विद्यार्थ्यांस देण्यांत येत नाहीं. उदाहरणार्थ, थोडे दिवस सुताराचें किंवा लोहाराचें काम करून ड्रॉइंग आणि थोडेसें रसायनशास्त्राचें किंवा पदार्थविज्ञानशास्त्राचें ज्ञान संपादिल्यानें कोणीहि विद्यार्थी एखादा स्वतंत्र धंदा काढून तो फायदेशीर रीतीनें चालविण्यास तयार होत नाहीं. सामान्य औद्योगिक शिक्षण त्यास मिळालेलें असतें; पण कोणताहि एखादा विशिष्ट धंदा किंवा कारखाना तो चालवूं शकत

नाहीं. ही उणीव कशी दूर करावी, इलाख्यांतील मुख्य ठिकाणीं व जिल्ह्याजिल्ह्यांतून जे कारखाने किंवा धंदे आहेत त्यांत वाकबगार होतील असे विद्यार्थी निपजण्यास कोणत्या प्रकारची धंदेशाळा असावी, या शाळांतून कोणकोणते विशिष्ट धंदे (सामान्य धंदेशिक्षण नव्हे) शिकवावे; आणि हिंदुस्थानांत निरनिराळे धंदे निरनिराळ्या जातींचे लोक करतात ही गोष्ट लक्षांत ठेवून निरनिराळ्या जातींतील लोकांनीं आपल्या जातींतील मुलें या शाळेंत पाठवावीं अशाबद्दल व तीं मुलें धंदेशिक्षणाच्या शाळेंतून बाहेर पडल्यावर कारकुनीच्या धंद्याकडे वळणार नाहींत अशाबद्दल काय तजवीज करावी, हे प्रश्न या कमिटीस विचारले होते आणि त्यावर रिपोर्ट करण्यास सांगितलें होतें. हे सर्व प्रश्न महत्त्वाचे आहेत यांत बिलकुल शंका नाहीं. लिहितां वाचतां येणें आणि ज्यास उदार शिक्षण म्हणून म्हणण्याची वहिवाट आहे तशा प्रकारचें शिक्षण असणें हें कारागीर लोकांस कांहीं अंशीं जरूर आहे. पण तेवढ्यानें किंवा लोहार–सुतारकीचें सामान्य ज्ञान असल्यानेंही त्यांचें काम भागत नाहीं. हिंदुस्थान देशांत पूर्वीं जे जिन्नस तयार होत होते ते बहुतेक सर्व आतां परदेशांतून येऊं लागले आहेत; आणि ते परदेशांत ज्या पद्धतीनें तयार होतात त्या पद्धतीचें ज्ञान आमच्या कारागिरांस झाल्याखेरीज आमच्या देशांतील धंदे पुन्हां कधींही ऊर्जितावस्थेस यावयाचे नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. हिंदुस्थानसरकास ही गोष्ट पूर्णपणें माहीत आहे असें हल्लींच्या ठरावावरूनच दिसून येईल. या ठरावांत उद्योगधंद्याचे दोन विभाग केलेले आहेत. एक सुताच्या व कापडाच्या गिरण्यासारखें पुष्कळ भांडवल व यंत्रसामुग्री लागणारे; आणि दुसरे जिल्ह्यांतून किंवा खेडेंगांवांतून थोड्या भांडवलानें सुरू होणारे लहान लहान कारखाने. पहिल्या तऱ्हेचे कारखाने मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद, लाहोर, कानपूर वगैरे मोठमोठ्या शहरांतूनच व्हावयाचे व ते पैसेवाले लोकांनींच सुरू केले पाहिजेत. धंदेशिक्षणाच्या शाळांपासून अशा मोठमोठ्या कारखान्यांस जी काय मदत व्हावयाची ती एवढीच कीं, सदर कारखान्यांत लागणारे वरच्या प्रतीचे कारागीर, मोकदम किंवा कारागिरावर देखरेख करणारे धंद्याचीं तत्वें समजणारे सुपरिंटेंडेंट या शाळांतून शिकून तयार व्हावेत; अर्थात् ज्या ज्या ठिकाणीं जे जे मोठमोठे कारखाने असतील त्या त्या कारखान्यांतून उपयोगी पडणारे वरच्या प्रतीचे कारागीर व नोकर त्या त्या ठिकाणच्या शाळांतून तयार करण्याची तजवीज झाली पाहिजे. उदाहरणार्थ, मुंबईस कापसाचें सूत काढणें व विणणें याच्या मोठ्या गिरण्या आहेत; तर या गिरण्यांतून उपयोगी पडतील असे या धंद्याचें ज्ञान असलेले विद्यार्थी मुंबई येथील धंदेशिक्षणाच्या शाळेंत तयार झाले पाहिजेत. कानपुरास लोंकरीचे कपडे तयार करण्याचे कारखाने आहेत; तर तेथील धंदेशिक्षणाच्या शाळेंत तो धंदा शिकविला

पाहिजे. ज्या धंद्यास मोठें भांडवल लागतें त्या धंद्यांतील शिक्षणासंबंधानें ही स्थिति झाली. परंतु वर सांगितल्यापैकीं दुसऱ्या वर्गांतील म्हणजे लहानसान धंद्यांसंबंधानें याहून निराळी व्यवस्था करणें जरूर आहे. कारण, या बाबतींत प्रत्येक धंद्याचें पूर्ण ज्ञान एकाच माणसास देणें शक्य आहे, इतकेंच नव्हे तर जरूरहि आहे. कुलपें, आगकाड्या, बटणें, छत्र्या, चष्मे, चाकू, साबण, वारनिसें, तेलें, चामडें कमावणें, रंग देणें वगैरे लहानसान पुष्कळ धंदे असे आहेत कीं, ते थोड्या भांडवलानें निरनिराळ्या ठिकाणीं चालू शकतील. हे धंदे कसे करावे याचें ज्ञान जेथें मिळेल अशा शाळा हिंदुस्थानांत बहुतेक नाहींत असें म्हटलें तरी चालेल. धंदेशिक्षण आम्हांस पाहिजे असें पुष्कळांस वाटूं लागलें आहे, आणि कांहीं म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांनीं टेन्निकल स्कूल्स काढून त्यांत थोडेसें ड्राइंग व थोडेसें सुतारकाम शिकविण्याची कांहीं ठिकाणीं तजवीज केली आहे. पण ज्यास खरें धंदेशिक्षण म्हणतात तें याहून फार भिन्न आहे; व तें हल्लीं चालू आहे अशा प्रकारच्या टेन्निकल शाळा कितीही वाढल्या तरी त्यांत मिळावयाचें नाहीं. देशांतील कच्चा माल बाहेर किती व कोणत्या प्रकारचा जातो आणि तिकडे त्याचें कोणत्या प्रकारचें रूपांतर होऊन तो आपल्या देशांत परत येतो याची पहिल्यानें पुरी चौकशी झाली पाहिजे. अशी चौकशी झाल्याखेरीज कोणत्या ठिकाणीं कोणता नवा धंदा करतां येईल हें सांगतां यावयाचें नाहीं. अर्थात् त्या ठिकाणीं अमुक एक धंदा शिकविण्याची शाळा काढली पाहिजे असेंही ठरविणें अशक्य आहे. क्लिबर्नसाहेबांच्या कमिटीच्या रिपोर्टांतही असाच अभिप्राय दिला आहे, व कोणत्या धंदेशिक्षणाच्या कोणत्या शाळा कोठें काढाव्या हें सध्यां आपणांस ठरवितां येत नाहीं असें लिहिलें आहे. कमिटीचें हें म्हणणें बरोबर आहे. पण त्याचा हिंदुस्थानसरकारनें आपल्या ठरावांत कांहीं विचार केलेला दिसत नाहीं. कोणत्या प्रांतांत किंवा जिल्ह्यांत कोणत्या प्रकारचा कच्चा माल तयार होतो किंवा मिळतो व त्याचे काय काय पदार्थ तयार करतां येतात याची पाहणी सरकारनें आधीं केली पाहिजे. ही कल्पना कांहीं नवी नाहीं. अशा प्रकारची सूचना वर्तमान-पत्रांतून, औद्योगिक परिषदेकडून किंवा इतर संस्थांकडून आज पुष्कळ वर्षें करण्यांत येत आहे. पण अद्याप कोणत्याही इलाख्यांत अशा प्रकारची औद्योगिक पाहणी झालेली नाहीं. जमिनीची सर्व्हे किंवा पाहणी करून सारे ठरविण्याकरितां किंवा वाढविण्याकरितां सरकारानें काढलेलीं मोठमोठीं खातीं चालू आहेत. पण लहानसान धंदे देशांत सुरू करण्यास अवश्य लागणारी जी औद्योगिक पाहणी ती करण्यास अद्याप सरकार तयार नाहीं. हल्लींच्या ठरावांत हिंदुस्थानसरकार असें म्हणतें कीं, लहान लहान धंदेशिक्षणाच्या शाळा काढण्याचा जो प्रश्न आहे त्याचा विचार स्थानिक सरकारानें करावा.

पण या म्हणण्यांत आम्हांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. स्थानिक सरकारच्या खर्चाकरितां दर पांच वर्षांनीं प्रांतिक करार करून जी रक्कम किंवा उत्पन्नाच्या बाबी हिंदुस्थानसरकार प्रांतिक सरकारास देतें त्या उत्पन्नांत प्रांतिक सरकारचा खर्च भागण्याचींच मारामार पडत असते, मग धंदेशिक्षणाच्या शाळा काढण्याकरितां जो पैसा लागणार तो प्रांतिक सरकार कोठून आणणार ? शिवाय कांहीं धंदे असे आहेत कीं, ते चालविण्याचा विचार एका इलाख्यांतील प्रांतिक सरकारानेंच करून उपयोगी नाहीं. अर्थात् हिंदुस्थानसरकारानेंच हें काम हातीं घेतलें पाहिजे, तरच तें नीट तडीस जाईल. पण लॉर्ड कर्झन तसें करण्यास तयार नाहींत. कर्नल क्लिबर्न यांच्या कमिटीचें असें मत आहे कीं, लहान लहान धंदे शिकविण्याकरितां ज्या शाळा काढावयाच्या त्यांत धंद्यासंबंधानें नुसतें शिक्षण देऊन उपयोगी नाहीं, तर तो धंदा फायदेशीर रीतीनें कसा चालवावा हें व्यापारी शिक्षणही त्यांत मिळालें पाहिजे. उदाहरणार्थ, चामड्याचा, कांचेचा किंवा साखरेचा कारखाना घ्या. या कारखान्यांत ज्या रासायनिक क्रिया लागतात त्या विद्यार्थ्यांस शिकविल्या तर तेवढ्यानें हे धंदे फायदेशीर रीतीनें चालविण्यास विद्यार्थी तयार होत नाहींत. यासाठीं फायदेशीर रीतीनें हे धंदे जे लोक चालवितात अशा लोकांच्या कारखान्यांतून विद्यार्थी उमेदवार म्हणून ठेवावे आणि त्यांस अवश्य लागणारें लिहिण्यावाचण्याचें, ड्रॉइंगचें आणि रासायनिक शास्त्राचें ज्ञान धंदेशिक्षणाच्या शाळेंत द्यावें अशी कमिटीनें सूचना केली होती; आणि अशा प्रकारची शाळा नेपल्स (इटली) येथें चालू आहे, त्या नमुन्यावरच इकडे शाळा कराव्या असें म्हटलें होतें. हल्लीं आमच्या देशांत जे धंदे चालू आहेत त्यांसंबंधानें पाहिलें तर ही सूचना कांहीं वावगी नव्हती, किंबहुना नवे धंदे लोकांस शिकविल्यानंतर त्यांपैकीं जे लोक कारखाने काढतील त्यांचे ते कारखाने आणि धंदेशिक्षणाच्या शाळा यांची परस्पर जोड राहणेंही इष्ट आहे. पण हिंदुस्थानसरकार या बाबतींत कांहीं उद्योग करण्यास तयार आहे असें त्यांच्या हल्लींच्या ठरावावरून दिसत नाहीं. कमिटीची सूचना हिंदुस्थानसरकारास मान्य नाहीं तर ती राहूं द्या. पण त्याऐवजीं दुसरी कांहीं तरी तोड हिंदुस्थानसरकारनें काढावयास पाहिजे होती. तशी तोड काढलेली हल्लींच्या ठरावांत कोठें दिसत नाहीं. सध्यां हिंदुस्थानसरकारानें जें काय केलें आहे तें एवढेंच कीं, धंदेशिक्षणाकरितां दरसाल १५० पौंडांच्या स्कॉलरशिपा देऊन हिंदुस्थानांतील दहा विद्यार्थी परदेशांत पाठवावयाचे. या विद्यार्थ्यांनीं कायदा, वैद्यकी, जंगल, इंजीनियरिंग आणि शेतकी यांखेरीज दुसरा कोणता तरी विषय घेतला पाहिजे असा सरकारचा ठराव आहे. या स्कॉलरशिपा विशेषेंकरून मुंबईंतील कापडाच्या गिरण्यांचे कारखाने आणि बंगाल्यांतील कोळशाच्या

खाणीचे कारखाने या दोन बाबतींत ज्या प्रकारचें शास्त्रीय ज्ञान लागतें त्या प्रकारचें ज्ञान संपादन करण्याकरितां काढलेल्या आहेत; म्हणजे वर मोठमोठ्या शहरांतील आणि जिल्ह्यानिहाय चालणारे असे जे धंद्याचे दोन वर्ग केले आहेत त्यांपैकीं पहिल्या म्हणजे मोठ्या भांडवलानें चालणाऱ्या धंद्यासबंधानें ही व्यवस्था केली आहे असें दिसतें. आजपर्यंत सरकारानें या बाबतींत कांहींच केलें नव्हतें त्यापेक्षां सालीना १५० पौंडांच्या दहा स्कालरशिपा सुरू केल्या याबद्दल सरकारचे आम्हीं आभार मानतों. पण जिल्ह्याजिल्ह्यांतून लहान लहान नवे धंदे लोकांस शिकविण्याकरितां किंवा बुडत चाललेले धंदे सुधारण्याकरितां ज्या शाळा पाहिजेत त्या निघाल्याखेरीज देशाची औद्योगिक उन्नति कधींहि व्हावयाची नाहीं. हें काम खर्चाचें आहे, व तें कसें करावें याचा कित्ताही जपानानें घालून दिला आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, धंदेशिक्षणावरील हल्लींच्या ठरावांत यासंबंधानें सर्व हवाला स्थानिक सरकारावर देण्यापलीकडे हिंदुस्थानसरकारनें कांहींच केलेलें दिसत नाहीं. किरकोळ कांहीं सूचना केलेल्या आहेत; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं, जे उद्योगधंदे देशांत निघाल्यानें परदेशांतून इकडे येणारे पदार्थ कमी होऊन देशांतील कच्चा माल देशांतच खपेल अशा प्रकारचे लहानसहान कारकारखाने सर्व देशभर ज्यायोगानें निघतील अशा प्रकारचा मोठा उद्योग हातीं घेण्यास हिंदुस्थानसरकार तयार नाहीं. इतकेंच नव्हे तर देशाची औद्योगिक पाहणीही करण्यास हिंदुस्थानसरकार तयार आहे असें दिसत नाहीं, सारांश, या लेखाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें या ' घरच्या ' म्हणजे देशांतील लोकांस उपयोगी पडणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नाची अशा प्रकारच्या इतर प्रश्नांप्रमाणें हिंदुस्थानसरकारनें हल्लींच्या ठरावांत वासलात लावलेली आहे. ठरीव औद्योगिक उन्नति होण्यास च्या गोष्टींची अत्यंत अवश्यकता आहे त्या गोष्टी करण्यास सरकार तयार नाहीं; आणि पैशाची अडचण म्हणावी तर चंबीदरींत लक्षावधि रुपये ओतले जात आहेत ! अशा स्थितींत दहा स्कॉलरशिपा तरी निघाल्या एवढ्याबद्दल सरकारचे आभार मानून स्वस्थ बसण्यापलीकडे कांहीं इलाज नाहीं. हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति होण्यास काय केलें पाहिजे हें सरकारास कळत नाहीं असें नाहीं, पण राज्यांतलि लोक अधिक सुखी व्हावें यापेक्षां राज्याची मर्यादा अधिक वाढवून त्याचा दरारा ही अधिक वाढवा इकडे सरकारचें लक्ष अधिक असल्यामुळें ह्मणा, किंवा हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति कांहीं अंशीं इंग्लंडच्या व्यापाऱ्यांस प्रतिकूल असल्यामुळें ह्मणा, या प्रश्नाचा व्हावा तसा सरकारकडून विचार होत नाहीं. हल्लींचा धंदेशिक्षणावरचा ठराव अशाच प्रकारचा आहे. शब्दपांडित्याची बरीच रेलचेल आहे; पण कृतीसंबंधानें पाहूं गेलें असतां दहा स्कॉलराशीपांपलीकडे निदान सध्यां तरी दुसरा कांहीं फायदा होईल असें दिसत नाहीं.

◆ ◆ ◆

* उत्तम गुराखी कोण ?

विलायतेंत ' सोसायटी ऑफ आर्ट्स ' नांवाच्या सभेनें तिकडील लोकांस हिंदुस्थानची माहिती होण्याकरितां हिंदुस्थानांतील निरनिराळे प्रांत व इलाखे यांजवर निरनिराळ्या व्याख्यात्यांकडून व्याख्यानें देण्याचा क्रम सुरू केला आहे. व्याख्याते त्या त्या प्रांतांत सिव्हिलियनचे मोठमोठे काम केलेले अधिकारी असतात, व ते आपलीं व्याख्यानें मनोरंजक करण्याकरीतां म्याजिक लँटर्नचा उपयोग करून त्या त्या प्रांतांतील प्रेक्षणीय स्थलांचीं चित्रेंहीं श्रोत्यांस दाखवितात. अशा प्रकारचीं व्याख्यानें समाजास मोहक होऊन आवडणारीं झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. त्यांतून येथून पेन्शन घेऊन गेलेले बडे बडे अधिकारी व्याख्याते असल्यानंतर मग विचारावयासच नको. मद्रास इलाख्यावरील व्याख्यान मि. रीस यांनीं दिलेलें होतें व आतां झालेलें मुंबई इलाख्यावरील व्याख्यान आमचे इकडे प्रसिद्धीस आलेले सर डब्ल्यु. लिवार्नर यांनीं थोडें दिवसांपूर्वीं दिलें. लीवार्नर साहेबांची वर्णन करण्याची शक्ति व मतें मुंबई इलाख्यांतील लोकांस तरी पूर्णपणें माहीत आहेत. करितां त्यासंबंधानें आज विवेचन करण्याची जरूरी नाहीं. व्याख्यात्यांच्या लौकिकावर व्याख्यानास बरेच बडे बडे लोक आले होते, व त्यांपैकीं बहुतेकांच्या तोंडून व्याख्यान मोठें उत्तम झालें असे उद्गार निघालेले आहेत. इतकेंच नव्हे तर या वेळीं ज्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें होतें ते हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. ब्रॉडरिक यांनींहि व्याख्यात्याची भरपूर स्तुति केलेली आहे. अशा व्याख्यानास आम्ही कांहीं खोड ठेवणें म्हणजे कित्येकांस चमत्कारिक वाटेल. परंतु इसापनीतींतील ' सिंह व चित्रकार ' हीं गोष्ट लक्षांत आणली म्हणजे आमच्या उद्गाराबद्दल कोणासही आश्चर्य वाटण्याचें कारण राहणार नाहीं. प्रथमतः आम्ही ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जे गृहस्थ हीं व्याख्यानें देतात ते या देशांत किंवा त्या त्या प्रांतांत मोठमोठ्या अधिकाराचीं कामें बजाऊन गेलेले असतात. अर्थात् आपापल्या प्रांतांतील प्रजेस अधिकाराच्या दडपणाखालीं ठेऊन आपण किंवा एकंदर इंग्रज सरकारनें त्यांजवर अंमल कसा चालविला अथवा त्यांच्या गमजा कशा चालू दिल्या नाहींत हाच अभिमान या व्याख्यानांतून भरलेला असावयाचा. तशांत लिवार्नरसारखे अभिमानी व्याख्याते असल्यावर मुंबई इलाखा हा हिंदुस्थानांतील सर्व इलाख्यांत श्रेष्ठ असें जें त्यांनीं प्रतिपादन केलें तेंही त्यांच्या बीदास व स्वभावास अनुरूपच होतें असें म्हटलें पाहिजे. परंतु व्याख्यात्यांनीं

---

* [केसरी ता. ९ फेब्रुवारी १९०४

सांगितलेल्या मुंबई इलाख्याच्या गौरवाचा प्रजेच्या दृष्टीनें विचार केला तर आम्हीं वर मथळ्यांत लिहिल्याप्रमाणें कोणाच्याही तोंडांतून उद्गार निघणार आहेत. सर्व हिंदुस्थान देश ईश्वरी सत्तेनें आज इंग्रज सरकारच्या ताब्यांत आलेला आहे; आणि मद्रास, मुंबई, बंगाल, पंजाब, किंवा इतर दुसरे कोणतेही इलाखे अगर प्रांत घेतले तरी त्या सर्वांत इंग्रजी अंमल एकसारखाच जारीनें सुरू आहे. बंगाल्यांतील प्रजेस मुंबईतील किंवा मद्रासेंतील प्रजेपेक्षां कांहीं विशेष हक्क आहेत असें नाहीं; आणि प्रजेच्या सुखाची आणि समाधानाची मर्यादा पाहिली तरी तीही चोहोंकडे एकसारखीच आहे असें हिंदुस्थानभर चोहोंकडे एकसारख्या पडणाऱ्या दुष्काळावरून व्यक्त होत आहे. अशा स्थितींत लिवार्नरसाहेबांनीं मुंबई इलाखा सर्वांत श्रेष्ठ, रीससाहेबांनीं मद्रासइलाखा उत्तम किंवा तिसऱ्या एका साहेबांनीं बंगालइलाखा सर्वांत अग्रगण्य अशी फुशारकी मारण्याचा अर्थ काय ? बंगाल्यांतील लोकांस* किंवा प्रजेस मुंबईइलाख्यांतील प्रजेपेक्षां कांहीं अधिक हक्क आहेत काय ! नाहींत. हिंदुस्थानावर इंग्रजी राज्यसत्तेचा जो मोठा रूळ फिरत आहे त्यामुळें प्रजाजनांच्या वाढीची जी खुंट झालेली आहे ती चोहोंकडे सारखीच आहे. मग एक इलाखा दुसऱ्या इलाख्यापेक्षां श्रेष्ठ असें कोणीं म्हटल्यास त्यापासून आमचा काय फायदा ? आपण असें समजूं कीं, तीस कोटी गुरें निरनिराळ्या गुराख्यांस वांटून दिलीं आहेत; आणि ते सर्व या गुरांस एकाच प्रकारच्या दावणींत घालून एकसारखेच राबवीत आहेत या गुराख्यांपैकीं एकानें उठून जर व्याख्यान दिलें आणि सांगितलें कीं, माझ्या ताब्यांतील गुरें उत्तम व माझा कळप सर्वांत श्रेष्ठ तर आपण त्यास काय म्हणूं ? तोच न्याय प्रकृतस्थलीं लागू करावयाचा आहे. मुंबईइलाख्याचा नंबर क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या मानानें सर्व इलाख्यांत जरी चवथा येतो तरी त्याचें उत्पन्न जास्त आहे, व हिंदुस्थानसरकारच्या राज्यकारभारास जी हरएक प्रांतांकडून रक्कम जाते त्यांत मुंबईकडून जाणारी रक्कम जास्त आहे यामुळें, आणि मुंबईइलाख्यांत दुष्काळ व प्लेग असतांही लोकांनीं अजून टिकाव धरला आहे, मुंबईतील पोस्टांतून इतर इलाख्यांपेक्षां अधिक पत्रें रवाना होतात, व पोस्टांतील सेव्हिंग ब्यांकेंत लोकांचे पैसेही अधिक आहे इतकेंच नव्हे तर इलाख्याचा व्यापारही अधिक आहे, यावरून हा इलाखा सर्वांत श्रेष्ठ आहे असें लिवार्नसाहेबांनीं म्हटलें आहे. तसेंच वेरूळ, नाशीक, आजिंठा वगैरे ठिकाणचीं लेणीं व विजापूरच्या इमारती यामुळेंही या इलाख्यास एकप्रकारचा मोठेपणा प्राप्त झाला आहे असें व्याख्यात्यांनीं सांगितलें. आमच्या मतें या सर्व गोष्टी आगंतुक आहेत. इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थापन करण्यास कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन ठिकाणांहून सुरुवात केली, यामुळें हल्लीं सदर नांवाचे जे तीन इलाखे झाले आहेत ते कांहीं

एका विशिष्ट क्रमानें बनत गेले आहेत, त्यांच्या रचनेंत यापेक्षां कांहीं जास्त तत्त्व आहे असें नाहीं. कारण, भाषा किंवा एकंदर लोकसमूहाची सामाजिक व्यवस्था पाहिली तर कर्नाटक प्रांतांतील कांहीं तालुके मद्रासकडे व सिंधप्रांत पंजाबाकडे जावयास पाहिजे होते; व वऱ्हाड नागपुराचे कांहीं भाग मुंबईइलाख्यास जोडावयास पाहिजे होते. पण इलाख्याची रचना ऐतिहासिक क्रमानें झालेली असल्यामुळें सिंध, गुजराथ, महाराष्ट्र आणि कर्नाटक असे चार निरनिराळे प्रांत मुंबईइलाख्यांत सामील झालेले आहेत. पण एवढ्यामुळें मुंबईइलाख्यास इतर इलाख्यांपेक्षां मोठेपणा देण्याचें आम्हांस कांहीं कारण दिसत नाहीं. तसेंच विलायतेहून जो माल हिंदुस्थानांत येतो तो मुंबई व कराची बंदरांतून पाठविणें सोपें पडत असल्यामुळें त्या बंदरासहि आगंतुक महत्त्व आलेलें आहे. पण तेवढ्याकरितां मुंबईइलाख्यानें फुशारकी मारावयाची म्हणजे मुंबईइलाखा हिंदुस्थानच्या पश्चिमेस आहे एवढ्याचकरितां फुशारकी मारणें होय. फुशारकीस हेंच कारण बस्स आहे तर सह्याद्रीपर्वत आमच्या इलाख्यांत आहे आणि गोदा व कृष्णा यांचे उगमहि याच इलाख्यांत झाले आहेत, अथवा तापी, नर्मदा व सिंधु या नद्या याच इलाख्यांत येऊन आपलें पाणी सागरास मिळवितात याबद्दलहि आम्ही फुशारकी मारावयास पाहिजे. पण मग गंगा आणि ब्रह्मपुत्रा बंगाल्यांत आणि कृष्णा, गोदा व कावेरी मद्रासइलाख्यांत समुद्रास मिळतात अगर वेदांत सांगितलेल्या पांच नद्या पंजाबांत आहेत म्हणून त्या त्या प्रांतांनींही आपली फुशारकी कां मारूं नये ? पोस्टांतील सेव्हिंग ब्यांकेंत मुंबईइलाख्यांत जास्त पैसे ठेवले जातात, यावरून मुंबईइलाख्याची स्थिति चांगली असें लिवार्नरसाहेब म्हणतात; पण मि. रीस यांनीं या व्याख्यानानंतर जें भाषण केलें त्यांत त्यांनीं याच गोष्टीवरून लिवार्नरसाहेबांच्या अगदीं विरुद्ध अनुमान काढलें आहे. ते म्हणतात कीं, देशांतील उद्योगधंदे व सावकारी पेढ्या बुडाल्यामुळें सरकारी बँकेखेरीज पैसे ठेवण्यास सुरक्षित स्थळ उरलें नाहीं, एवढेंच यावरून सिद्ध होतें. एकाच गोष्टीवरून दोन परस्परविरुद्ध अनुमानें कशीं निघतात याचें हें चांगलें उदाहरण आहे, रीससाहेबांच्या मताप्रमाणें मुंबईइलाख्याबद्दल जी फुशारकी लिवार्नरसाहेब मारतात त्यांत कांहीं विशेष नाहीं. कारण ती मुंबईकरांच्या स्वभावास अनुरूपच आहे ! रीससाहेब यांनीं आपलें आयुष्य मद्रासइलाख्यांत काढलेलें आहे आणि लिवार्नरसाहेबांची नोकरी मुंबईइलाख्यांत झालेली आहे. तेव्हां मीं जेथें नोकरी केली तो इलाखा श्रेष्ठ असें या दोघांपैकीं प्रत्येकाचें म्हणणें आहे. हा अभिमान ठीकच आहे. व आमचे कांहीं वाचक आम्हांस कदाचित् अशीहि शिफारस करतील कीं, या दोहोंपैकीं आपल्या इलाख्याचा जे अभिमान बाळगतात त्यांचा पक्ष आम्ही उचलून धरावा. परंतु दुःखाची गोष्ट अशी

कीं, या दोघांच्याहि अभिमानांत आवडानिवड करण्यासारखी आमची स्थिति नाहीं. वर दिलेल्या दृष्टांताप्रमाणें ' तुझीं गुरें चांगलीं कीं माझीं गुरें चांगलीं ' अशाबद्दलचा दोन गुराख्यांमधील हा वाद आहे, व त्याचा कसाहि निर्णय झाला तरी एकाच्या हाताखालील गुरांस दुसऱ्याच्या हाताखालील गुरांपेक्षा कांहीं अधिक चारावैरण मिळेल असा बिलकुल संभव नाहीं. हा गुरांचा दृष्टांत वाचकांस कदाचित् चमत्कारिक वाटेल, पण लिवार्नरसाहेबांचें व्याख्यान पुढें पुढें वाचीत गेल्यास कोणाही धूर्त मनुष्यास हा दृष्टांत सुचल्यावेरीज रहावयाचा नाहीं. मुंबईइलाख्यांतील सिव्हिलियन गोऱ्या अधिकाऱ्यांस इतर इलाख्यांतील अधिकाऱ्यांपेक्षां अधिक दक्षतेनें व हुषारीनें काम करावें लागतें, व त्यामुळें या इलाख्यांतील सिव्हिल सार्व्हिस व तिचें कामहि अधिक महत्त्वाचें आहे असें लिवार्नरसाहेबांनीं पुढें म्हटलें आहे. आणि त्याच्या समर्थनार्थ मुंबईइलाख्यांतील पूर्वीची स्थिति अर्थात् पेशव्यांचें स्वतंत्र राज्य व त्या राज्यांत असलेलीं मराठी संस्थानें यांचा परस्पर संबंध आणि इंग्रजी राज्य झालें तरी तत्पूर्वीं स्वातंत्र्य अनुभविल्यामुळें या इलाख्यांतील ब्राह्मण लोकांच्या मनांत असलेली असंतुष्टता किंवा इतर लोकांच्या अंगीं असलेला तापटपणा याचें लिवार्नरसाहेबांनीं वर्णन केलें आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, मुसलमान, पारशी, पेशवाईची आठवण असणारे ब्राह्मण, मराठे, आणि जंगलांतील पूर्वीपासूनच लुटारू असलेले भिल्ल, कोळी वगैरे लोक या सर्वांस इंग्रजी सत्तेच्या दावाखालीं ठेवण्याचें कठीण काम मुंबईसरकारास करावें लागतें व हें काम मुंबईचें सिव्हिलियन बिनबोभाट करतात एवढयावरूनच मुंबईइलाख्याचें मोठेंपण सिद्ध होतें. सारांश, हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचें सामर्थ्य जर कशावरून अधिक व्यक्त होत असेल तर तें मुंबईइलाख्यांतील प्रजेमध्यें सिव्हिल सर्व्हेटांकडून जी शांतता राखण्यांत येते त्यावरून व्यक्त होतें असें लिवार्नरसाहेबांचें म्हणणें आहे, व याचकरितां मुंबईइलाखा अधिक महत्त्वाचा असें ते सांगतात. विलायतेंतील श्रोतृसमाजापुढें मारलेली ही फुशारकी येथें आमच्यावर अंमल करण्याकरितां जे अधिकारी येतात त्यांच्या दृष्टीनें कदाचित् योग्य असेल.पण एकंदर इंग्रजी साम्राज्याच्या हिताचा विचार केला तर या फुशारकींत दोन गुराख्यांपैकीं एकानें माझीं गुरें अधिक खोडकर तथापि मी त्यांस चांगलीं वठणींस आणतों अशी प्रौढी मिरविण्यापेक्षां जास्त कांहीं आहे असें आम्हांस वाटत नाहीं. लिवार्नर साहेबांनीं ही गोष्ट कबूल केली आहे कीं, मुंबईइलाख्यांतील ब्राह्मणांप्रमाणें दक्ष किंवा हुषार नोकर इंग्रजी बादशहास मिळावयाचे नाहींत. त्याच्या अंगीं नुसतें सांगितलेलेंच काम करण्याची शक्ति असते असें नाहीं तर स्वत:ची अक्कलही चालविण्यांत ते समर्थ असतात. परंतु अशा नोकरांस किंवा लोकांस इतर प्रांतांतील नोकरांपेक्षां किंवा लोकांपेक्षां कांहीं अधिक सवलती इंग्रजसरकारानें द्याव्या

असें लिवार्नरसाहेबांनीं कोठें म्हटलें आहे काय ? नाहीं. उलट महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचें बंड, वासुदेव बळवंताचें बंड, रँडसाहेबाचा खून इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून हे दंगे मिटविण्याकरितां कित्येक प्रसंगीं लष्करी लोक व तोफा यांचेंही सहाय्य पोलिसास घ्यावें लागतें, असें सांगून मुंबई इलाख्यांतील या लोकांबद्दल आपल्या श्रोत्यांचें वाईट मत करण्याचा मात्र त्यांनीं प्रयत्न केला आहे. सारे वाटेल तसे वाढविले तरी लोकांनीं त्याबद्दल कुरकुर करूं नये, दुष्काळांत उत्पन्न झालें नाहीं तरी सरकारची पिशवी मुकाट्यानें भरावी, प्लेगमध्यें आपलीं माणसें पटापट मरत असतां सरकारी अधिकारी फुकटाफाकट देतील तेवढा त्रास सोसावा आणि इंग्रज बघितला म्हणजे त्याला साष्टांग नमस्कार घालून तूं माझा देव आहेस म्हणून त्याचे बूट उचलून डोक्यावर घ्यावेत, अशा प्रकारचे मुंबईइलाख्यांतील लोक नाहींत एवढेंच जर लिवार्नर-साहेबांचें म्हणणें असेल तर तें कांहीं खोटें नाहीं. पण अशा प्रकारच्या लोकांसही आम्ही पायाखालीं तुडवितों आणि शांतता ठेवतों आणि एवढ्या-करितां आम्हांस मोठें म्हणा असें जें लिवार्नरसाहेबांचें म्हणणें आहे तें मात्र आम्हांस मान्य नाहीं. लोकांच्या आंगचें पाणी किंवा रग मोडून टाकून त्यांस मेषपात्र बनविण्याकरितां ईश्वरानें इंग्रजसरकारास हिंदुस्थानांत पाठविलें असें आजपर्यंत जे बडे बडे मुत्सद्दी झाले त्यांपैकीं कोणीही म्हटलेलें नाहीं. हिंदु, मुसलमान वगैरे निरनिराळ्या जातींतील वैमनस्य मोडून त्यांनीं सलोख्यानें वागून आपली उन्नति करून घ्यावी एवढयाकरितां इंग्रजसरकारचें राज्य या देशांत आलें आहे असें आम्ही समजतों; व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे लिवा-र्नर साहेबांनीं या लोकांचें आपल्या व्याख्यानांत जें वर्णन दिलें आहे तें प्रजेच्या दृष्टीनें अगदीं चुकीचें आहे असें म्हणणें भाग येतें. पेशव्यांनीं सात-ऱ्याच्या राजास मागें सारलें, खानदेश होळकरांच्या स्वारीमुळें इंग्रजी राज्यापूर्वी उध्वस्त होता, किंवा पेशव्यांच्या हातांत सत्ता होती तरी आज ताजमहाला-सारखी एकही इमारत त्यांनीं उभारली नाहीं इत्यादि गोष्टी व्याख्यानांत सांगण्याची कांहीं जरूर नव्हती, मुसलमानी राज्य मोडून स्वराज्य स्थापण्यांत मराठ्यांचा बहुतेक सर्व काल गेला असल्यामुळें आणि ते मुसलमानी राज्य मोडकळीस आणतात न आणतात इतक्यांतच कंपनीसरकारची ब्याद त्यांच्या पाठीस लागल्यामुळें त्यांस ताजमहालासारख्या टोलेजंग इमारती बांधतां आल्या नाहींत, हें लिवार्नरसाहेबांस आम्ही सांगावयास पाहिजे असें नाहीं. तथापि त्यांनीं जर तशा इमारती बांधल्या असत्या तरीही ' हा पहा, ब्राह्मण राजांनीं सार्वजनिक पैशाचा कसा दुरुपयोग केला ' असा त्यांस दोष देण्यास लिवार्नर-साहेबांनीं मागेंपुढें पाहिलें नसतें. या इलाख्यांतील संस्थानिकांची पहिल्यानें गोड बोलून फाटाफूट करून पुढें एकेकाचीं नखें किंवा स्वातंत्र्य इंग्रज सरका-

रच्या अधिकाऱ्यांनीं कसकसें कमी केलें आणि त्या कामीं कोणत्या प्रकारचा धूर्तपणा दाखविला याचाही लिवार्नरसाहेबांनीं जो बडेजाव केला आहे तो त्यांच्या दृष्टीनें ठीकच आहे. पेशवाईच्या अखेरीस महाराष्ट्रांतील संस्थानिकांमध्यें देशाभिमानाचें थोडें जरी वारें जागृत असतें व नानाफडणिसाप्रमाणेंच इंग्रज सरकारचा कावा सर्वांस कळला असता, तर हिंदुस्थानच्या इतिहासास आज कांहीं निराळेंच स्वरूप आलें असतें. पण तशी गोष्ट घडून आली नाहीं, याबद्दल जर आम्हांस वाईट वाटत असलें तर तेवढ्याकरितां इंग्रज सरकारचा डोळा मुंबई इलाख्यांतील प्रजेवर एकसारखा रहावा व सदर प्रजेस होईल तितकें पायाखालीं तुडविण्याचा प्रयत्न व्हावा हें कांहीं पुरुषार्थाचें लक्षण नव्हे. इंग्रजसरकारचें वर्चस्व बरेच दिवस राहण्यासारखी आमच्या देशाची हल्लींची स्थिति आहे ही गोष्ट जर कोणास अधिक चांगली कळण्यासारखी असेल तर ती ज्यांनीं पेशवाईंत राज्यकाभार चालविला त्यांच्या वंशजांसच कळण्यासारखी आहे; आणि ही गोष्ट त्यांस कळते असें माहीत असल्यावरही या लोकांच्या आंगच्या गुणांचा इंग्रजसरकारनें फायदा न घेतां विलायतेंतील तरुण पोरांस येथें आणून त्यांच्यावर दडपण घालण्यास लागावें ही राजकीय दृष्ट्या मोठी चूक होय. लिवार्नरसाहेबांनीं आपल्या या चुकीचा उल्लेख करून जर मुंबईइलाख्यांतील ब्राम्हण लोकांबद्दल विलायतेंतील श्रोत्यांमध्यें कांहीं सहानुभूति उत्पन्न केली असती तर फार चांगलें झालें असतें. पण या साहेबांच्या हातून ही गोष्ट कशी घडणार ? त्यांचें सर्व व्याख्यान वाचलें असतां ' इतर लोकांच्या गुरांपेक्षां माझीं गुरें खोडकर असलीं तरी तीं मी मोठ्या शिताफीनें आपल्या कह्यांत ठेवतों ' अशा प्रकारच्या गुराख्याच्या प्रौढीपेक्षां त्यांत कांहीं जास्त सांगितलेलें नाहीं. मुंबईइलाख्याकडे पूर्वी इराणी आखातांतील राजकीय काम असे तें आतां हिंदुस्थानसरकारानें काढून घेतलें तथापि मुंबई इलाख्यास लेफ्टेनंट गव्हर्नर न नेमितां विलायतेहून मोठ्या कुळांतला गव्हर्नर पाठविणें जरूर आहे असाही एक मुद्दा त्यांच्या व्याख्यानांत आहे, पण त्याबद्दल आम्हांस विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. कारण गव्हर्नर झाले काय आणि ले. गव्हर्नर झाले काय, आमची स्थिति जर सारखीच राहणार तर आम्ही यांपैकीं अमुक चांगला असें मत देण्यांत कांहीं हांशील नाहीं. मुंबईइलाख्यांतील लोक जर अधिक हुषार असले तर त्यांस अधिक हक्क कां मिळूं नयेत एवढाच आमचा प्रश्न आहे. बडोदा मुंबईइलाख्यास जोडून मुंबईइलाख्यांतील सिव्हिल सर्व्हंटांस आपली बडेजावी मिरविण्यास आणखी एक संस्थान द्यावें कीं नाहीं हा आमचा प्रश्न नव्हे.

लिवार्नरसाहेबांचें व्याख्यान झाल्यानंतर उपसंहारादाखल सर जॉर्ज बर्डवुड यांनीं जें भाषण केलें तें आमच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें आहे. ते म्हणाले

कीं, मराठे लोक हे हिंदुस्थानांतील स्कॉच लोक होत. गुरखे किंवा शीख यांसारखे नुसते शूर व धर्माभिमानी, किंवा बंगाली लोकांसारखे नुसते बुद्धिवान् लोक हिंदुस्थानांत आहेत, पण बुद्धि, शौर्य, अभिमान वगैरे सर्व गोष्टी मराठ्यांखेरीज हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांत एकवटलेल्या दिसत नाहींत, आणि एवढ्याचकरितां हिंदुस्थानसरकारानें आपलें मुख्य राजधानाचें ठिकाण मुंबई येथें आणून या लोकांचां उपयोग करून घ्यावा. सर जॉर्ज बर्डवुड यांनीं मराठे लोकांस जो हा मोठेपणा दिला आहे त्यांत थोडा अतिशयोक्तीचा भाग आहे ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. कदाचित् लिवार्नरसाहेबांच्या व्याख्यानानंतर अशा प्रकारची थोडीशी अतिशयोक्ति करण्याची जरूरीहि होती असें म्हटलें तरी चालेल. पण तें कसेंही असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, शीख, गुरखे, पंजाबी, बंगाली, किंवा मराठे या सर्वांस पायाखालीं एकसारखे चिरडण्यापेक्षां इंग्रजी राज्याचें सध्या दुसरें धोरण दिसत नाहीं. यांपैकीं कोणत्याही एका जातीपेक्षां इंग्रजलोक अधिक शहाणे, धूर्त व सामर्थ्यवान् आहेत हें खरें आणि तसेंच त्या सर्व जाती लवकरच एकवटतील असाही पण संभव नाहीं. इंग्रजसरकारचें राज्य या देशांत स्थापन झालें आहे व चाललें आहे तें याचमुळें होय. पण तेवढ्यामुळें इंग्रजसरकारनें आपल्या सामर्थ्याचा उपयोग आपल्या पायाखालीं सर्व जातींस सारखेंच चिरडण्याकडे करावा हें म्हणणें अगदीं गैरवाजवी होय. आणि लिवार्नरसाहेबांच्या फुशारकीस जो आम्ही दोष ठेवितों तो याचकरितां होय. इंग्रजी राज्य या देशांत राहिल्यानें आमचा फायदा आहे; पण केव्हां ? स्कॉटलंडांतील लोक ज्याप्रमाणें इंग्रजी साम्राज्याचे घटकावयव बनून गेले तसे हिंदुस्थानांतील शीख, गुरखे, मराठे, बंगाली लोक इंग्रजी राज्याचे घटकावयव होण्यास लागतील तेव्हां. ही गोष्ट लिवार्नरसाहेबांनीं मारलेल्या फुशारकीनें घडून यावयाची नाहीं, त्याकरितां राजनीतिचें धोरण निराळेंच असलें पाहिजे हें उघड आहे. तशा प्रकारचें धोरण काय हें विलायतेंतील लोकांस समजून देण्यास सोसायटी ऑफ आर्टस् सारख्या सभा जर प्रयत्न करतील तर त्यापासून साम्राज्याचें अधिक हित होईल. अमुक एक प्रांतांतील लोक अधिक हुषार तरीही आम्ही त्यांस आपल्या सामर्थ्यानें कबजांत ठेवतों अशा प्रकारचीं व्याख्यानें विलायतेंतील लोकांपुढें दिल्यानें आम्हांस नव्हे तर साम्राज्यासही कांहीं फायदा नाहीं; मग व्याख्यात्यास त्याबद्दल कांहींही वाटो.

◆ ◆ ◆

* हिंदुस्थानसरकारचा शिक्षणावरील नवा ठराव.

लॉर्ड कर्झन हे आपल्या सप्तवार्षिक कारकीर्दीत हिंदुस्थानसरकारच्या प्रमुख प्रमुख खात्यांचें धोरण कायमचें ठरवून टाकून पुढील पांच पंचवीस वर्षेंपर्यंत या खात्यांत हल्लीं असलेले युरोपियन लोकांचें महत्त्व कायम ठेवून व त्या मानानें एतद्देशीय लोकांच्या हक्काची पायमल्ली करीत आहेत ही गोष्ट आमच्या वाचकांस आतां कांहीं नवीन सांगावयास पाहिजे असें नाहीं. लाटसाहेब मोठे धूर्त, हुषार आणि कार्यकर्ते व्हाइसरॉय आहेत. पण आमच्या दुर्दैवानें यांचा रोंख राज्यकर्त्यांचें वैभव आणि बडेजावकी कायम करण्याकडेच असल्यामुळें या देशांतील प्रजाजनांचे हक्क वाढविण्याचें किंवा सुशिक्षित लोकांचें राज्यकारभारांत अधिक सहाय घेण्याचें काम लॉर्ड कर्झन यांचे हातून आजपर्यंत झालें नाहीं व पुढें होण्याचाही संभव नाहीं. उलट हिंदुस्थानांतील लोकांच्या पायांत ज्या शृंखला आहेत त्या अधिक जड करण्यास त्यांच्या कृत्यापासून मदत झाली आहे. नुकतेंच पास झालेलें ऑफीशियल सीक्रेट बिल हें या प्रवृत्तींचेंच एक मोठें दांडगें उदाहरण होय. या बिलावर लॉर्ड कर्झन यांनीं जें भाषण केलें त्यांतील वक्तृत्वाचा मोहकपणा खरोखरच वर्णनीय आहे; आणि विद्वत्तेनें, वक्तृत्वानें किंवा शब्दावडंबरानें घाणेरडी गोष्टही कशी सजवावी हें ज्यास शिकावयाचें असेल त्यानें लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांचा कांहीं वर्षें अवश्य अभ्यास करावा इतकी त्यांची योग्यता आहे. या भाषणांतील मोहकपणा आविष्कृत करून त्याचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें कांहीं अशक्य नाहीं. किंबहुना ती गोष्ट हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रकारांनीं आणि इतर वक्त्यांनीं केलेली आहे. लॉर्ड कर्झन यांच्या मोहक भाषेनें फसून जाऊन त्यांनीं पुढें आणलेलीं बिलें पास होतात असें नाहीं. पण लॉर्ड कर्झन यांचीं खडीसाखरी भाषणें त्यांच्या कृतीच्या विरुद्ध असतात हें लोकांस आतां माहीत झालें आहे. पण सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं, या न्यायानें त्यांनीं आरंभिलेल्या सर्व गोष्टी सिद्धीस जात आहेत. अशा प्रकारें या देशांतील लोकांच्या आशेस सर्व प्रकारें आळा घालणारे धूर्त व्हाइसरॉय आणखी दोन वर्षें येथें रहावें हें आमचें दुर्दैवच होय. पण त्यास कांहीं इलाज नाहीं हल्लींच्या राज्यपद्धतीप्रमाणें पाहिलें म्हणजे अशाच गोष्टी उत्तरोत्तर अधिक व्हावयाच्या. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, आमच्या पुढाऱ्यांस त्या कळत असूनही त्यांचा वाचिक प्रतिकारही जितक्या धैर्यानें व नेटानें व्हावयास पाहिजे तितका आमच्यानें होत नाहीं.

---

* [केसरी ता. १५ मार्च १९०४]

इतकेंच नव्हे तर असें करणें हें पॉलिसीचें लक्षण आहे, असेंही कांहींजण उघड बोलून आपल्या दुर्बलतेचें समर्थन करीत असतात.

असो; आज हे विचार सुचण्यांचें कारण हिंदुस्थानसरकारचा शिक्षणासंबंधानें :जो एक नुकताच ठराव प्रसिद्ध झाला आहे तो होय. हिंदुस्थानच्या शिक्षणाचा पाया १८३५ सालीं लॉर्ड मेकॉले याच्या मिनिटानें घातलेला आहे; व त्यावरील इमारत उभारण्याची सुरवात १८५४ सालच्या कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या खलित्यानें झाली आहे. सन १८५४ पासून १९०४ पर्यंत बरोबर ५० वर्षें झालीं. इतक्या अवधींत ही शिक्षणाची इमारत कशी काय व कितपत तयार झालीं, याचें सर्व बाजूनें परीक्षण करून ही इमारत शोभेनें व उपयुक्ततेनें युरोपांत उभारलेल्या इमारतींप्रमाणें झाली आहे कीं नाहीं हें पाहणें, आणि तशी झाली नसल्यास त्यासाठीं योग्य ती पुनः तजवीज करणें हें हिंदुस्थानसरकारचें योग्य कर्तव्य होय. लॉर्ड कर्झनसाहेब यांनीं हिंदुस्थानच्या शिक्षणखात्याचा विषय परीक्षणाकरितां हातीं घेतला ही गोष्ट या कर्तव्यास अनुलक्षूनच झाली; व येथपर्यंत सर्व ठीक झालें. परंतु या परीक्षणाचा इत्यर्थ म्हणूनच जो ठराव हिंदुस्थानसरकारानें आतां प्रसिद्ध केला आहे तो वाचला म्हणजे वर सांगितलेले लॉर्ड कर्झन यांची धूर्तता, कौशल्य आणि खडीसाखरी वाक्पटुता यांची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. आम्ही अनेक वेळां जपान देशानें तीस वर्षांत जी विद्या संपादन केली तिचा उल्लेख केला आहे. जपान सरकारापेक्षां आमचे राज्यकर्ते अधिक शहाणे व जपानी विद्यार्थ्यांपेक्षां आमचे विद्यार्थी बुद्धि किंवा शरीरसामर्थ्य यांतही कांहीं कमी नाहींत. अशा स्थितींत जपान देशांत तीस वर्षांत सार्वजनिक शिक्षणास जें स्वरूप यावें तें स्वरूप हिंदुस्थानच्या शिक्षणास ५० वर्षांतही प्राप्त होऊं नये, याचें खरें कारण शोधून काढून त्याचा प्रतिकार कसा करावा हाच हिंदुस्थानसरकारापुढें मोठा प्रश्न होता; आणि लॉर्ड कर्झन यांनीं हा प्रश्न हातीं घेऊन आम्हांस अधिक सुशिक्षित करण्याचा अथवा जपानाप्रमाणें हिंदुस्थानांतही शिक्षणाचीं विलायती रोपें वाढीस लावून देण्याचा प्रयत्न किंवा तजवीज केली असती, तर त्यांचे हिंदुस्थानावर काय पण इंग्रजी राज्यावरही अनंत उपकार झाले असते. परंतु तशा प्रकारचा उद्योग लॉर्ड कर्झन यांच्या हातून झाला नाहीं किंवा करण्याचाही त्यांचा विचार आहे असें हल्लींच्या ठरावावरून दिसत नाहीं. एकंदर ठरावांत शब्दांची, उदात्त विचारांची आणि अलंकारिक भाषेची बरीच रेलचेल आहे. पण हल्लीं देशांतील शिक्षणाची जी स्थिती आहे ती पूर्णतेस पोहोंचविण्याकरितां जे उपाय केले पाहिजेत ते करण्याकडे लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दींत किंवा पुढें केव्हां तरी लवकरच सरकारचें लक्ष जाईल असें हल्लींच्या ठरावावरून दिसत नाहीं. हिंदुस्थानांत इतर देशांप्रमाणें प्राथमिक शिक्षणाचा

अद्याप प्रसार झाला नाहीं. धंदेशिक्षण, स्त्रीशिक्षण वगैरे बाबतींत अद्याप आम्ही पुष्कळ मागें आहों, शाळेंत जाण्यास योग्य अशा १०० मुलांपैकीं ८।९ मुलें पंजाबांत व २२।२३ मुलें कायतीं मुंबई व बंगाल इलाख्यांत शाळेंत जातात; आणि मुलींसंबंधानें पाहिलें तर हजारांत ७ मुलीही शाळेंत जात नाहींत, अशा प्रकारची रड गाण्यांत कांहीं हांशील नाहीं. जपानांत प्राथमिक शिक्षण सर्व लोकांस सक्तीनें व मोफत देण्यांत येतें; व सुधारलेल्या कांहीं राष्ट्रांनींही हीच पद्धत स्वीकारली आहे. हिंदुस्थानसरकारानें ही पद्धत कां स्वीकारूं नये याचें या ठरावांत कांहीं कारण दिलेलें नाहीं. किंबहुना अशा प्रकारच्या सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या पद्धतीचा उल्लेखही ठरावांत नाहीं; मग त्याचा उपयोग कोठून होणार ? प्राथमिक शिक्षणावर सन १८८६।८७ सालीं सुमारें ४२ लक्ष रुपये सर्व हिंदुस्थानांत खर्च होत होते, त्या ठिकाणीं १९०१–२सालीं ६५ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. म्हणजे १५ वर्षांत सुमारें २३ लक्ष रुपयांचा दरसाल खर्च वाढला आहे. पण या वाढीचा पैसा सरकारी तिजोरींतून न मिळतां सर्व लोकलबोर्डें व म्युनिसिपालीट्यांच्या तिजोरीतून घेण्यांत आला आहे, या गोष्टीबद्दल सरकारासही थोडें आश्चर्य वाटत आहे असें ठरांवातल्या भाषेंवरून दिसतें. प्राथमिक शिक्षणाच्या अवश्यकतेबद्दल नेहमीं डांगोरा पिटणाऱ्या सरकारानें या कामाकरितां स्वतःच्या खिशास पंधरा वर्षांत कांहीं चट्टा लावून घेऊं नये, यापेक्षां शिक्षणाच्या कामीं जास्त हलगर्जीपणा कोणता ? प्राथमिक शिक्षणाची ही स्थिति झाली. आतां औद्योगिक शिक्षणासंबंधानें पाहिलें तरीही हीच रड ऐकूं येते. या शिक्षणाची स्थिति अत्यंत शोचनीय आहे व ती सुधारली पाहिजे ही गोष्ट हिंदुस्थानसरकारास मान्य आहे. परंतु या कामास लागणारा पैसा एकदम आपणांस पुरवितां येत नाहीं, सबब कांहीं थोड्या गोष्टी अनुभव मिळविण्याकरितां करावयाच्या आहेत. असें या ठरावांत लिहिलें आहे. हिंदुस्थानसरकारची ही भाषा वाचली म्हणजे कपाळास आठ्या पडल्याखेरीज राहत नाहीं. हिंदुस्थानसरकारास अजून अनुभव कसला पहावयाचा आहे हें आम्हांस समजत नाहीं. जर्मनी, आस्ट्रिया, इटली, अमेरिका आणि खुद्द इंग्लंड या देशांतील अनुभव बाजूला ठेवला तरी जवळच्या जवळ जपानाचा अनुभव अनायासें सरकारास मिळण्यासारखा आहे इतकेंच नव्हे तर तो त्यांच्या डोळ्यापुढें आहे या अनुभवाचा अव्हेर करून आमच्या शाहण्या सरकारनें पुन्हां अनुभव घेण्याची गोष्ट अम्हांस सांगावी म्हणजे आम्हांस फसविण्याचा प्रयत्न करावा असें होत नाहीं काय ? शेतकीच्या शिक्षणाकरितां शेतकीखात्याच्या देखरेखीखालीं एक बडें ॲग्रिकलचरल कॉलेज काढून विद्यार्थी तयार करण्याचा ज्याप्रमाणें सरकारचा विचार झाला आहे त्याप्रमाणें निरनिराळ्या उद्योगधंद्याची कॉलेजें किंवा शाळा काढून येथेंहि जपानाप्रमाणें लहानसहान धंदे नव्या पद्धतीनें

सुरू होतील अशी व्यवस्था करण्यास हिंदुस्थानसरकारास कांहीं अडचण नव्हती. पण त्यासंबंधानेंहि हा ठराव अगदीं निराशेचा आहे. मध्यमप्रतीचें म्हणजे हायस्कुलांतील शिक्षण होय. हें गेल्या वीस वर्षांत म्हणजे हंटरसाहेबांच्या १८८२ च्या कमिशनानंतर खासगी शाळांस जें उत्तेजन मिळालें त्यामुळें अधिक पसरलेलें आहे. पण त्याचीहि कांहीं तरी सबब सांगून त्या ठरावांत वाट लावली आहे. खाजगी शाळा रजिस्टर करणें, त्या शाळांतील मास्तरांची योग्यता, ज्या गांवीं शाळा असतील त्या गांवीं त्या असणें अगदीं जरूर आहे कीं नाहीं याचा विचार, शाळेस जोडलेली विद्यार्थ्यांकरितां राहण्याची व जेवणखाणाची जागा आहे किंवा नाहीं, फीचा दर सरकारी शाळांपेक्षां कमी आहे कीं काय इत्यादि गोष्टींचा विचार करून करावयाच्या आहेत. अर्थात् खाजगी शाळांची वाढ इतउत्तर बहुतेक बंदच होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा परिणाम हंटरसाहेबांनीं शिफारस केलेल्या पद्धतीच्या अगदीं उलट आहे हें आम्हीं सांगावयास नकोच. हंटरसाहेबांची शिफारस अमलांत आणावयाची म्हणजे हळू हळू एखादी दुसरीखेरीज करून सर्व सरकारी शाळा खासगी लोकांच्या ताब्यांत जातील अशी तजवीज करावयास पाहिजे होती. पण हल्लींच्या ठरावांत नमूद केलेली पद्धत त्याच्या अगदीं विरुद्ध आहे. सरकारी शाळा खाजगी लोकांच्या ताब्यांत जाणें आतां शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर खाजगी शाळा उत्तरोत्तर बंद होत जातील, अशा प्रकारचीच योजना या ठरावाप्रमाणें व्हावयाची आहे. यास सबब अशी दाखविली आहे कीं, सरकारी शाळेंत ज्या ज्या गोष्टी आहेत त्या सर्व खाजगी शाळेंत असल्याखेरीज खाजगी शाळांपासून लोकांचें हित न होतां उलट नुकसान होण्याचा संभव आहे. सरकारची ही कोटी अगदींच वेडगळपणाची आहे हें थोड्या विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. मध्यम प्रतीचें शिक्षण लोकांच्या हातीं जावें अशी जर हंटरसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें सरकारची खरोखर इच्छा असेल तर खाजगी शाळांस उत्तेजन देऊन त्या लहानाच्या मोठ्या करणें किंवा त्यांत असलेली कमतरता काढून त्या पूर्णतेस पोंहोंचविणें हें सरकारचेंच कर्तव्य होय. परंतु तसें न करतां एखाद्या तालिमबाजानें किंवा मोठ्या पुरुषानें एखाद्या पोरास " तूं काय लहान आहेस, तूं पूर्णपणें मोठा झाल्याखेरीज मला मदत करतां येत नाहीं. " असें सांगून त्याचा जसा अव्हेर करावा तशा प्रकारचें हल्लीं सरकारचें वर्तन होत आहे. १८५४ पासून १८८२ पर्यंत सरकारच्या मदतीनें वाढत आलेल्या सरकारी शाळांची बरोबरी १८८२ नंतर निघालेल्या खाजगी शाळांनीं कशी होणार ? हे विचार सरकारास सुचले नाहींत किंवा सुचूं नयेत असें नाहीं. करितां हल्लींच्या ठरावाचा हेतूच खाजगी शाळाची वृद्धि कमी करण्याचा असावा असें उघड अनुमान होतें. हा सरकारचा हेतु दुसऱ्या अनेक गोष्टीं-

वरून व्यक्त होत आहे; व त्यांपैकीं कांहींकांचा उल्लेख मागें आम्ही केलाच आहे. सरतेशेवटीं उच्च प्रतीचें किंवा युनिव्हर्सिटींतील शिक्षण राहिलें. यासंबंधानें हल्लींचा ठराव बहुतेक युनिव्हर्सिटी बिलास अनुकूल आहे, किंबहुना त्या बिलाचें समर्थन करण्याकरितांच हा लिहिला आहे असें म्हटलें तरी चालेल. या देशांत युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन आज जवळ जवळ ५० वर्षें झालीं. पण इतक्या मुदतींत अशी एकही युनिव्हर्सिटी दिसत नाहीं कीं, तींतून निघालेले विद्यार्थी आपल्या विद्वत्तेनें पाश्चिमात्य देशांतील विद्यापीठांतील विद्वानांस सन्मान्य झालेले आहेत. रसायनशास्त्र, जंतुशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे आधुनिक शास्त्रांत नवीन शोध करणारे विद्वान गृहस्थ जपानाच्या युनिव्हर्सिटींतून बाहेर पडावे आणि आमच्या युनिव्हर्सिट्यांनीं परिक्षांच्या पाट्यावरवंट्याखालीं आमच्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची व हुषारीची चटणी करून टाकावी ही शोचनीय गोष्ट हिंदुस्थानसरकारच्या लक्षांत येऊन तिच्या प्रतिकारार्थ जपानाप्रमाणें उद्योग करण्यास सरकारानें तयार होऊं नये, हें लॉर्ड कर्झन यांच्यासारख्या विद्वान व पदवीधर व्हाइसरायांच्या कारकीर्दीस लांछनास्पद होय. पण यासंबंधानें आम्हीं मागेंच लिहिलें असल्यामुळें त्याचा पुनरुच्चार करून येथें जागा आडवीत नाहीं.

विद्याखात्याच्या ज्या निरनिराळ्या शाखा आहेत त्यांसंबंधानें सरकारचे या ठरावांत जे विचार नमूद केले आहेत ते वर दिले आहेत. लॉर्ड कर्झन यांनीं या ठरावात जी दिशा घालून दिली आहे त्यापासून या देशांतील शिक्षणाची इमारत अधिक शोभिवंत किंवा उपयुक्त होईल असें आम्हांस वाटत नाहीं. औद्योगिक शिक्षणासंबंधानें १० स्कॉलरशिपा, शेतकीचे एक नवें कॉलेज, विद्यार्थ्यांकरितां ठिकठिकाणीं सरकारी शाळांस जोडलेलीं भोजनवसतिगृहें, मध्यम प्रतीच्या शाळांतील शिक्षक तयार करण्याकरितां ट्रेनिंग कॉलेजें, चार इलाख्यातील डायरेस्टरांस मदत म्हणून एकेकास असि. डायरेक्टर, आणि खाजगी शाळांच्या नाड्या आपल्या हातांत ठेवून त्या बंद पाडण्याचा उद्योग, हींच कायतीं या ठरावांतील मुख्य तत्त्वें आहेत. यामुळें विद्याखात्याकडे इतउत्तर कांहीं थोडें जास्त पैसे खर्च करण्यांत येतील. पण हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतीस जें स्वरूप यावयास पाहिजे, आणि जें जपानानें गेल्या तीस वर्षांत आपल्या शिक्षणपद्धतीस आणलें आहे तें या ठरावांत नमूद केलेल्या योजनेनें आम्हांस प्राप्त व्हावयाचें नाहीं. लॉर्ड कर्झनसारख्या व्हाइसरायांच्या हातून जर ही गोष्ट घडून येत नाहीं तर इतरांच्या हातून पुढें घडून येईल याची आशाच नको. कारण, लॉर्ड कर्झन हे जो कित्ता आतां घालून देणार तोच पुढें येणाऱ्या दोन चार व्हाइसरायांनीं गिरवावा असा त्यांचा हेतु आहे. अर्थात् आणखी २५।३० वर्षें आमच्या शिक्षणपद्धतीस उपयुक्त स्वरूप येण्याची बिलकूल आशा नको. सुशिक्षित लोक सरकारी नोकरीकरितां हापापलेले असतात म्हणून त्यांस या

ठरावांत नांवें ठेवलेलीं आहेत. पण लॉर्ड कर्झन यांनीं असा विचार केला नाहीं कीं, आमची शिक्षणपद्धतीच जर सरकारी नोकर तयार करण्याकरितां आहे आणि तिचा पाया अधिक विस्तृत करावा अशी सरकारची इच्छा नाहीं, तर वर सांगितल्यापेक्षां शिक्षणाचा आणखी दुसरा परिणाम तो कोणता होणार ? जें पेरावें तें घ्यावें. जोंधळा पेरून गहूं येत नाहीं, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे; व त्याच न्यायानें आमच्या शिक्षणपद्धतीचाहि विचार केला पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत निघालेला हा ठराव हिंदुस्थानांतील शिक्षणास उत्तेजन मिळण्यासारखा नाहीं, किंबहुना प्रतिकूलच आहे असें मोठ्या निराशेनें म्हणणें भाग येतें. या ठरावांतील इतर मुद्यांसंबंधानें जें लिहिणें आहे तें दुसरें एखादे वेळीं लिहूं.

* * *

* आमचे बोलघेवडे व्हाइसराय !

लॉर्ड कर्झन यांची मुदत जर वाढली नाहीं किंवा हल्लीं विलायतेस जात आहेत ते जर परत आले नाहींत तर त्यांच्या पंचवार्षिक कारकीर्दीचें हें शेवटचेंच वर्ष होय; व हें जाणूनच त्यांनीं गेल्या आठवड्यांत हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलांत बजेटावर जो वादविवाद झाला त्या वेळीं शेवटच्या भाषणांत आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दीचें परीक्षण केलें असावें. लॉर्ड कर्झन यांची वक्तृत्वशक्ति आणि हातांत घेतलेला विषय गोड शब्दांनीं सजविण्याची हातोटी किती अपूर्व आहे, याचा अनुभव वाचकांस अनेक वेळां आला आहे. कोणतीहि गोष्ट घ्या, तिचें समर्थन कसें करावें हें लॉर्ड कर्झन यांजपासून शिकण्यासारखें आहे. शेतकऱ्यांस पैसे न देतां पेढ्या काढण्याचा अधिकार देण्यांत त्यांस स्वावलंबन शिकविण्याचा सरकारचा हेतु आहे, असें व्हाइसरायसाहेब म्हणतात; तर दुसरीकडे युनिव्हर्सिटीचें स्वातंत्र्य कमी करण्यांतच लोकांचें कल्याण आहे, असें ते प्रतिपादितात. सारांश, जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें या बोटाची थुंकी त्या बोटावर करून लोकांस फसविण्याचा धंदा लॉर्ड कर्झन यांस जितका साधला आहे तितका तो दुसऱ्या कोणत्याही मुत्सद्यास—निदान हिंदुस्थानांत आलेल्या व्हाइसरायांस तरी—साधलेला होता किंवा आहे, असें दिसत नाहीं. लॉर्ड कर्झन यांनीं हल्लीं जें भाषण केलें तें याच मासल्याचें आहे. आपल्या पंचवा-

---

* [केसरी ता. ५ एप्रिल १९०४.]

र्षिक कारकीर्दींत अनेक प्रश्नांचा आपण निकाल लावला, तिजोरीची आणि फडणिशी खात्याची नीट व्यवस्था केली, सरहद्द निर्भय केली, विद्याखात्याचा पाया पुन्हां खणून तो मजबूत केला, उद्योगधंदे, व्यापार यांस उत्तेजन देण्याची खटपट केली, शेतकी खाते सुधारलें, रेल्वे आणि पोलिसखात्यांत सुधारणा केल्या, सैन्याची तयारी वाढविली, रिपोर्टावर रिपोर्ट लिहिण्यांत खालील अधिकाऱ्यांचा वेळ जात होता ते कमी केले, आणि अशा रीतीनें कंदरींत सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार अधिक सुरळीत, अधिक व्यवस्थित आणि अधिक टिकाऊ होईल अशा प्रकारें सर्वत्र सुधारणा केली, अशी व्हाइसराय-साहेबांनीं आपल्या भाषणांत घमेंड मारली आहे; आणि ही घमेंड खरी आहे असें सिद्ध करण्याकरितां कांहीं आंकडेही दिले आहेत. हे आंकडे आजपर्यंत सरकारी पक्षाकडून जी माहिती प्रसिद्ध करण्यांत आली त्यापेक्षां कांहीं निराळे नाहींत. हिंदुस्थानांत गेल्या पांच वर्षांत इतर देशांतून जें सोनें रुपें आलें तें तत्पूर्वीच्या पांच वर्षांत आलेल्या सोन्यारुप्यापेक्षां अधिक आहे; आणि सेव्हिंग ब्यांकेंतही लोकांचे पैसे जास्त पडले आहेत, असें सांगून विलायतेंत हिंदुस्थानाचें द्रव्य फार जातें असा सरकारावर आक्षेप घेणारांची लॉर्ड कर्झन यांनीं थोडी थट्टा केली आहे. ते म्हणतात कीं, नळीच्या एका तोंडानें जर पैशाचा प्रवाह दुसरीकडे जात असला तर दुसऱ्या तोंडानें तोच द्रव्याचा ओघ नळींत येत आहे. खरोखर जर अशी स्थिति असती तर लॉर्ड कर्झन यांचे आम्ही पुष्कळ आभार मानले असते. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, लॉर्ड कर्झन यांनीं या वाक्यांत वस्तुस्थितीचा अगदीं विपर्यास करून टाकला आहे. हिंदुस्थानांतून दरसाल ३०।४० कोट रुपये द्रव्यमय मोबदला न मिळतां विलायतेस जातात आणि त्यामुळें हिंदुस्थानदेश भिकार होत चालला आहे, असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांनीं नळीच्या दोन्ही टोंकांतून जाणाऱ्या येणाऱ्या द्रव्यौघाचा हिशेब करूनच आपला सिद्धांत स्थापित केलेला आहे. हिंदुस्थानांत जो माल येतो त्यापैकीं कांहीं सोनेंरुपें आहे आणि बाकीचा व्यापाराचा माल आहे; हा सर्व आयात माल एकत्र करून त्याची बेरीज हिंदुस्थानाबाहेर जाणाऱ्या मालाच्या संख्येंतून जर कमी केली तर ३०।४० कोट रुपये निवळ या देशांतून जाऊन विलायतेंतील लोकांच्या हातांत पडतात, असें दिसून येईल. व्हाइसरॉय साहेबांस ही गोष्ट माहीत नाहीं अशी नाहीं. पण क्षणभर ती विसरून जाऊन किंवा तिकडे दुर्लक्ष करून निवळ प्रतिपक्षाचा उपहास करण्याकरितां सोनें आणि रुपें यांच्या आंकड्यांकडे ते वळलेले आहेत. सेव्हिंग ब्यांकेची गोष्ट अशाच प्रकारची होय. देशांतील गुजराथी, मारवाडी किंवा मुसलमान व्यापाऱ्यांच्या पेढ्या उत्तरोत्तर नाहींशा होत चालल्या, ही गोष्ट सर्व-श्रुत आहे. अशा स्थितींत सेव्हिंग ब्यांकेंतील ठेवीची रक्कम वाढल्यास त्यांत

नवल कोणतें ? हिंदुस्थानच्या तिजोरींत आज पांच वर्षें एकसारखी शिल्लक पडत चालली आहे; यावरूनही देशाची समृद्धि दिसून येते, असें व्हाइसराय-साहेबांचें म्हणणें आहे; पण त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. कारण रयतेवर कराचा बोजा वाढवून व पैशाची किंमत कृत्रिम रीतीनें जास्त करून ही शिल्लक दरसाल उत्पन्न झालेली आहे. यावरून देशाच्या समृद्धीचें अनुमान काढणें म्हणजे कर वसूल करण्याची पद्धत जितकी कडक व जुलमाची त्या मानानें देश अधिक समृद्ध असें म्हणावें लागेल. मिठावरील जकात थोडी कमी केल्याबरोबर मिठाचा खप वाढला, ही गोष्ट हल्लींच्या बजेटांतच नमूद केलेली आहे; आणि एवढ्यावरून हल्लीं जें. कराचें मान आहे तें असह्य आहे असें उघड दिसून येतें. जमिनीवरील कराचा प्रकारही अशाच तऱ्हेचा आहे. तात्पर्य, कर कडक रीतीनें वसूल करून त्याचें उत्पन्न वाढलें म्हणजे देश समृद्ध झाला असा जो लॉर्ड कर्झन यांचा व दुसऱ्या कित्येकांचा कोटिक्रम आहे तो अत्यंत चुकीचा होय; लॉर्ड कर्झन यांनीं या कोटिक्रमाचा आपल्या भाषणांत उपयोग करणें म्हणजे एक प्रकारें अर्थशास्त्राच्या तत्वाचें आपलें अज्ञान प्रदर्शित करण्यासारखें होय. लॉर्ड कर्झन यांस हीं तत्वें माहीत नाहींत असें आम्हीं म्हणत नाहीं; पण सरकारी पक्षाचें जेव्हां मंडण करावयाचें असतें तेव्हां ते आडरानांतही शिरण्यास कसे तयार होतात, याचें हें एक उदाहरण आहे.

लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांतील दुसरा मोठा भाग म्हटला म्हणजे त्यानीं पांच वर्षांत हिंदुस्थानांत राज्यकारभाराची जीं कामें केलीं, त्यांची याद होय. ही याद त्यांनीं कशाकरितां सांगितली हें आम्हांस समजत नाहीं. हिंदुस्थानांत जे जे व्हाइसराय येतात ते आपल्या कारकीर्दींत कांहींच काम करीत नाहींत, सिमल्या-वर चैन मारून दरमहा २० हजार रुपये पगार फुकट खिशांत टाकतात, असें जर कोणाचें म्हणणे असेल तर त्यास लॉर्ड कर्झन यांनीं दिलेला जबाब शोभण्या-सारखा आहे. पण व्हाइसरायांवर अशा प्रकारचा आक्षेप कोणी केल्याचें आम्हांस माहीत नाहीं. जो जो व्हाइसराय येतो तो तो आपल्या बुद्धिसामर्थ्या-प्रमाणें सैन्याचा, रेल्वेचा, पोलिसांचा किंवा सरहद्दीचा बंदोबस्त करीतच असतो. त्यांत कांहीं विशेष नाहीं. किंबहुना व्हाइसरायास दरमहा जे २० हजार रुपये द्यावयाचे ते एवढ्याचकरितां होत. रशियाची भीति प्रत्येक इंग्लिश मुत्सद्यास वाटत असते; आणि रशिया जिकडून येणार ती सरहद्द बळकट असावी व खऱ्या सरहद्दीच्या बाहेरही आपलें राज्य वाढावें अशा प्रकारचे हिंदुस्थानसर-कारचे प्रयत्न सदैव चालू आहेत. प्रश्न एवढाच आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांचें जेणेंकरून कल्याण होईल, ते ज्या रीतीनें अधिक सुशिक्षित, सुसंपन्न आणि धैर्यशाली होतील किंवा त्यांचा व्यापार अगर उद्योगधंदे जेणेंकरून वाढतील अथवा थोडक्यांत सांगणें असल्यास सुधारलेल्या राष्ट्रांची हिंदुस्थान देश जेणें-

करून अधिकाधिक बरोबरी करील, अशा कांहीं गोष्टी एखाद्या व्हाइसरायाच्या किंवा लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत झाल्या कीं काय ? लॉर्ड कर्झन यांच्या पंचवार्षिक कारकीर्दीचें अशा रीतीनें परीक्षण करूं गेल्यास त्यांस शून्यापेक्षां अधिक मार्क देतां येतील, असें आम्हांस वाटत नाहीं. लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द हिंदुस्थानांतील लोकांच्या हक्कांस प्रतिकूल आहे आणि हल्लींच्या व्हाइसरायांपासून इंग्रजी साम्राज्यास जो फायदा व्हावयाचा तो झाला नाहीं. अशा अर्थाचें एक पुस्तक विलायतेंत प्रसिद्ध झालेलें आहे; आणि त्यांत लॉर्ड कर्झन यांचें धोरण चुकलेलें आहे आणि त्यांचीं राजनीतीहि अत्यंत घातुक आहे,असा उघडपणें हिंदुस्थानांतून पेन्शन घेऊन गेलेल्या एका सिव्हिलियनानें त्यांच्यावर आरोप केला आहे या आरोपास प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें व्हाइसराय आपल्या हल्लींच्या भाषणांत कांहीं उत्तर देतील असें आम्हांस वाटलें होतें, पण तसा प्रकार घडून आला नाहीं. हिंदुस्थानांतील स्थानिक स्वराज्याचे हक्क कां कमी केले, संस्थानिकांवर पारतंत्र्याचा छाप अधिक कां वठविला, इराण व तिबेटांत मिशनें पाठवून लष्करी खर्च कां वाढविला, आणि उद्योगधंदे, व्यापार आणि खरें युनिव्हर्सिटीचें शिक्षण वाढविण्याची वेळ आली असतां त्यांची वाट गोड शब्दांनीं कशी लावली, याबद्दल हल्लींच्या भाषणांत कोठेंहि समाधानकारक खुलासा केलेला नाहीं. लॉर्ड कर्झन हे उद्योगी आहेत, हुषार आहेत आणि मुत्सद्दीपणांत मोठे धूर्त आणि दक्ष आहेत हें कोणासहि नाकबूल नाहीं. पण दुःखाची गोष्ट ही कीं, याचें सर्व शहाणपणा, सर्व धूर्तता आणि सर्व उद्योग हिंदुस्थानच्या प्रजेचें दास्यत्व जेणेंकरून अधिक चिरकालिक होईल अशा कृत्यांत खर्च झालेलें आहे; आणि त्याची लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या अलंकारिक भाषेनें किती जरी प्रशंसा केली तरी हिंदुस्थानवासी प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें पाहिले तर लॉर्ड कर्झन यांच्याइतके लोकांच्या हक्कांची पायमल्ली करणारे अरेरावी धूर्त व्हाइसराय आजपर्यंत हिंदुस्थानांत आले नव्हते, असें स्पष्टपणें म्हणणें भाग येतें. आपल्या कृत्यांचें खरें स्वरूप झांकण्याचा यांनीं किती जरी प्रयत्न केला तरी त्या कृत्यांचे खरे परिणाम किंवा त्यांतील खरें इंगित लोकांस न कळण्याइतकें मूर्ख लोक आतां राहिलेले नाहींत. हिंदुस्थानचें राज्य उत्तरोत्तर अधिकाधिक दृढ होण्यास हिंदुस्थानची प्रजाच अधिक संतुष्ट राखली पाहिजे हें तत्व लॉर्ड कर्झन यांनीं कधींच लक्षांत ठेविलें नाहीं, किंबहुना तें त्यांस मान्यहि नसेल. अशा स्थितींत त्यांनीं पांच वर्षांत अमुक कामें केलीं म्हणून बाराच नव्हे तर शंभर कार्याची जरी यादी आमच्यापुढें मांडली तरी त्याचा आम्हांस काय उपयोग ? ज्या दृष्टीनें त्यांच्या कार्याचें आम्ही परीक्षण करणार ती दृष्टीच वेगळी होय आणि तशा दृष्टीनें पाहिलें

म्हणजे लॉर्ड कर्झन यांनीं या भाषणांत आपल्या हातानें आपल्या भोंवतीं दिवा ओंवाळला हें पाहून आम्हांस हसूं येतें.

लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या भाषणांत अखेर सरकारी नोकरीसंबंधानें आंकड्यांचें जें गौडबंगाल केलें आहे तें तर अगदींच पोंचट आणि पोरकट झालेलें आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार बहुतेक नेटिवांकडूनच चालविला जातो. युरोपिअन लोकांचें प्रमाण लोक म्हणतात त्याप्रमाणें फाजिल नाहीं, असें दाखविण्याचा व्हाइसरायांचा प्रयत्न आहे. पण यांतही त्यांचें सर्व भाषण मुद्यास सोडून झालेलें आहे. कोणत्याही खात्यांतील शिपाई, कारकून किंवा खालच्या प्रतीचे अंमलदार नेटिव असतात आणि त्यांजवर देखरेख करण्यास मात्र एक दोन साहेब नेहमीं ठेवले जातात हें सांगण्यास लॉर्ड कर्झन साहेबांची कांहीं जरूरी नाहीं. कांहीं हजार युरोपियन कामगार तीस कोटी वस्तीच्या लोकांचा राज्यशकट हांकीत आहेत, ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. वादाचा मुद्दा एवढाच आहे कीं, हे जे कांहीं हजार युरोपियन कामगार आहेत ते सर्व लोणी खाऊन जाऊन ताक मात्र आमच्या वांट्यास ठेवतात. हा मुद्दा इतका निर्विवाद आहे कीं, तो खोडणें बहुतेक दुरापास्त होय. पण लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या भाषणांत मुद्याचा हा भाग मोठ्या शिताफीनें गाळून टाकला आहे; आणि सरकारी नोकरींत युरोपियन नोकरांच्या संख्येपेक्षां नेटिव लोकांचीच संख्या अधिक आहे असें मोठ्या डौलानें आणि आंकड्यांच्या मदतीनें सिद्ध करण्याचा आव घातला आहे. आमच्या मतेंहि गोष्ट सिद्धच करावयास नको होती. खेडेंगांवांतील एखाद्या जमिनदारानें किंवा टी प्लांटरनें जर उद्यां असा कोटिक्रम केला कीं, ' मी काय तो गांवांत एकटाच इनामदार आहें, आणि मी व माझ्या कुटुंबांतील दोन चार माणसांखेरीज गांवांतील शेतकरी व कुणबी आहेत; अर्थात् टी प्लांटर किंवा जमिनदार शेतकऱ्यांस बुडवितो किंवा त्यांचें सर्व उत्पन्न तो घेतो हें म्हणणें चुकीचें होय. ' तर त्यास लॉर्ड कर्झन काय जबाब देतील ? त्यांचें म्हणणें ते कबूल करतील काय ? आणि जर कबूल करणार नाहींत तर लाटसाहेबांचें म्हणणें आम्हीं तरी कसें कबूल करावें हें आम्हांस समजत नाहीं. पूर्वी नेटिवांस न मिळालेल्या अशा किती जागा लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत नेटिवांस मिळाल्या आहेत ? एकही नाहीं, उलट एखादी कमीच झाली असेल. मग उगाच आंकड्यांचा विस्तार माजवून व्यर्थ बडबड कां ? इंग्रजींत म्हण आहे त्याप्रमाणें आमच्या देशाच्या कारभारांत लांकडें वाहण्याचीं आणि पाणी भरण्याचीं सर्व कामें नेटिव लोकांकडे ठेवण्यांत आली आहेत, आणि मलिदा गोरे लोकांस मिळत आहे, हें निर्विवाद आहे. ही स्थिति शोचनीय होय; पण कष्टानें म्हणा कशी बशी तरी आम्ही ती सहन करीत आहों. अशा वेळीं सर्व कारभार तुमच्याच हातांत आहे अशा प्रकारें वेळोवेळीं आमच्या दुःखावर

डाग देण्याचा प्रयत्न आणि तोही लॉर्ड कर्झन यांच्या सारख्यांच्या हातून व्हावा हें इंग्रजी राज्यव्यवस्थेस अत्यंत लाजिरवाणें होय. आमच्या दुःखाचा भार कमी करणें हें बादशाहांच्या प्रतिनिधींचें कर्तव्य आहे, पण तो कमी करवत नसेल तर आमच्या दुःखावर डाग देण्याचा तरी प्रयत्न त्यांनीं करूं नये, अशी त्यांस आग्रहपूर्वक विनंति करण्याचा आमचा हक्क आहे, असें आम्ही समजतों. वर जे दोन शब्द लिहिले आहेत, ते अशाच दृष्टीनें लिहिले आहेत आणि आम्हांस अशी उमेद आहे कीं, अँग्लोइंडियन पत्रकर्त्यांनीं कांहीं जरी म्हटलें तरी बादशाहाचे प्रतिनिधि म्हणून जे या देशांत येतात ते तरी अशी चूक करणार नाहींत.

❖ ❖ ❖

* धूर्त कोण आणि फसला कोण ?

डॉ. भांडारकर यांनीं युनिव्हर्सिटी बिलावर शेवटीं जें भाषण केलें आहे तें समग्र सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध होऊन आलें आहे; आणि तें वाचलें म्हणजे डाक्टरसाहेबांच्या एकांगीपणाबद्दल आम्ही जे पूर्वीं उद्गार काढले आहेत त्यांचा खरेपणा कोणाच्याही प्रत्ययास येईल. डाक्टरसाहेब नव्या पद्धतीनें तयार झालेले संस्कृतज्ञ विद्वान् आहेत ही गोष्ट सर्वश्रुत व सर्वमान्य आहे; व याचें प्रत्यंतर जर कोणास पाहणें असेल तर डाक्टरसाहेबांच्या भाषणाचा शेवटचा भाग त्यानें वाचावा. खरी विद्या किंवा शास्त्र कशास म्हणतात, विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येबद्दल खरी आस्था उत्पन्न करण्यास त्यांच्या गुरुची विद्वत्ता, व्यासंग व आचरण हीं किती व्यापक व शुद्ध असावीं लागतात, याबद्दल डाक्टरसाहेबांनीं आपल्या भाषणाचे शेवटीं जे उद्गार काढाले आहेत ते अगदीं यथार्थ आहेत व हल्लीं युनिव्हर्सिटीच्या कायद्यांत जी सुधारणा झाली त्यानें या गोष्टी आम्हांस मिळण्याचा जर बराच संभव असेल, तर आम्हीही डाक्टरसाहेबांप्रमाणेंच बिलांचीं वांगीं संत्रे म्हणून मोठ्या आनंदानें पतकरूं. खरी युनिव्हर्सिटी म्हणजे काय अथवा त्यांतील विद्यार्थी आणि गुरु कोणत्या प्रकारचे असावेत याबद्दल डाक्टरसाहेबांचा व आमचा मुळींच मतभेद नाहीं व असणेंही शक्य नाहीं. खऱ्या युनिव्हर्सिटींतील गुरु आपल्या विषयांत निष्णात, नवीन शोध लावणारे आणि त्या विषयासंबंधानें चोहोंकडील माहिती रोजच्या रोज गोळा करणारे किंवा वाचणारे असावेत, हें

---

* [केसरी ता. १९ एप्रिल १९०४]

तत्त्व भांडारकरांसारख्या विद्वानांस कोणी नव्यानें सांगावयास नको. डॉक्टर-साहेबांनीं आपल्या भाषणांत शेवटीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, विलायतेच्या युनिव्हर्सिटींत नुसते पास झालेले किंवा नुकतेच ऑनर्स मिळविलेले विद्यार्थी हिंदुस्थानच्या युनिव्हर्सिटींत प्रोफेसर नेमिल्यानें आम्हांस कांहीं फायदा होत नाहीं; इतकेंच नव्हे तर डॉक्टरसाहेबांनीं असेंही सांगितलें आहे कीं, आजपर्यंत सरकारानें जे प्रोफेसर नेमिले त्यांपैकीं बरेच प्रोफेसर वर सांगिलेल्या वर्गांतील उदरंभरी लोक आहेत, आणि त्यांच्या नेमणुका कांहीं तरी शिफारशीनें किंवा वळणानें झालेल्या आहेत. येथपर्यंत डॉक्टरसाहेबांची व आमची पुरी एक-वाक्यता आहे; आणि म्हणूनच डॉक्टरसाहेबांच्या भाषणाचा हा भाग महत्त्वाचा असून सरकारानें तो अवश्य वाचावा अशी आम्ही शिफारस करितों; आणि लॉर्ड कर्झन साहेबांपुढें या गोष्टी स्पष्ट सांगितल्याबद्दल डॉक्टरसाहेबांचे आभार मानतों. पण येथेंच त्यांची व आमची एकवाक्यता संपली. खरी युनिव्हर्सिटी किंवा विद्यापीठ कसें असावें हा प्रश्न विद्वानांनींच सोडविण्याचा आहे; अर्थात् डॉक्टर भांडारकर यांनीं त्याबद्दल जें सांगितलें तें आम्हांस मान्य आहे. पण एवंगुणविशिष्ट युनिव्हर्सिटी हल्लीं सरकारनें युनिव्हर्सिटीच्या कायद्यांत जो फेर-फार केला आहे त्यामुळें आपणास मिळेल कीं नाहीं, या नव्या कायद्याचें धोरण काय आणि त्या धोरणानें खरी युनिव्हर्सिटी स्थापण्याचा उद्योग सिद्धीस जाईल कीं नाहीं, हे प्रश्न केवळ विद्वानांचे नसून मुत्सद्याचे आहेत; आणि त्यांचा विचार करतांना डॉक्टरसाहेबांनींच सांगितलेल्या ' त्रयाणां धूर्तानां , या गोष्टी-मधील मानेवरून मेंढरू नेणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें त्यांची स्थिति झाली आहे. आमच्या मतें डॉक्टरसाहेब या विषयावर न बोलते तर फार चांगलें झालें असतें. आपल्या भाषणाच्या आरंभीं ' पुढें काय बोलणार हें कळण्यापूर्वीच लोकांनीं मजविरुद्ध टीका करण्यास आरंभ केला ' म्हणून डॉक्टरसाहेबांनीं आश्चर्य प्रदर्शित केलें आहे आणि लोकांस दोषहि दिला आहे. पण आम्हांस त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. सगळा जन्म शाळाखात्यांत घाल-विलेले डॉक्टरसाहेब कितीही विद्वान् असले तरी लॉर्ड कर्झनसाहेबांच्या राजकीय-धोरणासंबंधानें बोलतांना हे चकतील अशी पूर्वींच पुष्कळांनीं अटकळ केली होती. ही अटकळ बांधण्यास डॉक्टरसाहेबांचें भाषण होण्याची वाट पाहणें जरूरच होतें असें नाहीं. हरिदासाचे दिवाण झालेले माणकेश्वर जेव्हां पालखींत बसून खडकीच्या समांरगणावर लढाई मारण्यास निघाले, तेव्हांच पुण्यांतील कांहीं शाहण्या लोकांस लढाईचा परिणाम कळून चुकला होता; आणि त्यास जर कोणी असें विचारिलें असतें कीं, 'कायरे, तुम्ही लढाई होण्यापूर्वीच तिच्या परिणामाविषयीं अटकळ कां करीतां ?' तर त्यांनीं जो जबाब दिला असता तोच आज आम्ही डॉक्टरसाहेबांस देऊं शकतों. आमच्याकडे कांहीं वर्षांपूर्वी

अशी समजूत होती कीं, एकदां एखादा मनुष्य एखाद्या पाश्चिमात्य विद्येंत प्रविण झाला कीं, त्याच्या बुद्धीची गति सर्वत्र अप्रतिहत चालावयाचीच. मग तो सामाजिक विषयावर बोलो, धार्मिक विषयाची चर्चा करो, राजकीय बाबींचा विचार करो किंवा व्यावहारिक गोष्टी सांगो. पण ही समजूत आमच्या सुदैवानें आतां नाहींशी होत चालली आहे; व त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, विद्वत्तेच्या संबंधानें जरी डॉक्टरसाहेबांचीं मतें किंवा विचार आम्ही ग्रहण करण्यास तयार असलों, तरी सामाजिक बाबतींत त्यांचे विचार जशाच्या तसेंच घेण्यास आम्ही तयार नाहीं. ज्यांनीं जन्मभर शाळेंत शिकविण्यापलीकडे कांहीं काम केलें नाहीं, आणि परकीय राजे आपल्यावर कोणत्या रीतीनें अंमल करतात अथवा त्यांच्या राजनीतीचें धोरण कसें असतें अगर तें. अहितकारक असून हितकारक आहे असें लोकांस दाखविण्याचा कसा प्रयत्न चालला असतो, इत्यादि गोष्टींचा ज्यांनीं विचार केला नाहीं, त्यांनीं जन्मभर आपण युनिव्हर्सिटींत होतो म्हणून युनिव्हर्सिटी बिलावर मत देण्याच्या आपल्या पात्रतेची टिमकी वाजविणें, म्हणजे नेहमीं पाण्यांत राहतों म्हणून बेडकानें सृष्टींत होणाऱ्या पावसाच्या घडामोडींवर अभिप्राय देण्यासारखेंच होय ! खरी युनिव्हर्सिटी म्हणजे काय, याबद्दल डॉक्टरसाहेबांचें मत आम्हांस मान्य आहे; पण हल्लींच्या बिलापासून (किंवा कायद्यापासून) ही गोष्ट आम्हांस कशी प्राप्त होणार याचा विचार डॉक्टरसाहेबांनीं आपल्या भाषणांत कोठेंही केलेला दिसत नाहीं. डॉक्टरसाहेब म्हणतात कीं, मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो हे बहुतेक लष्करी किंवा मुलकी कामगार असल्यानें त्यांचीच गेल्या वीस वर्षांत मुंबई युनिव्हर्सिटींत सरशी आहे. गोष्ट कबूल आहे पण मग डॉक्टरसाहेबांस आम्ही असें विचारतों कीं, अशा प्रकारच्या—म्हणजे बहुतेक अंशीं सरकाच्या कह्यांत असणाऱ्या—फेलों-चिच सरशी असतां सरकारच्या हातून मुंबईस खऱ्या युनिव्हर्सिटीची स्थापना कां झाली नाहीं ? सर रिचर्ड टेंपल यांस बी. ए. च्या परीक्षेस लागणारा काल तिहींच्या ठिकाणीं जेव्हां चार वर्षांचा करावयाचा होता, तेव्हां हे सर्व फेलो कान धरून गव्हर्नरसाहेबांप्रमाणें मत देण्याकरितां सेनेटच्या सभेस खेंचून आणले होते; आणि खरी युनिव्हर्सिटी स्थापण्याचा जर सर रिचर्ड टेंपल यांचा हेतु असता, तर हिच खेंचाखेंची फिरूनही करतां आली असती. परंतु—आणि डॉक्टरसाहेबांच्या लक्षांत न आलेला हा एक मोठाच ' परंतु ' आहे—सरकारच्या मनांत ही गोष्ट असेल तेव्हांना ? डॉक्टरसाहेबांत व आमच्यांत जो मोठा मतभेद आहे तो हाच होय. त्यांस वाटतें कीं, सरकारचे हेतु अगदीं शुद्ध व स्तुत्य आहेत, आणि त्यांस खरोखरीच हिंदुस्थानांतील लोकांस विलायतेंतिल विद्यापीठांत मिळणारें उच्च शिक्षण द्यावयाचें आहे. पण डॉक्टरसाहेबांस आम्ही असें विचारतों कीं, असा जर सरकारचा हेतु होता तर तो गेल्या ५०

वर्षांत सिद्धीस नेण्यास कोण लोक सरकारच्या आड आले होते ? कॉलेजांतील प्रोफेसरांच्या जागा शिफारशीनें किंवा वळणानें वरणीसारख्या देण्यास सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस आम्ही किंवा आमच्यापैकीं कोणी कधींही सांगितलें नव्हतें. वर्डस्वर्थ–ग्रांटसारख्यांची अमदानी जाऊन सेल्बी–जाईल्सची जी अमदानी आली आहे हें उक्रांती बव्वास अनुसरूनच झालें आहे असें डॉक्टरसाहेब म्हणतात काय ? विलायतेंतून इकडे येण्यास खुषी असे जाइल्स–सेल्बीपेक्षां अधिक योग्यतेचे विद्वान् गृहस्थ मिळतच नाहींत काय ? किंवा सरकारास या गोष्टीची आजपर्यंत आठवणच झाली नाहीं असें आम्हीं म्हणावयाचें काय ? डॉक्टरसाहेब यांपैकीं एखाद्या प्रश्नासही जर समर्पक उत्तर देतील तर आम्हीं त्याचें म्हणणें कबूल करूं. पण त्यांच्या भाषणांत असल्या प्रश्नांस उत्तर देण्याचा बिलकुल प्रयत्न केलेला नाहीं. सरकारचे हेतु चांगले आहेत हें दाखविण्याकरितां इंपीरियल लायब्ररी आणि जुन्या इमारती किंवा कामें संरक्षण करण्याचा कायदा या गोष्टी डॉक्टरसाहेबांनीं पुढें आणल्या आहेत. पण अशाच रीतीचा पुरावा द्यावयाचा असल्यास सरकारानें आगगाड्या केल्या व पूल बांधले याही गोष्टी आम्हांस सांगतां येतील ! पहिला युनिव्हर्सिटीचा कायदा १८५७ सालीं पास झाला. तेव्हां पहिल्यानें जे प्रोफेसर इकडे आले त्यांपेक्षां उत्तरोत्तर कमी दर्जाचे लोक जर सरकार प्रोफेसरांच्या जागीं आणीत आहे तर अजूनही सरकारचा हेतु हिंदुस्थानांत खरी युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचा आहे व लोकांनीं त्याबद्दल संशय घेऊं नये असें डॉक्टरसाहेबांसारख्या विद्वानानें कायदे कौन्सिलांत स्पष्ट सांगणें म्हणजे चालू असलेल्या राजनीतीविषयीं आपलें अज्ञान प्रगट करणें नव्हे काय ? खरी युनिव्हर्सिटी स्थापन करण्यास ५० नकोत तर त्याच्या निम्मीं म्हणजे २५ वर्षें पुरीं होतात, ही गोष्ट जपानच्या उदाहरणावरून उघड होत आहे. आणि ती उघड असतांहि सरकारच्या हेतूबद्दल संशय घेण्यास जागा नाहीं म्हणून डॉक्टरसाहेब लोकमताविरुद्ध कौन्सिलांत प्रतिपादन करितात यास काय म्हणावें तें सांगण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवितों. ही गोष्ट पाहून किंवा ऐकून न समजण्याइतके डॉक्टरसाहेब मूर्ख नाहींत. अर्थात् त्यांनीं या दृष्टीनें या प्रश्नाचा विचारच केला नाहीं असें म्हणणें भाग येतें. खऱ्या युनिव्हर्सिटीचीं स्थापना करण्यास फारसा प्रयास लागतो असें नाहीं. युरोप किंवा अमेरिकेंतून दहा पांच उत्तम विद्वान् आणून व त्यांच्या हातांत मुलबक पैसा व युनिव्हर्सिटीचीं सूत्रें दिलीं तर हें काम दहा पांच वर्षांत होण्याजोगें आहे. पण ती गोष्ट लॉर्ड कर्झन यांस कर्तव्य नाहीं. इतकेंच नव्हे तर, ती करण्याकरितां तयारी करतों असा आंव घालून हल्लीं युनिव्हर्सिट्या व कॉलेजें यांच्यावर सरकारचा जो दाब आहे तो मात्र त्यांस जास्त वाढवावयाचा आहे. हिंदुस्थानांतील उच्च प्रतीच्या शास्त्रीय शिक्षणाचें उच्च

विद्यापीठ ऊर्फ " पोस्ट ग्रॉज्युएट " युनिव्हर्सिटी स्थापण्याची सूचना मि० टाटा यांनीं स्वतःचे ३० लक्ष रुपये देऊन कायमची फेंटाळून लावली, असें ' इंडियन मिरर ' पत्र म्हणतें तें खरें असेल तर सरकारचें धोरण कसें आहे, हें डॉक्टरसाहेबांसहि कळून येईल.डॉक्टर भांडारकर यांनीं विद्यार्थ्यांच्या अंगांत इंग्रजी शिक्षणानें करारी स्वभाव किंवा दानत हल्लींच्या व्यवस्थेनें येत नाहीं म्हणून रड गाइली आहे. पण डॉक्टरसाहेबांस आम्ही एवढेंच विचारतों कीं, ज्या युनिव्हर्सिट्यांचा किंवा कॉलेजांचा गळा सरकारगवसणींत गेला त्यांतील विद्यार्थी तरी स्वतंत्र मताचे, सत्यप्रिय आणि करारी कसे होणार ? डॉक्टरसाहेबांस जी गोष्ट कळत नाहीं ती हीच होय; आणि ती त्यांस यापुढें तरी कळेल अशी आम्हांस बिलकुल आशा वाटत नाहीं. वरिष्ठ प्रतीचें शिक्षण होतां होईल तितकें सरकारच्या कह्यांत नसावें हें राजकीय तत्व सुधारलेल्या देशांत सर्वसंमत आहे. खरें विद्यापीठें म्हणजे तेथें राजकीय, सामाजिक, शास्त्रीय, औद्योगिक किंवा व्यावहारिक विषयासंबंधानें निर्भिडपणें विचारपूर्वक मत देणारे विद्वान् निपजले पाहिजेत. पण जीं विद्यापीठें दारूच्या गुत्याप्रमाणें सरकारच्या लायसेन्साप्रमाणें चालावयाचीं तेथें सत्यनिष्ठेपासून उत्पन्न होणारें धैर्य, किंवा करारीपणा तरी कोठून नजरेस पडणार ? लॉर्ड कर्झन यांस जर खरें विद्यापीठ काढावयाचें होतें तर पांच पंचवीस लाख रुपये खर्च करून त्यांस सुधारलेल्या देशांतून विद्वान् प्रोफेसर इकडे आणतां येत नव्हते काय ? तसें न करतां सेनेटच्या रचनेंत फेरफार करून युनिव्हर्सिट्यांचें व कॉलेजांचे पाय बांधण्याचा लाटसाहेबांनीं जो प्रयत्न केला तो वरिष्ठ शिक्षणाच्या प्रसारार्थ किंवा हितार्थ केला असें डॉक्टरसाहेबांखेरीज कोणीही विचारी मनुष्य म्हणेल असें आम्हांस वाटत नाहीं. सुधारलेल्या विसाव्या शतकांत मुत्सद्दी लोक—विशेषतः करून परकीय राज्यकर्ते मुत्सद्दी—आपला हेतु उघडपणें लोकांस कळवीत नाहींत, होतां होईल तोंपर्यंत तो साखरावगुंठित करून प्रजेस चकवीत असतात, हें डॉक्टर भांडारकरांसारख्यास कळूं नये किंवा कळत असल्यास बोलण्याचें धैर्य होऊं नये हें आमचें दुर्दैव होय. शिक्षणाचें काम लोकांच्या हातीं असेल तितकें चांगलें, किंबहुना लोकांनींच तें हातांत घेतलें पाहिजे, अशा तऱ्हेचा अभिप्राय हंटरसाहेबांच्या एज्युकेशन कमिशननें दिला होता; व आम्हांस असें आठवतें कीं, तो आपल्यास मान्य असल्याबद्दल डॉक्टरसाहेबांनीं त्या वेळीं एक दोन ठिकाणीं उद्गारहि काढले होते. पण आज सरकारचा मोर्चा फिरल्याबरोबर डॉक्टरसाहेबांचाहि मोर्चा फिरलेला आहे. त्यांतूनहि विशेष दुःखाची गोष्ट हीच कीं, सरकारानें या वेळीं डॉक्टरसाहेबांसारख्या शास्त्रयाचा फायदा घेऊन मुत्सद्यांचा पराभव करण्याकरितां शस्त्राऐवजीं त्यांचा उपयोग केला आहे. डॉक्टरसाहेबांस आपल्या स्पष्टवक्तेपणाची बरीच घमेंड आहे. पण देश-

हिताच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ही घमेंड 'वाब्या बोल' म्हणून मुलाच्या पाठीस लागल्यावर त्याचें आईस जें उत्तर मिळालें त्यासारखी आम्हांस घातुक झाली आहे; इलाज नाहीं. देशाची स्थितीच अशी आहे कीं, ज्या विषयांत ज्यास बोलण्याचा अधिकार नसतो त्यासच हातीं धरून सरकार आपला कार्यभाग उरकून घेत असतें. अशा स्थितींत लोकमत प्रतिपादन करणारे गृहस्थ नेमस्त असले काय आणि कडक बोलणारे असले काय त्यांचा सारखाच उपयोग होतो, हेंही युनिव्हार्सिटी बिलावरील वादविवादावरून सर्वांना कळून येण्यासारखें आहे. सरकारच्या राजनीतीचें धोरण आतां बहुतेक ठरल्यासारखें झालें आहे. हेंच धोरण चांगलें म्हणून कांहीं एकांगी गृहस्थ फसले जातात, कांहीं नेमस्तपणाचा अंगीं डौल आणून सरकार आपणास वळेल अशी फुकट आशा करितात आणि कांहीं सरकारचा हेतु पहिल्यापासून ओळखून वरील कातडें दूर सारून सरकारच्या हेतूची पहिल्यापासूनच स्पष्टपणें लोकांस ओळख करून देत असतात. पण कसेंही झालें तरी लोकमताचें प्राबल्य होऊन त्याप्रमाणें राजनीतीचें धोरण राहील अशी युक्ति कोणासही अद्याप सांपडली नाहीं. सरकार लोकपक्षाच्या सर्व गृहस्थांस वाजूस सारून आपला हेका जोरानें तडीस नेत आहे आणि आमच्या दुर्दैवानें त्यास आमच्यापैकीं डॉक्टर-साहेबांसारखा कोणीना कोणी तरी दुजोरा देण्यास मिळत आहे. ही स्थिति जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत लोकपक्षाची केव्हांही सरशी होण्याची आशा बाळगावयास नको.

* * *

* आंकड्यांचें गौडबंगाल

कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, एखादी गोष्ट आंकडे मांडून किंवा मोठमोठालीं कोष्टकें देऊन सिद्ध केली म्हणजे पुराव्याचें माप भरपूर झालें; कारण इंग्रजींत म्हण आहे कीं, 'आंकडे हे कधीं खोटें बोलत नाहींत.' परंतु हा समज अगदीं चुकीचा आहे. आंकड्यांसारखी भ्रामक वस्तु या जगांत क्वचितच सांपडेल. गणिताच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे दर एक आंकड्यास किंवा अंकसमुदायास कांहीं एक विशिष्ट किंमत असून ती जास्त होणें किंवा कमी होणें अशक्य असतें. परंतु हा गणितशास्त्रांतील आंकड्यांचा धर्म आंकड्यांनीं

---

* [केसरी ता. १४ जून १९०४]

निर्दिष्ट केलेल्यां वस्तूंस सर्व प्रकारें लागू पडतो असें नाहीं. न्यायशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास संख्या ही जरी आंकड्यांनीं परिछिन्न असली तरी संख्यावछिन्न धर्म संख्येनें निर्दिष्ट केलेल्या वस्तूंत इतर बाबतींतही असतात असें म्हणतां येत नाहीं. सारांश, आंकडे हे मोठे भ्रामक असतात आणि ते काय काय वस्तू किंवा विषय कोणकोणत्या स्थितींत दाखवितात याची जर आपण खबरदारी घेतली नाहीं तर निवळ आंकड्यापासून कित्येकदां भयंकर अनुमानें काढतां येण्यासारखीं असतात. याचें एका नकलेच्या बुकांत उदाहरण दिलेलें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस आठवत असेल. जगामध्यें मनुष्यास वसण्यास, निजण्यास वगैरे अतिशय घातुक वस्तु कोणती, असा एकानें प्रश्न केला तेव्हां दुसऱ्यानें त्यांस ताबडतोब असें उत्तर दिलें कीं, ही वस्तु ' बिछाना ' ही होय कारण मोजदाद केली असतां असें आढळून येतें कीं, शेंकडा ९५ माणसें बिछान्यावरच मरण पावलीं आहेत; अर्थात् बिछाना ही वस्तु अत्यंत भयंकर होय, त्यावर कोणी निजूं नये कीं बसूं नये ! आणि ही गोष्ट आंकड्यांनीं अगदीं निर्विवाद सिद्ध होत आहे !

वरील कोटिक्रम केवळ विनोदात्मकच आहे अशी जर कोणाची समजूत असेल तर त्यानें हिंदुस्थानसरकारचा सरकारी नोकऱ्यांसंबंधानें नुकताच जो एक ठराव प्रसिद्ध झाला आहे तो अवश्य वाचावा, अशी आम्ही त्यांस शिफारस करतों. दरमहा ७५ रुपयांपेक्षां जास्त पगाराच्या एकंदर हिंदुस्थानांत किती नोकऱ्या आहेत व त्यांपैकीं युरोपियन, युरेजिअन, हिंदु आणि मुसलमान लोकांस कोणकोणत्या दर्जाच्या नोकऱ्या किती प्रमाणानें दिलेल्या आहेत याचा तक्ता हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध करून त्या विषयावर त्यावरोबर आपला ठरावही प्रसिद्ध केला आहे. या तक्त्यांत दरमहा ७५ रुपयांवरच्या एकंदर नोकऱ्या १८६७ सालीं किती होत्या व पुढें १८७७।१८८७।१८९७ व १९०३ या सालीं त्या कशा वाढत गेल्या याचे आंकडे दिले आहेत; आणि वर लिहिलेल्या प्रत्येक युरोपियन, युरेजियन, हिंदु आणि मुसलमान या जातींस अनुक्रमें त्या नोकऱ्या कशा मिळत गेल्या याच्या हिसेरसीचें प्रमाण दिलें आहे. दरमहा ७५ रु. पेक्षां कमी पगाराच्या नोकऱ्या बहुतेक सर्व हिंदुस्थानांतील लोकांसच दिलेल्या आहेत; तेव्हां त्या सोडून देऊन बाकीच्यांचा म्हणजे दरमहा ७५ रु. पेक्षां वरच्या पगाराच्या नोकऱ्यांचा मात्र विचार कर्तव्य आहे, असें ठरावाच्या आरंभीं सरकारानें म्हटलें आहे. दरमहा पंचाहत्तरापासून वरच्या पगाराच्या एकंदर जागा सन १८६७ सालीं १३,४३१ होत्या त्या सन १९०३ सालीं २८,२७८ झाल्या; म्हणजे त्यांची वाढ शेंकडा ११० किंवा दुपटीवर झाली. परंतु आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं, युरोपियन नोकरांची संख्या दुप्पट न होतां शकडा ३६ या प्रमाणानें वाढली आहे. युरेजियनांची दुप-

टीवर थोडी म्हणजे शेंकडा १०६ या प्रमाणानें वाढली आहे. हिंदूंची वाढ शेंकडा १७९ म्हणजे पावणेतीन पटीवर झाली आहे, आणि मुसलमानांची वाढ शेंकडा १२९ या प्रमाणानें आहे. युरोपियन आणि युरेजियन एकत्र घेतले तर त्यांची वाढ शेंकडा ६१ आणि हिंदु आणि मुसलमान एकत्र केले तर त्यांची वाढ शेंकडा १७१ झालेली आहे. यावरून लॉर्ड कर्झन असें अनुमान करतात कीं, हिंदु लोकांस आतांशा नोकऱ्या कमी मिळतात अशी जी लोकांची ओरड आहे ती अगदीं चुकीची व अन्यायाची आहे. कारण आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं, दरमहा ७५ रु. पेक्षां कमी पगाराच्या सर्व नोकऱ्या हिंदुस्थानांतील लोकांच्याच हातांत आहेत; आणि दरमहा ७५ रु. पेक्षां वरच्या पगाराच्या नोकरांची एकंदर संख्या दुप्पट वाढली तर त्यांतील हिंदु लोकांची संख्या पावणेतीनपट झालेली आहे. यावरून जास्त वाढलेल्या नोकऱ्या जास्त जास्त हिंदु लोकांसच मिळत गेल्या, असें लाटसाहेबांचें म्हणणें आहे.

हा कोटिक्रम पाहून पुष्कळांस हसूं आल्याखेरीज राहाणार नाहीं. नेटिव लोकांस नोकऱ्या मिळत नाहींत म्हणून जी तक्रार आहे ती कनिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यासंबंधानें आहे, या गोष्टीकडे दुर्लक्ष करून वरचा कोटिक्रम रचलेला आहे. हिंदुस्थासरकारच्या वाढत्या राज्यव्यवस्थेस दरसाल अधिकाधिक नोकर लागतात ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे पण मौज अशी असते कीं दरमहा हजार किंवा हजार रुपयांपेक्षां वरच्या पगारांच्या ज्या नव्या जागा निघतात त्या सर्व गोऱ्या लोकांस दिल्या जातात, आणि खालच्या जागा मात्र गोऱ्यांत व काळ्यांत विभागल्या जातात. सामान्य नियम पाहिला म्हणजे दरमहा दोनशें किंवा तीनशें रुपयांपर्यंतच्या जागा बहुतेक एतद्देशियांसच दिल्या जातात असें म्हटलें तरी चालेल. दरमहा दोनशें किंवा तीनशें हा इंग्रजी अंमलदाराच्या सुरवातीचा पगार आहे. दरमहा तीनशेंपासून आठशें किंवा हजारपर्यंत कांहीं जागा गोऱ्यांस व कांहीं जागा काळ्यांस मिळतात. कारण, मुनसफीच्या किंवा डेप्युटी कलेक्टरच्या जागेचा अखेरचा पगार आठशें आहे; व न्यायखात्यांतील दरमहा एक हजाराच्या कांहीं थोड्या जागा नेटिवांस मिळत असतात. या वजा केल्या म्हणजे बाकी आठशेंच्या किंवा हजाराच्या जागा गोऱ्या लोकांसच मिळत असतात. उदाहरणार्थ, असि. कलेक्टर, असि. जज आणि एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, पोलिस सुपरिंटेंडेंट वगैरे दरमहा एक हजार रुपायांवरच्या जागा बहुतेक गोऱ्या लोकांनींच बळकावलेल्या आहेत. नाहीं म्हणावयास हायकोर्टाच्या जजाच्या कांहीं जागा, विलायतेहून सिव्हिल सर्व्हिस किंवा एंजिनिअरिंग पास होऊन आलेल्या नेटिवांस मिळालेल्या जागा अथवा प्रॉव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें नेटिवांकरितां एक दोन राखून ठेवलेल्या जागा हाच काय तो यास अपवाद आहे. बाकी सर्व मोठ्या प्रतीच्या जागा गोऱ्या लोकांच्या

हातांत असून त्या जागांच्या पगारांचीं ओझीं त्यांच्याच खिशांत उतरत आहेत. हिंदुस्थानांतील लोकांची जी तक्रार आहे ती याच जागांसंबंधानें होय. दरमहा ७५।१००।१५० किंवा २०० पगारावर कोणी युरोपियन इकडे येतहि नाहीं आणि सरकार त्यास लावीतहि नाहीं. कदाचित् एखादा फाटकातुटका युरोपियन मिळाला तर या जागेचें काम चालविण्याची त्याच्या अंगीं अक्कल नसते. सारांश, दोनशें रुपये पगारापर्यंत ज्या जागा आहेत त्यांचें काम चालविण्याइतक्या हुशारीचे युरोपियन लोक त्या जागा पतकरीत नसल्यामुळें त्या आमच्या वांटयास आल्या आहेत. अर्थात् त्या जागा सरकार नेटिवांस देतें यांत कांहीं सरकारची मेहेरबानी नाहीं. जो काय विचार करावयाचा तो वरच्या प्रतीच्या जागांसंबंधानें होय. अशा दृष्टीनें विचार केला असतां हल्लींच्या ठरावांत नमूद केलेले आंकडे लोकांच्या तक्रारींचेंच पुष्टीकरण करतात. दरमहा ७५ रु. पेक्षां जास्त पगाराच्या एकंदर जागा १३ हजारांच्या २८ हजार झाल्या. तेव्हां त्या मानानें इतर जागांची वाढ शेंकडा किती झाली याचें प्रमाण मांडून लोकांचें म्हणणें खोडून काढण्याचा सरकारी ठरावांत जो प्रयत्न केलेला आहे तो चुकीचा आहे. एकंदर सर्व जाग्याशीं प्रमाण काढण्यांत कांहीं हांशील नाहीं. कारण, संख्येनें पाहिलें तर साहेबापेक्षां कारकुनांच्याच जागा जास्त वाढलेल्या आहेत व वाढवाव्या लागतात हें निर्विवाद आहे. उदाहरणार्थ हल्लींच्या तक्त्यांतील आंकडे आपण घेऊं. सन १८६७ सालीं दरमहा ७५ रु. पेक्षां अधिक पगाराच्या जागा १३,४३१ होत्या. पैकीं ७,८३७ दोनशेंहून कमी पगाराच्या होत्या आणि हजाराहून जास्त पगाराच्या ६४८ होत्या. आतां १९०३ सालचे जे:आंकडे दिले आहेत त्यांवरून पाहतां या सालीं दरमहा ७५ रु. पेक्षां वरच्या जागा २८,२७८ झाल्या पैकीं २०० रु. पेक्षां कमी पगाराच्या १७,७२५ होत्या. आणि १००० रु. पेक्षां जास्त पगाराच्या १३७० होत्या, हें खालील कोष्टकावरून दिसून येईलः—

	सन १८६७	सन १९०३	वाढ	वाढीचें शें. प्रमाण
दरमहा ७५ रु. जास्त पगाराच्या जागा ...	१३,४३१	२८,२७८	१४,८४७	शें. ११०
पैकीं द. २०० रु. हून कमी पगाराच्या ...	७,८३७	१७,७२५	९,८८८	शें. १२६
पैकीं द. १००० रु. हून जास्त पगाराच्या ...	६४८	१,३३७	७२२	शें. १११

यावरून उघड दिसून येतें कीं, दरमहा हजारापेक्षां जास्त पगाराच्या जाग्यांची वाढ एकंदर जाग्यांच्या प्रमाणानेंच झाली आहे. म्हणजे नेटिव लोकांच्या जर

दुप्पट झाल्या तर गोऱ्यांच्याही दुप्पट झालेल्या आहेत. आह्मांस वास्तविक म्हटलें म्हणजे पहावयांची गोष्ट एवढीच कीं हजार किंवा हजारापेक्षां वरच्या पगाराच्या जागांपैकीं नेटिवांस पूर्वी किती मिळत होत्या व आतां जास्त किती मिळावयास लागल्या; याचा हिशोब खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

		सन १८६७	सन १९०३	वाढ	शें. वाढीचें प्रमाण
दरमहा १००० रु. वरील					
	एकंदर जागा ...	६४८	१३७०	७२२	१११
पैकीं	युरोपियन ...	६३२	१२६३	६३१	९९
,,	युरेजियन ...	४	१५	११	२७५
,,	हिंदु ...	१२	७१	५९	४९२
,,	मुसलमान ...	०	२१	२१	०

हेंच कोष्टक कायतें महत्त्वाचें आहे. पण लॉर्ड कर्झन म्हणतात कीं, दरमहा १००० रु. पेक्षां जास्त पगाराच्या जागांवरील युरोपिनांची संख्या अवघी शेंकडा ९९ वाढली म्हणजे सुमारें दुप्पट झाली तर त्या जाग्यांवरील हिंदुलोकांची संख्या शेंकडा ४९२ म्हणजे जवळ जवळ पांचपट वाढली आहे; आणि मुसलमान तर अनंत पटींनें वाढले आहेत! शेंकडा प्रमाण काढण्याची ही पद्धत अंकगणितरीत्या बरोबर असली तरी वस्तुतः अगदीं भ्रामक आहे हें सरासरीच्या हिशेबाचें तत्त्व ज्यास माहीत आहे त्यास सांगावयास नको. एखाद्या मुलास तुझा वर्गांत नंबर कितवा म्हणून विचारलें असतां 'कधीं पहिला असतो व कधीं दुसरा असतो' असा त्यानें जबाब दिल्यावर मग वर्गांत मुलें किती यांचें उत्तर जर त्यानें 'दोन' असें दिलें तर त्याचें पहिलें उत्तर जितकें हास्यास्पद होईल तितकाच लॉर्ड कर्झन यांचा कोटिक्रम हास्यास्पद आहे. हजार रु. वरच्या पगाराच्या गोरे लोकांची संख्या १८६७ सालीं ६३२ होती ती १९०३ सालीं १२६३ झाली आहे. या मानानें पाहिलें म्हणजे १८६७ सालीं हजारावरच्या पगाराचा एक नेटिव असून त्याचे १९०३ सालीं दोन झाले असते तर वाढीचें प्रमाण सारखेंच बसलें असतें, कारण जवळ जवळ

६३२ : १२६३ :: १ : २

म्हणजे त्रैराशिकानें युरोपियनांची आणि नेटिवांची वाढ सारखीच! पण हा त्रैराशिकी हिशेब लॉर्ड कर्झन, त्यांचे फिनान्स मिनिस्टर, आणि स्टेट सेक्रेटरी या तीन राशींखेरीज चवथ्या कोणत्याही राशीस मान्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. अशा तऱ्हेच्या अंकगणिती कोड्या काढून

नेटीवांस फसविण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. हजार रुपयांवरच्या पगाराच्या १८६७ सालीं १२ जागा हिंदु लोकांस मिळत होत्या त्या आतां ७१ मिळूं लागल्या ही गोष्ट खरी आहे. पण हें प्रमाण अगदींच थोडें असून यापेक्षां पुष्कळ जागा नेटीवांस मिळाल्या पाहिजेत अशी जी नेटिवांची तक्रार आहे ती अगदीं योग्य आहे. खरें प्रमाण पाहावयाचें असल्यास त्याची रीत निराळीच आहे. ६३२ पैकीं १२ जागा १८६७ सालीं नेटिवांस मिळत होत्या. आतां त्या ६३२ च्या जर १२६३ जागा झाल्या तर १२ च्या २४ हिशोबानेंच झाल्या पाहिजेत. अर्थात् १९०३ सालीं हिंदु लोकांस १००० रु. पगारावरच्या जर २४ जागा मिळाल्या असत्या तर त्यांत हिंदुस्थानरकारनें काहीं सुधारणा केली असें म्हणतां आलें नसतें. ७१ तून २४ काढून टाकिले म्हणजे बाकी ४७ जागा राहतात. दरमहा हजार रु. वरच्या पगाराच्या जागा नेटिवांस अधिकाधिक देत जाव्या म्हणून आमची एवसारखी आज ५० वर्षें ओरड चालू आहे. या ओरडीचा परिणाम काय झाला ? तर १८६७ पासून १९०३ पर्यंत म्हणजे ३४ वर्षांत अशा प्रकारच्या ४७ जागा, म्हणजे दरसाल सुमारें १ अशा प्रमाणानें हिंदुस्थानसरकारानें हिंदूस दिल्या ! ही वाढ समाधानकारक आहे असें लॉर्ड कर्झन मानीत असतील किंवा म्हणत असतील तर तें त्यांचें व आमचें दुर्दैव होय. दरमहा १००० रु. पेक्षां जास्त पगाराच्या जागा युरोपियन लोकांनीं आपल्याच हातांत ठेवल्या पाहिजेत. किंबहुना इंग्रजी राज्याची स्थिरस्थावरता याच गोष्टीवर अवलंबून आहे असें प्रसिद्ध झालेल्या ठरावाच्या अखेरीस म्हटलेलें आहे. हल्लीं पण हें तत्वच चुकीचें आहे. मोठ्या पगाराच्या जागा नेटिवांस न देतां त्यांना असंतुष्ट ठेवणें बरोबर नाहीं. आणि या जागा त्यांस न दिल्यानें त्यांच्या आंगची कर्तबगारी, करारीपणा वगैरे गुण विकसित न होतां लयास जाण्याचा संभव असून त्यांच्याबरोबर सर्व राष्ट्र मृतप्राय होण्याचा संभव आहे, अशी लोकांची तक्रार आहे. महाराणीसरकारचें वचन, पार्लमेंटच्या कायद्यांचीं कलमें, वेळोवेळीं मोठमोठ्या मुत्सद्यांनीं काढलेले उद्गार किंवा दिलेलीं अभिवचनें आणि न्याय किंवा राजनीति या सर्वांच्या दृष्टीनें पाहिलें तर नेटिव लोकांची तक्रार योग्य, कायदेशीर व न्यायाची आहे. आंकडे पाहिले तरी त्यावरून या तक्रारीचेंच पुष्टीकरण होतें. असें असतां या सर्व गोष्टी एके बाजूस ठेवून व आंकड्यांचा भ्रामक चक्रव्यूह रचून अभिमन्यूप्रमाणें बुद्धिमान् व कर्तबगार नेटिव लोकांचा छल व वध करण्यास लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानसरकारनें तयार व्हावें आणि आपल्या कृतीच्या समर्थनार्थ लांबलचक ठराव प्रसिद्ध करून आपल्या ' अद्वितीय औदार्या ' चीच तारीफ करीत सुटावें हें आमच्या दृष्टीनें हिंदुस्थानसरकारास अत्यंत लाजीरवाणें होय. इंग्रज सरकारचें राज्य

मुंबई इलाख्यांत शंभर वर्षें असतां अद्याप कोणत्याही डिव्हिजनच्या कमिशनरची जागा नेटिवांस मिळाली नाहीं ही गोष्ट लोकांच्या डोळ्यापुढें असतां आंकड्यांची थुंकी या बोटाची त्या बोटावर करून ते फसले जातील असें मानणें मूर्खपणा होय. आणि लॉर्ड कर्झन यांनीं जर हें साहस केलें नसतें तर त्यांचा मुत्सद्दीपणा अधिक दृग्गोचर झाला असता अशी आमची समजूत आहे. यावरील आणखी कांहीं आंकडे द्यावयाचे आहेत ते पुढें एखादे वेळेस देऊं.

आंकड्यांचें गौडबंगाल !

नंबर २

गेल्या खेपेस हिंदुस्थानांतील एकंदर जाग्यांसंबंधानें हिंदुस्थानसरकारच्या ठरावांत जे आंकडे दिले आहेत व शेंकडा जें प्रमाण काढलें आहे तें कसें भ्रामक आहे व त्यावरून खरा प्रकार विपरीत भासण्याचा किती संभव आहे हें वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. शेंकडा अमुक जागा सरकार नेटिवांस देतें या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. घरांत यजमानापेक्षां नोकरच जास्त असतात, पण तेवढ्यावरून म्हणजे घरांतल्या एकंदर माणसांच्या मानानें पाहिलें तर शेंकडा नोकरांचेंच प्रमाण जास्त आहे अशी कोटी करून, हें सर्व घर नोकरांचेंच आहे, यजमान काय दररोजचा पावशेर भात खाऊन राहतो, असें जर कोणी प्रतिपादन करूं लागला तर त्याचा कोटिक्रम जितका हास्यास्पद होईल तितकाच हिंदुस्थानसरकारच्या ठरावांतील कोटिक्रम हास्यास्पद, भ्रामक आणि चुकीचा झालेला आहे. या सर्व वादांत मुख्य मुद्याची गोष्ट म्हटली म्हणजे पगारांचें मान होय. युरोपियन लोकांस मोठमोठ्या पगाराच्या जागा दिल्यानें हिंदु लोकांच्या आंगची कर्तबगारी नाहींशी होते हें तर खरेंच; पण याखेरीज दुसरा आक्षेप असा आहे कीं, त्यामुळें कोट्यावधि रुपये दरसाल या देशांतून परदेशांत जाऊन त्या मानानें हिंदुस्थानदेश उत्तरोत्तर भिकारी होतो. मोठमोठ्या पगाराच्या जागा हिंदुलोकांस दिल्यानें हा पैसा देशांतल्या देशांत राहून देश दरसाल तितक्या प्रमाणानें सधन होत गेला असता. सारांश, मि. दादाभाई नौरोजी यांनीं म्हटल्याप्रमाणें मोठमोठ्या पगाराच्या जागा गोऱ्या लोकांस दिल्यानें हिंदुस्थानांतील लोक दरसाल अधिकाधिक भिकारी होतात इतकेंच नव्हे, तर हिमतीचीं,

---

* [केसरी ता. २१ जून १९०४]

कर्तबगारीचीं किंवा धैर्याचीं सर्व कामें आमच्या हातून काढून घेतल्यामुळें आमचे लोक उत्तरोत्तर नेभळे, भितरे, तोंडघुजे व हांजीहांजी करणारेच बनत चालले आहेत, हें निर्विवाद आहे. ही दुहेरी बूड किंवा ऱ्हास आम्ही किती दिवस सोसणार अथवा तो आमच्या कपाळीं सरकारानें आणखी किती दिवस लादावा, आणि तो पुष्कळ दिवस लादला गेल्यास अखेर परिणाम काय होईल हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. पण त्यांचा सध्या विचार कर्तव्य नाहीं. हिंदुलोकांस किंवा नेटिव लोकांस शक्य तेवढ्या मोठ्या पगाराच्या जागा आम्ही देत आहों असें जें लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें आहे तें बरोबर आहे किंवा नाहीं एवढेंच आपणास पाहणें आहे; आणि हल्लीं हिंदुस्थानसरकारनें जे आंकडे प्रसिद्ध केलें आहेत त्यावरून यासंबंधानें काय अनुमान निघतें याचाच विचार करावयाचा आहे. लॉर्ड कर्झन म्हणतात कीं, पूर्वी म्हणजे १८६७ सालीं ७५ वर पगाराच्या फक्त १३,४३१ जागा होत्या, व त्यांपैकीं, ५,०९० हिंदूंना व ९४८ मुसलमानांस दिलेल्या होत्या. परंतु १९०३ सालीं या जागा २८,२७८ होऊन पैकीं १४,२०२ हिंदूंस आणि २,१७३ मुसलमानांस देण्यांत आल्या; म्हणजे १८६७ सालीं एकंदर जाग्यांपैकीं शेंकडा ३५ युरोपियन लोकांस मिळत होत्या त्या आतां शेंकडा २३ मिळूं लागल्या आहेत; आणि नेटिवांस शेंकडा ४५ मिळूं लागल्या होत्या त्या आतां ५८ मिळूं लागल्या आहेत. म्हणजे एकंदर जाग्यांपैकीं शेंकडा १३ जागा नेटिवांस गेल्या ३७ वर्षांत अधिक मिळूं लागल्या असें हिंदुस्थानसरकारचें म्हणणें आहे. पण अशा तऱ्हेनें ठरविलेलें प्रमाण भ्रामक आहे हें गेल्या खेपेस सिद्ध केलें आहे. खरें प्रमाण म्हणजे पगाराचें पाहिलें पाहिजे; आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे असें आढळून येतें कीं, सरासरीनें दरएक युरोपियनास दरमहा १८६७ सालीं ६२९ रु. मिळत होते ते १९०३ सालीं ६९४ म्हणजे दरमहा ६५ अधिक मिळूं लागले. याच मुदतींत नेटिव लोकांचा (दरमहा ७५ वरचा) सरासरीनें दरमहा पगार १८६८ सालीं १७५ होता तो १९०३ सालीं १८८ म्हणजे दरमहा १२ रु. वाढला. या वाढीचें शेंकडा प्रमाण काढलें तर असें दिसून येतें कीं, युरोपियनांचा पगार सरासरीनें दरमहा गेल्या ३६ वर्षांत शेंकडा १० वाढला आहे; आणि नेटिवांचा शेंकडा ७ वाढला आहे. सारांश, गेल्या ३६ वर्षांत युरोपियनांचा पगार जितका वाढला तितका नेटिवांचा वाढला नाहीं हें उघड आहे. परंतु ह्या आंकड्यांपासून खऱ्या वस्तुस्थितीचा जितका बोध व्हावा तितका होत नाहीं. याकरितां निराळ्या तऱ्हेनें हिशेब करून पाहूं या.

सन १८९० सालीं पार्लमेंट सभेपुढें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं एक तक्ता सादर केला होता. या तक्तयांत ता. ३१ मार्च १८९० रोजीं हिंदुस्थानच्या तिजोरींतून मुलकी, दिवाणी, लष्करी आणि पब्लिक वर्क्स वगैरे सर्व खात्यांत

दरसाल एक हजार (दर महा ८३$\frac{1}{3}$ रु.) रुपयांपेक्षां ज्यांना जास्त पगार किंवा पेन्शन मिळतें अशांचा हिशोब दिलेला आहे; मग हे पगारदार किंवा पेन्शनदार हिंदुस्थानांत राहाणारे असोत किंवा हिंदुस्थानाबाहेर राहणारे असोत. या तक्त्यावरून हिशोब केला असतां खालीं दिलेले आंकडे निघतातः—

दरसाल १००० रु. वरच्या जागा व पगाराची वांटणी, सन १८९०.

	जागा	दरसाल पगार रु.
युरोपियन	...१३,१७८	८,७७,१४,४३१
युरेजियन	... ३,३०९	७२,९६,०२६
नेटिव	...११,५५४	२,५५,५४,३१३
एकूण	...२८,४०१	१२,०५,६४,७७०

यावरून असें दिसून येतें कीं, सन १८९० सालीं सालींना एकंदर पगार-खातीं खर्च १२ कोट रुपये असून त्यांपैकीं फक्त २॥ कोट रुपयेच कायते नेटिवांच्या पदरांत पडत होते. म्हणजे शेंकडा प्रमाण काढलें तर १०० रु. पैकीं ७९ रुपये गोऱ्यांस आणि २१ रुपये नेटिवांस मिळत होते. अर्थात् दरसाल सुमारें **९॥ कोट रुपये** पगार किंवा पेन्शन या रूपानें गोऱ्या लोकांस हिंदुस्थानच्या तिजोरींतून मिळत होते. ही स्थिति सन १९०३ सालीं कायम राहिली किंवा नेटिवांस अधिक पैसे दरसाल मिळूं लागले हा मुद्याचा प्रश्न आहे; आणि याचाच खुलासा प्रथम हिंदुस्थानसरकारनें करावयास पाहिजे होता. जागा पांच कमी दिल्या काय आणि पांच जास्त दिल्या काय, मुख्य गांठ तत्वमसीशीं आहे. पैसे अधिक कोण खातो हाच काय तो मुद्दा आहे. परंतु चमत्कार हा कीं, पगाराचे आंकडे १८९० सालच्या तक्त्यांत जितक्या खुलाशानें दिले आहेत तितके हल्लींच्या ठरावांत दिलेले नाहींत ! हल्लींच्या ठरावांतील आंकड्यांवरून हिशेब केला तर खालीं लिहिलेले आंकडे निष्पन्न होतात.

दरमहा ७५ (दरसाल ९०० रु.) वरच्या जागा व पगाराची वांटणी सन १९०३.

	जागा	दरसाल पगार.
युरोपियन	... ६,४६८	५,३८,८९,८०४
युरेजियन	... ५,४३५	१,२६,६७,५००
नेटिव	...१६,३७५	३,६८,६०,५५६
एकूण	...२८,२७८	१०,३४,१७,८६०

हे आंकडे आणि १८९० सालचे वर दिलेले आंकडे यांची बरोबर तुलना करणें अशक्य आहे. पहिलें कारण असें कीं, १८९० सालच्या तक्त्यांत जे आंकडे दिले आहेत त्यांत लष्करी खात्यांतील जागा आणि सर्व खात्यांतील पेन्शनदार यांचा समावेश केलेला आहे; आणि १९०३ सालचे हल्लींच्या ठरावांत जे आंकडे दिलेले आहेत त्यांत लष्करी खात्यांतील जागा व पेन्शनें वगळली आहेत. लष्करी खात्यांत २०० रु. पगारावरच्या बहुतेक सर्व जागा गोऱ्या लोकांसच देतात हें सर्वप्रसिद्ध आहे. तसेंच दरमहा एक हजार रु. वर किंवा सालीना १० हजार रु. पेक्षां जास्त पेन्शन घेणारे गोरेच लोक असतात व ते प्रायः विलायतेंत राहतात हेंही सुप्रसिद्ध आहे. १९०३ च्या तक्त्यांत या जागा व पेन्शनें यांचा समावेश केला नसल्यामुळें एकंदर जागांची संख्या २८२७८ इतकीच दाखविण्यांत आली आहे. सन १८९० च्या तक्त्याप्रमाणें यांत लष्करी खात्यांतील जागा व पेन्शनें यांचा समावेश केला असता तर या जाग्यांची संख्या आणखी दोन तीन हजारांनीं सहज वाढली असती. आणि त्या मानानें युरोपियन लोकांचे पगारही जास्त दाखवावे लागले असते. परंतु हिंदुस्थानसरकारनें हल्लींच्या ठरावांत या जागा जमेंत धरल्या नसल्यामुळें १८९० सालीं दरसाल १२ कोटींचा जो खर्च होता तो १९०३ सालच्या आंकड्यांत फक्त १० कोट रु. दाखविण्यांत आला आहे. वस्तुतः पाहतां तो १२ कोटींवर असला पाहिजे; आणि तो सर्व बहुतेक युरोपियन लोकांसच मिळणारा आहे. सारांश, १९०३ सालचे हल्लीं जे आंकडे दिलें आहेत ते भ्रामक आहेत. १८९० सालीं दरसाल १२ कोटी पगारखातीं खर्च पडणाऱ्या रकमेपैकीं २॥ कोट रुपयेच कायते नेटिवांस मिळत असत; १९०३ सालीं दरसाल १० कोटींपैकीं सुमारें ३॥ कोट रु. नेटिवास मिळतात, असा हिशेब दाखविला आहे. म्हणजे १८९० सालीं पगारापैकीं शेंकडा २१ रु. नेटिवास मिळत होते तर आतां शेंकडा ३५॥ रु. नेटिवांस मिळूं लागले, असें दाखविण्याचा हा प्रयत्न आहे! पण ही चूक आहे, कारण लष्करी खात्यांतल्या व हजार रु. पेन्शेनच्या जागा यांत दाखल केलेल्या नाहींत. त्या केल्या तर हें प्रमाण बदलेल हें सांगावयास नकोच. लष्करी खात्याचे आंकडे हल्लींच्या ठरावांत कां दाखल केले नाहींत याचें या ठरावांत कोठें कारण दिलेलें नाहीं. कदाचित या जागा केव्हांच नेटिवांस मिळावयाच्या नाहींत अशा हेतूनें त्या हल्लींच्या हिशेबांतून काढल्या असल्यास नकळे! पण मग कलेक्टर कमिशनरांच्या जागा तरी कां धराव्या ? हिंदुस्थानसरकारनें आपलें असें स्पष्ट मत दिलें आहे कीं, हिंदुस्थानदेशांत इंग्रजी राज्य इंग्रजी तव्हेनें चालावयाचें असल्यामुळें या मोठ्या पगाराच्या जागा गोऱ्या अंमलदारांसच दिल्या पाहिजेत; कारण कलेक्टर व कमिशनर नेटिव झाले म्हणजे मग इंग्रजी राज्याची निशाणीच नाहींशी होईल आणि इंग्रजी राज्य हिंदु-

स्थानांत आहे असें देखील कोणास समजणार नाहीं ! आमच्या मतें हा कोटिक्रम अगदीं मूर्खपणाचा आहे. नेटिव लोकांस मोठीं कामें करण्यास शिकावयाचें असल्यास तें इंग्रजसरकारनेंच शिकविलें पाहिजे; आणि तशा रीतीनें नेटिव लोक तयार होऊन जेव्हां वरिष्ट प्रतीच्या जाग्यांवर कामें करूं लागतील तेव्हांच हिंदुस्थान देश इंग्लंडच्या राज्यसत्तेखालीं गेल्याचें खरें फल आम्हांस मिळेल. असो; वर सांगितलेंच आहे कीं, सन १८९० सालच्या आंकड्यांची आणि १९०३ सालच्या आंकड्यांची नीट तुलना करतां येत नाहीं. कारण लष्करी जागा व पेन्शनें १९०३ सालच्या आंकड्यांत सोडलीं आहेत. १८९० सालचें आंकडे १९०३ सालच्या आंकड्यांप्रमाणें हल्लींच्या हिंदुस्थानसरकारच्या ठरावांत दिलेले नाहींत, पण १८९० पूर्वी तीन वर्षांचे म्हणजे १८९७ चे आंकडे हल्लींच्या ठरावांत दिलेले आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं, लष्करी जागा आणि पेन्शनें सोडून देऊन दरमहा ७५ रु. पेक्षां जास्त पगाराच्या एकंदर जागा सन १८८७ सालीं २१,४६६ होत्या व त्या १८९७ सालीं २५,३७० झाल्या आणि १९०३ सालीं २८,२७८ झाल्या, म्हणजे पहिल्या दहा वर्षांत अदमासें ४ हजार जागा वाढल्या. हें प्रमाण घेऊन चाललें तर १८९० सालीं फार झालें तर २३ हजार जागा दरमहा ७५ रु. पेक्षां अधिक पगाराच्या असाव्या. १८९० च्या तक्त्यांत त्यांची संख्या २८,०४१ दाखविली आहे. अर्थात् या संख्येपैकीं ५ हजार जागा लष्करी खात्यांतल्या आणि सर्व खात्यांतील पेन्शनदारांच्या असाव्या असें उघड होतें. या मानानें पाहिलें म्हणजे १९०३ सालीं याच जाग्यांची संख्या सुमारें ७ हजारांवर झालेली असेल, आणि ती जर हल्लींच्या आंकड्यांत मिळाविली तर १० कोटीस ३॥ कोटी असें जें १९०३ सालच्या दरसाल पगाराच्या वांटणीचें प्रमाण वर दिसत आहे तें नाहींसें होऊन १८९० सालाप्रमाणें एकंदर १२ कोटीपैकीं फक्त २॥ कोटच नेटिवांस मिळतात, असें दिसून येईल. पण मौज ही कीं, हिंदुस्थानसरकार हें प्रमाण काढण्याच्या भानगडींत मुळींच पडलें नाहीं. एकंदर आंकडचानें ठरावाचीं ५०।६० पानें भरलेलीं आहेत, पण १८९० सालीं ज्याप्रमाणें एकंदर म्हणजे लष्करीखात्यांतील आणि सर्व खात्यांतील पेन्शनें याचा हिशेब पार्लमेंटापुढें ठेवला आहे, तसा हिशेब हल्लींच्या ठरावांत दिलेला नाहीं. अशा प्रकारचा हिशेब हिंदुस्थान सरकारच्या म्हणण्यास प्रतिकूल होईल अशी आमची वरील कारणाकरितां समजूत झालेली आहे. ती खरी आहे किंवा खोटी आहे हें १८९० सालच्या तक्तयांत जसे आंकडे आहेत तसे १९०३ सालचे आंकडे दिले असतां सहज कळून येणार आहे; व कोणी तरी पार्लमेंटच्या सभासदानें किंवा हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलांतील मेंबरानें हे आंकडे प्रसिद्ध करण्याबद्दल सरकारास प्रश्न विचारावा, अशी

आमची सूचना आहे. आजचा हिशेब पाहिला तर असा आहे कीं, दरसाल हजार रु. पेक्षां ज्यांना जास्त पगार किंवा पेन्शन मिळतें अशा नोकरांच्या पगाराप्रीत्यर्थ १२ कोटींहून जास्त रु. दरसाल खर्च होतात, व त्यांपैकीं अवघे २-२॥ कोटी रुपयेच काय ते नेटिवांच्या पदरांत पडतात. अशा स्थितींत दुसरीं सर्व कारणें अनुकूल असलीं तरी कोणताहीं देश लवकरच भिकारी होईल हें सांगावयास नकोच.

* * *

*राजकीय चळवळीची नवी दिशा

गेल्या सालची काँग्रेस भरण्यापूर्वी मेसर्स ह्यूम, दादाभाई, वेडरबर्न व बानर्जी या चौघां काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं सर्व काँग्रेसभक्तांस लिहिलेलें पत्र त्या वेळीं प्रसिद्ध झालें होतें. या पत्रांत काँग्रेसच्या चळवळीच्या दिशेंत कांहीं तरी अवश्य सुधारणा झाली पाहिजे, दर वर्षास एकदां काँग्रेस भरून पांच पंचवीस विषयांवर भाषणें करून ठराव करण्यांत कांहीं हांशिल नाहीं व यापासून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं, असें वर सांगितलेल्या चार गृहस्थांनीं आपलें मत दिलें होतें; व या पत्राचा सारांश देतांना ऋग्वेदांतील मण्डूकसूक्तांतली ' संवत्सरं शशयाना ब्राह्मणा व्रतचारिणः। वाचं पर्जन्यजिन्वतां प्र मंण्डूका अवादिषुः॥ ही व यापुढल्या एक दोन ऋचा अवतरणासाठीं आम्हीं घेतल्या होत्या. वर्षातून बेडकाप्रमाणें एक वेळ जागें होऊन जोरदार भाषणें केल्यानें राष्ट्राची स्थिति सुधारेल किंवा जास्त राजकीय हक्क आपणांस प्राप्त होतील अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे असें ह्यूमसाहेबांनीं सदर पत्रांत म्हटलें आहे. अधिकाधिक राजकीय हक्क मिळविणें हें काम कांहीं फुकाचें नाहीं. ' नर करणी करे तो नरका नारायण होय ' हें खरें आहे; पण केव्हां ? आपल्या हातून दृढ निश्चयानें, उमेदीनें आणि विश्रांती न घेतां एकसारखी कांहीं तरी करणी होईल तेव्हां ' तुमचा भाग्योदय करून घेणें तुमच्या हातांत आहे ' असें जें ह्यूमसाहेबांनीं म्हटलें आहे त्याचा अर्थ हाच होय. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, गेल्या सालीं मद्रासेस या प्रश्नाचा कांहींच विचार झाला नाहीं; आणि यंदाच्या सालीं मुंबईस भरणाऱ्या सभेंत कांहीं होईल कीं नाहीं याचाहि अद्याप वानवा आहे. काँग्रेसकरितां यंदाच्या सालीं ' रुपया फंडाच्या ' रूपानें कायमचा फंड

---

* [केसरी ता. ५ जुलई १९०४]

गोळा करावा म्हणून सर्क्युलरें निघालीं आहेत व रीतीप्रमाणें यंदाच्या सालचा खर्च वर्गणीनें गोळा होऊन यंदाची काँग्रेसहि पार पडेल. पण काँग्रेसची दिशा किंवा चळवळ वार्षिक ओरडण्यापलीकडे न्यावयाची कीं नाहीं हा जो महत्वाचा प्रश्न त्याबद्दल अद्याप कोणी अवाक्षरहि काढीत नाहीं ! आमचें तर असें साफ मत आहे कीं, या प्रश्नाचा यंदां जर कांहीं निकाल व्हावयाचा नसेल तर कायमच्या फंडाची खटपट करणें व्यर्थ होय. यंदाच्या सालीं काँग्रेस भरविण्याचें काम मुंबईकरांनीं घेतलें आहे तेवढें भागवून टाकावें म्हणजे झालें. कायमच्या फंडाची भानगड काढली म्हणजे अर्थात्च काँग्रेस वार्षिक उत्सवापेक्षां जास्त काय करणार, हा प्रश्न उपस्थित होतो; आणि त्याचें उत्तर निदान हिंदुस्थानांतील काँग्रेसचे पुढारी देण्यास तयार आहेत असें दिसत नाहीं; इतकेंच नव्हे तर असले प्रश्न उपस्थित करून आपल्या आंगावर जास्त जबाबदारीचा बोजा घेण्यास यांपैकीं कोणी तयार आहे असेंहि दिसत नाहीं. ही स्थिति शोचनीय होय असें गेल्या सालींच आम्हीं म्हटलें होतें व ती स्थिति जितक्या वर्षें अधिक कायम राहील त्या प्रमाणानें ती अधिकाधिक शोचनीय होत जाईल याबद्दल कांहीं शंका नाहीं. अशा स्थितींत आमच्या राजकीय चळवळीच्या दिशेबद्दल आमचे हितेच्छु दुसरे कांहीं गृहस्थ काय म्हणतात इकडे लक्ष देणें जरूर आहे. गुदस्त सालीं ह्यूमसाहेबांचें पत्र आलें होतें तसें यंदा कोणाचें पत्र आलें नाहीं; पण मि. डिग्बी यांनीं नुकतेंच विलायतेंतील ' लंडन इंडियन सोसायटी ' मध्यें जें भाषण केलें व ज्यावेळीं मि. दादाभाई नौरोजी हे तेथें अध्यक्ष असून त्यांस ही जें भाषण पसंत झालें तें याच मासल्याचें आहे. मि. दादाभाई नौरोजीसारख्या हिंदुस्थानची खरी कळकळ बाळगणाऱ्या व आपल्या आयुष्याचीं कित्येक वर्षें हिंदुस्थानासंबंधाच्या विलायतेंतील चळवळींत घातलेल्या राष्ट्रभक्तास मि. डिग्बी यांनीं काढलेली कल्पना जर मान्य झाली आहे तर तिच्या उपयुक्ततेबद्दल अगर अवश्यकतेबद्दल निराळ्या सर्टिफिकिटाची कांहीं जरूर नाहीं. मि.डिग्बी यांनीं यासंबंधानें जी सूचना केली आहे तिचा पाया त्यांनीं अलीकडे आशिया आणि युरोप या दोन खंडांच्या राजकीय संबंधांत जें :स्थित्यंतर होत आहे त्यावर रचलेला आहे. ते म्हणतात कीं, आशिया खंड म्हणजे युरोप खंडांतील लोकांनीं अंमल चालवून पादाक्रांत करण्याकरितां ईश्वरानें निर्मिलेला प्रदेश होय अशी जी आजपर्यंत समजूत होती ती जपानास मिळत असलेल्या जयामुळें आतां पहिल्यानेंच ढांसळण्यास सुरुवात झाली आहे; आणि ही समजूत एकदां ढांसळूं लागली म्हणजे तिचा जपानासच नव्हे, तर हिंदुस्थानासहि फायदा मिळाल्यावांचून राहणार नाहीं. आशियाखंडांतील कोणताहि देश घ्या, तो सदैव गोऱ्या लोकांच्या सत्तेखालीं ठेवतां येईल किंबहुना जुलमानें ठेवतां येईल ही समजूत आतां राहणें अशक्य आहे. नवें व स्वतंत्र आशियाखंड

किंवा आशियाखंडाचा नवा अवतार होण्यास आतां सुरुवात झाली आहे असें म्हटलें तरी चालेल. आणि या नव्या अवतारांत किंवा युगांत हिंदुस्थानांतील लोकांनीं किंवा त्यांच्या पुढाऱ्यांनीं जर एकदिलानें, नेटानें आणि एकनिष्ठपणानें जपानी शिपायांप्रमाणेंच बाणा दाखवून आपली कार्यसिद्धी होण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकेनें फिलिपाइन बेटांस जें स्वातंत्र्य देण्याचें योजिलें आहे तितकें स्वातंत्र्य तरी दहा वर्षांच्या आंत हिंदुस्थानास खास मिळेल असें मि. डिग्बी यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात कीं, हिंदुस्थानांत जंगलखातें लोकांस अतिशय त्रासदायक आहे, हिंदुस्थानांतील पैसा लष्करी मोहिमेवर अधिक खर्च होत आहे, लॉर्ड कर्झन यांनीं शिक्षणाची मर्यादा आकुंचित केल्यामुळें लोकांचें नुकसान होण्याचा संभव आहे, इत्यादि गाऱ्हाणीं मग तीं लहान असोत कीं मोठीं असोत व्यक्तिशः विलायतेच्या लोकांपुढें मांडून त्यांची दाद मागितल्यानें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. विलायतेंतील लोक आपापल्या गाऱ्हाण्यांचीच दाद लावून घेण्यांत इतके व्यग्र झालेले असतात कीं, त्यांस हिंदुस्थानच्या लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकण्यापुरती इच्छा असली तरी वेळ नाहीं. हिंदुस्थानांतील राज्यकारभार चालविण्यास लॉर्ड कर्झनसारखे हुषार गृहस्थ नेमलेले असतां कोठें जंगलाची तर कोठें तिजोरीची, कोठें नोकऱ्यांबद्दलची तर कोठें लष्करी खर्चासंबंधाची तक्रार ऐकून घेऊन आणि त्याजवर दोन्ही पक्षाचें म्हणणें काय आहे तें पाहून त्याबद्दलचा अखेर निकाल द्यावयाचा आणि त्या निकालाची अम्मलबजावणी करावयाची इतकी तसदी हिंदुस्थानाकरितां घेण्यास विलायतेंतील लोक कधीं तयार होतील किंवा नाहीं याबद्दल वानवा आहे; किंबहुना अशा प्रकारची कटकट त्यांच्या कानींकपाळीं गेल्यास कांहीं दिवसांनीं ते दुर्लक्ष हि करूं लागतील. याकरितां मि० डिग्बी यांनीं अशी सूचना केली आहे कीं, काँग्रेसच्या ज्या पांच पंचवीस मागण्या आहेत त्या व्यक्तिशः विलायतेंतील लोकांपुढें न मांडतां हिंदुस्थानांतील राज्यकारभारासंबंधानें 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें एकच कांहीं तरी मोठा प्रश्न विलायतेंतील लोकांपुढें मांडून 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' अशा ईर्षेनें त्यांचा आपल्या तर्फेचा एकदां निकाल लावून घ्या म्हणजे झालें. अशा तऱ्हेचा व्यापक प्रश्न म्हटला म्हणजे स्थानिक स्वराज्याचा होय. हिंदुस्थानांतील राज्यकारभारांत अर्थात् गव्हर्नर जनरल, गव्हर्नर आणि ले० गव्हर्नर यांच्या कौन्सिलांत नेटिवांचा प्रवेश होऊन त्यांच्या धोरणानें आणि हिंदुस्थानच्या हिताकरितां जेव्हां हिंदुस्थानच्या पैशाचा व्यय होईल तेव्हांच हिंदुस्थानचा भाग्योदय होणार आहे; आणि हा एकच प्रश्न विलायतेंतील लोकांपुढें मांडून जपानी लोकांनीं हल्लीं चालत असलेल्या लढाईंत जें निश्चयाचें बळ दाखविलें त्याच निश्चयानें इंग्रजी राष्ट्राकडून या प्रश्नाचा हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनी आप-

पांस अनुकूल असा निकाल करून घेतला पाहिजे. हिंदुस्थानची राजसत्ता जोंपर्यंत सिव्हिलसर्व्हिसच्या हातांत आहे तोंपर्यंत निरनिराळ्या बाबतींतील निरनिराळ्या तक्रारी किंवा गाऱ्हाणीं विलायतेंतील लोकांपुढें मांडून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. लॉर्ड कर्झनसारखे मुत्सद्दी सेनानायक असून त्यांच्या हाताखालील सिव्हिलसर्व्हिसच्या गोऱ्या पलटणी जोंपर्यंत आमच्यावर चोपून राज्य करीत आहेत तोंपर्यंत आमचें कल्याण व्हावयाचें नाहीं, आम्हांस प्रतिनिधीसत्ताक राज्याचा थोडाबहुत तरी अंश मिळालाच पाहिजे, असा व्यापक प्रश्न आणि तेवढाच एक प्रश्न—विलायतेंतील लोकांच्या पुढें मांडून त्यावर त्यांजकडून आमच्यातर्फेचा निकाल घेतला पाहिजे. हल्लींच्या राज्यव्यवस्थेमुळें हिंदुस्थानांतील लोकांचें सामर्थ्य, वैभव आणि शहाणपण हीं सर्व खुर्ट्या झाडाप्रमाणें लंगडी होत जाऊन पुढें मागें त्या सर्वांचा लय होण्याचा संभव आहे, ही गोष्ट स्पष्टपणें विलायतेच्या लोकांपुढें मांडली पाहिजे आणि जी कांहीं चळवळ किंवा उद्योग करावयाचा तो सर्व एवढ्याच मुद्यासंबंधानें करून व आज नाहीं उद्यां पण एकसारखा त्यांचा पिच्छा पूरवून तो हक्क इंग्रज लोकांकडून आपण संपादन केला पाहिजे. अशा प्रकारचा उद्योग हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांनीं केल्यास दहा वर्षांचे आंत त्यांच्या उद्योगास यश मिळून फिलिपाईन बेटांतील लोकांप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांसही स्वातंत्र्य मिळेल, अशी डिग्बीसाहेब खात्री देत आहेत. फिलिपाईन बेटांतील लोकांसही अगदीं पादाक्रांत केलेल्या लोकांप्रमाणेंच अमेरिकेनें पहिल्यानें वागविलें होतें पण नुकतेच त्या बेटांतील लोकांचे प्रतिनिधि तेथील कौन्सिलांत घेतले आहेत; आणि सदर बेटांतील बरेचसे विद्यार्थी अमेरिकेंत पाठवून त्यांस नवीन शास्त्रांचें व उद्योगधंद्यांचें ज्ञान प्राप्त करून देण्याची तजवीज अमेरिकेनें करून दिली आहे. लॉर्ड कर्झन यांनीं गेल्या बजेटच्या वेळीं जें भाषण केलें त्यांत इंग्रज लोक, त्यांनीं जिंकलेल्या हिंदुस्थानच्या प्रजेशीं जितक्या औदार्यानें वागतात तितक्या औदार्यानें पोर्तुगीज, डच किंवा जर्मन लोक आपल्या प्रजेशीं वागत नाहींत, अशी घमेंड मारली होती. या गर्वोक्तीचा उल्लेख करून मि. डिग्बी यांनीं असें म्हटलें आहे कीं, पोर्तुगीज किंवा जर्मन लोकांशीं तुलना करण्यापेक्षां इंग्रज लोकांच्या हाडामांसाचेच जे अमेरिकन लोक ते आपल्या फिलिपाईन बेटांतील प्रजेस कसे वागवितात इकडे लॉर्ड कर्झन यांनीं प्रथमतः लक्ष द्यावयाचें होतें. बरें, अमेरिकेचें उदाहरण सोडून दिलें तरी पांदेचरीसारख्या लहानशा फ्रेंच संस्थानांतूनही एखादा दुसरा तेथील लोकांचा प्रतिनिधि पारिसच्या पार्लमेंटमध्यें जातो, याचा तरी लॉर्ड कर्झन यांनीं उल्लेख करावयास पाहिजे होता. कांहीं कारणामुळें एखाद्या राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य स्थापन झालें म्हणजे राज्यकर्त्यांनीं

जिंकलेल्या लोकांस नेहमींच लंगडें ठेवावें किंवा ते कायमचे लंगडे कसे राहतील अशा प्रकारच्या उद्योगास लागावें, हें राजनीतीस किंवा मनुष्यस्वभावास मोठेंच लांछन होय. हिंदुस्थानांत आज जी राज्यपद्धति चालू आहे ती अशाच प्रकारची आहे. आमची शिक्षणपद्धति घ्या किंवा राज्य व्यवस्थेचीं इतर खातीं पहा, येथून तेथून सर्वत्र एकच न्याय दृष्टीस पडतो; तो हा कीं, कोणत्याही खात्यांत हिंदुस्थानांतील प्रजेस डोकें म्हणून वर काढूं द्यावयाचें नाहीं. परवां लॉर्ड कर्झन यांनीं नोकऱ्यांसंबंधानें जो ठराव प्रसिद्ध केला त्यांतही वरीष्ठ प्रतीच्या सर्व नोकऱ्या गोऱ्या कामगारांच्याच हातीं ठेवणें जरूर आहे, असें ठांसून सांगितलें आहे. मि. डिग्बी यांच्या मताप्रमाणें लॉर्ड कर्झन यांच्या राजनीतीचें हें धोरण तर अगदींच जुलमाचें व अन्यायाचें आहे. आम्ही हिंदुस्थानांतील प्रजेच्या डोक्यावर पाय देऊन सदैव नाचणार असाच या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ आहे, आणि ज्या लोकांच्या आंगांतील शौर्य व हुषारी लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टन यांनीं नुकतीच कबूल केली, अशा लोकांबद्दल अशा प्रकारचे उद्गार काढणें म्हणजे मुत्सद्याच्या कोत्या दृष्टीची कमाल होय, असें डिग्बीसाहेबांनीं म्हटलें आहे. हिंदुस्थानांतील लोक बुद्धिवैभवानें किंवा शौर्यानें जपानी लोकांपेक्षां कांहीं कमी आहेत असें नाहीं; किंबहुना त्यांच्याहून कांकणभर जास्त शूर असें रजपूत, शीख, गुरखे, पठाण किंवा मराठे या जातींतील लोक असून यांच्याचपैकीं कांहीं जातींच्या पलटणींच्या लोकांकडून तिबेटांतील विजय इंग्रज सरकार आज संपादन करीत आहे. ' रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज ' चे एडिटर मि. स्टेड यांनीं आपल्या मासिकपुस्तकाच्या गेल्या अंकांत ' विजयी आशियाखंड ' या विषयावर जो लेख लिहिला आहे त्यांतही मि. डिग्बी यांच्याप्रमाणेंच जपानच्या विजयाबद्दल आपलें मत दिलें असून अशा प्रकारें जें नवीन स्थित्यंतर झालें आहे त्यांत धनगरी न्यायानें एक युरोपियन हिंदुस्थानांतील सहा हजार प्रजेस यापुढें आपल्या ताब्यांत कसें ठेवील, असा प्रश्न केला आहे. आतां एवढी गोष्ट खरी आहे. कीं जपानी युद्धामुळें आशियाखंडाच्या भावी अवस्थेसंबंधानें निघालेले प्रश्न सध्यां केवळ काल्पनिक आहेत; आणि चीनसारखा निद्रावस्थेंत पडलेला देश जपानच्या उदाहरणानें सुधारेलच सुधारेल, अशी कांहीं निश्चयानें खात्री देतां येत नाहीं. तथापि एवढी गोष्ट खरी आहे कीं, विलायतेंतील हल्लींचें राजकीय वातावरण बदललें आहे; आणि या वेळीं जर आमचे मेथा, बानर्जी किंवा चालूं आपलें सर्व बल, उत्साह व वक्तृत्व मि. डिग्बी यांनीं निर्दिष्ट केलेल्या एकाच प्रश्नाच्या निकालाकडे एकनिष्ठपणानें खर्च करतील तर दहा नाहीं तर पंधरा वर्षांत तरी हिंदुस्थानचें काँग्रेसच्या १९ वर्षांच्या वार्षिक ओरडीनें जें हित झालें नाहीं तें होऊन आम्हांस फिलिपाईन बेटाप्रमाणें तरी स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावयास सांपडेल. आशिया खंडांतील

लोक परकीयांचे दासच बनून नेहमीं रहावयाचे, ही गोऱ्या लोकांची जुनी समजूत पालटण्यास आतां सबळ कारण झालें आहे. अशा वेळीं आम्ही जर कांहीं नेटानें खटपट केली नाहीं तर त्याचा दोष सर्वस्वी आपणांकडेच येईल, हें आम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. दैव उघडावयाचें असलें तरी तें पुरुषार्थ किंवा पुरुषकारावांचून उघडत नाहीं, हा सिद्धांत प्राचीन कालापासून चालत आला आहे, व आमचें नशिब उघडावयाचें असल्यास त्याच सिद्धांताचें आम्हांस अवलंबन केलें पाहिजे; बेडकाप्रमाणें वर्षांतून एकदां ओरडल्यानें कांहीं कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं.

❖ ❖ ❖

*मराठी आणि इंग्रजी " काळ "

शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी ।
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः ॥
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो ।
नृपांगणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे ॥

भृर्तहरी.

भर्तृहरी म्हणतोः—"दिवसा निस्तेज झालेला चंद्र, यौवन गेलेली स्त्री, कमळें नाहींशीं झालेलें सरोवर, सुंदर पुरुषाचें अक्षरशून्य मुख, धनाला आसक्त झालेला प्रभु, नेहमीं विपत्तींत पडलेला सज्जन, आणि राजाचे अंगणांत असणारा खल, हीं सात माझ्या मनांत कांट्याप्रमाणें सलतात ! " ह्या सात शल्यांपैकीं पहिलीं सहा सयुक्तिक आहेत; परंतु सर्वांच्या शेवटीं राजाच्या अंगणांत दृष्टीस पडणाऱ्या खलाचा जो निर्देश केला आहे, त्यांतील रहस्य काय, हें एकाएकी लक्षांत येण्यासारखें नाहीं. तथापि 'नृपांगणगतः खलः' या एका वाक्यांत कवीनें जो जगाचा अनुभव व्यक्त केला आहे तितका खोल व महत्त्वाचा अनुभव इतक्या थोड्या शब्दांत इतर ठिकाणीं क्वचितच सांठवलेला सांपडेल, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जन्मतःच जे अकारणाविष्कृतवैरदारुण ' आहेत, त्या खलांस पाहून कोणाचेंही मन संतप्त झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण हेच खल जेव्हां राजाच्या अंगणांत किंवा हल्लींच्या परिभाषेंत बोलावयाचें

---

* [केसरी ता. २७ सप्टेंबर १९०४]

लो० बाळ गंगाधर टिळक (१९०५.)



असल्यास गव्हर्नरसाहेबांच्या गार्डनपार्टीत किंवा दरबारांत दृष्टीस पडतात,तेव्हां मात्र सज्जनांच्या पायाची आग मस्तकास गेल्याखेरीज राहत नाहीं. केवळ खलाचें खलत्व जितकें अपायकारक असतें त्यापेक्षां राजाच्या कानाशीं ह्या खलांचीं तोंडें भिडलीं म्हणजे मग आडामच्या बागेंत सैतान शिरण्यानें जी स्थिति प्राप्त झाली, तशी राज्यांत अवस्था होईल कीं काय, अशी लोकांस भीति पडूं लागते. भर्तृहरी म्हणतो कीं, "दौर्मन्यान्नृपतिर्विनश्यति यतिः संगात्सुतो लालनात्"; आणि नृपाच्या अंगणांत जेव्हां खल दृष्टीस पडतो, तेव्हां अधिकाराचा, सन्मानाचा आणि सौजन्याचा झरा जो राजा तोच खलांनीं दूषित केला, असें मनांत येऊन सज्जनांस स्वभावतःच अत्यंत विषाद वाटतो. " नृपांगणगतः खलः " या लहानशा वाक्यांत जें रहस्य आहे तें हेंच होय. आणि स्वानुभवावरून किंवा पुराण इतिहासावरून खलसंसर्गानें राजे कसे अधःपतन पावतात, हें ज्यांस पूर्णपणें अवगत झालें आहे, त्यांखेरीज इतरांच्या मुखांतून वरच्यासारखे खलांबद्दल उद्गार निघणें अगदीं अशक्य होय. राजाच्या दरबारीं किंवा आंगणांतून खल दृष्टीस पडला म्हणजे हें भावी संकटाचें पूर्वचिन्ह आहे, असें खात्रीनें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या दुर्दैवानें मुंबई सरकारास अशाच प्रकारच्या कांहीं खलांनीं सध्यां गांठलें आहे किंवा गांठण्याचा विचार आहे. या खलांपैकीं अध्वर्यु मुंबईचे टाइम्स पत्रकर्ते होत. ' टाइम्स ' या शब्दाचा इंग्रजींत ' काळ ' असाच अर्थ आहे. पण या इंग्रजी ' काळां'त आणि मराठी 'काळां'त विलायती सोदा व नेटिव सोदा यांच्यापेक्षां शतपट अधिक अंतर आहे. टाइम्स पत्रकर्त्यांची हांव काय आहे, त्याच्या युक्तया कोणत्या, कोणत्या पक्षाचें समर्थन करण्यासाठीं त्यानें आपला अवतार धारण केला आहे, तो लिहितो कसें, बोलतो काय अथवा त्याची कृति कशा प्रकारची आहे याबद्दल आम्हांस अनेक वेळां लिहिण्याचा प्रसंग आलेला आहे. परंतु हल्लीं या पत्रकर्त्यानें जी एक अजब परंतु शिळी युक्ति लढविण्याचा प्रयत्न चालविला आहे, ती पाहून राजांगणांतील हे कांटे आमचें अपरिहार्य नुकसान करीत आहेत, व न्यायाच्या केरसुणीनें यांस आंगणांतून झाडून काढून आंगण होईल तितकें साफ केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, अशी सरकारास नम्रपणें विनंति करणें आम्हांस भाग पडत आहे. टाइम्स पत्रकर्त्यांच्या ज्या दुष्कृत्याबद्दल आज आम्हांस विवेचन करावयाचें आहे, तें दुष्कृत्य म्हटलें म्हणजे गेल्याचे मागील सोमवारीं मराठी ' काळ ' पत्रांतील कांहीं आर्टिकलांच्या भाषांतराचे त्यानें प्रसिद्ध केलेले उतारे आणि तत्संबंधीं आपल्या आर्टिकलांत सरकारास केलेली इशारत हें होय. टाइम्सच्या लेखानें आज पुष्कळ लोकांचीं, विशेषतः मराठी लेख ज्यांस वाचण्याची सवड नाहीं किंवा वाचतां येत नाहींत, अशा लोकांचीं अंतःकरणें बरींच दूषित झालीं आहेत, व आमच्यापैकींही कित्येक सात्विक ब्राम्हण " काय हा

काळाचा अनर्थ ! " असें म्हणावयास लागले आहेत. पण मराठी ' काळ ' पत्रांतील लेख आणि टाइम्सचे लेख नीट वाचून या प्रकारणाचा अद्याप शांतपणानें व स्वतंत्रपणानें कोणी विचार केला आहे, असें आम्हांला दिसत नाहीं. टाइम्स तर बोलूनचालून अँग्लो-इंडियन लोकांचें कुलगें कुत्रें आहे; व त्याला मराठी काळांतल्या लेखांची जिकडून भाषांतरें मिळालीं आहेत तेही प्रायः ' नृपांगणगतः खलः ' याच वर्गांतील असल्यामुळें या दोन खलांनीं जी बोंब ठोकली आहे, ती भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें आमच्यापैकीं पोटाच्या पाठीस लागलेल्या व बायकांपोरांच्या आशेस गुंतलेल्या कांहीं तोंडपुज्या लोकांनीं उचलली आहे किंवा ते उचलण्याचें बेतांत आहेत. भर्तृहरी म्हणतोः—

खलोल्लापाः सोढाः कथमपितदाराधनपरैः ।
निगृह्यांतर्बाष्पं हसितमपि शून्येन मनसा ॥
कृतश्चितस्तंभः प्रतिहतधियामंजलिरपि ।
त्वमाशे मोघाश किमपरमतो नर्तयसिमाम् ॥

या श्लोकांत आमच्या कित्येक तोंडपुज्या गृहस्थांचें अगदीं हुबेहुब वर्णन आहे. सरकारचें आराधन करणें हेंच ज्यांचें कर्तव्य त्यांनीं आशेला गुंतून खलांचे उद्गार सहन केल्यास, कोरडें ' ह्यँः ह्यँः ' म्हणून हंसल्यास, किंवा दुष्ट लोकांपुढें क्षणभर हात जोडून उभे राहिल्यास त्यांत नवल तें कोणतें ? अशा लोकांनीं ' टाइम्स ' पत्रांतील लेखांबद्दल जर कांहीं सहानुभूति दाखाविली तर तो आशेनें ग्रस्त झालेल्या मनाचा खेळ आहे, असें म्हणण्यास आम्हांस बिलकुल शंका वाटत नाहीं. आतां

टाइम्सची लुच्चेगिरी.

कशी काय आहे ती थोडक्यांत सांगतों. टाइम्स म्हणतो कीं, पुण्यांतील ' काळ ' वर्तमानपत्र हें राजद्रोही आणि उच्छृंखळ होत चाललें आहे व त्याचा वेळींच जर सरकारनें प्रतिकार केला नाहीं तर सरकारच्या मूर्खपणास सीमा नाहींशी होऊन इंग्रजी साम्राज्यावर मोठा अनर्थ कोसळेल ! टाइम्सचा मुख्य कटाक्ष ता. २ सप्टेंबरच्या ' काळ' पत्रांत जे पहिल्यानेंच लागोपाठ ३।४ स्फुट लेख आहेत, त्यांजवर आहे आणि त्यांचें भाषांतर टाइम्सनें प्रसिद्ध केलें असून त्याजवर एक स्वतंत्र लेखही लिहिला आहे. हें भाषांतर कितपत बरोबर आहे हें आज आम्हांस पाहणें नाहीं. ' काळ ' पत्रावर फिर्याद झाल्यास त्याचा विचार होईल परंतु हें भाषांतर जर सरकारी ओरिएंटल ट्रान्सलेटरच्या भाषांतरावरून घेतलें असेल तर सदर ट्रान्सलेटरसाहेबांसही ' नृपांगणगतः खलः ' याच कोटींत ओढणें भाग पडेल, एवढें आज म्हटल्याखेरीज आमच्यानें राहवत नाहीं.

असो; भाषांतराच्या चर्चा न करण्याचें दुसरें कारण असें कीं, 'काळा' चा लेख काय आहे तो आमच्या सर्व वाचकांस मराठींतच कंळण्यासारखा असल्यामुळें आम्ही तोच मराठी लेख दुसरीकडे उतरून घेतला आहे; आणि त्याचे जोडीस विलायतेंतील 'जस्टिस' पत्रांत ता. ३० जुलै रोजीं मि. हिंडमन याचा लॉर्ड कर्झन यांच्यासंबंधानें जो इंग्रजी लेख आला आहे तोही जशाचा तसाच देवला आहे. या

दोन लेखांची जोडी

निःपक्षपातबुद्धीनें जर कोणीं पाहिली, तर टाइम्स पत्रकर्त्यांची दुष्ट आणि खोडसाळ बुद्धि कोणाच्याही सहज नजरेस येईल, इतकेंच नव्हे तर खुद्द टाइम्स पत्रकर्त्यास जर साक्षीदार या नात्यानें कोर्टांत उभें केलें तर त्यासही कबूल करावें लागेल कीं, " इंग्लंडांत एका गोष्टीवरून जें अनुमान होतें, तेंच अनुमान त्या गोष्टीवरून हिंदुस्थानांत संशयानें किंवा द्वेषानें आमचीं मनें ग्रस्त झाल्यामुळें आम्ही करीत नाहीं. " काळ-कर्ते रा. शिवराम महादेव परांजपे यांजवर टाइम्स पत्रकर्त्याचा मोठा आरोप हा कीं, त्यांनीं आपल्या लेखांत पर्यायानें लॉर्ड कर्झन यांचा खून व्हावा असें सुचविलें आहे. टाइम्स म्हणतो कीं, रशियांतील प्रधान एम. डी. प्लेहवे याच्या खुनासंबंधानें प्रथमतः काळकर्त्यांनीं जी टीका केली आहे. तीच आधीं गैरशिस्त आहे. कोणत्याही खुनामध्यें शिक्षणाचा अंश आहे, राजकीय आणि लौकिक खून यामध्यें पुष्कळ अंतर आहे, वगैरे जीं विधानें पहिल्या स्फुट सूचनेंत काळकर्त्यांनीं केलीं आहेत तींच अप्रशस्त आहेत. व पुढें दुसऱ्या स्फुट लेखांत काळकर्त्यांनीं रशियन सोशिॲलिस्ट लोकांच्या सेंट्रल कमिटीनें जो जाहीरनामा काढला आहे त्याचा अनुवाद केला आहे तोही सहेतुक असून लबाडीचा आहे. परंतु टाइम्स पत्रकर्त्यास

सलत असलेलें वाक्य

म्हटलें म्हणजे तिसऱ्या स्फुट सूचनेच्या आरंभीं काळकर्त्यांनीं " येणेंप्रमाणें वरील अध्यायामध्यें एम. डी. प्लेहवे यांचे आख्यान समाप्त झालें, आतां आपण आपल्या कर्झनसाहेबांच्या आख्यानाकडे वळूं " असें जें लिहिलें आहे तें होय. हें वाक्य लिहूनच काळकर्ते राहिले नाहींत; तर त्यापुढें कर्झनसाहेबांच्या हिंदुस्थानांतील दुष्कृत्यांची विलायतेंतील " इंडिया " पत्रांत आलेल्या एका लेखाच्या आधारें त्यांनीं याद दिली असून असले व्हाइसरॉय हिंदुस्थानांत परत आले असतां, " ती गोष्ट सहन करण्याला हिंदुस्थानांतील लोकांनीं कसें तयार व्हावें ? " असा प्रश्न विचारला आहे. झालें. कर्झनसाहेबांस एम. डी. प्लेव्हे यांच्याप्रमाणेंच केव्हां ना केव्हां तरी ईश्वराच्या घरची शिक्षा होईल, अस

काळकर्त्यांचा अभिप्राय यावरून निर्विवाद सिद्ध होतो, असें टाइम्सचें म्हणणें आहे. चवथ्या स्फुट सूचनेच्या प्रारंभीं " रशियांतील सोशियालिस्ट लोकांच्या सेंट्रल कमिटीच्या जाहिरनाम्यांतील तक्रारींपेक्षां ' इंडियन ' च्या पत्रांत कर्झनसाहेबांच्या विरुद्ध केलेल्या तक्रारींची यादी पुष्कळ लांब आहे यांत शंका नाहीं; परंतु कर्झनसाहेबांच्या अंगच्या चांगल्या गुणांची यादी केली तर तीहि कमी आंखूड भरेल असें नाहीं. आणि यामुळें कर्झनसाहेब हे हिंदुस्थानांतील लोकांना प्रियहि आहेत व अप्रियहि आहेत. " असें काळकर्त्यांनीं लिहिलें आहे. परंतु काळकर्त्यांची ही लबाडी आहे व अशा रीतीची उडवाउडवी त्यांनीं कितीहि केली तरी—आणि ही करण्यांत त्यांनीं बरीच शिताफी दाखविली आहे—एकंदरींत त्यांचा हेतु लॉर्ड कर्झन यांच्याविरुद्ध माथेफिरू लोकांस चिथावून देण्याचा आहे, असें टाइम्सनें ठाम अनुमान केलें आहे; आणि सरकारास अशी शिफारस केली आहे कीं, अशा पत्रकाराची खोड मोडण्यास सरकारानें एक क्षणाचाहि विलंब करूं नये ! टाइम्सपत्रांत हा लेख आल्यानंतर त्याच दिवशीं संध्याकाळच्या ' ॲडव्होकेट ' पत्रांत व पुढें 'बॉंबे गॅझेट' मध्यें व कांहीं देशी पत्रांतहि टाइम्सच्या मताविरुद्ध अभिप्राय प्रसिद्ध झालेले आहेत. या पत्रकर्त्यांचें मत असें आहे कीं, ' काळां ' तील लेख मूर्खपणाचे आहेत खरें; पण सरकारानें ' काळा ' वर फिर्याद करणें त्याहून अधिक मूर्खपणा होय. टाइम्सच्या लबाडीच्या युक्तीनें ॲंग्लो—इंडियन पत्रेंहि फसलीं गेलीं नाहींत, ही एक सुदैवाची गोष्ट होय. तथापि तेवढ्यानें एकंदर प्रकरणाचा नीट खुलासा होत नाहीं, एवढ्यासाठीं यासंबंधानें प्रजाजनांच्या अंतःकरणांतील खरी स्थिति काय आहे ही स्पष्टपणें सरकारास आम्हीं कळवीत आहों. आमच्या लेखांत आम्हांस कोणाची तरफदारी करावयाची नाहीं, कायद्याचा विपर्यास करावयाचा नाहीं, अथवा खून करण्यास कोणास: चिथावावयाचें नाहीं. एका लॉर्ड कर्झनाचा खून झाल्यानें इंग्रजी राज्यपद्धतीचा जुलूम कमी होईल असें मानण्याइतकें आम्ही मूर्ख नाहीं, व काळकर्तेहि नाहींत अशी आमची पक्की खातरी आहे. ज्यावेळीं सर्व राजसत्ता एकाच पुरुषाच्या हातांत आमरण असते, आणि तोच कायतो ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ' समर्थ असून त्या व्यतिरिक्त दुसरा कोणीही सूत्रधार नसतो, तेव्हां असल्या पुरुषाचा खून केल्यानें कदाचित्—आणि तोही कदाचितच—जुलमाचा प्रतिकार होण्याचा संभव असतो. तथापि खून ह्या नात्यानें हें कृत्य गर्ह्यच होय ह्यांत शंका नाहीं. इंग्रजी राज्यपद्धत अशा प्रकारची नाहीं. अशा स्थितींत अधिकाऱ्यांचा खून करण्यास कोणासही चिथावणें हें नामर्दपणाचें लक्षण होय; आणि ही गोष्ट कोणीही सुशिक्षित मनुष्य श्लाघ्य समजेल असें आम्हांस वाटत नाहीं. टाइम्सपत्रकर्त्यास नेटिव सुशिक्षित मनुष्याच्या अंतःकरणाची जर

खरी माहिती असती, व मराठी भाषेचें रहस्य जर थोडेंबहुत त्यास कळत असतें तर त्यानें हल्लींच्याप्रमाणें दुष्टपणाचे लेख कधींही लिहिले नसते. 'दुष्टपणाचे' हा शब्द आम्हीं मुद्दाम वापरलेला आहे. कारण १८९७ सालीं टाइम्सपत्रानें याच शस्त्राचा केवळ दांडगाईनें आणि दुष्टबुद्धीनें केसरीकारावरही प्रयोग केला होता. परंतु ईश्वराच्या घरचा न्याय असा कांहीं प्रबळ आहे कीं, टाइम्सची ही युक्ति सकृद्दर्शनीं जरी त्यावेळीं सिद्धीस गेली तरी अखेरीस त्याच्या लेखानें सरकाराच्या मनांत उत्पन्न झालेला ग्रह चुकीचा होता हें सर्वांच्या निर्दिवाद प्रत्ययास आलें; आणि खुद्द टाइम्सकारासही ग्लोबच्या पूर्वी रा. टिळक यांची माफी मागावी लागली. १८९७ सालच्या ह्या अनुभवावरून तरी आमच्या इंग्रजी 'काळा' च्या दुष्टबुद्धीस कांहीं आळा पडला असेल असें आम्हीं समजत होतों; पण म्हण आहे कीं, 'कुत्र्याचें शेंपूट बारा वर्षें नळींत घातलें तरी पुनः तें वांकडें तें वांकडेंच!'

१८९७ आणि १९०४

या दोन सालच्या लोकस्थितींत पुष्कळ अंतर पडलेलें आहे. १८९७ सालीं प्लेग जारीनें सुरू होता; व तो शमविण्यास सरकारचे सक्तीचे उपाय नुकेच अमलांत येऊं लागले होते; दुष्काळ होताच, आणि तो निवारण करण्याकरितां सरकार जो यत्न करीत होतें, तोही लोकांच्या दृष्टीनें अपुरा आणि चुकीचा होता, रँड आणि आयर्स्ट यांचे जे खून झाले ते या कृत्यांनीं लोक खवळून जाऊन झाले, असें मानण्यास त्यावेळीं इतर ठिकाणीं झालेल्या दंग्यांवरून सबळ कारण होतें. पण तिकडे दुर्लक्ष करून हे खून देशी वर्तमानपत्रांतील लेखांच्या–विशेषतः केसरीकारांच्या लेखांच्या–चिथावणीवरून झाले, अशी 'जस्टिस' ला हाताशीं धरून टाइम्सनेंच प्रथमतः बोंब मारली! केसरींतील लेखांचीं भाषांतरें टाइम्समध्यें येऊं लागलीं; आणि त्यांतच एका विद्याखात्यांतील शिरोमणींनीं आपल्या 'जस्टिसाची' भर घातली. अशा रीतीनें आगींत तेल पडल्यावर मग प्लेगनिवारणार्थ जे सक्तीचे उपाय सरकार योजीत होतें ते केसरीकारांस संमत होते व सरकारच्या धोरणांचें केसरी पत्रांत समर्थन केलें होतें, इकडे कोण लक्ष देतो? युरोपियन अधिकाऱ्यांचे खून झाले; आणि तत्पूर्वीच्या आठवड्याच्या केसरी पत्रांत अफझुलखानाचा खून केल्याबद्दल शिवाजीच्या कृत्याचें समर्थनपर शिवाजी उत्सवांत झालेलें भाषण आलें होतें. झालें! खून आणि खुनाच्या समर्थनाचें भाषण, या दोन गोष्टी आठ दहा दिवसांच्या अंतरानें घडल्यावर आणखी पुरावा तो काय पाहिजे? असा टाइम्सनें जगापुढें कोटिक्रम मांडला. सरकारचें आणि युरोपियन लोकांचीं मार्थीं खुनानें आधींच फिरून गेलीं होतीं; त्यांत टाइम्सच्या दुष्ट बुद्धीची भर

किंवा चिथावणी; मग सदुपदेशाची छाप सरकारच्या मनावर कोठून बसणार ? खटला सुरू झाला आणि केसरीकारास शिक्षाही झाली. पण अशा दुःस्थितींतही सत्याचा असा कांहीं प्रभाव असतो कीं, ॲडव्होकेट जनरल यांस भरकोर्टांत केसरीकारांच्या लेखांशीं खून जोडतां येत नाहीं, असें स्पष्टपणें कबूल करावें लागलें. परंतु जज, ज्यूरी आणि सर्व युरोपियन लोक जेथें खवळलेले, तेथें या कबुलीचा काय उपयोग होणार ? ' दुष्प्रीतीचा ' अर्थ ' अप्रीती ' झाला; ' अप्रीती ' म्हणजे ' प्रीतीचा अभाव ' असें ठरलें; आणि ' नञ् ' उपसर्गाच्या अर्थाची आणि कायद्याच्या कलमांची बरीच ओढाताण होऊन व खुद्द कायदेकौंसिलांत कायदा पास होतांना त्या कलमाचा जो अर्थ सांगितला गेला तो बाजूला ठेवून न्यायदेवतेच्या जागीं अधिष्ठित झालेल्या न्यायमूर्तींनी केसरीकरांस अठरा महिन्यांची शिक्षा ठोठावली ! परंतु सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या आंगची लाज अगदींच कांहीं नाहींशीं झाली नव्हती. खून करणारे लोक लवकरच सांपडले; आणि कित्येक महिने गुप्त चौकशी चालली असतांही केसरीकारांचा खुनाशीं संबंध जोडतां आला नाहीं. अशा स्थितींत न्यायमूर्तींनीं कायद्याचा जो विपर्यास केला तो सशास्त्र करण्याकरितां पिनकोडांतील १२४ अ या कलमाची घाईघाईनें दुरुस्ती करण्यांत आली; आणि ही झाल्यानंतर केसरीकरांची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने सुटका झाली. टाइम्सनें उठविलेल्या भुतानें याप्रमाणें हिंदुस्थानांत जरी गति घेतली तरी विलायतेंत त्यानें पुनः उचल खाल्ली, आणि विलायतचें भूत ग्लोबच्या तोंडानें भोंकूं लागल्याबरोबर मुंबईच्या कुलंगी कुत्र्यानेंही कुत्र्याच्या स्वभावाप्रमाणें नकळत त्याचा प्रतिध्वनि उठविला. परंतु दोघांसही अखेरीस गति मिळून आपली चूक कबूल करावी लागली. लॉर्ड लॅमिंग्टन यांस ह्या गोष्टी कदाचित् माहीत नसतील, म्हणून आज मुद्दाम त्या आम्ही येथें दिल्या आहेत. टाइम्सच्या लेखानें सरकार एकदां फसलें आहे. बाकी सरकारानें एखाद्यास गुन्हेगार ठरवावयाचा प्रयत्न करावा आणि लोकांमध्यें त्याचा विपरीत परिणाम व्हावा असें होणें दुरापास्त होय. परंतु दुराग्रहानें किंवा बदसल्लागारांच्या दुष्टबुद्धीनें, अथवा वर सांगितलेल्या ' नृपांगणगतखलां ' च्या ' दौर्मन्त्र्या ' नें प्रेरित होऊन जेव्हां सरकार आपलें कर्तव्य विसरतें, आणि खलांच्या नादीं लागून निरपराधी मनुष्याचा छळ करण्यास प्रवृत्त होतें, तेव्हां त्याचा परिणाम सरकारच्या इच्छेविरुद्ध होणें अगदीं स्वाभाविक होय. लॉर्ड लॅमिंग्टन यांस आमची सविनय अशी प्रार्थना आहे कीं टाइम्सच्या लुच्चेगिरीस भुलून

ही चूक पुनः करूं नका.

१८९७ सालचा इतिहास आणि त्यांत टाइम्सच्या हातून घडलेलें खोडसाळ वर्तन डोळ्यांपुढें असतां आतां पुनः टाइम्सकारानें जी हूल उठविली आहे

तिला भुरळून जाऊन व्यर्थ सरकारची बदनामी करूं नका. हल्लींचा कायदा, म्हणजे १८९७ सालीं दुरुस्त झालेला कायदा, पूर्वीच्या कायद्यापेक्षां जाणून बुजून अधिक कडक केलेला आहे; आणि त्याच्या जाळ्यांत नेटिव वर्तमानपत्रकारांचीं पांखरें सरकारास केव्हांहि अडकावितां येतील. परंतु कायदा जरी असा कडक झालेला आहे तरी हें जाळें केव्हां पसरावयाचें हें ठराविण्याचें काम पोलिसाकडे नसून सरकारानें आपल्या हातांत ठेवलेलें आहे. याचा हेतु त्यावेळीं असा सांगण्यांत आला होता कीं, सरकारच्या सोयीकरितां कायदा जरी अधिक कडक करण्यांत आला तरी त्याची जी सरकाराकडून अंमलबजावणी व्हावयाची ती योग्य विचार करूनच करण्यांत येईल. सारांश, कायदा जरी कडक झाला तरी सरकार प्रजाजनांच्या विचारस्वातंत्र्याचे हक्क कधींही विनाकारण पायाखालीं तुडविणार नाहीं, असें सरकारचें आम्हांस अभिवचन आहे. आणि प्रामाणिकपणानें पाहिलें तर हें वचन सरकारास पाळलेंच पाहिजे. प्रजाजनांचे वाटेल तेव्हां गळे कापण्याकरितां हा सक्तीचा कायदा केला नाहीं; त्यांच्या वर्तनापासून राज्यास जर खरोखर अपाय होण्याचा संभव असेल तरच कायद्याची अंमलबजावणी करण्यास सरकारास अधिकार पोंचेल. आतां सरकार मुखत्यार आहे, या दृष्टीनें पाहिलें तर केलेल्या कायद्याची त्यास हवी तेव्हां अंमलबजावणी करतां येईल हें खरें आहे. पण अशी गोष्ट घडली असतां सरकारचा हात धरण्याचें जरी कोणाचें अंगीं सामर्थ्य नसलें तरी सरकाराचें वर्तन अन्यायाचें व जुलमाचें समजलें जाईल; आणि या जुलमास जो बळी पडेल त्याबद्दल लोकांमध्यें वाईट ग्रह न होतां सहानुभूतीच उत्पन्न होईल. १८९७ च्या खटल्यामुळें जर कांहीं केसरीकाराबद्दल सहानुभूति झालेली असेल तर त्यांतील बीज हेंच होय. कोणी खरोखरीच बंड करीत असला, किंवा खून करण्यास लोकांस प्रवृत्त करीत असला, तर त्यास खुशाल सुळाबर चढवा. मग तो परांजपे असो, टिळक असो, किंवा टाइम्सपत्रकर्ता असो ! त्यामुळें कोणासही वाईट वाटणार नाहीं, इतकेंच नव्हें तर गुन्हा होणें बंद केल्याबद्दल लोक सरकारची प्रशंसा करतील; आणि गुन्हेगाराबद्दल नेहमीं लोकांची तिरस्कारबुद्धीच जागृत राहील. पण हें गाडें जेव्हां फिरतें, आणि मत्सरानें, दुराग्रहानें, द्वेषबुद्धीनें किंबहुना पाजीपणानें उभारलेल्या कटांत जेव्हां सरकार अंध होऊन सामील होतें, तेव्हां सरकार आपणांस लोकांच्या तिरस्कारास पात्र करून घेतें, यांत बिलकुल शंका नाहीं. ज्यांच्या हातीं राज्याचीं सूत्रें आहेत, त्यांनीं हें तत्त्व विशेषतः लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि हीं सूत्रें टाइम्स पत्रकर्त्याच्या हातांत नाहींत, अथवा सरकारनें त्याजकडे दिलेलीं नाहींत, असा आज लोकांचा समज आहे. हा समज बरोबर आहे कीं चुकीचा आहे, हें सरकार हल्लींच्या प्रकरणीं जें वर्तन करील त्यावरून दिसून येणार आहे. विशे-

षेकरून एकदां जो लुच्चा ठरला, त्याचा सल्ला पुनः घ्यावयाचा कीं, काय, हें लॉर्ड लॅमिंग्टन यांनीं अवश्य पाहावें अशी आमची त्यांस विनंति आहे. टाइम्सची ही दुष्ट संवय त्यास अशा प्रकारचा धक्का मिळाल्याखेरीज कधींही जावयाची नाहीं. एकदां ठोकर खाऊनही जें पत्र पुनः खोडसाळपणाचे लेख लिहितें तें निलाजरेंच समजलें पाहिजे; व त्याबरोबर सरकार जर निलाजरें होण्यास तयार असेल तर आमचें मोठें दुर्दैव होय.

टाइम्सकाराचा मुख्य मुद्दा

काय तो हाच कीं, प्लेहवे आणि कर्झन यांच्याबद्दलचे लेख एकापुढें एक लिहिण्यांत कर्झनसाहेबांचा खून व्हावा, हेंच काळकर्त्यांनीं ध्वनित केलें आहे. परंतु ज्याला ज्याला म्हणून मराठी वाचतां येतें किंवा मराठीचा अर्थ समजतो,—मात्र ते वर सांगितल्याप्रमाणें आशादेवीचे दास नसले पाहिजेत,—त्यांस हें टाइम्सचें अनुमान अत्यंत चुकीचें आणि खोटें आहे असें साफ दिसून येईल. याला प्रमाण, विलायतेंतील सोशालिस्ट लोकांच्या ' जस्टिस ' पत्रांतील जो उतारा आम्हीं दिला आहे, तो बस्स आहे. रा. परांजपे यांच्या लेखापेक्षां मि. हिंडमन यांचा लेख दसपट अधिक कडक आहे. दोनही लेख प्लेहवे यांचा खून झाल्यानंतर लिहिलेले आहेत; आणि दोन्हीमध्यें रशियांतील जुलमी अधिकाऱ्यांची बेबंदशाही व खून आणि लॉर्ड कर्झन यांची झोटिंगबाच्छाई या दोन गोष्टी एकत्र मांडल्या आहेत. सोशालिस्ट लोकांचें कायमचें असें मत आहे कीं, जुलमाचा आणि अन्यायाचा घडा केव्हांना केव्हां तरी भरल्याखेरीज राहत नाहीं. हें मत युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांत आज शेंकडों लोक व वर्तमानपत्रकर्ते प्रसिद्ध करीत आहेत. उघडच आहे कीं, मनगटाच्या जोरावर एकादा जुलमी राजा जेव्हां प्रजेस पादाक्रांत करतो तेव्हां दीन झालेल्या प्रजेस न्यायाचा त्राता जो ईश्वर त्याखेरीज कोणीहि शरण नसतें. इतिहास व पुराण यांवरून जर कांहीं शिकावयाचें असेल तर हेंच होय. रावणानें तुच्छ मानलेलीं माणसें व माकडें हींच ज्याप्रमाणें त्याच्या अपजयास कारण झालीं त्याच न्यायानें रशियानें तुच्छ मानलेलीं जपानचीं ' पिवळीं माकडें ' आज क्युरोपाटकिन यास पळवून लावीत आहेत. मि. हिंडमन यांनीं ' जस्टिस ' पत्रांत लिहिलेल्या लेखाचा: जो उतारा दुसरीकडे दिला आहे, त्यांतहि हेंच तत्त्व सांगितलें आहे. काळकर्त्यांस प्लेहवेच्या खुनावरून लॉर्ड कर्झन यांच्या अरेरावी कारकीर्दीची आठवण झाली, आणि मि. हिंडमन यांस लॉर्ड कर्झनच्या कृत्यांवरून रशियांतील झोटिंगपाच्छाईची आठवण झाली, एवढाच काय तो दोन लेखांमधील भेद आहे. बाकी लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीबद्दल दोघांचें मत एकसारखेंच आहे; आणि दोघांनीं त्याबद्दलची

आपली भाषाहि कडक वापरलेली आहे. किंबहुना हिंडमनसाहेबांची भाषा अधिक कडक आहे, असें म्हटलें तरी चालेल. लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचें धोरण हिंदुस्थानांतील प्रजेस बिलकुल सुखावह नाहीं, आणि लोक कर्झनशाहीस नाखुष झालेले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. टाइम्स किंवा इंग्रजी अधिकारी कांहींहि म्हणोत, आम्ही सरकारास स्पष्टपणें असें कळवितों कीं, कर्झनशाही आमच्या गळ्याभोंवतालचा गुलामगिरीचा पाश अधिकाधिक दृढ करीत चालली आहे; आणि हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें हें धोरण जर असेंच कायम राहिलें तर हिंडमन किंवा काळकर्ते म्हणतात त्याप्रमाणें परिणामीं ब्रिटिश साम्राज्यास तें अपायकारक झाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. हिंदुस्थानचे प्रसिद्ध देशभक्त मि. दादाभाई नौरोजी व सर वि. वेडरबर्न यांचेंहि असेंच मत आहे; आणि तें मत अमॅस्टरडम येथें भरलेल्या सोशालिस्ट परिषदेपुढें दादाभाई नौरोजी यांनीं स्पष्टपणें बोलून दाखविलें आहे. इतकेंच नव्हे तर मि. हिंडमनसारख्या सोशालिस्ट पंथाच्या मनुष्याबरोबर संबंध ठेवण्याचें मि. दादाभाई यांनीं कधींही सोडून दिलेलें नाहीं. टाइम्सकारास दादाभाईचें हें वर्तन अक्षम्य वाटत आहे हें खरें; पण 'लुटारू' पक्षाच्या टाइम्सची ही चूक आहे, असें आम्हीं गेल्या अंकींच दाखविलें आहे. 'काळा' प्रमाणेंच लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीवर कडक लेख लिहिणारा व रशियाच्या जुलमाची व कर्झनसाहेबांच्या जुलमाची जोड करणारा हिंडमन याजवर जर खून करण्यास उत्तेजन देण्याचा विलायतेंत लंडन टाइम्स किंवा इतर पत्रें आरोप करीत नाहींत, तर रा. परांजपे यांजवरच तो आरोप टाइम्स ऑफ इंडिया यानें कां करावा, हें आम्हांस बिलकुल समजत नाहीं. रा. परांजपे यांचीं कांहीं मतें सोशिआलिस्ट मतांप्रमाणें आहेत खरीं; हीं मतें कित्येकांस पसंत होतील, आणि कित्येकांस होणार नाहींत. किंबहुना आम्हांसही त्यांतील कांहीं मतें ग्राह्य नाहींत; पण कोणचीं मतें ग्राह्य आहेत आणि कोणचीं नाहींत हा प्रश्न आज आमच्यापुढें नाहीं. सध्यांचा प्रश्न एवढाच आहे कीं, ता० २ सप्तंबरच्या लेखाबद्दल काळकर्त्यांवर खटला करून त्यांस तुरुंगांत धाडावें कीं नाहीं ? किंवा इतर बदमाषांप्रमाणें त्यांजपासून चाप्टरखालीं चांगल्या वर्तणुकीचा जामीन घ्यावा किंवा नाहीं ? या गोष्टींचा विचार करतांना

विलायतेंतील कायदा

काय आहे, इकडेही थोडेंसें लक्ष पुरविलें पाहिजे. मि. हिंडमन यांचा लेख विलायतेंतच प्रसिद्ध झाला आहे; आणि काळकर्त्याप्रमाणेंच रशियांतील जुलूम आणि हिंदुस्थानांतील जुलूम यांची तुलना करून रशियांतील जुलमी अधिकाऱ्यांस जें शासन होत आहे, त्यावरून हिंदुस्थानसरकार अद्याप बोध घेत

नाहीं, हा सदर सरकारचा अरेरावीपणा, बेपर्वाई किंवा मूर्खपणा आहे असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. परंतु तेवढ्यावरून हिंडमनसाहेब कोणाचा खून करण्यास सांगतात असें कोणी सुचविलें नाहीं, अथवा अनुमानही केलें नाहीं. फार लांब कशाला ? प्रसिद्ध रशियन विद्वान गृहस्थ कौंट टॉलस्टॉय यांनीं रशियानें चालविलेल्या प्रस्तुतच्या युद्धाबद्दल अतिशय कडक लेख लिहून उघड उघड सर्वांस असें सांगितलें होतें कीं, ' तुम्ही जर खरे खिस्ती असाल तर लढाई करण्याबद्दलचा राजाचा हुकूम मानूं नका. ' पण खुद्द रशियांतील ह्या लेखाबद्दल टॉलस्टॉय यांस कोणी कोर्टात ओढलें नाहीं; किंवा चाप्टरखालीं त्यांचा कोणी जामीन घेतला नाहीं ! ही गोष्ट सांगण्याचें कारण असें कीं, सोशालिस्ट लोकांच्या मतांच्या प्रासिद्धीबद्दल युरोपांतील कायदा अगदीं निराळा आहे हें वाचकांच्या नजरेस यावें. कोणाही सोशालिस्ट गृहस्थास आपलीं मतें निर्भिडपणें किंवा उघडपणें बोलण्याचा किंवा लिहिण्याचा युरोपांतील सर्व राष्ट्रांत एकसारखाच पूर्ण हक्क आहे.पण जेव्हां या लेखावरून उत्तेजन मिळून एखादा गुन्हा किंवा खून होतो तेव्हां मात्र सदर लेखास कायद्याप्रमाणें जबाबदार धरतात, तोंपर्यंत धरीत नाहींत. कधीं कधीं असल्या लेखाचा व गुन्ह्याचा संबंध जोडतांना घाई किंवा अन्याय घडतो खरा; पण एकंदरींत एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत प्रत्यक्ष गुन्ह्यास शिक्षा आहे, मतप्रसारास नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थानांतील कायदा यापेक्षां अधिक सक्त व कडक आहे, आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे काळकर्त्यांचें लेख कोर्टापुढें गेले तर कोर्टाकडून काय निकाल होईल याबद्दल कोणासही शंका नाहीं. परंतु खटला करणें आणि न करणें हें जर सरकारनें आपल्या ताब्यांत ठेवलें आहे तर सरकारनें खटला करण्यास मंजुरी देण्यापूर्वी युरोपांतील अगर विलायतेंतील कायदा काय आहे, हें लक्षांत आणून मग मंजुरी द्यावयाची कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे. कायदा सक्त करून ठेवला, म्हणून तो हवा तेथें अमलांत आणावयाचा नाहीं, असें खुद्द सरकारचेंच अभिवचन आहे; आणि तें पोक्त विचारांतीं दिलेलें असून त्याचप्रमाणें वागणें यांतच सरकारचें शहाणपण व दूरदर्शित्व आणि साम्राज्याचें हित आहे. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे हल्लींच्या प्रकरणांत टाइम्सकार म्हणतात त्याप्रमाणें सरकारनें हात घालावा, असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं.

हल्लींची स्थिति

१८९७ सालापेक्षां अत्यंत भिन्न आहे. पाऊस पडून चोहोंकडे शांतता झाली आहे, देशांत प्लेग आहे खरा, पण तोही कमी प्रमाणावर आहे, अथवा लोकांस त्याची आतां संवय झालेली आहे; देशांत

कोठेंहि युरोपांतल्याप्रमाणें सोशालिस्ट लोकांच्या मंडळ्या किंवा कट नाहींत, कीं ज्यांतील लोक चिथावणीची वाट पाहत बसले आहेत; अशा वेळीं काळासारख्या पत्रांत प्रेहवेचा जुलमी कारकीर्दीबद्दल झालेला खून एका स्फुट सूचनेंत सांगून नंतर लागलीच दुसऱ्या लेखांत कर्झनचीं दुष्कृत्यें सांगितलीं एवढ्याच गोष्टीवरून काळकर्त्यांचा हेतु खुनास उत्तेजन देण्याचा होता असें अनुमान करणें शुद्ध वेडेपणा होय. काळकर्त्यांच्या कोणत्याहि लेखाचा अर्थ करण्यास ' सांनिध्य ' हें एकच साधन आहे असें नाहीं; तर न्यायशास्त्राप्रमाणें ' योग्यता ' ' आकांक्षा ' इत्यादिकांचाहि अवश्य विचार केला पाहिजे. या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे टाइम्स म्हणतो त्याप्रमाणें काळकर्त्यांचा हेतु होता असें आम्हांस वाटत नाहीं; किंवा अशा कृत्यास उत्तेजन देण्याइतके ते मूर्ख आहेत असेंही आम्ही समजत नाहीं. त्यांतून १८९७ सालीं ज्याप्रमाणें प्रत्यक्ष खून झाला होता तशी जर आतां स्थिति असती तर माथेफिरू टाइम्सास खोटीच कां होईना पण अकांडतांडव करण्यास कांहीं तरी सबब सांपडली असती. पण तसाहि प्रकार नाहीं. तेव्हां अशा स्थितींत सरकारानें टाइम्सचा उपदेश ऐकून विनाकारण कांहीं तरी खटले उपस्थित करून लोकमत क्षुब्ध व दूषित करावें हें आमच्या मतें शुद्ध आग्रहाचें आणि अविचारीपणाचें लक्षण होय. आमच्या म्हणण्यावर असा

एक आक्षेप

येऊं शकतो कीं, तुम्ही विलायतेंतील जी स्थिति सांगितली ती खरी आहे. पण हिंदुस्थानचें राज्य परकीय राज्यकर्त्यांनीं चालवावयाचें म्हटलें म्हणजे अर्थातच विलायतेंतल्या इतका येथें लोकांवर विश्वास ठेवतां येत नाहीं. सारांश, विलायतेंत हिंडमनच्या हेतूबद्दल जें अनुमान करतां येत नाहीं, तेंच हिंदुस्थानांत काळकर्त्यांच्या संबंधानें तितकेंच अशक्य आहे अशी सरकाराची खात्री होणें शक्य नाहीं. कांहीं अंशीं हा आक्षेप विचार करण्यासारखा आहे, हें आम्ही प्रांजळपणें कबूल करतों. गोऱ्या कांतडीच्या मनुष्यानें कितीही कडक लेख लिहिले तरी तो खून किंवा बंड करणार नाहीं अशी जी त्याबद्दलची गोऱ्या राज्यकर्त्यांची खात्री असते ती काळ्या कांतडीच्या मनुष्याबद्दल असणें कठीण आहे. परकीय राज्यकर्त्यांना येथील राज्य महाभारतांत म्हटल्याप्रमाणें " न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते चाप्यविश्वसेत् " कारण " विश्वासाद्भयमुत्तमम् " याच तत्त्वावर कांहीं अंशीं चालविलें पाहिजे ! पण हा अविश्वास कोठपर्यंत धरावा याला कांहीं मर्यादा आहे; आणि ती मर्यादा सरकारानें उल्लंघन करता कामा नये. सरकारानें ज्याप्रमाणें ही गोष्ट लक्षांत ठेवावयाची त्याचप्रमाणें आम्हीं वर्तमानपत्रकर्त्यांनींहि सरकारच्या अविश्वासास आपणास पात्र करून

घेऊं नये याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे, हें म्हणणेंहि आम्हांस मान्य आहे. परंतु त्याबरोबरच दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, सरकारच्या आवडीकरितां कांहीं आम्हीं पत्रें काढिलीं नाहींत; व सरकारावर कडक टीका केल्यानें त्यांचा रोष आमच्यावर झाला, तर त्याची आम्हांस परवाही नाहीं. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जर कडक टीका करावयाची नाहीं व ती पद्धत परिणामीं लोकांस व राज्यकर्त्यांस जाचेल असें निर्भिडपणें म्हणावयाचें नाहीं तर वर्तमानपत्र काढावें तरी कशाला ? सारांश, आमचीं मतें व भाषा कितीहि कडक असो, तो मनाचा धर्म आहे. ज्याचें अंतःकरण जसें जळत असेल त्याप्रमाणें तो बोलेल किंवा लिहील. बाकी एवढें मात्र खरें कीं, विलायतेंत एकजातीय राजा आणि प्रजा यांच्यामध्यें जो विश्वास आहे तितका विश्वास हिंदुस्थानांतील परकीय राजे आणि प्रजा यांचेमध्यें असणें शक्य नाहीं,हें लक्षांत ठेवून आपल्या लेखांबद्दल सरकारास राग आला तर चालेल, पण गैरविश्वास वाटूं नये, एवढी खबरदारी हल्लींच्या राज्याच्या व कायद्याच्या स्थितींत ठेवणें जरूर आहे. अशा रीतीची खबरदारी काळकर्त्यांनीं प्रस्तुतच्या लेखांत घेतली नाहीं; व "सीझरची बायको नुसती सती असून उपयोगी नाहीं, तर तिजबद्दल कोणाचे मनांत संशयहि येतां कामा नये " अशी जी इंग्रजींत म्हण आहे त्या म्हणीप्रमाणें ते वागले नाहींत, एवढाच जर त्यांचेवर कोणाचा आक्षेप असेल, तर ही चूक आम्ही कबूल करूं; पण त्यांची बुद्धि दुष्ट आहे, लॉर्ड कर्झन यांचा खून व्हावा अशी त्यांची इच्छा आहे, अथवा त्याकरतां लोकांस ते उत्तेजन देत आहेत, किंवा उद्योग करीत आहेत, असें जर कोणी म्हणेल, तर ही केवळ नजरचूक नव्हे, तर दुष्टपणा आहे, असें आम्ही स्पष्टपणें म्हणूं. विलायतेंतील लेखकांपेक्षां आम्ही थोडी जास्त काळजी घेतली पाहिजे हें खरें; आणि अशा दृष्टीनें पाहिलें तर काळकर्त्यांनीं आपणास विनाकारण सरकरच्या संशयास पात्र करून घेऊं नये असें आम्ही त्यांसही कळवितों. पण मराठींत म्हण आहे ' एकानें वांसरूं मारलें म्हणून दुसऱ्यानें गाय मारूं नये ' त्याप्रमाणें सरकारानेंही ह्या प्रकरणांत आपल्या गैरविश्वासी स्वभावाचें लोकांपुढें फाजील प्रदर्शन करणें साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत गैरमुत्सद्दीपणाचें व घातुक होय.

उपसंहार

सरते शेवटीं उपसंहारादाखल आम्हांस येवढेंच सांगणें आहे कीं, या विषयाचा वर जो आम्ही सर्व बाजूंनीं विचार केला आहे, तो काळकर्त्यांच्या लेखांच्या समर्थनार्थ केलेला नाहीं. त्यांचे लेख व आमचे लेख ज्यांनीं वाचले असतील त्यांस दोघांच्या मतांत जो फरक आहे तो यापूर्वीच कळून आला

असेल. परंतु काळाचीं कांहीं मतें आम्हांस ग्राह्य नसलीं म्हणून एकदां शिक्क्याच्या मापानें खोडसाळ ठरलेल्या टाइम्स पत्रानें विनाकारण एखाद्या नेटिव पत्रावर हल्ला करावा व त्याजबद्दल सरकारांत अविश्वास उत्पन्न करावा, आणि स्वतः साम्राज्याचें हित केल्याची खोटी प्रौढी मिरवून सरकारची लोकांत बदनामी करावी, हें आमच्या दृष्टीनें सर्वथैव अश्लाघ्य होय; व राजाच्या आंगणांत दृष्टीस पडणाऱ्या ह्या खलांच्या कृतीचें जर पुरें स्वरूपाविष्करण झालें नाहीं, तर त्यांत सरकार आणि प्रजा या दोघांचेंही नुकसान आहे, अशा समजुतीनें आम्ही एवढा मोठा लेख आज लिहिला आहे. आमची समजूत किंवा युक्तिवाद चुकला असल्यास त्यांतील चूक कोणीं दाखविल्यास ती आम्ही मोठ्या आनंदानें कबूल करूं. नसल्यास लॉर्ड लॅमिंग्टन यांनीं स्वतः त्याचा योग्य विचार करून मग काय करावयाचें तें ठरवावें, एवढीच त्यांजपाशीं आमची विनंति आहे. हा विषय नृपांगणगत खलांच्या किंवा त्यांचीं भाषणें ऐकून घेणाऱ्या आशेनें बद्ध झालेल्या गृहस्थांच्या मतानें निर्णय करण्यासारखा नाहीं. स्वतंत्र लोकमत काय आहे--मग तें प्रिय असो वा अप्रिय असो--तें सरकारनें समजून घेतलें पाहिजे; आणि तसें झाल्यास हल्लींचें वावटळ हें केवळ खोडसाळपणाचा परिणाम आहे अशी सरकारची खात्री होईल अशी आम्हांस उमेद आहे.

❖ ❖ ❖

* कुळकर्ण्यांच्या हक्कांवर गदा !

या विषयासंबंधानें आमच्याकडे बरींच पत्रें आलेलीं आहेत. परंतु सरकारचा विचार अद्याप कायमचा बाहेर न पडल्यामुळें आम्हीं त्याबद्दल आजपर्यंत कांहीं लिहिलें नव्हतें. परंतु हल्लींच्या स्थितीवरून पहातां या विषयावर सरकारचा ठराव होण्यापूर्वीच आपणास काय लिहिणें तें बरें असें वाटल्यावरून आज हा लेख लिहिला आहे. गांवच्या व्यवस्थेंत पाटील आणि कुळकर्णी हे मुख्य अधिकारी गणलेले आहेत किंबहुना ते गांवचे राजेच होत म्हटलें तरी चालेल. ही पद्धत इंग्रजी राज्य होण्यापूर्वीची असून, तेव्हां ती जितकी उपयुक्त होती तितकीच ती आतांहि आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सरकारची जी कांहीं राज्यव्यवस्था आहे तिचा मूळ पाया किंवा श्रीगणेशायनमः गांवापासून

---

* [केसरी ता. १ नोव्हेंबर १९०४]

होतो. जमिनीचें सारे, जंगलाची व्यवस्था किंवा इतर बाबी या सर्व गांववार ठरविल्या जातात; आणि त्या सर्व बिनबोभाट चालविणें हें पाटीलकुळकर्ण्यांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य आज शेंकडा वर्षें ते करीत आले आहेत. गांवचे इतर बलुतदार जोशी, महार, न्हावी, कुंभार वगैरे हेही पूर्वी पाटिलकुळकर्ण्यांप्रमाणेंच वतनदार होते. पण त्यांचे हक्क इंग्रजी राज्यांत कमी होऊन त्यांस वतनदारांतून बहुतेक कमी केलें आहे, असें म्हटलें तरी चालेल. सर्वे सेटलमेंट खात्याची स्थापना झाल्यानंतर या बलुतदारांस निरुपयोगी ठरवून त्यांच्यापैकीं कांहीं हक्कदारांबरोबर आठ आण्यांचें सेटलमेंट ठरविण्यांत आलें. महालाचे, तालुक्याचे किंवा जिल्ह्याचे जे मुलकी वतनदार कामगार देसाई, देशपांडे, देशमूख वगैरेंचीहि व्यवस्था अव्वल इंग्रजींत याचप्रमाणें लावण्यांत आली. सारांश, कमिशनर, कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर, डेप्युटि कलेक्टर, मामलेदार आणि पोलीस या सरकारी नोकरांनीं पूर्वीच्या वतनदार अमलदारांस खो दिला आणि पूर्वी हे वतनदार जीं कामें करीत होते तीं सरकारी पगारी अम्मलदार करूं लागले. गांवच्या कामासंबंधानें मात्र हा नियम लागूं झाला नाहीं. कारण पाटील कुळकर्ण्यांप्रमाणें आस्थेनें काम करणारे माहितगार लोक थोड्या पगारांत मिळणें त्यावेळीं शक्य नव्हतें. कुळकर्ण्याचें किंवा पाटलाचें काम कांहीं सोपें आहे असें नाहीं. गावांत जमिनीचा महसूल किती, पडित किती, लागवडींत किती, बाकी किती, पिकांचा अंदाज काय, प्रांतांतील निरनिराळ्या खात्याचे अधिकारी गांवासंबंधानें हुकूम देतात ते अमलांत येतात कीं नाहीं, गांवांत गुरेंढोरें किती, माणसें जन्मलीं किती, मेलीं किती, कोणाला देवी काढल्या, कोणाला नाहींत, किंबहुना गांवांत कावळे आले किती आणि गेले किती ही सर्व माहिती गांवच्या कुळकर्ण्यास तालुक्यांतील अधिकाऱ्यांस द्यावी लागते! एकटा कुळकर्णी ही माहिती कशी पुरवीत असेल हें सांगण्याची तूर्त जरूर नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें सर्व अष्टाधिकार कुळकर्ण्याकडे असतात, आणि वतनाच्या आशेनें तो ते आपल्या शक्तीप्रमाणें चालवीत असतो एवढें सांगितलें म्हणजे बस्स आहे. एखाद्या दुसऱ्या गांवचा कुळकर्णी आपल्या कामांत हयगय करीत असेल, नाहीं असें नाहीं; पण सामान्यरीत्या पाहिलें तर या वतनदार वर्गानें आपलें काम शेंकडों वर्षें बिनबोभाट चालविलें आहे; व एकंदर राज्यव्यवस्थेंत त्याचें काम कमी पगाराचें असलें तरी अत्यंत महत्त्वाचें आहे असें सरकारी कागदपत्रांवरून पूर्णपणें शाबीत करतां येईल.

अशा उपयुक्त वतनदारवर्गास फांटा देऊन त्यांचें काम पगारदार तलाठ्याकडून करून घेण्याची कल्पना सरकारच्या डोक्यांत येऊं लागली किंवा अलीकडे आली आहे, ही मोठ्या आश्चर्याची आणि दुर्दैवाची गोष्ट होय. वतन या शब्दांत जी कांहीं जादू भरलेली होती तीं इंग्रजी राज्यांत पुष्कळ

कमी झाली आहे हें खरें आहे. पेशवाईत शिंदे होळकर यांनीं उत्तरहिंदुस्थानांत पराक्रम करून राज्यें कमावलीं तरी त्यांस आपल्या मूळच्या पाटिलकी वतनाचा अभिमान असे. तशी स्थिति सांप्रत राहिली नाहीं हें खरें, तथापि अद्यापहि वतनाच्या तुकड्याकरितां पुष्कळ खर्च झाला तरी तो करण्यास लोक खुषी असतात असें आढळून येतें. वंशपरंपरा चालणारें वतन म्हणजे नोकरीपेक्षां पुष्कळपट अधिक महत्त्वाचें आहे ही आमची समजूत अद्याप पुष्कळ अंशी कायम आहे. हल्लींचे कुळकर्णी सरकारचीं सटरफटर शेंकडों कामें करितात यांतील बीज हेंच आहे. आतां कदाचित् कित्येकांचें असें म्हणणें पडेल कीं, या वतनदारलोकांपेक्षां सरकारी पगारी नोकर मामलेदारांच्या अधिक कह्यांत राहतील, वतनदारांच्या पाळ्या ठरविण्याची दगदग वांचेल, आणि वतनदारांच्या तंटे तोडण्यांत वरिष्ठ मुलकी अंमलदारांचा वेळ जाणार नाहीं; तसेंच वतनी आक्ट वगैरे वतनदाराकरितां जे स्वतंत्र कायदे करावे लागतात त्यांचीहि जरूर न पडतां गव्हर्नरापासून तों कुळकर्ण्यापर्यंत सररहा पगारी नोकरांची पद्धत सुरू झाल्यानें राज्यव्यवस्था सुलभ आणि एकसारखी होईल. परंतु आमच्या मतें ही समजूत अगदीं चुकीची आहे; आणि तिचें बीज हल्लींच्या सिव्हिलियन लोकांस आपल्या ऑफिसांत बसून कागदी हुकुमानें व्यवस्था करण्याची जी इच्छा उत्पन्न झाली आहे त्यांतच आहे असें आम्हांस वाटतें. संबंध इंग्रजी राज्यांत इनाम, वतन, जहागीर वगैरे जमिनीवरील स्वामित्वाचे हक्क कोणाकडेही राहूं न देतां जमीन कसणारे लोक म्हणजे सरकारचीं उपरीं कुळें आणि जमिनीचा वसूल करणारे कामगार हे सर्व सरकारचे पगारी नोकर अशी व्यवस्था जर पुढें मागें अमलांत आणावयाची असेल तर त्यास हल्लीं जो सरकारानें उपक्रम आरंभिला आहे तो योग्य आहे. परंतु त्याचा परिणाम मात्र असा आहे कीं, जमिनीबद्दल कोणासहि अभिमान न राहतां इंग्रजसरकार आणि त्यांचे अंमलदार हे मुख्य आणि बाकीचे लोक हे गुलाम किंवा दास बनतील. कोणत्याहि देशांत किंवा त्यांचे राज्यांत अशा प्रकारची स्थिति होणें इष्ट नाहीं. लोकांचा ज्या राज्य-व्यवस्थेंत हिताहितसंबंध नाहीं, किंवा नोकरीपेक्षां अन्य रीतीनें संबंध रहात नाहीं ती राज्यव्यवस्था शाश्वत टिकणारी नव्हे, हें तत्त्व हिंदुस्थानसरकारासही कबूल आहे. स्थानिक स्वराज्याची कल्पना याच तत्त्वावर निघाली आहे, व म्युनिसिपालीट्या आणि लोकलबोर्डें काढून त्यांचें काम लोकांच्या पुढाऱ्यांनीं चालवावें यांतील बीजही हेंच होय. पाटिलकुळकर्णी यांस हल्लीं जे हक्क आहेत ते एक प्रकारें स्थानिक स्वराज्याच्या तत्त्वावरच दिले आहेत असें म्हणतां येईल. प्रत्येक गांवांतील घराणीं पूर्वापार जे हक्क चालवीत आलीं त्यांच्याकडून तें काम काढून पगारी नोकरांस दिल्यानें तें अधिक चांगलें होईल ही समजूत चुकीची आहेत वंशपरंपरा चालत आलेले

लोकांचे हक्क काढून घेणें म्हणजेच अगोदर अन्याय होय. परंतु ' बळी तो कान पिळी ' या न्यायानें हा अन्याय करणें सरकारच्या स्वाधनिचें आहे, असें मानलें तरी उपयुक्ततेच्या दृष्टीनें पाहतांही हल्लीं सरकारनें मनांत आणलेली योजना गैरफायद्याची आहे असें सहज दाखवितां येईल. अर्थात् वंशपरंपरेचे हक्क काढून घेणें यांत जो अन्याय होणार तो सरकारच्या फायद्याचाही नसल्यामुळें अधिक गर्ह्य होय असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हिंदुस्थानदेश इंग्रज-सरकारनें जिंकला आहे तो कांहीं सर्व लोकांचे वंशपरंपरेचे हक्क बुडविण्याकरितां नव्हे, अशी लोकांची समजूत आहे व १८५८ पासून वेळोवेळीं जे जाहिरनामे निघाले ते पाहिले असतां ही समजूत निराधार नाहीं असें कोणासही दिसून येईल. या समजुतीकडे दुर्लक्ष करून केवळ वरिष्ट मुलकी अंमलदारांना थोडेसें सोपें पडावें म्हणून कुळकर्ण्यांचे वंशपरंपरेचे हक्क काढून घेणें आमच्या मतें अगदीं गैरमुत्सद्दीपणाचें काम होय व आम्हांस अशी उमेद आहे कीं सरकार अशा प्रकारचा असमंजसपणा करणार नाहीं.

आतां कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, हल्लींच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें गांव-कामगारांस जितकें ज्ञान जरूर लागतें तितकें कुळकर्ण्यांस असत नाहीं. उदाहरणार्थ, नवीन सर्व्हेचें ज्ञानच घ्या, जुन्या कुळकर्ण्यास हें ज्ञान कांहीं दिवस तरी सर्व्हेक्लासमध्यें घालविल्याशिवाय प्राप्त होणें शक्य नाहीं. गोष्ट खरी आहे. पण या आक्षेपचा विचार करतांना दुसऱ्याही एक दोन महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. त्यांतील पहिली ही कीं, कुळकर्ण्यावर कोणकोणतीं कामें लादावयाची याचा सरकारनें आधीं विचार केला पाहिजे. कुंभाराचा गाढव कितीही सोशिक असला तरी तेली, माळी, परीट, चांभार वगैरे सर्व लोक जर त्याच गाढवावर आपलें ओझें लादूं लागले तर त्या ओझ्यानें तो केव्हांच मरून जाईल ! हा दृष्टांत कदाचित् कोणास ग्राम्य वाटेल; पण कुळकर्ण्याची हल्लींची स्थिति लक्षांत आणतां तो अगदीं बरोबर आहे, असें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. आज सर्व्हे खात्यानें आपलें ओझें कुळकर्ण्यावर लादलें तर उद्यां जंगल खात्यानेंहि आपलें ओझें त्यावर लादून वनस्पति–शास्त्राचीही थोडीबहुत माहिती कुळकर्ण्यास असावी, असें कां म्हणूं नये ? अबकारी खातेंही उद्यां असेंच म्हणूं शकेल कीं, दारू गाळणें किंवा यंत्रानें त्यांत अर्क किती आहे हें मोजणें हींही कामें कुळकर्ण्यास आलीं पाहिजेत. परंतु अशा रीतीनें जर सर्वच कामें कुळकर्ण्यावर लादूं लागलें तर पगारी कुळकर्णी किंवा तलाठीही तें काम करूं शकेल कीं नाहीं, याचा वानवाच आहे. दरमहा १५।२० रुपये द्यावयाचे आणि त्या नोकरास सर्व खात्यांची माहिती असावी अशी इच्छा करावयाची हाच अगोदर मूर्खपणा होय. सरकारास कुळकर्ण्यांचा वर्ग जर हल्लींपेक्षां हुषार पाहिजे असें वाटत असेल तर त्यांचा अगोदर मुशाहिरा वाढवा आणि मग त्यांच्या-

करितां तालुक्यांतून निराळ्या शाळा काढून त्यांस योग्य शिक्षण देऊन तयार करा, परंतु तसें काहीं न करितां त्यांस कांहीं तरी नांवें ठेऊन, त्यांच्या जागीं पगारी तलाठी नेमून त्यांचे वंशपरंपरेचे हक्क बुडाविणें गैरमुत्सद्दीपणाचें आणि अन्यायाचें होय. यापासून सरकारास विशेष फायदा न होतां दरोबस्त खेडेगांवांतूनही एक प्रकारचा विनाकारण असंतोष उत्पन्न होणार आहे. तरी अशा प्रकारची गोष्ट सरकारनें करूं नये, अशी त्यास वेळींच विनंति करणें आमचें कर्तव्य होय; व त्याप्रमाणें ती आज केली आहे. आजचा लेख केवळ प्रास्तविक आहे. परंतु या चळवळीस जर कांहीं जास्त स्वरूप आलें तर त्यासंबंधानें पुढें आम्हांसहि जास्त लिहावें लागेल. कांहीं ठिकाणच्या कुळकर्ण्यांस तुम्ही वतनें दहापट किंवा वीसपट किंमत घेऊन सोडतां कीं काय, असेंहि विचारण्यांत आलें असल्याचें समजतें. हें जर खरें असेल तर वेळींच या लोकांनीं सावध राहून जबाबांत न गुंततां आपल्या वतनाच्या रक्षणार्थ योग्य ती तजवीज एकजुटीनें व एकमतानें करावी, अशी आमची त्यांस सूचना आहे.

❖ ❖ ❖

* वेडरबर्नसाहेबांचा ताजा निरोप

गेल्या सालीं याच सुमारास ह्यूमसाहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांस जें पत्र पाठविलें होतें त्यांतील सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे, व मुख्यतः हिंदुस्थानांतील लोकांची बाजू विलायतेंतील लोकांपुढें चांगल्या रीतीनें मांडली जाण्यास राष्ट्रीय सभेनें आपल्या कामाची दिशा बदलली पाहिजे. असें दोन अठवड्यांपूर्वी मुंबई येथें भरणाऱ्या विसाव्या राष्ट्रीय सभेसंबंधानें लिहितांना, आम्हीं प्रतिपादन केलें होतें. कर्मधर्मसंयोगानें त्याच अठवड्यांत विलायतेंत प्रसिद्ध झालेल्या 'इंडिया' वर्तमानपत्रांत सर विल्यम वेडरबर्न यांनींहि एक लेख लिहून याच विषयाचें प्रतिपादन केलेलें आहे. गुदस्त सालीं मि. ह्यूम यानीं जसा 'निरोप' म्हणून 'हिंदुस्थान रिव्ह्यू' नामक मासिकपुस्तकांत लेख लिहिलेला होता तसाच प्रस्तुतचा लेख हाहि हिंदुस्थानाचें कैवारी वेडरबर्नसाहेब यांचा निरोप होय. मात्र हा निरोप पुढें पाठवून त्यांतील विषयाची चर्चा करण्याकरितां ते स्वतः यंदाच्या सभेचे अध्यक्ष सर हेनरी कॉटन यांचे बरोबर मुंबईस येणार आहेत. अर्थात् अशा प्रसंगीं अशा महत्त्वाच्या विषयाची सांगोपांग चर्चा समक्ष भेटींत होण्याची, व अनेक दिशांनीं पाहणाऱ्या व स्वतंत्र रीतीनें विचार करणाऱ्या ठिकठिकाणच्या

---

* [केसरी ता. २९ नोव्हेंबर १९०४]

राष्ट्रभक्तांस मन मोकळें करून बोलण्यास संधी मिळण्याची यंदाच्या सभेचे चालक व्यवस्था करतील अशी अम्हांस उमेद आहे. अशा चर्चेविषयीं हल्लीं इतकी उत्सुकता हिंदुस्थानांत पूर्वी केव्हांही उत्पन्न झालेली नव्हती. दुसरे बाजूनें पाहतां विलायतेंतही मि. केन, मि. डिग्बी वगैरे गृहस्थ परलोकवासी झाले असून मि. ह्यूम यांचा गतवर्षींचा निरोप अखेरचाच होता, आणि मि. दादाभाई नौरोजी हे अत्यंत वृद्ध झालेले असून ते फिरून इकडे येतील असा भरंवसा वाटत नाहीं. अशा स्थितींत, त्यांच्याहून कांहींसे तरुण असलेले सर विल्यम वेडरबर्न व सरकारी नोकरींतून मोकळे होऊन उत्साहानें आपल्या आवडीच्या सार्वजनिक कामांत नुकतेंच पाऊल घातलेले सर हेनरी कॉटन यांचेशिवाय ज्याचा सल्ला घेतां येईल असा प्रमुख हिंदुस्थानचा कैवारी विलायतेंत आतां बहुधा कोणी राहिलेला नाहीं. अर्थात् या उभयतांचेही विचार काय आहेत हें इकडील लोकांस कळणें व इकडील लोकांचें म्हणणें या उभयतांस कळणें, व परस्पर समाधानाकरितां प्रश्नोत्तरें होणें अगदीं जरूर असून हें काम उघडपणें सभेच्या बैठकींत होण्यासारखें नसल्यानें या चर्चेकरितां म्हणून एखादा सबंध दिवस मुंबईच्या कार्यक्रमांत रास्तून ठेवला जावा अशी आमची सूचना आहे.

यंदां ठराव करण्यास योग्य अशा सुमारें सतरा विषयांची यादी मुंबईच्या स्वागतकमिटीकडून प्रसिद्ध करण्यांत आली आहे. परंतु आमच्या मतें यांपैकीं कित्येक वगळतां येण्यासारखे असून इतर कित्येकांचा एकत्र संग्रह करतां येण्यासारखा आहे, व तसें केल्यानें सभेचें काम सालाबादपेक्षां थोडक्यांत आटोपून बाकी राहिलेला वेळ वरील महत्त्वाच्या कामाकडे देतां येईल. सभेंत भाराभर वक्त्यांकडून भाषणें करविल्यानें सभेच्या ठरावांस कांहीं विशेष प्रकारची बळकटी येते असें नाहीं; व राष्ट्रीय सभेच्या सुधारणेचें काम तर उघड सभेंत मुळींच होणारें नव्हे. अलीकडे अलीकडे तर निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या जुन्या ओळखीची उजळणी होणें व नव्या संपादन करणें आणि स्वस्थपणानें चार घटका बसून राष्ट्रीय सुखदुःखाच्या गोष्टी सांगणें हे प्रकार अगदींच बंद झाल्यासारखे आहेत. चारचारशें कोसांवरून दव दव करून यावें व राष्ट्रीय सभेच्या उघड्या बैठकींतील कंटाळवाणा भाषणसमारंभ रोज सहा सहा तास पहाण्याचें श्रम करून ठिकठिकाणच्या लोकांच्या ओळखी न करितां व पुढारी व अनुगामी यांच्याशीं होणाऱ्या संभाषणांचा फायदा न मिळतां टपालांत टाकलेल्या एखाद्या पत्राप्रमाणें तडक परत जाण्यास भाग पडावें, यामुळें राष्ट्रीय सभेचे जे आनुषंगिक म्हणून फायदे आहेत त्यांचाही दिवसेंदिवस लोप होत चालला आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत आणून यंदां सभेच्या बैठकीच्या कार्यक्रमाची योजना करण्यांत येईल अशी आम्हांस आशा वाटते.

सर विल्यम वेडरबर्न यांनीं 'इंडिया' पत्रांत जो लेख लिहिलेला आहे, तो कांग्रेसच्या औपचारिक भक्तांनीं अवश्य वाचण्यासारखा आहे. त्यांतून कांग्रेस सभेनें आतां कांहीं तरी नवी दिशा काढल्याशिवाय तरणोपाय नाहीं असें कोणी म्हटल्याबरोबर त्यावर कांग्रेसद्रोही म्हणून तुटून पडणाऱ्या गृहस्थांनीं तर या लेखाचें विशेष मनन करावें अशी त्यांस आमची शिफारस आहे. कांग्रेस सभेचें मुख्य धोरण म्हटलें म्हणजे विलायतेंतील लोकांस बोध करून त्यांच्याकडून हिंदुस्थानांत अरेरावीनें राज्य करणाऱ्या गोऱ्या सनदी नोकरांचे कान टोंचवणें हें होय. हें काम केवळ प्रतिवर्षीं एकदां एकत्र जमल्यानें सिद्धीस जात नाहीं; याकरितां मिशनरी लोकांप्रमाणें विलायतेंत आमच्यांतील राष्ट्रभक्तांनीं जाऊन निरपेक्ष बुद्धीनें अव्याहत कांहीं वर्षें चळवळ सुरू ठेविली पाहिजे. पण आमच्याकडे पहावें तों वर्षाच्या अखेरीस पर्जन्य सूक्तांतील मंडूकांप्रमाणें कोणी "गोमायु" तर कोणी "अजमायु" "घाता यथा पूर्वमकल्पयत" ह्या मंत्रानें संवत्सरकृत्य उरकून घेतात. हें कृत्य चांगलें नव्हे, तेवढ्यानें राष्ट्रीय सभेची इतिकर्तव्यता संपत नाहीं, सभेचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं विलायतेंत हिंदु लोकांचें कायमचें "राजकीय मिशन" स्थापन झालें पाहिजे असें सर डब्ल्यू यांनीं पुनः सांगितलें आहे. या लेखावरून ना. मेथा यांनीं गुदस्त सालीं मद्रास येथें राष्ट्रीय सभेच्या कामाची जी संकुचित व्याप्ति प्रतिपादन केली होती ती निदान वेडरबर्नसाहेबांस तरी मान्य असेल असें आम्हांस वाटत नाहीं. वर्षांतून दोन दिवस एकत्र जमून विवक्षित विषयांवर सर्व राष्ट्राचे वतीनें कांहीं ठराव पास केले म्हणजे राष्ट्रीय सभेचें काम झालें, व एरव्हींचें म्हणजे शुष्क ओरडाओरडीचें काम वर्तमानपत्रें वर्षभर करीतच असतात, आणि अशा रीतीनें हिंदुस्थानांतील कायदेशीर चळवळींचें काम संपूर्ण होतें असेंच बहुधा ना. मेथा यांचें मत दिसतें. परंतु वेडरबर्नसाहेबांचें मत याहून वेगळें आहे. त्यांच्या मतें तर बॅरिस्टराला कजा लढण्याकरतां सॉलिसिटर किंवा दुय्यम वकील जें ब्रीफ तयार करून देतो त्याची व राष्ट्रीयसभेच्या ठरावांच्या पुडक्यांची योग्यता सारखीच आहे. म्हणजे बॅरिस्टर आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून आपलें वाक्चातुर्य लढवून, घाम फुटेपर्यंत भांडून व वेळीं आपल्या पक्षकारांशीं क्षणभर एकजीव होऊन उसन्या मनोविकारांचा आविर्भाव दाखवून, क्वचित् आपलें वजनही खर्ची न घालील तर वकीलसाहेबांचें ब्रीफ त्यांच्या पिशवींत व खटल्यांची हकीकत त्या पिशवींतील ब्रीफांत अशी जेथल्या तेथें राहून न्यायमूर्ति एकतर्फीच निकाल देतील. तीच गोष्ट राष्ट्रीय सभेच्या ठरावांसही लागू आहे. या ठरावांत राष्ट्रीय चळवळींतील सर्व प्रश्नांवर प्रजेच्या तर्फे जें जें काय म्हणून प्रतिपादन करतां येण्यासारखें आहे तें थोडक्यांत व उत्तम शब्दांनीं संग्रहित करून ठेवलेलें असेल. परंतु ज्यांचेकडून या म्हणण्याचा विचार व्हाव-

याचा आहे त्यांचे कानावर जर तें म्हणणें गेलेंच नाहीं तर त्याचा काय उपयोग ? एखाद्या रोगाचें बरोबर निदान झालेलें आहे व त्यावर चालणारी रामबाण मात्राही मिळण्यासारखी आहे. परंतु ती जर वैद्यबुवांचे पोतडींतल्या डबींतच राहील, तिला बाहेर काढून तिचे चार वळसे उगाळून ती रोग्याचे तोंडांत ओतणारा कोणी मिळणार नाहीं, तर रोग साध्य असून व औषध मिळणारें असूनही अखेर रोग्यास परलोकचीच वाट धरावी लागणार ! याच न्यायानें, हिंदुस्थानांतील प्रजेचा पक्ष सर्वस्वी न्यायाचा आहे व विलायतेंतील लोक न्यायप्रिय आहेत, या दोन्ही गोष्टी खऱ्या असल्या तरी त्यांचा संबंध जेणेंकरून घडून येईल अशी कांहीं तरी संघायक संस्था किंवा योजना झाल्या-शिवाय हिंदुस्थानांतील लोकांस न्याय मिळेल अशी आशा करणें व्यर्थ आहे. मुद्रा-राक्षसांतील एका पात्रानें म्हटल्याप्रमाणें 'हिमवति दिव्यौषधयःशीर्शे सर्पः समाविष्टः' अशी प्रस्तुत हिंदुस्थानची स्थिति झाली आहे. म्हणजे सर्प तर मानेस विळखा घालून आ पसरून उभा आहे, आणि सर्पविषावर वस्ताद अशा दिव्य औषधीहि आहेत, पण त्या राहिल्या हिमालय पर्वतावर एवढेंच काय तें ! त्याचप्रमाणें लॉर्ड कर्झनसाहेब फिरून ताज्या दमानें हिंदुस्थानावर आपल्या कुटिल राजनी-तिरूप शस्त्राचे घांवावर घांव घालण्यास ' सायुध व सशक्तिक ' असे सज्ज होऊन विलायतेंतून हिंदुस्थानास यावयास निघाले आहेत, व त्यांना रागालो-भाचे दोन शब्द सांगून किंवा दटावून आळा घालूं शकतील असे न्यायप्रिय लोक राहिले विलायतेंत ! व त्यांचे हिंदुस्थानाविषयीं ज्ञान पहावें तर तेंही हिंदुस्थान व विलायत यांजमध्यें असलेल्या समुद्रापेक्षां अगाध !! अशा स्थितींत कायदेशीर चळवळ करावयाची म्हटलें तरी ती किती कठिण आहे, व केवळ राष्ट्रीयसभेंत ठराव पास करून ती चळवळ पूर्ण होऊं शकणार नाहीं हें कोणा-च्याहि लक्षांत येईल.

हिंदुस्थानचे गव्हर्नर–जनरल व विलायतेंतील न्यायप्रिय लोक यांमध्यें अनेक अभेद्य असे कोट आहेत; व हे कोट एकामागून एक सर केल्याशिवाय हिंदु-स्थानांतील हांक विलायतेंतील लोकांच्या कानीं जाणें बहुधा अशक्य झालेलें आहे. या दरम्यानच्या कोटांतून धक्के खात खात जेव्हां वर पोंचावें व सर्वांत वरिष्ट पायरीच्या अधिकाऱ्यांचा हुकूम मिळवावा तेव्हां तो धक्के खात खात कालांतरानें खालीं येऊन पोंचणार. एखाद्या स्थानिक सरकारानें एखादें अन्या-यायाचें कृत्य केलें असें आपण समजूं. या कृत्याची दाद लावावयाची असल्यास प्रथम हिंदुस्थानसरकाराकडे अर्ज करावे; तेथून पुढें स्टेट सेक्रेटरीकडे धांव घ्यावी; तेथेंही काम न झालें तर कोणा अनाथाच्या वालीच्या कच्छपीं लागून पार्लमेंटमध्यें रडगाणें गावें, व अधिकारारूढ असलेल्या पक्षानेंहि वाटाण्याच्या अक्षता लाविल्या म्हणजे मग ' गौरिहराचें पूजन करीत बसणाऱ्या वधूप्रमाणें '

त्यांचा प्रतिपक्ष अधिकारारूढ होऊन येईल काय अशी आशा मनांत बाळगून आपल्या कर्माला दोष लावीत किंवा ईश्वराची प्रार्थना करीत स्वस्थ बसावें. ही हल्लींची आमच्या चळवळीची सोपानपरंपरा आहे ! याचें वर्णन वेडरबर्न साहेबांनीं विलायतेंतील मुलांच्या एका 'कावळा चिमणी'च्या गोष्टीचें रूपानें विनोदात्मक रीतीनें केलें आहे.या गोष्टीशीं सदृश अशी गोष्ट आपल्या इकडील भातुकली खेळणारीं मुलेंहि सांगत असतात. तिची आठवण आम्ही आमच्या प्रौढ वाचकांस करून देतों. चिमणीचें मोतीं कावळ्यानें उपटलें. तेव्हां चिमणाबाईनें कावळ्याला उडवून देण्यास झाडास विनंति केली. झाड कबूल होईना तेव्हां तें तोडण्यास सुताराला सांगितलें. सुतार नाकबूल झाला म्हणून अशा अनुपकारी मनुष्यास शासन करण्यास तिनें राजास विनंति केली. राजास चिमणीचें सुखदुःख काय कळणार ? तेव्हां त्यानें नाहीं म्हटल्यावर त्याची गुरुकिल्ली हातीं असणाऱ्या राणीस राजावर रुसून हा महत्त्वाचा व्यवहारनिर्णय करण्यास तिनें सांगितलें. परंतु स्त्रियांसहि स्त्रियांची सहानुभूति नेहमींच वाटते असें नाहीं. तेव्हां सरळ उपाय थकल्यानें चिमणीनें उंदरास राणीचीं भरजरी वस्त्रें फाडण्यास सांगितलें; व तेथून आपला अर्ज तिनें अनुक्रमें मांजर व कुत्रें येथपर्यंत नेऊन कुत्राहि ऐकेना, तेव्हां एक लठ्ठसा सोटा गांठून त्यांस कुत्र्याचे पाठींत बसण्याची तिनें विनंति केली. तेव्हां सोटा कबूल झाला व तो कुत्र्याचे पाठींत बसतांच कुत्र्यानें मांजरास, मांजरानें उंदरास अशी दहशत घालण्याचें काम सुरू होऊन शेवटीं पेंड पोंचत पोंचत झाडापर्यंत आला व झाडानें जेव्हां कावळ्यास हुसकून लावण्याचें कबूल केलें तेव्हां कावळ्याचा निरुपाय होऊन अर्जदार चिमणीस न्याय मिळून तिचा मोती तिला परत मिळाला ! याच गोष्टीच्या दुसऱ्या एका आवृत्तींत सोट्यानेंहि नाकबूल केल्यामुळें चिमणीस तो जाळून टाकण्यास अग्नीकडे, अग्नि विझविण्यास समुद्राकडे, समुद्र पिऊन टाकण्यास हत्तीकडे व हत्तीचे कानांत शिरण्यास मुंगीकडे दाद मागावी लागली. परंतु मुंगीहि नाकबूल झाली, तेव्हां चिमणीनें आपलें छोटेखानी विश्वरूप दाखवून 'तुला खाऊन टाकतें' म्हणून आपली चोंच उघडली ! तेव्हां मुंगी कबूल होऊन उलट पेंड पोंचत पोंचत शेवटीं चिमणीस न्याय मिळाला ! या व अशा प्रकारच्या मुलांच्या गोष्टींत नेहमीं बरेंच शहाणपण सांठविलेलें असतें; व विनोदशील पण मार्मिक अशा मनुष्यास अशा गोष्टींचा उपयोग मोठमोठे राजकीय प्रश्न सोडविण्यासहि होण्यासारखा आहे. विलायती गोष्टींत अखेर जेव्हां एका परोपकारी चांडाळानें एका अनुपकारी मनुष्यास फांसावर चढविण्याचें कबूल केलें तेव्हां गोष्टींतील म्हाताऱ्या बाईचें कार्य झालें. इकडल्या गोष्टींत अखेर न्याय एका परोपकारी सोट्यानें देवविला, व त्याच गोष्टीच्या दुसऱ्या आवृत्तीप्रमाणें स्वतः चिमणीनें जेव्हां आपली चोच मुंगीला खाण्याकरितां

पाजळली तेव्हां तिला न्याय मिळाला. तात्पर्य, उद्योग करितां करितां कोणा तरी समर्थ व परोपकारी अशा विभूतीची गांठ पडते, किंवा आपल्या अंगीं जें काय सामर्थ्य असतें त्याचाच स्वावलंबनाचे तत्त्वावर उपयोग करण्यास मनुष्य जेव्हां प्रवृत्त होतो तेव्हांच त्याची कार्यसिद्धि होते. आजपर्यंतचे इतिहासांत केवळ न्याय मागणाऱ्या अर्जदारांनाही अखेर हस्तेंपरहस्तें सोऱ्याचाच आश्रय करावा लागला आहे, व न्याय मिळविण्याचे कामीं आपल्या पंचप्राणांसह इह-सर्वस्वाचा बळी देण्यास तयार व्हावें लागलें आहे. परंतु ही अर्थात् अखेरची पायरी होय, समशक्तीच्या राजे लोकांनींही जर प्रथम सामदामाचाच उपयोग विहित म्हणून राजनतींत सांगितला आहे, तर न्याय व हक्क देणारे व घेणारे यांच्या शक्तीमध्यें जमीन—अस्मानचें अंतर असतां सामोपचार अर्थात् कायदे-शीर चळवळ हिच प्रथम करणें जरूर आहे, व ती सर्वांगांनीं पूर्ण होईपर्यंत वाट पाहणें हें प्रजेचें एका दृष्टीनें कर्तव्य आहे.

परंतु ही कायदेशीर चळवळ वर सांगितल्याप्रमाणें केवळ ठराव पास करून पूर्ण होणार नाहीं. हें काम मुख्यतः उद्योगाचें व स्वार्थत्यागाचें आहे. जे लोक आजपर्यंत राष्ट्रीय सभेस खर्च झालेल्या रकमा मांडून त्यांच्या बेरजेच्या प्रमा-णानें आमचें राष्ट्रकार्य काय झालें आहे तें द्या असें म्हणून हात पुढें करितात त्यांना राष्ट्रीय प्रगतीचीं मूलतत्वेंच कळलीं नाहींत असें म्हणण्यास आम्हांस मुळींच प्रत्यवाय वाटत नाहीं. राष्ट्रीय कार्याचा कोणास मक्ता दिलेला नाहीं अगर कोणी घेतलेला नाहीं, कीं वेळोवेळीं कामाप्रमाणें पैशाचा अगर पैशा-प्रमाणें कामाचा आपण मेळ घालूं पहावें. राष्ट्रीय सभेचे बैठकीस पांच पन्नास हजार रुपये खर्च होतात हें खरें. परंतु ते सोडून दिले असतां उभ्या सालांत हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांशीं वाद करण्यांत अगर विलायतेंतील न्यायप्रिय लोकांचा मनोनुनय करण्यांत सर्व हिंदुस्थानांतील लोकांचे मिळून किती पैसे खर्च होत आहेत, अगर सुशिक्षण पावलेल्या हजारों लोकापैकीं किती व्यक्तींनीं आपला किती वेळ या कामीं खर्च केला आहे हें कोणी सांगेल काय ? या कामीं राष्ट्रीय सभेच्या हेतूंची व्याप्ति संकुचित मानणाऱ्या पुढाऱ्यांची जितकी चूक आहे तितकीच पण आणेपैच्या हिशेबाशीं देशकार्य वरचेवर मिळवून पाहणाऱ्या अनुगामी लोकांचीही चूक आहे असें आम्हांस वाटतें. निराशावाद हा नेहमीं विपन्न स्थितींतील लोकांस सदाशावादापेक्षां अधिक प्रिय वाटावा हा स्वाभाविक नियमच आहे. परंतु ज्यांनीं कोणत्याही प्रकारचा उद्योग केलेला नाहीं अगर स्वार्थत्याग केलेला नाहीं अशा आळशी, उदरपरायण अशा लोकांस अमंगळ दिवाभीताप्रमाणें निराशावादाचा दगड उगाळीत बसून राष्ट्रीयसभा काय किंवा दुसऱ्या सार्वजनिक उपयोगाच्या संस्था काय, त्या-पासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें नाहीं असा अभिशाप देत त्यांस अल्पा-

युष्य चिंतण्याचा अधिकार कसा पोंचतो हें आम्हांस तरी कळत नाहीं. आक्षेपच व्यावयास बसलें असतां वाटेल ती गोष्ट निरुपयोगी ठरवितां येते. ज्यांस स्वदेशांत चळवळ करण्याचे उद्योगाचा कंटाळा त्यानीं सहजच म्हणावें कीं हिंदुस्थानांत ओरडून तुमचें कोण ऐकणार ? व विलायतेंत आपले लोक जाऊन मोरे चळवळ करून सोडतील ही धाडसी कल्पना करतां येईल इतकें विस्तृत अगर धैर्यशील असें ज्यांचें मन नाहीं त्यांनीं अर्थातच आयर्लंडचें उदाहरण देऊन म्हणावें कीं, विलायतेंत चळवळ करून किंबहुना पार्लमेंटांत शिरून तरी काय उपयोग ? आयर्लंडतर्फे पार्लमेंटांत ऐंशी सभासद असून व ग्लॅडस्टन व मोर्ले यांचेसारखे सहाय्यकर्ते असून गेल्या शंभर वर्षांत आयर्लंडास काय मिळालें ? परंतु भित्र्या माणसास ज्याप्रमाणें अंधेरांत भुतें नाचलेलीं दिसतात त्याचप्रमाणें निरुद्योगी व निरुत्साही माणसाचे वाटेंत अडचणींचे डोंगर नेहमीं उभे असावयाचेच.

आतां येवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं अमुक एकाच उपायानें अमुक इतकी कार्यसिद्धी होईलच असें सांगतां येणार नाहीं, तरी त्या प्रत्येकापासून अंशतः कार्यनिष्पत्ति झालीच पाहिजे. कोणता मार्ग कोणी स्वीकारावयाचा हें मात्र ज्याचें त्यानें अपल्या बुद्धीप्रमाणें, शिलाप्रमाणें व कर्तृत्वाप्रमाणें ठरविलें पाहिजे. कित्येकांस वेडरबर्न साहेब म्हणतात त्याप्रमाणें विलायतेचे लोक न्यायप्रिय असतांही थोडक्याच दिवसांत कान्सव्हेंटिव्ह पक्ष अधिकारावरून दूर होऊन त्याचे जागीं लिबरल पक्ष येईल व त्यामुळें आम्हांस त्याच उलाढालींत सहानुभूतिपूर्ण असा एकादा स्टेटसेक्रेटरी व गव्हर्नर जनरल मिळेल असें वाटत असेल; तर कित्येकांस या एकाच उलाढालीनें कांहीं विशेष निष्पन्न होणार नाहीं व अनकूल अशा आणखी कित्येक उलाढाली होईपर्यंत थांबावें लागेल असें वाटण्याचा संभव आहे. परंतु वेडरबर्नसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें, वर्तमानपत्रें, भाषणें वगैरेंच्या योगानें हिंदुस्थानांत जी थोडीबहुत चळवळ होते तशी व जमल्यास त्याहूनही अधिक चळवळ विलायतेंत झाली पाहिजे हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. व जर केवळ राष्ट्रीय सभेच्या खर्चास पैसे देण्याचें तेंच तेंच काम करून कोणास कंटाळा आला असेल तर विलायतेंत चळवळ करण्याच्या कार्यभागास काय थोडी पैशाची गरज आहे ? वेडरबर्नसाहेबांचें मतानें हिंदुस्थानांतील लोकांनीं निराश न होतां आपलीं गाऱ्हाणीं विलायतच्या लोकांपुढें राजकीय मिशनरी बनून मांडण्याची "सोन्यासारखी" संधी आतां आली आहे, आणि ती जर आम्ही गमावली तर त्याचा दोष सर्वस्वीं आमचेकडे आहे. उघडच आहे कीं, विलायतेंतील लोकमत बदलणें हेंच जर आपलें तूर्त मुख्य कार्य तर त्याबद्दल होणारा प्रयत्न विलायतेतच जारीनें अव्याहत सुरू झाला पाहिजे; व त्याकरितां मिशनरीप्रमाणें या कार्यास

वाहून घेऊन सतत उद्योग करण्यास आमच्या पुढाऱ्यांनीं तयार झालें पाहिजे. एकट्या दुकट्या दादाभाईंच्या हातून काहीं व्हावयाचें नाहीं. विलायतेंतील लोकांपुढें चिकाटीनें आपलीं दुःखें मांडून आम्ही जेव्हां त्यांस सळो का पळो करून सोडूं तेव्हांच आमची कोठें दाद लागणार ! पण दुःखाची गोष्ट ही, कीं ह्या महत्त्वाच्या कार्यभागाकडे दरवर्षीं होईल तितकी डोळेझांक होत आहे. परंतु अशानें फार दिवस निभाव लागणार नाहीं हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. ह्यूम व वेडरबर्न हे दोघेही आज कित्येक वर्षें हेंच म्हणत आहेत त्याचा राष्ट्रीय सभेच्या हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनीं जर लौकर विचार केला नाहीं तर कायदेशीर राजकीय चळवळीस लौकर यश न आल्याचा दोष त्यांस आपल्या माथीं घ्यावा लागेल. तात्पर्य, यथाशक्ति उद्योग व स्वार्थत्याग करण्याचा ज्यांचा निश्चय झाला असेल अशांनीं येत्या राष्ट्रीय सभेचे वेळीं आपापल्या सूचना मनाशीं ठरवून यावें, व असें झालें असतां ज्याचा मनास हृद्रोग लागलेला आहे अशा विषयाबद्दल त्यांचें थोडेंबहुत शंकासमाधान होण्याचा संभव आहे. आणि असें व्हावें याकरितां खाजगी रीतीनें वेडरबर्नसाहेब, सर हेनरी कॉटन वगैरे लोकांची व इकडील लोकांची कांहीं वेळ स्वस्थपणें गांठ पडेल अशी योजना समेच्या कार्यक्रमाचे योजकांनीं करावी असें आम्ही त्यांस सुचवितों.

❁ ❁ ❁

* जपान आणि हिंदुस्थान

रुसो–जपानी युद्धांत अलीकडे जपानची जी सरशी झाली आहे, किंबहुना प्रथमपासूनच जपानास जें यश मिळत आहे, आणि एकंदर सर्व मोहिमेंत जपानच्या लोकांनीं जें शौर्य आणि युद्धकलेचें प्राविण्य दाखविलें आहे तें पाहून किंवा ऐकून पुष्कळ युरोपियन लोकांच्या मनांत एशिया खंडांतील लोकांच्या सामर्थ्याबद्दल अनेक नव्या कल्पना उद्भवत आहेत; व त्यांपैकीं कांहीं कांहीं वेळोवेळीं आम्हीं ह्या पत्रांत दाखलही केल्या आहेत. एशियांतील लोक शरिरानें कितीही बळकट असले, अथवा ऊन, तहान सोसण्याची त्यांचे अंगांत कितीहि शक्ति असली, किंवा व्यक्तिशः ते कितीही शूर असले, तथापि त्यांच्यामध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना नसल्यामुळें युरोपियन लोकांच्या साहाय्याखेरीज त्यांस कोणत्याहि युरोपियन राष्ट्राबरोबर टक्कर देतां यावयाची नाहीं, असा युरोपियन लोकांचा आजपर्यंत

---

* [केसरी ता. ६ डिसेंबर १९०४]

समज होता. किंबहुना एशिया, आफ्रिका आणि अमेरिका हीं तिन्हीं खंडें युरोपियन लोकांना चरण्याकरितांच ईश्वरानें निर्माण केलीं आहेत, व जेथें वसाहत करणें शक्य नाहीं तेथें जे काळे लोक असतील त्यांस जिंकून त्यांच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या पिकापैकीं जेमतेम पोटापुरतां भाग त्याजला ठेवून बाकीचा सर्व युरोपियन लोकांनीं आपापल्या राष्ट्राच्या अभिवृद्धयर्थ घ्यावा, हेंच त्यांचें कर्तव्य आहे; इतकेंच नव्हे तर युरोपियन लोक असें न करतील तर देवाच्या घरीं ते अपराधी ठरतील, अशी चांगल्या चांगल्या युरोपियन ग्रंथकारांची समजूत होती. रुसो–जपानी युद्धामुळें–मग या युद्धांत अखेर जय कोणासहि मिळो–ही समजूत बरीच पालटली आहे किंवा पालटत चालली आहे, हा एक ऐतिहासिक दृष्टया हल्लींच्या युद्धापासून होणारा मोठा फायदाच समजला पाहिजे. एशियांतील लोकांस केवळ शिपायाचें काम न सांगतां जर त्यांस आधुनिक युद्धकलेचें चांगलें शिक्षण दिलें आणि त्यांचपाशीं शस्त्रास्त्रांचा किंवा युद्धांत लागणाऱ्या इतर साधनांचा भरभक्कम पुरवठा असला तर एशियांतील लोकांचें सैन्य एशियांतीलच सेनानायकांच्या देखरेखीखालीं उत्तम उत्तम युरोपियन सेनानायकांच्या युरोपियन सैन्याबरोबर टक्कर देण्यास तयार होतें, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. सारांश, युरोपियन आणि एशिआटिक यांच्यामध्यें या बाबतींत हल्लीं जो भेद दृष्टीस येतो तो नैसर्गिक नाहीं, कृत्रिम आहे, आणि एशियांतील लोकांस नवीन शस्त्रास्त्रें व इतर सामग्री आणि शिक्षण जर पाश्चिमात्य देशांतील लोकांप्रमाणें मिळेल तर एशियांतील राष्ट्रें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्यास कोणतीहि अडचण पडणार नाहीं, हें पुष्कळ लोक आतां कबूल करूं लागले आहेत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या अंगीं निरनिराळे गुण कमी अधिक प्रमाणानें वास करीत असतात हें खरें; परंतु हा गुणावगुणांचा भेद जरी वास्तविक असला तथापि एशियांतील राष्ट्रांनीं सदैव युरोपियन राष्ट्रांच्या कह्यांत राहिलें पाहिजे असा कांहीं देवदत्त अवगुण एशियांतील लोकांच्या अंगीं नाहीं हें वाचेनें नव्हे, तर कृतीनें जपानी लोकांनीं सर्व जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे.

असो. या विषयावर यापेक्षां पुष्कळ जास्त लिहिण्यासारखें आहे, व तें केव्हां तरी लिहिण्याचा आमचा विचारहि आहे, परंतु आजचा प्रश्न त्याहून थोडा निराळा आहे, व तो मद्रासचे लॉर्ड बिशप यांनीं जें नुकतेंच एक मद्रासेकडे मापण केलें, त्यावरून सुचलेला आहे. जपानी राष्ट्र पाश्चिमात्य शिक्षणानें आणि पाश्चिमात्य शस्त्रें व युद्धकला यांच्या अभ्यासानें जर चाळीस वर्षांत इतक्या उदयास आलें, तर हिंदुस्थानांतील लोकांस सदर शिक्षण गेल्या शंभर वर्षें मिळत असतां आणि युरोपांतील राष्ट्रांमध्यें पहिल्या प्रतींत गण-

लेल्या इंग्रजी राष्ट्राचा व हिंदुस्थानचा इतक्या वर्षें सतत सहवास असतां हिंदुस्थान देश असा कां मागें पडावा आणि जपाननेंच कां पुढें यावें, याचें या मद्रासी बिशपास मोठें गूढ पडलें आहे. हा प्रश्न लॉर्ड बिशप यांसच सुचला आणि इतरांस सुचला नाहीं असें नाहीं. जपानचें शौर्य, एकोपा आणि सरशी हीं पाहून हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यांपुढें वर सांगितलेला प्रश्न उभा राहिला आहे व रहात आहे. हिंदू लोक जपानी लोकांपेक्षां शरीरानें किंवा बुद्धीनें कोणत्याही प्रकारें कमकुवत नाहींत. मग पाश्चिमात्य विद्या जपानी लोकांस अमृताप्रमाणें व्हावी आणि आमच्या लोकांस मात्र तिनें मदिरेप्रमाणें बेहोष करावें यांतील इंगित काय असें प्रत्येक विचारी मनुष्य विचारल्याखेरीज राहणार नाहीं. " विषमप्यमृतं क्वचिद्भवेद् अमृतं वा विषमीश्वरेच्छया " या कोटींतील हा दैवी चमत्कार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं; आणि दैवी चमत्काराचें समाधान बाजूला ठेवलें म्हणजे मग वर निर्दिष्ट केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें दोनच प्रकारचीं होऊं शकतात. पहिलें उत्तर असें कीं, जपानास जें पाश्चिमात्य शिक्षण मिळालें किंवा जपानी लोकांनीं आपण होऊन संपादन केलें तशा प्रकारचें शिक्षण हिंदुस्थानांतील लोकांस मिळत नाहीं. दोन्ही देशांतील, म्हणजे जपानांतील आणि हिंदुस्थानांतील शिक्षण पाश्चिमात्य खरें, पण एकास मिळालेलें पाश्चिमात्य शिक्षण अमृत होय आणि दुसऱ्यास मिळालेली पाश्चिमात्य मदिरा होय. सारांश, शिक्षणाच्या दिशेंत, धोरणांत आणि स्वरूपांत भेद असल्यामुळें पाश्चिमात्य शिक्षणाचें हिंदुस्थानांत आणि जपानांत निरनिराळें परिणाम घडून आलेले आहेत, असें वरील प्रश्नांचें एक उत्तर आहे. दुसरें उत्तर असें कीं, शिक्षण एकाच प्रकारचें आहे. पण " वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे " या न्यायानें पाश्चिमात्य शिक्षणाचा जपानी लोकांवर जो परिणाम झाला तो हिंदुलोकांवर होऊं शकत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे जपान आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत पाश्चिमात्य शिक्षणाचा जो परिणाम लोकांवर घडला त्यांतील भेद शिक्षणाच्या स्वरुपामध्यें फरक असल्यामुळें झाला असें एक पक्ष म्हणणें आहे, आणि दोन्ही देशांतील लोकसमाज भिन्न प्रकारचे असल्यामुळें हा भेद झाला, असें दुसऱ्या पक्षाचें मत आहे. एक पक्षीं घडलेल्या परिणामाची जबाबदारी हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांवर पडते, आणि दुसऱ्या पक्षीं देशांतील लोकांवर पडते हें उघड होय. अशा स्थितींत जो तो आपल्यावरील जबाबदारी टाळून ती लोकांवर टाकण्यास तयार झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. मद्रासी बिशप हे याच वर्गांतले आहेत. यांच्या भाषणाचा इत्यर्थ असा आहे कीं, इंग्रजी राज्यकर्त्यांनीं जें पाश्चिमात्य शिक्षण हिंदुस्थानांतील लोकांस दिलें तें हिंदी लोकांच्या अवगुणामुळें त्यांच्या अंगीं जसं मुरावं तसं मुरलें नाहीं. त्यांतहि त्यांचा मुख्य अव-

गुण म्हटला म्हणजे जातिभेद होय. जपानी लोक पाश्चिमात्य शिक्षण मिळाल्या-बरोबर जातिभेद मोडून ज्याप्रमाणें एक राष्ट्र होण्यास तयार झाले तसे हिंदी लोक होत नाहींत. खेरीज जपानी लोकांत पाश्चिमात्य विद्या आणि कला आपल्याशा करण्याची जी कळकळ दिसून येते तीहि हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाच्या अंगीं आढळून येत नाहीं. जुनें सोडावें कसें आणि नवें घ्यावें कसें, या विवंचनेंत त्यांचीं मनें कांट्यावर घातल्याप्रमाणें दोन्ही बाजूंकडे झुकत आहेत, त्यांत ठामपणा म्हणून कांहीं नाहीं; आणि ठामपणा नाहीं म्हणून कार्यसिद्धीहि होत नाहीं. जपानी लोकांची अशी स्थिति नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांची उन्नति, वैभव, विद्या आणि कला, या नजरेस पडल्याबरोबर जपानी लोकांनीं त्यांचें पहिल्यानें यथेच्छ सेवन केलें, इतकेंच नव्हे तर तें आपलेंसें करून घेण्याबद्दल अतिशय कळकळ व आस्था दाखवून जुन्या पुराण्यांचा अभिमान सोडून दिला, आणि नखशिखांत पाश्चिमात्य बनले. हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोक धारवाडी कांट्याच्या दांडीवर न बसतां जर निर्धास्तपणें पाश्चिमात्य शिक्षणाचा स्वाद घेतील तर तेहि जपानी लोकांप्रमाणें उदयाला येतील, असा बिशपसाहेबांनीं अखेरीस आशीर्वाद दिला आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, बिशपसाहेबांचें हें मत राजकीय पक्षाचें आहे; आणि राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर याच मताचा हिंदी लोकांत अधिक प्रसार व्हावा, अर्थात् हिंदी लोकांस आपल्याच अंगीं कांहीं अवगुण आहेत असें वाटूं लागावें, हें इष्ट आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट हीच कीं, या मतास सत्याचें जसें पाठबळ असावें तसें नाहीं. जपानी लोकांनीं जें शिक्षण संपादन केलें तेंच हिंदुस्थानांतील लोकांस मिळत आहे असें मानणें हीच पहिली चूक होय. उदाहरणार्थ लष्करीच शिक्षण घ्या. युरोपियन सैनानायकांनीं केलेले हुकूम समजून घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यास जितकें लष्करी ज्ञान अवश्य लागतें तेवढेंच हिंदुस्थानच्या लष्करांतील काळ्या शिपायांस व अंमलदारास देण्यांत येतें. हत्यारें तयार करण्याचे किंवा सर्व प्रकारच्या नवीन शास्त्रास्त्रांचा उपयोग कसा करावा हें शिकविण्याचे कारखाने किंवा शाळा राज्यकर्त्यांनीं या देशांत आजपर्यंत काढलेल्या नाहींत. अशा परिस्थितींत आमच्या देशांत शरिरानें आणि बुद्धीनें मनुष्य कितीही समर्थ असला तरी तो कुरोकी किंवा ओयामा यांच्या योग्यतेस कसा चढणार ? परकीय राज्यकर्त्यांना स्वतंत्र देशांतील राज्यकर्त्यांप्रमाणें आपल्या प्रजेस लष्करी शिक्षण देतां येत नाहीं, असा याजवर कदाचित् कोणी आक्षेप घेतील; करितां ही बाब सोडून दुसऱ्या बाबीचा विचार केला तरीही अशीच शोचनीय स्थिति आढळून येते. रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, उद्योगधंदे किंवा नानाप्रकारच्या कला, या शिकण्याकरितां दरवर्षी शेंकडों विद्यार्थी जपाननें ज्याप्रमाणें गेल्या तीस चाळीस वर्षांत परदेशांत

पाठविले तसे कधीं हिंदुस्थानसरकारानें केलें आहे काय ? नाहीं म्हणायला आतां कोठें दर एक इलाख्याला दोन स्कॉलरशिपा ठेविल्या आहेत. पण देशाचें खरें हित जर करावयाचें होतें तर ह्यापूर्वी शेंकडों हिंदी विद्यार्थी परदेशांत पाठवावयास नको होते काय ? हिंदुस्थानचें राज्य मूठभर युरोपियन अधिकाऱ्यांनीं हांकणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या मदतीस लागणारे "सब्ऑर्डिनेट सर्व्हिस" मधील नोकरमंडळ तयार करण्यापलीकडे हिंदुस्थानांतील लोकांस विद्यादान देण्यांत सरकारचा जास्त कांहीं इरादा नाहीं, हें बिशपसाहेबांसहि कबूल आहे. अशा स्थितींत आमच्या युनिव्हर्सिटींतून शोधक विद्वान् गेल्या पन्नास वर्षांत बाहेर पडले नाहींत किंवा कितासाटोप्रमाणें प्लेगचे जंतु येथें कोणी शोधून काढले नाहींत, अथवा कुरोकीप्रमाणें कोणी शूर पुरुष येथें निपजला नाहीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? घरामध्यें शोभेसाठीं किंवा चैनीकरितां कुंड्यांतून लावलेल्या झाडांमध्यें आणि मोठ्या बागेंत वाढणाऱ्या झाडांमध्यें जें अंतर आहे तेंच हिंदी आणि जपानी विद्यार्थ्यांत दिसून येतें. स्वतंत्रतेचें वारें मिळून गगनचुंबी वाढलेला मंदार वृक्ष कोणीकडे आणि मेघदूतांत सांगितल्याप्रमाणें यक्षाच्या बायकोनें आपल्या रत्नवापीजवळ कौतुकानें लावलेला " हस्तग्राह्यस्तबकनमित " बालमंदार कोणीकडे ! हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिटींतून किंवा इतर नोकरस्थान्यांतून जे विद्वान् बाहेर पडतात ते या बालमंदारवृक्षासारखे होत. ते गोंडस राहावे, त्यांचीं फलेंपुष्पें युरोपियन अधिकारी वर्गास फार प्रयास न पडतां लीलेनें खुडतां यावीं, अशा बेतानेंच त्यांची वाढ होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यांत येते. परंतु मौज ही कीं, त्यांची अशा प्रकारची वाढ झाल्यावर फिरून " शूरोऽसि कृतविद्योऽसि दर्शनीयोऽसि पुत्रक यस्मिन् कुले समुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते " म्हणून त्यांसच उलट दोष देण्यांत येतो. बिशपसाहेबांच्या कोटिक्रमांत जी मोठी चूक आहे ती हीच होय. हिंदुस्थानांतील राज्यकर्ते— मग ते परकीय आहेत म्हणून म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें म्हणा— आम्हांस स्वतंत्र देशांतील लोकांस योग्य असें शिक्षण देत नाहींत, किंवा देऊं इच्छित नाहींत, हीच काय ती मुख्य गोम आहे. आणि ती झांकून ठेवून ज्ञातिभेद वगैरे सबबीवर लोकांस दूषणें देणें म्हणजे "चोराच्या उलट्या बोंबा" या न्यायानें आमच्या दुःखावर डाग देण्यासारखें आहे. बिशपसाहेबांस ही गोष्ट कळत नसेल असें नाहीं. परंतु करतात काय ? पाश्चिमात्य शिक्षणानें जपानइतका हिंदुस्थान सुधारला नाहीं हें तर निर्विवाद आहे. अर्थात् त्याचा दोष कोणावर तरी लादला पाहिजे. राज्यकर्त्यांवर लादावा तर ते पडले आपल्या ज्ञातिचे; तेव्हां हिंदी लोकांवर दोषाची गोणी लादून बिशपसाहेब मोकळे झाले आहेत. पण आम्ही त्यास सविनय असें कळवितों कीं, ह्या त्यांच्या हातचलाखीनें किंवा " अशुभवर्तमानानें " फसून जाण्याइतके मूर्ख आतां आम्ही

राहिलों नाहीं. जपान चाळीस वर्षांत पुढें येऊन पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसलें आणि आम्ही दर वर्षीं अधिकाधिक हताश, हतवीर्य आणि परकीयांचीं ओझीं वाहणारे बनत चाललों, याचा योग्य खुलासा जर कोणास पाहिजे असेल तर तो ' स्वतंत्रता ' या एकाच शब्दानें होईल. स्वतंत्रता म्हणजे हिंदुस्थानावरील हल्लींचें राज्य जाऊन दुसरें झालें पाहिजे असें नाहीं, तर हिंदुस्थान देश इतर वसाहतींप्रमाणें आपापलें काम पहाण्यास समर्थ व मोकळा असला पाहिजे. तसें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत अमृत म्हणून पाश्चिमात्य शिक्षणाची मदिराच आमच्या वांट्यास येणार, आणि तिनें आम्हांस गुंगी आल्यास त्याचा दोष जातिभेदाकडे न जातां हल्लींच्या राज्यव्यवस्थेच्या कपाळींच बसणार हें उघड आहे. मग राज्यकर्त्यांच्या जातींतील मद्रासी बिशपासारखे लोक कांहींहि म्हणोत.

❖ ❖ ❖

*वेळ तर हीच आहे !

आम्ही गुदस्तां व यंदां कांग्रेससंबंधानें जे लेख लिहिले ते वाचून कांहीं ' तातस्य कपोऽयमिति ब्रुवाणाः ' आमच्यावर जरा गरम झाले आहेत. पण यंदाचा आमचा लेख लिहिल्यानंतरच सर डब्ल्यू. वेडरबर्न यांचा ' इंडिया ' पत्रांत प्रसिद्ध झालेला लेख येथें अल्यामुळें या आमच्या लेखांचा गरमपणा जरा थंडावला; आणि आमची अशी आशा आहे कीं, ता. २ डिसेंबरच्या 'इंडिया' पत्रांतील लेख वाचल्यानें तो पुरा थंडावून जाईल. सदर तारखेचा ' इंडिया ' पत्राचा अंक खरोखरच महत्त्वाचा आहे. कांग्रेस सभेनें केलें काय, तिच्या विरुद्ध कांहीं निराधार तक्रारी कोणत्या उपस्थित झाल्या, आणि तिनें आतां पुढें काय केलें पाहिजे या विषयावर या अंकांत मेसर्स ह्यूम, स्मिटन, थॉबर्न, स्विनी आणि जार्डिन या गृहस्थांचे लेख आलेले आहेत; आणि त्याचबरोबर सर हेनरी कॉटन आणि सर डब्ल्यू. वेडरबर्न हे इकडे येण्यास निघाले, तेव्हां मि. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांस जी जेवणावळ देण्यांत आली त्यावेळीं मि. दादाभाई, कॉटन, वेडनबर्न, कोर्टने, लो, हॅरिसन आणि ओडेनेल यांचीं झालेलीं भाषणेंहि छापून आलीं आहेत. कॉंग्रेस सभेनें केलेलें काम, तिचें एकंदर कर्तव्य, त्यापैकीं उरकलेला भाग आणि पुढील कामाचें धोरण व दिशा यासंबंधानें इतक्या निरनिराळ्या गृहस्थांचे विचार

---

* [केसरी ता. २० डिसेंबर १९०४]

एके ठिकाणीं केलेले दुसऱ्या कोठें क्वचितच आढळतील. मरहुम मि. डिग्बी यांचा गेल्या आक्टोबरांत प्रसिद्ध झालेला कॉंग्रेसचा लेखही याच मासल्याचा आहे. हे सर्व लेख वाचून कॉंग्रेससंबंधानें हल्लींचा लेख लिहिलेला आहे; व त्यावरून आम्हीं कॉंग्रेसच्या पुढील कर्तव्यासंबंधानें जे कांहीं थोडे लेख लिहिले आहेत ते साधार आहेत अशी कोणाहि निःपक्षपाती मनुष्याची खात्री होईल. पहिल्यानें—

कांग्रेसचा जन्म.

कसा झाला यासंबंधानें मि. डिग्बी व मि. दादाभाई यांचें जें म्हणणें आहे तें लक्षांत ठेवलें पाहिजे. कॉंग्रेससभा ही कांहीं इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशांचा संबंध तोडण्याकरितां निर्माण झालेली नाहीं असें मि. दादाभाई यांनीं सांगितलें आहे; व त्यास प्रत्यंतर पुरावा म्हणून १८५३ सालीं ब्रिटिश इंडियन असोसिएशनची मुंबईची शाखा इतर लोकाबरोबर त्यांनीं स्थापना केली, तेव्हां तिचे जे उद्देश प्रसिद्ध झाले त्यांचा हवाला दिला आहे. १८५३ सालीं मुंबईस राजकीय चळवळीकरितां सभा स्थापन करणाऱ्या गृहस्थांपैकीं एकजण पन्नास वर्षांनंतर म्हणजे १९०४ सालीं विलायतेंत तेच उद्देश तडीस नेण्याकरितां एकसारखा अव्याहत उद्योग करून भांडत आहे हें सदर गृहस्थास व आमच्या देशासहि भूषणास्पद आहे. असो; १८५३ पासून १८८३ पर्यंत हिंदुस्थानांत ज्या राजकीय चळवळी झाल्या त्या स्थानिक सभांकडून झाल्या. त्यांचे आणि पुढें झालेल्या राष्ट्रीय सभेचे उद्देश एकच होते, तरी या सर्व उद्योगांचें एकीकरण प्रथम राष्ट्रीय सभेंतच झालें ही गोष्ट निर्विवाद आहे. मि. डिग्बी म्हणतात कीं, लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत इलबर्ट बिलाचा जो वादविवाद झाला त्यानें हिंदी लोकांचे डोळे उघडून कॉंग्रेससभेचा पाया घातला गेला. लॉर्ड रिपनच्या पाठीमागून लॉर्ड डफरिन गव्हर्नर जनरल होऊन आल्यावर त्यांनींच मि. ह्यूम यांस राष्ट्रीय सभा काढण्यास उत्तेजन दिलें. इतकेंच नव्हे तर पहिल्या राष्ट्रीय सभेचे ठराव पास होण्यापूर्वी खुद्द लॉर्ड डफरिन यांस ते दाखविले होते, व त्यांनीं त्यांस हरकत घेतली नाहीं, असेंही मि. डिग्बी यांनीं लिहिलें आहे. राष्ट्रीय सभेचा उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन तिनें सुचविलेली व्यवस्था सरकारच्या व्यवस्थेस प्रतिकूल आहे असें आढळून आल्यावर हिंदुस्थानसरकार कॉंग्रेसच्या विरुद्ध झालें व मि. ह्यूम आणि मि. बेडरबर्न यांस स्वजांतीयांकडून 'राजद्रोही' म्हणून शिव्या खाव्या लागल्या ही गोष्ट निराळी; पण पूर्वपिठिका पाहूं गेलें असतां असें दिसून येईल कीं, राष्ट्रीय सभा ही कांहीं एकट्या एतद्देशीय देशभक्तांच्या परिश्रमाचें फल नव्हे. कै. न्या. रानडे, मि. डब्ल्यू. सी. बानर्जी, दिवाणबहादुर रघुनाथराव, कै. तेलंग, मि. मेहता, दर्भंगाचे

महाराज, मि. सुरेंद्रनाथ बानर्जी, कै. पंडित अयोध्यानाथ वगैरे अनेक देश-भक्तांनीं या सभेची इमारत उठविण्याचें कामीं कमजास्त प्रमाणानें साहाय्य केलेलें आहे. पण त्याचबरोबर दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, या कामास मि. ह्यूमसारख्या पेन्शनर सिव्हिल सर्व्हंटचें साहाय्य मिळालें नसतें तर अशा प्रकारची सभा इतक्या लवकर अस्तित्वांत आली नसती. सारांश, राष्ट्रिय सभेचा जन्म होण्यास हिंदुस्थानांतिल देशभक्त आणि अँग्लो-इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील मि. ह्यूम, मि. बेडरबर्न यांसारखे कांहीं उदार गृहस्थ, व लॉर्ड डफरिनसारखे व्हाइसरॉय या दोघांचीही मदत झालेली आहे. या युरोपियन अधिकाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेस कां मदत करावी ? असा एक प्रश्न निघतो. याचें उत्तर एवढेंच आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांस इंग्रजी शिक्षण मिळाल्यानें ते अधिक चौकस होऊन त्यांची महत्त्वाकांक्षाहि वाढत चालली आहे; व अशा स्थितींत जर त्यांस राज्यकारभारांत न घेतलें तर हिंदुस्थानच्या राज्यास पुढें मागें धोका आहे अशा विचाराचे कांहीं गृहस्थ सिव्हिलसर्व्हिसमध्यें आहेत. ह्या लोकांच्या मतें हिंदुस्थानच्या राज्यकार-भारांत आतां कांहीं तरी सुधारणा करणें अवश्य आहे; आणि ती सुधारणा कोणती हें जर कायदेशीर रीतीनें हिंदु लोकच सांगत आहेत तर सदर कामीं त्यांस मदत करणें आपलें कर्तव्य होय. सारांश, हे अधिकारी राष्ट्रीय सभेस जी मदत करितात ती हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य कायम राखण्याकरितांच करीत आहेत. त्यांमध्यें आणि त्यांच्या इतर बंधूंमध्यें भेद येवढाच कीं, हिंदु-स्थानांतील लोकांस सवलती दिल्याखेरीज आपलें राज्य चिरस्थायी व्हावयाचें नाहीं असें हे समजतात. आणि यांचे दुसरे बंधु आद्याप असें मानतात कीं, हिंदुस्था-नचें राज्य मनगटाच्या जोरावर जबरीनें आणि प्रजेस दुर्बळ करून किंवा त्यांचे हक्क मर्यादित ठेऊनच चालविलें पाहिजे. लॉर्ड कर्झन यानीं परवां हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधानें दोन पक्ष असूं नयेत असें मुंबईस बोलून दाखविलें. परंतु गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटांमध्येंच जोंपर्यंत वर सांगितलेला मतभेद आहे तोंपर्यंत हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधानें दोन पक्ष होणें अपरिहार्य होय. असो; याप्रमाणें राजकीय चळवळीला नवीन वळण मिळाल्यावर गेल्या वीस वर्षांत-

राष्ट्रीय सभेचें काम

काय झालें हें पाहिलें तर त्याबद्दलहि निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. सभा स्थापन होण्यापूर्वी ज्या निरनिराळ्या राजकीय संस्था होत्या त्या या सभेंत एक-वटून गेल्या. इतकेंच नव्हे, तर ज्या इलाख्यांत तशा प्रकारच्या संस्था नव्हत्या तेथें राष्ट्रीयसभेच्या शाखा म्हणून त्या उत्पन्न झाल्या; आणि त्याबरोबरच सर्व देशभर एक प्रकारची राष्ट्रीय उन्नतीसाठीं कळकळ उत्पन्न झाली. तसेंच निर-

निराळ्या इलाख्यांतील व प्रांतांतील लोक एके ठिकाणीं आल्यानें त्यांच्यामधील दळणवळण व स्नेहभाव वाढून एककार्यत्वामुळें एकराष्ट्रीयत्वाची बुद्धिहि अधिकाधिक जागृत होत चालली. आपले हक्क काय, हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य न मोडतां आपणांस कोणत्या प्रकारें राज्यकर्त्यांच्या हक्कांची बरोबरी करून घेतां येईल, किंवा आपली राजकीय उन्नति किती व कशी होईल या गोष्टींचा वीस वर्षें खल होऊन आमच्या हक्कांची व मागण्यांची दिशा बहुतेक ठरून गेली. वीस वर्षें या कामीं झालेला खर्च फार झाला अशी कित्येकांची ओरड आहे. पण यांत कांहीं अर्थ नाहीं. तीस कोट लोकांची एकवाक्यता करणें कांहीं लहानसहान काम नव्हे; व जरी त्याकरितां थोडाबहुत अधिक खर्च झाला असला तरी तो अनाठायीं झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं; किंबहुना अद्यापहि देशांतील राष्ट्रीय एकीचें काम बरेंच पुरें व्हावयाचें आहे. राष्ट्रीय सभा निघाली तेव्हां आमचे मुसलमान बंधु तिला प्रतिकूल होते. पण गेल्या वीस वर्षांत मुसलमान लोकांत शिक्षणाचा जो प्रसार झाला आहे त्यामुळें राष्ट्रीय सभेचें महत्त्व व उपयुक्तता त्यांच्या ध्यानांत येऊं लागली आहे; व हल्लींच्या धोरणावरून असें दिसून येतें कीं, लवकरच मुसलमान लोकहि राष्ट्रीय सभेस येऊन मिळतील. राष्ट्रीय सभेचे उद्देश हल्लींपेक्षांही लोकांस जास्त माहित होण्याबद्दल आणखी या देशांतच खटपट व्हावयास पाहिजे हें खरें आहे. परंतु या गोष्टी करण्यास जी उमेद लागते ती कमी होण्यासहि मध्यंतरीं बरींच कारणें झालेलीं आहेत. हीं

नाउमेदीचीं कारणें

मि. स्मिटन यांनीं आपल्या लेखांत चांगलीं नमूद केलीं आहेत. ह्यूमसाहेब म्हणतात त्याप्रमाणें कांग्रेस ही संस्था वीस वर्षें तावूनसुलाखून निघालेली आहे; आणि सभेच्या मागण्या नेमस्त असून विचारार्ह आहेत असें पुष्कळ लोकांचें आज मत झालें आहे हें खरें आहे. पण वीस वर्षांच्या उद्योगाचें हक्कप्राप्तीच्या रूपानें कांहीं दृश्य फल झालें आहे कीं काय असें पाहूं गेलें असतां एक दोन किरकोळ गोष्टीखेरीजकरून विशेष कांहीं नजरेस येत नाहीं. कांग्रेस जन्मास आली तेव्हां सर्वांस अशी उमेद होती कीं, हजारों देशभक्तांच्या मागण्या व्यवस्थित रीतीनें सरकारापुढें मांडल्या गेल्या तर सरकारकडून त्याचा योग्य विचार झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण पुढें अनुभव पहावा तो अगदीं निराळाच येऊं लागला.कॉंग्रेस सभेच्या ठरावांपैकीं निर्विवाद अशा ज्या गोष्टी होत्या त्याहि अमलांत आणण्याचें सरकारानें नाकबूल केलें. इतकेंच नव्हे तर, कांग्रेसचा उत्कर्ष न होऊं देण्याबद्दल आंग्लो–इंडियनतर्फें खटपट सुरू झाली; आणि ब्रॉडलासारखा पुरस्कर्ता मिळाला नसता तर कौन्सिलच्या सुधारणेचा कायदा

पास झाला तोही झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे. सारांश, जितकी चळवळ जास्ती तितका सरकारच्या किंवा सरकारी अधिकारी वर्गाचा रोष जास्त असें अनुभवास येऊं लागलें आहे; व कित्येकांस असेंहि वाटूं लागलें कीं, यापेक्षां चळवळ न केली तर काय वाईट ? लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत तर या अरेरावीपणाचा कळस झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे व्हाइसरॉय हुषार तर खरेच पण याची सर्व हुषारी हिंदुलोकांच्या मागण्या साफ नाहींशा करण्याकडे खर्च झालेली आहे, आणि विलायतेंतील टोरी सरकारानें ही सर्व धुमश्चक्री चालविण्यास जणुं काय यांस मुभा देऊन ताम्रपट दिला आहे. अशा स्थितींत कांग्रेस पक्षाच्या कांहीं लोकांची नाउमेद झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. आज तिबेटांत तर उद्यां इराणांत आणि परवां आफगाणिस्थानांत याप्रमाणें हिंदुस्थानच्या खर्चानें एकसारखी पुंडाई चालू आहे; हिंदी लोकांस वरिष्ठ प्रतीच्या जागा न मिळण्याचा बंदोबस्त चालला आहे; सोन्याचें नाणें केल्यामुळें तिजोरींत जी शिल्लक पडली तिचा व्यय कर कमी करण्याकडे किंवा शिक्षणवृद्धीकडे न होतां सरहद्दीवरील बंदोबस्ताकडे होत आहे; ऑफीशियल सीक्रेट ॲक्टानें नेटिव वर्तमानपत्रांचीं तोंडें आवळलीं आहेत; युनिव्हर्सिट्या सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत जाऊन वरिष्ठ शिक्षणाच्या प्रसारास धक्का बसला आहे; स्थानिक स्वराज्याचा रिपनसाहेबांनीं घातलेला पाया तोडला गेला आहे आणि एतद्देशीय राजे व संस्थानिक यांजवरहि कराचें व अपमानाचें ओझें लादण्यांत येत आहे. सारांश, कांग्रेसच्या ज्या मागण्या आहेत, त्यांच्या उलट दिशेनें लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानचा कारभार चालवीत आहेत; आणि आपल्या मागेंहि याच तऱ्हेनें राज्यकारभार चालावा अशाबद्दल बंदोबस्त करून ठेवीत आहेत. कांग्रेससभा वीस वर्षें भरत असूनहि लॉर्ड कर्झन यांच्या राज्यपद्धतीस जर आळा घालतां येत नाहीं तर तिच्या हातून पुढें होणार तरी काय ? व जर कांहीं होणार नसलें तर दरसाल एवढा खर्च तरी कशाला ? असे प्रश्न या स्थितींत सहजच उद्भवतात. गेल्या मेलनें आलेल्या ' इंडिया ' पत्राच्या अंकांत सर हेनरी कॉटन, मि. स्मिटन, सर जार्डिन वगैरे गृहस्थांनीं या प्रश्नास उत्तर देण्याचा प्रयत्न केला असून पुढील मार्गहि सुचविला आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, हल्लीं चालू असलेला कांग्रेसचा क्रम आहे तसाच चालू राहील तर त्याच्यापासून इक्क प्राप्तीच्या रूपानें जास्त कांहीं एक फायदा व्हावयाचा नाहीं. सभा, व्याख्यानें, ठराव, भाषणें, इत्यादि प्रकारें चाललेली केवळ–

हिंदुस्थानांतील चळवळ व्यर्थ

आहे, असें मि. स्मिटन यांनीं आपल्या लेखांत साफ लिहिलें आहे. ते म्हणतात कीं, कांग्रेसच्या मागण्या योग्य आहेत अशी विलायतेंतल्या लोकांची खात्री झाली पाहिजे; आणि तशी खात्री जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थान-सरकार राष्ट्रीय सभेस कधींहि भीक घालणार नाहीं. सर हेनरी कॉटन आणि सर डब्ल्यू. वेडरबर्न हे जे मुंबईस येत आहेत ते एवढ्याचकरितां होत. ह्यूम-साहेब यांनीं आपल्या पत्रांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, यंदाच्या सालीं राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे विलायतेंत चळवळ करण्याकरितां हिंदुस्थानांतून कांहीं योग्य गृहस्थ तिकडे पाठवून त्यांच्या द्वारें तिकडील लोकांपुढें मागण्या मांडणें हें होय. तशांत हल्लीं जें टोरी पार्लमेंट आहे त्याची मुदत संपून लवकरच पार्लमेंटाच्या सभासदांची नवी नेमणूक होण्याचा संभव आहे. करितां एव्हांपासूनच जर कांग्रेसच्या तर्फे कांहीं हिंदी लोक विलायतेस राहून एकसारखी चळवळ करतील तर कोणत्या ना कोणत्या तरी पक्षाकडून त्यांस थोडाबहुत लाभ झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्यांतल्यात्यांत विशेष फायद्याची गोष्ट ही कीं, सर हेनरी कॉटन (आसामचे माजी कमिशनर), मि. स्मिटन (ब्रह्मदेशचे माजी चीफ कमिशनर), सर जॉन जॉर्डिन (मुंबई हायकोर्टाचे माजी जज) यांसारखे राष्ट्रीय सभेबद्दल सहानुभूति असणारे दहा बारा अँग्लो-इंडियन गृहस्थ नव्या पार्लमेंटांत शिरण्याचा एव्हांपासूनच उद्योग करीत आहेत. यांच्या सहानुभूतीचा फायदा घेऊन आमच्याकडील दहा पांच लोकांनीं जर एव्हांपासूनच विलायतेस जाऊन त्यांचा पक्ष दृढ होण्याची खटपट केली तर काँग्रेसच्या मागण्यांपैकीं कांहीं मागण्या तरी पुढें मागें पण लवकरच हिंदुस्थानांतील लोकांस मिळतील अशी मि. स्मिटन वगैरे गृहस्थांस बळकट अशा आहे. ते म्हणतात कीं, नुसत्या हिंदुस्थानांत चळवळ करून कांहींएक उपयोग नाहीं. खरा मारा काय तो विलायतेंतच केला पाहिजे आणि तोहि शाळूसोबत्याप्रमाणें नव्हे तर विलायतेस कांहीं वर्षें कायमचें राहून नेटानें व धैर्यानें आपलें काम चालवून केला पाहिजे. त्यांतूनहि हा मारा करण्याची उत्तम वेळ म्हटली म्हणजे हल्लींचीच होय. पुनः अशी संधी कधीं येणार नाहीं, असें मि. स्मिटन यांनीं आपल्या लेखाच्या शेवटीं निक्षून लिहिलें आहे; व इतर लेखकांचाहि अभिप्राय याचप्रमाणें आहे. हा उपदेश लक्षांत घेऊन—

काँग्रसचें पुढील धोरण.

यंदा ठरविणें अवश्य आहे. वास्तविक म्हटलें म्हणजे गुदस्तांच या प्रश्नाचा निकाल लागावयास पाहिजे होता. पण तेव्हां कांहीं लोकांच्या अग्रहामुळें हा प्रश्न मागें टाकावा लागला. आम्हींच असें म्हणतों असें नाहीं तर 'अमृतबझार

पत्रिका, ' ' न्यु इंडिया ' आणि मद्रास येथील ' नेटीव स्टेटस ' व ' युनायटेड इंडिया ' याचेंहि याचप्रमाणें मत आहे. शेवटच्या पत्रकारानें असें साफ म्हटलें आहे कीं, भाषणें, ठराव आणि अर्ज यापलीकडे कायदेशीर चळवळ जाऊं शकत नाहीं असें जर कोणाचें मत असेल तर तें चुकीचें आहे. मुंबईस यंदाच्या सालीं प्रदर्शन, पंचांगशोधन, सामाजिक परिषद, आर्यमहिला, परिषद वगैरे अनेक प्रकारच्या चळवळी होणार आहेत; व कॉंग्रेसचा आठवडा निघून गेला म्हणजे पुन्हा पुढील कार्याची कोणास स्मृति राहणार नाहीं. यांकरितां 'इंडिया' पत्रांतील लेखकाप्रमाणेंच आमचीहि अग्रहपूर्वक अशी सूचना आहे कीं, यंदाची ही सोन्यासारखी संधी वरील प्रश्नाचा कांहीं तरी अखेरचा निकाल लावल्याखेरीज जाऊं देऊं नये. आमच्यापैकीं कित्येकांस हा उपदेश रुचत नसल्यास त्यास आमचा कांहीं इलाज नाहीं. आमचें तर असें स्पष्ट मत आहे कीं कांग्रेसच्या कामाचें पुढील धोरण जर हल्लींहून कांहीं भिन्न न होईल तर वर सांगितलेले निराशेचे अंकुर बळावत गेल्यास त्याचा दोष कांग्रेसच्या हिंदुस्थानांतील पुरस्कर्त्यांसच घ्यावा लागेल; व इंडियाच्या प्रस्तुतच्या अंकांतील लेखांवरून याच मतास पुष्टीकरण मिळत आहे.

❖ ❖ ❖

*खोटे कोण ?

येशूख्रिस्त (एशियाटिक):—जो सत्याचा आहे तो माझें म्हणणें जाणतो.

पायलेट (युरोपियन):—कसलें सत्य ?

नवा करार. सें. जॉन, १९,३६-७.

English falsehood is incomparably superior to it (French) as an exercise of mental sharpness and is always worth studying as an inexhaustible subject for the most watchful and interesting analysis.....The intelligent Englishman knows that truth is the most important ingredient in a well-concocted falsehood.

Philip. Gilbert Hamerton.

वर जो येशूख्रिस्त आणि हल्लीं, हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें इंग्रजी राज्यकर्ते म्याजिस्ट्रेट असतात त्याप्रमाणें येशूचे वेळीं पॅलेस्टाइनमध्यें असलेला रोमन

---

* [केसरी ता. २१ फेब्रुआरी १९०५]

म्याजिस्ट्रेट यांमधील संवाद दिला आहे तो १९०० वर्षांचा जुना आहे. येशू-खिस्तास रोमन म्याजिस्ट्रेटा- (पायलेट) पुढें ज्यू लोकांनीं नेलें असतां पायलेटनें त्यास 'तूं ज्यू लोकांचा राजा आहेस काय ? असें विचारलें. तेव्हां खिस्तानें आपलें राज्य या लोकींचें नाहीं असें सांगून, सत्य हें ज्यांचें ब्रीद आहे त्यांस मी काय म्हणतों तें समजेल, असा जबाब दिला आहे. परंतु अधिकाराच्या मदानें चढ-लेल्या पायलेटास सत्य कोठून कळणार ? त्यानें उपहासानें ' कोठलें सत्य ? सत्य तें काय ! ' असा उलट येशूखिस्तास प्रश्न केला आहे. लॉर्ड बेकन याच्या सत्यावरील निबंधांत आरंभीं हेंच अवतरण घेतलें आहे, व लॉर्ड कर्झन यांचें कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदानाचे वेळीं झालेलें भाषण वाचून वरील संवदाचीच आम्हांस आठवण होते. मनगटाच्या जोरावर साम्राज्य संपादन करणाऱ्या रोमन लोकांचा म्याजिस्ट्रेट यानें सत्याची पर्वा न धरितां दोन हजार वर्षांपूर्वी चोरास (बाराव्हास) सोडून संन्याशाला सुळी देण्याचें ज्याप्रमाणें काम केलें तसेंच विसाव्या शतकांत इंग्रजी बादशाहाचे मुखत्यार लॉर्ड कर्झन यांनीं करण्यास सुरवात केली आहे हें पाहून आम्हांस अत्यंत खेद होतो. दोन हजार वर्षांपूर्वी युरोपियन लोकांस सत्य समजत नव्हतें असें बायबलांतील वरील विचारावरून उघड होत आहे. लॉर्ड कर्झन यांचा बायबलावर विश्वास आहे किंवा नाहीं हें आम्हीं सांगूं शकत नाहीं; व त्याची आम्हांस जरूरहि नाहीं. कारण चान्सेलर या नात्यानें त्यांनीं जीं कांहीं विधानें केली आहेत तीं इतकीं पोरकट व चुकीचीं आहेत कीं, तीं खोटीं आहेत असें दाखविण्यास आमचेजवळ बायबलापेक्षां दुसरीं अनेक साधनें आहेत. परंतु खिस्ती धर्माच्या पाश्चिमात्य राष्ट्रांचा सत्याबद्दलचा बाणा एशियाटिक लोकांपेक्षां अधिक प्रखर आहे असें प्रतिपादन करणारास बायबलांतील वाक्याची प्रथमतः आठवण देणें जरूर आहे. युरोपियन राष्ट्रांत जर सत्याचा अभिमान वाढला असेल तर तो एशियांत उत्पन्न झालेल्या खिस्ती धर्मामुळेंच वाढलेला आहे किंबहुना, खिस्त, महंमद, श्रीकृष्ण, बुद्ध व कन्फ्यूशस वगैरे जे धर्मप्रवर्तक झाले ते सर्व एशि-यांतच उत्पन्न झाले असून एकहि युरोपांत जन्मला नव्हता, हें त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

लॉर्ड कर्झन हे ज्याप्रमाणें व्हाइसरॉय आहेत त्याप्रमाणें कलकत्ता युनि-व्हर्सिटचे चान्सेलरहि आहेत; व चान्सेलर या नात्यानें विद्याभ्यास पूर्ण होऊन पदवी घेण्यास आलेल्या विद्यार्थ्यांस थोडाबहुत उपदेश करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. परंतु हें कर्तव्य इतकें पवित्र आहे कीं, यावेळीं व्हाइसरॉयांनीं धर्मचार्याप्रमाणें आपल्या मनोवृत्ती अगदीं सात्विक ठेवून अक्रोध, शांती, क्षमा, नातिमानिता या दैवी संपत्तीचेंच आविष्करण करावयास पाहिजे. आणि त्यांनीं तसें केलें असतें तर सर्वांनीं त्यांची प्रशंसाच केली असती.

' सत्यं वद, धर्मं चर ' अशा प्रकारें कोणीहि विद्यार्थ्यांस उपदेश केला तर तो ग्राह्यच आहे. परंतु या अशा पवित्र समयीं आचार्यांच्या आंसनावर आरूढ झालेला मनुष्य जेव्हां दुसरीकडे उत्छृंखल झालेल्या आपल्या मनोवृत्तींस स्वैर सचार करण्यास परवानगी देतो आणि अभिमान, क्रोध पारुण्य व अज्ञान हे राजस व तामस भाव प्रगट करून आसुरी संपत्तीचा योग दाखवितो, तेव्हां या अनुचित कर्मानें विचारी लोकांच्या अनुकंपेस मात्र तो आपणास पात्र करून घेतो यांत शंका नाहीं. लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांस अशी घमेंड होती कीं,आपल्या वक्तृत्वानें हिंदु लोकांच्या पुढाऱ्यांस आपण मोह पाडूं; आणि गोडीगुलाबीनें त्यांच्या गळयाभोंवतीं दोरी घट्ट करून त्यांस हसत्या मुखानें कायमच्या दास्यत्वांत गोंवून टाकूं. पण ही त्यांची कल्पना त्यांच्या मनोदयाप्रमाणें सिद्धींस गेली नाहीं. लॉर्ड कर्झन यांच्या जिव्हेप्रमाणें त्यांचें अंतःकरण प्रेमळ नाहीं असें हिंदुस्थानांतील लोकांस लवकरच कळून आलें; आणि तेव्हांपासून युनिव्हर्सिटीचें बेकायदेशीर काम कायदेशीर करण्याकरितां जो परवां वाद झाला तेथपर्यंत लाटसाहेबांच्या बोलण्यावर कोणत्याही विचारी हिंदूनें कधींही विश्वास ठेवला नाहीं. अशा रीतीनें झालेलें आपलें स्वरूपाविष्करण लॉर्ड कर्झनसाहेबांस असह्य झालें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. व त्याकरतां हिंदुस्थानांतील लोकांवर वाग्बाण सोडून त्यांनीं आपल्या मनांतील क्रोधाची शांती करून घेतल्यास त्यांत कांहीं मानवी स्वभावाविरुद्ध झालें असें म्हणतां यावयाचें नाहीं. स्वतःची लबाडी उघडकीस आली असतां कोणीहि म ुष्य ' चाराच्या उलट्या बोंबा 'या न्यायानें असेंच अकांडतांडव करणार हें उघड आहे. आम्हांस वाईट वाटतें तें एवढेंच कीं,लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या अंतःकरणांताल क्रोध ओवून टाकून सरस्वतीचें पवित्र आणि शुचिर्भूत मंदिर अशुची केलें !सरस्वतीच्या पवित्र मंदिरापेक्षां अंतःकरणांतील ही घाण काढून टाकण्यास लॉर्ड साहबांस एखाद्या डिनरपार्टीनंतर मदिरेच्या आवेशांत भाषण करण्याचा उचित प्रसंग केव्हां तरी आला नसता असें नाहीं. त्याकरितां चान्सेलरच्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचें कांहीं एक कारण नव्हतें.

असो; लॉर्ड कर्झन यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांस जो उपदेश केला त्यासंबंधानें आमच्या एका विद्वान मित्राकडून आलेला लेख आम्ही दुसरीकडे दिलाच आहे. विद्यार्थी आश्रमांतून गृहस्थाश्रमांत जाणाऱ्या तरुण लोकांस सत्याच्या मार्गानें चला, कोणाचे आर्जव करूं नका, आपापलीं मतें प्रमाणें पाहून स्वतः बनवा, शब्दापेक्षां कृतीकडे अधिक लक्ष द्या आणि आपल्या देशाचें व राज्याचें जेणेंकरून हित होईल अशी वर्तणूक ठेवा, असा उपदेश करणें अत्यंत हितकारक आहे. परंतु असा उपदेश करण्याचा प्रसंग साधून त्यांत जेव्हां एखादा उपदेशक आपल्या खोट्या मनोवृत्तीची शांती

करण्याचा प्रयत्न करतो तेव्हां तो अर्थातच आपणास लोकांच्या निंदेस व अभिशापास पात्र करून घेतो. लॉर्ड कर्झन यांची स्थिति अशाच प्रकारची झाली आहे. यांच्या कारकीर्दीच्या धोरणावर जी चोहोंकडून कडक टीका होत आहे त्यामुळें त्यांचें डोकें फिरून जाऊन ते सरस्वतीच्या पवित्र मंदिरांतही घाण करण्यास तयार झाले आहेत. एरवीं 'सत्यं वद' असा विद्यार्थ्यांस उपदेश करण्याच्या वेळीं सत्याचा बाणा युरोपियन लोकांत अधिक असतो, असें असत्य विधान करून त्यांनीं आम्हां एशिआटिक लोकांचा उपमर्द व मानहानि केली नसती. लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांतील मुख्य विषारी भाग म्हटला म्हणजे हाच होय. यांतून इंग्रजी मुत्सद्यांच्या लबाडींत अग्रगण्य झालेल्या लॉर्ड कर्झन साहेबांनीं असें उद्गार काढावे म्हणजे सैतानानें बायबलांतील वाक्यें म्हटल्यासारखेंच आश्चर्यकारक व उद्वेगजनक आहे. यांतून लॉर्ड कर्झन यांचा आक्षेप हिंदुस्थानांतील लोकांवरच नव्हे तर सर्व एशिया खंडांतील लोकांवर आहे, हें लक्षांत आणलें म्हणजे पायाची तिडीक मस्तकास गेल्याखेरीज रहात नाहीं. आज एशियाखंडांतील जपानी राष्ट्र आपल्या शौर्यानें आणि तेजानें युरोपांतील युद्धकलेंत अग्रगण्य मानलेल्या राष्ट्रास एकसारखें पराभूत करीत आहे, अशा वेळीं एशियाटिक लोक खोटें आणि युरोपियन लोक खरे असें कलकत्ता युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांपुढें उद्गार काढणें धाडसाचें आणि मूर्खपणाचें नव्हे काय ? लॉर्ड कर्झन म्हणतात कीं, महाभारतांत सत्याचा महिमा गाइला आहे, पण त्यास कांहीं अपवाद दिले आहेत; आणि एवढ्यावरून त्यांनीं असें विधान केलें आहे कीं सत्याची किंमत एशियांतलि लोकांपेक्षां युरोपियन लोकच जास्त ओळखतात. लॉर्ड कर्झन यांस महाभारत कितपत कळत असेल याचा वानवाच आहे. आणि कळलें असलें तरी भारतांतील मधुरवचनांचा त्यांच्या अंतःकरणांत कटु परिपाक झाला आहे. सर्पाप्रमाणें दूध पिऊन ते गरळ ओकीत आहेत असें त्यांच्या हल्लींच्या उक्तीवरून उघड होतें. यास पुरावा पाहिजे असल्यास फार लांब जावयास नको. संस्कृत वाङ्मयाचा ज्यांनीं आजन्म अभ्यास केला होता अशा मॅक्समूलरसाहेबांनीं या विषयावर 'India—what can it teach us?' या ग्रंथांत दुसरें व्याख्यान दिलें आहे तें वाचून पाहिलें असतां कोणाचीहि खात्री होईल कीं, हिंदु लोक युरोपियन लोकांइतकेच सत्यप्रिय आहेत. या व्याख्यानाच्या शेवटीं मॅक्समूलरसाहेब असें म्हणतात कीं, 'हिंदुस्थानांतील लोक लबाड आहेत असा मनाचा ग्रह करून घेऊन जे तरुण इंग्रजी अधिकारी (सिव्हिल सर्व्हंट) हिंदुस्थानांत जातात त्यांच्यापेक्षां हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या अस्तित्वास अधिक धोका आणणारी अपायकारक किंवा

हानिकारक दुसरी कोणतीहि गोष्ट मला दिसत नाहीं. ' * मॅक्स मूलरसाहेब यांचे हे उद्गार अक्षरशः खरे आहेत; आणि सिव्हिल सर्व्हंटांच्या ऐवजीं व्हाइसरायही जेव्हां असेच बरळूं लागतात तेव्हां त्यांनीं इंग्रजी राज्याच्या चिरस्थायीपणाबद्दलचे काढलेले उद्गार विशेष जोरानें लागू पाडतात हें लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यास आम्ही कळविलें पाहिजे असें नाहीं. सुदैवानें अलेक्झांडरबरोबर आलेल्या ग्रीक लोकांपासून तों मनरोमालकम वगैरे अलीकडील इंग्रजी अधिकाऱ्यांपर्यंत शेकडों मुत्सद्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या सत्यनिष्ठतेबद्दल अनेक वेळां साक्ष दिलेली आहे; व मॅक्समूलरसारख्या संकृतज्ञ पंडितांनीं श्रुति, स्मृति व पुराणें यांचे पुरावे देऊन राष्ट्रीय वाङ्मयाच्या साहाय्यानेंहि हीच गोष्ट बेमालूम सिद्ध केलेली आहे. करितां लॉर्ड कर्झन यांचें अशा रीतीनें खंडन करण्याची आज अम्हांस कांहीं आवश्यकता दिसत नाहीं. लॉर्ड कर्झन जें कांहीं बोलले तें संकृतवाङ्मयाचा अधार घेऊन बोलले असें नाहीं, तर क्रोधाच्या आवेशानें त्यांनीं आपल्या अंतःकरणांतले विचार व एशियाटिक लोकांबद्दल तिरस्कारबुद्धि जगांत व्यक्त केलेली आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, ' सर्वच युरोपिन लोक नेहमीं खरें बोलतात किंवा एशियाटिक लोक जाणूनबुजून खोटें बोलतात असें मी म्हणत नाहीं; पहिला सिद्धांत वेडेपणाचा आणि दुसरा उपमर्दकारक होईल. ' आमच्या मतें हें वाक्य तर अतिशयच मूर्खपणाचें आहे ' सर्वच युरोपियन लोक नेहमीं खरें बोलतात असें नाहीं ' याच्या जोडीस ' सर्वच एशियाटिक लोक नेहमीं खोटें बोलतात असें नाहीं. ' वाक्य पाहिजे; पण तसें न घालतां ' सर्वच एशियाटिक लोक जाणूनबूजून खोटें बोलतात असें नाहीं ' असें वाक्य घातलें आहे. म्हणचे एशियाटिक लोकांत जर कांहीं अपवाद असला तर तो खरें बोलणारांचा नव्हे तर न कळत खोटें बोलणारांचा

---

*Certainly I can imagine nothing more mischievous, more dangerous, more fatal to the permanence of English rule in India, than for the Yonng Civil Servants to go to that country with the idea that it is a sink of moral depravity, an ant's nest of lies; for no one is so sure to go wrong, whether in public or in private life, as he who says in his haste: "All men are liars."

Max Muller—India : What can it teach us? P. 75. Ed. 1892.

आहे, असें यांत ध्वनित केलें आहे ! सारांश एशियाटिक लोक कोणत्या तरी रूपानें नेहमीं खोटें बोलतात असें लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें आहे; आणि ही त्यांची संवय जावी म्हणून लाट साहेबांनीं विद्यार्थ्यांपुढें सत्याचा महिमा गाइला आहे. लाटसाहेबांचे हे उद्गार ऐकून इसापनींतींतील वैद्य होऊं पाहणाऱ्या बेडकाची आम्हांस आठवण होतें. जगामध्यें दुसऱ्याचें स्वातंत्र्य, पैसा किंवा वैभव गोड बोलून कसें हिरावून घ्यावें, ही मायावी विद्या इंग्रज लोकांपेक्षां कोणासहि जास्त अवगत नाहीं, असें पुष्कळ इंग्रजी ग्रंथांतून आम्हीं वाचलेलें आहे; व आमचे बंधु ' गुजराथी ' वर्तमानपत्रकार यांनीं गेल्या अंकांत या अर्थाचा हॅमर्टनच्या ग्रंथांतील एक उताराहि दिलेला आहे. क्लाइव्ह, हेस्टिंग्ज, वगैरे मुत्सद्यांचीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील उदाहरणें तर सर्वप्रसिद्धच आहेत. पण याहीपेक्षां ताजीं उदाहरणें पाहिजे असल्यास लॉर्ड लिटन किंवा खुद्द लॉर्ड कर्झन यांचींच होत. हिंदु प्रजेस महाराणीसाहेबांनीं दिलेली वचनें मोडून आम्हीं फसवीत आहों, असें लॉर्ड लिटन यांनीं एके ठिकाणीं कबूल केलें आहे आणि राणीचा जाहिरनामा ' अशक्य सनद ' म्हणून बाजूस ठेवण्यास खुद्द लॉर्ड कर्झन तयार आहेत. सारांश, हत्तीचे ज्याप्रमाणें दाखविण्याचे दांत एक व खावयाचे एक तसा इंग्रजी राज्यपद्धतीचा मासला आहे. आणि या मायावी राज्यपद्धतींत लॉर्ड कर्झन हे अगदीं अग्रगण्य आहेत; इतकेंच नव्हे तर अगदीं क्षुल्लक कामाकरितां देखील बिनदिक्कत खोटें बोलण्याची लॉर्ड कर्झन यांस संवय लागलेली आहे असें त्यांनीं आपल्या एशियाखंडांतील प्रवासासंबंधानें जें बुक लिहिलें आहे त्यांतील एका गोष्टीवरून दिसून येतें. या प्रसंगाचा त्यांच्या ग्रंथांतील उतारा आमचे बंधु ' अमृतबझारपत्रिका ' कार यांनीं आपल्या पत्रांत दिला आहे. हिंदुस्थानांत व्हाइसरॉय होण्यापूर्वी लॉर्ड कर्झन हे एशियाखंडांतून प्रवास करून गेले. या प्रवासांत कोरिया द्वीपकल्पाच्या राज्यांतील फॉरिन ऑफिसचे प्रेसिडेंट यांस भेटण्याकरितां लॉर्ड (त्यावेळीं नुसते मिस्टर) कर्झन यांची स्वारी गेली होती. भेटीस जाण्यापूर्वी मि. कर्झन यांस असें समजलें होतें कीं, कोरिया देशांत तरुण मनुष्यास फारसा मान देत नाहींत; तेव्हां भेटीच्या वेळीं कर्झनसाहेबांनीं कोरियाच्या प्रधानास जीं उत्तरें दिलीं तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

कोरियाचे प्रधान:—तुमचें वय काय ?

कर्झन:—(बिनदिक्कत) चाळीस.

को. प्रधान:—वयाच्या मानानें आपण फारच तरुण दिसतां, याचें कारण काय असावें ?

कर्झनः—कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलखांत आज महिनाभर प्रवास करीत आहें.

लॉर्ड कर्झन यांचें वय यावेळीं फक्त ३३ वर्षांचें होतें. असें असून केवळ कोरियाच्या प्रधानास खुष करण्याकरितां व त्याचें आपल्याबद्दल चांगलें मत व्हावें म्हणून आपलें वय ४० वर्षांचें आहे असें त्यांनीं सांगितलें आणि तेंही बिनदिक्कत (unhesitatingly) सांगितलें असें मोठ्या फुशारकीनें त्यांनीं आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे ! बरें हें जें चाळीस वर्षांच्या वयांत दिसणारें अपूर्व तारुण्य याचें कारण काय ? असा जेव्हां कोरियाच्या प्रधानानें प्रश्न केला तेव्हां लॉर्ड कर्झन यांनीं मोठ्या शिताफीनें कोरियाच्या राज्याच्या सुंदर हवेची स्तुति करून वेळ मारून नेली आहे. परंतु एवढ्यानेंच संपलें असें नाहीं. कोरियाच्या प्रधानानें पुढें आणखी असें विचारलें कीं:—

को. प्रधानः—आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहां ?

कर्झनः—नाहीं. (हें उत्तर कोरियाच्या प्रधानास आवडलें नाहीं असें पाहून) परंतु माझें लग्न अद्याप व्हावयाचें आहे.

लॉर्ड कर्झनसाहेबांचें हें उत्तर त्यांसच लबाडीचें वाटलें,(unscrupulous) असें त्यांनीं आपल्या ग्रंथांतच म्हटलें आहे. परंतु अशा लबाडीच्या उत्तरानें कोरियाच्या वृद्ध प्रधानाची मर्जी संपादन केली असें लिहिलें आहे. मि. कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन झाल्यानंतर काढलेल्या नव्या आवृत्तींत हें संभाषण गाळलें आहे, ही छपवाछपवीहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. लॉर्ड कर्झन यांच्या बुकांतील हा उतारा अत्यंत मनन करण्यासारखा आहे. कोरियाचा प्रधान आणि प्रवासी मि. कर्झन यांच्या भेटीचा हा प्रसंग कोणत्याहि प्रकारें राजकीय महत्त्वाचा नव्हता कीं, जेणेंकरून पॉलिसी किंवा डिप्लोमसी (राजनीति) या महासबबीवर असत्याचा विटाळ त्यांना काढून टाकतां येईल. इंग्लंड देशांतील एक श्रीमंत प्रवासी कोरिया देशांत गेला असतां तेथील प्रधानास तो भेटण्यास जातो आणि माझें लग्न होणार आहे, सबब आतांच मी राजशालक नाहीं असें मानूं नका, असें ध्वनित करतो आणि बिनदिक्कत आपलें वय ४० वर्षांचें सांगून आणि कोरिया देशाच्या हवेची स्तुति करून ज्या गृहस्थाकडे भेटीस गेला त्याची मर्जी संपादन करतो, यापेक्षां आणखी जास्त खोटेपणा तो काय ? असल्या क्षुल्लक कारणाकरितांही ज्या देशांतील मोठे पुरुष खोटें बोलण्यास तयार होतात त्या देशांतील नावांजलेले मुत्सद्दी गोडगोड थापा देऊन हिंदुस्थानच्या लोकांचें अहित करण्यास व आपल्या देशबांधवांचा स्वार्थ साध-

ण्यास तयार झाल्यास त्यांत नवल तें कोणतें ? परंतु कालाची गति अशी विचित्र आहे कीं, अशा प्रकारचे लोक व गृहस्थ पारतंत्र्यामुळें दीनावस्थेस पोंचलेल्या आम्हां हिंदू लोकांस किंबहुना एशियांतील सर्व लोकांस सरस्वतीच्या पवित्र मंदिरांत उभे राहून गंभीरपणानें 'युरोपियन लोक जात्याच अधिक सत्यप्रिय आहेत करितां त्यांचें तुम्ही अनुकरण करा " असें सांगण्यास तयार झाले आहेत. अशा धाष्ट्र्याच्या व लबाडीच्या कृत्यास निर्लज्ज ही संज्ञा देणें म्हणजे सर्पाच्या आणि वृश्चिकाच्या विषाची तुलना करणें होय. लॉर्ड कर्झन यांस ' ओरिएंटल डिप्लोमसी ' ही संज्ञा आठवली पण त्याचबरोबर ' मॅकिव्हीलियन पॉलिसी ' ' परफिडीयस आल्बियन ' म्हणजे ' विश्वासघातकी इंग्रजी राष्ट्र ' ह्या म्हणी आठवल्या नाहींत काय ? आमच असें म्हणणें नाहीं कीं, एशिया खंडांतील लोक मुळींच खोटें बोलणारे नाहींत. चोर, चहाड, लुच्चे, लबाड, युरोपाप्रमाणें एशियाखंडांतहि आहेतच, व जर कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, पारतंत्र्यावस्थेंत उद्दाम राज्यकर्त्यांची खुशामत करण्याकरितां हिंदुस्थानांतिल लोकांस प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष रीतीनें पूर्वीपेक्षां हल्लीं अधिक असत्याचा आश्रय करावा लागतो तर तेंही म्हणणें आम्ही क्षणभर कबूल करूं. पण याचा दोष सर्वस्वी परकीय राज्यकर्त्यांकडे आहे. लॉर्ड कर्झन यांनीं हिंदुस्थानांतिल लोकांस इंग्रजी राज्यांत आपले गुण दाखविण्यास पुष्कळ जागा आहे, असें आपल्या भाषणाच्या शेवटीं म्हटलें आहे. पण हें विधान निवळ लबाडीचें आहे असें उघड सिद्ध करून दाखवितां येईल. एखादी हायकोर्टांतिल जजाची जागा हिंदी लोकांस दिलीं म्हणून तेवढ्यानें कांहीं होत नाहीं. इंग्रजी राज्यांत हिंदी लोकांच्या गुणांची पायमल्ली होत आहे, त्यांच्या मतास कांहीं मान नाहीं, कर्तृत्व दाखविण्यास जागा नाहीं आणि राज्यकर्त्यांची खुशामत केल्याखेरीज बढती मिळत नाहीं अशींच मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांची ओरड आहे. अशा स्थितींत तुम्ही वाचाळता सोडून क्रिया करा, स्वतंत्र मतें बनवा, खुशामत करूं नका, असा त्यांस उपदेश करणें म्हणजे दुःखावर डाग देण्यासारखें आहे. वर्तमानपत्रांतील लेख वाचून आपलें मत बनवूं नका, हा उपदेश विलायतेंत लॉर्ड कर्झन यांनीं केला असता काय ? वर्तमानपत्रांतील लेखास जर महत्त्व द्यावयाचें नाहीं तर लॉर्ड कर्झन यांच्या बोलण्यास तरी काय म्हणून मान द्यावयाचा ? ते व्हाइसरॉय आहेत एवढ्याचकरितां काय ? त्यांचा सत्यवादीपणा किती किमतीचा आहे हें वर दिलेल्या त्यांच्या उताऱ्यावरूनच व्यक्त होत आहे. अशा प्रकाच्या असत्यवादी आणि कुटिल इंग्रजी राजनीतींतिल पुरुषानें आंम्हास उपदेश करण्यास तयार व्हावें, हें आमचें मोठेंच दुर्भाग्य होय, व आम्हांस अत्यंत खेद होतो कीं, व्हाइसरायांसारख्या मोठ्या अधिकाऱ्याबद्दल आमच्यावर

अशा रीतीनें लिहिण्याचा आज प्रसंग यावा. परंतु सत्याची योग्यता सर्वांत अधिक आहे व सत्य हें त्रिकाल अबाधित आहे, या सिद्धांताचें महत्त्व लक्षांत आणूनच आम्ही हा लेख लिहिण्याचें साहस केलें आहे व त्याबद्दल व्हाइसराय हे माफी करतील अशी आम्हांस उमेद आहे.

❖ ❖ ❖

*रोल्टप्रकरण आणि सरकारी अन्याय.

आमचें सरकार—मग तें हिंदुस्थान सरकार असो वा प्रांतिक सरकार असो—कित्येक प्रसंगीं ढळढळीत अन्याय कसें करतें, अथवा सरकारानें नेमलेले जिल्ह्याचे किंवा डिव्हिजनचे अधिकारी कधीं अज्ञानानें तर कधीं दुराग्रहानें आणि कधीं अधिकारमदानें लोकांवर कसा जुल्मूम करतात, याचीं अनेक उदाहरणें आजपर्यंत घडून आलीं आहेत. परंतु हे अन्याय ढळढळीत दिसून येण्यास आमचेकडील ताईमहाराजांचें प्रकरण आणि बंगाल्यांत झालेला रोल्टसाहेबांवरील खटला हे जसे एकामागून एक थोडक्याच दिवसांच्या अंतरानें झाले तसा प्रकार क्वचितच घडून येतो. रा. टिळक यांनीं ताईमहाराजप्रकरणांत आपल्यावर आग्रहानें चालविलेल्या फौजदारी खटल्यामुळें आपलें जें नुकसान झालें तें भरून देण्याबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडे केलेला अर्ज नामजूर झाला हें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. त्याबद्दल आज कांहीं लिहावयाचें नाहीं. परंतु एकाच प्रकारचे खटले असतां केवळ एकांतील गांजलेला मनुष्य पांढऱ्या कातडीचा आणि दुसऱ्यांतील काळ्या कातडीचा असल्यामुळें अखेर परिणामांत कसा भेद पडतो, हें रोल्ट केस व टिळक यांजवरील चाललेला खटला याची तुलना केली असतां कोणासही कळून येणार आहे. यासंबंधानें मागें आम्हीं केसरींत एक स्फुट लेख लिहिलाच आहे. परंतु आज तो विषय हातीं घेण्याचें कारण रोल्टप्रकणावरील नुकताच प्रसिद्ध झालेला बंगाल सरकारचा ठराव हें होय. रोल्ट हा एक युरोपियन गृहस्थ पूर्णिया जिल्ह्यांत खाग्रा मिळकतीचा कोर्ट ऑफ वार्डस् यांच्यातर्फे एक म्यानेजर होता; म्हणजे अज्ञानासंबंधानें ही इस्टेट कोर्टाच्या ताब्यांत जाऊन तिच्या व्यवस्थेकरितां रोल्टसाहेबांची नेमणूक झालेली होती. या नात्यानें इस्टेटीची व्यवस्था करतांना त्यानें कांहीं पैसे खाल्ल्याचा पूर्णियाचे कलेक्टर मि. ली यांस संशय येऊन त्यांनीं गुप्त चौकशी सुरू केली, आणि रोल्ट यास त्याचें

---

* [केसरी ता. १३ जून १९०५]

म्हणणें काय आहे हें न विचारतां किंवा त्यानें मुलाखत मागितली असतां त्यास ती न देतां त्यांनीं नौकरीवरून काढलेल्या इसमावर भरंवसा ठेवून कांहीं पुरावा गोळा केला आणि अखेर कमिशनर व लीगल रिमेंब्रन्सर यांच्या अनुमतीनें रोल्टवर फौजदारी फिर्याद सुरू केली. फिर्यादीची प्रथम चौकशी मि. हर्ड या सब डिव्हीजनल ऑफिसरपुढें झाली. तेव्हां रोल्ट यांचा कोर्टांत बराच उपमर्द करण्यांत आला. पुढें रोल्ट हा युरोपियन असल्यामुळें त्याचा खटला हायकोर्टांत युरोपियन ज्यूरीपुढें चालून फिर्यादीतर्फें पूर्ण पुरावा होण्यापूर्वीच ज्यूरीनें व जज्जानें त्यास निर्दोषी म्हणून सोडून दिलें. इतकेंच नव्हे तर हायकोर्टचे जज न्या. मि. हिंडरसन यांनीं कलेक्टर, कमिशनर, रेव्हिन्यू बोर्ड वगैरे ज्या ज्या अधिकाऱ्यांनीं रोल्टवर खटला उपस्थित केला होता त्यांच्या वर्तनावर कडक टीका करून ती सरकारकडे पाठविली. हायकोर्टच्या जज्जाकडून कमिशनर, डि. म्याजिस्ट्रेट आणि सब. डिव्हिजनल म्याजिस्ट्रेट यांच्यावर अशा प्रकारें कडक टीका झाल्यावरून बंगाल सरकारास अर्थातच या प्रकरणाची व अधिकाऱ्यांच्या वर्तनाची चौकशी करणें भाग पडलें; व त्याप्रमाणें दोन युरोपियन अधिकारी कमिशनर नेमून चौकशी झाली व कलेक्टर, कमिशनर, असि. कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांकडून लेखी रिपोर्ट मागितले. या सर्वांचा विचार करून बंगालसरकारचा हल्लींचा ठराव प्रसिद्ध झाला आहे. या ठरावांत बंगालसरकारानें आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांची होईल तितकी तरफदारी करून त्यांचा बचाव करण्याचा बराच प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, मि. ली यांची चूक व घाई झाली असली तरी ती समजून उमजून केलेली नाहीं; त्यांनीं रोल्ट यांजकडून खुलासा मागावयास पाहिजे होता खरा, पण रोल्ट याचा प्रथमतःच संशय असल्यामुळें त्यांस तसें करणें इष्ट वाटलें नाहीं वगैरे बरीच सारवासारव केलेली आहे. तथापि, हायकोर्टचे जज न्या. हिंडरसन यांनीं कायद्याच्या दृष्टीनें जी कलेक्टराच्या वर्तनावर कडक टीका केली आहे तिचें निराकरण कलेक्टरास किंवा सरकारास करतां आलें नाहीं. यामुळें अखेरीस बंगालसरकारासही कलेक्टर लीसाहेब यांस थोडेंबहुत तरी दोषी ठरवावें लागलें तें लागलेंच; आणि सब. डि. म्याजिस्ट्रेट मि. हर्ड यांजवर तर चांगलाच चाबूक ओढला आहे. एकाद्याबद्दल मन कलुषित झालें असतां त्याचें म्हणणें न ऐकतां त्यांच्या विरुद्ध त्याच्या शत्रूकडून पुरावा हलगर्जीपणानें किंवा कायद्याच्या अज्ञानानें गोळा करून त्याचा पाठलाग करण्याची हातोटी पंडितमन्य अरेरावी जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांस कशी साधलेली असते व सरकारचा पैसा आणि वजन याचा असल्या कामीं ते किती दुरुपयोग करतात, आणि असा दुरुपयोग करून पुनः आपण जें केलें तें आपणांस दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेंत सत्यबुद्धीनें केलें असें म्हणून निसटून जाण्याचा हेच राजेश्री

कसा प्रयत्न करतात, आणि त्यावर पांघरूण घालणें आपलें व्रत आहे असें मानणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्यानें व शिफारशीनें हे जिल्ह्याचे अधिकारी अखेर कसे मोकळे होतात, याचें रोल्टप्रकरण हें एक चांगलें उदाहरण आहे. न्यायाकरितां नांवाजलेल्या इंग्रजी राज्यांत एक अधिकारी मनांत आल्यास किती जुलूम करूं शकतो आणि गोरगरिबांची अशा प्रसंगीं दाद लागणें किती अशक्य असतें, याचाही प्रत्यय या खटल्याच्या वाचनानें येण्यासारखा आहे; असो. या प्रकरणांत समाधान मानण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे रोल्ट हायकोर्टातून सुटल्यावर रेव्हिन्यू बोर्डाचा झालेला ठराव ही होय. रोल्ट हा कोर्ट ऑफ वॉर्ड्सच्या तर्फे पुनः वहिवाटदार नेमण्यास लायक आहे व खटल्याच्या पायीं त्यास झालेला खर्च भरून देण्याकरितां सरकारांतून त्यास पंधरा हजार रुपये द्यावे, अशी बोर्डानें सूचना केली आहे.

वरील हकीकत वाचली आणि रा. टिळक यांच्या विरुद्ध येथें चाललेल्या फौजदारी खटल्याच्या हकीकतीशीं तिची तुलना केली म्हणजे दोहोंमधील साम्य आणि भेद कोणाच्याही लक्षांत येईल. मि. ली आणि मि. आस्टन हे दोघेही सारखेच उतावळे आणि दुराग्रही आहेत, असें त्यांच्या वर्तनावरून म्हणण्यास हरकत नाहीं. मि. आस्टन यांनीं ट्रस्टींचें म्हणणें ऐकून न घेतां किंवा त्यांनीं मागितलेली मुलाखत त्यांस न देतां लीसाहेबाप्रमाणेंच ट्रस्टींच्या पाठीमागें त्यांच्या हितशत्रूकडून माहिती घेऊन ते लुच्चे आहेत अशी आपल्या मनाशीं गांठ बांधून ठेविली होती. सरदारांचे एजंट या नात्यानें अशा प्रकारचा मनाचा ग्रह करून घेऊन हे न्यायासनावर बसले, तेव्हां कायद्याचा त्यांनीं जो चुथडा केला त्याची शहानिशा हायकोर्टांत झालीच आहे. रोल्ट आणि टिळक यांच्यामधील खटल्यांचे प्रवर्तक ली व आस्टन यांच्या वर्तनांमधील जें हें साम्य दाखविलें तितकेंच दोन्ही खटल्यांची चौकशी करणारे हर्ड व क्लेमंट् यांच्या वर्तनामधील साम्य आहे. दोघांनींही कायद्याचें अज्ञान आणि फिर्यादी पक्षाचा अभिमान वेळोंवेळीं व्यक्त केला आहे. कलेक्टर किंवा डि. जज्ज यांनीं उपस्थित केलेला खटला चौकशीकरितां जेव्हां असि. कलेक्टर किंवा असि. जज्ज यांजकडे जातो तेव्हां हे हाताखालील अंमलदार नरम पडल्यास अथवा फिर्यादीतर्फेचे झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. हर्ड किंवा क्लेमंट्स हे कांहीं अगदींच मूर्ख आहेत किंवा असतील असें नाहीं. पण वरिष्ठ अधिकारी एखाद्या इसमाचा छल करण्यास जेव्हां प्रवृत्त होतात तेव्हां त्यांच्या हाताखालचे अधिकारी जातीनें इंग्रज असले तरी बहुतेक तत्पक्षीय होऊनच कामें करतात, इतकी युरोपियन सिव्हिल सर्व्हंटांचीहि हल्लीं अवनति झालेली आहे; मग हाताखालच्या नेटिव किंवा हाफकॅस्ट म्याजिस्ट्रेटाची तर गोष्ट काढावयासच नको ! हे कायद्याचा सरळ अर्थ सोडून देतात, इतकेंच नव्हे तर प्रसंगीं अर्थाचा अनर्थही करतात.

रा. टिळक यांच्या खटल्यांत हायकोर्टानें जो अखेर निकाल दिला आहे त्यांत खालील न्यायाधीश हे कायद्याचीं अगदीं ठोकळ मूळ तत्वेंही विसरले, असें स्पष्ट लिहिलें आहे. रोल्टसाहेबांवरील खटल्यांतही असाच प्रकार घडलेला आहे. भेद एवढाच कीं, रोल्टवर झालेल्या जुलमाची बंगालसरकारास लाज वाटून त्यांनीं आपल्या अंमलदारांच्या वर्तनाची चौकशी केली व रोल्टचें नुकसान भरून दिलें. आणि आमच्या इकडे मुंबईसरकारास तशा प्रकारच्या अन्यायाचीही लाज न वाटून त्यांनीं पोक्त विचारांतीं असें ठरविलें कीं, रा. रा. टिळक यांस कोणत्याही प्रकारें नुकसान भरून देऊं नये ! कारण त्यांजवर खटला उपस्थित केला तो जज्जानें केला आणि तसें करण्यास कायद्याप्रमाणें त्यास मुभा होती ! जणूं काय कायद्याच्या नांवावर कोणी कितीही जुल्म केला, अथवा कायद्याच्या अज्ञानानें अथवा दुराग्रहानें विनाकारण एखाद्यास पेंचांत घातलें तर त्यांचें निवारण करणें हें सरकारचें कर्तव्यच नव्हे. इंग्रजसरकार अगर त्यांचे अधिकारी जेव्हां अशा प्रकारें आपल्या चुकीचें समर्थन करतात तेव्हां देशी संस्थानिकांनीं यावर ताण करून आपल्या प्रजेची पायमल्ली केल्यास त्यांचा तरी हात कोण धरणार ? रोल्ट यांजवरील चाललेल्या खटल्याची बंगाल सरकारानें जशी चौकशी केली तशी ताईमहाराजप्रकरणाची मुंबई सरकारानें कां करूं नये ? असें त्यांस कोणी विचारणारा नाहीं, एवढ्याचकरितां ही अरेरावी आणि दांडगाई आहे; अथवा रोल्ट गोरा होता आणि टिळक काळे होते म्हणून हा भेदा झाला आहे; याचा निकाल करण्याचें काम आम्हीं वाचकांवरच सोंपवितों. कदाचित् असेंही असेल कीं, बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर अँड्रयू फ्रेझर यांच्या मनांत जितकी उदार बुद्धि असेल तितकी आमच्या मुंबईच्या गव्हर्नरांत किंवा कौन्सिलदारांत नसेल. कसेंही असो; जिल्ह्याचे कलेक्टर किंवा जज, लीगल रिमेंब्रन्सर, सब डिव्हिजनल म्याजिस्ट्रेट किंवा डिव्हिजनचे कमिशनर, अशा प्रकारचे अधिकारी गैरसमजानें, दुराग्रहानें, अज्ञानानें, अरेरावीपणानें, द्वेषबुद्धीनें अगर मूर्खपणानें जेव्हां एखाद्याचा छळ करितात, तेव्हां त्याचा न्यायदृष्टीनें प्रतिकार करून सरकारचा मोठेपणा कायम ठेवणें हें लेफ्टनेंट गहर्नर किंवा गव्हर्नर–इन–कौन्सिल यांचें कर्तव्य होय. निदान न्यायाच्या कोर्टापुढें खालील अधिकाऱ्यांची चूक जेव्हां ढळढळीत शाबीत होते तेव्हां तरी गव्हर्नर–इन–कौन्सिल यांनीं केवळ त्यांचीच तरफदारी करून उपयोगी नाहीं. ज्याचा छल झाला त्याचें नुकसान होईल तितकें भरून दिलें पाहिजे हें न्याय्य आहे. हा न्याय रोल्टप्रकरणांत बंगालसरकाराकडून अखेर झाला आहे. परंतु मुंबईसरकारानें मात्र आपली न्यायाची बुद्धि गुंडाळून ठेऊन बंगालसरकारच्या अगदीं विरुद्ध इकडे वर्तन केलें आहे. आणि विलायतेंत बसलेले स्टेट सेक्रेटरी यांनींही त्यास मान डोलविली आहे ! हा प्रकार पाहिला

म्हणजे हल्लींच्या राज्यांत निदान सरकारी अधिकारी विरुद्ध असतां प्रजेस न्याय कसा काय मिळतो, हें चांगलें लक्षांत येईल. रोल्टप्रकरणाची जी आज आम्ही चर्चा केली आहे ती एवढ्याचकरितां होय. रोल्ट यांस खर्च मिळाला म्हणून टिळक यांस मिळेल असें नाहीं; व त्याकरितां हा लेख लिहिलाही नाहीं. कारण प्रत्यक्ष अर्जानें जी गोष्ट झाली नाहीं ती वर्तमानपत्राच्या लेखानें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि, अशा प्रकारचे खटले लोकांपुढें मांडून वरीष्ठ प्रतीचे युरोपियन सरकारी अंमलदारही प्रसंगविशेषीं कसे दुराग्रही बनतात याची लोकांस समजूत करून देणें हें आमचें कर्तव्य असल्यामुळें वरील चर्चा आज केली आहे. सरकार हें नपुंसकलिंगी भाववाचक नाम असून परमेश्वराप्रमाणें त्याची क्रिया निर्हेतुक असावयाची असा सिद्धांत मोठमोठ्या लोकांकडून आम्हांस सांगण्यांत येत असतो. परंतु परमेश्वराच्या मागें जशी मायेची उपाधि आहे तशी सरकारच्या मागेंही सरकारची सूत्रें हालविणाऱ्या लोकांची असल्यामुळें आणि ते लोक इतर मनुष्यांप्रमाणें सर्व मानवी विकारांस पात्र असल्यामुळें ते आपल्या बरोबरच सरकारास अंध करून कुमार्गास लावतात, असा अनुभव आहे. राजाजवळ चांगले मंत्री असावे अशी जी पूर्वींची म्हण आहे त्यांतील बीज हेंच होय. पण आमच्या सरकारची स्थिति तशी नाहीं, हें दुर्दैव होय.

❖ ❖ ❖

*परवश झालेल्या नेटिव अंमलदारांचें मानसिक दौर्बल्य

सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।

भर्तृहरि.

दुसऱ्याची नोकरी करणें म्हणजे केव्हांही झालें तरी स्वाभिमानास कमीपणा आणणारें आणि मोठ्या जोखमीचें काम होय. आपलें शरीरच नव्हे तर आपलें मन व विचार यांवरील आपली सत्ता काढून मानाकरितां किंवा उदरपोषणाकरितां क्षणभर तरी दुसऱ्याच्या ताब्यांत देणें म्हणजे तितक्या कालपर्यंत आपलेपणा विसरणें होय. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ट नोकरी' अशी जी आपल्यांत म्हण आहे त्यांतील बीज हेंच होय. आपला धनी आपल्या

---

* [केसरी ता. २० जून १९०५]

धर्मांतील, आपल्या देशांतील किंबहुना आपल्या आप्तांतील, असला तरी त्याची सेवा करणें, म्हणजे निसर्गतः आपणांस प्राप्त झालेलें स्वातंत्र्य गुंडाळून ठेवून आपली बुद्धि, चातुर्य, शहाणपण व धैर्य, यांचा उदरपूरणाकरितां कांहीं काल-पर्यंत तरी विक्रय करणेंच होय. त्यांतून ज्या प्रभूची आपण सेवा करतों तो प्रभु जर स्वदेशांतला असेल अथवा स्वदेशाचें किंवा त्यांतील लोकांचें हित करणारा असेल, तर क्षणभर स्वाभिमान एका बाजूस ठेवून आपण सेवावृत्ति स्वीकारल्याचा देशास कांहीं तरी उपयोग होण्याचा संभव असतो. पण तोच स्वामी जेव्हां परकीय असतो तेव्हां त्याची सेवा करण्यांत स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची होळी होते इतकेंच नव्हे, तर त्याबरोबर देशाचें अहित होऊं शकतें. हाच हेतु मनांत धरून पंचतंत्रांत "सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम्। स्वातंत्र्यं यच्छरीरस्य मूढैस्तदपि हारितम् ॥" याप्रमाणें सेवकांची निर्भर्त्सना केलेली आहे. त्याचप्रमाणें व्यासांनींही जिवंत असून मेलेले पांच प्रकारचे जे लोक सांगितलेले आहेत त्यांतही 'नित्यसेवकः' असा एक वर्ग सांगितला आहे. हा नित्य-सेवकांचा वर्ग म्हटला म्हणजे आमच्याकडील पांढरपेशांचा वर्ग होय. हा वर्ग बुद्धीनें इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ असून विद्यार्जनाच्या कामींही इतर लोकांपेक्षां अधिक दृढ उद्योग करणारा आहे, ही गोष्ट खरी पण वंशपरंपरागत आपापल्या कुलांत किंवा ज्ञातींत चालत असलेल्या सेवाधर्मामुळें त्याच्या स्वाभिमानादि मनोवृत्ति थोड्या बहुत तरी बोथटल्याच असतात. स्वराज्यांत या वर्गाचा हा बोथटपणा प्रजेस किंवा राष्ट्रास घातुक होत नाहीं. पण स्वराज्य जाऊन परराज्य झालें म्हणजे हा सेवकवर्ग परकीय राजांस आपले मतलब साधण्यास चांगला उपयोगी पडतो, इतकेंच नव्हे तर सेवाधर्मात होणारा स्वाभिमानाचा ऱ्हास अधिकाधिक वाढत जाऊन परकीय राजांच्या अमलाखालीं हा वर्ग स्वदेशाचा शत्रु बनण्याचा प्रसंग येतो. परराज्याखालीं देशांतील बुद्धिमान् लोकही नैतिकदृष्ट्या निकृष्टावस्थेस पावतात असें मि. दादाभाई नौरोजी यानीं एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचा प्रत्यय हल्लींच्या कालीं सबॉर्डिनेट सर्विसमध्यें या देशांत डेप्युटी कलेक्टर, मामलेदार किंवा मॅजिस्ट्रेट वगैरे जे कांहीं नेटीव कामगार आहेत त्याची स्थिति अवलोकन केली असतां सहज येणार आहे. अव्वल इंग्रजींत म्हणजे ज्यावेळीं परकीय अमलाचें जूं आमच्या मानेवर पूर्णपणें बसलें नव्हतें तेव्हां--दमरदार किंवा मामलेदार अशा मोठ्या अंमलदारांस वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांकडून थोडाबहुत तरी मान मिळत होता आणि त्यांची सल्ला सरकार जमेस धरीत असे. पण तेही दिवस आतां राहिले नाहींत. या अंमलदारांच्याच सहाय्यानें इंग्रजसरकारानें जिल्ह्यानिहाय किंवा गांवोगांव जमीनीची, जंगलाची किंवा अन्य तऱ्हेची खडान्खडा माहिती गोळा करून ती पुस्तकरूपानें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपयोगाकरितां प्रसिद्ध

केलेली आहे. ही माहिती जेव्हां गोळा झाली तेव्हां ती गोळा करणारांच्या मनांत अशी कल्पनाही आली नसेल कीं, या माहितीच्या जोरावर वरिष्ठ युरोपियन अधिकारी पुढें आपली अगदीं पायमल्ली करून टाकतील. कसेंही असो, खालच्या प्रतीच्या किंवा वर दिलेल्या म्हणीप्रमाणें पहिल्या प्रकारच्या शेतकरी वगैरे वर्गांत " आम्हांस जर कोणी बुडाविलें असेल तर तें सरकारापेक्षां पांढरपेशा वर्गानेंच बुडाविलें " असा जो समज झालेला कधीं कधीं दृष्टोत्पत्तीस येतो तो अगदीं निष्कारण आहे असें नाहीं. लोकांची इनामें खालसा करण्यास काय युक्ति करावी, सनदांतील स्पष्ट शब्दांचा अर्थविपर्यास कसा करावा, पुर्वापार चालत आलेल्या वतनदार लोकांच्या हक्कांस हळु हळू पण पूर्ण आळा कसा घालावा, सारा कसा वाढवावा, लोकांची जंगलें कशीं ब्यावीं अथवा मिठाचा आणि अबकारीचा बंदोबस्त करून उत्पन्न कसें वाढवावें याबद्दलच्या युक्त्या स्वराज्यांत तयार झालेल्या पांढरपेशा वर्गानेंच परकीय राज्यकर्त्यांस सांगून त्यांस हुषार केलें आहे. सारांश, आम्हीच आमच्या घरचा भेद या राज्यकर्त्यांस देऊन त्यांची शाबासकी किंवा सार्टिफिकीटें मिळाविलीं आहेत. परंतु त्याचा पुढें काय परिणाम होईल इकडे त्यावेळीं कोणी लक्ष दिलें नाहीं. ही माहिती इंग्रजसरकारास आतां आमच्याकडून मिळण्याची जरूर उरली नाहीं. यदाकदाचित् थोडीशी जरूर असली तर ती भरून काढणें किंवा भागविणें सेवकवर्गाचा आतां मान बहुतेक नाहींसा झालेला आहे; आणि त्यांतील सर्व लोक वरिष्ठ युरोपियन अधिकारी जे हुकूम करतील ते अमलांत आणण्याचीं यंत्रें बनून राहिले आहेत. देशांतील बुद्धिमान् लोकांचा सगळा वर्ग अशा रीतीनें उदरपोषणाकरितां परकीय राज्यकर्त्यांच्या अगदीं कह्यांत गेल्यावर देशाची उन्नति लवकर झाली नाहीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? सेवाधर्म हा गुणच असा आहे कीं, त्यांत स्वाभिमानादि इतर गुण लोपून जातात; आणि विशेषेंकरून ज्या वेळीं अशा प्रकारचे सेवक तयार करण्याकरितां शाळा व कॉलेजें स्थापून त्यांतून देशांतील तरुण पिढीस सदर धर्मास अनुकूल असें आरंभापासूनच शिक्षण देण्यांत येतें तेव्हां या वर्गाच्या आंगचे गुण सेवाधर्मापुढें लोपतात इतकेंच नव्हे तर तरुण पिढींत सेवाधर्मास योग्य अधिकारी होण्यापूर्वीच ते गुण बहुतेक नामशेष होतात. अशाही परिस्थितींत एखादा तरुण विद्यार्थी जरासा तेजस्वी निघाला तर तो नोकरींत पडल्याबरोबर लागलींच थप्पड खातो; आणि त्याही थपडीनें ताळ्यावर न आल्यास लवकरच उदरपोषणाकरितां त्याला दुसरा कांहीं तरी मार्ग अंगिकारावा लागतो. ही स्थिति अत्यंत शोचनीय होय, असें कोणीही कबूल करील. पांढरपेशा वर्गाच्या पोषाखाकडे किंवा राहणीकडे दृष्टि दिली असतां हा वर्ग नैतिक दृष्ट्या इतक्या निकृष्ट दशेस पोंचला असेल अशी सहसा कल्पना होत

नाहीं पण जरा खोल विचार केला तर खरी स्थिति काय आहे हें सहज कळून येतें. आम्ही हा जो दोष दाखवीत आहों तो आमच्या लोकांचा असल्यामुळें आमच्यावर कदाचित् कांहीं शहाणी मंडळीं स्वजातिद्रोहाचाही आरोप करण्यास मागें पुढें पाहणार नाहीं. परंतु या परकीय राज्यांत आमच्या देशांतील प्रजेच्या हिताच्या आड ज्या कांहीं गोष्टी येताहेत—मग त्या राज्यकर्त्यांबद्दलच्या असोत किंवा स्वदेशी नोकरांबद्दलच्या असोत—त्यांचें निर्भयपणें विवेचन करणें हें आमचें कर्तव्य आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आमच्या देशांतील सेवकवर्गासंबंधानें वरच्याप्रमाणें उद्घाटण करणें अवश्य आहे. हे विचार आज सुचण्याचें कारण मद्रासइलाख्यांत गुंटूर जिल्ह्यांतील ओंगोल तेथील वकील एम्. व्यंकट सुब्बाराव यांनीं " हिंदुस्थानांतील दुष्काळ आणि नेटिव मुलकी अमलदार " यासंबंधानें नुकतेंच प्रसिद्ध केलेंले लहानसें पुस्तक होय. यंदांच्या सालचें प्रांतिक बजेट मद्रासच्या कायदेकौन्सिलापुढें मांडतांना मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ॲम्प्टल यांनीं असें बोलून दाखविलें होतें कीं, " दुष्काळच्या गैरव्यवस्थेबद्दल किंवा दुष्काळाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल सरकारास दोष देणें गैरवाजवी आहे. कारण सरकारास यासंबंधानें जी माहिती मिळते ती जिल्ह्यांतील डेप्युटी कलेक्टर, मामलेदार, भागकारकून, पोलिस आणि जंगलखात्याचे अंमलदार यांजकडून मिळत असते; आणि सरकारास खुष करण्याकरितां हें अंमलदार जाणूनबूजून खोटी माहिती देतात असें म्हणणें म्हणजे हुषार नेटिव अंमलदारांची विनाकारण नालस्ती करणें होय. त्यांतून अशा तऱ्हेचे आक्षेप या अंमलदाराच्या देशबंधूंकडूनच यावेत हें मोठें आश्चर्य होय." लॉर्ड ॲम्प्टल यांची ही कोटी खरोखरच मोठ्या चतुराईची आणि कावेबाजपणाची आहे. इंग्रजींत या कोटीस 'डायलेमा' म्हणत असतात डायलेमा म्हणजे अन्यतरापत्तीचा दोष होय. उदाहरणार्थ, प्रस्तुत कोटींतच सरकारास नांव ठेवावें तर आपल्या जातींतील हुषार अमलदारांस नांव ठेवावें लागतें; वरें देशी अंमलदार खरें बोलतात म्हणावें तर सरकारास दोष देण्यास प्रवृत्त झालेल्या लोकांचा इष्ट हेतु साधत नाहीं. कोणताही पक्ष घेतला तरी तो सरकारास इष्टच आहे. अशा प्रकारच्या कोटीस उत्तर देण्याचे मार्ग आहेत, नाहींत असें नाहीं. तथापि लॉर्ड ॲम्प्टल यांनीं ही कोटी करण्यांत जें बुद्धिकौशल्य दाखविलें त्याबद्दल त्यांची आम्हीं तारीफ करतों. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, हें बुद्धिकौशल्य अस्थानीं म्हणजे खोट्या पक्षाच्या समर्थनाकरितां खर्च झालेलें आहे. खरी स्थिति अशी आहे कीं, इंग्रजी राज्याची मगरमिठी जसजशी जास्त वसत चालली आहे त्या त्या मानानें सरकारी सेवेंत असलेल्या नेटिव अमलदारांचें मानसिक धैर्य अधिकाधिक लुप्त होत चाललें आहे व वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्याकरितां त्यांस पसंत पडतील असेच रिपोर्ट—मग

ते खरे असोत वा खोटे असोत–हे अधिकारी निःशंकपणें करण्यास तयार झालेले आहेत. लॉर्ड ॲम्प्टल यांच्या दृष्टीनें हा वर्ग मोठा हुषार असेल व आमच्या दृष्टीनेंही तो कांहीं गैरहुषार नाहीं–पण स्वाभिमान किंवा सत्यनिष्ठा हे गुण आमच्या दुर्दैवानें या वर्गाच्या आंगांत पूर्वीप्रमाणें आतां राहिले नाहींत, असें स्पष्टपणें म्हणण्यास आम्हांस कोणतीच हरकत दिसत नाहीं. तालुक्यांत यंदां किती पिक आलें आहे याचा रिपोर्ट जर मामलेदारास करावयाचा असेल तर सदर रिपोर्ट केवळ वस्तुस्थिति पाहून तो करीत नाहीं; कलेक्टरसाहेबांचें मत काय आहे आणि त्यांस काय आवडेल या धोरणावरही रिपोर्ट होत असतात, आणि एखादा वस्तुस्थिति पाहून रिपोर्ट करणारा भेटल्यास त्याचें प्रायश्चित त्यास लवकरच भोगावें लागतें ! नेटिव अंमलदारांची अशा प्रकारें दुर्दशा होते आणि प्रजेच्या हितापेक्षां स्वार्थाकडे नजर देऊनच ते आपली नोकरी बजावीत असतात, याचा आम्हांस अनुभव आहे; इतकेंच नव्हे तर या वर्गांतील लोकांची मनोमय देवताही अशीच साक्ष देईल. लॉर्ड ॲम्प्टल कदाचित् म्हणतील कीं, तुमचेच लोक जर असे भितरे आणि असत्यवादी आहेत तर आम्हीं काय करावें ? प्रश्न ठीक आहे; पण त्यास आमचें असें उत्तर आहे कीं, ' ॲम्प्टल महाराज, हा जो नेटिव अंमलदारांच्या आंगांत दोष जडला आहे याचें खरें कारण आपल्यासारखे वरिष्ठ इंग्रजी अंमलदारच होत. आमच्या इलाख्यांत हा कार्यकारणासंबंध क्राफर्ड कमिशनच्या वेळीं लोकांच्या चांगला निदर्शनास आला होता. क्राफर्ड-साहेब लांच मागूं लागल्याबरोबर ग्रॅज्युएट मंडळीसहि त्यांच्या जाळ्यांत सांपडण्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग राहिलेला नव्हता. लॉर्ड रे यांस चांगले गव्हर्नर आम्ही म्हणतों तें एवढ्याचकरितां कीं, त्यांनीं या कामांत खरा दोष कोणाचा हें ओळखून काफर्डावर खटला केला आणि नेटिव अंमलदारांस माफी दिली. लॉर्ड ॲम्प्टल जर मद्रास इलाख्यांतील कामगारांस अशा प्रकारची माफी देण्यास तयार असतील तर मद्रासेंतील शेंकडों तहशीलदार किंवा डेप्युटी कलेक्टर दुष्काळासंबंधानें आपण खोटे रिपोर्ट कां केले यांचीं कारणें लॉर्डसाहेबांस मोकळ्या मनानें सादर करतील. मि. व्यंकट सुब्बाराव यांनीं आपल्या पुस्तकांत लॉर्ड ॲम्प्टल यांच्या कोटीचें अशाच प्रकारें निराकरण केलें आहे; आणि आमच्या दृष्टीनें तें खरें आहे. इतकेंच नव्हे तर, आमच्या इलाख्यांतील अनुभवावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते असें त्यांस आम्ही कळवितों. किंबहुना आमच्या इलाख्यांतिल अनुभव याहीपेक्षां भयंकर आहे, असें म्हटलें तरी चालेल. इलाख्याच्या राज्यव्यवस्थेचीं सूत्रें गव्हर्नर आणि कौन्सिलर यांच्या हातांत इतकीं दृढ आलीं आहेत कीं, नेटिव अंमलदारच काय, पण कलेक्टरासारखे युरोपियन अंमलदारहि कौंसिलदाराच्या किंवा सेक्रेटरीएटमधील मताच्या विरुद्ध एखादी गोष्ट नेटानें करूं लागल्यास त्यास त्याच्या मानानें पगाराची

शिक्षा न झाली तरी बदलीची शिक्षा भोगावी लागते. सरकारची अशा प्रकारची कदर असल्यावर केवळ वस्तुस्थितीप्रमाणेंच सरकाराकडे रिपोर्ट करण्याचें धैर्य असणारा मायेचा पूत एकादाच सांपडल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. राज्यव्यवस्थेंत नोकरी करणाऱ्या आपल्या हाताखालील देशी अधिकाऱ्यांत अशा प्रकारचें मानसिक दौर्बल्य असावें हेंच सरकारास इष्ट आहें व सर्व राज्यव्यवस्था ज्या रीतीनें चालली आहे ती रीत देशी अंमलदारांत अशा प्रकारचें मानसिक दौर्बल्य प्रत्यहीं उत्पन्न करीत आहे. लॉर्ड ॲम्प्टल यांस जर ही स्थिति माहीत नसेल तर त्यांचा चौकसपणा कमी आहे, असें आम्ही समजूं आणि माहीत असूनहि जर सरकारच्या कृत्याचें वरच्याप्रमाणें ते समर्थन करीत असतील तर हें शहाणपणाचें ढोंग आहे असें म्हणावें लागेल. मानसिक धैर्याच्या बाबतींत पाहिलें तर देशी अंमलदारांचा वर्ग हल्लींच्या कालांत अगदीं कवडीमोलाचा झाला आहे, असें मोठ्या दुःखानें कबूल करावें लागतें. कलेक्टरसाहेबांस कोणती गोष्ट प्रिय आहे याची हे अधिकारी त्यांच्या बटलराकडून बातमी आणीत असतात; इतकेंच नव्हे तर सरकारच्या धोरणाचा वारा कसा वाहत आहे हें सूक्ष्म रीतीनें मोजण्यास यांचीं मनें अशा रीतीनें तयार झालीं असतात कीं, तीं विसाव्या शतकांतील वेधशाळेंतील सूक्ष्म वायुमापक यंत्रासहि मागें टाकतील ! यांच्या मंडळींत क्षणभर बसलें तर जी कांहीं चर्चा ऐकूं येते तीही याच मासल्याची होय. स्वतःचें मत किंवा खात्री कोणत्याहि प्रकारची असली तरी हा उदरपोषणाविषयीं आतुर झालेला अंमलदार आपलें मत क्षणभर बाजूस ठेवून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणेंच मत देणें हें आपलें कर्तव्य समजत असतो. कालेजांतून दरवर्षीं बाहेर पडणाऱ्या उमेदवारांपैकीं बहुतेक लोक पाहिल्यानें नाहीं तरी पुढें मागें जेव्हां अशा प्रकारच्या मानसिक दौर्बल्यानें ग्रस्त झालेले असतात, तेव्हां त्यांच्या बुद्धीचा किंवा अधिकाराचा देशास बिलकुल फायदा न झाल्यास त्यांत नवल तें कोणतें ? कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या ' न्यू इंडिया ' नामक पत्राच्या गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या अंकांत बंगाल इलाख्यांतील नेटिव अधिकाऱ्यांचीहि स्थिति अशीच शोचनीय आहे, असें लिहिलें आहे. म्हणजे मद्रास, मुंबई आणि बंगाल या तिन्ही इलाख्यांतील नेटिव अंमलदारांच्या स्थितीचा अनुभव एकसारखाच आहे व जिकडे तिकडे एक प्रकारेंचच मानसिक दौर्बल्य माजत चाललें आहे, असें दिसतें. हें दौर्बल्य निघणार कसें ? हा एक मोठाच प्रश्न आहे. आमच्या कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस जर आम्ही सांगितलें कीं, " बाबांनो तुम्ही सरकारची नोकरी करा; आम्ही नाहीं म्हणत नाहीं. तुमचे वरिष्ट अधिकारी जे हुकूम करतील त्यांची अंमलबजावणी तुम्हांस केली पाहिजे, पण अशी अंमलबजावणी करणें यांत अंमलदारास

खुष करण्याकरितां खोटें मत देणें याचा समावेश होत नाहीं. सारांश, राजाची नोकरी करण्यांत प्रजेशीं बेइमानीपणा केलाच पाहिजे असें नाहीं. आणि एवढें जर तुम्ही लक्षांत ठेवाल तर पतिव्रता वधू ज्याप्रमाणें उभयकुलांस आनंददायक होते त्याप्रमाणें राजा व प्रजा या दोघांसही तुम्ही मान्य व्हाल. " तर या उपदेशाचा परिणाम स्वार्थाविरुद्ध होत असल्यामुळें लवकरच त्यांस हा मार्ग सोडून द्यावा लागतो. करितां हें दौर्बल्य काढण्यास खरा उपाय म्हटला म्हणजे सरकारानें आपल्या नेटिव अंमलदारांपैकीं हांजी हांजी करणारे कोण आणि खरें बोलणारे कोण, याची निवड करून खरें बोलणारांस उत्तेजन किंवा प्रमोशन देणें हाच होय. ही गोष्ट सरकाराकडून होत नाहीं. उलट अशीं उदाहरणें आहेत कीं, जो अंमलदार केवळ आपल्या वरिष्ठ अंमलदारांस खुष ठेवतो, इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वारीचा मुक्काम किंवा तळ रेल्वेजवळ असल्यास सदर रेल्वेस्टेशनवरून रात्रीं बेरात्रीं जाणाऱ्या बड्या इंग्रजी अंमलदारांची किंवा त्यांच्या कुटुंबांची मोठ्या काळजीनें चहा वगैरे देऊन सरबराई किंवा आदरातिथ्य ठेवतो त्यासच–मग तो अंमलदार या नात्यानें कितीही मूर्ख असो–नेटिवांकरितां ज्या दहा पांच मोठ्या जागा शिल्लक आहेत त्यांपैकीं एखादी मोठी जागा मिळते अथवा नोकरी संपल्यावर पेन्शनाखेरीज दुसरें कांहीं तरी बक्षीस किंवा पदवी मिळते. रावसाहेब–रावबहादुरांबद्दल सामान्य लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि नसते याचें कारण हेंच होय. सरकारानें यांना बंदेगुलाम बनविलेले असतात; आणि पंचवीस तीस वर्षांच्या अभ्यासानें आंगीं जडलेली ही संवय पेन्शन घेतल्याबरोबर सोडून देणें बहुधा अशक्य होतें. हे विद्वान् किंवा हुषार नसतात असें नाहीं. पण ती विद्वत्ता आणि हुषारी सरकारचरणीं अर्पण केली असल्यामुळें किंबहुना सरकारास विकली असल्यामुळें पेन्शनींतही तोच कित्ता गिरविणें त्यांस सुखावह व निर्भय वाटतें. इंग्रज सरकार परकी असल्यामुळें त्यांस ही गोष्ट इष्ट आहे. कारण, देशांतील बुद्धिवान् लोक जितके सरकारच्या कह्यांत अधिक राहतील तितकें त्यास हवें आहे; पण आमची सरकारास एवढीच विनंती आहे कीं, ही स्थिति तुम्हांस इष्ट वाटत असली तर ठेवा. पण मग निदान ' तुमच्या देशांतील लोक मत देतात त्याप्रमाणेंच आम्ही अमुक गोष्ट करतों, अशी सबब सांगून दुःखित झालेल्या आमच्या अंतःकरणावर नवे डाग देऊं नका. हिंदुस्थानांतील नेटिव लोकांत दानत (Character) किंवा मानसिक धैर्य नाहीं अशी आमच्या नांवानें जगभर टिमकी वाजवावयाची आणि दुसरीकडे राज्यव्यवस्थेचा चरक असा चालवावयाचा कीं, त्याखालीं शाहाण्या व तरुण देशी अंमलदारांचें मानसिक धैर्य किंवा स्वतंत्रता यांचा अगदीं चट चुराडा उडून जाईल, हें तत्व इंग्रजसरकारास फार चांगलें साधल आहे. आज हिंदुस्थानचें जें कांहीं नुकसान होत आहे त्यांपैकीं हें मोठें नुकसान होय.

आणि त्याचा प्रतिकार करणें असल्यास तो दादाभाई नौरोजी आजन्म कंठशोष करीत आले आहेत, त्याप्रमाणें नेटिवांस वरिष्ठ प्रतीच्या जागा देऊन मतस्वातंत्र्य व मानसिक धैर्य या गुणांचा त्यांच्या आंगीं जेणेंकरून विकास होईल, अशी व्यवस्था ठेविल्याखेरीज व्हावयाचा नाहीं. सारांश, या मानसिक दौर्बल्यास कारण सरकारच झालेलें आहे. बड्या सरकारी अंमलदारांस खालील नेटिव अधिकाऱ्यांच्या तोंडपूजेचा हा प्रकार कळत नसेल असें नाहीं. पण सरकरचें त्यामुळें काम होतें अशी जर त्यांची समजूत आहे तर त्याचा निषेध त्यांनीं काय म्हणून करावा ? केवळ देशाच्या हिताची ज्यास कळकळ आहे असा एकादा दुसरा देशी अंमलदार निघाल्यास त्याचें प्रायश्चित्त त्यास कसें मिळतें, हें वर सांगितलेंच आहे. अशीं उदाहरणें डोळ्यापुढें असतां नेटिव अंमलदारांनीं मानसिक दौर्बल्य सोडून राजा व प्रजा यांची नोकरी करावी, म्हणजे बहुतेक पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखेंच आहे. तथापि, अशा प्रकारचा उपदेश किंवा विनंति केल्याखेरीज हा लेख संपवितां येत नाहीं. मोरोपंतांनीं म्हटल्याप्रमाणें ' परवशतेनें शतगुण जाच ' कसा होतो, हें या विवेचनावरून दिसून येणार आहे. तथापि, धीर धरून देशांतील बुद्धिवान् लोकांनीं याचा प्रतिकार करणें हें त्यांचें कर्तव्य होय, आणि तशा प्रकारच्या कर्तव्यास जागृत होऊन आपल्या मानसिक धैर्यानें सरकारासही हे लोक ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करतील, अशी आम्हांस आशा आहे. निदान लॉर्ड ऑम्प्टल यांनीं आतां जशा प्रकारची सबब पुढें आणली आहे तशा प्रकारची आणण्यास तरी अशा वर्तना नें मार्ग राहणार नाहीं.

❁ ❁ ❁

*इंग्रजी राज्याची कदर !

डुकरमाऱ्या अंमलदार !!

गेल्या शनिवारच्या स्थानिक कायदेकौन्सिलाच्या सभेंत जीं प्रश्नोत्तरें झालीं त्याचा सारांश आज बाहेर दिला आहे. परंतु त्यांपैकीं ना. खरे यांनीं विचारलेला एक प्रश्न राजनीतीच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा असल्यामुळें त्याची येथें थोडी जास्त चर्चा करण्याचा आमचा विचार आहे. इंग्रज सरकारच्या राज्यांत लोकांनीं हत्यारें परवान्याखेरीज बाळगूं नयेत असा सरसहा कायदा झालेला आहे, हें सर्वांस माहीत आहेच. हत्यार बाळगण्याची सर्वांस मोकळीक असल्यानें विशेषतः नवीन हुकमी नेमाचीं व लांब पल्ल्याचीं हत्यारें लोकांस कांहीं अटकाव न ठेवतां वापरूं दिल्यानें राज्यास अपाय आहे. निदान फौजफाट्याचा अधिक बंदोबस्त तरी राज्यकर्त्यांस ठेवला पाहिजे, अशी आमच्या राज्यकर्त्यांची समजूत आहे. व या समजुतीमुळेंच सर्व राष्ट्रास कायद्यानें निःशस्त्र करून मेंढपाळाप्रमाणें त्यांजवर राज्य करण्याचें व्रत त्यांनीं आंगिकारलें आहे ! लोकांजवळ शस्त्रें असल्यानें ते तामसी होऊन मारामाऱ्या व खून करण्यास अधिक प्रवृत्त होतात व एकंदर जनसमूहास त्यापासून अधिक त्रास होतो, यास्तव सर्व प्रजा निःशस्त्र करून राज्य चालविणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे; अशा प्रकारचीं कांहीं औपचारिक कारणें हत्याराच्या कायद्याच्या समर्थनार्थ देण्यांत येत असतात. परंतु हीं कारणें खरीं नाहींत; वास्तविक कारण निराळेंच आहे, हें कोणास सांगण्याची आतां बहुधा जरूर उरली नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांस निःशस्त्र केल्यानें त्यांच किंवा त्यांच्यापासून इंग्रजी साम्राज्याचें संरक्षण करण्याचा बोजा कमी होतो अशा हेतूनेंच ही सार्वजनिक निःशस्त्र करण्याची योजना झालेली आहे; व तिचा अंमल इतक्या जारीनें सुरू आहे कीं, लग्नसमारंभाकरितांही क्षणभर कट्यार कोणी हातांत घेतली तरी कायद्याच्या पेंचांत सांपडण्याची त्यास भीति असते ! इतकेंच नव्हे तर जिल्ह्यानिहाय बंदुका किंवा इतर हत्यारें बाळगण्याकरितां जे परवाने दरसाल दिले जातात त्यांचीही संख्या उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. ज्या गांवांत जंगल किंवा डोंगर जवळ असल्यामुळें रानटी जनावरांचा शेतकऱ्यांस फार उपद्रव होतो तेथें सुद्धां शेतकऱ्यांस तोड्याच्या देखील बंदुका बाळगण्याची सरकारांतून परवानगी मिळत नाहीं; मग रायफलची गोष्ट तर बाजूलाच राहिली ! देशांतील लोक किंवा त्यांचीं

---

* [केसरी ता. २८ जुलै १९०५]

जनावरें हिंस्र पशूंनीं खाल्लीं तरी कांहीं हरकत नाहीं. त्यापासून होणाऱ्या नुकसानापेक्षां लोकांस शस्त्रें बाळगूं दिल्यानें होणारें नुकसान अधिक आहे अशी आमच्या राज्यकर्त्यांची समजूत किंवा त्यांच्या राजनीतीचें धोरण आहे. हें धोरण उदात्त राजनीतीच्या तत्वाप्रमाणें किती शुद्ध अथवा गर्ह्य आहे याचा विचार आज कर्तव्य नाहीं. याबद्दल जें कांहीं लिहावयाचें तें वेळोवेळीं आम्हीं लिहिलेंच आहे. आज या धोरणाचे परिणाम कसे काय होतात व त्यामुळें सरकारी अंमलदारास काय युक्त्या योजाव्या लागतात व रयतेस काय त्रास पडतो यांचें जें एक मासलेवाईक उदाहरण नजरेस आलें आहे त्याबद्दल विचार करावयाचा आहे. धारवाड जिल्ह्यांत कलघटगी आणि बंकापूर या दोन तालुक्यांत शेतकरी लोकांचें म्हणजे त्यांच्या शेतांतील पिकांचें रानडुकरांच्या योगानें अतिशय नुकसास होत असल्यामुळें त्यांनीं सरकाराकडे कागाळी केली. रानडुकरांपासून शेताचा बचाव करण्यास शेतकऱ्याजवळ कांहीं हत्यार पाहिजे हें उघड आहे. पण हें हत्यार त्यांजपाशीं यावें कसें ? जिल्ह्यांतील लोकांस बंदुकीचे परवाने शिरस्त्यापेक्षां अधिक दिले तर सरकारांतून ठपका येणार आणि न दिले तर शेतकऱ्यांच्या शेतांतील पिकास रानडुकरांकडून होणारा उपद्रव कमी होणें शक्य नाहीं. अशा प्रकारच्या अडचणींत पडल्यावर धारवाडच्या कलेक्टरांनीं त्याच्या निवारणार्थ एक मोठी अजब युक्ति काढली ! त्यांच्या डोक्यांत असें आलें कीं, या डुकरांचा नाश करण्याकरितां एक नवा युरोपियन (नेटिव नव्हे हो !) कामगार नेमण्याची सरकारांतून परवानगी आणावी. परंतु असें करण्यापूर्वी त्यांनीं डि० डे० कलेक्टरास असा हुकूम दिला कीं, या कामाकरितां तालुक्यांतील लोक लोकलफंडाइतका दरसाल अधिक कर देण्यास कबूल आहेत कीं काय, आणि डुकरमाऱ्या गोरा कामगार नेमिला असतां त्यास डुकर मारण्याचे कामीं खड्डे वगैरे खणून मदत करतील कीं नाहीं, याची शेतकऱ्यांस बोलावून चौकशी करावी. डे० कलेक्टर काय आणि मामलेदार काय, हुकूमाचे बंदे. कलेक्टरसाहेबांचा याप्रमाणें हुकूम होतांच मामलेदारांनीं गांवोगांवच्या पाटील-कुळकर्ण्यांस नोटिसा काढल्या कीं, एक डुकरमाऱ्या नवीन गोरा अंमलदार नेमण्याचा कलेक्टरसाहेबांचा विचार आहे. करितां दोन दिवसांच्या आंत गांवांतील रयतपैकीं आठ दहा प्रमुख लोकांस घेऊन तुम्ही तालुक्यास या आणि सर्वांनीं मिळून लोकलफंडाइतका अधिक जास्त कर डुकरें मारण्याच्या कामाकरितां देण्यास कबूली द्या. हें मोठें वहत्त्वाचें काम आहे; करितां याबद्दल हयगय होतां कामा नये, इत्यादि. याप्रमाणें मामलेदारसाहेबांचें सर्क्युलर गेल्यावर कोण कबूली देणार नाहीं ? बंकापुर तालुक्यांतील मामलेदारानें तर हां हां म्हणतां ५०० रु. गोळा केले ! परंतु कलेक्टरसाहेबांचें पुढें मन फिरल्यामुळे त्यांनीं डुकरमाऱ्या गोरा ऑफिसर नेमण्याची कल्पना सोडून दिली

आणि जमलेल्या पैशांपैकीं सुमारें १०० रुपये भाल्याचीं फाळें विकत घेण्यांत खर्च करण्यांत आले. मामलेदार किंवा कलेक्टर यांनीं काढलेलें हे हुकूम सरकारच्या संमतीनें काढले होते काय? असा ना. खरे यांनीं एक प्रश्न विचारला होता त्यास अस उत्तर मिळालें कीं, सरकारची त्यास मंजुरी मिळालेली नव्हती; व कलेक्टरच्या रिपोर्टावर सरकारानें अद्याप कांहीं ठराव केला नाहीं. सरकारचें हें उत्तर बरोबर असेल, नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. तथापि कलेक्टरसाहेबांची युक्ति, डे. कलेक्टर व मामलेदार यांचे हूकूम आणि त्यांनीं लोकांपासून ५०० रु. गोळा केले या गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे इंग्रजी राज्याच्या नांवानें रडावें कीं हंसावें हें आम्हांस समजत नाहीं ! रानडुकरांपासून शेतीस विशेषतः बागायतीस-फार उपद्रव होतो आणि शेतकऱ्यांजवळ लहान लहान भाले दिल्यानें या उपद्रवाचें नीट निरसन होत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. शेतकऱ्यांच्या हिताची ज्यास मनापासून कळकळ आहे तो ती कधींही नाकबूल करणार नाहीं व हल्लींच्या कामांत धारवाडचे कलेक्टर यांनींहीं ती गोष्ट मान्य केली आहे असें उघड दिसून येतें. परंतु कलेक्टरसाहेब झाले म्हणून करतात काय ? सरकारचे बंदे नोकर आणि सरकारची कदर अशी कीं, होतां होईल तोंपर्यंत कोणाही नेटिवास हत्यारें बाळगण्याचा परवाना देऊं नये. अशा स्थितींत कलेक्टरसाहेबांनीं युक्ति काढली कीं, डुकरें मारण्याकरितां एक स्वतंत्र अंमलदार नेमला तर हत्यारांच्या कायद्याचा हेतु न मोडतां शेतकऱ्यांचें काम होईल. पण येथें हीही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, कलेक्टरसाहेब हा जो डुक्करमाऱ्या अंमलदार नेमणार होते तोहि गोरा नेमणार होते. म्हणजे काळ्या माणसाच्या हातांत या युक्तीनें देखील बंदुक मिळण्याची आशा नको. मायबाप सरकार सर्वस्वीच जर आमचें रक्षण करण्यास तयार आहे, तर डुकरांपासून आमच्या शेतांचा बचाव तरी कोण करणार ? सरकारच कीं नाहीं ! मग त्याकरितां एकादा गोरा अंमलदार सरकारांतून नेमल्यास आपण त्यास मदत करावयास नको काय ? अशा प्रकारचा कोटिक्रम सरकारतर्फे आमच्यापैकीं कित्येकांकडून लढविण्यांत येईल. हें आम्हीं जाणून आहों. कारण या आर्यभूमीच्या पुत्रांत असेहि कांहीं वीर आहेत कीं, आम्हांस निःशस्त्र करून आमच्या शेतांतील पिकांचें रानडुकरांपासून रक्षण करण्याकरितां गोरा अंमलदार नेमण्यास सरकार तयार झालें तरी देखील ते सरकारची स्तुतीच गातील ! परंतु खरोखर लोकांचें मत पाहिलें तर ही लज्जास्पद स्थिति आपणांस प्राप्त झाल्याबद्दल कोणासही खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. आमच्या पैशावर, उद्योगावर, रक्तावर, आणि वीर्यावर वाढलेल्या आमच्या राज्यकर्त्यांच्या मनांत आमच्याबद्दल इतका गैरविश्वास असावा कीं, शेतांतील पिकांचें रानडुकरांपासून संरक्षण करण्याकरितां तोड्याची बंदुक बाळगण्याची

देखील त्यांनीं सढळ हातानें आम्हांस परवानगी देऊं नये, यांपेक्षां अधिक लज्जास्पद व आश्चर्यकारक गोष्ट ती कोणती ? टोळ मारण्याकरितां गोरे कामगारच नेमलेले होते; व त्यास कारण असें दर्शविलें होतें कीं, जाळी वगैरे बांधून त्यांत टोळ हांकून नेणें हें मोठ्या खटपटीचें काम असल्यामुळें तें शेतकऱ्याकडून व्यक्तिशः व्हावयाचें नाहीं. बरें आहे. महाराज; पण डुकरांचीही गोष्ट अशीच आहे काय ? दोन हात भाल्यानें जो शेतकरी डुकर मारतो तो हातीं बंदुक किंवा पिस्तुल असल्यानें अधिक डुकरें मारण्यास असमर्थ होईल काय ? पण बंदुक म्हटली कीं, आमच्या सरकारच्या मनांत संशय उतरलाच. त्यांतून रयतेच्या हातांत बंदूक, मग काय ? ही नवीन १८५७ सालची तयारीच झाली म्हणावयाची ! अशा स्थितींत धारवाडच्या कलेक्टरांनीं जी युक्ति काढली ती खरोखरच अजब होय. शेतकऱ्यांची तक्रार खोटी म्हणवेना आणि त्यांस हत्यारही देतां येईना. मग शेतांतील डुकरें शेतकऱ्यांच्या खर्चानें गोऱ्या अंमलदाराकडून मारविण्यापेक्षां दुसरा मार्गच नव्हता. पण शेतकऱ्यांच्या सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा कलेक्टरसाहेबांनीं आपली नवी नयुक्ति अंमलांत आणण्याचें सोडून दिलें आणि हें प्रकरण येथेंच थांबलें. न जाणो कलेक्टरसाहेबांचा असाही कदाचित् उद्देश असेल कीं, या नवीन युक्तीबद्दल आपण पेटंट घेऊन मग सरकाराकडून तिचा अमंल करावा ! कसेंही असो; आम्हांस तर या असल्या युक्तीबद्दल अथवा ही युक्ति राज्यव्यवस्थेच्या ज्या धोरणामुळें सुचली त्या धोरणाबद्दल तिरस्कार व खेद वाटल्यावांचून रहात नाहीं. शेतांतील रानडुकरें मारण्यास शेतकरी कांहीं असमर्थ नाहींत. परंतु सरकारची कदरच अशी कीं, या कामाकरितां देखील त्यांस योग्य हत्यारें मिळूं नयेत. बरें, हेंहि झालें, पण यापुढची पायरी तर अतिशयच लज्जास्पद आहे. ती ही कीं, जें काम हत्यारें दिली असतां लोक आपोआप करतील तेंच काम करण्याकरितां लोकांवर नवा कर लादून एक गोरा अंमलदार नेमावयाचा; आणि तो अंमलदारही लोकांच्या संमतीनें व खुषीनें नेमला असें म्हणावयाचें ! हत्यारांच्या कायद्याचा आणखी भयंकर परिणाम तो कोणता ? उद्यां शेतास उपद्रव करणाऱ्या चिमण्या किंवा दुसरीं रान–पांखरें मारण्याकरितां देखील शेतकऱ्यांच्या खर्चानें एखादा गोरा अंमलदार नेमण्याची युक्ति निघेल; आणि त्या गोऱ्या अंमलदारास जाळीं वगैरे पुरून जो मदत करणार नाहीं तो कायद्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल ! धन्य आहे इंग्रजी राजनीतीची कीं, आमच्या शेतकऱ्यांवर देखील त्यांच्याच खर्चानें ती जैनधर्म लादीत आहे ! वरील गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे आमच्या घरांत आम्हांस उपद्रव देणारीं चिलटें किंवा ढेंकूण मारण्यास देखील आमच्या खर्चानें एखादा गोरा अंमलदार नेमण्याची पाळी येईल कीं काय, अथवा एखादा कलेक्टर सूचना करील कीं काय आणि एवढा खटाटोप आमच्या कल्याणाक-

गितांच चालला आहे असेंहि पुन्हां म्हणेल कीं, काय अशी शंका येते. ज्या राज्यांत डुकरांपासून शेताचें संरक्षण करण्याकरितां देखील शेतकऱ्यांस शस्त्र बाळगतां येत नाहीं तें राज्य कितीही शांततेचें असलें तरी त्याचा आम्हांस काय उपयोग ? ना. खरे यांचा प्रश्न आम्हीं पाहिला तेव्हां आम्हांस तर असें वाटत होतें कीं, धारवाडच्या कलेक्टरनें सुचविलेल्या अजब युक्तीबद्दल सरकार त्याची चांगली कानउघाडणी करील आणि गांवोगांव डुकरें मारण्याकरितां प्रत्येक शेतकऱ्या-जवळ नाहीं तरी दर गांवीं पाटील, कुळकर्ण्याजवळ दोन चार ' मझललोडर ' बंदुका ठेवण्याचा हुकूम देईल, पण सरकार असलें खमंग आहे कीं, मामले-दारांनीं काढलेले हुकूम किंवा कलेक्टरची युक्ती यास सरकारची मंजुरी नव्हती यापेक्षां ना. खरे यांच्या प्रश्नास उत्तर देतांना सरकारनें कांहीं एक जास्त सांगितलें नाहीं. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या राजनीतीच्या धोरणाचें हें एक मासले-वाईक उदाहरण आहे. या नीतिचें धोरण बरेच प्रसंगीं लोकांस त्रासदायक, अपायकारक व अनिष्ट आहे, ही गोष्ट आमच्या राज्यकर्त्यांस पुरी माहित आहे. आम्ही मात्र मनांत मांडे खात असतों कीं, सरकारच्या नजरेस ही गोष्ट येत नाहीं व जर ती आपण त्यांच्या नजरेस आणली तर तिचा प्रतिकार झाल्याखेरीज राहणार नाहीं. परंतु सरकारचा कावा निराळाच असतो. कांहीं गोष्टींमध्यें तरी निदान आम्हांस कांहीं सवलत द्यावयाची नाहीं असा त्यांचा संकल्पच ठरला आहे; आणि असा संकल्प जेथें झाला तेथें त्या-पासून लोकांचें किती जरी नुकसान झालें तरी तें नुकसान न होण्यास हल्लींच्या प्रकरणीं गोरा अम्मलदार नेमण्याची जशी युक्ति निघाली तशीच एखादी निर्लज्जपणाची युक्ति लढविण्यापलीकडे जास्त कांहीं व्हावयाचें नाहीं, हा सिद्धांत होय. पिकांस त्रास देणारी रानडुकरें मारण्याबद्दलचा प्रश्न क्षुल्लक होय. परंतु या क्षुल्लक गोष्टीवरून देखील इंग्रजी राजनीतीचा वारा कसा वहात आहे याचा निर्णय उत्तम प्रकारचा होत असल्यामुळें या गोष्टीचें मुद्दाम आम्ही थोडेसें जास्त विवरण केलें आहे. भाताची परीक्षा शितावरून किंवा वाऱ्याच्या गतीची परीक्षा एका गवताच्या काडीवरून देखील करतां येते. प्रस्तुतचें उदाहरण त्याच प्रकारचें होय; आणि अशीं उदाहरणें जेथें जाणूनबुजून घडत आहेत तेथें लोकांच्या दुःखाची दाद लागून त्यांचा बचाव तरी कसा होणार याचा विचार वाचकांनींच करावा. शेतकऱ्यांचीं पिकें रानडुकरें खातात आणि शेतकऱ्यांचीं गुरें जंगलाजवळच्या तालुक्यांतून व्याघ्रादि हिंस्र पशू खातात. शेतकऱ्यांजवळ हत्यारें असलीं तर या दोहोंचेंही ते निवारण करतील, पण-पण-पण-पुढें कशाला ? वरील विवेचनावरून पुढला प्रकार वाचकांच्या लक्षांत आलाच असेल.

❖ ❖ ❖

*हिंदुस्थानची वाट काय ?

राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधींचें डेप्युटेशन विलायतेस जाणार असें प्रसिद्ध झाल्या दिवसापासून विलायतेंत सदर प्रतिनिधींनीं कोणत्या पक्षाच्या सहाय्यानें आपलें काम चालवावें, याबद्दल बरीच चर्चा झाली व होत आहे. कित्येकांच्या मतें आम्ही कोणत्याही पक्षास चिकटून न राहतां स्वतंत्र रीतीनें काम करावें आणि कित्येकांच्या मतें त्यांतले त्यांत लिबरलपक्षाचा अधिक आश्रय करावा. या बाबतींत विलायतेंतल्या कांहीं प्रसिद्ध गृहस्थांचीं मतें आम्ही गेल्या खेपेस दिलीं आहेत. सोशल डेमोक्रॅट पक्षाचे पुढारी मि. हिंडमन यांचेंहि यासंबंधाचें मत मागेंच प्रसिद्ध झालें आहे. मि. हिंडमन यांचें मत असें आहें कीं, विलायतें-तील कांहीं उदात्त मतांचे गृहस्थ किंवा सोशियालिस्ट अगर पॉझिटिव्हिस्ट पंथाचे लोक आमच्या प्रतिनिधींस मदत करतील; पण राज्यसूत्रें ज्यांच्या हातांत आहेत ते लोक--मग ते लिबरल असोत वा टोरी असोत--आमच्या म्हणण्याकडे सहसा लक्ष पुरविणार नाहींत, निदान हल्लींच्या स्थितींत तरी त्यांचें लक्ष तिकडे जाणार नाहीं. ही स्थिति आमच्या दृष्टीनें कितीहि अनिष्ट असली तरी ती वास्तविक तशी आहे; आणि तिचा प्रतिकार पांच सात वर्षांनीं एक दोन महिनेपर्यंत आमचे प्रतिनिधि विलायतेस पाठवून होईल असे आम्हांस वाटत नाहीं. विलायतेंत ज्या लोकांच्या ताब्यांत राजसूत्रें आहेत त्या लोकांचा कल स्वजाति आणि स्वार्थ या दोन कारणांमुळें स्वभावतःच अँग्लो-इंडियन लोकांकडे वळणार हें निःसंशय आहे. हा कल फिरविणें हें मोठ्या प्रयासाचें आणि दीर्घोद्योगाचें काम आहे. अर्थात हें काम जर तडीस न्याव-याचें असेल तर राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं एकनिष्ठपणानें अविश्रांत खटपट केली पाहिजे. 'दे वाई जोगवा' म्हणून ज्याप्रमाणें कोणी भिक्षा घालीत नाहीं, त्याप्रमाणेंच राजकीय हक्कहि हंगामी डेप्युटेशनें पाठवून मिळावयाचे नाहींत, त्या करितां चिकाटी धरून बसलें पाहिजे, आणि विलायतेंतील लोकांची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, या भिक्षेकऱ्यांस भीक घातल्याखेरीज आतां गत्यंतर नाहीं. सारांश, मि. हिंडमन म्हणतात त्याप्रमाणें आम्हांस राजकीय हक्क मिळणें किंवा न मिळणें हें सर्वांशीं आमच्या हातचें काम आहे. मि. ह्यूम आणि सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनीं अशाच प्रकारचे उद्गार वेळोवेळीं काढलेले आहेत, परंतु त्यांचा खरा अर्थ अद्याप आमच्या पुढाऱ्यांस नीट समजत नाहीं, हें आमचें दुर्दैव होय.

---

* [केसरी ता. ८ आगस्ट १९०५]

हक्क मिळविण्याच्यासंबंधानें हा विचार झाला. परंतु हिंदुस्थानांतील लोकांनीं सरकाराकडून कोणते हक्क मागावयाचे किंवा या देशांतील राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची असावी म्हणून आग्रह धरावयाचा हा स्वतंत्र व विशेष महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानांत धंदेशिक्षणाच्या शाळा काढा; कायदेकौन्सिलांत आमचे जास्त प्रतिनिधि घेऊन त्यांस आणखी थोडे हक्क द्या; अथवा वरिष्ठ प्रतीच्या जास्त जागा नेटिवांस द्या, असें म्हटल्यानें काम भागत नाहीं. या वरवरच्या गोष्टी आहेत. आणि ज्याप्रमाणें रोग्याच्या वेदना कमी केल्यानें रोग समूळ नाहींसा होत नाहीं, त्याप्रमाणें हिंदुस्थानास लागलेल्या व्याधिचे केवळ वरवर दिसणारे परिणाम दूर केल्यानें हिंदी प्रजेस कधींहि खरें व शाश्वत समाधान वाटावयाचें नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेबद्दल जेव्हां जेव्हां विचार करण्याचा आणि बोलण्याचा प्रसंग येतो तेव्हां वर सांगितलेल्या बाह्योपाधींकडे लक्ष न देतां प्रत्येकानें मुळाशीं हात घातला पाहिजे. हिंदुस्थानावर सध्यां असलेलें इंग्रजी राज्य हें शांततेकरितां जरी अभूतपूर्व असलें तरी तें परकीय आहे; इतकेंच नव्हे तर सहा हजार कोसांवरून मूठभर परकीय लोक येथें येऊन येथील लोकांवर फारसा विश्वास न ठेवतां त्यांनीं मुख्यत्वेंकरून आपल्या हिताकरितां तें चालविलें आहे, हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे. आज हा प्रश्न सुचण्याचें कारण मुंबईच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सर हेनरी कॉटन यांनीं, विलायतेंतील 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज' नामक प्रसिद्ध मासिक पुस्तकाचे कर्ते मि. स्टेड यांजकडून लवकरच चर्चेस येणाऱ्या प्रश्नासंबंधानें जी छोटेखानी पुस्तकमाला प्रसिद्ध होत आहे, त्यांत लिहिलेला लेख होय. या लेखांत नमूद केलेलीं मतें नवीन आहेत असें नाहीं. पण सर हेनरी कॉटन यांनीं त्यांस व्यवस्थित रूप देऊन त्यांचें सप्रमाण प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात कीं, हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोक–आणि यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे–परकीय सरकारचे केवळ भारवाहक म्हणून कधींहि संतुष्ट राहावयाचे नाहींत. सर हेनरी कॉटन यांचें असें मत आहे कीं, लॉर्ड कर्झन हे कितीहि हुषार आणि उद्योगी असले तरी या मुद्याकडे त्यांनीं जितकें लक्ष पुरवावें तितकें पुरविलें नाहीं. हिंदुस्थान आणि इंग्लंड यांचा संबंध तुटून हिंदुस्थाननें मोकळें व्हावें अथवा दुसऱ्या कोणत्या तरी राष्ट्राच्या ताब्यांत जावें हें कोणासही इष्ट वाटत नाहीं; व सर हेनरी कॉटन म्हणतात कीं, याकरितां हिंदुस्थानचे पुढारी खटपटहि पण करीत नाहींत. या पुढाऱ्यांस जी गोष्ट डाचत आहे अथवा असह्य होत चालली आहे ती परकीय **अंमल** नव्हे तर त्याचा **परकीपणा** होय. साम्राज्य कायम राखण्यास एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांस सर्वस्वी चीत करून त्याचें राष्ट्रीय अस्तित्व बुडविण्याची जरूर नाहीं अथवा तसें करणें हल्लींच्या काळांत इष्टहि नाहीं. कानडा आस्ट्रेलिया वगैरे वसाहती

इंग्लंडास आजामित्तीस ज्या चिकटून राहिल्या आहेत त्या सदर वसाहतींस प्रांतिक स्वराज्याचे पूर्ण हक्क आहेत म्हणून होत; नाहींपेक्षां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांप्रमाणें या वसाहतीहि इंग्लंड देशापासून केव्हांच फाटून निघाल्या असत्या. तसा प्रकार न होतां इंग्रजी साम्राज्य अमेरिकन लढाईनंतरही पुन्हां जें स्थापित झालें यांतील खरें बीज प्रांतिक स्वराज्य हें होय; आणि हेंच तत्त्व जर हिंदुस्थानास लागू केलें नाहीं तर त्यांत अखेरीस इंग्रजी साम्राज्याचेंच अकल्याण आहे असें सर हेनरी कॉटन यांनीं आपल्या लेखांत स्पष्ट म्हटलें आहे. सध्यांच्या कालाचें व स्थितीचें सर हेनरी यांनीं जें चित्र दिलें आहे तें आमच्या मतें अगदीं बरोबर वठलें आहे. हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चिमात्य विद्या आणि शिक्षण मिळून स्वातंत्र्याची गोडी किंवा इच्छा त्यांच्या आंगांत संचारली आहे, इतकेंच नव्हे तर जपानासारख्या छोटेखानी प्राच्य राष्ट्रानें पांच पन्नास वर्षांत आपल्या देशास राष्ट्रभक्ति आणि सुधारणा यांच्या योगें वैभवाच्या शिखरास कसें पोंचविलें आहे, हें ढळढळीत उदाहरण त्यांच्या डोळ्यांपुढें आहे. अशा लोकांस लष्करी खात्यांत मेजर सुभेदारांच्या पलीकडे आणि मुलकी व न्यायखात्यांतील खालच्या प्रतींतील वरिष्ठ जागांपलीकडे नोकऱ्या देण्यांत येऊं नयेत, ही इंग्लंड देशास शरम वाटण्यासारखी गोष्ट आहे, असें सर हेनरी यांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतें हिंदुस्थानासंबंधीं मुख्य प्रश्न दोन प्रकारचे आहेत, एक राजकीय आणि दुसरा औद्योगिक. आणि या दोन्ही बाबतींत हिंदुस्थानास काय हक्क द्यावे याचा जर विलायतेंतील लोकांनीं उदारपणें विचार केला नाहीं तर साम्राज्याबद्दलच्या जबाबदारींतून ते चांगल्या रीतीनें कधींही पार पडावयाचे नाहींत. विलायतेंतून हिंदुस्थानांत जाणारे इंग्रजी अधिकारी कितीही नेकीनें आणि जोमानें काम करणारे असले तरी हिंदुस्थान देशाच्या हल्लींच्या स्थितींत त्यांनीं चालविलेला राज्यकारभार लोकप्रिय होणें अशक्य आहे. देशांतील वरिष्ट दर्जाचे अधिकार व नोकऱ्या परकीयांच्या हातांत रहाव्या ही स्थिति उत्तरोत्तर अधिकाधिक असह्य होणार आणि तिचा केवळ मनगटाच्या जोरावर प्रतिकार करणेंही अशक्य आहे. औद्योगिक बाबतींतही हेंच तत्त्व लागू पडतें. हिंदुस्थानांतील लोकांनीं शेतकी करून कच्चा माल तयार करावा आणि विलायतेंतील लोकांनीं त्यांस सर्व प्रकारच्या कलाकौशल्याचा माल पुरवावा, ही स्थिति सुध्दां शाश्वत टिकावयाची नाहीं. या दोन्ही बाबतींत हिंदुस्थानांतील लोकांस विलायतेंतील लोकांनीं जरूर लागल्यास पदरची झीज सोसूनही अधिकाधिक हक्क अगर सवलती दिल्या पाहिजेत. हिंदुस्थानांतील लोक कांहीं रानटी नाहींत. पश्चिमात्य विद्येचा व शिक्षणाचा प्रभाव त्यांच्यावर होऊं लागला असून सदर विद्येच्या व शिक्षणाच्या योगानें—आणि जपानच्या प्रत्यक्ष उदाहरणानें—त्यांच्या मनांत जागृति उत्पन्न होऊं लागली आहे. आणि या जागृतीची पुरी वाढ होऊं देणें हेंच शहाण्या

राज्यकर्त्यांचें खरें कर्तव्य होय. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर झडप घालून जिंकलेल्या राष्ट्रास कायमच्या दास्यत्वांत ठेवल्यानें साम्राज्याची शाश्वती हल्लींच्या कालांत राहावयाची नाहीं, असें सर हेनरी कॉटन यांनीं निस्पृहपणानें लिहिलें आहे. हिंदी लोकांच्या अंगांत युरोपियन लोकांप्रमाणें शील किंवा चारित्र्य यांचा जोर नाहीं, वगैरे सबबींवर हिंदी लोकांस प्रांतिक स्वराज्याचे हक्क देण्याचें नाकबूल करणें अगदीं वेडेपणा होय. सर्व प्रकारच्या स्वतंत्रेतवर परकीय राज्याचें जबरदस्त: दडपण असतां केवळ शाळांतून चालत असलेल्या पुस्तकांच्या वाचनानें कोणत्याही लोकांची नीतिमत्ता, चारित्र्य किंवा हिंमत वाढणें अशक्य होय, असा सिद्धांत सर हेनरी यांनीं दिला आहे. हाच सिद्धांत थोड्या दिवसांपूर्वी आम्ही लिहिलेल्या 'परवश झालेल्या नेटीव अमलदारांचें मानसिक दौर्बल्य' या अग्रलेखांत दिला होता. एकीकडे राष्ट्राचे पाय तोडण्याची खटपट करावयाची आणि दुसरीकडे तें वाढत नाहीं म्हणून त्यास दोष द्यावयाचा, ही कुटिल राजनीति आतां सर्व लोकांस समजूं लागली आहे. आणि लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यांनीं कितीही खटपट केली तरी 'हिंदुस्थानचा उत्कर्ष राजकीय चळवळीनें होणार नाहीं, त्यासाठीं अन्य तऱ्हेनें उद्योग केला पाहिजे' हें तत्व आतां कोणासहि मान्य व्हावयाचें नाहीं. आजपर्यंत चालत आलेल्या कुटिल राजनीतीचें समर्थन करून लॉर्ड कर्झन यांनीं आपणास अप्रिय करून घेतलें आहे, असें जें सर हेनरी कॉटन यांनीं विधान केलें आहे तें अक्षरशः बरोबर आहे. लॉर्ड कर्झन यांस सुशिक्षित हिंदी लोकांची काय महत्त्वाकांक्षा आहे हें कळत नाहीं असें नाहीं. परंतु या महत्त्वाकांक्षेस होईल तितका आळा घालणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें ते समजतात. सर हेनरी कॉटन यांची समजूत निराळी आहे. ते म्हणतात कीं, कर्झन आणि किचनेर यांच्यामधील वादापेक्षा हिंदुस्थानाच्या भावी स्थितीचा प्रश्न हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांस अधिक महत्त्वाचा वाटतो; आणि तसें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. किचनेर यांनीं लष्करी खर्च वाढविला काय आणि कर्झनसाहेबांनीं तिबेट मिशनमध्ये पैसे ओतले काय, हिंदुस्थानांतील लोकांच्या दृष्टीनें दोन्हींहि एकसारखींच अपकृत्यें आहेत. लोकांस त्यांपैकीं एकापासूनही फायदा नाहीं. फार झालें तर अरेरावी कर्झनास थप्पड देण्यास दुसरा कोणी तरी गोमाजी निघाला एवढ्याबद्दल त्यांस कदाचित् बरेंही वाटेल. कारण गर्वाचें आणि अहंकाराचें घर खालीं झालेलें पाहून स्वभावतःच प्रेक्षकवर्गास थोडें तरी समाधान वाटत असतें. परंतु हिंदुस्थानच्या लोकांस खरा महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे प्रांतिक स्वराज्याचा होय. देशांतील राज्यकारभारांत आपला हात असावा, युरोपियन बड्या अधिकाऱ्याबरोबर आपली योग्यता गणली जावी, देशांतील सैन्य आपलें आहे व आपल्या फायद्याकरितां लढत

आहे, अशी स्थिति यावी आणि एकंदर देशास कांहीं तरी राष्ट्रीय अस्तित्व यावें, ही हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाची मागणी आहे, व याकरितां ते खटपट करीत आहेत; आणि पुढील पार्लमेंट सभेस या प्रश्नांचा कांहींना कांहीं तरी विचार करणें जरूर पडेल, असें सर हेन्री कॉटन यांनीं लिहिलें आहे. राष्ट्रीय सभेच्या तर्फे इकडून जाणाऱ्या प्रतिनिधींनीं सर हेन्री कॉटन याच्या म्हणण्याप्रमाणेंच हा प्रश्न निस्पृहपणें विलायतेंतील लोकांपुढें मांडणें जरूर आहे. इंग्रजी राज्याची किंवा लॉर्ड कर्झन यांची पोकळ स्तुती करीत बसण्यांत अर्थ नाहीं किंवा कांहीं लहान अगर मोठ्या तक्रारींच्या बाबींचें व्यक्तिशः विवेचन करण्यांतहि हांशील नाहीं. मुख्य प्रश्न राज्यपद्धतीचा आहे, माणसाचा नव्हे अगर व्यक्तिशः लहान मोठ्या तक्रारींचाहि नव्हे. कानडा किंवा आस्ट्रेलियाप्रमाणें हिंदुस्थानाला प्रांतिक स्वराज्य पाहिजे आणि तें जेणेंकरून प्राप्त होईल अशा प्रकारची राज्यपद्धति हिंदुस्थानांत सुरू करा, हा मुख्य मुद्दा आहे आणि हा डोळ्यांपुढें ठेवून नेटानें आणि एकनिष्ठपणानें जर आम्ही मेहनत करूं व सरकारच्या प्रत्ययास असें आणून देऊं कीं, या प्रश्नाचा निकाल केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, तर हल्लींच्या पालटलेल्या मनूत आम्हांस थोडेंबहुत तरी यश आल्याखेरीज राहणार नाहीं. सर हेनरी कॉटन यांच्या लेखाचें पर्यवसान असेंच आहे. आणि हिंदुस्थानची पुढें काय वाट होणार, याबद्दल विचार करणारांनीं हा लेख एक वेळ अवश्य वाचण्यासारखा आहे. अशा तऱ्हेचीं छोटेखानीं पुस्तकें विलायतेंत जितकीं प्रसिद्ध होतील तितकीं चांगलीं. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतहि या लेखापासून बऱ्याच लोकांनीं बोध घेण्यासारखा आहे. आपणास काय प्राप्त करून घ्यावयाचें याचीच जर नीट कल्पना नाहीं तर पुढील उद्योग तरी कसा होणार नाहीं ? हिंदुस्थानास प्रांतिक स्वातंत्र्य दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं, अशी विलायतेंतील लोकांची खात्री करून देणें महत्प्रयासाचें काम आहे हें खरें, पण त्यास इलाज काय ? तो प्रयास जर आमचे हातून होत नसेल तर उगीच वायफळ बोलण्यांत कांहीं हांशील नाहीं.

❖ ❖ ❖

परिशिष्ट.

* खोतीच्या हकावर घाला

मुंबईसरकारनें खोतीचा कायदा दुरुस्त करण्याबद्दल आपल्या तर्फे मुंबई कायदे कौन्सिलांत बिल आणल्यामुळें या प्रश्नाची चर्चा अलीकडे बरीच होऊं लागली आहे. व दोन चार दिवसांपूर्वी ज्या जिल्ह्यांतील लोकांचा या बिलाशीं मुख्य संबंध आहे त्या जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं या प्रश्नाचा विचार करण्याकरितां तेथील वजनदार लोकांची जी सभा भरली होती, तिची हकीगत दुसरीकडे दिलीच आहे. वस्तुतः पहातां या प्रश्नाचा प्रत्यक्ष संबंध रत्नागिरी जिल्ह्याशींच आहे, पण पर्यायानें या विषयाच्या चर्चेंत दुसऱ्या अनेक प्रश्नांचा समावेश होतो, व परंपरेनें त्याचा संबंध बहुतेक सर्व इनामदार, वतनदार, पाटील, कुळकर्णी, देशमुख, देशपांडे वगैरे लोक जे शेत कसणारे कुणबी आणि सरकार यांच्या दरम्यान साऱ्याच्या वसुलाकरितां जबाबदार धरले जातात त्या सर्वांशीं जाऊन पोचतो. याकरितां या प्रश्नाचें थोडेसें सविस्तर विवेचन करण्याचा आमचा इरादा आहे. आज रत्नागिरीच्या खोतांची अमुक दशा झाली, किंवा त्यांचे अमुक एक हक्क बुडाले म्हणजे तेवढ्यानेंच हें अरिष्ट टळलें असें कोणी समजूं नये. कोणत्याना कोणत्या तरी रूपानें हा प्रश्न सर्व ठिकाणीं उद्भवला आहे, व उद्भवत आहे. बंगाल्यांत जमीनदारी पद्धत सुरू केल्यानें सरकार आणि रयत यांच्या दरम्यान श्रीमान जमीनदार आहेत, औध व वायव्य प्रांतांत तालुकदार आहेत, मध्यप्रांतांत मालगुजार लोक आहेत, आणि गुजराथ व सिंध येथेंहि अशाच प्रकारचे शेतकरी आणि सरकार यांच्या दरम्यान दुसरी वतनदार मंडळी आहे. पेशवाई जाऊन महाराष्ट्र देशाची इंग्रजसरकारच्या तर्फे जेव्हां पहिली पहाणी झाली, त्यावेळीं पुणें, सातारा, वगैरे प्रांतांत म्हणजे महाराष्ट्र देशांत त्यावेळीं नवीन झालेलें इंग्रजसरकार व रयत यांच्या दरम्यान कोणत्या प्रकारचा संबंध असावा याबद्दल चर्चा होऊन त्यावेळच्या अधिकाऱ्यांनीं या प्रांतास रयतवारी पद्धत लागू करावी असें ठरवून त्याप्रमाणें सर्व्हेखात्याचें काम सुरू झालें. अर्थशास्त्राचें असें एक तत्त्व आहे कीं, शेत करणारा प्रत्येक मनुष्य आपापल्या जमिनीच्या तुकड्याचा मालक असला

---

* [केसरी ता. २१ फेब्रुवारी १८९१]

* खोतीच्या विषयावर लो. टिळक यांनीं केसरींत लेख लिहिले ते पुनश्च हरिःओम् या अग्रलेखापूर्वी, म्हणजे टिळक जाहीर रीतीनें केसरचे फिरून संपादक होण्यापूर्वी लिहिले. सबब ते परिशिष्टाच्या रूपानें या भागाच्या शेवटीं दिले आहेत. (प्रकाशक)

म्हणजे त्याला जमिनीची सुधारणा करण्याची उमेद येऊन त्याच्या श्रमाचें पूर्ण फळ त्यास मिळतें; इतकेंच नव्हे तर एकंदर देशाचें उत्पन्न वाढून देश अधिक श्रीमंत व सुखी होतो. अर्थशास्त्राचें हें तत्त्व अगदीं अक्षरशः खरें आहे. प्रत्येक शेतकरी प्लेटोच्या युटोपिया अथवा काल्पनिक देशांतील रहिवाशांप्रमाणें जर विद्यासंपन्न असून आपलें हित पाहणारा असेल, तर वरील अर्थशास्त्राच्या तत्त्वानें देशांत पुष्कळ लहान लहान सुखी कुटुंबें होऊन त्यामुळें देशास व राज्यास अधिक बळकटी येईल. पण जोंपर्यंत शेंकडा ५ लोकांसही लिहितां वाचतां येत नाहीं, इतकेंच नव्हे तर हरएक बाबतींत कोणी तरी नायक, पुढारी अगर कर्ता पुरुष असल्याखेरीज कोणचाहि धंदा करण्यास जे लोक प्रवृत्त होत नाहींत, अशा स्थितींतल्या लोकांस वरील अर्थशास्त्राचें तत्व लागू करणें म्हणजे लहान मुलास एक मोठा दगड उचलण्याचें काम सांगण्याइतकेंच मूर्खपणाचें होय. आमच्या सरकारची महाराष्ट्रांत रयतवारी पद्धत सुरू करण्यांत अशा प्रकारची चूक झाली आहे. देशमुख, देशपांडे, वगैरे गांवोगांवींचे पेशव्यांच्या वेळीं असलेल्या लोकांस ते रयतेवर जुलूम करतात ह्या सबबीवर काढून टाकून अथवा त्यांच्या हक्कांबद्दल कांहीं नक्त नेमणुका करून देऊन सरकारानें साऱ्याकरितां रयतेशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्याचा निश्चय केला, सर्व जमीन मोजून काढली, प्रतबंदी ठरविली, आणि तीस वर्षेंपर्यंत सारा मुक्रर करून तो जमीन करणारानें प्रत्यक्ष तिजोरींत भरावा, आणि सुखानें आपल्या जमिनीचा वंशपरंपरेनें उपभोग घ्यावा अशी व्यवस्था सुरूं झाली, याच व्यवस्थेस रयतवारी पद्धत असें म्हणतात. या व्यवस्थेनें पहिल्यानें कांहीं लोकांस आनंद झाला, पण लवकरच त्याचे दुष्परिणाम दिसूं लागले. सरकारची मागणी नियमित व कायमची राहील असें जें वाटलें होतें तो भ्रम दूर झाला. तीस वर्षांनीं पहिले सारे दुप्पट, तिप्पट, पांचपट वाढल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडूं लागलीं. जंगल, अबकारी, लोकलसेस वगैरे करांचें ओझेंहि शेतकऱ्यांवर चढत गेलें. लोकसंख्या वाढत चालली; आणि परदेशीय व्यापारवृद्धीमुळें इकडचे उद्योगधंदे बसून गेले. कांहीं दिवस जोंपर्यंत रेलवेसारखीं मोठीं कामें बांधावयाचें सुरू होतें, तोंपर्यंत लोकांजवळ थोडासा पैसा होता. पण पुढें लवकरच भांडवलाची उणीव पडूं लागली, सावकराखेंरीज शेतकऱ्यांचें चालेना, पेशवाईंत मुलुखगिरी करून पैसे आणण्याचा मार्ग होता तो खुंटला व शेतीवरच सर्वांस निर्वाह करणें भाग पडलें. अशा स्थितींत रयत व सरकार यांच्या दरम्यानच्या ज्या लोकांस रयतवारी पद्धतीनें फाटा मिळाला होता त्यांस पुनः सावकार या रूपानें आंत शिरण्यास जागा सांपडली. जमिनी गहाण पडूं लागल्या, सावकाराचा त्रास असह्य होऊं लागला, व दहा पंधरा वर्षांनीं आमच्याकडे जे दुष्काळ डोकावतात, तशांतलेच एकदोन

डोकावून गेल्यामुळें लोक त्रासून गेले, बंडें झालीं, सावकारांचीं नाकें कापलीं गेलीं, व एकंदरींत ती स्थिति सुधारल्याखेरीज आतां चालत नाहीं असें सरकारासहि वाटूं लागून शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याबद्दलचा कायदा पास करण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. हा कायदा इकडच्या मुलखांत आज वीस वर्षें चालूं आहे, तरी अद्यापि शेतकऱ्यांची स्थिति फारशी सुधारली आहे असें म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्रांत रयतवारी पद्धत सुरूं करते वेळीं जर या गोष्टीचा नीट विचार झाला असता तर कदाचित् आजमित्तीस इतक्या थरावर गोष्ट येऊन ठेपती ना. परंतु स्वराज्यांत ज्याप्रमाणें रयत आणि सरकार यांच्या दरम्यान श्रीमंत, संभावित, वजनदार, गृहस्थ असण्याची जरूर वाटते, तशी परदेशीय राज्यकर्त्यांस वाटत नसल्यामुळें, किंबहुना असे लोक मध्यें नसणें हेंच आपणास अधिक श्रेयस्कर आहे अशी त्यांची समजूत असल्यानें, बंगाल्यांत घडून आलेली चूक महाराष्ट्रांत घडूं द्यावयाची नाहीं असा त्यावेळीं सरकारानें ठराव केला, व सनदा पत्रांवरून अगदीं सोळा आणे ज्यांचा हक्क सिद्ध होत होता, व जो हक्क कोणतीही सबब लावून काढून टाकणें अशक्य होतें, अशा वतनदार किंवा इनामदार लोकांखेरीज महाराष्ट्रांत सर्वत्र रयतवारी पद्धत सुरू झाली. याचा परिणाम काय झाला हें थोडक्यांत सांगितलेंच आहे. प्रस्तुतचा विषय त्याहून भिन्न असल्यामुळें त्याचें येथें जास्ती विवेचन करितां येत नाहीं. इतकेंच सांगणें जरूर आहे कीं, ज्या कारणाकरितां रयत व सरकार यांच्या दरम्यानचे मक्तेदार, वतनदार वगैरे गृहस्थ लहान मोठ्या नक्त नेमणुकी देऊन किंवा अन्य रीतीनें काढून टाकण्यांत आले, त्याच कारणाकरितां इनामदार लोकांस हल्लीं सरकारांतून जितकें सहाय्य मिळावें तितकें मिळत नसतें व एकंदरींत बहुतेक सरकारी रेव्हिन्युखात्यांतील अधिकाऱ्यांची इनाम म्हणजे एक नसता उपटसूळ आहे, व त्यांस होईल तितकी कमी मदत केली पाहिजे अशी समजूत असते.

घांटावर याप्रमाणें व्यवस्था झाली. परंतु सरकारी पैमाषखातें घांटाखालीं जेव्हां उतरलें तेव्हां परशुरामक्षेत्रांतील जमीनधाऱ्याच्या विचित्र पद्धतीमुळें घांटावरला नियम घांटाखालीं लागू करण्याची मोठीच पंचाईत येऊन पडली. महाराष्ट्रांत रयत व सरकार यांच्या दरम्यान जे हक्कदार लोक होते त्यांच्यामध्यें आणि कोंकणांतील तशाच प्रकारच्या लोकांमध्यें पुष्कळ अंतर आहे, ही गोष्ट पैमाषखात्याच्या नजरेस आली, किंवा रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांनीं आणिली असें म्हटलें तरी चालेल. महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें सर्वत्र रयतवारी पद्धत सुरू केली होती त्याप्रमाणेंच रत्नागिरी जिल्ह्यांतहि रयतवारी पद्धत सुरू करण्याचा सरकारचा विचार होता, पण हा त्यांचा विचार अद्याप सिद्धीस गेला नाहीं. प्रत्येक गांवीं ज्याप्रमाणें येथें पाटील कुलकर्णी आहे त्याप्रमाणें तेथें

खोत या हुद्याचे कोंकणांत लोक आहेत. हुद्याचे असें म्हणण्याचें कारण कीं खोताचा हक्क किंवा खोतकी ही कांहीं गांवांतून मराठे, मुसलमान, महार लोकांकडेहि आहे. हे खोत लोक आपला असा हक्क सांगूं लागले कीं, आम्हीं पाटीलकुळकर्ण्याप्रमाणें नुसते सारा गोळा करणारे लोक नव्हेत; तर ज्यावेळीं कोंकणांत वस्ती नव्हती त्यावेळीं उजाड झालेलीं गांवें पुनः बसविण्याकरितां, अथवा जंगल तोडून आपल्या खर्चानें नवीन वसाहत करण्याकरितां पेशवेसरकारच्या पूर्वीच्याही सरकारापासून सनदेनें आम्हांस एक प्रकारचा विशिष्ट हक्क मिळालेला आहे. तो हक्क हा कीं, आम्ही वसाहत केलेल्या गांवांतून ज्या जमिनी आहेत त्यांची आम्ही हवी ती व्यवस्था करूं व जमिन करणाऱ्या कुणबी लोकांपासून (ह्यांस कुळें म्हणतात) पूर्वापार चालत आलेल्या रिवाजाप्रमाणें जमिनीच्या उत्पन्नाचा कांहीं भाग घेऊन त्या जमिनीच्या किंवा सर्व गांवाच्या साऱ्याबद्दलचीं जबाबदारी कोणत्याहि कुळावर न राखतां आम्ही आपल्या शिरावर घेऊं. सारांश खोतांचें म्हणणें असें पडलें कीं, सरकारनें पाहणी करून जो सारा ठरावावयाचा तो गांवांतील शेतकऱ्यावरोबर किंवा कुळाबरोबर ठरविण्याची जरूरी नाहीं. सरकारनें जमिनीची पाहणी करावी व त्याप्रमाणें एकंदर गांवाचा जो सारा ठरेल तो खोत सरकारांत भरील, व तो त्यानें सरकारांत भरल्यानंतर गांवांतील जमीन कोणाकडे लागवडीस द्यावी व त्याबद्दल त्याचेकडून उत्पन्नाचा किती भाग घ्यावा, हें सर्व खोत व कूळ यांच्या दरम्यान एकमेकांच्या अनुमतानें किंवा पूर्वापर चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें ठरेल, त्यांत सरकारास हात घालण्याचा हक्क नाहीं. व खोतांचें हें म्हणणें पैमाषवाल्या धूर्त अधिकाऱ्यास अर्थातच पसंत पडलें नाहीं. व त्यांच्या व खोतांच्या दरम्यान लढा पडून दोन्ही पक्षांनीं सकारी कोर्टाची पायरी धरिली. पैमाषी अधिकाऱ्यांच्या अंगांत रयतेची फाजील कळकळ नेहमींच वसत असते. जणूं काय आमच्या अनाथ शेतकऱ्यांस तारण्याकरितांच ईश्वरानें त्यांस पाठवून दिलें आहे, आणि आम्ही या देशांतले लोक इसाबनीतींतील सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या हंसीच्या धन्याप्रमाणें रयतेला समूळ खाण्यास उत्पन्न झालों आहों ! असो. पैमाषी अधिकारी लोकांनीं अशी तक्रार केली कीं, जमीन कसणाऱ्या कुळांस सर्वस्वी खोताच्या ताब्यांत दिल्यानें खोत त्यांस सर्वस्वी नागवून घेईल, आणि ह्या सर्व रयतेचे अभिशाप सरकारास भोगावे लागतील, करितां सरकारानें खोतांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां घांटावरील प्रांताप्रमाणें घांटाखालींही रयतवारी पद्धतीचीच सुरवात केली पाहिजे. खोतांचें असें म्हणणें पडलें कीं, सरकारचे हेतू स्तुत्य असोत वा निंद्य असोत तिकडे आम्हांस पाहणें नाहीं. मुसलमानी अमदानीपासून सनदेनें जे हक्क आम्हांस प्राप्त झाले आहेत ते जमिनीची पैमाष करण्याच्या निमित्तानें

सरकारास काढून घेतां येत नाहींत. कुळांचे जर कांहीं हक्क असले तर ते वहिवाटी-पेक्षां कांहीं जास्त नाहींत. एकदां सरकारसारा भरल्यानंतर गांवांतल्या जमिनीच्या लागवडीसंबंधानें खोत हाच मुखत्यार आहे. हीं दोन म्हणणीं अर्थातच परस्परांच्या अगदीं विरुद्ध होतीं. घांटाखालींहि कांहीं तालुक्यांत बिनसनदी खोत आहेत त्या तालुक्यांतून सरकारास आपलें म्हणणें अमलांत आणण्यास विशेष पंचाईत पडली नाहीं. पण दोन दोनशें तीन तीनशें वर्षांच्या खोतकीच्या जुन्या सनदा ज्या लोकांपाशीं होत्या त्यांनीं सरकारचें म्हणणें मान्य केलें नाहीं. सरकारानें आग्रह धरून अम्मलबजावणी करण्यास सुरुवात केली, सनदी खोतांनीं अडथळा केला, गांवेंच्या गांवें जप्त झालीं. आणि आपल्या हक्काच्या संरक्षणार्थ कलेक्टर व पैमाषी अधिकारी यांच्यावर दिवाणी कोर्टांत शेंकडों फिर्यादी खोतांनीं लावल्या, व रत्नागिरी जिल्ह्यांतील एकंदर दाव्यांप्रमाणें त्याची हायकोर्टापर्यंत मजल येऊन खोतांच्या तर्फेचा निकाल होण्याचा संभव दिसूं लागला. एवढ्यावर जेव्हां मजल येऊन ठेपली तेव्हां तडजोडीचीं बोलणीं सुरू झालीं. एक दोन सरकारी अधिकारी व एक दोन दुसरे स्वतंत्र गृहस्थ यांचें कमिशन नेमून या प्रश्नाची काय तोड काढावी याबद्दल सरकारांत शिफारस करण्यांत आली व त्यावर १८७६ सालीं सरकारचा एक ठराव प्रसिद्ध होऊन समजुतीचीं कांहीं कलमें ठरलीं व त्या कलमांअन्वयें पुढें लवकरच म्हणजे १८८० सालीं खोती वतनाचा एक लहानसा कायदा पास झाला. यासच १८८० चा पहिला किंवा खोती ॲक्ट असें म्हणतात. हा कायदा पास झाल्यावर दोन्ही पक्षांच्या संमतीनें हायकोर्टांत चालू असलेल्या खटल्यांत राजीनामे होऊन फिर्यादी काढून घेण्यांत आल्या. अथवा राजीनाम्यांतील शर्तींप्रमाणें कोर्टानें निकाल सांगून त्यांचा शेवट केला. हें सर्व काम त्यावेळीं विशेषतः करून कै. रा० सा० मंडलिक यांच्या मेहनतीनें, ईर्षेनें व अभिमानानें पार पडलें हें सर्वत्रांस माहीत आहेच. खोत व सरकार यांच्या दरम्यानच्या तंट्याचें ठळक स्वरूप अशा प्रकारचें आहे. स्थलसंकोचास्तव बारिकसारिक गोष्टी येथें नमूद करितां येत नाहींत. तथापि वर दिलेल्या हकीकतीवरून या प्रश्नाची जरूरीपुरती पूर्व हकिकत वाचकांचे लक्षांत येईल. सन १८८० च्या कायद्याचें स्वरूप काय, त्यांत ना. मि. खरे यांच्या म्हणण्याप्रमाणें कोणता फेरफार करणें जरूर होतें, व ना. खरे यांनीं आणलेल्या बिलाची संधी पाहून त्यांत हळूच आपलेंहि चंबूगवाळें ढकलून खोतांचा बीमोड करण्याचा पूर्व संकल्प अंमलांत आण-ण्यास हल्लीं सरकार कसें प्रवृत्त झालें आहे, व लोकांनीं त्यासंबंधानें काय केलें पाहिजे, याचा विचार पुढील खेपेस करूं. खोत म्हणजे काय हें जरी रत्नागिरी जिल्ह्यांत सर्वत्रांस माहिती असलें तरी इतर जिल्ह्यांत त्याची माहिती नसल्यामुळें एवढी प्रस्तावना करणें भाग पडलें.

◆ ◆ ◆

* खोतीच्या हक्कावर घाला.

नंबर २.

गेल्या अंकीं खोत म्हणजे काय आणि सरकार व रयत यांच्या दरम्यान त्याचा कोणाचा अधिकार असतो व हा अधिकार त्यास कशा रीतीनें मिळाला आहे, याचें सामान्यतः विवेचन करून देशपांडे, देशमुख वगैरे घांटावरील वतनदार लोकांप्रमाणेंच खोत हे रयत व सरकार यांच्यांमध्यें एक वतनदार आहेत, हें दाखविलें आहे. भेद इतकाच कीं देशमुख, देशपांडे यांचीं वतनें ज्याप्रमाणें नक्त नेमणुकी ठरवून काढून टाकण्यांत आलीं, त्याप्रमाणें खोतांचें वतन काढून टाकण्यांस त्यांस मुसलमानी अमदानीपासून सनदा मिळाल्या असल्यामुळें कायदेशीर हक्क देऊन अखेरीस सरकारास तडजोड करावी लागली. ही तडजोड म्हणजेच सन १८८० चा १ ला खोतीचा ॲक्ट होय, हें मागें सांगितलेंच आहे. आज या तडजोडीचें स्वरूप सांगून त्यांत काय फेरफार करण्याची सरकारची इच्छा आहे, तें दाखविण्याचा आमचा इरादा आहे.

पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें आणि सनदांप्रमाणें खोताचा हक्क म्हटला म्हणजे सर्व गांवचा सारा सरकारांत त्यानें भरावा, आणि मालकीनें गांवाची वहिवाट करावी. एकदां त्यानें सारा भरला म्हणजे मग गांवांतील कोणती जमीन कोणाच्या लागवडीस द्यावयाची किंवा एकाद्याच्या लागवडीस असलेली काढावयाची यास तो मुखत्यार झाला. तात्पर्य सारा दिल्यावर खोत गांवचा धनी, आणि गांवांतील जमीन कसणारे कुणबी हीं त्यांचीं कुळें. वर्तीं कुळें त्यानें पाहिजे तशीं लावावीं अशी स्थिति होती, परंतु जमीन कसणारापासून भात जामिनीच्या अर्ध्या उत्पन्नापेक्षां, आणि वरकस जामिनीच्या (म्हणजे ज्यांत वरी, नाचणी वगैरे हलक्या प्रतीचें धान्य पिकतें तिच्या) त्रितीयांश उत्पन्नापेक्षां, ज्यास्त मक्ता कुळापासून घेण्याचा मामुल वहिवाटीनें खोतास अधिकार नव्हता, यास अर्धेल व तिर्धेल असें म्हणतात. कुळापासून खोतानें अर्धेल अथवा तिर्धेल घ्यावी, सर्व गांवचा सारा खोतानें भरावा, ही स्थिति इंग्रजी राज्यापूर्वी होती, यामुळें रोख पैसे भरण्याची पाळी कुळावर कधींहि येत नसे व त्यास सावकर कधींहि बघावा लागत नसे. शिवाय जसें पीक त्या मानानें अर्धेल किंवा तिर्धेल असल्यामुळें खोत व कूळ या दोघांचाही नफा होत असे. ज्या वर्षीं पीक कमी

---

* [केसरी ता. २८ फेब्रुवारी १८९९]

त्या वर्षीं सरकारसारा जरी नेहमींप्रमाणेंच असला तरी कुळापासून खोतास निम्मे पिकांपेक्षां जास्ती घेतां येत नसे. आणि ज्या वर्षीं पीक जास्ती त्या वर्षीं जास्त झालेल्या पिकाचाही योग्य वांटा खोतास मिळे. सारांश, आमच्याकडील जमीन करणाऱ्या कुणब्याची स्थिति व योग्यता लक्षांत आणतां ही व्यवस्था दोघांसहि हितकारक होती व म्हणूनच ती पुष्कळ वर्षें बिनतक्रार चालली होती. एकदां निम्मे किंवा त्रितीयांश उत्पन्न दिल्यावर साऱ्याकरितां सावकार बघण्याची कुळास अवश्यकता पडत नसे, व त्यामुळें घांटावर ज्याप्रमाणें शेतकऱ्यास सावकाराचा जाच होतो तसा कोंकणांत होत नव्हता तथापि इतकें सांगितलें पाहिजे कीं, या अर्धेली तिर्धेली-खेरीज पुष्कळ ठिकाणीं खोत, वेठ, बिगार वगैरे रूपानें कुळापासून नोकरी, अन्य तऱ्हेनें त्याचे श्रम अथवा उत्पन्न घेत असत; व पाहिजे तें कूळ पाहिजे तेव्हां काढण्याचा त्यांस अधिकार होता.

सरकारी पैमाष खात्याची जेव्हां पाहणी सुरू झाली त्या वेळीं याप्रमाणें स्थिति होती. परंतु पैमाष खात्याचे उद्देश पहिल्यापासूनच निराळे असल्यामुळें लवकरच सदर खात्यांतील अम्मलदारांचें आणि खोतांचें युद्ध जुंपलें. खिस्ती धर्माप्रमाणें मनुष्याला ईश्वराची भेट होण्यास येशू खिस्त हा मध्यस्थ असल्या-खेरीज चालत नाहीं. पण ईश्वराच्या ठिकाणीं असलेल्या आमच्या खिस्ती सरकाराची व रयतेची भेट खोतासारखे मध्यस्थ न ठेवतां समक्षासमक्षच झाली पाहिजे असा पैमाष खात्याचा आग्रह होता; व त्यामुळें त्या खात्यांतील अधि-काऱ्यांनीं कुळाचा कैवार घेऊन खोतावर हल्ला करण्यास आरंभ केला. खोत कुळांस निर्दयतेनें वागवितात, कुळांस जमीन दरवर्षी आपल्याच ताब्यांत राहील असा भरंवसा नसल्यामुळें कूळ जमिनीची सुधारणा करीत नाहीं, अर्धेल तिर्धेल ठरवितेवेळींच खोत लबाडी करितात, वगैरे मुद्दे निघून अखेर कोर्टा-पर्यंत मजल गेली. शेवटीं १८७६ चा सरकारी ठराव व त्यावर १८८० चा १ ला खोती ॲक्ट पास होऊन दोघांच्या समजुतीनें या प्रश्नाचा निकाल लागला, हें वर सांगितलेंच आहे. या ॲक्टाप्रमाणें कूळ, खोत व सरकार यांचे परस्पर जे हक्क संबंध ठरले गेले आहेत त्यांतील मुख्य कलमें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१ खोती गांवच्या सर्व सारा खोतानें दिला पाहिजे. हा सारा वेळोवेळीं वाढविण्याचा सरकारास हक्क आहे.

२ जमीन कसणाऱ्या गांवांतील कुणब्याचे या ॲक्टाप्रमाणें चार वर्ग केले आहेत:—

(अ) पहिला वर्ग निव्वळ धारेकरी लोकांचा; म्हणजे ते जमिनीचे मालक असून जमिनीवर आकारलेला फक्त सारा खोतास द्यावा. त्यांची

जमीन काढण्याचा अगर त्यांजपासून अर्धेल अगर तिर्धेल घेण्याचा खोतास हक्क नाहीं. या वर्गांत अर्थातच खोताच्या पूर्वी गांवांत ज्यांनीं जमिनी संपादन केलेल्या होत्या तेवढेच लोक येतात.

(ब) दुसऱ्या प्रतीच्या लोकांस धारेकरीच म्हणतात; पण त्यांत आणि पहिल्यांत भेद इतकाच कीं, त्यांनीं सरकारी सारा व सदर साऱ्यापैकीं दर रुपयास सुमारें दोन आणे या मानानें जास्ती पैसा खोतास द्यावा; व अशा रीतीनें रुपयाला दोन आणे खोताला जास्त दिले म्हणजे अर्धेल व तिर्धेल देण्याचें कारण नाहीं, अथवा खोतास त्यांची जमीन काढतां येत नाहीं. अ आणखी ब या दोनहि वर्गांतील कुळांचा त्याच्या जमिनीवरील हक्क वंश-परंपरेनें चालणारा असून सदर जमीन पाहिजे त्यास विकत देण्याचा हक्क आहे.

(क) तिसऱ्या वर्गांतील कुळास कायमचीं अथवा जुनीं कुळें म्हणतात. यांजपासून भात जमिनीच्या उत्पन्नांपैकीं निम्में व वरकस जमिनीच्या उत्पन्नापैकीं तिसऱ्या हिश्शापर्यंत उत्पन्न घेण्याचा हक्क खोतास आहे. यापेक्षां जास्ती घेतां कामा नये. कमी घेतलें तरी चालेल. कुळांकडून जमीन काढण्याचा खोतास हक्क नाहीं. कुळाचा हक्क वंशपरंपरा परंतु जमीन विकण्याचा मात्र त्यास हक्क नाहीं.

(ड) चवथ्या वर्गांतील कुळांस उपरीं कुळें म्हणतात. यांच्यापासून आपआपसांत ठरलेल्या करारापमाणें लागेल तितकें कमजास्त उत्पन्न घेण्याचा खोतास अधिकार आहे, व कुळाची जमीनही त्याजकडून तो पाहिजे तेव्हां काढूं शकतो. या उपरी कुळांची संख्या फारच कमी म्हणजे शेंकडा ५ या प्रमाणानें आहे.

याप्रमाणें १८८० च्या १ ल्या ॲक्टानें सरकार, खोत व कुळें यांचे परस्पर संबंध कायम करण्यांत आले. धारेकऱ्यांचे पहिले दोन वर्ग खेरीज करून इतर कुळांपासून तीं जुनीं असल्यास अर्धेल आणि तिर्धेल व उपरी असल्यास कबुलायतीप्रमाणें उत्पन्नाचा ठरलेला भाग घेण्याचा सदरील कायद्यानें खोतास हक्क मिळाला. अर्धेल तिर्धेल कुळानें दिली नाहीं तर मामलेदाराकडे मदतीचा अर्ज करून कुळापासून ती वसूल करण्याचा खोतास अधिकार आहे. परंतु या अर्धेली तिर्धेलीखेरीज कुळापासून खोतास जास्त कांहीं एक मिळावयाचें नाहीं. वेठ, बिगार वगैरे सर्व या कायद्यानें बंद केली. खोतानें गांवचा सारा भरावा, आणि वर लिहिल्याप्रमाणें अर्धेल तिर्धेल घ्यावी असा नियम ठरला.

अर्धेलबिद्दल पुढें मागें तक्रार पडूं नये म्हणून शेतांत उभीं पिकें असतांनाच एकंदर उत्पन्नाचा अजमास अथवा अभावणी करण्यांत येते व या अभावणीचे नियम वर लिहिलेल्या ॲक्टाअन्वयें करण्यांत आले असून त्याप्रमाणें आभावणीचें काम चालू आहे. आभावणींत ठरलेलें उत्पन्न कुळास कबूल नसल्यास तें अर्ज करून पंचमार्फत ठरवून घेण्याचा कुळास अधिकार दिलेला आहे. त्याचप्रमाणें अर्धेल आणि तिर्धेल हा जरी सामान्य नियम आहे तरी सर्वच ठिकाणीं उत्पन्नाचा निमे किंवा तिसरा भाग खोतास मिळतो असें नाहीं. तर पुष्कळ ठिकाणीं जमिनीची मगदुरी व पूर्वींची वहिवाट पाहून कुळानें खोतास उत्पन्नाचा अर्धेली किंवा तिर्धेलीपेक्षां किती कमी भाग द्यावा हेंहि पैमाष अधिकाऱ्यांनीं ठरवून टाकलेलें आहे. हे मक्ते रजिष्टरांत नमूद झालेले असून त्याबद्दल आतां वादाचा प्रश्न राहिलेला नाहीं. सारांश, जेवढें म्हणून सनदेचे हक्क कायम राहून करण्यासारखें शक्य होतें तेवढें सर्व १८८० च्या ॲक्टानें करण्यांत आलें आहे. कांहीं गोष्टी—उदाहरणार्थ जुनीं व नवीं कुळें सनदेंतील हक्काच्या विरुद्ध होतीं. पण त्या खोतांनीं कबूल केल्यामुळें अखेरीस दोन्ही पक्षांच्या समजुतीनें १८८० च्या १ ल्या ॲक्टाची अंमलबजावणी होऊं लागली व पूर्वीं जीं गांवें जमींत पडलीं होतीं तीं खुलीं होऊन खोत आपल्या वतनांची वहिवाट पाहूं लागले.

याप्रमाणें सर्व व्यवस्था झाली खरी, पण ज्यास तंटा उकरून काढावयाचा त्यास आपला हेतु सिद्धीस नेण्यास कोणताहि ॲक्ट झाला तरी त्यानें कितीसें निवारण होणार ? जुन्या कुळापासून खोतानें अर्धेल, तिर्धेल अगर सरकारनें ठरविलेले मक्ते यापेक्षां जास्ती घेऊं नये, असा सरकारनें नियम घालून दिला. पण सरकारी साराच जर या अर्धेल, तिर्धेल अथवा मक्ते यांपेक्षां जास्ती झाला, तर तो खोतानें आपल्या पदरचा भरावा कीं काय, या प्रश्नाची वासलात वरील ॲक्टांत कांहींच लागली नव्हती. सरकारास हवा तितका सारा वाढविण्याचा सदर ॲक्टानें अधिकार दिलेला आहे. परंतु सरकारी सारा कुळापासून खोतास जें उत्पन्न मिळतें त्यापेक्षां तरी जास्त वाढणार नाहीं अशी सामान्य समजूत असल्यामुळें त्याबद्दल या ॲक्टांत कांहींच विचार झालेला नव्हता. परंतु तोच प्रश्न आतां उपस्थित झाला आहे. देवगड तालुक्यांतील कांहीं गांवांत कुळांपासून खोतांनीं जे मक्ते द्यावे म्हणून कायद्याप्रमाणें पैमाष अधिकाऱ्यांनीं ठरविलें आहे त्यापेक्षां फेरपहाणींत सरकारी सारा जास्त वाढला गेला. म्हणजे सरकार खोतापासून १० रुपये मागूं लागलें आणि कुळापासून ८ रुपये किंमतीचेंच धान्य द्यावें हा पूर्वीचाच ठराव कायम ठेवला; खोतांनीं सरकारांत अर्ज केले, पण त्यांस जबाब मिळाला कीं, कूळ व खोत यांच्या दरम्यान जे मक्ते पैमाष अधिकाऱ्यांनीं ठरविले आहेत

त्यांत खोती ॲक्टाप्रमाणें हात घालण्याचा सरकारास हक्क नाहीं. सारा वाढविण्याचा सरकारास हक्क आहे परंतु खोतांचे मक्ते वाढवून देण्याचा हक्क नाहीं, अशी स्थिति जेव्हां प्राप्त झाली, तेव्हां खोतांनीं आपलीं वतनें जप्त होऊं दिलीं. आणि मौज अशी कीं, खोती गांव अशा रीतीनें जप्त झाला म्हणजे कुळापासून जप्तीदार पूर्ण सारा वसूल करून घेऊं लागला. म्हणजे जी गोष्ट खोतास करूं देण्यास सरकारास अधिकार नाहीं असें सरकार म्हणत होतें, तीच गोष्ट गांव जप्तींत गेल्याबरोबर सरकार करूं लागलें. इंग्रजी न्यायाचें व कायद्याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. आम्हीं पाहिजे तर कुळावर जुल्मूम करू पण तूं कोण करणार, अशाच प्रकारचें खोतास सरकारचें म्हणणें आहे व याच म्हणण्याविरुद्ध ना० खरे यांनीं गेल्या दोनचार वर्षें सरकारमध्यें तक्रार चालविली आहे. ना० खरे यांचें असें म्हणणें आहे कीं, सरकारास जर सारे वाढविण्याचा अधिकार आहे, तर त्याप्रमाणें कुळांकडून खोतास मिळणारे मक्तेहि त्यांनीं वाढवून दिले पाहिजेत. आतां असा अधिकार जर सन १८८० च्या १ल्या ॲक्टाप्रमाणें सरकारास नसेल तर तेवढ्यापुरती त्या ॲक्टांत दुरुस्ती करून तो अधिकार सरकारनें आपल्याकडे घ्यावा व होत असलेला अन्याय दूर करावा. ना. खरे यांचें हें म्हणणें अगदीं न्यायाचें व सरळपणाचें आहे; परंतु सरकारास इतक्या सरळपणानें वागावयाचें नाहीं. ना. खरे हे ॲक्टांत दुरुस्ती करण्यास मागतात ही संधी पाहून सरकारनें आणखीहि कांहीं आमच्याहि तर्फे कांहीं दुरुस्त्या करा म्हणून दुसरें बिल आणिलें आहे. या बिलाचा हेतु काय व त्यांतील मुद्दे काय आहेत यांचें विवेचन आज करण्यास अवकाश नाहीं. तात्पर्य इतकेंच आहे कीं, कसेंहि करून खोतांचे आणखी मोडतिल तेवढे पाय मोडावे. याबद्दल विशेष चर्चा पुढिल खेपेस करूं.

• • •

* खोतीच्या हक्कावर घाला

नंबर ३.

गेल्या दोन अंकीं खोतासंबंधें जी हकीकत व खोती ॲक्टांतिल कांहीं कलमांचा जो सारांश दिला आहे, त्याजवरून रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत व त्यांचीं कुळें यांच्यामधील अथवा खोत व सरकार यांच्यामधील परस्परसंबंध वाचकांच्या लक्षांत आलाच असेल. आज त्यापुढें म्हणजे सरकार हल्लीं खोतांच्या हक्कांत कोणत्या प्रकारें हात घालूं पहात आहे याचा विचार

* [केसरी ता. १४ मार्च १८९९]

करावयाचा; पण तसें करण्यापूर्वी ज्या दोन चार गोष्टींचा मागील दोन्ही लेखांत उल्लेख करण्याचें राहून गेलें आहे त्या सांगून नंतर हल्लींच्या बिलाकडे वळण्याचा विचार आहे. ह्या गोष्टी खोतांची हल्लींची स्थिति व हक्क पूर्णपणें ध्यानांत येण्यास फार जरूरीच्या आहेत व त्या जर नीट लक्षांत ठेवल्या नाहींत तर खोतीच्या प्रश्नाचें खरें स्वरूप कोणाच्याही लक्षांत यावयाचें नाहीं.

घांटावर ज्यावेळीं पैमाष सुरू झाली त्यावेळीं मिराशी हक्क म्हणून कांहीं शेतकऱ्यांनीं सांगितले होते. हा हक्क लँड रेव्हिव्यू कोडाप्रमाणें राहिला आहे कीं नाहीं याची शंकाच आहे. तथापि ह्या हक्कावरून एवढी गोष्ट शाबीत होते कीं, देशावरील जिल्ह्यांतून शेत कसणारे कुणबी आपल्या जमिनीचे आपणांस मालक समजत व सरकारास सारा दिला म्हणजे मग आपणास कोणात्याही प्रकारची कोणाचीहि तसदी नाहीं, अशी त्यांची समजूत असे. शेतकऱ्यांपासून हा सारा किंवा इतर बाबीचे पैसे वसूल करून तो सरकारांत भरण्याचें काम ज्या लोकांकडे असे त्यांस शेंकडा अमुक दराप्रमाणें हक्काचें कमिशन मिळत असे. अशा हक्कदार लोकांसच देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी वगैरे संज्ञा असून कधीं कधीं साऱ्याचे वसुलाखेरीज गांवची अन्य कामेंही त्यांच्याकडे असत. सारांश, साऱ्याचा वसूल किंवा दुसरें सार्वजनिक काम करण्याबद्दल साऱ्याच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग मिळण्याचा जो हक्क त्यासच वतन म्हणत, आणि धर्मादायार्थ किंवा पूर्वी केलेल्या कामाबद्दल सर्व सारा किंवा त्याचा कांहीं नियामित भाग मालकीनें घेण्याचा जो हक्क त्यास इनाम म्हणत. इनामदार, हक्कदार, आणि वतनदार ही सर्व मंडळी अशा रीतीनें अर्थातच सरकार व शेतकरी यांच्या दरम्यान रहात असे. शेतकरी जमिनीचा मालक व सरकार साऱ्याचें मालक, आणि पूर्वी केलेल्या कामाकरितां किंवा दरवर्षीच्या कामाकरितां साऱ्याच्या उत्पन्नापैकीं नियामित भाग मिळत असे ती वतनदार मंडळी, अशी स्थिति घांटावर होती. यांत इंग्रज सरकारच्या पैमाषीनें बराच फरक झाला. पहिला मोठा फरक असा कीं, शेतकरी जमिनीचा सर्वांशीं मालक आहे हें तत्त्व इंग्रजसरकारनें कबूल केलें नाहीं. तो सारा देत आहे तोंपर्यंत जमीन नांगरून पेरि काढण्याचा त्याचा हक्क, एवढाच मालकी शब्दाचा सरकारनें अर्थ केला. म्हणजे जमिनींत एखादी खाण लागल्यास ती सरकारची, सारा न दिल्यास सर्व जमीन काढून घेण्यास सरकारास अधिकार आणि प्रसंगविशेषीं जंगल, अबकारी वगैरे संबंधानेंहि हक्क शेतकऱ्यांकडून काढून घेण्याचा अधिकार, या सर्व गोष्टी वरील व्याख्येपासून निष्पन्न झाल्या. सरकारी कायदेपंडितांनीं आपली भाषा व व्याख्या अशा कांहीं बनवल्या आहेत कीं, त्यांचा गरीब शेतकऱ्यांस बोधहि होणें कठीण आहें. जमिनीची मालकी म्हणजे जमीन

करण्याचा अधिकार, आणि तोही सारा देईंपर्यंत असा अर्थ झाल्यामुळें अनेंक आपली जमीन व ा विकली, अथवा अच्या मृत्यूनें बचा वारसा त्या जमिनीवर झाला याचा अर्थही जमीन कसण्याचा अधिकार विकला गेला अथवा वारसहक्कानें प्राप्त झाला असा आतां कायद्याच्या भाषेंत होत असतो; असो. दुसरा मोठा फरक पैमाषीचे वेळीं झाला तो असा कीं, देशमुख, देशपांडे वगैरे वतनदार मंडळीस नक्त नेमणुका करून काढून टाकलें आणि इनामदारांची बरीच छाटाछाट होऊन त्यांसहि संपुष्टांत आणण्याचा बराच प्रयत्न झाला.

घांटाखालीं रत्नागिरी जिल्ह्यांत हीं तत्वें पहिल्या पैमाषीचे वेळीं लागू करण्याचा जेव्हां प्रयत्न झाला तेव्हांच खोतांनीं हरकत करून कोर्टमार्फत आपले हक्क शाबीत करून घेतले हें मागें सांगितलेंच आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत व देशावरील वतनदार यांच्यामध्यें जो मोठा भेद आहे तो हाच; व तो पूर्णपणें लक्षांत ठेवल्याखेरीज खोतीच्या प्रश्नाचा कोणासहि नीट उमज पडावयाचा नाहीं. पैमापी अधिकारी जेव्हां घांटावरचाच नियम घांटाखालीं लागू करूं लागले तेव्हां खोतांनीं त्यांजवर फिर्यादी करून कोर्टापुढें आपली हकीकत शेंकडों जुन्या सनदांनीं सिद्ध करून दाखविली. या सनदांवरून आतां असें निर्विवाद सिद्ध झालें आहे कीं, देशावर ज्याप्रमाणें जमिनीची मालकी शेत कसणाऱ्याकडे पूर्वापार चालत आली आहे तशी घांटाखालीं नव्हती. खोत लोकांच्या जुन्या सनदांवरून असें दिसून येतें कीं, रत्नागिरी जिल्हा हा एकदां ओसाड मुलुख होता. या ओसाड देशांत जाऊन आपल्या पैशानें व हिंमतीनें वसाहत करणारे ते खोत होत. गुजराथ, वऱ्हाड, आसाम, नागपूर, सीलोन वगैरे प्रांतांत अद्यापहि असाच प्रकार चालू आहे. शेंकडों युरोपियन लोकांनीं मोठमोठ्या जमिनी आपल्या नांवावर सरकारांतून घेऊन आपल्या खर्चानें त्या साफ करून त्यांत मजुरांकडून आज कित्येक वर्षें चहाची लागवड करण्याचें काम चाललें आहे. हे मजूर म्हणजे निव्वळ कामकरी बैलांप्रमाणें असतात असें म्हटलें तरी चालेल. चहाची लागवड करणारा हा सर्व जमिनीचा मालक व सरकारास त्यानें एकदां सारा भरला म्हणजे मग तो जमिनीपासून होईल त्या सर्व उत्पन्नाचा मालक असें सरकार समजतें. इतकेंच नव्हे तर ज्या मजुरांस कित्येक वेळां केवळ पशूप्रमाणें वागण्यांत येतें, ते मजूर त्यांस सुखानें मिळण्याबद्दलहि सरकार आपल्या खर्चानें तजवीज करीत असतें! परंतु ओसाड रत्नागिरी जिल्ह्याची त्यांनीं ज्यावेळीं वसाहत केली त्यावेळीं अशा प्रकारें त्यांस कोणीच साह्य केलें नाहीं. प्रत्येक खोतानें दहा पांच कुणब्याचीं कुटुंबें आपल्याबरोबर न्यावीं, आणि गोडीगुलाबीनें वागून ओसाड प्रदेशांत वसाहत करून गांव वसवावें असा त्या वेळचा क्रम होता. त्यावेळीं आगगाड्या वगैरे नव्हत्या. त्यामुळें आतां सारखीं निव्वळ मजुरीवर

माणसें मिळत नसत. चहाची लागवड करणारा युरोपियन ज्याप्रमाणें घांच वर्षांच्या करारानें आतां माणसें नेतो त्याप्रमाणें त्यावेळीं नव्हतें. यासाठीं खोतांनीं जीं कुळें अथवा कुणब्याचीं कुटुंबें बरोबर नेलीं तीं अशा शर्तीवर नेलीं होतीं कीं, त्यांनीं जमिनीची लागवड करून जें उत्पन्न होईल त्यापैकीं भात जमिनीवर निम्में व वरकशीस तृतीयांश उत्पन्न खोतास द्यावें. हा नियम इतक्या अबाधित रीतीनें अंमलांत येत असे कीं, त्यांस बहुतेक कायद्याचेंच स्वरूप आलें होतें. ओसाड प्रदेशांत कुळास खोतांची व खोतास कुळाची निव्वळ आत्मसंरक्षणाकरितांहि जरूर असल्यामुळें त्याच्यामध्यें वैरभाव उत्पन्न होण्याचा संभव नव्हता, व चहाच्या लागवडीकरितां केलेल्या वसाहतींल मजुरांपेक्षां यांची स्थिति फारच चांगली असे. या हकीकतीवरून रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत व कुळें यांचें स्वरूप नीट लक्षांत येईल. रत्नागिरी जिल्ह्यांत जितकीं गांवें तितके जमीनदार म्हणण्यास हरकत नाहीं. यांनीं सरकारास सारा द्यावा आणि गांवच्या जमिनीची लागवड आपल्या मर्जीप्रमाणें करावी, हा त्यांचा हक्क होय, आणि शेत कसणाऱ्या कुणब्याच्या मधील हक्कसंबंधाचा निर्बंध फक्त वर लिहिलेल्या अर्धेलीच्या व तिर्धेलीच्या नियमानेंच झालेला होता. ही स्थिति व हक्क खोतांनीं आपल्या सनदांवरून जेव्हां कोर्टांत शाबीत केले—आणि हे हक्क शाबीत करण्याचें सर्व श्रेय कै. रा. सा. मंडालिक यांजकडे आहे—तेव्हां पैमाषी खात्याचे डोळे उघडून रत्नागिरी जिल्ह्यास घांटावरील पैमाषीची पद्धत लागू करतां येणें अशक्य आहे असें त्यांस वाटलें. परंतु सरकारी अधिकाऱ्यांची शेत कसणाऱ्या कुणब्याबद्दल भूतदया रत्नागिरी जिल्ह्यांतच विशेष जागृत झाल्यामुळें (आसाम वगैरे प्रांतांतहि अद्याप जागृत झालेली नाहीं) खोताचे कुळास खोतानें पूर्वापेक्षां कांहीं तरी जास्ती हक्क दिले पाहिजेत असा त्यानीं आग्रह धरला, व खोती ॲक्ट हा या आग्रहाचाच परिणाम होय. खोतांनीं आपले हक्क कोर्टमार्फत शाबीत करून घेतले होते, पण अखेर न्याय कांहींना कांहीं तरी 'बळी तो कान पिळी' या न्यायानेंच व्हावयाचा, हें लक्षांत आणून त्यांनीं तडजोडीचें बोलणें कबूल केलें. आणि गेल्या अंकीं सांगितल्याप्रमाणें जुन्या कुळांस आपली जमीन विकण्याचा व अर्धेल देत आहे तोंपर्यंत अव्याहत जमीन कसण्याचा हक्क देण्याचें कबूल केलें. खोती ॲक्टामुळें खोतांच्या कुळांस जो काय फायदा झाला त्यांमधील मुख्य फायदा हाच होय. दुसरा फायदा असा कीं, कुळानें अर्धेल आणे तिर्धेल खोतास दिली म्हणजे मग वेठ, बिगार, तवसें, भोंपळा वगैरे कोणत्याहि प्रकारें खोतास आपल्या उत्पन्नाचा अथवा श्रमाचा जास्त भाग देण्याची या ॲक्टाप्रमाणें त्याजवर जबाबदारी राहिली नाहीं. खोतानें गांवचा सारा भरावा आणि कुळानें जमिनीची लागवड करून त्यास अर्धेल तिर्धेल द्यावी; परंतु कुळ जुनें असल्यास

खोतानें त्यास काढूं नये, अशी हल्लींच्या ॲक्टानें स्थिति झाली आहे. अर्धेल किंवा तिर्धेल म्हणजे शेताचें निम्में अगर तृतियांश उत्पन्न, शेतें उभीं असतांच गांवांतील कांहीं लोक बरोबर घेऊन खोतानें ठरवावें व त्यावर कुळाची कांहीं तक्रार असल्यास मामलेदाराकडे अर्ज करून निकाल करून घ्यावा, असेंहि या ॲक्टांत नियम आहेत, व त्याप्रमाणेंच हल्लीं व्यवस्था चालू आहे. कित्येक ठिकाणीं अर्धेल तिर्धेलीच्या ऐवजीं कुळानें खोतास अमुक एक उक्ता मक्ता द्यावा असें ठरलें आहे. या मक्त्यापेक्षां सरकारी सारा जास्त वाढल्यामुळें व मक्ता वाढवण्यास सरकारास ॲक्टाप्रमाणें अधिकार नसल्यामुळें देवगड तालुक्यांतील भानगड उपस्थित झाली आहे. ही भानगड मिटावी म्हणून ना० खरे यांनीं आपलें बिल कौन्सिलांत आणिलें. या बिलांत एकच कलम आहे, आणि तें हें कीं, सारा वाढला असतां मक्ता वाढविण्याचा सरकारास अधिकार आहे. सारांश, पूर्वी एकमेकांच्या समजुतीनें झालेल्या खोती ॲक्टांत अनुभवानें जेवढी अडचण दृष्टीस पडली तेवढी दूर करण्यापेक्षां जास्त ना० खरे यांचा दुसरा कांहीं एक उद्देश नव्हता. पायांत रुतलेला कांटा ते सुईनें काढणार होते, पण ते त्या कांट्यास सुई लावतात न लावतात तोंच रेव्हिन्यु खात्यांतील सरकारी वैद्यांनीं आपली शस्त्राची पेटी उघडून खोती ॲक्टाचें सर्वच डिसेक्शन करण्याचा ऊर्फ चिरण्याचा उद्योग आरंभिला. अर्धेल तिर्धेल शेतें उभीं असतां ज्या पद्धतीनें ठरविण्यांत येतें ती पद्धत (ज्यास आभावणी म्हणतात) तीच वाईट आहे, आणि त्याऐवजीं नक्त मक्ते ठरवून देऊन खोतास बहुतेस घांटावरील वतनदारांच्या पाहिरीस आणून ठेवण्याचा सरकाराचा फार दिवसांचा संकल्प यावेळीं साधून घ्यावा असें त्यांच्या मनांत आलें आहे, व त्याकरितां ना० खरे यांनीं आणलेल्या बिलाची संधी पाहून सरकारनें मागें लिहिल्याप्रमाणें आपलें बिल पुढें आणिलें आहे. त्या बिलांतील कलमें व त्याविषयीं आमचे विचार पुढील खेपेस देऊं.

* खोती हक्कावर घाला.

नं. ४

ना. खरे यांच्या मतें खोती ॲक्टांत काय सुधारणा करावयाची होती व त्यांनीं आणलेल्या बिलाची संधी साधून सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत फार दिवसांपासून असलेले हेतु सिद्धीस नेण्याचा सरकारानें कसा कावा मांडला आहे, याचें साधारण स्वरूप गेल्या अंकीं दिलेंच आहे. ना. खरे हे पायांत चोंचलेला फक्त कांटाच काढणार होते, पण सरकारास तें न खपून त्याऐवजीं त्यांनीं पाय कापून टाकण्याच्या कायद्याचा मसुदाच कायदे कौन्सिलपुढें आणला आहे. वस्तुतः पाहतां अशा रीतीनें खोत लोकांचे हातपाय वगैरे अवयव निर-निराळ्या वेळीं कापून काढण्यापेक्षां त्यांचें डोकेंच कापून टाकण्याचें बिल जर सरकार कायदे कौन्सिलपुढें आणील तर आमच्या मतें फार चांगलें होईल. जुन्या मॉरलक्लास बुकांत भूतदयेचा एक धडा आहे, व त्यांत असें लिहिलें आहे कीं, कोणास मारून टाकणें असल्यास एकदम मारून टाकावें, हालहाल करून मारूं नये. हा नियम अर्थातच मांसाहारी लोकांचा आहे. तथापि त्यांतल्यां त्यांत ही भूतदयेची पायरी आहे असें जर आपण कबूल केलें तर जी गोष्ट आपणास कर्तव्य आहे ती त्वरित आणि एका झटक्यासरशी करावी, यांतच खरें शौर्य अथवा प्रामाणिकपणा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं मुंबईसरकारचें वर्तन याच्या अगदीं विरुद्ध आहे; व जी गोष्ट त्यांस न्यायानें अथवा न्यायाच्या कोर्टामार्फत करून घेतां येत नाहीं, तीच गोष्ट न्यायाचा आव आणून नुसत्या दांडगाईनें करण्यास सरकार प्रवृत्त झालें आहे. करितां, ही दांडगाई कितपत चालण्यासारखी आहे, आपणास त्याचे विरुद्ध कांहीं प्रतिकार करण्यासारखा आहे कीं नाहीं, असल्यास तो कोणता ह्याहि प्रश्नाचा आपल्यास येथें विचार केला पाहिजे. आमचें असें मत आहे कीं, ही दांडगाई करण्याचा सरकारास अधिकार नाहीं, व मागें ज्याप्रमाणें सरकारावर फिर्यादी करून खोत लोकांस आपले हक्क शाबीत करून घेतां आले, त्याप्रमाणें आतांहि करणें कदाचित् भाग पडेल. नवीन हक्क उपस्थित करणें हें रेव्हिन्यू खात्याचें काम नव्हे, व कायदे कौन्सिलच्या ॲक्टानेंहि तसा अधिकार त्या खात्यास देतां येईल कीं नाहीं याचा आम्हांस वानवाच आहे. सन १८८० चा खोती ॲक्ट अमलांत आला त्याचें मुख्य कारण त्यांत नमूद केलेली व्यवस्था दोन्ही पक्षास मान्य होती हें होय. तसें जर झालें नसतें तर सनदेवरून

---

* (ता. २१ मार्च १८९९)

प्राप्त झालेल्या हक्काचें कायद्यानें नियमन करण्यास सरकारास कितपत अधिकार आहे हाहि प्रश्न तेव्हांच निघाला असता. खोतांचे हक्क जुन्या सनदांवरून सिद्ध झालेले आहेत. व ती गोष्ट आतां सरकारास नाकारतां येत नाहीं. त्या हक्कांची व्यवस्था अथवा सेटलमेंट कसें करावें एवढेंच काय तें आतां शिल्लक राहिलें आहे; व यापेक्षां जर सरकार जास्त करूं म्हणेल तर त्याचें करणें अन्यायाचें व निव्वळ दांडगाईचें होईल.

खोती ॲक्टांत सुधारणा करण्याकरितां सरकारच्या वतीनें जें बिल कायदे-कौन्सिलांत आलें आहे, त्यांत मुख्यत्वेंकरून चार पांचच ठळक प्रश्न आहेत. (१) वहिवाटदार खोतास मुखत्यार नेमण्याचा अधिकार देण्याबद्दल, (२) पैमाष अंमलदारांनीं केलेली कुळवार नोंद दुरुस्त करण्याबद्दल. (३) खोत आणि त्यांचीं कुळें यांच्या दरम्यानचे संबंध नियमित करण्याबद्दल आणि (४) जंगलाबद्दल. यांपैकीं १, २ व ४ हे पहिल्यानें घेऊन नंतर तिसऱ्या प्रश्नाचा आम्ही विचार करणार आहों. कारण तिसरा प्रश्नच ह्या सर्वांत अति महत्त्वाचा आहे, व त्यावरच खोतांचें अस्तित्व सर्वांशीं अवलंबून आहे. खोतानें सर्व सरकारी सारा भरला म्हणजे खोत आणि त्यांचीं कुळें यांच्या दरम्यान पूर्वापार वहिवाट किंवा सन १८८० सालचा खोती ॲक्ट यामुळेंच त्यांचे परस्पर संबंध ठरवणारें दुसरें कांहीं एक नाहीं. धारेकरी सोडून देऊन बाकी कुळांचे नवे आणि जुने असे भेद या सन १८८० च्या ॲक्टांत केलेले आहेत. परंतु हा भेद फक्त कुळांकडून जमीन काढतां येते कीं नाहीं येवढ्यापुरताच आहे. कूळ जुनें असो अथवा नवें असो, त्यानें खोतास ठरलेला मक्ता अथवा अर्धेल आणि तिर्धेल शिरस्त्याप्रमाणें दिली पाहिजे, असा हल्लींचा नियम आहे. हा नियम काढून टाकून हळू हळू खोतास कुळांकडून गल्ला, मक्ता, वगैरे कांहीं एक न मिळतां साऱ्यापेक्षां रुपयास दोन आणे जास्त नक्त रक्कमच मिळावी अशी व्यवस्था हल्लींच्या बिलानें करण्याचें सरकारच्या मनांत आहे. म्हणजे पर्यायानें खोती मोडून टाकून खोती गांवचा सारा व लोकलफंड खोतानें भरावा आणि साऱ्यावर रुपयास दोन आणे किंवा शेंकडा १२॥ टक्क्यांपेक्षां जास्ती वसूल कुळांकडून घेऊं नये, अशी थोड्याच वर्षांत व्यवस्था होईल अशा हेतूनें हल्लींचें बिल कौन्सिलापुढें आणलेलें आहे. प्रस्तुतच्या बिलांतील मुख्य मुद्दा हाच आहे, व खोती ॲसोसिएशनचे सेक्रेटरींनीं जो सरकाराकडे सदर बिलासंबंधानें एक अर्ज केला आहे, त्यांतहि याच प्रश्नाची विशेष चर्चा केलेली आहे. परंतु त्याची येथें चर्चा करण्यापूर्वी वर सांगितलेल्या दुसऱ्या तीन प्रश्नांचा येथें आधीं विचार करूं.

वहिवाटदार किंवा पाळीदार खोतास मुखत्यार देतां येतो कीं नाहीं, या प्रश्नाचा सन १८८० च्या कायद्यांत खुलासा केलेला नाहीं, हें खरें आहे, पण

याचा निकाल येथें करावयास तरी कशास पाहिजे होता हें आम्हांस समजत नाहीं. कोर्टातील सर्व कामें करण्यास जर मुखत्यार देतां येतो तर गांवच्या वहिवाटीचेंच काम मुखत्यारानें कां करूं नये, हें आम्हांस समजत नाहीं. आजपर्यंतची वहिवाटहि तशीच आहे, म्हणजे मुखत्यारपत्रावरून नेमलेला मनुष्य सध्यांहि गांवची वहिवाट करितो. पण कांहीं उपद्यापी मुलकी अंमलदारांनीं अशी दीर्घ शंका काढली आहे कीं, हे मुखत्यार कायदेशीर नाहींत, व ही शंका दूर करण्याकरितां हल्लींच्या बिलांत एक कलम घातलें आहे, पण हें कलम घालतांनाहि सरकारानें आपली कारकुनी करण्याचें सोडलें नाहीं. मुखत्यार पसंत करणें किंवा न करणें ह्यावद्दलचा अधिकार या बिलांत कलेक्टराला दिलेला आहे. त्यामुळें हें बिल पास झाल्यास मुखत्यार नेमणें अगर न नेमणें ही गोष्ट कलेक्टराच्या मर्जीवर रहाणार अर्थात् जी गोष्ट आम्हांस कलेक्टरास न विचारतां आज करतां येत आहे, तीच उद्यां त्यांस विचारून करावी लागणार. ही सुधारणा म्हणावयाची कीं कुधारणा म्हणावयाची हें निराळें सांगावयास नकोच. सरकारास जर पूर्वीच्या वहिवाटीबद्दल कांहीं संशय होता तर सरळ मार्ग म्हटला म्हणजे वहिवाटदार खोतास त्याच्या खुषीप्रमाणें मुखत्यार नेमण्याचा अधिकार देणें हाच होय. कलेक्टरचें नसतें घोडें मध्यें ढकलून तो हक्क मर्यादित करणें कोणासहि फायदेशीर अथवा सोईचें नाहीं.

या कायद्यांतील दुसरें एक महत्त्वाचें कलम असें आहे कीं, कुळाकडून येणारा वसूल—मग तो मक्ता असो किंवा अर्धेल, तिर्धेल असो—वेळेवर न आल्यास लँड रेव्हिन्यूकोडाप्रमाणें कुळाविरुद्ध मदत मागण्याचा खोतास हल्लींच्या कायद्याप्रमाणें जो अधिकार आहे,तोहि कांहीं अंशीं कमी करावयाचा.कुळांकडून त्यानें लागवड केलेल्या शेतीच्या उत्पन्नापैकीं अर्धेल किंवा तिर्धेल खोतास मिळत असते, व दरवर्षी शेतांत पिकें उभीं असतां गांवांतील दोन पंचांसमक्ष पिकाचा अंदाज करून अर्धेल आणि तिर्धेलचें माप ठरवण्यांत येतें हें मागें सांगितलेंच आहे. इतकेंच नव्हे तर पिकाची आभावणी कुळास नाकबूल असल्यास हल्लींच्या कायद्याप्रमाणें मामलेदारास अर्ज करून ती दुरुस्त करून घेण्याचा अधिकार कुळांस आहे. इतके सर्व सोहाळे झाल्यावर आभावणीप्रमाणें खोतास वसूल मिळणें अगदीं न्याय्य व जरूरीचें आहे हें कोणीहि कबूल करील. खोतापासून साऱ्याची मात्र पैनपै वसूल करून घ्यावयाची आणि योग्य रीतीनें आभावणी होऊन कुळांकडून येणारा वसूल मिळण्यास त्यास सरकारानें मदत करूं नये हा न्याय कोठला ? आजपर्यंत अशी मदत मिळत असे, पण हल्लींच्या बिलांत आतां असें कलम आणिलें आहे कीं, जेव्हां मदतीच्या कामांत कुळाची तक्रार असेल तेव्हां जमिनीवरील साऱ्याच्या दुपटीपेक्षां जास्त रकमेबद्दल मदत देण्याचें कारण नाहीं. आमच्या मतें हें कलम दोन तीन प्रकारें खोतांस नडण्यासारखें आहे.—

एक तर साऱ्याच्या दुपटीपेक्षां जास्त मागण्याचा त्याला हक्क नाहीं, असा यावरून अप्रत्यक्ष निर्णय होतो. दुसरी अडचण अशी कीं, वरकस जमिनीची आळीपाळीनें लागवड करतात, म्हणजे चार नंबर असले तर त्यांपैकीं दोन किंवा तीन कांहीं वर्षें पडीत टाकून फक्त एक दोहोंतच लागवड केलेली असते. अशा वेळीं चार नंबरांचा सारा खोतातें भरावा आणि त्यांपैकीं एकाच नंबराची कुळानें लागवड केली असल्यास कुळाकडून त्या नंबराच्या साऱ्याच्या दुपटीपेक्षां जास्त ऐवज घेण्याचा अधिकार असूं नये हें मोठेंच आश्चर्य होय. आभावणीपत्रकाविरुद्ध तक्रार करण्याची सवड एकदां कुळास दिल्यावर पुनः पुनः तीच तक्रार करण्याची कायद्यानें त्यास सवड ठेवणें म्हणजे खोताचे पैसे न देण्यास त्यास उत्तेजन देण्यासारखेंच आहे, व अशा रीतीनें त्यास सवलती ठेवण्यापेक्षां खोताविरुद्ध बंड करण्यास त्यांस उघड सांगणें बरें.

जंगलासंबंधेंही अशाच प्रकारची दांडगाई हल्लींच्या बिलांत केलेली आहे. सन १८८० च्या कायद्याप्रमाणें खोत जोंपर्यंत जमिनीचा सारा भरीत आहे तोंपर्यंत गांवांतील सर्व जमीन खोताची आहे. परंतु त्या कायद्यांत जंगल खात्याच्या सुधारणेकरितां व लोकोपयोगाकरितां म्हणून अशी एक सवड ठेवलेली आहे कीं, सदर ॲक्ट अमलांत येण्यापूर्वीं वीस वर्षेंपर्यंत गांवांत ज्या जमिनी पडीत असतील त्या जंगलाकरितां घेण्याचा सरकारास अधिकार आहे. मात्र त्याच्या मोबदला सरकारानें खोतास नुकसानीदाखल योग्य रक्कम दिली पाहिजे, अथवा खर्चवेंच भागून जें जंगलाचें उत्पन्न राहील त्याचा तिसरा हिस्सा खोतास दिला पाहिजे. परंतु जंगल खात्याच्या जंगली अंमलदारांनीं या दोन्ही अटी धाब्यावर बसवून कित्येक ठिकाणीं निव्वळ दांडगाईनें वरकस जमिनीही जंगलांत सामील केल्या आहेत, कां तर वरकस जमीन आळीपाळीन पडीत टाकावी लागते म्हणून. सन १८८० च्या कायद्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांचें हें कृत्य अन्यायाचें आहे, कारण वरकस जमीन जरी मध्यें मध्यें पडीत राहिली तरी एकसारखी वीस वर्षेंपर्यंत ती कधींही पडीत रहात नाहीं, यावद्दल सरकारावर कोर्टांत दावे होऊन त्याचा अखेर निकाल नुकताच खोतासारखा लागला आहे. जंगली अधिकाऱ्यांची दांडगाई येथवरच होऊन राहिली असें नाहीं जंगलाच्या उत्पन्नापैकीं तिसरा हिस्सा खोतास मिळावयाचा त्यासही जंगलाचें उत्पन्न खर्चासच पुरत नाहीं, या सबबीवर जंगली अधिकाऱ्यांनीं फांटा दिला आहे या दोन्ही गोष्टी अगदीं उघड उघड अन्यायाच्या आहेत हे आता कोर्टमार्फतच सिद्ध झालेलें आहे. तेव्हां खरें म्हटलें म्हणजे सरकारानें त्या बाबतींत खोतांवर होत असलेला जुलूम दूर करून न्यायाची व्यवस्था करावयास पाहिजे. पण तसें कांहीं एक न करितां हल्लींच्या बिलांत असें कलम घातलें आहे कीं, " पडीत ठरवून ज्या जमिनी जंगलाकरितां सर-

कारनें घेतल्या आहेत, त्या बरोबर घेतल्या आहेत असें समजावें ! " या कलमाचा उघड अर्थ असा आहे कीं, मी प्रथम चोरी करणार आणि तुम्ही माझ्यावर कोर्टांत फिर्याद करून ती चोरी आहे असें शाबीत केल्यास मी पुनः असा नवा कायदा करणार कीं, मीं चोरी केली ती रास्त केली. असल्या कृत्यास दांडगाई म्हणावें कीं त्यापेक्षां दुसरा कांहीं जास्त योग्यतेचा शब्द वापरावा हें सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. ' बळी तो कान पिळी ' या म्हणीप्रमाणेंच असल्या कृत्याचें समर्थन होईल, एरवीं त्यास दुसरा मार्ग नाहीं. यापेक्षां सदरील बिलांत " सरकारास वाटेल तेव्हां खोताचे हक्कांपैकीं वाटेल तितके हक्क कमी करण्याचा अधिकार आहे " असें एकच कलम घातलें तर आमच्या मतें फार चांगलें. न्याय द्यावयाचा नसल्यास तो असल्या लबाडीनें नाकारण्यापेक्षां सरळ नाकारलेला फार चांगला.

आभावणीसंबंधाचीं जीं कलमें या बिलांत आहेत त्यांचा विचार स्थळसंकोचास्तव आज होणें शक्य नाहीं, करितां तो पुढील खेपेस करूं.

❁ ❁ ❁

* खोतां हक्कावर घाला

नं. ५.

सरकारानें नवीन आणलेल्या बिलांतील किरकोळ गोष्टींचा विचार गेल्या खेपेस केला; आज त्यांतील महत्त्वाच्या कलमांचा विचार करावयाचा आहे. या बिलाचा मुख्य उद्देश असा आहे कीं, पिकाची आभावणी होऊन अर्धेलं तिर्धेल घेण्याचा खोतास जो हक्क आहे तो हळूहळू नाहींसा करून टाकून त्या ऐवजीं कुळाकडून खोतास कांहीं नक्त रक्कम मात्र कायद्यानें मिळावी. म्हणजे कुळानें आपल्या जमिनीचा सारा सरकारांत भरल्यावर त्याखेरीज साऱ्यांतील दर रुपयाच्या पाठीमागें दोन आणे खोतास जास्त दिले म्हणजे खोतकीसंबंधाच्या सर्व जबाबदारींतून तो मोकळा झाला. उदाहरणार्थ, एखाद्या गांवचा साऱ्याचा वसूल एक हजार रुपये असून तो सर्व गांव खोती असला तर खोतास कुळांकडून दोन हजार आणेच काय तो वसूल मिळावा अशी सरकारची इच्छा आहे. या दोन हजार आण्यांतून एक हजार आणे लोकलफंड वजा झाला म्हणजे हजार रुपयांच्या गांवची वहिवाट दरसाल हजार आण्याकरितांच खोतानें करावी असें निष्पन्न होतें. हल्लींच्या बिलांत ही गोष्ट आम्ही वर लिहिल्याप्रमाणें स्पष्ट मांडलेली नाहीं, पण या बिलाचें अखेर घोरण

* (ता. २८ मार्च १८९९.)

अशाच प्रकारचें आहे हें कोणाहि समंजस वाचकाच्या ताबडतोब ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. आभावणीचे हल्लींचे नियम रद्द करून त्याऐवजीं या बिलांत कांहीं नवीन नियम घातलेले आहेत. त्यांतील मुख्य नियमांचा सारांश येणेंप्रमाणें:—

(१) कुळाकडून अर्धेल तिर्धेलीच्या ऐवजीं केव्हांही खोतानें जर मक्त्या-दाखल म्हणून अमुक एक ऐवज घेतला असला तर तोच कायमचा मक्ता म्हणून कलेक्टरास ठरविण्याचा अधिकार आहे. म्हणजे खोतानें जर कुळावर एखादे वेळीं मेहेरबानी केली असली तर ती त्यानें कुळावर नेहमींच केली पाहिजे, असें ठरविण्याचा अधिकार कलेक्टर साहेबांस या बिलानें येणार आहे.

(२) असे मक्ते ठरविण्याचें जेथें साधन नसेल तेथें गांवच्या शिरस्त्या प्रमाणें अर्धेल तिर्धेल ठरवावी. पण आभावणीबद्दल तक्रार पडून मदत माग-ण्याचा प्रसंग आल्यास साऱ्याच्या दुपटीपेक्षां जास्त रक्कम वसूल करण्यास मदत मिळावयाची नाहीं.

(३) अर्धेल तिर्धेल जरी ठरली असली तरी कूळ किंवा खोत यांपैकीं कोणी एक नेंही अर्ज केल्यास दहा वर्षांच्या पिकाच्या व किंमतीच्या सरासरीनें अर्धेल तिर्धेलीच्या ऐवजीं नक्त रक्कम ठरवून देण्याचा कलेक्टरांस अधिकार दिलेला आहे.

(४) अशा रीतीनें मक्ते किंवा नक्त नेमणुका ठरल्या म्हणजे त्या कोर्ट-मार्फत किंवा अन्य तऱ्हेनें बदलण्याचा कोणास अधिकार नाहीं. फक्त जेव्हां सरकारी साऱ्यापेक्षां या मक्त्याची किंमत किंवा नक्त ठरविलेली रक्कम कमी पडेल तेव्हां खोतास साऱ्यापेक्षां रुपयास दोन आणे जास्त रक्कम पडेल अशा बेतानें मक्ते अगर नक्त रक्कम वाढविण्याचा कलेक्टरास अधिकार आहे. त्याच-प्रमाणें जमीन वाहून गेल्यामुळें, खराब झाल्यानें, किंवा अन्य कारणानें जमि-नीचा सारा कमी करण्यांत येतो, तेव्हां त्या मानानें खोतास मिळणारा मक्ताही कमी करण्याचा कलेक्टर साहेबांस अधिकार ठेवलेला आहे.

(५) आजपर्यंत कलेक्टर साहेबांनी केलेल्या असल्या ठरावाविरुद्ध कांहीं बाबतींत दिवाणी कोर्टांत दावे करितां येत असत; परंतु हा खोतास असलेला अधिकार काढून घेण्याचा हल्लींचें बिल करणाऱ्यांचा इरादा आहे, म्हणजे कलेक्टर करील तें ब्रह्मवाक्य असें होणार.

वर ज्या पांच गोष्टी दिल्या आहेत त्यांवरून बिलाचें स्वरूप व त्याचे उद्देश कोणाच्याहि लक्षांत येतील. खोत आणि कूळ यांच्या दरम्यानचे संबंध जर सनदापत्रांवरून पूर्वापार कायम झालेले आहेत, तर त्यांत ढवळाढवळ कर-ण्याचा सरकारास कसा अधिकार येतो, हेंच आम्हांस आधीं समजत नाहीं. घांटावरील जिल्ह्यांत ज्याप्रमाणें पाटील कुलकर्णी आणि शेतकरी यांचा संबंध

असतो तसा खोत व त्यांचीं कुळें यांच्या दरम्यान नाहीं, हें आम्हीं मागेंच सांगितलें आहे. सरकारास सारा भरल्यानंतर खोत सरकारचें खातेदार कूळ झालें; व ज्याप्रमाणें कॉफीची लागवड करणारे लोक आपल्या हाताखालीं वाटेल तितके लोक ठेवून आपणास पाहिजे तितकी मजुरी देतात, तशाच कायद्याच्या दृष्टीनें खोताचा अधिकार आहे. कुळाकडून अधेंल तिर्धेल घेण्याचा खोताचा जो हक्क आहे तो सरकारास कधींहि कमी करतां यावयाचा नाहीं. निदान त्या हक्काचा पूर्ण मोबदला तरी खोतास दिला पाहिजे. कुळांची स्थिति चांगली आहे कीं नाहीं, हें पाहण्याचें सरकारचें किंवा दुसऱ्या कोणाचेंहि काम नाहीं. पुण्यांत भिकार पुष्कळ आहे म्हणून येथील सावकाराच्या घरांतील पैसे उचलून त्यांस वांटण्याचा ज्याप्रमाणें सरकारास हक्क नाहीं, त्याचप्रमाणें खोती गांवांतील कुळांची स्थिति चांगली नसल्यास खोतास बुचाडून त्याच्या वसुलाची खैरात करण्याचा सरकारास अधिकार नाहीं. हा प्रश्न हक्काचा आहे. भूतदयेचा नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांतील कुळांबद्दल न्यूजंट साहेबांस कींव येत असेल व त्यांच्या तंबूबर लंगोटी नेसून आलेल्या कुणब्यांबद्दल जर त्यांचें अंतःकरण खरोखरीच द्रवत असेल, तर त्यांनीं आपल्या खिशांतले पैसे त्यांस खुशाल वांटावे, त्याबद्दल कोणाचीहि तक्रार नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांचे औदार्याबद्दल व रत्नागिरी जिल्ह्यांतील रयतेच्या कळकळीबद्दल त्यांचें आम्ही मोठ्या आनंदानें अभिनंदन करूं. पण रत्नागिरी जिल्ह्यांतील रयत भिकारी आहे म्हणून खोताच्या खिशांतील पैसे काढून रयतेच्या खिशांत घालण्याची जी युक्ति न्यूजंटसाहेबांनीं काढिली आहे ती मात्र आम्हांस पसंत नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांत खोत नको असला तर तो काढून टाकण्यास एकच मार्ग आहेः तो हा कीं, खोताचें जें उत्पन्न असेल तितकें व्याज येईल अशा बेतानें त्यास पहिल्यानें सरकारनें रक्कम देऊन त्याचे हक्क विकत घ्यावे, आणि मग ते हक्क हळू हळू कुळांस विकत द्यावे किंवा कुळांबद्दल सरकारची खरोखरच दयार्द्र बुद्धि असल्यास फुकट द्यावे. आयर्लंड देशांतील जमीनदार व कुळें यांच्या संबंधाचा पार्लमेंट सभेंत जो मागें वादविवाद झाला होता, व त्यासंबंधानें ग्लॅडस्टन-साहेबांनीं जो कायदा पास करून घेतला आहे, त्यांतहि हेंच तत्त्व विलायत सरकारानें मान्य केलेलें आहे. खोत जमिनीचा किंवा गांवचा एक प्रकारें मालक म्हटल्यावर दुसरा न्याय संभवतच नाहीं: आणि खोत एक प्रकारचा मालक आहे ही गोष्ट हायकोर्टापर्यंत भांडणें होऊन आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. तेव्हां माझ्या तंबूभोंवतीं जमलेले कुणबी लोक उघडे नागडे व गरीब होते व त्यांचीं पोटें खोल गेलेलीं होतीं वगैरे बाष्कळपणाच्या गोष्टी कौन्सिलांत सांगून हल्लीच्या बिलाचें समर्थन करणें म्हणजे निव्वळ धाडसाचें, अन्यायाचें अथवा जुलमाचें काम होय. खोताची समजूत घालून मागें ज्या

प्रमाणें सन १८८० चा कायदा केला तशी जर आतां कांहीं तडजोड केली तर त्यापासून कुळांचा कांहीं फायदा होणार नाहीं असें नाहीं; कारण कुळावांचून खोताचें चालावयाचें नाहीं; व खोतावांचून कुळाचें चालावयाचें नाहीं, अशी दोघांचीहि सामान्यतः समजूत असल्यामुळें एकमेकांचें ते नुकसान करण्यास प्रवृत्त होतील असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु तेवढ्याकरितां विनाकारण आपल्या हक्कांची खोत लोक पायमल्ली करून घेतील असें जर सरकार समजत असेल, तर ती मात्र निव्वळ चूक आहे. आजपर्यंत खोतीसंबंधाचे दावे कोर्टांत बरेच गेले आहेत; व अद्यापहि जरूर पडल्यास कायदेशीर हक्कांचा निकाल खोत कोर्टामार्फत करून घेतील असें आम्हांस वाटतें; व त्यांनीं तसें करण्यास चुकूं नये अशीहि आमची त्यांस सूचना आहे.

कुळांकडून खोतास दरवर्षीं उत्पन्नाच्या मानानें अर्धेल किंवा तिर्धेल मिळत जावी यांतच वास्तविक पाहतां दोघांचेंहि हित आहे. अशा व्यवस्थेनें एखादे वर्षीं पीक जास्त आल्यास त्याचा फायदा ज्याप्रमाणें खोतास मिळतो, त्याचप्रमाणें एखादे सालीं शेताचें उत्पन्न कमी झाल्यास त्या मानानें कुळावरचें ओझेंहि त्या सालीं कमी होतें. सारांश, दरवर्षीं होईल तें उत्पन्न निम्मेंनिम किंवा दोन हिस्से व एक हिस्सा असें वाटावयाचें असा नियम असल्यानें कोणासहि नक्त साऱ्याचें जसें ओझें वाटतें, तसें या अर्धेल तिर्धेलीचें वाटत नाहीं. शेतांत दोन कणसेंच उत्पन्न झालीं तर खोत त्यांतलें एकच घेणार; नाहीं तर त्यांतलें कांहीं नाहीं. नक्त सारा ठरविला म्हणजे मात्र तो दरसालीं दिला पाहिजे. मग उत्पन्न होवो वा न होवो. नक्त साऱ्यापेक्षां शेताच्या उत्पन्नाचा कांहीं भाग दरसाल देणें शेतकऱ्यांस जें अधिक सोईचें वाटत त्याचें कारण हेंच होय; व सन १८७६ सालीं खोतीसंबंधानें जो एक सरकारी ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यांतहि अशा व्यवस्थेपासून रयतेस होणारा फायदा सरकारनें प्रांजलपणें कबूल केला आहे. आतां ऐवढें खरें आहे कीं, दरएक गांवचीं आभावणीपत्रकें तयार करावयाचीं, आणि त्याप्रमाणें खोतास वसूल करून देववावयाचा, हें काम प्रत्येक कुळाकडून साऱ्याचे नक्त पैसे वसूल करून घेण्याच्या कामापेक्षां अधिक खटपटीचें व त्रासाचें आहे. पण तेवढ्यासुळें खोतीची व्यवस्थाच वाईट किंवा खोती गांवांतील कुळें फार वाईट स्थितींत आहेत, असें म्हणतां यावयाचें नाहीं. रत्नागिरी जिल्हा देशावरील जिल्ह्याप्रमाणें सुपीक नसूनहि तेथें लोकसंख्येचें मान अधिक आहे, ही गोष्ट सरकारी रिपोर्टवरून कोणासहि सहज कळून येण्यासारखी आहे; व अशी जर स्थिति आहे तर रत्नागिरींतील रयतेच्या गरीबीबद्दलचा दोष सर्वस्वीं खोतांच्या आंगावर टाकणें मूर्खपणाचें काम आहे. आतां घांटावर रोख साऱ्याचा वसूल करण्यास सवकलेल्या कांहीं कलेक्टरांस जर रत्नागिरी जिल्ह्यांतील वसुलीच्या कामाची दगदग वाटत असेल, तर त्यांच्या खुषीकरितां खोतीच्या हक्कांत

ढवळाढवळ करण्यापेक्षां त्यांस सरकारनें आधींच तेथें पाठवूं नये, हें अधिक चांगलें. रयतेचें कल्याण होऊं नये, असें आमचें बिलकुल म्हणणें नाहीं. गरीब लोकांस दोन पैसे जास्त मिळाल्यास ते पाहिजे आहेत. पण त्याकरितां ज्याप्रमाणें त्यांस चोरी करण्याचा कायद्यानें अधिकार दिलेला नाहीं, त्याचप्रमाणें त्यांच्यासाठींच कां होईना पण खोताच्या खिशांतले पैसे काढून ते त्यास देण्याचा सरकारास हक्क नाहीं. तशांत सर्वच खोत कांहीं श्रीमंत आहेत असें नाहीं. खुद्द न्यूजंटसाहेब यांनींच आपल्या भाषणांत असें सांगितलें आहे कीं, खोती गांवच्या खोतीचे हिस्से पडून कोणी पैशाचा तर कोणी पैचा वतनदार अशी स्थिति आलेली आहे. अशा प्रकारें गरीबीस आलेल्या खोताच्या तोंडांतील घांस काढून तो दुसऱ्या कोणास तरी देण्यांत काय पुरुषार्थ आहे, हें आम्हांस तरी समजत नाहीं ! मग जरा समजुतदार व आपल्या हक्काकरितां भांडणारे असे खोत काढून टाकून त्यांच्या ऐवजीं अक्षरशून्य कुळें तेवढीं रहावीं इतकाच हें बिल करण्यांत जर सरकारचा हेतु असेल, तर मग या बिलापेक्षां दुसरी कांहीं तरी युक्ति काढून एकदम सर्व खोत लोक मागें हबशाच्या राज्यांत वहिवाट होती त्याप्रमाणें गोणत्यांत घालून बुडवून टाकल्यास फार चांगलें होईल !

सरकारी अधिकाऱ्यांचें व विशेषेंकरून पैमाषखात्यांतील व मुलकी खात्यांतील अधिकाऱ्यांचें नेहमीं असें म्हणणें असतें कीं, जमिनीवरील सरकारी सारा सरासरीनें दरसाल पिकाचे किंमतीच्या सहाव्या हिश्शाचे किंमतीपेक्षां कधींही जास्त नसतो. म्हणजे मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणें इंग्रज सरकार जमिनीच्या उत्पनाचा षष्ठांशच घेत असतें ! आतां आमच्या सरकारचे खावयाचे एक व दाखवावयाचे एक असे दांत असल्यास आम्हांस माहीत नाहीं. पण तशी स्थिति जोंपर्यंत निदान सरकार कबूल करीत नाहीं तोंपर्यंत सरकारी साऱ्याचें मान षष्ठांशच आहे, असें आपणास घेऊन चालण्यास कांहीं हरकत नाहीं. शेताच्या उत्पन्नापैकीं निम्में उत्पन्न शेतकऱ्यानें द्यावें आणि राहिलेल्या निम्मेपैकीं तृतीयांश (म्हणजे एकंदर उत्पन्नाचा षष्ठांश) खोतानें सरकारांत भरून बाकी आपल्या मालकी हक्काकरितां द्यावें असें या प्रमाणावरून निष्पन्न होतें. म्हणजे खोतास जेथें अर्धेल मिळत असेल तेथें साऱ्याच्या दुप्पट तरी रक्कम त्यास हल्लीं मिळते व मिळाली पाहिजे, असें उघड हिशोबी सिद्ध झालें. असें असतां रुपयाला दोन आणे, किंवा फार झालें तर रुपयाला रुपया मिळण्यापुरताच कलेक्टरनें खोतास मदत द्यावी असें जें हल्लींच्या बिलांत दाखल केलें आहे तें काय म्हणून ? कुळांकडून ऐन जिनसी अर्धेल तिर्धेल घेण्याची पद्धत जर सरकारास मान्य नसेल तर निदान खोतास त्या ऐन जिनसी वसुलाच्या मानानें रोख रक्कम मिळेल अशी तरी अवश्य तजवीज झाली पाहिजे. परंतु हल्लींच्या बिलांत त्याप्रमाणें कांहींच व्यवस्था केलेली नाहीं, इतकेंच नव्हे तर

उलट खोती हक्काची किंमत साऱ्याचा एक अष्टमांश अथवा रुपयाला दोन आणे करून टाकण्याचा विचार आहे. हा विचार अर्थातच अगदीं अन्यायाचा आहे. हें सांगावयास नकोच. अर्धेलीची किंमत ठरवावयाची असल्यास ती साऱ्याच्या निदान दुप्पट तरी ठरविली पाहिजे, व कोणच्याहि कारणानें सारा वाढविल्यास त्या मानानें सदर किंमतहि वाढविण्याबद्दल त्यास शर्त असली पाहिजे, नाहीं तर वाढत्या उत्पन्नाचा वांटा हल्लीं ज्याप्रमाणें खोतास मिळतो त्याप्रमाणें पुढें मिळणार नाहीं. परंतु एवढा खटाटोप करून त्यापासून सरकारास कांहीं फायदा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांतील कुळांस तरी रोख रुपये देण्यापेक्षां निम्में उत्पन्नच देणें अधिक सोईवार वाटेल असें आम्हांस वाटतें; व सरकार ज्या हेतूनें हल्लींचें बिल करीत आहे तो हेतु तडीस न जातां कुळांस सरकारास एक, तर खोतास दोन असे रुपये रोख देण्याचें भाग पडल्यास कुळाची सर्व इष्टेट लवकरच खोताकडे गहाण पडून लवकरच ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्ट मात्र रत्नागिरी जिल्ह्यास लागू करण्याची पाळी येईल. असला नसता उपद्व्याप करण्यापेक्षां आहे हींच स्थिति कायम राखणें हेंच अधिक शहाणपणाचें काम आहे. सरकारी अधिकाऱ्यांस हल्लींच्या व्यवस्थेनें थोडाबहुत अधिक त्रास पडत असल्यास तो लोकांच्या हिताकरितां त्यांनीं सोसला पाहिजे; व त्यांच्या तक्रारीकडे सरकारनेंहि तादृश लक्ष पुरवितां कामा नये. न्यूजंटसाहेबांनीं आपल्या तंबूवर आलेल्या कुळांची स्थिति वर्णन केली आहे. पण आमचा त्यास एवढाच प्रश्न आहे कीं, हल्लींच्या व्यवस्थेबद्दल कुळांकडून कांहीं मुद्देसूद तक्रार अगर अर्ज सरकाराकडे आला आहे काय? पैसा कोणास नको आहेसा नाहीं. खुद्द कौन्सिलदारांचीच गोष्ट घ्याना ? त्यांस जर उद्यां पांचाचा दहा हजार रुपये पगार झाला तर ते नको म्हणतील काय ? कुळांचीहि स्थिति याचप्रमाणें किंवा याहूनहि अधिक वाईट आहे, हें आम्ही प्रांजलपणें कबूल करितों. प्रश्न एवढाच आहे कीं, अर्धेल तिर्धेलीपेक्षां कमी भाग आम्ही खोतास देऊं असें म्हणण्यास कुळांस कांहीं अधिकार आहे किंवा नाहीं व असा अधिकार जर त्यांस नसेल तर त्यांच्या अगर त्यांच्या वतीनें फुकटी कळकळ बाळगणाऱ्या लोकांच्या म्हणण्यास कांहीं एक मान मिळणार नाहीं. मग निव्वळ अधिकाराच्या जोरावर सरकार जुल्लूम करील, तर सरकार तसें करण्यास नेहमींच मुखत्यार व समर्थ आहे.

* खोतां हक्कावर घाला

नंबर ६.

खोतलोकांच्या हक्काची सरकारनें कशी पायमल्ली चालविली आहे हें आजपर्यंत केलेल्या विवेचनावरून कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखे आहे. सरकारी अधिकाऱ्यांचा सामन्यतः असा समज झाल्यासारखा दिसतो कीं, जमीन कसणारे कुणबीलोक अथवा कुळें हेच जमिनीचे खरे मालक असून खोतानें त्यांस फसवून आपलें घोडें विनाकारण मध्यें ढकलेलें आहे. एकदां मनाची अशी समजूत झाली म्हणजे प्रत्येक सरकारी अधिकारी खोतांचे हक्क होईल तितके कमी करण्याचा प्रयत्न करण्यास स्वभावतःच प्रवृत्त होतो. करितां या प्रश्नाचा जेव्हां जेव्हां विचार करण्याचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां खोत हे कोणी उपटसूळ नसून पहिल्यापासून गांवांतील जमिनीवर त्यांचा कायदेशीर हक्क आहे, हा मुद्दा मुख्यत्वेंकरून पुढें आणला पाहिजे. खोतांचें अस्तित्व व बचाव ह्या एकाच मुद्यावर अवलंबून आहे. व कै० राव० मंडलीक यांनीं कित्येक वर्षें भांडून जी गोष्ट न्यायाच्या कोर्टांत सिद्ध करून घेतली ती हीच होय. हा मुद्दा एकदां सुटला म्हणजे मग खोतांचें तारूं सरकारच्या मर्जीच्या वाऱ्याबरोबर पाहिजे तिकडे भडकत जाण्यास कोणताहि प्रत्यवाय रहावयाचा नाहीं, ही गोष्ट खोतांच्या तर्फें भांडणारांनीं नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. कुळांकडून खोतास जो ऐवज मिळावयाचा तो खोतांचा हक्क म्हणून त्यांस मिळावयाचा आहे, मेहरबानी म्हणून नव्हे; व खुद्द सरकारासहि हा हक्क नाकबूल करण्याची आतां खवड राहिली नाहीं. फार झालें तर कुळांकडून खोतास मिळणारा ऐवज कोणत्या रूपानें मिळावा, म्हणजे नक्त मिळावा किंवा ऐनजिनसी मिळावा एवढ्याबद्दलच सरकारास ठराव करतां येईल. परंतु यापेक्षां सरकार खोतीहक्कांत जर जास्त हात घालूं इच्छील तर लोकांचे हक्क मोडल्याबद्दल सरकारावर अद्यापहि दिवाणी दावा होऊं शकेल असें आम्हास वाटतें. करितां खोतांच्या तर्फेनें भांडणारे जे लोक आहेत त्यांनीं, अगर खोताच्या सभेनें या कायद्याच्या प्रश्नासंबंधानें कायदेपंडितांचीं मतें आधींच घेऊन ठेवून आपल्या पक्षाचें पुष्टीकरण करून ठेवावें, अशी त्यांस आमची सूचना आहे. सरकारच्या नजरेस ही गोष्ट पूर्णपणें पुनः आणल्याखेरीज हल्लींच्या बिलासंबंधानें जो शुष्क वादविवाद चालला आहे तो बंद पडणार नाहीं.

खोत लोकांस आमची दुसरी अशी सूचना आहे कीं त्यांनीं मागें ज्याप्रमाणें एकत्र होऊन कै. मंडलीक यांच्या मदतीनें आपले हक्क शाबूत राखण्याचा

---

* (ता. ११ एप्रिल १८९९)

प्रयत्न केला होता त्याप्रमाणें आतांहि केला पाहिजे. खोतांच्या जनरल ॲसोसिएशनची एक सभा रत्नागिरी येथें नुकतीच भरली होती, पण तेवढ्यानें सर्व काम भागेल असें नाहीं. दर एक तालुक्यांत याचप्रमाणें सभा भरविल्या पाहिजेत व त्या सभांमार्फत लागेल ती माहिती व पैसे खोतांच्या पुढाऱ्यांस पुरविण्याची तजवीज झाली पाहिजे. मागें कै. मंडलीक ह्यांनीं ज्याप्रमाणें स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून खोतांचें काम केलें, तसें करणारा आतां कोणी गृहस्थ उरला नाहीं. याकरतां खोतांनीं आपण होऊन आतां सर्व तयारी केली पाहिजे. हें काम सभेंत नुसते ठराव करून होणारें नाहीं. त्यासाठीं गांवोगांव हिंडणारा हुषार इंग्रजी शिकलेला व कायदे जाणणारा मनुष्य स्वतंत्र एवढ्याच कामाकरितां ठेवला पाहिजे. या मनुष्यानें आपलें काम सतत सुरू ठेवून खोतांच्या सभेच्या सेक्रेटरीस अगर नामदार खरे वगैरे मंडळींस जरूर लागेल तें साहाय्य नेहमीं केलें पाहिजे. हल्लींचें खोतीबिल रद्द करावयाचें असल्यास त्यास बरीच खटपट करावी लागेल. कायदेकौन्सिलांतील प्रत्येक सभासदास या प्रश्नाची सर्व हकीकत खोताच्या वतीनें समजून दिली पाहिजे; आणि वर्तमानपत्रांत त्याबद्दल नेहमीं चर्चा सुरू ठेवून जरूर पडल्यास हिंदुस्थानसरकार व विलायतसरकार अथवा पार्लमेंटपर्यंत जाण्याचीहि तयारी असली पाहिजे. एवढा उद्योग जेव्हां करावा तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांच्या इच्छेस कांहीं आळा बसला तर बसेल, नाहीं पेक्षां खोतांचे हक्क बुडविण्याची त्यांची इच्छा अमलांत आणण्यास ते कधींहि मागें पुढें पहावयाचे नाहींत. ज्याचें पोट दुखतें तो ओंवा मागतो हें तत्त्व इंग्रज लोकांच्या हाडीं खिळून गेलें असल्यामुळें कोणी मुकाट्यानें आपले हक्क बुडवून घेईल ही गोष्ट त्यांस खरी देखील वाटत नाहीं. करितां अशा वेळीं प्रत्येकानें होईल तेवढी ओरड केली पाहिजे, इतकेंच नव्हे तर जरूर पडल्यास सरकारवर फिर्याद करण्यासहि तयार झालें पाहिजे. तसेच आपल्या जिल्ह्याच्या वतीनें जो मनुष्य कायदेकौन्सिलांत पाठवावयाचा तोहि या प्रश्नाची पुरी माहिती असलेला व खोताच्या हक्काबद्दल काळजी घेणारा असावा अशाबद्दलहि एव्हांपासून तरतूद ठेविली पाहिजे. सारांश ज्या ज्या गोष्टीनें कायदेकौन्सिलांत आपल्या पक्षास बळकटी येईल ती गोष्ट करावयास यावेळीं चुकतां कामा नये; व तसें होण्यास ह्या कामासाठीं कांहीं महिने तरी स्वतंत्र मनुष्याची नेमणूक केल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें खोतलोकांस येथें सूचना करणें अवश्य आहे, ती ही कीं त्यांच्या हक्काचा त्यांनीं ह्या वेळीं पूर्ण विचार करून सरकारानें पूर्वीप्रमाणें एखादी तडजोड काढल्यास ती न्यायाची अगर अन्यायाची आहे, हें सिद्ध करून देण्यास त्यांनीं नेहमीं तयार असलें पाहिजे. शेताच्या उत्पन्नापैकीं जो निमे अगर तृतीयांश भाग खोतास मिळत असतो

त्याऐवजीं रोख पैसा कुळांकडून घ्यावा असा ठराव सरकार करूं इच्छित असेल तर तो कोणत्या रीतीनें अमलांत आल्यास आपलें नुसकान होणार नाहीं याचाहि खोतांनीं आतां विचार केला पाहिजे. कारण केव्हां ना केव्हां तरी हा प्रसंग आल्याखेरीज राहील असें वाटत नाहीं. भातशेत व वरकस या दोन्ही ठिकाणीं साऱ्याचें व दरसाल सरासरी उत्पन्नाचें प्रमाण काय पडतें याबद्दल तपशीलवार माहिती गोळा करून ती सरकारापुढें मांडली पाहिजे; त्याचप्रमाणें वरकस जमिनीच्या बाबतींत त्या जमिनीची दरसाल लागवड होत नसते यामुळें उत्पन्नाचें व साऱ्याचें प्रमाण भातजमिनीप्रमाणें येथें बसविता येत नाहीं, हेंहि सरकारच्या नीट नजरेस आणून दिलें पाहिजे; ही माहिती सरकारी पैमाष खात्यांतील अथवा शेतकी खात्यांतील अधिकाऱ्यांस नाहीं असें नाहीं; पण लोकांकडून ती पुढें आल्याखेरीज सरकारची खरी माहिती आधीं बाहेर पडावयाची नाहीं. सरकारी सारा जमिनीच्या सरासरी वार्षिक उत्पन्नाच्या एक षष्ठमांश आहे असें सरकारी अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे. हें खरें धरलें तर साऱ्याच्या दुप्पट किंवा निदान साऱ्याइतका तरी ऐवज नेहमींच कुळांकडून खोतास मिळाला पाहिजे असें उघड सिद्ध होतें. परंतु या सामान्य नियमावर अवलंबून राहण्यापेक्षां या बाबतींत खोतांच्या तर्फेनें स्वतंत्र माहिती गोळा करण्याची तजवीज करणें इष्ट व जरूर आहे. वरकसीसंबंधानें तर अशा प्रकारची माहिती गोळा केल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. सर्व वरकस जमिनीचा सारा खोतास भरावा लागत असून त्यापैकीं कांहीं भाग मात्र दरसाल लागवडीस येऊन बाकीचा पडित रहातो. तेव्हां एकंदर साऱ्याचें सरासरीनें वार्षिक उत्पन्नाशीं प्रमाण ठरवितांना वार्षिक उत्पन्न, कांहीं भागाचें व सारा सर्व जमिनीचा ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. अशा रीतीनें माहिती गोळा झाली म्हणजे अर्धेल–तिर्धेलीचें साऱ्याशीं चांगलें प्रमाण दर्शविलें येऊन त्यासंबंधानें कांहीं तडजोड निघाल्यास त्याचा विचार करण्यास ठीक पडेल.

देवगडच्या प्रकरणावरून आणखी जी एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते ती ही कीं, सरकारास ज्याप्रमाणें आपला सारा वाढविण्याचा अधिकार आहे तसा खोतास नाहीं. यामुळें आज देवगड तालुक्यांत जी अडचण आली आहे तीच पुढें मागें केव्हांहि इतर तालुक्यांत येण्याचा संभव आहे. ही अडचण दूर करण्यास साऱ्याचें व खोती हक्काचें प्रमाण ठरविल्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. साऱ्याच्या प्रत्येक रुपयावर दोन आणेप्रमाणें सरकार खोत–फायदा ठरविण्यास कबूल आहेसें दिसतें, पण हें प्रमाण फारच कमी असल्यामुळें लोकांस कधींहि मान्य व्हावयाचें नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें माहिती गोळा करून ती प्रसिद्ध झाल्यास साऱ्याचें व खोत–फायद्याचें प्रमाण नीट बसवितां येईल व सरकारासहि ते कबूल करावें लागेल. सरते शेवटीं इतकच दुरुस्त करावयाचें आहे कीं, या बाब-

तींत जो कांहीं एकमेकांच्या विचारानें निकाल लागेल त्याप्रमाणें नव्या सनदा मिळण्याबद्दल खोतांनीं मागणी केली पाहिजे. नुसता कायदा होऊन कांहीं उपयोग नाहीं हें आतां चांगलें अनुभवास आलें आहे. सन १८८० सालीं जो एकमेकांच्या समजुतीनें कायदा पास झाला तो बदलण्यास जर आज सरकार तयार झालें आहे, तर आज पास केलेला आणखी दहा पंधरा वर्षांनीं सरकार बदलणार नाहीं कशावरून ? सन १८८० च्या कायद्यांत "तडजोड" हें शब्द कोठें नमूद केलेले नाहींत, म्हणून तो कायदा एकमेकांच्या विचारानें पास झालेला नाहीं असें म्हणण्यास ज्याप्रमाणें आतां ना० देसाई तयार झाले आहेत त्याप्रमाणेंच पुढेंहि हल्लींच्या कायद्याबद्दल आक्षेप घेण्यास त्या वेळचा सरकारी नोकरींत असलेला एखादा देसाई निघणार नाहीं कशावरून ? याकरितां हल्लीं जर कांहीं तडजोड करून अखेर निकाल लावावयाचा असेल तर त्याप्रमाणें सरकारापासून नव्या सनदा खोत लोकांनीं घेतल्याखेरीज राहूं नये, अशी त्यांस आमची सूचना आहे. घांटावर जेव्हां 'समरी सेटलमेंट' झालें तेव्हां याप्रमाणें सनदा देण्यांत आल्या आहेत, करतां तीच पद्धत खोतास लागूं करण्यास कांहीं हरकत नाहीं. सनदेनें झालेल्या निकालास जितकी बळकटी असते तितकी कायद्यानें केलेल्या व्यवस्थेस नसते हें आतां उघड सिद्ध झालें आहे.

येणेंप्रमाणें आम्हांस या विषयासंबंधानें ज्या कांहीं सूचना करावयाच्या होत्या त्या करून या विषयाचें सामान्य विवेचन आज पुरें केलें आहे. या संबंधानें आणखी लिहावयाचें तें वेळोवेळीं पुढें लिहिण्यांत येईल.

सूचि

अ

अकबर १४.
ॲग्रिकल्चर रिलीफ ॲक्ट २४३.
ॲंड्रयू फ्रेझर ५८०.
ॲनिबेझंट १५.
अनंत ३.
अबंदुल रहिमान ३०५,३०७.
अमीर-काबूल ३५९.
अमृतबझार ३,२२७,५६९,५७४.
अयूबखान ३०७.
अयोध्यानाथ पंडित ५६५.
अयंगार डॉ. राजम् ८१,८४.
अलिगड कॉलेज १७,१८.
अलेक्झांडर मेकॅन्झी ५२.
अवरंगझेब ३८६.
ॲप्टिल लॉर्ड ५८४,८५,८६,८८.

आ

आनदाचार्लू ना. ३२१,४८९.
आपटे वामन शिवराम ७३.
आरबीपाशा ३०४,
आस्टन मि. २८०,५७९.

इ

इचलकरंजीकर ना. २८१.
इन मि. १५९.
इनॉक्युलेशन १२१,१३१,१३३-१३९,१६१-१६३,१६९,३७४.
इबेटसन सर डॅंझिल ४७२,४७६,७७,७८.
इंडियन मिरर ५१७.
इंडियापत्र ५३७,५५१,५५३,५६३,५६७,५६९.
ईस्ट ॲन्ड वेस्ट (मासिक) ४७८,४८२.
ईस्ट इंडिया असोसिएशन २६५.

ए

एडवर्ड सातवे २२३.
एडवर्ड लॉसर ३१७,३३२.
एल्जिन लॉर्ड ५८,३०९,३६६.
एज्युकेशन कमिशन ६८,७२,७३.
एल्फिन्स्टन कॉलेज १९४,२९९,३६६.

ओ

ओक विनायक कौंडदेव २१२.
ओकाकुरा प्रो. ४२२-४२६.

क

कट्टी १६१.
कॅमरॉफ ३०८.
कामिन २८०.
कर्कॅरिया ३४,३६,३७,४०,४१.
कर्झन लॉर्ड १५,५३,५४,५५,५६,५८,१५८,२२३, २२४, २२५,२२८,२३३,२३५,२३६,२८०,२८२,२८७,३१८,३२१-३२६,३३०,३३१,३३४,३५५,३६७,३७३,३८५,३९६-४०३;४२८,४३५,४४१,४७४,४९०,४९१;४९४,५०३,५०४,५०७,५०८,

५१०-५१४,५१६,५१७,५२२,
५२३,५२४,५३१,५३२,५३३,
५३७,५३८,५४२,५४३,५४५,
५४६,५५४,५६५,५६७,५७०-
५७६,५९७,५९८.
करंदीकर रामचंद्र बाळाजी १६१,
१६३.
कॉंग्रेस (रा. सभा) १३,१४,१८,
१९, २०, ४८, ५१, ६७, ७८,
१२९,१३२,१५६,२२३ २२८,
२३१,२३२,४७८-४९०,५२९,
५३०,५३१,५३३,५५१,५५२,
५५३,५५६,५५८,५६३-५६८,
५९४,५९५,५९८.
कॉटन सर हेनरी ३४४,३४७,५५१,
५५२,५५८,५६३,५६७,५६८,
५९५–५९८.
काब्राजी मि. २०२.
कायदेकौन्सिल ५०,१०१,१०२,
११०,२४२,२४६,२४७,२५०,
२५१,२५३,२५४,२६४,२६८,
२७०,२७४,२७६,२७८,२८२,
२८३,२८५,२८६,३३९,४५१,
४५५,४५६,४५९,४६३,४६९,
४७२,४७३,५०८,५२८,५३१,
५४०,५९५,५९९,६१२,६१३,
६१९,६२४.
कॉर्टर डॉ. ८०.
क्राफर्ड १२३,२८९.
क्रामवेल ३७,३८.
कालिनाथ मित्र ५२.
किचनेर लॉर्ड २८५.
किटॅसॅटो डॉ. २९,९४,५६२.
किर्लोस्कर १६१.
कीर्तने निळकंठ जनार्दन ६५
क्लिथर्न कर्नल ४९१,४९३,४९४.
कुरोकी ५६२.
केतकर २१४.
केन ३४४,३४५,५५२.
केसरी २,७३,७८,८०,१०१,२०१,
३०४,५३९,५४०,५४१,५७७.
केसरीकार २,४,५,६,११,७८,७९,
८९,९२,१९४,५३९.
कळकर (एडिटर पुणें वैभव) ९८.
,, नरसिंह चिंतामण ३,१८८.
क्लेमंटस् ५७९.
कोर्टने मि.२६५.

ख

खरे दाजी आबाजी २७९, २८०,
२८४,३४२,४२६,४२८,४२९,
४३०,४३२,४६०,५८९,५९१,
५९३,६०३,६१२,६१३,६२४.
खाडिलकर कृ. प्र. ३.
खानोलकर १६१.
खुर्द गणपत बाळोबा १८८.
खोती ॲक्ट १२३,३४०,४५६-६०,
५९९,६०३,६०५,६०६,६०७,
६०८,६११,६१२,६१३,६१४,
६१६.
खोतीबिल ४५५,४५९,४६२,६१२,
६१७,६१८,६१९.

ग

गणपतिउत्सव १०२,१९७.
गर्दे डॉ. १८८.
गार्डन सा. ३०४.
गुरुजी कृ. आ. ८०–८४,१३९,
१६१-१६४.

ले प्रो. (ना.) ११९,२५४, २६२,२७९,२८०,२८४,३१७, ३१८.
ब्रँटडफ ३४,२२९.
गोळे प्रो. २१३.
ग्लॅडस्टन मि. १०५,२१२,२८५, ३०४,३१४,४४२,४४३,५५७.

घ

घरत रा. १४३—१४४.
घोले डॉ. ९२.
घोस अमृतलाल ५२.
घोस एन्. एन्. ५२.
घोसाळ ५२.

च

चॅटफिल्ड मि. १२३,१९६.
चाफेकर दामोदर ९८.
चिटणीस १०६.
चितळे २१३.
चिपळूणकर लक्ष्मण कृष्ण २३०.
चुनीलाल २८०,२८१.
चेंबर ऑफ कॉमर्स बंगाल ३९६,४०१.
,, ,, ,, इंग्लन्ड ४०३.
चेंबर्लेन ४४१—४४५;४४८—४५०.
चंदावरकर १२८,१२९,१३१.

छ

छत्रे ना. २५४,२६२.

ज

जमशेटजी जिजीभाई २०२.
जाइल्स सा० ४,९,१४९,१९३, १९४,१९५,१९७, २०५,२१० २१४.
जार्डिन १६८,५६७,५६८.
जेम्स मि. ४४.
जोगळेकर २४,२५.
जोशी सदाशिव परशुराम १८८.

झ

झांशीची राणी ३१४.

ट

टप्पर मि. ३१५,३८८.
टाईम्स ऑफ. इंडिया ३४,३५,३६, ४०,१३०,१३१, १५६, १६५, १६६, २०६, २६९, २७६, २८२, २८३, २८५, २८६, २८७, ३६९, ४६३, ५३५,—५३९, ५४१—५४५, ५४७.
टाटा मि. ५१७.
टार्मर ३४९.
टॉलस्टॉय ५४४.
टिळक ४३, ९८, २१३, ५३९, ५४१, ५७७, ५७९, ५८०, ५८१.
टेंपल सर रिचर्ड १२९,४१८,५१५.

ड

डफरिन लॉर्ड ३०१, ३०८, ३०९, ३१३, ३६६, ५६४, ५६५.
डर्बी लॉर्ड २२२.
डलहौसी लॉर्ड ३५६, ३५७.
डिग्बी मि. ५३०—५३३, ५५२, ५६४.
डघूकेट १७४, १७६, १७९, १८०, १८१.
डेक्कन ए. सोसायटी ७३—७७, १२२.
डेक्कन कॉलेज ७३, १४९,१९३.
डेक्कन सभा ११९, २६२.
डोडन कर्नल ३४६.

त

ताईमहाराज प्र. ५७७,५८०.
तेलंग २२९, ४७८, ४७९, ५६४.

थ

थॅकरे २९८, २९९.
थत्ते १८८.
थॉर्टन ३०४.
थॉमस मनरो सर ३४९.
थॉर्बर्न मि. २६५,३४४,३४५,३४६,
थिबाराजा ३०९.

द

दत्त मि. १५६,१५९,१६०,३४३.
दलाल चनप्पा १६१.
दादाभाई नवरोजी २२७,२९२,
२९४,२९५,२९७,३०२,३०३,
३४३,३९९,४८२,४८३,४८६,
५२४,५२९,५३०,५४३,५५८,
५६३,५६४,५८२.
दाभाडे सेनापति ३९.
दीक्षित ना. ३४२.
दुष्काळ ४९,५०,५९, ६८, १०८,
१११,११२,११५,१२२,१२५,
१४०,१४१,१४२,१४८,१४९,
१५०,१५६,१५७,१६०,१७०,
२२२,२४५,२४९,२५०,२६०,
२६४,२८१,३१९,३५८,३९६,
४१७,४१८,४१९,४२०,४२१,
४२२,४३१,४५४,४९७,५३९.
देशमुख डॉ. ९२.
देसाई रा. ब. २८०.
दोराबजी खा. ब. १८६.

दंगे हिंदु मुसलमान, १०६.
,, मुंबई १११,१२१,१२६.
द्रवीड ९८.

ध

धारगळकर डॉ. ८०,८२.
धीरनपाल १२,१३.

न

नरेंद्रनाथसेन ५२.
नातू तात्यासाहेब ९९.
,, बाळासाहेब ९८–१०१,१८८,
२३०.
,, बंधू ४४–४६,९९,१००,१०२,
१०६,११८,१२०,१३२.
,, सौ. लक्ष्मीबाई १००.
नाना फडणवीस ५०१.
नॉर्थकोट लॉर्ड १४१,१४६,१४७
१६७,१६८,१६९,१७०,२०६-
२०८,२१८,२५३,२५७,२६१,
२६४,५७८,२८०
निजाम ३७,४०.
निवर्गी १६१.
निळकंठराव रा. ब. २२९
नेपोलियन ४४५.
न्यूजंट मि. ४७,४९,५०,६१,११०,
१११,११४,१४०,१४४,१४५,
६१९,६२१,६२२.
नंदी आलफ्रेड २३४.

प

पटवर्धन अण्णासाहेब १८८.
,, गंगाधरशास्त्री ४१०.
पटेल मि. २०३.

परांजपे शिवराम महादेव ५३७, ५४१,५४२,५४३.
पॅस्टूर डॉ. ९४.
पायोनियर १२,१३,२१०,२११, २३४.
पारख २०६–२०७,२०८,२०९, २१०,२५८,२५९,२६२,२७९, २८०,२८४,२८९,२९१,३४२.
पॉटिंजर १७४,१७५,१७६,१७९, १८१–१८६.
पारनेल ३०४.
पुराणिक ४३.
पेशवाई १७,३९,५७,१७५,२४१, २४२,२८२,२९९,३६६,४२८, ४२९,४३१,४३४,५०१,५४९, ५९९.
पेशवे ३६–३९,१७५,१७८,३८६, ३८७,४९९.
,, नारायणराव ४१०.
पेंजदे प्र. ३५७.
प्रेसिडेन्सी असोसिएशन मुंबई २६७.
प्लेग (टोंचणें, कमिशन) ८, १०, २८,३०,३२,४९,५०,५५,५६, ५८,५९,६१-६५,६८,७८,७९, ८०,८१,८४—९३, ९५–९७, १००,१०१,१०८, ११४,११६, ११७,११९,१२५, १३३,१३८, १३९,१६३,१८१,१८८,१८९, २१५–२१८,३१९, ३५८,३७३ ३७५,३७६,३९६,४३१,४५४, ४६६,४९७,५३९,५४४.
पंत प्रतिनिधी ३९.

फ

फर्ग्युसन कॉलेज ७३,७४,१०५, १०९,१९७.
,, सर जेम्स ७४.
फॅमिन कमिशन १११,१४२,१४४– १४८,१५१,१५३,१५५, १६४, १६५,१६८–१७०,२९०.
,, कोड ११२,११३,११५, १२६,१४३,१४८,१४९,१५०, १५२.
फॅमिन फंड १५१,१५२.
फ्राय मि. १००
फ्रायर डॉ. ३४९.

ब

बर्डवुड सर जॉर्ज ५०१,५०२.
बर्नेट मि. १८८,१९२.
ब्रॅडलॉ २१,२८५,३०१,५६६.
बॅनरमन सर कँबेल ४४४.
ब्रॅडफील्ड मि. ५४.
बॅनरमन डॉ. २८,३०,३३,८२, ८५,८७,८८,९०.
बाउल्स मि. जिटसन ४३९.
बाजीराव पाहिले ३८,३९.
बानर्जी डब्ल्यू. सी. ४८६,५६४,
बानर्जी सुरेंद्रनाथ ४८९,५२९,५३३, ५६५.
बारी पांडुरंग रामजी ६१,६२.
बाळ (मॅ. केसरी) ९८.
ब्रॉडरिक मि. ४९६.
बाल्फोर मि. ३५९.
बिरजॅ मि. २००.
बिस्मार्क प्रिन्स ३२७,३२८,३३१.
बुचानन मि. ३३३,३३४.

बुक्स ॲडम्स २९७.
बुडन मि. ४१३.
बेअरिंग सर ३००.
बेक प्रिन्सिपाल १७.
बेकन लॉर्ड ५७०.
भट गंगाधर अनंत रा. सा. १७४.
भालू प्रो. ७५.
मालचंद्र डॉ. (सर) ७८–९०,९२, ९३,९४,९७;१२८,१२९,१३५, १६१,२६७,२७९,२८०, २८४, ३७३.
मांडारकर डॉ. ५१३–५१८.
मूर्धेंद्रनाथ बोस ५२.

म

मॅक्स मुल्लर प्रो. ३,५७२,५७३.
मॅक अर्थर रे २३८,४६४,४६५.
मॅकेंझी मि. म्यूर २८४,४२८,४२९, ४३१,४३२.
मॅकडोनेल सर ॲटनी ४१७,४१८.
मॅकनिकल मि. १८९,१९१.
मॅडम ब्लॅव्हॅटस्की १५.
मलबारी ११४,१९६,१९९,२०३, २०४,२०५,२१३, २१४,४७४, ४७५,४७८–४८४.
महंमद पैगंबर २००.
महादी ३०४.
मंडलिक रा. सा. ६०४,६२३,६२४.
मायदेव २४–२७.
माबजरकर व्यंकटेश अनंत १६१.
मॉंट गॉमेरी मॉंटिथ ३६५.
मॉंटिथ १११,११४, १४०, १४४, १४५,२०७,२४८,२४९, २५६, २५७,२५८,२६०,२६१, २८०, २८१,४५०,४५४,४५५.
मॉरिसन प्रो. १२,१७.
मेकॉले लॉर्ड ५०४.
मेथा ४४,४५,१०१,१२९,१३०, १३२,२५८,२६७,२७९,२८०, २८१,२८४,२८६,४६३,४८९, ५३३,५५३,५६४.
मेकॅनेकी मि. २७७,२८९,२९१.
मोडक २१३.
मोलें ५५७.

य

यारसिन डॉ ३२,३३,९४,९६.
युनाइटेड इंडिया ५६९.

र

रमाबाई पंडिता १९७.
रॅंड (खून) ४२,९८,४१३,५००.
राइट डॉ. ८८.
रानडे न्या. ३४,१३१,१९६,१९९, २००,२२९,२३०, ४७८,४७९, ४८१,५६४.
रॉबर्टस् लॉर्ड ३०६.
राव डॉ. ९४.
रिपन लॉर्ड १४,१५,५५,५७–६०, १२३,३०८,३०६,३०७, ३०८, ३१४,३२२,३६६,५६४.
रीस मि.४९६,४९७,४९८.
रे लॉर्ड १०५,१२९,५८५.
,, कर्नल १२४.
,, मि. ३४९.
रोल्ट मि. ५७७–८१.

ल

लल्लुभाई सामळदास २७५
लॅन्डरेव्हिन्यूकोड ६७,२४३,२४४,

२५८,२५९,२६०, २६५,२६६,
२७४,४६०,६०९,६१५.
लॅन्सडाउन लॉर्ड ३०९,३६६.
लॅमिंग्टन लॉर्ड ५४०,५४१,५४७.
लँब मि. ११८.
लॉयल जेम्स सर २६५.
लॉरेन्स सर डब्ल्यू ४७४,४७५,४७८.
ब्लॉच मि. ३३१.
लिटन लॉर्ड ३०६,३०७,३२४,
५७४.
ली वॉर्नर ३७,२७५,३१५,३८८,
४९६–५०२.
ली मि. ५७७, ५७८, ५७९.
लीस्टर लॉर्ड ८८.
लेली मि. २४४,२४९,२८०,२८४,
२८९,४६३,४६४, ४६५,४६६.

व

वाच्छा मि. १३१.
वॉट २९७.
विवेकानंद १५,४२४.
विलियम डिग्बी २२७,२९२,२९४–
३००,३०२,३०३, ३२६,३४३.
विंचुरकर २८०,२८१.
वेडरबर्न सर डब्ल्यू ४२,४३,४६८,
४६९,५२९,५४३, ५५१,५५२,
५५३,५५५,५५७, ५५८,५६३,
५६५,५६८,५९४.
वेस्ट मिलंडसाहेब ४९,५०.
वेब मि. १५६–१५९.
वेल्बी ३५८.
वैद्य सातारकर २८८.

श

शिवाजी ३४-३९;२२९,२३०,३८९,
४३३,४८३,५३९.
,, उत्सव ३४,३६,७५,१०२,
२३०,२३२.
श्रीधर विठ्ठल कै. ३९८.
श्रीराम ऑ. ३१८.

स

सँढर्स्ट लॉर्ड ४६,५८,५९,६५,७२,
९९,१०१,१०३, १०४, १०६–
११०,११२-१२२,१२४–१३०,
१३२,१४०,१४१.
संभाजी ३०.
,, महाराज ३८९.
सय्यद अहमद सर १७,२३३.
सॅलिबरी लॉर्ड १५७,३७८,३८२.
सातारचे राजे ३८,३८८.
साठे प्रो. ११३.
सार्वजनिक सभा (पुणें) ११०,
११२,१४०, १४२,१४४,१६४,
१६५,१७०,२५७.
स्ट्रॅची साहेब ६,३५.
स्टीव्हन्स मि. २६५.
स्मिटॅन मि. ५६६–५६८.
सुखिया डॉ. ८२,८३.
सुब्बराव व्यंकट ५८५.
सेटलवाड १३१.
स्टेड मि. ५३३,५९५.
स्पेन्स ३०१.
सोमण महादेव रामचंद्र २०१.

ह

हर्ड मि. ५७८,५७९.

हंटर ५०६.
हॅमिल्टन लॉर्ड जॉर्ज ४१–४३,१०१, १५९,२९५,३०२, ३०३,३०८, ३३३,३४४–३४६,३५५,३५६, ५३३.
हर्बर्ट स्पेन्सर ३७४,३७६.
हॅरिस लॉर्ड १०३–१०६;१०९, १२६.
हॅवलॉक लॉर्ड ७२.
हाफकिन डॉ. २८,३०,३२,३३,८२, ८५,८७–९१, ९३, ९६, ९७, १३५–१३७.
हिंडमन मि. ५३७, ५४२–५४५, ५९४.
व्हिश मि. ३४४,३४५.
हिंडरसन न्या. ५७८.
ह्यूम. ए. ओ. ४८२–४८४,४८६– ४९०,५२९,५३०,५५१, ५५२, ५६५,५६६,५६८,५९४.
होळकर ३९.
,, अहिल्याबाई ३८७.
,, खंडेराव ३८७.
,, तुकोजीराव ३८७,३८९,३९१, ३९४.
,, बाळासाहेब ३८४–३९५.
,, मार्तंडराव ३८७.
,, यशवंतराव ३८६–३८८,४१०.
,, हरीराव ३८७.

REFBK-0002461